।। रामकृष्णहरी ।।

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

संत नामदेव गाथा – शब्द अभंग चरण सूची

संकलन आणि संपादन

ह. भ. प. श्री. चकोर श्रीकृष्ण बाविस्कर

श्री. आदेश वसंत अत्रे

अद्वैत पब्लिकेशन्स्
बिल्डींग नं. ८, फ्लॅट नं. ६, आनंद पार्क सोसायटी, शंकरशेट रस्ता, पुणे ४११ ०३७.
दूरध्वनी : ०२०–२६४५७९६६ – www.advaitgroup.com - publications@advaitgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क: श्री. आदेश वसंत अत्रे – ९९२१३४५९५५

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

।। आशीर्वचन ।।

।। प्रस्तावना ।।

।। मनोगत ।।

।। प्रकाशकाचे मनोगत ।।

।। अनुक्रमणिका (अक्षरवार शब्दसंख्या) ।।

।। संत नामदेव गाथा व शब्द अभंग चरण सूची (६ भाग)।।

सर्व हक्क राखीव

।। संत नामदेव गाथा व शब्द अभंग चरण सूची (६ भाग)।।

---------------- भाग १ ----------------
।। संत नामदेव गाथा – मराठी अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – मराठी अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।
---------------- भाग २ ----------------
।। संत नामदेव गाथा – हिंदी अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – हिंदी अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।
---------------- भाग ३ ----------------
।। संत नामदेव गाथा – कुटुंबीय अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – कुटुंबीय अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।
---------------- भाग ४ ----------------
।। संत नामदेव गाथा – संत जनाबाई अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – संत जनाबाई अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।
---------------- भाग ५ ----------------
।। संत नामदेव गाथा – अप्रकाशित अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – अप्रकाशित अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।
---------------- भाग ६ ----------------
।। संत नामदेव गाथा – गुरुग्रंथसाहिब अभंग ।।
।। संत नामदेव गाथा – गुरुग्रंथसाहिब अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

।। संत नामदेव गाथा व शब्द अभंग चरण सूची (६ भाग)।।
गाथा व त्याची सूची – पृष्ठ क्रमांक

भाग १	१.१	मराठी अभंग	४२
	१.२	मराठी अभंग – शब्द अभंग चरण सूची	५५९
भाग २	२.१	हिंदी अभंग	५३७७
	२.२	हिंदी अभंग – शब्द अभंग चरण सूची	५४२३
भाग ३	३.१	कुटुंबीय अभंग	५९५९
	३.२	कुटुंबीय अभंग – शब्द अभंग चरण सूची	५९९४
भाग ४	४.१	संत जनाबाई अभंग	६२९२
	४.२	संत जनाबाई अभंग – शब्द अभंग चरण सूची	६३६३
भाग ५	५.१	अप्रकाशित अभंग	६८५४
	५.२	अप्रकाशित अभंग – शब्द अभंग चरण सूची	६८७०
भाग ६	६.१	गुरुग्रंथसाहिब अभंग	७००२
	६.२	गुरुग्रंथसाहिब अभंग – शब्द अभंग चरण सूची	७०१६

गाथा सूची कशी बघावी

''नाचू कीर्तनाचे रंगी'' या संत नामदेव गाथा शब्द अभंग सूचीमध्ये एकंदरीत ६ भाग आहेत. प्रत्येक भागात मूळ गाथा (अभंग) व त्यानंतर त्या अभंगांची शब्द – चरण – सूची दिलेली आहे आणि ती विवक्षित गाथा व त्याची सूची कोणत्या पृष्ठापासून सुरू होते त्याचा पृष्ठक्रमांकही पान नं. ४ वर दिलेला आहे. प्रत्येक पानाच्या खाली – तळाशी – भाग क्रमांक व सूची असे लिहिले आहे. त्याद्वारे, आपण कोणता भाग आणि त्यातील अभंग (गाथा) किंवा सूची पाहतो हे त्वरित कळून येईल.

या गाथेची मांडणी ही पारंपारिक पद्धतीने केलेली नसून ती गाथेतील अभंग चरण क्रमांकानुसार दिसणार आहे. ज्यामुळे, त्या अभंग गाथेत संपूर्ण किती चरण आहेत हे सुद्धा कळू शकेल.

सूचीमध्ये प्रत्येक शब्द हा आकार विल्ह्यानुसार नमूद केला असून त्यासमोर त्याचा गाथेनुसार अभंग चरण क्रमांक दिसतो आहे. शिवाय लगेच संबंधित संपूर्ण चरणही पाहता येणार आहे.

थोडक्यात म्हणजे, एखादा शब्द शोधताना त्या विशिष्ट भागाच्या अक्षरवार शब्द संख्येच्या तक्त्यामधून त्या शब्दाच्या सुरुवातीच्या वर्णाक्षराचा क्रमांक पहावा आणि त्यानंतर त्या भागातील सूची विभागात त्या शब्द क्रमांकापर्यंत जावे व तद्नंतर जो विवक्षित शब्द शोधायचा त्या शब्दापर्यंत तुम्ही त्वरित पोहोचणार आहात.

अक्षरवार शब्दसंख्या

भाग क्रमांक	भाग	अभंग संख्या	चरण संख्या	शब्दसंख्या
१	मराठी अभंग	२१२५	१३३०९	१२०८१८
२	हिंदी अभंग	२३०	११४३	१३३८१
३	कुटुंबीय अभंग	१४५	८८४	७६८५
४	संत जनाबाई अभंग	४८५	१८१०	१२६५६
५	अप्रकाशित अभंग	६९	३५६	३२२९
६	गुरुग्रंथसाहिब अभंग	६१	३०१	४११९
	एकुण	३११५	१७८०३	१६१८८८

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा। चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।। १।।
जयदेव जयदेव जय पांडुरंगा। रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा जयदेव जयदेव ।। धृ।।
तुळसी माळा गळां कर ठेवुनि कटी। कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं।
देव सुरवर नित्य येती भेटी। गरूड हनुमंत पुढें उभे राहती।। २।।
धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा। सुवर्णाचीं कमळे वनमाळा गळां।
राही रखुमाबाई राणीया सकळा। ओवाळिती राजा विठोबा सांवळा।।३।।
ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती। चंद्रभागेमाजी सोडुनियां देती।
दिंड्या पताका वैष्णव नाचती। पंढरीचा महिमा वर्णावा किती।।४।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागेमाजी स्नान जे करिती।
दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती। केशवासी नामदेव भावे ओंवाळिती ।।५।।

संत परिसा भागवत कृत–श्री संत नामदेवमहाराजांची आरती

जन्मता पांडुरंगे। जिव्हेवरी लिहिलें। शतकोटी प्रमाण । हे कवित्व रचिले।।१।।
जय जयाजी भक्तराया। जिवलगा नामया। आरती ओवाळितां। चित्त पालटे काया ।।धृ।।
घ्यावया भक्तीसुख। पांडुरंग अवतार। करोनिया तीर्थमिसे। केला जगाचा उद्धार।।२।।
प्रत्यक्ष प्रचिती हे। वाळवंट परिस केले। हारपली विषमता। द्वैतबुद्धि निरसली।।३।।
समाधि महाद्वारी। श्री विठ्ठल चरणी। आरती ओवाळितो। परिसा कर जोडोनी।।४।।

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

।। आशीर्वचन ।।

।। श्री विठ्ठल प्रसन्न ।।
(श्री नामदेव–जनाबाई)

भक्त शिरोमणी श्री नामदेवरायांची अभंगवाणी ही महाराष्ट्राला लाभलेली अमोलिक देणगीच आहे. प्रेमळ भाषा, देवाशी प्रेमाचे भांडण, सलगी, विनय, भक्ती, विनोद अशा विशिष्ठ अंगांनी परिपूर्ण रससिद्ध अभंगवाणी असूनही महाराज म्हणतात ''अभंगाची कळा नाही मी जाणत ।''.

वास्तविक, नामदेवरायांची अभंगवाणी प्रासादिक असून स्वत: परब्रह्म श्रीविठ्ठलाने लिहीली आहे. ''नामया जनीचे लिही पांडुरंग ।'' त्यामुळे त्यांच्या अभंगाची गोडी अविट अशीच आहे. संत श्री परिसा भागवत सांगतात ''दुधावरील साय। ते मी वर्णु काय। तैसे गाणे गाय। नामदेव।।''. तसेच कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती ज्ञानोबाराय नामदेवरायांच्या अभंगवाणीविषयी सांगतात – ''सिंधुहूनी सखोल। सुरस तुझे बोल। आनंदाची ओळ। नित्यनवी ।।''.

महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनाची घडण बसविण्यास ज्या व्यक्तींनी आपल्या प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे सर्व सामर्थ्य वेचले, त्यात नामदेवरायांचा अग्रक्रम लागतो.

ज्ञानोबारायांची ''मराठी नगरी'' मध्ये ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची प्रतिज्ञा होती; तर श्रीसंत नामदेवरायांची संपूर्ण भारतात कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानदीप लावण्याची ! पांडुरंगाच्या कृपेने त्यांच्या इच्छा सफल झाल्या, असाच निष्कर्श त्यांच्या चरित्राकडे व कर्तृत्वाकडे पाहून येतो.

श्रीसंत नामदेवरायांची अभंगवाणी आज सातशे वर्षांची झाली, तरीसुद्धा महाराष्ट्राच्या मनावर दृढतर आहे असे दिसते. ज्यांच्या जिभेवर नामदेवरायांच्या अभंगातील एखादी ओळ कधीही खेळली नाही तर तो मराठी माणूस मराठी नव्हेच! इतके म्हणता येईल, असे नामदेव महाराजांच्या अभंगवाणीचे व मराठी माणसाचे अतुट नाटे आहे. त्यांच्या साहित्यामागील प्रेरणाही उदार स्वरुपाची असून, शाश्वत जीवनमूल्यांचा उत्कट आविष्कार यात झाला आहे. त्यामुळे मराठी साहित्यात त्यांच्या सारस्वताला चिरंतर स्थान लाभावे यात आश्चर्य नाही. संत नामदेवराय जर कीर्तनात रंगले नसते व अभंगरचना केली नसती तर भागवत संप्रदायाचा इतका व्यापक प्रसार होऊ शकला असता काय? श्रीगुरु ज्ञानोबारायादि भावंडें जगाला कळली असती

काय? तेराव्या शतकात ज्ञानोबांनी भावार्थदीपिकेची रचना केली. भक्तीची एक समर्थ लाट तेव्हापासून साहित्यात उचंबळून आली. त्या लाटेचे एक प्रचंड व सुंदर दर्शन नामदेवरायांच्या अभंगवाणीतून होते. मराठी काव्याला नाविन्य आणि सामर्थ्य देणाऱ्या वाणीचा विलास ज्ञानोबा व नामदेवराय या जोडगोळीशिवाय होऊ शकला असता काय ? ध्येयवादी कल्पनेने भारावलेल्या या दोन संतांच्या अध्यात्मिक शक्तींचा प्रभाव मराठी साहित्यात व समाजजीवनात होऊन त्यांना नवे चैतन्यप्रद वळण लाभले यात शंका नाही.

अशी श्री. नामदेवरायांची अभंगवाणी मराठी माणसाच्या, विशेषत: तरुण पिढीच्या अधिक संपर्कात यावी यासाठी माझे मित्र व श्रीनामदेवराय भक्त न्यायमूर्ती ह.भ.प. श्री. चकोर श्रीकृष्ण बाविस्कर आणि त्यांचे सहकारी श्री. आदेश वसंत अत्रे व श्री. समीर शशिकांत कुसुरकर हे सर्वजण सध्याच्या संगणकयुगात त्याचाच आधार घेऊन अमृतवाणीच्या असंख्य कणांना सीडीच्या माध्यमातून म्हणजेच अध्यात्मिक भाषेत भक्तीसोपानाच्या समीप आपण सर्वांना नेत आहेत, याचा अत्यंत आनंद होत आहे. याचे प्रकाशन श्रीनामदेवरायांच्या समाधीदिनी पंढरीत होत असल्याने हा दुग्धशर्करायोग आला आहे. या भक्तत्रयींच्या संतवाङमय सेवेमुळे वारकरी संप्रदायिक विद्यार्थी व इतर अभ्यासक वर्गास या सीडीचा मोठा आधार मिळणार आहे. अनाथनाथ श्रीविठ्ठलाने या तिघांचे हातून अशीच सर्वांग सुंदर, संतसाहित्याची व वारकरी संप्रदायाची सेवा सतत करुन घ्यावी यासाठी त्यांना वेळ आणि आयुरारोग्य चांगले लाभावे ही श्री केशवराज चरणी अखंड प्रार्थना व श्री नामदेवरायांचा शुभाशिर्वाद!

श्रीसंत नामदेवरायांचा १७वा वंशज
ज्ञानेश्वर तुळशीदास महाराज नामदास
श्रीसंत नामदेव मंदिर, पंढरपूर

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

।। प्रस्तावना ।।

प्रस्तावना

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । (गीता ४.३८) या मनुष्यलोकी ज्ञानासारखे पवित्र करणारे अन्य काही नाही. यासाठी मनुष्याने सतत ज्ञानप्राप्तीची इच्छा धरावी. ज्ञान म्हणजे माहिती. ज्ञान म्हणजे विषयाचे आकलन. ज्ञान म्हणजे जावीण. जाणण्याची शक्ती. अध्यात्मात ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान. ब्रह्मविषयक ज्ञान. सांप्रत विज्ञानयुगात ज्ञान प्राप्तीच्या नानाविध शाखा आहेत. विज्ञानाने केलेल्या प्रगतीने नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. संगणकाने तर मोठी क्रांती केली आहे. एका छोट्या तबकडीत हजारो पानांची माहिती एकत्रित साठविण्याची आणि हवी तेव्हा ती क्षणार्धात उपलब्ध करून देण्याची क्षमता त्यात साठविली आहे. या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य प्रकारे मनुष्याने करणे आवश्यक आहे. अभ्यासकांना ही ती सुवर्ण संधी आहे. ज्ञानकला वृध्दिंगत करण्याची, बुध्दिवैभव समृध्द करण्याची अपूर्व संधी या विज्ञान युगात विज्ञानाने आम्हास दिली आहे.

पारमार्थिक क्षेत्रात प्रबोधन करणारे प्रवचनकार, कीर्तनकार, व्याख्याते, संत साहित्याचा अभ्यास करणारे अभ्यासक, संशोधक, जिज्ञासू, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक गुरु, शिक्षक, प्राध्यापक या सर्वांना अत्यंत उपयुक्त अशी संतांच्या अभंगांची शब्द अभंग सूची जर उपलब्ध झाली तर केवढी भाग्याची गोष्ट ! हे परम भाग्य ह.भ.प. श्री. चकोर श्रीकृष्ण बावीस्कर, श्री. आदेश वसंत अत्रे (श्री. शेखरकाका) आणि श्री. समीरजी कुसुरकर यांच्या ध्यासाने तथा अविरत प्रयत्नाने उपलब्ध झाले आहे. मुळात याची संकल्पना आहे ती कै. पद्माकर विठ्ठल कुलकर्णी यांची. खरोखरीच त्यांचे आपणावर अनंत अनंत उपकार आहेत. आत्तापर्यंत त्यांनी श्रीज्ञानेश्वरी शब्द ओवी सूची, श्रीमद् दासबोध शब्द ओवी सूची, श्री तुकाराम गाथा शब्द कडवे अभंग सूची प्रसिद्ध केलेल्या आहेत.

आता ते संत तथा भक्तशिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंगाची गाथा त्यातील शब्द कडवे अभंग सूची प्रसिद्ध करीत आहेत. खरोखरीच ही सुद्धा परम भाग्याची गोष्ट आहे.

संत तथा भक्तशिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंगाची गाथा मराठी वाङ्मयातील एक सुंदर लेणं आहे. मराठी साहित्यातील अनेक वाङ्मयीन दालनांचा शुभारंभ संत नामदेव महाराजांनी केला आहे. आद्य आत्मचरित्रकार, आद्य संतचरित्रकार, आद्य प्रवासवर्णनकार, आद्य अभंग रचनाकार म्हणून

संत नामदेवराय यांचा जसा गौरव होतो तसाच आद्य व श्रेष्ठ कीर्तनकार, आद्य अस्पृश्योद्धारक, आद्य फडकरी, आद्य महाराष्ट्रीय हिन्दी संत कवी, हिन्दी भाषेचे आद्य प्रचारक म्हणूनही त्यांचा गौरव होतो.

सात शतकापूर्वी संत नामदेवराय महाराष्ट्रात माय मराठी मुलुखात पंढरपुरी जन्माला आले. पंढरपूर ही संत नामदेवराय यांची जन्म तथा कर्मभूमी आहे. इथेच चंद्रभागेच्या पवित्र जलात स्नान करावे, श्रीपांडुरंगाचे भक्तीभावाने दर्शन घ्यावे आणि त्याच्या सन्मूख रंगशिळेवर उभे राहून त्याचेच गुणगान गात नाचावे असे संत नामदेवराय श्रीपंढरीनाथाचे प्रेमभांडारी संत होते. विठुरायाचे लडिवाळ भक्त होते.

सकल संतांचा, वैष्णव भक्तांचा प्रेरणास्रोत असणारा श्रीविठ्ठल, तपस्वियांचे तप, जपकांचे जाप्य, योगियांचे परमधाम असणारा शुध्दरामकमलदललोचनु श्री विठ्ठल वैकुंठनायक, आनंदपददायक, संसारतारक, भक्तजनपालक, भवमुक्तीदायक, गोपीमनरंजक, यादवकुळटिळका श्रीकेशीराज, श्रीविठ्ठल सकल जीवांचा आधार झाला. आता ती विठाई माउली झाली. कृपेची सावली झाली. भक्तांना प्रेमपान्हा पाजू लागली. दीनजनासाठी विठाई माउली विटेवर उभारून कटीवर हात ठेवून भक्तांना दर्शन देऊ लागली. ‘‘दीनाची माउली । अजि म्यां देखियेली । कटी ठेवूनिया कर । उभी राहे विटेवर ।।’’

संत नामदेव महाराज यांचे सर्वस्व म्हणजे पंढरीचा श्रीपांडुरंग. ‘‘विठ्ठलेविण जया न जमे एक घडी । सर्वस्व आवडी विठ्ठलाची ।।’’ संत नामदेवराय श्री विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. श्रीपांडुरंगांवर त्यांची अपरंपार उपास्ती होती. भक्ती होती. तर श्रीपांडुरंगाची संत नामदेव महाराज यांच्यावर अपरंपार भैदवी होती. कृपा होती. संत नामदेवराय यांच्याविषयी देव स्वत: संतांना सांगत, ‘‘हे कृपेचे पोसणे माझे आवडते । क्षण जीवापरते न करी कदा ।।’’ ‘‘नामदेव नामदेव । धरा भाव दृढ हा । देव सांगे वैष्णवासी । नका यासी विसंबू ।।’’ असा हा देव भक्तांचा भक्ती सुखाचा अनमोल ठेवा आहे. संत नामदेवराय यांना संत ज्ञानोबाराय यांनी भक्तशिरोमणी म्हणून गौरविले आहे. ‘‘ज्ञानदेव म्हणे तू भक्तशिरोमणी । जोडिले जन्मोनि केशव चरण ।।’’ भक्तीची मूर्तिमंत मूर्ती म्हणजे संत नामदेवराय. पंढरी ही त्यांची कर्मभूमी होती. इथेच त्यांनी सात शतकापूर्वी देव मस्तकी धरला आणि अवघा हरिनामाचा गजर केला. नामभक्तीचे सूर आळविले. संत नामदेव महाराज यांच्या भक्तीने विठोबा चौबारात आला. भक्तीची आनंदधारा वाहू लागली. पाहता पाहती ती जीवनधारा झाली. मराठी माती धन्य झाली. गावोगावी पताकांचे भार दिसू लागले. वैष्णवभक्तांचा पोहा जमू लागला. त्या मेळाव्यात हरिनामाचा गजर होऊ लागला. संत ज्ञानोबाराय यांच्या ओवीने ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला तर संत नामदेवराय यांच्या अभंगाने भक्तीचा गंगौघ वाहू लागला. सौख्य सरितेत सारे न्हाऊन निघाले. पंढरी महाराष्ट्राची अध्यात्मिक राजधानी झाली. भक्ती ज्ञानाचे ज्ञानपीठ तथा भक्तीपीठ झाले. कटीवर हात ठेवून विटेवर उभे

असणाऱ्या विठुरायाच्या दर्शनार्थ वैष्णवभक्तांची मांदियाळी इथे येऊ लागली. हरिनामाचे भीमातीर गरजू लागले. सर्व सुखाचे सुख असणाऱ्या श्रीमुखाकडे पाहुन सर्वांची तहान भूक हरपून गेली. आनंदाचे डोही आनंदी तरंग निर्माण झाले. भक्ती तथा प्रेमसुखाचा सुकाळ झाला. आता पंढरपूर सकल संतांचे माहेर झाले. भक्तीचे मळे फुलू लागले. सुखाचे पाट वाहू लागले. संत नामदेवराव कीर्तनी नाचत ज्ञानदीप लावू लागले. त्यांच्या अभंगाने विठ्ठल डोलू लागला. भागवत धर्माच्या ध्वजा समीप वैष्णवभक्तांचा मेळा जमला. भेदाभेद भ्रम दूर झाला. ऐक्यभाव निर्माण झाला. माणूसधर्म जोपासला गेला. ''विठ्ठलचि घ्यावा विठ्ठलचि गावा । विठ्ठलचि पहावा सर्वाभूती ।।'' अशा विठ्ठल भक्तीत सारे दंग झाले.

संत नामदेवराय यांनी आसेतू हिमाचल तीर्थाटन केले. भक्ती पताका खांद्यावर घेऊन भारतभर भ्रमण केले आणि भक्ताचा डांगोरा पिटला. भागवत धर्माचा प्रसार आणि प्रचार त्यांनी केला. नामदेवराय किंकर बनले आणि त्यांनी भागवत धर्माच्या मंदिराचे आवार विस्तारिले. ''नामा तयाचा किंकर । तेणे विस्तारिले आवार ।'' संत नामदेवराय यांनी चंद्रभागेच्या जलाचे ओघ उत्तरी नेले. अभंगरूपी वैष्णवीधन त्यांनी उधळले आणि सर्व जगाने ते वेचले.

विठ्ठल भक्त नामदेव महाराज यांचे राष्ट्रीय स्तरावरील कार्य फार मोठे आहे. पंढरीच्या पावन परिसरातून भक्ती पताका खांद्यावर घेऊन साऱ्या भारतभर त्यांनी हरिनामाचा गजर केला. सर्व भेदभाव दूर करून सर्वांना एकत्र आणून राष्ट्रीय ऐक्य साधले. ''नामे नारायण नहीं भेद'' ही विचारधारा घेऊन भक्ती मार्गावरील निष्ठावंत उपासक निर्माण केले. भागवत धर्माची भक्ती पताका उत्तरेतील पंच नद्यांच्या पंजाबात मोठ्या डौलाने फडकविली. जनजागृती केली. धर्म रक्षण केले. जुन्या रूढीवादात, भेदाभेदात अडकून पडलेल्या समाजाला नवीन प्रकाश दाखविला. सदाचार, सन्नीती, सद्वासना या उच्च जीवन मूल्यांचे बीजारोपण केले. सत्य मार्ग दाखविला. संत नामदेवराय उत्तर भारतातील संतमताचे प्रवर्तक तथा प्रेरणास्थान ठरले. महाराष्ट्रीय मराठी भाषिक असणारे संत नामदेवराय हिन्दी संत साहित्याचे आद्य संत कवी आहेत. मराठी सारस्वतातील संत कवी आहेत. नामदेवराय हिंदी सारस्वतातील सुद्धा संत कवी आहेत. शीख संप्रदायाच्या आदिग्रंथ ''गुरुग्रंथसाहिब''यात त्यांच्या ६१ हिंदी पदांचा समावेश करून त्यांचा सन्मान केला आहे. महाराष्ट्र आणि पंजाब यांना जवळ आणण्याचे, त्यांच्यात समन्वय साधण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले आहे. इतकेच नव्हे तर संत चोखोबाराय या आपल्या शिष्याच्या अस्थी मंगळवेढ्याहून पंढरपुरी आणून महाद्वारात श्रीविठ्ठल मंदिरासमोर आपल्या प्रिय शिष्याची समाधी उभारून अलौकिक क्रांतीकार्य त्यांनी केले. त्यामुळे संत नामदेव महाराज आद्य अस्पृश्योधारक म्हणून प्रसिद्ध झाले. मराठीत अभंग छंदाची निर्मिती त्यांनी केली. महर्षी वाल्मिकी नंतर शंभर कोटी अभंग रचना करणारे पहिले संत नामदेवराय होत.

॥ नाचू कीर्तनाचे रंगी ॥

संत नामदेव गाथा – शब्द अभंग चरण सूची

संत नामदेव महाराज यांची अभंगवाणी अतीशय गोड आहे. मधुरं मधुरं आहे. सर्व रसांचा व सर्व काव्यगुणांचा उत्कृष्ट अविष्कार त्यांच्या अभंगवाणीत आहे. भक्तीरस तर ओतप्रोत भरला आहे. करूण रसाचा सर्वोत्कृष्ट अविष्कार संत नामदेवराय यांच्या अभंगात आहे. त्यांची अभंगवाणी अमृताची खाण आहे. ती पीयूषवाणी आहे. संत परिसा भागवत हे संत नामदेवराय यांचे शिष्य होते. त्यांनी आपल्या सद्गुरुंच्या अभंगवाणीचे वर्णन करताना म्हटले आहे, ''दुधावरील साय तें मी वाणूं काय । तैसे गाणे गाय नामदेव ॥'' ''परसा म्हणे नाम्या तुझें बरवें गाणें । जैसे कां नाणें टांकसाळीचें ॥'' संत नामदेव महाराज यांची अभंगवाणी ''संत नामदेवगाथा'' म्हणून प्रसिद्ध आहे. या संत नामदेव गाथेत मंगलाचरण, बालक्रीडा, श्रीकृष्णलीला, श्रीरामकथा माहात्म्य, श्रीविठ्ठल माहात्म्य, पंढरी माहात्म्य, श्री विठ्ठलस्तुती आणि भक्तवत्सलता, शिवरात्र माहात्म्य, तुलसी माहात्म्य, गंगा माहात्म्य, चोवीस नामांचे माहात्म्य, नाम माहात्म्य, संत महिमा, श्री संत ज्ञानेश्वरांची आदि, गीता माहात्म्य, तीर्थावळी, श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे माहात्म्य, श्री संत ज्ञानेश्वरमहाराज यांच्या संजीवन समाधीचा सोहळा, संत सोपानदेव, संत चांगदेव, संत मुक्ताबाई, संत निवृत्तीनाथ यांचे संजीवन समाधी सोहळे, संत ज्ञानदेव व संत नामदेव यांच्या भेटीचा सोहळा, संत नामदेव महाराज यांचे आत्मनिवेदन, आत्मसुखप्राप्तीविषयी आर्तोद्गार, आत्मज्ञान प्राप्ती उपदेश, रूपके व दशावतारण वर्णन, भूपाळ्या व आरत्या, हिन्दी पदावली, परिवारातील संतांचे अभंग, संत जनाबाईंचे अभंग, अप्रकाशीत अभंग, गुरुग्रंथसाहिब मधील संत नामदेवराय यांची ६१ अभंग. अशी पस्तीस प्रकरणे त्यात आहेत. ती नवरसांची व भक्तीरसांची पाणपोई आहे. करुण रसाचा सर्वोत्कृष्ट अविष्कार त्यात आहे. ते करुणरसपूर्ण पाच संतांचे अभंग वाचताना डोळे पाणावल्याशिवाय रहात नाहीत. त्यात उपदेशाचे पीयूष आहे. जनकल्याणाची तळमळ आहे. आत्मानंद आहे. परमानंद आहे. अवघा ब्रह्मानंद आहे. संत नामदेवराय यांच्या अभंगातील भक्तीयोग हा या अभंग गाथेचा आत्मा आहे. नामयाची पीयूषवाणी । जो याचा ध्यास घेई । मनोरथ त्याचे पूर्ण होई । ऐसी साक्ष याची ॥ तसेच
नामयाची अभंगवाणी । असे अमृताची खाणी । जीवनाचे सोने करी । एक तरी अभंग अनुभवी ॥

अशा संत तथा भक्तशिरोमणी नामदेव महाराज यांच्या अभंग गाथेतील शब्द कडवे अभंग सूची प्रसिद्ध होत आहे. लक्षावधी शब्दांचा शब्दकोष व त्यावरील अभंग क्षणार्धात नवीन तंत्रज्ञानाने संगणकावर पहावयास मिळणार आहेत. वेळ वाचणार आहे. शोधाशोधीचे कष्ट कमी होणार आहेत. अभ्यासाला, चिंतनाला गती प्राप्त होणार आहे. ऐसे भाग्य दुजे नाही.

या उपक्रमाकरिता सर्वश्री ह.भ.प. चकोर श्रीकृष्ण बावीस्कर, आदेश वसंत अत्रे अर्थात शेखरकाका, समीरजी कुसुरकर यांना मन:पूर्वक धन्यवाद. सकल संतांच्या अभंग शब्द सूचीचे कार्य त्यांच्या हातून भगवंताने करवून घ्यावे ही श्री विठ्ठल चरणी प्रार्थना. या अत्यंत उपयुक्त अशा उपक्रमाची मुळात संकल्पना साकारणारे कै. पद्माकर विठ्ठल कुलकर्णी यांना त्रिवार वंदन.

सह्याद्री मानव सेवा मंच, ठाणे यांचे सर्व अधिकारी, डॉक्टर्स आणि कार्यकर्ते यांच्या विशेष सहकार्याने संत नामदेव गाथा पारायण प्रत हा प्रकल्प सिध्दीस गेला आहे, याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

आदिती ग्राफीक्सचे श्री. अतुल भिडे आणि श्री. अभय भिडे तसेच श्री. वा. शं. मराठे, सौ. शीलाताई मराठे, डॉ. अच्युत जोशी, डॉ. चंद्रकांत जोशी, सौ. सुनंदा केळकर, श्री.अशोक वझे, श्री. नाफडे यांचेही सहकार्य संत नामदेव गाथा पारायण प्रत या प्रकल्पाला लाभले आहे. त्यांच्याविषयी कृतज्ञता. संत नामदेव सेवा मंडळ, ज्ञानदेव सेवा मंडळ आणि नामदेव भक्तीपीठ यांचेही आभार मानतो.

आपणा सर्वांसाठी संत नामदेव महाराज यांच्या शब्दात पसाय प्रार्थना.

आकल्प आयुष्य व्हावे तया कुला । माझीया सकळा हरिच्या दासा ।।१।।
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी । ही संत मंडळी सुखी असो ।।२।।
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी ।।३।।
नामा म्हणजे तया असावे कल्याण । ज्या मुखी निधान पांडुरंग ।।४।।

प्र.द. निकते
पंढरपूर
आषाढ शु. ११,
शके १९३६
दि. ९.७.२०१४

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

।। मनोगत ।।

आषाढ वद्य त्रयोदशी गुरुवार
शके एकोणीसशे छत्तीस
दिनांक : २४ जुलै २०१४

रामकृष्णहरि

पंढरीश परमात्मा श्रीविठ्ठल पांडुरंग भगवान आणि सकल संतमांदियाळीची कृपा अकारण व अपरंपार असल्याची आणखी एक खूण म्हणजे संतशिरोमणी श्रीनामदेव महाराज यांच्या अभंगगाथेची ही अकारविल्ह्यानुसार शब्द-कडवे-अभंग सूची आजच्या पुण्यपावन तिथीस प्रकाशित होते आहे. या सूचीत श्रीसंत नामदेवराय, त्यांचे कुटुंबीय व संतजनाबाई यांच्या अभंगांची शब्द-कडवे-अभंग सूची आहे.

या निमित्ताने अतिव आनंद आणि समाधान आहेच. पण त्याचबरोबर, जणू त्यास नियंत्रित करण्यासाठी, थोडीशी खंती आणि काहीसा अपराधभाव देखील आहे आणि जणू त्याही भावनांना नियंत्रित करण्यासाठी, अन् निरासही करण्यासाठी; काही समर्थन देखील आहे.

अद्वैत प्रकाशनाच्या या आणि अशा प्रकल्पांचे आणि उपक्रमांचे अध्वर्यु, मूळ प्रेरणास्रोत असलेले वैकुंठवासी श्रीमन् पद्माकर विठ्ठल कुलकर्णी, म्हणजेच श्री.पी.व्ही. हे त्यांच्या पांचभौतिक देहासह आज आपल्यात उपस्थित असते, तर आज आपला, आम्हा सर्वांचा आनंद खचितच शतगुणित झाला असता. पण या खंतीचा काहीसा निरास करणारे समर्थन म्हणजे श्री.पी.व्ही. हे त्यांच्या सुक्ष्म देहाने आणि श्रीमती प्रफुल्ल वहिनींच्या रूपाने अर्धांगाने आपल्यात आहेतच. शिवाय 'तव स्मरण स्फुर्तिदायी सतत आम्हा घडो'. त्यांच्या सतत स्मरणाच्या रूपानेही श्रीमन् पीव्ही हे मनामनांत नित्यवासी आहेत, हे वास्तव आहे. त्या श्री.पीव्हींच्या पावनस्मृतींस शत-शत प्रणाम.

श्रीमन् पीव्ही आणि त्यांच्या 'मैत्रियेचि चित्कळा' असलेले श्रीमन् आदेश वसंत अत्रे, म्हणजेच श्री. शेखरकाका, या उभयतांच्या स्नेहादरास पात्र असलेले श्रीमन् समीरजी कुसुरकर - या तिघांच्या सात्विक कायिक, वाचिक, मानसिक (आणि तांत्रिकही !) तपाचे फल म्हणून सिद्ध झालेली ज्ञानेश्वरीची 'तो वाग्यज्ञु म्हणिजे' ही शब्द-ओवी-सूची, हा अद्वैत प्रकाशनाचा पहिला प्रकल्प.

संत साहित्याच्या हिमालयातले सर्वोच्च शिखर पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरित्या गाठले गेल्याने आत्मविश्वास अन् उत्साह दुणावलेल्या अद्वैत प्रकाशनाच्या कर्त्या–धर्त्यांनी मग तेवढ्याच उत्तुंगतेची नवनवीन शिखरे गाठण्याचा जणू छंदच घेतला आणि त्या शिखरांनीही आम्हा लेकरांना लडिवाळपणे अंगा–खांद्यावर वागवून आमचे लाड–कोड केले.

ज्ञानेश्वरीची शब्द–ओवी–सूची (तो वाग्यज्ञु म्हणिजे), दृष्टांत–सिध्दांत–महत्त्वाच्या ओव्या विषयानुरुप ओव्या प्रकट करणारी चतुरंगातील ज्ञानेश्वरी (ऐसीं नानावर्णे रूपडीं), जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या अभंगगाथेची शब्द–कडवे–अभंग–सूची (तुका झालासे कळस), संतश्रेष्ठ श्री रामदासस्वामींच्या श्रीमद् दासबोधाची शब्द–ओवी–सूची (हे शब्दरत्नांचे सागर), श्रीज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठाची शब्द–कडवे–सूची (तयाचे बिसाट शब्द)– हे आणि असे प्रकल्प बघता बघता पूर्णत्वास गेले, हे चमत्कार वाटावा असे वास्तव आहे. आणि आज श्रीसंतनामदेव महाराज यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांच्या व श्रीसंत जनाबाई यांच्या अभंगगाथ्याची एकत्रित शब्द–कडवे–अभंग–सूची अर्थात् 'नाचू कीर्तनाचे रंगीं' प्रकाशित होते आहे !

या प्रकाशन सोहळ्याचा आनंद असतानाच कांहीसा अपराधभावही असण्याचे कारण म्हणजे या व अशा वेगवेगळ्या प्रकल्पांचे संकल्प आणि त्यांची झालेली पूर्तताही. आता, अपराधभाव मनात दाटण्याचे हे कारण काहींना अनाकलनीय तर काहींना अगदी चमत्कारिकही वाटेल, पण तसा भाव आहे खरा.

याचे कारण म्हणजे, आम्ही जो जो संकल्प करावा, मनाचा तो तो खेळ भगवंतांनी–संतांनी सोन्याचा करून आमच्या समक्ष साक्षात् करावा, इतके लाड–कोड पुरवावेत, एवढी कृपा भगवंताने–संतांनी करावी – एवढी अशी काय विशेष सेवा हातून घडते आहे ? आपण वेगवेगळे संकल्प करून त्या भगवद्शक्तीस सतत सांकडे का घालत राहावे ? आणि का त्या विश्वनियामकानेही आमचे संकल्प सिध्दिस नेण्याचे एवढे मनावर घेत राहावे ?

या आणि यांसारख्या विचारांनी मनात अपराधभाव दाटतो खरा पण त्याचाही निरास करणारे समर्थनही मनात लगेचच स्फुरते. ते असे की, हे संकल्प करण्याचे आणि प्रकल्पसिध्दिंचे हे असे वेगवेगळे प्रयोग त्याचे तोच करतो आहे. आता, माध्यम म्हणून आम्हा सर्वांस वापरून घेण्याची त्याचीच जर इच्छा असेल, तर आपण काय करा ? आणि काय न करा ? करणे न करणे, होणे न होणे – हे सगळे त्याचे तोच जाणे ! विश्व चळतसे जेणे, परमात्मेनि !! हे जेही काही आहे, त्याचे आहे अन् तोच आहे.

आणि हा काही केवळ वाच्यार्थ नव्हे. आम्हा सर्वांचाच तसा प्रत्यक्ष अनुभवही आहे. एरव्ही, 'तुका झालासे कळस'चे काम सुरू असतानाच, तशीच शब्द–कडवे–अभंग–सूची नामदेवगाथेचीही करावी हा विचार मनात येताच पुढचे सर्व योग अनायास व त्वरित जुळून येण्याचे काय कारण ?

श्रीसंत नामदेवरायांची गाथा संपूर्ण संगणक मुद्रित करणे, तिचे मुद्रितशोधन करणे, पुन:पुन्हा ती तपासणे, अंतिम मसुदा तयार करणे ही सर्व कामे केवळ कालापव्ययीच नव्हेत, तर कष्टप्रदही आहेत. अद्वैत प्रकाशनाशी संबद्ध असलेल्यांचे इतर, सांसारिक व्याप–ताप, नित्य–नैमित्तिक–प्रासंगिक कर्म कर्तव्ये, काही स्वयंप्रेरित तर बरीचशी अनियंत्रित देखील असलेली कार्यबाहुल्ये ध्यानात घेता वरील कामे बरीच जिकिरीचीही होती. पण देवाला काळजी ! कुठल्याही विवंचना निर्माण होण्यापूर्वीच त्यांचा बाध झाला. पंढरीनिवासी नामदेवभक्त हरिभक्तिपरायण श्रीमन् प्रकाश दत्तात्रेय निकते, म्हणजे श्री. निकते गुरूजी यांचा परिचय झाला.

श्री. निकते गुरूजी म्हणजे, संतशिरोमणी नामदेवरायांच्या अमृतमयी प्रेमाभक्तीत आकंठ बुडालेले व्यक्तिमत्व. श्रीसंत नामदेवराय, हाच श्री निकते गुरूजींचा जीवनभरचा ध्यास आणि जगण्याचा श्वास ! नामदेवरायांच्या अभंगगाथा फार पूर्वीच त्यांनी मुखोद्गत केला, हा श्री. निकतेगुरूजींच्या नामभक्तीचा एक पैलू. ते नामदेवगाथेचे साक्षेपी अभ्यासक आहेत, हा एक पैलू. नामदेवरायांच्या सर्वंकष अभ्यासासाठी त्यांनी अध्यासन सुरू करून अखंड सायास केले, करताहेत, हा एक पैलू. अंतरीं पराकोटीची नामदेवभक्ती असूनही विलक्षण–विचक्षण वृत्तीने श्री. निकते गुरूजींनी नामदेवगाथेचे संकलन, अर्थविवरण अन् संपादन केले, हा एक पैलू. किती सांगावेत ? या प्रकल्पास असलेली त्यांची प्रस्तावना म्हणजे या आणि अशांसारख्या प्रकाशपैलूंचा प्रकाश आहे !

श्रीसंत नामदेवरायांवरील मूर्तिमंत निष्ठा म्हणजे श्री. निकते गुरूजी होत. त्यामुळे आयुष्यभराच्या साधनेचे सार–सर्वस्व असलेली, नामदेवगाथेची त्यांनी संपादित केलेली संगणकमुद्रित प्रत श्री. निकते गुरूजींनी स्वत:हून आम्हास दिली. वस्तुत: श्री. निकते गुरूजींच्या घरी आम्ही गेलो, त्यांना ज्ञानेश्वरीची शब्द–ओवी–सूची दाखवली, तुकारामगाथेची शब्द–कडवे–सूची दाखवली, पुढच्या प्रकल्पांचा उल्लेख केला, त्यावेळी त्यामागचा सुप्त उद्देशच हा होता, की त्यांच्याकडून नामदेवगाथेची संगणकमुद्रितप्रत (Soft copy) मागावी. पण आम्ही मागण्याच्या आतच, बहुदा आमचा मनोभाव ओळखून श्री. निकते गुरुजीच म्हणाले, 'नामदेवगाथेची देखील अशी सूची करा. त्यासाठी संगणकप्रत हवी असल्यास मी देतो.' आणि अशा तऱ्हेने हा प्रकल्प झटकन् पुढे सरकला.

नामदेवगाथेची संगणकप्रत श्री. निकते गुरूजींनी उपलब्ध करून दिल्यानंतर नेहमीप्रमाणे श्री. समीरजी कुसुरकर झपाट्याने कामास लागले आणि सूचीची सर्व तांत्रिक बाजू त्यांनी त्यांच्याकडून पटकन् पूर्ण केली देखील. नेहमीप्रमाणे श्री. शेखरकाकांनी त्या सूचीची, शब्दांची, कडव्यांची, अभंगांची बारकाईने तपासणी केली.

श्री. समीरजी आणि श्री. शेखरकाका यांनी आपापला कार्यभाग अविलंब पूर्ण करून सूचीचा, कडव्यांचा, अभंगांचा एक-एक भाग मजकडे पाठविला. मग संपूर्ण गाथा सूची पाठवली. मी ती बराच काळपावेतो नुसतीच ठेऊन घेतली आणि शेवटी काहीच न करता त्यांच्याकडे तशीच परत पाठवून दिली. तेव्हा, या सूचीच्या प्रकाशनास जो काही विलंब झाला, त्याचा दोष व्यक्तिगतरित्या माझा. यास मात्र समर्थनही नाही आणि प्रायश्चित्तही नाही.

श्री. निकतेगुरुजींनी संपादित व प्रकाशित केलेल्या नामदेवगाथेच्या आधाराने ही शब्द-कडवे-अभंग-सूची अकारविल्ह्यानुसार तयार करण्यात आली आहे. अभंगांचा क्रम त्याच गाथेतील क्रमानुसार ठेवण्यात आला आहे. काही अगदी ढोबळ व किरकोळ दुरूस्त्या करण्याचा प्रयत्न आम्ही केला खरा, पण प्राय: अभंगांचा पाठ देखील श्री. निकतेगुरूजींनी संपादिलेल्या नामदेव गाथेतील पाठ आहे.

या गाथेतील सर्वच अभंगांचे पाठ संप्रदायातील सर्वांना, इतर सर्व अभ्यासकांना, विद्वानांना पूर्णत: मान्य होतीलच असे नाही. पण मग हे कुठल्याही संपादित गाथेस सारखेच लागू होईल. कुठल्याही गाथेत अभंग किती आहेत, कोणते आहेत, त्यातले अस्सल किती-कोणते, प्रक्षिप्त किंवा क्षेपक किती-कोणते, अस्सल असलेल्या अभंगांचा अस्सल पाठ कोणता, तो ठरविण्याचे निकष कोणते, ते निकष ठरविण्याचे निकष कोणते, प्रमाण गाथेस आधार काय, आधारांना आधार काय, त्या निकषांची, आधारांची योग्यायोग्यता, विश्वासार्हता व स्वीकारार्हता किती - या आणि अशांसारख्या चिकित्सांची मालिका 'नान्तो न चा दिर्नच संप्रतिष्ठा' अशीच बहुदा असावयाची. सर्वच गाथ्यांतील सर्वच अभंगांचा सर्वमान्य होईल, असा पाठ तयार करणे ही बहुदा निरंतर चालणारी आणि तरीही अंतिमत: कधीच पूर्ण न होणारी प्रक्रिया असेल. मग तो पावेतो काय अभ्यासकांनी कुठलीच गाथा अभ्यासू नये की काय ? की सर्वच उपलब्ध गाथा अभ्यासत राहाव्यात ? आणि तावत्कालपावेतो संतप्रेमी भाविक भक्तांनी तसेच तिष्ठत-तळमळत रहावे काय ?

मुळात, अभंगांचा सर्वमान्य पाठ सिद्ध करणे - हा काही आमच्या कुठल्याच प्रकल्पाचा उद्देशच नव्हे. याही प्रकल्पांचा नाही. जी गाथा आम्हास सहज-साध्य उपलब्ध झाली, त्या गाथेतील सर्व अभंगांतील सर्व कडव्यांतील / चरणांतील सर्व शब्दांची अकारविल्ह्यानुसार सूची तयार करणे आणि त्या-

त्या शब्दासमोर तो तो शब्द समाविष्ट असलेले पूर्ण कडवे देणे, ते कडवे ज्या अभंगात ज्या क्रमांकाने आहे, त्या अभंगाचा क्रमांक व त्या कडव्याचा क्रमांक देणे आणि त्या अभंगांच्या क्रमांकांनुसार संपूर्ण गाथाही त्या सूचीत आधी देणे एवढाच आमचा प्रयत्न आहे.

या व अशा सूचींच्या निर्मितीमागील हा उद्देश व या सूचींची उपयोगिता, उपयोजन, वापर याबाबतचा विचार 'तुका झालासे कळस'च्या मनोगतात आम्ही विस्ताराने व सोदाहरण मांडला आहे. त्यातील बऱ्याच बाबी याही सूचीस तशाच लागू आहेत. म्हणून त्या पूर्णच पुनरूक्त करण्याचे कारण नाही.

अन्य कुणासही अन्य कुठलीही संपादित गाथा प्रमाणभूत वाटणे शक्य आहे. त्या मतभिन्नतेचा आम्ही आदर करतो. मात्र त्या ज्या कुणा महानुभावास जी अन्य कुठली संपादित गाथा प्रमाण वाटत असेल, त्या अन्य गाथेतील हवा असलेला नेमका अभंग त्या गाथेतून हवा तेव्हा लगेचच सापडेल, असे नाही.

संत साहित्याच्या अभ्यासकांना, विद्वानांना, व्याख्यात्यांना, अगदी कीर्तनकार-प्रवचनकारांना देखील सर्वच संतांचे सर्वच अभंग पाठ असतात असे नाही. पाठ नसलेलेही अभंग प्रत्येक वेळी पूर्ण आठवतीलच, असेही नाही. हा व्यक्तिगत अनुभव आहे अन् ही सार्वत्रिक अडचण आहे. बऱ्याचवेळेला एखाद्या अभंगाचे एखादेच कडवे, एखादेच चरण आठवत असते. बऱ्याचदा तर एखाद्या कडव्यातला पूर्वार्ध किंवा उत्तरार्धच आठवत असतो. अनेक अभंगांतील अनेक कडव्यांना, शब्दांना सुभाषितांचे, म्हणींचे स्वरूपही समाजमानसात प्राप्त झाले आहे. याची अनेक उदाहरणे 'तुका झालासे कळस' या सूचीच्या प्रकाशकीय मनोगतात दिली आहेत.

संतसाहित्यातले असे अनंत चरण समाजमनांत अढळपद मिळवून असले, तरी संपूर्ण अभंग कोणता, हे माहिती नसते किंवा आठवत नसते. बऱ्याचदा अभंगातला एखाद दुसरा महत्त्वाचा शब्द, एखादेच पद आठवत असते. आठवणारे चरण/कडवे वा आठवणारा शब्द किंवा पद जर त्या अभंगाची सुरुवात नसेल, तर तो अभंग त्या गाथेच्या अनुक्रमणिकेतही सापडत नाही. गाथेत नेमका कुठे सापडेल, हेही बऱ्याचवेळेला समजत नाही. तो अभंग शोधावा कसा, हे उमजत नाही आणि हवा असलेला तो अभंग मिळाल्याशिवाय तर चैन पडत नाही !

अशा बिकट प्रसंगी 'शब्द-कडवे-अभंग-सूची' हा एकमेव आणि हमखास आधार आहे. कुठल्याही अभंगातला, कुठल्याही कडव्यातला कुठलाही शब्द आठवत असला, तरी त्या शब्दाच्या रकान्यांसमोरची सर्व कडवी पाहिली की आपल्याला हव्या असलेल्या अभंगातले ओळखीचे कडवे सापडू शकते

आणि त्या कडव्याच्या सन्निध दिलेल्या अभंग क्रमांकावरून या सूचीच्या सुरुवातीला क्रमवार दिलेल्या संपूर्ण गाथेत त्या क्रमांकावर तो अभंग पूर्णही पाहता येऊ शकेल.

एकदा का हवे असलेले ते कडवे/चरण सापडले आणि तो नेमका अभंग सापडला, की या सूचीचा उद्देशही सफल झाला आणि उपयोगिताही पूर्ण झाली. मग त्यानंतर, या सूचीच्या आधी दिलेली गाथा अभंगाच्या पाठासाठी प्रमाण वाटली नाही, मानली नाही, तरी आमची मुळीच हरकत नाही, हरकत असण्याचे मुळात काही कारणच नाही.

या सूचीच्या साहाय्याने तुम्हाला हवे असलेले कडवे/चरण मिळाले ना? अभंग मिळाला ना ? आमचे काम झाले. आता त्या अभंगाच्या पहिल्या कडव्यातील सुरुवातीच्या शब्दांवरून, तुम्हास जी कुठली संपादित गाथा प्रमाण वाटते, त्या गाथेच्या अनुक्रमणिकेतून तो अभंग तुम्ही शोधून काढा आणि ज्या कुठल्या कारणासाठी वापरायचा असेल, तो वापरा. शुभं भवतु.

तेव्हा पुन्हा एकदा, पुनरूक्तीचा दोष पत्करूनही स्पष्ट करतो, की कुठल्याही गाथेची वा संतसाहित्याची पाठशुद्ध प्रमाणित प्रत तयार करणे, हा आमचा मुळी उद्देशच नाही. कोणत्याही शब्दाच्या आधाराने तो शब्द असलेल्या सर्व अभंगांतले तो शब्द असलेले सर्व कडवे चटकन् आपल्या डोळ्यांसमोर यावीत, एवढाच मर्यादित उद्देश आमच्या इतर प्रकल्पांप्रमाणे याही सूचीमागे आहे.

अर्थात्, आमचा हा उद्देश मर्यादित असला, तरी या सूचीची उपयोगिता मात्र अमर्याद आहे. त्या-त्या स्थल-काल परिस्थितीत ही सूची वापरणाऱ्यांच्या उद्देश अधिकारासापेक्षाने या सूचीची उपयोगिता वाढू-बदलू शकते. कालोह्ययंनिरवधी र्विपुलाश्च पृथ्वी: तेव्हा, अनंत काळातील समान व/वा अन्य धर्मियांच्या वृत्ती-प्रवृत्तीनुरूप सापेक्ष व अमर्याद उपयोजन क्षमता असलेले ही सूची म्हणजे एक साधन आहे. साधनेसाठी, अभ्यासासाठी, संत साहित्याच्या सेवेसाठी या साधनाचा उपयोग व्हावा. त्यात कल्याण आहे. सर्वांचेच.

संतसाहित्याच्या शब्दा-शब्दाच्या सूचीकरणाने हे काम एकेका प्रकल्पाने पुढेपुढे चालले आहे. हा भगवंताच्या कृपेचा आणि संतांच्या आशीर्वादाचा, त्यांच्या अनुग्रहाचा सर्वात मोठा अन् आश्‍वस्त करणारा पुरावा आहे. एरव्ही, स्थलकाल, बुद्धिशक्ति, पात्रता क्षमता यांच्या व्यक्तिगत

परिच्छिन्न मर्यादेत यातील एकाही प्रकल्पाचे काम पूर्णत्वास जाणे, निव्वळ अशक्य होते. सर्वच ज्ञात अज्ञात शक्तीव्यक्तींचा सहयोग या सर्व संतकार्यास, सत्कार्यास लाभला, त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे हे प्रकल्प व ही पूर्तता.

विश्वकल्याणाच्या सर्वमंगल भावनांचे आणि तदनुरुप उक्तीकृतींचे मूर्तरुप म्हणजे संत. या भावनांतच जीवजगताचे हित आहे, हे त्या सर्वज्ञ जगदीशासही ज्ञात आहेच. विश्वाप्रति आत्मरती असलेली अन् आत्मज्ञानाने चोखडी असलेली संतमांदियाळी म्हणजे भगवंताचीच रूपडी. सर्वच लोभसवाणी. कोडीसवाणी. पण त्यांच्यातही 'लाडके लडिवाळे नामा माझे तान्हे', असे स्वत: भगवंतही ज्यांच्याबद्दल बोलतो, त्या श्रीमंत नामदेवरायांच्या अभंगगाथेच्या या शब्द-कडवे-अभंग सूचीचे प्रकाशन आज श्रीनामदेवरायांच्या व त्यांसोबतच त्यांच्या सकल कुटुंबीयांच्या समाधी सोहळ्याच्या तिथीस होते आहे, हे कालमाहात्म्य आहे.

साक्षात् भगवंतांनी सुदर्शनावर वसविलेल्या पुण्यपावन पंढरीतील श्रीविठ्ठलसन्निद्य असलेल्या श्रीसंत नामदेवरायांच्या मंदिरात, म्हणजे त्यांच्या रहात्या घरात या सूचीचे प्रकाशन होते आहे, हे स्थानमाहात्म्य आहे.

अमृताने पाहिल्या-न्हाइलेल्या या सोन्याच्या दिवसात आणखी एक योगाने दिव्यसुगंधही प्राप्त झाला आहे. तो योग म्हणजे साक्षात् श्रीनामदेवरायांच्या प्रत्यक्ष वंशजांच्या पावन उपस्थितीत, त्यांच्या हस्ते या सूचीचे प्रकाशन होते आहे, हे आमचे भाग्यमाहात्म्य आहे !

श्रीसंत नामदेवमहाराजांच्या अक्षुण्ण, कालजयी अन् वर्धिष्णू वंशपरंपरेतील सतरावे वंशज म्हणजे श्रीमन् ज्ञानेश्वर तुळशीदास नामदास (रेळेकर), उपाख्य: माउली, हे माझे सन्मित्र आणि गुरूबंधू आहेत. पारमार्थिक क्षेत्रातील अधिकाराच्या संबंधाने ते योगेश्वर अन् सर्व ऐश्वर्यसंपन्न श्रीकृष्ण आहेत आणि मी म्हणजे सुदामदेवांच्या फाटक्या वस्त्राचा तुटका धागा. तरीही आमचे मैत्र आहे. आता यास, स्वत:च्या प्रारब्धास दोष देण्यावाचून श्रीमन् ज्ञानेश्वर नामदास काय करणार ? आणि 'धन्य मी मानीन आपुले संचित' याशिवाय मी तरी काय करणार ?

श्रीसंतनामदेवरायांचे 'सतराविये' वंशज असलेल्या या माउलींकडे आम्ही आशीर्वादपर स्तन्याची मागणी केली आणि या आमच्या झट्याचा, धाष्टर्याचा लवमात्र रोष न मानता 'तेणे अधिकचि पान्हा फुटे' असे स्नेहाचे उमाळे अधिकच उसळले. श्री नामदेवरायांसारखेच प्रेमाचे पुतळे असलेल्या या

माउलींनी आमची ती मागणी पूर्णही केली. या श्रीमाउलींचा हा अनाहताचा हल्लरू समाधिबोधाचे सुख देऊन बुझाविणाराही आहे आणि अंत:करणकुहराच्या निबिड तिमिरात नामप्रेमाचा ज्ञानदीप उजळविणाराही आहे. सूचीचे नामाभिधान या नामदासांच्या कृपा–आशीर्वादाने सार्थ ठरले आहे.

नामप्रेमाचा हा ज्ञानदीप अहंकाराच्या वाऱ्याने विझणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी मात्र भक्तभाविक हरिदासांवर आहे. त्यासाठी भगवान श्रीपंढरीश पांडुरंग परमात्म्याचे निधिनिधान परमपावन नाम ज्यांच्या मुखात अहर्निश आहे, अशा नामदेवरायांनीच कृपाच कृपा करून कल्पकल्पांतापावेतो सकळांचे कल्याण करीत राहावे, ही श्रीपांडुरंगाच्या, श्रीसंतनामदेवरायांच्या आणि सकलसंत मांदियाळीच्या चरणी विनम्र प्रार्थना.

रामकृष्णहरि
चकोर श्रीकृष्ण बाविस्कर

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

।। प्रकाशकाचे मनोगत ।।

।। श्रीराम ।।

।। प्रकाशकीय मनोगत ।।

‘‘अमृताहुनि गोड। नाम तुझे देवा।।’’
‘‘तीर्थ विठ्ठल। क्षेत्र विठ्ठल। देव विठ्ठल। देवपूजा विठ्ठल।।’’
‘‘माझा भाव तुझें चरणीं। तुझें रूप माझे नयनी।।’’
‘‘आधी रचिली पंढरी। मग वैकुंठनगरी।।’’
‘‘काय सांगू देवा। ज्ञानोबाची ख्याती।।’’
‘‘देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।।’’
‘‘नामाचा गरज गर्जे भीमातीर।।’’
‘‘पक्षिणी प्रभाती चारियासी जाये।।’’
‘‘पतितपावन नाम ऐकूनि आलो मी द्वारा।।’’
‘‘पंढरीनिवासा सखा पांडुरंगा। करी अंगसंगा भक्तांचिया।।’’
‘‘रात्री काळी घागर काळी।।’’
‘‘या रे नाचो अवघे जन।।’’
‘‘आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा।।’’

जगभरातील कोणत्याही मराठी माणसाला वरील सर्व भक्तीगीते (अभंग) सुपरिचित असणारच! कारण या अभंगांत जी नादमयता, लय, माधुर्य आणि तालाचा अनुपमेय संगम आहे तो अन्यत्र अभावानेच आढळणार! आपण ओळखलेच असणार की, ज्या ज्ञानेश्वर माउलींनी ‘भक्त भागवत बहुसाल

ऐकिलें। बहु होऊनि गेले, होती पुढें। परी नामयाचे बोलणे नव्हें हे कवित्व। तो रस अद्भुत निरुपम।'' असे ज्यांचे वर्णन केले त्या संत नामदेवांचे हे स्तुतिगान आहे.

चरित्राचा संक्षिप्त विचार करावयाचा तर संत नामदेवांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० या दिवशी दामाशेटी आणि गोणाई या दांपत्याच्या पोटी पंढरपुर येथे झाला. सुमारे ८० वर्षांचे दीर्घायुष्य त्यांना लाभले. (३ जुलै १३५० रोजी देह ठेविला). नामदेवांचे सर्वस्व म्हणजे पांडुरंग। पांडुरंगाचीही भक्तावर तेवढीच प्रीति। तेवढीची कृपा। तेवढाच लोभ। याची साक्ष 'मागा किती संत झाले। नामा ऐसे कोण बोलें। नामा जाता राऊळासी। देव बोले आधी त्यासी।।' या जनाबाईंच्या अभंगातून येते. नामदेवांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने गुजरात, राजस्थान व मुख्यत्वे पंजाबमध्ये जे कार्य केले त्यामुळे ते महाराष्ट्र ओलांडून मुलतानपर्यंत जाणारे पहिले संत ठरतात. म्हणूनच, राजस्थानात नामदेव महाराजांची शेकडो मंदिरे आहेत आणि शिखांच्या 'गुरु ग्रंथसाहिब' या धर्मग्रंथात नामदेवांची ६१ पदे समाविष्ट आहेत ही मराठी भाषिकांसाठी आत्मगौरवाची बाब आहे आणि पंढरपुर प्रमाणेच पंजाबातील घुमान या गांवी सुद्धा त्यांची समाधी आहे. संत चोखोबांच्या मृत्युनंतर त्यांचे अंतिम क्रियाकर्म नामदेव महाराजांनी पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराच्या आवारातच केले आणि देवाच्या द्वारीच चोखोबांची समाधी बांधली. यामुळे देवळात जाणाऱ्याला चोखोबांचे दर्शन घेऊनच जावे लागते. म्हणून नामदेव आद्य अस्पृश्योद्धारक आहेत, असे मानावे लागते. महाराष्ट्रातील सर्व संतांप्रमाणेच नानक, मीराबाई, नरसी मेहता, रोहिदास, कबीर ही उत्तरेतील संतांची मांदियाळीसुद्धा नामदेवांचे उपकार मानतात. वारकरी भजन आणि कीर्तनाची सांगता नामदेवांच्या 'आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा' या पसायदानानेच होत असते. पांडुरंग हाच नामदेवांचा सखा, सोयरा, माय, बाप, देव, गुरु, स्वामी असा सर्वस्व होता. म्हणूनच निवृत्तीनाथ महाराज म्हणतात की ''नामदेवासंगे देवाचा ओढा। देव केला वेडा पांडुरंग।। भक्तीचिया बळें देव पैं जिंकिला। ऋणाइत केला कैसा येणें।'' नामदेवांच्या कोटी अभंगांप्रमाणेच त्यांच्या संबंध परिवाराने अभंगरचना केली आहे. ''गुरुविण कोण दाखविल वाट।'' हे जाणून नामदेवांनी विसोबा खेचरांकडून औंढ्या नागनाथ येथे गुरुपदेश घेतला. पुंडलिकापासून जनाबाईंपर्यंत सर्व भक्तांची चरित्रें लिहून ठेवली आहेत, म्हणून नामदेव आद्य चरित्रकार होत. ''जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत।।'' याची प्रचिती नामदेवांच्या श्वानामागें तुपाची वाटी घेऊन धावण्याच्या क्रियेत दिसते. त्याचप्रमाणे, पंजाबात एका महारोग्यालासुद्धा आश्रय दिला. नामदेवांच्या एका गौळणीत श्रीकृष्णाच्या पाचपैकी एक गोपी मुस्लिम आहे यावरून सर्वधर्मसमन्वयसुद्धा त्यांनी साधला होता हे दिसते.

असे अलौकिक चरित्र असलेल्या नामदेवरायांची महती गाताना ज्ञानेश्वर माउली म्हणतात ''धन्य तुझा जन्म। धन्य तुझे कुळ। धन्य तुज राऊळ। जवळी असे।'' अवतारसमाप्ती नंतर नामदेव महाराजच तुकारामांच्या रूपात पुनश्च अवतरले. ''जगद्गुरु तुका अवतार नामयाचा। संप्रदाय सकळांचा

येथूनिया।'' या अभंगात संत निळोबारायांनी या वचनाची पुष्टी केली आहे. रामेश्वरभटांना माउलींनी स्वप्नदृष्टांत दिलेल्या अभंगातही ''तुका सर्व श्रेष्ठ प्रिय आम्हां थोर। कां जो अवतार नामयाचा।'' असा उल्लेख आहे.

''नामयाची अभंगवाणी। असे अमृताची खाणी।' अशा संत नामदेवांची आज (२४ जुलै २०१४) पुण्यतिथी आहे. या पावन आणि मंगल सुदिनी अद्वैत प्रकाशनाची ''नाचू कीर्तनाचे रंगी।'' ही नामदेव गाथेची शब्द - अभंग - चरण - सूची प्रकाशित होत आहे. नामदेव महाराजांनी पंजाबप्रांती अटकेपार झेंडा रोवला त्या घुमान यावी यावर्षीचे मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. हा सुद्धा एक सुयोगच आहे आणि नामदेवरायांचा गौरव आहे.

या अभंग सूचीमध्ये नामदेव महाराजांचे अभंग, त्यांचे अप्रकाशित अभंग, कुटुंबीयांचे अभंग, संत जनाबाईंचे अभंग, हिंदी पदावली आणि गुरुग्रंथसाहिब या शीख धर्मग्रंथातील अभंग अशा क्रमाने अभंग आणि त्यांची सूची असा क्रम ठेवला आहे.

अद्वैत प्रकाशनातर्फे याआधी माउलींचा हरिपाठ, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा आणि दासबोध या ग्रंथांची सूची प्रकाशित झाली आहे. तद्वतच, दृष्टान्त - सिद्धान्त रूपातील चतुरंगी ज्ञानेश्वरी प्रत आणि भगवद्गीतेचा दृकश्राव्य प्रकल्पही सिद्धीस गेला आहे. आजच्या महन्मंगल प्रसंगी नामदेव गाथेची सूची प्रकाशित होत आहे. यात आमचे कर्तृत्व काहीच नसून 'साइखडियाचे बाहुले। चालवित्या सूत्राचेनि चाले। तैसा माते दावीत बोले। स्वामी तो माझा।'' अशीच आमची भावना आणि भूमिका आहे. या सूचीच्या उद्देश आणि उपयुक्ततेविषयी ह. भ. प. श्री. बाविस्कर महाराजांनी त्यांच्या मनोगतात विस्तृत विवेचन केले आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती नको.

''नामदेव कीर्तन करी। पुढे नाचे पांडुरंग।।' अशी आजच्या युगातही ज्यांच्या कीर्तन-प्रवचनात श्रोत्यांना व भक्तांना प्रचिती येते त्या ह. भ. प. श्री. चकोर श्रीकृष्ण बाविस्कर महाराजांचा अकृत्रिम स्नेह आणि अनमोल सहाय्य व मार्गदर्शन आम्हाला लाभले हे आमचे महद्भाग्य! महाराज स्वत: पिढीजात कीर्तन - प्रवचनकार असल्याने तुकाराम व नामदेव गाथेच्या प्रकल्पात त्यांना सक्रिय आणि सहर्ष सहभाग आम्हाला सुखावह ठरत आहे. बाविस्कर महाराज लौकिकात न्यायाधीशपदी विराजित असल्याने सर्वार्थाने ''अधिकारी'' सन्मित्राचे सान्निध्य आम्हाला मिळाले आहे. नामदेव गाथेची मूळ संहिता बाविस्कर महाराजांनीच उपलब्ध करून दिली आहे. आम्ही त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करतो.

नामदेव हेच ज्यांचे जीवनसर्वस्व अशा पंढरपूरनिवासी ह. भ. प. श्री. प्रकाश दत्तात्रेय निकते (गुरुजी) यांनी विनाविलंब त्यांच्या नामदेव गाथेची मूळ संहिता उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे तर नामदेव महाराजांचे चरित्र, जीवन, अभंग, महत्त्व अशा सर्वांगाने परिपूर्ण, विस्तृत आणि अभ्यासपूर्ण अशी प्रदीर्घ प्रस्तावना दिली आहे. आम्ही त्यांचे शतश: आभारी व ऋणी आहोत. तसेच संपूर्ण नामदेव गाथा निकते गुरुजींना मुखोद्गत आहे या विभूतीस आमचे त्रिवार वंदन!

‘‘आजि सोनियाचा दिनु। वर्षे अमृताचा घनु।।’’ अशी आमची आज भावावस्था झाली आहे. कारण नामदेव महाराजांच्या वंशपरंपरेतील सतरावे वंशज श्रीमन् ज्ञानेश्वर तुळशीदास नामदास (रेळेकर) उपाख्य माउली यांनी या प्रकल्पास ‘‘आशीर्वचन’’ रूपी प्रस्तावना दिली आहे. तद्वतच नामदास महाराजांच्या उपस्थितीतच या सूचीचे प्रकाशन होत आहे. श्री. नामदास महाराजांनाही आमचे साष्टांग दंडवत!

ह. भ. प. श्री. निकते गुरुजी यांच्या नामदेव गाथेची प्रकाशित प्रत त्वरित उपलब्ध करून देणारे ठाण्याचे श्री. अतुल भिडे यांचे आभारी आहोत. आमच्या प्रत्येक प्रकपास मार्गदर्शन करणारे संतसाहित्याचे अभ्यासक श्री. रा. शं. नगरकर यांचेही आम्ही ऋणी आहोत. सर्व प्रकल्पांच्या डी.टी.पी. चे काम मनोभावे करणारे श्री. अविनाश कढे यांचेही आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

ह. भ. प. श्री. निकते गुरुजींच्या नामदेव गाथेचे प्रकाशक सह्याद्री मानव सेवा मंच – ठाणे यांचेही आम्ही विशेष आभार मानतो.

संत साहित्याचे प्रेमी, अभ्यासक, कीर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते या सर्वांना ‘‘नाचू कीर्तनाचे रंगी।’’ या सूचीचा उपयोग आणि आनंद मिळावा ही सदिच्छा!

या प्रकल्पात काही चूका, उणीवा, कमतरता असल्यास त्या ‘‘न्यून ते पुरते।’’ म्हणून वाचकांनी माफ कराव्यात ही विनंती.

नादमाधुर्य असलेली अभंगरचना आणि गीत, वाद्य व नृत्य या तिहींचा ज्या नामदेव महाराजांच्या कीर्तनात त्रिवेणीसंगम होत असे त्या नामदेवरायांना वंदन करून हे मनोगत आटोपते घेतो.

‘‘दुधावरील साय तेवी वानु काय। तैसें गाणे गाये नामदेवा।
परिसा म्हणें नाम्या तैसे तुझे गाणे। जैसें का नाणे टाकसाळीचे।।’’

आषाढ वद्य त्रयोदशी

२४ जुलै २०१४

अद्वैत पब्लिकेशन्स्

प्रकल्प

‘ऐसीं नानावर्णें रूपडीं’ –श्री ज्ञानेश्वरी – दृष्टांत सिद्धांत रूप चतुरंगातील पारायण प्रत
‘तो वाग्यज्ञु म्हणिजे’ – श्री ज्ञानेश्वरी – शब्द ओवी सूची
‘ते हे मंत्ररहस्य गीता’ –श्रीमद् भगवद्गीता – शब्द श्लोक सूची
‘हे गीतासागर तरंग’ – श्रीमद् भगवद्गीता पठण – दृक श्राव्य प्रकल्प
‘तुका झालासे कळस’ – श्री तुकाराम गाथा – शब्द अभंग सूची
‘हे शब्द रत्नांचे सागर’ – श्रीमद् दासबोध – शब्द ओवी सूची
‘शब्दब्रह्में होसी आकळा’ – श्री ज्ञानदेव गाथा – शब्द अभंग सूची
‘नाचू कीर्तनाचे रंगी’ – श्री नामदेव गाथा – शब्द अभंग सूची
‘श्रीकृष्णकीर्तीचे एकेक अक्षर’ – श्री एकनाथी भागवत – शब्द ओवी सूची
‘तयाचे बिसाट शब्द’ – श्री ज्ञानदेव हरिपाठ – शब्द अभंग सूची

॥ नाचू कीर्तनाचे रंगी ॥

॥ अनुक्रमणिका (अक्षरवार शब्दसंख्या) ॥

अक्षरवार शब्दसंख्या

भाग क्रमांक	भाग	अभंग संख्या	चरण संख्या	शब्दसंख्या
१	मराठी अभंग	२१२५	१३३०९	१२०८१८
२	हिंदी अभंग	२३०	११४३	१३३८१
३	कुटुंबीय अभंग	१४५	८८४	७६८५
४	संत जनाबाई अभंग	४८५	१८१०	१२६५६
५	अप्रकाशित अभंग	६९	३५६	३२२९
६	गुरुग्रंथसाहिब अभंग	६१	३०१	४११९
	एकुण	३११५	१७८०३	१६१८८८

अक्षरवार शब्दसंख्या भाग १

।। संत नामदेव गाथा – मराठी अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	१३२६७	१२	ड	३७२१०	२९०	२३	म	८०४५०	१००७२
२	क	१३२६८	९४३२	१३	ढ	३७५००	२७	२४	य	९०५२२	२०९०
३	ख	२२७००	६९२	१४	त	३७५२७	९३५७	२५	र	९२६१२	२५०८
४	ग	२३३९२	३४५०	१५	थ	४६८८४	२९९	२६	ल	९५१२०	१६१२
५	घ	२६८४२	१४६५	१६	द	४७१८३	५६९१	२७	व	९६७३२	७२२५
६	च	२८३०७	२२२३	१७	ध	५२८७४	१९५७	२८	श	१०३९५७	२०४१
७	छ	३०५३०	१०१	१८	न	५४८३१	१०२१५	२९	ष	१०५९९८	३०
८	ज	३०६३१	५५७२	१९	प	६५०४६	८८२६	३०	स	१०६०२८	९६५८
९	झ	३६२०३	२७१	२०	फ	७३८७२	३४८	३१	ह	११५६८६	४२९९
१०	ट	३६४७४	१९७	२१	ब	७४२२०	३०४५	३२	क्ष	११९९८५	३०३
११	ठ	३६६७१	५३९	२२	भ	७७२६५	३१८५	३३	ज्ञ	१२०२८८	५३१
										एकुण	१२०८१८

अक्षरवार शब्दसंख्या भाग २

।। संत नामदेव गाथा – हिंदी अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	१०७०	१२	ड	४३३५	४५	२३	म	९४१९	९७५
२	क	१०७१	१२९०	१३	ढ	४३८०	८	२४	य	१०३९४	४६
३	ख	२३६१	३९	१४	त	४३८८	७४७	२५	र	१०४४०	६८३
४	ग	२४००	४६३	१५	थ	५१३५	४६	२६	ल	१११२३	३२३
५	घ	२८६३	९६	१६	द	५१८१	५२२	२७	व	११४४६	१६०
६	च	२९५९	२३६	१७	ध	५७०३	१७८	२८	श	११६०६	१५
७	छ	३१९५	९९	१८	न	५८८१	१२३८	२९	ष	११६२१	६९
८	ज	३२९४	९४८	१९	प	७११९	८७२	३०	स	११६९०	१०९४
९	झ	४२४२	४९	२०	फ	७९९१	६६	३१	ह	१२७८४	५९७
१०	ट	४२९१	१८	२१	ब	८०५७	८५९	३३	ज्ञ	१३३८१	१
११	ठ	४३०९	२६	२२	भ	८९१६	५०३			एकुण	१३३८१

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

संत नामदेव गाथा – शब्द अभंग चरण सूची

अक्षरवार शब्दसंख्या भाग ३

।। संत नामदेव गाथा – कुटुंबीय अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	८३९	१२	ड	२४१२	१२	२३	म	५२६५	६५३
२	क	८४०	६३८	१३	ढ	२४२४	१	२४	य	५९१८	११२
३	ख	१४७८	४९	१४	त	२४२५	७०९	२५	र	६०३०	१४०
४	ग	१५२७	१९८	१५	थ	३१३४	१५	२६	ल	६१७०	१४६
५	घ	१७२५	१०२	१६	द	३१४९	३७७	२७	व	६३१६	५२८
६	च	१८२७	१३४	१७	ध	३५२६	१२७	२८	श	६८४४	१०७
७	छ	१९६१	७	१८	न	३६५३	६३६	२९	स	६९५१	४६४
८	ज	१९६८	३३५	१९	प	४२८९	५४७	३०	ह	७४१५	२५२
९	झ	२३०३	२१	२०	फ	४८३६	२५	३१	क्ष	७६६७	१४
१०	ट	२३२४	८	२१	ब	४८६१	२३६	३२	ज्ञ	७६८१	५
११	ठ	२३३२	८०	२२	भ	५०९७	१६८			एकुण	७६८५

अक्षरवार शब्दसंख्या भाग ४

।। संत नामदेव गाथा – संत जनाबाई अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	१३६६	१२	ड	४२८१	४७	२३	म	८६४३	११०५
२	क	१३६७	९८७	१३	ढ	४३२८	१०	२४	य	९७४८	१८१
३	ख	२३५४	६९	१४	त	४३३८	८६२	२५	र	९९२९	३३९
४	ग	२४२३	३४७	१५	थ	५२००	३४	२६	ल	१०२६८	१९७
५	घ	२७७०	१९९	१६	द	५२३४	७६०	२७	व	१०४६५	६८३
६	च	२९६९	२२४	१७	ध	५९९४	२५७	२८	श	१११४८	२०४
७	छ	३१९३	१८	१८	न	६२५१	७९४	२९	स	११३५२	७९५
८	ज	३२११	९४४	१९	प	७०४५	८७९	३०	ह	१२१४७	४५१
९	झ	४१५५	३६	२०	फ	७९२४	४०	३१	क्ष	१२५९८	२२
१०	ट	४१९१	३०	२१	ब	७९६४	३६७	३२	ज्ञ	१२६२०	३७
११	ठ	४२२१	६०	२२	भ	८३३१	३१२	३३		एकुण	१२६५६

अक्षरवार शब्दसंख्या भाग ५

।। संत नामदेव गाथा – अप्रकाशित अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	३२९	१२	ड	१०१२	२	२३	म	२१९३	२८६
२	क	३३०	३०६	१३	ढ	१०१४	१	२४	य	२४७९	५५
३	ख	६३६	१७	१४	त	१०१५	२७३	२५	र	२५३४	९६
४	ग	६५३	६९	१५	थ	१२८८	८	२६	ल	२६३०	६२
५	घ	७२२	४०	१६	द	१२९६	१६९	२७	व	२६९२	१५५
६	च	७६२	५६	१७	ध	१४६५	५१	२८	श	२८४७	४६
७	छ	८१८	१	१८	न	१५१६	२७१	२९	स	२८९३	२३२
८	ज	८१९	१५४	१९	प	१७८७	२२६	३०	ह	३१२५	९६
९	झ	९७३	८	२०	फ	२०१३	१८	३१	क्ष	३२२१	४
१०	ट	९८१	५	२१	ब	२०३१	६६	३२	ज्ञ	३२२५	५
११	ठ	९८६	२६	२२	भ	२०९७	९६			एकुण	३२२९

अक्षरवार शब्दसंख्या भाग ६

।। संत नामदेव गाथा – गुरुग्रंथसाहिब अभंग – शब्द अभंग चरण सूची ।।

भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या	भाग	अक्षर	शब्दक्रमांक	शब्दसंख्या
१	अ	१	३५४	१२	ड	१५१२	१२	२३	म	३०३०	२७८
२	क	३५५	४१०	१३	ढ	१५२४	४	२४	य	३३०८	२
३	ख	७६५	३७	१४	त	१५२८	२४४	२५	र	३३१०	१८१
४	ग	८०२	१९०	१५	थ	१७७२	१३	२६	ल	३४९१	७९
५	घ	९९२	४४	१६	द	१७८५	१५८	२७	व	३५७०	३२
६	च	१०३६	७१	१७	ध	१९४३	६२	२८	श	३६०२	३
७	छ	११०७	४०	१८	न	२००५	३३४	२९	स	३६०५	३११
८	ज	११४७	३३०	१९	प	२३३९	२५१	३०	ह	३९१६	२०४
९	झ	१४७७	९	२०	फ	२५९०	१५				
१०	ट	१४८६	१०	२१	ब	२६०५	२८३				
११	ठ	१४९६	१६	२२	भ	२८८८	१४२			एकुण	४११९

।। नाचू कीर्तनाचे रंगी ।।

---------------- भाग १ ----------------

।। संत नामदेव गाथा - मराठी अभंग ।।

।। संत नामदेव गाथा - मराठी अभंग - शब्द अभंग चरण सूची ।।

१	।।ना.गा.०००१.००१।।	प्रथम नमन करूं गणनाथा । उमाशंकराचिया सुता । चरणावरी ठेवूनि माथा । साष्टांगी आतां दंडवत
२	।।ना.गा.०००१.००२।।	दुसरी वंदूं सारजा । जे चतुराननाची आत्मजा । वाक्सिद्धी पाविजे सहजा । तिच्या चरणवोजा दंडवत
३	।।ना.गा.०००१.००३।।	आतां वंदूं देवब्राह्मण। ज्यांचेनि पुण्यपावन । प्रसन्न होऊनी श्रोतेजन । त्या माझें नमन दंडवत
४	।।ना.गा.०००१.००४।।	आतां वंदूं साधुसज्जन । रात्रंदिवस हरिचें ध्यान। विठ्ठल नाम उच्चारिती जन । त्या माझें नमन दंडवत
५	।।ना.गा.०००१.००५।।	आतां नमूं रंगभूमिका । कीर्तनीं उभे होती लोकां । टाळ मृदुंग श्रोते देखा । त्या माझे दंडवत
६	।।ना.गा.०००१.००६।।	ऐसें नमन करोनि सकळां । हरिकथा बोले बोबड्या बोला । अज्ञान म्हणोनि आपल्या बाळा । चालवी सकळां नामा म्हणे
७	।।ना.गा.०००२.००१।।	प्रथम नमूं गजवदनु । गौरीहराचा नंदनु । सकळ सुरवरांचा वंदनु । मूषकवाहनु नमियेला
८	।।ना.गा.०००२.००२।।	त्रिपुरावधीं गणाधिपति। हरे पूजिला भावें भक्ती । एके बाणें त्रिपुर पाडिला क्षितीं । तैं पशुपति संतोषला
९	।।ना.गा.०००२.००३।।	इंद्रादिकीं अष्टलोकपाळीं । लंबोदरू पूजिला कनककमळीं । त्यासी प्रसन्न जाला तयेवेळीं । म्हणवूनी सकळीं पूजियेला
१०	।।ना.गा.०००२.००४।।	सटवें रात्रीं मदनु शंभरें नेला । प्रद्युम्न समुद्रामाजी टाकिला । तैं कृष्णें विघ्नहरु पूजिला । प्रद्युम्न आला रतीसहित
११	।।ना.गा.०००२.००५।।	पूजिला साही चक्रवर्ती । त्यांचिया पुरती आर्ती । युधिष्ठिरें पूजिला चतुर्थी । राज्यप्राप्ती जाली तया
१२	।।ना.गा.०००२.००६।।	म्हणवूनि सुरवरीं केली पूजा । त्रिभुवनीं आणिक नाहीं दुजा । विष्णुदास नामा म्हणे स्वामी माझा । भावें भजा एकदंता
१३	।।ना.गा.०००३.००१।।	गणेश नमूं तरी तुमचा नाचणा । म्हणोनि नारायणा नमन माझें
१४	।।ना.गा.०००३.००२।।	सारजा नमूं तरी तुमची गायणी । म्हणोनि चक्रपाणी नमन माझें
१५	।।ना.गा.०००३.००३।।	इंद्र नमूं तरी तुमचिया भुजा । म्हणोनि गरुडध्वजा नमन माझें
१६	।।ना.गा.०००३.००४।।	ब्रह्मा नमूं तरी तुमचिये कुसी। म्हणोनि हृषिकेशी नमन माझें
१७	।।ना.गा.०००३.००५।।	शंकर नमूं तरी तुमची विभूति । म्हणोनि कमळापति नमन माझें
१८	।।ना.गा.०००३.००६।।	वेद नमूं तरी तो तुझा स्थापिता । म्हणोनि लक्ष्मीकांता नमन माझें
१९	।।ना.गा.०००३.००७।।	गंगा नमूं तरी तुमच्या अंगुष्टीं । म्हणोनि जगजेठी नमन माझें
२०	।।ना.गा.०००३.००८।।	लक्ष्मी नमूं तरी तुमच्या पायांतळी । म्हणोनि वनमाळी नमन माझें
२१	।।ना.गा.०००३.००९।।	नामा म्हणे भेटी जालिया पैं राया । कोण गणि वायां सेवकासि
२२	।।ना.गा.०००४.००१।।	गाणें जरी म्हणों तरी गणेश सारजा । आणिक नाहीं दुजा तयावांचूनी
२३	।।ना.गा.०००४.००२।।	नाचेन म्हणों तरी तांडववनीं महेश्वरू । तो एक नृत्याकारू करूं जाणे
२४	।।ना.गा.०००४.००३।।	बोलका म्हणों तरी बोलके वेद चारी । त्याणें काय उरी जें मी बोलों
२५	।।ना.गा.०००४.००४।।	जाणुं म्हणों तरी अठराही जाणें । त्या पैं काय उणें जें मी जाणों
२६	।।ना.गा.०००४.००५।।	कळावंत म्हणों तरी चंद्र सूर्य दोन्ही । बारा सोळा गगनीं दाविताती

२७	।।ना.गा.०००४.००६।।	नामा म्हणे आवघे आवघे वेंचलें। केशवें आपुलें म्हणावें मातें
२८	।।ना.गा.०००५.००१।।	तरी मी गाणु नव्हे जे गाणीव करी । जेणें तुमतें हरि संतोष उपजे
२९	।।ना.गा.०००५.००२।।	तरी मी जाणु नव्हे जे जाणीव करी । जेणें तुमतें हरि संतोष उपजे
३०	।।ना.गा.०००५.००३।।	तरी मी दाता नव्हे जें दातृत्व करी । जेणें तुमतें हरि संतोष उपजे
३१	।।ना.गा.०००५.००४।।	तरी मी बहुरूपी नव्हे जे अभिनव नट धरी । जेणें तुमतें हरि संतोष उपजे
३२	।।ना.गा.०००५.००५।।	तरी मी योगी नव्हे जें मी ध्यान धरी । जेणें तुमतें हरि संतोष उपजे
३३	।।ना.गा.०००५.००६।।	यावरी जाणसीं तें तूं करी अनंता । नामा विनवी संतां विष्णुदासा
३४	।।ना.गा.०००६.००१।।	लंबोदरा तुज शोभे शुंडादंड । करीतसे खंड दुश्चिन्हांचा
३५	।।ना.गा.०००६.००२।।	चतुर्भुज आयुधें शोभताती हातीं। भक्ताला रक्षिती निरंतर
३६	।।ना.गा.०००६.००३।।	भव्य रूप तुझें उंदीरवाहना । नमन चरणा करीतसे
३७	।।ना.गा.०००६.००४।।	तुझें नाम घेतां दोष जळताती। कळिकाळ कांपती तुझ्या नामें
३८	।।ना.गा.०००६.००५।।	चौदा विद्या तुझे कृपेनें येतील । मुके बोलतील वेदघोष
३९	।।ना.गा.०००६.००६।।	रूणझुण पायीं वाजताती वाळे । ऐकोनी भुलले मन माझें
४०	।।ना.गा.०००६.००७।।	भक्तवत्सला ऐकें पार्वतीनंदना । नमन चरणां करितसे
४१	।।ना.गा.०००६.००८।।	नामा म्हणे आतां देई मज स्फूर्ती। वर्णितसे कीर्ति कृष्णजीची
४२	।।ना.गा.०००७.००१।।	सरस्वती माते द्यावी मज स्फूर्ती । येतों काकुलती तुजलागीं
४३	।।ना.गा.०००७.००२।।	लाडकें लडिवाळ मागतसे तुज। वंदीन हे रज चरणींचे
४४	।।ना.गा.०००७.००३।।	त्वरें येवोनियां मस्तकीं ठेवी हात । जाईल ही भ्रांत तेव्हां माझी
४५	।।ना.गा.०००७.००४।।	आपुल्या बाळासी धरी आतां हातीं । न करी फजिती जनामध्यें
४६	।।ना.गा.०००७.००५।।	विश्वात्मा जो हरि त्याची वर्णिन कीर्ति । आवडीचा ओती रस यातें
४७	।।ना.गा.०००७.००६।।	ऐकोनियां स्तव जालीसे प्रसन्न । नाम्या तुझा अभिमान मजलागीं
४८	।।ना.गा.०००८.००१।।	प्रल्हाद नारद पराशर पुंडरीक । व्यास आणि वाल्मिक नमीयेले
४९	।।ना.गा.०००८.००२।।	बगदालभ्य तो भीष्म अंबरीष शौनक । ब्रह्मनिष्ठ शुक नमीयेले
५०	।।ना.गा.०००८.००३।।	रुक्मांगद अर्जुन वसिष्ठ बिभीषण । केलेसें नमन याजलागीं
५१	।।ना.गा.०००८.००४।।	टीकाकार श्रीधर बहिरंभट चतुर । करा निरंतर कृपा मज
५२	।।ना.गा.०००८.००५।।	साधुसंतसिद्ध शिरीं ठेवा हात । वर्णीन समस्त कृष्णलीला

५३	।।ना.गा.०००८.००६।।	नामा मनीं आठवीं खेचरचरण । तयाच्या कृपेनें सिद्धि जावो
५४	।।ना.गा.०००९.००१।।	देवा आदिदेवा सर्वत्रांच्या जीवा । ऐकें वासुदेवा दयानिधी
५५	।।ना.गा.०००९.००२।।	ब्रह्मा आणि इंद्र वंद्य सदाशिवा। ऐकें वासुदेवा दीनबंधु
५६	।।ना.गा.०००९.००३।।	चौदा लोकपाळ करिती तुझी सेवा । ऐकें वासुदेवा कृपासिंधु
५७	।।ना.गा.०००९.००४।।	योगियांचे ध्यानीं नातुडसी देवा । ऐकें वासुदेवा जगद्गुरु
५८	।।ना.गा.०००९.००५।।	निर्गुण निराकार नाहीं तुज माया । ऐकें कृष्णराया कानडिया
५९	।।ना.गा.०००९.००६।।	करुणेचा पर्जन्य शिंपी मज तोया। ऐकें कृष्णराया गोजरीया
६०	।।ना.गा.०००९.००७।।	नामा म्हणे जरी दाखविशील पाया। तरी वदावया स्फूर्ती चाले
६१	।।ना.गा.००१०.००१।।	क्षीरसागरांत अससी बैसला । धांवोनी मजला भेटी देई
६२	।।ना.गा.००१०.००२।।	शेषावरी जरी अससी निजला । धांवोनी मजला भेटी देई
६३	।।ना.गा.००१०.००३।।	कैलासीं शिव पूजितसे तुजला । धांवोनि मजला भेटी देई
६४	।।ना.गा.००१०.००४।।	योगियांचे ध्यानीं अससी बैसला । धांवोनि मजला भेटी देई
६५	।।ना.गा.००१०.००५।।	गहिंवरोनि नामा बाहात विठ्ठला । धांवोनि मजला भेटी देई
६६	।।ना.गा.००११.००१।।	चक्रवाक पक्षी वियोगें बाहाती । जालें मजप्रती तैसें आतां
६७	।।ना.गा.००११.००२।।	चुकलिया माया बाळकें रडती। जालें मजप्रती तैसें आतां
६८	।।ना.गा.००११.००३।।	वत्स न देखतां गाई हुंबरती । जाले मजप्रती तैसें आतां
६९	।।ना.गा.००११.००४।।	जीवनावेगळे मत्स्य तळमळती । जालें मजप्रती तैसें आतां
७०	।।ना.गा.००११.००५।।	नामा म्हणे मज ऐसें वाटे चित्तीं । करीतसे खंती फार तुझी
७१	।।ना.गा.००१२.००१।।	काय माझा आतां पाहातोसी अंत । येई बा धांवत देवराया
७२	।।ना.गा.००१२.००२।।	माझ्या जीवा होय तुजविण आकांत । येई बा धांवत देवराया
७३	।।ना.गा.००१२.००३।।	असे जरी काम भेटूनियां । येई बा धांवत देवराया
७४	।।ना.गा.००१२.००४।।	येरे देवा नामा तुज बाहत । येई बा धांवत देवराया
७५	।।ना.गा.००१३.००१।।	न वर्णवे वाचे जन्ममरण दुःख । दावीं आतां मुख पांडुरंगा
७६	।।ना.गा.००१३.००२।।	कुरळिया केश भाळीं शोभे तिलक । दावीं आतां मुख पांडुरंगा
७७	।।ना.गा.००१३.००३।।	भोंवया व्यंकटा शोभती सुरेख । दावीं आतां मुख पांडुरंगा
७८	।।ना.गा.००१३.००४।।	कमलाकार नेत्र सुंदर नासीक । दावीं आतां मुख पांडुरंगा

७९	।।ना.गा.००१३.००५।।	कर्णींची कुंडलें न वर्णवे हाटक । दावीं आतां मुख पांडुरंगा
८०	।।ना.गा.००१३.००६।।	अधरारक्त दंत इंदुहूनि अधिक। दावीं आतां मुख पांडुरंगा
८१	।।ना.गा.००१३.००७।।	विष्णुदास नामा तुझेंचि बाळक । दावीं आतां मुख पांडुरंगा
८२	।।ना.गा.००१४.००१।।	बाहुबळें तुवां काढिलें अमृत । ठेवीं बा तो हात शिरावरी
८३	।।ना.गा.००१४.००२।।	जननी माझी जेव्हां ज्याकडे बाहात । ठेवीं बा तो हात शिरावरी
८४	।।ना.गा.००१४.००३।।	देवा बैसवोनी सुधेते वाढीत । ठेवीं बा तो हात शिरावरी
८५	।।ना.गा.००१४.००४।।	क्षीराचा सागर उपमन्यूशीं देत । ठेवीं बा तो हात शिरावरी
८६	।।ना.गा.००१४.००५।।	घेवोनियां चक्र परीक्षिता रक्षीत । ठेवीं बा तो हात शिरावरी
८७	।।ना.गा.००१४.००६।।	कवटाळुनी धरिलें धृवासी वनांत। ठेवीं बा तो हात शिरावरी
८८	।।ना.गा.००१४.००७।।	विदुराच्या घरीं कण्या सांभाळीत । ठेवीं बा तो हात शिरावरी
८९	।।ना.गा.००१४.००८।।	चिरंजीव करूनिया नगरी सुवर्ण देत । ठेवीं बा तो हात शिरावरी
९०	।।ना.गा.००१४.००९।।	नामा म्हणे युद्धीं रक्षियेला पार्थ । ठेवीं बा तो हात शिरावरी
९१	।।ना.गा.००१५.००१।।	रुणझुण पायीं वाजताती वाळे । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९२	।।ना.गा.००१५.००२।।	जनक श्रुत देवाच्या घरासी जे गेले। दावीं तीं पाऊलें दयानिधी
९३	।।ना.गा.००१५.००३।।	धरियेलें नक्रें तेंव्हा जी धाविली । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९४	।।ना.गा.००१५.००४।।	वस्त्रहरणी ज्यातें द्रौपदीनें चिंतिली । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९५	।।ना.गा.००१५.००५।।	देखोनियां ज्यांतें कौरव भ्याले । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९६	।।ना.गा.००१५.००६।।	धर्म आणि भीष्म विदुरादिक धाले । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९७	।।ना.गा.००१५.००७।।	स्वयंवराशीं जातां शीळें उद्धरिलें । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९८	।।ना.गा.००१५.००८।।	नामा म्हणे ज्यातें बळीनें पूजिलें । दावीं तीं पाऊलें दयानिधी
९९	।।ना.गा.००१६.००१।।	अडखळूनी पडशी घालूं नको जोडा । धांवत दुडदुडा येईं आतां
१००	।।ना.गा.००१६.००२।।	बैसावयासाठी घेंऊ नको घोडा । धांवत दुडदुडा येईं आतां
१०१	।।ना.गा.००१६.००३।।	भोजना बैसलासी घेई पान विडा । धांवत दुडदुडा येईं आतां
१०२	।।ना.गा.००१६.००४।।	बाहुबळें काढिला देवांचा जो खोडा । धांवत दुडदुडा येईं आतां
१०३	।।ना.गा.००१६.००५।।	कृपाळु बहुत लक्ष्मीचा चुडा । त्याला बाहतसे वेडा नामदेव
१०४	।।ना.गा.००१७.००१।।	येरे येरे देवा तुला देईन मी पेडा । वेगीं बाहे वेडा नामदेव

१०५	।।ना.गा.००१७.००२।।	ज्याचे पायीं असे बिरुदाचा तोडा। त्याला बाहे वेडा नामदेव
१०६	।।ना.गा.००१७.००३।।	जनीं पुसे सुखी रखुमाईचा जोडा । त्याला बाहे वेडा नामदेव
१०७	।।ना.गा.००१७.००४।।	यावयासी येथें आळस तुम्हीं सोडा । घेईन इडापिडा नामा म्हणे
१०८	।।ना.गा.००१८.००१।।	युगा ऐसें पळ तुजविण जाय । पहातोसी काय अंत माझा
१०९	।।ना.गा.००१८.००२।।	कोमळ हृदय तुझें पंढरीच्या राया। कठिण सखया कैसें जालें
११०	।।ना.गा.००१८.००३।।	विचारिलें चित्तीं दुर्लभ हरिहरा । जाऊं कैसा घरा रंकाचिया
१११	।।ना.गा.००१८.००४।।	अंगिकारावरी अव्हेराची मात । नव्हे हें उचित देवराया
११२	।।ना.गा.००१८.००५।।	मागें जे कां आळी केली वासुदेवा । उदारा केशवा पुरविली
११३	।।ना.गा.००१८.००६।।	नुपेक्षिसी ऐसा भरंवसा चित्तासी । दिसोनी निराशा जाली आतां
११४	।।ना.गा.००१८.००७।।	वांचोनिया दुःख भोगावे म्यां आता । प्राणासी मुकतां तेंचि भलें
११५	।।ना.गा.००१८.००८।।	वर्णितां तो नामा झाला समाधिस्थ । जहालें विदित पांडुरंगा
११६	।।ना.गा.००१९.००१।।	त्वरें धांवोनियां आलासे गोविंद । सावध सावध नामदेवा
११७	।।ना.गा.००१९.००२।।	रुसलासे नामा देवासी न बोले । करें कुर्वाळिलें वदन तेव्हां
११८	।।ना.गा.००१९.००३।।	समजावूनि देवें धरिला पोटासी । बोले मजपाशीं नामदेवा
११९	।।ना.गा.००१९.००४।।	नामा म्हणे देवा उशीर कां केला । किंवा माझा आला राग तुला
१२०	।।ना.गा.००२०.००१।।	वेळोवेळां तुज बाहे वेडा भक्त । राहूं नेदी निवांत क्षण एक
१२१	।।ना.गा.००२०.००२।।	मागें बहुतांनीं केले रे प्रबंध । तुझे पाहुनि छंद वेडावलों
१२२	।।ना.गा.००२०.००३।।	माथा ठेऊनि हात बोले विश्वाचा जो बाप । वर्णिले प्रताप नामदेवा
१२३	।।ना.गा.००२१.००१।।	करील जो प्रश्न सांगेल जो कथा । श्रवण करितां उद्धरती
१२४	।।ना.गा.००२१.००२।।	कथा भागीरथी स्नान जे करिती। त्याचे उद्धरती पूर्वज ते
१२५	।।ना.गा.००२१.००३।।	भागीरथी स्नाना श्रम लागे फार । करावें एकाग्र मन येथें
१२६	।।ना.गा.००२१.००४।।	नामा म्हणे ऐसें बोले भागवत । शुक सांगतसे परीक्षिती
१२७	।।ना.गा.००२२.००१।।	पापी जे अभक्त दैत्य ते मातले । धरणीसी जालें ओझें त्यांचें
१२८	।।ना.गा.००२२.००२।।	दिधलासे त्रास ऋषि मुनि सर्वां । न पूजिती देवा कोणी एक
१२९	।।ना.गा.००२२.००३।।	राहियेले यज्ञ मोडिलें कीर्तन । पळाले ब्राह्मण दैत्यां भेणें
१३०	।।ना.गा.००२२.००४।।	वत्सरूपीं पृथ्वी ब्रह्मयापाशीं जाय । नेत्रीं वाहे तोय सांगतसे

१३१	।।ना.गा.००२२.००५।।	बुडविला धर्म अधर्म जाला फार । सोसवेना भार मज आतां
१३२	।।ना.गा.००२२.००६।।	ब्रह्मा इंद्र आणि बरोबरी शिव । चालियले सर्व क्षीराब्धीशीं
१३३	।।ना.गा.००२२.००७।।	नामा म्हणे आतां करितील स्तुती । सावधान चित्तीं परिसावें
१३४	।।ना.गा.००२३.००१।।	वासुदेवा ऋषिकेशा माधवा मधुसूदना । करिताती स्तवना पुरुषसूक्तें
१३५	।।ना.गा.००२३.००२।।	पद्मनाभ त्रिलोकेशा वामना शेषशायी। आम्हां कोणी नाहीं तुजवीण
१३६	।।ना.गा.००२३.००३।।	जनार्दना हरि श्रीवत्स गरुडध्वजा । पाव अधोक्षजा आतां आम्हां
१३७	।।ना.गा.००२३.००४।।	वराहा पुंडरीका नृसिंह नरांतका । वैकुंठनायका देवराया
१३८	।।ना.गा.००२३.००५।।	अच्युता शाश्वता अनंता अज अव्यया । कृपेच्या अभया देई आम्हां
१३९	।।ना.गा.००२३.००६।।	नारायणा देवाध्यक्षा कैठभभंजना । करी रे मर्दना दुष्टाचिया
१४०	।।ना.गा.००२३.००७।।	चक्रगदाशंखपाणि नरोत्तमा । पाव पुरुषोत्तमा दासा तुझ्या
१४१	।।ना.गा.००२३.००८।।	रामा हयग्रीवा भीमा रौद्रोद्‌भवा । आश्रय भूतां सर्वां तुझा असे
१४२	।।ना.गा.००२३.००९।।	श्रीधरा श्रीपति चतुर्बाहो मेघ:शामा । लेकुरें आम्ही आम्हां पाव त्वरें
१४३	।।ना.गा.००२३.०१०।।	नामा म्हणे ऐसें करितां स्तवन । तोषला भगवान क्षीराब्धींत
१४४	।।ना.गा.००२४.००१।।	आकाशीं वाणी होय सांगे सकळांसी । तळमळ मानसीं करूं नका
१४५	।।ना.गा.००२४.००२।।	देवकीच्या गर्भा येईल भगवान । रक्षील ब्राह्मण गाई भक्त
१४६	।।ना.गा.००२४.००३।।	उतरील भार मारील दैत्यांसी । आनंद सर्वांसी करील तो
१४७	।।ना.गा.००२४.००४।।	रोहिणी उदरीं शेष बळिभद्र । यादव समग्र व्हा रे तुम्ही
१४८	।।ना.गा.००२४.००५।।	ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं । येती स्वस्थळासी नामा म्हणे
१४९	।।ना.गा.००२५.००१।।	शेषाप्रती बोले लक्ष्मीचा तो वर । चला अवतार घेऊं आतां
१५०	।।ना.गा.००२५.००२।।	पृथ्वीवरी दैत्य ते मातले फार। गार्‍हाणें सुरवर सांगू आले
१५१	।।ना.गा.००२५.००३।।	शेष म्हणे मज श्रम जाले फार । या लागीं अवतार मी न घेचि
१५२	।।ना.गा.००२५.००४।।	राम अवतारीं मी जालों लक्षुमण । सेविलें अरण्य तुम्हासवें
१५३	।।ना.गा.००२५.००५।।	चौदा वर्षांवरी केलें उपोषण । जाणतां आपण प्रत्यक्ष हें
१५४	।।ना.गा.००२५.००६।।	नामा म्हणे ऐसें वदे धरणीधर। हांसोनी श्रीधर काय बोले
१५५	।।ना.गा.००२६.००१।।	पूर्वी तूं अनुज जालासी कनिष्ट । सोसियेले कष्ट मजसवें
१५६	।।ना.गा.००२६.००२।।	आतां तूं वडील होईगा सर्वज्ञा । पाळीन मी आज्ञा तुझी बारे

१५७	।।ना.गा.००२६.००३।।	देवकी उदरीं राहावें जावोनी । मायेसी मागूनि पाठवितों
१५८	।।ना.गा.००२६.००४।।	योगमाया तुज काढील तेथून । घालील नेऊन गोकुळासी
१५९	।।ना.गा.००२६.००५।।	लक्ष्मीशीं सांगे तेव्हां हृषिकेशी । कौंडण्यपुराशीं जावें तुम्ही
१६०	।।ना.गा.००२६.००६।।	नामा म्हणे ऐसा करूनि विचार । घ्यावया अवतार सिद्ध असे
१६१	।।ना.गा.००२७.००१।।	वसुदेवा देत देवकी बहीण । लग्नामध्यें विघ्न जालें ऐका
१६२	।।ना.गा.००२७.००२।।	आकाशीची वाणी सांगतसे कंसा। मानी भरंवसा हा बोलण्याचा
१६३	।।ना.गा.००२७.००३।।	आठवा इचा पुत्र वधील तुजसी । ऐकोनी मानसीं क्रोधावला
१६४	।।ना.गा.००२७.००४।।	घेऊनियां खड्ग माराया धांवला । हात तो धरीला वसुदेवें
१६५	।।ना.गा.००२७.००५।।	देईन मी पुत्र सत्य माझें मानी । ठेवा बंदिखानी दूतां सांगे
१६६	।।ना.गा.००२७.००६।।	होतांचि प्रसुत नेऊनियां देत । साहाही मारीत दुराचारी
१६७	।।ना.गा.००२७.००७।।	धन्य त्याचें ज्ञान न करीच शोक। वधितां बाळक नामा म्हणे
१६८	।।ना.गा.००२८.००१।।	सातवा जो गर्भ योगमाया नेत । आश्चर्य करीत मनामाजीं
१६९	।।ना.गा.००२८.००२।।	रोहिणी उदरीं नेवोनी घातला । न कळे कोणाला देवावीण
१७०	।।ना.गा.००२८.००३।।	कंसाचिया भेणें यादव पळाले । ब्राह्मण राहिले अरण्यांत
१७१	।।ना.गा.००२८.००४।।	नाहीं कोणा सुख तळमळ मानसीं । वधील दुष्टासी कोण आतां
१७२	।।ना.गा.००२८.००५।।	विश्वाचा जनिता कळेल तयाला । दावितसे लीला संभूतीची
१७३	।।ना.गा.००२८.००६।।	अहर्निशीं ध्यान भक्ताचे मानसी । स्थापील धर्मासी नामा म्हणे
१७४	।।ना.गा.००२९.००१।।	देवकीचें तेज दिसे जैसा सूर्य । कंसाचें हृदय जळतसे
१७५	।।ना.गा.००२९.००२।।	हरणें पळती देखोनियां व्याघ्र । कांपे थरथर तैशापरी
१७६	।।ना.गा.००२९.००३।।	अजासर्पन्यायें कीटकभ्रमर । दिसती नारीनर कृष्णरूप
१७७	।।ना.गा.००२९.००४।।	जेवितां बोलतां शेजेसी तो निजे । आला आला मज मारावया
१७८	।।ना.गा.००२९.००५।।	नासील हा आतां दैत्यांचे तें बंड । फाटलीसे गांड तेव्हां त्याची
१७९	।।ना.गा.००२९.००६।।	नामा म्हणे भयें लागलेंसें ध्यान । चराचरी कृष्ण दिसतसे
१८०	।।ना.गा.००३०.००१।।	विमानांची दाटी अंतरिक्षीं देव । करिताती सर्व गर्भस्तुति
१८१	।।ना.गा.००३०.००२।।	सत्रा अक्षरांत असे तुझी मूर्ती । यज्ञेशा तुजप्रती नमो नमो
१८२	।।ना.गा.००३०.००३।।	सहाजणें भांडती नवजणी स्थापिती । न कळे कोणाप्रती अंत तुझा

१८३	।।ना.गा.००३०.००४।।	अठराजणें तुझी वर्णिताती कीर्ति। गुणातीत श्रीपती नमो तुज
१८४	।।ना.गा.००३०.००५।।	चौघा जणां तुझा न कळेचि पार । श्रमसी वारंवार आम्हांसाठी
१८५	।।ना.गा.००३०.००६।।	अठ्ठ्यांशीं सहस्र वर्णिताती तुज । ब्रह्मांडाचें बीज तुज नमो
१८६	।।ना.गा.००३०.००७।।	जन्ममरणाचे नाहीं तया भय । आठविती पाय तुझे देवा
१८७	।।ना.गा.००३०.००८।।	नवजणी तुझ्या पायीं लोळताती । परब्रह्म मूर्ति तुज नमो
१८८	।।ना.गा.००३०.००९।।	नामा म्हणे ऐशी करिताती स्तुती । पुष्पें वाहुनि जाती स्वस्थळासी
१८९	।।ना.गा.००३१.००१।।	मयूरादि पक्षी नृत्य करिताती । नद्या वाहताती दोन्ही थड्या
१९०	।।ना.गा.००३१.००२।।	भूमीवरी सडे केशर कस्तुरी । आनंद अंतरीं सकळांच्या
१९१	।।ना.गा.००३१.००३।।	विमानांची दाटी सुरवर येती । गंधर्व गाताती सप्तस्वरें
१९२	।।ना.गा.००३१.००४।।	मंदमंद मेघ गर्जना करिती । वाद्यें वाजताती नानापरी
१९३	।।ना.गा.००३१.००५।।	नामा म्हणे स्वर्गी नगारे वाजती । अप्सरा नाचती आनंदानें
१९४	।।ना.गा.००३२.००१।।	दशरथें मारिला तोचि होता मास । वर्षा ऋतु असे कृष्णपक्ष
१९५	।।ना.गा.००३२.००२।।	वसूनाम तिथीं बुधवार असे । शुक सांगतसे परीक्षिती
१९६	।।ना.गा.००३२.००३।।	रोहिणी नक्षत्र दोन प्रहररात्र । माया घाली वस्त्र रक्षपाळा
१९७	।।ना.गा.००३२.००४।।	नवग्रह अनुकूल सर्वांचें जें मूळ । वसुदेव कपाळ धन्य धन्य
१९८	।।ना.गा.००३२.००५।।	जयाचा तो वंश तयासी आनंद । माझ्या कुळीं गोविंद अवतरला
१९९	।।ना.गा.००३२.००६।।	अयोनीसंभव नोहे कांही श्रमी। नामयाचा स्वामी प्रगटला
२००	।।ना.गा.००३३.००१।।	कोटिशा आदित्य गोठे एके ठायीं । तेजे दिशा दाही उजळल्या
२०१	।।ना.गा.००३३.००२।।	घाबरा होऊनी वसुदेव पाहे। हृदयीं आश्चर्य करीतसे
२०२	।।ना.गा.००३३.००३।।	मुकुटावरीं रत्न नक्षत्रांचा मेळा । भाळीं शोभे टिळा केशराचा
२०३	।।ना.गा.००३३.००४।।	व्यंकटा भृकुटी कमलाकर नेत्र । नासीक विचित्र शुकचंचु
२०४	।।ना.गा.००३३.००५।।	विद्युल्लते ऐसी झळकती कुंडलें । अधर कोवळें अरुणोदय
२०५	।।ना.गा.००३३.००६।।	कंबुग्रीव कंठ हृदयीं वत्सलांच्छन । ब्रह्मयासी खूण न कळे अंत
२०६	।।ना.गा.००३३.००७।।	चतुर्भुज शंखचक्रगदापद्म । चिमणा मेघ:शाम वर्ण ज्याचा
२०७	।।ना.गा.००३३.००८।।	कौस्तुभ निर्मळ वैजयंती माळा । कासे सोनसळा हाटकवर्ण
२०८	।।ना.गा.००३३.००९।।	रुणझुण रुणझुण वाजताती वाळे । आरक्त वर्तुळ नखीं शोभा

२०९	।।ना.गा.००३३.०१०।।	ध्वजवज्रांकुश जैसीं रातोत्पळें । नामा म्हणे डोळे दिपताती
२१०	।।ना.गा.००३४.००१।।	अयुत गायी ब्राम्हणांसी । सोडी संकल्प मानसीं
२११	।।ना.गा.००३४.००२।।	ओळखिलें तुज । आतां कळलासी मज
२१२	।।ना.गा.००३४.००३।।	धर्म स्थापावया। येथें येसी देवराया
२१३	।।ना.गा.००३४.००४।।	आलिंगितां दोहीं बाही । नामा म्हणे डोई पायीं
२१४	।।ना.गा.००३५.००१।।	सोडी सोडी मिठी । लपवा लपवा जगजेठी
२१५	।।ना.गा.००३५.००२।।	झणीं कंसासी कळेल । माझ्या बाळासी मारील
२१६	।।ना.गा.००३५.००३।।	वसुदेव चिंता मनीं । तेज न माये गगनीं
२१७	।।ना.गा.००३५.००४।।	नामा म्हणे आलें हांसे । देव तेव्हां सांगतसे
२१८	।।ना.गा.००३६.००१।।	नंदाच्या घराला । मज नेई गोकुळाला
२१९	।।ना.गा.००३६.००२।।	माया उपजली तेथें । ठेवी मज आणि येथें
२२०	।।ना.गा.००३६.००३।।	म्हणसी असे रक्षपाळ। ते म्यां मोहिले सकळ
२२१	।।ना.गा.००३६.००४।।	आच्छादित रूप । नामा म्हणे माझा बाप
२२२	।।ना.गा.००३७.००१।।	उचलिला कमळापती । पायींचीं बंधनें गळती
२२३	।।ना.गा.००३७.००२।।	त्रैलोक्यांत जो न माय । त्यासी बंधन करील काय ?
२२४	।।ना.गा.००३७.००३।।	कवाडें उघडती । देखतांची देवाप्रती
२२५	।।ना.गा.००३७.००४।।	मंद मंद पडे पाऊस । शिरीं छाया करी शेष
२२६	।।ना.गा.००३७.००५।।	पूर चढला अवचट । त्यासी लाविला अंगुष्ठ
२२७	।।ना.गा.००३७.००६।।	त्वरें आला नंदाघरीं । निद्रिस्त नरनारी
२२८	।।ना.गा.००३७.००७।।	ठेवी तेथें कृष्णजीला। माया घेऊनि निघाला
२२९	।।ना.गा.००३७.००८।।	रडे माया करी आकांत । नामा म्हणे उठती दूत
२३०	।।ना.गा.००३८.००१।।	पूर्णब्रह्म मानी कंसाच्या भयासी । वाटेल मानसीं कोणाचिया
२३१	।।ना.गा.००३८.००२।।	इच्छामात्रें करी सृष्टीचा प्रलय । त्यासी असे भय कवणाचें
२३२	।।ना.गा.००३८.००३।।	नंदाचें सुकृत जालें अगणित । म्हणोनी भगवंत आला तेथें
२३३	।।ना.गा.००३८.००४।।	सर्वां होय सुख तरतील लोक । नामा म्हणे शुक सांगतसे
२३४	।।ना.गा.००३९.००१।।	तांतडीनें जाती । कंसा सेवक सांगती

२३५	।।ना.गा.००३९.००२।।	उपजला वैरी । त्यासी तूं रे त्वरें मारी
२३६	।।ना.गा.००३९.००३।।	त्वरें धांव घाली । पाहे कन्या उपजली
२३७	।।ना.गा.००३९.००४।।	ज्याचा धाक तुज । कन्या द्यावी मज
२३८	।।ना.गा.००३९.००५।।	मारायाशीं खड्ग घाली । हातींची निसटूनियां गेली
२३९	।।ना.गा.००३९.००६।।	तुजलागीं जो का वधी । उपजला मज आधीं
२४०	।।ना.गा.००३९.००७।।	सांगे ब्रह्मज्ञान । देवकीचें समाधान
२४१	।।ना.गा.००३९.००८।।	नामा म्हणे तयेवेळीं । त्यांची बंधनें काढिली
२४२	।।ना.गा.००४०.००१।।	बोलावुनी अवघीयातें । कंस पाहे विचारातें
२४३	।।ना.गा.००४०.००२।।	कोणी एक ते बोलती । आम्हां ठावी देववस्ती
२४४	।।ना.गा.००४०.००३।।	जेथें पुराण कीर्तन। गाईब्राह्मण करिती यज्ञ
२४५	।।ना.गा.००४०.००४।।	तेथें असे नारायण । वधूं तयासी जाऊन
२४६	।।ना.गा.००४०.००५।।	वैरी सहजची मरेल । ऐसे बोलताती बोल
२४७	।।ना.गा.००४०.००६।।	कंसा मानवलें जाण । करा मजसाठीं यत्न
२४८	।।ना.गा.००४०.००७।।	नामयाचा छंद । नंद करितो आनंद
२४९	।।ना.गा.००४१.००१।।	शुक म्हणे राया ऐक परीक्षिती । श्रवण करितां तृप्ति नाहीं तुज
२५०	।।ना.गा.००४१.००२।।	माया जातां मथुरे सावध होती ते निद्रिस्त। देखिला भगवंत यशोदेनें
२५१	।।ना.गा.००४१.००३।।	ब्रह्मांडें उदरीं न कळे कोणाला । वाजविती थाळा जन्मकाळीं
२५२	।।ना.गा.००४१.००४।।	यज्ञभोक्ता कृष्ण त्यासी देती बोळा । ध्यानीं ध्याय भोळा सदाशिव
२५३	।।ना.गा.००४१.००५।।	गौळणी बाहाती नंदालागीं तेव्हां । पुत्रमुख पाहा नामा म्हणे
२५४	।।ना.गा.००४२.००१।।	विश्वाचा जो बाप हातीं ज्याच्या सूत्र । म्हणवितो पुत्र नंदजीचा
२५५	।।ना.गा.००४२.००२।।	तीर्थें ज्याच्या चरणी करीताती न्हाणी । यशोदा जननी म्हणताती
२५६	।।ना.गा.००४२.००३।।	वेडावला शेष शिणले वेद चारी । निजे मांडीवरी यशोदेच्या
२५७	।।ना.गा.००४२.००४।।	शरणागता देत क्षीरसिंधू जाण । चोखीतसे स्तन आवडीनें
२५८	।।ना.गा.००४२.००५।।	त्रैलोक्याचा राजा वर्णूं काय रंक । ऐकावें जातक नामा म्हणे
२५९	।।ना.गा.००४३.००१।।	नंदे करोनियां स्नान । वस्त्रें घेतली नूतन
२६०	।।ना.गा.००४३.००२।।	पाचारा ब्राह्मण । शृंगारावे देवसदन

२६१	।।ना.गा.००४३.००३।।	बाहा बाहा दशग्रंथी। त्यासी सांगो आणा पोथी
२६२	।।ना.गा.००४३.००४।।	त्वरें बाहारे ज्योतिषी । नंद करी जातकासी
२६३	।।ना.गा.००४३.००५।।	केलें देवतार्चन । द्विज सांगती तर्पण
२६४	।।ना.गा.००४३.००६।।	फार त्याला सुख । पाहे कृष्णजीचें मुख
२६५	।।ना.गा.००४३.००७।।	करी पुण्याहवाचनें । नामा म्हणे आनंदाने
२६६	।।ना.गा.००४४.००१।।	आला जगदोद्धार । त्याचे भरलें भांडार
२६७	।।ना.गा.००४४.००२।।	सुशोभित दिसे मही । दोन लक्ष दिधल्या गायी
२६८	।।ना.गा.००४४.००३।।	तिळ तांदूळ पर्वत । द्रव्यें वांटी अगणित
२६९	।।ना.गा.००४४.००४।।	एक जाती एक येती । ओझें उचलिता कुंथती
२७०	।।ना.गा.००४४.००५।।	भाट वर्णिताती । नामा म्हणे ज्याची कीर्ति
२७१	।।ना.गा.००४५.००१।।	तुतारे भोंवारें वाजंत्री वाजती । अप्सरा नाचती थैथैकारें
२७२	।।ना.गा.००४५.००२।।	झणझणा झणझणा झांजा गर्जताती। नौबता वाजती धो धो धो धो
२७३	।।ना.गा.००४५.००३।।	सुरवर येती विमानांची दाटी । करिती पुष्पवृष्टी देवावरी
२७४	।।ना.गा.००४५.००४।।	नारद तुंबर गंधर्व किन्नर । गाती सर्व सप्त स्वरीं तेव्हां
२७५	।।ना.गा.००४५.००५।।	कीर्तनाचा घोष टाळांचा गजर । मृदंग वीणे सुस्वर वाजताती
२७६	।।ना.गा.००४५.००६।।	केशरी गंध टिळा लावीतसे भाळा। घाली पुष्पमाळा द्विजाकंठी
२७७	।।ना.गा.००४५.००७।।	घरोघरीं नंद धाडी शर्करेसी । वस्त्रें सुहृदांसी नामा म्हणे
२७८	।।ना.गा.००४६.००१।।	ब्राह्मण आशिर्वाद देती । नंदा पुसोनि निघती
२७९	।।ना.गा.००४६.००२।।	चलाचला म्हणती लोक । पाहूं नंदाचें बालक
२८०	।।ना.गा.००४६.००३।।	नरनारी अलंकार । शृंगारिलें हो नगर
२८१	।।ना.गा.००४६.००४।।	दैन्य दारिद्र्य अपेश । पळती मानूनियां त्रास
२८२	।।ना.गा.००४६.००५।।	आणिताती बाललेण । स्त्रिया पाहताती कृष्ण
२८३	।।ना.गा.००४६.००६।।	नामा म्हणे पाहतां मुख । हारपली तहान भूक
२८४	।।ना.गा.००४७.००१।।	पाटावरी बैसविती । गोपी अक्षवण करिती
२८५	।।ना.गा.००४७.००२।।	ब्रह्मादिक न देखती माथा । त्यासी लाविती अक्षता
२८६	।।ना.गा.००४७.००३।।	नव्हे प्राकृत बालक । परस्परें म्हणती लोक

२८७	।।ना.गा.००४७.००४।।	ध्वज वज्रांकुश चिन्हां । आला वैकुंठीचा राणा
२८८	।।ना.गा.००४७.००५।।	लोक येती वेळोवेळां। नामा म्हणे पाहती डोळां
२८९	।।ना.गा.००४८.००१।।	द्रव्य द्यावयासी । नंद गेला मथुरेसी
२९०	।।ना.गा.००४८.००२।।	तेथें भेटे वसुदेव । सांगितलें गुह्य सर्व
२९१	।।ना.गा.००४८.००३।।	कंसाचें मानसीं । घात इच्छी गोकुळासी
२९२	।।ना.गा.००४८.००४।।	जाई जाई रे त्वरित । होती गोकुळीं आघात
२९३	।।ना.गा.००४८.००५।।	नामा म्हणे ऐसें सांगे। नंद तेथूनियां निघे
२९४	।।ना.गा.००४९.००१।।	कंसें पाठविली मायावी पूतना । देवोनिया स्तना बाळें मारी
२९५	।।ना.गा.००४९.००२।।	दीन दुर्बळांची मारीत बालकें। करीताती शोक मायबाप
२९६	।।ना.गा.००४९.००३।।	गहिंवरोनि तेव्हां पुसे परीक्षिती । भगवंताची मूर्ती बाळरूप
२९७	।।ना.गा.००४९.००४।।	अभय देतसे बापा नको रडूं । तें काय घुंगुर्डुं मारूं शके
२९८	।।ना.गा.००४९.००५।।	जेथें पुराणें कीर्तन होत नामघोष । तेथें यम त्रास घेत असे
२९९	।।ना.गा.००४९.००६।।	पळती तेथुनि असुरादिक वैरी । तेथें नाहीं उरीं पाप तापा
३००	।।ना.गा.००४९.००७।।	नामा म्हणे आली नंदाचिये घरी । स्वरूपें सुंदरी देवांगना
३०१	।।ना.गा.००५०.००१।।	कृष्णा लावितसे स्तनीं । तिसी मारी चक्रपाणि
३०२	।।ना.गा.००५०.००२।।	भयाभीत प्रेत । जन विस्मय करीत
३०३	।।ना.गा.००५०.००३।।	रडे तेव्हां माया। वांचलासी बा तान्हया
३०४	।।ना.गा.००५०.००४।।	मिळोनियां समस्त । भाळीं आंगारा लावीत
३०५	।।ना.गा.००५०.००५।।	वसुदेवें सांगितलें । नंद म्हणे तैसें जाले
३०६	।।ना.गा.००५०.००६।।	कुऱ्हाडी आणिती । शस्त्रे करूनि तोडिती
३०७	।।ना.गा.००५०.००७।।	नामा म्हणे दिला अग्नी। वास न माये गगनीं
३०८	।।ना.गा.००५१.००१।।	पुण्यवंता दावी बाळलीला देव । पालथा केशव पडे तेव्हां
३०९	।।ना.गा.००५१.००२।।	नंदें उत्साहासी केलें तेव्हां पार। दिधलें अपार द्रव्य द्विजां
३१०	।।ना.गा.००५१.००३।।	यशोदा घेतसे देवाचें चुंबन । तुजला न्हाणीन तान्ह्या माझ्या
३११	।।ना.गा.००५१.००४।।	चोंगईचा मुका घेताती गौळणी । हांसे चक्रपाणि आनंदानें
३१२	।।ना.गा.००५१.००५।।	नामयाचा स्वामी मंदमंद हांसे । यशोदा करितसे निंबलोण

३१३	।।ना.गा.००५२.००१।।	करावया वनभोजन । जाती गोकुळींचे जन
३१४	।।ना.गा.००५२.००२।।	कोणी भोजन करिती । कोणी देवा खेळविती
३१५	।।ना.गा.००५२.००३।।	डोळे झांकीत श्रीपती । दावी निद्रेची आकृती
३१६	।।ना.गा.००५२.००४।।	बहुत खेळलासे खेळा । आतां निजवा गे बाळा
३१७	।।ना.गा.००५२.००५।।	वस्त्रें घालूनी शकटातळीं। निजविती वनमाळी
३१८	।।ना.गा.००५२.००६।।	क्षण एक निजला देव । रडे उठे वासुदेव
३१९	।।ना.गा.००५२.००७।।	मुलांलागीं म्हणे तेव्हां । माझा कान्होबा खेळवा
३२०	।।ना.गा.००५२.००८।।	रागेंरागें झाडी लात । गाडा मोडोनी पडत
३२१	।।ना.गा.००५२.००९।।	नामा म्हणे वाटी धन । नंद वांचला नंदन
३२२	।।ना.गा.००५३.००१।।	मांडीवरी घेत यशोदा सुंदरी । आळवी श्रीहरी नाना युक्ती
३२३	।।ना.गा.००५३.००२।।	तूंचि माझा प्राण तूं माझी माउली । तूं माझी बहिणुली कान्हाबाई
३२४	।।ना.गा.००५३.००३।।	गणगोत भाऊ तूंचि माझा सखा । संसार लटिका तुजवीण
३२५	।।ना.गा.००५३.००४।।	तूंचि माझे धन तूंचि माझें जीवन। चुंबीत वदन वेळोवेळां
३२६	।।ना.गा.००५३.००५।।	नामा म्हणे भार घाली मांडीवरी । ठेवी भूमीवरी कृष्णजीला
३२७	।।ना.गा.००५४.००१।।	कंसें पाठविला आला तृणावर्त । धुळीनें समस्त व्यापियेलें
३२८	।।ना.गा.००५४.००२।।	दुष्टबुद्धि तेव्हां उचली देवासी। धरियेलें त्यासी कंठी देवें
३२९	।।ना.गा.००५४.००३।।	यशोदा पाहात न दिसे श्रीकृष्ण । ऊर बडवूनी शोक करी
३३०	।।ना.गा.००५४.००४।।	गौळणींचा मेळा मिळाला समस्त । कोणी कृष्णनाथ नेला सये
३३१	।।ना.गा.००५४.००५।।	न लगे घरदार बुडाला संसार । दावा गे श्रीधर तान्हें माझें
३३२	।।ना.गा.००५४.००६।।	ठावें असतें ऐसें बांधित्ये पोटासी । कोठें गुंतलासी बाळा माझ्या
३३३	।।ना.गा.००५४.००७।।	धांवा गे धांवण्या पाहा गे लेंकरुं । शोक अनिवारू करीतसे
३३४	।।ना.गा.००५४.००८।।	शिणल्या भागल्या येतों तुम्हां घरां । मुख हें उदारा दावी कृष्णा
३३५	।।ना.गा.००५४.००९।।	सोडूं पाहे प्राण यशोदा सुंदरी । हंबरडा फोडी कृष्णालागीं
३३६	।।ना.गा.००५४.०१०।।	चेपोनी नरडी गतप्राण केला । भूमीसी पाडिला दैत्य तेव्हां
३३७	।।ना.गा.००५४.०११।।	नामा म्हणे वरी खेळत गोंविद । पाहोनी आनंद सकळांचा
३३८	।।ना.गा.००५५.००१।।	आला गोकुळासी । हर्ष न माये मानसीं

३३९	।।ना.गा.००५५.००२।।	नंदे गर्गातें देखिलें । पूजा स्तवनीं तोषविलें
३४०	।।ना.गा.००५५.००३।।	भूतभविष्य वर्तमान । तुम्हां कळे हो संपूर्ण
३४१	।।ना.गा.००५५.००४।।	पाहा सामुद्रिक लक्षण । याचें काय सांगा चिन्ह
३४२	।।ना.गा.००५५.००५।।	बोले तेव्हां गर्गऋषी । झणीं कळेल कंसासी
३४३	।।ना.गा.००५५.००६।।	रोहिणीनंदादि बैसती । गर्ग घेउनी एकांतीं
३४४	।।ना.गा.००५५.००७।।	घालूनियां मंगलस्नान । आरंभी पुण्याहवाचन
३४५	।।ना.गा.००५५.००८।।	ऐसी वदे शुकवाणी । नामा म्हणे ऐका कानीं
३४६	।।ना.गा.००५६.००१।।	जन्मजन्मांतरी जाला तुज श्रम । म्हणोनियां ब्रह्म आलें येथें
३४७	।।ना.गा.००५६.००२।।	राखतील गाई मारतील दुष्ट । न करी बोभाट जनामध्यें
३४८	।।ना.गा.००५६.००३।।	द्वादश गांव अग्नि करील प्राशन । वांचवील प्राण सकळांचे
३४९	।।ना.गा.००५६.००४।।	चोरोनियां गाई नेईल सौंगडे । लावील हा वेड ब्रह्मयासी
३५०	।।ना.गा.००५६.००५।।	उचलील पर्वत हरील हा गर्व । तारील हा सर्व नाममात्रें
३५१	।।ना.गा.००५६.००६।।	समुद्रीं हा नगरी रचील क्षणांत । चरित्र अद्भुत करील हा
३५२	।।ना.गा.००५६.००७।।	सोळा सहस्र स्त्रिया अष्ट त्या नायका । करील बाईका तुझा कृष्ण
३५३	।।ना.गा.००५६.००८।।	त्रैलोक्यांत हाचि उदाराचा राणा । देईल ब्राह्मणा हेमपुरी
३५४	।।ना.गा.००५६.००९।।	सांगुनिया ऐसे आशीर्वाद देऊनि । नामा म्हणे मुनि जाता जाला
३५५	।।ना.गा.००५७.००१।।	श्रीकृष्ण जन्मला वार्ता ही ऐकोनी । चिंता कंसा मनीं प्रवर्तली
३५६	।।ना.गा.००५७.००२।।	उद्विग्न मानसी कंस तो बैसला । सन्मुख देखिला महाबळ
३५७	।।ना.गा.००५७.००३।।	गौरवोनी त्यासी सांगे वर्तमान । शत्रूसीं जाऊनि कोण मारी
३५८	।।ना.गा.००५७.००४।।	महाबळ दैत्य प्रतिज्ञा बोलत । शत्रुसी त्वरित मारीन मी
३५९	।।ना.गा.००५७.००५।।	नामा म्हणे ऐसा बोलूनि निघाला । वेष धरियेला कपटाचा
३६०	।।ना.गा.००५८.००१।।	विप्र वेष तेव्हां घेऊनि निघाला । गोकुळासी आला लगबगे
३६१	।।ना.गा.००५८.००२।।	पुत्रोत्सव कोठें लोकांस पुसत। भाविक सांगत नंदाघरीं
३६२	।।ना.गा.००५८.००३।।	ऐकोनियां ऐसें आला अकस्मात । यशोदा देखत सन्मुख त्या
३६३	।।ना.गा.००५८.००४।।	श्रीकृष्णासी तेव्हां वोसंगीं घेतलें । दंडवत केले ब्राह्मणासी
३६४	।।ना.गा.००५८.००५।।	सन्मुख बैसोनि वर्तमान पुसे । बाळाचें या कैसें चिन्ह सांगा

३६५	||ना.गा.००५८.००६||	पंचांग त्यावेळी काढिलें कपटानें । मान तुकावोनी पहातसे
३६६	||ना.गा.००५८.००७||	नामा म्हणे मैंदें पंचांग पाहून । यशोदे लागून बोलतसे
३६७	||ना.गा.००५९.००१||	तुझिया पुत्रासी लागलेसें मूळ । करील निर्मूळ सर्वत्रांचे
३६८	||ना.गा.००५९.००२||	बाळकाचे अंगीं अवचिन्हें बहुत । नेऊनीं गर्तेत टाका यासी
३६९	||ना.गा.००५९.००३||	लोभ धरूनियां ठेवाल बाळकासी । ग्रासील सर्वांसी एकदांची
३७०	||ना.गा.००५९.००४||	ऐकोनी यशोदा गहिंवरोनी बोले । गर्गानीं कथियेले उत्तम गुण
३७१	||ना.गा.००५९.००५||	अमंगळ वाणी पुनरपि बोलिला । गर्ग तो चुकला गणितासी
३७२	||ना.गा.००५९.००६||	स्तनपान करीत असतां श्रीकृष्ण। मांडिलें विंदान नामा म्हणे
३७३	||ना.गा.००६०.००१||	ठाईंहुनि जाती उखळें उडताती । मस्तकीं आदळती येवोनियां
३७४	||ना.गा.००६०.००२||	पाटे वरवंटे वसुपात्रालागी। जीव त्या प्रसंगी येता जाला
३७५	||ना.गा.००६०.००३||	घाबरे दुर्जन पळाया पाहात । आडव्या ठाकत बाजा पुढें
३७६	||ना.गा.००६०.००४||	जानवें तुटलें पंचांग फाटलें। धोतरही गळालें ढुंगणाचें
३७७	||ना.गा.००६०.००५||	पाठीवरी होती बदबदा मार । तेथून सत्वर पळता जाला
३७८	||ना.गा.००६०.००६||	आयुष्याची कांही बाकी उरली होती । म्हणूनी श्रीपती सोडी त्यातें
३७९	||ना.गा.००६०.००७||	नामा म्हणे जीव घेऊनी पळाला । मथुरेसी आला कंसापाशी
३८०	||ना.गा.००६१.००१||	परीक्षिती राया सांगतसे शुक । वैकुंठनायक रांगतसे
३८१	||ना.गा.००६१.००२||	दुडदुडा पळती मुखीं घाली माती । शेणांत लोळती दोघेजण
३८२	||ना.गा.००६१.००३||	नंदाच्या पुढील ओढीताती ताट । मिटक्या मटमट वाजविती
३८३	||ना.गा.००६१.००४||	कटीं कडदोरा वांकी घुंघुरुवाळा । पिंपळपान भाळा शोभतसे
३८४	||ना.गा.००६१.००५||	देवातें झोंकिती वर्जिल्या रडती । घडोघडीं येती बिदीमाजीं
३८५	||ना.गा.००६१.००६||	वत्साचिये पुच्छें बळें ओढीताती । खोडी न सोडिती दोघेजण
३८६	||ना.गा.००६१.००७||	विमानांची दाटी येताती सुरवर । नाम्याचा दातार पहावया
३८७	||ना.गा.००६२.००१||	मृगाचिये श्रृंगे धरोनि नाचती । जन हांसताती खदखदां
३८८	||ना.गा.००६२.००२||	भोजना बैसती घांस घेती हातीं । मांजरें देखती दुरोनिया
३८९	||ना.गा.००६२.००३||	गळां त्यांच्या तेव्हां धरी मेघ:श्याम । पुच्छ बळिराम ओढीतसे
३९०	||ना.गा.००६२.००४||	यशोदा धांवत खदखदां हांसत । गौळणी समस्त पाहताती

३९१	।।ना.गा.००६२.००५।।	पुसतांची मामा चोंगई दाविती । मर्कटाचे धरिती दोन्ही कान
३९२	।।ना.गा.००६२.००६।।	रोहिणी म्हणे डसतील बाळा । किती म्यां याजला सांभाळावें
३९३	।।ना.गा.००६२.००७।।	पाणी उडविती प्रतिबिंब पाहती । गोरस सांडिती भूमीवरी
३९४	।।ना.गा.००६२.००८।।	नामा म्हणे स्वामी सर्वांचा जो साक्षी । धरितसे पक्षी चुकवुनी
३९५	।।ना.गा.००६३.००१।।	मुतुनियां हातें भूमी सारविती । पोटासी पुसती दोघेजण
३९६	।।ना.गा.००६३.००२।।	घेऊनियां काष्ट घाशिताती दांत । वाकुल्या दावित नंदालागीं
३९७	।।ना.गा.००६३.००३।।	जेवितां जेवितां बाहेर पळती । श्वानासी बाहाती यू यू करुनी
३९८	।।ना.गा.००६३.००४।।	तयापुढें दोघे ठेवुनियां वाटी । घालिताती मिठी गळां त्याच्या
३९९	।।ना.गा.००६३.००५।।	देखोनियां जन खदखदां हांसती । यशोदे सांगती कवतुक
४००	।।ना.गा.००६३.००६।।	भिंती धरूनियां उभे राहताती । आधार जगती ज्यांचा असे
४०१	।।ना.गा.००६३.००७।।	उभयतां जाती बिदी खेळावया। कुरवंडी काया नामयाची
४०२	।।ना.गा.००६४.००१।।	मिळवूनी सौंगडे सांगती तयासी । चला गोरसासी देतों तुम्हां
४०३	।।ना.गा.००६४.००२।।	गेली असे एक गौळण जळाला । सांगे गोपाळानां तेथें जाऊं
४०४	।।ना.गा.००६४.००३।।	न पुरेचि हात दूध शिंक्यावरी । करावें मुरारी कैसें तेथे
४०५	।।ना.गा.००६४.००४।।	पाटावरी पाट रची वनमाळी । पाडीतसे डुळी मोहोरीनें
४०६	।।ना.गा.००६४.००५।।	बडवोनी टिरी नाचतसे पेंदा । भली ले गोविंदा युक्ती केली
४०७	।।ना.गा.००६४.००६।।	उगला ले बेते कलु नका गलबला । थांबाला ले गोला लोनियाचा
४०८	।।ना.गा.००६४.००७।।	कोणी पिती दूध कोणी खाती दहीं । आली लवलाही गौळण ते
४०९	।।ना.गा.००६४.००८।।	अहर्निशीं धरूं मी जपतसे तुज । जासी कैसा आज चोरटिया
४१०	।।ना.गा.००६४.००९।।	मुखींहुनि पय टाकी तिच्या डोळां । नामा म्हणे पळा सांगतसे
४११	।।ना.गा.००६५.००१।।	गाऱ्हाणें सांगाया । आल्या गोकुळीच्या स्त्रिया
४१२	।।ना.गा.००६५.००२।।	यशोदा ऐकत । पळे बाहेरी भगवंत
४१३	।।ना.गा.००६५.००३।।	एक म्हणे लोणी । माझें भक्षी चक्रपाणि
४१४	।।ना.गा.००६५.००४।।	फोडितसें भांडें । वर्जिलिया म्हणे रांडे
४१५	।।ना.गा.००६५.००५।।	गाई वासरें सोडितो । येऊन आम्हांसी सांगतो
४१६	।।ना.गा.००६५.००६।।	अष्टदळ काढिलें अंगणीं । वरी मुते चक्रपाणि

४१७	।।ना.गा.००६५.००७।।	घेऊनियां आला अग्न । तुझ्या घरासी लावीन
४१८	।।ना.गा.००६५.००८।।	देईन मी तोंडावर । तुझ्या बापाचें हें घर
४१९	।।ना.गा.००६५.००९।।	घेतसे वरखडे । शिव्या देऊनियां रडे
४२०	।।ना.गा.००६५.०१०।।	देखोनियां गरोदर । म्हणे केवढें उदर
४२१	।।ना.गा.००६५.०११।।	सांगती गाऱ्हाणीं । नामा म्हणे ऐका कानीं
४२२	।।ना.गा.००६६.००१।।	एक म्हणे धरी स्तन । त्यांचे उपटीन कान
४२३	।।ना.गा.००६६.००२।।	यशोदे तुला येईल राग । आपुल्या पोरा कांही सांग
४२४	।।ना.गा.००६६.००३।।	अंधारीं लपत । पोरें करिती आकांत
४२५	।।ना.गा.००६६.००४।।	सांगतसे शिकवणा । खोडी नको करूं कान्हा
४२६	।।ना.गा.००६६.००५।।	तोंड करूनि वांकडें । मला म्हणे तशीच रडे
४२७	।।ना.गा.००६६.००६।।	पोरां शिकवीत । गोरस आणा रे समस्त
४२८	।।ना.गा.००६६.००७।।	आम्हीं निजलों समस्त । काजळ मुखासी लावीत
४२९	।।ना.गा.००६६.००८।।	मेले आणूनिया सर्प । माझ्या पोरा दावी दर्प
४३०	।।ना.गा.००६६.००९।।	योगियांचे न ये लक्षा । त्यासी लावूं म्हणती शिक्षा
४३१	।।ना.गा.००६६.०१०।।	अनंत गाऱ्हाणीं । नामा म्हणे कीर्ति वानीं
४३२	।।ना.गा.००६७.००१।।	मुलें सांगतातीं । माती खातो गे श्रीपती
४३३	।।ना.गा.००६७.००२।।	लांकुड घेऊनि हातांत । माती खातो असे पुसत
४३४	।।ना.गा.००६७.००३।।	भावा भुललासे खरा । कांपतसे थरथरा
४३५	।।ना.गा.००६७.००४।।	मुख तेथे उघडोनि । दावी तेंव्हां चक्रपाणि
४३६	।।ना.गा.००६७.००५।।	ब्रह्मांडें देखिलीं । नामा म्हणे वेडी जाली
४३७	।।ना.गा.००६८.००१।।	यशोदा घुसळीत । स्तन मागे भगवंत
४३८	।।ना.गा.००६८.००२।।	घालोनी पदर । पाजीतसे जगदीश्वर
४३९	।।ना.गा.००६८.००३।।	दूध जातसे उतोन । उठे कृष्णासी टाकून
४४०	।।ना.गा.००६८.००४।।	मंथनपात्रातें फोडीत । पळे तेथूनि त्वरित
४४१	।।ना.गा.००६८.००५।।	मागें धांवली यशोदा। धरावया त्या गोविंदा
४४२	।।ना.गा.००६८.००६।।	हातीं न लगे जगजेठी । नामा म्हणे होय कष्टी

४४३	।।ना.गा.००६९.००१।।	कृपा उपजली । उभा राहे वनमाळी
४४४	।।ना.गा.००६९.००२।।	धरूनि आणिला । आजी बांधीन मी तुला
४४५	।।ना.गा.००६९.००३।।	दावें सोडुनियां । बांधितसे देवराया
४४६	।।ना.गा.००६९.००४।।	फार करितोसी खोड्या। गोपी दाविती वाकुड्या
४४७	।।ना.गा.००६९.००५।।	दावीं अनंत लावीत । दोन बोटें उणें येत
४४८	।।ना.गा.००६९.००६।।	करिताती चोज । परि नव्हेचि उमज
४४९	।।ना.गा.००६९.००७।।	श्रमतसे वारंवार । पुढती करी जगदोद्धार
४५०	।।ना.गा.००६९.००८।।	विष्णुदास नामा पुढें । आतां उद्धरिल झाडे
४५१	।।ना.गा.००७०.००१।।	कुबेराचे पुत्र मदोन्मत्त जाले । म्हणूनि शापिले नारदानें
४५२	।।ना.गा.००७०.००२।।	व्हाल तुम्हीं वृक्ष ऐकोनी सावध । जाला अपराध ऋषिराया
४५३	।।ना.गा.००७०.००३।।	विमलार्जुन वृक्ष व्हाल गोकुळांत । उश्शाप वदत कृपाळुवा
४५४	।।ना.गा.००७०.००४।।	कृष्णाचा चरण लागेल तुम्हांसी । आपुल्या स्थळासी याल वेगीं
४५५	।।ना.गा.००७०.००५।।	मोडितसे तेव्हां वृक्ष लक्ष्मीचा पती । दोघे निघताती दिव्य पुरुष
४५६	।।ना.गा.००७०.००६।।	नामा म्हणे तेव्हां दिव्य करिताती स्तुती । पापें दग्ध होती ऐकतांची
४५७	।।ना.गा.००७१.००१।।	दामोदरा केशवा वामना देवा कृष्णा । परंज्योति नारायणा तुज नमो
४५८	।।ना.गा.००७१.००२।।	विश्वव्यापका जनार्दना वासुदेवा निर्गुणा। अव्यया जगजीवना तुज नमो
४५९	।।ना.गा.००७१.००३।।	अनंत अवतार घेसी भक्तांसाठी । कृपाळु जगजेठी तुज नमो
४६०	।।ना.गा.००७१.००४।।	यज्ञेशा सर्वेशा दयानिधी हृषिकेशा । पुराणपुरूषा तुज नमो
४६१	।।ना.गा.००७१.००५।।	धन्य हा दिवस देखिले तुझे पाय। कृपादृष्टी पाहे आम्हांकडे
४६२	।।ना.गा.००७१.००६।।	जोडोनियां हात करितो विनंति । देई तुझी भक्ति जन्मोजन्मीं
४६३	।।ना.गा.००७१.००७।।	करूनि नमस्कार हळूहळू चालती । वेळोवेळां पाहती कृष्णाकडे
४६४	।।ना.गा.००७१.००८।।	मोडतांचि वृक्ष धांवोनियां येती । मग पाहताती नामा म्हणे
४६५	।।ना.गा.००७२.००१।।	समस्तां सांगती लहानाली मुलें । नवल देखिलें आम्हीं आतां
४६६	।।ना.गा.००७२.००२।।	वृक्ष मुळींहुनी दोघे निघताती। पायासी लागती कान्होबाच्या
४६७	।।ना.गा.००७२.००३।।	यशोदेचे मनीं झालासे विवेक। वैकुंठनायक येथें आला
४६८	।।ना.गा.००७२.००४।।	नामा म्हणे तिसी घालितसे माया। अपराध तयां काय असे

४६९	।।ना.गा.००७३.००१।।	नंदें सोडविलें तेव्हां त्या कृष्णासी । नासूं दे ग यासी दहींदूध
४७०	।।ना.गा.००७३.००२।।	मजला लेकरें नाहींत गे फार । विश्रांतीस थार एवढेंचि
४७१	।।ना.गा.००७३.००३।।	निवारिलें विघ्न देवें हें केवढें । पडती गे जरी झाडें याजवरी
४७२	।।ना.गा.००७३.००४।।	आजपासूनि यासी बोलसी कठीण । देईन मी प्राण तुजवरी
४७३	।।ना.गा.००७३.००५।।	स्फुंद स्फुंद रडे तेव्हां नारायण । देई त्यासी स्तन भुकेलासे
४७४	।।ना.गा.००७३.००६।।	येश्वदा बहात न ये वनमाळी । धांवोनि कुरवाळी वदन त्यांचे
४७५	।।ना.गा.००७३.००७।।	समजावोनि देवा पाजितसे स्तन । घालीत भोजन नामा म्हणे
४७६	।।ना.गा.००७४.००१।।	एक गोप तेव्हां स्त्रियेसी सांगत । सांठवी समस्त नवनीत
४७७	।।ना.गा.००७४.००२।।	देवाचा नवस आहे पुरवणें । धरावें येथून अनसुट
४७८	।।ना.गा.००७४.००३।।	सांगोनियां ऐसे राहिला तो स्वस्थ । मागें स्त्रीनें कृत्य काय केलें
४७९	।।ना.गा.००७४.००४।।	चोरोनियां घृत भरोनि घागरीं । नेवोनि शेजारीं ठेवियेल्या
४८०	।।ना.गा.००७४.००५।।	गौळियानें तेव्हां संकल्प सोडिला । नवस फेडिला नामा म्हणे
४८१	।।ना.गा.००७५.००१।।	गोपीनें घृतासी चोरूनी ठेविलें । देवासी कळलें अंतर्यामीं
४८२	।।ना.गा.००७५.००२।।	सेजे घरीं होतें ठेविलें चोरून । सौंगडे घेऊन गेला तेथें
४८३	।।ना.गा.००७५.००३।।	आज्य घेऊनियां गोपाळासी देत । आपण भक्षित आनंदानें
४८४	।।ना.गा.००७५.००४।।	तृप्त होवोनियां गेला क्रीडायासी । पूर्ण नवसासी केलें त्याच्या
४८५	।।ना.गा.००७५.००५।।	नामा म्हणे ऐसा वैकुंठनायक । दावित कौतुक नानापरी
४८६	।।ना.गा.००७६.००१।।	कांही दिवस लोटलियावरी । गोपी तिचे घरीं प्रवेशली
४८७	।।ना.गा.००७६.००२।।	म्हणे माझा कुंभ देई वो आणून । येरीनें सदन धुंडाळिलें
४८८	।।ना.गा.००७६.००३।।	म्हणे सये येथें नाहीं तुझे घृत । ऐकोनियां मात क्रोधावली
४८९	।।ना.गा.००७६.००४।।	चोरी नवनीत नाहीं तुझें गेले । माझें काय जाले पुसतसे
४९०	।।ना.गा.००७६.००५।।	नष्टें अभिलाष केला सांग सत्य । बोलोनि निवांत राहिली ते
४९१	।।ना.गा.००७६.००६।।	कलह करावा भ्रतारा कळेल । तो शिक्षा करील यथास्थित
४९२	।।ना.गा.००७६.००७।।	न मिळे जाणोन म्हणे कृष्णार्पण । आली तें बोलोन मंदिरासी
४९३	।।ना.गा.००७६.००८।।	नामा म्हणे शुक सांगे परीक्षिती । ऐशा किती ख्याती तुज सांगों
४९४	।।ना.गा.००७७.००१।।	एकदां श्रीकृष्ण खेळत असतां । प्रवेशे अवचिता गोपीगृहीं

४९५	।।ना.गा.००७७.००२।।	दोन्हीं करें तेव्हां नेत्र चोळीतसे। गोपी पुसतसे काय जाले
४९६	।।ना.गा.००७७.००३।।	कृष्ण म्हणे माझे दुखताती डोळे । उपाय न कळे करूं काय
४९७	।।ना.गा.००७७.००४।।	पुत्राची जननी तिचें दूध मिळे । घालितांची डोळे बरे होती
४९८	।।ना.गा.००७७.००५।।	गोपी म्हणे दूध देतें मी काढून । तें नेत्रीं घालून बरें करी
४९९	।।ना.गा.००७७.००६।।	देव म्हणे देसी तूं दूध काढून। कैसा गुण त्याशीं येईल सांग
५००	।।ना.गा.००७७.००७।।	माझिया करानें पिळूं देसी स्तन । तरी येईल गुण लवकरी
५०१	।।ना.गा.००७७.००८।।	ऐकतांचि गोपी धांवे मारावया । पळे उठोनियां नामा म्हणे
५०२	।।ना.गा.००७८.००१।।	यशोदे भोंवत्या मिळाल्या गौळणी । सांगती गाऱ्हाणीं नानापरी
५०३	।।ना.गा.००७८.००२।।	गोरस भक्षोनी फोडितो भाजन । गोकुळ सोडोनि जाऊं सये
५०४	।।ना.गा.००७८.००३।।	एक गोपी म्हणे माझ्या घरी येसी । बांधीन खांबासी तुजलागीं
५०५	।।ना.गा.००७८.००४।।	यशोदेसी ऐसीं सांगोनि गाऱ्हाणीं । चालिल्या कामिनी गृहाप्रती
५०६	।।ना.गा.००७८.००५।।	नामा म्हणे गोपी बोलिली बांधिन । तिजवरी विघ्न करी देव
५०७	।।ना.गा.००७९.००१।।	निशीं प्राप्त होतां भ्रताराचे शेजे । गोपिका ती निजे आनंदानें
५०८	।।ना.गा.००७९.००२।।	संधी पाहोनियां प्रवेशला देव। करीत लाघव काय तेंव्हां
५०९	।।ना.गा.००७९.००३।।	भ्रताराची दाढी कांतेची ती वेणी । एकत्र करोनी ग्रंथी देत
५१०	।।ना.गा.००७९.००४।।	करूनि कौतुक निघोनियां गेला । अरुणोदय झाला तयेवेळीं
५११	।।ना.गा.००७९.००५।।	गोदोहनालागीं गोपी ते उठत । वेणी आसंडीत दाढीसंगे
५१२	।।ना.गा.००७९.००६।।	भ्रतारासी तेव्हां बोले ते कामिनी । न धाय अजूनी मन कैसें
५१३	।।ना.गा.००७९.००७।।	भ्रताराची दाढी ओढतांच जाण । सक्रोध होऊनि बोलतसे
५१४	।।ना.गा.००७९.००८।।	मत्त होवोनिया माजली धांगडी। करिसी ओढाओढी मजलागीं
५१५	।।ना.गा.००७९.००९।।	नामा म्हणे तेव्हां उठोनि बैसती । आश्चर्य करिती मनामाजीं
५१६	।।ना.गा.००८०.००१।।	उभयतां तेंव्हा कलह करिताती । आण वाहताती परस्परें
५१७	।।ना.गा.००८०.००२।।	सोडूं जंव पहाती सत्वर ग्रंथिका। न सुटे ब्रह्मांदिका कदाकाळीं
५१८	।।ना.गा.००८०.००३।।	सोडितां सुटेना जाळितां जळेना । कापिता कापेना कांही केल्या
५१९	।।ना.गा.००८०.००४।।	स्त्रियेलागीं तेव्हां भ्रतार बोलत । तुजसंगें मृत्यु मज आला
५२०	।।ना.गा.००८०.००५।।	दोघेंहि रडत बिदीमाजीं येती । कोल्हाळ करिती तयेवेळीं

५२१	।।ना.गा.००८०.००६।।	गोकुळीचे जन डोळां पाहाताती । जाऊन सांगती नंदालागीं
५२२	।।ना.गा.००८०.००७।।	नामा म्हणे नंद बैसला चावडी । घेऊन आवडी कृष्णजीला
५२३	।।ना.गा.००८१.००१।।	गोपीगोप तेथें पातलीं त्वरित । हांसती समस्त देखोनियां
५२४	।।ना.गा.००८१.००२।।	कृष्ण म्हणे कैसी बांधिसी मजला । बांधिलें तुजला भगवंतें
५२५	।।ना.गा.००८१.००३।।	पायां पडताती रडोनी बोलती । सोडवा म्हणती आम्हालागीं
५२६	।।ना.गा.००८१.००४।।	पाहोनी कींव त्याची दया आली चित्ता । कृपेनें पाहातां मुक्त जाली
५२७	।।ना.गा.००८१.००५।।	नामा म्हणे तेव्हां वंदोनी देवासी । गेली निजधामासी आनंदानें
५२८	।।ना.गा.००८२.००१।।	नंदाचिये घरीं चंपाषष्ठी नेम । कुळीं कुलधर्म मार्तंडाचा
५२९	।।ना.गा.००८२.००२।।	पक्वान्नेंहीं नाना रोटिया भरीत । केलीं अपरमित यशोदेनें
५३०	।।ना.गा.००८२.००३।।	वाघियामुरळी सांगितली दोन्ही । आला चक्रपाणि खेळतची
५३१	।।ना.गा.००८२.००४।।	मातेलागीं म्हणे लागलीसे क्षुधा । थांब रे गोविंदा म्हणे माता
५३२	।।ना.गा.००८२.००५।।	घेतलीसे आळी करी लगबग । विस्तारिलें सांग नैवेद्यासी
५३३	।।ना.गा.००८२.००६।।	नेवोनियां पुढें देवाच्या ठेविलें । बोलवा वहिलें आमंत्रिक
५३४	।।ना.गा.००८२.००७।।	तोंवरी मागें तो भक्षी नारायण। यशोदा आपण रागावली
५३५	।।ना.गा.००८२.००८।।	दुरळ हा देव होय आतां कैसें। मार्तंडाचें पिसें लागे तुज
५३६	।।ना.गा.००८२.००९।।	करी क्षणामाजीं वांकडेंचि मुख । हरी खात वीख कालवलें
५३७	।।ना.गा.००८२.०१०।।	जाणीतला भाव मायेचें अंतर । करूनिया खरें दावी देव
५३८	।।ना.गा.००८२.०११।।	वांकडिया हांते ग्रास घाली मुखें । मुख तेंहि सुखें तैसें दावी
५३९	।।ना.गा.००८२.०१२।।	पिसाळल्या परी करी वेडेचार । भय वाटे फार मायेलागीं
५४०	।।ना.गा.००८२.०१३।।	पूर्वी म्यां सांगतां नायकसी कैसा । पुढें हा वोळसा ओढवला
५४१	।।ना.गा.००८२.०१४।।	पाचारिले देवऋषि हालवितीं सुपें । त्याचिया न बापें देव निघे
५४२	।।ना.गा.००८२.०१५।।	वासोनियां डोळे तयाकडे पाहे । कांपे तया भयें थरथरां
५४३	।।ना.गा.००८२.०१६।।	मंत्रूनियां पाणी आणिला अंगारा । तयाचा मातेरा केला देवें
५४४	।।ना.गा.००८२.०१७।।	नवसा न पावती गोकुळींच्या देवता । उपाय मागुता राहिलासे
५४५	।।ना.गा.००८२.०१८।।	चिंतावली माय मूर्च्छा आली तिसी । जाली पोरपिसी मोहजाळें
५४६	।।ना.गा.००८२.०१९।।	जाणोनी अंतर म्हणे कृष्णार्पण । तेव्हां आले विघ्न दूर होय

५४७	।।ना.गा.००८२.०२०।।	नामा म्हणे देव पाहे कृपादृष्टी । जाणवलें पोटीं हाचि देव
५४८	।।ना.गा.००८३.००१।।	गोपिका म्हणती यशोदे सुंदरी । करितो मुरारी खोडी बहु
५४९	।।ना.गा.००८३.००२।।	यशोदेप्रति त्या गौळणी बोलती । संकष्टचतुर्थी व्रत घेई
५५०	।।ना.गा.००८३.००३।।	गणेश देईल त्यासी उत्तम गुण । वचन प्रमाण मानावें हें
५५१	।।ना.गा.००८३.००४।।	गजवदनासी तेव्हां म्हणत यशोदा । माझिया मुकुंदा गुण देई
५५२	।।ना.गा.००८३.००५।।	ऐसें हें वचन ऐकून कृष्णनाथें । सत्य गणेशातें केले तेव्हां
५५३	।।ना.गा.००८३.००६।।	एक मास खोडी देवें नाहीं केली । प्रचीत ते आली यशोदेसी
५५४	।।ना.गा.००८३.००७।।	धन्य धन्य देव गणपती पाहे । यशोदा ती राहे उपवासी
५५५	।।ना.गा.००८३.००८।।	इंदिराबंधूचा उदय होऊं पाहात । यशोदा करीत पूजनासी
५५६	।।ना.गा.००८३.००९।।	शर्करामिश्रित लाडू येकवीस। आणीक बहूवस मोदक ते
५५७	।।ना.गा.००८३.०१०।।	ऐसा नैवेद्याचा हारा तो भरूनी । देव्हारा घेऊनि ठेवी माता
५५८	।।ना.गा.००८३.०११।।	मातेसी म्हणत तेव्हां हृषिकेशी । लाडू केव्हां देशी मजलागीं
५५९	।।ना.गा.००८३.०१२।।	यशोदा म्हणत पूजीन गजवदन । नैवेद्य दाऊन देईन तुज
५६०	।।ना.गा.००८३.०१३।।	ऐसें म्हणूनियां माता बाहेर गेली । देव्हाऱ्याजवळी हरि होता
५६१	।।ना.गा.००८३.०१४।।	एकांत देखोनी हारा उचलिला। सर्व स्वाहा केला एकदांची
५६२	।।ना.गा.००८३.०१५।।	घेऊनियां ग्रास उगीच बैसला । भक्तांलागीं लीला दावितसे
५६३	।।ना.गा.००८३.०१६।।	धूप घेवोनियां आली सदनातें । रिता हारा तेथें देखियेला
५६४	।।ना.गा.००८३.०१७।।	विस्मय बहुत मातेसी वाटला । नैवेद्य हरीला पुसतसे
५६५	।।ना.गा.००८३.०१८।।	कृष्ण म्हणे सत्यवचन मानी माते । एक सहस्र उंदीर आले येथें
५६६	।।ना.गा.००८३.०१९।।	त्यांत एक थोर होता तो मूषक । वरी विनायक बैसलासे
५६७	।।ना.गा.००८३.०२०।।	सकळिक लाडू सोंडेनें उचलिले । सर्व आकर्षिले एकदांची
५६८	।।ना.गा.००८३.०२१।।	सर्वांगासी त्याणे चर्चिला शेंदूर । सोंड भयंकर हालवितसे
५६९	।।ना.गा.००८३.०२२।।	उंदीर भ्यासूर भ्यालों मी देखूनी । वळली वदनीं बोबडी ते
५७०	।।ना.गा.००८३.०२३।।	न बोलवे कांहीं माझेनी जननी । क्षुधा मजलागोनी लागलीसे
५७१	।।ना.गा.००८३.०२४।।	लाडू मज देई म्हणे जनार्दन । माता क्रोधें करून बोलतसे
५७२	।।ना.गा.००८३.०२५।।	माता म्हणे कृष्णा पाहूं तुझें वदन । लाडू त्वांचि पूर्ण भक्षियेले

५७३	।।ना.गा.००८३.०२६।।	हरी म्हणे माते लाडू ते बहुत । मावतील मुखांत कैसे माझ्या
५७४	।।ना.गा.००८३.०२७।।	गणपती सर्व लाडू गेलासे घेऊन । आलें विहरण मजवरी
५७५	।।ना.गा.००८३.०२८।।	हरी म्हणे मज मारूं नको माते । तुज वदनातें दावितों मी
५७६	।।ना.गा.००८३.०२९।।	कृष्णनाथें तेव्हां मुख पसरिलें । ब्रह्मांड देखिलें मुखामाजीं
५७७	।।ना.गा.००८३.०३०।।	असंख्य गणपती दिसती वदनीं । पाहातसे नयनीं यशोदा ते
५७८	।।ना.गा.००८३.०३१।।	मुखांत गणपती मातेसी बोलत । पूजावें त्वरित हरिलागीं
५७९	।।ना.गा.००८३.०३२।।	ऐसें देखोनियां समाधिस्थ होत । चहूंकडे पाहात तटस्थ ते
५८०	।।ना.गा.००८३.०३३।।	योगमाया तेव्हां हरीने घालून । मातेपुढें जाण उभा असे
५८१	।।ना.गा.००८३.०३४।।	यशोदा हरीसी कडेवरी घेत । मुखासी चुंबित आवडीनें
५८२	।।ना.गा.००८३.०३५।।	हरी घेऊनियां घरांत ती गेली । भोजना बैसली नामा म्हणे
५८३	।।ना.गा.००८४.००१।।	कोणी एके दिनीं श्रीकृष्ण अंगणीं । विलोकी नयनीं प्रतिबिंब
५८४	।।ना.गा.००८४.००२।।	मातेप्रती तेंव्हां म्हणतसे हरी। काढोनि झडकरी देई मज
५८५	।।ना.गा.००८४.००३।।	माता म्हणे बाळा न ये तें काढितां । आणिक अनंता माग कांहीं
५८६	।।ना.गा.००८४.००४।।	ऐसें ऐकोनियां मागतसे हरी । त्यासी नानापरी समजावित
५८७	।।ना.गा.००८४.००५।।	बहुत खेळणीं पुढें ठेवी माता । परी तो रडतां न राहेची
५८८	।।ना.गा.००८४.००६।।	पालखी नेऊनि हरीसी निजवित । यशोदा ते जात स्वकार्यासी
५८९	।।ना.गा.००८४.००७।।	तेच समयीं राधा आलीसे मंदिरीं । देखीला श्रीहरी रडतां तिनें
५९०	।।ना.गा.००८४.००८।।	पालखी जवळी जाऊनि सत्वर । घेत कडेवरी हरिलागीं
५९१	।।ना.गा.००८४.००९।।	राधा म्हणे कां तूं रडतोसी चाटा । गोष्टी त्या अचाटा सांगतोसी
५९२	।।ना.गा.००८४.०१०।।	ऐसें ऐकोनियां उगाची राहिला । खेळवी हरिला प्रेमें राधा
५९३	।।ना.गा.००८४.०११।।	मागुती नेऊनि पालखां घातला । रडाया लागला हरी तेव्हां
५९४	।।ना.गा.००८४.०१२।।	राधेसी म्हणत यशोदा सुंदरी । यासी क्षणभरी नेई आतां
५९५	।।ना.गा.००८४.०१३।।	आपले मंदिरा घेऊन जाय यासी । ऐकोनि मानसा संतोषली
५९६	।।ना.गा.००८४.०१४।।	नामा म्हणे राधा घेऊन हरीसी । गेली मंदिरासी आपुलिया
५९७	।।ना.गा.००८५.००१।।	मंदिरा नेवोनि पलंगी बैसविला । म्हणत हरीला तयेवेळीं
५९८	।।ना.गा.००८५.००२।।	ऐसिया समयीं थोर तू असती। तरी हृषीकेशी बरें होते

५९९	।।ना.गा.००८५.००३।।	देखोनि तिचा भाव थोर जाला हरी । पाहूनि सुंदरी आनंदली
६००	।।ना.गा.००८५.००४।।	सुखशयनीं राधा एकांतीं असतां । अनया अवचिता आला तेथें
६०१	।।ना.गा.००८५.००५।।	सक्रोध होऊनि बोलला राधेसी । कोणासी बोलसी गुजगोष्टी
६०२	।।ना.गा.००८५.००६।।	भ्रताराचा शब्द ऐकतां श्रवणीं। दचकली मनीं राधिका ते
६०३	।।ना.गा.००८५.००७।।	हात जोडोनियां विनवित हरीसी । होई हृषिकेशी सान आतां
६०४	।।ना.गा.००८५.००८।।	ऐकोनि करुणा बाळ जाला हरी । दहीभात झडकरी ठेवीं पुढें
६०५	।।ना.गा.००८५.००९।।	कवाड उघडून बोलत अनयासी । घरांत हृषिकेशी जेवितसे
६०६	।।ना.गा.००८५.०१०।।	कावड ठेऊनि घरांत तो आला । जेवितां देखिला कृष्णनाथ
६०७	।।ना.गा.००८५.०११।।	नामा म्हणे अनया आनंदला मनीं । हृदयीं चक्रपाणि धरियेला
६०८	।।ना.गा.००८६.००१।।	राधेप्रती अनया बोले तयेवेळीं । घरांत एकली अससी तूं
६०९	।।ना.गा.००८६.००२।।	एकलें हें तुज करमेना मंदिरीं। खेळावया हरी आणीत जाई
६१०	।।ना.गा.००८६.००३।।	भ्रतार वचन राधेनें ऐकोनी । आनंद तो मनीं थोर तिच्या
६११	।।ना.गा.००८६.००४।।	स्वामी तुमची आज्ञा मजलागीं प्रमाण । म्हणौनि चरण वंदियेले
६१२	।।ना.गा.००८६.००५।।	सुखशयनीं राधा भोगीत अनंता । गोकुळांत वार्ता प्रगटली
६१३	।।ना.गा.००८६.००६।।	राधेचिया घरीं थोर होतो हरी। गोकुळींच्या नारी गुजगुजती
६१४	।।ना.गा.००८६.००७।।	यशोदा मातेसी सांगती सुंदरी। आवरी मुरारी आपुला हा
६१५	।।ना.गा.००८६.००८।।	तैसीच जाऊन राधेच्या गृहासी । सांगती सासूसी तिच्या तेंव्हा
६१६	।।ना.गा.००८६.००९।।	राधेलागीं वृद्धा म्हणे तयेवेळीं । घरासी वनमाळी आणूं नको
६१७	।।ना.गा.००८६.०१०।।	नामा म्हणे लोकीं पडियेली तुटी । तीसी जगजेठी अंतरला
६१८	।।ना.गा.००८७.००१।।	प्रात:काळीं राधा उठोनियां जाण । नंदसदनावरून पाण्या जातां
६१९	।।ना.गा.००८७.००२।।	इकडे गोदोहन करीतसे हरी । पाहे उभी द्वारीं राधिका ते
६२०	।।ना.गा.००८७.००३।।	विसरे गोदोहन वृषभाखालीं बैसत । कृष्णजीचें चित्त वेधियेलें
६२१	।।ना.गा.००८७.००४।।	भरणा रिचवोनी बाहेर आली माता । वृषभ दोहतां हरि देखे
६२२	।।ना.गा.००८७.००५।।	माता म्हणे काय करीसी घननीळा । प्रत्युत्तर त्यावेळां हरि देत
६२३	।।ना.गा.००८७.००६।।	दाराकडे पाहे राधेसी न्याहाळून । मातेसी वचन बोलतसे
६२४	।।ना.गा.००८७.००७।।	भरणा भरला आतां जाई तूं घेऊन । माता क्रोधायमान जाली तेव्हां

६२५	।।ना.गा.००८७.००८।।	कृष्णासी यशोदा म्हणे खालीं पाहे । वृषभ कीं गाय दोहतोसी
६२६	।।ना.गा.००८७.००९।।	कृष्ण खालीं पाहे वृषभ देखिला । म्हणे यशोदेला ऐक एक
६२७	।।ना.गा.००८७.०१०।।	देवाचा नवस चुकलीस बहुतेक । चौथानांचे थान एक जालें
६२८	।।ना.गा.००८७.०११।।	वचन ऐकोनी हांसत यशोदा । द्वारीं उभी राधा देखियेली
६२९	।।ना.गा.००८७.०१२।।	कां गे येथें उभी घेऊनि घागर । जातसे सत्वर राधा तेव्हां
६३०	।।ना.गा.००८७.०१३।।	नामा म्हणे ऐसे जाले गोदोहन । मुख प्रक्षाळून हरी जेवी
६३१	।।ना.गा.००८८.००१।।	मंथना आरंभ करीतसे राधा । आठवी गोविंदा मनामाजीं
६३२	।।ना.गा.००८८.००२।।	मेळवोनी मुलें खेळे तिचे द्वारीं । देखिला श्रीहरी राधिकेनें
६३३	।।ना.गा.००८८.००३।।	विसरोनी मंथन रित्या डेरियांत । रवी फिरवीत गरगरां
६३४	।।ना.गा.००८८.००४।।	डेरा खडबडा वाजतां ऐकोन । वृद्धा ते धांवोन बाहेर आली
६३५	।।ना.गा.००८८.००५।।	सासू म्हणे काय गेले तुझे नेत्र । देतसे उत्तर राधा तीसी
६३६	।।ना.गा.००८८.००६।।	डेरा धड किंवा फुटका म्हणुनी । रवी घुसळोनी पाहतसे
६३७	।।ना.गा.००८८.००७।।	वृद्धा म्हणे तुझे चित्त नाही स्थिर । द्वारीं हो श्रीधर देखियेला
६३८	।।ना.गा.००८८.००८।।	रागें भरोनियां बोलत म्हातारी । येथें कां रे हरी खेळसी तूं
६३९	।।ना.गा.००८८.००९।।	कृष्ण म्हणे आम्हीं खेळतों बिदीसीं । तूं कां दटाविसी थेरडिये
६४०	।।ना.गा.००८८.०१०।।	ऐसें बोलोनियां श्रीहरी पळाला । घरासी तो गेला नामा म्हणे
६४१	।।ना.गा.००८९.००१।।	मध्यान्हकाळीं मग हरीसी घेऊन । करीतसे भोजन यशोदा तें
६४२	।।ना.गा.००८९.००२।।	भोजन करूनि पलंगी निजत। श्रीकृष्णासी घेत पुढें तेव्हां
६४३	।।ना.गा.००८९.००३।।	यशोदेसी सुखनिद्रा हो लागली । राधिका ते गेली यमुनेसी
६४४	।।ना.गा.००८९.००४।।	नेत्रासी पदर लावोनी रडत । अंतरीं अनंत आठवोनी
६४५	।।ना.गा.००८९.००५।।	करुणा शब्द तिचा ऐकोनी श्रवणीं । उठला चक्रपाणि तेथोनियां
६४६	।।ना.गा.००८९.००६।।	जावोनियां राधा धरिली पदरीं । तिजलागीं हरि समजावित
६४७	।।ना.गा.००८९.००७।।	संसारासी माझ्या पडियेलें पाणी । ऐसें चक्रपाणि तुवां केलें
६४८	।।ना.गा.००८९.००८।।	इकडे यशोदा ती जागी जंव होत । हरिसी धुंडीत तयेवेळीं
६४९	।।ना.गा.००८९.००९।।	एखादी कळी घेऊन येईल आतां । पाहातसे माता चहुंकडे
६५०	।।ना.गा.००८९.०१०।।	पाउलाचा मार्ग चालली काढीत । पावली त्वरित यमुना तीरां

६५१	।।ना.गा.००८९.०११।।	राधा तयेवेळीं म्हणे रे अनंता । पैल तुझी माता येत असे
६५२	।।ना.गा.००८९.०१२।।	मातेसी देखुनि गडबडा लोळत । यशोदा ते घेत कडेवरी
६५३	।।ना.गा.००८९.०१३।।	मातेसी म्हणे चोरोनी कंदुक । घेऊनियां देख आली येथें
६५४	।।ना.गा.००८९.०१४।।	माता म्हणे कां वो यासी रडविसी । चेंडू तूं हरिसी देई वेगीं
६५५	।।ना.गा.००८९.०१५।।	कृष्ण म्हणे माते झाडा घेई आतां । कंदूक तत्त्वतां निघेल पैं
६५६	।।ना.गा.००८९.०१६।।	वस्त्र जंव झाडीत राधा तयेवेळीं । पडिला भूतळीं कंदूक तो
६५७	।।ना.गा.००८९.०१७।।	ऐसें देखोनियां लज्जित जहाली । हांसत वनमाळी नामा म्हणे
६५८	।।ना.गा.००९०.००१।।	चेंडू देखोनियां यशोदा कोपली । म्हणे तयेवेळीं राधिकेसी
६५९	।।ना.गा.००९०.००२।।	महा नष्ट तुम्ही अवघिया गवळणी । माझा चक्रपाणि ब्रह्मचारी
६६०	।।ना.गा.००९०.००३।।	इतुकें ऐकोनि राधा ते चालिली । स्वगृहासी गेली आपुलिया
६६१	।।ना.गा.००९०.००४।।	राधेचिया मनी समजलें पूर्ण। ब्रह्म सनातन श्रीकृष्ण हा
६६२	।।ना.गा.००९०.००५।।	इकडे यशोदा घेऊनि हरीसी । गेली मंदिरासी नामा म्हणे
६६३	।।ना.गा.००९१.००१।।	गोकुळीं अनर्थ होताती बहुत । मिळोनी समस्त विचारिती
६६४	।।ना.गा.००९१.००२।।	वृद्ध ते म्हणती येतें आमुच्या मना । जाऊं वृंदावना सकळीक
६६५	।।ना.गा.००९१.००३।।	समस्तां मानला तयांचा विचार । निघती नारीनर शीघ्र तेव्हां
६६६	।।ना.गा.००९१.००४।।	अहर्निशीं देवा करिती जतन । नामा म्हणे मन गोविंदाचें
६६७	।।ना.गा.००९२.००१।।	विचारित हो श्रीपती । जे म्यां जावें वनाप्रती
६६८	।।ना.गा.००९२.००२।।	राखावया गायी । भार उतरावया मही
६६९	।।ना.गा.००९२.००३।।	एके दिनीं सायंकाळी । नंदा पुसे वनमाळी
६७०	।।ना.गा.००९२.००४।।	उद्यां जाईन मी रानां । घेऊनिया जी गोधना
६७१	।।ना.गा.००९२.००५।।	बुद्धीचा चालक । नामा म्हणे हाचि एक
६७२	।।ना.गा.००९३.००१।।	प्रात:काळी मुलें येताती सकळ । उठरे गोपाळ म्हणताती
६७३	।।ना.गा.००९३.००२।।	आळस देवोनी उठे देवराणा । बळीराम गोधना सोडितसे
६७४	।।ना.गा.००९३.००३।।	देऊनियां स्तन काकुळती येत । सांभाळा भगवंत वनामध्यें
६७५	।।ना.गा.००९३.००४।।	जवळीच खेळा जाऊं नका दुरी । सांभाळा मुरारी प्राण माझा
६७६	।।ना.गा.००९३.००५।।	होताती उत्पात याजवरी मोठे । मोडतील कांटे सांभाळावें

६७७	।।ना.गा.००९३.००६।।	आसनीं शयनीं भोजनीं जतन करा। नामया दातारा केशिराजा
६७८	।।ना.गा.००९४.००१।।	चालियेले तेव्हां गडी आणि देव । खेळताती सर्व आनंदानें
६७९	।।ना.गा.००९४.००२।।	वत्साचिया वेषे वत्सासुर आला। माराया कृष्णाला परीक्षिती
६८०	।।ना.गा.००९४.००३।।	पाहोनियां ऐसें तयासी मारिलें । झोंकोनियां दिल्हें आकाशातें
६८१	।।ना.गा.००९४.००४।।	चला आतां जेवूं बसू एके ठायीं । काढारे लवलाही शिदोरीया
६८२	।।ना.गा.००९४.००५।।	गोपाळ मिळोनी आनंदें जेविले । ब्रह्मरसें धाले कृष्णासंगें
६८३	।।ना.गा.००९४.००६।।	उदक प्राशन करावया आले । बकानें देखिलें कृष्णजीला
६८४	।।ना.गा.००९४.००७।।	दुष्टबुद्धि तेव्हां देवासी गिळीत। हृदय जाळीत उगाळीला
६८५	।।ना.गा.००९४.००८।।	धरूनियां हातें उभाची चिरीला । आनंदें देवाला न समाये
६८६	।।ना.गा.००९४.००९।।	नामा म्हणे आले घरासी सकळ । सांगताती बाळें वर्तमान
६८७	।।ना.गा.००९५.००१।।	उठोनी प्रात:काळी गौळणी बोलती । जाईल श्रीप्रती वना आतां
६८८	।।ना.गा.००९५.००२।।	चला जाऊं त्याचें पाहूं गे श्रीमुख । हरेल गे भूक डोळियांची
६८९	।।ना.गा.००९५.००३।।	तांतडीनें येती नंदाचिया घरा । पाहाती उदारा कृष्णराया
६९०	।।ना.गा.००९५.००४।।	कुरळे हे केश सुहास्य वदन । आकर्ण नयन शोभताती
६९१	।।ना.गा.००९५.००५।।	अरुणोदय प्रभा अधर दिसती । हिरे झळकती दंत तुझे
६९२	।।ना.गा.००९५.००६।।	भोंवया व्यंकटा सुंदर नासीका । पाहोनियां सुख फार होय
६९३	।।ना.गा.००९५.००७।।	लल्लाटीं शोभत केशराचा टिळा । वर बिंदु रेखिला कस्तुरीचा
६९४	।।ना.गा.००९५.००८।।	वैजयंती माळा किरीट कुंडलें । नामयानें केले निंबलोण
६९५	।।ना.गा.००९६.००१।।	उठोनियां प्रात:काळी । देवें वाजविली मुरली
६९६	।।ना.गा.००९६.००२।।	गडी मिळोनी समस्त । घ्या रे शिदोऱ्या सांगात
६९७	।।ना.गा.००९६.००३।।	अलंकार घालिताती । दिसे सुशोभित मूर्ति
६९८	।।ना.गा.००९६.००४।।	नामा म्हणे स्वामी माझा । आला भक्ताचिये काजा
६९९	।।ना.गा.००९७.००१।।	अनेक पुष्पांच्या साजताती माळा । गुंजाहार गळां शोभताती
७००	।।ना.गा.००९७.००२।।	रक्त पितांबर आरक्त अधर । चरण सुंदर चालताती
७०१	।।ना.गा.००९७.००३।।	रक्त चंदनाची घेतलीसे उटी । मयूर पत्रवेठी शोभताहे
७०२	।।ना.गा.००९७.००४।।	शिंगें रंगविती देऊनियां रंग । चालती श्रीरंग मागें मागें

७०३	।।ना.गा.००९७.००५।।	चित्तीं सर्वकाळ राहे ऐसें ध्यान । नामा म्हणे धन्य तोचि एक
७०४	।।ना.गा.००९८.००१।।	शिवादिक ज्याचें वंदी पायवणी । पायांवर न्हाणी यशोदा ते
७०५	।।ना.गा.००९८.००२।।	नंद पुण्य लेखा नव्हे आम्हांप्रती। शुक परीक्षिती सांगतसे
७०६	।।ना.गा.००९८.००३।।	सनकादिक ज्याचे ध्यानीं झाले पिसे । गायी चारीतसे गोकुळांत
७०७	।।ना.गा.००९८.००४।।	गडियांसी काला वांटित श्रीधर । कौतुक सुरवर पाहताती
७०८	।।ना.गा.००९८.००५।।	नामा म्हणे सुख देईल भक्तांशीं । वधील दुष्टांसी स्वामी माझा
७०९	।।ना.गा.००९९.००१।।	कंसें धाडीला आघासूर । मारी नंदाचा कुमर
७१०	।।ना.गा.००९९.००२।।	एक ओठ घाली खालीं । दुजा मेघाच्या मंडळी
७११	।।ना.गा.००९९.००३।।	गाई गोपाळ उदरीं । देवा कळलें अंतरीं
७१२	।।ना.गा.००९९.००४।।	आंत प्रवेशला कृष्ण । रूप धरीत वामन
७१३	।।ना.गा.००९९.००५।।	क्षणार्धेंचि मारी । भक्तजनांचा कैवारी
७१४	।।ना.गा.००९९.००६।।	भेणें गोपाळ पडियेलें । कृपादृष्टी उठविले
७१५	।।ना.गा.००९९.००७।।	तेज अद्‌भुत निघाले । कृष्णमुखी प्रवेशलें
७१६	।।ना.गा.००९९.००८।।	भक्तांसी रक्षीत । नामा म्हणे कृष्णनाथा
७१७	।।ना.गा.०१००.००१।।	गडी आणि रमापती । तेव्हां आनंदें जेवती
७१८	।।ना.गा.०१००.००२।।	कोणी मांडिताती पानें । वरी ठेविताती अन्नें
७१९	।।ना.गा.०१००.००३।।	कोणी ठेवी मांडिवरी । कोणी जेवी भूमीवरी
७२०	।।ना.गा.०१००.००४।।	कोणी पसरिती चवाळें । कोणी अंथरती जाळें
७२१	।।ना.गा.०१००.००५।।	गोळे घेऊनियां हातीं । येरयेरातें हाणिती
७२२	।।ना.गा.०१००.००६।।	पाहताती देव । धन्य धन्य त्यांचा भाव
७२३	।।ना.गा.०१००.००७।।	मिटकिया देती । देवा वांकुल्या दाविती
७२४	।।ना.गा.०१००.००८।।	माया मोही ब्रह्मादिकां । नामा म्हणे तेंचि ऐका
७२५	।।ना.गा.०१०१.००१।।	गौळियांची पोरें वांकुल्या दाविती । क्रोधावला चित्तीं ब्रह्मदेव
७२६	।।ना.गा.०१०१.००२।।	चोरोनियां नेत गोवत्स गोपाळ । पाहूं यांचें बळ किती आहे
७२७	।।ना.गा.०१०१.००३।।	जाणोनि अंतर देव हांसतसे । सामर्थ्य पाहातसे पुत्र माझा
७२८	।।ना.गा.०१०१.००४।।	तेथून आणावी नव्हे हें उचित । म्हणेल किंचित पराक्रम

७२९	।।ना.गा.०१०१.००५।।	नामा म्हणे ऐसें विचारलें चित्तीं । करीतसे श्रीपती काय तेव्हां
७३०	।।ना.गा.०१०२.००१।।	गायीवत्सगोपाळ केलीसे निर्माण । न लागतां क्षण परीक्षिती
७३१	।।ना.गा.०१०२.००२।।	पूर्ववत सर्व न्यून कांहीं नोहे। न करी आश्चर्य मनामाजीं
७३२	।।ना.गा.०१०२.००३।।	इच्छामात्रें करी ब्रह्मांडाच्या कोटी । त्यासी काय गोष्टी अपूर्व हे
७३३	।।ना.गा.०१०२.००४।।	सायंकाळीं जाती गोकुळाभीतरीं । आपुलाल्या परी घरीं सर्व
७३४	।।ना.गा.०१०२.००५।।	ब्रह्मादिकां ज्याचा नकळेची पार । मानवा विचार न कळे कांहीं
७३५	।।ना.गा.०१०२.००६।।	ऐसा हा समर्थ नामयाचा धनी । वंदी पायवणी सदाशिव
७३६	।।ना.गा.०१०३.००१।।	एक संवत्सर सकळ जाहला । पाहावया आला ब्रह्मदेव
७३७	।।ना.गा.०१०३.००२।।	पूर्ववत गाई गोपाळ देखिले । आश्चर्य वाटलें तेव्हां त्यासी
७३८	।।ना.गा.०१०३.००३।।	ब्रह्मांडांत ब्रह्मा दुजा असे कोण । केलेसें उत्पन्न याजलागीं
७३९	।।ना.गा.०१०३.००४।।	घेवोनियां गेलों तेंचि आहे येथें । जावोनियां तेथे पाहातसे
७४०	।।ना.गा.०१०३.००५।।	भ्रांतीनें व्यापिलें तयाचें तें मन । देखतों मी स्वप्न किंवा सत्य
७४१	।।ना.गा.०१०३.००६।।	नामा म्हणे एके ठायीं उभा राहे । न्याहाळून पाहे सकळांसी
७४२	।।ना.गा.०१०४.००१।।	चतुर्भुज दिसे शंखचक्र हातीं । मुकुट शोभती सर्वांलागीं
७४३	।।ना.गा.०१०४.००२।।	कर्णीचीं कुंडलें वैजयंती माळा। देखतसे डोळां ब्रह्मा तेव्हां
७४४	।।ना.गा.०१०४.००३।।	कौस्तुभ हृदयीं श्रीवत्सलांच्छन । बाहूचीं भूषणें पाहातसे
७४५	।।ना.गा.०१०४.००४।।	चरणीं तोडर पीत पीतांबर । तेजें दिवाकर लोपतसे
७४६	।।ना.गा.०१०४.००५।।	आपादपर्यंत तुळसीच्या माळा । मुद्रिका दशांगुळा रत्नाचिया
७४७	।।ना.गा.०१०४.००६।।	केशराचे टिळे नेत्र कमळाकर । दंती इंदुकर बैसलेती
७४८	।।ना.गा.०१०४.००७।।	कोटी कृष्ण मूर्ति कोटी ब्रह्में दिसती । स्तविताती करिती सुरवर
७४९	।।ना.गा.०१०४.००८।।	नामा म्हणे ऐसे दावीत गोविंद। जालासे सावध ब्रह्मा तेव्हां
७५०	।।ना.गा.०१०५.००१।।	ओळखे बापाला । ब्रह्मा तेव्हां धाविन्नला
७५१	।।ना.गा.०१०५.००२।।	नेत्रीं अश्रुचिया धारा । कांपतसे थरथरां
७५२	।।ना.गा.०१०५.००३।।	घाली नमस्कार । म्हणे अपराधी मी फार
७५३	।।ना.गा.०१०५.००४।।	जोडोनियां हात । नामा म्हणे स्तुति गात
७५४	।।ना.गा.०१०६.००१।।	श्रवणमात्रें जळती पापांचे पर्वत । ऐके ब्रह्मगीत शुक म्हणे

७५५	।।ना.गा.०१०६.००२।।	धरूनि विश्वास करी जो पठण। तरेल तो जाण भवसिंधू
७५६	।।ना.गा.०१०६.००३।।	आपण तरेल नव्हे हें नवल । कुळें उद्धरतील सकळांची
७५७	।।ना.गा.०१०६.००४।।	येका येका अक्षरीं निर्दाळी महापाप । करा याचा जप सकळिक हो
७५८	।।ना.गा.०१०६.००५।।	नाम घेतां धांवे अनवाणीच पाय । कोमळ हृदय कृष्णजीचें
७५९	।।ना.गा.०१०६.००६।।	न विचारी जाति न म्हणे अमंगळ। न विचारी काळवेळ धांवतसे
७६०	।।ना.गा.०१०६.००७।।	शरणागता नेदी काळाचिये हातीं। नामा म्हणे चित्तीं दृढ धरा
७६१	।।ना.गा.०१०७.००१।।	मेघ:श्याम वर्ण जालासे सगुण । कार्य आणि कारण तुज नमो
७६२	।।ना.गा.०१०७.००२।।	गुंजाहार गळां मयुरपुच्छें वेष्टि । कृपाळू जगजेठी तुज नमो
७६३	।।ना.गा.०१०७.००३।।	वनपुष्पमाळा आपाद शोभती । लक्ष्मिच्या पति तुज नमो
७६४	।।ना.गा.०१०७.००४।।	वेणू वाजविसी गायी त्या चारीसी। न कळे कोणासी तुझी लीला
७६५	।।ना.गा.०१०७.००५।।	हातीं तुझ्या कवळ शोभे पितांबर । चरण सुंदर तुज नमो
७६६	।।ना.गा.०१०७.००६।।	घेवोनी अवतार दुष्टांसी मारिसी । भक्तांसी रक्षिसी निरंतर
७६७	।।ना.गा.०१०७.००७।।	रावण कुंभकर्ण मारीसी आत्मारामा । सोडविलें आम्हां बंदीहुनी
७६८	।।ना.गा.०१०७.००८।।	तुझें मी बाळक वेडें अविचारी । नामा म्हणे करी कृपा आतां
७६९	।।ना.गा.०१०८.००१।।	भवसिंधु तराया एकचि उपाय । ध्यावे तुझे पाय वासुदेवा
७७०	।।ना.गा.०१०८.००२।।	गोविंद गोपाळ वाचेसी निखळ। उद्धरे तात्काळ कलीमाजीं
७७१	।।ना.गा.०१०८.००३।।	नारायण नारायण करी जो पारायण । तो उद्धरे जाण इहलोकीं
७७२	।।ना.गा.०१०८.००४।।	तुटती यातना कर्माच्या भावना । जडजीवा उद्धरणा नाम स्मरा
७७३	।।ना.गा.०१०८.००५।।	अहर्निश कीर्ति गाती भाविक भोळे । त्यांनीं तुज जिंकिलें ब्रह्मा म्हणे
७७४	।।ना.गा.०१०८.००६।।	नामा म्हणे ऐसें दाविलें सुगम । नलगे तुम्हां नेम नाना कोटी
७७५	।।ना.गा.०१०९.००१।।	कृष्णभक्तीविण तरला आहे कोण । द्यावा निवडून एक तरी
७७६	।।ना.गा.०१०९.००२।।	कार्य आणि कारण लटकाचि शीण । वर्म न कळोन वायां गेलें
७७७	।।ना.गा.०१०९.००३।।	नामा म्हणे माझी खेचर माउली । कृपेनें दाविली वाट माझी
७७८	।।ना.गा.०११०.००१।।	धन्य ते गोप धन्य त्यांच्या गायी । धन्य हेचि मही ब्रह्मा म्हणे
७७९	।।ना.गा.०११०.००२।।	विश्वात्मा जो हरी क्रीडे या वनांत । तृणादि समस्त धन्य धन्य
७८०	।।ना.गा.०११०.००३।।	धन्य गोवर्धन धन्य वृंदावन । वृक्षादि पाषाण धन्य धन्य

७८१	।।ना.गा.०११०.००४।।	धन्य हें गोकुळ धन्य हे गोपाळ । व्रजवासी सकळ धन्य धन्य
७८२	।।ना.गा.०११०.००५।।	धन्य ही यशोदा स्तन दे मुकुंदा । धन्य तूंची नंदा त्रैलोक्यांत
७८३	।।ना.गा.०११०.००६।।	ब्रह्मसनातन वेदांसी न कळे । गड्यासंगें खेळे अरण्यांत
७८४	।।ना.गा.०११०.००७।।	विश्वाचा जो बाप नंद त्याचा पिता । यशोदेसी माता म्हणतसे
७८५	।।ना.गा.०११०.००८।।	सद्गदित कंठे नेत्रीं जळ वाहे । नामा म्हणे काय मागतसे
७८६	।।ना.गा.०१११.००१।।	इतुकें मागतसे तुज। वनीं जन्म देई मज
७८७	।।ना.गा.०१११.००२।।	सुखें करूनी राहीन । तुझे चरण पाहीन
७८८	।।ना.गा.०१११.००३।।	बहुत शीणलों । आतां तुजपाशीं आलों
७८९	।।ना.गा.०१११.००४।।	न करीं अव्हेर । दास तुझा मी किंकर
७९०	।।ना.गा.०१११.००५।।	ब्रह्मा येतो काकुलती। नामा म्हणे देवा प्रती
७९१	।।ना.गा.०११२.००१।।	काय देशील यांजला । ब्रह्मा म्हणे न कळे मला
७९२	।।ना.गा.०११२.००२।।	म्हणसी देईन मी मुक्ति । तरी ऐक रमापति
७९३	।।ना.गा.०११२.००३।।	मारायासी आले । त्यासी स्वरूपीं मिळविलें
७९४	।।ना.गा.०११२.००४।।	न फिटे यांचे पुण्य । तुजवरी जालें ऋण
७९५	।।ना.गा.०११२.००५।।	येथोनियां नवजासी । मज कळलें मानसीं
७९६	।।ना.गा.०११२.००६।।	आणोनियां देत । गायी गोपाळ समस्त
७९७	।।ना.गा.०११२.००७।।	घाली पोटामध्यें डोई । क्षमा करी माझे आई
७९८	।।ना.गा.०११२.००८।।	आज्ञा घेऊनियां गेला । नामा म्हणे स्वस्थळाला
७९९	।।ना.गा.०११३.००१।।	आनंदें खेळत । राम गडी कृष्णनाथ
८००	।।ना.गा.०११३.००२।।	गडी म्हणती रामा । ताडफळें देई आम्हां
८०१	।।ना.गा.०११३.००३।।	सकळ मिळोनी । आले धेनूकांचे वनीं
८०२	।।ना.गा.०११३.००४।।	वृक्ष हालवोनी । फळें पाडिती मेदिनी
८०३	।।ना.गा.०११३.००५।।	येत धांवोनी असुर । करी तयाचा संहार
८०४	।।ना.गा.०११३.००६।।	भक्तांचा अंकित । नामा म्हणे कृष्णनाथ
८०५	।।ना.गा.०११४.००१।।	कालिंदीचे डोहीं कालियाची वस्ती । ऐक परीक्षिती चरित्र हें
८०६	।।ना.गा.०११४.००२।।	पक्षीश्वापदांनी सोडियेलें स्थळा । निघताती ज्वाळा तया डोहीं

८०७	।।ना.गा.०११४.००३।।	विषाचिया योगें झाडे जळताती । जीवन न घेती कोणी त्याचें
८०८	।।ना.गा.०११४.००४।।	वैकुंठनायक तया वनीं आला। गोपाळांचा मेळा बरोबरी
८०९	।।ना.गा.०११४.००५।।	हुतुतु हमामा लपंडाई खेळती । देवासी म्हणती लपें आतां
८१०	।।ना.गा.०११४.००६।।	तृषाक्रांत गाई जहाले गोपाळ । पिती तेव्हां जळ कालिंदीचें
८११	।।ना.गा.०११४.००७।।	लहानालीं मुलें नाहीं तयां ज्ञान । झाले गतप्राण सकळांचे
८१२	।।ना.गा.०११४.००८।।	नामा म्हणे तेव्हां कृपादृष्टी पाहात । उठती समस्त गायी गडी
८१३	।।ना.गा.०११५.००१।।	जगजेठी तेव्हां क्रोधावला चित्तीं । करीन मी शांति तुझी आतां
८१४	।।ना.गा.०११५.००२।।	माझिया लेकरा दिधलासे त्रास । करीन मी नाश आतां तुझा
८१५	।।ना.गा.०११५.००३।।	त्रैलोक्यांत कोण ऐसा हो समर्थ । माझे शरणागत मारील जो
८१६	।।ना.गा.०११५.००४।।	माझिया भक्तांसी जो दुःखदायक। करीन प्रळय त्याजवरी
८१७	।।ना.गा.०११५.००५।।	स्फुरताती दंड कांपती अधर । उठला सत्वर जगदीश
८१८	।।ना.गा.०११५.००६।।	कळंबाचे वृक्षीं देव चढतसे । पितांबर सोगे खोवियले
८१९	।।ना.गा.०११५.००७।।	जगद्गुरु तेव्हां पुष्पमाळा काढी । टाकितसे उडी जळामध्यें
८२०	।।ना.गा.०११५.००८।।	नामा म्हणे शोकें व्यापिलें समग्र । करूनि एकाग्र मनें ऐका
८२१	।।ना.गा.०११६.००१।।	घालीतसे वेढे दिसतसे जळीं । आकांत सकळीं मांडियेला
८२२	।।ना.गा.०११६.००२।।	गडी रडताती वत्सें पडताती । कपाळा पिटिती सकळिक
८२३	।।ना.गा.०११६.००३।।	तुजवांचोनियां रक्षी कोण आम्हां । काय सांगू रामा सकळिक
८२४	।।ना.गा.०११६.००४।।	रुसल्या आमुचे करी समाधान । तुजवीण वन ओस वाटे
८२५	।।ना.गा.०११६.००५।।	आम्हांसाठी तुवां दुष्टांसी मारिलें । कोण आतां लळे पुरवील
८२६	।।ना.गा.०११६.००६।।	तुजवांचोनियां आम्हीं सर्व दीन । न जाऊं येथून गोकुळासी
८२७	।।ना.गा.०११६.००७।।	वियोगानें तेव्हां पक्षी रडताती। आतां कृष्णमूर्ति कैची आम्हां
८२८	।।ना.गा.०११६.००८।।	बोलोनियां ऐसें निस्तेज पडती । नदी वाहत होती स्थिरावली
८२९	।।ना.गा.०११६.००९।।	नामा म्हणे होती दुश्चिन्हें बहुत । गोकुळीं समस्त विचारिती
८३०	।।ना.गा.०११७.००१।।	यशोदा व्याकुळ जाहलीसे प्राणें । सुखी असो तान्हें वनामाजीं
८३१	।।ना.गा.०११७.००२।।	उठती तिडका स्तनीं माझ्या फार । लवतसे नेत्र वेळोवेळां
८३२	।।ना.गा.०११७.००३।।	जीव तळमळी दाटे माझा घसा । पाहीन पाडसा माझ्या केव्हां

८३३	।।ना.गा.०११७.००४।।	गोकुळीचे जन निघाले सकळ । पाहताती गोपाळ वनामध्यें
८३४	।।ना.गा.०११७.००५।।	कालिंदीच्या तीरीं पडिले सकळ । पाहोनि कोल्हाळ करिताती
८३५	।।ना.गा.०११७.००६।।	कपाळ पिटिती यशोदा रोहिणी । आतां चक्रपाणि कैचा आम्हां
८३६	।।ना.गा.०११७.००७।।	धांव धांव कृष्णा दावी रे वदना । पाजूं आतां पान्हा कोणालागीं
८३७	।।ना.गा.०११७.००८।।	तुझिया कौतुकें कंठीं मी संसार । जळतें अंतर तुजसाठीं
८३८	।।ना.गा.०११७.००९।।	कोणावरी आतां घालूं अलंकार । बुडालें हें घर माझें आतां
८३९	।।ना.गा.०११७.०१०।।	नामा म्हणे शोकें जाऊं पाहे प्राण । सकळांचे जीवन कृष्णनाथ
८४०	।।ना.गा.०११८.००१।।	नंद म्हणे माझे बुडालें जहाज । अभाग्यासी मज कृष्ण कैचा
८४१	।।ना.गा.०११८.००२।।	काय माझें तप संपूर्ण सरलें। म्हणोनी बुडालें तान्हें माझें
८४२	।।ना.गा.०११८.००३।।	चिंतेने व्याकुळ पिटी वक्षस्थळा । दावा रे सांवळा प्राण माझा
८४३	।।ना.गा.०११८.००४।।	आलीया अतीता त्रासें दवडीलें । म्हणोनी बुडालें बाळ माझें
८४४	।।ना.गा.०११८.००५।।	प्रात:काळीं पाहूं कोणाचें मी मुख । येथूनियां सुख नाहीं नाहीं
८४५	।।ना.गा.०११८.००६।।	समस्तांची दृष्टी करी तुज कष्टी । म्हणोनी जगजेठी टाकियलें
८४६	।।ना.गा.०११८.००७।।	गोकुळीचे जन देऊं पाहाती प्राण । वांचाया कारण काय आतां
८४७	।।ना.गा.०११८.००८।।	अभय देतसे बळिभद्र सर्वांसी । मारून दुष्टांसी येईल आतां
८४८	।।ना.गा.०११८.००९।।	अंतर्यामीं जाणें जन जाले वेडें । नामा म्हणे वेढे काढितसे
८४९	।।ना.गा.०११९.००१।।	तयाचे मस्तकीं नाचे नारायण । आरंभीं गायन जगदीश
८५०	।।ना.गा.०११९.००२।।	त्रैलोक्याचा भार घाली हृषिकेशी। दमीत दुष्टासी स्वामी माझा
८५१	।।ना.गा.०११९.००३।।	होता एक क्षण जाला तेव्हां क्षीण । जाऊं पाहे प्राण कालियाचा
८५२	।।ना.गा.०११९.००४।।	तेव्हां त्याच्या स्त्रिया येती काकुळती। लक्ष्मीच्या पती कृपाळुवा
८५३	।।ना.गा.०११९.००५।।	यज्ञेशा अच्युता गोविंदा माधवा । दयानिधी केशवा कृष्णनाथा
८५४	।।ना.गा.०११९.००६।।	श्रीधरा वामना अगा वासुदेवा । ऐकावी ही देवा विज्ञापना
८५५	।।ना.गा.०११९.००७।।	आम्हांलागीं आतां देई चुडेदान । धरिती चरण कृष्णजीचे
८५६	।।ना.गा.०११९.००८।।	दीनाचा दयाळ दासाचा कैवारी । नामा म्हणे हरि उतरला
८५७	।।ना.गा.०१२०.००१।।	राहूं नका येथें जावें समुद्रासी । सांगे हृषिकेशी सकळिकां
८५८	।।ना.गा.०१२०.००२।।	तुझिया मस्तकीं असे माझा चरण । न भक्षीच तुज जाण पक्षीराज

८५९	।।ना.गा.०१२०.००३।।	दिव्य सुमनांच्या घालितात माळा । पूजिती सांवळा बाप माझा
८६०	।।ना.गा.०१२०.००४।।	अनर्घ्य रत्नांचे देती अलंकार । श्रीमुख सुंदर पाहताती
८६१	।।ना.गा.०१२०.००५।।	जांबुनदातटी घालिती भोजन । निघती तेथून सकळिक
८६२	।।ना.गा.०१२०.००६।।	आला भगवान आनंदले गडी । उभारिती गुढी जन तेव्हां
८६३	।।ना.गा.०१२०.००७।।	कालिया आख्यान स्मरे जो मानसीं । न डंखिती तयासी सर्पकुळें
८६४	।।ना.गा.०१२०.००८।।	अहर्निशीं याचें करी जो पठण । नामा म्हणे विघ्न नाहीं तेथें
८६५	।।ना.गा.०१२१.००१।।	आला वनमाळी । मग भेटती सकळीं
८६६	।।ना.गा.०१२१.००२।।	यशोदा रोहिणी । पोटीं धरिती चक्रपाणि
८६७	।।ना.गा.०१२१.००३।।	गायी धांवताती । कृष्ण अंगातें चाटिती
८६८	।।ना.गा.०१२१.००४।।	उड्या मारताती । गडी आनंदें नाचती
८६९	।।ना.गा.०१२१.००५।।	न वर्णवे तो आनंद। नामयाची बुद्धि मंद
८७०	।।ना.गा.०१२२.००१।।	जाला अस्तमान तेंथेंचि राहती । ऐके परीक्षिती अद्‌भुत तें
८७१	।।ना.गा.०१२२.००२।।	निद्रेनें व्यापिलें असे तेव्हां सर्वां । लागला वणवा तया वनीं
८७२	।।ना.गा.०१२२.००३।।	गायी पळताती पक्षी आहाळती । पिली पडताती कृष्णापुढें
८७३	।।ना.गा.०१२२.००४।।	हाहा:कार जाला धांव धांव कृष्णा । वांचवी रे प्राणा सकळांच्या
८७४	।।ना.गा.०१२२.००५।।	तुझीं आम्हीं बाळें वांचवी रे आम्हां । धांव धांव रामा म्हणताती
८७५	।।ना.गा.०१२२.००६।।	आक्रोशें रडती मारिताती हांका । वैकुंठनायका रक्षीं आम्हां
८७६	।।ना.गा.०१२२.००७।।	दीनांचा दयाळ मनाचा कोमळ । घाली अग्नी ज्वाळ मुखामाजीं
८७७	।।ना.गा.०१२२.००८।।	होतां प्रात:काळ सकळ उठले । नामा म्हणे आले गोकुळांती
८७८	।।ना.गा.०१२३.००१।।	दुष्ट दुराचारी । गोपाळाचा वेष धरी
८७९	।।ना.गा.०१२३.००२।।	दैत्य ओळखिला । रामें प्रलंब मारिला
८८०	।।ना.गा.०१२३.००३।।	देव करिती जयजयकार। पुष्पें वर्षती अपार
८८१	।।ना.गा.०१२३.००४।।	सूर्य आलासे माध्यान्हा । देवा बाहाती भोजना
८८२	।।ना.गा.०१२३.००५।।	नामा म्हणे पाचारती । गडी एकत्र बैसती
८८३	।।ना.गा.०१२४.००१।।	एके ठायीं करूनि अन्न । हातें वाढी नारायण
८८४	।।ना.गा.०१२४.००२।।	हें पाहोनी सुरवर । चित्तीं करिती विचार

८८५	।।ना.गा.०१२४.००३।।	धन्य पुण्य गौळियांचे । आम्हां अन्न मिळे कैचें
८८६	।।ना.गा.०१२४.००४।।	एक असे युक्ति । हात धुविल श्रीपती
८८७	।।ना.गा.०१२४.००५।।	उच्छिष्टाचे मिषें। देव जळीं जाले मासे
८८८	।।ना.गा.०१२४.००६।।	हें कळलें घननीळा । सांगतसे हें गोपाळा
८८९	।।ना.गा.०१२४.००७।।	चला वृंदावना जाऊं । नामा म्हणे उदक घेऊं
८९०	।।ना.गा.०१२५.००१।।	तृणाचिया लोभें गायी गेल्या दुरी । पाचारी मुरारी नामें त्यांची
८९१	।।ना.गा.०१२५.००२।।	चंद्रभागे, गंगे, भागिरथी, यमुने । येई ताम्रपर्णे धांवोनियां
८९२	।।ना.गा.०१२५.००३।।	सरस्वती, प्रवरे, कालिंदी, नर्मदे । येई तुंगभद्रे धांवोनियां
८९३	।।ना.गा.०१२५.००४।।	देवाजीचा शब्द ऐकोनियां कानीं । येताती धांवोनी नामा म्हणे
८९४	।।ना.गा.०१२६.००१।।	त्रिभंगी देहुडें उभें वृंदावनीं । वेणु चक्रपाणि वाजवितो
८९५	।।ना.गा.०१२६.००२।।	व्याघ्रावरी गायी टाकिताती माना। बाळें स्तनपाना विसरती
८९६	।।ना.गा.०१२६.००३।।	सर्प आणि नाग मुंगुसें बैसती । जळेंही वाहणें ते विसरलीं
८९७	।।ना.गा.०१२६.००४।।	हस्ती सिंह एके ठायीं बसताती । भ्रमर भुलती वेणुनादें
८९८	।।ना.गा.०१२६.००५।।	विंचरती वेणी तेथें राही फणी । करितां भोजनीं ग्रास मुखीं
८९९	।।ना.गा.०१२६.००६।।	उदकाचे कुंभ गोपिकांचे शिरीं । यमुनेच्या तीरीं वेडावल्या
९००	।।ना.गा.०१२६.००७।।	जाहले तटस्थ त्रिलोकींचे जीव। विसरला शिव देहभाव
९०१	।।ना.गा.०१२६.००८।।	नामा म्हणे व्योमीं उभ्या देवांगना । पाहोनियां कृष्ण भुलताती
९०२	।।ना.गा.०१२७.००१।।	अधरीचे अमृत सेविसी तूं एकलें । काय पुण्य केलें नेणों पाविया रे
९०३	।।ना.गा.०१२७.००२।।	तुळशी माळा शोभती गोपाळा । त्याहुनि आगळा तूं पाविया रे
९०४	।।ना.गा.०१२७.००३।।	सोळा सहस्त्र गोपी बोलतील प्रौढी । अधरींची गोडी नेली त्वां रे
९०५	।।ना.गा.०१२७.००४।।	विष्णुदास नामा केशवीं सौरस । उद्धरिला वंश पाविया त्वां रे
९०६	।।ना.गा.०१२८.००१।।	मार्गशीर्ष मासीं कात्यायनी व्रत । कुमारी समस्त आचरती
९०७	।।ना.गा.०१२८.००२।।	अरुणोदयी येती कालिंदीचे तीरीं । गाती त्या सुंदरी कृष्णलीला
९०८	।।ना.गा.०१२८.००३।।	सिकतेची मूर्ति करूनी देवीची । पूजाअर्चा तिची करिताती
९०९	।।ना.गा.०१२८.००४।।	जोडोनियां कर करिताती स्तवना। ऐके विज्ञापना आदिमाये
९१०	।।ना.गा.०१२८.००५।।	नंदाचा नंदन देई आम्हां पती । नामा म्हणे येती स्वस्थळासी

९११	।।ना.गा.०१२९.००१।।	कालिंदीचे तीरी वस्त्रें ठेविताती । जळांत रिघती सकळीक
९१२	।।ना.गा.०१२९.००२।।	गड्यांसमवेत आला तेथें कृष्ण । करावया पूर्ण व्रत त्यांचें
९१३	।।ना.गा.०१२९.००३।।	वस्त्रें घेवोनियां चढे कळंबावरी । घाबरल्या नारी पाहोनियां
९१४	।।ना.गा.०१२९.००४।।	वस्त्रें देई आतां आमुची मुकुंदा । जाऊनियां नंदा सांगों आतां
९१५	।।ना.गा.०१२९.००५।।	अच्युता अनंता कृष्णा गरुड़ध्वजा । दासी आम्ही तुझ्या सकळिया
९१६	।।ना.गा.०१२९.००६।।	वाजतसे सीत जाऊं पाहे प्राण । यशोदेची आण तुज असे
९१७	।।ना.गा.०१२९.००७।।	ऐकोनियां ऐसें नामा म्हणे देव हांसे । धर्म सांगतसे तयालागीं
९१८	।।ना.गा.०१३०.००१।।	नग्न होवोनियां स्नान जे करिती । त्यांचीं व्रतें होती निरर्थक
९१९	।।ना.गा.०१३०.००२।।	त्वरें करूनियां गे मजपाशीं । सांगतो तुम्हांसी प्रायश्चित्त
९२०	।।ना.गा.०१३०.००३।।	येक्या मार्गे एक काम सदनि हात । आनंद बहुत मनामध्यें
९२१	।।ना.गा.०१३०.००४।।	करा नमस्कार सांगे वनमाळी । एक हस्त भाळीं लाविताती
९२२	।।ना.गा.०१३०.००५।।	देवा द्विजां ऐसा करितां नमस्कार । पाप याचें फार धर्मशास्त्रीं
९२३	।।ना.गा.०१३०.००६।।	ऐकोनियां ऐसें लाज सोडोनियां। पडताती पाया आदित्याच्या
९२४	।।ना.गा.०१३०.००७।।	वस्त्रें देत तेव्हां तयां जगजीवन । मनोरथ पूर्ण करीन मी
९२५	।।ना.गा.०१३०.००८।।	नामा म्हणे येती गोकुळासी नारी । चालिला श्रीहरी तेथूनियां
९२६	।।ना.गा.०१३१.००१।।	प्रात:काळीं सांगे सकळांसी कृष्ण । नका घेऊं अन्न आज कोणी
९२७	।।ना.गा.०१३१.००२।।	सोडोनियां गायी चालिले वनासी । गडी हृषिकेशी खेळताती
९२८	।।ना.गा.०१३१.००३।।	वर्जियलें आम्हां नका घेऊं अन्ना । खावें काय कृष्णा आजी आतां
९२९	।।ना.गा.०१३१.००४।।	गडियांसी सांगे वैकुंठीचा राणा । सांगावें ब्राह्मणां जावोनियां
९३०	।।ना.गा.०१३१.००५।।	वनीं उपवासी आहेत रामकृष्ण । द्यावें त्यासी अन्न कृपा करोनी
९३१	।।ना.गा.०१३१.००६।।	गोपाळासी तेव्हां धाडी वासुदेव । पाहावया भाव याज्ञिकांचा
९३२	।।ना.गा.०१३१.००७।।	जोडोनियां हात वंदिती द्विजांसी । धाडिलें आम्हांसी कृष्णनाथें
९३३	।।ना.गा.०१३१.००८।।	नामा म्हणे ऐसें सांगती गोपाळ । याज्ञिका सकळ अभिमान
९३४	।।ना.गा.०१३२.००१।।	पडे प्रायश्चित्त बोलों नका कोणी । ऐकूं नये कानीं शब्द यांचा
९३५	।।ना.गा.०१३२.००२।।	स्वर्गसुखासाठी करिताती यज्ञ । टाकिती अवदानें अग्निमुखीं
९३६	।।ना.गा.०१३२.००३।।	भोक्ता वनीं आला न कळेची त्याला । पूर्ण ब्रह्म याला न जाणती

९३७	।।ना.गा.०१३२.००४।।	कृपाळु बहुत परीक्षिती राया । उद्धार कराया पाठविलें
९३८	।।ना.गा.०१३२.००५।।	इच्छामात्रें पाडी अन्नाचे पर्वत । काकुळती येत अन्नासाठीं
९३९	।।ना.गा.०१३२.००६।।	गडियांसी कळे तेथील आकार । निघती सत्वर तेथुनियां
९४०	।।ना.गा.०१३२.००७।।	येवोनियां कृष्णा सांगितलें त्यांनीं । हांसे चक्रपाणि नामा म्हणे
९४१	।।ना.गा.०१३३.००१।।	कृष्णा पांच खाणी उथळ दिसती । लाहानाल्या भिंती त्याजवरी
९४२	।।ना.गा.०१३३.००२।।	विस्तु घालिताती गवत आंथरती । बडबड करिती अवघेजण
९४३	।।ना.गा.०१३३.००३।।	घालुनियां तूप हातीं घेती चाटू । करीत ॐ फट् अक्षेवेळां
९४४	।।ना.गा.०१३३.००४।।	लांकडाचें पाळें घेऊनि बैसला । मिळालासे मेळा त्याजपुढें
९४५	।।ना.गा.०१३३.००५।।	एवढेंसें भांडें तांदूळ शिजविती । तुजला काय देती त्यांतूनियां
९४६	।।ना.गा.०१३३.००६।।	घडिघडी उठती घडिघडी बैसती । तें काय श्रीपति आम्हां सांग
९४७	।।ना.गा.०१३३.००७।।	काय चतुराई असे त्या गोपाळा । भावासी भुलला नामा म्हणे
९४८	।।ना.गा.०१३४.००१।।	गडियांसी तेव्हां सांगितलें देवें । स्त्रियांसी सांगावें जाऊनियां
९४९	।।ना.गा.०१३४.००२।।	नको कृष्णा द्विज आम्हांसी मारिती । अभय श्रीपती त्यांसी देत
९५०	।।ना.गा.०१३४.००३।।	त्वरें करोनियां गेले स्त्रियांपाशीं । सांगितलें त्यांसी वर्तमान
९५१	।।ना.गा.०१३४.००४।।	ऐकोनियां ऐसें उठिल्या सत्वर । वर्जिती भ्रतार तेव्हां त्यांचे
९५२	।।ना.गा.०१३४.००५।।	एका ब्राह्मणानें स्त्रियेसी बांधिलें । प्राणासी सोडिलें परीक्षिती
९५३	।।ना.गा.०१३४.००६।।	सुकुमार सांवळा राजीवलोचन । पाहताती कृष्णमुख तेव्हां
९५४	।।ना.गा.०१३४.००७।।	आनंदाचे नेत्रीं वाहते जीवन । पुसे वर्तमान नामा म्हणे
९५५	।।ना.गा.०१३५.००१।।	घरा जावें ऐसें सांगे पुरुषोत्तम । ऐकोनियां श्रम फार होय
९५६	।।ना.गा.०१३५.००२।।	दयानिधी ऐके अगा मेघ:श्यामा। धाडूं नको आम्हां येथूनियां
९५७	।।ना.गा.०१३५.००३।।	तुजसाठीं आम्हीं सोडिलें भ्रतारां । चरणीं देईं थारा देवराया
९५८	।।ना.गा.०१३५.००४।।	देव ना संसार आम्हां जालें कृष्णा । सांगावें हें कोणा दु:ख आतां
९५९	।।ना.गा.०१३५.००५।।	तुमचे भ्रतार वंदिती आम्हांसी । सांगे हृषिकेशी भिऊं नका
९६०	।।ना.गा.०१३५.००६।।	सांगतांची ऐसें चालियेल्या त्या सर्व । पाहाती केशव वेळोंवेळीं
९६१	।।ना.गा.०१३५.००७।।	द्विजांचे मानसीं होय अनुताप । निंदिती आप आपणातें
९६२	।।ना.गा.०१३५.००८।।	भोजन करूनी गडी रामकृष्ण । निघती तेथून नामा म्हणे

९६३	।।ना.गा.०१३६.००१।।	इंद्राचा भाग भक्षी नारायण । रूप गोवर्धन धरूनियां
९६४	।।ना.गा.०१३६.००२।।	क्रोधावला इंद्र गौळियां निंदीत । दावीन सामर्थ्य तुम्हां आतां
९६५	।।ना.गा.०१३६.००३।।	पोरांच्या बुद्धीनें वर्तताती सर्व । धरूनियां गर्व तेचि करिती
९६६	।।ना.गा.०१३६.००४।।	प्रलय मेघांच्या काहाडिल्या शृंखला । वर्षावें गोकुळां सकळांनी
९६७	।।ना.गा.०१३६.००५।।	आज्ञा म्हणोनियां वंदियेला इंद्र । कोपे जैसा रुद्र प्रळयींचा
९६८	।।ना.गा.०१३६.००६।।	मुसळाच्या धारा मेघ वर्षताती । गारा पडताती शिळा जैशा
९६९	।।ना.गा.०१३६.००७।।	मरताती पक्षी श्वापदें अपार । हिंवें नारीनर कांपताती
९७०	।।ना.गा.०१३६.००८।।	नामा म्हणे गायी हंबरडा फोडिती । येऊनि पडती कृष्णापुढें
९७१	।।ना.गा.०१३७.००१।।	काकुळती येती सकळिक लोक । पाहसी कौतुक काय आतां
९७२	।।ना.गा.०१३७.००२।।	मागें बहुतापरी रक्षियलें आम्हां । अगा पुरुषोत्तमा दीनबंधु
९७३	।।ना.गा.०१३७.००३।।	कोण तुजविण आम्हासि रक्षिता । उदारा अनंता जगजेठी
९७४	।।ना.गा.०१३७.००४।।	शरण शरण अगा वासुदेवा । अच्युता माधवा दीनबंधू
९७५	।।ना.गा.०१३७.००५।।	विलंब केलिया जातील रे प्राण । धरिती चरण नामा म्हणे
९७६	।।ना.गा.०१३८.००१।।	सकळिकां लोकां देवें आश्वासिलें । इंद्रें हें मांडिलें विघ्न येथें
९७७	।।ना.गा.०१३८.००२।।	महेंद्राचा रंक करीन क्षणांत। पहा पुरुषार्थ दावीन मी
९७८	।।ना.गा.०१३८.००३।।	रक्षिणार यासी आहे मी गोविंद । उतरीन मद याचा आतां
९७९	।।ना.गा.०१३८.००४।।	शरणागत मारी ऐसा कोण थोर । मशक पामर पाहूं आतां
९८०	।।ना.गा.०१३८.००५।।	या साठीं करीन सृष्टीचा उभारा । लागों नेदी वारा दुःखाचा मी
९८१	।।ना.गा.०१३८.००६।।	गोवर्धना तुम्ही चलारे समस्त । दावितों सामर्थ्य इंद्रा आतां
९८२	।।ना.गा.०१३८.००७।।	उचलिला गिरी प्रथम अंगुळीं । नामा म्हणे बळी बाप माझा
९८३	।।ना.गा.०१३९.००१।।	राहा याजतळीं आनंदें करूनी । मानूं नका मनीं भय याचें
९८४	।।ना.गा.०१३९.००२।।	पाहूं किती दिवस पडतो पाऊस। धरीन निःशेष प्रलयान्त
९८५	।।ना.गा.०१३९.००३।।	सांगतांचि ऐसें राहाती सकळ । वर्णिताती बळ परस्परें
९८६	।।ना.गा.०१३९.००४।।	सौंगडे म्हणती पडेल अवचिता । लावा कीं रे हाता सकळिक
९८७	।।ना.गा.०१३९.००५।।	उगेंचि होती श्रमीं बालकें अज्ञान । म्हणे नारायण काहाडा हात
९८८	।।ना.गा.०१३९.००६।।	सप्त दिन होती सांगतो योगींद्र। पहावया इंद्र येता जाला

९८९	।।ना.गा.०१३९.००७।।	अद्‌भुत चरित्र पाहून गेली भ्रांत । मेघासी सांगत पुरे करा
९९०	।।ना.गा.०१३९.००८।।	नामा म्हणे चित्तीं इंद्र चिंतावला। अपराध घडला समर्थांचा
९९१	।।ना.गा.०१४०.००१।।	राहिला पाऊस निघावें बाहेर । सांगे विश्वंभर सकळिकां
९९२	।।ना.गा.०१४०.००२।।	दीनबंधू तेव्हां ठेवी पर्वतासी । भेटती देवासी सकळिक
९९३	।।ना.गा.०१४०.००३।।	आयुष्य बहुत तुज होवो कृष्णा । वांचविले प्राणा सकळांच्या
९९४	।।ना.गा.०१४०.००४।।	विष्णुदास नामा ओवाळून जाय । ये गे माझे माय भेटी देई
९९५	।।ना.गा.०१४१.००१।।	इंद्राचिये नेत्रीं वाहातसे नीर । अपराधी थोर देवराया
९९६	।।ना.गा.०१४१.००२।।	क्षमा करीं आतां अच्युता अनंता । अगा कृष्णनाथा दीनबंधू
९९७	।।ना.गा.०१४१.००३।।	तुझिया दासासी दु:ख म्यां दिधलें । भ्रांतीनें मोहिलें मन माझें
९९८	।।ना.गा.०१४१.००४।।	दावी तुज थोरी न करीच सेवा । करा दंड देवा मजलागीं
९९९	।।ना.गा.०१४१.००५।।	तूंचि माझा बाप तूंचि माझी आई । क्षमा कृष्णाबाई करी आतां
१०००	।।ना.गा.०१४१.००६।।	दैत्य मारावया भूतळीं आलासी। भक्ताला रक्षिसी निरंतर
१००१	।।ना.गा.०१४१.००७।।	जगद्‌गुरु धन्ये माझा वनमाळी। जोडोनि अंजुली उभा असे
१००२	।।ना.गा.०१४१.००८।।	चतुर्भुज गळां वैजयंती माळा। पाहातसे डोळां नामा म्हणे
१००३	।।ना.गा.०१४२.००१।।	गोविंदा माधवा केशवा वामना । मायातीता कृष्णा तुज नमो
१००४	।।ना.गा.०१४२.००२।।	गोवर्धनोद्धारा देवा विश्वंभरा। निर्गुण निराकारा तुज नमो
१००५	।।ना.गा.०१४२.००३।।	जनार्दना हरि कृपाळू हृषिकेशा । पुराणपुरूषा तुज नमो
१००६	।।ना.गा.०१४२.००४।।	अव्यक्ता क्षेत्रज्ञा अचिंत्या कूटस्था। भुवनत्रय नाथा तुज नमो
१००७	।।ना.गा.०१४२.००५।।	अनंत ब्रह्मांडें तुझिये उदरीं । घनश्याम हरि तुज नमो
१००८	।।ना.गा.०१४२.००६।।	देवराया तुझें कोमळ हृदय । कृपा दृष्टी पाहे मजकडे
१००९	।।ना.गा.०१४२.००७।।	तुझा मी किंकर आहे वासुदेवा । अभय या जीवा देईं आतां
१०१०	।।ना.गा.०१४२.००८।।	नामा म्हणे घाली चरणासी मिठी। बोले जगजेठी स्वामी माझा
१०११	।।ना.गा.०१४३.००१।।	तुझा मोडिला म्यां यज्ञ । ऐक तयाचें कारण
१०१२	।।ना.गा.०१४३.००२।।	न करी रे स्मरण । सुखारूढ तुझें मन
१०१३	।।ना.गा.०१४३.००३।।	विसरलासी मज। अनुग्रह केला तुज
१०१४	।।ना.गा.०१४३.००४।।	ऐसे सांगे नारायण । नामा म्हणे समाधान

१०१५	।।ना.गा.०१४४.००१।।	आणूनि सुरभि करी अभिषेक । येती सकळिक मरूद्गण
१०१६	।।ना.गा.०१४४.००२।।	सुरवरांची दाटी करिती नमस्कार। होतसे अपार पुष्पवृष्टी
१०१७	।।ना.गा.०१४४.००३।।	वेदमंत्रघोष ऋषी करिती । अप्सरा नाचती थैयथैयां
१०१८	।।ना.गा.०१४४.००४।।	नारद तुंबर गंधर्व गायन। वर्णिताती गुण कृष्णजीचे
१०१९	।।ना.गा.०१४४.००५।।	यथाविधी इंद्र पूजी विश्वंभरा । जोडोनियां करां उभा राहे
१०२०	।।ना.गा.०१४४.००६।।	आज्ञा घेऊनियां जाय स्वस्थळासी । येती गोकुळासी सकळिक
१०२१	।।ना.गा.०१४४.००७।।	चरित्र जो कोणी उच्चारील वाचे । जळती पापांचे पर्वत हे
१०२२	।।ना.गा.०१४४.००८।।	नामा म्हणे ऐसें सांगतसे शुक । सूत पुराणिक शौनकासी
१०२३	।।ना.गा.०१४५.००१।।	अहर्निशीं कंस बसे चिंताक्रांत । विचार पुसत प्रधानासी
१०२४	।।ना.गा.०१४५.००२।।	प्रतिज्ञा करूनि शत्रुवधा जाती। ते मागें न येती परतोनी
१०२५	।।ना.गा.०१४५.००३।।	आतां पुरूषार्थी कोण पाठवावा । तो मज सांगावा निवडोनि
१०२६	।।ना.गा.०१४५.००४।।	सांगती प्रधान धाडा असुरासुर । तव तो असुर उभा राहे
१०२७	।।ना.गा.०१४५.००५।।	म्हणे मृत्यु नसे मज कोणा हातीं । द्वापारीं मारुती गुप्त जाला
१०२८	।।ना.गा.०१४५.००६।।	ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं । गौरविलें त्यासी नानापरीं
१०२९	।।ना.गा.०१४५.००७।।	नामा म्हणे काळें बोलाविलें त्यासी । सत्वर वनासी येता जाला
१०३०	।।ना.गा.०१४६.००१।।	आनंदें वनांत खेळताती गोप । गाईंचे कळप चरताती
१०३१	।।ना.गा.०१४६.००२।।	अकस्मात दैत्य देखती दुरोन । म्हणती कृष्ण विघ्न थोर आलें
१०३२	।।ना.गा.०१४६.००३।।	लपें तूं कान्होबा म्हणताती गडी । घालितों घोंगडी तुजवरी
१०३३	।।ना.गा.०१४६.००४।।	घाबरले तेव्हां समस्त गोपाळ । पाहोनी घननीळ बोलतसे
१०३४	।।ना.गा.०१४६.००५।।	तुम्ही कांही चिंता न करे मानसीं । मारितों मी यांसी क्षणामाजीं
१०३५	।।ना.गा.०१४६.००६।।	राहोनिया उभा पाहात अंतरीं। यासी मृत्यु करीं कोणाचिया
१०३६	।।ना.गा.०१४६.००७।।	वातात्मजा हातीं मरण असे यासी । कळलें देवासी नामा म्हणे
१०३७	।।ना.गा.०१४७.००१।।	गायी गोप तेव्हां लपवोनी क्षणेक । जानकी नायक जाला देव
१०३८	।।ना.गा.०१४७.००२।।	आकर्ण नयन हातीं धनुष्यबाण । करितसे ध्यान मारुतीचें
१०३९	।।ना.गा.०१४७.००३।।	स्वामीचा तो धांवा ऐकोनियां कानीं । हडबडिला मनीं कपींद्र तो
१०४०	।।ना.गा.०१४७.००४।।	निघोनी त्वरित वनामाजी आला । चरणासी लागला प्रेमभावें

१०४१	।।ना.गा.०१४७.००५।।	म्हणे स्वामी कांही सेवकासी आज्ञा । करावी सर्वज्ञा दयानिधी
१०४२	।।ना.गा.०१४७.००६।।	देव म्हणे बा रे काय सांगू फार । पैल तो असुर येत आहे
१०४३	।।ना.गा.०१४७.००७।।	तुझ्या हातें आहे तयासी मरण । म्हणोनि स्मरण केलें तुझें
१०४४	।।ना.गा.०१४७.००८।।	तयासी जावोनी मारी तुवां आतां । चरणीं ठेवूनि माथा निघाला तो
१०४५	।।ना.गा.०१४७.००९।।	दुर्जनें ते वेळीं मारुती पाहिला । म्हणे काळ आला कोठोनियां
१०४६	।।ना.गा.०१४७.०१०।।	धरूनियां नरडी केला गतप्राण । पुनरपि येऊन वंदितसे
१०४७	।।ना.गा.०१४७.०११।।	नामा म्हणे दोन्ही जोडोनियां कर । बोलिला उत्तर काय आतां
१०४८	।।ना.गा.०१४८.००१।।	त्रेतायुगीं ख्याती करोनियां थोर । वधिले असुर रावणादि
१०४९	।।ना.गा.०१४८.००२।।	कोण्या हेतुस्तव पुन्हां आगमन। सांगा कृपाकरून दासालागीं
१०५०	।।ना.गा.०१४८.००३।।	ऐकोनियां वचन बोले सर्वेश्वर । द्वापारीं अवतार आठवा हा
१०५१	।।ना.गा.०१४८.००४।।	तुझे भेटीस्तव रूप हें धरिलें । दावी तें वहिलें कपी म्हणे
१०५२	।।ना.गा.०१४८.००५।।	कृष्णलीला पाहूं हेत आहे चित्ता । दावी सीताकांता दीनालागीं
१०५३	।।ना.गा.०१४८.००६।।	चतुर्भुज रूप दाविलें प्रगट । शिरीं मोर मुगुट शोभतसे
१०५४	।।ना.गा.०१४८.००७।।	गुंजाहार गळां वैजयंती माळा। कांसेसी पिवळा पीतांबर
१०५५	।।ना.गा.०१४८.००८।।	नवलक्ष गायी गोपही तितुके। खेळती कौतुकें करोनियां
१०५६	।।ना.गा.०१४८.००९।।	नामा म्हणे तेव्हां स्तुति ते करीत । न कळे तुझा अंत ब्रह्मादिकां
१०५७	।।ना.गा.०१४९.००१।।	द्वापाराची ठेव संपूर्ण पाहून । विनवी जोडून करालागीं
१०५८	।।ना.गा.०१४९.००२।।	रामरूप धरून मज बोळवावें । तें रूप पाहावें हृदयामाजीं
१०५९	।।ना.गा.०१४९.००३।।	मनोरथ त्याचा ऐकोनी श्रवणीं । झाला चापपाणि तात्कालिक
१०६०	।।ना.गा.०१४९.००४।।	पाहोनियां ध्यान करूनि नमन । निघाला तेथून वायुसुत
१०६१	।।ना.गा.०१४९.००५।।	घेवोनियां आज्ञा सेतुबंधा गेला । ध्यानस्थ बैसला नामा म्हणे
१०६२	।।ना.गा.०१५०.००१।।	गौळी म्हणती हृषिकेशी । दावी आपुल्या स्थळासी
१०६३	।।ना.गा.०१५०.००२।।	सखा तूंचि कृष्णा । आमुची पुरावी वासना
१०६४	।।ना.गा.०१५०.००३।।	दावी वैकुंठ सकळां । क्षण एक पाहूं डोळां
१०६५	।।ना.गा.०१५०.००४।।	नामा तेथील रहिवासी । आला स्थापाया धर्मासी
१०६६	।।ना.गा.०१५१.००१।।	लोपला आदित्य चढे चंद्रप्रभा । वृंदावनीं शोभा सुशोभित

१०६७	।।ना.गा.०१५१.००२।।	देहुडा पाउलीं उभा तये वनीं । वेणू चक्रपाणि वाजवितो
१०६८	।।ना.गा.०१५१.००३।।	ऐकतांचि नाद गोकुळींच्या नारी । पाहावया हरि निघताती
१०६९	।।ना.गा.०१५१.००४।।	भ्रतार सेजेसीं टाकुनी उठती । वाढितां पंगती निघताती
१०७०	।।ना.गा.०१५१.००५।।	स्तन देतां बाळें टाकिलीं भूमीसी । मोकळिया केशीं निघताती
१०७१	।।ना.गा.०१५१.००६।।	नामा म्हणे ऐशा गेल्या देवापाशीं। आनंद मानसीं न समाये
१०७२	।।ना.गा.०१५२.००१।।	वनामध्यें कां गे आलाती सकळ । विनोदें गोपाळ म्हणतसे
१०७३	।।ना.गा.०१५२.००२।।	निशींमाजीं व्याघ्र फिरताती रानीं । जावें सकळांनी घरां आतां
१०७४	।।ना.गा.०१५२.००३।।	ऐकोनियां ऐसें कठीण वचन । चालिले जीवन नेत्रींहूनी
१०७५	।।ना.गा.०१५२.००४।।	वेणुनाद दूत धाडिला आम्हांसी । आलिया म्हणसी जावें आतां
१०७६	।।ना.गा.०१५२.००५।।	शहाणा चतुर आहेसी नेटका । वैकुंठनायका विचारावें
१०७७	।।ना.गा.०१५२.००६।।	कामाग्नीनें कृश पाडिले सकळ । मांडियेला खेळ मन्मथाचा
१०७८	।।ना.गा.०१५२.००७।।	एक एक नारी एक एक कृष्ण । करावया पूर्ण इच्छा त्यांची
१०७९	।।ना.गा.०१५२.००८।।	प्रकृतीसी ऐसा भुलला गोविंद । करिती आनंद नामा म्हणे
१०८०	।।ना.गा.०१५३.००१।।	जाला अभिमान धन्य आम्ही आतां । लक्षुमीचा कांता भोगितसों
१०८१	।।ना.गा.०१५३.००२।।	गुप्त जाला तेव्हां वैकुंठ नायक । करिताती शोक सकळीक
१०८२	।।ना.गा.०१५३.००३।।	निघाल्या तेथूनि फिरताति वनें । यशोदेचें तान्हें धुंडावया
१०८३	।।ना.गा.०१५३.००४।।	वृक्ष आदि पक्षी पुसती तयांसी । तुम्ही हृषिकेशी देखियेला
१०८४	।।ना.गा.०१५३.००५।।	मृगासी पुसती देखियेला डोळां । सांगा रे सांवळा कोणीतरी
१०८५	।।ना.गा.०१५३.००६।।	आम्हांवरी तुम्ही काय रे कोपता । सांगा रे भगवंता पुसतसों
१०८६	।।ना.गा.०१५३.००७।।	कुरवंडी करूं सकळांचे प्राण । देऊं त्या भूषण अंगावरी
१०८७	।।ना.गा.०१५३.००८।।	नामा म्हणे जेथें असे अभिमान । तेथें नारायण नाहीं नाहीं
१०८८	।।ना.गा.०१५४.००१।।	ऐकावें चरित्र परीक्षितिराया । बरोबरी जाया एक असे
१०८९	।।ना.गा.०१५४.००२।।	तोडोनियां पुष्पें गुंफोनियां हार । घालीत श्रीधर तिजवरी
१०९०	।।ना.गा.०१५४.००३।।	न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । घालितसे वेणी आवडीनें
१०९१	।।ना.गा.०१५४.००४।।	वंदियेलीं शिवें चरणींची गंगा । करीतसे भांगा नीट तिच्या
१०९२	।।ना.गा.०१५४.००५।।	गोपिकांच्या वेषें प्रगटल्या श्रुती । गुह्य तुजप्रति सांगितलें

१०९३	।।ना.गा.०१५४.००६।।	घेवोनियां तिसी गेला कुंजवना । वज्रांकुश चिन्हां उमटती
१०९४	।।ना.गा.०१५४.००७।।	गोपिकांचा मेळा येतसे तांतडी । युगा ऐसी घडी झाली तयां
१०९५	।।ना.गा.०१५४.००८।।	न लगेची शोध शिणती सकळ । न जाती गोकुळा नामा म्हणे
१०९६	।।ना.गा.०१५५.००१।।	चंद्राच्या प्रभेनें चमकती पाऊलें । दुरोनि देखिलें गोपिकांनी
१०९७	।।ना.गा.०१५५.००२।।	कृपणाचें धन होतें जे चळलें। तयासी लाधलें अवचिता
१०९८	।।ना.गा.०१५५.००३।।	एकीमागें एक धावताती नारी । आहे येथें हरी ऐसे वाटे
१०९९	।।ना.गा.०१५५.००४।।	घेवोनियां रज लाविताती भाळा । पाहती सकळां न्याहाळूनि
११००	।।ना.गा.०१५५.००५।।	बरोबरी नारी कोणीतरी असे । पाउलांचे ठसे उमटले
११०१	।।ना.गा.०१५५.००६।।	पापिणि गे तुम्ही आम्ही सकळिक । पुण्याची अधिक म्हणुन भोगी
११०२	।।ना.गा.०१५५.००७।।	बरोबरी तिसी होय अभिमान । जालासे स्वाधीन माझ्या देव
११०३	।।ना.गा.०१५५.००८।।	कडे घेसे तरी येतें बरोबरी । चालवेना हरि मज आतां
११०४	।।ना.गा.०१५५.००९।।	जाणोनि अंतर ठकविले भगवंतें । नामा म्हणे येथें रडतसे
११०५	।।ना.गा.०१५६.००१।।	मागोनियां गोपी आल्या तिजपाशीं । कोठें हृषिकेशी सांग आम्हां
११०६	।।ना.गा.०१५६.००२।।	टाकोनियां गेला मज पूतनारी। येथेंची मुरारी गुप्त जाला
११०७	।।ना.गा.०१५६.००३।।	वैकुंठनायका अगा नारायणा । दावी रे वदना एक वेळां
११०८	।।ना.गा.०१५६.००४।।	कृष्णाचें चरित्र सकळ करिती । मन रंजविती नामा म्हणे
११०९	।।ना.गा.०१५७.००१।।	जोडोनियां हात येती काकुळती । पाव कृपामूर्ति आम्हांलागीं
१११०	।।ना.गा.०१५७.००२।।	अवतार घेसी दुष्ट वधायासी। येसी गोकुळासी म्हणोनियां
११११	।।ना.गा.०१५७.००३।।	पाहोनियां तुला लक्षुमी पातली । दरिद्रें पळाली येथोनियां
१११२	।।ना.गा.०१५७.००४।।	सकळांसी सुख द्यावया आलासी । आम्हीं वनवासी दु:खी होतों
१११३	।।ना.गा.०१५७.००५।।	नामा म्हणे कंठी धरियेला प्राण । दाखवी चरण दयानिधी
१११४	।।ना.गा.०१५८.००१।।	सरोवरीं कमळें तैसे तुझे नेत्र । त्याहूनि विचित्र दिसताती
१११५	।।ना.गा.०१५८.००२।।	कृपाळुवा ऐके अगा हृषिकेशी । आम्हीं तुझ्या दासी मोलाविण
१११६	।।ना.गा.०१५८.००३।।	कामरूपदैत्य मारितो आम्हांसी । भक्तांसी रक्षिसी कीर्ति जगीं
१११७	।।ना.गा.०१५८.००४।।	दीनासी रक्षिसी दुष्टांसी मारिसी । धर्माला स्थापिसी निरंतर
१११८	।।ना.गा.०१५८.००५।।	घेवोनियां शस्त्र मारावें सकळां । आलासे कंटाळा नामा म्हणे

१११९	।।ना.गा.०१५९.००१।।	सुकुमार सांवळे जैसीं रातोत्पळें । दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२०	।।ना.गा.०१५९.००२।।	ध्वजवज्रांकुश जयाशीं शोभलें । दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२१	।।ना.गा.०१५९.००३।।	दमोनियां दुष्टां बाहेर काढिलें । दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२२	।।ना.गा.०१५९.००४।।	रांगता रांगतां विमलार्जुन मोडीले। दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२३	।।ना.गा.०१५९.००५।।	अघासुरा उदरीं उभी जी राहिलीं । दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२४	।।ना.गा.०१५९.००६।।	नामा म्हणे ज्यांतें वरुणानें पूजिलें । दावीं तीं पाऊलें कृष्णराया
११२५	।।ना.गा.०१६०.००१।।	सकळांचें तुझ्या हातीं असे सूत्र । यशोदेचा पुत्र नवसीला
११२६	।।ना.गा.०१६०.००२।।	नंदाचिया ऋणा फेडाया आलासी। कळलें आम्हासीं तुझ्या कृपें
११२७	।।ना.गा.०१६०.००३।।	तेहतीस कोटी देव ब्रह्मा सदाशिव । प्रार्थितातीं सर्व तुजलागीं
११२८	।।ना.गा.०१६०.००४।।	यादवकुळटिळका वैकुंठनायका। विधीच्या जनका भेट आतां
११२९	।।ना.गा.०१६०.००५।।	नामा म्हणे मुख दाखवी कृष्णनाथा। हरेल ही व्यथा वियोगाची
११३०	।।ना.गा.०१६१.००१।।	शरणांगत तारी भवसिंधु त्वरित । ठेवावा तो हात शिरावरी
११३१	।।ना.गा.०१६१.००२।।	अरण्यांत दुष्ट दैत्यांसी मारीत। ठेवावा तो हात शिरावरी
११३२	।।ना.गा.०१६१.००३।।	वेणू पांवा जया हातांत शोभत । ठेवावा तो हात शिरावरी
११३३	।।ना.गा.०१६१.००४।।	घेवोनी शिदोऱ्या गड्यांसी वांटीत । ठेवावा तो हात शिरावरी
११३४	।।ना.गा.०१६१.००५।।	रक्षावया प्रजा उचलिला पर्वत । ठेवावा तो हात शिरावरी
११३५	।।ना.गा.०१६१.००६।।	सुवर्णाचीं कडीं भूषणें अमित । ठेवावा तो हात शिरावरी
११३६	।।ना.गा.०१६१.००७।।	ऐशा त्या गोपिका अनंता वर्णिती । निष्पाप पाहती नामा म्हणे
११३७	।।ना.गा.०१६२.००१।।	अभिमानें घाला घातला आम्हासीं । म्हणूनि लपलासी देवराया
११३८	।।ना.गा.०१६२.००२।।	तुजवांचोनियां जाऊं पाहे प्राण । दाखवी वदन एकवेळां
११३९	।।ना.गा.०१६२.००३।।	मुकुट कुंडलें श्रीमुख सांवळें । केशरीं लाविलें गंध भाळीं
११४०	।।ना.गा.०१६२.००४।।	पाहोनियां जीवीं होय फार सुख । हरेल ही भूक डोळियांची
११४१	।।ना.गा.०१६२.००५।।	तुजवांचोनियां आम्हां नाहीं कोणी । तिहीं त्रिभुवनीं नामा म्हणे
११४२	।।ना.गा.०१६३.००१।।	चरणासी शरण तुझिया जे येती । तेचि उद्धरती भवसिंधु
११४३	।।ना.गा.०१६३.००२।।	लक्षुमीने ज्यातें असे आराधिलें। ठेवीं तीं पाऊलें स्तनावरी
११४४	।।ना.गा.०१६३.००३।।	आवडीनें शिवें मस्तकीं वंदिलें । ठेवीं तीं पाऊलें स्तनावरी

११४५	।।ना.गा.०१६३.००४।।	नामा म्हणे ऐसी करिताती स्तुती । शिंपीयेली क्षिती अश्रुपातें
११४६	।।ना.गा.०१६४.००१।।	आम्हांवरी कां रे धरियेला राग । काय तुझें सांग आम्हीं केलें
११४७	।।ना.गा.०१६४.००२।।	रडतसों आम्हीं मारितसों हांका । विश्वाच्या जनका नायिकसी
११४८	।।ना.गा.०१६४.००३।।	कामाग्नीनें आम्ही जळतों सकळ । करावें शीतळ अधरामृतें
११४९	।।ना.गा.०१६४.००४।।	नामा म्हणे देई एकवेळ भेटी । तुजसाठीं कष्टी फार होतों
११५०	।।ना.गा.०१६५.००१।।	वाजवोनी वेणू पसरिलें जाळें । आम्हांसी न कळे कपटिया तूं
११५१	।।ना.गा.०१६५.००२।।	दुखवोनी सर्वां टाकियेलें वनीं । गेलासी येथुनि पारधिया
११५२	।।ना.गा.०१६५.००३।।	धरूनियां धीर राहूं एक क्षण । देऊं मग प्राण सकळिक
११५३	।।ना.गा.०१६५.००४।।	सकळांच्या हत्या येती तुजवरी । नामा म्हणे हरि भेट आतां
११५४	।।ना.गा.०१६६.००१।।	त्रिविधतापें प्राणी होताती संतप्त । शीतळ करीत कथामृतें
११५५	।।ना.गा.०१६६.००२।।	अमृतापरीस तुझी कथा अधिक । सांगतसे ऐक देवराया
११५६	।।ना.गा.०१६६.००३।।	स्वर्गी जे अमृत प्राशन करिती । पुण्य सरल्या येती मृत्युलोकां
११५७	।।ना.गा.०१६६.००४।।	तुझी कथा देत अच्युत पदांसी । न विचारी मानसीं याति कांही
११५८	।।ना.गा.०१६६.००५।।	नाहीं चतुराई बोबडे हे बोल । लिहित विठ्ठल नामा म्हणे
११५९	।।ना.गा.०१६७.००१।।	गायी घेवोनियां जासी जेव्हां राना । आमुचिया मना दुःख वाटे
११६०	।।ना.गा.०१६७.००२।।	सुकुमार सांवळी जैसीं रातोत्पळें । त्याहुनि कोवळे पाय तुझे
११६१	।।ना.गा.०१६७.००३।।	खडे कांटे बहू कठिण तृणमुळें । ठेवीसी पाऊलें तयांवरी
११६२	।।ना.गा.०१६७.००४।।	पावतोसी क्लेश अगा वासुदेवा । म्हणोनियां जीवा दु:ख वाटे
११६३	।।ना.गा.०१६७.००५।।	सांगतसों आम्ही नित्य यशोदेसी । धाडूं नको यासी वनांमध्यें
११६४	।।ना.गा.०१६७.००६।।	नामा म्हणे होय सकळांचा उद्धार । म्हणोनी श्रीधर वना जाय
११६५	।।ना.गा.०१६८.००१।।	तुजवांचोनियां वैकुंठनायका । आम्हांसी घटिका युग होय
११६६	।।ना.गा.०१६८.००२।।	अस्तमान होतां येसी तूं गोकुळीं। मुखावरी धुळी गोरजांची
११६७	।।ना.गा.०१६८.००३।।	कुरळ हे केंस सुंदर नासिक । पाहोनियां सुख होय फार
११६८	।।ना.गा.०१६८.००४।।	लवती पापण्या न सोसवे आम्हां । अहर्निशीं नामा हेंचि गाय
११६९	।।ना.गा.०१६९.००१।।	टाकियेलें आम्हीं पतिबंधुसुतां । आलोंत अच्युता तुजपाशीं
११७०	।।ना.गा.०१६९.००२।।	आमुची ही इच्छा करिशील पूर्ण । आहेसी कठीण ठावें नाहीं

११७१	।।ना.गा.०१६९.००३।।	घालोनियां कूपीं कापियेले दोरा । साधियेलें वैरा आपुलिया
११७२	।।ना.गा.०१६९.००४।।	वरोनियां टाकी मोठासा पर्वत । म्हणती समस्त नामा म्हणे
११७३	।।ना.गा.०१७०.००१।।	तुझे भेटीविण । जाती सकळांचे प्राण
११७४	।।ना.गा.०१७०.००२।।	दया तुझिया मना । कां रे न ये नारायणा
११७५	।।ना.गा.०१७०.००३।।	बोलवेना आतां । कंठ शोषला अनंता
११७६	।।ना.गा.०१७०.००४।।	ऐसें पाहोनियां । नामा म्हणे आली दया
११७७	।।ना.गा.०१७१.००१।।	देतसे दर्शन । सकळांसी नारायण
११७८	।।ना.गा.०१७१.००२।।	झाला सकळां आनंद । हृदयीं धरिला गोविंद
११७९	।।ना.गा.०१७१.००३।।	टाकोनियां आम्हां । कां रे गेलासी पुरुषोत्तमा
११८०	।।ना.गा.०१७१.००४।।	तुम्हां जाला अभिमान । नामा म्हणे सांगे खूण
११८१	।।ना.गा.०१७२.००१।।	सकळांची इच्छा करीतसे पूर्ण । भुलला श्रीकृष्ण त्यांच्या भावा
११८२	।।ना.गा.०१७२.००२।।	विमानी बैसोनी सुरवर पाहाती । गंधर्व गाताती सप्तस्वरें
११८३	।।ना.गा.०१७२.००३।।	विणे वाजताती मृदंगाचा घोष । वाचे तो उल्हास वर्णवेना
११८४	।।ना.गा.०१७२.००४।।	न जाय चन्द्रमा न जाये नक्षत्रे । पाहाती सर्वत्र रासक्रीडा
११८५	।।ना.गा.०१७२.००५।।	जलक्रीडा करी लक्षुमीचा पती । लाळ घोटताती देवस्त्रिया
११८६	।।ना.गा.०१७२.००६।।	धन्य त्या गोपिका धन्य त्यांचे पुण्य । भोगिताती कृष्ण पूर्णब्रह्म
११८७	।।ना.गा.०१७२.००७।।	नामा म्हणे होय कामाची ते पूर्ति । नव्हे वीर्यच्युती गोविंदाची
११८८	।।ना.गा.०१७३.००१।।	होतां प्रात:काळ सांगतसे तयां । जावें येथोनियां शीघ्र आतां
११८९	।।ना.गा.०१७३.००२।।	क्षणोक्षणीं पाहाती देवाजींचे मुख । येती सकळीक गोकुळांसी
११९०	।।ना.गा.०१७३.००३।।	परीक्षिती ऐके ऐशा कौतुकासी । होत्या त्याजपाशीं त्याच्या स्त्रिया
११९१	।।ना.गा.०१७३.००४।।	म्हणोनियां कोणी नाहीं विचारिलें । अंतरीं न कळे दुज्या आल्या
११९२	।।ना.गा.०१७३.००५।।	यथामति रास वर्णिला देवाचा । संपूर्ण हे वाचा काय करी
११९३	।।ना.गा.०१७३.००६।।	चरित्र श्रवण करील जो कोणी । धन्य तोचि प्राणी नामा म्हणे
११९४	।।ना.गा.०१७४.००१।।	सरस्वती तीरीं अंबिकेचें स्थान । गोकुळीचे जन जाती तेथें
११९५	।।ना.गा.०१७४.००२।।	करोनी पूजन करिती प्रार्थना। नंदाच्या नंदना सुखी राखी
११९६	।।ना.गा.०१७४.००३।।	सारितां भोजन लोपिला आदित्य । नामा म्हणे तेथे राहताती

११९७	।।ना.गा.०१७५.००१।।	निद्रिस्त सकळ तये वनीं व्याळ । गिळितसे बळें नंदालागीं
११९८	।।ना.गा.०१७५.००२।।	कृष्णा धांव वेगीं मज गिळी सर्प । काळावरी दर्प तुझा देवा
११९९	।।ना.गा.०१७५.००३।।	माझिया पाडसा येई रे धांवोनी । दावी रे वदन अंतकाळीं
१२००	।।ना.गा.०१७५.००४।।	आली काय तुज निद्रा रे कान्हया । माझिया तान्हया ऊठ वेगीं
१२०१	।।ना.गा.०१७५.००५।।	ऐकोनियां ऐसें उठती सकळ। घालिती मुसळ सर्पावरी
१२०२	।।ना.गा.०१७५.००६।।	श्रमले सकळ न सोडी नंदाला । पिटी वक्षस्थळा नंदपत्नी
१२०३	।।ना.गा.०१७५.००७।।	उठे जगद्गुरु काय झाले माय। लावितसे पाय तयालागीं
१२०४	।।ना.गा.०१७५.००८।।	टाकियेलें सर्पें तेव्हां कलेवर । पुरुष सुंदर निघतसे
१२०५	।।ना.गा.०१७५.००९।।	नामा म्हणे वाचे स्तवी विश्वंभरा । करूनि नमस्कारा जाता जाला
१२०६	।।ना.गा.०१७६.००१।।	करिती गायन रामकृष्ण हरी । गोकुळीच्या नारी जाती तेथें
१२०७	।।ना.गा.०१७६.००२।।	शंख नामा तेथें आलासे गुह्यक । नाहीं त्या विवेक पापियासी
१२०८	।।ना.गा.०१७६.००३।।	उपजला काम तयाचिया मना । घालोनि विमाना स्त्रिया नेत
१२०९	।।ना.गा.०१७६.००४।।	धांव धांव रामा नेतसे हा आम्हां। अगा मेघश्यामा कृष्णनाथा
१२१०	।।ना.गा.०१७६.००५।।	नेतो स्त्रिया काय न कळेचि देवा । यासी करूं द्यावा अपराध
१२११	।।ना.गा.०१७६.००६।।	हातीं वृक्ष दोघे ऐसे पाहोनियां । टाकोनि तो स्त्रिया पळतसे
१२१२	।।ना.गा.०१७६.००७।।	घालितांची वृक्ष प्राणासी मुकला । मणी त्याचा दिला बळीभद्रा
१२१३	।।ना.गा.०१७६.००८।।	भक्तांसाठी मारी दुष्टा जगजेठी । नामा म्हणे तुटी विसरेना
१२१४	।।ना.गा.०१७७.००१।।	गोपिकांचा मेळा आला गृहाप्रती । काय त्या म्हणती नंदालागी
१२१५	।।ना.गा.०१७७.००२।।	परब्रह्म साक्षात् क्षीरसागरवासी। त्या कैसा धाडसी वनामध्यें
१२१६	।।ना.गा.०१७७.००३।।	ब्रह्मा आणि इंद्र आले गोकुळासी । वर्णिती कृष्णाशीं तुम्ही देखा
१२१७	।।ना.गा.०१७७.००४।।	तेहतीस कोटी देव जयातें प्रार्थित । तयासी अरण्यांत रूतती कांटे
१२१८	।।ना.गा.०१७७.००५।।	दैत्यांचा हा भार जाहला पृथ्वीसी । वधाया कंसासी आला येथें
१२१९	।।ना.गा.०१७७.००६।।	त्याजसाठीं फार श्रमताती योगी । कैलासाचा जोगी ध्यान करी
१२२०	।।ना.गा.०१७७.००७।।	भ्रांती कां रे तुज पडे वेळोवेळां । पाहतोस डोळां चरित्र तें
१२२१	।।ना.गा.०१७७.००८।।	नामया सुकृत जाहालेंसे फार । म्हणोनी विचार नाठवेची
१२२२	।।ना.गा.०१७८.००१।।	वृषभाच्या रूपें आला रिठासूर । इंद्रादि सुरवर भीती जया

१२२३	।।ना.गा.०१७८.००२।।	बहु देतो त्रास गोकुळींच्या जनां । धांव धांव कृष्णा मारी याला
१२२४	।।ना.गा.०१७८.००३।।	जगजेठी तेव्हां धरितसे शिंगें । सारितसे मागें भुजाबळें
१२२५	।।ना.गा.०१७८.००४।।	पाडोनियां खालीं दिला पाय वर । मारिला असुर नामा म्हणे
१२२६	।।ना.गा.०१७९.००१।।	कंसाचिया घरा आला नारदमुनी । एकांतीं बैसोनी सांगतसे
१२२७	।।ना.गा.०१७९.००२।।	सातवा जो गर्भ जिराला म्हणती । झाला रोहिणिसी बळिराम
१२२८	।।ना.गा.०१७९.००३।।	आठवा जो पुत्र देवकीसी जाला । वसुदेवें नेला नंदाघरीं
१२२९	।।ना.गा.०१७९.००४।।	यशोदेची कन्या घेउनियां येत । गेली आकाशांत मारितां जे
१२३०	।।ना.गा.०१७९.००५।।	तुझिया मानसीं आशंका येईल । होते रक्षपाळ माझे तेथें
१२३१	।।ना.गा.०१७९.००६।।	ईश्वराची माव नकळे कोणाला । कळलें मजला त्यांच्या कृपें
१२३२	।।ना.गा.०१७९.००७।।	घेवोनियां शस्त्र उठला त्वरित । करितों मी घात वसुदेवाचा
१२३३	।।ना.गा.०१७९.००८।।	तयेवेळीं म्हणे ब्रह्मयाचा सुत । ऐक तुज मात सांगतों मी
१२३४	।।ना.गा.०१७९.००९।।	शत्रू वधी आधीं मग मारी यासी । आहे तुजपासीं कारागृहीं
१२३५	।।ना.गा.०१७९.०१०।।	सांगोनियां ऐसें शांतविलें त्यासी । गेला गोकुळासी नामा म्हणे
१२३६	।।ना.गा.०१८०.००१।।	गोकुळा येवोनी भेटे नंदादिकां । वैकुंठनायका सांगतसे
१२३७	।।ना.गा.०१८०.००२।।	कंसानें मांडिला अधर्म बहुत । मारावें त्वरित तयालागीं
१२३८	।।ना.गा.०१८०.००३।।	लावोनियां आग आपण विझविली । तेचि परी केली नारदानें
१२३९	।।ना.गा.०१८०.००४।।	सांगोनियां ऐसे विणा सांवरोन । निघाला तेथून नामा म्हणे
१२४०	।।ना.गा.०१८१.००१।।	कंसें पाठविला केशी । मारावया कृष्णासी
१२४१	।।ना.गा.०१८१.००२।।	बहु असे तो प्रतापी । आला अश्वाचिये रूपीं
१२४२	।।ना.गा.०१८१.००३।।	डसावया धाविन्नला । पायीं धरोनि झोकिला
१२४३	।।ना.गा.०१८१.००४।।	मुखीं देऊनियां हात । श्वास कोंडी जगन्नाथ
१२४४	।।ना.गा.०१८१.००५।।	नामा म्हणे पडलें प्रेत । हर्ष सुरवरां बहुत
१२४५	।।ना.गा.०१८२.००१।।	शेळ्या मेंढियांचा खेळ । आतां खेळूं रे सकळ
१२४६	।।ना.गा.०१८२.००२।।	कोणी मेंढ्या होती । कोणी चोर म्हणताती
१२४७	।।ना.गा.०१८२.००३।।	म्हणती रात्र जाली । आतां जावें वनमाळी
१२४८	।।ना.गा.०१८२.००४।।	कोणी श्वान होती । चोरा डसाया धांवती

१२४९	।।ना.गा.०१८२.००५।।	तेथें व्योमासुर येत । गोपाळांचा वेष धरीत
१२५०	।।ना.गा.०१८२.००६।।	करोनियां चोरी । नेऊन ठेवी पर्वत–दरी
१२५१	।।ना.गा.०१८२.००७।।	हें तो देवासी कळलें । नामा म्हणे संहारिलें
१२५२	।।ना.गा.०१८३.००१।।	कंस दुराचारी करोनि विचार । धाडिला अक्रुर गोकुळासी
१२५३	।।ना.गा.०१८३.००२।।	अक्रुरा आनंद जाला असे फार । पाहीन श्रीधर डोळे भरी
१२५४	।।ना.गा.०१८३.००३।।	आजि होईल माझ्या जन्माचें सार्थक । वैकुंठनायक पाहीन मी
१२५५	।।ना.गा.०१८३.००४।।	काग सव्य येती वाम जाती मृग । पाहीन श्रीरंग स्वामी माझा
१२५६	।।ना.गा.०१८३.००५।।	शुभ हे शकुन मार्गानें हे होताती । पाहीन भूपती त्रैलोक्याचा
१२५७	।।ना.गा.०१८३.००६।।	येथुनियां माझी सरली येरझार। कंसानें उपकार केला मोठा
१२५८	।।ना.गा.०१८३.००७।।	अजी माझे पितर उद्धरती सकळ । पाहीन घननीळ कृपासिंधु
१२५९	।।ना.गा.०१८३.००८।।	नामा म्हणे आला गोकुळा सन्निध । हृदयीं आनंद न समाये
१२६०	।।ना.गा.०१८४.००१।।	चौदाजणी ज्याच्या चरणातें पूजिती । त्याची घेईन माती आपुल्या शिरीं
१२६१	।।ना.गा.०१८४.००२।।	एकांतीं अर्चन करिती धूर्जटी । त्यासी बोलेन गोष्टी आवडीच्या
१२६२	।।ना.गा.०१८४.००३।।	सप्तऋषि ज्याचे वर्णिताती गुण । करितसे ध्यान ब्रह्मा त्याचें
१२६३	।।ना.गा.०१८४.००४।।	चारी वेद ज्याची वर्णितात कीर्ति । करिताती स्तुती साही जणें
१२६४	।।ना.गा.०१८४.००५।।	तेहतीस कोटि देव जयातें पूजिती । श्रुति वर्णिताती गुण ज्याचे
१२६५	।।ना.गा.०१८४.००६।।	लक्षुमीचा पति ध्याती सनकादिक । पाहीन श्रीमुख एक वेळां
१२६६	।।ना.गा.०१८४.००७।।	पृथ्वीचा हा भार करावया दूर । म्हणोनि अवतार घेतलासे
१२६७	।।ना.गा.०१८४.००८।।	नामा म्हणे आला यमुनेजवळी । उतरला खालीं रथाचिया
१२६८	।।ना.गा.०१८५.००१।।	धन्य ही यमुना धन्य हें गोकुळ । वृक्षादि सकळ धन्य धन्य
१२६९	।।ना.गा.०१८५.००२।।	धन्य ह्या गोपिका धन्य हे गोपाळ । पक्षादि सकळ धन्य धन्य
१२७०	।।ना.गा.०१८५.००३।।	धन्य गोवर्धन धन्य वृंदावन । नंदाचा नंदन क्रीडतसे
१२७१	।।ना.गा.०१८५.००४।।	धन्य ती यशोदा धन्य तिचा पति । अखंड पाहाती मुख ज्यांचें
१२७२	।।ना.गा.०१८५.००५।।	गायी घेवोनियां देव गेला रानां । ध्वज वज्रांकुश चिन्हां उमटली
१२७३	।।ना.गा.०१८५.००६।।	नेत्रीं अश्रुपात उतरे रथाखालीं। गडबडा लोळे चरणावरी
१२७४	।।ना.गा.०१८५.००७।।	ब्रह्मादिकां दुर्लभ हे माती । घेवोनियां हांतीं मुखीं घाली

१२७५	।।ना.गा.०१८५.००८।।	नामा म्हणे पुढें चालिला त्वरित। देखे गाडियांत परब्रह्म
१२७६	।।ना.गा.०१८६.००१।।	तनु हें आकाश चंद्रमा तें मुख । ऐसें निष्कलंक परीक्षिती
१२७७	।।ना.गा.०१८६.००२।।	पूर्णिमेचा चंद्र त्याहुनी अधिक। शोभत श्रीमुख कृष्णजींचें
१२७८	।।ना.गा.०१८६.००३।।	भोंवता हा शोभे नक्षत्रांचा मेळा । खेळत सांवळा जगद्गुरु
१२७९	।।ना.गा.०१८६.००४।।	वैजयंती माळा किरीट कुंडलें । अक्रुरें देखिले दोघेजण
१२८०	।।ना.गा.०१८६.००५।।	जोडोनियां हात घाली नमस्कार । वाहातसे नीर क्षणोक्षणीं
१२८१	।।ना.गा.०१८६.००६।।	नामा म्हणे त्वरें धांवे हृषिकेशी । धरीत पोटाशीं अक्रुरातें
१२८२	।।ना.गा.०१८७.००१।।	भेट देई मज म्हणे बळिराम । न वर्णवे प्रेम अक्रुराचें
१२८३	।।ना.गा.०१८७.००२।।	पेंद्यासी पुसती अवघे गडी तेव्हां । कोण रे हा बाबा आला येथें
१२८४	।।ना.गा.०१८७.००३।।	आपुल्या कान्होबाच्या पाया कां पडतो । काय हा मागतो सांग आम्हां
१२८५	।।ना.गा.०१८७.००४।।	अक्रुर बळिराम घरीं आले गोपाळ । नंदादि सकळ भेटविले
१२८६	।।ना.गा.०१८७.००५।।	मधुपर्कविधि करिती पूजन । म्हणे धन्य दिन आजिचा हा
१२८७	।।ना.गा.०१८७.००६।।	अक्रुरासह पंक्ति सारिलें भोजन । पुसे वर्तमान मग त्यासी
१२८८	।।ना.गा.०१८७.००७।।	भक्त माझें दैवत जगा दावी मात । कृपाळु बहुत नामा म्हणे
१२८९	।।ना.गा.०१८८.००१।।	प्रात:काळीं मात जाली गोकुळांत । जातो भगवंत मथुरेसी
१२९०	।।ना.गा.०१८८.००२।।	गौळणींचा मेळा मिळाला सकळ । पिटिती कपाळ आपुल्या हांते
१२९१	।।ना.गा.०१८८.००३।।	एकी त्या घालिती केसामध्यें माती । एक त्या लोळती भूमीवरी
१२९२	।।ना.गा.०१८८.००४।।	कोणी रथापुढें जाऊनी पडती । आक्रोशें रडती सकळिक
१२९३	।।ना.गा.०१८८.००५।।	आम्हां सोडूनियां तूं रे कैसा जाशी । तुजविण पीशीं आम्ही सर्व
१२९४	।।ना.गा.०१८८.००६।।	अक्रुरा आम्ही सर्व पसरितों पदर । नेऊं नको श्रीधर मथुरेसी
१२९५	।।ना.गा.०१८८.००७।।	अक्रुर नसे बाई असे क्रूर मोठा । नामीं निरंतर क्रिया वसे
१२९६	।।ना.गा.०१८८.००८।।	नामा म्हणे शोक न वर्णवे आतां । जाला तो हांकिता रथ त्वरें
१२९७	।।ना.गा.०१८९.००१।।	ब्रह्मनिष्ठ तेव्हां स्थिरावला चित्तीं । अक्रुराचे गळती दोन्ही नेत्र
१२९८	।।ना.गा.०१८९.००२।।	दहीं दूध तूपें भरिल्या कावडी । चालती तांतडी सकळिक
१२९९	।।ना.गा.०१८९.००३।।	चिंतेनें व्यापिलें अक्रुराचें मन । काय वर्तमान होईल नेणों
१३००	।।ना.गा.०१८९.००४।।	नरनारी शोक करिती सकळ । दुराचारी खळ कंस आहे

१३०१	।।ना.गा.०१८९.००५।।	मार्गीं स्नानालागीं उतरला अक्रुर । रथावरी किशोर नंदजीचे
१३०२	।।ना.गा.०१८९.००६।।	दावोनि कौतुक निरसी त्याचा धाक । सांगतसे शुक परीक्षिती
१३०३	।।ना.गा.०१८९.००७।।	जुंपूनिया घोडी चालिला सत्वर । लोपे दिनकर नामा म्हणे
१३०४	।।ना.गा.०१९०.००१।।	जोडोनियां करां विनवी विश्वंभरा । चलावें मंदिरा सकळिकीं
१३०५	।।ना.गा.०१९०.००२।।	आम्हांवरी कृपा करी कृष्णनाथा । ठेवितसे माथा पायांवरी
१३०६	।।ना.गा.०१९०.००३।।	मारूनिया कंस येईन तुझ्या घरां । आग्रह अक्रुरा करूं नको
१३०७	।।ना.गा.०१९०.००४।।	सकळ समुदाय मथुरेचें वनीं । सहित चक्रपाणि म्हणे नामा
१३०८	।।ना.गा.०१९१.००१।।	प्रात:काळीं गडी उठे कृष्णराम । पाहावया ग्राम चालियेले
१३०९	।।ना.गा.०१९१.००२।।	मागती रजका देईना तो वस्त्रें। वधी नख शस्त्रें पापियासी
१३१०	।।ना.गा.०१९१.००३।।	तीठाई वांकडी नीट केली तिसी । तिनें चंदनासी लावियेलें
१३११	।।ना.गा.०१९१.००४।।	जोडोनियां हात विनवी सुदामा । चला मेघ:श्यामा घरा माझ्या
१३१२	।।ना.गा.०१९१.००५।।	वस्त्रें देती तेव्हां मथुरेचे लोक । नरनारी मुख पाहाताती
१३१३	।।ना.गा.०१९१.००६।।	मोडितां धनुष्य येती रक्षपाळ । नामा म्हणे खळ वधियेले
१३१४	।।ना.गा.०१९२.००१।।	इच्छामात्रें मोडी ब्रह्मांडांच्या कोटी । चालिला जगजेठी कंसद्वारा
१३१५	।।ना.गा.०१९२.००२।।	मदोन्मत्त हत्ती देखोनियां हांसे । पितांबर गोसे खोवियेला
१३१६	।।ना.गा.०१९२.००३।।	सांवरोनियां हात केंसां देत गांठ । खोवितसे नीट वैजयंती
१३१७	।।ना.गा.०१९२.००४।।	खंब ढोकोनियां राहे पुढें उभा । सांवळी ही प्रभा अंगकांती
१३१८	।।ना.गा.०१९२.००५।।	पाहोनियां शुक जाला समाधिस्थ । ऋषि मुनी समस्त वेडावले
१३१९	।।ना.गा.०१९२.००६।।	तेव्हां धांवे हत्ती घाली अंगावरी । क्षणार्धेंची मारी गजालागीं
१३२०	।।ना.गा.०१९२.००७।।	उपडोनियां दांत घेतसे श्रीधर । जाहला उद्धार कुवलयाचा
१३२१	।।ना.गा.०१९२.००८।।	नामा म्हणे पुढें चालिला गोविंद । परीक्षिती सावध शुक बोले
१३२२	।।ना.गा.०१९३.००१।।	चौदा भुवनें वसे जयाचिये पोटीं । त्यासी आणी जेठी मारावया
१३२३	।।ना.गा.०१९३.००२।।	इंद्रादि सुरवर जयाचे किंकर । त्यासी आणि पामर झोंबीसाठीं
१३२४	।।ना.गा.०१९३.००३।।	अतुर्बळी तेव्हां दिसे नारायण । जळतसे मनें वैरियांचे
१३२५	।।ना.गा.०१९३.००४।।	कंसाचे अंगणीं उभा असे देव । जैसा ज्याचा भाव तैसा भासे
१३२६	।।ना.गा.०१९३.००५।।	कृष्णातें देखोनी वल्गना करिती । चोळितताती माती दंडालागीं

१३२७	।।ना.गा.०१९३.००६।।	बळिभद्रा खूण दावियेली तेव्हां । उशीर न लावावा माराया
१३२८	।।ना.गा.०१९३.००७।।	नामा म्हणे एक उरला असे कंस । वधिती सकळांस दोघेजण
१३२९	।।ना.गा.०१९४.००१।।	रमेचा वल्लभ देखियेला कंसें । धरोनी आवेशें बैसलासे
१३३०	।।ना.गा.०१९४.००२।।	त्वरें धांवोनियां धरियेला केशीं। पाडिला भूमिसी दुष्टबुद्धि
१३३१	।।ना.गा.०१९४.००३।।	वज्रप्राय मुष्टी वोपी नारायण । सोडियेला प्राण कंसें तेव्हां
१३३२	।।ना.गा.०१९४.००४।।	देव वर्षताती सुमनांचे भार । भक्त जयजयकार गर्जताती
१३३३	।।ना.गा.०१९४.००५।।	गाऱ्हाणीं सांगती ऋषिमुनी सर्व । गाताती गंधर्व सप्तस्वरें
१३३४	।।ना.गा.०१९४.००६।।	नामा म्हणे पुढें अप्सरा नाचती । वर्णिताती कीर्ती वेद ज्याची
१३३५	।।ना.गा.०१९५.००१।।	राज्यीं स्थापियेला उग्रसेन तेव्हां । देवकीवसुदेवा सोडविलें
१३३६	।।ना.गा.०१९५.००२।।	देवकीच्या स्तनीं फुटलासे पान्हा । वसुदेव रूदना करितसे
१३३७	।।ना.गा.०१९५.००३।।	वसुदेवें केलें त्याचें समाधान । गायी दिल्या दान ब्राह्मणांसी
१३३८	।।ना.गा.०१९५.००४।।	समस्तांची क्रिया करी उग्रसेन । जालासे दिवाण देव त्याचा
१३३९	।।ना.गा.०१९५.००५।।	पळोनियां गेले होते जे यादव । आणियेले सर्व रामकृष्णें
१३४०	।।ना.गा.०१९५.००६।।	आनंद न समाये सकळिकां लोकांला । मथुरेंत राहिला नामा म्हणे
१३४१	।।ना.गा.०१९६.००१।।	नंदालागीं तेव्हां म्हणे चक्रपाणि । जावें सकळांनीं गोकुळासी
१३४२	।।ना.गा.०१९६.००२।।	अहर्निशीं माझें करावें चिंतना । दु:ख सांडी मना नंदराया
१३४३	।।ना.गा.०१९६.००३।।	ऐसें ऐकोनियां निराश वचन । जाई माझा प्राण तुजविण
१३४४	।।ना.गा.०१९६.००४।।	गडी म्हणती देवा आम्हांसी टाकिलें । काय अमुचें सरलें पुण्य देवा
१३४५	।।ना.गा.०१९६.००५।।	कोणासवें आम्हीं खेळूं यमुनेंत । रक्षिल आम्हांते कोण आतां
१३४६	।।ना.गा.०१९६.००६।।	ब्रह्मादिक तुझ्या वंदिताती पायां । दिल्या आम्ही शिव्या क्षमा करीं
१३४७	।।ना.गा.०१९६.००७।।	यशोदेसी सांगा माझा नमस्कार । देईन सत्वर भेटी तुम्हां
१३४८	।।ना.गा.०१९६.००८।।	कंठ सद्गदित नेत्रीं अश्रुपात । निघती समस्त नामा म्हणे
१३४९	।।ना.गा.०१९७.००१।।	चारी वेदां ज्याचा नयेचि उमज । करितसे मुंज वसुदेव
१३५०	।।ना.गा.०१९७.००२।।	कर्दळीचे स्तंभे वाडे शृंगारिले । गर्गासी धाडिलें आणावया
१३५१	।।ना.गा.०१९७.००३।।	यशोदेसी पत्रिका लिहिल्या वसुदेवें । मुंजीसाठीं यावें कृष्णजीच्या
१३५२	।।ना.गा.०१९७.००४।।	मथुरेचे लोक आणिती आहेर । होतसे गजर वाजंत्र्यांचा

१३५३	।।ना.गा.०१९७.००५।।	उग्रसेनें तेव्हां फोडिलें भांडार । द्विजांसी अपार द्रव्य दिलें
१३५४	।।ना.गा.०१९७.००६।।	विष्णुदासनामा वांटितो सुपारी। जाले ब्रह्मचारी रामकृष्ण
१३५५	।।ना.गा.०१९८.००१।।	घालितसे पंथ तरावया जनां । गेले सांदीपना घरीं दोघे
१३५६	।।ना.गा.०१९८.००२।।	गुरुसेवा करिती वंदिती चरण । जाहली संपूर्ण विद्या तेव्हां
१३५७	।।ना.गा.०१९८.००३।।	जोडोनियां हात करिती प्रार्थना । मागावी दक्षिणा गुरुराया
१३५८	।।ना.गा.०१९८.००४।।	नामा म्हणे द्विज म्हणत स्त्रियेसी । असे जें मानसीं इच्छा तुज
१३५९	।।ना.गा.०१९९.००१।।	समुद्रांत पुत्र बुडाला रे माझा । पराक्रम तुझा ठावा असे
१३६०	।।ना.गा.०१९९.००२।।	अवश्य म्हणोनी तेथोनि निघाले। समुद्रांत आले रामकृष्ण
१३६१	।।ना.गा.०१९९.००३।।	करोनियां पूजा पुसे वर्तमान । देई रे आणून गुरुपुत्र
१३६२	।।ना.गा.०१९९.००४।।	पांचजन्य दैत्य बळें येथें राहे । बंधू तेथें पाहे कृष्णनाथा
१३६३	।।ना.गा.०१९९.००५।।	टाकोनियां उडी वधिलें तयासी । पाहे हृषिकेशी उदरांत
१३६४	।।ना.गा.०१९९.००६।।	नाहीं ऐसें कळों आलें विश्वंभरा । घेवोनी शरीरा आला वरी
१३६५	।।ना.गा.०१९९.००७।।	परीक्षिती काय न कळे तयाला । दावितसे लीला नामा म्हणे
१३६६	।।ना.गा.०२००.००१।।	यमाचिया नगरीं दोघेजण गेले । शंखातें स्फुरिलें कृष्णनाथें
१३६७	।।ना.गा.०२००.००२।।	ऐकोनियां नाद कांपतसे काळ । उठिले सकळ पाहावया
१३६८	।।ना.गा.०२००.००३।।	जोडोनियां हात आणी अधोक्षजा । करोनियां पूजा पुसतसे
१३६९	।।ना.गा.०२००.००४।।	सांदीपन पुत्र आहे तुजपाशीं । आणी रे तयासी शीघ्र आतां
१३७०	।।ना.गा.०२००.००५।।	तुमचा मी किंकर निरोप मज द्यावा। रामा वासुदेवा पुसतसे
१३७१	।।ना.गा.०२००.००६।।	घेवोनियां पुत्र तेथोनी चालिले। नामा म्हणे आले गुरुगृहीं
१३७२	।।ना.गा.०२०१.००१।।	काढीतसे दृष्टी सांदीपनपत्नी । न वर्णवे वाणी हर्ष तिचा
१३७३	।।ना.गा.०२०१.००२।।	असे कांही इच्छा मागावें आणिक । दिलें हें बाळक म्हणती दोघे
१३७४	।।ना.गा.०२०१.००३।।	अहर्निशीं तुम्हां असावें कल्याण । आले रामकृष्ण मथुरेसी
१३७५	।।ना.गा.०२०१.००४।।	कृतांतासी धाक नामा म्हणे ज्याचा । आहे मी तयाचा शरणांगत
१३७६	।।ना.गा.०२०२.००१।।	युगांबरोबरी जाताती घटिका । गोकुळींच्या लोकां तैसें जालें
१३७७	।।ना.गा.०२०२.००२।।	उदास दिसती वनें दाही दिशा । काय रे जगदीशा आम्हां केलें
१३७८	।।ना.गा.०२०२.००३।।	रोडावल्या गायी करिताती खंती । वत्स न करिती स्तनपान

१३७९	।।ना.गा.०२०२.००४।।	अन्नपाणी तेव्हां वर्जिती गौळणी । आतां चक्रपाणी कैचा आम्हां
१३८०	।।ना.गा.०२०२.००५।।	यमुनेचे तीरीं वृक्ष ते सुकले । पाषाण उलले तया दु:खें
१३८१	।।ना.गा.०२०२.००६।।	प्रात:काळी गडी अवघेचि बोलती । मारूनि श्रीपती गेला नाहीं
१३८२	।।ना.गा.०२०२.००७।।	जीवनाविण मत्स्य जैसे तळमळती । नामा म्हणे चित्तीं धन्य प्रेमा
१३८३	।।ना.गा.०२०३.००१।।	अंतर्यामीं जाणे सर्वांचा जो साक्षी । रडताती पक्षी मजसाठीं
१३८४	।।ना.गा.०२०३.००२।।	पाहूनियां प्रेमा भुलला गोविंद । रडतसे मंद मंद तेव्हां
१३८५	।।ना.गा.०२०३.००३।।	उच्चारितां नामें तरताती पापी । न विसरती गोपी कांहीं केल्या
१३८६	।।ना.गा.०२०३.००४।।	विश्वाचा जो आत्मा शोक तया नाहीं । भुललासे तोहि भक्तिप्रेमें
१३८७	।।ना.गा.०२०३.००५।।	चिंतेनें व्यापिला तेव्हां हृषिकेशी । पाठवूं कोणासी गोकुळांत
१३८८	।।ना.गा.०२०३.००६।।	तयेवेळीं पुढें देखिलें उद्धवा । बाहातसे तेव्हां तयालागीं
१३८९	।।ना.गा.०२०३.००७।।	नामा म्हणे आतां करील एकांत । सावधान चित्त अवधारा
१३९०	।।ना.गा.०२०४.००१।।	शुकादिक ज्याची वर्णिताती कीर्ति । तो ये काकुळती उद्धवासी
१३९१	।।ना.गा.०२०४.००२।।	दयेचा सागर बोले तये वेळां । मजलागीं गोकुळा तुवां जावें
१३९२	।।ना.गा.०२०४.००३।।	मजवरी त्यांनीं ठेवियेला प्राण । संसाराचें भान नाहीं कोणा
१३९३	।।ना.गा.०२०४.००४।।	यशोदा आणि नंद जालेती तटस्थ। गडी माझे समस्त पिसे जाले
१३९४	।।ना.गा.०२०४.००५।।	गाई मजविण न घेती तृण । बाळें स्तन पान विसरलीं
१३९५	।।ना.गा.०२०४.००६।।	चालतांना पंथ चुकती नारीनर । पक्षांनीं आहार सांडियेला
१३९६	।।ना.गा.०२०४.००७।।	शाहाणा चतुर आहेसी नेटका । बोधाव्या गोपिका ब्रह्मज्ञानें
१३९७	।।ना.गा.०२०४.००८।।	नामा म्हणे ठेवी चरणावरी माथा । जुंपूनियां रथा निघतसे
१३९८	।।ना.गा.०२०५.००१।।	सारथ्यासी सांगे हांकी हा रहंवर । पाहियेलें तीर यमुनेचें
१३९९	।।ना.गा.०२०५.००२।।	उभा राहोनियां पाहे चहुंकडे । बोलताती कोडें पक्षीराज
१४००	।।ना.गा.०२०५.००३।।	व्याघ्र आणि गायी एकत्र बैसती । कोकिळा बोलती कृष्ण कृष्ण
१४०१	।।ना.गा.०२०५.००४।।	सर्प आणि नकुल निस्तेज पडती । चिमण्या बोलती कृष्ण कृष्ण
१४०२	।।ना.गा.०२०५.००५।।	वियोगानें तेव्हां मयूरें रडती । शोकें बोलताती कृष्ण कृष्ण
१४०३	।।ना.गा.०२०५.००६।।	कृष्णाच्या कृपेनें कळलें उद्धवासी । धन्य धन्य त्यांसी म्हणे तेव्हां
१४०४	।।ना.गा.०२०५.००७।।	ब्रह्मज्ञान सांगो देवें पाठविला। तो रडूं लागला तये वेळीं

१४०५	।।ना.गा.०२०५.००८।।	नामा म्हणे आला नंदाचिया घरा । पुढील अवधारा निरूपण
१४०६	।।ना.गा.०२०६.००१।।	धांवोनियां नंदें धरिले चरण । घालूनि आसन बैसविला
१४०७	।।ना.गा.०२०६.००२।।	सुकुमार सांवळा राजीवलोचन। सुखी आहे कृष्ण मथुरेंत
१४०८	।।ना.गा.०२०६.००३।।	रोहिणीचा पुत्र सुखी आहे राम । स्मरे पुरुषोत्तम कधीं आम्हां
१४०९	।।ना.गा.०२०६.००४।।	गोकुळांत गौळी आहे एक नंद । आठवी गोविंद कधीं तरी
१४१०	।।ना.गा.०२०६.००५।।	काय माझें पुण्य उद्धवा सरलें । म्हणोनि टाकिलें कृष्णनाथें
१४११	।।ना.गा.०२०६.००६।।	परब्रह्म पूर्ण धाडी मी वनासी । म्हणोनि हृषिकेशी कोपलासे
१४१२	।।ना.गा.०२०६.००७।।	मेघ:श्याम मूर्ति सुकुमार सांवळे । न देखती डोळे आतां माझे
१४१३	।।ना.गा.०२०६.००८।।	उठा नंदा जेवा कोण म्हणे आतां । दु:ख माझ्या चित्ता फार वाटे
१४१४	।।ना.गा.०२०६.००९।।	सद्गदित कंठ आश्रुपात । पडे तो मूर्च्छित नामा म्हणे
१४१५	।।ना.गा.०२०७.००१।।	पाहियेलें जेव्हां यशोदेची भ्रांती । ऐक परीक्षिती प्रेम तिचें
१४१६	।।ना.गा.०२०७.००२।।	खोडी नको करूं म्हणे दटाविलें। म्हणोनि रुसलें तान्हें माझें
१४१७	।।ना.गा.०२०७.००३।।	नंदा लागीं म्हणे पाहूं कोठें कृष्णा । दाटलासे पान्हा स्तनीं माझ्या
१४१८	।।ना.गा.०२०७.००४।।	उद्धव चित्तांत करीतसे खेद । यशोदे सावध होई माते
१४१९	।।ना.गा.०२०७.००५।।	दुष्ट मी पापीण बांधी उखळासी । म्हणोनि रुसलासी देवराया
१४२०	।।ना.गा.०२०७.००६।।	माती खातां वेळे तुज म्यां मारिलें। म्हणोनि टाकिलें मजलागीं
१४२१	।।ना.गा.०२०७.००७।।	नामा म्हणे त्यांचें करी समाधान । सांगे ब्रह्मज्ञान दोघांजणां
१४२२	।।ना.गा.०२०८.००१।।	प्रात:काळीं उद्धव स्नानासी चालिला । मिळालासे मेळा गोपिकांचा
१४२३	।।ना.गा.०२०८.००२।।	परस्परें म्हणती कोण आतां आला । न्यावया नंदाला पाठविलें
१४२४	।।ना.गा.०२०८.००३।।	सकळांच्या प्राणा घेऊनियां येई । म्हणोनियां पाही धाडी यांसी
१४२५	।।ना.गा.०२०८.००४।।	धांवून उद्धवाचे धरिती चरण । आमुचें स्मरण करितसे
१४२६	।।ना.गा.०२०८.००५।।	स्वरूपहीन आम्ही सुंदर कंसदासी । म्हणोनि तुजसी पुसतसों
१४२७	।।ना.गा.०२०८.००६।।	भ्रमरासी स्त्रिया कुशब्दे ताडिती । आवडीनें बोलती नाना शब्द
१४२८	।।ना.गा.०२०८.००७।।	आम्हांसाठी तेथें जाऊनियां म्हण । एकदां चरण दावी सर्वां
१४२९	।।ना.गा.०२०८.००८।।	मेल्या त्या गोपिका त्यांची राख जाली । वाजवी मुरली तया ठायां
१४३०	।।ना.गा.०२०८.००९।।	नामा म्हणे त्यांसी सांगे ब्रह्मज्ञान । श्रीकृष्ण कृपेनें स्थिरावल्या

१४३१	।।ना.गा.०२०९.००१।।	समस्तांचे त्यानें केलें समाधान । सारिलें भोजन सकळिकीं
१४३२	।।ना.गा.०२०९.००२।।	यशोदा आणि नंद देती अलंकार । कृपा दीनावर असों द्यावी
१४३३	।।ना.गा.०२०९.००३।।	गोपाळ गौळिणी पुसत उद्धवा । मिळोनियां सर्व बोळविती
१४३४	।।ना.गा.०२०९.००४।।	पक्षी श्वापदांसी सांगत उद्धव । असों द्यावा भाव कृष्णापायीं
१४३५	।।ना.गा.०२०९.००५।।	आला मथुरेसी सांगे वर्तमान । नामा म्हणे धन्य श्रोते वक्ते
१४३६	।।ना.गा.०२१०.००१।।	अक्रुराच्या घरां आले रामकृष्ण । संतोषलें मन फार त्यांचें
१४३७	।।ना.गा.०२१०.००२।।	घालोनि आसन प्रक्षाळी चरण। म्हणे धन्य दिन आजिचा हा
१४३८	।।ना.गा.०२१०.००३।।	जोडोनियां हात घाली नमस्कार । जाहला उद्धार पूर्वजांचा
१४३९	।।ना.गा.०२१०.००४।।	हस्तिनापुरासी अक्रुरा त्वां जावें । सांगितलें देवें नामा म्हणे
१४४०	।।ना.गा.०२११.००१।।	अवश्य म्हणोनि चालिला अक्रुर । पाहियेलें पूर कौरवांचें
१४४१	।।ना.गा.०२११.००२।।	धृतराष्ट्रा सांगे विवेकाच्या गोष्टी । फार तुझ्या पोटीं दुष्टबुद्धि
१४४२	।।ना.गा.०२११.००३।।	बंधूचिया पुत्रा धरितोसी दूर । होसी लोभापार पुत्रावरी
१४४३	।।ना.गा.०२११.००४।।	धरितोसि द्वेष पंडुच्या पुत्रांचा । होशील नरकाचा अधिकारी
१४४४	।।ना.गा.०२११.००५।।	स्वर्गींचे पूर्वज हांसतील तुज । धरावा उमज येथोनियां
१४४५	।।ना.गा.०२११.००६।।	सांगोनियां ऐसें तेथोन उठला । कुंतीसी भेटला नामा म्हणे
१४४६	।।ना.गा.०२१२.००१।।	देवकी रोहिणी बळीराम वसुदेव । सखे सुखी सर्व आहेत कीं
१४४७	।।ना.गा.०२१२.००२।।	पाहोनियां तुज जालें समाधान । सुखी आहे कृष्ण मथुरेंत
१४४८	।।ना.गा.०२१२.००३।।	आमुची एक कुंती आहे हस्तिनापुरीं । स्मरतो अंतरीं किंवा नाहीं
१४४९	।।ना.गा.०२१२.००४।।	बहुतां दिवसां धाडिलें अक्रुर । म्हणोनि अंतरा सुख वाटे
१४५०	।।ना.गा.०२१२.००५।।	माझिया बाळासी फार देती दु:ख । नाहीं मज सुख क्षणभरी
१४५१	।।ना.गा.०२१२.००६।।	राजा पंडू आम्हां टाकुनियां गेला । रक्षींया बाळाला कोण आतां
१४५२	।।ना.गा.०२१२.००७।।	नामा म्हणे ऐसें सांगतसे कुंती । शिंपियेली क्षिती अश्रुपातें
१४५३	।।ना.गा.०२१३.००१।।	निरोप हा माझा सांगा रे कृष्णाला । भरंवसा मजला आहे तुझा
१४५४	।।ना.गा.०२१३.००२।।	अच्युता अनंता श्रीधरा वामना । अगा नारायणा शरण तुज
१४५५	।।ना.गा.०२१३.००३।।	जनार्दना हरी त्रिविक्रमा केशवा । अगा वासुदेवा शरण तुज
१४५६	।।ना.गा.०२१३.००४।।	गोविंदा माधवा हरी मेघ:शामा। अगा पुरुषोत्तमा शरण तुज

१४५७	।।ना.गा.०२१३.००५।।	चक्रपाणि अगा वैकुंठनायका । रक्षी या बालका दासा तुझ्या
१४५८	।।ना.गा.०२१३.००६।।	त्रिविधतापें माझी जळतसे काया । दावीं मज पायां एक वेळां
१४५९	।।ना.गा.०२१३.००७।।	विदूर अक्रुर करिती समाधान । करावें श्रवण नामा म्हणे
१४६०	।।ना.गा.०२१४.००१।।	परब्रह्म पूर्ण तुझा आहे सखा । मानिसी कां दु:खा जननीये
१४६१	।।ना.गा.०२१४.००२।।	इंद्राचा अवतार आहे हा अर्जुन । घेईल गे प्राण कौरवांचा
१४६२	।।ना.गा.०२१४.००३।।	करील गे युद्ध धरोनियां धीर । न देखे मी वीर त्रैलोक्यांत
१४६३	।।ना.गा.०२१४.००४।।	सांगुनियां ऐसें पुसोनि सर्वांसी । आला मथुरेसी नामा म्हणे
१४६४	।।ना.गा.०२१५.००१।।	कृष्णराम लीला सर्वे त्या गोपाळां । जन्मासी सांवळा कैसा आला
१४६५	।।ना.गा.०२१५.००२।।	विस्तार बोलाया बैस तूं अंतरा । करीं तूं पामरा कृपादान
१४६६	।।ना.गा.०२१५.००३।।	म्हणोनि विनवी पायां पैं निगुती । ऐकावें श्रीपती नामा म्हणे
१४६७	।।ना.गा.०२१६.००१।।	भूमि भार जाला चालली उदकांत । धरूनियां रूप गाईचें हो
१४६८	।।ना.गा.०२१६.००२।।	विधीपाशीं गेली रडूं ते लागली । समग्र वहिली कथा सांगे
१४६९	।।ना.गा.०२१६.००३।।	नको भिऊं म्हणोनि आश्वासिलें विधीनें । सवें तीस घेऊनी गेला ठायां
१४७०	।।ना.गा.०२१६.००४।।	नामा म्हणे तेंचि आधार सर्वांसी । रूप नाम त्यासी कांहीं नाहीं
१४७१	।।ना.गा.०२१७.००१।।	देव क्षीराब्धीसी आले हो सकळ । होवोनि निश्चळ मनामाजीं
१४७२	।।ना.गा.०२१७.००२।।	प्राणायाम मुद्रा लावुनि अंतरीं । इंद्रादि श्रीहरी चिंतूनियां
१४७३	।।ना.गा.०२१७.००३।।	विराट जें पाही संस्कृतें वर्णिलें । तेंचि चिंतियेलें नामा म्हणे
१४७४	।।ना.गा.०२१८.००१।।	अकस्मात तेथें उठली ते वाणी । नका भिऊं म्हणोनि मेघरूपा
१४७५	।।ना.गा.०२१८.००२।।	ऐकतांची कानीं हरुषल्या मनीं । देवाचियां श्रेणी नामा म्हणे
१४७६	।।ना.गा.०२१९.००१।।	गौळियाचे घरीं रहिवास गोकुळीं । तेथें तुम्ही सकळीं वास कीजे
१४७७	।।ना.गा.०२१९.००२।।	वसुदेव देवकी उदरीं जन्मेन । कंस भयें राहीन गोकुळीं हो
१४७८	।।ना.गा.०२१९.००३।।	तेथें आहे काज कळेल सकळां । आनंद सोहळा पुरवीन
१४७९	।।ना.गा.०२१९.००४।।	नामा म्हणे ऐसें देव बोलियेले । आपण ते गेले निजधामा
१४८०	।।ना.गा.०२२०.००१।।	तयेकाळीं देव गोकुळीं भरले । अगोचर जालें रूप ठायीं
१४८१	।।ना.गा.०२२०.००२।।	सकळ संपत्ति भरूनि उरल्या । दिगंतरीं गेल्या विपत्ति त्या
१४८२	।।ना.गा.०२२०.००३।।	नामदेवा तेव्हां आनंद जो जाला । गोकुळीं भरला पांडुरंग

१४८३	।।ना.गा.०२२१.००१।।	शेषशायी हरी उठोनि लवकरी । म्हणे सख्या धरी मनुष्यरूप
१४८४	।।ना.गा.०२२१.००२।।	तुजविण मज न गमे घटिका। म्हणोनि नेटके रूप धरी
१४८५	।।ना.गा.०२२१.००३।।	देवकी उदरीं जाऊन रिघावें । अंतरीं बसावें रोहिणीच्या
१४८६	।।ना.गा.०२२१.००४।।	तुझियेचें सेवें येतों मी माघारा । नामया दातारा कळों आलें
१४८७	।।ना.गा.०२२२.००१।।	देवकी कवण वसुदेव कवण । सांगावी हे खूण नातवळा
१४८८	।।ना.गा.०२२२.००२।।	ऐकोनि उत्तर देव मनीं पाही । बोलतो लवलाही चित्त देई
१४८९	।।ना.गा.०२२२.००३।।	सुतपाप्रती ते अनुष्ठानीं दोघे । करूनियां तपें वर मागे
१४९०	।।ना.गा.०२२२.००४।।	तया दिला वर पुत्र मी होईन । यालागीं कारण आहे तेथें
१४९१	।।ना.गा.०२२२.००५।।	तींचि दोघें जालीं वसुदेव देवकी । म्हणोनि यादवीं जन्म घेणें
१४९२	।।ना.गा.०२२२.००६।।	तयाचा वृत्तांत आतां कोठें आहे । सांगेन लवलाहे नामा म्हणे
१४९३	।।ना.गा.०२२३.००१।।	अवतरले हरी नंदाचे मंदिरीं । जाणोनियां सुरीं तोषिजेत
१४९४	।।ना.गा.०२२३.००२।।	आतां गेली सर्व आमुची ही चिंता । भूभार सर्वथा उतरील
१४९५	।।ना.गा.०२२३.००३।।	यज्ञ दान तप होतील अपार । आमुचा आहार आम्हालागीं
१४९६	।।ना.गा.०२२३.००४।।	दुष्ट दुराचारी मातले राक्षस । यांचा करील नाश क्षणामाजीं
१४९७	।।ना.गा.०२२३.००५।।	नीति न्याय धर्म वाढेल अपार । भाविकांसी पार उतरील
१४९८	।।ना.गा.०२२३.००६।।	नामा म्हणे ऐशा आनंदानें सूर । वर्षताती भार सुमनांचे
१४९९	।।ना.गा.०२२४.००१।।	बरवें बरवें बाळ कोडीसवाणे रे । यशोदा म्हणे दृष्टी होईल बारे
१५००	।।ना.गा.०२२४.००२।।	बरवी बरवी डोळस सांवळी। लोण उतरोनि हरीची पाऊलीं
१५०१	।।ना.गा.०२२४.००३।।	चंदन पाटोळा कांसे सोनसळा । विष्णुदास नामा चरणाजवळ
१५०२	।।ना.गा.०२२५.००१।।	डोलत डोलत टमकत चाले । गोजिरीं पाऊलें घालोनियां
१५०३	।।ना.गा.०२२५.००२।।	पायीं रुणझुण वाजताती वाळे । गोपी पाहतां डोळे मन निवे
१५०४	।।ना.गा.०२२५.००३।।	सांवळे सगुण मानसमोहन । गोपीमनरंजन म्हणे नामा
१५०५	।।ना.गा.०२२६.००१।।	कंसा हातीं विडा पाहे चहूंकडा । पूतना त्या पुढां काय बोले
१५०६	।।ना.गा.०२२६.००२।।	जाईन गोकुळा वधीन त्या बाळा । ऐसी त्या चांडाळा बोलतसे
१५०७	।।ना.गा.०२२६.००३।।	विष भरूनि स्तन निघाली पूतना। तीतें देखूनि कान्हा दूध मागे
१५०८	।।ना.गा.०२२६.००४।।	येऊनि द्वारीं थोकली तव यशोदे देखिली । कृष्णा आली माऊली राहें उगा

१५०९	।।ना.गा.०२२६.००५।।	तंव अधिकचि आळी करी वनमाळी । येरी म्हणे दे जवळी पाजीन दूध
१५१०	।।ना.गा.०२२६.००६।।	पुतने वोसंगा दिधलासे कान्हा । घटाघटा पयपाना करीतसे
१५११	।।ना.गा.०२२६.००७।।	शोषियेलें विख न धायेची भूक । नामया स्वामी न राखे प्राण तिचा
१५१२	।।ना.गा.०२२७.००१।।	वाढों लागे हरि नंदाचे मंदिरीं । नाना क्रीडा करी नित्य नवी
१५१३	।।ना.गा.०२२७.००२।।	देखोनियां चोज भुलल्या नरनारी । देहभावें वरी ओवाळिती
१५१४	।।ना.गा.०२२७.००३।।	साजिरें गोजिरें दिसे नेत्रालागीं । म्हणोनि वोसंगी सदा घेती
१५१५	।।ना.गा.०२२७.००४।।	नाचे उडे बोले मंजुळ बोबडें । तेणें वेदां पडे मौन सदा
१५१६	।।ना.गा.०२२७.००५।।	नित्य नवी लीला दाखवी अपार। मन तेथें स्थिर लावियेलें
१५१७	।।ना.गा.०२२७.००६।।	नामा म्हणे गोप त्यासंगे रातले । प्रेमानें मातले एकसरें
१५१८	।।ना.गा.०२२८.००१।।	एके काळीं मोठा आनंद दाटला । नभीं उगवला पूर्ण चंद्र
१५१९	।।ना.गा.०२२८.००२।।	तेव्हां गोप आले विनविती गोपाळा । आतां जाऊं चला चोरीलागीं
१५२०	।।ना.गा.०२२८.००३।।	कोठें काय असे तें आम्हां ठाऊकें । जाऊं एकमेकें मिळोनियां
१५२१	।।ना.गा.०२२८.००४।।	तुझिये संगतीं वाढतो आनंद । दाविसी विनोद ब्रह्मादिकां
१५२२	।।ना.गा.०२२८.००५।।	नामा म्हणे ऐसें गोपाळ बोलिले। ऐकोनियां जालें देवा गोड
१५२३	।।ना.गा.०२२९.००१।।	देव सांगे तुम्ही सामोग्री हे करा । सांगेन प्रकारा जाणोनियां
१५२४	।।ना.गा.०२२९.००२।।	तेणें सर्व काज साधेल तुमचें। ठेविलें ठायींचें नवें पडे
१५२५	।।ना.गा.०२२९.००३।।	घ्या रे आतां बरी मृत्तिका गाळूनी । सराटे वेंचूनि वोटीं भरा
१५२६	।।ना.गा.०२२९.००४।।	डांगा एक आणा वेंचुनियां खडे । निघावें रोकडें एकसरा
१५२७	।।ना.गा.०२२९.००५।।	नामा म्हणे ऐसें ऐकती गोपाळ । नाचती सकळ कृष्णापुढें
१५२८	।।ना.गा.०२३०.००१।।	जेथें नाहीं आकार, नाम, रूप गुण । बोलती निर्गुण तयालागीं
१५२९	।।ना.गा.०२३०.००२।।	तोचि गोकुळांत होऊनि गोपाळ । म्हणविती बाळ यशोदेचा
१५३०	।।ना.गा.०२३०.००३।।	चिन्मय चिद्रूप अक्षय अपार । परेहूनि पर म्हणती ज्यातें
१५३१	।।ना.गा.०२३०.००४।।	सर्वां भूतांचियां फुटकिया खोळे । भरले न गळे आत्मपणें
१५३२	।।ना.गा.०२३०.००५।।	अद्‌भुत आनंद मातला अपार । वेदासही पार नाहीं ज्याचा
१५३३	।।ना.गा.०२३०.००६।।	नामा म्हणे सर्व रूपीं जो रूपस । गोकुळीं विलास मांडियेला
१५३४	।।ना.गा.०२३१.००१।।	आई मज म्हणशील अवगुणांचें । तरी मी काय करितों कोणाचें । जें जें होणार जयाचें । तें कां मजवरी घालिसी

१५३५	।।ना.गा.०२३१.००२।।	भट आलासे महाबळ । तेणें वर्णिला जन्मकाळ । तो चुकला ग्रहमूळ । तेणें त्यांसी पीडीलें
१५३६	।।ना.गा.०२३१.००३।।	माये तीच मावशी। तिनें मज घेतलें वोसंगाशीं । तिचे अंगी होती विवशी । तिनें तिसी ग्रासिले
१५३७	।।ना.गा.०२३१.००४।।	दहीं भात रत्न ताटीं । कालवुनि दिधली माझे हातीं । जेवितां तेथें कागाची झपेटी । तो म्यां थापें मारियला
१५३८	।।ना.गा.०२३१.००५।।	कैसी पाठविली रिठागांठी । ती घातली माझे कंठीं । तेणें माझ्या गळां मिठी। मग म्यां दाढें रगडिली
१५३९	।।ना.गा.०२३१.००६।।	खेळत होतो यमुनेतटीं । बक लागला माझे पाठीं । मग मी धरूनि चंचु उपटीं। भूमीवरी त्राहाटिला
१५४०	।।ना.गा.०२३१.००७।।	आई म्यां तुझें काय केलें । त्वां मज उखळासी बांधिलें । रांगत रांगत अंगणीं आलों । तेणें वृक्ष उन्मळिले
१५४१	।।ना.गा.०२३१.००८।।	ऐसा नाटकी हृषिकेशी । परब्रह्म दावी यशोदेशी । विष्णुदास नामा अहर्निशीं । हृदय कमळीं पहातसे
१५४२	।।ना.गा.०२३२.००१।।	मोरपिसाचे कुंचे ढळताती अपार । येताती कुमर यशोदेचे
१५४३	।।ना.गा.०२३२.००२।।	शिंगें पावे मोहऱ्या वाजती कुसरी । हुंबरीं आखरीं गगन गर्जे
१५४४	।।ना.गा.०२३२.००३।।	मोतियांचे घोस चांदवे झळकती । कनक दंड ढाळिती रामकृष्णा
१५४५	।।ना.गा.०२३२.००४।।	गोरजें डौरला पितांबर भिजला । स्वेद जो दाटला मुख कमळीं
१५४६	।।ना.गा.०२३२.००५।।	रूळती वनमाळा कंठी गुंजाहार । तरू घोस अपार खोविले शिरीं
१५४७	।।ना.गा.०२३२.००६।।	गजगती पाऊलें ठेविती भूमिवरी । धन्य ते संसारीं डोल देती
१५४८	।।ना.गा.०२३२.००७।।	कुंकम केशर रंगलें रातोत्पल । ध्वज वज्रांकुश कमळ ऊर्ध्व रेखा
१५४९	।।ना.गा.०२३२.००८।।	विमानवत् आकाश जाहालें पैं सकळ । धन्य तें गोकुळ म्हणती देवा
१५५०	।।ना.गा.०२३२.००९।।	देव पुष्प–वृष्टी करिती कृष्णावरी । अंबर जयजयकारी गर्जतसे
१५५१	।।ना.गा.०२३२.०१०।।	माडिया गोपुरीं पाहती सुंदरी । यशोदेचे करी लिंबलोण
१५५२	।।ना.गा.०२३२.०११।।	ओंवाळिला नाम्या शिंप्याचा दातार । रखुमादेवीवरू श्रीविठ्ठल
१५५३	।।ना.गा.०२३३.००१।।	खांद्यावरी पांवा कस्तुरीचा टिळा । चालत गोपाळ गाई मागें
१५५४	।।ना.गा.०२३३.००२।।	यमुने पाबळी गोपा पाचारीत। शिदोऱ्या शोभत पाठीवरी
१५५५	।।ना.गा.०२३३.००३।।	अङ्तीपंक्ती करी त्या गोपाळांच्या । संगें गोविंद त्यांच्या अखंडित
१५५६	।।ना.गा.०२३३.००४।।	नामा म्हणे बोनें विटों देऊं नका । वैकुंठनायका सांभाळावें
१५५७	।।ना.गा.०२३४.००१।।	श्रीमुख सुंदर वाटोळें । कैसें निलोत्पल सांवळें
१५५८	।।ना.गा.०२३४.००२।।	पैल पेंदा गडी धाकुटा । होय घोंगडें खांदा मोठा
१५५९	।।ना.गा.०२३४.००३।।	थिरू वासुरें हाकारी । पुढें वाहती पावे मोहरी
१५६०	।।ना.गा.०२३४.००४।।	हातीं घेऊनियां वेताटी । कैसा लागे वासुरा पाठीं

१५६१	।।ना.गा.०२३४.००५।।	बाळगोपाळासहित मुरारी । खेळूं खेळे नानापरी
१५६२	।।ना.गा.०२३४.००६।।	विष्णुदास नामयाचा दातारु । ब्रह्मादिकां त्याचा न कळे पारु
१५६३	।।ना.गा.०२३५.००१।।	गोवळे म्हणती कां हो आम्हां भितो । ब्रह्माहि वंदितो पायधुळी
१५६४	।।ना.गा.०२३५.००२।।	गाई तृप्त करी कळंबाच्या तळीं । सोडिली शिदोरी दावितसे
१५६५	।।ना.गा.०२३५.००३।।	हमामा घालितां नव्हेती माघारे । नाहीं भीत पोरें येत संगें
१५६६	।।ना.गा.०२३५.००४।।	नामा म्हणे काय भिऊनि राहिले । निवांतचि ठेले ब्रह्मादिक
१५६७	।।ना.गा.०२३६.००१।।	हुंबरीच्या मिषें हुतुतु खेळती । गड्यांशीं श्रीपति सर्वकाळ
१५६८	।।ना.गा.०२३६.००२।।	कळंबाचे झाडाखाली कुंकुमाचे सडे । गोपाळा पवाडे दावितसे
१५६९	।।ना.गा.०२३६.००३।।	काय काय सोंग घेसी नानापरी । गोपिकांचे घरीं काम सारी
१५७०	।।ना.गा.०२३६.००४।।	नामा म्हणे ऐसी अगाध जे कीर्ति । भोळ्या भक्तांप्रति दावीतसे
१५७१	।।ना.गा.०२३७.००१।।	डोहामाजीं वास होता बहु दिवस । आतां कासावीस काय सांगूं
१५७२	।।ना.गा.०२३७.००२।।	विक्राळ होऊनि आला चक्रपाणि । कालिया निर्वाणीं ध्यान करी
१५७३	।।ना.गा.०२३७.००३।।	नको काढूं मज उदका बाहेरी । दंडवत करी कालिया तो
१५७४	।।ना.गा.०२३७.००४।।	नामा म्हणे ऐसा काढिला विखारी । कीर्ति वानूं तरी किती देवा
१५७५	।।ना.गा.०२३८.००१।।	ब्रह्मादिकां पाहतां ठक पडियेलें । पहा हो कैवल्य गौळिया जोडलें
१५७६	।।ना.गा.०२३८.००२।।	कोण्या ऋणें या केला नकळे । परब्रह्म आमुचें आहे सांवळें
१५७७	।।ना.गा.०२३८.००३।।	या गोकुळाचेनि पाडे पाहतां । सुख वैकुंठीं न दिसे सर्वथा
१५७८	।।ना.गा.०२३८.००४।।	ऐसा अभिनव आनंदु जाणतो । गोकुळीचें तृण तरू तरी होतो
१५७९	।।ना.गा.०२३८.००५।।	कामलोभ लावियेला येणें निवे । तेणें सुखें शुद्ध लागलीसे सवें
१५८०	।।ना.गा.०२३८.००६।।	नामयाचा स्वामी हृदयींचा विसांवा । आपुलें सर्वस्व देऊनियां जोडावा
१५८१	।।ना.गा.०२३९.००१।।	आकाश गडगडी विद्युल्लता तळपती । अनिवार मेघ सणसणां वरुषती
१५८२	।।ना.गा.०२३९.००२।।	राखियेलें येणें देवकीनंदनें । गोपाळ म्हणती आमुचें कान्हें
१५८३	।।ना.गा.०२३९.००३।।	गोवर्धनगिरी उचलोनी निज करीं । राखिलें यापरी नामा म्हणे
१५८४	।।ना.गा.०२४०.००१।।	जन्म गेले याचे राखतां गाई । याचिया बोला विश्वास काई
१५८५	।।ना.गा.०२४०.००२।।	गोधनें राखितो आपण पेंढारा। तुझ्यानी मिळती पाणियाचा थारा
१५८६	।।ना.गा.०२४०.००३।।	हातीं डांगा खांदीं कांबळा । तुझ्या गाई आम्ही राखों गोपाळा

१५८७	।।ना.गा.०२४०.००४।।	आठ कोटी नव बहात्री गाई । गोधनें वसलीं आपुले ठायीं
१५८८	।।ना.गा.०२४०.००५।।	धाली गोधनें बसली वाडां । संत पाहों आले तंव झोंपा उघडा
१५८९	।।ना.गा.०२४०.००६।।	गोधनें चरती बाराही रानें । माझें मन तुझें वासरूं तान्हें
१५९०	।।ना.गा.०२४०.००७।।	गोधनें चारितां कृष्ण सांगाती। विष्णुदास नामा देतसे वळती
१५९१	।।ना.गा.०२४१.००१।।	कृष्णातें चैतन्य गौळिया गोपाळा । जिवींचा जिव्हाळा कृष्ण एक
१५९२	।।ना.गा.०२४१.००२।।	न गमेचि तया कृष्ण संगाविणें । कृष्णचरणीं मन सर्वकाळ
१५९३	।।ना.गा.०२४१.००३।।	कृष्ण सुख जिवीं कोंदलें सर्वांसी । उभे कृष्णापाशीं मागेंपुढें
१५९४	।।ना.गा.०२४१.००४।।	नामा म्हणे कृष्ण भक्तांचे जीवन । कृष्णीं समाधान भक्तांलागीं
१५९५	।।ना.गा.०२४२.००१।।	आणा उचित उचितें । भाणा भात रायतें
१५९६	।।ना.गा.०२४२.००२।।	भात सारा भात सारा । हरिहरस्मरणीं
१५९७	।।ना.गा.०२४२.००३।।	गाई गोपाळापें हरी । आणा तरी शिदोऱ्या
१५९८	।।ना.गा.०२४२.००४।।	नामा म्हणे काल्या मिसें । श्रीनिवास स्मरावा
१५९९	।।ना.गा.०२४३.००१।।	गड्यांनो राजा कीं रे जाला । कृष्ण सिंहासनीं बैसला
१६००	।।ना.गा.०२४३.००२।।	पांवा मोहरी घोंगडी । आम्ही खेळू यमुने थडी । नाचूं पाउला देहुडी । कृष्ण आमुचा कीं रे गडी
१६०१	।।ना.गा.०२४३.००३।।	खेंळूं हुतूतू हुंबरी । धडक हाणो टिरीवरी । आतां चालिला दळभारी । आमचे यशोदेचा हरी
१६०२	।।ना.गा.०२४३.००४।।	कुस्ती खेळतां कासविसी । शेंबुड खरकटें नाकासी । कडे घेऊं सावकासी । आतां बहु भितों यासी
१६०३	।।ना.गा.०२४३.००५।।	आम्ही तुम्ही सर्वे जेऊं । गाई वळावया जाऊं । त्याचे मानेंत बुक्या देऊं । जवळी जावयास भिऊं
१६०४	।।ना.गा.०२४३.००६।।	नामा म्हणे चला जाऊं। हात जोडोनी उभे राहूं । पायां पडून मागून घेऊं । जनीं वनीं तोचि कृष्णजी ध्याऊं
१६०५	।।ना.गा.०२४४.००१।।	परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरीं । वाक्यावाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी
१६०६	।।ना.गा.०२४४.००२।।	म्हणती गौळणी हरीचीं पाऊलें धरा । रांगत रांगत येतो हरी हा राजमंदिरा
१६०७	।।ना.गा.०२४४.००३।।	लपत छपत येतो हरी हा राजभुवनीं । नंदासी टाकूनि आपण बैसे सिंहासनीं
१६०८	।।ना.गा.०२४४.००४।।	सांपडला देव्हारीं यासी बांधी दाव्यांनीं। शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी
१६०९	।।ना.गा.०२४४.००५।।	बहुतां कष्टें बहुतां पुण्यें जोडिलें देवा । अनंत पवाडे तुमची न कळती मावा
१६१०	।।ना.गा.०२४४.००६।।	नामा म्हणे केशवा अहो जी दातारा । जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरण सेवा
१६११	।।ना.गा.०२४५.००१।।	यशोदे घराकडे चल मला जेवूं घाल
१६१२	।।ना.गा.०२४५.००२।।	साध्या गव्हाची पोळी लाटीं । मला पुरणपोळी करून दे मोठी । नाहीं अडवीत गुळासाठीं । मला जेवूं घाल

१६१३	।।ना.गा.०२४५.००३।।	तूप लावून भाकर करीं । वांगे भाजून भरीत करीं । वर कांद्याची कोशिंबिरी । मला जेवूं घाल
१६१४	।।ना.गा.०२४५.००४।।	आई ग खडिसाखरेचे खडे । लवकर मला करून दे वडे। बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे । मला जेवूं घाल
१६१५	।।ना.गा.०२४५.००५।।	आई लहानच घे गे उंडा । लवकर भाजून दे मांडा । लांब गेल्या गाईच्या झुंडा । मला जेवूं घाल
१६१६	।।ना.गा.०२४५.००६।।	आई मी खाईन शिळघांटा । दह्याचा करून दे मठ्ठा । नाहीं माझ्या अंगीं ताठा । मला जेवूं घाल
१६१७	।।ना.गा.०२४५.००७।।	भाकर बरीच गोड जाली । भक्षुनी भूक हरपली । यशोदेनें कृपा केली । मला जेवूं घाल
१६१८	।।ना.गा.०२४५.००८।।	आई मी तुझा एकुलता एक । गाई राखितों नऊ लाख । गाई राखून झिजलीं नखं । मला जेवूं घाल
१६१९	।।ना.गा.०२४५.००९।।	नामा विनवी केशवासी । गाई राखितो वनासी। जाऊन सांगा यशोदेसी । मला जेऊं घाल
१६२०	।।ना.गा.०२४६.००१।।	तळवे तळहात टेकीत । डाव्या गुडघ्यानें रांगत । रंगणीं रंगनाथ । तो म्यां देखिला सये
१६२१	।।ना.गा.०२४६.००२।।	गवळण जसवंती पैं सांगे । आली कृष्णाचेनि मागें । येणें येणें हो श्रीरंगें । नवनीत माझें भक्षिलें
१६२२	।।ना.गा.०२४६.००३।।	एक्या हातीं लोण्याचा कवळु । मुख माखिलें अळुमाळु । चुंबन घेतां येतो परिमळु । नवनीताचा गे सये
१६२३	।।ना.गा.०२४६.००४।।	येणें माझें कवाड उघडिलें । पुढती शिंकें हो तोडिलें। दह्यादुधातें भक्षिलें । उलंडिलें ताकातें
१६२४	।।ना.गा.०२४६.००५।।	ऐसें जरी मी जाणते । यमुना पाणिया नवजातें । वोढुनि उखळी बांधितें । शिक्षा लावितें गोविंदा
१६२५	।।ना.गा.०२४६.००६।।	ऐसा पुराणप्रसिद्ध चोर । केशव नाम्याचा दातार । पंढरपुरीं उभा विटेवर । भक्त पुंडलिकासाठीं
१६२६	।।ना.गा.०२४७.००१।।	गेलिया वृंदावना तेथें देखिला कान्हा । सवंगडियामाजीं उभा ध्यान लागलें मना
१६२७	।।ना.गा.०२४७.००२।।	हरिनाम गोड जालें काय सांगो गे माय । गोपाळ बाहती पावे मन कोठें न राहे
१६२८	।।ना.गा.०२४७.००३।।	त्याचें श्रीमुख साजिरें वो कुंडलें चित्त चोरें । सांडुनी अमृतधनीं लुब्धलीं चकोरें
१६२९	।।ना.गा.०२४७.००४।।	सांडुनी धृवमंडळ आली नक्षत्रमाळा । कौस्तुभा तळवटीं वैजयंती शोभे गळां
१६३०	।।ना.गा.०२४७.००५।।	सांडुनी मेघराजु कटिसूत्रीं तळपे विजू । भुलला चतुराननु तया नव्हे उमजू
१६३१	।।ना.गा.०२४७.००६।।	सांडुनी लक्ष्मी निज गोपाळासी बोले गुज । अचोज हा चोजवेना ब्रह्मांदिकां सहज
१६३२	।।ना.गा.०२४७.००७।।	वांजट धीट मोठी ऐसी कवण असे खिळू । भेदली हरिचरणीं पायीं मुरडीव वाकीं सोज्वळू
१६३३	।।ना.गा.०२४७.००८।।	त्याचे पायींची नेपुरें वाजती वो गंभिरें । लुब्धलीया पक्षयाती धेनु पाचारी स्वरें
१६३४	।।ना.गा.०२४७.००९।।	आणिक एक नवल कैसें स्वर्गीं देव जाले पिसे । ब्रह्मादिक उच्छिष्टालागीं देखा जळीं जाले मासे
१६३५	।।ना.गा.०२४७.०१०।।	आणिक एक नवल परी करीं घेऊनि शिदोरी । सवंगड्या वांटितसे नामया स्वामी मुरारी
१६३६	।।ना.गा.०२४८.००१।।	हरिनाम गोड जालें काय सांगू गे माये । गोपाळ वाहताती वेणू आर्तें पाहे
१६३७	।।ना.गा.०२४८.००२।।	गेलें होतें वृंदावना तेथें भेटला कान्हा । गोपाळासी वेध माझा छंद लागला मना
१६३८	।।ना.गा.०२४८.००३।।	आणिक एक नवल चोज गोपाळांसी सांगे गुज । आजळ जळीं चोजवेना पाहतां नेत्र ते अंबुज

१६३९	।।ना.गा.०२४८.००४।।	आणि एक नवलपरि करीं धरिली सिदोरी । गोपाळांसी वाढीतसे नामयाचा स्वामी हरी
१६४०	।।ना.गा.०२४९.००१।।	जाऊं पाण्या निसुरवाण्या । आळविती गोंड राण्या
१६४१	।।ना.गा.०२४९.००२।।	गोविंद गीतीं गाऊं गोविंद गीतीं गाऊं । आनंदें जाऊं पाण्या
१६४२	।।ना.गा.०२४९.००३।।	खाऊं कंदमुळें आम्ही असों वनीं । न देखों श्रीकृष्ण न ऐकों कानीं
१६४३	।।ना.गा.०२४९.००४।।	आम्ही गोंड भिल्लिणी काय ऐसी गोडी । तुझिया नामाची लागली आवडी
१६४४	।।ना.गा.०२४९.००५।।	आजीचा दिवस आम्हां जालासे आनंदु । विष्णुदास नामा यानें लावियेला छंदु
१६४५	।।ना.गा.०२५०.००१।।	येत येत उभा राजबिदीं । सवें चाले गोपाळांची मांदी । नारी पाहती उभया बिदीं । एकीच्या धरूनी बाहू वा खांदीं
१६४६	।।ना.गा.०२५०.००२।।	हरीहर वंदना सादृश्य लोचना । डोळ्यां वेगळा नवजासी कान्हा । अरे कान्हा मनमोहना । गोपी भुलल्या तुजिया गुणां
१६४७	।।ना.गा.०२५०.००३।।	चतुरवेद नागवी भाट सांगते । उभया वर्णितां रामकृष्णातें । श्रुतिस्मृति विद्यावंतें । जय जय म्हणती कृपानिधीतें
१६४८	।।ना.गा.०२५०.००४।।	येत येत उभा रहात । सुदाम्याच्या खांद्यावरी ठेवुनि हात । समदृष्टी गोपिका न्याहाळीत । चैतन्य चोरूनि आनंदें डुल्लत
१६४९	।।ना.गा.०२५०.००५।।	ऐसा गे माये सौभाग्यसुंदरु । नंदरायाचा कुमरु । विष्णुदास नामयाचा दातारु । भक्तिभावें वोळंगा शारंगधरु
१६५०	।।ना.गा.०२५१.००१।।	जाये जाये जाये परतोनि पाहे । लाचावले जीव पर न लगे माये
१६५१	।।ना.गा.०२५१.००२।।	नावेक विठ्ठल पाहूं या सांजणी । न पुरे गे धनी डोळियांची
१६५२	।।ना.गा.०२५१.००३।।	देखिला गे माय लावण्यसागर । नामया दातार केशिराज
१६५३	।।ना.गा.०२५२.००१।।	मल्हार मढ़ूडें गगनीं दाटलें । विजु खळें गर्जिन्नलें गे माय
१६५४	।।ना.गा.०२५२.००२।।	गोविंद पाहाया लौकरी । कैसे वरुषताहे मधुधारी
१६५५	।।ना.गा.०२५२.००३।।	आनंदें मयूरें नाचती आपैसे । प्रेमें नीळकंठ जाले कैसें
१६५६	।।ना.गा.०२५२.००४।।	नामया स्वामी दृष्टी सोज्वळ । जीव लागला गोपाळ गे माय
१६५७	।।ना.गा.०२५३.००१।।	ध्यान सांवळें गोकुळीचें । धांव पाव वेगीं हरी सांवळियां
१६५८	।।ना.गा.०२५३.००२।।	सांवळिसी अंगी उटी । सांवळी कस्तुरी लल्लाटीं। सांवळीसी कांसे कसियला कटि । गोंवळिया
१६५९	।।ना.गा.०२५३.००३।।	सांवळीसी तनु बरवी । सांवळें वृंदावन मिरवी । सांवळ्याशा तुळसी कानीं । मंजुरिया कोंवळिया
१६६०	।।ना.गा.०२५३.००४।।	सांवळीशी कंठीं माळा । सांवळें हृदयीं पदक विशाळा । सांवळ्याशा गोपी केल्या ओंवळ्या गोंवळिया
१६६१	।।ना.गा.०२५३.००५।।	सांवळीसी हातीं काठी । सांवळासा कांबळा पाठीं । नामयाचा स्वामी गाई राखी । धवळ्या आणि पिवळ्या
१६६२	।।ना.गा.०२५४.००१।।	कोकिळेची कळा रत्नाची ते कीळा । माणकीं सोज्वळा वर्णु हरीचा
१६६३	।।ना.गा.०२५४.००२।।	वृंदावनीं वेणु वाजे रुणुझुणु । वेध तनूमनू गोपाळांचा
१६६४	।।ना.गा.०२५४.००३।।	देहूडा पाऊलीं हरि गोपाळा गोजिरीं । वाहाती ते लालोरी हरी छंदें

१६६५	।।ना.गा.०२५४.००४।।	वेधलीं वनचरें गोधनें अपारें। पक्षीकुळें साचारें तल्लिन जालीं
१६६६	।।ना.गा.०२५४.००५।।	यमुनेचें उदक जळचरें सम्यक । पाताळीं पन्नग ऐकों ठेलीं
१६६७	।।ना.गा.०२५४.००६।।	ऐसें कृष्णवेधें तल्लिन जाले बोधें । नामा म्हणे वेणूछंदें स्थिर जालीं
१६६८	।।ना.गा.०२५५.००१।।	ध्यानीं ध्यातां मनीं हाचि येऊनी बैसे । गीतीं गातां वसे हृदयकमळीं
१६६९	।।ना.गा.०२५५.००२।।	बाहेरी भीतरीं वेधिलें वो येणें । रुक्मिणीरमणें पांडुरंगें
१६७०	।।ना.गा.०२५५.००३।।	याविण दुसरें मज कांहींच नाठवे । लागलीसे सवें गोपाळाची
१६७१	।।ना.गा.०२५५.००४।।	भोगितां या जीवा कांहींच नाठवे । लागलीसे सवें गोपाळाची
१६७२	।।ना.गा.०२५५.००५।।	ऐसा अखंड विदेही लौकिकाविरहित । नामा जीवन्मुक्त होउनी ठेला
१६७३	।।ना.गा.०२५६.००१।।	रात्र काळी घागर काळी । यमुनाजळेंही काळीं वो माय
१६७४	।।ना.गा.०२५६.००२।।	बुंथ काळी बिलवर काळी । गळां मोतीं एकावळी काळी वो माय
१६७५	।।ना.गा.०२५६.००३।।	मी काळी कांचोळी काळी । कांस कांसिली ते काळी वो माय
१६७६	।।ना.गा.०२५६.००४।।	एकली पाणीया नवजाय साजणी। सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय
१६७७	।।ना.गा.०२५६.००५।।	विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी । कृष्णमूर्ति बहु काळी वो माय
१६७८	।।ना.गा.०२५७.००१।।	यशोदेचा बाळ अलगट । रूपें राजस बरवया बरवंट
१६७९	।।ना.गा.०२५७.००२।।	वेधीं लावूनि वेधिलें येणें मानस । आड घालूनियां आपुला प्रकाश
१६८०	।।ना.गा.०२५७.००३।।	आपणासींच खेळे विनोदें । विश्व निववी तेणें सुखें निजबोधें
१६८१	।।ना.गा.०२५७.००४।।	दृष्टी याची पावे देखणीया । आड रिघोनि तेज सांवळें भरिलें डोळियां
१६८२	।।ना.गा.०२५७.००५।।	मन मुरोनि आर्त पुरविलें । रूप दावूनि चित्त भुलविले
१६८३	।।ना.गा.०२५७.००६।।	नामया स्वामी आसनीं शयनीं । दुरी नवजे डोळ्यांपासोनी
१६८४	।।ना.गा.०२५८.००१।।	दुःखाची निवृत्ती सुखाचें तें सुख । पाहतां श्रीमुख गोविंदाचें
१६८५	।।ना.गा.०२५८.००२।।	रंगणीं रांगत गुलगुल बोलत । असुर रूळत चरणतळीं
१६८६	।।ना.गा.०२५८.००३।।	नामा म्हणे हातीं लोणियाचा उंडा । गौळणी त्या तोंडा भुललिया
१६८७	।।ना.गा.०२५९.००१।।	चंद्रबिंबासरी देखो जरी मुखा । कोटी चंद्रप्रभा देखा कृष्णमूर्ति
१६८८	।।ना.गा.०२५९.००२।।	धवळलें चांदणें रांगतां रंगणीं । धन्य वो गौळणी सुखी तुम्हीं
१६८९	।।ना.गा.०२५९.००३।।	कानींचीं कुंडलें गुरुशुक्र बिंबले । शिरीं ते शोभलें पिंपळपान
१६९०	।।ना.गा.०२५९.००४।।	कंठी वाघनखें साजिरी ते सरी। कटीकडदोरा वरी राजसासी

१६९१	।।ना.गा.०२५९.००५।।	सुकुमार दोंदिलें किंकिणी कटीतटीं। चरणीं नाद उठी नेपुरांचा
१६९२	।।ना.गा.०२५९.००६।।	श्रुतिसमागमें नाद ऐके कानीं । संतोषोनि मनीं डुले हरी
१६९३	।।ना.गा.०२५९.००७।।	देखोनियां माते होय समाधान । उतरी निंबलोण मुखावरूनि
१६९४	।।ना.गा.०२५९.००८।।	सच्चिदानंदघन तान्हुलें आपण । विष्णुदास नामयानें वोवाळिलें
१६९५	।।ना.गा.०२६०.००१।।	घागरिया छंदें चरण घवघवी । अरुणा दाखवी चरणतळीं
१६९६	।।ना.गा.०२६०.००२।।	अरुता येई कान्हा देई आलिंगन। उतरी निंबलोण मुखावरूनि
१६९७	।।ना.गा.०२६०.००३।।	वाघनखें कडदोरा कंठी घालुनि सरी । झणीं तुज मुरारी दृष्टी लागो
१६९८	।।ना.गा.०२६०.००४।।	अंबुलें लोळिया कंठी रिठे गांठीं। छंदें जगजेठी हालवी मान
१६९९	।।ना.गा.०२६०.००५।।	भाळीं चंदन वरी मसीचा टिळकला। झणीं तुज गोपाळा दृष्टी लागे
१७००	।।ना.गा.०२६०.००६।।	नामयाचा स्वामी हरी माझे चित्त । सर्व छंदें गीत गाऊं नाचूं
१७०१	।।ना.गा.०२६१.००१।।	कृष्ण डोलतु रांगतु रंगणीं । इडापीडा धांवोनि घेती गौळणी
१७०२	।।ना.गा.०२६१.००२।।	जीवापरीस हें वाल्हें बालक। शिणलिया विसांवा त्याचें श्रीमुख
१७०३	।।ना.गा.०२६१.००३।।	सर्व सुख याचेनी मनोहरें । तेंचि खेळवितां धणी न पुरे
१७०४	।।ना.गा.०२६१.००४।।	देह गेह नाठवे सर्वथा । सुतपतीची मावळली वार्ता
१७०५	।।ना.गा.०२६१.००५।।	सुख न सांगवे वैखरी कोंदली । रूपीं रमतां मनें बुडी दिधली
१७०६	।।ना.गा.०२६१.००६।।	नामया स्वामी सुखाचा सागरू । कृष्ण खेळवितां सुफळ हा संसारू
१७०७	।।ना.गा.०२६२.००१।।	चाल सखिये वेगु करीं वहिला । दिन सरला काळ थोडा उरला
१७०८	।।ना.गा.०२६२.००२।।	आवडी घेऊं गे हरिसुख धनींचे । आर्त पुरोनी जें उरलेंसे मनीचें
१७०९	।।ना.गा.०२६२.००३।।	कृष्णमुख पाहे दृष्टी भरोनी । चित्त सांडी कुरवंडी करोनी
१७१०	।।ना.गा.०२६२.००४।।	झणीं विसरसी हे खूण निरुती । मग अंतरलें सर्वसुख पुढती
१७११	।।ना.गा.०२६२.००५।।	हाचि निर्धार करूनियां मानसीं । आंत बाहेरी हरिरूप देखसी
१७१२	।।ना.गा.०२६२.००६।।	नामया स्वामी राजीवलोचनु । रमारमणु तों जीवींचा जीवनु
१७१३	।।ना.गा.०२६३.००१।।	हातीं घेऊनियां काठी । शिकविते श्रीपती । यमुनेची माती । खासी कां कां कां कां
१७१४	।।ना.गा.०२६३.००२।।	हरी तूं खोडी नको करूं। माझ्या बा बा बा बा
१७१५	।।ना.गा.०२६३.००३।।	धांऊनियां धरिला करीं । बैसविला मांडीवरी । मुख पसरोनि करी । आ आ आ आ
१७१६	।।ना.गा.०२६३.००४।।	विष्णुदास नामा म्हणे । मरोनियां जन्मा येणें । कृष्ण सनातन पाहूं । या या या या

१७१७	।।ना.गा.०२६४.००१।।	गौळणी ठकविल्या । गौळणी ठकविल्या । एक एक संगतीनें । मराठी कानडीया ।एक मुसलमानी। कोंकणी गुजरणी । अशा पांचींजणी गौळणी ठकविल्या
१७१८	।।ना.गा.०२६४.००२।।	गौळणी सुंदरी । गौळणी सुंदरी । गेल्या यमुनेतीरीं । वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी । गोविंदानें वस्त्रें । नेली कळंबावरी । स्नान करोनियां । त्या आल्या बाहेरी
१७१९	।।ना.गा.०२६४.००३।।	लडोबा गोविंदा । लडोबा गोविंदा । निरवाणी आज । आडचाल्लो पडचाल्लो ।शिर फोड्या न कोडो । मारी कन्हय्या । पानी खेळ्या न खेळो
१७२०	।।ना.गा.०२६४.००४।।	देख रे कन्हय्या देख रे कन्हय्या । मैं इज्यतकी बडी । कदम पकडूंगी । मैयां कूटोजुडी । मेरी चुनरी दे । मेरी ले दुल्लडी
१७२१	।।ना.गा.०२६४.००५।।	देवकी नंदना । देवकी नंदना । तूं एक श्रीपती । उघडी हिंवाची । तुज विनवुं किती । पायां पडत्यें बा । मी येत्यें काकुळती । माझी साडी दे । घे नाकाचें मोतीं
१७२२	।।ना.गा.०२६४.००६।।	पावगा दातारा । पावगा दातारा । तूं नंदाचा झिलो । माकां फडको दी । मी हिवान मेलों। घे माझो कोयतो । देवा पायां पडलों
१७२३	।।ना.गा.०२६४.००७।।	ज्योरे माधवजी । ज्योरे माधवजी । में शरण थई । तनका काकैपी। बाप दयाळू तूंही । मारी साडी अपो । हातणी ले कंकणी
१७२४	।।ना.गा.०२६४.००८।।	इतुकें ऐकोनी । इतुकें ऐकोनी । देव बोले हांसोनी । सूर्या दंडवत करा कर जोडोनी । नामा विनविती । म्हणे शारंगपाणी । गौळ्या ऐक तूं । धन्य तुझी करणी
१७२५	।।ना.गा.०२६५.००१।।	लांचावलें ब्रह्म भक्तीचेनि सुखें । तें गोकुळीं गोपाळवेषें गाई राखे
१७२६	।।ना.गा.०२६५.००२।।	त्रिभुवनीं न समाये ब्रह्मादिकीं लक्षा नये। तें दास्यत्व करिताहे गौळीयांचे
१७२७	।।ना.गा.०२६५.००३।।	नवलाव गे माये देखियला । तें सुख काय सांगों तुला
१७२८	।।ना.गा.०२६५.००४।।	कैसें गोवळेपणाची बुंथी घेऊनियां साजिरी । परब्रह्म जालेंसे पिसें गे माये
१७२९	।।ना.गा.०२६५.००५।।	निगमा निर्धारितां अमरा दर्शनाची आस । मुनिजनां ध्यानीं आभास तोही नाहीं
१७३०	।।ना.गा.०२६५.००६।।	तें हें नित्य पूर्ण खेळविती गौळणी । चुंबन देउनी हृदयीं आलिंगिती
१७३१	।।ना.गा.०२६५.००७।।	क्षीरसागरीचें सुख सांडुनी अशेष। लक्ष्मुमी सेजेचे विलास तेहि नावडती
१७३२	।।ना.गा.०२६५.००८।।	तें हें गोधना गोठणीं लोळे शुद्ध चैतन्य सांवळें । तें सुखही न कळे साचें चतुरानना
१७३३	।।ना.गा.०२६५.००९।।	भक्ती प्रेम भाव देखे आहे जेथें । हरी ओरसला जाये तेथें कैचें नश्वरत्व
१७३४	।।ना.गा.०२६५.०१०।।	न विचारी जातिकूळ शुची अथवा चांडाळ। हृदय देखुनी निर्मळ प्रीति धरी तेथें
१७३५	।।ना.गा.०२६५.०११।।	ऐसें त्रिभुवन सुखाचें सार का अनाथाचें माहेर । अव्यक्त परि साकार जालें असें तें
१७३६	।।ना.गा.०२६५.०१२।।	भक्ताचेनि वियोगें श्रमलें म्हणोनि गोकुळासी आलें । तेणें प्रेम सुख दिधलें नामयासी

१७३७	।।ना.गा.०२६६.००१।।	बाळ सगुण गुणाचें तान्हें गे । बाळ दिसतें गोजिरवाणें गे । काय सांगतां गाऱ्हाणें गे । गोकुळींच्या नारी
१७३८	।।ना.गा.०२६६.००२।।	श्रीरंग माझा वेडा गे । याला नाहीं दुसरा जोडा गे । तुम्ही याची संगत सोडा गे । गोकुळींच्या नारी
१७३९	।।ना.गा.०२६६.००३।।	पांच वर्षांचें माझें बाळ गे । अंगणीं माझ्या खेळे गे । कां लटकाच घेतां आळ गे । गोकुळींच्या नारी
१७४०	।।ना.गा.०२६६.००४।।	सांवळा गे चिमणा माझा घे । गवळणींत खेळे राजा गे । तुम्ही मोठ्या ढालगजा गे । गोकुळींच्या नारी
१७४१	।।ना.गा.०२६६.००५।।	तुम्ही खाऊन लोण्याचा गोळा गे । आळ घेतां या गोपाळा गे । तुम्ही ठाईंच्या वोढाळा गे । गोकुळींच्या नारी
१७४२	।।ना.गा.०२६६.००६।।	तुम्ही लपवुनी याची गोटी गे । लागतां याचे पाठी गे । ही एवढीच रीत खोटी गे । गोकुळींच्या नारी
१७४३	।।ना.गा.०२६६.००७।।	तुम्ही लपवुनी याचा भंवरा गे । आळ घेतां शारंगधरा गे । तुम्ही बारा घरच्या बारा गे । गोकुळींच्या नारी
१७४४	।।ना.गा.०२६६.००८।।	हा ब्रह्मविधीचा जनिता गे । तुम्हीं याला धरूं पाहतां गे । हा कैसा येईल हातां गे । गोकुळींच्या नारी
१७४५	।।ना.गा.०२६६.००९।।	नामा म्हणे यशोदेसी गे । हा तुझा हृषिकेशी गे । किती छळितो आम्हांसी गे । गोकुळींच्या नारी
१७४६	।।ना.गा.०२६७.००१।।	वारी वो दशवंती आपुला तूं बाळ । विकटू हा खेळ खेळतसे
१७४७	।।ना.गा.०२६७.००२।।	धाकुटिया मुलां घेतो हा चिमोरे । काय करूं धुरे भीत असों
१७४८	।।ना.गा.०२६७.००३।।	घरींचा म्हातारा हाणितला येणें । काय सांगूं उणें तुजपाशीं
१७४९	।।ना.गा.०२६७.००४।।	मी वो लटिकी तरी नामयासी पुसा । तुझा बाळू कैसा आसंदत
१७५०	।।ना.गा.०२६८.००१।।	कान्हा तूं आजि कां जालासि बेभान
१७५१	।।ना.गा.०२६८.००२।।	तूं तो आमुचा गडी । म्हणोनि मी केली खोडी । घालूं हुंबर यमुनेची मोडूं मान
१७५२	।।ना.गा.०२६८.००३।।	होसी तूं आमुचा बळी । म्हणोनि म्यां केली कळी । तेथें कशाचा काय गुमान
१७५३	।।ना.गा.०२६८.००४।।	जरी तूं होसी सखा । होऊं दे जाला वाखा । चल रूपवती घरीं घेऊं मान
१७५४	।।ना.गा.०२६८.००५।।	समजूनियां देव । येक नामा नामदेव । जाले तें हरपलें । या द्वैत भान
१७५५	।।ना.गा.०२६९.००१।।	हरी तुझी ऐसी कैसी ही खोड
१७५६	।।ना.गा.०२६९.००२।।	घेउनी चिमुटे मुळसी पळसी । गोपी तुज म्हणती हा दोड
१७५७	।।ना.गा.०२६९.००३।।	सोडुनी वासरें गाईसी पाजिसी । यांत तुज काय मिळती जोड
१७५८	।।ना.गा.०२६९.००४।।	आडवा होऊनी गोपीसी धरिसी । चुंबितां वदन म्हणती मज सोड
१७५९	।।ना.गा.०२६९.००५।।	अशा ह्या चेष्टा नाम्यासी करिसी । हरी तुझी ऐसी कैसी ही खोड
१७६०	।।ना.गा.०२७०.००१।।	सोडी कान्हा रवि दोर । मथिल्या देतें । बया मज तें दे । आई मज तें दे डेरा घुमघुमतें
१७६१	।।ना.गा.०२७०.००२।।	यशोदा उचलोनी । कडे त्यासी घेऊनी । दाविती चित्रशाळेंतें
१७६२	।।ना.गा.०२७०.००३।।	करीं कर धरूनी । नेऊनी अंगणीं । दावी कुप बावीतें

१७६३	।।ना.गा.०२७०.००४।।	दावीत आरशांत । म्हणे पाहे कृष्णनाथ । मुखमुखा चुंबितें
१७६४	।।ना.गा.०२७०.००५।।	चिमण्या या गौळणी । आल्या त्या हो मिळोनी । राधे उरीं मज तें दे
१७६५	।।ना.गा.०२७०.००६।।	राधेसी म्हणे नामा । कृष्णासी तुझा प्रेमा । समजावियासी तें दे
१७६६	।।ना.गा.०२७१.००१।।	मला तूं हरी कळलासी रडीवाला
१७६७	।।ना.गा.०२७१.००२।।	विधीचें अक्षर खरें हें असतां । अजासुताचें कां जाले हाल
१७६८	।।ना.गा.०२७१.००३।।	पाराशरसुत वरचढ जाला । म्हणून कां त्वां फुगविले गाल
१७६९	।।ना.गा.०२७१.००४।।	बळीनें तुज पाहे खरीद केलें । खर्चून तो धनमाल
१७७०	।।ना.गा.०२७१.००५।।	नामा मनीं निर्भय गुरुवर कृपें । तुजलागीं देतां हे प्रतिख्याल
१७७१	।।ना.गा.०२७२.००१।।	मुक्ताफळ नथ नाकीं । चरणीं ल्याली वर वांकी । पितांबरें अंग झांकी । कृष्णाई माझी
१७७२	।।ना.गा.०२७२.००२।।	खांद्यावरी कांबळी। पायघोळ लांबली । पांघरली धाबळी । कृष्णाई माझी
१७७३	।।ना.गा.०२७२.००३।।	गाई पाठीं लागली । पळतां नाहीं भागली । मायबहिण चांगली। कृष्णाई माझी
१७७४	।।ना.गा.०२७२.००४।।	देहुडा पाउलीं । उभी माझी माउली । विश्रांतीची साउली । कृष्णाई माझी
१७७५	।।ना.गा.०२७२.००५।।	कर ठेवुनी कटावरी । उभी भीवरेचें तीरीं । नामयाची कैवारी । कृष्णाई माझी
१७७६	।।ना.गा.०२७३.००१।।	रावणा मारून माझे माये गे । बिभीषण लंकेस स्थापिलास काय गे । अयोध्येस आलीस काय गे । माझे हृदयमंदिरीं राहे गे । विठ्ठल माये गे
१७७७	।।ना.गा.०२७३.००२।।	रुसुनी आली रखुमाबाई गे । तिच्या मागें तूं धांवलीस काय गे । संगें घेऊनियां गोपाळ गाय गे। मम हृदयमंदिरीं राहें गे
१७७८	।।ना.गा.०२७३.००३।।	सत्ये राधिकेचे पायीं गे । सोडूनी द्वारकेचा ठाव गे । आलीस काय गे । माझे हृदयमंदिरीं राहे गे
१७७९	।।ना.गा.०२७३.००४।।	धन्य पुंडलीक भक्त माय गे । त्यानें विटेवर उभा केला काय गे । नामा म्हणे माझे माय गे । माझे हृदयमंदिरीं राहे गे
१७८०	।।ना.गा.०२७४.००१।।	चिदानंद दोंदिल बाळ डोळस । कृष्ण खेळवितां निवे मानस
१७८१	।।ना.गा.०२७४.००२।।	सये आन कांही या जीवा नावडे । चित्त गुंतले तया सुखी न निवडे
१७८२	।।ना.गा.०२७४.००३।।	देहा गेहा आठव नाहीं सर्वथा । स्थिति बाणली सहज रूप पाहतां
१७८३	।।ना.गा.०२७४.००४।।	तेज सांवळें दृष्टींत कोंदलें। तेणें प्रकाशें सबाह्य वेधलें
१७८४	।।ना.गा.०२७४.००५।।	वृत्ति संहित इंद्रियें परतलीं । कृष्णरूपीं मिळोनियां गेलीं
१७८५	।।ना.गा.०२७४.००६।।	नामया स्वामी आदि परंपरा। आवडता आहे तो माझा सोयरा
१७८६	।।ना.गा.०२७५.००१।।	चिदानंद दोंदिल बाळ सांवळें । कृष्ण पाहतां नयनीं मन मावळे
१७८७	।।ना.गा.०२७५.००२।।	तें सुख कवणें वाचे बोलिजे । चित्त चैतन्य समरस भोगिजे

१७८८	।।ना.गा.०२७५.००३।।	परा परतली पश्यंति तन्मया । मध्यमा वैखरी पावली हो लया
१७८९	।।ना.गा.०२७५.००४।।	आलिंगना लागुनी बाह्या स्फुरती। देह न दिसे पाहतां कृष्णमूर्ति
१७९०	।।ना.गा.०२७५.००५।।	तेथें आर्तीचा आनंदू गोठला । तो हा कृष्णरूपें अंकुर उठिला
१७९१	।।ना.गा.०२७५.००६।।	नामया स्वामी सबाह्याभ्यंतरी । गेले रसरंग गोकुळाभीतरीं
१७९२	।।ना.गा.०२७६.००१।।	चिदानंद चिद्रूप चित्त चिन्मय । बाळ यशोदेचें आनंद अद्वय
१७९३	।।ना.गा.०२७६.००२।।	सत्य अभिनव सुख याच्या दर्शनीं । मिठी पडली पाहतां रूप नयनीं
१७९४	।।ना.गा.०२७६.००३।।	दृष्टीया डोळियां आड रिघोनी । तनु मनासी केली भुलवणी
१७९५	।।ना.गा.०२७६.००४।।	आंत बाहेरी निजसुख वावरे । नित्य नूतन जीव जीवपणा विसरे
१७९६	।।ना.गा.०२७६.००५।।	आपरूपी रूप सकळां केलें । गोपी गोपाळां धेनु वत्सां भूलविलें
१७९७	।।ना.गा.०२७६.००६।।	नामया स्वामी आनंद उदधि । माजीं बुडोनियां गेली देहबुद्धि
१७९८	।।ना.गा.०२७७.००१।।	चिदानंदघन चिन्मय बाळकृष्ण । खेळवितां मन होय उन्मन
१७९९	।।ना.गा.०२७७.००२।।	सुख अनुभवी अनुवाद खुंटला । विश्वंभरी तोचि अनुवाद गोठला
१८००	।।ना.गा.०२७७.००३।।	दुजें न दिसे उपमेसीं द्यावया । मन न मिळे आन सुख घ्यावया
१८०१	।।ना.गा.०२७७.००४।।	ज्ञाता ज्ञान हेंचि अद्वय । ध्याता ध्यान हेंचि निरामय
१८०२	।।ना.गा.०२७७.००५।।	जन्मोजन्मीचें पुण्य संचित । जालें गौळियांचे काय मूर्तिमंत
१८०३	।।ना.गा.०२७७.००६।।	नामया स्वामीची अनुपम्य आवडी । चित्तें दिधली प्रेमरसीं बुडी
१८०४	।।ना.गा.०२७८.००१।।	जो भक्तजन करुणाकर क्षीरसिंधुचा दानी । तो चोरोनी खाय लोणी नवल देखा
१८०५	।।ना.गा.०२७८.००२।।	जो न माये भूतळीं वेदार्थाहि न कळे । तो बांधिला उखळे नवल देखा
१८०६	।।ना.गा.०२७८.००३।।	एका पादें करूनि आक्रमी मेदिनी । त्यासी चालूं सिकविती गवळणी नवल देखा
१८०७	।।ना.गा.०२७८.००४।।	ज्याचे मायेचेनि कुवाडें ब्रह्मादिक वेडें । तो बागुल म्हणतां दडे नवल देखा
१८०८	।।ना.गा.०२७८.००५।।	दानवांची कोटी हेळांचि निवटि। त्यांते माता भयें दावी सोंपटी नवल देखा
१८०९	।।ना.गा.०२७८.००६।।	नामा म्हणे हरी विश्वीं विश्वंभरीं । तो म्हणती नंदाघरीं नवल देखा
१८१०	।।ना.गा.०२७९.००१।।	गोपाळाशीं खेळती । आनंदें डोलती । कृष्ण आमुचा सांगाती । डो डो डो डो डो
१८११	।।ना.गा.०२७९.००२।।	कान्होबाची संगती । ब्रह्मादिक इच्छिती । धन्य आम्ही म्हणती । अ ल ल ल ल
१८१२	।।ना.गा.०२७९.००३।।	कृष्णाप्रती गोपाळ । म्हणताती सकळ । अकळसी नाकळ । हा त त त त
१८१३	।।ना.गा.०२७९.००४।।	मामा मारूं गेलासी । आपटिलें गजाशीं । मल्लयुद्ध खेळलासी । हू तू तू तू तू

१८१४	।।ना.गा.०२७९.००५।।	अजगर मारिला । वडवानळ गिळिला । गोवर्धन उचलिला । अ ब ब ब ब
१८१५	।।ना.गा.०२७९.००६।।	पुतनेसी शोषिलें । नारदासी मोहिलें । गणिकेसी उद्धरिलें । अ रे रे रे रे
१८१६	।।ना.गा.०२७९.००७।।	गौळियाचें घरां जाशी । दहीं दूध लोणी खासी । त्यांच्या सुना मोहिसी । छी छी छी छी छी
१८१७	।।ना.गा.०२७९.००८।।	सोळा सहस्र भोगिसी। ब्रह्मचारी म्हणविसी । लटिकेची ठकविशी । लु लु लु लु लु
१८१८	।।ना.गा.०२७९.००९।।	सोडोनियां मीपण । आम्हां घाली लोटांगण । परब्रह्म नारायण । आ हा हा हा हा
१८१९	।।ना.गा.०२७९.०१०।।	ऐसे तुझे पवाडे । वर्णिताती वाडेकोडें । विष्णुदास नामा म्हणे । यु यु यु यु यु
१८२०	।।ना.गा.०२८०.००१।।	प्रात:काळीं प्रहरा रात्रीं उठिल्या गौळणी बाळा । घुसळण मांडियेलें घरोघरीं सकळां । नित्यानंदें परमानंदें गाती गोपाळा । सहस्रापरी केशा गाती मदन सांवळा
१८२१	।।ना.गा.०२८०.००२।।	घुम घुम करिती घुम घुम करिती डेरे घुमती। आनंदल्या गौळणी छंदें छंदें डोलती
१८२२	।।ना.गा.०२८०.००३।।	एक म्हणती साजणी तुम्ही लपवा गे लोणी । नकळे नकळे हो बाई कृष्णाची करणी । कोणीकडून हा गे येईल सखये चक्रपाणि । खास खांदुनि तुम्ही आतां लपवा दुधाणी
१८२३	।।ना.गा.०२८०.००४।।	बोलतां चालतां इतुक्यामध्यें हरी आला । कवणेंहि नाहीं देव दृष्टी देखिला । सूक्ष्म रूप धरूनि डेऱ्यामध्ये प्रवेशला । वरच्यावरी देव लोणी खाऊनियां गेला
१८२४	।।ना.गा.०२८०.००५।।	उन्हवणीं शिळवणी घालिती परतें लोणी येईना । काय जाले ढोण सासूबाई कळेना
१८२५	।।ना.गा.०२८०.००६।।	हा हा गे बायांनों तुमचे जाणते चाळे । यशोदेच्या मुला देतसां गोळे । उगेचि मग पाहातां आतां फिरगे निराळे । मारी ठोसरे दोन्ही गाल्होरे घेतले
१८२६	।।ना.गा.०२८०.००७।।	डेऱ्यामधून मार माझा जगजीवन पाहे । नामा म्हणे धन्य धन्य वर्णूं मी काये
१८२७	।।ना.गा.०२८१.००१।।	मस्तकीं ठेवोनियां डेरा । करूं निघाली विकरा । साच करितसे पुकारा । म्हणे गोविंद घ्या वो
१८२८	।।ना.गा.०२८१.००२।।	बोल बोलती अबळा । तंव त्या हांसती सकळा । मुखीं पडियेला चाळा । तो गोपाळाचा
१८२९	।।ना.गा.०२८१.००३।।	दहीं म्हणावेसे ठेलें । वाचे गोविंद पैं आलें । चित्त चैतन्य रंगलें । कान्हुचरणीं बाई वो
१८३०	।।ना.गा.०२८१.००४।।	उन्नतीये बोलती नेती । चालतां गजगती । कान्हु वांचुनी चित्तीं । आणीक नेणें बाई वो
१८३१	।।ना.गा.०२८१.००५।।	जाऊनियां बळींच्या द्वारां । त्रिकांड केली वसुंधरा । कैसा सामावला तुमच्या डेरा । दाखवी बाई वो
१८३२	।।ना.गा.०२८१.००६।।	वृद्धा गौळणी पाचारिती । आणी वो अरुता श्रीपती । कोठें गोविंदु विकिती । नाहीं देखियला बाई वो
१८३३	।।ना.गा.०२८१.००७।।	श्रीरंगीं रंगला जीवु । म्हणे घ्यावो हा माधवु । बरवा रमापती गौरवु । साच आणियला कैसा
१८३४	।।ना.गा.०२८१.००८।।	बाळा भरूनियां बाळा । देखें श्रीरंगु सांवळा । वेधी वेधल्या सकळां । गोपी गोविंदासवें
१८३५	।।ना.गा.०२८१.००९।।	गोविंद गोविंद म्हणा वाचे । गोविंद स्मरण करा साचे । दोष हरती जन्माचें । छंद लागला तयाचा

१८३६	।।ना.गा.०२८१.०१०।।	नामया स्वामी हो मुरारी । मज पाहतां अभ्यंतरीं । शेखीं व्यापिलें निर्धारीं । मनुष्यपण
१८३७	।।ना.गा.०२८२.००१।।	रूपें श्यामसुंदर निलोत्पल गाभा । सखिये स्वप्नीं शोभा देखियेली
१८३८	।।ना.गा.०२८२.००२।।	नेत्र विशाळ भाळ दंत हिरया ज्योती । बाईये मदनमूर्ति देखियेला
१८३९	।।ना.गा.०२८२.००३।।	शंख चक्र गदा पद्म शोभती चहूं करीं । सखिये गरुडावरी देखियेला
१८४०	।।ना.गा.०२८२.००४।।	शयन शेषापृष्ठीं नाभीं परमेष्ठी । गंगा वामांगुष्ठी देखियेला
१८४१	।।ना.गा.०२८२.००५।।	पीतांबर कटीतटीं दिव्य चंदनउटी । सखिये जगजेठी देखियेला
१८४२	।।ना.गा.०२८२.००६।।	विचारितां मानसीं नये जो व्यक्तीसी । मन लुब्धलें विठ्ठलेसि म्हणे नामा
१८४३	।।ना.गा.०२८३.००१।।	अव्यक्त परब्रह्म कैसें आलें वो व्यक्तीं । अकळू न कळेचि तो हा अमूर्ती । पुंडलिकाचे भक्तीं येऊनियां वाळवंटीं। उभा राहे विटेवरी कर ठेवुनि कटीं
१८४४	।।ना.गा.०२८३.००२।।	जिवाचा जीवनु वो मज भेटवा हरी । लागलें प्रेमपिसें होईन दासी कामारी
१८४५	।।ना.गा.०२८३.००३।।	कांसे कसिला पितांबर तयावरी मेखळा । अंगी उटी चंदनाची शोभती वनमाळा । बाहू बाहूवाटे तें रूप गुंतले डोळां । मन माझें मोहिलें दृष्टि देखतां घननीळा
१८४६	।।ना.गा.०२८३.००४।।	अधर जे पोंवळियाचे दंत हिरिया ज्योति । विशाल नयन वो भोंवयां व्यंकटा अति। टिळक जो रेखियेला मृगनाभी लल्लाटीं । उपमा नये व्यक्ती चंद्रा पडियेली तुटी
१८४७	।।ना.गा.०२८३.००५।।	माथां मुगुट जो रत्नें जडियेलीं वरी । त्याखालीं मयुरपत्रीं वेष्टि साजे मुरारी । माथां त्या विरगुंठी पुष्पें तुरंबिलीं वरी । तेणें भाळलियें भेटवावो झडकरी
१८४८	।।ना.गा.०२८३.००६।।	इंद्रनीळ कीळ उभा घनश्यामु हा दिसे । पाहातो एक दृष्टी चकित केलें वो हांसे । तेचि ते कामबाण जिवा लागलें पिसें । नामया विष्णुदासा व्यापिलें हृषिकेशे
१८४९	।।ना.गा.०२८४.००१।।	संसार परजनीं । दूर दिधलें मज साजणी । द्वारकापूर पाटणीं । माझें माहियेर
१८५०	।।ना.गा.०२८४.००२।।	थोर उत्कंठा मनीं । वाट पाहे प्रतिदिनीं । मज नेतु कां कोणी । तया माहियेरा
१८५१	।।ना.गा.०२८४.००३।।	चित्तीं न लगती व्यापार । मनीं हेंचि वारंवार । आड ठाकले गिरि डोंगर। तया माहियेरा
१८५२	।।ना.गा.०२८४.००४।।	माझिया सासुरे निष्ठुरें । दुरळ बोलिलीं उत्तरें । तंव तंव मी स्मरें। विठू बाप माहियेरा
१८५३	।।ना.गा.०२८४.००५।।	येथें कोणी नाहीं माझें एक । जें त्यासी बोलूं सुखदु:ख । हें मन उतावेळ देख । तया माहियेरासाठीं
१८५४	।।ना.गा.०२८४.००६।।	कामक्रोध भावें दीर । बोलती अति निष्ठुर । ते वेळीं त्यजिजे संसार । ऐसें वाटतसे मना
१८५५	।।ना.गा.०२८४.००७।।	या वो संसारी नसिजे । संगु अवघ्याचा सांडिजे । नि:संग होऊनि राहिजे । तया माहियेरा
१८५६	।।ना.गा.०२८४.००८।।	या वो प्राणाचें संकटीं । आत्मा ठेऊनियां कंठीं । मग चालवी घररहाटी । म्हणिजे काम रात्रंदिवस

१८५७	।।ना.गा.०२८४.००९।।	याचे क्रूर बोल न होती । तेणें मी असे निर्बुज चित्तीं । निरोप धाडूं कवणा हांता । तया माहियेरा
१८५८	।।ना.गा.०२८४.०१०।।	तंवचि वो शिणीजे। जंव यातें न वोळंगिजे । याचें बीज पाविजे । नामें एकें विठ्ठलें
१८५९	।।ना.गा.०२८४.०११।।	आतां बहु काय बोलिजे । यासि सुवेळा न पुसिजे । पुण्यमार्गें जाईजे । तया माहियेरा
१८६०	।।ना.गा.०२८४.०१२।।	माझी सखी जे कां भक्ति। मज तेंचि संबोखिती । तियें लाविलें शुद्धमति। साह्य तें मज चुकों नेदी
१८६१	।।ना.गा.०२८४.०१३।।	सत्य भावो मज सांगाती । येर लटकिया व्युत्पत्ति । मी वो जाईन हरखेजती । तया माहियेरा
१८६२	।।ना.गा.०२८४.०१४।।	कृष्ण माऊली भेटेल । शिण अवघाचि हरेल । सुख आनंदू न मायेल। या त्रिभुवनीं
१८६३	।।ना.गा.०२८४.०१५।।	या बहू जन्माचा शिण वो जाईल । विठोदर्शनें दुःख हरेल । नामा सुखिया होईल । केशव चरणीं
१८६४	।।ना.गा.०२८५.००१।।	कृष्ण अनुरागें रंगली कामिनी । कामधामें गेली घरा विसरोनी
१८६५	।।ना.गा.०२८५.००२।।	होती बहुत जन्में वियोगें शिणली । आप नाठवे पर सुखें मिनली
१८६६	।।ना.गा.०२८५.००३।।	मनें करूनियां जाये विषयांचे संकल्प । तंव ते अवघे होय कृष्णरूप
१८६७	।।ना.गा.०२८५.००४।।	दृष्टीं देखणें जें जें आवडे । वेणू वाहे तेथें उभें देहूडें
१८६८	।।ना.गा.०२८५.००५।।	सुखशयनीं स्वप्नीं देखें सांवळा । कंठीं कौस्तुभ रूळे वरी वनमाळा
१८६९	।।ना.गा.०२८५.००६।।	जीवें धांवुनी आलिंगीं प्रीति । तंव ते आर्ती होय कृष्णमूर्ति
१८७०	।।ना.गा.०२८५.००७।।	देह परतोनी मागुते सांभाळी । तंव स्वयें सिद्ध आपण वनमाळी
१८७१	।।ना.गा.०२८५.००८।।	नामया स्वामी जिवींचा जिवलगू । कृष्णसुखाचा सुखबोधू अंतरंगु
१८७२	।।ना.गा.०२८६.००१।।	भिन्न रात्री माध्यान्हीं वो । सेजे सुतली नारी । आपआपणा विसरूनियां । सुशोभित अंधारीं
१८७३	।।ना.गा.०२८६.००२।।	त्यामाजी चारी भुजा । शंख चक्र वो करीं । पद्म गदा हातीं शोभती । दिसे सर्व शृंगारी
१८७४	।।ना.गा.०२८६.००३।।	येऊनी हंस तुळिके । कैसें धरियलें करीं । देऊनि आलिंगन । वोसरला वो दुरी
१८७५	।।ना.गा.०२८६.००४।।	पालवीं धरितां धरितां । रिघाला बाहेरी । त्यालागीं प्राण जातो । भेटवा झडकरी
१८७६	।।ना.गा.०२८६.००५।।	कवण ते प्राणसखी । भेट करी विठोसी । सांडूनि वीरगुंठी । चरण न झाडी केशी
१८७७	।।ना.गा.०२८६.००६।।	कवण मी कैंचा नेणों । जाती कुळ तयाचें । कवणा पासाव जाला । तें मी नेणें वो साचें
१८७८	।।ना.गा.०२८६.००७।।	इंद्र चंद्र नीळ कीळ । घन नभ रूप तयाचें । चरणीं तोडर रूळे । वरि नेपुरें साचे
१८७९	।।ना.गा.०२८६.००८।।	नख चंद्रमंडित वो । जन्मस्थान गंगेचें । जानू जघन नीट । पीतांबर वो कांसे
१८८०	।।ना.गा.०२८६.००९।।	त्यावरी नाग मुरडी । रत्न मेखळा साजे । माजू जो मुष्टी माय । त्या मन वेधलें माझें
१८८१	।।ना.गा.०२८६.०१०।।	नाभीं सरोवरीं वो । दिसे ब्रह्मकमळ । अनुकम्प्य उदर ज्याचें। विशाळ वक्षस्थळ
१८८२	।।ना.गा.०२८६.०११।।	कौस्तुभ वरी शोभे । करितो झळपळ । कुंडलाचेनि रत्नें । कैसेनि फांकतांती कीळ

१८८३	।।ना.गा.०२८६.०१२।।	वदनीं मी काय वानूं । प्रसिद्ध निर्मळा । भाळीं तो अर्ध चंद्र । मृगनाभीचा टिळा
१८८४	।।ना.गा.०२८६.०१३।।	सरळ ज्या अंगोळिका । नवरत्नें जडीत । कंकिणें मनगटीं । बाहुवटीं सुशोभित
१८८५	।।ना.गा.०२८६.०१४।।	त्यावरी कीर्तिमुखें । भुजादंड मिरवत । वैजयंती पदक हीरे । मुगुटीं झळकत
१८८६	।।ना.गा.०२८६.०१५।।	मयूरपत्रें शिरीं । शोभा दिसे अमित । चंद्र मंडळ लोपलीं वो । महातेज अद्भुत
१८८७	।।ना.गा.०२८६.०१६।।	व्यापिलें वनमाळिये । लावण्य तेज अमित । तें रूप देखावया । माझा जीव उल्हासत
१८८८	।।ना.गा.०२८६.०१७।।	ऐसी तापली विरहज्वरें । थोर होतो उबारा । चंदन पोळतसे । न घाला विंजण वारा
१८८९	।।ना.गा.०२८६.०१८।।	चंद्रमा दाहतसे । उष्ण तो खडतरा । तंव येरी जाणितला । वेध नंदकुमारा
१८९०	।।ना.गा.०२८६.०१९।।	येईल केशीराजा। नेईल द्वारकापुरा । भक्ति ही वीर माता । तिनें आणिला घरा
१८९१	।।ना.गा.०२८६.०२०।।	नामया विष्णुदासा । भेटी शारंगधरा । तनु मन जीवें त्याला । सुख जालें अंतरा
१८९२	।।ना.गा.०२८७.००१।।	स्त्री गरवार पति उदरीं । पतिव्रतापण साजे तिये नारी
१८९३	।।ना.गा.०२८७.००२।।	अंबुला खेळवी मोहें । कडीये घेवो देतसे पाहे
१८९४	।।ना.गा.०२८७.००३।।	समस्तीं मिळोनि पाळणा घातला । विष्णुदास नामयानें अनुभव गाईला
१८९५	।।ना.गा.०२८८.००१।।	जो जो जो जो रे मधुसुदना । बाळा जगजीवना । हालवी यशोदा पाळणा । नीज बा नारायणा । जो जो जो जो रे
१८९६	।।ना.गा.०२८८.००२।।	प्रथम अवतारीं । स्तवन करितांचि पैं विधी । करुणासागर गुणनिधी । शंखासुर वधोनि
१८९७	।।ना.गा.०२८८.००३।।	द्वितीये संकष्टीं इंद्रासी। कूर्मरूप होसी । सिंधू मंथुनियां श्रमलासी । सौख्य समस्तां देसी
१८९८	।।ना.गा.०२८८.००४।।	तृतीये वराह हिरण्याक्षी । धरूनी त्याची कुक्षी । पळतां धरियेला अनुलक्षी । फोडुनि त्याची वक्षी
१८९९	।।ना.गा.०२८८.००५।।	चतुर्थ नरसिंह विशाळ । अग्नीचा कल्होळ । निवडुनि असुराचें तेजाळ । काढी अंत्रमाळ
१९००	।।ना.गा.०२८८.००६।।	पंचम वामन सुंदर । क्षीराब्धीचा वर । जेणें भुलविला दिनकर । हरिला दानासुर
१९०१	।।ना.गा.०२८८.००७।।	षष्टम भार्गव अभिदानीं । पिता जमदग्नी । पृथ्वी निःक्षेत्री त्रिवाणी । दिधली विप्रा दानीं
१९०२	।।ना.गा.०२८८.००८।।	सप्तम अयोध्यापुरवासी। राजा राम होसी। पितृवचनाचे नेमासी । राहुनियां वनवासी
१९०३	।।ना.गा.०२८८.००९।।	अष्टम अवतार गोकुळीं । जन्मला वनमाळी । चाणुर कंसाची मंडळी । जाळुनी केली होळी
१९०४	।।ना.गा.०२८८.०१०।।	नवम बौध्य अवतार । पुढें येती युगांतर । दशम कलंकी होणार । नामा म्हणे संतां
१९०५	।।ना.गा.०२८९.००१।।	संसार घन घनदाट । कैं होईल शेवट जातियाचा
१९०६	।।ना.गा.०२८९.००२।।	जीव हेंचि जातें कर्म हाचि खुंटा । वोढिती वरवंटा चौघीजणी
१९०७	।।ना.गा.०२८९.००३।।	जातां वैर वैरणें जंव आहे लहाणे । जातां जाईजणें जाईल जाणा
१९०८	।।ना.गा.०२८९.००४।।	एकोत्तरशें कौरव वैरिले वैरणा । पांचा पांडवा जाणा तेचि जालें

१९०९	।।ना.गा.०२८९.००५।।	नळनीळ मांधाता वैरियेलें जातां । निमिष न लागतां पीठ जालें
१९१०	।।ना.गा.०२८९.००६।।	संसाराचा वोढा वोढितां न वोढे। बैस पलीकडे लावी हात
१९११	।।ना.गा.०२८९.००७।।	नामा म्हणे विठोबा दीनाचें माहेर । सदा पंढरपूर गाऊं गीतीं
१९१२	।।ना.गा.०२९०.००१।।	पहिला बागुल तो ऐसा । त्याचें नांव म्हणती मासा । शंखासुर वधिला कैसा । चारी वेद आणिले
१९१३	।।ना.गा.०२९०.००२।।	कृष्णा राहे रे उगला । नाहीं तर सांगेन त्या बागुला । घुसळणाशी उशीर जाला । रवी सोड गोविंदा
१९१४	।।ना.गा.०२९०.००३।।	दुसरा बागुल बोलती । नाम कांसव म्हणती । जेणें सृष्टी धरिली पृष्टीं । पाय पोटीं सूदले
१९१५	।।ना.गा.०२९०.००४।।	तिसरा बागुल बोलती । नाम वराह म्हणती । जेणें दाढें धरिली क्षितीं । दैत्य थोर मारिले
१९१६	।।ना.गा.०२९०.००५।।	चवथा बागुल नरहरी । थोर खांबांत गुरगुरी । दैत्य वधोनि मांडीवरी। भक्त प्रल्हाद रक्षिला
१९१७	।।ना.गा.०२९०.००६।।	पाचवा बागुल ब्रह्मचारी । उभा असे बळीचे द्वारीं । भिक्षा त्रिपांड धरित्री। बळीचें द्वार रक्षिलें
१९१८	।।ना.गा.०२९०.००७।।	सहावा बागुल बोलती । नाम परशुराम म्हणती । ज्यानें वधिलें मातेप्रती । पितृवचन मानुनी
१९१९	।।ना.गा.०२९०.००८।।	सातवा बागुल सत्त्वाचा । राम म्हणती दशरथाचा । रावण वधोनि दशमुखाचा । जानकीसी आणिलें
१९२०	।।ना.गा.०२९०.००९।।	आठवा बागुल बोलती । गोकुळीं थोर आहे ख्याती । त्यानें वधिलें कंसाप्रति । देव सुखी केले
१९२१	।।ना.गा.०२९०.०१०।।	नववा बागुल बोलती । नांव बौद्ध म्हणती । कोणा न कळे त्याची गती । बौद्ध रूपें राहिला
१९२२	।।ना.गा.०२९०.०११।।	होता कलंकीचा रथु । वेगीं येई बा धांवतु । नामा म्हणे पंढरीनाथु । बागुल तूं जालासी
१९२३	।।ना.गा.०२९१.००१।।	समस्त मिळोनि गोपाळीं । तया यमुनेच्या पाबळीं । कृष्णे मांडिली धुमाळी । कळंबातळी आनंद
१९२४	।।ना.गा.०२९१.००२।।	वळुनि कांबळ्या वेष्टि । त्याही बांधिल्या मनगटीं । विवाद मांडिला निकटीं । धूर्जटी कान्होसी
१९२५	।।ना.गा.०२९१.००३।।	आतां कृष्णा कवणे ठायीं । जासी तुजवरी आली डाई । आमची हमामा हुंबरी देई । उभा राहे पै कां गा
१९२६	।।ना.गा.०२९१.००४।।	कृष्ण म्हणे मी एकवटु । तुम्ही आम्ही गडी वाटूं । गोवळी घातलासे हाटु । अति निकटू कान्हूसी
१९२७	।।ना.गा.०२९१.००५।।	म्हणे बळीराम पहा गा । बोल नव्हे तुम्हाजोगा । तुम्ही समर्थ श्रीरंगा। आम्हां कांगा भेटविसी
१९२८	।।ना.गा.०२९१.००६।।	ऐसा सकळीं मान केला । तेव्हां कृष्ण संतोषला । आनंद चित्तासी पावला । म्हणे भला भला नाम्या
१९२९	।।ना.गा.०२९२.००१।।	कुस्ती खेळतां कासाविसी । शेंबुड खरकटे नाकासी । करे घेऊनि सावकाशी । आतां बहु भितो यासी
१९३०	।।ना.गा.०२९२.००२।।	आम्ही तुम्ही सवे जेवूं । गाई वळावया जाऊं । त्याच्या मानेवर बुकया देऊं । जवळ जावयासी आतां भिऊं
१९३१	।।ना.गा.०२९२.००३।।	नामा म्हणे चला जाऊं । हात जोडोनि उभे राहूं । पायां पडूनी मागूनि घेऊं । ध्यानीं मनीं तो कृष्ण गाऊं
१९३२	।।ना.गा.०२९३.००१।।	कान्होबा निवडी आपुली गोधनें
१९३३	।।ना.गा.०२९३.००२।।	पांच पांच पोळ्या तीन भाकरी । दीड कानवला एक पुरी। आम्हां धाडिलें वना दुरी । आमची ठकवून खाल्ली शिदोरी
१९३४	।।ना.गा.०२९३.००३।।	परियेसी शारंगधरा । तुझा बैल चुकला मोरा । सांगूं गेलों तुझ्या घरा । पाठीं लागला तुझा म्हातारा

१९३५	।।ना.गा.०२९३.००४।।	परियेसी हृषिकेशी । गाई म्हशींचे दूध पिशी । वासरें प्यालीं म्हणून सांगशी । द्या ताक नाहीं आम्हांसी
१९३६	।।ना.गा.०२९३.००५।।	कान्होबा ओढाळ तुझ्या गाई । होत्या नव्हत्या कळंबा ठायीं । शिव्या देती तुझी आई
१९३७	।।ना.गा.०२९३.००६।।	विष्णुदास नामा साहे । देवा तूंचि बाप माये । अखंड माझे हृदयीं राहे
१९३८	।।ना.गा.०२९४.००१।।	अरे अरे कान्हया वेल्हाळा । तूं रे बरविया गोपाळा । तुज देखियलें डोळां । रे धेनु बा हुंबरती
१९३९	।।ना.गा.०२९४.००२।।	माते दे वो शिदोरी । ऐसें म्हणतसे मुरारी । मी जाईन वो दुरी । धेनु चारावयालागीं
१९४०	।।ना.गा.०२९४.००३।।	आलें बेलें चिलें मेके । सुरण मिरगोडी पैं तिखें। दह्यावांचोनि नव्हें निकें । शिदोरी ताकें कालवूं
१९४१	।।ना.गा.०२९४.००४।।	वडजा वांकुडा पेंदा सुदामा । हेंचि पांतिकर आम्हां । तेथें विष्णुदास नामा । उच्छिष्ट शितें वेंचितसे
१९४२	।।ना.गा.०२९५.००१।।	तुम्ही थोरल्या पाटलाचे लेक। तुम्हां मध्यें रे मी गरीब आहे एक। भला म्हणसी रे जाय गाई राख । माझ्या कांटा रे कांटा रे कांटा मोडला–पाई। कान्होबा संभाळ रे संभाळ आपुल्या गाई
१९४३	।।ना.गा.०२९५.००२।।	आपुली आपुल्या घरासि जातों भाई
१९४४	।।ना.गा.०२९५.००३।।	यमुना तीरीं रे नित्य करितां अंघोळी । मला म्हणतो रे जाये आण शिदोरी। मी कैसा रे आणु करून भाकरी। काम करी भाई
१९४५	।।ना.गा.०२९५.००४।।	अजी भला रे भला खजूर लांबविला। गूळ घालुनियां फारच गोड केला। तुम्ही अवघ्यानें फार घेतला। मी निपट म्हणोनी मला थोडाच दिला
१९४६	।।ना.गा.०२९५.००५।।	काली विवली रे भली येक सोनेरी। या गौळ्याची गोरी गाय पळाली। जे देखीन तो करीन हाता मारी। माजी हिरोन रे काटी कांबळी
१९४७	।।ना.गा.०२९५.००६।।	कृष्ण म्हणे रे उगा राहे बोबड्या। माझ्या कवड्या रे जिंकून नेल्या साऱ्या। मला म्हणतो रे फिरून खेळ गड्या। नामा म्हणे रे तुमच्या गोष्टी रोकड्या
१९४८	।।ना.गा.०२९५.००७।।	कान्होबा संभाळ रे संभाळ आपुल्या गाई
१९४९	।।ना.गा.०२९६.००१।।	कुत्ना थमाल ले थमाल आपुल्या गाई। आम्ही आपुल्या घलासि जातों भाई
१९५०	।।ना.गा.०२९६.००२।।	तुम्ही थोलल्या पातलाचे लेक। तुम्हांमधीं ले मी गलीब आहे येक। मदला म्हनतां ले जाई गायी लाख। किती मी धांवूं ले कांता लागला पाई
१९५१	।।ना.गा.०२९६.००३।।	काली पिवली ले गाय आहे तान्हेली । या या गवल्याची धवली गाय पलाली। मदला देखुनि तो गवली हांका माली। काली कांबली हिलुनि घेतली थाली
१९५२	।।ना.गा.०२९६.००४।।	काल बलाचि ले बलाचि खलवस केला। तुम्ही सल्वांनी फाल फाल घेतला। मी गलीब ले म्हनुनि थोलका दिला। तूं म्हनसिल ले ‘याला कलतचि नाही!’
१९५३	।।ना.गा.०२९७.००१।।	कुळगुरु वशिष्ठ सांगे नृपवरा ।असती गरोदर तुझ्या कांता

१९५४	।।ना.गा.०२९७.००२।।	धर्म शास्त्र ऐसें डोहाळे पुसावे । त्यांचे पुरवावे मनोरथ
१९५५	।।ना.गा.०२९७.००३।।	ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं । कैकई सदनासी जाता जाला
१९५६	।।ना.गा.०२९७.००४।।	मंचकीं बैसली होती ते पापिणी । देखतां नयनीं पहुडली
१९५७	।।ना.गा.०२९७.००५।।	सुंदरपणाचा अभिमान मनीं । त्यावरी गर्भिणी नामा म्हणे
१९५८	।।ना.गा.०२९८.००१।।	राजा म्हणे इच्छा तुझिये मानसीं । डोहाळे मजसी सांग आतां
१९५९	।।ना.गा.०२९८.००२।।	येरी म्हणे ऐसें वाटतसे जीवा। कनिष्ठासी द्यावा राज्यपट
१९६०	।।ना.गा.०२९८.००३।।	ज्येष्ठासी धाडावें दुरी दिगंतरी । न ये समाचार त्याचा आम्हां
१९६१	।।ना.गा.०२९८.००४।।	जनांत हें निंद्य वेदबाह्य कर्म । करितां अधर्म पाप बहू
१९६२	।।ना.गा.०२९८.००५।।	माझिये मस्तकीं ठेवावा हा दोष । तुम्हांकडे लेश नाहीं नाहीं
१९६३	।।ना.गा.०२९८.००६।।	निंदतील जन मज वाटे सुख। ऐकतांची दु:ख राया जालें
१९६४	।।ना.गा.०२९८.००७।।	वृश्चिकाचे पेंवी तक्षक पडत। घालिताती घृत अग्निमुखीं
१९६५	।।ना.गा.०२९८.००८।।	ऐशी व्यथा होय नामा म्हणे त्यासी । उठिला त्वरेसी तेथूनियां
१९६६	।।ना.गा.०२९९.००१।।	येतसे दशरथ सुमित्रा मंदिरीं । देखतां सामोरी येती जाली
१९६७	।।ना.गा.०२९९.००२।।	न माये आनंद तियेचे मानसीं । ठेवी मस्तकासी चरणांवरी
१९६८	।।ना.गा.०२९९.००३।।	घालोनी आसन प्रक्षाळी चरण । सर्वांगीं लेपन तीर्थोदकें
१९६९	।।ना.गा.०२९९.००४।।	गंध धूप दीप पुष्पांचिया माळा । अर्पुनी तांबुल उभी राहे
१९७०	।।ना.गा.०२९९.००५।।	कैकयीचें दु:ख विसरला राव । पाहोनियां भाव सुमित्रेचा
१९७१	।।ना.गा.०२९९.००६।।	होती जे डोहाळे तुझिये मानसीं । सांग मजपाशीं पतिव्रते
१९७२	।।ना.गा.०२९९.००७।।	प्राणनाथा ऐसें वाटतसे जीवा । वडिलांची सेवा अहर्निशीं
१९७३	।।ना.गा.०२९९.००८।।	आवडे हें एक नावडे आणिक । द्यावें मज एक हेंचि आतां
१९७४	।।ना.गा.०२९९.००९।।	ऐकतांची ऐसें कांतेचे वचन । आनंदें निमग्न मन होय
१९७५	।।ना.गा.०२९९.०१०।।	घेऊनियां हातीं रत्नाचें भूषण । टाकी ओवाळून नामा म्हणे
१९७६	।।ना.गा.०३००.००१।।	दशरथ राजा उठिला तेथुनी । कौसल्ये सदनीं जाता जाला
१९७७	।।ना.गा.०३००.००२।।	पाहातसे दृष्टी तेव्हां श्रावणारी। न माये अंतरीं तेज तिचें
१९७८	।।ना.गा.०३००.००३।।	तुझिये मानसीं होती जे डोहाळे । सांग वो वेल्हाळे मजपाशीं
१९७९	।।ना.गा.०३००.००४।।	उदरांत असे भक्तांचा कैवारी । तेथें कैंची उरी देहभावा

१९८०	।।ना.गा.०३००.००५।।	सदा समाधिस्थ रामरूप जाली । कौसल्या माऊली नामा म्हणे
१९८१	।।ना.गा.०३०१.००१।।	न बोलेचि कांही इसी काय जालें । भूतें झडपिलें निश्चयेंसी
१९८२	।।ना.गा.०३०१.००२।।	माझिये अदृष्टीं नाहीं हा नंदन। म्हणोनियां विघ्न ओढवलें
१९८३	।।ना.गा.०३०१.००३।।	निवारी हें विघ्न वैकुंठनायका । रक्षी या बाळका सुदर्शनें
१९८४	।।ना.गा.०३०१.००४।।	तुझा मी किंकर आजी अंबुजाक्षा । द्यावी मज भिक्षा हेचि आतां
१९८५	।।ना.गा.०३०१.००५।।	नामाचा उच्चार ऐकतांचि कानीं । नेत्र उघडोनी पाहती जाली
१९८६	।।ना.गा.०३०१.००६।।	राजा म्हणे कां हो ऐसी हे अवस्था। कां हो भ्रम चित्ता जाला असे
१९८७	।।ना.गा.०३०१.००७।।	विश्वाचा मी आत्मा स्वयें असे राम । मजमाजीं भ्रम कैंचा असे
१९८८	।।ना.गा.०३०१.००८।।	अवतार महिमा वाणी वेद माझा । सुरवरांच्या काजा नामा म्हणे
१९८९	।।ना.गा.०३०२.००१।।	रावणें हे केलें लग्नामाजीं विघ्न । असे कीं स्मरण तुजलागीं
१९९०	।।ना.गा.०३०२.००२।।	आणी रे धनुष्य मारीन रावणा। लंका बिभीषणा देईन मी
१९९१	।।ना.गा.०३०२.००३।।	अंगद सुग्रीव जांबुवंत वीरा । हनुमंत पाचारा लवकरी
१९९२	।।ना.गा.०३०२.००४।।	टाकोनी पर्वत बुजवा रे सागरा । पायवाट करा जावयासी
१९९३	।।ना.गा.०३०२.००५।।	लंकेपुढे मोठें माजवीन रण । तोडीन बंधन सुरवरांचें
१९९४	।।ना.गा.०३०२.००६।।	विश्वामित्रयाग नेईन मी सिद्धी । मारीन कुबुद्धि दोघांजणां
१९९५	।।ना.गा.०३०२.००७।।	खर दूषणांचा घेईन मी प्राण । धनुष्य मोडीन भुजाबळें
१९९६	।।ना.गा.०३०२.००८।।	ध्याती मज त्यांची बहुत आवडी । न विसंबे घडी त्यांसी एक
१९९७	।।ना.गा.०३०२.००९।।	बोलिला वाल्मिक तैसेंचि करीन । वर्तोनि दाविन नामा म्हणे
१९९८	।।ना.गा.०३०३.००१।।	परब्रह्म पूर्ण आलें माझे घरीं । न कळे अंतरीं नृपाचिया
१९९९	।।ना.गा.०३०३.००२।।	करी ती बडबड होती भूतचेष्टा । पाचारा वशिष्ठा लवकरी
२०००	।।ना.गा.०३०३.००३।।	येऊनि वशिष्ठ पाहे कौसल्येसी । नावरती त्यास अष्टभाव
२००१	।।ना.गा.०३०३.००४।।	राजा म्हणे कैसें विपरीत जालें । वशिष्ठा झडपिले महाभूतें
२००२	।।ना.गा.०३०३.००५।।	श्रावणवधाचें अघ नाहीं जळालें । दुजें हे निर्मिलें प्रारब्धासी
२००३	।।ना.गा.०३०३.००६।।	ऐकतांचि हांसे सावध होऊनि । बोलतसे झणीं नामा म्हणे
२००४	।।ना.गा.०३०४.००१।।	विरंचीचा बाप क्षीरसागरवासी । ध्याती योगी त्यासी निरंतर
२००५	।।ना.गा.०३०४.००२।।	परेहूनिपर वैखरीहूनि दुरी । कौसल्येचे उदरीं तोचि असे

२००६	।।ना.गा.०३०४.००३।।	बोलियेंलें जें जें नव्हे असत्य वाणी । न येऊं दे मनीं शंका कांहीं
२००७	।।ना.गा.०३०४.००४।।	माझें हें संचित धन्य धन्य आतां । पाहीन मी कांता लक्ष्मुमीच्या
२००८	।।ना.गा.०३०४.००५।।	धन्य धन्य धन्य अयोध्येचे लोक । वैकुंठनायक पाहातील
२००९	।।ना.गा.०३०४.००६।।	धन्य पशुपक्षी श्वापदें तरुवर । राजा रघुवीर पाहातील
२०१०	।।ना.गा.०३०४.००७।।	त्रैलोक्यांत धन्य तूंचि एक नृपा। नामयाच्या बापा पाहातील
२०११	।।ना.गा.०३०५.००१।।	उत्तम हा चैत्रमास । ऋतु वसंताचा दिवस
२०१२	।।ना.गा.०३०५.००२।।	शुक्लपक्षी ही नवमी । उभे सुरवर ते व्योमीं
२०१३	।।ना.गा.०३०५.००३।।	माध्यान्हासी दिनकर । पळभरी होय स्थिर
२०१४	।।ना.गा.०३०५.००४।।	धन्य मीच त्रिभुवनीं । माझें वंशीं चक्रपाणि
२०१५	।।ना.गा.०३०५.००५।।	सुशोभित दाही दिशा । आनंद नरनारी शेषा
२०१६	।।ना.गा.०३०५.००६।।	नाहीं कौसल्येसी भान । गर्भी आले नारायण
२०१७	।।ना.गा.०३०५.००७।।	अयोनीसंभव। प्रगटला हा राघव
२०१८	।।ना.गा.०३०५.००८।।	नामा म्हणे डोळां । पाहीन भुवनत्रयपाळा
२०१९	।।ना.गा.०३०६.००१।।	सुवर्णाचा शोभे मस्तकीं मुगुट । हिरे घनदाट तयावरी
२०२०	।।ना.गा.०३०६.००२।।	विस्तीर्ण कपाळ व्यंकटा भृकुटीं । टिळक लल्लाटीं केशराचा
२०२१	।।ना.गा.०३०६.००३।।	कमळाकार नेत्र आकर्ण शोभती । कुंडलें झळकती कर्णी ज्याच्या
२०२२	।।ना.गा.०३०६.००४।।	सरळ नासिक आरक्त अधर । हनुवटी सुंदर राघवाची
२०२३	।।ना.गा.०३०६.००५।।	कंठाचा आकार कंबुग्रीवा ऐसा । हृदयावरी ठसा द्विजपद
२०२४	।।ना.गा.०३०६.००६।।	सुकुमार सुरेख जयाचें उदर । ब्रह्मांडें अपार वसती जेथें
२०२५	।।ना.गा.०३०६.००७।।	नाभीं कमळींचा ब्रह्मा नेणें अंत । कडदोरा शोभत कटीं ज्याच्या
२०२६	।।ना.गा.०३०६.००८।।	दंडी पेट्या करीं जडित मुद्रिका । पिवळा नेटका पीतांबर
२०२७	।।ना.गा.०३०६.००९।।	केशराची उटी सरळ बाहुदंड । चिमणा कोदंड हातीं ज्याच्या
२०२८	।।ना.गा.०३०६.०१०।।	गर्जती नुपुर कोमळ चरणीं । वज्रांकुश चिन्हीं विराजित
२०२९	।।ना.गा.०३०६.०११।।	कौस्तुभ मुक्तमाळा रुळे वैजयंती । भ्रमर भुलती नामा म्हणे
२०३०	।।ना.गा.०३०७.००१।।	सांगताति दाया । तुम्हां पुत्र जाला राया
२०३१	।।ना.गा.०३०७.००२।।	ऐकतांचि ऐसें कानीं । हर्ष न समाये मनीं

२०३२	।।ना.गा.०३०७.००३।।	उठा उठा वो त्वरेसी। पाचारावें वशिष्ठासी
२०३३	।।ना.गा.०३०७.००४।।	ब्राह्मणासी पाचारा । सांगा सर्व नारीनरा
२०३४	।।ना.गा.०३०७.००५।।	फोडा फोडा रे भांडारें । आणवी गाईंचीं खिल्लारें
२०३५	।।ना.गा.०३०७.००६।।	उभवा उभवा रे गुढी । सोडा वस्त्रांची गाठोडीं
२०३६	।।ना.गा.०३०७.००७।।	झाडोनियां टाका खडे । घाला केशराचे सडे
२०३७	।।ना.गा.०३०७.००८।।	नामा म्हणे भूमंडळा । स्वामी माझा पहा डोळां
२०३८	।।ना.गा.०३०८.००१।।	अनंत ब्रह्मांडे जयाचें उदरीं । ध्यातसे त्रिपुरारी अहर्निशीं
२०३९	।।ना.गा.०३०८.००२।।	पाहतसे मुख दशरथ त्याचें । भाग्य मी तयाचें काय वर्णूं
२०४०	।।ना.गा.०३०८.००३।।	गंध पुष्प वस्त्रें अर्पोनियां द्विजां । समभावें पूजा सकळांसी
२०४१	।।ना.गा.०३०८.००४।।	साखरेच्या गोण्या घाला हत्तीवरी । धाडी घरोघरीं नामा म्हणे
२०४२	।।ना.गा.०३०९.००१।।	करितसे स्नान अयोध्येचा पाळक । वस्त्रें अमोलिक परिधान
२०४३	।।ना.गा.०३०९.००२।।	लावोनियां भाळीं कस्तुरी केशर । करी नमस्कार वशिष्ठासी
२०४४	।।ना.गा.०३०९.००३।।	पुण्याहवाचनीं बसें दशरथ । त्रिभुवनीं समर्थ तूंचि एक
२०४५	।।ना.गा.०३०९.००४।।	वेदमंत्र घोष करिती ऋषीश्वर । पुष्पें सुरवर वरुषती
२०४६	।।ना.गा.०३०९.००५।।	आणिती आहेर अयोध्येचे जन । करिती गायन गायक जे
२०४७	।।ना.गा.०३०९.००६।।	नाचती अप्सरा वाजती नगारे । वाजंत्री तुतारे भोंवारें ही
२०४८	।।ना.गा.०३०९.००७।।	गुलालाची धूम रंग वस्त्रावरी । बंदीजन द्वारीं गर्जताती
२०४९	।।ना.गा.०३०९.००८।।	नामा म्हणे इंद्रें पाहोनियां सभा । नाहीं ऐसी शोभा चित्तीं म्हणे
२०५०	।।ना.गा.०३१०.००१।।	बाई कशाच्या नवबता । पुत्र जाला दशरथा
२०५१	।।ना.गा.०३१०.००२।।	चला चला तेथें जाऊं । कौसल्येचें बाळ पाहूं
२०५२	।।ना.गा.०३१०.००३।।	नवसे बहुत। तिशीं पावला भगवंत
२०५३	।।ना.गा.०३१०.००४।।	घ्या ग घ्या ग त्वरें वाण । झगा फडकीं पेहरण
२०५४	।।ना.गा.०३१०.००५।।	करुनि शृंगारा । येती राजयाच्या घरा
२०५५	।।ना.गा.०३१०.००६।।	पाहतां सुकुमार सांवळा । लवूं विसरला डोळा
२०५६	।।ना.गा.०३१०.००७।।	सार्थक जन्माचें । नामा म्हणे जाले त्यांचे
२०५७	।।ना.गा.०३११.००१।।	भांडारी येऊनि करिती प्रार्थना । द्विजांसी दक्षिणा काय द्यावी

२०५८	।।ना.गा.०३११.००२।।	जया लागे जितुकें तितुकें त्यानें घ्यावें । तुम्हीं न रहावें उभे तेथें
२०५९	।।ना.गा.०३११.००३।।	धांवताती तेव्हां विप्र सकळिक । एकावरी एक पडताती
२०६०	।।ना.गा.०३११.००४।।	करुं नका घाई सर्वांसी पुरेल । न राहे दुर्बळ यांत कोणी
२०६१	।।ना.गा.०३११.००५।।	नामा म्हणे ऐसें धन वांटी राजा । सुखी केल्या प्रजा सकळिक
२०६२	।।ना.गा.०३१२.००१।।	ब्राह्मणांची इच्छा पूर्ण जाली जेव्हां । आशिर्वाद तेव्हां वदताती
२०६३	।।ना.गा.०३१२.००२।।	कल्पकोटी यासी नाहीं नाहीं भय । सकळांचे ध्येय हेंचि असे
२०६४	।।ना.गा.०३१२.००३।।	तपाचिया राशी जाहल्या बहुत । म्हणोनियां सुत जाला तुज
२०६५	।।ना.गा.०३१२.००४।।	तथास्तु म्हणोनि जोडित अंजुळ । पायांवरी भाळ नामा म्हणे
२०६६	।।ना.गा.०३१३.००१।।	बाई कौसल्येचा पुत्र । दिसे सर्वांही विचित्र
२०६७	।।ना.गा.०३१३.००२।।	ऐसें वाटे माझ्या चित्तीं । प्रगटली विष्णुमूर्ती
२०६८	।।ना.गा.०३१३.००३।।	झणें होईल या दृष्ट । मोडताती कानीं बोट
२०६९	।।ना.गा.०३१३.००४।।	तिच्या भाग्यें असें सुखी । नामा म्हणे सर्वांमुखीं
२०७०	।।ना.गा.०३१४.००१।।	धन्य ते संसारीं पवित्र ते वाणी । अखंड उच्चारणीं रामनाम
२०७१	।।ना.गा.०३१४.००२।।	तयांचीच एक सरली येरझार । उतरले पार भवनदी
२०७२	।।ना.गा.०३१४.००३।।	वधोनी ताटिका सुबाहुही देख । सिद्धी नेला मख कौशिकाचा
२०७३	।।ना.गा.०३१४.००४।।	पहावया यावें स्वयंवर सीतेचें । आलें जनकाचे पत्र तेथें
२०७४	।।ना.गा.०३१४.००५।।	मारगीं चालतां ब्रह्मयाची बाळा । उद्धरली शिळा पदरजें
२०७५	।।ना.गा.०३१४.००६।।	मोडील धनुष्य तया ही देईन । केला होता पण जनकानें
२०७६	।।ना.गा.०३१४.००७।।	रावणादि राजे आले थोर थोर । त्यांचा उतरला नूर पाहातांची
२०७७	।।ना.गा.०३१४.००८।।	अहर्निशीं जया ध्यानीं ध्याय भोळा । तो उठला सांवळा बाप माझा
२०७८	।।ना.गा.०३१४.००९।।	सुरा असुरा असाध्य ऐसें तें प्रचंड । तें तीं ठायीं कोदंड मोडियेलें
२०७९	।।ना.गा.०३१४.०१०।।	पाहोनियां ऐसें नामा म्हणे बळ । सीता घाली माळ रघुवीरा
२०८०	।।ना.गा.०३१५.००१।।	संत समागमें चाले दळभारू । आशा तृष्णा देशधडी अहंकारू
२०८१	।।ना.गा.०३१५.००२।।	दुम दुम दुम दुम भेरी वाजे । आले अयोध्येसी श्रीरघुनाथ राजे
२०८२	।।ना.गा.०३१५.००३।।	भक्तभद्रजाती दोहों बाही चालत । विष्णुदास नामा कीर्ति वाखाणित
२०८३	।।ना.गा.०३१६.००१।।	राम पिता सीता माता । लक्ष्मण सोयरा चुलता

२०८४	।।ना.गा.०३१६.००२।।	तयांसी भेटों जाऊं आतां । चित्रकुटींच्या पर्वता
२०८५	।।ना.गा.०३१६.००३।।	नामा म्हणे माझें गोत । चित्रकुटीं असे नांदत
२०८६	।।ना.गा.०३१७.००१।।	काळे गोरे धनुर्वाडे । ते चालताती रामापुढें
२०८७	।।ना.गा.०३१७.००२।।	राम निळिये गुढारी । कनकदंड चौरेवरी
२०८८	।।ना.गा.०३१७.००३।।	चला चित्रकूटीं जाऊं । राम दशरथाचा पाहूं
२०८९	।।ना.गा.०३१७.००४।।	अयोध्यें केला अवतारु । राम नामया दातारू
२०९०	।।ना.गा.०३१८.००१।।	म्हणसी बिभीषण शाहणा । परि तो महामूर्ख जाणा
२०९१	।।ना.गा.०३१८.००२।।	काय तो रामासी भेटला । आवघा रामचि नाहीं जाला
२०९२	।।ना.गा.०३१८.००३।।	राम दृष्टी देखतांची । पदवी न घेववेचि त्याची
२०९३	।।ना.गा.०३१८.००४।।	कोण हित केलें तेणें । राम नाकळी चिंतनें
२०९४	।।ना.गा.०३१८.००५।।	जरी तो जाला लंकापती । नाश पावेल कल्पांतीं
२०९५	।।ना.गा.०३१८.००६।।	नामया स्वामीतें जाणोन । अवघा रामचि होईन
२०९६	।।ना.गा.०३१९.००१।।	गुंडाळिल्या जटा तोचि माथा फेटा । गोजिरा गोमटा रामचंद्र
२०९७	।।ना.गा.०३१९.००२।।	वैकुंठींचा राजा म्हणवितो योगी । दावावया जगीं योग करी
२०९८	।।ना.गा.०३१९.००३।।	आकर्ण लोचन हातीं चापबाण । वल्कलें भूषणें नेसोनियां
२०९९	।।ना.गा.०३१९.००४।।	पितृवचनालागीं मानोनि साचारी । जाला पादचारी वनीं हिंडे
२१००	।।ना.गा.०३१९.००५।।	देवांचिया काजीं ठेवोनियां निज । सर्वांपरी सज्ज जाला अंगें
२१०१	।।ना.गा.०३१९.००६।।	नामा म्हणे त्यांचें न कळे कौतुक । आपुलिया सुख वाढावया
२१०२	।।ना.गा.०३२०.००१।।	श्रीराम सोयरा आला माझ्या घरा । दिधला म्यां थारा हृदयीं माझ्या
२१०३	।।ना.गा.०३२०.००२।।	पावलों विश्रांति धालें माझें मन । न लगे आतां ध्यान शिकावया
२१०४	।।ना.गा.०३२०.००३।।	ज्यासाठीं हिंडणें जटामौनमग्न । धरिलें तेणें ठाणें हृदयीं माझ्या
२१०५	।।ना.गा.०३२०.००४।।	योग याग तप करावें साधन । तोहि जाण ओठीं सदा वसे
२१०६	।।ना.गा.०३२०.००५।।	तीर्थयात्रा देव ज्यासाठीं करावें। तें ब्रह्म बरवें नांदे देहीं
२१०७	।।ना.गा.०३२०.००६।।	ब्रह्मचर्यादिक आश्रम साधावें । केली तया देवें देहीं वस्ती
२१०८	।।ना.गा.०३२०.००७।।	वेदशास्त्र पुराण ज्यासाठीं पठण । तो नांदे परिपूर्ण हृदयीं माझ्या
२१०९	।।ना.गा.०३२०.००८।।	ऐसा तो सज्जन जिवलग सांगाती । दिधली मज विश्रांती नामसंगें

२११०	।।ना.गा.०३२०.००९।।	तैसें नव्हे ज्ञान फुटक्या हांडोऱ्याचें । धरूनियां साचे खोखा वाजे
२१११	।।ना.गा.०३२०.०१०।।	स्वधर्मी विचार वेदांचें अन्वयें । लाधलें हे पाय गुरुकृपें
२११२	।।ना.गा.०३२०.०११।।	अभंग भंगेना फोडितां फुटेना । गुरुकृपें जाणा प्राप्त जालें
२११३	।।ना.गा.०३२०.०१२।।	चावळी वटवट बोलणें बासर । हे तंव अवघे चार मर्कटाचे
२११४	।।ना.गा.०३२०.०१३।।	परनिंदा परद्रोहो करणें या संतांचा । जाळावी ते वाचा ज्ञान त्याचें
२११५	।।ना.गा.०३२०.०१४।।	न लगे सोंग धरणें देह ताप करणें । ऐसें निज ध्यान हातां आलें
२११६	।।ना.गा.०३२०.०१५।।	नाम घेतां रूप हृदयीं बिंबलें । सर्वत्र देखिलें तेचि डोळां
२११७	।।ना.गा.०३२०.०१६।।	नाममंत्र बीज नाही जंववरी । केशव तंववरी प्राप्त नाहीं
२११८	।।ना.गा.०३२०.०१७।।	नामाचे धारक केशवरूप देख । वैकुंठीचे सुख रुळे पायीं
२११९	।।ना.गा.०३२०.०१८।।	नामेंविण ज्ञान नपुंसक ऐसें। नातळती कैसे साधुसंत
२१२०	।।ना.गा.०३२०.०१९।।	नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम । नामरूपा भिन्न नाहीं नाहीं
२१२१	।।ना.गा.०३२०.०२०।।	आकारला देव नाम रूपा आलें । म्हणुनि स्थापिलें नाम देवें
२१२२	।।ना.गा.०३२०.०२१।।	नाम परता मंत्र नाहीं वो आणिक । सांगती ते मूर्ख ज्ञानहीन
२१२३	।।ना.गा.०३२०.०२२।।	नामा म्हणे ज्ञान केशव केवळ । जाणती प्रेमळ भले भले
२१२४	।।ना.गा.०३२१.००१।।	हनुमंत गेला सीताशुद्धिलागीं । लंका मध्यभागीं घेऊनियां
२१२५	।।ना.गा.०३२१.००२।।	माता जानकीच्या करीत शुद्धीसी । हिंडे गृहदेशीं राक्षसांच्या
२१२६	।।ना.गा.०३२१.००३।।	न देखे तो सती सीतादेवी माया । अकस्मात तया वनामाजीं
२१२७	।।ना.गा.०३२१.००४।।	शिंसीवावृक्षाचे असे तळवटीं । समीप निकटीं राक्षसाचे
२१२८	।।ना.गा.०३२१.००५।।	न चले उपाय कांहीं तो बोलाया । स्मरे रामराया तये काळीं
२१२९	।।ना.गा.०३२१.००६।।	श्रीरामें मुद्रिका दिली होती संगें । तयासी अव्यंग सोडावया
२१३०	।।ना.गा.०३२१.००७।।	वृक्षाचिया माथां बैसोनियां बळी । देत करकमळीं सोडूनियां
२१३१	।।ना.गा.०३२१.००८।।	जानकी अवलोकी श्रीरामाची मुद्रा । कोठोनी कपींद्रा आणलीसे
२१३२	।।ना.गा.०३२१.००९।।	सुखी रामराणा कवणिये वना । माझिया तूं प्राणा बोले वेगीं
२१३३	।।ना.गा.०३२१.०१०।।	ऐकोनि कपींद्र चरणासी वंदी । म्हणे रामचंद्र सुखी असे
२१३४	।।ना.गा.०३२१.०११।।	सहितसौमित्र वनामाजीं आहे । शुद्धीलागीं पाहे पाठविलें
२१३५	।।ना.गा.०३२१.०१२।।	तुझेनि वियोगें रामराजा दुःखी । यालागीं तुज देखीं पाठविलें

२१३६	।।ना.गा.०३२१.०१३।।	ऐकतांचि वाणी करीत आक्रोशा । म्हणे राम कैसा सोडियेला
२१३७	।।ना.गा.०३२१.०१४।।	नानापरी खेद आलाप करूनी । हा हा रामवाणी बोलतसे
२१३८	।।ना.गा.०३२१.०१५।।	समीप जे होते रक्षपाळ बळी । ऐकोनि आरोळी दूर जाले
२१३९	।।ना.गा.०३२१.०१६।।	तये संधीमध्यें हनुमंत खालौता । येवोनियां माता वंदितसे
२१४०	।।ना.गा.०३२१.०१७।।	क्षुधाक्रांत भारी म्हणे काय खाऊं । सांगसी उपाऊ तरी येथें
२१४१	।।ना.गा.०३२१.०१८।।	वनामाजी मेवा घेऊनियां कांहीं । क्षुधेसी ते पाही शांतवावी
२१४२	।।ना.गा.०३२१.०१९।।	म्हणे सीता दूता रक्षपाळ होती । निरोध करिती तुजलागीं
२१४३	।।ना.गा.०३२१.०२०।।	म्हणोनियां पाही भूमिगत कांहीं । घेऊनि स्वदेहीं विश्रांतीसी
२१४४	।।ना.गा.०३२१.०२१।।	पडलें तें घेई ऐसी आज्ञा पाही । वंदोनिया पायीं संतोषला
२१४५	।।ना.गा.०३२१.०२२।।	करोनी उड्डाण वृक्षमाथां बैसे । उपडोनि झाडास हालवीत
२१४६	।।ना.गा.०३२१.०२३।।	खालीं पाडी फळें तयांचे भोजन । करूनियां वन विध्वंसिलें
२१४७	।।ना.गा.०३२१.०२४।।	रक्षपाळ सारे मिळोनी कपींद्रा । धरावया सारा यत्न केला
२१४८	।।ना.गा.०३२१.०२५।।	न चढे हातासी बहु बळ त्यासी । राक्षसां विध्वंसी हातपायीं
२१४९	।।ना.गा.०३२१.०२६।।	वृक्षाचेनि घायें मारिलें उपायें । ऐसी बळ सोय दाखवीत
२१५०	।।ना.गा.०३२१.०२७।।	जंबूमाळी बागीं तया अधिकार । धांवोनी सत्वर रायापाशीं
२१५१	।।ना.गा.०३२१.०२८।।	मात ते घेऊनि आला तो धांवुनि । कपीराज वनीं आला एक
२१५२	।।ना.गा.०३२१.०२९।।	त्यानें सर्व वन पाडिलें उपडोन । कोणाचा तो कोण कळेना हो
२१५३	।।ना.गा.०३२१.०३०।।	राजा करी आज्ञा धरा बांधा त्याला । मारा वानराला वेगीं जा रे
२१५४	।।ना.गा.०३२१.०३१।।	ऐकतांचि वाणी भूपामुखींची हो । उठिले लवलाही राक्षसगण
२१५५	।।ना.गा.०३२१.०३२।।	जावोनि वेढिला कपिराजराणा । धनुष्यासी बाणां लावूनियां
२१५६	।।ना.गा.०३२१.०३३।।	मारितां बाणासी न लागे कपीसी । तेव्हां युक्ति कैसी आरंभिली
२१५७	।।ना.गा.०३२१.०३४।।	करूनि फांसासी धरूं म्हणती त्यासी । न ये तो फांसासी आटोपितां
२१५८	।।ना.गा.०३२१.०३५।।	धरिती जरी बाही निघोनियां जातां । न चढे तो हाता कवणाच्या
२१५९	।।ना.गा.०३२१.०३६।।	थोर जरी फांसा होत तो लहान । जाय तो निघोन फांशांतुनी
२१६०	।।ना.गा.०३२१.०३७।।	लहान जरी केला तरी होतो थोर । फांशाचा विचार व्यर्थ करिती
२१६१	।।ना.गा.०३२१.०३८।।	ऐशापरी जाले श्रमातुर भारी । कपि तो विचारी कार्य पुढें

२१६२	।।ना.गा.०३२१.०३९।।	म्हणून फांशांत पडे तो तेधवां । धरोनी वानरा नेती दूत
२१६३	।।ना.गा.०३२१.०४०।।	सन्मुख रावणें देखुनि कपीसी । करी कौतुकासी अपूर्व हो
२१६४	।।ना.गा.०३२१.०४१।।	कधीं नाहीं ऐसें स्वरूप देखिलें । येणें फार केलें नाशालागीं
२१६५	।।ना.गा.०३२१.०४२।।	पुसत तूं कोण कवण कार्यालागीं । पातलासी वेगीं याच ठायीं
२१६६	।।ना.गा.०३२१.०४३।।	वानर म्हणे आलों मूर्खा रावणा रे । रामदूत खरे सीताशुद्धि
२१६७	।।ना.गा.०३२१.०४४।।	ऐकोनि रावण म्हणे यासी जाळा । शेपूट गुंडाळा अग्नी लावा
२१६८	।।ना.गा.०३२१.०४५।।	कपीसी पुसिलें मरण कोणे ठायीं । येरू पुच्छ दावी म्हणोनियां
२१६९	।।ना.गा.०३२१.०४६।।	समग्र लंकेची आणोनियां वस्त्रें । कपी पुच्छ पुरे न होयची
२१७०	।।ना.गा.०३२१.०४७।।	तेव्हां राजधानी आणोनि वेष्टितां । परी तो पुरतां न होयची
२१७१	।।ना.गा.०३२१.०४८।।	तेव्हां तेल घाला म्हणे तो रावण । दूत ते धांवोन टाकिताती
२१७२	।।ना.गा.०३२१.०४९।।	लावूनि अग्निसी केला मोठा ज्वाळ । वानर तत्काळ उडाला हो
२१७३	।।ना.गा.०३२१.०५०।।	लंकेची ते केली सारी तेणें होळी । सहित मंडळी राजघरें
२१७४	।।ना.गा.०३२१.०५१।।	भुभु:कार केला वानर उडाला । लंकेमाजीं जाला प्रळय हो
२१७५	।।ना.गा.०३२१.०५२।।	अग्निचा उबाळा धुरानें दाटला । देखे कपी त्याला सुखरूप
२१७६	।।ना.गा.०३२१.०५३।।	मुखासी लागला पाहतांची डोळां । म्हणोनि तो जाला शामवर्ण
२१७७	।।ना.गा.०३२१.०५४।।	येवोनी लवलाही श्रीरामातें पाही । नमूनि सर्वही सांगितलें
२१७८	।।ना.गा.०३२१.०५५।।	तेव्हां नामा म्हणे होतों मी जवळां । चरणकमळां ध्यात तेथें
२१७९	।।ना.गा.०३२२.००१।।	पैल आला रामराणा । लंका दिधली बिभीषणा
२१८०	।।ना.गा.०३२२.००२।।	नळनीळ जांबुवंत । मध्यें चाले रघुनाथ
२१८१	।।ना.गा.०३२२.००३।।	मागें वानरांचे थाट । पुढें गर्जताती भाट
२१८२	।।ना.गा.०३२२.००४।।	केला अयोध्या प्रवेश । म्हणे नामा विष्णुदास
२१८३	।।ना.गा.०३२३.००१।।	गोरे सांवळे घनवटे । एक चालती एकापुढें
२१८४	।।ना.गा.०३२३.००२।।	राम निळीय गुढारी । कनकदंड चौरेवरी
२१८५	।।ना.गा.०३२३.००३।।	राम लक्ष्मण विजयी जाले । आनंदें अयोध्यें आले
२१८६	।।ना.गा.०३२३.००४।।	चंद्रगिरीचे तळवटीं । राम सीतेसी जाली भेटी
२१८७	।।ना.गा.०३२३.००५।।	चंद्रगिरी चला जाऊं । राम दाशरथी पाहूं

२१८८	।।ना.गा.०३२३.००६।।	चंद्रगिरी केला वास । म्हणे नामा विष्णुदास
२१८९	।।ना.गा.०३२४.००१।।	निर्गुणींचे वैभव आलें भक्तिमिषें । तें हें विठ्ठलवेषें ठसाविलें
२१९०	।।ना.गा.०३२४.००२।।	बरविया बरवें पाहतां नित्य नवें । हृदयीं ध्यातां निवे त्रिविधताप
२१९१	।।ना.गा.०३२४.००३।।	चोवीसांवेगळे सहस्रांआगळें। निर्गुणा निराळें शुद्धबुद्ध
२१९२	।।ना.गा.०३२४.००४।।	वेदां मौन पडे श्रुतीसी कानडें । वर्णितां कुवाडे पुराणांसी
२१९३	।।ना.गा.०३२४.००५।।	भावाचें आळुकें भुललें भक्तिसुखें । दिधलें पुंडलिकें साधूनियां
२१९४	।।ना.गा.०३२४.००६।।	नामा म्हणे आम्हां अनाथा लागुनी । निडारलें नयनीं वाट पाहे
२१९५	।।ना.गा.०३२५.००१।।	आषाढी कार्तिकी विसरूं नका मज । सांगतसे गुज पांडुरंग
२१९६	।।ना.गा.०३२५.००२।।	पतितपावन मी तो आहे खरा। तुमचेनि बरा दिसतसे
२१९७	।।ना.गा.०३२५.००३।।	तुम्हीं जातां गांवा हुरहुर माझे जीवा । भेटाल केधवां मजलागीं
२१९८	।।ना.गा.०३२५.००४।।	धांवोनियां देव गळा घाली मिठी । स्फुंदस्फुंदुन गोष्टी बोलतसे
२१९९	।।ना.गा.०३२५.००५।।	तिन्ही त्रिभुवनीं मज नाही कोणी । म्हणे चक्रपाणि नामयासी
२२००	।।ना.गा.०३२६.००१।।	निर्विकल्प निराकारू । नि:शून्य निराधारू । निर्गुण अपरंपारू । चिदानंद सांवळे
२२०१	।।ना.गा.०३२६.००२।।	तया पुंडलिकासाठीं । येऊनि उभे वाळवंटीं । दोन्ही कर ठेवूनि कटीं । प्रसन्न दृष्टी पाहातसे
२२०२	।।ना.गा.०३२६.००३।।	म्हणऊनि उठा घ्या रे वाट । ठाका पंढरी वैकुंठ । येर वाउगे काय कष्ट । ब्रह्मीं भेट पंढरीये
२२०३	।।ना.गा.०३२६.००४।।	मूळग्राम मायापूर । पडिलें भूतग्रामाचार । म्हणउनि कर जघनावर । उभा राहुनि दावितसे
२२०४	।।ना.गा.०३२६.००५।।	विठ्ठल नाम हृदयीं धरा । हाचि उतार पैलपारा । मग नाहीं येरझारा । शंभू कुमरा सांगतसे
२२०५	।।ना.गा.०३२६.००६।।	भेटी चौघे मुरडले । अठरा धांवतां भागले । पंथी साही भांडले । ते अद्यापि बुझले नाहीं
२२०६	।।ना.गा.०३२६.००७।।	जो सहस्रामाजीं न दिसे । चोविसांत न भासे। दो सहस्र अनारिसे। पाहतां अरे न दिसेचि
२२०७	।।ना.गा.०३२६.००८।।	लयलक्ष लावूनि समाधि । योगियां हेचि उपाधि । उघडा डोळा प्रेमपदीं। रे विठोजी न्याहाळा
२२०८	।।ना.गा.०३२६.००९।।	येर वाउगि खटपट । ठाका पंढरी वाळुवंट । हरुनि मनुष्यपण दृष्ट । चतुर्भुज करील
२२०९	।।ना.गा.०३२६.०१०।।	जना ऐहिक पाहारे हित । हें पंढरीचें कुळदैवत । येर वाउगे खेचर भूत । रे संगीत चित्रींचें
२२१०	।।ना.गा.०३२६.०११।।	पूर्वज उद्धरावयाचि चाडु । तरी वेणुनादी जेवण करा गोडु । कोटिकुळें उद्धरती सुरवाडू । तुम्ही रे पावाल कैवल्य
२२११	।।ना.गा.०३२६.०१२।।	धन्य धन्य तो संसारीं । जेणें देखिली पंढरी । जेणें सप्रेम होऊनि महाद्वारीं । लोटांगण घातलें
२२१२	।।ना.गा.०३२६.०१३।।	केलें चंद्रभागे स्नान । आणि संतचरणीं दर्शन । नामघोषें निवे मन । समाधान जीवासी
२२१३	।।ना.गा.०३२६.०१४।।	पंढरी हे वैकुंठ भुवन । म्हणऊनि करी कां रे दरुषन । मग नाहीं आया गमन । रे सुरगण वंदिती

२२१४	।।ना.गा.०३२६.०१५।।	भुक्ति मुक्तिचा दातारू। तो हा वोळगा सारंगधरू । नामया स्वामीचा दातारू । रुक्मादेवीवरू पंढरीये
२२१५	।।ना.गा.०३२७.००१।।	अनिर्वाच्य ब्रह्म निगम म्हणती । शिणले वेवादती अठरा साही
२२१६	।।ना.गा.०३२७.००२।।	तें हें पुंडलिकें चोहांटा ऊभें केलें। भावें भुलविलें पंढरीये
२२१७	।।ना.गा.०३२७.००३।।	घ्या रे घ्या रे तुम्हीं कैवल्याचें पीक । देतो पुंडलिक सकळ जीवां
२२१८	।।ना.गा.०३२७.००४।।	जें उपनिषदांचें मथित जें साराचें यथार्थ । तो हा पंढरीनाथ प्रगट जगीं
२२१९	।।ना.गा.०३२७.००५।।	हरिहर विरंची त्रिमूर्ती पैं हाचि । माउली दीनांची लोभापर
२२२०	।।ना.गा.०३२७.००६।।	जो श्रवणांचा श्रवण नयनांचा नयन । ज्ञानाचा दर्पण दृष्ट होय
२२२१	।।ना.गा.०३२७.००७।।	आदिमध्यअन्तीं व्यापक सर्वांभूतीं । तो हा आला व्यक्ति भक्तिभावें
२२२२	।।ना.गा.०३२७.००८।।	सच्चिदानंद आनंदघन परिपूर्ण । कारण महाकारण प्रभा हाचि
२२२३	।।ना.गा.०३२७.००९।।	चित्ता चेतवितां बुद्धिते पाळितां । मनादि चाळितां इंद्रियासी
२२२४	।।ना.गा.०३२७.०१०।।	तो या चराचरा जिवलग सोईरा । म्हणोनि अनुसरा पांडुरंगा
२२२५	।।ना.गा.०३२७.०११।।	नामा म्हणे काया वाचा मनें त्याचें । नाम जपा कैंचें जन्ममरण
२२२६	।।ना.गा.०३२८.००१।।	ज्ञानियांचें ज्ञेय ध्यानियांचें ध्येय । पुंडलिकाचें प्रिय सुख वस्तु
२२२७	।।ना.गा.०३२८.००२।।	तें हें समचरण उभें विटेवरी। पहा भीमातीरीं विठ्ठल रूप
२२२८	।।ना.गा.०३२८.००३।।	जें तपस्वियांचे तप जें जपकांचें जाप्य । योगियांचें गौप्य परमधाम
२२२९	।।ना.गा.०३२८.००४।।	जें तेजकांचें तेज जें गुरुमंत्राचें गुज। जें पूजकांचें पूज्य कुळदैवत
२२३०	।।ना.गा.०३२८.००५।।	जें जीवनातें जीवविते पवनातें निवविते । जें भक्तांचें उगविते मायाजाळ
२२३१	।।ना.गा.०३२८.००६।।	नामा म्हणे तें सुखचि आयतें । जोडलें पुंडलिकातें भाग्य योगें
२२३२	।।ना.गा.०३२९.००१।।	वेदां अगोचर परब्रह्म कारण । योगियां हृदयींचें परमतत्त्व निर्वाण । आकळूं न कळेचि शेखीं धरियेलें मौन। तें रूप पंढरिये विटे समचरण
२२३३	।।ना.गा.०३२९.००२।।	कानडा विठ्ठल वो उभा भिवरेतीरीं । भेटिचे आर्त वो जीवा लागलें भारी
२२३४	।।ना.गा.०३२९.००३।।	भूवैकुंठ पंढरी हे देवें रचियेली पैं गा । शिवें ती वंदियेली विठो समचरणांची गंगा । सदाचा नामघोषु कलिमल जाय भंगा । काय वानूं सुख तेथिचें भेटलिया पांडुरंगा
२२३५	।।ना.गा.०३२९.००४।।	विठ्ठल नाम वाचे जना हाचि उपचारु । म्हणवुनि दावीतसे कटीं ठेवूनियां करूं । येरासी मायानदी काम क्रोध मगरू । ठेवा हा नामयाचा स्वामी विठ्ठलवीरू
२२३६	।।ना.गा.०३३०.००१।।	वेडावली वाचा वेदाची बोलतां । देवा पाहूं जातां अनिर्वाच्य

२२३७	।।ना.गा.०३३०.००२।।	अनिर्वाच्य वाचा बोलावया गेली । जिव्हा हे चिरली भूधराची
२२३८	।।ना.गा.०३३०.००३।।	भूधराची जिव्हा जालीसे कुंठित । नामा म्हणे अंत नलगे त्याचा
२२३९	।।ना.गा.०३३१.००१।।	हवा हवा म्हणताती श्रुती । परि त्या नेणती भुललीया
२२४०	।।ना.गा.०३३१.००२।।	तुझिया रूपा नेणती अगा कमळापती। बाळक म्हणती गौळियांचें
२२४१	।।ना.गा.०३३१.००३।।	विष्णुदास नामयानें दावियेल्या खुणा । पंढरीचा राणा श्रीविठ्ठल
२२४२	।।ना.गा.०३३२.००१।।	पुष्पासी परिमळु दुध घृत मेळु । उंस तो रसाळू बीज नाहीं
२२४३	।।ना.गा.०३३२.००२।।	तैसें परब्रह्म आहे तें निर्वाण । वर्णितां पुराण न पडे ठायीं
२२४४	।।ना.गा.०३३२.००३।।	दीपाचीही दीप्ति दर्पणाची कांति । तैसी ब्रह्ममति कवण जाणे
२२४५	।।ना.गा.०३३२.००४।।	नामा म्हणे जैसें सर्वां घरी आकाश । केशव परमहंस तैसा जाणें
२२४६	।।ना.गा.०३३३.००१।।	निर्गुण सगुण नाहीं ज्या आकार । होऊनि साकार तोचि ठेला
२२४७	।।ना.गा.०३३३.००२।।	जळीं जळगार दिसे जैशा परी । तैसा निराकारीं साकार हा
२२४८	।।ना.गा.०३३३.००३।।	सुवर्ण कीं धन धन कीं सुवर्ण । निर्गुण सगुण ययापरी
२२४९	।।ना.गा.०३३३.००४।।	ऐसा पूर्णपणें सहजीं सहज । सखा केशिराज प्रगटला
२२५०	।।ना.गा.०३३३.००५।।	पांडुरंगीं अंगें सर्व जालें जग । निववी सर्वांग नामा म्हणे
२२५१	।।ना.गा.०३३४.००१।।	आपणची कर्ता आपणची मित्र । आपण सर्वत्र हरी जाला
२२५२	।।ना.गा.०३३४.००२।।	साधन साधितां हरि दिसे पूर्ण। प्रपंच हें भान न देखे डोळां
२२५३	।।ना.गा.०३३४.००३।।	किमर्थ हें टवाळ मायामोह जाळ । वांयांच पाल्हाळ कोरडे करी
२२५४	।।ना.गा.०३३४.००४।।	नामा म्हणे सखोल विठ्ठल पूर्ण बोल। उच्चारितां मोल नलगे कांहीं
२२५५	।।ना.गा.०३३५.००१।।	एक तत्त्व एकाकार सर्व देशीं । एक तो नेमेंसी सकल जनीं
२२५६	।।ना.गा.०३३५.००२।।	ऐसें ब्रह्म पहा आहे सर्व एक। नलगे विवेक करणें कांहीं
२२५७	।।ना.गा.०३३५.००३।।	मिथ्या हे डंबर माया मथितार्थ । हरि हाचि स्वार्थ वेगीं करी
२२५८	।।ना.गा.०३३५.००४।।	नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद । नाहीं भेदाभेद ब्रह्मपणीं
२२५९	।।ना.गा.०३३६.००१।।	ज्ञान सत्य मुक्त शुद्ध बुद्ध युक्त । कारण रहित निरंजन
२२६०	।।ना.गा.०३३६.००२।।	ते आम्हीं देखिले चर्मचक्षु दृष्टी । उभा वाळवंटीं पंढरीये
२२६१	।।ना.गा.०३३६.००३।।	वेदां अगोचर तयां सहस्रमुखा । तें जालें पुंडलिका लोभापर
२२६२	।।ना.गा.०३३६.००४।।	परतल्या श्रुती म्हणती नेति नेति । आम्हां गातां गीतीं सांपडलें

२२६३	।।ना.गा.०३३६.००५।।	स्वरूपाचा निर्धार नेणती पुराणें । शिणली दरुशनें वेवादतीं
२२६४	।।ना.गा.०३३६.००६।।	नामा म्हणे यासी भावची कारण। पावावया चरण केशवाचे
२२६५	।।ना.गा.०३३७.००१।।	ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण मुळीं नाहीं जग । सर्व माया योग कल्पनेचा
२२६६	।।ना.गा.०३३७.००२।।	स्थावर जंगम सर्व मायोपाधि। जाण पां त्रिशुद्धि आत्मज्ञानें
२२६७	।।ना.गा.०३३७.००३।।	रवीच्या किरणें जैसें मृगनीर । तैसें ब्रह्मीं कीर विश्व जालें
२२६८	।।ना.गा.०३३७.००४।।	नामा म्हणे विठ्या ऐक निज खूण । स्वरूपीं तल्लिन होऊनि राहे
२२६९	।।ना.गा.०३३८.००१।।	वंदावे तें काय निंदावें तें काय । सर्वांठायीं पाहे कोंदाटले
२२७०	।।ना.गा.०३३८.००२।।	आहे कवणा ठायीं नाहीं कवणा ठायीं । ठायींच्या पैं ठायीं कोंदाटलें
२२७१	।।ना.गा.०३३८.००३।।	रविरश्मीचें तेज सर्वांठायीं असे । त्या परि अनायासें बुझतु जाय
२२७२	।।ना.गा.०३३८.००४।।	भाव तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि कर्म। जाणोनियां वर्म म्हणे नामा
२२७३	।।ना.गा.०३३९.००१।।	हात पाय सर्व मिळोनियां मेळा । चला पाहूं डोळां म्हणताती
२२७४	।।ना.गा.०३३९.००२।।	देखणें तें नव्हें देखतील कैसें। देखणाची असे सर्व डोळां
२२७५	।।ना.गा.०३३९.००३।।	चंचुभुत अंश अंशांत मिळाली । निर्गुणाची खोली देव जाणे
२२७६	।।ना.गा.०३३९.००४।।	नामा म्हणे तेव्हां तुज पाहों आला । पाहोनि तो ठेला सर्वांभूतीं
२२७७	।।ना.गा.०३४०.००१।।	देख देख देख पैल पैल । पैल उभा असे विटेवरी
२२७८	।।ना.गा.०३४०.००२।।	खोळबुंथीचा आकारु झळके पीतांबरु। सौभाग्य सुंदरु विठ्ठल देव
२२७९	।।ना.गा.०३४०.००३।।	दान दीक्षा गुरु नामया दातारु । धरावया नागरु केशिराज
२२८०	।।ना.गा.०३४१.००१।।	काष्ठी अग्नी असे प्रगटे नयनीं । काष्ठींही असोनि वेगळाची
२२८१	।।ना.गा.०३४१.००२।।	तैसें निर्धारितां असे पैं सकळा । दावितां निराळा पांडुरंग
२२८२	।।ना.गा.०३४१.००३।।	तरु बीजीं जैसे सर्व व्यापक असे । जळाविण नसे फळ पहा कीं
२२८३	।।ना.गा.०३४१.००४।।	नामा म्हणे बीज नासिलें तें भोग। तूंचि पांडुरंग आम्हांसाठीं
२२८४	।।ना.गा.०३४२.००१।।	वैकुंठीं पाहें तंव चतुर्भुज दिसे । परि सुंदर रूप तेथें नाही
२२८५	।।ना.गा.०३४२.००२।।	क्षीरसागरीं पाहें तों तेथें निद्रिस्त। परि सुंदर रूप तेथें नाहीं
२२८६	।।ना.गा.०३४२.००३।।	द्वारकें पाहें तव पाताळीं चरण । परि सुंदर रूप तेथें नाहीं
२२८७	।।ना.गा.०३४२.००४।।	हृदयीं तव अव्यक्तची दिसे । परि सुंदर रूप तेथें नाहीं
२२८८	।।ना.गा.०३४२.००५।।	नामा म्हणे ऐसा सर्व गुण संपूर्ण । पंढरिये उभा शोभतसे

२२८९	।।ना.गा.०३४३.००१।।	निर्गुण सगुण नव्हे ते समान । तैसें तेंहि जाण योगाभ्यासीं
२२९०	।।ना.गा.०३४३.००२।।	प्रल्हादासी हरि शंख चक्र गदा। सगुण गोविंदा शोभतसे
२२९१	।।ना.गा.०३४३.००३।।	अर्जुनासी देव उभा पाचारासी। सखा उद्धवासी साक्ष दावी
२२९२	।।ना.गा.०३४३.००४।।	नामा म्हणे माझा केशिराज भोळा । दाविसी गोपाळा बाललीला
२२९३	।।ना.गा.०३४४.००१।।	अमराचें ठेवणें विश्वाचें जीवन । सौभाग्य लावण्य रखुमाईचें
२२९४	।।ना.गा.०३४४.००२।।	धन्य गौळियांचें जिणें कृष्ण बाळपण । यशोदानंदन क्रीडा करी
२२९५	।।ना.गा.०३४४.००३।।	अंगें स्थूलपणें ब्रह्म खेळा येणें । लीला सामावणें रोमरंध्री
२२९६	।।ना.गा.०३४४.००४।।	विष्णुदास नामा दैवेंचि लहाणें। ज्या घरीं खेळणें परब्रह्म
२२९७	।।ना.गा.०३४५.००१।।	धन्य गोकुळ महीतळीं मंडन । सुखावलें ब्रह्म जालें सगुण
२२९८	।।ना.गा.०३४५.००२।।	काय न कळे आवडी त्याचा भाव । सुख नेलें रे गोवळीं म्हणती देव
२२९९	।।ना.गा.०३४५.००३।।	आली वैकुंठभुवनीं विकृति । ते हे पाहवी गौळियांची विश्रांती
२३००	।।ना.गा.०३४५.००४।।	योगियांचें ध्यानीं उबगलें । तया गौळियांचे अनुरागीं रंगलें
२३०१	।।ना.गा.०३४५.००५।।	वेद श्रुतीसी पारू न कळे । कोण सुख सर्वांहुनि आगळें
२३०२	।।ना.गा.०३४५.००६।।	नामयाचा स्वामी आमुचें कुलदैवत । शरण जाऊनि गौळिया मागु उच्छिष्ट
२३०३	।।ना.गा.०३४६.००१।।	डोलत डोलत टकमक चाले । गोजिरीं पाउलें टाकूनियां
२३०४	।।ना.गा.०३४६.००२।।	पायीं रुणझुण वाजताती वाळे। गोपी पाहतां डोळे मन निवे
२३०५	।।ना.गा.०३४६.००३।।	सावळे सगुण मानसमोहन । गोपी रंजवण नामा म्हणे
२३०६	।।ना.गा.०३४७.००१।।	उपाधिनिर्मळ शोभती चरण । नादबिंदु पूर्ण मध्यभागीं
२३०७	।।ना.गा.०३४७.००२।।	कदंबावरतीं चढे वनमाळी । शोभती निढळा उर्ध्वपुंड्र
२३०८	।।ना.गा.०३४७.००३।।	श्रवणीं कुंडलें शोभती नक्षत्र । श्रीमुख पवित्र दिसों येत
२३०९	।।ना.गा.०३४७.००४।।	नामा म्हणे मज ढापवेना डोळे । करुणा कल्लोळें देखुनियां
२३१०	।।ना.गा.०३४८.००१।।	यमुने पाबळीं देखियली मूर्ति । तळपती दिप्तीं तेजोमय
२३११	।।ना.गा.०३४८.००२।।	सांवळें सुंदर ओंकार वर्तुळ। मध्यें घननीळ पाचारितो
२३१२	।।ना.गा.०३४८.००३।।	सुरंग ओतली प्रेमतनु छाया । तेणें तुझी माया काय वाणू
२३१३	।।ना.गा.०३४८.००४।।	नामा म्हणे विठो चातुर्य करुणा । गुणागुणीं किरणा प्रभा भासे
२३१४	।।ना.गा.०३४९.००१।।	विटेवरी समचरण सुंदर । बाळ सुकुमार यशोदेचें

२३१५	।।ना.गा.०३४९.००२।।	वाळे वांकी गर्जे तोडर चरणीं। नाद झणझणी वाजताती
२३१६	।।ना.गा.०३४९.००३।।	कासें कसियेला पीत पीतांबर । लोपे दिनकर तेणें प्रभा
२३१७	।।ना.गा.०३४९.००४।।	नामा म्हणे नाही तुझ्या रूपा पार । तेथें मी किंकर काय वानूं
२३१८	।।ना.गा.०३५०.००१।।	कमळगर्भ मनी थोर चिंता करी । पद्मठसे वरी उमटताती
२३१९	।।ना.गा.०३५०.००२।।	नीलोत्पल जैसें चरण वानूं कैसे। सुकुमार राजस विठ्ठलाचे
२३२०	।।ना.गा.०३५०.००३।।	लावण्यसागरु रूप पाहों ठेली । दृष्टी पैं खुंटली रुक्मिणीची
२३२१	।।ना.गा.०३५०.००४।।	नामा म्हणे विठोचे चरण सुकुमार । तेथें वाहे धार गंगादेवी
२३२२	।।ना.गा.०३५१.००१।।	काळा गे दादुला पाहतां आकळू । तो जाला गोवळू नंदाचा गे
२३२३	।।ना.गा.०३५१.००२।।	काळा गे दादुला काळा गे दादुला । पंढरीं पहा चला विठ्ठल गे
२३२४	।।ना.गा.०३५१.००३।।	काळा म्हणौनी पाहीं गेलों जवळां । सुनीळु सांवळा दिसतसे
२३२५	।।ना.गा.०३५१.००४।।	नामा म्हणे सर्व भक्षितो हा काळु । भक्तांचा कृपाळु श्रीविठ्ठल
२३२६	।।ना.गा.०३५२.००१।।	सहस्रदळांत आकाशाच्या परी । राहोनी शरीरीं शोभा दावी
२३२७	।।ना.गा.०३५२.००२।।	तेंचि नटे थाटे उभे विटेवरी। कर कटावरी ठेऊनियां
२३२८	।।ना.गा.०३५२.००३।।	जयाचिये नाभीं जन्मला विधाता । तेथोनी वाढता लोक जाला
२३२९	।।ना.गा.०३५२.००४।।	श्रुतीचिये वाचे नोहे गोचर । जेथें अवतार तिहीं देवा
२३३०	।।ना.गा.०३५२.००५।।	नामा म्हणे विश्वंभरु आणिक । अंगुळ दशक आहे जें कां
२३३१	।।ना.गा.०३५३.००१।।	परब्रह्ममूर्ति सांवळे सगुण । पंढरी निधान वाळुवंटी
२३३२	।।ना.गा.०३५३.००२।।	आनंद अमृत वोळला दरुशनें । तुटेल बंधन हेळामात्रें
२३३३	।।ना.गा.०३५३.००३।।	नामा म्हणे नको नामीं सदा मन । उभा नारायण भेटी पुरे
२३३४	।।ना.गा.०३५४.००१।।	कस्तुरी कुंकुम रेखे लाल टिळा । केशराची उटी सर्वांगासी
२३३५	।।ना.गा.०३५४.००२।।	पाहिला पाहिला माझा पांडुरंग । जिवीं जिवलग डोळे भरी
२३३६	।।ना.गा.०३५४.००३।।	हार शोभे गळां मंजुरीचा तुरा । कर्ण रत्नफळा झळाळित
२३३७	।।ना.गा.०३५४.००४।।	विटेवरी नीट गोमटीं पाउलें। त्यांवरी ठेविलें मस्तक म्यां
२३३८	।।ना.गा.०३५४.००५।।	नामयाची धणी भुकेली ते धाली। आनंद दिवाळी आजि जाली
२३३९	।।ना.गा.०३५५.००१।।	सुखाचें हें सुख श्रीहरि मुख । पाहतांही भूक तहान गेली
२३४०	।।ना.गा.०३५५.००२।।	भेटली भेटली विठाई माउली। वासना निवाली जिवांतील

२३४१	।।ना.गा.०३५५.००३।।	चंद्रासी चकोर मेघासी मयूर । वाटे तैसा भर आनंदाचा
२३४२	।।ना.गा.०३५५.००४।।	नामा म्हणे पाप आणि ताप दु:ख । गेलें जालें सुख बोलवेना
२३४३	।।ना.गा.०३५६.००१।।	माझ्या मनें तुझ्या चरणीं दिली बुडी । इन्द्रियें बापुडीं वेडावलीं
२३४४	।।ना.गा.०३५६.००२।।	आतां विषयसुख जाणावें हें कोणें । जाणोनी भोगणें कोणे स्वामी
२३४५	।।ना.गा.०३५६.००३।।	देह सहज स्थिति राहिलें निष्काम । हृदयीं सदा प्रेम वोसंडत
२३४६	।।ना.गा.०३५६.००४।।	नामा म्हणे केशवा कृपेच्या सागरा । तूं आम्हां सोयरा आदि अंतीं
२३४७	।।ना.गा.०३५७.००१।।	शांति भीमातीरी भक्ति पंढरपुरीं । प्रेम विटेवरी देखियेलें
२३४८	।।ना.गा.०३५७.००२।।	देखिला गे माय देखिला गे माय । देखिला गे माय पंढरीये
२३४९	।।ना.गा.०३५७.००३।।	नामारूपातीत नित्य सदोदित । जेथें विरे चित्त योगियांचें
२३५०	।।ना.गा.०३५७.००४।।	दुरी ना जवळी त्रिपुटीं वेगळा । केशव भेटला नामा म्हणे
२३५१	।।ना.गा.०३५८.००१।।	योगियांचें ब्रह्म शून्य व्योमाकार । आमुचे साकार विटेवरी
२३५२	।।ना.गा.०३५८.००२।।	दाटुगें नागर कटीं ठेऊनि कर। सर्वस्वें उदार भक्तांलागीं
२३५३	।।ना.गा.०३५८.००३।।	ज्ञानीया सिद्धांतीं लक्षापरी नये । आमुची वाट पाहे अनाथाची
२३५४	।।ना.गा.०३५८.००४।।	पुंडलिकाप्रति भावा वोळलें वोरसें। नेणों काय कैसें प्रेम त्याचें
२३५५	।।ना.गा.०३५८.००५।।	जाप्यकाचें जाप्य नाम मंत्रमय । आमुचें भक्तिप्रिय संसारिकां
२३५६	।।ना.गा.०३५८.००६।।	नामा म्हणे जीवें करीन ओंवाळणी । झणीं चक्रपाणी दिठावसी
२३५७	।।ना.गा.०३५९.००१।।	श्रीमुख साजिरें कुंडलें गोमटीं । तेथें माझी दृष्टी बैसलीसे
२३५८	।।ना.गा.०३५९.००२।।	कटावरी कर समचरण साजिरे। देखावया झुरे माझें मन
२३५९	।।ना.गा.०३५९.००३।।	माहेरींची आस दसरा दिवाळी । बाहे ठेवीं निढळी वाट पाहे
२३६०	।।ना.गा.०३५९.००४।।	बंदिजन नामा उभा महाद्वारीं । कीर्ति चराचरीं वर्णितसे
२३६१	।।ना.गा.०३६०.००१।।	चाळक माझें मन पांगुळ पैं जालें। हारपोनी गेलें साक्षात्कारें
२३६२	।।ना.गा.०३६०.००२।।	मन हारपलें करूं आतां काय । पहावया गेलें तो परतोनी कां न ये
२३६३	।।ना.गा.०३६०.००३।।	भक्ति ज्ञान वैराग्य अवघेंचि आहे । अवघेंचि होये अवघें येणें
२३६४	।।ना.गा.०३६०.००४।।	नामा म्हणे जनाबाई आहे वो कैसा। बाबा उदकीं घट बुडोनी ठेला जैसा
२३६५	।।ना.गा.०३६१.००१।।	केशवाचें नाम्या लागलेसें ध्यान । देखे त्रिभुवन तदाकार
२३६६	।।ना.गा.०३६१.००२।।	जया तया म्हणे माझा चक्रपाणि। जाय लोटांगणीं सर्व भावें

२३६७	।।ना.गा.०३६१.००३।।	प्रेम वोथरत नामाचेनि छंदें । हृदय प्रेमानंदें वोसंडत
२३६८	।।ना.गा.०३६१.००४।।	धांवूनि येऊनि चरणाजवळी । वंदी पायधुळी सर्वभावें
२३६९	।।ना.गा.०३६१.००५।।	घन:श्याम मूर्ति सुंदर सांवळी । ध्यान हृदयकमळीं नित्य राहे
२३७०	।।ना.गा.०३६१.००६।।	भाग्यवंत नामा भक्तां शिरोमणी । अखंड उन्मनी भोगितसे
२३७१	।।ना.गा.०३६२.००१।।	वेणू वाहूनि चित्त दुहिले । रूप दाऊनि मज मोहियलें
२३७२	।।ना.गा.०३६२.००२।।	वेधी वेधकू गोपाळ लाघवी । जीवा लावियली आवडी निच नवी
२३७३	।।ना.गा.०३६२.००३।।	दृष्टीपुढें माझें ध्यान ठेवियेले । वृत्तिसहित मन तेथें माझें गोविलें
२३७४	।।ना.गा.०३६२.००४।।	शुद्धशाम कमळदळलोचनु । पावा बाहातसे देहुडा रुणुझुणु
२३७५	।।ना.गा.०३६२.००५।।	तया प्रभा दिसती दिशा निर्मळ । कृष्ण पाहतां मन जालें व्याकुळ
२३७६	।।ना.गा.०३६२.००६।।	नामया स्वामीचें अनुपम्य रूपडें । पाहतां मन मुरडे माघारें
२३७७	।।ना.गा.०३६३.००१।।	शाममूर्ति डोळस सुंदर सांवळी । ते ध्यान हृदयकमळीं धरूनि ठेला
२३७८	।।ना.गा.०३६३.००२।।	सकळ स्थिति सुखाचा अनुभव जाला। सकळ विसरला देहभाव
२३७९	।।ना.गा.०३६३.००३।।	पांगुळलें मन स्वरूपीं गुंतलें । बोलणें खुंटलें प्रपंचाचें
२३८०	।।ना.गा.०३६३.००४।।	सबाह्याभ्यंतरीं स्वरूप कोंदलें। द्वैत निरसलें चंद्राकारें
२३८१	।।ना.गा.०३६३.००५।।	निज निर्धारितां नयन सोज्वळ जाले । रोमांच दाटले स्वरवीत
२३८२	।।ना.गा.०३६३.००६।।	नामामृताचा घन वोळला अंबरीं । वर्षाव सहस्रधारी होत असे
२३८३	।।ना.गा.०३६३.००७।।	तें क्षीर सेवितां जालें समाधान । चुकलें जन्ममरण कल्पकोडी
२३८४	।।ना.गा.०३६३.००८।।	सहज सुखें निवाला भवदु:ख विसरला । विसांवा भेटला पांडुरंग
२३८५	।।ना.गा.०३६३.००९।।	नामा म्हणे देवा दृष्टी लागे क्षणीं । पुंडलिका धर्में करूनि जोडिलासी
२३८६	।।ना.गा.०३६४.००१।।	जीव विठ्ठल शिव विठ्ठल । आत्मा विठ्ठल अखंडित
२३८७	।।ना.गा.०३६४.००२।।	जनक विठ्ठल जननी विठ्ठल । सोयरा विठ्ठल सांगाती
२३८८	।।ना.गा.०३६४.००३।।	अहिक्य विठ्ठल परत्र विठ्ठल । निरंतर विठ्ठल तारिता
२३८९	।।ना.गा.०३६४.००४।।	नाम विठ्ठल रूप विठ्ठल । पतित पावन विठ्ठल विठ्ठल नामा
२३९०	।।ना.गा.०३६५.००१।।	तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल
२३९१	।।ना.गा.०३६५.००२।।	माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल
२३९२	।।ना.गा.०३६५.००३।।	गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल । निधान विठ्ठल निरंतर विठ्ठल

२३९३	।।ना.गा.०३६५.००४।।	नामा म्हणे मज विठ्ठल सांपडला । म्हणोनि कळिकाळा पाड नाही
२३९४	।।ना.गा.०३६६.००१।।	माता पिता बंधू भगिनी इष्टमित्र विठ्ठला तूं रे
२३९५	।।ना.गा.०३६६.००२।।	बापा यावें भेटावें विसावा माझा गा तूं। माझा कुळाचार माहेर रे जिव्हार विठ्ठला तूं
२३९६	।।ना.गा.०३६६.००३।।	माझें विद्याधन आयुष्य आरोग्यता विठ्ठला तूं गा । माझें तप व्रत तीर्थ दान पुण्य विठोबा तूं गा
२३९७	।।ना.गा.०३६६.००४।।	माझा गुरुमंत्र दैवत आगम निगम विठ्ठला तूं गा । भूपति सुरपति ब्रह्ममूर्ति विठोबा तूं गा
२३९८	।।ना.गा.०३६६.००५।।	माझा आचार विचार सत्यवाद धीर धर्म विठोबा तूं गा । यश कीर्ती निवृत्ति आतां माझी तृप्ति विठोबा तूं गा
२३९९	।।ना.गा.०३६६.००६।।	माझे यम नियम प्राणायाम प्रत्याहार विठ्ठला तूं गा । नामा म्हणे विठोबा केशव परमात्मा माझा तूं गा
२४००	।।ना.गा.०३६७.००१।।	बरवेपण बरवा बाप मदनाचा । तो स्वामी आमुचा पंढरिराव
२४०१	।।ना.गा.०३६७.००२।।	उदारपणे उदार दाता त्रैलोक्याचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव
२४०२	।।ना.गा.०३६७.००३।।	झुंजार आणि शूर अरी त्या दैत्यांचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव
२४०३	।।ना.गा.०३६७.००४।।	चतुरपणें चतुर बाप ब्रह्मयाचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव
२४०४	।।ना.गा.०३६७.००५।।	पवित्रपणें पवित्र उद्धार तीर्थांचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव
२४०५	।।ना.गा.०३६७.००६।।	नामा म्हणे आधार सकळां जीवांचा । तो स्वामी आमुचा पंढरिराव
२४०६	।।ना.गा.०३६८.००१।।	विटेवरी उभा दीनांचा कैवारी । भेटाया उभारी दोन्ही बाह्या
२४०७	।।ना.गा.०३६८.००२।।	गुण दोष त्याचे न पाहेचि डोळां । भेटे वेळोवेळां केशिराज
२४०८	।।ना.गा.०३६८.००३।।	ऐसा दयावंत घेत समाचार । लहान आणि थोर सांभाळितो
२४०९	।।ना.गा.०३६८.००४।।	सर्वांलागीं देतो समान दरुशन । उभा तो आपण समपायीं
२४१०	।।ना.गा.०३६८.००५।।	नामा म्हणे तया संतांची आवडी। भेटावया कडाडी उभाची असे
२४११	।।ना.गा.०३६९.००१।।	दीनाची माउली । आजि म्यां देखियेली
२४१२	।।ना.गा.०३६९.००२।।	कटीं ठेऊनियां कर । उभी राहे विटेवर
२४१३	।।ना.गा.०३६९.००३।।	मुगुट रत्नांचा साजिरा। वरी मोतियांचा तुरा
२४१४	।।ना.गा.०३६९.००४।।	रूप लावण्य गोजिरें । हृदयीं पदक साजिरें
२४१५	।।ना.गा.०३६९.००५।।	कांसे पिवळा पीतांबर । चरणी ब्रीदाचा तोडर
२४१६	।।ना.गा.०३६९.००६।।	भक्तां कृपेची सावली । नामा वंदी पायधुळी
२४१७	।।ना.गा.०३७०.००१।।	आषाढी कार्तिकी हेचि आम्हां सुगी । शोभा पांडुरंगीं घनवटे
२४१८	।।ना.गा.०३७०.००२।।	संतांची दर्शने हेंचि पीक जाण । देतां आलिंगन देह निवे

२४१९	||ना.गा.०३७०.००३||	देह निवे किती नवल सांगावें । जीवासी दुणावे ब्रह्मानंद
२४२०	||ना.गा.०३७०.००४||	नामा म्हणे यासी मूळ पांडुरंग । त्याचेनि अव्यंग सुख आम्हां
२४२१	||ना.गा.०३७१.००१||	आवडे जें जीवा तें पंढरीये उभे । पुंडलिकें लोभें राहविलें
२४२२	||ना.गा.०३७१.००२||	जोडुनि पाऊलें ठेवियलीं विट। करद्वय गोमटें कटावरी
२४२३	||ना.गा.०३७१.००३||	कान मुख डोळे न म्हणती पुरे । सेवितां न पुरे धणी मना
२४२४	||ना.गा.०३७१.००४||	गोड लागे पोट न भरे न धाये । भूकेलीच राहे भूक सदा
२४२५	||ना.गा.०३७१.००५||	नामा म्हणे संत–संगतीं विश्वास । घेऊं अनुभवास फार फार
२४२६	||ना.गा.०३७२.००१||	जयालागीं हृदय उले । ते म्यां जीवेंसि धरिलें
२४२७	||ना.गा.०३७२.००२||	विठ्ठलाचीं पाऊलें । म्यां मस्तकीं वाहिलीं
२४२८	||ना.गा.०३७२.००३||	नामा म्हणे मुनि रंगलें । तें म्यां जीवेंसि धरिलें
२४२९	||ना.गा.०३७३.००१||	आमुचा विठ्ठल प्रचंड । इतरां देवांचें न पाहूं तोंड
२४३०	||ना.गा.०३७३.००२||	एका विठ्ठलावांचून । न करुं आणिक भजन
२४३१	||ना.गा.०३७३.००३||	आम्हां एकविध भाव । कदा न म्हणूं इतरां देव
२४३२	||ना.गा.०३७३.००४||	नित्य करूं हा अभ्यास । म्हणे नामा विष्णुदास
२४३३	||ना.गा.०३७४.००१||	भजूं एका विठोबास । आणिक न करूं अभ्यास
२४३४	||ना.गा.०३७४.००२||	येथें साधन आहे एक । पाहों विठोबाचें मुख
२४३५	||ना.गा.०३७४.००३||	वर्णू हरीचे पवाडे । काळ लावूं देशधडे
२४३६	||ना.गा.०३७४.००४||	नामा विष्णुदास म्हणे । ऐसें करूं हरिकीर्तन
२४३७	||ना.गा.०३७५.००१||	जीवप्राणें एक विठ्ठलची व्हावा । ऐसिया मी भावा रतलिया
२४३८	||ना.गा.०३७५.००२||	आवडे पंढरी आवडे चंद्रभागा। येती यमुनागंगा प्रतिदिनीं
२४३९	||ना.गा.०३७५.००३||	आवडे पद्मतीर्थ आवडे गरुडपार । राउळीं माहेर पांडुरंग
२४४०	||ना.गा.०३७५.००४||	नामा म्हणे अहा विठाई रुक्माई । आणिकांपाशी नाही चित्त माझें
२४४१	||ना.गा.०३७६.००१||	न पाहे गे माय विठाईविण डोळां । सर्वस्वें कंटाळा आणिकांचा
२४४२	||ना.गा.०३७६.००२||	विठोविण कांहीं नायकें मी कानीं । जडली चरणीं चित्तवृत्ती
२४४३	||ना.गा.०३७६.००३||	आणिकांचे मार्गीं न चालोत पाय । जीव वोढे सयें पांडुरंग
२४४४	||ना.गा.०३७६.००४||	नामा म्हणे करीं आणिकांची पूजा। न करीं गरुडध्वजावांचुनियां

२४४५	।।ना.गा.०३७७.००१।।	विठ्ठल कानडे बोलूं जाणे । त्याची भाषा पुंडलिक नेणें
२४४६	।।ना.गा.०३७७.००२।।	युगें अठ्ठावीस जालीं । दोघां नाहीं बोलाबोली
२४४७	।।ना.गा.०३७७.००३।।	कर ठेवूनि कटावरी । उभा भिंवरेच्या तीरीं
२४४८	।।ना.गा.०३७७.००४।।	नामा म्हणे स्वामी माझा । उभा भक्तांचिया काजा
२४४९	।।ना.गा.०३७८.००१।।	मान तोडावया कर शस्त्रांचे । कठिण बहुतांचे उभारिले
२४५०	।।ना.गा.०३७८.००२।।	तरी न वदे न वदे आन । आन कांहीं या विठोबावांचून
२४५१	।।ना.गा.०३७८.००३।।	विठोबा परतें दैवत आहे म्हणती । ऐसें श्रुतिस्मृती जरी बोलती
२४५२	।।ना.गा.०३७८.००४।।	तरी ते अपशब्द कानीं पडो न द्यावें । पाखांडीं म्हणती जरी उगेंचि असावें
२४५३	।।ना.गा.०३७८.००५।।	ब्रह्मदेवेसी जालिया भेटी । तोहि जरी वदेल ऐसिया गोष्टी
२४५४	।।ना.गा.०३७८.००६।।	या विठोबापरते दैवत म्हणेल सृष्टीं । चळला पोटीं निभ्रांत जाणा
२४५५	।।ना.गा.०३७८.००७।।	कोटी कोटी ब्रह्मांडें एक एक रोमीं । व्यापूनियां व्योमीं वर्ततसे
२४५६	।।ना.गा.०३७८.००८।।	तो हा माझा विठोबा सर्वाघटीं सम । न सांडावें वर्म म्हणे नामा
२४५७	।।ना.गा.०३७९.००१।।	बांधिलें राहीना वैरलें खाईना । दवडिलें जाईना जाणते हो
२४५८	।।ना.गा.०३७९.००२।।	तया खुंटा नांदावें सैरा वैरा धावे । कशानें करावें वोढाळे वो
२४५९	।।ना.गा.०३७९.००३।।	तया नेत्र वा पाय तिन्हीं एक पाहे । न देखावें तें ठाय देखताहे
२४६०	।।ना.गा.०३७९.००४।।	नामा म्हणे श्रोता विचारावें ज्ञानी । केशवाचे नयनीं उतरला
२४६१	।।ना.गा.०३८०.००१।।	ध्यान धारणा न लगे टाळी । विठो पाहावा उघडे डोळी
२४६२	।।ना.गा.०३८०.००२।।	विठो समाधीचें सुख । पाहातां हरे तहानभूक
२४६३	।।ना.गा.०३८०.००३।।	नामा म्हणे न लगे कांहीं । चित्त रंगो हरिचे पायीं
२४६४	।।ना.गा.०३८१.००१।।	येतियां पुसे जातियां धाडी निरोप । पंढरपुरीं आहे माझा मायबाप
२४६५	।।ना.गा.०३८१.००२।।	येईवो येईवो येईवो विठाबाई माउली ये। निढळावरी कर ठेऊनि वाट पाहे
२४६६	।।ना.गा.०३८१.००३।।	पिवळा पितांबर गगनीं झळकला । गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला
२४६७	।।ना.गा.०३८१.००४।।	विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी । विष्णुदास नामा जीवें भावें ओवाळी
२४६८	।।ना.गा.०३८२.००१।।	विठ्ठलेंविण जया न जमे एक घडी । सर्वस्व आवडी विठ्ठलाचि
२४६९	।।ना.गा.०३८२.००२।।	विठ्ठलचि माता विठ्ठलचि पिता । भगिनी आणि भ्राता विठ्ठलचि
२४७०	।।ना.गा.०३८२.००३।।	विठ्ठलचि क्रिया विठ्ठलचि कर्म । विठ्ठल सकळ धर्म कुळदैवत

२४७१	।।ना.गा.०३८२.००४।।	गुज गौप्य जीवीचें विठ्ठला सांगावें । विठ्ठलें पुरवावें कोड त्याचें
२४७२	।।ना.गा.०३८२.००५।।	सर्वकाळ करणें विठ्ठलाची कथा। विठ्ठल जडला चित्ता जयाचियां
२४७३	।।ना.गा.०३८२.००६।।	विठ्ठल जागृती स्वप्न आणि सुषुप्ति । अखंड वदती विठ्ठल विठ्ठल
२४७४	।।ना.गा.०३८२.००७।।	ऐसें सर्वस्वेंसी विठ्ठल भजतां । सुख आलें हाता विठ्ठलाचें
२४७५	।।ना.गा.०३८२.००८।।	नामा म्हणे त्याचें चरणरज होऊन । जाहलासे पावन म्हणे आतां
२४७६	।।ना.गा.०३८३.००१।।	विठ्ठल विसावा सकळिकां। विठ्ठल आधार तिहीं लोकां । विठ्ठल न कळे ब्रह्मादिकां । विठ्ठल देखा पंढरिये
२४७७	।।ना.गा.०३८३.००२।।	विठ्ठल डोळस सांवळा । विठ्ठल पहाती अबलाबाळा । विठ्ठल ध्यावा वेळोवेळां । विठ्ठल कमलावल्लभ
२४७८	।।ना.गा.०३८३.००३।।	विठ्ठल धरा रे मानसीं । विठ्ठल सोडवील अहर्निशीं । विठ्ठलाविण मुक्ती कैंची । कुंटणी गणिकेसी उद्धरिलें
२४७९	।।ना.गा.०३८३.००४।।	विठ्ठल उभा भीमातीरीं। कर ठेवूनि कटावरी । विठ्ठल भक्तकाज कैवारी । विठ्ठल हरी महादोष
२४८०	।।ना.गा.०३८३.००५।।	विठ्ठल अनाथ कोंवसा । विठ्ठल नुपेक्षी भरवंसा। विठ्ठलेंविण शून्य दाही दिशा । विठ्ठलाविण नाही हें अनेक
२४८१	।।ना.गा.०३८३.००६।।	श्रीविठ्ठल धन्य दिवस । श्रीविठ्ठल भक्तिरस । श्रीविठ्ठल परमपुरुष । विष्णुदास म्हणे नामा
२४८२	।।ना.गा.०३८४.००१।।	दोन्ही हात ठेवोनि कटा । उभा भिंवरेच्या तटा
२४८३	।।ना.गा.०३८४.००२।।	हरि बरवया बरवया । विठोबा पंढरीच्या राया
२४८४	।।ना.गा.०३८४.००३।।	नामा म्हणे वेगीं धांवा । देव आले याचि गांवा
२४८५	।।ना.गा.०३८५.००१।।	आघवें तीर्थ तीर्थरूप । परि तें विठ्ठल चरणींचें स्वरूप । विठ्ठल देखिलीया निष्पाप । जीवजंतू होताती
२४८६	।।ना.गा.०३८५.००२।।	एवढें क्षेत्र पांडुरंग । सर्वा तीर्थांमाजीं अभंग । धरिलिया संतसंग । महादोष हरताती
२४८७	।।ना.गा.०३८५.००३।।	हरिकीर्तन करीं वेगीं । हेंचि उद्धरील जगालागीं । जें जें अनुसरलें पांडुरंगीं । तें तें गेलें वैकुंठ
२४८८	।।ना.गा.०३८५.००४।।	नामा जपे सदा काळीं । रामकृष्ण नामावळीं । विठ्ठल विठ्ठल हृदयकमळीं । जपतसे सर्वदा
२४८९	।।ना.गा.०३८६.००१।।	केशव आराध्य देवाचांहि देव । पंढरीचा राव पांडुरंग
२४९०	।।ना.गा.०३८६.००२।।	पांडुरंगाविण नाहीं त्रिभुवनीं । भोळा चक्रपाणिवांचुनियां
२४९१	।।ना.गा.०३८६.००३।।	नामा म्हणे ध्यानीं ध्यावें विठोबासी । अखंड मानसीं भजा देवा
२४९२	।।ना.गा.०३८७.००१।।	अनंत म्हणती माझिया स्वामीतें। अनंत गुण त्यांतें म्हणोनियां
२४९३	।।ना.गा.०३८७.००२।।	पतितपावन म्हणती माझिया स्वामीतें । उद्धरी पतितातें म्हणोनियां
२४९४	।।ना.गा.०३८७.००३।।	विश्वंभर म्हणती माझिया स्वामीतें । पोशितो विश्वातें म्हणोनियां
२४९५	।।ना.गा.०३८७.००४।।	जगजीवन म्हणती माझिया स्वामीतें । जीवन जगातें म्हणोनियां
२४९६	।।ना.गा.०३८७.००५।।	हृषिकेश म्हणती माझिया स्वामीतें। चाळी इंद्रियातें म्हणोनियां

२४९७	।।ना.गा.०३८७.००६।।	नामा म्हणे केशव म्हणती स्वामीतें । नासितो क्लेशातें म्हणोनियां
२४९८	।।ना.गा.०३८८.००१।।	संपूर्ण विश्वाचा आत्म्याचा जो आत्मा । तोचि हा परमात्मा विटेवरी
२४९९	।।ना.गा.०३८८.००२।।	द्वादश लिंगाचें जें का आत्मलिंग । तें हें पांडुरंग विटेवरी
२५००	।।ना.गा.०३८८.००३।।	अनंत सूर्याची ज्योतीची निजज्योती । ती हि उभी मूर्ति विटेवरी
२५०१	।।ना.गा.०३८८.००४।।	अनंत शक्तीची जी निजशक्ती। ती हि उभी मूर्ती विटेवरी
२५०२	।।ना.गा.०३८८.००५।।	अनंत ब्रह्माचें जे कां निजब्रह्म । तें हें परब्रह्म विटेवरी
२५०३	।।ना.गा.०३८८.००६।।	अवघ्या चैतन्याचें जें कां निजचैतन्य । तेहे समध्यान विटेवरी
२५०४	।।ना.गा.०३८८.००७।।	अनंत विराटाचे स्वरूपाचे निजरूप । ते हे चिद्रूप विटेवरी
२५०५	।।ना.गा.०३८८.००८।।	अनंत वेदांच्या अर्थाचा निजअर्थ । तोचि महाअर्थ विटेवरी
२५०६	।।ना.गा.०३८८.००९।।	अनंत शास्त्राचें पुराणाचें सार । त्याचेंही जिव्हार विटेवरी
२५०७	।।ना.गा.०३८८.०१०।।	अनंत सिद्धीची जी कां निजसिद्धी । तें हें महासिद्धी विटेवरी
२५०८	।।ना.गा.०३८८.०११।।	चहुंहि वाचेचि जी निजवाचा । तें हें अनिर्वाच्य विटेवरी
२५०९	।।ना.गा.०३८८.०१२।।	भक्तीची निजभक्ति मुक्तिची निजमुक्ति । शांतीची निजशांती विटेवरी
२५१०	।।ना.गा.०३८८.०१३।।	क्रोधाचा महाक्रोध बोधाचा महाबोध। शुद्धाचाहि शुद्ध विटेवरी
२५११	।।ना.गा.०३८८.०१४।।	काळाचा महाकाळ वेळेची महावेळ । फळाचें महाफळ विटेवरी
२५१२	।।ना.गा.०३८८.०१५।।	अनंत पिंडाचें ब्रह्मांडसहित । सांठवण सत्य विटेवरी
२५१३	।।ना.गा.०३८८.०१६।।	अनंत सत्त्वाचे जें कां निजसत्त्व । तत्त्वाचें निजतत्त्व विटेवरी
२५१४	।।ना.गा.०३८८.०१७।।	सर्व संबंधाचा जो कां निजसंबंध । आनंदाचा कंद विटेवरी
२५१५	।।ना.गा.०३८८.०१८।।	नामा म्हणे सर्व सुखाचा आराम । धाम परम धाम विटेवरी
२५१६	।।ना.गा.०३८९.००१।।	अहो त्रिभुवनामाझारीं । भूवैकुंठ पंढरी । चंद्रभागा सरोवरीं । विटेवरी नीट उभा
२५१७	।।ना.गा.०३८९.००२।।	उभा कैवल्यनायक । दृष्टी सन्मुख पुंडलीक । ज्याचे ब्रह्मादिक सेवक । इतरां कवण पाड
२५१८	।।ना.गा.०३८९.००३।।	सुरंग रंगे चरणतळें। रातलीं रातोत्पळें । जिंकिलीं माणिक निळें । मज पाहातां बाई
२५१९	।।ना.गा.०३८९.००४।।	पद अंकुश पताका । ध्वज वज्रांकित रेखा । तेथें लक्ष्मी रतली देखा । सिंधुतनया बाई
२५२०	।।ना.गा.०३८९.००५।।	अनुपम्य गे माय अनुपम्य सार । परब्रह्म वो साकार । मंत्रमय त्रिअक्षर । विठ्ठलनाम बाई
२५२१	।।ना.गा.०३८९.००६।।	तें गा प्रत्यक्ष ध्यान । सर्व सुखाचें निधान। दृष्टीं पाहातांचि मन । माझें परतेना
२५२२	।।ना.गा.०३८९.००७।।	न लागे पातया पातें । लक्ष लागलें निरुतें। सुख जालें बा मनातें। तें काय सांगें वो माय

२५२३	।।ना.गा.०३८९.००८।।	मन इंद्रियें वेधलीं । घर वृत्तीचें रिघाली । काय स्वानंदा मुकलीं । वेगळेंपणें
२५२४	।।ना.गा.०३८९.००९।।	पदद्वयाची ठेवणी। इंद्रनीळ गुल्फमणी । गंगा मिरवत चरणीं । वांकी तोडर पायीं
२५२५	।।ना.गा.०३८९.०१०।।	सरळ अंगोळियावरी । नखें वर्तुळ साजिरीं । चंद्र देखोनि अंबरीं । झाला कळाहीन
२५२६	।।ना.गा.०३८९.०११।।	पोटरीया जानु जंघ। मर्गजमणीचे स्तंभ । कैसे वोळले स्वयंभ । ओघ जैसे कालिंदीचे
२५२७	।।ना.गा.०३८९.०१२।।	पितांबर माळ कंठी । रत्नकिळा बरवंटीं । विद्युल्लतेच्या थाटीं । जैशा मेघमंडळीं
२५२८	।।ना.गा.०३८९.०१३।।	वीर कंकणें मनगटीं । काठेवाडी मुद्रिका दाटी । साज सामावे जी मुठीं । वरी कटीं कटिसूत्र
२५२९	।।ना.गा.०३८९.०१४।।	नाभीं सरोज गहन । ब्रह्मयाचें जन्मस्थान । वरी त्रिवळी लक्षण । कैसें शोभे रोमराजी
२५३०	।।ना.गा.०३८९.०१५।।	काय वाणूं तें उदर । सांठवलें चराचर । ब्रह्मगोळ निरंतर । जया रोमरंध्रीं
२५३१	।।ना.गा.०३८९.०१६।।	तनु मृदु शाम निर्मळ । प्रभा दिसती सोज्वळ । जेवीं ओळलेंसे जळ । घनमंडळीं
२५३२	।।ना.गा.०३८९.०१७।।	शुद्ध चंदन पातळ । आंगी चर्चिला निर्मळ । जेवीं इंद्रनीळकिळ । गुल्फ मोतियांचे
२५३३	।।ना.गा.०३८९.०१८।।	पदक बाहुभूषणें । नवरत्नांचे खेवणें । कैसें सर्वां जालेंपणें । लेणें लेणियासी
२५३४	।।ना.गा.०३८९.०१९।।	कौस्तुभ मिरवे कंठीं । माजी रत्नांचिये दाटी । तेथें सुरवरांच्या दृष्टी । भाळलिया
२५३५	।।ना.गा.०३८९.०२०।।	श्रवणीं कुंडलें झळकती । जैशा विजुवा तळपती । कंठीं माळ वैजयंती । सह तुळसीदळेसी
२५३६	।।ना.गा.०३८९.०२१।।	विशाल नयन दृष्टी । ठेऊनियां नासापुटीं। दावी योग कसवटी । योगीयांसी गे माये
२५३७	।।ना.गा.०३८९.०२२।।	लिंग स्वयंभू शीर स्थळीं । रश्मी मुकुट झळाळी । वेष्टि मोरपिसांतळी । मृग नाभीं तिळक
२५३८	।।ना.गा.०३८९.०२३।।	स्मित अधर सुरेख । कैसे निमासुर मुख । तेथें मदन मयंक । कोटी कुरवंड्या
२५३९	।।ना.गा.०३८९.०२४।।	विष्णुदास नामा जिवें । ओंवाळित सर्व भावें । अनुभव अनुभवें । अनुभविजे सदा
२५४०	।।ना.गा.०३९०.००१।।	पितयाची भक्ति पुंडलिकें केली । मात हे ऐकिली देवरायें
२५४१	।।ना.गा.०३९०.००२।।	नवलक्ष गोधनें पांचसें सवंगडे । रामकृष्ण पुढें चालताती
२५४२	।।ना.गा.०३९०.००३।।	उठा चला जावो पुंडलिका पाहो । देव म्हणे भावो पाहो त्याचा
२५४३	।।ना.गा.०३९०.००४।।	गोकुळीहुनी देव पंढरपुरा पातला । त्वरित पावला वेणूनादीं
२५४४	।।ना.गा.०३९०.००५।।	तेथुनि परतला वाळवंटीं आला । तंव देव देखिला पुंडलिकें
२५४५	।।ना.गा.०३९०.००६।।	देव उभा आहे पुंडलिक पाहे । चतुर्भुज स्वयें देखियला
२५४६	।।ना.गा.०३९०.००७।।	देखियेला हरी शंख चक्र करीं । आयुधें तीं चारी झळकती
२५४७	।।ना.गा.०३९०.००८।।	चतुर्भुज मूर्ती देखियली दृष्टी । पुंडलिकें इट टाकियेली
२५४८	।।ना.गा.०३९०.००९।।	इटेवरी उभा राहिला विठ्ठल । ठसा मिरविला त्रिभुवनीं

२५४९	।।ना.गा.०३९०.०१०।।	पुंडलिक भाव पाहूं आला देव । प्रसन्न जाले सर्व पुंडलिका
२५५०	।।ना.गा.०३९०.०११।।	वैकुंठ कैलास आणील हा येथ । नामा म्हणे हित जालें आम्हां
२५५१	।।ना.गा.०३९१.००१।।	पुंडलिकालागुनी म्हणे पांडुरंग । सखा जिवलग तूंचि माझा
२५५२	।।ना.गा.०३९१.००२।।	न पाहसी वास बोलसी उदास । सांडोनियां आस सर्वस्वाची
२५५३	।।ना.गा.०३९१.००३।।	वैकुंठ सांडोनि आलों तुजपाशीं । कां गा न बोलसी भक्तराया
२५५४	।।ना.गा.०३९१.००४।।	पितृभजनाचा जालासी अधिकारी । केली बा पायरी वैकुंठासी
२५५५	।।ना.गा.०३९१.००५।।	माग बापा कांहीं आवडे तें घेई । मज वाटे हृदयीं घालावाची
२५५६	।।ना.गा.०३९१.००६।।	नामा म्हणे देवा स्वामी मुगुटमणी । उभा कर ठेवुनी कटीवरी
२५५७	।।ना.गा.०३९२.००१।।	येक वेळ भेटी आलें भक्तराया । स्फुरती माझ्या बाह्या क्षेमालागीं
२५५८	।।ना.गा.०३९२.००२।।	ऊठ पुंडलिका परतोनियां पाहें । जीवींचें आर्त काय सांग मज
२५५९	।।ना.गा.०३९२.००३।।	जीवाची शिराणी फेडी डोळ्यांची । वास श्रीमुखाची पाहूं देई
२५६०	।।ना.गा.०३९२.००४।।	हेंचि आर्त धरोनी आलें असें जीवीं । तें तूं सर्व पुरवी भक्तराया
२५६१	।।ना.गा.०३९२.००५।।	नामयाचा स्वामी कृपेचा कोंवळा । म्हणऊनि उतावळा भक्तालागीं
२५६२	।।ना.गा.०३९३.००१।।	सांडूनी वैकुंठ न धरत पातलें । तुज भेटावया आलें पुंडलिका
२५६३	।।ना.गा.०३९३.००२।।	प्रीतिचा वोरसु हृदयीं दाटला । नुठिसी कां वहिला आलिंगना
२५६४	।।ना.गा.०३९३.००३।।	भक्त शिरोमणी आमचा जिवलग । म्हणे पांडुरंग पुंडलिका
२५६५	।।ना.गा.०३९३.००४।।	स्फुरती भुजादंड आणि वक्षस्थळ। हरुषें नयनकमळ विकासलें
२५६६	।।ना.गा.०३९३.००५।।	आनंदें रोमांच उद्भवले आंगीं । क्षेमा देई वेगीं भक्तराया
२५६७	।।ना.गा.०३९३.००६।।	मज नाम रूप तुमचेनी संभ्रमें । केली जन्मकर्मे असंख्यात
२५६८	।।ना.गा.०३९३.००७।।	तुमचिया आवडी असें म्यां विकिला । सांग कोण्या बोला रुसलासी
२५६९	।।ना.गा.०३९३.००८।।	हृदयींचे निजगुज सांग रे सकळिक । तेणें मज सुख होईल जीवा
२५७०	।।ना.गा.०३९३.००९।।	परतोनियां दृष्टि पाहे आळुमाळ । तेणें हरेल सकळ श्रम माझा
२५७१	।।ना.गा.०३९३.०१०।।	ऐसा भक्तजनवत्सलु भक्तांचा विसांवा । भक्तांचिया भावा भाळलासे
२५७२	।।ना.गा.०३९३.०११।।	कटावरी दोन्ही हात उभा पुंडलिका द्वारीं । नामया स्वामी हरि विनवितसे
२५७३	।।ना.गा.०३९४.००१।।	माझिया पितयाचा होईल निद्राभंग । न घडे प्रसंग बोलायाचा
२५७४	।।ना.गा.०३९४.००२।।	क्षण एक मौन धरुनियां रहा । शरणागत पहा कृपादृष्टि

२५७५	।।ना.गा.०३९४.००३।।	करूनि निर्धार आलेती जेणें भावें । जतन करावें वचन देवा
२५७६	।।ना.गा.०३९४.००४।।	नवजावें देवा माझे गांवेहुनि । मागतों प्रार्थुनी हेचि तुम्हां
२५७७	।।ना.गा.०३९४.००५।।	माझें सुख पहावें मागेन तें द्यावें। माझे गांवीं व्हावें अधिपती
२५७८	।।ना.गा.०३९४.००६।।	नामयाचा स्वामी भक्तीसी भुलला । पुंडलिकें राहविला पंढरीये
२५७९	।।ना.गा.०३९५.००१।।	आलासी आरते धरिलासी चित्तें। आतां तुज मागुतें जावों नेदी
२५८०	।।ना.गा.०३९५.००२।।	शरीर प्राणाचा देईन मी बळी । तुज हृदयकमळीं सांठवीन
२५८१	।।ना.गा.०३९५.००३।।	धरिलासि तूं एक वैकुंठनायक । म्हणे पुंडलिक पांडुरंगा
२५८२	।।ना.गा.०३९५.००४।।	इहलोकीचें सुख न मागो सकळिक । आणिक परलोकी चाड नाहीं
२५८३	।।ना.गा.०३९५.००५।।	पंढरीस राही रुक्माई समवेत । तेणें मनोरथ पूर्ण होती
२५८४	।।ना.गा.०३९५.००६।।	तुझें रूप दृष्टी नामस्मरण पुटीं । मना चरणीं मिठी पडोनि गेली
२५८५	।।ना.गा.०३९५.००७।।	तुझे चरणीं आर्त हृदयीं नामामृत । तेणें मी समर्थ मिरवे जगीं
२५८६	।।ना.गा.०३९५.००८।।	संतां सोयरियां व्हावयासि भेटी । म्हणोनि वाळवंटीं वस्ती केली
२५८७	।।ना.गा.०३९५.००९।।	परब्रह्म पुतळा देखिलासि डोळां । समाधि सुख सोहळा पांडुरंगा
२५८८	।।ना.गा.०३९५.०१०।।	कटीं ठेवूनि हात आपण पंढरीनाथ। भक्तांचा एकांत श्रवण करी
२५८९	।।ना.गा.०३९५.०११।।	उभारे म्हणोनि दिधलें आपणांतें । संबोखोनि नाम्यातें प्रेम दिलें
२५९०	।।ना.गा.०३९६.००१।।	म्हणे पुंडलिक देवा शिरोमणी । परिसावी विनवणी एक माझी
२५९१	।।ना.गा.०३९६.००२।।	संसारबंधन तोडी रे दारुण। हें एक मागणें तुजपाशीं
२५९२	।।ना.गा.०३९६.००३।।	ऋद्धि सिद्धि मोक्षसंपत्ति विलास । सांडियेली आस त्यांची जीवें
२५९३	।।ना.गा.०३९६.००४।।	पंच महापातकी विश्वासघातकी । त्यासी यमादिकीं गांजियेलें
२५९४	।।ना.गा.०३९६.००५।।	ऐसिया पतिता करी रे सनाथ । पुरवी माझें आर्त पांडुरंगा
२५९५	।।ना.गा.०३९६.००६।।	हेंचि माझे काज अंतरींचे गुज । उद्धरी सहज महादोषी
२५९६	।।ना.गा.०३९६.००७।।	नामा म्हणे वर दिला नारायणें । विठ्ठलदर्शनें मोक्ष जीवा
२५९७	।।ना.गा.०३९७.००१।।	तंव पुंडलिक पुढारला । कर जोडोनियां वदला । म्हणे वेदादिका अबोला । तुझिया स्वरूपाचा
२५९८	।।ना.गा.०३९७.००२।।	तो तू प्रगट श्रीरंगा । येऊनि आमुच्या लोभा । स्थिर राहूनि चंद्रभागा । भक्त जना तारिसी
२५९९	।।ना.गा.०३९७.००३।।	नेणो काय भक्तपण । नेणो तुमचे महिमान । कोण जन्मी साधन । कोण केले हे नेणवे
२६००	।।ना.गा.०३९७.००४।।	नीरे भीवरे संगमीं । चंद्रभागेचे उगमी । वेणुनाद परब्रह्मीं । गोपाळ गरजे गर्जती

२६०१	।।ना.गा.०३९७.००५।।	तरी स्वामी दीनदयाळा । महाविष्णु गा गोपाळा । भक्तालागीं कृपाळा । तारावया तयासी
२६०२	।।ना.गा.०३९७.००६।।	माझे करोनिया मिस। वास केला युगें अठ्ठावीस । करोनियां रहिवास । माझे भक्ति लाधलासी
२६०३	।।ना.गा.०३९७.००७।।	तूं नियंता ईश्वरमूर्ती । सकळा गोसावी श्रीपती । तुज वाचूनि नेणे मती । दया मूर्ती परब्रह्मा
२६०४	।।ना.गा.०३९७.००८।।	नामा म्हणे पुंडलिके । ऐसे स्तवन केले निकें । तव म्हणितले पुण्य श्लोके । पुरे पुरे करी आतां
२६०५	।।ना.गा.०३९८.००१।।	सहस्र अठ्ठ्यांशीं ऋषि । स्कंद उपदेशी तयांसी । तिहीं एक पुसिली पुसी । ते तयासी अकळ
२६०६	।।ना.गा.०३९८.००२।।	आतां जाऊं कैलासा । सकळ पुसूं त्या महेशा । मग निघाले आकाशा । पितृदेशा पातले
२६०७	।।ना.गा.०३९८.००३।।	बरे होऊनियां सावध । ऐका भक्तीचा संवाद । विनविता जाला स्कंद । तो अनुवाद शंभूचा
२६०८	।।ना.गा.०३९८.००४।।	स्कंदें विनविला त्रिपुरारी । सहित वामभागीं गौरी । स्तुति स्तवनें केलीं भारी । हृदासनीं नमियेला
२६०९	।।ना.गा.०३९८.००५।।	मग निघाला लोटांगणीं। म्हणे त्राहे त्राहे शूळपाणि । करें उचलिला धांवोनि । मग आसनीं बैसविला
२६१०	।।ना.गा.०३९८.००६।।	ऋषींसि आसनें देऊनि वेगां। जवळीं बैसविलें पैं गा । ते म्हणती झडकरी सांगा । जें वेदशास्त्रांसि प्रिय
२६११	।।ना.गा.०३९८.००७।।	तव स्कंद म्हणे ताता । ऋषिंनीं पुसिली जे वार्ता । ते अकळ माझिया चित्ता । वेदशास्त्रविरहित
२६१२	।।ना.गा.०३९८.००८।।	बरवी तीर्थें पुण्यरासी । माहात्म्यें सांगत होतों त्यासी । परी तीर्थ क्षेत्र भक्त देवांसी । नाहीं चहूंसी एक मेळा
२६१३	।।ना.गा.०३९८.००९।।	जें जें क्षेत्रीं करितां विचार । तें तें ठायीं तेंचि थोर। परि तयांमाजीं असे सार । जें माहेर सकळिकां
२६१४	।।ना.गा.०३९८.०१०।।	पाप घडे जे जे मेदिनीं । तयांसी तें तीर्थ करी धुणी । तीर्था वर्णी शूळपाणि । सांगा हानि जें करी
२६१५	।।ना.गा.०३९८.०११।।	जाळिती पातकांचिया कोडी । ऐसीं तीर्थें आहेत गाढीं । तयां सकळिकां तीर्थें आहे खोडी । तें मी उघडी सांगेन
२६१६	।।ना.गा.०३९८.०१२।।	हिमकाळीं कीजे स्नान । हेचि प्रयागासी न्यून । काशी इच्छी जो मरण । थोर निर्वाण पाविजे
२६१७	।।ना.गा.०३९८.०१३।।	पितृस्मरण आचमन । करोनि देईजे पिंडदान । तेणें पूर्वज होती पावन । हेंचि न्यून गयेसी
२६१८	।।ना.गा.०३९८.०१४।।	गाढें कुरुक्षेत्र जाण । तेथें किजे हिरण्यदान । केदारीचें उदकपान । करी पीडन देहासी
२६१९	।।ना.गा.०३९८.०१५।।	उपमा द्वारकेहुनी । अरुच गोमतीचें पाणी । सहा मास सेविल्यावांचुनी । नव्हे दाटनी चक्राशी
२६२०	।।ना.गा.०३९८.०१६।।	गंगा बारा वरुषावरी । सकळिकामध्यें गोदावरी । सिंहस्थीं महिमा थोरी । हें न्यून भारी तयासी
२६२१	।।ना.गा.०३९८.०१७।।	अयोध्या माया मथुरा । कांची आवंतिका करवीरा । लोण्हार हाटकेश्वर तुंगभद्रा । आणि पुष्करा कावेरी
२६२२	।।ना.गा.०३९८.०१८।।	कलिमाजीं वैकुंठ साक्षात । गाढें क्षेत्र जगन्नाथ । त्या देवासी नाहीं पायहात। उणीव बहुत तयासी
२६२३	।।ना.गा.०३९८.०१९।।	गाढें श्रीशैल्यपर्वत । लक्षावया उदित । तेथें जिवासी करिजे घात। ही उणीव बहुत तयासी
२६२४	।।ना.गा.०३९८.०२०।।	गाढें क्षेत्र परियेसा । गोकर्ण सेतुबंधु महेशा । तयासी उणीव ऐसा । जे यमदिशा म्हणताती
२६२५	।।ना.गा.०३९८.०२१।।	ऐसीं तीर्थें कोटीरासी । परि लांछन आहे सर्वांसी । पहिलें राहिजे उपवासी । मग डोईसी मुंडन
२६२६	।।ना.गा.०३९८.०२२।।	सकळ तीर्थांचा पारू । जो गा देखिला सागरु । तयाची उणीव आहे थोरु । योग येतो अमावास्ये

२६२७	।।ना.गा.०३९८.०२३।।	म्हणोनि पुसों आलों तुज । सकळ तीर्थांचें बीज । तें झडकरी सांग मज । देवा तुज जें प्रिय
२६२८	।।ना.गा.०३९८.०२४।।	ऐसी करोनि विनवणी । मग स्कंद लागला चरणीं । येरें उचलिला झडकरुनी । मग शूळपाणि हे बोलिले
२६२९	।।ना.गा.०३९८.०२५।।	पुत्रा तुवां जे केली विनंति । हेंचि गिरिजा पुसत होती । तरी सांगेन तुजप्रती । चित्त देऊनि परियेसी
२६३०	।।ना.गा.०३९८.०२६।।	महिमा दरुशनाचा पूर्ण । एक लक्ष्मी जाणे खूण । शुक सनकादिक मुनि सज्जन । आणि वैष्णवजन प्रेमळ
२६३१	।।ना.गा.०३९८.०२७।।	जैसा कृपणाचा ठेवा । तैसें आर्त रे माझिया जीवा । पुत्रा पुसिलें तुवां । तरी वृत्तांत बरवा सांगेन
२६३२	।।ना.गा.०३९८.०२८।।	मी बैसोनियां स्मशानीं । जयाचें नाम जपतो ध्यानीं । तें दैवत आहे जये स्थानीं । चित्त देऊनि परियेसा
२६३३	।।ना.गा.०३९८.०२९।।	युगा अठ्ठाविसांवरी । आहे पुंडलिकाच्या द्वारीं । विठ्ठल उभा भीमातीरीं । विश्व तारी दरुशनें
२६३४	।।ना.गा.०३९८.०३०।।	घेऊनि तरुवरांची बुंथि । देव सेवा जाणवीती । आदिकरोनी पार्वती । आम्हां वस्ती तये ठायीं
२६३५	।।ना.गा.०३९८.०३१।।	तेजें झळाळे वैकुंठ । तयापरी चोखट । पहा पंढरपूर नीट । महिमा अद्‌भुत तिहीं लोकीं
२६३६	।।ना.गा.०३९८.०३२।।	जेणें पीडिलें तिन्ही लोकां । त्यासि वधावया पावलों देखा। ओढी काढोनी त्र्यंबका । श्रीहरि सखा स्मरला
२६३७	।।ना.गा.०३९८.०३३।।	घात करोनी त्रिपुरा । वधियेलें तिन्हीं असुरां । तेंचि तीर्थ भिवरा । सचराचरा तारक
२६३८	।।ना.गा.०३९८.०३४।।	प्रतिदिनीं मध्यान्हीं। सकळ तीर्थे स्थानीं । भिवरे सुस्नात होऊनि । विठ्ठलचरणीं लागती
२६३९	।।ना.गा.०३९८.०३५।।	तये क्षेत्रीं पाप घडे । ऐसें बोलतां जिव्हा झडे । काय तुज सांगूं पुढें । ब्रह्म उघडें असे जेथें
२६४०	।।ना.गा.०३९८.०३६।।	लोहो लागलिया परीसे । सोनें जालें एक सरिसें। आतां पालटेल कैसें भलतें । तैसें जरी जालें
२६४१	।।ना.गा.०३९८.०३७।।	एक वेळ पंढरीये जाऊन । मग भलतिये ठायीं राहो कां जन। तो राहे वैकुंठींच जाण । कर्महीन जरी जाला
२६४२	।।ना.गा.०३९८.०३८।।	ऐसें ऐकोनी उत्तर । स्कंद हरुषें निर्भर । आदि करोनी ऋषीश्वर । पंढरपूर ठाकिती
२६४३	।।ना.गा.०३९८.०३९।।	विष्णुदास नामा म्हणे । एक वेळ पंढरीये जाणें । विठ्ठल धन्यावरी पाहणें। नाहीं येणें संसारा
२६४४	।।ना.गा.०३९९.००१।।	जगीं पेठा जाण असती अनेका । अति सुरंगा वाखाणिती
२६४५	।।ना.गा.०३९९.००२।।	जंव तूं न देखसी पेठ द्वारकेची। श्रीरंगरायाची राजधानी
२६४६	।।ना.गा.०३९९.००३।।	द्वारकेची पेठ तेथें स्वरूप चोखट । बरवी बरवंट शोभत असे
२६४७	।।ना.गा.०३९९.००४।।	तैसेंचि पंढरीचें सोपें बहु ठाण । संत सुलक्षण जाणताती
२६४८	।।ना.गा.०३९९.००५।।	तयाचें दर्शनें लाभ कोटी गुणें जाला । भवसिंधु आटला हेळामात्रें
२६४९	।।ना.गा.०३९९.००६।।	ऐसी पेठ निर्मिली देवें ही पंढरी । पुंडलिक द्वारीं उभा असे
२६५०	।।ना.गा.०३९९.००७।।	या पेठेचा शेट्या पुंडलीक भक्त । नामा शरणागत केशवासी
२६५१	।।ना.गा.०४००.००१।।	पंढरी हें क्षेत्र पावन पवित्र । महिमा विचित्र त्रिभुवनीं
२६५२	।।ना.गा.०४००.००२।।	पाहिलिया क्षणीं नासती पातकें । ऐसियासी तुके दुजें कोण

२६५३	।।ना.गा.०४००.००३।।	तृण पक्षी सर्व जाले ऋषिदेव । पहाती वैभव पंढरीचें
२६५४	।।ना.गा.०४००.००४।।	भूमि ते राहिली विष्णु चक्रावरी । वैकुंठीची परी सर्व येथें
२६५५	।।ना.गा.०४००.००५।।	टाळ नृत्य घोष पताकांचे भार । गर्जे भीमातीर सर्वकाळ
२६५६	।।ना.गा.०४००.००६।।	पुंडलिकासाठीं ठाके केशीराज । भेटीनें सायुज्य त्यास देती
२६५७	।।ना.गा.०४००.००७।।	स्नानें उद्धरती दर्शनें प्रशस्ती । वाचे नाम कीर्ती विठोबाची
२६५८	।।ना.गा.०४००.००८।।	नामा म्हणे लाभ थोर हा जोडतो । पंढरिसी येतो प्राणी त्यासी
२६५९	।।ना.गा.०४०१.००१।।	पंढरीचें सुख आनंदें गर्जती । ध्यातसे पार्वती अखंडित
२६६०	।।ना.गा.०४०१.००२।।	भीमातीरीं उभा सखा पांडुरंग । देतो अंगसंग अखंडित
२६६१	।।ना.गा.०४०१.००३।।	उशीर जाला काय कामकाजा । यावें अधोक्षजा अनिरुद्धा
२६६२	।।ना.गा.०४०१.००४।।	नामा म्हणे पाहा पंढरीमाझारीं । केशीराज तारी एकसरा
२६६३	।।ना.गा.०४०२.००१।।	निंबलोण करूं पंढरीच्या सुखा । आणिक पुंडलिका मायबापा
२६६४	।।ना.गा.०४०२.००२।।	पाहतां भूमंडळीं नाहीं आणिक रे । पांडुरंग क्षेत्रावांचोनीयां
२६६५	।।ना.गा.०४०२.००३।।	अणिमादि सिद्धि भक्ताचिये द्वारीं । होऊनि कामारि वोळंगति
२६६६	।।ना.गा.०४०२.००४।।	परलोकींची येती परतोनि मागुते। सर्व सुख तेथे भोगावया
२६६७	।।ना.गा.०४०२.००५।।	मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं । हिंडे वाळवंटी दीनरूप
२६६८	।।ना.गा.०४०२.००६।।	भक्तांचिया पायां पडे पुढतो पुढती । मज करा सांगाती मोक्ष म्हणे
२६६९	।।ना.गा.०४०२.००७।।	सत्य लोकीं जया सुखाची शिराणी । तें आम्हां अनुदिनीं प्रत्यक्ष दिसे
२६७०	।।ना.गा.०४०२.००८।।	बंदीजन नामा उभा महाद्वारीं । कीर्ति चराचरीं वर्णितसे
२६७१	।।ना.गा.०४०३.००१।।	पंढरीचें सुख जिहीं अनुभविलें । भावें अनुसरलें विठ्ठलपायीं
२६७२	।।ना.गा.०४०३.००२।।	काया वाचा मन रंगलें चरणीं । धरियेला मनीं पांडुरंग
२६७३	।।ना.गा.०४०३.००३।।	नामाचेनि बळें उडविलीं साधनें । तोडीलीं बंधनें संसाराची
२६७४	।।ना.गा.०४०३.००४।।	मुक्तिपद कोणी ने घे फुकासाठी । हिंडे वाळवंटी दीनरूप
२६७५	।।ना.गा.०४०३.००५।।	योगियांचे घर रिघे काकुलती । आव्हेरिलें संतीं म्हणोनियां
२६७६	।।ना.गा.०४०३.००६।।	दोन्ही कर जोडोनि मोक्ष पाहे वास। म्हणे मी होईन दास हरिदासाचा
२६७७	।।ना.गा.०४०३.००७।।	तंव तुच्छ करोनी न पाहाती दृष्टि । आपंगिलें शेवटीं ब्रह्मज्ञानी
२६७८	।।ना.गा.०४०३.००८।।	अष्ट महासिद्धी म्हणती कवण गति । यावें काकुलती कवणा आम्ही

२६७९	।।ना.गा.०४०३.००९।।	मोक्ष मुक्ति जिहीं हाणितल्या पायीं । आमुची तें सोयी काय धरिती
२६८०	।।ना.गा.०४०३.०१०।।	ऐसे भक्तराज देवा वंद्य झाले। ते एक राज्य केले पुंडलिके
२६८१	।।ना.गा.०४०३.०११।।	ऐसी सर्व जीवा त्रीदेवासी पुज्य । ते एक राज्य केलें पुंडलिकें
२६८२	।।ना.गा.०४०३.०१२।।	हर्षे निर्भर नामा नाचे महाद्वारीं । मुखीं निरंतरीं नामघोष
२६८३	।।ना.गा.०४०४.००१।।	पंढरीचें सुख पाहतां एक घडी । वास कल्पकोडी वैकुंठीचा
२६८४	।।ना.गा.०४०४.००२।।	आणितां अनुमाना न पवे सरी । महिमा न कळे थोरी सहस्रमुखा
२६८५	।।ना.गा.०४०४.००३।।	जें सुख सुरवरां स्वप्नीं नाहीं दृष्टि । तें हें वाळवंटीं तुम्हां आम्हां
२६८६	।।ना.गा.०४०४.००४।।	धन्य चंद्रभागा पुण्य सरोवर । धन्य भीमा तीर पुण्यभूमी
२६८७	।।ना.गा.०४०४.००५।।	धन्य नरनारी गर्जती हरिनामें । ऐकोनि प्रेमें डोले शूलपाणी
२६८८	।।ना.गा.०४०४.००६।।	धन्य वेणुनाद धन्य वृंदावन। धन्य तें जीव जन क्षेत्रवासी
२६८९	।।ना.गा.०४०४.००७।।	धन्य पंचक्रोशी धन्य आसपासी । दुमदुमी अहर्निशीं नामघोष
२६९०	।।ना.गा.०४०४.००८।।	धन्य पशु पक्षि कीटक आणि भृंग । जया अंगसंग पांडुरंगीं
२६९१	।।ना.गा.०४०४.००९।।	धन्य ते तरुवर सर्व सान थोर । अवतरले अमर गुप्तरूपें
२६९२	।।ना.गा.०४०४.०१०।।	धन्य ते संसारी अवघे जीवन्मुक्त । जया आर्त असे पांडुरंगीं
२६९३	।।ना.गा.०४०४.०११।।	धन्य त्याचा वंश ज्या नामीं विश्वास । धन्य विष्णुदास नामा म्हणे
२६९४	।।ना.गा.०४०५.००१।।	ऐका पंढरीचें महिमान । राउळ तितुकें प्रमाण । तेथील तृण आणि पाषाण । तेहि देव जाणावें
२६९५	।।ना.गा.०४०५.००२।।	ऐसी पंढरी मनीं ध्याती । त्यांसी तिहीं लोकें गति । ते आणिका तीर्थां जाती । तीं वंदिती तयांसी
२६९६	।।ना.गा.०४०५.००३।।	वाराणसी चालिजे मासा । गोदावरी एक दिवसा । पंढरी पाऊल परियेसा । ऐसा ठसा नामाचा
२६९७	।।ना.गा.०४०५.००४।।	ऐसें शंकर सांगे ऋषीजवळ । सकळ तीर्थें माध्यान्हकाळी । येती पुंडलिकाजवळी । करिती अंघोळी वंदिती चरण
२६९८	।।ना.गा.०४०५.००५।।	ऐसेनि तीर्थें पाप घडे । ऐसें बोलता जिव्हा झडे । नामा विनवी संतांपुढें । पंढरी पेठ न सांडावी
२६९९	।।ना.गा.०४०६.००१।।	अगाध भवजळ तरावया दुस्तर । रची पंढरपूर कलीमाजी
२७००	।।ना.गा.०४०६.००२।।	तारू पंढरीनाथ मोलेंविण उतरी । उभा भिमातीरीं वाट पाहे
२७०१	।।ना.गा.०४०६.००३।।	बुडण्याचें भय नाही पैं संसारीं । कलीमाजी पंढरी थोर नाव
२७०२	।।ना.गा.०४०६.००४।।	जया नावेवरी आठराही आवलें । साही खण भले मिरवती
२७०३	।।ना.गा.०४०६.००५।।	चहूमुखीं जिचा नकळेचि पार । पाहतां विचार सहस्रमुखा
२७०४	।।ना.गा.०४०६.००६।।	सड्या लावी कांसे कुटुंबी नावेवरी। उतरिलें तीरीं केशिराजें

२७०५	।।ना.गा.०४०६.००७।।	प्रेमाचिया पेटी बांधोनियां पोटीं । उतरी जगजेठी पांडुरंग
२७०६	।।ना.गा.०४०६.००८।।	अंगें घाली उडी बुडतियां काढी । ऐसे कल्पकोडी तारियेले
२७०७	।।ना.गा.०४०६.००९।।	तारियेलें सत्य हाचि पै निर्धार । नामा पैल पार उतरला
२७०८	।।ना.गा.०४०७.००१।।	धन्य पंढरीचे सकळही जन । जिहीं सख्य केलें विठ्ठलपायीं
२७०९	।।ना.गा.०४०७.००२।।	विठ्ठल हा ध्यानीं विठ्ठल हा मनीं । विठ्ठल चिंतनीं रात्रंदिवस
२७१०	।।ना.गा.०४०७.००३।।	विठ्ठलेविण जया न गमे एक घडी । सर्वस्वें आवडी विठ्ठलाची
२७११	।।ना.गा.०४०७.००४।।	विठ्ठलची माता विठ्ठलची पिता। भगिनी आणि भ्राता विठ्ठल ज्यांचा
२७१२	।।ना.गा.०४०७.००५।।	विठ्ठलची मित्र विठ्ठलची पुत्र । विठ्ठल कुळगोत्र केला जिहीं
२७१३	।।ना.गा.०४०७.००६।।	विठ्ठलची क्रिया विठ्ठलची कर्म । विठ्ठल सकळ धर्म कुळदैवत
२७१४	।।ना.गा.०४०७.००७।।	गुज गौप्य जीवीचें विठ्ठला सांगावें । विठ्ठले पुरवावें कोड त्यांचें
२७१५	।।ना.गा.०४०७.००८।।	सर्वकाळ करणें विठ्ठलाची कथा । विठ्ठल जडला चित्ता जयांचिया
२७१६	।।ना.गा.०४०७.००९।।	विठ्ठल जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं । अखंड वोथरती विठ्ठल विठ्ठल
२७१७	।।ना.गा.०४०७.०१०।।	ऐसा सर्वस्वेसी विठ्ठल भजता । सुख आले हाता विठ्ठलाचे
२७१८	।।ना.गा.०४०७.०११।।	नामा म्हणे त्यांचें चरणरेणू होऊन । जालों मी पावन म्हणे आतां
२७१९	।।ना.गा.०४०८.००१।।	पंढरीचे जन अवघे पावन । ज्या जवळी निधान पांडुरंग
२७२०	।।ना.गा.०४०८.००२।।	विठ्ठलनामें घेणें विठ्ठलनामें देणें। विठ्ठलनामें करणें सकळ काम
२७२१	।।ना.गा.०४०८.००३।।	विठ्ठलनामें क्रिया विठ्ठलनामें कर्म । हाचि प्रिय धर्म जया चित्ता
२७२२	।।ना.गा.०४०८.००४।।	सभराभरित विठ्ठल मागें पुढें । जिकडे जाती तिकडे विठ्ठलचि
२७२३	।।ना.गा.०४०८.००५।।	निरंतर गर्जती विठ्ठलपवाडे । पहाती निवाडे विठ्ठलरूप
२७२४	।।ना.गा.०४०८.००६।।	विठ्ठलनामें सरतें विठ्ठलनामें परतें । विठ्ठलनाम ज्यातें भांडवल
२७२५	।।ना.गा.०४०८.००७।।	विठ्ठलनामें करिती वाचे योगक्षेम । नित्य ज्याचें प्रेम विठ्ठलनामीं
२७२६	।।ना.गा.०४०८.००८।।	सदा हृदयीं भरित विठ्ठलाचें प्रेम । हर्षें विठ्ठलनाम गर्जताती
२७२७	।।ना.गा.०४०८.००९।।	विठ्ठलनामीं गोडी धरोनी आवडी । विठ्ठलनामीं बुडी दिली जेणें
२७२८	।।ना.गा.०४०८.०१०।।	नामा म्हणे अवघें विठ्ठलचि जालें । विठ्ठलें दिधलें प्रेमसुख
२७२९	।।ना.गा.०४०९.००१।।	नित्य हे दिवाळी असे पंढरपुरीं । ओंवाळिती नारी विठ्ठलासी
२७३०	।।ना.गा.०४०९.००२।।	पावा वाजे वेणु बरविया नादें । नामघोष आनंदें नाचतसे

२७३१	।।ना.गा.०४०९.००३।।	नामा म्हणे आम्ही पंढरीये जावें । कवतुकें पहावें विठ्ठलासी
२७३२	।।ना.गा.०४१०.००१।।	अवघी हे पंढरी सुखाची मांदुस । माजी स्वप्रकाशरत्ना हरी
२७३३	।।ना.गा.०४१०.००२।।	धन्य संतजन तेथिचें पारखी। ज्या जाली ओळखी विठ्ठल रूपीं
२७३४	।।ना.गा.०४१०.००३।।	अनुभवुंनी चित्तीं पाहिलें विवेकें । धरिलें पुंडलिकें हृदयकमळीं
२७३५	।।ना.गा.०४१०.००४।।	भक्तीचें खेवण प्रेमाचें कोंदण । करोनि भूषण मिरवीतसे
२७३६	।।ना.गा.०४१०.००५।।	युगें गेलीं परी पालटचि नाहीं । नित्य शुद्ध पाही तेज:पुंज
२७३७	।।ना.गा.०४१०.००६।।	पाहतां नित्य नवें ध्यातां चित्त निवे । म्हणोन नामा जिवें न विसंबे
२७३८	।।ना.गा.०४११.००१।।	अनंत तीर्थाचें माहेर । अनंत रूपांचें हे सार । अनंता अनंत अपार । तो हा कटीं कर ठेवूनि उभा
२७३९	।।ना.गा.०४११.००२।।	धन्य धन्य पांडुरंग । सकळ दोषां होय भंग । पूर्वज उद्धरती सांग । पंढरपूर देखिलिया
२७४०	।।ना.गा.०४११.००३।।	निरा भिवरा पडतां दृष्टी । स्नान करितां शुद्ध सृष्टी । अंतीं तो वैकुंठप्राप्ति । ऐसें परमेष्टि बोलिला
२७४१	।।ना.गा.०४११.००४।।	तेथें एक शीत दिधल्या अन्न । कोटी कुळांचें होय उद्धरण । कोटि याग केले पूर्ण । ऐसें महिमान ये तीर्थींचें
२७४२	।।ना.गा.०४११.००५।।	नामा म्हणे धन्य जन्म । जे धरिती पंढरीचा मान । तया अंतीं पुरुषोत्तम । जीवें भावें न विसंबे
२७४३	।।ना.गा.०४१२.००१।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा गोमटें । जेथें प्रत्यक्ष भेटे परब्रह्म
२७४४	।।ना.गा.०४१२.००२।।	कोठें ऐसें क्षेत्र आहे त्रिभुवनीं । सकळां शिरोमणी चंद्रभागा
२७४५	।।ना.गा.०४१२.००३।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवावें । देखतांचि सुख पावे मन
२७४६	।।ना.गा.०४१२.००४।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा साजिरें । सदा प्रेमपुरें वोसंडत
२७४७	।।ना.गा.०४१२.००५।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ । जेथें समारंभ हरिकथेचा
२७४८	।।ना.गा.०४१२.००६।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ । परब्रह्म केवळ सकळां जीवा
२७४९	।।ना.गा.०४१२.००७।।	नामा म्हणे आम्हां दीनांचें माहेर । धन्य पंढरपूर गीतीं गातां
२७५०	।।ना.गा.०४१३.००१।।	काय सांगूं तुझी करणी नारायणा । वेदपारायणा केशिराजा
२७५१	।।ना.गा.०४१३.००२।।	पृथ्वीवरी तीर्थें आहेत अपार। परी पंढरिची सर एका नाहीं
२७५२	।।ना.गा.०४१३.००३।।	जन्मोजन्मींचिया पातका दरारा । चुकती येरझारा एके खेपें
२७५३	।।ना.गा.०४१३.००४।।	ब्रह्मज्ञानेंविण मोक्ष आहे भूतीं । वाचेसी ते घेती विठ्ठलनाम
२७५४	।।ना.गा.०४१३.००५।।	बेचाळीसांसहित जातील वैकुंठा । नामा म्हणे भेटा विठ्ठलासी
२७५५	।।ना.गा.०४१४.००१।।	सांडूनि पंढरी जासी आणिका तीर्थां । लाज तुझ्या चित्ता कैशी नये
२७५६	।।ना.गा.०४१४.००२।।	त्रिभुवनींचीं तीर्थें जाली तीं मळीन । व्हावया पावन आलीं येथें

२७५७	।।ना.गा.०४१४.००३।।	एवढा ब्रह्मानंद कैंचा आणिका ठायीं । जो या आहे पायीं विठोबाच्या
२७५८	।।ना.गा.०४१४.००४।।	काळ मृत्यु दोन्ही घालोनि पायांतळीं । वाजविल्या टाळी कीर्तनसंगें
२७५९	।।ना.गा.०४१४.००५।।	नित्य नवी दिवाळी सुखाचा सोहळा । भोगिजे अवलीळा संतसंगें
२७६०	।।ना.गा.०४१४.००६।।	धर्म अर्थ काम मोक्ष मुक्ती चारी । देतो हा मुरारी नामें एका
२७६१	।।ना.गा.०४१४.००७।।	नामा म्हणे निकी दाखवीलि सोये । न विसंबें मी पाय खेचराचे
२७६२	।।ना.गा.०४१५.००१।।	काशी हे पंढरी । प्रयाग नीरा नरसींगपुरी । पिंड ठेवा पुष्पावती संगमपदावरी । पूर्वज होती चतुर्भुज
२७६३	।।ना.गा.०४१५.००२।।	सकळ तीर्थांसह वाराणसी । मध्यान्हकाळीं येती पंढरीसी । ओंवाळिती विठोबासी । विश्वनाथ म्हणोनियां
२७६४	।।ना.गा.०४१५.००३।।	म्हणऊनि वेगीं चला पंढरपुरा । विठोबारायाच्या नगरा । चंद्रभागा सरोवरा । देव कौतुक पाहती
२७६५	।।ना.गा.०४१५.००४।।	वाराणसी मनिकर्णिका । चंद्रभागा पुंडलिका । वाराणसी भागीरथी देखा । पांडुरंगीं भीमरथी
२७६६	।।ना.गा.०४१५.००५।।	वाराणसी पंचगंगा । पुष्पावती पांडुरंगा । महापातकें जाती भंगा । तीर्थे मस्तकीं वंदिल्या
२७६७	।।ना.गा.०४१५.००६।।	वाराणसी दंडपाणि । क्षेत्रपाळ हे हनुमंत दोन्ही । सकळ तीर्थे विठोबाचे चरणीं । काशी होय पंढरी
२७६८	।।ना.गा.०४१५.००७।।	वाराणसी माधवबिन्दू । पांडुरंगीं वेणुनादू । पंचक्रोशी तीर्थ उदंडू । पांडुरंगीं पद्मतीर्थ
२७६९	।।ना.गा.०४१५.००८।।	वाराणसी मोक्षपंथा । विठ्ठलाचेनि सायुज्यता । एवढें तीर्थ त्रिभुवनीं पाहतां । तीर्थ नाहीं यापरतें
२७७०	।।ना.गा.०४१५.००९।।	वाराणसी चंद्रमौळी । पांडुरंगीं वनमाळी । विश्वनाथ नंदी जवळी । विठोबा जवळी गरुड
२७७१	।।ना.गा.०४१५.०१०।।	वाराणसी गौरी खुणा । पांडुरंगीं रुक्मिणी जाणा । वाराणसी अन्नपूर्णा । पांडुरंगीं जाणा सत्यभामा
२७७२	।।ना.गा.०४१५.०११।।	वाराणसी त्रिशुळावरी । सुदर्शनावरी पंढरी । कांहीं संदेह मनीं न धरी । काशी होय पंढरी
२७७३	।।ना.गा.०४१५.०१२।।	ऐसें सकळ तीर्थांचे माहेर । तीर्थ नाहीं यापरतें थोर । विष्णुदास नामयाचा दातार । पुंडलिकासहित असे
२७७४	।।ना.गा.०४१६.००१।।	पाहतां देऊळाची पाठ । तीर्थे घडलीं तीनशें साठ
२७७५	।।ना.गा.०४१६.००२।।	स्नान करितां पद्माळें । उद्धरती सर्व कुळें
२७७६	।।ना.गा.०४१६.००३।।	सन्मुख पाहतां विठाई । त्यासी उपमा द्याया नाहीं
२७७७	।।ना.गा.०४१६.००४।।	ऐसा पंढरीचा महिमा । काय वर्णूं म्हणे नामा
२७७८	।।ना.गा.०४१७.००१।।	कृत त्रेता द्वापार कली । ऐसा चौयुगांचा मेळीं । तें महायुग शब्द आढळी । वेदांतशास्त्रीं
२७७९	।।ना.गा.०४१७.००२।।	ऐसा ब्रह्मयाचा दिनांतर । तैसीच रात्र एक सहस्र । तीसा दिवसांचा प्रखर । एक मास
२७८०	।।ना.गा.०४१७.००३।।	ऐसे बारा मास । त्याचें एक वरुष । शतभरी आयुष्य । ब्रह्मयाचें
२७८१	।।ना.गा.०४१७.००४।।	ऐसा ब्रह्मयाचा दिनांत । शत वरुषें गणीत । ज्या प्रळयीं पोहत। मार्कंडेय उदकीं
२७८२	।।ना.गा.०४१७.००५।।	ऐसीं अठ्ठावीस युगें जाण । पंढरपुरासी जालीं पूर्ण । जो कीं ब्रह्मयाचा दिन । प्रळय काळ

२७८३	।।ना.गा.०४१७.००६।।	नामा म्हणे पंढरीची संख्या । सांगितली संत महंत लोकां । लक्षूनि पादुका । विठोबाच्या
२७८४	।।ना.गा.०४१८.००१।।	श्रोते म्हणती विष्णुदासा । या ब्रह्मदिनाचे प्रळयीं । पंढरीच्या भासा । नाश कीं नाही
२७८५	।।ना.गा.०४१८.००२।।	तंव नामा म्हणे सुदर्शनावरी। देवें रचिली पंढरी। भक्तांसहित राज्य करी। रुक्मिणीवर
२७८६	।।ना.गा.०४१८.००३।।	तो परमात्मा गुणातीत। अपरोक्ष भक्तांसहित । तेथें प्रळय हात जोडीत । जयालागीं
२७८७	।।ना.गा.०४१८.००४।।	जें ब्रह्मयाचें आयुष्य सरे । तैं लया जाय चराचरे । तैं मिळे पंढरपूर । वस्तु माझी
२७८८	।।ना.गा.०४१८.००५।।	नामा म्हणे या खुणा । कळती संतजना । इतर मायिक जना । नेणवती
२७८९	।।ना.गा.०४१९.००१।।	आधीं रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी
२७९०	।।ना.गा.०४१९.००२।।	जेव्हां नव्हतें चराचर । तेव्हां होतें पंढरपूर
२७९१	।।ना.गा.०४१९.००३।।	जेव्हां नव्हती गोदा गंगा । तेव्हां होती चंद्रभागा
२७९२	।।ना.गा.०४१९.००४।।	चंद्रभागेच्या तटीं । धन्य पंढरी गोमटीं
२७९३	।।ना.गा.०४१९.००५।।	नासिलीया भूमंडळ । उरे पंढरीमंडळ
२७९४	।।ना.गा.०४१९.००६।।	असे सुदर्शनावरी । म्हणूनि अविनाश पंढरी
२७९५	।।ना.गा.०४१९.००७।।	नामा म्हणे बा श्रीहरी । ते म्यां देखिली पंढरी
२७९६	।।ना.गा.०४२०.००१।।	अवघी ही पंढरी सुखाची वोवरी । अवघ्या घरोघरीं ब्रह्मानंद
२७९७	।।ना.गा.०४२०.००२।।	अवघा हा विठ्ठल सुखाचाचि आहे । अनुसरे तो लाहे सर्व सुख
२७९८	।।ना.गा.०४२०.००३।।	पहावा नयनीं ऐकावा श्रवणीं । अवघा घ्यावा ध्यानीं अवघ्या मनें
२७९९	।।ना.गा.०४२०.००४।।	अवघिये आवडी अवघा गावा गीतें । अवघा सर्वांभूतीं तोचि आहे
२८००	।।ना.गा.०४२०.००५।।	अवघा हा जाणावा अवघा हा मानावा । अवघा हा वाखाणावा अवघी वाचा
२८०१	।।ना.गा.०४२०.००६।।	अवघा ओळखूनी अवघा गिळिजे मनें । अवघा हाचि होणें म्हणे नामा
२८०२	।।ना.गा.०४२१.००१।।	अवघें हें पवित्र पांडुरंग श्रेत्र । सुखचि सर्वत्र भरलें असे
२८०३	।।ना.गा.०४२१.००२।।	अवघा हा विठ्ठल गीतीं गातां गोड । अवघें पुरे कोड नामें एक
२८०४	।।ना.गा.०४२१.००३।।	अवघें जे सांडोनी अनुसरले यातें । अवघें देतो त्यांतें आपलें प्रेम
२८०५	।।ना.गा.०४२१.००४।।	अवघी चित्तवृत्ति ठेविती याच्यापायीं। त्यांतें अवघ्या बाहीं आलिंगतो
२८०६	।।ना.गा.०४२१.००५।।	अवघें आपलें मन दिल्हे जिहीं यातें । असे त्या सांगातें मागें पुढें
२८०७	।।ना.गा.०४२१.००६।।	अवघ्यासि अनुसरला अवघेंचि विसरला । अवघा नामा जाला सुखरूप
२८०८	।।ना.गा.०४२२.००१।।	जाऊं नको जेथें तेथें । जरी तुज मुक्तीचें आर्ते । तुज मी सांगेन हित । देऊनि चित्त परियेसी

२८०९	।।ना.गा.०४२२.००२।।	शंभु अडसष्टी तीर्थांचे माहेर । सकळ सिद्धी ऋषीश्वर । माध्यान्हकाळीं सुरवर । पंढरपूर ठाकती
२८१०	।।ना.गा.०४२२.००३।।	जाई जाई आलिया रे । पांडुरंगीं राहे स्थिर रे । न लगती आणिक दैवतें रे। एक पुरे विठ्ठलची
२८११	।।ना.गा.०४२२.००४।।	तीर्थ क्षेत्र दैवतें । ऐसें नाहीं जेथें तेथें । तिन्ही सर्वोत्तम जेथें । तें पैं क्षेत्र सांगेन
२८१२	।।ना.गा.०४२२.००५।।	श्रीहरिच्या चोविस मूर्ति । विठ्ठल प्रेमदृष्टीं प्रीति । सहस्र नामांवरती कीर्ती । विठ्ठल दैवत जाणावें
२८१३	।।ना.गा.०४२२.००६।।	रुद्रार्धांगी गौरी । जान्हवी असे शिरीं । सर्वांग व्यापिनी भीमा सुंदरी । आले त्रिपुरारी ठाकोनी
२८१४	।।ना.गा.०४२२.००७।।	कोटि जन्माचें पातक । नासे स्नान केलिया देख। एवढें क्षेत्र अलौकिक । पांडुरंग भीवरा
२८१५	।।ना.गा.०४२२.००८।।	काशी त्यागिजे शरीर । हिवें शिणलें केदार । पाणी गोमतीचें क्षार। म्हणवोनि महिमा सम नाहीं
२८१६	।।ना.गा.०४२२.००९।।	जन्म मरणावेगळें । वैकुंठ तुकिलें सगळें । परि त्याहुनि आगळें । एक अक्षर जाणावें
२८१७	।।ना.गा.०४२२.०१०।।	गया भोंवूनि चौदापदीं । तीं अनंतें वेणुनादीं । काला केला गोविंदीं । हा दृष्टांत पहा पां
२८१८	।।ना.गा.०४२२.०११।।	ज्यांचेनि नांवें पिंडदान । त्यासी गयेसी गति जाण । येथें करितां नामस्मरण । सर्व पूर्वजां मुक्ति
२८१९	।।ना.गा.०४२२.०१२।।	कार्तिकिये आदित्यवारीं । जो पद्माळा स्नान करी । त्यांसी नाहीं येरझारी । नये पुढती संसारा
२८२०	।।ना.गा.०४२२.०१३।।	इंद्र येवढे परमेष्टी । तेथें मनुष्याच्या काय गोष्टी । धन्य धन्य तो एक सृष्टी । पंढरी दृष्टी जो देखे
२८२१	।।ना.गा.०४२२.०१४।।	बरवें पुंडलिकें केलें। हें परब्रह्म रे अर्चिलें । जगांत शांतवन केलें । परि न टके सर्वथा
२८२२	।।ना.गा.०४२२.०१५।।	तीर्थ सोपारें सधर । कष्ट न लगती अपार । उपवासी निराहार । कीं क्षौर करणेची नलगे
२८२३	।।ना.गा.०४२२.०१६।।	येथें सुखें येणें जाणें । घेणें नलगे धरणें । मनींचे मनोरथ पुरवणें । एके भेटीसाठीं
२८२४	।।ना.गा.०४२२.०१७।।	पूर्वजन्मीचा तापसी । तीर्थें केलीं पुण्य राशी । सहस्र शतें भोजनासी। देवा द्विजा भजिन्नला
२८२५	।।ना.गा.०४२२.०१८।।	शाळिग्रामाची पूजा करी । त्यासी प्रसन्न जाले हरि । त्यासी दावितो पंढरी । पूर्व संस्कारी म्हणोनियां
२८२६	।।ना.गा.०४२२.०१९।।	जयासी नावडे पंढरी । तो पापिया दुराचारी । उपजोनियां संसारीं । येरझारी शिणतो
२८२७	।।ना.गा.०४२२.०२०।।	त्यासी श्वान सुकर हासती । म्हणती यासी कैसी पडली भ्रांती । उपजोनियां मनुष्याती । पंढरपूरपती नोळखे
२८२८	।।ना.गा.०४२२.०२१।।	जो विन्मुख पंढरपुरा । त्याचा संग झणें करा । मोडोनि सुकृताचा थारा । पापशरीरासी तो गेला
२८२९	।।ना.गा.०४२२.०२२।।	जो पंढरीसी आर्तु । त्याची करा बरवी मातु । अंत:काळीं पंढरीनाथू । यमपंथु चुकवील
२८३०	।।ना.गा.०४२२.०२३।।	बरवें समतुल्य वाळवंट । वरी वैष्णव मिळाले घनदाट । करिती हरिनामाचें बोभाट । वीर उद्भट विठ्ठलाचे
२८३१	।।ना.गा.०४२२.०२४।।	जे येथें प्रेमासी आतुर । ते चतुर्भूज होती नर । येवढें क्षेत्र पंढरपूर । महिमा थोर तिहीं लोकीं
२८३२	।।ना.गा.०४२२.०२५।।	अन्य क्षेत्रीं पाप किजे । तें पुण्यक्षेत्रीं विनसिजे । पुण्यक्षेत्रीं पाप किजे । तें त्यागिजे पंढरीसी
२८३३	।।ना.गा.०४२२.०२६।।	पंढरीचें पातक । पंढरीस नासे देख । एवढें क्षेत्र अलौकिक । त्रिभुवनामाझारी
२८३४	।।ना.गा.०४२२.०२७।।	पैल इटेवरी सांवळा। विठोबा पहा पहा रे डोळां । विघ्न घालोनि पायातळां । आणिक कळिकाळा दमेना

२८३५	।।ना.गा.०४२२.०२८।।	जप तप अनुष्ठान। नलगे जीवासी बंधन । आणिक न करावें साधन । पहावें चरण विठोबाचे
२८३६	।।ना.गा.०४२२.०२९।।	देवा सांगे वसुंधरा । मी न भीये सप्तसागरा। स्थावर जंगमादि सारा । नाही भार तयाचा
२८३७	।।ना.गा.०४२२.०३०।।	ज्यासी नावडे विठ्ठल वीरू । त्याचा मज भार थोरू । त्यासी नरकीं होय थारू । तो असुर प्राणिया
२८३८	।।ना.गा.०४२२.०३१।।	ऐसा हा पंढरपूरपति । जीवंतु असतां देतो मुक्ती । मेलिया देतो ब्रह्मप्राप्ति । दोहींकडे सौरस
२८३९	।।ना.गा.०४२२.०३२।।	येरां प्राणियां कष्ट थोर । परी ते न भरे उदर । मेलिया यम किंकर । अष्टौप्रहर जाचिती
२८४०	।।ना.गा.०४२२.०३३।।	ऐसा कैलासीचा राणा । गिरीजे स्कंदा सांगे खुणा । तुम्ही आणिकु मंत्र नेणा । या पांडुरंगावांचुनी
२८४१	।।ना.गा.०४२२.०३४।।	विठ्ठल विठ्ठल म्हणतां । तुटती महापातक चळथा । विष्णुदास नामा विनवी संता । सावधान व्हा जी म्हणतसे
२८४२	।।ना.गा.०४२३.००१।।	सुखालागीं जरी करिसी तळमळ । तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ
२८४३	।।ना.गा.०४२३.००२।।	मग तूं अवघाची सुखरूप होसी । जन्मोजन्मीचें दु:ख विसरसी
२८४४	।।ना.गा.०४२३.००३।।	चंद्रभागेसी करितां स्नान । तुझे दोष पळती रानोरान
२८४५	।।ना.गा.०४२३.००४।।	लोटांगण घालोनी महाद्वारीं । कान धरोनि नाच गरुडपारी
२८४६	।।ना.गा.०४२३.००५।।	नामा म्हणे उपमा काय द्यावी । माझ्या विठोबाची इडापीडा घ्यावी
२८४७	।।ना.गा.०४२४.००१।।	यारे नाचे प्रेमानंदें । विठ्ठल नामाचिया छंदें
२८४८	।।ना.गा.०४२४.००२।।	जाऊं म्हणती पंढरीवाटें । कळिकाळा भय वाटे
२८४९	।।ना.गा.०४२४.००३।।	चंद्रभागें घडलें स्नान । यमलोकीं पडली हान
२८५०	।।ना.गा.०४२४.००४।।	जाली पुंडलिका भेटी । पूर्वज आनंदले वैकुंठीं
२८५१	।।ना.गा.०४२४.००५।।	राउळासीं जातां । जाली जीवाची मुक्तता
२८५२	।।ना.गा.०४२४.००६।।	विष्णुदास नामा म्हणे । आतां नाहीं येणें जाणें
२८५३	।।ना.गा.०४२५.००१।।	पैल ते पंढरी पैल ते पंढरी । पांढरीवरीं काळीं वसविलीं
२८५४	।।ना.गा.०४२५.००२।।	सावळें हें ब्रह्म सुनिल हें ब्रह्म । विद्युल्लता ब्रह्म पाहूं चला
२८५५	।।ना.गा.०४२५.००३।।	नामा म्हणे माझा विठ्ठल हा डोळा । अर्धमात्रें जवळां पाहूं चला
२८५६	।।ना.गा.०४२६.००१।।	झळझळित सोनसळा । कळस दिसतो तेजाळा
२८५७	।।ना.गा.०४२६.००२।।	बरवें बरवें पंढरपूर । विठोबा रायाचें नगर
२८५८	।।ना.गा.०४२६.००३।।	माहेर संतांचें । नामया स्वामी केशवाचें
२८५९	।।ना.गा.०४२७.००१।।	काय पुण्य केलें इहीं जीवा जनीं । पंढरी नयनीं देखियेली
२८६०	।।ना.गा.०४२७.००२।।	अनंता जन्माचें हेंचि प्रायश्चित। वाचे जपे नित्य रामनाम

२८६१	।।ना.गा.०४२७.००३।।	कोटी कुळें केलीं क्षणेंची पावन । केल्या एक स्नान चंद्रभागें
२८६२	।।ना.गा.०४२७.००४।।	शोक मोह ताप विध्वंसिला हेळा । अवलोकित डोळा पांडुरंग
२८६३	।।ना.गा.०४२७.००५।।	महापापराशी तींही केल्या होळी । वाजविल्या टाळी विठ्ठलनाम
२८६४	।।ना.गा.०४२७.००६।।	नामा म्हणे धन्य धन्य ते संसारीं । चालविती वारी पंढरीची
२८६५	।।ना.गा.०४२८.००१।।	काशिराज क्षेत्रीं जुंपिले आऊत । अष्ट धान्यें तेथ पेरियेलीं
२८६६	।।ना.गा.०४२८.००२।।	मेघ:श्यामघोष वर्षे सर्वांधारीं। बीज विटेवरी सासिन्नलें
२८६७	।।ना.गा.०४२८.००३।।	जगाचें जीवन पंढरी पिकली । चाराया सोकलीं भुतेंजातें
२८६८	।।ना.गा.०४२८.००४।।	घालुनीयां माळा रक्षि कळीकाळा । काय कलिमळा संसाराची
२८६९	।।ना.गा.०४२८.००५।।	पाप सोकरण भक्ति हें गोफण । भूस सांडी कण वेंचिताती
२८७०	।।ना.गा.०४२८.००६।।	वेदस्मृती श्रुति ऐसे बोलवितां। गूढ उगवितां लाभ होती
२८७१	।।ना.गा.०४२८.००७।।	नामा म्हणे स्वामि केशव सुकाळ । अन्न ब्रह्म फळ नाम बीज
२८७२	।।ना.गा.०४२९.००१।।	कार्तिकी एकादशी । पोहा मिळाला पंढरीसी । तेथील महिमा वर्णू कैसी । ब्रह्मांदिकां न वर्णवे
२८७३	।।ना.गा.०४२९.००२।।	दिंड्या गरुडटक्यांचे भार । मृदंग वाजती अपार । वैष्णव नाचती जयजयकार । नादें अंबर गर्जतसे
२८७४	।।ना.गा.०४२९.००३।।	उपजोनियां संसारीं । वेळोवेळां पाहा रे पंढरी । विठ्ठलराज भीमातीरीं । वाट पाहे भक्तांची
२८७५	।।ना.गा.०४२९.००४।।	कल्पतरू चिंतामणी । घरीं कामधेनूची दुभणीं । मोतियांचे चौक राजांगणी । वृंदावनें शोभती
२८७६	।।ना.गा.०४२९.००५।।	संत बैसले पद्मासनीं । राया विठ्ठला तुझे चरणध्यानीं । हरिकीर्तन ऐकोनी कानीं । अंत:करणीं निवाले
२८७७	।।ना.गा.०४२९.००६।।	जें जें चिंतन मानसीं । तें फळ पावले अहर्निशीं । मुक्ति देऊनि तयासी । अढळपदीं बैसविलें
२८७८	।।ना.गा.०४२९.००७।।	सकळ तीर्थें मध्यान्हकाळीं । येती चंद्रभागेजवळी । विमानें येती अंतराळीं । देव स्नानें करीताती
२८७९	।।ना.गा.०४२९.००८।।	धन्य धन्य ऐसें चंद्रभागा तीर्थ । तेथें चतुर्भुज होती प्राणिमात्र । ऐसें आणिक नाहीं क्षेत्र । भूवैकुंठ पंढरी
२८८०	।।ना.गा.०४२९.००९।।	मणिकर्णी वैतरणीं। स्नान करिजेती अंत:करणीं । लीन होईल विठ्ठल चरणीं । पापधुणी होईल
२८८१	।।ना.गा.०४२९.०१०।।	अनंत जन्मांचा उपाव । नामया स्वामी पंढरीराव । देईल वैकुंठीं ठाव । पुनर्जन्म चुकवील
२८८२	।।ना.गा.०४३०.००१।।	एक एकादशी होय पंढरीसी । सुकृताच्या रासी ब्रह्मा नेणें
२८८३	।।ना.गा.०४३०.००२।।	चंद्रभागेतीरीं चतुर्भूज नरनारी। विठ्ठल कैवारी उभा असे
२८८४	।।ना.गा.०४३०.००३।।	परतुन येथें न येसी मागुता । आणिकां सर्वथा ऐसें नाहीं
२८८५	।।ना.गा.०४३०.००४।।	क्षीरसागरींचें जिव्हार वैकुंठीचें सार । पुंडलिकें उपहार केला लोकां
२८८६	।।ना.गा.०४३०.००५।।	नामा म्हणे आम्हां थोर लाभ जाला । तापत्रय गेला पांडुरंगा

२८८७	।।ना.गा.०४३१.००१।।	अरूप रूपासी आलें । परब्रह्म ठसावलें । भक्तां पुंडलिका फावलें । गौप्य जालें प्रगट
२८८८	।।ना.गा.०४३१.००२।।	धन्य धन्य भिंवरातट । चंद्रभागा वाहे निकट । धन्य धन्य वाळुवंट । मुक्तिपेठ पंढरी
२८८९	।।ना.गा.०४३१.००३।।	धन्य धन्य पद्माळें। सबराभरित स्वानंदजळें। स्नान केलिया निर्मळें । कोटिकुळें उद्धरती
२८९०	।।ना.गा.०४३१.००४।।	धन्य धन्य गा मानदेशु । जेथें विठ्ठलें केला रहिवासु । नामा विनवी विष्णुदासु। देईं सौरसु भक्तीचा
२८९१	।।ना.गा.०४३२.००१।।	पांडुरंगाचें नाम बरवें । आवडी घेतली माझ्या जीवें
२८९२	।।ना.गा.०४३२.००२।।	कैसा देहुडा पाउलीं उभा आहे । वेणुनादीं गोपाळ वेणु वाहे
२८९३	।।ना.गा.०४३२.००३।।	आंगीं चर्चित चंदन माळा गळां । भाळीं शोभताहे कस्तुरींचा टिळा
२८९४	।।ना.गा.०४३२.००४।।	नामा म्हणे धन्य धन्य जिणें । एकवेळ पंढरी पाहणें
२८९५	।।ना.गा.०४३३.००१।।	उठाउठी जावो पंढरीस राहो । आनंदें क्षेत्र पाहों विठ्ठलाचें
२८९६	।।ना.गा.०४३३.००२।।	नाम वदनीं ध्यावो । चरण हृदयीं ध्यावो । रूप डोळां पाहों । विठ्ठलाचें
२८९७	।।ना.गा.०४३३.००३।।	जीवें भेटी घेवो । आनंदभावें गावों । प्रेमसुख घेवो । म्हणे नामा
२८९८	।।ना.गा.०४३४.००१।।	विठोबाच्या गांवा जाईन धांवोनी । घालीन लोळणी चरणांवरी
२८९९	।।ना.गा.०४३४.००२।।	शिणभाग दवडिला म्हणेल । जीविंचें पुसेल जडभारी
२९००	।।ना.गा.०४३४.००३।।	हरुषें लोळत जाईन महाद्वारां । भेटाया सामोरा येईल मज
२९०१	।।ना.गा.०४३४.००४।।	उचलोनी वोसंगें घेईल आदरें। मुख पीतांबरें पुसिल माझें
२९०२	।।ना.गा.०४३४.००५।।	धरोनी बाहुवटी उठवील हस्तकीं । ठेवील मस्तकीं अभयकर
२९०३	।।ना.गा.०४३४.००६।।	राही रखुमाई माता सत्यभामा। कडे घेऊनि नामा बुझाविला
२९०४	।।ना.गा.०४३५.००१।।	धांऊनियां मिठी घालीन संतचरणीं । सांगेन वचनीं मनिंचे गुज
२९०५	।।ना.गा.०४३५.००२।।	विठोबाचे गांवा न्यारे एकवेळां । तापत्रयें आहाळला जीव माझा
२९०६	।।ना.गा.०४३५.००३।।	आनंदाचें जीवन पाहेन श्रीमुख । शोक मोह दु:ख हरती माझे
२९०७	।।ना.गा.०४३५.००४।।	विटेसहित चरण देईन आलिंगनु । तेणें माझी तनु ओल्हावेल
२९०८	।।ना.गा.०४३५.००५।।	तुम्ही आवडते हरीचें अंतरंग । माझे जीवलग प्राणसखे
२९०९	।।ना.गा.०४३५.००६।।	नामा म्हणे विठोबा कृपेची माउली । तळहातें साउली करील मज
२९१०	।।ना.गा.०४३६.००१।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ । जेथें समारंभ हरिकथेचा
२९११	।।ना.गा.०४३६.००२।।	तें एक पंढरी विख्यात त्रिभुवनीं। सकळां शिरोमणी चंद्रभागा
२९१२	।।ना.गा.०४३६.००३।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुखरूप । जेथें त्रिविध ताप हारपती

२९१३	।।ना.गा.०४३६.००४।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुंदर। गरुडटकभार विराजती
२९१४	।।ना.गा.०४३६.००५।।	ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ । जेथें नासे मळ दुष्टबुद्धि
२९१५	।।ना.गा.०४३६.००६।।	नामा म्हणे संतजनांचें माहेर । गातो मनोहर गोड वाटे
२९१६	।।ना.गा.०४३७.००१।।	सर्व सुखरासी भिंवरेचे तीरीं । आमुची पंढरी कामधेनु
२९१७	।।ना.गा.०४३७.००२।।	प्रेमामृतें दुभे सदा संतजनां । वोसंडतो पान्हा नित्य नवा
२९१८	।।ना.गा.०४३७.००३।।	धर्म अर्थ काम मोक्ष चाऱ्ही थानें । दोहोणार धन्य पुंडलीक
२९१९	।।ना.गा.०४३७.००४।।	जीयेचें दुभतें नित्य नवें वाढे । पंढरीसी वोढे पूर्वपुण्यें
२९२०	।।ना.गा.०४३७.००५।।	भक्तिचेनि बळें भावाचेंनि मेळें । देखोनियां वोळे अधिकाधिक
२९२१	।।ना.गा.०४३७.००६।।	भाग्यवंत नामा तें क्षीर लाधला । प्रेमें वोसंडला गर्जे नामें
२९२२	।।ना.गा.०४३८.००१।।	पंढरीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा । शेषा सहस्रमुखा न वर्णवेची
२९२३	।।ना.गा.०४३८.००२।।	पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी । जन्मोजन्मीं वारी घडली जया
२९२४	।।ना.गा.०४३८.००३।।	पंढरीस जातां प्रेम उचंबळत । आनंदें गर्जत नामघोष
२९२५	।।ना.गा.०४३८.००४।।	विश्वमूर्ति विठो विश्वंभर देखें । विसरला दुःखें देहभाव
२९२६	।।ना.गा.०४३८.००५।।	नामा म्हणे त्याचा होईन चरणरज । नुपेक्षील मज पांडुरंग
२९२७	।।ना.गा.०४३९.००१।।	पंढरीची वारी जयाचिये कुळीं । त्याची पायधुळी लागो मज
२९२८	।।ना.गा.०४३९.००२।।	तेणें त्रिभुवनीं होईन सरता। नलगे पुरुषार्थी मुक्ति चारी
२९२९	।।ना.गा.०४३९.००३।।	नामाची आवडी प्रेमाचा जिव्हाळा । क्षण जीवावेगळा न करी त्यासी
२९३०	।।ना.गा.०४३९.००४।।	नामा म्हणे माझा सोयरा जिवलग । सदा पांडुरंग तयाजवळीं
२९३१	।।ना.गा.०४४०.००१।।	पंढरीचें प्रेम आहे ज्याचे जीवीं । त्याची नित्य नवी करीन आशा
२९३२	।।ना.गा.०४४०.००२।।	ते माझे सोयरे सुखाचे सद्गुरु । भवसिंधूचा पारु उतरती
२९३३	।।ना.गा.०४४०.००३।।	माझ्या विठोबाच्या नामीं ज्या विश्वास । होईन त्यांचा दास आवडीचा
२९३४	।।ना.गा.०४४०.००४।।	माझ्या विठोबाच्या चरणीं ज्यांचा भाव । दारवंटा पाय धरीन त्यांचे
२९३५	।।ना.गा.०४४०.००५।।	माझ्या विठोबाचें ध्यान ज्याचें मनीं । सांडोवा अंगणीं होईन त्याचे
२९३६	।।ना.गा.०४४०.००६।।	ऐसें सर्वभावें विठोबासी शरण । त्यांचे वंदीन चरण नामा म्हणे
२९३७	।।ना.गा.०४४१.००१।।	अभिमानें लोक जाती वाराणसी । आमुची मिरासी पंढरीये
२९३८	।।ना.गा.०४४१.००२।।	तीर्थ व्रत नेम मज केशीराजा। पंढरीचा राजा बोळवया

२९३९	।।ना.गा.०४४१.००३।।	पाउलापाऊलीं चालती मारग । उभा पांडुरंग मागें पुढें
२९४०	।।ना.गा.०४४१.००४।।	नामा म्हणे मज पंढरी विसांवा । दर्शन केशवा पुरे मज
२९४१	।।ना.गा.०४४२.००१।।	जाऊं म्हणतां पंढरी । यम थोर चिंता करी
२९४२	।।ना.गा.०४४२.००२।।	धरितां पंढरीची वाट । पापें पळालीं कपाट
२९४३	।।ना.गा.०४४२.००३।।	कळस देखतां नयनीं । होय पातकांची धुणी
२९४४	।।ना.गा.०४४२.००४।।	घेतां विठोबाची भेटी । दोष जाती उठाउठी
२९४५	।।ना.गा.०४४२.००५।।	करितां चंद्रभागे स्नान । सर्व दोषां पडे खाण
२९४६	।।ना.गा.०४४२.००६।।	नामा म्हणे रे केशवा । आम्ही करूं तुझी सेवा
२९४७	।।ना.गा.०४४३.००१।।	वांकडें पाहणें जया लौकिकासी । मज पंढरीसी वास पुरे
२९४८	।।ना.गा.०४४३.००२।।	उदंड उपास कासया करावें । पुरे एका भावें भाविकांसी
२९४९	।।ना.गा.०४४३.००३।।	तीर्थ क्षेत्र मूळ जाणा वाळुवंट । कटीं कर नीट भक्तांसाठीं
२९५०	।।ना.गा.०४४३.००४।।	नामा म्हणे माझी वैकुंठ पंढरी । तेथें निरंतरीं जन्म देई
२९५१	।।ना.गा.०४४४.००१।।	आम्हीं स्वर्गसुख मानूं जैसा ओक । देखोनियां सुख पंढरीचें
२९५२	।।ना.गा.०४४४.००२।।	नलगे वैकुंठ न वांछूं कैलास। सर्वस्वाची आस देवा पायीं
२९५३	।।ना.गा.०४४४.००३।।	नलगे संतति आणि धन मान । एक असें ध्यान विठोबाचें
२९५४	।।ना.गा.०४४४.००४।।	सत्य कीं मायिक आमुचें बोलणें । तुझी तुज आण सांग हरी
२९५५	।।ना.गा.०४४४.००५।।	जीवभाव आम्हीं सांडूं ओंवाळूनि । नामा लोटांगणीं महाद्वारीं
२९५६	।।ना.गा.०४४५.००१।।	वैकुंठासी आम्हां नको धाडूं हरी । वास दे पंढरी सर्वकाळ
२९५७	।।ना.गा.०४४५.००२।।	वैकुंठ कोपट जुनाट झोंपडी । नको अडाअडी घालूं आम्हां
२९५८	।।ना.गा.०४४५.००३।।	वैकुंठीं जाऊनि काय बा करावें । उगेंचि बैसावें मौनरूप
२९५९	।।ना.गा.०४४५.००४।।	नामा म्हणे मज येथेंच हो ठेवी । सदा वास देई चरणांजवळी
२९६०	।।ना.गा.०४४६.००१।।	नित्य प्रेमाचे पेटे बांधीं माझे पोटीं । उतरी जगजेठी पैलपार
२९६१	।।ना.गा.०४४६.००२।।	निरे भिवरे ऐक्य तीरीं । कां पद्माळा पंढरपुरीं
२९६२	।।ना.गा.०४४६.००३।।	केलिया रविवारीं आंघोळी । महादोषां होय होळी
२९६३	।।ना.गा.०४४६.००४।।	पाप जाईल जन्माचें । पद पावाल अच्युताचें
२९६४	।।ना.गा.०४४६.००५।।	म्हणाल बोलणें कोणाचें । नामया स्वामी केशवाचें

२९६५	।।ना.गा.०४४७.००१।।	देव गुज सांगे पंढरीसी यारे । प्रेमें चित्तीं घ्या रे नाम माझे
२९६६	।।ना.गा.०४४७.००२।।	काया वाचा मन दृढ धरा जीवीं । सर्व मी भार चालवी त्यांचा
२९६७	।।ना.गा.०४४७.००३।।	भवसिंधु तारीन घ्या रे माझी भाक । साक्ष पुंडलिक करूनी बोले
२९६८	।।ना.गा.०४४७.००४।।	लटकें जरी असे नामयासी पुसा। आहे त्या भरंवसा नामीं माझ्या
२९६९	।।ना.गा.०४४८.००१।।	अवताराची राशी तो हा उभा विटेवरी । शंखचक्रगदापद्मसहित करीं हरी
२९७०	।।ना.गा.०४४८.००२।।	देखिला देखिला देवादि देव बरवा । समाधान जीवा पाहतां वाटे गे माये
२९७१	।।ना.गा.०४४८.००३।।	सगुण चतुर्भुज रूपडें तेज पुंजाळती । वंदी चरणरज नामा विनवीतसे पुढतीं गे माये
२९७२	।।ना.गा.०४४९.००१।।	भक्ताचिया काजा अवतार धरी । कृपाळू श्रीहरि सांचोकार
२९७३	।।ना.गा.०४४९.००२।।	तो हा महाराज चंद्रभागे तीरीं । उभा विटेवरी पांडुरंग
२९७४	।।ना.गा.०४४९.००३।।	वेद नेले म्हणोनि मत्स्य जाला हरी । शंखासुरा मारी आफळोनि
२९७५	।।ना.गा.०४४९.००४।।	समुद्र मंथनीं मंदार बुडाला । कासव तो जाला तया तळीं
२९७६	।।ना.गा.०४४९.००५।।	हिरण्याक्षें धरा नेतां रसातळां । वराहरूपें त्याला वधियेलें
२९७७	।।ना.गा.०४४९.००६।।	प्रल्हादासी पिता गांजी नानापरी । स्तंभीं नरहरी प्रगटला
२९७८	।।ना.गा.०४४९.००७।।	देवाचिया काजा वामन भूतळीं । बळीसी पाताळीं घातियेला
२९७९	।।ना.गा.०४४९.००८।।	भूमिभार जाला क्षत्रियांचें कुळीं । केली निःक्षत्रिय परशुरामें
२९८०	।।ना.गा.०४४९.००९।।	सीतेचिया काजा रावण मर्दिला । सूर्यवंशीं जाला रामचंद्र
२९८१	।।ना.गा.०४४९.०१०।।	गोकुळीं जन्मला श्रीकृष्ण आठवा । होऊनि पांडवा साहाकरी
२९८२	।।ना.गा.०४४९.०११।।	भक्तांचिया काजा बौद्ध अवतार । जाला दिगंबर अवनिये
२९८३	।।ना.गा.०४४९.०१२।।	कलंकी अवतार होणार श्रीहरी । तेव्हां पृथ्वीवरी तृण न उरे
२९८४	।।ना.गा.०४४९.०१३।।	नामा म्हणे तुझे अनंत अवतार । काय मी पामर बोलूं वाचे
२९८५	।।ना.गा.०४५०.००१।।	होसी भक्तांचा कोंवसा । तुझीं ब्रीदें हृषिकेशा । निवविलें सायासा । कृपासिंधु मुरारी
२९८६	।।ना.गा.०४५०.००२।।	अंबऋषिकारणें । दहा वेळ गर्भवासा येणें । अवतार धरिला नारायणें । गजापूर नगरीं
२९८७	।।ना.गा.०४५०.००३।।	अंदुरायाच्या घरीं। बाळ जनसेनाच्या कुमरीं । मत्स्य रूप अवतार धरीं । वेद हरणकैवारी नारायण
२९८८	।।ना.गा.०४५०.००४।।	विद्यापूर नगरीं । अंधरू राजा राज्य करी । श्रियादेवी त्या सुंदरी । उदरीं कुमरू जन्मला
२९८९	।।ना.गा.०४५०.००५।।	पृथ्वी रसातळवटीं । जाता थोर आंदोळली सृष्टी । धांवण्या धांविन्नले जगजेठी । धरा पृष्ठीं सांवरिली
२९९०	।।ना.गा.०४५०.००६।।	मर्गजपुरीं पुरपती । हिरण्याक्ष चक्रवर्ती । अग्नि असे जनवंती । घरीं बाळवराह

२९९१	।।ना.गा.०४५०.००७।।	त्रिदशदेवश्रिया चाडा । हिरण्याक्ष वधिला गाढा । भूगोल धरूनियां दाढा । केला निवाडा स्वर्गींचा
२९९२	।।ना.गा.०४५०.००८।।	कर्पूरपूरपाटण । हरिभक्तीचें हें स्थान । सदयादेवी प्रिया नंदन । उदरीं नृसिंह जन्मला
२९९३	।।ना.गा.०४५०.००९।।	पित्या पुत्रा जाली कळी । स्तंभीं प्रगटला तये वेळीं । असुर मारिला करकमळीं । भक्त प्रल्हाद रक्षिला
२९९४	।।ना.गा.०४५०.०१०।।	कश्यपनंदनवर्धन । कोंवळादशेचा वामन । खुजट रूप धरून । महेंद्रपुरीसी आला
२९९५	।।ना.गा.०४५०.०११।।	दानें तपें व्रतें बळी । तोही घातला पाताळीं । अद्यापि राहिला जवळी । चरणतळीं पद देउनी
२९९६	।।ना.गा.०४५०.०१२।।	रेणापुरीं देवी रेणुका । लाधली जमदग्नीस देखा । तिचे उदरीं विश्वतारक । परशुराम जन्मला
२९९७	।।ना.गा.०४५०.०१३।।	असुरीं वधियेली माया । म्हणे धांवे पुत्रराया । अवचित पातला धांवया । सहस्रार्जुन मारिला
२९९८	।।ना.गा.०४५०.०१४।।	अयोध्या नाम नगरी । जन्म कौसल्ये उदरीं । देवभक्तांचा कैवारी । दशरथनंदन राघव
२९९९	।।ना.गा.०४५०.०१५।।	राम त्रैलोक्यीं वीर दारुण । तेणें वधियेला रावण । अढळपद देऊन । राज्यीं बिभीषण स्थापिला
३०००	।।ना.गा.०४५०.०१६।।	मथुरा नामें नगरी । वसुदेव देवकी उदरीं । कृष्ण आठवा अवतारीं । लीलाविग्रहि जन्मले
३००१	।।ना.गा.०४५०.०१७।।	कंस चाणूर मर्दिले । विमलार्जुन उन्मळिले । सप्त गर्भांचे सूड घेतले । रक्षियेले गाई गोपाळ
३००२	।।ना.गा.०४५०.०१८।।	बौद्ध श्रीवत्साच्या घरीं । जन्म शांभवीच्या उदरीं । राजा कांतिये नगरीं । निरंतर रूपें राहिला
३००३	।।ना.गा.०४५०.०१९।।	ध्यान मुद्रा मांडूनियां । वस्त्रें शस्त्रें त्यजूनियां । राहिला पैं निरंजनिया। भक्तिभाव ओळखे तो
३००४	।।ना.गा.०४५०.०२०।।	कल्कि जसरायाचा पुत्र । सावित्री देवीचा कुमर । शंभलापुरीं करील अवतार। दाही रूपें प्रगटला
३००५	।।ना.गा.०४५०.०२१।।	ऐसा अमूर्त मूर्ति विटेवर । उभा राहिला निरंतर । विष्णुदास नाम्याचा दातार । वर विठ्ठल पंढरीये
३००६	।।ना.गा.०४५१.००१।।	देवा तूं प्रथम गर्भवास भोगिसी । सागरीं जळचरू मत्स्य जालासी । कमठें पाठी न संडी कैसी। कूर्मे कासाविसी केलें तुज
३००७	।।ना.गा.०४५१.००२।।	अपवित्र नाम आदि वराह । याहूनि थोर कूर्म कांसव । अर्ध सावज अर्ध मानव। हे भवभाव कर्माचे
३००८	।।ना.गा.०४५१.००३।।	खुजेपणें बळीस पाताळीं घातलें । तेणें कर्मे तयाचें द्वार रक्षिलें । पितयाचे वचनें मातेसी वधिलें । तें कर्म जडलें परशुरामा
३००९	।।ना.गा.०४५१.००४।।	श्रीरामा जाल्या आपदा बहुता । कर्मे भोगविलें अंतरली सीता। भालुकातिर्थीं वधियेलें अवचिता । नाम अच्युता तुज जालें
३०१०	।।ना.गा.०४५१.००५।।	ऐसा कष्टी होऊनी बौद्ध राहिलासी । तूं कलंकिया लोकां मारिसी । आपल्या दोषांसाठी आणिकां दंडिसी । निष्कलंक होसी नारायणा
३०११	।।ना.गा.०४५१.००६।।	ऐसा तूं बहुतां दोषी बांधिलासी । पुढिलाचि जन्में अवगतोसी । विष्णुदास नामा म्हणे हृषिकेशी । तुझी भीड कायसी स्वामियाहो
३०१२	।।ना.गा.०४५२.००१।।	प्रथम अवतारीं देव मच्छ जाले सागरीं । वधोनि शंखासुर वैरी आणिले वेद
३०१३	।।ना.गा.०४५२.००२।।	कूर्म अवतारीं सावली सृष्टी । वराहद्विज नेहटी धरणीधरू
३०१४	।।ना.गा.०४५२.००३।।	प्रल्हाद कैवारा स्तंभाभीतरीं । बळी बंधन हरी प्रगट जाला

३०१५	।।ना.गा.०४५२.००४।।	रेणुका नंदन द्विजकुळ पाळण । त्रिंबक भंजन रघुनाथ
३०१६	।।ना.गा.०४५२.००५।।	गोकुळीं अवतारू सोळा सहस्र वरू । आपण योगेश्वरू बौद्धरूपीं
३०१७	।।ना.गा.०४५२.००६।।	कलंकी अवतारू वदतसे वरू । नामया दातारू केशिराज
३०१८	।।ना.गा.०४५३.००१।।	मत्स्य कच्छ क्रोड मृग ते खुजट । जेथूनि प्रगट जालीं रूपें
३०१९	।।ना.गा.०४५३.००२।।	तेंचि ब्रह्म उभें भिंवरेच्या तीरीं। हात कटावरी ठेवूनियां
३०२०	।।ना.गा.०४५३.००३।।	मातृघाती हिंडे वनीं जो रडत । चोर जार घात करी दुष्ट
३०२१	।।ना.गा.०४५३.००४।।	दिगंबर अश्वारूढ खड्गधारी। पृथ्वीचा जो करी ग्रास एक
३०२२	।।ना.गा.०४५३.००५।।	नामा म्हणे मुंगी आदि ब्रह्मावरी । नाना अवतारीं एकलाचि
३०२३	।।ना.गा.०४५४.००१।।	अंगाचिये सेज फणि छाया धरी । सहस्रमुखीं करी स्तुति शेष
३०२४	।।ना.गा.०४५४.००२।।	परि तयातें तुझें चरित्र अकल्पित । तेथें माझें गीत कोणीकडे
३०२५	।।ना.गा.०४५४.००३।।	कैशापरी तुज आम्हीं ध्यावें देवा । हें वर्म केशवा सांग मज
३०२६	।।ना.गा.०४५४.००४।।	मार्कंडेयो भृशुंडी लोमहर्ष अगस्ति । करितां तुझी स्तुति कल्प गेलें
३०२७	।।ना.गा.०४५४.००५।।	ध्यानीं पाहतां तुज न पवती योगी । तेथें मी तो रोगी कोणीकडे
३०२८	।।ना.गा.०४५४.००६।।	ब्रह्मचर्यव्रत आचरती देव । ऋषिमुनि सर्व करिती सेवा
३०२९	।।ना.गा.०४५४.००७।।	परि तुवां गर्व हरिला तयांचा । तेथें माझी वाचा कोणीकडे
३०३०	।।ना.गा.०४५४.००८।।	इतुकें ऐकोनि बोले केशिराज खुणें । आरुता येई म्हणे नामयासी
३०३१	।।ना.गा.०४५४.००९।।	मुखीं माझे नाम हृदयीं धरूनि प्रेम । हेंचि तुज वर्म सांगितलें नाम्या
३०३२	।।ना.गा.०४५५.००१।।	चारी वेद तुझ्या नांदती नगरीं । तेथें मी भिकारी काय वानूं
३०३३	।।ना.गा.०४५५.००२।।	वर्णितां पार नेणें चतुरानन । तेथें मी अज्ञान काय जाणें
३०३४	।।ना.गा.०४५५.००३।।	अंगलग सेवक तो सारिखा । तेथें माझा लेखा कोणीकडे
३०३५	।।ना.गा.०४५५.००४।।	कैलासींचा राणा करितसे ध्यान । तेथें भ्रांत मन केवीं रिघे
३०३६	।।ना.गा.०४५५.००५।।	इंद्रासहित देव जेथें ओळंगणें । तेथें दास्य करणें घडे कांहीं
३०३७	।।ना.गा.०४५५.००६।।	नामा म्हणे केशवा काय म्यां करावें । तुझे पायीं रहावें कैशापरी
३०३८	।।ना.गा.०४५६.००१।।	वेदां नकळे पार श्रुतिसी गव्हार । उपनिषदां सार नकळेचि
३०३९	।।ना.गा.०४५६.००२।।	तो हरि गोकुळीं वसुदेवा कुळीं। यशोदेजवळी बाळकृष्ण
३०४०	।।ना.गा.०४५६.००३।।	ब्रह्मादिक वंदिती शिवादिक ध्याती । शास्त्रांसी तों गति नकळेचि

३०४१	।।ना.गा.०४५६.००४।।	योग्यांचें चिंतन मुनींचें अंजन । शेषादिकां ध्यान सदा ज्याचें
३०४२	।।ना.गा.०४५६.००५।।	पुराणें भागलीं आचारें श्रमलीं । बोलतां राहिलीं साधुवृंदें
३०४३	।।ना.गा.०४५६.००६।।	नामा म्हणे तो हा विठ्ठल पंढरी । नाममात्रें तारी सकळांसी
३०४४	।।ना.गा.०४५७.००१।।	सहस्र तोंडाचा तोहि भागियेला । अंत नाहीं ज्याला गुणालागीं
३०४५	।।ना.गा.०४५७.००२।।	तेथें मी पामर काय बोलूं वाणी । तुझी कीर्ति जनीं काय कैसी
३०४६	।।ना.गा.०४५७.००३।।	यथामति कांहीं बोलियलों बोलु । तोचि हा विठ्ठलु नामा म्हणे
३०४७	।।ना.गा.०४५८.००१।।	अगणित गुण वर्णिती पुराणें । पंढरीचे राणे ख्याती जगीं
३०४८	।।ना.गा.०४५८.००२।।	अलक्ष भेटी लक्षिताची नाहीं । पुंडलिकें कांहीं तप केलें
३०४९	।।ना.गा.०४५८.००३।।	युगें गेलीं अठ्ठावीस ते अजुनी । उभा चक्रपाणि राहिलासी
३०५०	।।ना.गा.०४५८.००४।।	वेद म्हणती नेति पुराणें तें किती । भांबावल्या मती म्हणे नामा
३०५१	।।ना.गा.०४५९.००१।।	खोळ बुंथीचा तो देवकीनंदन । उभा देखिला तो गे बाई
३०५२	।।ना.गा.०४५९.००२।।	नंदाचा नंदनु संताचें जीवन । उभा देखिला तो गे बाई
३०५३	।।ना.गा.०४५९.००३।।	कामिनीमनोहर नामया दातार । उभा देखिला तो गे बाई
३०५४	।।ना.गा.०४६०.००१।।	फेडूनि पीतांबर उभा दिगंबर । कटीं ठेवूनि कर वाळवंटीं
३०५५	।।ना.गा.०४६०.००२।।	मोतियाचे हार सांडूनि रत्नकीळा। तुळशीच्या माळा गळां घाली
३०५६	।।ना.गा.०४६०.००३।।	पर्यंक शयन शेषाचें आसन । सांडूनि निजभुवन उभे येथें
३०५७	।।ना.गा.०४६०.००४।।	सांडूनियां भक्ति सनकादिकीं प्रेमा । कलियुगीं नामा आवडला
३०५८	।।ना.गा.०४६१.००१।।	पुंडलिकाचे भेटी भीवरेचे तटीं । परब्रह्म उभें वाळुवंटीं गे माये
३०५९	।।ना.गा.०४६१.००२।।	उभा वीटेवरी कर ठेवुनि कटावरी । उभा भीमातीरीं जगजेठी गे माय
३०६०	।।ना.गा.०४६१.००३।।	विठ्ठल कान्हा चरणीं वांकी तोडर । कांसे पीतांबर पदकलीळा मनोहर गे माय
३०६१	।।ना.गा.०४६१.००४।।	कान्हा विठ्ठल कान्हा प्रसन्नवदन थोरा । जो आथी करुणाकरा हरि नामया दातारा
३०६२	।।ना.गा.०४६२.००१।।	देहुडा चरणु वहातसे वेणु । गोपिकारमणु स्वामी माझा
३०६३	।।ना.गा.०४६२.००२।।	देखिला गे माय यमुनेचे तीरीं । हात खांद्यावरी राधिकेच्या
३०६४	।।ना.गा.०४६२.००३।।	गुंजावर्ण डोळे शिरीं बाबरझोटी । मयूर पिच्छ वेष्टि शोभतसे
३०६५	।।ना.गा.०४६२.००४।।	सगुण मेघ:श्याम लावण्य सुंदर । नामया दातार केशवराज
३०६६	।।ना.गा.०४६३.००१।।	हरि भोळा हरि भोळा । आम्ही डोळां पाहिला

३०६७	।।ना.गा.०४६३.००२।।	हरि श्रेष्ठ हरि श्रेष्ठ । आम्हां कष्ट नाहीं ते
३०६८	।।ना.गा.०४६३.००३।।	हरि उदार हरि उदार । आम्हां धीर होईना
३०६९	।।ना.गा.०४६३.००४।।	नामा म्हणे हरि दाता । आम्हां दासां रक्षितो
३०७०	।।ना.गा.०४६४.००१।।	वैकुंठ तें घर । सांडूनियां निरंतर
३०७१	।।ना.गा.०४६४.००२।।	तो हा पुंडलिका द्वारीं । उभा कर कटावरी
३०७२	।।ना.गा.०४६४.००३।।	क्षीर सागरींची मूर्ती । तो हा रुक्मिणीचा पती
३०७३	।।ना.गा.०४६४.००४।।	नये योगियांचे ध्यानीं । छंदें नाचतो कीर्तनीं
३०७४	।।ना.गा.०४६४.००५।।	नामा म्हणे आला । सर्वें परिवार आणिला
३०७५	।।ना.गा.०४६५.००१।।	अनंता श्रीधरा गोविंदा केशवा । मुकुंदा माधवा नारायणा
३०७६	।।ना.गा.०४६५.००२।।	देवकीतनया गोपिकारमणा । भक्तउद्धरणा त्रिविक्रमा
३०७७	।।ना.गा.०४६५.००३।।	मकर कुंडलें श्रवणीं शोभती । एकावळी दीप्ति तेजें भारी
३०७८	।।ना.गा.०४६५.००४।।	नामा म्हणे तुझा नकळेचि पार । भजों निरंतर सर्वकाळ
३०७९	।।ना.गा.०४६६.००१।।	सत्यसंकल्पाचा कर्ता जो विश्वाचा । अनाथ जीवांचा तो मायबाप
३०८०	।।ना.गा.०४६६.००२।।	पुंडलिकें तया आणिलें रंगणीं । कटावरी पाणि ठेवूनियां
३०८१	।।ना.गा.०४६६.००३।।	अणुरेणुमाजि व्यापूनि राहिला । आनत्व जाहला एकलाचि
३०८२	।।ना.गा.०४६६.००४।।	नामा म्हणे वेद त्यालागीं बोभाय । जोडोनियां पाय ठाके उभा
३०८३	।।ना.गा.०४६७.००१।।	तुझिया सत्तेनें वेदांसी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें
३०८४	।।ना.गा.०४६७.००२।।	ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणूनि शरण आलों
३०८५	।।ना.गा.०४६७.००३।।	मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे
३०८६	।।ना.गा.०४६७.००४।।	नामा म्हणे काडी न हाले साचार । प्रभु तूं निर्धार पांडुरंगा
३०८७	।।ना.गा.०४६८.००१।।	अच्युता अनंता श्रीधरा माधवा । देवा आदिदेवा पांडुरंगा
३०८८	।।ना.गा.०४६८.००२।।	कृष्णा विष्णु हरि गोविंदा वामना । तूंचि नारायणा नामधारी
३०८९	।।ना.गा.०४६८.००३।।	मुकुंदा मुरारी प्रद्युम्ना केशवा । नाम सदाशिवा शांतरूपा
३०९०	।।ना.गा.०४६८.००४।।	रूपातीत हरी दाखवी सगुण । निरंतर ध्यान करी नामा
३०९१	।।ना.गा.०४६९.००१।।	पंढरीचा देव सत्सच्चित अद्वय । तूंचि मायबाप पांडुरंगा
३०९२	।।ना.गा.०४६९.००२।।	सगुण निर्गुण दाविसी प्रकार । दाही अवतार निमित्तासी

३०९३	।।ना.गा.०४६९.००३।।	ऐसा माझा स्वामी समर्थ गोविंद । निरंतर छंद हरिनामीं
३०९४	।।ना.गा.०४६९.००४।।	नामा म्हणे कांहीं न धरिसी लाज । भाविकांसी गुज कानीं सांगें
३०९५	।।ना.गा.०४७०.००१।।	केशिराजा आदि सकळा अनादि । तूंचि कृपानिधी नारायणा
३०९६	।।ना.गा.०४७०.००२।।	अव्यक्ता अक्षरा सर्व अविनाशा । अगा पंढरीशा पांडुरंगा
३०९७	।।ना.गा.०४७०.००३।।	तूंचि ब्रह्मचारी गोपिकांचे घरीं । सर्वस्वें उद्धरी सर्व जीवां
३०९८	।।ना.गा.०४७०.००४।।	लटिकें दाविसी गोकुळाभीतरीं । नामा म्हणे शिरीं भार वाही
३०९९	।।ना.गा.०४७१.००१।।	अनंत हे कळा अनंत हे लीळा । अनंत जयाला वेद गाती
३१००	।।ना.गा.०४७१.००२।।	तोचि पांडुरंग पंढरीचा राजा । धणीं जाला वोजा भावबळें
३१०१	।।ना.गा.०४७१.००३।।	अनंत तयाच्या सेवा वोजावणी । नामरूप गुणीं नामातीत
३१०२	।।ना.गा.०४७१.००४।।	नामा म्हणे अंत असेना तो कांहीं । सांपडतो पाहीं पंढरीये
३१०३	।।ना.गा.०४७२.००१।।	देव दाखवी ऐसा नाहीं गुरु । जेथें जाय तेथें दगड शेंदरू
३१०४	।।ना.गा.०४७२.००२।।	देव दगडाचा बोलेल कैंचा । कोणे काळीं त्यास फुटेल वाचा
३१०५	।।ना.गा.०४७२.००३।।	देव देव करितां शिणलें माझें मन । जेथें जाय तेथें पूजा पाषाण
३१०६	।।ना.गा.०४७२.००४।।	नामा तोचि देव हृदयीं पाहे । नामा केशवाचे न सोडी पाय
३१०७	।।ना.गा.०४७३.००१।।	वाळवंटीं उभा करें कुरवाळिल । जीवीचें पुसेल जडभारी
३१०८	।।ना.गा.०४७३.००२।।	हरूषें लोळणीं घालूं महाद्वारीं। येईल सामोरी केशिराज
३१०९	।।ना.गा.०४७३.००३।।	शोभतसे पायीं भक्त ब्रीदावळी । जिवासी सांभाळी दीनानाथ
३११०	।।ना.गा.०४७३.००४।।	माझा अभिमान धरून मानसीं । नामा म्हणे होसी भक्तां साह्य
३१११	।।ना.गा.०४७४.००१।।	करूणा बहुत तुझ्या चरणापाशीं । धांवोनि हृषिकेशी आलों सर्व
३११२	।।ना.गा.०४७४.००२।।	वाळवंटीं उभे पताकांचे भार । पाहोनि शंकर वेडावला
३११३	।।ना.गा.०४७४.००३।।	सूर्य चंद्रादिक घालिती लोटांगण । करी प्रदक्षिणा स्वयें गंगा
३११४	।।ना.गा.०४७४.००४।।	नामा म्हणे ऐसें सांगतां बहुत । वेदशास्त्र ग्रंथ ठकावले
३११५	।।ना.गा.०४७५.००१।।	देव आपण नाटक । भक्तां दाखवी वैकुंठ
३११६	।।ना.गा.०४७५.००२।।	देव आपण संसारीं । होसी भक्तांचा साहकारी
३११७	।।ना.गा.०४७५.००३।।	देव आपण निराळा । भक्तां दाविती सोहळा
३११८	।।ना.गा.०४७५.००४।।	नामा म्हणे भक्तांसाठीं । हात जोडी जगजेठी

३११९	।।ना.गा.०४७६.००१।।	गोविंद गुणाचें निधान । गोविंद नयनींचे अंजन । गोविंद बाळकाचें स्थान । गोविंद चिंतन योगियांचें
३१२०	।।ना.गा.०४७६.००२।।	गोविंद पांघुरे कांबळा । गोविंद कृपेचा कोंवळा । गोविंद भावालागीं भोळा । गोविंद अजामेळा उद्धरणें
३१२१	।।ना.गा.०४७६.००३।।	गोविंद बुद्धीची बुद्धी । गोविंद एकली मांदी । गोविंदें हरिली विघ्नव्याधि । गोविंद सिद्धि स्मरलिया
३१२२	।।ना.गा.०४७६.००४।।	गोविंद गोकुळपाळक । गोविंद अंगवणें एक । गोविंदे दैत्या लावियेला धाक । गोविंद शेष शयनीं
३१२३	।।ना.गा.०४७६.००५।।	गोविंदें आडलिया काजा कैवारी । गोविंद बुडतियांतें तारी । गोविंद सोळा सहस्र नारी । गोविंदें बाळ ब्रह्मचारी
३१२४	।।ना.गा.०४७६.००६।।	गोविंद दान दीक्षा गुरु । गोविंदें अढळ केला धुरू। गोविंद नामया दातारू । रुक्मिणी वरू गोविंदु
३१२५	।।ना.गा.०४७७.००१।।	विठ्ठल माउली कृपेची सावली । आळवितां घाली प्रेम पान्हा
३१२६	।।ना.गा.०४७७.००२।।	न सांगतां सर्व जाणे तान्ह भूक । जवळी व्यापक न विसंबे
३१२७	।।ना.गा.०४७७.००३।।	माया मोह कैसा झकवि सर्वथा । अंतरींची व्यथा तोचि जाणे
३१२८	।।ना.गा.०४७७.००४।।	सुखशांति रूपें लेवउनि अंगीं । लागों नेदी धगी संसाराची
३१२९	।।ना.गा.०४७७.००५।।	देऊनि अभयदान करें तो कुरवाळी । करीतसे सांवली पितांबरें
३१३०	।।ना.गा.०४७७.००६।।	मुखीं नाममाळा कीर्तन श्रवणीं । लेवविलीं लेणीं नवविध
३१३१	।।ना.गा.०४७७.००७।।	नयनीं अंजन सूदलें सांवळें । समाधान झालें सर्व अंग
३१३२	।।ना.गा.०४७७.००८।।	अच्युत अनंत सुवर्णाची पेटी । घातलिसे कंठीं निर्विकार
३१३३	।।ना.गा.०४७७.००९।।	चतुर्भुज शोभा रूप मध्यें मणि । प्रभा त्रिभुवनीं विराजित
३१३४	।।ना.गा.०४७७.०१०।।	मुक्तलग शुद्ध बिंदुली गोजिरीं । पद्महस्त शिरीं स्थापितसे
३१३५	।।ना.गा.०४७७.०११।।	संत पायरज कपाळीं टिळका । नाहीं भय शंका कळिकाळा
३१३६	।।ना.गा.०४७७.०१२।।	सगुण साजिरा कटीं कडदोरा । अवर्ण दुर्भरा दृढ बोधू
३१३७	।।ना.गा.०४७७.०१३।।	काम क्रोधादिक करूनि पुतळे । पाईं जे घातले पायवाट
३१३८	।।ना.गा.०४७७.०१४।।	वासनेचि दृष्टी लागेल त्या झणीं । उभा चक्रपाणि मागें पुढें
३१३९	।।ना.गा.०४७७.०१५।।	संतपायीं नामा शृंगार मंडितु । अखंड क्रीडतु महाद्वारीं
३१४०	।।ना.गा.०४७८.००१।।	एक गोक्षीर धाम धवळा । एक तो सहज मेघ सांवळा । एक कंठीं रूंडमाळा । एक गळां वैजयंती
३१४१	।।ना.गा.०४७८.००२।।	एक तो वृषभारूढ जाण । एका साजे गरुडवाहन । एक स्मशानीं भस्मोद् धुळण । एका शयन क्षीरसागरीं
३१४२	।।ना.गा.०४७८.००३।।	एक भोळा कैलासीं चक्रवर्ती । एक तो वैकुंठाधिपती । एक सुरवर मुगुटीं वंदिती। एक अंगुष्ठीं गंगा वाहे
३१४३	।।ना.गा.०४७८.००४।।	एकाचे चरणीं नेपुरें झणात्कारू । एका पायीं रुळे तोडरू । एका परिधान व्याघ्रांबरू । एका पीतांबरू कसियेला
३१४४	।।ना.गा.०४७८.००५।।	एका नरकपाल खट्वांग डमरू त्रिशूळ । एका शंख चक्र गदा कमळ । एका अर्धांगी हैमवती बाळ । एका कमळा वामभागीं

३१४५	।।ना.गा.०४७८.००६।।	एक त्रिपुर संघानीं लक्ष न चुके । एकबाणें वाळी वधिला कौतुकें । विष्णुदास नामा एक रूप देखे । हरिहर कौतुके वर्णितसे
३१४६	।।ना.गा.०४७९.००१।।	अपराधाविण बळी । घातला पाताळीं । सर्वेचि कणव उपजली । द्वार राखिसी तयाचें
३१४७	।।ना.गा.०४७९.००२।।	गाऱ्हाणें सांगावें कवणा । अगा केशव सुजाणा । कोणी आणिक तुजविणा । नाहीं दुसरा आम्हातें
३१४८	।।ना.गा.०४७९.००३।।	बाळमित्र सुदामा सवें जेवी । धान्य जो मागे गांवोगांवीं । विपत्ति त्याची दूर व्हावी । म्हणून दिधली राणीव
३१४९	।।ना.गा.०४७९.००४।।	तुझें नाम न तोंडीं । वसुदेव देवकी बांधोडी । कंसा केली धांगडी । ऐसी विपत्ति दाखवूनि
३१५०	।।ना.गा.०४७९.००५।।	इंद्र वर्षे शिळाधारा । पर्वत केला सामोरा । इंद्रा लाविला दरारा । एवढी विपत्ति दाखवुनि
३१५१	।।ना.गा.०४७९.००६।।	जोहरीं सुदले पांडवा। सर्वेचि उपजली कणवा । त्यासी केला त्वां रिघावा । आगीं पाहण्या धांवसी
३१५२	।।ना.गा.०४७९.००७।।	सभा पिशुनाची दाटली । द्रौपदी काया आसुंडली । तिये वस्त्रें पुरविलीं । येवढी आपदा दाखवूनी
३१५३	।।ना.गा.०४७९.००८।।	दैत्यें गांजिला प्रल्हादु । तुझ्या नामाचा प्रसादु । ऐसा करूनि विनोदु । तया दैत्य केला वधु
३१५४	।।ना.गा.०४७९.००९।।	बिभीषण हाणितला लाथां । लंका दिधली त्या उचिता । कृपा करें रघुनाथा । समर्थ केला तये वेळीं
३१५५	।।ना.गा.०४७९.०१०।।	गजेंद्र पानेडी । धरिला यमदूत सुसरी । वैकुंठीहूनि घालिसी उडी । येवढी आपदा दाखवुनि
३१५६	।।ना.गा.०४७९.०११।।	आम्हां डिंगराचें बोलणें । अनाथनाथाचें परिसणें । विष्णुदास नामा म्हणे । शहाणें व्हावें यापरतें
३१५७	।।ना.गा.०४८०.००१।।	दुरोनी ओळंगिल्या अविनाश देताहे । तो जवळीं जातां काय देईल नेणों
३१५८	।।ना.गा.०४८०.००२।।	ऐसा हा कृपाळू लक्ष्मीकांत आहे । साधन प्रवाहें वोळगती प्राणी
३१५९	।।ना.गा.०४८०.००३।।	सेवा माझा स्वामी वैकुंठनायक । भुक्तिमुक्तिदायक आणिक नाहीं
३१६०	।।ना.गा.०४८०.००४।।	साधिलें नगर देऊनियां शिर । कष्ट दशशिरें एवढें केलें
३१६१	।।ना.गा.०४८०.००५।।	तें दिलें बिभीषणा एका नमस्कारा । त्या माझ्या उदारा कां न भजा
३१६२	।।ना.गा.०४८०.००६।।	मांडी बैसों नेदी सापत्न ते माता । म्हणे राज्यधुरूसुता नव्हसी तूं
३१६३	।।ना.गा.०४८०.००७।।	हें ऐकोनि वना जाय तो तत्त्वतां । सकळ देवा माथा वरिष्ठ केला
३१६४	।।ना.गा.०४८०.००८।।	दुर्योधनें भोजना बहु केले सायास। परि न घे ग्रास तया घरीं
३१६५	।।ना.गा.०४८०.००९।।	विदुराचे घरीं न पुसतां जाय । भक्ति प्रिय होय स्वामी माझा
३१६६	।।ना.गा.०४८०.०१०।।	अर्जुनाचे कांजी सांडी निज पैजा । सुदर्शन वोजा धरियलें
३१६७	।।ना.गा.०४८०.०११।।	आपण लटिका जाला भीष्म साच केला । काळाचा अंबुला स्वामी माझा
३१६८	।।ना.गा.०४८०.०१२।।	दीक्षित अवदान देती निज करीं । परि मुख न करी तयांकडे
३१६९	।।ना.गा.०४८०.०१३।।	सुदामा जो पोहे देत मुष्टीभरी । तयासी श्रीहरी पसरी हात
३१७०	।।ना.गा.०४८०.०१४।।	म्हणउनि गावा हाचि मनीं घ्यावा । हाचि वो धरावा हृदयकमळीं

३१७१	।।ना.गा.०४८०.०१५।।	हरिगुण नाम हेंचि प्रिय आम्हां । कीर्ती गाय नामा होऊनि भाट
३१७२	।।ना.गा.०४८१.००१।।	आला आला रे नरहरी । भक्त प्रल्हादा कैवारी । खांब तडतडला तडतडला । त्रिखंड भूमि दणदणिला
३१७३	।।ना.गा.०४८१.००२।।	स्तंभामधें जाली हांक । कापिन्नले तिन्ही लोक । सिंह वदन विशाळ । मुखीं रिघताती ज्वाळ
३१७४	।।ना.गा.०४८१.००३।।	आसुर धरिला जान्हुवरी । नखें उदर फाडिले सत्वरी । देव सनकासी आनंदु । नामया स्वामी परमानंदु
३१७५	।।ना.गा.०४८२.००१।।	अज्ञान बाळके तुझा हाकारा केला । तेणें तये वेळा स्वर्ग भेदिला । ऐकूनी तो धाविन्नला । अहो देवी खेचरें
३१७६	।।ना.गा.०४८२.००२।।	स्तंभीं प्रगटलीसे हांक । कापिन्नले तिन्ही लोक । भेणें पळती शंखादिक । आणि कैलास आंदोळले
३१७७	।।ना.गा.०४८२.००३।।	आली त्रिभुवन देवता । ना भी ना भी रे म्हणतां । माझा प्रल्हाद केउता । तो कवणें रे गांजिला
३१७८	।।ना.गा.०४८२.००४।।	वदन पसरूनि विक्राळ । झरझरीत झरे लाळ । नेत्र जैसे वडवानळ । शोषूं पाहे जळविधि
३१७९	।।ना.गा.०४८२.००५।।	संहार जाला नागकूळ । भ्याले अष्टहि लोकपाळ । स्वर्गीं सुटली खळबळ । अमरावती इंद्रासी
३१८०	।।ना.गा.०४८२.००६।।	मग दैत्यानें पाचारित । लोह खणखणा वाजत । हाकीं अंबर गर्जत । तेणें कापे मेदिनी
३१८१	।।ना.गा.०४८२.००७।।	कवटाळुनि चहूं हातीं । विदारिले चपेटघातीं । जैसा रूद्र प्रळयांतीं । तैसा हरी दिसतसे
३१८२	।।ना.गा.०४८२.००८।।	दैत्य न मरे कवणे परी । मग तो धरिला जान्हुवरी । नखें उदर फाडोनि सत्वरी । अस्थि चूर्ण केलीया
३१८३	।।ना.गा.०४८२.००९।।	भोजें नाचती देवता । मुक्ति दिल्ही दैत्यनाथा । नामया स्वामी वरदहस्ता । अभयदाता भक्तांसी
३१८४	।।ना.गा.०४८३.००१।।	अणिमादि सिद्धि जयाचिया दासी । उणें तयापासीं काय आहे
३१८५	।।ना.गा.०४८३.००२।।	आणिकाचे द्वारीं सांडोवा पैं होसी । धिग् धिग् न लाजसी अरे जना
३१८६	।।ना.गा.०४८३.००३।।	सुलभ सोपारा सेवा माझा स्वामी । म्हणतां जोडे नामीं एक वाचे
३१८७	।।ना.गा.०४८३.००४।।	अजामेळ वैकुंठा एक नेला नामें । गणिका हें नामें स्वयें गेली
३१८८	।।ना.गा.०४८३.००५।।	ऐसा हा कृपाळू आसनीं शयनीं। न विसंबावा मनीं भाग्यवंतीं
३१८९	।।ना.गा.०४८३.००६।।	जटायु पक्षियाचें स्वयें जाला लेकरूं । त्याचा क्रियापारू केला रामें
३१९०	।।ना.गा.०४८३.००७।।	शबरीचीं फळें उच्छिष्टे ही खाय । मा कैसी राम सोये विसरति
३१९१	।।ना.गा.०४८३.००८।।	शाहाणिया द्वारपाळ म्हणतां लाज थोरी । जरी जाला भिकारी ते न साहे
३१९२	।।ना.गा.०४८३.००९।।	तो बळीचा द्वारपालु सारथी पार्थाचा । तो गोसावी आमुचा देवराणा
३१९३	।।ना.गा.०४८३.०१०।।	गर्भवास यातना न साहावे जना । म्हणोनि लोक भजना प्रवर्तले
३१९४	।।ना.गा.०४८३.०११।।	अंबऋषिरायास पडले सायास। साहिला गर्भवास सकळ देवें
३१९५	।।ना.गा.०४८३.०१२।।	उच्छिष्ट हेंचि खातां प्रायश्चित असे । तो गोपाळाचें कैसें खाय हरी
३१९६	।।ना.गा.०४८३.०१३।।	त्या सुख लाभासी सुरवर इच्छिती । ऐसा लक्ष्मीपति कां न सेवावा

३१९७	।।ना.गा.०४८३.०१४।।	म्हणोनि सोइरा आन दुजा नाहीं । गुरु पिता पाहीं हाचि बंधु
३१९८	।।ना.गा.०४८३.०१५।।	सज्जन सांगती आणिक नाहीं आम्हां । कीर्ती वर्णी नामा होऊनि भाट
३१९९	।।ना.गा.०४८४.००१।।	देवा तूं जया होसी प्रसन्न । तया न लगे कर्मबंधन । निकें म्हणती सकळ जन । नीच लोक वंदिती
३२००	।।ना.गा.०४८४.००२।।	तुझी दृष्टी कृपावंता । जयावरी पडे अनाथनाथा । तया न बाधी संसारव्यथा । सर्वस्व त्याचें हरिसी
३२०१	।।ना.गा.०४८४.००३।।	माती धरिल्या होय कनक । भोग भोगिती परममूर्ख । नातळती महादोष । मुखीं नाम गर्जतां
३२०२	।।ना.गा.०४८४.००४।।	धन्य धन्य ते संसारी । हो कां पुरुष अथवा नारी । दरिद्र नाहीं त्यांचे घरीं । तूं श्रीहरी सानुकूळ जालिया
३२०३	।।ना.गा.०४८४.००५।।	ऋद्धि सिद्धि द्वारा वोळंगती । वैरी दास्यत्व करिती । विषें तें अमृत होती । तूं श्रीपति सानुकूल जालिया
३२०४	।।ना.गा.०४८४.००६।।	येथूनि नेसील परते । नामा म्हणे वैकुंठातें । लक्षा नये चहूं वेदां तें । नाना मतें धांडोळितां
३२०५	।।ना.गा.०४८५.००१।।	पांडव भाग्याची वर्णावया थोरी । शेषाची वैखरी न वर्णवे
३२०६	।।ना.गा.०४८५.००२।।	पीतांबर कास घालूनि वनमाळी। काढी उष्टावळी आवडीनें
३२०७	।।ना.गा.०४८५.००३।।	विधीचा जनक रमा ज्याची दासी । ध्यान अहर्निशीं करी शिव
३२०८	।।ना.गा.०४८५.००४।।	रोमीं जयाचे ब्रह्मांडे अनंत । चारी वेदां अंत न कळे ज्याचा
३२०९	।।ना.गा.०४८५.००५।।	नामा म्हणे राबे भक्तांचिये घरीं । भाव देखोनि हरि भुलतसे
३२१०	।।ना.गा.०४८६.००१।।	नेणें साही शास्त्रें तुज केशिराजा । स्वरूपें कुबजा काय होती
३२११	।।ना.गा.०४८६.००२।।	न मागें मी तैसा न मागें मी तैसा । न मागें मी तैसा कदा काळीं
३२१२	।।ना.गा.०४८६.००३।।	कौरवांचे काजीं घेसी गाढेपण । धर्मा घरीं पूर्ण घोडे धुसी
३२१३	।।ना.गा.०४८६.००४।।	नामा म्हणे आम्ही कीर्ती वाखाणावी । भक्तांसी गोसावी होसी देवा
३२१४	।।ना.गा.०४८७.००१।।	पाला खाऊनियां धाला बहिणी घरीं । भक्तांलागीं हरि वेडा जाला
३२१५	।।ना.गा.०४८७.००२।।	सुदाम्याचे पोहे कोरडेचि खाय । टकमका पाहे चहूंकडे
३२१६	।।ना.गा.०४८७.००३।।	विदुराच्या कण्या खाय धणीवरी । जाला बळिचें द्वारीं द्वारपाळ
३२१७	।।ना.गा.०४८७.००४।।	नामा म्हणे हरिचे न कळती पवाडे । नेणें भक्तांपुढें वेडा जाला
३२१८	।।ना.गा.०४८८.००१।।	काय वानूं आतां पायाचा महिमा । जेथें जाली सीमा बोलायाची
३२१९	।।ना.गा.०४८८.००२।।	विठोबाचे पाय आठवितां मनीं । गेलें हरपूनि भवभय
३२२०	।।ना.गा.०४८८.००३।।	पाय नारदाचे हृदयीं धरितां । ब्रह्मांडीं मान्यता जाली त्याची
३२२१	।।ना.गा.०४८८.००४।।	सनकादिकां लागीं पाय वज्रकवच । ब्रह्मांदि देवांस पद जेणें
३२२२	।।ना.गा.०४८८.००५।।	लागतांचि पाय शिळा दिव्य जाली । पाषाण तारिले उदकावरि

३२२३	।।ना.गा.०४८८.००६।।	पाय ते रमेचे सौभाग्य साजिरें । योगी ऋषीवर थोर जेणें
३२२४	।।ना.गा.०४८८.००७।।	नामा म्हणे मनीं पाय सर्वकाळ। म्हणोनि सुकाळ आनंदाचा
३२२५	।।ना.गा.०४८९.००१।।	उभा भीमातीरीं कर कटावरी । राहे निरंतरीं भक्तांपुढें
३२२६	।।ना.गा.०४८९.००२।।	भक्तभाग्य थोर नव्हे कधीं प्राप्ती । जाणोनी श्रीपती गुज बोले
३२२७	।।ना.गा.०४८९.००३।।	गणिका गजेंद्र उद्धव नारद । आपण गोविंद मिळोनियां
३२२८	।।ना.गा.०४८९.००४।।	समुद्रमंथनीं उभा करोनियां । लागतसे पायां नामा म्हणे
३२२९	।।ना.गा.०४९०.००१।।	गगनीं धृव तुवां अढळ पैं केला । तो बाळ धाकुला न म्हणसी
३२३०	।।ना.गा.०४९०.००२।।	अजामेळाचें तुवां चुकविलें संकट । ब्राह्मण तो नष्ट न म्हणसी
३२३१	।।ना.गा.०४९०.००३।।	प्रल्हादाचा तुवां केला कैवारू । वैऱ्यांचा कुमरू न म्हणसी
३२३२	।।ना.गा.०४९०.००४।।	गजेंद्र पशु सोडविला पानडिये । मगर वोढिये ऐसें न म्हणसी
३२३३	।।ना.गा.०४९०.००५।।	रुक्मांगदाची तुवां उद्धरिली नगरी । विषयीं मुरारी न म्हणसी
३२३४	।।ना.गा.०४९०.००६।।	ऐसे अपराधी न म्हणसी देवा । नामा तो केशवा विनवितसे
३२३५	।।ना.गा.०४९१.००१।।	खगावरी स्वारी करूनियां देवा । धांवसी केशवा भक्तांसाठीं
३२३६	।।ना.गा.०४९१.००२।।	रामा परशुरामा कृष्णा नारायणा । हरी संकर्षणा भक्तांसाठीं
३२३७	।।ना.गा.०४९१.००३।।	बिभीषण तारी रावणातें मारी । दावी माव हरी भक्तांसाठीं
३२३८	।।ना.गा.०४९१.००४।।	नामा म्हणे भक्तांकारणें गोविंदा । घेऊनियां गदा उभा ठासी
३२३९	।।ना.गा.०४९२.००१।।	कौस्तुभ सोज्वळ कंठीं शोभताहे । भक्तांसाठी बाहे उभारिलीं
३२४०	।।ना.गा.०४९२.००२।।	आन हितासाठीं करिसी धांवण्या । विदुराच्या कण्या गोड करी
३२४१	।।ना.गा.०४९२.००३।।	ब्रह्मचारी साक्ष सत्यत्वें करिसी । पुढें तूं धांवसी आवडीनें
३२४२	।।ना.गा.०४९२.००४।।	वचना अंतर पडों नेदी सत्य । नामा म्हणे भृत्य होसी देव
३२४३	।।ना.गा.०४९३.००१।।	दर्दुराचें पिलू म्हणे रामकृष्ण । नाहीं उदक उष्ण जालें तेथें
३२४४	।।ना.गा.०४९३.००२।।	कढईमध्यें बाळ करी तळमळ। गोविंद गोपाळ पावे वेगीं
३२४५	।।ना.गा.०४९३.००३।।	तये काळीं आज्ञा केली पावकासी । झणीं तापविसी तयालागीं
३२४६	।।ना.गा.०४९३.००४।।	ऐसा तो कृपाळु आपुलिया दासा । आमुचा कोंवसा नामा म्हणे
३२४७	।।ना.गा.०४९४.००१।।	देवा पांडुरंगा वासुदेवा हरी । गोविंदा मुरारी नारायणा
३२४८	।।ना.गा.०४९४.००२।।	नारायणा कृष्णा कमळलोचना । माधवा प्रद्युम्ना रावणारी

३२४९	।।ना.गा.०४९४.००३।।	रावणारि होसी जानकी टाकुनी । हिंडसी अंगणीं अर्जुनाच्या
३२५०	।।ना.गा.०४९४.००४।।	अर्जुनाच्या घरीं अंगें घोडे धुसी । लज्जा द्रौपदीची राखियेली
३२५१	।।ना.गा.०४९४.००५।।	राखियेलीं द्वारें भक्तां बळिवंता । नामा म्हणे आतां काय सांगू
३२५२	।।ना.गा.०४९५.००१।।	भरतें त्यागिली जननी । ख्याती जाली त्रिभुवनीं
३२५३	।।ना.गा.०४९५.००२।।	ऐसी भक्ति तुझी हरि । जगीं करंटा न करी
३२५४	।।ना.गा.०४९५.००३।।	बंधु अवज्ञीं बिभीषणा । प्रगट जाला रामराणा
३२५५	।।ना.गा.०४९५.००४।।	प्रल्हाद पितृ अवज्ञा करी । स्तंभीं प्रगटला नरहरी
३२५६	।।ना.गा.०४९५.००५।।	पति अवज्ञा ऋषिपत्न्यांसी । कृष्णदर्शन पूर्ण त्यांसी
३२५७	।।ना.गा.०४९५.००६।।	नामा म्हणे भक्ती ते अवरोधी पाही । त्यासी त्याजिल्या दोष नाहीं
३२५८	।।ना.गा.०४९६.००१।।	पंढरीचा देव बहुत कोंवळा । सगुण सांवळा सारथि हा
३२५९	।।ना.गा.०४९६.००२।।	सारथि सर्वांचा साक्षिभूत असे । संकटीं सायासें गजेंद्रासी
३२६०	।।ना.गा.०४९६.००३।।	गजेंद्रासी रक्षी गणिका उद्धरी । भिल्लीणीचे करीं फळें भक्षी
३२६१	।।ना.गा.०४९६.००४।।	भक्षी सुदाम्याचे पोहे मुष्टिभरी । नामा म्हणे हरि गोड मानी
३२६२	।।ना.गा.०४९७.००१।।	पंढरीचा देव पाहतां सगुण । प्रल्हादाकारणें सिद्ध जाला
३२६३	।।ना.गा.०४९७.००२।।	पंढरीचा देव पतित पावन । उभा नारायण विटेवरी
३२६४	।।ना.गा.०४९७.००३।।	पंढरीचा देव प्रत्यक्ष उदार । बाळ्या भोळ्या पार दावितसे
३२६५	।।ना.गा.०४९७.००४।।	नामा म्हणे देवा कीर्ति वानूं काय । आम्हांसाठीं सोय लावी बापा
३२६६	।।ना.गा.०४९८.००१।।	सगुण तें ब्रह्म विटेवरी नीट । कोण्या प्राण्या कष्ट होऊं नेदी
३२६७	।।ना.गा.०४९८.००२।।	देऊनियां क्षेम देह पालटिसी। वृद्ध रूप होसी कर्णासाठीं
३२६८	।।ना.गा.०४९८.००३।।	भजन भक्तांचें मानिसी वचन । नाम नारायण म्हणे कां रे
३२६९	।।ना.गा.०४९८.००४।।	उफराटी वदवी वाल्मिकी नामाच्या । शतकोटी संख्या प्रविस्तार
३२७०	।।ना.गा.०४९८.००५।।	नामा म्हणे देवा भक्तीचें पैं पिसें । त्यालागीं हव्यासें होसी जाण
३२७१	।।ना.गा.०४९९.००१।।	शिशुपाळादिकां कोठें शुद्ध भाव । उद्धरी केशव उंच नीच
३२७२	।।ना.गा.०४९९.००२।।	काय कामा पुत्रा कोण आले जाणा । सेखीं त्या रावणा कैवल्यदानीं
३२७३	।।ना.गा.०४९९.००३।।	महादुष्ट शंखासुरें नेले वेद । शेवटीं गोविंदें सोडविलें
३२७४	।।ना.गा.०४९९.००४।।	पित्याचिये हातीं पुत्र वध करी । कृपाळू बा हरी नामा म्हणे

३२७५	।।ना.गा.०५००.००१।।	पांडुरंगा नमूं परात्परा नमूं । सगुणासी नमूं साक्षीभूता
३२७६	।।ना.गा.०५००.००२।।	समस्त संबंध साधियेले हरी । रावणादि वैरी उद्धरिले
३२७७	।।ना.गा.०५००.००३।।	नामरूपातीता नाहीं भेटाभेट । म्हटलें आहे नीट नामा म्हणे
३२७८	।।ना.गा.०५०१.००१।।	सगुण समान भजती अंतरीं । सर्व भूतांतरीं असे एक
३२७९	।।ना.गा.०५०१.००२।।	पहा कोळियाची काय सांगें कीर्ति। विद्या अभ्यासिती मूर्तीपुढें
३२८०	।।ना.गा.०५०१.००३।।	द्रौपदीचे घरीं होते उपवासी । देठहि लाविसी अकस्मात
३२८१	।।ना.गा.०५०१.००४।।	नामा म्हणे जाण प्रारब्ध कारण । पांडुरंगाविण गति नाहीं
३२८२	।।ना.गा.०५०२.००१।।	सहस्रनामाची घालितां लाखोली । तरला हा कोळी वाल्मिक तो
३२८३	।।ना.गा.०५०२.००२।।	पुराणप्रसिद्ध गोष्टी ह्या ऐकाव्या । प्रत्यक्ष देखाव्या कोणें ठायीं
३२८४	।।ना.गा.०५०२.००३।।	अंगें अनुभवा आपण आणाव्या । तरीच वानाव्या संतांपुढें
३२८५	।।ना.गा.०५०२.००४।।	नाही तरी मज वाटे कानकोंडे । सुधा म्हणे तोंडें चवी नेणें
३२८६	।।ना.गा.०५०२.००५।।	नामा म्हणे असे पोटामध्यें भूक । तृप्तीचें तें सुख बोलों कैसें
३२८७	।।ना.गा.०५०३.००१।।	प्रल्हादा रक्षिलें पांडवां प्रतिपाळिलें । तया उभें केलें पुंडलिकें
३२८८	।।ना.गा.०५०३.००२।।	बिभीषणा स्थापिलें धृवासी अढळ केलें । तया उभें केलें पुंडलिकें
३२८९	।।ना.गा.०५०३.००३।।	चैद्यादि मर्दिले सुरवर तारिले । तया उभें केलें पुंडलिकें
३२९०	।।ना.गा.०५०३.००४।।	अहिल्यें उद्धरिलें गजेंद्रा उद्धरिलें। तया उभें केलें पुंडलिकें
३२९१	।।ना.गा.०५०३.००५।।	गयासुरा वधिलें बळिस पाताळीं घातलें । तया उभें केलें पुंडलिकें
३२९२	।।ना.गा.०५०३.००६।।	नामा म्हणे केशवा भक्तांचें ठेवणें । घेऊनि केंवि जाणें घडे तुज
३२९३	।।ना.गा.०५०४.००१।।	एक अंजनीं उत्पन्न । एक खांबीं अवतरण
३२९४	।।ना.गा.०५०४.००२।।	ते पावले दोघेजण । नरसिंह हनुमंत आपण
३२९५	।।ना.गा.०५०४.००३।।	एक सिंहनाद करी । एक भुभुःकार करी
३२९६	।।ना.गा.०५०४.००४।।	एक सीताशुद्धी करी । एक प्रल्हादा कैवारी
३२९७	।।ना.गा.०५०४.००५।।	एक बाळ ब्रह्मचारी । एक अर्धांगी सुंदरी
३२९८	।।ना.गा.०५०४.००६।।	एक रूद्राचा अवतारू । एक नामया दातारू
३२९९	।।ना.गा.०५०५.००१।।	निर्गुण सगुण नव्हे ते समान । तैसे तेंहि जाण योगाभ्यासी
३३००	।।ना.गा.०५०५.००२।।	प्रल्हादासी हरी शंख चक्र गदा। सगुण गोविंदा शोभतसे

३३०१	।।ना.गा.०५०५.००३।।	अर्जुनासी देवा उभा पाचारिसी । सखा उद्धवासी साक्ष दावी
३३०२	।।ना.गा.०५०५.००४।।	नामा म्हणे माझा केशिराज भोळा । दावितो गोपाळां बाळलीला
३३०३	।।ना.गा.०५०६.००१।।	उचितानुचिता भजे पंढरीनाथा । न बोले सर्वथा वर्मे तुझीं
३३०४	।।ना.गा.०५०६.००२।।	बिभीषणा तुवां दिधली नगरी। कीर्ति चराचरीं वाखाणिती
३३०५	।।ना.गा.०५०६.००३।।	धृव प्रल्हाद अंबऋषि नारद । हरिश्चंद्र मुचकुंद करोनियां
३३०६	।।ना.गा.०५०६.००४।।	नामा म्हणे आतां जन्मजन्मांतरीं । करीन ऋणि हरी तुज आतां
३३०७	।।ना.गा.०५०७.००१।।	निरंतर नाम जपे । पिता प्रल्हादास कोपे । उदरा आला वैरिरुपें । म्हणवूनि घायीं त्रासिला
३३०८	।।ना.गा.०५०७.००२।।	कोपें कोपला नरहरी । कवण तयातें सावरीं । खटखटा वाजती दांतोरी । दैत्यावरी उठावला
३३०९	।।ना.गा.०५०७.००३।।	हांक देऊनि अवचितीं । आंदोळली त्रिजगतीं । समुद्रपाणी उसळती । उलथों पाहाती गिरिवर
३३१०	।।ना.गा.०५०७.००४।।	सिंहवदन प्रगटला । मर्गजू अवचिता उतटला । भेणें वासुकी मोवाळला । गजबजिला पाताळीं
३३११	।।ना.गा.०५०७.००५।।	जैसा प्रलयकाळिचा मेघु । तैसा गडगडिला वेगू । अरे मर्गजाच्या खांबीं सवेगु । क्षणामाजीं प्रगटला
३३१२	।।ना.गा.०५०७.००६।।	केला भक्तांचा कुडावा । शिक लाविली दानवा । नामया स्वामी वोळंगावा । नरहरि विसांवा भक्तांचा
३३१३	।।ना.गा.०५०८.००१।।	वैकुंठाहूनि केलें धावणें । भक्त प्रल्हादाकारणें
३३१४	।।ना.गा.०५०८.००२।।	नरहरि पावला पावला । महापापा पळ सुटला
३३१५	।।ना.गा.०५०८.००३।।	शंख चक्र पद्म गदा । ना भी ना भी रे प्रल्हादा
३३१६	।।ना.गा.०५०८.००४।।	पावला गरुडध्वज । नामया स्वामी केशवराज
३३१७	।।ना.गा.०५०९.००१।।	तडक फुटला अंबरीं । आला प्रल्हाद कैवारी
३३१८	।।ना.गा.०५०९.००२।।	आला आला हांक देतु । सिंहनादें रे गर्जतु
३३१९	।।ना.गा.०५०९.००३।।	दैत्यां दचकु नरहरी । नामया स्वामी नरकेसरी
३३२०	।।ना.गा.०५१०.००१।।	काय रे गडगडित दुमदुमीत । ब्रह्मकटाह उलथूं पहात
३३२१	।।ना.गा.०५१०.००२।।	तो देव आला रे नरहरी । आतां कवण सांवरी
३३२२	।।ना.गा.०५१०.००३।।	प्रल्हादासी दिधलें दैत्य । हर्षे नामा गुढी उभारित
३३२३	।।ना.गा.०५११.००१।।	पहाहो कडकडिलें गगनीं । भेणें कांपते मेदिनी
३३२४	।।ना.गा.०५११.००२।।	तो देव दैत्या अंतकु । होय भक्तांसी पाळकु
३३२५	।।ना.गा.०५११.००३।।	भक्त संकटीं धावत । क्षणामाजीं केला मुक्त
३३२६	।।ना.गा.०५११.००४।।	भोजें प्रल्हाद नाचतु । नामया स्वामी रे अनंतु

३३२७	।।ना.गा.०५१२.००१।।	वैकुंठीहूनि धांवत आला । खांबा आड उभा ठेला
३३२८	।।ना.गा.०५१२.००२।।	खांब गडगडिला गडगडिला । वीर नरसिंह पावला
३३२९	।।ना.गा.०५१२.००३।।	भक्त हृदयींचे प्रेम । एक जाणे घन:श्याम
३३३०	।।ना.गा.०५१२.००४।।	पावला नामया स्वामी । जग उद्धरिलें त्याचे नामीं
३३३१	।।ना.गा.०५१३.००१।।	अंबऋषि रुक्मांगद । नारद महामुनी प्रल्हाद
३३३२	।।ना.गा.०५१३.००२।।	मिळोनि सनकादिकां भारू । पांडुरंगीं हरि जागरू
३३३३	।।ना.गा.०५१३.००३।।	शंख भेरी नादाकर । नादें गर्जत अंबर
३३३४	।।ना.गा.०५१३.००४।।	योगनिद्रेसी पहुडला । आदिपुरुष उपवर जाला
३३३५	।।ना.गा.०५१३.००५।।	देवी उतरोनी विमानीं । आदि क्षीरसागर भुवनीं
३३३६	।।ना.गा.०५१३.००६।।	सुरवर ओळंगती जगन्निवास । गातो नामा विष्णुदास
३३३७	।।ना.गा.०५१४.००१।।	पैल गरुडाचें वारिकें । गगनीं कृष्ण येतां देखे
३३३८	।।ना.गा.०५१४.००२।।	दवडा दवडी हरि धांवतु । ना भी नामयातें म्हणतु
३३३९	।।ना.गा.०५१४.००३।।	वैकुंठाहुनि आले वेगीं । नामयाच्या भक्तिलागीं
३३४०	।।ना.गा.०५१५.००१।।	दिसंदिस कैसा जालासी शहाणा । गोवळांसी खेळसी पंढरीच्या राण्या
३३४१	।।ना.गा.०५१५.००२।।	विश्वामाजी तुझे बोभाट मोठें । जन्ममरणाचे संकल्प तुटे
३३४२	।।ना.गा.०५१५.००३।।	अकळ करणी नकळे लिहितां धरणी । सिंधुशिरोमणि करूनि नाम तुझें
३३४३	।।ना.गा.०५१५.००४।।	नामा म्हणे कीर्ति काय वानूं देवा । भक्तांचा कुडावा ब्रीद तुझें
३३४४	।।ना.गा.०५१६.००१।।	वेदां जन्मस्थान शास्त्रां समाधान । काय बुझावण दाखविसी
३३४५	।।ना.गा.०५१६.००२।।	जगादि अनंत अवतार घेसी। चरित्र दाविसी भक्तांपुढें
३३४६	।।ना.गा.०५१६.००३।।	पतितपावन तूंचि नारायण । सत्वर धांवणें दामोदरा
३३४७	।।ना.गा.०५१६.००४।।	नामा म्हणे भवबंधविमोचका । वैकुंठ नायका पांडुरंगा
३३४८	।।ना.गा.०५१७.००१।।	चोरूनि खादलें दहीं दुध लोणी । जिहीं चक्रपाणी खेळविला
३३४९	।।ना.गा.०५१७.००२।।	अखंड उन्मत्तें मतिमंद मूढें। गौळणीपाशीं रडे रूपें दावी
३३५०	।।ना.गा.०५१७.००३।।	शकुनीचा पुत्र शिव द्वेष करी । संकट मुरारी निवारिसी
३३५१	।।ना.गा.०५१७.००४।।	उद्धरिल्या सर्व गोपगवळणी । लीला दाखवूनि नामा म्हणे
३३५२	।।ना.गा.०५१८.००१।।	तुझिया कीर्तना कोण जाय आतां । सख्या भगवंता कृपा करी

३३५३	।।ना.गा.०५१८.००२।।	भीष्म पहुडला शरांचे पंजरीं । तया प्रश्न करी युधिष्ठिर
३३५४	।।ना.गा.०५१८.००३।।	महाभयेश्वरी विघ्नें निवारितां । सकळां देखतां दांत पाडी
३३५५	।।ना.गा.०५१८.००४।।	नामा म्हणे तुझी भक्ति अघटित । पवाडे अनंत दाविना कां
३३५६	।।ना.गा.०५१९.००१।।	अगम्य सामर्थ्य नयेचि गणना । तारूनि पाषाणा केलें सम
३३५७	।।ना.गा.०५१९.००२।।	तारिसी वानर अवघेचि सेना । तोडिसी बंधना पांडुरंगा
३३५८	।।ना.गा.०५१९.००३।।	काय वनचर जाणती प्रत्यक्ष । परीक्षिती साक्ष दिस सातां
३३५९	।।ना.गा.०५१९.००४।।	कृतत्रेताद्वापारांचे आदि अंतीं । नामाची ते ख्याति म्हणे नामा
३३६०	।।ना.गा.०५२०.००१।।	सर्व देवांमाजीं विठ्ठल वरिष्ठ । बोलतसे स्पष्ट वेदशास्त्रीं
३३६१	।।ना.गा.०५२०.००२।।	अच्युता अनंता माधवा मुकुंदा । गोपाळा गोविंदा गोपवेषा
३३६२	।।ना.गा.०५२०.००३।।	कृष्णा कमलाक्षा कस्तुरीचा टिळा । नेसला पाटोळा खोंचे शिरीं
३३६३	।।ना.गा.०५२०.००४।।	नामा म्हणे रामकृष्ण नारायण । तारिसी पाषाणां सिंधुमाजीं
३३६४	।।ना.गा.०५२१.००१।।	षड्गुणसंपन्न पंढरीच्या राया । आमुच्या स्वामिया केशिराजा
३३६५	।।ना.गा.०५२१.००२।।	रामकृष्ण हरी श्रीधरा मुकुंदा । सज्जनीं स्वानंदा सर्वातीता
३३६६	।।ना.गा.०५२१.००३।।	गोविंदा गोपाळा गोपवेषधारी । गोवर्धन धरी नखावरी
३३६७	।।ना.गा.०५२१.००४।।	दुष्ट दुर्जनाच्या दुखाविना चित्ता । पावन पतिता नामा म्हणे
३३६८	।।ना.गा.०५२२.००१।।	संतोषाकारणें सज्जन जीवासी । साहाकारी होसी नारायणा
३३६९	।।ना.गा.०५२२.००२।।	समान करिसी सर्वां भूतीं जाण । पतितपावन भाक तुझी
३३७०	।।ना.गा.०५२२.००३।।	भक्ति भाव ज्यांचा भाग्यें आगळिया । होसी देवराया सर्वविध
३३७१	।।ना.गा.०५२२.००४।।	समर्थपणासी कोणा विचारावें । नामा म्हणे भावें कारण हा
३३७२	।।ना.गा.०५२३.००१।।	अलक्ष्या अच्युता सख्या भक्तराया । तूंचि देवराया पांडुरंगा
३३७३	।।ना.गा.०५२३.००२।।	परात्परतरा पार नेणें ब्रह्मा। तूंचि निजधामा स्वयें देसी
३३७४	।।ना.गा.०५२३.००३।।	विश्वामित्रासाठी विलंब न करी । बळिचिया द्वारीं भृत्य होसी
३३७५	।।ना.गा.०५२३.००४।।	नामा म्हणे तुझी माव नेणें कोणी । धांवे चक्रपाणि त्वरें नेटें
३३७६	।।ना.गा.०५२४.००१।।	योगी मुनिजन तपस्वी याज्ञिक । ते तव पादुका वंदिती शिरीं
३३७७	।।ना.गा.०५२४.००२।।	हरिहर ब्रह्मा सूर्य चंद्रादिक। ओढवी मस्तक रजरेणु
३३७८	।।ना.गा.०५२४.००३।।	गंगा भागीरथी होती शुचिमंत । आणिकांची मात काय सांगों

३३७९	।।ना.गा.०५२४.००४।।	नामा म्हणे नेणों पार तुझा देवा । कृपाळू केशवा केशीराज
३३८०	।।ना.गा.०५२५.००१।।	भक्त पुंडलिका देखोनि निकटा । आलासी वैकुंठाहुनि आजी
३३८१	।।ना.गा.०५२५.००२।।	नारदवचन ऐकोनियां मनीं । सुखें चक्रपाणी सुखावला
३३८२	।।ना.गा.०५२५.००३।।	सुखरूप सदा देव दुरी ठेला । मुनीश्वर काला स्वयें दावी
३३८३	।।ना.गा.०५२५.००४।।	नामा म्हणे तुज भक्ति पिसें फार । साधिलें नगर क्षणमात्रें
३३८४	।।ना.गा.०५२६.००१।।	चातुर्यसागरा आमुची जननी । जाणते रुक्मिणी प्रेमकळा
३३८५	।।ना.गा.०५२६.००२।।	चरणीची प्रभा जाणे मणिग्रीव। नकुळ वैष्णव सखे माझे
३३८६	।।ना.गा.०५२६.००३।।	कुबेर गौतमवधू अहिल्या । चक्रपाणि तया मुक्त केले
३३८७	।।ना.गा.०५२६.००४।।	नामा म्हणे तुझे पायीं संजीवन । सदाशिव ध्यान तेचि करी
३३८८	।।ना.गा.०५२७.००१।।	चारी वेद गाती जयासी अखंड । नेणवे प्रचंड कीर्ति ज्याची
३३८९	।।ना.गा.०५२७.००२।।	तोचि भीमातीरी उभा दिगंबर । ठेवी कटीं कर भक्तांसाठी
३३९०	।।ना.गा.०५२७.००३।।	युद्धी अर्जुनाते सांगितली गीता । सहस्रशा कांता केल्या ज्याने
३३९१	।।ना.गा.०५२७.००४।।	नामा म्हणे शिवा दिल्हे शिवपण । ब्रह्मया लागोन उपदेश
३३९२	।।ना.गा.०५२८.००१।।	विश्वाच्या मोहना कपटनाटका । पंढरीनायका पांडुरंगा
३३९३	।।ना.गा.०५२८.००२।।	अवतार धरूनि होऊनि निमित्त । बुजविसी दैत्य सर्पखाणी
३३९४	।।ना.गा.०५२८.००३।।	गोपिकांचे घरी कामासी लंपट । करिसी धीट गवळियांसी
३३९५	।।ना.गा.०५२८.००४।।	भाव अभावांचा न करी कंटाळा । दावी बाळलीला म्हणे नामा
३३९६	।।ना.गा.०५२९.००१।।	गोकुळीं गोपिका गोपाळ सकळ । मध्ये घननीळ क्रीडा करी
३३९७	।।ना.गा.०५२९.००२।।	करी खेळ मोठा स्थापिले निशाण । स्वयें नारायण हांका मारी
३३९८	।।ना.गा.०५२९.००३।।	मारियेला कंस दुर्घट दुर्जना । पुरवी वासना पांडवांची
३३९९	।।ना.गा.०५२९.००४।।	पांडवांचे ध्यान धरूनि अंतरीं । नामा म्हणे हरि साह्य करी
३४००	।।ना.गा.०५३०.००१।।	सर्वाभूती नांदे सर्व नारायण । सर्व संस्थापन पांडुरंग
३४०१	।।ना.गा.०५३०.००२।।	अगा देववंद्या अगा गोपवेषा । पावन परेशा परमार्थी
३४०२	।।ना.गा.०५३०.००३।।	मूर्त अमूर्ताचा मुक्त परांगता । सर्व मायातीता साक्षिरूपा
३४०३	।।ना.गा.०५३०.००४।।	नामा म्हणे देवांदानवां जिंकिसी । ते भाकी आम्हांसी सांभाळावें
३४०४	।।ना.गा.०५३१.००१।।	प्रल्हादादिकांचे अंतरीचें ध्यान । ते पंढरिये निधान उभे असे

३४०५	।।ना.गा.०५३१.००२।।	सर्व जन जया नेणते जाहले । सुख दाखविले पुंडलिका
३४०६	।।ना.गा.०५३१.००३।।	वेदांचे जे सार श्रुतीचे जिव्हार । तेचि कटीं कर उभे असे
३४०७	।।ना.गा.०५३१.००४।।	ज्ञानाचे जीवन वैराग्या भूषण । ते सुख निधान विटेवरी
३४०८	।।ना.गा.०५३१.००५।।	शुद्धबुद्ध मुक्त समाधीचे सुख । ते उभे प्रत्यक्ष वाळवंटी
३४०९	।।ना.गा.०५३१.००६।।	हृदयीं धरूनि नामा निजबोधे निमाला । शिण हारपला संसाराचा
३४१०	।।ना.गा.०५३२.००१।।	एक वाहूं तुळसीपत्र । तें देवासी प्रिय होत
३४११	।।ना.गा.०५३२.००२।।	रखुमाइनें देव । सोडविला कृष्णराव
३४१२	।।ना.गा.०५३२.००३।।	नामा म्हणे पूर्ण होती। प्राप्त राधिकेचा पती
३४१३	।।ना.गा.०५३३.००१।।	संतांची विश्रांती ज्ञानियांचें गुज । मुक्तिचें हे बीज मोक्षदानीं
३४१४	।।ना.गा.०५३३.००२।।	कृष्ण विष्णु हरी मुकुंद मुरारी । अच्युता नरहरी नारायणा
३४१५	।।ना.गा.०५३३.००३।।	गोवर्धनधर गोपी मनोहर । भक्त करुणाकर पांडुरंगा
३४१६	।।ना.गा.०५३३.००४।।	तूंचि हे सकळ आदि मध्य अंतीं । निजसुख संपत्ति सज्जनांची
३४१७	।।ना.गा.०५३३.००५।।	सकळ नारायण पातक भंजन । हरि जगज्जीवन परमानंद
३४१८	।।ना.गा.०५३३.००६।।	तूंचि माझा श्रोता तूंचि माझा वक्ता । तूंचि देतां घेतां प्रेमसुख
३४१९	।।ना.गा.०५३३.००७।।	नामदेव ऐसें नाम त्वां ठेविलें । येणें अनुभविलें प्रेमसुख
३४२०	।।ना.गा.०५३३.००८।।	विष्णुदास नामा विनवी पुरुषोत्तमा । सोडवी भवभ्रमा पासोनियां
३४२१	।।ना.गा.०५३४.००१।।	देऊनि भातुकें गळां घाली मिठी । सखा जगजेठी भक्तिभावा
३४२२	।।ना.गा.०५३४.००२।।	आधार करोनि राहिले पंढरीं । तेथें निरंतरीं प्रेम दावी
३४२३	।।ना.गा.०५३४.००३।।	नामा म्हणे सेवा करोनियां शुद्ध । संसार संबंध नाहीं तया
३४२४	।।ना.गा.०५३५.००१।।	कोहळीये काय कोहळी जड । तैसें मी तुझें लळेवाड
३४२५	।।ना.गा.०५३५.००२।।	आंधळें मुकें कानीं नायके । त्यासी काय जननी पोसूं न शके
३४२६	।।ना.गा.०५३५.००३।।	नामा म्हणे केशव कृपेचा सागरू । जयाचा जारू तयासिच भारू
३४२७	।।ना.गा.०५३६.००१।।	योगिये शिणती तुझिये प्राप्तिलागीं । नातुडसी जगीं कवणासी
३४२८	।।ना.गा.०५३६.००२।।	एक जटा नखें स्वयें वाढविती । दिगंबर होती एक देवा
३४२९	।।ना.गा.०५३६.००३।।	त्यासी तुझी भेटी नव्हेचि कल्पांतीं । अखंड सिणती साधनानें
३४३०	।।ना.गा.०५३६.००४।।	आमचे सन्निध सर्वदा राहसी । आमच्या भाग्यासी पार नाहीं

३४३१	।।ना.गा.०५३६.००५।।	धन्य जालों आम्हीं तुझिया प्रसादें । नाचे तुझ्या छंदें नामदेव
३४३२	।।ना.गा.०५३७.००१।।	मजसाठीं काय लाजतोसि देवा । तृण आणि जीवा साच होसी
३४३३	।।ना.गा.०५३७.००२।।	ते काय पवाडे गमाविली ब्रीदें । ब्रह्मादिकें वृंदें ध्याती कैसी
३४३४	।।ना.गा.०५३७.००३।।	जाणतां नेणतां सर्वांसी उद्धार । भवसिंधु पार पावविसी
३४३५	।।ना.गा.०५३७.००४।।	नामा म्हणे तुझे उपकार ऐसे । दावी जगदीशा हेळामात्रें
३४३६	।।ना.गा.०५३८.००१।।	उपमन्यु बाळा स्थापी क्षीरसिंधु । अनाथाचा बंधु नारायण
३४३७	।।ना.गा.०५३८.००२।।	तुझें नाम मुखीं जपे सर्वकाळ। दिधलें अढळपद त्यासी
३४३८	।।ना.गा.०५३८.००३।।	अनेक वृत्तांत सांगें देवा । अन्याय केशवा कोण मानी
३४३९	।।ना.गा.०५३८.००४।।	नामा म्हणे तैसें मी नाहीं मागत । ऐकोनियां मात आलों जन्मा
३४४०	।।ना.गा.०५३९.००१।।	हरि गातां बरवा ऐकतां बरवा । हृदयीं ध्यातां बरवा बाइयांनो
३४४१	।।ना.गा.०५३९.००२।।	केशव पैं देणें केशव पैं घेणें । केशव करणें धंदा आम्ही
३४४२	।।ना.गा.०५३९.००३।।	चंद्रबिंबाची कुरवंडी ओवाळूं श्रीमुखावरी । मदन हा जिव्हारीं लाजिन्नला
३४४३	।।ना.गा.०५३९.००४।।	नामा म्हणे निववेिलें सकळ इंद्रियातें । म्हणोन त्या केशवातें शरण जावें
३४४४	।।ना.गा.०५४०.००१।।	आशा तृष्णा माया नाहीं लाथाडल्या । म्हणावा तो भला कासयानें
३४४५	।।ना.गा.०५४०.००२।।	अमृत सेवितां मृत्यू पळे दुरी । सुख होय तरी तेंचि नाम
३४४६	।।ना.गा.०५४०.००३।।	तेव्हां कोणी तरी धरावा सत्संग । होय पांडुरंग प्राप्ति सर्वां
३४४७	।।ना.गा.०५४०.००४।।	अविश्वास नर सर्वस्व पतिता । तारीसी अनंता नामा म्हणे
३४४८	।।ना.गा.०५४१.००१।।	केशव पैं मुक्ति केशव पैं भक्ति । केशव विश्रांति पंढरीये
३४४९	।।ना.गा.०५४१.००२।।	केशव लौकिकीं केशव व्यवहारीं । केशव निर्धारीं नाम तुझें
३४५०	।।ना.गा.०५४१.००३।।	नामा म्हणे आम्हां केशव वोळला । भावासि भुलला वाळुवंटीं
३४५१	।।ना.गा.०५४२.००१।।	वेदासी कानडा श्रुतीसी कानडा । विठ्ठल उघडा पंढरीये
३४५२	।।ना.गा.०५४२.००२।।	नाम बरवें रूप बरवें । दर्शन बरवें कानडीयाचें
३४५३	।।ना.गा.०५४२.००३।।	नामा म्हणे तुझें अवघेंचि बरवें । त्याहुनि बरवें प्रेम तुझें
३४५४	।।ना.गा.०५४३.००१।।	देवाधिदेवा सर्वत्रांच्या जीवा । ऐकें वासुदेवा दयानिधी
३४५५	।।ना.गा.०५४३.००२।।	ब्रह्मा आणि इंद्रा वंद्य सदाशिवा । ऐकें वासुदेवा दीनबंधू
३४५६	।।ना.गा.०५४३.००३।।	चवदा लोकपाळ करिती तुझी सेवा । ऐके वासुदेवा कृपासिंधु

३४५७	।।ना.गा.०५४३.००४।।	योगियांचे ध्यानीं नातुडसी देवा । ऐकें वासुदेवा जगद्गुरु
३४५८	।।ना.गा.०५४३.००५।।	निर्गुण निराकार नाहीं तुज माया । ऐकें कृष्णराया कानडीया
३४५९	।।ना.गा.०५४३.००६।।	वेडा अविचारी करी मजवर दया। ऐके कृष्णराया शहाणिया
३४६०	।।ना.गा.०५४३.००७।।	करुणेचा पर्जन्य शिंपी मजवरता या। ऐकें कृष्णराया गोजिरिया
३४६१	।।ना.गा.०५४३.००८।।	नामा म्हणे जरी दाविसील पाया । तरी वदावया स्फूर्ति चाले
३४६२	।।ना.गा.०५४४.००१।।	तुटोनि आकाश पडेलहि शिरीं । न सोडीं मी हरी पाय तुझे
३४६३	।।ना.गा.०५४४.००२।।	तुझे पाय गोड तुझे पाय गोड। तुझे पाय गोड सर्वकाळ
३४६४	।।ना.गा.०५४४.००३।।	डोंगरा सांगातें कोण करी वाद । वाउगी उपाध आहे आम्हां
३४६५	।।ना.गा.०५४४.००४।।	नामा म्हणे तुझें थोरपण काय । कायसे उपाय सांग आम्हां
३४६६	।।ना.गा.०५४५.००१।।	निर्धन धनातें कीं आंधळे लोचनातें । मयूर घनातें जेंवि भावी
३४६७	।।ना.गा.०५४५.००२।।	पारधियें पाडस धरियलें वनीं । तें चिंती जननी रात्रंदिवस
३४६८	।।ना.गा.०५४५.००३।।	तैसा तुझा छंद लागो कां गा देवा । माझिया जीवा केशिराजा
३४६९	।।ना.गा.०५४५.००४।।	सर्पें डंखिलें तें स्मरतो गारोडी । पुरी जातां सांगडी मन चिंती
३४७०	।।ना.गा.०५४५.००५।।	रोगी वैद्यातें बोलावूं धाडी । पडिले बांदवडी सुटका इच्छी
३४७१	।।ना.गा.०५४५.००६।।	बोळविली बाला ते मनीं वाहे कुवसा । कां रसज्ञू जैसा औषध गिवसी
३४७२	।।ना.गा.०५४५.००७।।	धेनुकारणें व्याकुळ होय वत्स । तें दशदिशेस अवलोकितें
३४७३	।।ना.गा.०५४५.००८।।	निचेतन देह प्राण असे अलग । घायवट उदक स्मरे वनीं
३४७४	।।ना.गा.०५४५.००९।।	चकोरें मिळोनि चंद्रा जेविं ध्याती । इंद्रियासि तृप्ति कैं होईल
३४७५	।।ना.गा.०५४५.०१०।।	पक्षिणीचें पिलूं येऊनि द्वाराजवळें । मुख पसरी कोंवळें अलोहित
३४७६	।।ना.गा.०५४५.०११।।	नामा म्हणे म्यां आन नाहीं जाणितले । मज पुरे येतुलें केशिराजा
३४७७	।।ना.गा.०५४६.००१।।	नवजावें तेथे लागे जाणें । न करावें तेंचि लागे करणें । न बोलावे त्यासि लागे बोलणें । पडणें मागणें नेदी तया
३४७८	।।ना.गा.०५४६.००२।।	कृष्णें देवकीये उदरा येणें । कंसा भेणें त्वां गोकुळासी जाणें । तेथें नंदाच्या गाई राखणें । संगतीं असणें गोंवळ्यांच्या
३४७९	।।ना.गा.०५४६.००३।।	राम वानराची सेवा करी । पांडव किंकर विराटा घरीं । हरिश्चंद्र डोंबा घरीं पायकी करी । हें अपूर्व परियेसा
३४८०	।।ना.गा.०५४६.००४।।	रुद्रें अंजनीं उदरा येणें । रामाची सेवा वानरपणें । प्रसंग पडे तैसें वर्तणें । रुसणें न लगे कवणासी
३४८१	।।ना.गा.०५४६.००५।।	स्वामीनें सेवकाची सेवा करणें । नुपेक्षी कदान्न भक्षणें । म्हणवूनि अहंकार न धरणें । विषम संसार अरे जना

३४८२	।।ना.गा.०५४६.००६।।	अवचट धडविती तुझिया भावा । घोर विस्मय होतो माझिया जीवा । विष्णुदास नामा विनवी केशवा । देवा तूं करिसी तें बरवें
३४८३	।।ना.गा.०५४७.००१।।	सर्व पाप पुण्य हीचिं दोन्हीं भांडी । विवेक न सांडी येतां जातां
३४८४	।।ना.गा.०५४७.००२।।	तुझें नाम तारूं तुझे नाम तारूं । तुझें नाम तारूं श्रीविठ्ठला
३४८५	।।ना.गा.०५४७.००३।।	विष्णुदास नाम्याने उभारिली शिडी । टाकावया पेढी वैकुंठींची
३४८६	।।ना.गा.०५४८.००१।।	पंढरी ज्ञानिया ध्यातां लक्षा नये । आम्हां वाट पाहे अनाथांची
३४८७	।।ना.गा.०५४८.००२।।	जपकांचें जाप्य नानामंत्रमय। आम्हां भक्ति प्रिय भावें सारी
३४८८	।।ना.गा.०५४८.००३।।	पुंडलिकासाठीं वोळला वोरसें । नेणों काय कैसें प्रेम त्याचें
३४८९	।।ना.गा.०५४८.००४।।	नामा म्हणे जीवें करूं निंबलोण । झणीं नारायणा दिठावसी
३४९०	।।ना.गा.०५४९.००१।।	नित्य आम्हां सुख तुझ्या पायापासीं । शरण कोणासी जाऊं आम्ही
३४९१	।।ना.गा.०५४९.००२।।	सकाळीं उठोनि ऐकतों कीर्तन । तेणें समाधान मज होय
३४९२	।।ना.गा.०५४९.००३।।	उभा महाद्वारीं वैष्णव भेटती । सांखळ्या तुटती चौऱ्यांशींच्या
३४९३	।।ना.गा.०५४९.००४।।	नामा म्हणे सदा पंढरी रहिवास । मागुता जन्मास येतो कोण
३४९४	।।ना.गा.०५५०.००१।।	सगुण संपन्न पंढरीच्या राया । आमुच्या स्वामिया केशिराजा
३४९५	।।ना.गा.०५५०.००२।।	रामकृष्ण हरी श्रीधरा मुकुंदा। सज्जनीं स्वानंदा सर्वातीता
३४९६	।।ना.गा.०५५०.००३।।	गोविंद गोपाळ गोपवेशधारी । गोवर्धन धरी नखावरी
३४९७	।।ना.गा.०५५०.००४।।	दुष्ट दुर्जनासी दु:ख फार चित्ता । पावन पतिता नामा म्हणे
३४९८	।।ना.गा.०५५१.००१।।	जय विठ्ठल श्री विठ्ठल । जय जय विठ्ठल विठ्ठल
३४९९	।।ना.गा.०५५१.००२।।	परब्रह्म विठ्ठल मूर्ति विठ्ठल । निरंजन विठ्ठल विठ्ठल
३५००	।।ना.गा.०५५१.००३।।	जोचि नाम तोचि देवो । ऐसें म्हणे तरी नाहीं संदेहो
३५०१	।।ना.गा.०५५१.००४।।	म्हणे विष्णुदास नामा । तो नेईल परत ग्रामा
३५०२	।।ना.गा.०५५२.००१।।	कैलासींचा देव भोळा चक्रवर्ती । पार्वतीचा पति योगिराज
३५०३	।।ना.गा.०५५२.००२।।	तयाचिया पायां माझे दंडवत। घडो आणि चित्त जडो नामीं
३५०४	।।ना.गा.०५५२.००३।।	जटाजूट गंगा अर्धचंद्र भाळीं । तिजा नेत्रज्वाळी जातवेद
३५०५	।।ना.गा.०५५२.००४।।	कंठीं काळकूट डौर त्रिशूळ हातीं । सर्वांगीं विभूति शोभतसे
३५०६	।।ना.गा.०५५२.००५।।	गळा रूंडमाळा खापर हस्तकीं । रामनाम मुखीं सर्वकाळ

३५०७	।।ना.गा.०५५२.००६।।	व्याघ्रचर्मधारी स्मशानीं राहिला । संगें भूतमेळा विराजित
३५०८	।।ना.गा.०५५२.००७।।	नामा म्हणे नामें नासोनियां पाप । करीं सुखरूप भक्तांलागीं
३५०९	।।ना.गा.०५५३.००१।।	डंवरला गिरी कैलास ढवळा । सिंहासन ज्याला ढवळेंची
३५१०	।।ना.गा.०५५३.००२।।	पाहतां पाहतां निवाले लोचन। भव्य ज्याचें ध्यान एकरूप
३५११	।।ना.गा.०५५३.००३।।	ढवळा सर्वांगीं देव तो आपण । लेईला भूषण तें हि तैसें
३५१२	।।ना.गा.०५५३.००४।।	पर्वताची बाळा पार्वती ढवळी । अर्धांगी शोभली एकरूप
३५१३	।।ना.गा.०५५३.००५।।	सर्वांगीं लाविली ढवळी विभूति । माळा विराजती स्फटिकांच्या
३५१४	।।ना.गा.०५५३.००६।।	पांढरिया जटेमध्यें गंगा आहे श्वेत । गळ्यांत शोभत श्वेत सर्प
३५१५	।।ना.गा.०५५३.००७।।	शंखपाळ श्रवणें कुंडलें ढवळीं । देखतां भूतळीं दुजा नाहीं
३५१६	।।ना.गा.०५५३.००८।।	नामा म्हणे ऐसें दाऊनियां ध्यान । भाविकांचें मन तोषवित
३५१७	।।ना.गा.०५५४.००१।।	एके दिनीं रत्नसिंहासनावरी । कैसा त्रिपुरारी शोभतसे
३५१८	।।ना.गा.०५५४.००२।।	सांगो जातां चाऱ्ही वाचा विसावती। तेथें माझी मति काय सांगों
३५१९	।।ना.गा.०५५४.००३।।	वामभागीं साजे सुंदरी भवानी । सिद्ध ऋषि मुनी करिती सेवा
३५२०	।।ना.गा.०५५४.००४।।	नारद तुंबर गर्जती गायन । तेथें कर जोडोन उभे देव
३५२१	।।ना.गा.०५५४.००५।।	गणेश सन्मुख ढाळिती चामरें । ऋद्धिसिद्धि द्वार राखिताती
३५२२	।।ना.गा.०५५४.००६।।	नामाचा गजर मृदंगाची घाई । पाहती नवाई ब्रह्मादिक
३५२३	।।ना.गा.०५५४.००७।।	नामा हाडपे करी देतसे विडिया । लागोनियां पायां वारंवार
३५२४	।।ना.गा.०५५५.००१।।	तेव्हां प्रश्न करी पार्वती आदरें । शिवाप्रती कर जोडोनियां
३५२५	।।ना.गा.०५५५.००२।।	सांगावा जी स्वामी ऐसा इतिहास। गातां जोडे वास तुझे पायीं
३५२६	।।ना.गा.०५५५.००३।।	जाळोनियां पापें सुखाची उन्नति । विश्व सुखी होती जेणें योगें
३५२७	।।ना.गा.०५५५.००४।।	नामा म्हणे सुटे काळासी दरारा । विश्वासिया नरा मुक्ति जोडे
३५२८	।।ना.गा.०५५६.००१।।	ऐकोनियां वाणी । संतोषला शूळपाणि
३५२९	।।ना.गा.०५५६.००२।।	देवी चांगलें पुसिलें । तुझ्या बोलें चित्त धालें
३५३०	।।ना.गा.०५५६.००३।।	बोल नव्हती साचार । जड जीवाचां उद्धार
३५३१	।।ना.गा.०५५६.००४।।	बोल तुझे गोडावले । जगीं सुदिन पाहिले
३५३२	।।ना.गा.०५५६.००५।।	शिवरात्रींचे महिमान । नामा म्हणे ऐका जन

३५३३	।।ना.गा.०५५७.००१।।	ऐका सावधान कथा शिवरात्र । पावन पवित्र तिहीं लोकीं
३५३४	।।ना.गा.०५५७.००२।।	भाव धरोनियां आचरती जरी। वास शिवपुरीं घडे त्यासी
३५३५	।।ना.गा.०५५७.००३।।	उपवास आणि शिवाचें पूजन । रात्रीं जागरण विधी त्याचा
३५३६	।।ना.गा.०५५७.००४।।	एक पसा पाणी एक बिल्वदळ । पूजन केवळ सोपें बहु
३५३७	।।ना.गा.०५५७.००५।।	नामा म्हणे करा नामाचा गजर । मुखीं हरहर शब्द मात्रें
३५३८	।।ना.गा.०५५८.००१।।	शिव ऐसा शब्द कल्याणदायक । जाणती भाविक साधुजन
३५३९	।।ना.गा.०५५८.००२।।	तारक हें नाम भोळ्या भाविकांसी । नेणतें जाणत्यासी लाभ एक
३५४०	।।ना.गा.०५५८.००३।।	उपमन्यु बाळक दूध मागों गेला । क्षीराब्धि दिधला उचितासी
३५४१	।।ना.गा.०५५८.००४।।	दुष्ट दुराचारी पतित तारिले। नाहीं अव्हेरिले दीनानाथें
३५४२	।।ना.गा.०५५८.००५।।	नामा म्हणे शिव विष्णु एकरूप । ताराया अमूप अवतार
३५४३	।।ना.गा.०५५९.००१।।	भेदवादी जन वदतसे भिन्न । नव्हे तें लक्षण भजनाचें
३५४४	।।ना.गा.०५५९.००२।।	विश्वीं विश्वंभर कोंदलासे एक । भेदाचें कौतुक कैसें सांगा
३५४५	।।ना.गा.०५५९.००३।।	ब्रह्मीं नाहीं ठाव एकपणाचाही । तेथें दुजें कांहीं सामावतें
३५४६	।।ना.गा.०५५९.००४।।	आदि मध्य अंतीं खेळूनियां खेळ । उरलें तें निखळ अविनाश
३५४७	।।ना.गा.०५५९.००५।।	हेमीं जैसें केलें तैसे होती, नग । तरी तें अव्यंग सोनेपणीं
३५४८	।।ना.गा.०५५९.००६।।	केली जैसी भक्ति शैव कां वैष्णव । पाहतां तो देव नाहीं दुजा
३५४९	।।ना.गा.०५५९.००७।।	शिवविष्णु दोघे एकचि अवतार । वेदांनी निर्धार हाचि केला
३५५०	।।ना.गा.०५५९.००८।।	नामा म्हणे येथें दुजा नको भाव । विष्णु तोचि शिव शिव विष्णु
३५५१	।।ना.गा.०५६०.००१।।	कांचीपुरीं राजा नामें सोमदत्त । तयाचे संपत्ती पार नाहीं
३५५२	।।ना.गा.०५६०.००२।।	पूर्वपुण्यबळें लाधलें तयासी । देतां उपमेसी उणा शुक्र
३५५३	।।ना.गा.०५६०.००३।।	पांचशतें तया कामिनी सुंदरा । करितां नाहीं पुरा जाला काम
३५५४	।।ना.गा.०५६०.००४।।	ऋद्धि सिद्धि घरीं कामारि हिंडती । धैर्य शौर्य कीर्ति ज्याची जगीं
३५५५	।।ना.गा.०५६०.००५।।	नामा म्हणे जेथें उणें कांहीं नाहीं । ऐसें असोनिही न सुटे भोग
३५५६	।।ना.गा.०५६१.००१।।	भोगाची नव्हाळी न सुटे कोणे काळीं । वासना वोंगळी तेचि करी
३५५७	।।ना.गा.०५६१.००२।।	वासनेचि थोरी सांगवेना कांहीं । न सुटिजे कांहीं कोण्या काळीं
३५५८	।।ना.गा.०५६१.००३।।	तारुण्याच्या भरें आवडी स्त्रियेची । वृद्धपण तेंचि चिंता होये

३५५९	।।ना.गा.०५६१.००४।।	म्हणतसे पोरें वांचतील कैसीं । हाचि अहर्निशीं ध्यास करी
३५६०	।।ना.गा.०५६१.००५।।	मेलियाही पुढें तेंचि उभें राहे । जन्मोजन्मीं पाहे लागलेसें
३५६१	।।ना.गा.०५६१.००६।।	मृगाचिया ध्यासे भरतां मृगपण । जन्मल्यावांचून सोडिना तें
३५६२	।।ना.गा.०५६१.००७।।	नामा म्हणे जया जैसी जे वासना । जन्मकर्में जाणा तैसी होती
३५६३	।।ना.गा.०५६२.००१।।	पंचशतांमाजीं दोघी पतिव्रता । जारिणी समस्त सर्व काळ
३५६४	।।ना.गा.०५६२.००२।।	करूनियां ऐसीं जाती नरकासी । नाडिलें पतीसी त्यांच्या पापें
३५६५	।।ना.गा.०५६२.००३।।	करिती ये वेळे झांकिती लोचन । शेवटीं बंधन यमाहातीं
३५६६	।।ना.गा.०५६२.००४।।	नामा म्हणे बरें नव्हे हें कोणासी । घडेल तयासी जाच बहू
३५६७	।।ना.गा.०५६३.००१।।	राष्ट्र करी पाप राजानें भोगावें । राजियाचें तें सर्व पुरोहितां
३५६८	।।ना.गा.०५६३.००२।।	बोले धर्मशास्त्र जाणती सर्वही । परी तें कोणाही न कळे वर्म
३५६९	।।ना.गा.०५६३.००३।।	शिष्यें केलें पाप भोगावें गुरुनें । स्त्रीनें केलें घेणें पुरुषासी
३५७०	।।ना.गा.०५६३.००४।।	नामा म्हणे जन मायेंत गुंतले । सेखीं खाती झोले संसाराचे
३५७१	।।ना.गा.०५६४.००१।।	ऐसें बहुत काळ लोटलियावरी । पुण्याची सामुग्री हारपली
३५७२	।।ना.गा.०५६४.००२।।	मरोनियां जन्म हरणाचा पावला । पतिव्रता जाल्या कुरंगिणी
३५७३	।।ना.गा.०५६४.००३।।	प्रारब्धाचा भोग सुटेना कोणासी । केली जैसीं तैसी घ्यावी फळें
३५७४	।।ना.गा.०५६४.००४।।	नामा म्हणे देव कृपा करील जरी । सुटेना तोंवरी भोग खरा
३५७५	।।ना.गा.०५६५.००१।।	होऊनि हरण राहिला तो वनीं । दोषी त्या हरिणी स्त्रिया जाल्या
३५७६	।।ना.गा.०५६५.००२।।	जातीच्या स्वभावें करिती विहार । चित्त जाले स्थिर एकमेकां
३५७७	।।ना.गा.०५६५.००३।।	धाकुटीला दोन्हीं पाडसें गोजिरीं । दुजी गरोदरी पूर्ण मास
३५७८	।।ना.गा.०५६५.००४।।	नामा म्हणे पुढें काय जाली गती । कथेची संगति ऐका बरी
३५७९	।।ना.गा.०५६६.००१।।	देवलोकीं इंद्र सेवेसी सादर । भूतसेन चाकर होता तेथें
३५८०	।।ना.गा.०५६६.००२।।	सेवेसी चुकतां होय तूं किरात । ऐसें इंद्रें त्यातें शापियेलें
३५८१	।।ना.गा.०५६६.००३।।	शेज सज्ज करितां अंतर पडिलें । म्हणोनि घडले भोग त्यासी
३५८२	।।ना.गा.०५६६.००४।।	नामा म्हणे सेवा करणें हे कठीण । त्यानें व्हावें जाण सावधान
३५८३	।।ना.गा.०५६७.००१।।	ऐकतांचि शब्द होऊनि किरात । राहिला निवांत एके ग्रामीं
३५८४	।।ना.गा.०५६७.००२।।	पाळणपोषण विषयांची वोढी । करितसे जोडी पातकांची

३५८५	।।ना.गा.०५६७.००३।।	चण्डभिल्ल नाम घेतलें ठेऊनि । दुष्टभाव मनीं वाढविला
३५८६	।।ना.गा.०५६७.००४।।	कासेसी वाघुरा हातीं शूळ दंड । सामोग्री उदंड मेळविली
३५८७	।।ना.गा.०५६७.००५।।	हिंडे नाना वन पर्वत शिखरें । मारीतसे फार जीवजंतू
३५८८	।।ना.गा.०५६७.००६।।	जातीचा स्वभाव लागला तयासी । कष्टे अहर्निशीं म्हणे नामा
३५८९	।।ना.गा.०५६८.००१।।	ऐसें असतां तो सरूं आला काळ । प्रारब्धाचें बळ कैसें पाहा
३५९०	।।ना.गा.०५६८.००२।।	हिंडतां हिंडतां फार कष्टी जाला । दृष्टीस तयाला न पडे कांहीं
३५९१	।।ना.गा.०५६८.००३।।	कडे दरी मोठ्या पर्वताचे वरी । रिघोनियां करी नाना युक्ति
३५९२	।।ना.गा.०५६८.००४।।	जाली सांजवेळ न मिळे आमीष । होऊनी उदास राहिलासे
३५९३	।।ना.गा.०५६८.००५।।	नामा म्हणे मग काय त्यानें केलें । ऐकावें निश्चळें साधुजनीं
३५९४	।।ना.गा.०५६९.००१।।	मार्गही राहिला जाऊं कोणीकडे । आमीष न जोडे काय कीजे
३५९५	।।ना.गा.०५६९.००२।।	चिंताज्वरें फार तापलें अंतर । क्षुधेचा आडदर पोटामध्यें
३५९६	।।ना.गा.०५६९.००३।।	रिक्त जाऊं तरी नाहीं कांही घरीं । वाट पाहे घरीं दारापुत्र
३५९७	।।ना.गा.०५६९.००४।।	पाहू जातां कांहीं नाठवे विचार । तेणें स्थिर स्थिर पाय टाकी
३५९८	।।ना.गा.०५६९.००५।।	नामा म्हणे तेव्हां देखे सरोवर । कांहींसा विचार करूं लागे
३५९९	।।ना.गा.०५७०.००१।।	भोंवतालें जाळें घाली नेटें पाटें । हस्तकीं तिखट बाण धरी
३६००	।।ना.गा.०५७०.००२।।	येतील उदकपानासी सावजें। पाहे त्याचे व्याजें रोखोनियां
३६०१	।।ना.गा.०५७०.००३।।	तेथें एक बिल्ववृक्ष महाथोर । वेधोनियां वर बैसलासे
३६०२	।।ना.गा.०५७०.००४।।	डोळ्याआड आली म्हणोनियां तोडी । अंतरीं आवडी आमीषाचीं
३६०३	।।ना.गा.०५७०.००५।।	बकाचियेपरी ध्यानस्थ राहिला । जीविंचा जिव्हाळा वेगळाची
३६०४	।।ना.गा.०५७०.००६।।	नामा म्हणे ऐसी देवाची नव्हाळी । न करितां जाली देवपूजा
३६०५	।।ना.गा.०५७१.००१।।	लक्षवरी बिल्व दळें माथा पाहे । आनंद न समाये महादेवा
३६०६	।।ना.गा.०५७१.००२।।	बहुतां काळाचें तेथें एक लिंग। होते भूमिभाग होउनियां
३६०७	।।ना.गा.०५७१.००३।।	भोळा महादेव तेणें संतोषला । म्हणे करितां जाला कोण पूजा
३६०८	।।ना.गा.०५७१.००४।।	नामा म्हणे पाहे निमित्याची वाट । पुराणीं बोभाट असे त्याचा
३६०९	।।ना.गा.०५७२.००१।।	पुराणीं पवाडे जयाचे अपार । ऐकतांचि फार सुख वाटे
३६१०	।।ना.गा.०५७२.००२।।	भोळा महादेव पाहे भोळा भाव। एक सरे जीव उद्धराया

३६११	।।ना.गा.०५७२.००३।।	रावण मागों गेला पार्वतीकारणें । देते वेळें नेणें कैसें द्यावें
३६१२	।।ना.गा.०५७२.००४।।	जातीची चांडाळी गोकर्णासी गेली । दरूशनें ते नेली कैलासासी
३६१३	।।ना.गा.०५७२.००५।।	नामा म्हणे कैसें दैव या भिल्लाचें । आलें पूजनाचें फळ हातां
३६१४	।।ना.गा.०५७३.००१।।	माथां पडतां पाला । सांब तेणें संतोषला
३६१५	।।ना.गा.०५७३.००२।।	होता प्राचीनाचा ठेवा । बहु दुर्लभ मानवा
३६१६	।।ना.गा.०५७३.००३।।	काय भक्तीचा जिव्हाळा । काय त्याचे अंगीं कळा
३६१७	।।ना.गा.०५७३.००४।।	बहु केलीं दुष्ट कर्म । सेखीं तोचि जाला धर्म
३६१८	।।ना.गा.०५७३.००५।।	नामा म्हणे भोळा देव । सांगायाचा हाचि भाव
३६१९	।।ना.गा.०५७४.००१।।	इतुकियासाठीं । बहु तुष्टला धूर्जटी
३६२०	।।ना.गा.०५७४.००२।।	काय सांगावा विचार । दैव पारध्याचें थोर
३६२१	।।ना.गा.०५७४.००३।।	जाली तीन प्रहर निशी । पूजा पावली देवासी
३६२२	।।ना.गा.०५७४.००४।।	धाडियलें यमाला । सुखी कराया तयाला
३६२३	।।ना.गा.०५७४.००५।।	आला तो धांवत । माग म्हणे अपेक्षित
३६२४	।।ना.गा.०५७४.००६।।	त्याची विषयक भक्ति । पुढती जाली तया गती
३६२५	।।ना.गा.०५७४.००७।।	जें जें याचके मागावें । तें तें दातयानें द्यावें
३६२६	।।ना.गा.०५७४.००८।।	काय मागितलें तेणें । तेचि नामा ऐका म्हणे
३६२७	।।ना.गा.०५७५.००१।।	येऊनियां यम ठाकला पुढारीं । पाहे दुराचारी दुरोनियां
३६२८	।।ना.गा.०५७५.००२।।	घाबरला मनीं कोण असे नेणें । विचारितां मनीं भांबावला
३६२९	।।ना.गा.०५७५.००३।।	पुसों लागे त्याला कोण तूं आलासी । आणिक म्हणसी माग कांहीं
३६३०	।।ना.गा.०५७५.००४।।	देव किंवा यक्ष राक्षस किन्नर । करितां निर्धार न पडे ठायीं
३६३१	।।ना.गा.०५७५.००५।।	नामा म्हणे मूर्ख पारधी तो खरा । दैव त्याच्या घरा आलें जाण
३६३२	।।ना.गा.०५७६.००१।।	जाणोनियां यम संतोषला मनीं । मंजुळ वचनीं काय बोले
३६३३	।।ना.गा.०५७६.००२।।	केली देवें कृपा पाठविलें मज। वरदान तुज द्यावयासी
३६३४	।।ना.गा.०५७६.००३।।	सर्वही जीवांचा नियंता मी यम । इच्छिसी तो काम पूर्ण करूं
३६३५	।।ना.गा.०५७६.००४।।	शिवरात्री आजी उपवास केला । शंकर तोषला बिल्वदळीं
३६३६	।।ना.गा.०५७६.००५।।	नामा म्हणे ऐसें ऐकतां वचन । पारध्याचें मन सुखावलें

३६३७	।।ना.गा.०५७७.००१।।	जोडोनियां हात वंदिला कृतान्त । म्हणे माझा हेत इतुकाची
३६३८	।।ना.गा.०५७७.००२।।	सर्व सुखाहुनीं हेंचि वाटे गोड । संसाराची ओढ मोडवेना
३६३९	।।ना.गा.०५७७.००३।।	मृग पक्षीयाचें कळावें बोलणें । सर्व कांहीं येणें कार्यसिद्धी
३६४०	।।ना.गा.०५७७.००४।।	इतुकी आहे हो माझी ही वासना । पुरवूनि स्वस्थाना जावें तुम्ही
३६४१	।।ना.गा.०५७७.००५।।	नामा म्हणे ज्याची जे कांहीं वासना । तेचि पुढें जाणा उभी ठाके
३६४२	।।ना.गा.०५७८.००१।।	देऊनियां वर दंडपाणी गेला । ध्यास पारध्याला मृगाचाची
३६४३	।।ना.गा.०५७८.००२।।	लाऊनियां चित्त ऐके चळवळ। दृष्टीची तळमळ लक्ष तेथें
३६४४	।।ना.गा.०५७८.००३।।	उगवला दिन जाहला प्रकाश । मृग पक्षीयास दृष्टि जाली
३६४५	।।ना.गा.०५७८.००४।।	तोचि मृग पाहा आला उदकासी । उड्डाण गगनासी साधीतसे
३६४६	।।ना.गा.०५७८.००५।।	तृषाक्रांत मोठा चालिला नि:संग । प्रारब्धाचा भोग ओढवला
३६४७	।।ना.गा.०५७८.००६।।	उदकाचिये हांवें दृष्टि जाली दुरी । पाश तो सामोरी देखेचिना
३६४८	।।ना.गा.०५७८.००७।।	येऊनियां पडे जाळिया माझारीं । लोळे पृथ्वीवरी एकसरा
३६४९	।।ना.गा.०५७८.००८।।	नामा म्हणे भिल्लें पाहतां लोचनीं । वोढोनियां गुणीं बाण लावी
३६५०	।।ना.गा.०५७९.००१।।	घाव घालूं जातां देखिलें नवल । पाहातसे खळ दुष्टभावें
३६५१	।।ना.गा.०५७९.००२।।	परी ते होणार कदापि चुकेना । तैसीच वासना धांव घाली
३६५२	।।ना.गा.०५७९.००३।।	धाकुटी हरणी पाडसें धाकुटीं । सांडी उठाउठीं आली तेथें
३६५३	।।ना.गा.०५७९.००४।।	पाहों जातां पाशीं गुंतला तो मृग । तेव्हां काय मग केलें तिनें
३६५४	।।ना.गा.०५७९.००५।।	मुखाप्रती मुख लाऊनि चुंबिलें । हृदय फुटलें देखतांचि
३६५५	।।ना.गा.०५७९.००६।।	सुख दु:ख बोल बोलती ते वेळीं । म्हणती कपाळीं भोग होता
३६५६	।।ना.गा.०५७९.००७।।	सोडवितां कोणी न दिसे ये काळीं। काळाची पडली उडी आतां
३६५७	।।ना.गा.०५७९.००८।।	नामा म्हणे खळा कळे त्याची वाणी । ऐकाया लागूनि स्थिर जाला
३६५८	।।ना.गा.०५८०.००१।।	धर्मशास्त्रीं ऐसें बोलताती बोलें । तेणें चोजवलें चित्त त्याचें
३६५९	।।ना.गा.०५८०.००२।।	आश्चर्याच्या डोहीं बुडाला पारधी । म्हणे कैसी बुद्धि याची पाहा
३६६०	।।ना.गा.०५८०.००३।।	रानींचीं रानवट तया एवढें ज्ञान । प्रेमाचें जीवन वोसंडत
३६६१	।।ना.गा.०५८०.००४।।	चाकाटली वृत्ति चित्त केलें स्थिर । दोघांचीं उत्तरें ऐकतसे
३६६२	।।ना.गा.०५८०.००५।।	नामा म्हणे हरणीहरणाचा संवाद । ऐकतां भवबंध तुटतसे

३६६३	।।ना.गा.०५८१.००१।।	बंधनीं गुंतला देखोनियां पती । उडालीसे वृत्ति हरणीची
३६६४	।।ना.गा.०५८१.००२।।	देहाची ते आस सांडोनि लवलाही। पडे रडे कांहीं बोलवेना
३६६५	।।ना.गा.०५८१.००३।।	म्हणे तुम्ही आतां न जावें एकलें । संगें आम्हां नेलें पाहिजे जी
३६६६	।।ना.गा.०५८१.००४।।	बहुतां जन्मांची तुम्हां आम्हां गांठीं । आतां कैसी तुटी पाडितसां
३६६७	।।ना.गा.०५८१.००५।।	भोग जे भोगिले स्वप्नप्राय जाली । नाहीं ते पुरली वासना हे
३६६८	।।ना.गा.०५८१.००६।।	नामा म्हणे विषयवासना वोंगळ । तेणें कोण्या काळें सुटिजेना
३६६९	।।ना.गा.०५८२.००१।।	देखतांचि कांता दु:खी जाली फार । डोंगर तिजवर कोसळला
३६७०	।।ना.गा.०५८२.००२।।	बोलतां तियेसीं न निघती बोल । ऐसाचि तो वेळ अवधारी
३६७१	।।ना.गा.०५८२.००३।।	नको आतां पडू मायेचिये भरी । जाये वो सुंदरी स्वस्थळासी
३६७२	।।ना.गा.०५८२.००४।।	माझी गति मज तुझी गति तुज । काय काज व्यर्थ प्राण द्यावा
३६७३	।।ना.गा.०५८२.००५।।	घरीं तुझीं बाळें गोजिरीं गोमटीं । जाऊनियां पोटीं धरीं त्यांसी
३६७४	।।ना.गा.०५८२.००६।।	न लावी उशीर जाई वो माघारीं । जंव तो दुराचारी न देखतां
३६७५	।।ना.गा.०५८२.००७।।	बाळा पाळणा हाचि स्त्रियांचा धर्म । सांगतो वर्म जाई आतां
३६७६	।।ना.गा.०५८२.००८।।	माझिया प्रारब्धीं होतें तैसें जालें । तूं कां येथें बळें प्राण देसी
३६७७	।।ना.गा.०५८२.००९।।	नामा म्हणे ऐसें सांगें तिच्या हिता । परी तें नाइकतां कष्टी होय
३६७८	।।ना.गा.०५८३.००१।।	नेत्रीं अश्रुधारा पडती अपार । तेणें पृथ्वीवर पूर वाहे
३६७९	।।ना.गा.०५८३.००२।।	म्हणे तुम्हांविण कैसा प्राण धरूं । वांचूनिया करूं काय आतां
३६८०	।।ना.गा.०५८३.००३।।	माझिया भारानें दाटेल मेदिनी । तुम्हां अव्हेरूनि गेलें जरी
३६८१	।।ना.गा.०५८३.००४।।	सुखाचे सांगाती होतों दोघीजणीं । दु:ख म्हणवूनि सांडी केली
३६८२	।।ना.गा.०५८३.००५।।	सांडिलिया तुम्हां देवा न मानेल । वेदशास्त्र बोल हाकारिती
३६८३	।।ना.गा.०५८३.००६।।	तुजविण क्षण कंठवेना काळ। मीन जैसें जळ तैसें आम्हां
३६८४	।।ना.गा.०५८३.००७।।	तुजविण जिणें व्यर्थ या संसारी । नामा म्हणे खरी गोष्ट बोले
३६८५	।।ना.गा.०५८४.००१।।	चण्डभिल्ल तेणें ऐकिलें बोलणें । सावधान मनें करोनियां
३६८६	।।ना.गा.०५८४.००२।।	तेव्हां चित्तीं होती वासना जे खोटी । जिरऊनि पोटीं चाकाटला
३६८७	।।ना.गा.०५८४.००३।।	भीतील यालागीं वृक्षाआड जाला । ऐकों जो लागला शब्द त्यांचे
३६८८	।।ना.गा.०५८४.००४।।	नामा म्हणे ऐसा राहिला पारधी । ऐकावें ते संधि काय जालें

३६८९	।।ना.गा.०५८५.००१।।	दुसरी जे होती गर्भिण कुरंगी । तेहि लागवेगीं आली तेथें
३६९०	।।ना.गा.०५८५.००२।।	आहा ऐसें काय केलें वो साजणी । न येसी अजूनि कोंपटासी
३६९१	।।ना.गा.०५८५.००३।।	लहान पाडसें आक्रंदती भुकें । कैसी येथें सुखें राहिलीसी
३६९२	।।ना.गा.०५८५.००४।।	जाई लवलाही त्यांसी स्तन देई । सांगू आतां कांही बोलवेना
३६९३	।।ना.गा.०५८५.००५।।	नामा म्हणे धन्य तयाचें सौजन्य । नाही भाव भिन्न कोणामाजीं
३६९४	।।ना.गा.०५८६.००१।।	येरी म्हणे काय करूं वो सुंदरी । आतां आहे घरीं काय माझें
३६९५	।।ना.गा.०५८६.००२।।	प्राणनाथें पेणें केलें त्या लोकीं । जाईन मी देखा तयासंगें
३६९६	।।ना.गा.०५८६.००३।।	वडिलपणें तुम्ही लोभ असों द्यावा । सांभाळ करावा बाळकांचा
३६९७	।।ना.गा.०५८६.००४।।	वागुरे माझारीं गुंतलासे कांत । कायसें जीवित विचारीं पां
३६९८	।।ना.गा.०५८६.००५।।	न लावीं उशीर जाई येच क्षणीं । अससी गर्भिणि पूर्ण मास
३६९९	।।ना.गा.०५८६.००६।।	जरा देसी प्राण पतन गर्भासी । होय ते दोषासी पात्र होसी
३७००	।।ना.गा.०५८६.००७।।	पोसोनियां बाळें वाढवी वंशाला । द्यावें चित्त बोला माझ्या आतां
३७०१	।।ना.गा.०५८६.००८।।	पळावया तुज नाहीं अंगीं बळ । न देखतां खळ जाई वेगीं
३७०२	।।ना.गा.०५८६.००९।।	नामा म्हणे ऐसीं उत्तरें ऐकिलीं । तेही घाबरली तये वेळीं
३७०३	।।ना.गा.०५८७.००१।।	ऐकतांची जीव जाला कासावीस । म्हणे जालें कैसें अकस्मात
३७०४	।।ना.गा.०५८७.००२।।	आम्हां कपाळींचा भोग वोढवला । कांत तो निघाला सांडोनियां
३७०५	।।ना.गा.०५८७.००३।।	कैचीं बाळें कोण कोणाची सांगाती । पाहतां हे भ्रांति वाउगीची
३७०६	।।ना.गा.०५८७.००४।।	ठायींची हे काया जायाची जाईल । वांचलिया फोल पतिविण
३७०७	।।ना.गा.०५८७.००५।।	पतिविण सुख काय या संसारीं । दुःख कल्पवरी भोगावें कीं
३७०८	।।ना.गा.०५८७.००६।।	नामा म्हणे ऐसें चिंतोनियां मनीं । आली तत्क्षणीं हरणापाशीं
३७०९	।।ना.गा.०५८८.००१।।	कपाळीं कपाळ लावी चुंबी रडे । आक्रंदोनी पडे पृथ्वीवरी
३७१०	।।ना.गा.०५८८.००२।।	आवडीचें चिन्ह सांगवेना वाचे । जाणावे जयांचे त्यांचे त्यांनीं
३७११	।।ना.गा.०५८८.००३।।	मानेवरी मान टाकूनि राहिली । वाचाही खुंटली बोलवेना
३७१२	।।ना.गा.०५८८.००४।।	आम्ही तुजविण न राहूं क्षणभरी । उदास न करीं चित्त आतां
३७१३	।।ना.गा.०५८८.००५।।	नामा म्हणे मृगजन्म त्यांचा खरा । लक्षितां विचारा ज्ञानी बहु
३७१४	।।ना.गा.०५८९.००१।।	पट्टाची मी राणी वडील मानाची । जे गति मृगाची तेचि मज

३७१५	।।ना.गा.०५८९.००२।।	जाईन सांगातें न सोडी संगती । निश्चय हा चित्तीं दृढ केला
३७१६	।।ना.गा.०५८९.००३।।	तुझीं बाळें घरीं कष्टती क्षुधेनें । जाई वेगीं स्तनें पान देई
३७१७	।।ना.गा.०५८९.००४।।	बाळांकडे जाई पाहे कंठीं काळ । न करीं उतावीळ मन आतां
३७१८	।।ना.गा.०५८९.००५।।	नामा म्हणे ऐसें संवादले फार । तिघांचे अंतर एकविध
३७१९	।।ना.गा.०५९०.००१।।	ऐशा दोघीजणी एकविध भावें । द्यावयासी जीव उभ्या ठेल्या
३७२०	।।ना.गा.०५९०.००२।।	धन्य धन्य त्यांचा संसार सुफळ । सत्वाचेंचि बळ अंगामध्यें
३७२१	।।ना.गा.०५९०.००३।।	पाजुनियां येई बाळकासी स्तन । आम्हीं दोघेजण येथें असों
३७२२	।।ना.गा.०५९०.००४।।	न टाका मजला सांगोनि निघाली । बिर्‍हाडासी आली लागवेगें
३७२३	।।ना.गा.०५९०.००५।।	घेवोनियां अंकी पाडसें तीं दोन्ही । लावूनिया स्तनीं शोक करी
३७२४	।।ना.गा.०५९०.००६।।	एकमेकें सुखें राहावें अनन्य । तुटलें सौजन्य तुम्हां आम्हां
३७२५	।।ना.गा.०५९०.००७।।	पति पाडिलासे फासीं सांडितसे प्राण । आम्हांलागीं जाणें त्याच्यासंगें
३७२६	।।ना.गा.०५९०.००८।।	ह्रदयीं धरोनी दिधलें चुंबन । तीं म्हणती कोण पोशी आम्हां
३७२७	।।ना.गा.०५९०.००९।।	येऊं तुम्हासंगें देऊं आधीं प्राण । पुढील कारण तुम्ही पाहा
३७२८	।।ना.गा.०५९०.०१०।।	नामा म्हणे ऐसे पांचही ते एक । देखोनि कौतुक वाटतसे
३७२९	।।ना.गा.०५९१.००१।।	निघोनियां देखा आली त्या तटाका । झाली एकमेकां भेटी तेथें
३७३०	।।ना.गा.०५९१.००२।।	परस्परें दु:ख देखतां वाढलें । धैर्याचेंचि बळ केलें त्यांनीं
३७३१	।।ना.गा.०५९१.००३।।	देहभाव कांहीं नाठवे तयांसी । गुंतोनी मोहासी जीव देतां
३७३२	।।ना.गा.०५९१.००४।।	नामा म्हणे देवें सोडवावें त्यासी । हें तो अनेकासी आटोपेना
३७३३	।।ना.गा.०५९२.००१।।	पारधी तो झड घालोनी पातला । घालावया घाला एकसरें
३७३४	।।ना.गा.०५९२.००२।।	भयभीत जालीं पांचही ते काळीं । वासना गुंतली एकमेकां
३७३५	।।ना.गा.०५९२.००३।।	वडील कुरंगी येऊनी त्यापाशीं । लागोनी पायांसी काय बोले
३७३६	।।ना.गा.०५९२.००४।।	नको मारूं पति तृषेनें पीडिला । मारी तूं मजला तयां आधीं
३७३७	।।ना.गा.०५९२.००५।।	आहेवपणानें धाडी स्वर्गलोका । येतुल्यानें सुखा पात्र होशी
३७३८	।।ना.गा.०५९२.००६।।	इतुकीयामाजीं दुसरीही आली। ती म्हणे उगली थांब आतां
३७३९	।।ना.गा.०५९२.००७।।	तृषेनें पीडिलों पाजीं आधीं पाणी । मग जैसें मनीं तैसें करी
३७४०	।।ना.गा.०५९२.००८।।	नामा म्हणे भिल्ल विसरला घात । राहिला निवांत त्यांच्या बोलें

३७४१	।।ना.गा.०५९३.००१।।	वडील कुरंगी काय बोले त्यासी । सांगते धर्मासी पूर्वीलिया
३७४२	।।ना.गा.०५९३.००२।।	बांधोनि मारितां घडे महादोष। पाजी उदकास सोडोनियां
३७४३	।।ना.गा.०५९३.००३।।	पिऊनियां जळ येऊं तुजपाशीं । मग सावकासी करीं काज
३७४४	।।ना.गा.०५९३.००४।।	आमुचा विश्वास नाहीं तुजवरी । मागसी त्यापरी भाक देऊं
३७४५	।।ना.गा.०५९३.००५।।	पर उपकारी पडतसे देह । लोभ आतां काय वांचुनियां
३७४६	।।ना.गा.०५९३.००६।।	भुकेलिया अन्न तान्हेल्या जीवन । पुण्यासी कारण इतुकेंची
३७४७	।।ना.गा.०५९३.००७।।	पांचजणी तुज वोपीयेले देह । यालागीं संदेह न धरावा
३७४८	।।ना.गा.०५९३.००८।।	नामा म्हणे ऐसा प्रार्थितां किरात। द्रवला मनांत काय बोले
३७४९	।।ना.गा.०५९४.००१।।	होऊनियां तुम्ही वनींचीं वनचरें । बोलतसों सारे धर्माधर्म
३७५०	।।ना.गा.०५९४.००२।।	येणें कांहीं कांहीं द्रव आला मना । तुमची भावना कोण जाणे
३७५१	।।ना.गा.०५९४.००३।।	सोडिल्या पाण्यासी ठकवुनि आम्हांसी । गेलिया तुम्हांसी काय कीजे
३७५२	।।ना.गा.०५९४.००४।।	नामा म्हणे ऐसें बोलोनि किरात । करावया घात शस्त्र काढी
३७५३	।।ना.गा.०५९५.००१।।	देखती तीं दोन्हीं पाडसें त्या काळीं । भिल्लापुढें आलीं लागवेगें
३७५४	।।ना.गा.०५९५.००२।।	सांभाळोनि हात ऐकावी विनंती । धरीं कृपा चित्तीं आमुचिया
३७५५	।।ना.गा.०५९५.००३।।	अतिथालागोनि चिलिया वोपी देहे । तेणेंचि तो लाहे परमधाम
३७५६	।।ना.गा.०५९५.००४।।	मातापितरांसी न करावा घात । मारावें आमुतें आधीं आतां
३७५७	।।ना.गा.०५९५.००५।।	कोंवळें शरीर गोड बहु मांस। लागो सार्थकास तुझे काजीं
३७५८	।।ना.गा.०५९५.००६।।	नामा म्हणे सत्त्व मोठें पांचांचें । होती कैलासींचे अधिकारी
३७५९	।।ना.गा.०५९६.००१।।	हरणी सांगे कांहीं कर्मविपाकासी । ऐशा ऐशा दोषीं ऐसें होती
३७६०	।।ना.गा.०५९६.००२।।	ठकवुनियां आम्हीं तुज जाऊं जरी । अंधतमाभीतरीं वास पावों
३७६१	।।ना.गा.०५९६.००३।।	गुरु स्वामी द्रोही विश्वास घातकी । तयास तो नरकीं वास सदा
३७६२	।।ना.गा.०५९६.००४।।	परद्रोही परनिंदेसी रतला । तो होय कावळा जन्मोजन्मीं
३७६३	।।ना.गा.०५९६.००५।।	पंक्तिभेदकेचीं मरतील पोरें । किंवा पती मरे बालपणीं
३७६४	।।ना.गा.०५९६.००६।।	सदासर्वकाळ दुष्ट कर्मीं रत । शूकरादि होत नीच योनी
३७६५	।।ना.गा.०५९६.००७।।	अतिथ अभ्यागत पूजा नाहीं ज्याला । घूस सर्प बिळामाजीं होती
३७६६	।।ना.गा.०५९६.००८।।	नामा म्हणे केलें तैसें तें भोगावें । सावधान व्हावें जाणत्यांनीं

३७६७	।।ना.गा.०५९७.००१।।	पापिष्टाचें जिणें काय तें जियालें । गळां स्तन जाले शेळियेचे
३७६८	।।ना.गा.०५९७.००२।।	येथेंचि जो खोटा तेथें तो करंटा । व्यर्थ आला पोटा माऊलीच्या
३७६९	।।ना.गा.०५९७.००३।।	तप्त ताम्र भूमि लोळविती नरा । लोटिती अघोरा नरकामाजी
३७७०	।।ना.गा.०५९७.००४।।	लोहोचंचुकाग टोंचिती येवोनी । मारिताती घणीं माथां घाव
३७७१	।।ना.गा.०५९७.००५।।	बांधोनियां गळां टांगिती उफराटें । हाणताती सोटे वरिच्यावरी
३७७२	।।ना.गा.०५९७.००६।।	आसीपत्रावरी वोढिती धरोनी । लोटिती नेउनी कुंभपाकीं
३७७३	।।ना.गा.०५९७.००७।।	जळतिया खांबा भेटविती बळें । खैराच्या इंगळें नाहाविता
३७७४	।।ना.गा.०५९७.००८।।	प्रळय क्रूर सर्प झोंबविती कंठासी । ओढोनि जिव्हेसी खंडें करिती
३७७५	।।ना.गा.०५९७.००९।।	नामा म्हणे ऐसी पापिष्टाची गती । जन्म लक्ष शतीं हेंचि फळ
३७७६	।।ना.गा.०५९८.००१।।	न करूं आम्ही तैसें घेई आतां भाक । अंतरीं नि:शंक जालों सर्व
३७७७	।।ना.गा.०५९८.००२।।	तुम्हां आम्हां साक्षी असे सदाशिव । येथें दुजा भाव धरूं नको
३७७८	।।ना.गा.०५९८.००३।।	पिऊनियां पाणी न येऊं तुजपाशीं । तरी घडे आम्हांसी सर्व पाप
३७७९	।।ना.गा.०५९८.००४।।	जातीचा ब्राह्मण न करी ब्रह्मकर्म । तो जैसा अधम तैसे आम्ही
३७८०	।।ना.गा.०५९८.००५।।	स्वामिद्रोही आणि विश्वासघातकी। तो पडे ज्या नरकीं तेथें पडों
३७८१	।।ना.गा.०५९८.००६।।	नामा म्हणे ऐसी वाहोनियां आण । धरिले चरण पारध्याचे
३७८२	।।ना.गा.०५९९.००१।।	पारधियासी जेव्हां दाटला गहींवर । लोटलें अपार प्रेम तेव्हां
३७८३	।।ना.गा.०५९९.००२।।	जीवदान दिलें जावें तुम्ही आतां । न करावी चिंता कांहीं येथें
३७८४	।।ना.गा.०५९९.००३।।	इंद्राचा मी दूत चुकलों सेवेसी । यालागीं जन्माशीं आलों जाणा
३७८५	।।ना.गा.०५९९.००४।।	तुमचिया बोलें निवालें अंतर । घात इत:पर न करी कांही
३७८६	।।ना.गा.०५९९.००५।।	नामा म्हणे शुभ काळ त्याचा आला । म्हणवोनि जाला पश्चाताप
३७८७	।।ना.गा.०६००.००१।।	सोडोनियां गळां मुक्त केलें त्यासी । पिऊनि उदकासी आलीं पुढती
३७८८	।।ना.गा.०६००.००२।।	क्षुधेलागीं फार न लावी उशीर । घेऊनियां शस्त्र हाणी वेगें
३७८९	।।ना.गा.०६००.००३।।	घर तुझें दूर वाहावेना भार । आम्ही तेथवर येत असों
३७९०	।।ना.गा.०६००.००४।।	सत्यत्व देखोनि म्हणितलें पारधी । तुम्हांसी न वधी जावें आतां
३७९१	।।ना.गा.०६००.००५।।	पाठोपाठीं त्याच्या घरालागीं आलीं । चरणीं घातली मिठी त्यांनीं
३७९२	।।ना.गा.०६००.००६।।	नामा म्हणे सत्त्व आगळें तयाचें । वर्णावया वाचे न ये शेषा

३७९३	।।ना.गा.०६०१.००१।।	हरिश्चंद्र राजा सत्वनिष्ठ मोठा । स्त्रीपुत्र चोहाटामाजी विकी
३७९४	।।ना.गा.०६०१.००२।।	तैसेंचि येथें मृगाअंगीं सत्व। वोपियेला जीव पारध्यासी
३७९५	।।ना.गा.०६०१.००३।।	शिबीराजा अंग कापी नेटपाटें । सत्वासी पालट होऊं नेदी
३७९६	।।ना.गा.०६०१.००४।।	ताम्रध्वजा शिरीं कर्वत घातला । नाहीं पालटला मनोधर्म
३७९७	।।ना.गा.०६०१.००५।।	नामा म्हणे मागें बहुती केली कीर्ति । तया ऐसी रीति येथें दिसे
३७९८	।।ना.गा.०६०२.००१।।	आधींच कृपाळू भोळा महादेव । जाणितला भाव कुरंगीचा
३७९९	।।ना.गा.०६०२.००२।।	कृपा केलीं देवें मांडिला सन्मान । धाडिलें विमान दूता हातीं
३८००	।।ना.गा.०६०२.००३।।	लखलखित टके पताका डोलती । तयामाजीं होती गीत नृत्य
३८०१	।।ना.गा.०६०२.००४।।	नाना सुमनांची शय्या आरुवार । करिती उपचार सिद्धि आठ
३८०२	।।ना.गा.०६०२.००५।।	आले अकस्मात तयाचियेपाशीं । पाहतां सर्वांसी नवल वाटे
३८०३	।।ना.गा.०६०२.००६।।	दिव्य देह जाले पांचांचे ते काळीं । विमानीं बैसलीं लागवेगें
३८०४	।।ना.गा.०६०२.००७।।	पारधी देखोनी तटस्थ राहिला । दूतीं तया केला उपदेश
३८०५	।।ना.गा.०६०२.००८।।	शिवरात्रीं आजी जागरण उपवास । केला तेणें दोष सर्व गेला
३८०६	।।ना.गा.०६०२.००९।।	करोनी पारणें होई शिवभक्त । आशापाशीं चित्त गोवुं नको
३८०७	।।ना.गा.०६०२.०१०।।	अखंड कीर्तन शिवनामाचें करी । तेणें मोक्षपुरी पावशील
३८०८	।।ना.गा.०६०२.०११।।	पुढिल्या शिवरात्रीं नेऊं कैलासासी । सांगोनियां त्यासी गेले वेगीं
३८०९	।।ना.गा.०६०२.०१२।।	नामा म्हणे मोक्ष जाला त्या पांचाशीं । वस्ती चंद्रापाशी केली त्यांनीं
३८१०	।।ना.गा.०६०३.००१।।	तेणें उपदेशें पारध्यासी ज्ञान । करी तो कीर्तन नाम घोषें
३८११	।।ना.गा.०६०३.००२।।	संचिताचा नाश क्रियमाण बुडविलें । त्या सहज जोडलें मोक्ष सुख
३८१२	।।ना.गा.०६०३.००३।।	दुसऱ्या शिवरात्रीं पुजीलें शंकरा । करोनियां बरा भाव शुद्ध
३८१३	।।ना.गा.०६०३.००४।।	विमानीं वाहोनि स्वस्थानीं स्थापिला । येथुनि संपला कथाभाग
३८१४	।।ना.गा.०६०३.००५।।	नामा म्हणे शिवविष्णु एकरूप । जाणोनियां जप करा त्यांचा
३८१५	।।ना.गा.०६०४.००१।।	शिवरात्री कथा धन्य जे ऐकती । इच्छिलें पावती सर्व कांहीं
३८१६	।।ना.गा.०६०४.००२।।	पातकांचा नाश पुण्य वाढे फार । शेखीं विश्वंभर कृपा करी
३८१७	।।ना.गा.०६०४.००३।।	भोग जाय त्याचा करिती सन्मान । काळ करी चरण सेवा त्यांची
३८१८	।।ना.गा.०६०४.००४।।	नामा म्हणे शिव अक्षरें ही दोन्हीं । जपावीं सज्जनीं वारंवार

३८१९	।।ना.गा.०६०५.००१।।	नामाचा महिमा कोण जाणे सीमा । चतुर्मुख ब्रह्मा नेणें कांहीं
३८२०	।।ना.गा.०६०५.००२।।	संसारा आलिया हेंचि आहे जोडी । अखंड घ्यावी गोडी हरिनामें
३८२१	।।ना.गा.०६०५.००३।।	सहस्रमुखें शेष वाखाणितां कीर्ती । नाहीं तया तृप्ति आजवरी
३८२२	।।ना.गा.०६०५.००४।।	पशु पक्षी तृण कीटक अपार । नामें गेलें पार उतरोनि
३८२३	।।ना.गा.०६०५.००५।।	कापुराचे राशी पडे अग्निकण । तैसें नाम जाण पातकासी
३८२४	।।ना.गा.०६०५.००६।।	नामाग्नीनें दोष जळती येकसरा । कैवल्य ये घरा बसले ठायीं
३८२५	।।ना.गा.०६०५.००७।।	नामा म्हणे धन्य नामाचा प्रताप । ध्याती एकरूप देवभक्त
३८२६	।।ना.गा.०६०६.००१।।	लिंगपुराणीं हा बोलिला इतिहास । तोचि म्यां तुम्हांस निवेदिला
३८२७	।।ना.गा.०६०६.००२।।	अनेक पुराणीं अनेक प्रकार । तारावया नरनारी लोक
३८२८	।।ना.गा.०६०६.००३।।	मुख्य हेचि कथा शिवरात्रीची जाणा । कैलासींचा राणा तोष पावे
३८२९	।।ना.गा.०६०६.००४।।	नामा म्हणे मन करोनि निश्चळ। करा गदारोळ नामघोष
३८३०	।।ना.गा.०६०७.००१।।	अहो सदाशिवा । देसी भुक्ती मुक्ती भावा
३८३१	।।ना.गा.०६०७.००२।।	करावी ते तुम्ही सेवा । ऐसें धरावें या जीवा
३८३२	।।ना.गा.०६०७.००३।।	नामा म्हणे महादेवा । चुकवी चौऱ्यांशींचा फेरा
३८३३	।।ना.गा.०६०८.००१।।	बरवें गा शंकरा नाम तुझें । हरहर बरवें गा देवा नाम तुझें
३८३४	।।ना.गा.०६०८.००२।।	गाईल्या ऐकिल्या होय वैष्णवा गती । रामनामें तरले नेणों किती
३८३५	।।ना.गा.०६०८.००३।।	ऐसी सदा आनंद राऊळीं । विष्णुदास नामा पंढरपुरीं
३८३६	।।ना.गा.०६०९.००१।।	साठीसहस्र विघ्नांवरी । शिवनाम पंचाक्षरी
३८३७	।।ना.गा.०६०९.००२।।	तो पर्वत राजा कैं देखेन । जेथें असे मल्लिकार्जुन
३८३८	।।ना.गा.०६०९.००३।।	भक्तिभावाचें अंजन । साधावया निधान
३८३९	।।ना.गा.०६०९.००४।।	मन मारूनि देईन बळी । साधावया चंद्रमौळी
३८४०	।।ना.गा.०६०९.००५।।	भ्रांति पाटा फिटला । शिवमार्ग देखिला
३८४१	।।ना.गा.०६०९.००६।।	विष्णुदास नामा पायाळ भला । तेणें मलयानिळ देखिला
३८४२	।।ना.गा.०६१०.००१।।	सदा सोमवारीं । विभूति लावूनि शिरीं । तुमच्या मंदिरीं । आलाप करीं
३८४३	।।ना.गा.०६१०.००२।।	शंकर त्रिपुरारी। हरि नाम उच्चारी । म्हणती षडाक्षरी । पावें मज
३८४४	।।ना.गा.०६१०.००३।।	ॐ नमः शिवाय । हरहर जयजय । नाहीं भवभय । तुझेनि नामें

३८४५	||ना.गा.०६१०.००४||	करिती शिवरात्री । वाहाती बेलपत्री । प्रगट होऊनि गाती । भक्तिभावें
३८४६	||ना.गा.०६१०.००५||	बोलती सत्कीर्ति । जिंतिले पवित्रीं । हरहर नाम मंत्रीं । तुज पूजिती
३८४७	||ना.गा.०६१०.००६||	रुद्राक्षाच्या माळा । घालूनियां गळां । तो तुम्हां जवळां। सर्व मान्य
३८४८	||ना.गा.०६१०.००७||	शिवशंभु भोळा । बहुतां पुण्यें जोडला । पावे जाश्वनीळा । म्हणे नामा
३८४९	||ना.गा.०६११.००१||	तुळसी पुष्पाहूनि आगळी । वृंदावनीं ती मिरवली । देवें मस्तकीं वंदिली । वंद्य जाली तीन्ही लोकां
३८५०	||ना.गा.०६११.००२||	तुळसी वंदावी माउली । अरे ही संतांची साउली । तुळसीपासीं वनमाळी । सदा रहात असे
३८५१	||ना.गा.०६११.००३||	तुळसीदळ भूमिवरी पडिलें । तें जरी मस्तकीं वंदिलें । कोटी तीर्थस्थान केलें । एवढें फळ नामा म्हणे
३८५२	||ना.गा.०६१२.००१||	तुळसीविण ज्याचें घर । तें तंव जाणावें अघोर । तेथें वसति यम किंकर । आज्ञा आहे म्हणोनी
३८५३	||ना.गा.०६१२.००२||	तुळसीवृंदावन ज्याचे घरीं । त्यासी प्रसन्न श्रीहरी । तें वर्जिलें यम किंकरीं । आज्ञा आहे म्हणोनी
३८५४	||ना.गा.०६१२.००३||	तुळसीचिया वृंदावना । जे करिती प्रदक्षिणा । अंतकाळीं होती स्मरणा । जन्म मरण नाही नामा म्हणे
३८५५	||ना.गा.०६१३.००१||	तुळसी वृंदावन दर्शन । त्यासी वैकुंठीं गमन । त्यासी लटिकें म्हणे कोण । त्यासी आण केशवाची
३८५६	||ना.गा.०६१३.००२||	तुळसी माळा घाली गळां । त्यासी भेटेल सांवळा । चतुर्भुजसहित कमळा । केसिराजे प्रत्यक्ष
३८५७	||ना.गा.०६१३.००३||	तुळसी रोपा घाली उदक । त्याचे हारति महादोष । ब्रह्मादिकां नकळे नि:शेष । जन्ममरण त्या नाहीं
३८५८	||ना.गा.०६१३.००४||	तुळसीची देवा बहु प्रीती । आणिक पुष्पें न लगती । नामा म्हणे जी श्रीपति । हेचि भक्ति मज द्यावी
३८५९	||ना.गा.०६१४.००१||	उभें वृंदावन जयाचिये द्वारीं । होय तो श्रीहरि प्रसन्न त्या
३८६०	||ना.गा.०६१४.००२||	तुळसीचें रोप लावील जो आणोनि । तया चक्रपाणि न विसंबे
३८६१	||ना.गा.०६१४.००३||	तुळसीचें काष्ट जपमाळ करी । तयासि श्रीहरि प्रसन्न तो
३८६२	||ना.गा.०६१४.००४||	तुळसीची कीर्ति अगाध पैं आहे । पंढरीसी पाहे नामा म्हणे
३८६३	||ना.गा.०६१५.००१||	तुळसीची सेवा घडे । रंगमाळा घाला सडे
३८६४	||ना.गा.०६१५.००२||	दूत न येती तयाकडे । हरिनामाची घरटीं पडे
३८६५	||ना.गा.०६१५.००३||	नामा म्हणे हरिएवढें । ब्रह्म वृंदावनीं सांपडे
३८६६	||ना.गा.०६१६.००१||	फुकाचिया तुळसी वहा रे । धृवासारखें पद मागा रे
३८६७	||ना.गा.०६१६.००२||	एका विठ्ठला शरण जा रे । जन्म वायां कां दवडा रे
३८६८	||ना.गा.०६१६.००३||	नामा म्हणे हा पहा रे । विठ्ठल भक्तांचा ऋणिया रे
३८६९	||ना.गा.०६१७.००१||	तुळसीचें हत्यार । वृंदावन द्रुम थोर
३८७०	||ना.गा.०६१७.००२||	तुळसीच्या दळीं । यम जिंकिला महाबळी

३८७१	।।ना.गा.०६१७.००३।।	नामा म्हणे बळि रे बळी । विठ्ठल आमचा भुजबळी
३८७२	।।ना.गा.०६१८.००१।।	उठोनियां प्रात:काळीं । तुळस वंदावी माऊली । तुळस संतांची साउली । मुगुटीं वाहिली विष्णूनें
३८७३	।।ना.गा.०६१८.००२।।	तुळस असे ज्याचे द्वारीं । लक्ष्मी वसे त्याचे घरीं । येवोनि श्रीहरि । क्रीडा करी स्वानंदें
३८७४	।।ना.गा.०६१८.००३।।	तुळसीसी मंजुळा येतां । पळ सुटे यमदूतां । अद्वैत तुळस कृष्ण स्मरतां । नासे दुरित चित्तांचे
३८७५	।।ना.गा.०६१८.००४।।	जे जे तुळसी घालिती उदक । ते नर पावती ब्रह्मसुख । नामा म्हणे पंढरिनायक । तुळसीजवळी उभा असे
३८७६	।।ना.गा.०६१९.००१।।	वाचे म्हणतां गंगा गंगा । सकळ पापें जाती भंगा
३८७७	।।ना.गा.०६१९.००२।।	दृष्टी पडतां ब्रह्मगिरी । त्यासि नाहीं यमपुरी
३८७८	।।ना.गा.०६१९.००३।।	कुशावर्तीं करितां स्नान । त्याचें वैकुंठीं राहणें
३८७९	।।ना.गा.०६१९.००४।।	नामा म्हणे प्रदक्षिणा । त्यासि जन्म नाहीं पुन्हां
३८८०	।।ना.गा.०६२०.००१।।	येई गे केशवे मज तुझी सवे । तुजविण नुगवे दिनू माये
३८८१	।।ना.गा.०६२०.००२।।	तूं माय जननी कांसवी कौसाळ। दिन बहुसाळ मज पावे
३८८२	।।ना.गा.०६२०.००३।।	न मागे केवळ विषयाचें टवाळ । तूं माझी कृपाळ विठ्ठल माय
३८८३	।।ना.गा.०६२०.००४।।	वोळली गगनीं केशव कामधेनु । लवतां लोचनु स्फुरे बाह्या
३८८४	।।ना.गा.०६२०.००५।।	वाजवील वाद्य गोपाळांची मांदी । आल्हाद गोविंदीं नित्य माझा
३८८५	।।ना.गा.०६२०.००६।।	नामा म्हणे केशव येई कामधेनु । तेणें माझी तनु तृप्त सदा
३८८६	।।ना.गा.०६२१.००१।।	येई गे नारायणी अमृत संजीवनी । चिंतितां निर्वाणीं पावें वेगीं
३८८७	।।ना.गा.०६२१.००२।।	तूं माझें जीवन नाम नारायण । नित्य अनुष्ठान तुझ्या नामें
३८८८	।।ना.गा.०६२१.००३।।	बाह्य अभ्यंतरीं तूंचि सर्वांठायीं । तुजविण सृष्टि शून्य दिसे
३८८९	।।ना.गा.०६२१.००४।।	चाल लवलाह्या कृपाळू तूं माये । मज हें न साहे मोह जाळ
३८९०	।।ना.गा.०६२१.००५।।	तुटेल बिरडें सुटतील गांठी । जंव तूं जगजेठी येशील माये
३८९१	।।ना.गा.०६२१.००६।।	नामा म्हणे धन्य तुझें नाम साचे। उच्चारितां वाचे निवती अंगें
३८९२	।।ना.गा.०६२२.००१।।	येई गे माधवी पाजी प्रेमपान्हा । विषयाचा आंदणा नको करूं
३८९३	।।ना.गा.०६२२.००२।।	धांव तूं मधुकरे माधवे उदारे । येई तूं सोइरे जननिये
३८९४	।।ना.गा.०६२२.००३।।	जंव तूं न येसि तंव कोणा पावे मज । माझें जीवीचें गुज कोण पुसे
३८९५	।।ना.गा.०६२२.००४।।	कष्टलो वेरझारी शीण दूर करी । येई तूं झडकरी माधवे वो
३८९६	।।ना.गा.०६२२.००५।।	अनंता वो नामें पुराणें पढती। पावसी आकांतीं विठ्ठल वो

३८९७	।।ना.गा.०६२२.००६।।	नामा म्हणे लाहो करावा माधवे। माझेनि वो जीवें लाहे चाड
३८९८	।।ना.गा.०६२३.००१।।	येई तूं गोविंदे नामामृतधारी । नित्य हें उच्चारि गोविंदातें
३८९९	।।ना.गा.०६२३.००२।।	गोविंद नित्य हाचि छंद । पावे तूं हृद्गद आदिरूपें
३९००	।।ना.गा.०६२३.००३।।	गोविंद हो ध्यानें निवती अष्टांगें । गोविंद गे वेगें वेष धरूं
३९०१	।।ना.गा.०६२३.००४।।	गोविंद गोपाळ मुकुंद केशरी । येई तूं लवकरी सांवळीये
३९०२	।।ना.गा.०६२३.००५।।	गोविंद गे नाम जनीं वनीं वसे। प्रत्यक्ष ते दिसे पंढरीसी
३९०३	।।ना.गा.०६२३.००६।।	वेणूनादें काला गोविंदें पैं केला । धांवतचि आला पेंद्यापाशीं
३९०४	।।ना.गा.०६२३.००७।।	ती हीच वो माय उभी बाळमूर्ति । नाम जे जपती पांडुरंग
३९०५	।।ना.गा.०६२३.००८।।	नामा म्हणे पांग गोविंद हा दवडी । वेगें लवडसवडी करीत माये
३९०६	।।ना.गा.०६२४.००१।।	विष्णु विष्णु हरि पावे लवकरी । ब्रीद चराचरी सांगे मुनी
३९०७	।।ना.गा.०६२४.००२।।	वैकुंठवासिनी कृष्णविष्णुदेव । नाम तें गौरव आम्हांलागीं
३९०८	।।ना.गा.०६२४.००३।।	धन्य हाचि दिनु विष्णुमाय पावे । गगनीं उगवे सूर्य जैसा
३९०९	।।ना.गा.०६२४.००४।।	आदि ब्रह्मा हरी विष्णु कृष्णगंगा । भागिरथी पैं गा पदीं पावे
३९१०	।।ना.गा.०६२४.००५।।	गया ते प्रयाग काशी ते सर्वांग । विश्वेश्वर लिंग चराचर
३९११	।।ना.गा.०६२४.००६।।	विष्णुगंगाधर विष्णुनाम पाठ। उच्चारितां वाट वैकुंठींची
३९१२	।।ना.गा.०६२४.००७।।	नामा म्हणे विष्णु भागिरथींमाजीं । पंढरीये माझी विठ्ठल माये
३९१३	।।ना.गा.०६२५.००१।।	येई तूं मधुकरे मदनसुंदरे । मज गे न धरे प्रेम पोटीं
३९१४	।।ना.गा.०६२५.००२।।	तूं माझी जननी मधुसूदन गाय । कामधेनु होय कांसवीची
३९१५	।।ना.गा.०६२५.००३।।	आनंद निजधने जुनाट मधुसूदने । शुकस्तनपान पाजीं पान्हा
३९१६	।।ना.गा.०६२५.००४।।	केशव कांसवी पद रानगाय । आत्माराम होय नि:संदेह
३९१७	।।ना.गा.०६२५.००५।।	विठ्ठलमुकुंदें स्वरूपें गोमटीं । आकांतली सृष्टी मधुसूदनें
३९१८	।।ना.गा.०६२५.००६।।	शंखचक्रांकित आयुधें मंडित । मुकुट शोभत तुझा शिरीं
३९१९	।।ना.गा.०६२५.००७।।	भक्तवरदायिनी मधुसूदन गंगा । व्हावें तूं वो वेगा कामधेनु
३९२०	।।ना.गा.०६२५.००८।।	नामा म्हणे माय मधुसूदन गाय । ते संजीवनी होय आम्हालागीं
३९२१	।।ना.गा.०६२६.००१।।	येई वो त्रिविक्रमे पूर्ण पान्हा देईं । कामधेनु होई विठ्ठलराजे
३९२२	।।ना.गा.०६२६.००२।।	त्रिविक्रमधरे येई तूं सांवळे । मुकुंद गोपाळे केशवे वेगीं

३९२३	।।ना.गा.०६२६.००३।।	तूं माझें निजधन त्रिविक्रमधरे । गंगानाममात्रें भंगी पाप
३९२४	।।ना.गा.०६२६.००४।।	त्रिपदागायत्री त्रिविक्रममुखें । जनाची वो दु:खें हरती नामें
३९२५	।।ना.गा.०६२६.००५।।	त्रिजटा त्रिफणी भागीरथी वेणी । प्रयाग वो धूनी पाप जाळी
३९२६	।।ना.गा.०६२६.००६।।	त्रिस्थळीं त्रिमाये त्रिविक्रम होय । विश्वेश्वर दोहे तारक ब्रह्म
३९२७	।।ना.गा.०६२६.००७।।	काशीकांति माये अयोध्या द्वारका । मथुरा अवंतिका तूंचि माये
३९२८	।।ना.गा.०६२६.००८।।	नामा म्हणे माझी त्रिविक्रम गाय । भक्तिसी पान्हाय पंढरपुरीं
३९२९	।।ना.गा.०६२७.००१।।	येई वो वामने खुजीयखुजटे । पंढरीचे पेठे उभी राहे
३९३०	।।ना.गा.०६२७.००२।।	येई वो डोळसे सांवळें तेजसे । वामन बहु वसे ब्रह्मचारी
३९३१	।।ना.गा.०६२७.००३।।	अनंत विद्गदे अनंत अपारे । कैवल्य वोसरे पदकमळें
३९३२	।।ना.गा.०६२७.००४।।	तुझें नाम धन्य वामन साजिरें । रूप हें गोजिरें बळिच्या द्वारीं
३९३३	।।ना.गा.०६२७.००५।।	तुझ्या चरणीं तीर्थे उद्धरती सर्व । येई तूं सत्वर वामनाई
३९३४	।।ना.गा.०६२७.००६।।	नामा म्हणे पावे वामन ब्रह्मांडें । स्वरूप वितंडे ब्रह्मचारें
३९३५	।।ना.गा.०६२८.००१।।	येई वो श्रीधरे सर्व रूपसारे । कैवल्य उत्तरे अभिनव
३९३६	।।ना.गा.०६२८.००२।।	श्रीधर श्रीरंगे नाम पांडुरंगे । प्रगट वो सांगे पूर्णघन
३९३७	।।ना.गा.०६२८.००३।।	श्रीकरे श्रीधरे शोभे ते साचारें । चक्रांकित करें शंख तुझा
३९३८	।।ना.गा.०६२८.००४।।	सुंदर श्यामळ नाम हें अढळ। मुखीं हो वेल्हाळ हस्त तुझे
३९३९	।।ना.गा.०६२८.००५।।	प्रकाशें हा पूर्ण श्रीधरें पैं जाण । सांगितली खूण खेचरानें
३९४०	।।ना.गा.०६२८.००६।।	नामा म्हणे माता श्रीधर उच्चारू । तरेन साचारू तिन्हीं लोकीं
३९४१	।।ना.गा.०६२९.००१।।	येई हृषिकेशी दिव्य रूप दिसे । मन हें उल्हासे भेटीलागीं
३९४२	।।ना.गा.०६२९.००२।।	त्राहे हृषिकेशी नामें तरले संभ्रमें। नित्य रामनामें भवसिंधु
३९४३	।।ना.गा.०६२९.००३।।	आराधनें धन ऋषिसी संपूर्ण । नाम कोटी यज्ञ जाले तया
३९४४	।।ना.गा.०६२९.००४।।	पावन हृषिकेशी हेंचि ध्यान मन । नाम सनातन हृषिकेशी
३९४५	।।ना.गा.०६२९.००५।।	विश्वा करी कळा विश्व जनलीळां । त्राहे वेळोवेळां हृषिकेशी
३९४६	।।ना.गा.०६२९.००६।।	नामा म्हणे माय येई हृषिकेश । जालों कासावीस तुजवीण
३९४७	।।ना.गा.०६३०.००१।।	येई वो पद्मनामें पंकजलोचनें । विश्व पूर्णधनें देखे तुज
३९४८	।।ना.गा.०६३०.००२।।	त्राहे पद्मनाभा वाचा सिद्ध पावे । मज हें नुगवे मायाजाळ

३९४९	।।ना.गा.०६३०.००३।।	पद्मांकित रेखा पद्म हें सुरेख । पावे वो निमिष एक माये
३९५०	।।ना.गा.०६३०.००४।।	विचरे हे पृथ्वी नाम पद्मनाभ । स्वयंभावो बिंब विठ्ठलेसी
३९५१	।।ना.गा.०६३०.००५।।	रिकामा मी नसे दिननिशीं निमिष्य । पद्मनाभ साक्ष हृदयीं भोगी
३९५२	।।ना.गा.०६३०.००६।।	नामा म्हणे पद्मनाभ हेंचि हो नाम । जपतुसें प्रेम देई मज
३९५३	।।ना.गा.०६३१.००१।।	येई वो दामोदरे पवित्र हे करे । मना हो नावरे प्रेमलोट
३९५४	।।ना.गा.०६३१.००२।।	पाहे कृपादृष्टी साहे जगजेठी । पूर्ण पान्हा घोटी ऐसें करी
३९५५	।।ना.गा.०६३१.००३।।	दामोदरें नाम मदन परिकरें । हाचि वो विचार मनें केला
३९५६	।।ना.गा.०६३१.००४।।	येई तूं निर्धारें पावें तूं झडकरी । येई वो लवकरी दामोदरे
३९५७	।।ना.गा.०६३१.००५।।	दामोदर माता पाहे वो समता । पावे वो निवांता पावें वेगीं
३९५८	।।ना.गा.०६३१.००६।।	नामा म्हणे लोटूं प्रेमामृत निवटूं । नामेंचि वैकुंठे दामोदरे
३९५९	।।ना.गा.०६३२.००१।।	येई तूं कृपाळे संकर्षण माते । पवित्र पूर्णभरिते गुणनिधि
३९६०	।।ना.गा.०६३२.००२।।	त्राहे त्राहे वेगीं पावे वो झडकरी। ब्रीद चराचरीं वर्णिताती
३९६१	।।ना.गा.०६३२.००३।।	संकर्षण गंगा सर्वांगीं तू असे । जनीं वनीं दिसे रूप तुझें
३९६२	।।ना.गा.०६३२.००४।।	कटावरी कर सांवळी सुंदर । मनाचा विचार इच्या चरणीं
३९६३	।।ना.गा.०६३२.००५।।	निर्धारू सांगते माये वो घेतां । संकर्षण माता पाव वेगीं
३९६४	।।ना.गा.०६३२.००६।।	विष्णु संकर्षण नाम हें गहन । पतितपावन चरणरजे
३९६५	।।ना.गा.०६३२.००७।।	नामा म्हणे माय संकर्षण गाय । हरिदासा पाल्हावे पंढरीसी
३९६६	।।ना.गा.०६३३.००१।।	येई तूं शारंगे वासुदेवे त्वरें । वासुदेवे सारे गोपाळ वो
३९६७	।।ना.गा.०६३३.००२।।	त्राहे वासुदेवा पावे झडकरी । त्वरें वेगूं करी आर्त भेटी
३९६८	।।ना.गा.०६३३.००३।।	वासुदेव नामें साधन सुगम । योगियां विश्राम स्थान जालें
३९६९	।।ना.गा.०६३३.००४।।	द्वादश अक्षर जपिन्नला गुरु । तयासी साचार अढळपद
३९७०	।।ना.गा.०६३३.००५।।	बळी भीष्मदेवी वासुदेवी भाव । रोहिणीची माव ऐसें जालें
३९७१	।।ना.गा.०६३३.००६।।	नामा म्हणे भक्त वासुदेवीं रत । सायुज्य पावे तो एक्या नामें
३९७२	।।ना.गा.०६३४.००१।।	येई तूं प्रद्युम्ने ध्यान तूं धरणें । माझिये कल्पनें निर्धारुसा
३९७३	।।ना.गा.०६३४.००२।।	त्राहे झडकरी पावे वो लवकरी। प्रद्युम्ने फुत्कारी वेळोवेळां
३९७४	।।ना.गा.०६३४.००३।।	सांवळे सुंदरे वेणु वाहे करीं । ध्यान हे सुंदरी यमुना तटीं

३९७५	।।ना.गा.०६३४.००४।।	प्रवाह प्रद्युम्ने नामघोष दाट । जिंकिले प्रद्युम्ने जुनाट पापराशी
३९७६	।।ना.गा.०६३४.००५।।	नामा म्हणे नाम धन्य हें प्रद्युम्न । होईल संपन्न नाम घेतां
३९७७	।।ना.गा.०६३५.००१।।	येई वो अनिरुद्धे सांवळे प्रबुद्धे । विराटे गोविंदे पाव वेगीं
३९७८	।।ना.गा.०६३५.००२।।	त्राहे माउलीये मना तुझी सोय । चुकती अपाय नाम घेतां
३९७९	।।ना.गा.०६३५.००३।।	अनिरुद्ध पाठें जाईन वैकुंठे । पुंडलिक पेठे उभा असे
३९८०	।।ना.गा.०६३५.००४।।	कटावरी कर सांवळी सुंदर । मनाचा विचार इच्या चरणीं
३९८१	।।ना.गा.०६३५.००५।।	अनिरुद्धसार अनु नाहीं आधार । सर्वही विचार अनिरुद्धे
३९८२	।।ना.गा.०६३५.००६।।	नामा म्हणे येई अनिरुद्धे माये । आणिक उपाय नलगे मज
३९८३	।।ना.गा.०६३६.००१।।	येई तू पुरुषोत्तम संजीवनी रामें । योगियां विश्रामे पुरुषश्रेष्ठा
३९८४	।।ना.गा.०६३६.००२।।	त्राहे मनोधर्म नाम पुरुषोत्तम। साधन आगम ऐसी माये
३९८५	।।ना.गा.०६३६.००३।।	येई वो सांभाळी लवलाहे मनें । जुनाट हो जुनें पुरुषोत्तमें
३९८६	।।ना.गा.०६३६.००४।।	तुझें नाम धन्य पुरुष हें सौजन्य । द्वैत हें अभिन्न अद्वैत हे
३९८७	।।ना.गा.०६३६.००५।।	एकाक्षरी नाम पुरुष शुचिसम । नाम आत्माराम पुरुषोत्तम
३९८८	।।ना.गा.०६३६.००६।।	नामा म्हणे पावे पुरुषोत्तम माते । सर्वत्र अद्वैत एकरूप
३९८९	।।ना.गा.०६३७.००१।।	येई वो अधोक्षजे वैकुंठ विराजे । नाम गे सहजे अमृतरासी
३९९०	।।ना.गा.०६३७.००२।।	अधोक्षज नामें घालीन गोंधळ। रिता एक पळ जाऊं नेदी
३९९१	।।ना.गा.०६३७.००३।।	अधर हे रंगीं अधोर्ध्व सेवीन । सर्वत्र पाहीन अधोक्षज
३९९२	।।ना.गा.०६३७.००४।।	अरिष्ट हें निरसी माये अधोक्षजे । ऐसी या पाविजे संकटीं त्वां
३९९३	।।ना.गा.०६३७.००५।।	अरि हे मर्दन अधोक्षजे जाणें । स्वीकारावें पूर्ण प्रगटतां
३९९४	।।ना.गा.०६३७.००६।।	नामा म्हणे धांवे अधोक्षज पावे । दिशाद्रुम भावें तुज मग
३९९५	।।ना.गा.०६३८.००१।।	येई वो केसरी नरसिंह उच्चारी । पवित्र साचारी तिन्हीं लोकीं
३९९६	।।ना.गा.०६३८.००२।।	नरसिंह वामन प्रल्हादरक्षण। आमुचें तें धन नाम तुझें
३९९७	।।ना.गा.०६३८.००३।।	शंखचक्र करीं पावे वो लवकरी । येई तूं केसरी लवलाहे
३९९८	।।ना.गा.०६३८.००४।।	नरसिंह हें नाम नरसिंह हें प्रेम । उत्तम उत्तम तिन्हीं लोकीं
३९९९	।।ना.गा.०६३८.००५।।	त्रिपुररक्षक दानवमर्दन । विकट वदन पंचाक्षरी
४०००	।।ना.गा.०६३८.००६।।	नामा म्हणे हरि नाम नरकेसरी । नरसिंह उच्चारी तरती जीव

४००१	।।ना.गा.०६३९.००१।।	येई वो अच्युते नामामृते रसे । सुंदर डोळसे जान्हवीये
४००२	।।ना.गा.०६३९.००२।।	अमृताची खोटी अच्युत नाम पेठीं। पावे जगजेठी अच्युत सार
४००३	।।ना.गा.०६३९.००३।।	अच्युत अच्युत नामें हेंचि सत्य । हे पियूष त्वरित उच्चारितां
४००४	।।ना.गा.०६३९.००४।।	वैकुंठींची मूर्ति अच्युतनाम पाठें । प्रत्यक्ष वो भेटे विटेवरी
४००५	।।ना.गा.०६३९.००५।।	पुंडलिक दृष्टी नयनाची भेटी । निवारितां दृष्टी न्याहाळितां
४००६	।।ना.गा.०६३९.००६।।	नामा म्हणे अच्युत नाम हेंचि आम्हां । दिननिशीं राम जपतसें
४००७	।।ना.गा.०६४०.००१।।	येई जनार्दन जनवनसंपन्ने । माझे वो चिद्घने पांडुरंगे
४००८	।।ना.गा.०६४०.००२।।	त्राहे जनार्दने पूर्णानंदघने । येई वो संपन्ने विश्वंभरे
४००९	।।ना.गा.०६४०.००३।।	नाम हें दुर्लभ जनक जननी । राम जनार्दनीं विनटली
४०१०	।।ना.गा.०६४०.००४।।	सांवळी डोळस रवि एकासनीं। तेज प्रकाशनी हिरियाची
४०११	।।ना.गा.०६४०.००५।।	जननी ते जननी निकट ते जीवनीं । जग प्रगटिणी हरीयाची
४०१२	।।ना.गा.०६४०.००६।।	नामा म्हणे जन नाम जनार्दन । सनकादिक जाण सेवताती
४०१३	।।ना.गा.०६४१.००१।।	येई तूं उपेंद्रे विठ्ठल महिंद्रे । देवामाजी भद्रे सिंहासनीं
४०१४	।।ना.गा.०६४१.००२।।	त्राहे वो जननी शिणलों गे माये । तुजविण आहे कवण मज
४०१५	।।ना.गा.०६४१.००३।।	तूं माझें कारुण्य प्रत्यक्ष सौजन्य । विचारितां प्रवीण प्रबुद्ध हो
४०१६	।।ना.गा.०६४१.००४।।	पावे वो तूं वेगीं उपेंद्रे गे माते । पुंडलिक सांगातें पंढरीसी
४०१७	।।ना.गा.०६४१.००५।।	दीपकु लाविला दिन उगवला । दीपकें फळला पांडुरंग
४०१८	।।ना.गा.०६४१.००६।।	नामा म्हणे नाम उपेंद्र ऐसें शम । पावेन विश्राम नाम घेतां
४०१९	।।ना.गा.०६४२.००१।।	येई तूं हरिरूपें विठ्ठल स्वरूपे । कळिकाळ कांपे नाम घेतां
४०२०	।।ना.गा.०६४२.००२।।	नामें हरि हरि त्राहे वो झडकरी। शिणलों मी भारी जननीये
४०२१	।।ना.गा.०६४२.००३।।	हरिनामधन सर्व जनार्दन । हरी हें आठवण जिव्हे सदा
४०२२	।।ना.गा.०६४२.००४।।	हरि हरि म्हणतां हरिरूपा संतां । नाम हें अनंताक्षर विलसे
४०२३	।।ना.गा.०६४२.००५।।	येई तूं हरि गंगे सांवळे सुरंगे । हरि हरि संगें रतलोंसे
४०२४	।।ना.गा.०६४२.००६।।	नामा म्हणे हरी पांडुरंग माझा । चरण हो भोजा राज्यधरू
४०२५	।।ना.गा.०६४३.००१।।	येई वो तूं कृष्णे हरी माझिये तृष्णे । दिननिशीं प्रष्णे वाट पाहें
४०२६	।।ना.गा.०६४३.००२।।	त्राहे कृष्णगंगे सांवळे सारंगे। नामस्मरण वेगें पुरे आम्हां

४०२७	।।ना.गा.०६४३.००३।।	राम-कृष्ण टाहो नामें लवलाहो । फिटला संदेहो संसाराचा
४०२८	।।ना.गा.०६४३.००४।।	उद्धव अक्रूर यादव सादर । कृष्णातें अपार तयालागीं
४०२९	।।ना.गा.०६४३.००५।।	अर्जुन द्रौपदी स्मरण गोविंदा । पावावें निजपदीं नामा म्हणे
४०३०	।।ना.गा.०६४४.००१।।	नामाचा महिमा नेणेची पैं ब्रह्मा । म्हणोनियां कर्मा अनुसरला
४०३१	।।ना.गा.०६४४.००२।।	नाम हेंचि कर्म नाम हेंचि धर्म । केशव हेंचि वर्म सांगितलें
४०३२	।।ना.गा.०६४४.००३।।	नाम शुद्ध स्नान नाम शुद्ध संध्या । नामाविणें वेद आणिक नाहीं
४०३३	।।ना.गा.०६४४.००४।।	करितां आचमन केशव नारायण । करिती उच्चारण आधीं हेंचि
४०३४	।।ना.गा.०६४४.००५।।	लग्नाचिये काळीं म्हणती सावधान । लक्ष्मीनारायण चिंतन करा
४०३५	।।ना.गा.०६४४.००६।।	देहाचिये अंतीं प्रायश्चित देती । शेवटीं वदविती रामनाम
४०३६	।।ना.गा.०६४४.००७।।	ऐसिया नामापरतें नाहीं सार । गिरिजेसी शंकर उपदेशी
४०३७	।।ना.गा.०६४४.००८।।	करिती पितृश्राद्ध कर्म आचरती । शेवटीं म्हणती एको विष्णु
४०३८	।।ना.गा.०६४४.००९।।	नामें होय गति नामें होय मुक्ति । नामयाचे चित्तीं रामनाम
४०३९	।।ना.गा.०६४५.००१।।	म्हणतां वाचे नाम वंदी तया यम । काळादिकांसम तुज एका
४०४०	।।ना.गा.०६४५.००२।।	ऋद्धि सिद्धि दासी अंगण झाडिती । उच्छिष्टें काढिती मुक्ति चारी
४०४१	।।ना.गा.०६४५.००३।।	चारी वेद भाट होऊनि गर्जती । सनकादिक गाती कीर्ति तुझी
४०४२	।।ना.गा.०६४५.००४।।	सुरवरांचे भार अंगणीं लोळती । चरणरज क्षितीं शिव वंदी
४०४३	।।ना.गा.०६४५.००५।।	नामा म्हणे देव ऐसा हो कृपाळू । करी तो सांभाळू अनाथांचा
४०४४	।।ना.गा.०६४६.००१।।	नामें सदा शुद्धि प्राणिया होतसे । नामापाशीं असे भुक्तिमुक्ति
४०४५	।।ना.गा.०६४६.००२।।	नामा ऐसें सोपें नाहीं त्रिभुवनीं । नाम संजीवनी साधकांसी
४०४६	।।ना.गा.०६४६.००३।।	नामें भक्ति जोडे नामें कीर्ति वाढे । नामें सदा चढे मोक्ष हातां
४०४७	।।ना.गा.०६४६.००४।।	यज्ञ दान तप नामें आली हातां । नामें सर्व सत्ता प्राप्त होय
४०४८	।।ना.गा.०६४६.००५।।	नामा म्हणे सदा नाम ज्याचे मुखीं । नाहीं याच्या तुकीं दुजा कोणी
४०४९	।।ना.गा.०६४७.००१।।	नामें तो सरता नामें तो परता । नामें पंढरिनाथा भेटविलें
४०५०	।।ना.गा.०६४७.००२।।	नाम हेंचि तारी नाम भवसागरीं । उतरी पैलतिरीं नाम तुझें
४०५१	।।ना.गा.०६४७.००३।।	नाम तें अंजन नामें बोधे मन । नामेंचि निधान चांगया जाला
४०५२	।।ना.गा.०६४७.००४।।	मार्गीं जातां तुम्ही उगेंचि नसावें । वाचेसि म्हणावें रामकृष्ण

४०५३	।।ना.गा.०६४७.००५।।	रामकृष्ण हरी मुकुंदमुरारी । केशव नरहरी नारायण
४०५४	।।ना.गा.०६४७.००६।।	ऐसा हा सतत आठव नामाचा । नामा म्हणे कैंचा दोष तया
४०५५	।।ना.गा.०६४८.००१।।	चिंतातुर देहीं न साहे काजळी । नामाची पाजळी उभय दिवीं
४०५६	।।ना.गा.०६४८.००२।।	प्रकाश पडेल ब्रह्म हें दिसेल। वैकुंठ जोडेल भजनभक्ति
४०५७	।।ना.गा.०६४८.००३।।	नाहीं यातीवर्ण नाहीं हें वेदोक्त । नामचिं संतृप्ति होती जीवा
४०५८	।।ना.गा.०६४८.००४।।	नामा म्हणे नाम हेंचि बीजसार । तुटेल येरझार भवबंधाची
४०५९	।।ना.गा.०६४९.००१।।	गोक्षीर लाविलें अंधळिया मुखीं । तेथील पारखी जिव्हा जाणे
४०६०	।।ना.गा.०६४९.००२।।	तैसें देवा तुझें नाम निरंतर। जिव्हेसी पाझर अमृताचे
४०६१	।।ना.गा.०६४९.००३।।	सोलूनियां केळें साखरें घोळिलें । अंधारीं खादलें तरी गोड
४०६२	।।ना.गा.०६४९.००४।।	द्राक्षफळां घड सेवितां चोखड । तयाहूनि गोड नाम तुझें
४०६३	।।ना.गा.०६४९.००५।।	आळूनियां क्षीर तुपाचिये आळे । कालविलें गुळें गोड जैसे
४०६४	।।ना.गा.०६४९.००६।।	जाणोनियां नामा करी विनवणी । अमृताची खाणी नाम तुझें
४०६५	।।ना.गा.०६५०.००१।।	नामचि हें आहे पंचतत्त्वा ठाव । नाहीं दुजा भाव देखावया
४०६६	।।ना.गा.०६५०.००२।।	देखणारा जाहाला कर्पुराची वाती । नामाग्नीं विश्रांती ठाईं जाहाली
४०६७	।।ना.गा.०६५०.००३।।	द्वैताद्वैत तेथें नेणे जाणपण । गेलें हरपोन नामें सर्व
४०६८	।।ना.गा.०६५०.००४।।	नामदेव म्हणे अनाम तें नाम । नाना नामभ्रम तेथें दुजा
४०६९	।।ना.गा.०६५१.००१।।	हडबडलीं पातकें । घेतां रामनाम एक
४०७०	।।ना.गा.०६५१.००२।।	राम म्हणतां तत्क्षणीं । चित्रगुप्तें सांडिली लेखणी
४०७१	।।ना.गा.०६५१.००३।।	घेऊनि पूजेचा संभार । ब्रह्म येतसे समोर
४०७२	।।ना.गा.०६५१.००४।।	नामा म्हणे जरी हें लटकें । तरी हें भंगो मस्तक
४०७३	।।ना.गा.०६५२.००१।।	असत्याचें मूळ बैसलें ये वाचे । तें न फिटती साचे तीर्थोदकें
४०७४	।।ना.गा.०६५२.००२।।	हरीनामामृत प्रक्षाळी जिव्हेतें। पाणिये बहुतें काय करिती
४०७५	।।ना.गा.०६५२.००३।।	गंगासागरादी तीर्थें कोटीवरी । हरिनामाची सरी न पवती
४०७६	।।ना.गा.०६५२.००४।।	हरिनाम गंगे सुस्नात पैं जाला । नाम्या जवळी आला केशिराज
४०७७	।।ना.गा.०६५३.००१।।	वैष्णव तो बळी । सदाशिव चंद्रमौळी
४०७८	।।ना.गा.०६५३.००२।।	त्याचा भक्त तो रावण । मारुनि छेदिला अभिमान

४०७९	।।ना.गा.०६५३.००३।।	आणिक तो बाणासूर । छेदिला शिवासमोर
४०८०	।।ना.गा.०६५३.००४।।	अनिरुद्धा समयीं ख्याती । केली तयाची फजिती
४०८१	।।ना.गा.०६५३.००५।।	भस्मासुर भस्म जाला । जाळुनियां भस्म केला
४०८२	।।ना.गा.०६५३.००६।।	मारुनियां मुक्त केलें । परि ते भक्त नाहीं जाले
४०८३	।।ना.गा.०६५३.००७।।	नामा म्हणे देवाधिदेव । भजावया पंढरीराव
४०८४	।।ना.गा.०६५४.००१।।	भक्ति करूनियां कोण वायां गेला । सांगा हो विठ्ठला निवडूनि
४०८५	।।ना.गा.०६५४.००२।।	द्वापाराचे अंतीं नामचि सुकृत । अद्यापि निश्चित चालतसे
४०८६	।।ना.गा.०६५४.००३।।	नाम ऐकतां तरती निर्धारीं । व्याख्यान श्रीधरी टीकाकार
४०८७	।।ना.गा.०६५४.००४।।	नामा म्हणे राम व्यापीं त्रिभुवन । नाम तें निधान कलियुगीं
४०८८	।।ना.गा.०६५५.००१।।	देवाचें हें गुज सकळ मंत्रमय । जें कां नित्य ध्येय शंकराचें
४०८९	।।ना.गा.०६५५.००२।।	तें हें रामनाम सेवितां सर्वभावें। रामरूप व्हावें निश्चयेंसी
४०९०	।।ना.गा.०६५५.००३।।	नष्ट अजामेळाचें पतितत्व गेलें । दिव्य देह जालें वाल्मिकाचें
४०९१	।।ना.गा.०६५५.००४।।	शरीरसंपत्ति बळीनें देऊनि सकळ । केला द्वारपाळ नारायण
४०९२	।।ना.गा.०६५५.००५।।	कृष्णाविण दुजें नेणती कायावाचा । जाला पांडवांचा साहाकारी
४०९३	।।ना.गा.०६५५.००६।।	नामा म्हणे केशव भावाचा लंपट । भक्तांशीं निकट रतलासे
४०९४	।।ना.गा.०६५६.००१।।	नामाचें सामर्थ्य नेणें वेदशास्त्र । शेषाचीं वक्त्रें मौनावलीं
४०९५	।।ना.गा.०६५६.००२।।	गंगा गणपति चंद्र सूर्य श्रेष्ठ । शंकर वरिष्ठ मौनावले
४०९६	।।ना.गा.०६५६.००३।।	भीष्म पराशर उद्धव अंगद । ब्रह्मा मुचकुंद मौनावले
४०९७	।।ना.गा.०६५६.००४।।	नामा म्हणे येरे काय जाणे स्तुति । दाटोनि श्रीपती उभा केला
४०९८	।।ना.गा.०६५७.००१।।	करीं घेऊनि ब्रह्मविणा । नारद वोळगे नारायणा
४०९९	।।ना.गा.०६५७.००२।।	हेंचि हेंचि तत्त्वसार । नामा म्हणे निरंतर
४१००	।।ना.गा.०६५७.००३।।	आपण शिव आणि शक्ति। रामनाम ते जपती
४१०१	।।ना.गा.०६५७.००४।।	गात नाचत प्रल्हाद वीर । खांबीं केलासे अवतार
४१०२	।।ना.गा.०६५७.००५।।	कुंटिणी पक्षिया म्हणे रामा । तिसी नेलें निजधामा
४१०३	।।ना.गा.०६५७.००६।।	अहिल्येसी लागतां चरण । तिसी आलें मनुष्यपण
४१०४	।।ना.गा.०६५७.००७।।	अजामेळ पातकी अपार । नामें पावला पैलपार

४१०५	।।ना.गा.०६५७.००८।।	गजेंद्रें केलें स्मरण । त्याचें तोडिलें बंधन
४१०६	।।ना.गा.०६५७.००९।।	द्रौपदी स्मरे हृषिकेसी । वस्त्रें पुरविलीं तियेसी
४१०७	।।ना.गा.०६५७.०१०।।	परीक्षितासी घडलें स्मरण । त्यासी जाले सुलभ चरण
४१०८	।।ना.गा.०६५७.०११।।	नामा म्हणे निरंतरू । गगनीं अढळ केला धुरू
४१०९	।।ना.गा.०६५८.००१।।	अग्नी जाळी तरी न जळती पांडव । हृदयीं माधव म्हणोनियां
४११०	।।ना.गा.०६५८.००२।।	अग्नी जाळी तरी न जळती गोपाळ । हृदयीं देवकीबाळ म्हणोनियां
४१११	।।ना.गा.०६५८.००३।।	अग्नी जाळी तरी न जळे हनुमंत । हृदयीं सीताकांत म्हणोनियां
४११२	।।ना.गा.०६५८.००४।।	अग्नी जाळी तरी न जळे प्रल्हाद । हृदयीं गोविंद म्हणोनियां
४११३	।।ना.गा.०६५८.००५।।	अग्नी जाळी तरी न जळे पैं सीता । हृदयीं रघुनाथ म्हणोनियां
४११४	।।ना.गा.०६५८.००६।।	लंकेसी उरलें बिभीषणाचें घर । हृदयीं सीतावर धरिला म्हणोनियां
४११५	।।ना.गा.०६५८.००७।।	नामा म्हणे तुम्ही स्मरावें गोविंदा । चुके भवबाधा संसाराची
४११६	।।ना.गा.०६५९.००१।।	नामाचा प्रताप जाणवेना कोणा । समुद्रीं पाषाण तारियेले
४११७	।।ना.गा.०६५९.००२।।	आवडीनें कोणी चिंतितां उल्हास । काय तो तयास उपेक्षील
४११८	।।ना.गा.०६५९.००३।।	कुंटिणी ते नीच राव्यासाठीं नेली । वैकुंठीं ठेविली सन्निधची
४११९	।।ना.गा.०६५९.००४।।	अजामिळ खळ पुत्राचिया मिषें । उद्धरिलें त्यास दीनानाथे
४१२०	।।ना.गा.०६५९.००५।।	नामा म्हणे ऐसें सांगो आतां किती । नामापाशीं मुकती उभी असे
४१२१	।।ना.गा.०६६०.००१।।	आणीक ही मंत्र मोक्षदानी खरे । अशौचाचा थार असूं नये
४१२२	।।ना.गा.०६६०.००२।।	नाममंत्र कांहीं बाधेना कोणासी। जया अहर्निशीं रामकृष्ण
४१२३	।।ना.गा.०६६०.००३।।	तपाची मांडणी आकाशाचें खेव । इंद्रियांची हाव राहे तरी
४१२४	।।ना.गा.०६६०.००४।।	यज्ञ तो आचार धनाचें सांकडें । तरी जाण द्वाड स्वर्गसुख
४१२५	।।ना.गा.०६६०.००५।।	नामा म्हणे नाम साधकाची माता । जैसें तैसें घेतां भक्ति जोडे
४१२६	।।ना.गा.०६६१.००१।।	नामचि तो जाणे आन कांहीं नेणें । संसार नामाविणें जाईजेना
४१२७	।।ना.गा.०६६१.००२।।	नाम स्मरे त्यांसी संसारचि नाहीं । खुंटली ते पाही येरझार
४१२८	।।ना.गा.०६६१.००३।।	नाम न म्हणे त्याचे जळों ज्यालेंपण । आळसी वायांविण संसाराची
४१२९	।।ना.गा.०६६१.००४।।	नामा म्हणे मज नामींच सौरसु । नाम स्मरे हृषिकेशु त्यासी पावे
४१३०	।।ना.गा.०६६२.००१।।	साराचेंहि सार भक्तीचें भांडार । नाम निरंतर गातां वाचे

४१३१	।।ना.गा.०६६२.००२।।	कासया करावें आणिक साधन। नामाविण क्षण जाऊं नेदी
४१३२	।।ना.गा.०६६२.००३।।	दया शांति क्षमा हेंचि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशीं
४१३३	।।ना.गा.०६६२.००४।।	नामा म्हणे जप अखंड नामाचा । काळ हा सुखाचा सदोदित
४१३४	।।ना.गा.०६६३.००१।।	दग्धही होतसे आलें जें आकारा । असोनि निर्धारा नाम नाहीं
४१३५	।।ना.गा.०६६३.००२।।	नाम अनुभवें प्रपंचि हो ब्रह्म। जाहला सर्वोत्तम संत कृपें
४१३६	।।ना.गा.०६६३.००३।।	म्हणोनियां संतां जाऊनि शरण । साधावें निधान नाम ब्रह्म
४१३७	।।ना.गा.०६६३.००४।।	नामदेव म्हणे संताचिया कृपें । माजी नाम सोपें नांदतसे
४१३८	।।ना.गा.०६६४.००१।।	नांदतसे नाम आकाश पाताळीं । सर्व भूमंडळीं घनदाट
४१३९	।।ना.गा.०६६४.००२।।	पाताळ फोडोनि किती आहे पुड। नाहीं आंत वाड नभ वरी
४१४०	।।ना.गा.०६६४.००३।।	चौऱ्यांशीं भोगिती दुर्मति पामर । नाहीं सारासार जाणत तें
४१४१	।।ना.गा.०६६४.००४।।	नामदेव म्हणे नाम अविनाश । तेथें नाना वेष नाम सर्व
४१४२	।।ना.गा.०६६५.००१।।	तरले तरतील हा भरवंसा । पुढती न येती गर्भवासा
४१४३	।।ना.गा.०६६५.००२।।	वाट सांपडली निकी । विठ्ठल नाम ज्याचे मुखीं
४१४४	।।ना.गा.०६६५.००३।।	तीर्थें इच्छिती चरणीचें । रज नामधारकाचें
४१४५	।।ना.गा.०६६५.००४।।	प्रायश्चित सोडोनि प्रौढी । जाली दीन रूपें बापुडीं
४१४६	।।ना.गा.०६६५.००५।।	ऋद्धि सिद्धी महाद्वारीं । मोक्ष वोळंगण करी
४१४७	।।ना.गा.०६६५.००६।।	नामा म्हणे सुखनिधान । नाम पतित पावन
४१४८	।।ना.गा.०६६६.००१।।	तीर्थ तपराशी जप हृषिकेशी । नाम अहर्निशीं रामराम
४१४९	।।ना.गा.०६६६.००२।।	तीर्थाचें पैं तीर्थ नाम हें समर्थ । होईल कृतार्थ रामनामें
४१५०	।।ना.गा.०६६६.००३।।	साधेल साधन तुटेल बंधन । वाचे जनार्दन सफळ सदा
४१५१	।।ना.गा.०६६६.००४।।	नामा म्हणे हरी उच्चार तूं करी । उद्धरसी निर्धारीं इहलोकीं
४१५२	।।ना.गा.०६६७.००१।।	तपें दानें व्रतें यज्ञाचिया कोडी । तुकितां जालीं थोकडीं हरिनामें
४१५३	।।ना.गा.०६६७.००२।।	न पुरे त्यांसी घातली त्रिभुवनींचीं तीर्थें । नयेची पुरतें रामनामेंसी
४१५४	।।ना.गा.०६६७.००३।।	नाहीं या जीवांचें बोलणें शिवाचें । उपदेशिलें वाचे शक्तिप्रती
४१५५	।।ना.गा.०६६७.००४।।	नाम नाहीं वाचे हाचि पैं निषेधु । विधी हा गोविंदु स्मरलिया
४१५६	।।ना.गा.०६६७.००५।।	श्रेष्ठ सर्व नाम शिवाचें बोलणें । युक्ति अनुमानें न बोले कांहीं

४१५७	।।ना.गा.०६६७.००६।।	नामेंचि भक्त ते पावले अपार । नामें पतित नर उद्धरले
४१५८	।।ना.गा.०६६७.००७।।	नामें पशु गजेंद्राचा तो उद्धार । वाल्मिकें विचार हाचि केला
४१५९	।।ना.गा.०६६७.००८।।	गगनीं धुरु केला अढळ नामें देखा । नामेंचि गणिका उद्धरली
४१६०	।।ना.गा.०६६७.००९।।	नामें ते आपदा न बाधी प्रल्हादा । मुखीं नाम सदा उच्चारितां
४१६१	।।ना.गा.०६६७.०१०।।	कृपाळु नाम पैं मेघ हाचि सार । भीष्में युधिष्ठिरा उपदेशिलें
४१६२	।।ना.गा.०६६७.०११।।	हरिनामापरतें नाहीं विचारीतां । नवमाध्यायी गीता कृष्ण सांगे
४१६३	।।ना.गा.०६६७.०१२।।	सकल अमृत श्रीहरीचें नाम । त्यामाजीं उत्तम रामनाम
४१६४	।।ना.गा.०६६७.०१३।।	म्हणोनी सदाशिवें धरिलें मानसीं । हेचि गिरिजेसी उपदेशिलें
४१६५	।।ना.गा.०६६७.०१४।।	तारक ब्रह्ममंत्र रामनाम जाण । विश्वनाथ श्रवण करीतसे
४१६६	।।ना.गा.०६६७.०१५।।	कीर्तन श्रवण हेंचि पैं हो काशी । म्हणोनी मानसीं राम जपा
४१६७	।।ना.गा.०६६७.०१६।।	विरंची सकळ शास्त्र विचारितां । हरिनामापरता मंत्र नाहीं
४१६८	।।ना.गा.०६६७.०१७।।	कळिकाळा त्रास हरिनामकीर्तनें। पतितपावन प्राणी होय
४१६९	।।ना.गा.०६६७.०१८।।	कलियुगीं धर्म हरीचें हे नाम । म्हणोन शुकदेवें वाखाणिलें
४१७०	।।ना.गा.०६६७.०१९।।	नामयाचा स्वामी पंढरीचा रावो । रुखमाईचा नाहो गाऊं गीतीं
४१७१	।।ना.गा.०६६८.००१।।	चंद्रतारांगण नैऋति भास्कर । तटस्थ निर्धार ब्रह्मादिक
४१७२	।।ना.गा.०६६८.००२।।	ब्रह्मादि सकळ भजनीं तत्पर । तेव्हां हरिहर नाचतसे
४१७३	।।ना.गा.०६६८.००३।।	कृष्ण विष्णु नाम अच्युत अनंत । सगुण निश्चित स्मरा वेगीं
४१७४	।।ना.गा.०६६८.००४।।	नामा म्हणे नको उदंड सायास । तोडी भवपाश रामनामें
४१७५	।।ना.गा.०६६९.००१।।	सुखाचा सोहळा वाटतसे जीवा । भेटणें केशवालागीं आजी
४१७६	।।ना.गा.०६६९.००२।।	पाउलां पाउलीं याचिया वाटे । पताकांचे थाट दिसताती
४१७७	।।ना.गा.०६६९.००३।।	पैल तो कळसू पाहे पां साजणी । नामघोष कानीं पडतसे
४१७८	।।ना.गा.०६६९.००४।।	नामा म्हणे नामीं पारणें जो करी । तयासि श्रीहरी उपेक्षिना
४१७९	।।ना.गा.०६७०.००१।।	नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनीं । ऐसें बोले वाणी वेदशास्त्रीं
४१८०	।।ना.गा.०६७०.००२।।	पहा विचारोनि अनुभव तो मनीं । नका आडरानीं झणीं भरो
४१८१	।।ना.गा.०६७०.००३।।	नामाविण कोणी तरले जे म्हणती । ते आधीं बुडती भवसागरीं
४१८२	।।ना.गा.०६७०.००४।।	नामा म्हणे नाम ॐकाराचें मूळ । ब्रह्म तें केवळ विटेवरी

४१८३	।।ना.गा.०६७१.००१।।	कां करिसी सोस मायेचा असोस । नव्हे तुज सौरस नामेंविण
४१८४	।।ना.गा.०६७१.००२।।	नामचि हा मंत्र नामचि हो तंत्र । नामेंविण पवित्र न होसी देखा
४१८५	।।ना.गा.०६७१.००३।।	तिहीं लोकीं पाहतां नामेंविण सर्वथा । अच्युत म्हणतां पुण्य कोटी
४१८६	।।ना.गा.०६७१.००४।।	नामा म्हणे ब्रह्म आदिअंतीं नेम । तें विटेवरी सम उभें असे
४१८७	।।ना.गा.०६७२.००१।।	सार पैं सांगत उपनिषद तुम्हां । वाचे रामनामा जप करा
४१८८	।।ना.गा.०६७२.००२।।	हेंचि पैं मथित सांगोनियां गेले । उच्चारितां ठेले ब्रह्मरूप
४१८९	।।ना.गा.०६७२.००३।।	ज्योतिसी ते ज्योति भजन करील । आपणचि होईल हरी स्वयें
४१९०	।।ना.गा.०६७२.००४।।	नामा म्हणे कैसें विपरीत करणें । भूतदया धरणें सर्वांभूतीं
४१९१	।।ना.गा.०६७३.००१।।	अखंड मुखीं रामनाम । धन्य तयाचाचि जन्म । स्नान संध्येसी नेम । तो पुरुष महापवित्र
४१९२	।।ना.गा.०६७३.००२।।	धन्य धन्य तयाचा जन्म । रामार्पण अवघें कर्म । तोचि तरला हाचि नेम । रामकृष्ण उच्चारणीं
४१९३	।।ना.गा.०६७३.००३।।	अनंत जन्माचें सांकडें । तेणेंचि उगविलें कोडें । जप तप येणें नावडे । रामकृष्ण उच्चारणीं
४१९४	।।ना.गा.०६७३.००४।।	नामा म्हणे नाममात्रें। अवघीं निवारलीं शस्त्रें। रामकृष्ण नाम वक्त्रें । उच्चारी तो धन्य
४१९५	।।ना.गा.०६७४.००१।।	सहस्र दळांमधुन अनुहातध्वनि उठी । नामाचेनि गजरें पातकें रिघालीं कपाटीं
४१९६	।।ना.गा.०६७४.००२।।	जागा रे गोपाळांनों रामनामीं जागा । कळिकाळ एका नामें महादोष जाति भंगा
४१९७	।।ना.गा.०६७४.००३।।	दशमी एक व्रत दिंडीचें करा दर्शन । एकादशी उपवास तुम्ही करा जागरण
४१९८	।।ना.गा.०६७४.००४।।	द्वादशी साधनें जळती पातकांच्या कोटी । नामा म्हणे केशव ठाव देईल वैकुंठीं
४१९९	।।ना.गा.०६७५.००१।।	मायेचें भुररे रज तम सात्विक । रामनाम एक सोडवणें
४२००	।।ना.गा.०६७५.००२।।	राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान । नामें घडती यज्ञ कोटी देखा
४२०१	।।ना.गा.०६७५.००३।।	न लगती साधन नाना मंत्र विवेक । रामनाम मुखें घेई कां रे
४२०२	।।ना.गा.०६७५.००४।।	नामा म्हणे श्रीराम हेंचि वचन आम्हां । नित्य ते पौर्णिमा सोळा कळी
४२०३	।।ना.गा.०६७६.००१।।	माझें मी करितां गेले हे दिवस । न धरीच विश्वास रामनामीं
४२०४	।।ना.गा.०६७६.००२।।	अंतीं तुज उद्धरती रामनाम हरी । राम पंचाक्षरी मंत्रसार
४२०५	।।ना.गा.०६७६.००३।।	कां करशील सांठा प्रपंच विस्तार । न तुटे वेरझार नामेंविण
४२०६	।।ना.गा.०६७६.००४।।	नामा म्हणे कैसें रामनामीं पिसें। तो उद्धरेल अपैसे इहलोकीं
४२०७	।।ना.गा.०६७७.००१।।	कृष्णकथा सांग जेणें तुटे पांग । न लागे तुज उद्वेग करणें कांहीं
४२०८	।।ना.गा.०६७७.००२।।	समर्थ सोईरा राम हा निधान । जनीं जनार्दन एक ध्याई

४२०९	।।ना.गा.०६७७.००३।।	नाम हेंचि सार नाम हेंचि सार । तराल निर्धार श्रुति सांगे
४२१०	।।ना.गा.०६७७.००४।।	नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सार । तुटेल वेरझार भवाब्धीची
४२११	।।ना.गा.०६७८.००१।।	स्मरण करितां रामनाम ध्वनी । ऐकतांची कर्णीं पळती यम
४२१२	।।ना.गा.०६७८.००२।।	ऐसें पाठ करी रामनाम हरी । होतील कामारी ऋद्धिसिद्धि
४२१३	।।ना.गा.०६७८.००३।।	साध्य तेंचि साधी न करीं उपाधी । जन्मांतरीच्या व्याधि हरती नामें
४२१४	।।ना.गा.०६७८.००४।।	नामा म्हणे सर्व राम हाचि भाव । नाहीं आणिक देव रामेंविण
४२१५	।।ना.गा.०६७९.००१।।	सर्वांभूतीं हरी आहे हेंचि साच । मायाजाळ न छळे भाविकांसी
४२१६	।।ना.गा.०६७९.००२।।	सर्व ब्रह्म ऐसें वेद बोले गाढा । ब्रह्मींचा पवाडा अगम्य तो
४२१७	।।ना.गा.०६७९.००३।।	जाणतां नेणतां हरीनाम उच्चार । मार्ग तो साचार सुफल सदा
४२१८	।।ना.गा.०६७९.००४।।	नामा म्हणे कारण जिव्हा होय स्मरण । सर्व नारायण हरी दिसे
४२१९	।।ना.गा.०६८०.००१।।	जप तप अनुष्ठान हरी । एकचि तो नमस्कारी । भूतद्वेष कदा न करी । तप सामुग्री हेचि तुझी
४२२०	।।ना.गा.०६८०.००२।।	हरी माधव यादवा । कृष्णा गोविंदा केशवा । येणें करोनियां जीवा । सर्वकाळ रंजवी
४२२१	।।ना.गा.०६८०.००३।।	स्मरतां हरीचें नाम । पळोनी जाति काळयम । तुटती नाना योनी जन्म । गर्भवासा मग नये
४२२२	।।ना.गा.०६८०.००४।।	नामा जपे नामावळी । अखंड तप हेंचि सदाकाळीं । हरीनामें पिटोनि टाळी । हाचि तरणोपाय सकळांचा
४२२३	।।ना.गा.०६८१.००१।।	सर्वकाळ हरी जप । हेंचि तपामाजीं तप । न लागती घालावे संकल्प । नाना मंत्राचे परियेसी
४२२४	।।ना.गा.०६८१.००२।।	मंत्रामाजीं मंत्रसार । रामकृष्ण हाचि उच्चार । नित्यानित्य निर्विकार । हाचि जोडेल साचा रे
४२२५	।।ना.गा.०६८१.००३।।	मागें कृतायुगीं सांगो । त्रेतायुगीं काय ओळगों । द्वापारीं कृष्णरंगे रंगो । परी कलीमाजी नामतारक
४२२६	।।ना.गा.०६८१.००४।।	नामा म्हणे ग्रंथीं । पाहे पां यथा निगुती । नाम जपतांची तरती । हें व्यासाचें वचन ऐसें
४२२७	।।ना.गा.०६८२.००१।।	नाम वाचे उच्चारितां । हरे संसाराची व्यथा । जाती दोषाचिया चळथा । रामकृष्ण उच्चारणीं
४२२८	।।ना.गा.०६८२.००२।।	हरी माधव गोविंद । याची नामाचा जया छंद । तोचि पावेल परमपद । निजभुवन वैकुंठीं
४२२९	।।ना.गा.०६८२.००३।।	जन्मजन्मांची तपरासी । तेणें नाम आलें मुखासी । स्मरतां हरी हृषिकेशी । सकळ पूर्वजां उद्धार
४२३०	।।ना.गा.०६८२.००४।।	नाम जपे ध्यानीं मनीं । अखंड विठ्ठल हरी कीर्तनीं । तेणें जपें ये मेदिनी । कोटी यज्ञ घडले
४२३१	।।ना.गा.०६८३.००१।।	रूपाचें रूपस नाम हृषिकेश । पंढरी निवास जप करी
४२३२	।।ना.गा.०६८३.००२।।	विठ्ठल श्रीहरी मुकुंद श्रीहरी । नामेंचि बोहरी प्रपंचाची
४२३३	।।ना.गा.०६८३.००३।।	विठ्ठल नामामृत हेंचि जीवन होत । नाम हें मुखांत केशवाचें
४२३४	।।ना.गा.०६८३.००४।।	नामा म्हणे देव अमृताचा साठा । मुखामाजीं पेठा होत नामें

४२३५	।।ना.गा.०६८४.००१।।	सर्वांग साजिरीं आहेती इंद्रियें । तंव सावध होय हरीकथे
४२३६	।।ना.गा.०६८४.००२।।	कीर्तन नर्तन वाचे जनार्दन । न पावसी पतन येरझारीं
४२३७	।।ना.गा.०६८४.००३।।	पूर्ण मनोरथ घडती एका नामें । दाटले सप्रेमें जीवन हेतु
४२३८	।।ना.गा.०६८४.००४।।	नामा म्हणे विलास न करी तूं आणिक । सर्वी सर्वा येक नाम असे
४२३९	।।ना.गा.०६८५.००१।।	ऐकतां कीर्तन होती जीवन्मुक्त । दाविसी अनंत नाममात्रें
४२४०	।।ना.गा.०६८५.००२।।	मृत्युलोकीं जो जन्म इच्छी नर। त्याच्या पुण्या पार कोण वाणी
४२४१	।।ना.गा.०६८५.००३।।	भक्तिसारामृत श्रेष्ठ कलियुगीं । उद्धरिले योगी ब्रह्मादिक
४२४२	।।ना.गा.०६८५.००४।।	नामा म्हणे मज नाही चिंता भय । हृदयीं तुमचे पाय पुरे आतां
४२४३	।।ना.गा.०६८६.००१।।	कीर्तनाच्या सुखें सुखी होतो देव । कोण तें वैभव वाणी आतां
४२४४	।।ना.गा.०६८६.००२।।	अंत्यज आणि जातिवंता। मुखीं नाम घेतां उडी घाली
४२४५	।।ना.गा.०६८६.००३।।	बैसोनी आसनीं आळवितां नाम । उभा सर्वोत्तम तयापुढें
४२४६	।।ना.गा.०६८६.००४।।	प्रेमाचिया भरें उभ्यानें गर्जत । नाचे हा अनंत तयासवें
४२४७	।।ना.गा.०६८६.००५।।	नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी ।घालीतसे उडी नेटेपाटें
४२४८	।।ना.गा.०६८७.००१।।	काळवेळ नसे नामसंकीर्तनीं । उंच नीच योनी हेंहि नसे
४२४९	।।ना.गा.०६८७.००२।।	धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ । मग तो गोपाळ सांभाळील
४२५०	।।ना.गा.०६८७.००३।।	कृपाळु कोंवसा सुखाचा सागर । करील उद्धार भाविकांसी
४२५१	।।ना.गा.०६८७.००४।।	नामा म्हणे फार सोपें हें साधन । वाचे नाम घेणें इतुकेंचि
४२५२	।।ना.गा.०६८८.००१।।	गीता हेचि गंगा गुह्यभाव पैं गा । नाम हेचि वेगा सोडवण
४२५३	।।ना.गा.०६८८.००२।।	सर्व ब्रह्म हरी सांगतसे मुरारी । विश्वरूप श्रीहरी आपण जाला
४२५४	।।ना.गा.०६८८.००३।।	उपदेश अर्जुना जनीं जनार्दना । अखंड भावना भूतदया
४२५५	।।ना.गा.०६८८.००४।।	नामा म्हणे सर्व आहे हाचि देव । उदार माधव सर्वांभूतीं
४२५६	।।ना.गा.०६८९.००१।।	नामाचें चरित्र सदा अति गोड । तीर्थें काय चाड नाममात्रें
४२५७	।।ना.गा.०६८९.००२।।	ऐसा दृढ मनीं करावा विचार । नाम परिकर कलियुगीं
४२५८	।।ना.गा.०६८९.००३।।	नामा म्हणे नाम अनादि अक्षर । उभा कटीं कर भक्तांसाठीं
४२५९	।।ना.गा.०६९०.००१।।	नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम । नामरूप भिन्न नाहीं नाहीं
४२६०	।।ना.गा.०६९०.००२।।	देव आकारला नामरूपा आला। म्हणोनि स्थापिला नामवेदीं

४२६१	।।ना.गा.०६९०.००३।।	नामापरता मंत्र नाहीं हो आणिक । सांगती ते मूर्ख ज्ञानहीन
४२६२	।।ना.गा.०६९०.००४।।	नामा म्हणे नाम केशव केवळ । जाणती प्रेमळ भक्त भले
४२६३	।।ना.गा.०६९१.००१।।	अनंत जन्में मेळवितां दुर्लभ । तो प्राणवल्लभ शंकराचा
४२६४	।।ना.गा.०६९१.००२।।	वेदशास्त्र मंथुनी काढियेलें सार। ब्रह्मादिकां पार रामनामें
४२६५	।।ना.गा.०६९१.००३।।	स्वर्गींचे देव चिंतिताती मानसीं । भेटी आम्हां कैसी पांडुरंगीं
४२६६	।।ना.गा.०६९१.००४।।	नामा म्हणे केशवाचें नाम उच्चारितां । विघ्नासी भंगिता नवल काय
४२६७	।।ना.गा.०६९२.००१।।	विठ्ठलाचें नाम जे माऊलिचे ओठीं । विठो तिचें पोटीं गर्भवासी
४२६८	।।ना.गा.०६९२.००२।।	जयाचिये कुळीं पंढरीची वारी । विठो त्याचे घरीं बाळलीळा
४२६९	।।ना.गा.०६९२.००३।।	नामा म्हणे जिव्हे काढीन मी रवा । असत्य केशवा वचन होतां
४२७०	।।ना.गा.०६९३.००१।।	अनंत ब्रह्मांडें व्यापक तें नाम । अनादि निष्काम विश्वंभर
४२७१	।।ना.गा.०६९३.००२।।	तोचि कृष्ण परब्रह्म द्वारकेसी। पांडवां मानसीं ठसावला
४२७२	।।ना.गा.०६९३.००३।।	ठसावला तोचि पाहावा अनुभव । पांचालागीं ठाव मग कैसा
४२७३	।।ना.गा.०६९३.००४।।	नामा म्हणे देव संपूर्ण आघवा । तयाचिया गांवा सींव नाहीं
४२७४	।।ना.गा.०६९४.००१।।	ज्ञान व्हावें आधीं ओळखावें नांवा । मग जावें गांवा तयाचिया
४२७५	।।ना.गा.०६९४.००२।।	या नामाचें मूळ त्या माजीं जो धाला । प्रपंच्याचा घाला मग नाहीं
४२७६	।।ना.गा.०६९४.००३।।	नाम गांवें प्रपंच सर्व आहे नाम । ब्रह्मानंदें प्रेम घनदाट
४२७७	।।ना.गा.०६९४.००४।।	नामदेव म्हणे नंदाचिया घरीं। होता एक हरि दुजें नाम
४२७८	।।ना.गा.०६९५.००१।।	साधनांत सोपें नाम हें केवळ । याविण सकळ शीण वायां
४२७९	।।ना.गा.०६९५.००२।।	धरा रे धरा नाम विठोबाचें । तेणें अज्ञानाचें मूळ नासे
४२८०	।।ना.गा.०६९५.००३।।	नाम तारी फार पुराणीं वर्णिलें । नामचि केवळ आत्मसत्ता
४२८१	।।ना.गा.०६९५.००४।।	नामा म्हणे नामीं रंगला सुरंग । अंगें स्वयमेव पांडुरंग
४२८२	।।ना.गा.०६९६.००१।।	एकटी येकला सर्व हें सकळां । आपणची जाला विश्वहरी
४२८३	।।ना.गा.०६९६.००२।।	न कळे याची माव कैसा आहे भाव । सर्वांभूतीं देव गीता सांगे
४२८४	।।ना.गा.०६९६.००३।।	भूतदया धरा भजावें श्रीधरा । नामा एक स्मरा विठ्ठल ऐसें
४२८५	।।ना.गा.०६९६.००४।।	नामा म्हणे देव पंढरी पाटणीं । पावेल निर्वाणीं नाम घेतां
४२८६	।।ना.गा.०६९७.००१।।	जीव शिव ग्रामीं मीतूंपण पाही । हा गौरव कांहीं नाहीं नामीं

४२८७	।।ना.गा.०६९७.००२।।	नाहीं चतुर्देह तूर्या हे उन्मनी। स्वयंभु ते खाणी निजनामाची
४२८८	।।ना.गा.०६९७.००३।।	नामीं जडे चित्त तेथें काय उणें । लज्जित साधनें नाना जहालीं
४२८९	।।ना.गा.०६९७.००४।।	नामदेव म्हणे मीतूंपण नाहीं । नाहीं आन कांहीं सर्व तेंचि
४२९०	।।ना.गा.०६९८.००१।।	पवित्र परिकर नाम हा उच्चार । उद्धरण साचार जगायया
४२९१	।।ना.गा.०६९८.००२।।	गोविंद केशव उच्चार श्रीराम । न लगती नेम अमूप जप
४२९२	।।ना.गा.०६९८.००३।।	तें हें विठ्ठलरूप पिकलें पंढरीं । नाम चराचरीं विठ्ठल ऐसें
४२९३	।।ना.गा.०६९८.००४।।	नामा म्हणे विठ्ठल सर्वांत सखोल । उच्चारितां मोल नलगे तुज
४२९४	।।ना.गा.०६९९.००१।।	आकारिक नाम जीवानें ठेविलें । शिवानें तें केलें निर्विकल्प
४२९५	।।ना.गा.०६९९.००२।।	जीव शिव दोन्ही विराले ज्यामाजीं । तें नाम सहजीं आद्य आहे
४२९६	।।ना.गा.०६९९.००३।।	तया नामाविण जावयासी ठाव । नाहीं दुजा भाव तिळभरी
४२९७	।।ना.गा.०६९९.००४।।	नामदेव म्हणे नाम घनदाट । प्रपंच निघोट नामापरी
४२९८	।।ना.गा.०७००.००१।।	कृष्णनाम श्रेष्ठ गाती देव ऋषी । नाम अहर्निशीं गोपाळाचें
४२९९	।।ना.गा.०७००.००२।।	हरी हरी हरी तूंचि बा श्रीहरी। वसे चराचरीं जनार्दन
४३००	।।ना.गा.०७००.००३।।	आदि ब्रह्मा हरि आळवी त्रिपुरारी । उमेप्रति करी उपदेश
४३०१	।।ना.गा.०७००.००४।।	नामा म्हणे ब्रह्म हा जप उत्तम । शंकरासी नेम दिननिशीं
४३०२	।।ना.गा.०७०१.००१।।	भजन करा रे हरिहरा । नारायण शिवशंकरा । माझें बोलणें हें अवधारा । भेद न करा दोघांचा
४३०३	।।ना.गा.०७०१.००२।।	तुम्हां सांगेन सत्य वृत्तान्त । पाहें पां तेथींचा दृष्टान्त । नारायणें सेविलें अमृत । जाला श्वेत महादेव
४३०४	।।ना.गा.०७०१.००३।।	शंभूनें गिळिलें हलाहला । म्हणोनि विष्णु जाला निळा । देखत देख आंधळा । झणीं होसी गव्हरा
४३०५	।।ना.गा.०७०१.००४।।	लक्ष्मी रूपें आपण हरू । देवें वरिला शारंगधरू। गरूडरूपें महेश्वरू । वाहन जाला विष्णूचें
४३०६	।।ना.गा.०७०१.००५।।	शक्तिरूपें शारंगपाणि। नारायण जाला भवानी । शारंगधर नंदी होऊनि । सन्मुखासनीं बैसला
४३०७	।।ना.गा.०७०१.००६।।	एक तो एक वेगळा नाहीं । दृष्टान्त तूं आगमीं पाहीं । नामा म्हणे एक केशव ध्यायीं । हरिहर पाहीं ज्याचे अवतार
४३०८	।।ना.गा.०७०२.००१।।	म्हणतां नाम वाचे वैकुंठ जवळी । नित्य वनमाळी भक्तांसंगें
४३०९	।।ना.गा.०७०२.००२।।	होईल साधन विठ्ठलीं परिपूर्ण । निवती नयन मूर्ति पाहतां
४३१०	।।ना.गा.०७०२.००३।।	शंखचक्रांकित आयुधें शोभती । भाग्योदयीं दिसती भावशीळा
४३११	।।ना.गा.०७०२.००४।।	नामा म्हणे तें रूप पंढरीचें आहे । न सांडी ते सोय केशवाची
४३१२	।।ना.गा.०७०३.००१।।	आपुली पदवी सेवकासी द्यावी । तो एक गोसावी पांडुरंग

४३१३	।।ना.गा.०७०३.००२।।	भावाचा आळुका भुलला भक्तिसुखा । सांपडला फुका नामासाठीं
४३१४	।।ना.गा.०७०३.००३।।	प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी । क्षण एक न सोडी संग त्याचा
४३१५	।।ना.गा.०७०३.००४।।	नामा म्हणे आम्हां दीनांचे माहेर । तो एक उदार पांडुरंग
४३१६	।।ना.गा.०७०४.००१।।	सोयरा सुखाचा विसावा भक्तांचा । विठोबा निजाचा मायबाप
४३१७	।।ना.गा.०७०४.००२।।	कृपाळु दीनाचा बडिवार नामाचा । तोडर ब्रीदाचा साजे तया
४३१८	।।ना.गा.०७०४.००३।।	काया मनें वाचा संग धरा त्याचा । अनंत जन्माचा हरेल शीण
४३१९	।।ना.गा.०७०४.००४।।	नामा म्हणे विठो अनाथा कुवासा । तारिल भरंवसा आहे मज
४३२०	।।ना.गा.०७०५.००१।।	देव दयानिधी भक्तांचा कैवारी । नाममात्रें तारी सर्वांलागीं
४३२१	।।ना.गा.०७०५.००२।।	तया देवराया गावें हो आवडी । लागे मनीं गोडी सर्वकाळ
४३२२	।।ना.गा.०७०५.००३।।	नाहीं यातिकूळ उंच नीच भेद । भाव एक शुद्ध पाहातसे
४३२३	।।ना.गा.०७०५.००४।।	नामा म्हणे काय सांगावें नवल । अखंड दंडलें व्योमाकार
४३२४	।।ना.गा.०७०६.००१।।	नाम फुकाचें चोखट । नाम घेतां नलगे कष्ट
४३२५	।।ना.गा.०७०६.००२।।	पडशील ज्या सागरीं । रामनामें आत्मा तारी
४३२६	।।ना.गा.०७०६.००३।।	पुत्रभावें स्मरण केलें । तया वैकुंठासी नेलें
४३२७	।।ना.गा.०७०६.००४।।	नामा हें महिमान जाण । घेतो विठ्ठलाची आण
४३२८	।।ना.गा.०७०७.००१।।	साधावया स्वरूपसिद्धी । सिद्ध साधक समाधी । बैसोनी ध्यानबुद्धी । परी तो हरी न सांपडे
४३२९	।।ना.गा.०७०७.००२।।	धन्य धन्य वैष्णव संग । अखंड तेथें पांडुरंग । कीर्तनीं नाचतसे अभंग । अखंड काळ सर्वदा
४३३०	।।ना.गा.०७०७.००३।।	नाम घेतां धांवे विठ्ठल । नलगे तप नलगे मोल । कष्ट न लगती बहुसाल । हा कृपाळु दीनाचा
४३३१	।।ना.गा.०७०७.००४।।	नामा म्हणे भक्तीचें कारण । भक्तीसी तुष्टे नारायण । याचें करितां कीर्तन । आपेंआप तुष्टेल
४३३२	।।ना.गा.०७०८.००१।।	दया हेचि दाता मन करी उदार । सर्व हा श्रीधर ऐसें भावी
४३३३	।।ना.गा.०७०८.००२।।	तुटेल यातना होईल वैकुंठ । पंढरी मूळपेठ सेवी कां रे
४३३४	।।ना.गा.०७०८.००३।।	इच्छिती अमर नित्य काळ नेमें । दाटताति प्रेमें सनकादिक
४३३५	।।ना.गा.०७०८.००४।।	तें हें विठ्ठलनाम पवित्र चोखडें । अंतरीं माजिवडे नित्य करी
४३३६	।।ना.गा.०७०८.००५।।	होतील कामारि ऋद्धिसिद्धी अपार । आपण श्रीधर कुरवाळील
४३३७	।।ना.गा.०७०८.००६।।	नामा म्हणे येथें न लगेची मोल । विठ्ठल निमोल सर्वांभूतीं
४३३८	।।ना.गा.०७०९.००१।।	पोसिशी शरीर इंद्रियांचा बांधा । सेखीं ते आपदा करील तुज

४३३९	।।ना.गा.०७०९.००२।।	नव्हे तुझें हित विषय पोषितां। हरी हरी म्हणतां उद्धरसी
४३४०	।।ना.गा.०७०९.००३।।	वायांच पाल्हाळ चरित्र सांगसी। परी राम हें न म्हणसी अरे मूढा
४३४१	।।ना.गा.०७०९.००४।।	नामा म्हणे हेंचि पंढरीये निधान। उच्चारिता जन तरले ऐसें
४३४२	।।ना.गा.०७१०.००१।।	कां करिसी हव्यास इंद्रियांचा सोस। वायां कासावीस कोण्या काजें
४३४३	।।ना.गा.०७१०.००२।।	सर्व ही लटिके माया मोहबंधन। सत्य हे निधान विठ्ठल एक
४३४४	।।ना.गा.०७१०.००३।।	उगवेल प्रपंच सर्व हे आहाचें। रामकृष्ण वाचे बांध जिव्हे
४३४५	।।ना.गा.०७१०.००४।।	नामा म्हणे करणी करावी पैं ऐसी। जेणें त्या विठ्ठलासी पाविजेसा
४३४६	।।ना.गा.०७११.००१।।	नामाचा महिमा कोण करी सीमा। जपा श्रीरामा एक्याभावें
४३४७	।।ना.गा.०७११.००२।।	न लगती स्तोत्र नाना मंत्र तंत्रें। वर्णिजें वक्त्रें श्रीराम नाम
४३४८	।।ना.गा.०७११.००३।।	अनंत पुण्यरासी घडे ज्या प्राण्यासी। तरीच मुखासी नाम येत
४३४९	।।ना.गा.०७११.००४।।	नामा म्हणे राम हा जप परम। तो देह उत्तम मृत्युलोंकी
४३५०	।।ना.गा.०७१२.००१।।	कासावाचे दृष्टीं जें होईजे भेटी। तैं अमृताची सृष्टी घडे त्यासी
४३५१	।।ना.गा.०७१२.००२।।	तैसें हें भजन श्रीरामांचे ध्यान। वाचे नारायण अमृतमय
४३५२	।।ना.गा.०७१२.००३।।	धन्य त्याचें कुळ सदा पैं सकळ। दिननिशीं पळ रामनाम
४३५३	।।ना.गा.०७१२.००४।।	नामा म्हणे चोखडा भक्त तो उत्तम। वाचेसी सुगम रामनाम
४३५४	।।ना.गा.०७१३.००१।।	मी माझें भावितां न फिटे हें ओझें। कर्मकाण्ड दुजें आड येत
४३५५	।।ना.गा.०७१३.००२।।	न तुटे हे कर्म न चले हा धर्म। सर्वत्र हें ब्रह्म न कळे तया
४३५६	।।ना.गा.०७१३.००३।।	मी माझें हें ओझें अहंताची वाहे। परतोनी न पाहे मी कवण
४३५७	।।ना.गा.०७१३.००४।।	नामा म्हणे नाम स्मरे त्या कृष्णाचें। भय कळिकाळाचें नाहीं नाहीं
४३५८	।।ना.गा.०७१४.००१।।	उपदेश विव्हळ न कळे याचा अर्थ। वायांची हा स्वार्थ प्रपंचाचा
४३५९	।।ना.गा.०७१४.००२।।	सांडी हा प्रपंच मिथ्या लवलाहो। विठ्ठल हा टाहो नित्य करी
४३६०	।।ना.गा.०७१४.००३।।	हरी हरी भजन भज दयाशीळ। होसील निर्मळ ब्रह्मरूप
४३६१	।।ना.गा.०७१४.००४।।	सर्व हा आकार हरीचें शरीर। मायेचा विकार भुलों नका
४३६२	।।ना.गा.०७१४.००५।।	आप तेजीं ब्रह्म हरी माझा सम। आदि अंतीं नेम विठ्ठल हरी
४३६३	।।ना.गा.०७१४.००६।।	नामा म्हणे उपमा काय द्यावी यासी। नाम तारी सर्वांसी कलिमाजीं
४३६४	।।ना.गा.०७१५.००१।।	धिग् तो ग्राम धिग् तो आश्रम। संत सगामग नाहीं जेथें

४३६५	।।ना.गा.०७१५.००२।।	धिग् ते संपत्ति धिग् ते संतति। भजन सर्वांभूतीं नाहीं जेथें
४३६६	।।ना.गा.०७१५.००३।।	धिग् तो आचार धिग् तो विचार। वाचे सर्वेश्वर नाहीं जेथें
४३६७	।।ना.गा.०७१५.००४।।	धिग् तो वक्ता धिग् तो श्रोता। पांडुरंगकथा नाहीं जेथें
४३६८	।।ना.गा.०७१५.००५।।	धिग् तें गाणें धिग् तें पढणें। विठ्ठल नाम बाणें नाहीं जेथें
४३६९	।।ना.गा.०७१५.००६।।	नामा म्हणे धिग् धिग् त्यांचें जिणें। एका नारायणें वांचूनिया
४३७०	।।ना.गा.०७१६.००१।।	सुख तें आपुलें चोरांशीं वांटिलें । पालटें घेतलें दुःख त्यांचें
४३७१	।।ना.गा.०७१६.००२।।	नित्य नवी त्याची सोसितां सोसिणा । नयेचि तुज अझोनी वीट मना
४३७२	।।ना.गा.०७१६.००३।।	ऐसा तूं निर्लज्ज पाहे आत्मघातीं । कैसी तुझी खंती न वाटे तुज
४३७३	।।ना.गा.०७१६.००४।।	लक्ष या चौऱ्यांशीं सोसितां यातना । भोगिसी पतना ज्यांच्या संगें
४३७४	।।ना.गा.०७१६.००५।।	त्यातें भजसी सांग पुढती कोण्या मोहें । विचारूनि पाहे तुझा तूंचि
४३७५	।।ना.गा.०७१६.००६।।	सदा चिंतातुर होऊनि दीनरूप । संकल्प विकल्प करिसी किती
४३७६	।।ना.गा.०७१६.००७।।	नाथिलाची छंदु नाही त्या दुराशा । भोंवसी दाही दिशा तळमळीत
४३७७	।।ना.गा.०७१६.००८।।	त्यांची इंद्रियें बापुडी असती केविलवाणीं । विषया लागोनी लोलंगिती
४३७८	।।ना.गा.०७१६.००९।।	तूं हे आशा करिसी निरंतरीं । जालासी भिकारी कृपणाचा
४३७९	।।ना.गा.०७१६.०१०।।	आलें काळभय हाकीत टाकीत । मूढा तुझें हित कोण करी
४३८०	।।ना.गा.०७१६.०११।।	त्रिभुवनीं समर्थ बळी जगजेठी । रिघें त्याचे पाठीं म्हणे नामा
४३८१	।।ना.गा.०७१७.००१।।	अभ्यासिले वेद जाला शास्त्रबोध । साधिल्या विविध नाना कळा
४३८२	।।ना.गा.०७१७.००२।।	प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं । तंव कैसा श्रीहरि करील कृपा
४३८३	।।ना.गा.०७१७.००३।।	हित ते आचरा हित ते विचारा । नामीं भाव धरा जाणतेनों
४३८४	।।ना.गा.०७१७.००४।।	प्रसंगीं पुराणें ऐकिलीं श्रवणीं। त्यांतील कोण मनीं धरील अर्थ
४३८५	।।ना.गा.०७१७.००५।।	काय तें सांडिलें काय तें मांडिलें। काय तें दंडविलें प्रवृत्तीसी
४३८६	।।ना.गा.०७१७.००६।।	अनंत ह्या मूर्ति पाहिल्या लोचनीं । यातील कोण ध्यानीं प्रतिबिंबली
४३८७	।।ना.गा.०७१७.००७।।	स्वप्नींचिया परी देखसी अभ्यास । न धरीच विश्वास चित्त तुझें
४३८८	।।ना.गा.०७१७.००८।।	वांझेचिये स्तनीं अमृताची धणी । मृगजळ पाणी तान्हा बोले
४३८९	।।ना.गा.०७१७.००९।।	तरी प्रेमेंविण कळती क्रियाकर्मे । हातीं येती वर्मे विठोबाची
४३९०	।।ना.गा.०७१७.०१०।।	दृष्टीचें देखणें श्रवणीचें ऐकणें । मनाचें बैसणें एक होय

४३९१	।।ना.गा.०७१७.०११।।	नामा म्हणे तरी विठो येऊनि भेटे । कायाच पालटे कैवल्य होय
४३९२	।।ना.गा.०७१८.००१।।	नामामृत गोडी आहे वैष्णवासी । येरां प्राकृतासी कळेनाची
४३९३	।।ना.गा.०७१८.००२।।	प्राकृत हे जन भुलले विषयीं। नामाचिया गांवीं कैसे जाती
४३९४	।।ना.गा.०७१८.००३।।	नामीं चित्त व्हावें जावें तेव्हां गांवा । मग नाम गोवा तेथें कैंचा
४३९५	।।ना.गा.०७१८.००४।।	नाम तेंचि जाहालें वर्णरूपातीत । अनाम स्वतंत्र स्वयंभु तो
४३९६	।।ना.गा.०७१८.००५।।	नामदेव म्हणे नाम हें सुलभ । अभक्त दुर्लभ नानापरी
४३९७	।।ना.गा.०७१९.००१।।	अवघिया आचार निष्ठा । चित्त जरी जाय वैकुंठा । तरीच निस्तारिले कष्टां । भवपाशापासोनी
४३९८	।।ना.गा.०७१९.००२।।	धन्य धन्य चित्तवृत्ति । विठ्ठल भक्तीसी पुढत पुढती । त्याचे पूर्वज उद्धरती । गीत गाती रामकृष्ण
४३९९	।।ना.गा.०७१९.००३।।	हेंचि जप तप ध्यान । हरी चरणीं ठेवूनि मन । साधले कार्याचें कारण । रामकृष्ण उच्चारणीं
४४००	।।ना.गा.०७१९.००४।।	नामा जपे ठेऊनि चित्त । अखंड चरणीं जाला रत । पुरेल आमचे मनोरथ । सर्व कृतार्थ पैं जालों
४४०१	।।ना.गा.०७२०.००१।।	सर्वांमाजीं सार नाम हे देवांचें । सर्व साधनांचें सार जें कां
४४०२	।।ना.गा.०७२०.००२।।	चार साहा आणिक आठरा वर्णिती । नामें निजप्राप्ती अर्धक्षणीं
४४०३	।।ना.गा.०७२०.००३।।	व्यासादिक नाम साधियलें दृढ । प्रपंच काबाड निरसेल
४४०४	।।ना.गा.०७२०.००४।।	नामदेव म्हणे निजधाम ब्रह्म । घेतां नेम धर्म सर्व साधे
४४०५	।।ना.गा.०७२१.००१।।	मन करी आपुलें वासना ते वारी । सर्व हेंचि हरी भजत जाय
४४०६	।।ना.गा.०७२१.००२।।	ब्रह्मनाम गोविंद नाहीं भेदाभेद । तुटे भवबंध हरी नामें
४४०७	।।ना.गा.०७२१.००३।।	सांडी लगबग न करी तूं आळस । विठ्ठलीं विश्वास असों देणें
४४०८	।।ना.गा.०७२१.००४।।	नामा म्हणे ब्रह्म हेंचि निरूपण । सर्व काम पूर्ण याच्या नामें
४४०९	।।ना.गा.०७२२.००१।।	व्रत तप दान हवन पूजन । न लगे साधन नाम म्हणतां
४४१०	।।ना.गा.०७२२.००२।।	रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी । जिव्हे क्षणभरी न विसंबें
४४११	।।ना.गा.०७२२.००३।।	कळिकाळ दारुण करीतसे विघ्न । परजी नारायण नाम जिव्हे
४४१२	।।ना.गा.०७२२.००४।।	शरण आलों जिव्हे तुवां नुपेक्षावें । नामा म्हणे गावों हरिनाम
४४१३	।।ना.गा.०७२३.००१।।	नित्य सर्वगत अखंड सगुण । केशवाचें ध्यान करी ब्रह्म
४४१४	।।ना.गा.०७२३.००२।।	ब्रह्मा सर्वकाळ सांगे साधूपाशी । आणिक हे शेषीं तेंचि मानी
४४१५	।।ना.गा.०७२३.००३।।	मनीं जो मानसीं नामामृत सार । सेविती सादर नामा म्हणे
४४१६	।।ना.गा.०७२४.००१।।	नामाचा धारक विष्णुरूप देख । वैकुंठीचें सुख रुळे पायीं

४४१७	।।ना.गा.०७२४.००२।।	निराकार देव आकारासी आला । भक्तीं पैं स्थापिला नामरूपा
४४१८	।।ना.गा.०७२४.००३।।	नाममंत्र बीज जोंवरी नाहीं जया । तोंवरी केशवदया नाहीं प्राप्त
४४१९	।।ना.गा.०७२४.००४।।	नामा म्हणे नाम केशव केवळ । जाणती प्रेमळ हरीभक्त
४४२०	।।ना.गा.०७२५.००१।।	सदा पैं परिपूर्ण जयाचें रूपडें । तेथेंचि माजीवडे मन करी
४४२१	।।ना.गा.०७२५.००२।।	होईल उद्धार सुटेल संसार । सर्व मायापूर दुरी होय
४४२२	।।ना.गा.०७२५.००३।।	कांठाळा कायेचा दुरावा मायेचा । हेंचि जप वाचा स्मरे नाम
४४२३	।।ना.गा.०७२५.००४।।	नामा म्हणे करी सर्व हरी हरी । राम हें उत्तरीं वाखाणी पां
४४२४	।।ना.गा.०७२६.००१।।	रकार मकार बांधी कां रे तुळीं । तापत्रय होळी होऊनि जाय
४४२५	।।ना.गा.०७२६.००२।।	गोविंद मुकुंद हरि परमानंद। कृष्ण केशव छंद नित्य वाचे
४४२६	।।ना.गा.०७२६.००३।।	जपे जगद्‌बंधु हरिकथा छंदू । बिघडे भवबंधु येणें मात्रें
४४२७	।।ना.गा.०७२६.००४।।	नामा म्हणे केशवा न करी निर्वाण । माझा अभिमान आहे त्यासी
४४२८	।।ना.गा.०७२७.००१।।	जन्माचें कारण रामनाम पाठें । जाईजे वैकुंठें एक हेळां
४४२९	।।ना.गा.०७२७.००२।।	रामनाम ऐसा जिव्हे उमटे ठसा । तो उद्धरेल अपैसा इहलोकीं
४४३०	।।ना.गा.०७२७.००३।।	दो अक्षरीं राम हा जप परम । नलगे तुज नेम नाना पंथ
४४३१	।।ना.गा.०७२७.००४।।	नामा म्हणे पवित्र श्रीरामाचें चरित्र । उद्धरसि गोत्र पूर्वजेंसी
४४३२	।।ना.गा.०७२८.००१।।	गोविंद गोपाळ वाचेसि निखळ । तो उद्धरे तात्काळ कलिमाजीं
४४३३	।।ना.गा.०७२८.००२।।	नारायण नारायण हेंचि पारायण । उद्धरले जन इहलोकीं
४४३४	।।ना.गा.०७२८.००३।।	तुटती यातना कर्माच्या भावना । जड जीव उद्धरणा नाम स्मरा
४४३५	।।ना.गा.०७२८.००४।।	नामा म्हणे राम हा जप परम । न लगती नेम नानाकोटी
४४३६	।।ना.गा.०७२९.००१।।	शंभु उपदेशी भवानीसी । रामनाम जपे मानसीं
४४३७	।।ना.गा.०७२९.००२।।	दोन्हीं अक्षरें रसाळें । महा पातकां करी निराळें
४४३८	।।ना.गा.०७२९.००३।।	बीजमंत्र रामनाम । फळ शतकोटी रामायण
४४३९	।।ना.गा.०७२९.००४।।	नामा विनवितो रघुनंदना । विनंती परिसा दशरथनंदना
४४४०	।।ना.गा.०७३०.००१।।	संसार पाल्हाळ सांगसी परिकर । नाम तें श्रीधर न म्हणसी
४४४१	।।ना.गा.०७३०.००२।।	कैसें तुज उद्धरण होईल गव्हारा । भजन त्या हरीहरा करी वेगीं
४४४२	।।ना.गा.०७३०.००३।।	योनी नानाविधा पावसी आपदा । हाचि खेळ सदा स्मरतोसि

४४४३	।।ना.गा.०७३०.००४।।	नामा म्हणे लटिकें प्रपंचासी मुके। राम हेंचि मुखें जप करी
४४४४	।।ना.गा.०७३१.००१।।	नामावांचूनि कांहीं दुजें येथें नाहीं । वेगीं लवलाही राम जपा
४४४५	।।ना.गा.०७३१.००२।।	गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ । पावसी केवळ निजपद
४४४६	।।ना.गा.०७३१.००३।।	धृव प्रल्हाद बळी अंबऋषि प्रबुद्ध । नामेंचि विद्गद पावले देखा
४४४७	।।ना.गा.०७३१.००४।।	नामा म्हणे राम वाचे जया नाम । संसाराचे श्रम हरे नामें
४४४८	।।ना.गा.०७३२.००१।।	गाणें गाती रे सुगडें । तया हांसती दुधडें
४४४९	।।ना.गा.०७३२.००२।।	नाम गोड नाम गोड । होय जन्माचा निवाड
४४५०	।।ना.गा.०७३२.००३।।	हांसे त्यासी हांसूं द्यावें । गात आपण असावें
४४५१	।।ना.गा.०७३२.००४।।	नामा म्हणे जे हांसती । त्यांचीं कुळें नरका जाती
४४५२	।।ना.गा.०७३३.००१।।	नाम एकचि तारक । रामनामें शुद्ध मुख । येणें उद्धरती तिन्ही लोक । कुळांसहित वैकुंठ
४४५३	।।ना.गा.०७३३.००२।।	धन्य धन्य तें कुळ। रामनामें नित्य निर्मळ । जो उच्चारी सर्वकाळ । धन्य जन्म तयाचा
४४५४	।।ना.गा.०७३३.००३।।	एक हरी एक तत्त्व। तेथें धरोनियां शुद्ध सत्त्व । नाना काय करिसी कवित्व । राम नाम उच्चारी
४४५५	।।ना.गा.०७३३.००४।।	नामा जपे नाम मंत्र । हातीं न घे आणिक शस्त्र । रामकृष्ण हें वक्त्र । उच्चार इतुकेचि पुरे आम्हां
४४५६	।।ना.गा.०७३४.००१।।	तूं तंव नेणता परी हरी जाणता । आहे तो समता सर्वांभूतीं
४४५७	।।ना.गा.०७३४.००२।।	सर्व ब्रह्म हरी येकचि निर्धार । होसील झडकरी ब्रह्म तूंचि
४४५८	।।ना.गा.०७३४.००३।।	अच्युत माधव अमृताच्या पाठें । लागतांचि वाटे वंदी यम
४४५९	।।ना.गा.०७३४.००४।।	नामा म्हणे होसील जिवलग विष्णूचा । दास त्या हरीचा आवडता
४४६०	।।ना.गा.०७३५.००१।।	न लगती कथा व्युत्पत्ति उलथा । वाउग्या चळथा ग्रंथाचिया
४४६१	।।ना.गा.०७३५.००२।।	हरी हरी भजन जनीं जनार्दन। सर्वत्रीं समान भूतदया
४४६२	।।ना.गा.०७३५.००३।।	भावेंचि भजावें हरीतें पूजावें । नित्य हें सेवावें रामनाम
४४६३	।।ना.गा.०७३५.००४।।	नामा म्हणे गोड नको तें हें वाड । विठ्ठलाचें वेड इतुकें पुरे
४४६४	।।ना.गा.०७३६.००१।।	मंत्राचा पैं मंत्र हरी हरी उच्चार । न लागे तो विचार करणें कांहीं
४४६५	।।ना.गा.०७३६.००२।।	सुफळ नाम गाढें वाचेसि उच्चारूं । केशव हाचि करूं सर्वांभूतीं
४४६६	।।ना.गा.०७३६.००३।।	नाहीं यासी पतन न होईल बंधन । नित्य हेंचि स्नान रामनामें
४४६७	।।ना.गा.०७३६.००४।।	नामा म्हणे भाव सर्वांभूतीं करा। आणिक पसारा घालूं नका
४४६८	।।ना.गा.०७३७.००१।।	नाचतां उठतां रडतां पडतां । नाम्या अवचितां हातां आला

४४६९	।।ना.गा.०७३७.००२।।	येतां जातां हरी हरी हरी वाटे। नाम तें चोखटें स्मरा मुखीं
४४७०	।।ना.गा.०७३७.००३।।	हसता खेळतां घरीं दारीं पारीं । मुखीं हरी हरी म्हणे कां रे
४४७१	।।ना.गा.०७३७.००४।।	खातां जेवितां अन्नतृप्ति सारी । सांडी मांडी हरि सर्व काळ
४४७२	।।ना.गा.०७३७.००५।।	नामा म्हणे नामीं आस्ति नास्ति ठसा । केशव हरि सन्मुख तुम्हां दिसे
४४७३	।।ना.गा.०७३८.००१।।	करितां हरीकथा नाम सुखरासी । उद्धार जीवाशीं एका नामें
४४७४	।।ना.गा.०७३८.००२।।	तें हें रामनाम जप तूं सप्रेम । जय हा सुगम सुफळ सदा
४४७५	।।ना.गा.०७३८.००३।।	नामेचि तरले नामेंचि तरले । नाम म्हणतां गेले वैकुंठासी
४४७६	।।ना.गा.०७३८.००४।।	नामा म्हणे एक नामेंसी विनटे । ते वैकुंठीचे पेठे पावले देखा
४४७७	।।ना.गा.०७३९.००१।।	हरीविण देह मळीण सर्वथा । मंगळाची कथा रामकृष्ण
४४७८	।।ना.गा.०७३९.००२।।	कथा करी कोणी ऐकती जे जन। वैकुंठभुवन हातां आलें
४४७९	।।ना.गा.०७३९.००३।।	वेदशास्त्रां सार नामाचा उच्चार । अंतीं पैल पार दाखवितो
४४८०	।।ना.गा.०७३९.००४।।	जन्मोनियां जगीं अलिप्त असावें । नाम तें स्मरावें म्हणे नामा
४४८१	।।ना.गा.०७४०.००१।।	हरि रे वाढवेळ झाला। कोण्या भक्ताने गोंविला
४४८२	।।ना.गा.०७४०.००२।।	झडकरी येई गा विठ्ठला। कंठ आळवितां शोषिला
४४८३	।।ना.गा.०७४०.००३।।	प्राण केव्हां येईल माझा। आलिंगील चहूं भुजा
४४८४	।।ना.गा.०७४०.००४।।	नामा गहिंवरें दाटला। पूर धरणीये लोटला
४४८५	।।ना.गा.०७४१.००१।।	विष्णुनाम श्रेष्ठ गाताती देवऋषी । नाम अहर्निशीं गोपाळाचें
४४८६	।।ना.गा.०७४१.००२।।	हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरी। वसे चराचरीं जनार्दन
४४८७	।।ना.गा.०७४१.००३।।	आदि ब्रह्म हरी आळवी त्रिपुरारी । उमेप्रती करी उपदेश
४४८८	।।ना.गा.०७४१.००४।।	नामा म्हणे पूर्ण हा जप उत्तम । शंकरासी नेम दिननिशीं
४४८९	।।ना.गा.०७४२.००१।।	सर्वकाळ पुण्याच्या राशी । हरिनाम आलिया जिव्हेसी । नित्य तप अनुष्ठानाच्या राशी । कोटी यज्ञासी लाभ जाला
४४९०	।।ना.गा.०७४२.००२।।	धन्य धन्य त्याचा वंश । जे जे रतले नामास । रामनामीं नित्य सौरस । ते विष्णुदास पवित्र
४४९१	।।ना.गा.०७४२.००३।।	पवित्र ते स्वधर्मी । ज्यांसी सर्वकाळ नामीं । तयाचें नाम पूर्णकामी । मनोरथ पुरतील
४४९२	।।ना.गा.०७४२.००४।।	नामा जपे नाम हरीचें । सार्थक केलें संसाराचें । ओझें फेडिलें पूर्वजन्माचें । हरीस्मरण केलिया
४४९३	।।ना.गा.०७४३.००१।।	नामीं नारायण । होय भक्तांचे आधीन
४४९४	।।ना.गा.०७४३.००२।।	न मागतां भक्ति । नामापासीं चारी मुक्ती

४४९५	।।ना.गा.०७४३.००३।।	भुलों नये जाण । नाम वैकुंठीं निशाण
४४९६	।।ना.गा.०७४३.००४।।	नामा म्हणे ऐसे प्राणी । सम होती नारायणीं
४४९७	।।ना.गा.०७४४.००१।।	सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ । वंदी कळिकाळ शास्त्र सांगे
४४९८	।।ना.गा.०७४४.००२।।	ब्रह्मांडनायक ऐसें जें कवतुक । तेंचि नाम एक श्रीकृष्ण ऐसें
४४९९	।।ना.गा.०७४४.००३।।	आदी अंत पाहतां नाहीं पैं सर्वथा । परिपूर्ण सरिता अमृताची
४५००	।।ना.गा.०७४४.००४।।	नामा म्हणे कां करिसी संकेत । उद्धरिले पतित युगायुगीं
४५०१	।।ना.गा.०७४५.००१।।	आतां आहे नाहीं पाहतां क्षण एक । संपत्तीचें सुख विषय हा
४५०२	।।ना.गा.०७४५.००२।।	हित तें आचरा हित तें विचारा । नामीं भाव धरा जाणतेनों
४५०३	।।ना.गा.०७४५.००३।।	संपत्तीच्या बळें एक जाले आंधळे । वेढिलें कळिकाळें स्मरण नाहीं
४५०४	।।ना.गा.०७४५.००४।।	एक विद्यावंत जातीच्या अभिमानें। नेले तमोगुणें रसातळा
४५०५	।।ना.गा.०७४५.००५।।	मिथ्या माया करोनि मोह हव्यास । वेंचिलें आयुष्य वायांविण
४५०६	।।ना.गा.०७४५.००६।।	नामा म्हणे कृपा करुनि ऐशा जीवा । सोडवी केशवा मायबाप
४५०७	।।ना.गा.०७४६.००१।।	आम्ही विठोबाचे दूत । यम आणूं शरणागत
४५०८	।।ना.गा.०७४६.००२।।	मुखें नाम हातें टाळी । महापापा करूं होळी
४५०९	।।ना.गा.०७४६.००३।।	करूं हरिनामाचा घोष । कुंभपाक पाडूं ओस
४५१०	।।ना.गा.०७४६.००४।।	करूं हरीकथा कीर्तन । तोडूं यमाचें बंधन
४५११	।।ना.गा.०७४६.००५।।	एवढा प्रताप नामाचा । रिघ नव्हे कळिकाळाचा
४५१२	।।ना.गा.०७४६.००६।।	ऐसा नामा यशवंत । विठोबाचा शरणागत
४५१३	।।ना.गा.०७४७.००१।।	ज्यासी विन्मुख संसार । तो करी मोक्षाचा विचार
४५१४	।।ना.गा.०७४७.००२।।	आम्ही पंढरीचे लाठे । नवजो वैकुंठींचे वाटे
४५१५	।।ना.गा.०७४७.००३।।	सांडोनी पंढरीची वारी । मोक्ष मागतो भिकारी
४५१६	।।ना.गा.०७४७.००४।।	जन्मोजन्मींचा आळसी । तो मुक्तीतें अभिलाषी
४५१७	।।ना.गा.०७४७.००५।।	ताट ओगरिलें निकें । सांडोनी कोण जाय भिके
४५१८	।।ना.गा.०७४७.००६।।	जो कां नेणे नामगोडी । तो मुक्तीतें चरफडी
४५१९	।।ना.गा.०७४७.००७।।	नामा म्हणे विष्णुदासा । झणीं भ्याला गर्भवासा
४५२०	।।ना.गा.०७४८.००१।।	हरीकथा श्रवण श्रवणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें

४५२१	।।ना.गा.०७४८.००२।।	तीर्थाचें सुख चरणाचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
४५२२	।।ना.गा.०७४८.००३।।	पूजनाचें सुख कराचेनि द्वारें । माझिया दातारें केशवें दिलें
४५२३	।।ना.गा.०७४८.००४।।	नामा म्हणे ऐसे जयाचे उपकार । तो विठ्ठल दातार विसरले
४५२४	।।ना.गा.०७४९.००१।।	ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म । गवसे परब्रह्म नामें एका
४५२५	।।ना.गा.०७४९.००२।।	लहान थोरांसी करितों प्रार्थना। दृढ नारायणा मनीं धरा
४५२६	।।ना.गा.०७४९.००३।।	सर्वांप्रति माझ्या हेचि पैं विनंती । आठवा श्रीपति आपुलें मनीं
४५२७	।।ना.गा.०७४९.००४।।	केशव नारायण करावें आचमन । तेचि संध्या स्नान कर्म तया
४५२८	।।ना.गा.०७४९.००५।।	नामा म्हणे हेंचि करा नित्य भजन । ब्रह्मार्पण साधन याचे पायीं
४५२९	।।ना.गा.०७५०.००१।।	नव्हे तुज हित विषय पोशितां । हरि हरि म्हणतां तरशील
४५३०	।।ना.गा.०७५०.००२।।	माधव श्रीहरी कृष्ण नरहरी । वेगीं हा उच्चारी लवलाही
४५३१	।।ना.गा.०७५०.००३।।	घडतील यज्ञ पापें होतील भग्न । प्रपंच सर्वज्ञ होईल ब्रह्म
४५३२	।।ना.गा.०७५०.००४।।	नामा म्हणे हरिकथा हरी भवव्यथा । उद्धरसी सर्वथा भाक माझी
४५३३	।।ना.गा.०७५१.००१।।	ब्राह्मण हो शूद्र वैश्य नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य
४५३४	।।ना.गा.०७५१.००२।।	नामाविण गति नाहीं हो आणीक। वैकुंठनायक बोले मुखें
४५३५	।।ना.गा.०७५१.००३।।	परि तेंचि नाम पाहावें शोधून । चौऱ्यांशीं खाणी चुके तेव्हां
४५३६	।।ना.गा.०७५१.००४।।	नामदेव म्हणे सद्गुरुपासोनी । नाम घ्या शोधूनि भावमुक्त
४५३७	।।ना.गा.०७५२.००१।।	सदाशिवापुढें कोण अनुष्ठानी । अष्टांग लावूनि नमस्कारी
४५३८	।।ना.गा.०७५२.००२।।	नाम यज्ञ जप ऋषीश्वर ध्याती। शीतळ ते होती काळकूट
४५३९	।।ना.गा.०७५२.००३।।	सर्वांमाजीं श्रेष्ठ नाम कलियुगीं । रामकृष्ण जगीं नामनौका
४५४०	।।ना.गा.०७५२.००४।।	नामा म्हणे नाम अखंडित स्मरा । पांडुरंग धरा भजा वेगीं
४५४१	।।ना.गा.०७५३.००१।।	ब्रह्मांडनायक विश्वाचा गोसावी । तो केला पांडवीं म्हणियारा
४५४२	।।ना.गा.०७५३.००२।।	भावाचा लंपट भक्तां पराधीन । सोडोनी अभिमान दास्य करी
४५४३	।।ना.गा.०७५३.००३।।	भाजीचिया पाना संतोषला हरि । जयाचे उदरीं चौदा भुवनें
४५४४	।।ना.गा.०७५३.००४।।	जनक श्रुतिदेवें धरियेला करीं। दोघांचिये घरीं घेतो पूजा
४५४५	।।ना.गा.०७५३.००५।।	पुंडलिकें वीट बैसावया नीट । तेथें भूवैकुंठ वसतें केलें
४५४६	।।ना.गा.०७५३.००६।।	नामा म्हणे शरण रिघतां एक्याभावें । कैवल्य भोगावें नाममात्रें

४५४७	।।ना.गा.०७५४.००१।।	केशव कैवल्य कृपाळ । नारायणें उद्धरिला अजामेळ । माधव मनीं धरा निश्चळ । गोविंद गोपाळ गोकुळींचा
४५४८	।।ना.गा.०७५४.००२।।	विष्णु विश्वाचा जिव्हाळा । मधुसूदन माउली सकळां । त्रिविक्रमें रक्षिलें गोवळा । वामनें पाताळीं बळी नेला
४५४९	।।ना.गा.०७५४.००३।।	श्रीधरें धरा धरिली पृष्ठीं । हृषिकेश उभा भीवरेतटीं । पद्मनाभ पुंडलिकासाठीं। दामोदरें गोष्टी पांडवाशीं
४५५०	।।ना.गा.०७५४.००४।।	संकर्षणें अर्जुनासी संवाद केला । वासुदेवें अवचितां वालि वधिला । प्रद्युम्न समुद्रावरी कोपला । अनिरुद्धें छेदिला सहस्रबाहो
४५५१	।।ना.गा.०७५४.००५।।	पुरुषोत्तमें केला पुरुषार्थ । अधोक्षजे हिरण्यकश्यपा मारिली लाथ । नरहरि प्रल्हादा रक्षित । स्मरावा अच्युत स्वामी माझा
४५५२	।।ना.गा.०७५४.००६।।	जनार्दनें रावणादि वधिले । उपेंद्रें अहिल्येसी उद्धरिलें । हरि हरि म्हणतां दोष जळाले । कृष्णें तारिलें गणिकेसी
४५५३	।।ना.गा.०७५४.००७।।	या चोवीस नामांचें करितां स्मरण । जन्ममरणांचें होय दहन ।विष्णुदास नामा करी चिंतन । चरण ध्यान मज देईं
४५५४	।।ना.गा.०७५५.००१।।	येऊनि संसारा । हित वेगीं विचारा
४५५५	।।ना.गा.०७५५.००२।।	स्मरा हृषिकेशी । तो नेईल परलोकासी
४५५६	।।ना.गा.०७५५.००३।।	गणिका नाम उच्चारी वाचे । जन्ममरण चुकलें तिचें
४५५७	।।ना.गा.०७५५.००४।।	अजामेळ पापराशी । नामें पावला मोक्षासी
४५५८	।।ना.गा.०७५५.००५।।	दूध मागों गेलें लेकरूं । तया दिधला क्षीरसागरू
४५५९	।।ना.गा.०७५५.००६।।	सापत्नी धुरू दवडिला । तो अढळपदीं बैसविला
४५६०	।।ना.गा.०७५५.००७।।	गजेंद्र स्मरत तांतडी । त्याची चुकविली सांकडीं
४५६१	।।ना.गा.०७५५.००८।।	नामा म्हणे नामबळें । उद्धरती कोटी कुळें
४५६२	।।ना.गा.०७५६.००१।।	हरीनाम गातां पवित्र । सेविती हरिहर ब्रह्मादिक
४५६३	।।ना.गा.०७५६.००२।।	नाम तारी नाम साहाकारी । नामें उच्चारी रूपें तुझीं
४५६४	।।ना.गा.०७५६.००३।।	ऐसीं अनंत नामें तुझीं न वर्णवती देवा । नामा म्हणे केशवा विनवितसे
४५६५	।।ना.गा.०७५७.००१।।	नाम घेतां भगवंताचें । पाश तुटती भवाचे
४५६६	।।ना.गा.०७५७.००२।।	जे जे नामीं रत जाले । ते ते केशवीं तारिले
४५६७	।।ना.गा.०७५७.००३।।	गणिका दुराचारी । नामें तारिली अहिल्या नारी
४५६८	।।ना.गा.०७५७.००४।।	महापापी अजामेळ । तोही तारिला चांडाळ
४५६९	।।ना.गा.०७५७.००५।।	नामें गजेंद्र तारिला । देवें मोक्षपदासी नेला
४५७०	।।ना.गा.०७५७.००६।।	नाम घेतसे पांचाळी । उभा बाप वनमाळी
४५७१	।।ना.गा.०७५७.००७।।	नामा सांगे भाविकांसी । नाम घ्या रे अहर्निशीं
४५७२	।।ना.गा.०७५८.००१।।	कुटिल कुबुद्धि कुपात्र कठोरी । अंगिकारी हरि अश्वत्थामा

४५७३	।।ना.गा.०७५८.००२।।	अश्वत्थामा अंबऋषि दुर्योधन। शेवटीं अर्जुन हितकारी
४५७४	।।ना.गा.०७५८.००३।।	मानी भावभक्ति आश्चर्य सकळ । शंकर शीतळ होय नामें
४५७५	।।ना.गा.०७५८.००४।।	नामा म्हणे आधीं नाममंत्र घोका । नाहीं भय धोका किमपिही
४५७६	।।ना.गा.०७५९.००१।।	नामाचा प्रताप काय सांगूं वाचे । अक्षय सुखाचें स्थान दावी
४५७७	।।ना.गा.०७५९.००२।।	नामाविण कांहीं नाहीं नाहीं सार। साधावें सत्वर भले नोहे
४५७८	।।ना.गा.०७५९.००३।।	अजामेळ पाहा आजन्म पातकी । नामें गेला सेखीं वैकुंठासी
४५७९	।।ना.गा.०७५९.००४।।	कुंटिणी जारिणी शुकामिसें गाय । वैकुंठासी जाय तत्क्षणीं
४५८०	।।ना.गा.०७५९.००५।।	पाहा वाल्ह्या कोळी उफराट्या नामें । भविष्य संभ्रमें वाखाणिलें
४५८१	।।ना.गा.०७५९.००६।।	नामा म्हणे किती सांगावा निर्धार । साधन सोपारें नाम एक
४५८२	।।ना.गा.०७६०.००१।।	नाम न म्हणे आवडी । व्यर्थ वाचे बडबडी
४५८३	।।ना.गा.०७६०.००२।।	जिव्हा नव्हे ती वाचक । भोगी आळसें नरक
४५८४	।।ना.गा.०७६०.००३।।	करी आरालिया निंदा । परी न म्हणे गोविंदा
४५८५	।।ना.गा.०७६०.००४।।	असत्या आवडी । सदा वाचेसी रोकडी
४५८६	।।ना.गा.०७६०.००५।।	निंदेवांचूनि पातक । सत्या जाणा माझी भाक
४५८७	।।ना.गा.०७६०.००६।।	गर्जे नामाचे पवाडे । पायां कळिकाळ पडे
४५८८	।।ना.गा.०७६०.००७।।	निज सहज चैतन्य । नामा म्हणे नाम जाण
४५८९	।।ना.गा.०७६१.००१।।	जयासी लागली रामनामाची गोडी । त्यानें केली प्रौढी परमार्थाची
४५९०	।।ना.गा.०७६१.००२।।	कलिमाजीं नाम सुलभ सोपारें । यालागीं आदर नामीं धरा
४५९१	।।ना.गा.०७६१.००३।।	आणिक साधनें आहे ती उदंड । सेवितां वितंड कष्ट तेथें
४५९२	।।ना.गा.०७६१.००४।।	सोवळें ओवळें उंच नीच वर्ण । नाहीं येथें गुणदोष कांहीं
४५९३	।।ना.गा.०७६१.००५।।	नामा म्हणे सर्व सिद्धांताचा भाव । प्राणियांचें दैव कोण जाणे
४५९४	।।ना.गा.०७६२.००१।।	नाम जींही उच्चारण केलें । तींही वैकुंठ साधिलें । भवसागर पार पावले । उद्धरले हरिभक्त
४५९५	।।ना.गा.०७६२.००२।।	नाम दुर्लभ दुर्लभ । तारील हा पद्मनाभ । पुंडलिकें करोनियां स्वयंभ । केशव मूर्ति केली उभी
४५९६	।।ना.गा.०७६२.००३।।	ऐसें अगाध हरी रूपडें । प्रत्यक्ष पुंडलिकापुढें । भक्ती काज कैवाडें । भीमातीरीं उभा असे
४५९७	।।ना.गा.०७६२.००४।।	वर्णावया न पुरे शेष । वेदां न घालवे कास । तेथें शास्त्र काय घेती भाष । रूप वर्णावया हरीचें
४५९८	।।ना.गा.०७६२.००५।।	उद्धव अक्रूर द्वापारीं । त्यासवें खेळले हरि । मग ते उद्धरिले अवधारी । ज्ञान देऊनि श्रीकृष्णें

४५९९	।।ना.गा.०७६२.००६।।	नामा म्हणे ऐसें नाम । हरिकथेसी धरी प्रेम । तरी तुझा धन्य जन्म । मनुष्य जन्मीं असतां
४६००	।।ना.गा.०७६३.००१।।	हरीनाम पाठ हाचि भाव । हरि हरि हाचि देव । हरीविण न फिटे संदेह । सर्व जिवांचा जाण पां
४६०१	।।ना.गा.०७६३.००२।।	हरीतत्व ज्याचे देहीं । तोचि तरला येथें पाही । हरीविण या डोहीं । भवसागर कैसा तरेल
४६०२	।।ना.गा.०७६३.००३।।	रामकृष्ण वासुदेवा । हाचि सर्व जिवांचा विसावा । तेथे पोकारूनिया धांवा । विठ्ठलनाम उच्चारी
४६०३	।।ना.गा.०७६३.००४।।	नामा जपे हृदयीं सदा । रामकृष्ण हाचि धंदा । हरीराम परमानंदा । हाचि जप जपतसे
४६०४	।।ना.गा.०७६४.००१।।	भवाब्धि तारण रामकृष्ण नांव । रोहिणीची माव सकळ दिसे
४६०५	।।ना.गा.०७६४.००२।।	नाम हेंचि थोर नाम हेंचि थोर । वैकुंठीं बिढार रामनामें
४६०६	।।ना.गा.०७६४.००३।।	नाम हे निशाणी जपतांची अढळ । वैकुंठ तत्काळ तया जीवा
४६०७	।।ना.गा.०७६४.००४।।	नामा म्हणे वैकुंठ नामेंचि जोडेल । अंतीं तुज पावेल नाम एक
४६०८	।।ना.गा.०७६५.००१।।	तप तीर्थ दान हें सर्व कुवाड । नाम एक वाड केशवाचें
४६०९	।।ना.गा.०७६५.००२।।	मुमुक्षु साधकीं सदा नाम गावें । तेणेंचिया व्हावें अखंडित
४६१०	।।ना.गा.०७६५.००३।।	विपत्तीचें बळें न होतां विन्मुख । नाममात्र एक धरा वाचे
४६११	।।ना.गा.०७६५.००४।।	जीवन्मुक्त शुक मुनि धृवादिक । तयासी आणिक ध्यास नाहीं
४६१२	।।ना.गा.०७६५.००५।।	नामयाची वाणी अमृताची खाणी । घ्यावी आतां धणी सर्वत्रांही
४६१३	।।ना.गा.०७६६.००१।।	केशव नाम गाय माधव नाम गाय । विठ्ठल नाम गाय कामधेनु
४६१४	।।ना.गा.०७६६.००२।।	वेणुनादीं चरे पाणी पी भीवरें। ती गाय हंबरे भक्तांलागीं
४६१५	।।ना.गा.०७६६.००३।।	भक्तीसुखें धाय प्रेमें तें पान्हाय । भुकेलिया खाय पातकासी
४६१६	।।ना.गा.०७६६.००४।।	नामा म्हणे गाय पंढरीसी आहे । पापिया न साहे पाठीं लागे
४६१७	।।ना.गा.०७६७.००१।।	आदरें जपतां केशवाचे नाम । वैकुंठ हे धाम पाया पडे
४६१८	।।ना.गा.०७६७.००२।।	आणिक सायास करूनि कदापि। चौऱ्यांशींच्या सिंपीं गुंफीं नका
४६१९	।।ना.गा.०७६७.००३।।	याजसाठीं हरिनाम निरंतरीं । तारील निर्धारीं भाक माझी
४६२०	।।ना.गा.०७६७.००४।।	भावभक्ती क्रिया नलगे आणिक । कीर्तन तारक म्हणे नामा
४६२१	।।ना.गा.०७६८.००१।।	केशव म्हणतां क्लेश जाताती परते । त्याहुनि सरतें आणिक नाहीं
४६२२	।।ना.गा.०७६८.००२।।	वेद कां पढसी शास्त्रें कां शिणसी । उदंड वाचेसी हरी म्हणा
४६२३	।।ना.गा.०७६८.००३।।	याहुनि पैं सार नाहीं हो दुसरें । भीष्में युधिष्ठिर उपदेशिला
४६२४	।।ना.गा.०७६८.००४।।	नामा म्हणे धरा केशवीं विश्वास । तुटे गर्भवास नामें एकें

४६२५	।।ना.गा.०७६९.००१।।	शेतीं बीज नेतां थोडें । मोटे आणिताती गाडे
४६२६	।।ना.गा.०७६९.००२।।	एक्या नामें हरि जोडे । फिटे जन्माचें सांकडें
४६२७	।।ना.गा.०७६९.००३।।	बाळें भोळे जन । सर्व तरती कीर्तनें
४६२८	।।ना.गा.०७६९.००४।।	नामा म्हणे नेणें मूढें । नाम स्मरावें साबडें
४६२९	।।ना.गा.०७७०.००१।।	तोडीं हें बिरडें मोह ममता आधीं । विषय बाधा कधीं गुंफों नको
४६३०	।।ना.गा.०७७०.००२।।	असे घराश्रमीं भजे सर्वांभूतीं । मी माझें पुढतीं म्हणों नको
४६३१	।।ना.गा.०७७०.००३।।	तूं तंव लटिका आलासी कोठुनि । मी माझें म्हणोनि म्हणतोसी
४६३२	।।ना.गा.०७७०.००४।।	नामा म्हणे मूळ राम परब्रह्म । जगाचा विश्राम त्यासी भजे
४६३३	।।ना.गा.०७७१.००१।।	मी म्हणतां अहंता होईल पूर्णता । भजन सर्वथा न घडे येणें
४६३४	।।ना.गा.०७७१.००२।।	आपुलें आपण विचारावें मनें । हरि हाचि पूर्ण भजे कारे
४६३५	।।ना.गा.०७७१.००३।।	हेंचि भजन थोर करी निरंतर । नाम हें सधर मनें गिळी
४६३६	।।ना.गा.०७७१.००४।।	नामा म्हणे अपार नाम पारावार । श्रीराम सुंदर जप करी
४६३७	।।ना.गा.०७७२.००१।।	विषय खटपट आचार सांगसी । विठ्ठलीं न भजसी अरे मूढा
४६३८	।।ना.गा.०७७२.००२।।	पूर्णब्रह्म हरि विठ्ठल श्रीहरी। अंतीं हा निर्धारीं तारील सत्य
४६३९	।।ना.गा.०७७२.००३।।	न लगे सायास करणें उपवास । रामाचा विश्‍वास ऐसा धरी
४६४०	।।ना.गा.०७७२.००४।।	नामा म्हणे प्रेम धरी तूं सप्रेम । विठ्ठल हाचि नेम दिननिशीं
४६४१	।।ना.गा.०७७३.००१।।	एकांत एकला सर्व आहे हरि । ऐसेंचि अहर्निशीं ध्यायिजे तूं
४६४२	।।ना.गा.०७७३.००२।।	सर्वांभूतीं विठ्ठल आहे आहे साचे । हें तंव वेदींचे वचन जाण
४६४३	।।ना.गा.०७७३.००३।।	मार्ग हाचि सोपा गेले मुनिजन । जनीं जनार्दन हाचि भावो
४६४४	।।ना.गा.०७७३.००४।।	नामा म्हणे नाम मंत्र उच्चारण । सर्वही कारण होईल तुझें
४६४५	।।ना.गा.०७७४.००१।।	उपदेश सुगम आईक रे एक । नाम हे सम्यक विठ्ठलाचें
४६४६	।।ना.गा.०७७४.००२।।	जनीं जनार्दन भावचि संपन्न । विठ्ठल उद्धरण कलीमाजीं
४६४७	।।ना.गा.०७७४.००३।।	साधेल निधान पुरेल मनोरथ । नामेंचि कृतार्थ होसी जना
४६४८	।।ना.गा.०७७४.००४।।	नामा म्हणे नाम घेई तूं झडकरी । पावसी निर्धारीं वैकुंठपद
४६४९	।।ना.गा.०७७५.००१।।	एकचि क्षरलें एकचि देखिलें । ब्रह्म हें संचलें हरीनामें
४६५०	।।ना.गा.०७७५.००२।।	एक एकाकार सर्वही आकार । राम हा साकार सर्वांघटीं

४६५१	।।ना.गा.०७७५.००३।।	असोनी निराळा सुमनाचा वास । तैसा हृषिकेश जीवां सकळां
४६५२	।।ना.गा.०७७५.००४।।	नामा म्हणे सुमन कळिकाळें एक । तेंचि निजसुख घेई जना
४६५३	।।ना.गा.०७७६.००१।।	प्रसन्न वदन सदा वेळीं आहे । कां करिसी उपाव कर्म जाड
४६५४	।।ना.गा.०७७६.००२।।	मंत्रांचा पैं मंत्र बीज नाम हरीचें। तेंचि हें शिवाचें रामनाम
४६५५	।।ना.गा.०७७६.००३।।	तुटेल भवकंद जासील निजपंथें । झणीं तूं दुश्चितें करिसी चित्त
४६५६	।।ना.गा.०७७६.००४।।	नामा म्हणे भजन सर्व हरीचें करी । होईल बोहरी प्रपंचाची
४६५७	।।ना.गा.०७७७.००१।।	एकतत्त्व हरि निर्धार तूं धरी । प्रपंच बोहरी एका नामें
४६५८	।।ना.गा.०७७७.००२।।	अच्युत गोविंद परमानंद छंद । नित्य तो आल्हाद हरिनामीं
४६५९	।।ना.गा.०७७७.००३।।	ऐसा तूं विनटे हरि नामपाठें । जासील वैकुंठें नश्वरता
४६६०	।।ना.गा.०७७७.००४।।	नामा म्हणे तत्त्व नाम गोविंदाचें । हेंचि धरी साचें येर वृथा
४६६१	।।ना.गा.०७७८.००१।।	शरीर संपत्ती मायेचें टवाळ । वायांची पाल्हाळ मिरवितोसी
४६६२	।।ना.गा.०७७८.००२।।	नाम हेंचि तारी विठ्ठल निर्धारीं । म्हणे हरि हरि एकी हेळा
४६६३	।।ना.गा.०७७८.००३।।	स्मरतां गोपाळनाम वंदील काळयम । न लगती नेम मंत्रबाधा
४६६४	।।ना.गा.०७७८.००४।।	नामा म्हणे सार मंत्र तो उत्तम । राम हेंचि नाम स्मरें कां रे
४६६५	।।ना.गा.०७७९.००१।।	सर्वांमाजीं सार नाम श्रीहरीचें । अखंडित वाचे जप करी
४६६६	।।ना.गा.०७७९.००२।।	निशिदिनीं हृदयीं ध्यातो शूळपाणि। पाविजे निर्वाणीं मोक्षपद
४६६७	।।ना.गा.०७७९.००३।।	नामा म्हणे ऐसें स्मरे कां निधान । पावेल सदन वैकुंठींचें
४६६८	।।ना.गा.०७८०.००१।।	विठ्ठलासी पाहे विठ्ठलासी ध्याये । विठ्ठलासी गाये सर्वकाळ
४६६९	।।ना.गा.०७८०.००२।।	विठ्ठल हा वृत्ति विठ्ठल जपणें । चित्त वित्त मनें सर्वकाळ
४६७०	।।ना.गा.०७८०.००३।।	सबाह्य विठ्ठल दाटे घनवट । दशदिशा अफाट विठ्ठलचि
४६७१	।।ना.गा.०७८०.००४।।	नामा म्हणे तुम्ही विठ्ठल होऊन । अभंग भजन करीतसां
४६७२	।।ना.गा.०७८१.००१।।	सार पैं नाम विठ्ठलाचें आहे । दिननिशीं सोय मना लावी
४६७३	।।ना.गा.०७८१.००२।।	गुंपेजेल मन जोडती पाउलें । तुटती घेतलें मायाजाळ
४६७४	।।ना.गा.०७८१.००३।।	नामचि कारण जप पैं सफळ । उद्धार निर्मळ सकळ जीवां
४६७५	।।ना.गा.०७८१.००४।।	नामा म्हणे तो हा विठ्ठल पंढरिये । नाम अमृतमय चराचरीं
४६७६	।।ना.गा.०७८२.००१।।	विठ्ठलनामीं आळस न करी गव्हारा । वायांचि वेरझारा शिणतोसी

४६७७	।।ना.गा.०७८२.००२।।	हरी उच्चारण करी हा विचार । नामचि साचार उद्धरण
४६७८	।।ना.गा.०७८२.००३।।	मी म्हणतां अहंता वाढे हे सर्वथा । परी भजनापरता नाहीं मार्ग
४६७९	।।ना.गा.०७८२.००४।।	मायाजाळ विषय तोडी तोडी सांठा। विठ्ठलनाम पाठा वोळगे जना
४६८०	।।ना.गा.०७८२.००५।।	सर्व हें लटिके मोहजाळ फिकें । नामेंविण एके नाहीं दुजें
४६८१	।।ना.गा.०७८२.००६।।	नामा म्हणे उपदेश भजे केशवास । वैकुंठनिवास वोळगे तुज
४६८२	।।ना.गा.०७८३.००१।।	तुझें तुज सांकडें पडलें थोर कोडें । तें करी माजीवडें ब्रह्मार्पण
४६८३	।।ना.गा.०७८३.००२।।	ब्रह्म हरि ध्याई मन ठेवीं ठायीं। विठ्ठलाच्या पायीं दिननिशीं
४६८४	।।ना.गा.०७८३.००३।।	अनुभवग्रहणीं विठ्ठल निशाणी । घडेल पर्वणी नित्यकाळ
४६८५	।।ना.गा.०७८३.००४।।	नामा म्हणे सुघड मन करी वाड । इंद्रियांची चाड धरूं नको
४६८६	।।ना.गा.०७८४.००१।।	नामाचेनि पाठें जातील वैकुंठें । तो पुंडलिक पेठे प्रगट असे
४६८७	।।ना.गा.०७८४.००२।।	विठ्ठल विठ्ठल मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाहीं शस्त्र नामेंविण
४६८८	।।ना.गा.०७८४.००३।।	पुराण व्युत्पत्ति न लगती त्या श्रुती । हरिनाम पंथीं मुनि गेले
४६८९	।।ना.गा.०७८४.००४।।	नामा म्हणे हरि नामेंचि उद्धरी। जन्माची वेरझारी हरे नाम
४६९०	।।ना.गा.०७८५.००१।।	ज्याचे मुखीं नाम तोचि एक धन्य । त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं
४६९१	।।ना.गा.०७८५.००२।।	नामसंकीर्तन नित्य नाम वाचे । दहन पापाचें एका नामें
४६९२	।।ना.गा.०७८५.००३।।	ऐसा जो अखंड जपे रामनाम । नाहीं तयासम दुजें कोणी
४६९३	।।ना.गा.०७८५.००४।।	नामा म्हणे नाम विठ्ठलाचें जपा । हाचि मार्ग सोपा परब्रह्मीं
४६९४	।।ना.गा.०७८६.००१।।	सकळ साधनांचें सार । रामकृष्ण हा उच्चार
४६९५	।।ना.गा.०७८६.००२।।	म्हणा गोविंद नरहरी । सकळ जीवां तोचि तारी
४६९६	।।ना.गा.०७८६.००३।।	नाम घेतां हरी माधव । तरताती सकळ जीव
४६९७	।।ना.गा.०७८६.००४।।	नामा म्हणे केशव वाचे । धन्य जीवित वैष्णवांचें
४६९८	।।ना.गा.०७८७.००१।।	रामकृष्ण माळ घालीं कां अढळ । तुटेल भवजाळ मायामोह
४६९९	।।ना.गा.०७८७.००२।।	होशील तूं साधु न पवसी बाध। पूर्ण ब्रह्मानंद पावेल तुज
४७००	।।ना.गा.०७८७.००३।।	जपतां रामनाम पुरती सर्व काम । आदि अंतीं नेम साधेल तुज
४७०१	।।ना.गा.०७८७.००४।।	नामा म्हणे कृतार्थ पूर्ण मनोरथ । न लगती ते अर्थ मायाफांसे
४७०२	।।ना.गा.०७८८.००१।।	नको नको माया सांडी लवलाह्या । पुढील उपाया झोंबे कां रे

४७०३	।।ना.गा.०७८८.००२।।	रामनाम म्हणे तुटेल बंधन। भवबंधमोचन एका नामें
४७०४	।।ना.गा.०७८८.००३।।	स्मरतां पतित उद्धरले यथार्थ । नाम हाचि स्वार्थ तया जाला
४७०५	।।ना.गा.०७८८.००४।।	नामा म्हणे जप करी तूं अमूप । नामें चुकली खेप इये जनीं
४७०६	।।ना.गा.०७८९.००१।।	करी हें कीर्तन राम नारायण । जनीं जनार्दन हेंचि देखे
४७०७	।।ना.गा.०७८९.००२।।	जगाचा जनक रामकृष्ण एक । न करितां विवेक स्मरें राम
४७०८	।।ना.गा.०७८९.००३।।	तुटेल भवजाळ कां करिसी पाल्हाळ । सर्व मायाजाळ इंद्रियबाधा
४७०९	।।ना.गा.०७८९.००४।।	नामा म्हणे गोविंद स्मरें तूं सावध । नव्हे तुज बाध नानाविघ्नें
४७१०	।।ना.गा.०७९०.००१।।	तपाचें पैं राम हें अमूप । करी कां रे जप रामनामीं
४७११	।।ना.गा.०७९०.००२।।	रामकृष्ण म्हणे वाचे नारायण । तुटेल बंधन यमपाश
४७१२	।।ना.गा.०७९०.००३।।	साधेल साधन होती कोटी यज्ञ । नाम जनार्दन जप करी
४७१३	।।ना.गा.०७९०.००४।।	नामा म्हणे जिव्हे नामस्मरण करी । म्हणे नरहरि एकभावें
४७१४	।।ना.गा.०७९१.००१।।	म्हणा श्रीराम जयराम । भवसिंधु तारक नाम
४७१५	।।ना.गा.०७९१.००२।।	नाम पतितपावन । नाम जीवांचें साधन
४७१६	।।ना.गा.०७९१.००३।।	नाम शिवाचें ध्यान । नाम नारदा गायन
४७१७	।।ना.गा.०७९१.००४।।	नामा म्हणे हरिचें नाम । नाम तारक परब्रह्म
४७१८	।।ना.गा.०७९२.००१।।	सोपा हा सुगम उपावो परीस । धरीं तूं विश्वास नाममहिमें
४७१९	।।ना.गा.०७९२.००२।।	नाम हेंचि गंगा नाम हेंचि भीमा। अंतरीं श्रीरामा जपिजेसू
४७२०	।।ना.गा.०७९२.००३।।	अमृत सुरस रामनाम एक । वाचेचें वाचक मन करी
४७२१	।।ना.गा.०७९२.००४।।	नामा म्हणे सुरस सेवी सुधारस । ध्यायी केशवास दिननिशीं
४७२२	।।ना.गा.०७९३.००१।।	भावेंचि भजन जनीं जनार्दन । नित्य हें वचन रामनाम
४७२३	।।ना.गा.०७९३.००२।।	खुंटतील योनी तुटेल यातना । भक्ति नारायणा पावेल तुझी
४७२४	।।ना.गा.०७९३.००३।।	स्मरे सदा कारें न लगती पाल्हाळ । वसिजे गोपाळ सर्वांभूतीं
४७२५	।।ना.गा.०७९३.००४।।	नामा म्हणे ब्रह्म सर्व हरि । येकु चराचरीं जनार्दन
४७२६	।।ना.गा.०७९४.००१।।	सर्वांभूतीं भजन हेंचि पैं चोखडें । ब्रह्म माजीवडे करोनि घेई
४७२७	।।ना.गा.०७९४.००२।।	सफळ सर्वदा जप हा गोविंदा। न पावाल आपदा नाना योनी
४७२८	।।ना.गा.०७९४.००३।।	नाम संजीवनी अमृत सरिता । परिपूर्ण भरिता सिंधु ऐसा

४७२९	।।ना.गा.०७९४.००४।।	नामा म्हणे चोखडें नाम हेंचि गाढें । चुकवील कोडें जन्ममरण
४७३०	।।ना.गा.०७९५.००१।।	जळाचा जळबिंदु जळींच तो विरे । तैसे हें विघरे पांचा ठायीं
४७३१	।।ना.गा.०७९५.००२।।	जीव शिव हे उच्चार नाम हें मधुर । जिव्हेसी उच्चार रामनाम
४७३२	।।ना.गा.०७९५.००३।।	रामनाम तारक शिव षडाक्षरी । तैसा वाचा करी अरे मूढा
४७३३	।।ना.गा.०७९५.००४।।	नामा म्हणे ध्यान शिवाचें उत्तम । मंत्र हा परम रामनाम
४७३४	।।ना.गा.०७९६.००१।।	निसुगा निदसुरा झणीं तू बा होसी । नाम हृषिकेशी घालीं मुखीं
४७३५	।।ना.गा.०७९६.००२।।	गोविंद हरे कृष्ण विष्णु हरे। अच्युत मुरारे जनार्दन
४७३६	।।ना.गा.०७९६.००३।।	करितां नामपाठ चुकती भवजाळ । तुटेल तें जाळें मायामोह
४७३७	।।ना.गा.०७९६.००४।।	नामा म्हणे ऐसा उपाव सुगम । दिननिशीं नेम राम म्हणे
४७३८	।।ना.गा.०७९७.००१।।	केशवाचे प्रतापें गोसावी होसी । दास्यत्व करोनि सर्वस्व पोशी
४७३९	।।ना.गा.०७९७.००२।।	अर्जुनाचा सारथी बळीचा सांगाती । द्रौपदीच्या आकांतीं धांवोनी पावे
४७४०	।।ना.गा.०७९७.००३।।	चातका जलधरू मच्छा जीवन नीरू । प्रल्हादा कैवारू दास म्हणोनी
४७४१	।।ना.गा.०७९७.००४।।	नामा म्हणे तुम्ही न करा आळसु । नाम मंत्र दिवसु अभ्यासिजे
४७४२	।।ना.गा.०७९८.००१।।	कां करितोसी शीण वाचे नारायण । जपतां समाधान होईल तुज
४७४३	।।ना.गा.०७९८.००२।।	रामकृष्ण हरी गोविंद गोविंद । वाचेसी हा छंद नामपाठ
४७४४	।।ना.गा.०७९८.००३।।	वंदितील यम कळिकाळ सर्वदा । न पवसी आपदा असतां देहीं
४७४५	।।ना.गा.०७९८.००४।।	नामा म्हणे वोळगे सीण जाला सांगें । प्रपंच वाउगे टाकी परतें
४७४६	।।ना.गा.०७९९.००१।।	पांडुरंगें प्राप्त होईल सकळ । चरणकमळ ध्यारे मनीं
४७४७	।।ना.गा.०७९९.००२।।	मनी आळस न करावा कधीं । नाम घ्या रे आधीं केशवाचें
४७४८	।।ना.गा.०७९९.००३।।	केशवाचें नाम पावन पवित्र । महाभाष्यसूत्र हेंचि सांगे
४७४९	।।ना.गा.०७९९.००४।।	नामा म्हणे तुम्हीं करावें कीर्तन । पंढरीचें ध्यान चुकों नका
४७५०	।।ना.गा.०८००.००१।।	केशव नारायण हा जप आमुचा । सर्व हा मंत्राचा आत्माराम
४७५१	।।ना.गा.०८००.००२।।	माधव गोविंद सर्वशास्त्रीं आहे। उभारूनियां बाहे वेदु सांगे
४७५२	।।ना.गा.०८००.००३।।	नामाचेनि पाठें तरूं हा भवसागरू । आणिक विचारू नेणों आम्ही
४७५३	।।ना.गा.०८००.००४।।	विष्णु मधुसूदन हें दैवत आमचें । नित्य पैं नामाचें सार आम्हां
४७५४	।।ना.गा.०८००.००५।।	त्रिविक्रम वामन सर्व ब्रह्मांडनायकु । हाचि जप सम्यकु आम्हां घटीं

४७५५	।।ना.गा.०८००.००६।।	श्रीधर हृषिकेष मंत्रराज जपा । पावाल स्वरूपा विष्णुचिया
४७५६	।।ना.गा.०८००.००७।।	पद्मनाभ दामोदर हा नामाचा विस्तार । करितां विचार तरले जीव
४७५७	।।ना.गा.०८००.००८।।	संकर्षण वासुदेव पंढरीचा राणा । सांगितल्या खुणा खेचररायें
४७५८	।।ना.गा.०८००.००९।।	प्रद्युम्न अनिरुद्ध दैवत कुळीचें । पुंडलिकें तयाचें तपसार
४७५९	।।ना.गा.०८००.०१०।।	पुरुषोत्तम अधोक्षज वैकुंठ निर्मळ । जपतां सकळ पापें जाती
४७६०	।।ना.गा.०८००.०११।।	नरसिंह अच्युत नामाचें कवच । जपतां होय वेंच संसारासी
४७६१	।।ना.गा.०८००.०१२।।	जनार्दन उपेंद्र नाम हें अमृत । शंकर निवांत जपे सदा
४७६२	।।ना.गा.०८००.०१३।।	हरी कृष्ण विष्णु सर्व घटी नांदे । तोचि पैं आल्हाद उच्चारजेसु
४७६३	।।ना.गा.०८००.०१४।।	ऐसा नाम महिमा उपदेश गोमटा । नामेंचि वैकुंठा भक्त गेले
४७६४	।।ना.गा.०८००.०१५।।	नामा म्हणे ते मूर्ति पंढरिये गोमटी । नामें उठाउठी भेटी देसी
४७६५	।।ना.गा.०८०१.००१।।	माया पुरातनु तूंचि वो जननी । नाम संजीवनी विठ्ठल वो
४७६६	।।ना.गा.०८०१.००२।।	तेंचि हें वोळलें पूर्ण प्रेम आम्हां । लोलंगित ब्रह्मा पंढरिये
४७६७	।।ना.गा.०८०१.००३।।	धांव पाव वेगीं येई संभाळी तूं । नाम हा संकेतु पांडुरंगें
४७६८	।।ना.गा.०८०१.००४।।	क्षुधा तृषा आशा तुजलागीं चिंतिती । जीवन हें मागुती नाम तुझें
४७६९	।।ना.गा.०८०१.००५।।	अनंत अच्युत नाम हेंचि नित्य । तेणें कृतकृत्य प्राण माझा
४७७०	।।ना.गा.०८०१.००६।।	नामा म्हणे देवा तूं जीवन आमुचें । आतां मज कैचें क्रियाकर्म
४७७१	।।ना.गा.०८०२.००१।।	मायेचा कळवळा मायाची जाणे । तैसें मी तान्हें माऊलिये
४७७२	।।ना.गा.०८०२.००२।।	विठ्ठल श्रीरंग डोळस प्रसन्न । नित्य अमृतघन वोळला सदा
४७७३	।।ना.गा.०८०२.००३।।	जननी जनक तूंचि वो मुकुंद । नाम हें गोविंद शुद्धरसु
४७७४	।।ना.गा.०८०२.००४।।	येई वो केशवे नित्य नामरूपें । मी तुज आलापें आळवित
४७७५	।।ना.गा.०८०२.००५।।	माधवा श्रीधरा वेगीं येई त्वरें । मज वो नावरे प्रेमवेधु
४७७६	।।ना.गा.०८०२.००६।।	नामा म्हणे तूं जीवन आमुचें । नित्य केशवाचें प्रेम मज
४७७७	।।ना.गा.०८०३.००१।।	केशवासी पाहे केशवासी ध्याये । केशवासी गाये सर्वकाळ
४७७८	।।ना.गा.०८०३.००२।।	केशव पैं हाचि वृत्तीसहित मन। केशवासी ध्यान सर्वकाळ
४७७९	।।ना.गा.०८०३.००३।।	सबाह्यअंतरीं सांडिना कोणासी । जाणें अंतरासी साक्ष भूत
४७८०	।।ना.गा.०८०३.००४।।	नामा म्हणे तुम्हीं केशव होऊनि । पंढरीं पाटणीं नांद बापा

४७८१	।।ना.गा.०८०४.००१।।	वेदाचें महिमान जनीं जनार्दन । आणिक वचन तेथें नाहीं
४७८२	।।ना.गा.०८०४.००२।।	भूतीं दया धरा भक्तिभाव करा । भजन हरिहरां वेद सांगे
४७८३	।।ना.गा.०८०४.००३।।	सर्व हेंचि सार ब्रह्ममय खरें । आणिक दुसरें न दिसे आम्हां
४७८४	।।ना.गा.०८०४.००४।।	नामा म्हणे समर्थ वेद तो आमुचा । सांगे नित्य जपा रामकृष्ण
४७८५	।।ना.गा.०८०५.००१।।	पाहतां ये परिपाठी आणिक नाहीं सृष्टि । नामेंविण दृष्टि न दिसे माझे
४७८६	।।ना.गा.०८०५.००२।।	नामचि समर्थ नामचि मथित । शंकरासी हेत रामनामीं
४७८७	।।ना.गा.०८०५.००३।।	पुरती सर्व काम वाचे रामनाम । न लगती ते नेम कर्मजाळ
४७८८	।।ना.गा.०८०५.००४।।	नामा म्हणे उच्चार न करी तूं विचार । तुटेल वेरझार नाना योनी
४७८९	।।ना.गा.०८०६.००१।।	साधन साधितां होताती आपदा । म्हणोनि गोविंदा स्मरे कां रे
४७९०	।।ना.गा.०८०६.००२।।	कृष्णकथा सार सांगे कां सधर । तुटेल येरझार जन्ममरणा
४७९१	।।ना.गा.०८०६.००३।।	निष्फळ निखळ भावीं तूं सफळ । भजन केवळ सर्वांभूतीं
४७९२	।।ना.गा.०८०६.००४।।	नामा म्हणे भक्ति होईल विरक्ति । तुटेल यातायाती जन्ममरण
४७९३	।।ना.गा.०८०७.००१।।	भवसिंधुचा पार तरे तो पोहणार । बळिया परम धीर भजनशील
४७९४	।।ना.गा.०८०७.००२।।	नामची सांगडी लावूनि कासे । दृढ प्रेमरस वोसंडती
४७९५	।।ना.गा.०८०७.००३।।	सत्वाचा सुभट असंग एकट । वैराग्य उद्‍भट निर्वासन
४७९६	।।ना.गा.०८०७.००४।।	कामक्रोध जेणें घातले तोडरीं । निर्दाळिले वैरी लोभदंभ
४७९७	।।ना.गा.०८०७.००५।।	रजतमाचे जेणें तोडिले अंकुर । केला अहंकार देशधडी
४७९८	।।ना.गा.०८०७.००६।।	नामा म्हणे जया नामीं अनुसंधान । तोचि परम धन्य त्रिभुवनीं
४७९९	।।ना.गा.०८०८.००१।।	भवसिंधुचा पार तरावयालागीं । साधन कलियुगीं आणिक नाहीं
४८००	।।ना.गा.०८०८.००२।।	अहर्निशीं नाम जपा श्रीरामाचें। सफळ धर्माचें मुगुटमणी
४८०१	।।ना.गा.०८०८.००३।।	न चले वर्णाश्रम धर्म आचरण । न घडे व्रत दान तप कोणा
४८०२	।।ना.गा.०८०८.००४।।	नव्हे तीर्थाटन पुराण श्रवण । नव्हे ब्रह्मज्ञान शास्त्रबोध
४८०३	।।ना.गा.०८०८.००५।।	नव्हे ध्यान स्थिती भावेंविण वोजा । न घडे देवपूजा एकनिष्ठ
४८०४	।।ना.गा.०८०८.००६।।	नामा म्हणे नाम राघोबाचें गातों । ब्रह्म सायोज्यता घर रिघे
४८०५	।।ना.गा.०८०९.००१।।	तुटे मायाजाळ विघडे भवसिंधु । जरी लागे छंदू हरिनामाचा
४८०६	।।ना.गा.०८०९.००२।।	येर कर्मधर्म करितां या कलीं। माजी कोण बळी तरला सांगा

४८०७	।।ना.गा.०८०९.००३।।	न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा
४८०८	।।ना.गा.०८०९.००४।।	नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान । करावी सोपान कृष्णकथा
४८०९	।।ना.गा.०८०९.००५।।	न साधे हा योग न करवे वैराग्य । साधा भक्ति भाग्य संतसंगें
४८१०	।।ना.गा.०८०९.००६।।	नामा म्हणे साधन न लगे आणिक । दिधली मज भाक पांडुरंगें
४८११	।।ना.गा.०८१०.००१।।	पंढरीचा राजा उभा भक्तकाजा । उभारूनि भुजा वाट पाहे
४८१२	।।ना.गा.०८१०.००२।।	घ्या रे नाम सुखें प्रेमें अलौकिक। साधनें आणिक करूं नका
४८१३	।।ना.गा.०८१०.००३।।	मनाचेनि मनें हृदयीं मज धरा । वाचेनें उच्चारा नाम माझें
४८१४	।।ना.गा.०८१०.००४।।	बोलोनियां ऐसा उभा भीमातीरीं । नामा निरंतरीं चरणापाशीं
४८१५	।।ना.गा.०८११.००१।।	हरिहर ब्रह्मा इंद्रादिक देव । इच्छिताती सर्व पायधुळी
४८१६	।।ना.गा.०८११.००२।।	यांवरी गोपाळ आनंदें नाचती । भूषणें श्रीपती शोभायमान
४८१७	।।ना.गा.०८११.००३।।	पाहोनियां सुख आले सर्व देव । पंढरीचा राव पाहावया
४८१८	।।ना.गा.०८११.००४।।	नामा म्हणे मिषें गोपाळकाल्याचे। निरंतर वाचे घेत नाम
४८१९	।।ना.गा.०८१२.००१।।	वदनीं तुझें नाम अमृत संजीवनी । असतां चक्रपाणि भय कवण
४८२०	।।ना.गा.०८१२.००२।।	या जन्ममरणाची कायसी मग चिंता । तुझिया शरणागता पंढरीनाथा
४८२१	।।ना.गा.०८१२.००३।।	हृदयीं तुझे रूप बिंबलें साचार । तेथें कवण पार संसाराचा
४८२२	।।ना.गा.०८१२.००४।।	नामा म्हणे तुझें नाम वेळोवेळ । म्हणतां कळिकाळ पायां पडे
४८२३	।।ना.गा.०८१३.००१।।	नाहीं भक्ती नामीं चांडाळ पातकी । तोचि जाणावा लोकीं दुष्ट नष्ट
४८२४	।।ना.गा.०८१३.००२।।	प्रपंचीं कर्दमीं गढोनियां ठेले। न निघती बोले संताचिया
४८२५	।।ना.गा.०८१३.००३।।	काढितां त्या वाटे प्रपंचाचें दुःख । विषयाचें सुख हर्ष बहु
४८२६	।।ना.गा.०८१३.००४।।	पुत्र वित्त कांता मानी भरंवसा । पडे मोह फांसा जन्मवरी
४८२७	।।ना.गा.०८१३.००५।।	नामदेव म्हणे अंतीं आहे कोण । कळा नामाविण नानापरी
४८२८	।।ना.गा.०८१४.००१।।	नाम हें अमृत भक्तांसी लाधलें । आपण घेतलें बौध्यरूप
४८२९	।।ना.गा.०८१४.००२।।	नाम हें आळवा नाम हें आळवा। होईल दोहावा कामधेनु
४८३०	।।ना.गा.०८१४.००३।।	न बाधेल विघ्न प्रपंच हें भान । नाम हेंचि खूण वैकुंठीची
४८३१	।।ना.गा.०८१४.००४।।	नामा म्हणे जीव ब्रह्म असे सर्व । हा गीतेमाजीं भाव सांगितला
४८३२	।।ना.गा.०८१५.००१।।	आलिया संसारीं आत्माराम मुखीं । घेतलिया सुखी त्रिभुवनीं

४८३३	।।ना.गा.०८१५.००२।।	जपोनियां नाम आपुलेंचि आधीं । मग सोहंसिद्धि सर्व साधे
४८३४	।।ना.गा.०८१५.००३।।	सर्व हरि मग नाहीं दुजा भाव । प्रापंचिक गर्व दिसेचिना
४८३५	।।ना.गा.०८१५.००४।।	नामदेव म्हणे सर्वही साधनें । भासे जन वन परब्रह्म
४८३६	।।ना.गा.०८१६.००१।।	व्यापक तें नाम तेव्हांच होईल । जेव्हां ओळखेल मीपणासी
४८३७	।।ना.गा.०८१६.००२।।	आपुलेंचि नाम न ओळखिलें। व्यापक साधिलें जायेचिना
४८३८	।।ना.गा.०८१६.००३।।	आपुलीच ओळख आपणासी पडे । मग सर्वत्र जोडे नाम तेव्हां
४८३९	।।ना.गा.०८१६.००४।।	नामाविण नाम तेंचि होय विभ्रम । नामदेव म्हणे संतां पुसा
४८४०	।।ना.गा.०८१७.००१।।	आसनीं शयनीं जपतां चक्रपाणि । लाविली निशाणी वैकुंठींची
४८४१	।।ना.गा.०८१७.००२।।	नाहीं रे बंधन आम्हां हरिभक्तां । गीतीं गुण गातां राघोबाचि
४८४२	।।ना.गा.०८१७.००३।।	भवसिंधूची जिवा जाली पायवाट । जे गर्जती उद्भट नामघोष
४८४३	।।ना.गा.०८१७.००४।।	प्रेमें वोथरत हर्षे पिटूं टाळी । नाम हृदयकमळीं विठोबाचें
४८४४	।।ना.गा.०८१७.००५।।	नाहीं काया क्लेश न करी सायास । दृढ धरी विश्वास हरीनामीं
४८४५	।।ना.गा.०८१७.००६।।	नामा म्हणे साधन न लगे अनेक । दिली मज भाक पांडुरंगें
४८४६	।।ना.गा.०८१८.००१।।	राम मंत्राचिया आवर्ती । घडती जयासी पुढतोपुढती । त्याचा जन्म धन्य ये क्षितीं । सर्व कुळाशीं तारक
४८४७	।।ना.गा.०८१८.००२।।	राममंत्र आवडे जीवा । हाचि उद्धार सर्व जीवां । शिवासही विसावा । पार्वती सहित
४८४८	।।ना.गा.०८१८.००३।।	रामकृष्ण उच्चारे । तरती जड पामरें। ऐसें हें व्यासें निर्धारें । नानाग्रंथीं सांगितलें
४८४९	।।ना.गा.०८१८.००४।।	नामा जपे नाम मंत्र । आणिक नेणे नाना शास्त्र । रामनामें नित्य वक्त्र। हरी रंगें रंगलें
४८५०	।।ना.गा.०८१९.००१।।	हाचि नेम सारी साधेल तो हरि । नाम हें मुरारी अच्युताचें
४८५१	।।ना.गा.०८१९.००२।।	गोविंद हरे गोविंद हरे । यादव मुरारे रामनाम
४८५२	।।ना.गा.०८१९.००३।।	न लगती कथा नानाविध वार्ता । राघवाचें स्मरतां नाम वाचे
४८५३	।।ना.गा.०८१९.००४।।	नामा म्हणे राम आम्हां हाचि नेम । नित्य तो सप्रेम जप आम्हां
४८५४	।।ना.गा.०८२०.००१।।	विठोबाचे पाय जन्मोनि जोडावे । संबंधी तोडावे कामक्रोध
४८५५	।।ना.गा.०८२०.००२।।	ऐक्य सुख घ्यावें एकविध भावें । प्रेम न संडावें आवडीचें
४८५६	।।ना.गा.०८२०.००३।।	अनंत जन्मा यावें ऐसें भाग्य व्हावें । एक वेळां जावें पंढरीसी
४८५७	।।ना.गा.०८२०.००४।।	वृत्तिसहित मन पायींच ठेवावें । अद्वैत भोगावे प्रेमसुख
४८५८	।।ना.गा.०८२०.००५।।	देहीं देहभाव प्रकृति दंडावें । सांडणे सांडावे ओवाळुनी

४८५९	।।ना.गा.०८२०.००६।।	नामा म्हणे ऐसें घेतलें माझ्या जिवें । विठोबा पुरवावें आर्त माझें
४८६०	।।ना.गा.०८२१.००१।।	तुझाचि अहंकार तुजचि नाडील । मागुता मांडील संसारू हा
४८६१	।।ना.गा.०८२१.००२।।	सांडी सांडी मोहो विषय टवाळ । वाचेसी गोपाळ उच्चारी रे
४८६२	।।ना.गा.०८२१.००३।।	सर्व हे भुररे मायेचें घरकुलें । अहंकारें नाथिलें नानायोनी
४८६३	।।ना.गा.०८२१.००४।।	नामा म्हणे भजन हरीचें करीन । नित्य ते सेवीन चरणरज
४८६४	।।ना.गा.०८२२.००१।।	देहधर्म विहित करी । द्वैतभाव चित्तीं न धरी । सर्वाभूतीं नमस्कारी । एक आत्मा म्हणोनियां
४८६५	।।ना.गा.०८२२.००२।।	एक तत्त्व एक हरि । एकचि तो नमस्कारी । आदि अंतींचा नरहरि । सकळ कुळांसी तारील
४८६६	।।ना.गा.०८२२.००३।।	पवित्र त्याचेंचि कुळ । आचार त्याचाचि सुशीळ । अखंड जपे सर्वकाळ । रामकृष्ण नरहरि
४८६७	।।ना.गा.०८२२.००४।।	नामा जपे नाम मंत्र । अखंड हरि नाम सहस्र। हाचि आमुचा निज मंत्र । रामकृष्ण गोविंद
४८६८	।।ना.गा.०८२३.००१।।	सुलभ सोपारें नाम केशवाचें । आठवितां वाचे दोष जाती
४८६९	।।ना.गा.०८२३.००२।।	अनाथाचा सखा उभा नामापासीं। ऐसा तो प्रेमासी भुललासे
४८७०	।।ना.गा.०८२३.००३।।	जातिवंत आम्ही वेदाचें पाठक । तरी सर्व फिकें नामाविण
४८७१	।।ना.गा.०८२३.००४।।	नामा म्हणे नामीं रंगलें सतत। म्हणोनि अनंतें दिधली भेटी
४८७२	।।ना.गा.०८२४.००१।।	विसावा विश्वाचा जो प्राण जिवाचा । तोचि नित्य वाचा जपों आम्ही
४८७३	।।ना.गा.०८२४.००२।।	गोविंद वामन भावयुक्त भजन । सर्व जनार्दन हाचि भाव
४८७४	।।ना.गा.०८२४.००३।।	चैतन्य अचिंत्य नाम हेंचि सत्य । नित्यता कृतार्थ विठ्ठलनामें
४८७५	।।ना.गा.०८२४.००४।।	नामा म्हणे उद्धरण आणिक नाठवे । केशवचि सवें पुरे आम्हां
४८७६	।।ना.गा.०८२५.००१।।	राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान । रामें घडे यज्ञ कोटी देखा
४८७७	।।ना.गा.०८२५.००२।।	न लगती साधनें नाना मंत्र विवेक। रामनामीं सुख रंगीं कां रे
४८७८	।।ना.गा.०८२५.००३।।	नामा म्हणे नाम हेंचि वचन आम्हां । नित्य ती पौर्णिमा सोळा कळी
४८७९	।।ना.गा.०८२६.००१।।	शास्त्राचें हें सार वेदाचें गव्हर । उतरावया पार आणिक नाहीं
४८८०	।।ना.गा.०८२६.००२।।	विठ्ठल विठ्ठल म्हणा उघडा मंत्र जाणा। कळिकाळ अंकणा होईल तुम्हां
४८८१	।।ना.गा.०८२६.००३।।	न करावें खंडन खंडन उच्चारण । तप अनुष्ठान न लगे तुम्हां
४८८२	।।ना.गा.०८२६.००४।।	सिद्धीचें हें सार मुक्तीचें माहेर । उतरावया पार दुजें नाहीं
४८८३	।।ना.गा.०८२६.००५।।	विठ्ठलापरतें काय करिसी दैवत । परब्रह्म निरुतें पंढरीये
४८८४	।।ना.गा.०८२६.००६।।	सिद्धीचें सहज भक्तीचें हें बीज । केशवीं दिलें मज म्हणे नामा

४८८५	।।ना.गा.०८२७.००१।।	मुक्तिप्रद आहे एक विठ्ठल नाम । आतां क्रियाकर्म कवणालागीं
४८८६	।।ना.गा.०८२७.००२।।	राहें राहें तूं मना निवांत । ध्याई अखंडित नारायणा
४८८७	।।ना.गा.०८२७.००३।।	संतसमागम साधी हें साधन । पावसी निर्वाण नित्य सुख
४८८८	।।ना.गा.०८२७.००४।।	नामा म्हणे भज श्रीगुरुच्या पायीं । तरी वर्म ठायीं पडेल जाण
४८८९	।।ना.गा.०८२८.००१।।	करितां हे वेदाध्ययन ज्योतिष । नामाचा तो लेश न ये हातां
४८९०	।।ना.गा.०८२८.००२।।	बहुत व्युत्पत्ति सांगती पुराण । व्यर्थ तें स्मरण नाम नव्हे
४८९१	।।ना.गा.०८२८.००३।।	अनंत हें नाम जयांतुनि आलें । त्यांतचि विरालें जळीं जळ
४८९२	।।ना.गा.०८२८.००४।।	तें नाम सद्‌गुरुकृपेविण कोणा । साधितां साधेना जपें तपें
४८९३	।।ना.गा.०८२८.००५।।	नामदेव म्हणे स्वत: सिद्ध नाम । गुरुविण वर्म हातां न ये
४८९४	।।ना.गा.०८२९.००१।।	ज्ञान ध्यान जप तप साधन तें । नाम प्रत्ययातें न ये कोणा
४८९५	।।ना.गा.०८२९.००२।।	गुरुपदीं जावें आधीं हो शरण । मी हें माझें ओळखून घ्यावें नाम
४८९६	।।ना.गा.०८२९.००३।।	तयाचें तें मूळ पाहोनियां त्यांते । मिळवावें द्वैत अद्वैतातें
४८९७	।।ना.गा.०८२९.००४।।	द्वैत द्वैतातीत स्वयंभ संचलें । तेंचि नाम आलें त्रिभुवनीं
४८९८	।।ना.गा.०८२९.००५।।	नामदेव म्हणे परब्रह्म नाम । द्वैत क्रियाकर्म नाहीं तेथें
४८९९	।।ना.गा.०८३०.००१।।	सद्‌गुरुवांचुनी नाम न ये हातां । साधन साधितां कोटी गुणें
४९००	।।ना.गा.०८३०.००२।।	जैसा कांतेविण करणें संसार । तैसा हा व्यापार साधनांचा
४९०१	।।ना.गा.०८३०.००३।।	जंव सद्‌गुरु नाहीं केला भ्रतार । साधनविचार व्यर्थ गेला
४९०२	।।ना.गा.०८३०.००४।।	नामदेव म्हणे सद्‌गुरुपासोनी । नाम घ्या जाणोनी नाना कांही
४९०३	।।ना.गा.०८३१.००१।।	चंद्रभागातीरीं उभा राहिलासी । भक्तांचे मानसीं भाव मात्र
४९०४	।।ना.गा.०८३१.००२।।	काय पुंडलिकें केल्या तपरासी। जाणोनि मानसीं भावमात्रें
४९०५	।।ना.गा.०८३१.००३।।	भावेंविण देवा सर्वथा नातुडे । नेणती बापुडे बद्धजन
४९०६	।।ना.गा.०८३१.००४।।	नामा म्हणे माझें माहेर पंढरीं । भेटती महाद्वारीं संतजन
४९०७	।।ना.गा.०८३२.००१।।	देवाचे हे आत्मे ते जाणावे संत । त्यांचे पदीं रत सर्वभावें
४९०८	।।ना.गा.०८३२.००२।।	श्रीहरीची भेटी सहजचि होय । श्रम लया जाय जाला आधीं
४९०९	।।ना.गा.०८३२.००३।।	पापाचे पर्वत भस्म नामाग्नीनें । अभक्तासी हाण नामाविण
४९१०	।।ना.गा.०८३२.००४।।	नामदेव म्हणे नामाग्नीच्या पोटीं । नाना पाप कोटी दग्ध होती

४९११	।।ना.गा.०८३३.००१।।	अवघे ते दैवाचे विठ्ठल म्हणती वाचे । अवघे कुळ त्यांचें पुण्यवंत
४९१२	।।ना.गा.०८३३.००२।।	अवघेचि संसारीं जाणावे ते धन्य । ज्यांचें प्रेम पूर्ण पांडुरंगीं
४९१३	।।ना.गा.०८३३.००३।।	अवघा विठ्ठल भोगिती दिनरातीं । वोळगे किंकरवृत्ति नामा त्यांतें
४९१४	।।ना.गा.०८३४.००१।।	सर्वाभूतीं भज नमन करी संतां । नित्य त्या अच्युता स्मरण करी
४९१५	।।ना.गा.०८३४.००२।।	ऐसें भजनीं विनट सांपडेल वाट । रामकृष्ण नीट वैकुंठींची
४९१६	।।ना.गा.०८३४.००३।।	न लगती साधनें वायांचि बंधनें । एक नामें होणें चतुर्भुज
४९१७	।।ना.गा.०८३४.००४।।	नामा म्हणे थोर नामेंचि सधर । वैकुंठीं बिढार तयां भक्तां
४९१८	।।ना.गा.०८३५.००१।।	म्हणतां वाचे नाम वंदी तया यम । काळादिका सम वंदी तया
४९१९	।।ना.गा.०८३५.००२।।	ऐसें नाम श्रेष्ठ सकळांसी वरिष्ठ। उच्चारितां नीट वैकुंठ गाजे
४९२०	।।ना.गा.०८३५.००३।।	तो हा नाममहिमा वाखाणित ब्रह्मा । न कळे तया उपमा आदि अंतीं
४९२१	।।ना.गा.०८३५.००४।।	नामा म्हणे पाठें नामाचेनि वाटे। तरी प्रत्यक्ष प्रगटे विठ्ठल हरि
४९२२	।।ना.गा.०८३६.००१।।	म्हणे दीन बंधू तुम्ही सावध व्हावें । संतांशीं नमन नाम वाचे जपावें
४९२३	।।ना.गा.०८३६.००२।।	नामाविण साधन नाहीं या कलियुगीं। व्यर्थ श्रम होती पाहतां मतें
४९२४	।।ना.गा.०८३६.००३।।	मताभिमान करोनि तुम्ही जाल आड वाटां । अभिमानें ठकविलें नारदादि श्रेष्ठा
४९२५	।।ना.गा.०८३६.००४।।	आलिया जन्मास आतां न करी आळस । नामदेवालागीं सांगे जगन्निवास
४९२६	।।ना.गा.०८३७.००१।।	सकळ संतजन देखोनि नयनीं । टाळिया पिटोनी गाती नाम
४९२७	।।ना.गा.०८३७.००२।।	म्हणती धन्य भक्त निधडा वैष्णव । ब्रह्मादिकां माव न कळे याची
४९२८	।।ना.गा.०८३७.००३।।	कैसा ऋणिया केला पंढरीनाथ । आहे सदोदित याचेजवळी
४९२९	।।ना.गा.०८३७.००४।।	पूर्वी तो प्रल्हाद श्रवणीं ऐकिला। किंवा हा देखिला संतामधीं
४९३०	।।ना.गा.०८३७.००५।।	नामा येऊनियां चरणासी लागला । हृदयीं आलिंगिला भक्तराज
४९३१	।।ना.गा.०८३८.००१।।	ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरलें । उद्धरावया आले दीनजनां
४९३२	।।ना.गा.०८३८.००२।।	ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी। नाम घे वदनीं दोष जाती
४९३३	।।ना.गा.०८३८.००३।।	हो कां दुराचारी विषयीं आसक्त । संतकृपें त्वरित उद्धरतो
४९३४	।।ना.गा.०८३८.००४।।	अखंडित नामा त्याचा वास पाहे । निशिदिनीं ध्याय सत्संगती
४९३५	।।ना.गा.०८३९.००१।।	संतांचा महिमा कोण जाणे सीमा । सीणला हा ब्रह्मा बोलवेना
४९३६	।।ना.गा.०८३९.००२।।	संतांची हे कळा पाहतां न कळे । खेळोनियां खेळ वेगळाची

४९३७	।।ना.गा.०८३९.००३।।	संतांचिया पारा नेणें अवतारा । म्हणती याच्या पारा कोण जाणे
४९३८	।।ना.गा.०८३९.००४।।	नामा म्हणे धन्य धन्य भेट जाली । कल्पना निमाली संतापायीं
४९३९	।।ना.गा.०८४०.००१।।	कर्दळी फळ कर्पूर परिमळें भिन्न । परि दोहींचे जन्म ते एकत्र जाण । आत्मा कीं परमात्मा अभेद कीं भिन्न । चंद्र सोमकांत शून्य महाशून्य
४९४०	।।ना.गा.०८४०.००२।।	सूर्य सूर्यकांतु प्रकाश एकु । साधुसंत आरति रावो ना रंकु
४९४१	।।ना.गा.०८४०.००३।।	भ्रमरांच्या रुंजी मकरंद उधळती । असाध्य साधनीं लागल्या ज्योती । लयांचे लक्ष हरपली स्थिति । म्हणोनि साधुचरणीं नित्य पंचारती
४९४२	।।ना.गा.०८४०.००४।।	गोदेचा उगमु तो ठाईंच्या ठाईं । आणिकें उदकें तीं चाली प्रवाहीं । तैसी साधुसंत कृपा उन्मत्त देहीं । सागरा भेटली क्षीरसिंधु तेही
४९४३	।।ना.गा.०८४०.००५।।	सागराचें उदक जगा विनवित । निवळूनि मागुतें पूर्ण भरित। तैसें अंतरीचें नीर ओघें हे साधुसंत । परि सागरा अंतरीं न वर्णवे मुक्त
४९४४	।।ना.गा.०८४०.००६।।	तेथें अनुपम्या ऐकिजे शब्दाचि रचना । हें जाणतेनो जाणा अमृतखुणा । हें रत्न कीं माणिक ऐसें अनुमाना । तें पानबुडिया परसोबा लाधलें निधाना
४९४५	।।ना.गा.०८४०.००७।।	दुधावरील साय वरी साखर मेळवणी । जैसी जिव्हा लोधली मधु लागुनी । तेथील गौलता तें रहस्य लागलें ध्यानीं । तें परसोबा लाधलें येरां मूर्खां भुलवणी
४९४६	।।ना.गा.०८४०.००८।।	तापलें लोहो तेणें शेखियेलें जीवन । तैसें अंतरीं निवालें आपोआप आपण । परसा भागवत हें सकळांचे जीवन । विष्णुदास नामा त्याचे चरणीचे रजरेण
४९४७	।।ना.गा.०८४१.००१।।	वैष्णवा घरीं सर्वकाळ । सदा झणझणिती टाळ
४९४८	।।ना.गा.०८४१.००२।।	कण्या भाकरीचें खाणें । गांठीं रामनाम नाणें
४९४९	।।ना.गा.०८४१.००३।।	बैसावयासी कांबळा । द्वारीं तुळसी रंगमाळा
४९५०	।।ना.गा.०८४१.००४।।	घरीं दुभे कामधेनु । तुपावरी तुळसीपानु
४९५१	।।ना.गा.०८४१.००५।।	फराळासी पीठ लाह्या। वेळोवेळां पडती पायां
४९५२	।।ना.गा.०८४१.००६।।	नामा म्हणे नलगे कांही । चित्त रंगलें हरिचे पायीं
४९५३	।।ना.गा.०८४२.००१।।	रविरष्मि धरोनि स्वर्गीं जाऊं येईल । परि साधुसंगतीचा पार नकळे नकळे
४९५४	।।ना.गा.०८४२.००२।।	वैतरणी उतरोनि वैकुंठा जाऊं येईल । परि साधुसंगतीचा पार नकळे नकळे
४९५५	।।ना.गा.०८४२.००३।।	स्वप्नींचा ठेवा साचहि होईल । परि साधुसंगतीचा पार नकळे नकळे

४९५६	।।ना.गा.०८४२.००४।।	मायबाप बंधू भगिनी मिळे योनी । परि साधुची मिळणी भाग्ययोगें
४९५७	।।ना.गा.०८४२.००५।।	तपें व्रतें दानें गोविंद पैं भेटे । परि साधु तंव न भेटे भाग्येंविण
४९५८	।।ना.गा.०८४२.००६।।	नामा म्हणे केशवा बरा साधुसंग । या वेगळा भवरोग न तुटे न तुटे
४९५९	।।ना.गा.०८४३.००१।।	आजी महासुखें सृष्टी भरली भाग्यवंती । जालीसे विकृती पापा तापा
४९६०	।।ना.गा.०८४३.००२।।	चालिले देखोनि वैष्णव जगजेठी । उभविती वैकुंठीं गुडिया देव
४९६१	।।ना.गा.०८४३.००३।।	आले आलें रे हरिचे डिंगर । वीर वारीकरी पंढरीचे
४९६२	।।ना.गा.०८४३.००४।।	ज्याची चरणधुळी उधळे गगनपंथें । ब्रह्मादिकां तेथें जाली दाटी
४९६३	।।ना.गा.०८४३.००५।।	एकमेकांपुढें उडविती माथें । म्हणती आम्हातें लागो रज
४९६४	।।ना.गा.०८४३.००६।।	भक्ति प्रेमभाव भरले ज्यांच्या अंगीं । नाचती हरिरंगीं नेणताती लाजू
४९६५	।।ना.गा.०८४३.००७।।	हर्षे निर्भर चित्तीं आनंदें डोलती । हृदयीं कृष्णमूर्ति भेटों आली
४९६६	।।ना.गा.०८४३.००८।।	कोंदलें हरिरूप देखती विश्वाकार । सुटले पाझर नयन कमळीं
४९६७	।।ना.गा.०८४३.००९।।	गुढियां रोमांकुरी सात्त्विकें दाटले । गर्जती विठ्ठले नामघोष
४९६८	।।ना.गा.०८४३.०१०।।	मोरपिसा कुंचे भाट गरुड टके। भार ते नेटके मिरविताती
४९६९	।।ना.गा.०८४३.०११।।	तेथें केशवाचें नामें तनु हे तुळिका केली । पायघडी घातली हरिच्या दासा
४९७०	।।ना.गा.०८४४.००१।।	ध्वजा कुंचे गरुडटके । वैष्णव चालिले नेटिके
४९७१	।।ना.गा.०८४४.००२।।	आलें वैष्णवांचें दळ । भेणें पळे कळिकाळ
४९७२	।।ना.गा.०८४४.००३।।	तुळसी मंजरीचे भाले । देखोनि यमदूत पळाले
४९७३	।।ना.गा.०८४४.००४।।	ऐकोनी नामाचा गजर । प्रेमें डुल्लतसे शंकर
४९७४	।।ना.गा.०८४४.००५।।	नामा म्हणे भक्ति गाढी । सेवा न सोडी अर्ध घडी
४९७५	।।ना.गा.०८४५.००१।।	आला वैष्णवांचा मेळ । पळाला हो कळिकाळ
४९७६	।।ना.गा.०८४५.००२।।	आले आले हरिदास । कळिकाळावरी घाला कास
४९७७	।।ना.गा.०८४५.००३।।	कल्मशा पडियेला धाक । तो हि देऊं न शके हांक
४९७८	।।ना.गा.०८४५.००४।।	पैल नामा केशवाचा । सवें मेळू वैष्णवांचा
४९७९	।।ना.गा.०८४६.००१।।	भक्त केशवाचे आले । दूत यमाचे पळाले
४९८०	।।ना.गा.०८४६.००२।।	भक्त हरीचे चालिले । हातीं हरिनामाचें भाले
४९८१	।।ना.गा.०८४६.००३।।	तळपे शांतीचें ओढण । घेती स्वानंदें उड्डाण

४९८२	।।ना.गा.०८४६.००४।।	नामा म्हणे निजदास । कळिकाळाचे भरंवसे
४९८३	।।ना.गा.०८४७.००१।।	यम सांगू गेला वैकुंठा । देवा सांभाळा जी आपुल्या मठा । आम्ही नवजाऊं तयाचिया वाटां । वैष्णव दूत नागवती
४९८४	।।ना.गा.०८४७.००२।।	कुंभिपाक पडला ओस । दूतां लागला त्रास । देवा कोपेल महेश । म्हणोनी सांगावया आलों
४९८५	।।ना.गा.०८४७.००३।।	देवा तुम्ही एक वोखटें केलें । गंगेसि मृत्यूलोकासी पाठविलें । तेणें थोर कार्य नाशिले । हा प्रसाद गौतमाचा
४९८६	।।ना.गा.०८४७.००४।।	ऐसें वैष्णवदूतीं गांजिलों । तुजप्रति सांगावया आलों । देवें पाहिजे मना आणिजों । माझें साह्य करावें स्वामी
४९८७	।।ना.गा.०८४७.००५।।	विशेष शिंपी नामा । तो पंढरीये पुरुषोत्तमा । हाचि बोल ऐकूनि प्रेमा । त्याच्या शिवाणा न जावें
४९८८	।।ना.गा.०८४८.००१।।	यम सांगे दूतां कानीं । तुम्ही जातां मेदिनी । विष्णुभक्त चुकवूनि । येर बांधोनि आणा
४९८९	।।ना.गा.०८४८.००२।।	दूत सांगतां यमा । दिंडीपुढें चाले नामा । ते नागविती आम्हां । विष्णुदूत म्हणोनी
४९९०	।।ना.गा.०८४८.००३।।	जे नेणती धर्मवेळा । वाचे न उच्चारिती गोपाळा । तयांसि जाचवावें वेळोवेळां । एकविस कुळांसहित
४९९१	।।ना.गा.०८४८.००४।।	जे न करिती हरीची भक्ती । तयांसी जाचवावें पुढतां पुढतीं । रघुनाथनाम ज्याच्या कंठी । त्याच्या वाटे नवजावें
४९९२	।।ना.गा.०८४८.००५।।	दिंडी पताका गजर टाळघोषांचा । नाद उमटतो अंबरींचा । तेथें पाड नाहीं काळाचा । शिंपी नामा तळपतो केशवराया
४९९३	।।ना.गा.०८४९.००१।।	सांडोनि नित्य नेम कर्म । बोलती कळिकाळाचें वर्म
४९९४	।।ना.गा.०८४९.००२।।	नामधारक नामाचे । जाले डिंगर केशवाचे
४९९५	।।ना.गा.०८४९.००३।।	टाळ मृदंग वाजती । टके पताका शोभती
४९९६	।।ना.गा.०८४९.००४।।	कंठी तुळसीच्या माळा । वज्र पंजराचा टिळा
४९९७	।।ना.गा.०८४९.००५।।	शंख चक्र मुद्रा धरणें । अंगी मिरवती भूषणें
४९९८	।।ना.गा.०८४९.००६।।	संतरज उधळलें । तेणें सर्वांग डवरलें
४९९९	।।ना.गा.०८४९.००७।।	सहस्रनामें गर्जित । तेणें पळाले यमदूत
५०००	।।ना.गा.०८४९.००८।।	नामा म्हणे ते माझे सखे । स्वामी विठोबासारखे
५००१	।।ना.गा.०८५०.००१।।	वैष्णवांचे घरीं मांडिला पाहुणेर । नामाचा वोगर वाढियेला
५००२	।।ना.गा.०८५०.००२।।	घ्या रे ताटभरी जेवा धणीवरी । आनंद गजरीं रामनाम
५००३	।।ना.गा.०८५०.००३।।	होईल पाईरव दुर्जना न सांगावें । एकांतीं सेवावें नामा म्हणे
५००४	।।ना.गा.०८५१.००१।।	सर्वांभूतीं पाहे एक वासुदेव । पुसोनियां ठाव अहंतेचा
५००५	।।ना.गा.०८५१.००२।।	तोचि संतसाधु ओळखावा निका । येर ते ऐका मायाबद्ध
५००६	।।ना.गा.०८५१.००३।।	देखिलिया धन मृत्तिकेसमान । नवविधा रत्नें जैसे धोंडे
५००७	।।ना.गा.०८५१.००४।।	काम क्रोध दोघे घातले बाहेरी । शांति क्षमा घरीं राबवित

५००८	।।ना.गा.०८५१.००५।।	नामा म्हणे नाम गोविंदाचें वाचे । विसंबेना त्याचे क्षणमात्र
५००९	।।ना.गा.०८५२.००१।।	नावडे निजांगना शेजेवरी रुचेसी । कीं पतिसेजे जेविं व्यभिचारिणी अप्रीत जैसी
५०१०	।।ना.गा.०८५२.००२।।	गांधी विष संग्रहीत भक्षणाची नाहीं प्रीत । चकोरा देखत सिद्धी अमावस्या
५०११	।।ना.गा.०८५२.००३।।	याचपरी संत वर्ते प्रपंच देह कर्मां । समूळ बुडे ब्रह्मीं ब्रह्मपणें
५०१२	।।ना.गा.०८५२.००४।।	पोसणा पुत्र लटकेंचि बाबा म्हणे । स्वपितयातें अंतरूनि पिंडदान करणें
५०१३	।।ना.गा.०८५२.००५।।	बहुरूपी स्त्रियेचे कटाक्ष इतरां दावी । आपण जाणत जीवीं हें मी नव्हे
५०१४	।।ना.गा.०८५२.००६।।	शत्रूसभे नाना उपचार होती । ते न लगती कांही चित्तीं भूपा
५०१५	।।ना.गा.०८५२.००७।।	नामा म्हणे हृदयभानीं योगी निरंजन मनीं । मिथ्या विनोद कानीं क्षणिक जैसा
५०१६	।।ना.गा.०८५३.००१।।	आशा नाहीं ज्याला । देव का मारी तयाला
५०१७	।।ना.गा.०८५३.००२।।	जेव्हां सुखाची उन्नति । मोह पायासी लागती
५०१८	।।ना.गा.०८५३.००३।।	सर्वां चित्तीं समभाव । सर्व मानी वासुदेव
५०१९	।।ना.गा.०८५३.००४।।	नामा म्हणे अंगीं प्रेम । मुखीं विठोबाचें नाम
५०२०	।।ना.गा.०८५४.००१।।	धन्य महाराज जन्मले संसारीं । जे ध्याती अंतरीं नारायणा
५०२१	।।ना.गा.०८५४.००२।।	नारायण गाय नारायण ध्याय । धन्य त्यासी माय प्रसवली
५०२२	।।ना.गा.०८५४.००३।।	प्रसवली तया कुळाचा उद्धार । तो तरे निर्धार नामा म्हणे
५०२३	।।ना.गा.०८५५.००१।।	प्रतिदिनीं स्वधर्म करी । हरिमूर्ति नमस्कारी । भावें भजन वसे शरीरीं । तोचि भक्त हरिचा
५०२४	।।ना.गा.०८५५.००२।।	अनंत जन्मींचे कांट । तेणेंचि केलें सपाट । स्वधर्मे करोनियां नीट । शुद्धपक्ष हरि हरि
५०२५	।।ना.गा.०८५५.००३।।	तेंचि तापसा सामर्थ्य । तेणेंचि जोडिलें तीर्थ । त्याचे धरोनि मनोरथ । हरिभजन पथीं लागला
५०२६	।।ना.गा.०८५५.००४।।	देवो त्याचा अंकिला । सत्वा न ढळे तो कष्टविला। अकर्मी तोचि भला । त्याचें धन्य जीवित्व
५०२७	।।ना.गा.०८५५.००५।।	तोचि सफळ सकळीं । सदा निर्मळ सर्वकाळीं । जो हरीनामें वाजवी टाळी । तोचि समर्थ त्रिभुवनीं
५०२८	।।ना.गा.०८५५.००६।।	नामा हरिरंगीं रंगला । संत चरणीं अनुरंगला । तेणें विठ्ठल संतोषला । येऊनि राहिला हृदयकमळीं
५०२९	।।ना.गा.०८५६.००१।।	वैष्णवांमाजीं एक बळी । पृथु जाला दुजा महीतळीं । हरि नांदे प्रल्हादाजवळी । नारदें वनमाळी दान घेतला
५०३०	।।ना.गा.०८५६.००२।।	बिभीषणें पूजिला लंके हरि । भीष्में देखिला द्वारकेभीतरीं । अर्जुनें केला साहकारी । सारथि हरि पांडवांचा
५०३१	।।ना.गा.०८५६.००३।।	उद्धवें तप केलें समर्थ । अक्रुर नित्य वंदनार्थ । गाई गोपिका गोपाळांत । तो स्तन पीत यशोदेचें
५०३२	।।ना.गा.०८५६.००४।।	नंदा वसुदेवा लाधलें । बळि देवें ऐसेंचि पुण्य केलें । उग्रसेनें तप साधिलें । रत्न साधिलें रुक्मिणीनें
५०३३	।।ना.गा.०८५६.००५।।	गरुड हनुमंत शेषादिक । नित्य जाले हरिचे सेवक । चरणींच्या उदका शिवादिक । नित्य मस्तक लाविती

५०३४	।।ना.गा.०८५६.००६।।	ऐसा दुर्लभ हरिराजा । वर्णितां होती चतुर्भुजा । जड जीवां तारिल केशवराजा । उभारोनि भुजा सांगे नामा
५०३५	।।ना.गा.०८५७.००१।।	सदा विचरती जनीं वनीं रानीं । मुखीं चक्रपाणि जपतसे
५०३६	।।ना.गा.०८५७.००२।।	विरक्तीची मात असे कोण्या गुणें। नामाचें चिंतन योगिराज
५०३७	।।ना.गा.०८५७.००३।।	तेव्हां योगियासी कीर्तनाचे ध्यास । मुक्ती चारी त्यास हात जोडी
५०३८	।।ना.गा.०८५७.००४।।	पंढरीस उभा राहे पांडुरंग । तीर्थ चंद्रभागा नामा म्हणे
५०३९	।।ना.गा.०८५८.००१।।	जयाचेनि तीर्था आलें तीर्थपण । केली सांठवण हृदयीं तीं
५०४०	।।ना.गा.०८५८.००२।।	नवल महिमा हरिदासां जीवीं । तीर्थें उपजवी त्यांचे कुसीं
५०४१	।।ना.गा.०८५८.००३।।	वाराणसी प्राणी मरे अंतीं कोणी । तया चक्रपाणि नामें तारी
५०४२	।।ना.गा.०८५८.००४।।	नामा म्हणे तीर्थें तया येती भेटी । वोळंगती दृष्टी त्रिभुवना
५०४३	।।ना.गा.०८५९.००१।।	सत्वसमाधानी कर्मनिष्ठ जाण । अखंडित ध्यान रामकृष्ण
५०४४	।।ना.गा.०८५९.००२।।	सत्संग सर्वदा साक्ष सर्व देहीं । सर्वाभूतीं पाही अंशमात्रें
५०४५	।।ना.गा.०८५९.००३।।	आपणासमान सर्वत्र पाहती । अन्य सर्वांभूतीं रामविष्णु
५०४६	।।ना.गा.०८५९.००४।।	नामा म्हणे ऐसें सकळिकें संमत । नामीं सदोदित भक्तिमार्ग
५०४७	।।ना.गा.०८६०.००१।।	गौतम वसिष्ठ आणि विश्वामित्र । भारद्वाज अत्रि कश्यपादि
५०४८	।।ना.गा.०८६०.००२।।	बळी हनुमंत बिभीषण नळ । दुष्ट अजामिळ वाल्हा श्रेष्ठ
५०४९	।।ना.गा.०८६०.००३।।	उद्धव अर्जुन अंगद अगस्ति । सर्वांभूतीं भक्तिभाव ऐक्य
५०५०	।।ना.गा.०८६०.००४।।	नामा म्हणे सदा साधु संत जन । जनीं जनार्दन आत्मा एक
५०५१	।।ना.गा.०८६१.००१।।	तोचि पुराणिक जो होय कृतार्थ । विषयीं विरक्त विधि पाळी
५०५२	।।ना.गा.०८६१.००२।।	मानी तो हरिदास ज्या नामीं विश्वास । सर्वस्वें उदास देहभावो
५०५३	।।ना.गा.०८६१.००३।।	नामा म्हणे ऐसे संत भेटावे गा देवा । त्यालागीं केशवा हृदय फुटे
५०५४	।।ना.गा.०८६२.००१।।	पत्रावळी काढी वैकुंठनायक । धांवुनियां शुक आला तेथें
५०५५	।।ना.गा.०८६२.००२।।	दाटी पाहुनि द्वारीं मानसीं विचारी। जावया भीतरीं काय काज
५०५६	।।ना.गा.०८६२.००३।।	हा वाहे प्रसाद स्वहस्तें अनंत । वेंचोनियां शीत घाली मुखीं
५०५७	।।ना.गा.०८६२.००४।।	घंटानाद वाजे लक्ष द्विजपंक्ती । अक्षयीं वाजती वेळोवेळां
५०५८	।।ना.गा.०८६२.००५।।	ऐकोनि विस्मित ऋषिसमुदाव । पुसे धर्मराव देवाजीसी
५०५९	।।ना.गा.०८६२.००६।।	सांगतसे खुण वैकुंठनायक । ब्रह्मनिष्ठ एक आला तेथें

५०६०	।।ना.गा.०८६२.००७।।	येथुनी उठले धर्म नारायण । बाहेर येऊन पाहताती
५०६१	।।ना.गा.०८६२.००८।।	शुकाचिया मिषें व्यासाचा नंदन । सांगतसे खूण जगदीश
५०६२	।।ना.गा.०८६२.००९।।	धरुनियां करीं नेला तो भीतरीं । नामा म्हणे करी पूजा त्याची
५०६३	।।ना.गा.०८६३.००१।।	नित्य सर्वकाळ पुण्याचिया राशी । हरिनाम आलिया जिव्हेसी । नित्य तपानुष्ठानाच्या राशी । कोटि यज्ञासी लाभ जाला
५०६४	।।ना.गा.०८६३.००२।।	धन्य धन्य त्यांचा वंश । जे जे रतले नामास । रामनामीं नित्य सौरस । ते विष्णुदास पवित्र जाणा
५०६५	।।ना.गा.०८६३.००३।।	पवित्र ते स्वधर्मी । ज्यासी सर्वकाळ नेम नामीं । तयाचें नाम पूर्णकामीं । मनोरथ पुरतील
५०६६	।।ना.गा.०८६३.००४।।	नामा जपे नाम हरीचें । सार्थक केलें संसाराचें । ओझें फेडिलें पूर्वजन्मींचें । हरि स्मरण केलिया
५०६७	।।ना.गा.०८६४.००१।।	एक भानू अवघा सृष्टीचा सोहळा । व्यापूनि सकळा आकाशासी
५०६८	।।ना.गा.०८६४.००२।।	पवनसिंधुवरी मन वेगें पांखरी । मार्गु षटचक्री वैकुंठासी
५०६९	।।ना.गा.०८६४.००३।।	तोचि भोगी सुख चिदानंदी वासू । संतसंगें प्रकाशु सफळ मग
५०७०	।।ना.गा.०८६४.००४।।	नामा म्हणे यासी गुरुकृपा पाहिजे । संतसंगें पाविजे केशवचरण
५०७१	।।ना.गा.०८६५.००१।।	धन्य नरदेहीं संतसंग करी । त्रैलोक्य उद्धरी हेळामात्रें
५०७२	।।ना.गा.०८६५.००२।।	नेणे सुख दुःख शरीराचें भान । अखंड भजन केशवाचें
५०७३	।।ना.गा.०८६५.००३।।	कर्म करूनियां होय शुचिष्मंत । नामामृतीं प्रीत सर्वकाळ
५०७४	।।ना.गा.०८६५.००४।।	नामा म्हणे ऐसें वर्ते देहभावीं । मूढजनां दावी भक्तिमार्ग
५०७५	।।ना.गा.०८६६.००१।।	धन्य तोचि देश जेथें संतवास । तापत्रयदोष जाती सत्य
५०७६	।।ना.गा.०८६६.००२।।	धन्य मातापिता उभयकुळशुद्धता । तोचि भजे संतां निर्धारेंसी
५०७७	।।ना.गा.०८६६.००३।।	तीर्थरूपीं जळ विलंबें करी निर्मळ । संतदर्शनें तत्काळ शुद्ध होती
५०७८	।।ना.गा.०८६६.००४।।	धातुमय मूर्ति चिरकाळें फळती । संतांचे संगतीं निजस्वार्थ
५०७९	।।ना.गा.०८६६.००५।।	नामा म्हणे मुक्ति जे नर इच्छिती । संतांचे संगतीं धरती भाव
५०८०	।।ना.गा.०८६७.००१।।	कपटाचें कुपथ्य जालें तुझें पोटीं । स्मरावा जगजेठी कृपाळू तो
५०८१	।।ना.गा.०८६७.००२।।	नाम औषध घ्यावें नाम औषध घ्यावें । संतांचे लागावें समागमीं
५०८२	।।ना.गा.०८६७.००३।।	त्यापाशीं औषध आहे नानाविध । रामकृष्ण गोविंद म्हणती वाचे
५०८३	।।ना.गा.०८६७.००४।।	पुत्रस्नेहें कैसा अजामेळ स्मरला । तेणें तो उद्धरला क्षणमात्रें
५०८४	।।ना.गा.०८६७.००५।।	राम राम म्हणतां तारिली कुंटिणी । वैकुंठभुवनीं तये वासु
५०८५	।।ना.गा.०८६७.००६।।	तेंचि हें औषध प्रल्हादें घेतलें । तें तूं घे उगलें म्हणे नामा

५०८६	।।ना.गा.०८६८.००१।।	संतापायीं माथा धरितां सद्भावें । तेणें भेटे देव आपेंआप
५०८७	।।ना.गा.०८६८.००२।।	म्हणवूनि संतां अखंड भजावें । तेणें भेटे देव आपेंआप
५०८८	।।ना.गा.०८६८.००३।।	साधुपाशीं देव कामधंदा करी । पीतांबर धरी वरी छाया
५०८९	।।ना.गा.०८६८.००४।।	नामा म्हणे देव इच्छी संतसंग । आम्हां जिवलग जन्मोजन्मीं
५०९०	।।ना.गा.०८६९.००१।।	बहुरुप्या ब्राह्मणा पडियेलें मित्र । दोहींचें तें गोत्र एक जालें
५०९१	।।ना.गा.०८६९.००२।।	वेश्या पतिव्रते पडियेला शेजार। दोहींचा आचार एक जाला
५०९२	।।ना.गा.०८६९.००३।।	संग तोचि बाधी संग तोचि बाधी । कुसंग तो बाधी नारायणा
५०९३	।।ना.गा.०८६९.००४।।	नामा विष्णुदास सत्संगति बोधला । आत्मा हा लाधला पांडुरंग
५०९४	।।ना.गा.०८७०.००१।।	जायाचें सोंवळें जायाची ही चोळी । जायाची गरसोळी तीहि जाय
५०९५	।।ना.गा.०८७०.००२।।	जिणें हें जायाचें जिणें तें जायांचे । तें पैल कोणाचें देणें आहे
५०९६	।।ना.गा.०८७०.००३।।	जायाचा आचार जायाचा विचार । जायाचा भ्रतार क्षणभरी
५०९७	।।ना.गा.०८७०.००४।।	नामा म्हणे अवघें जिणें तें जायाचें । संतसंगतीचें सुख घ्यावें
५०९८	।।ना.गा.०८७१.००१।।	संतसंगतीचें काय सांगूं सुख । आपण पारिखें नाहीं तेथें
५०९९	।।ना.गा.०८७१.००२।।	साधु थोर जाणा साधु थोर जाणा। साधु थोर जाणा कलियुगीं
५१००	।।ना.गा.०८७१.००३।।	इहलोकीं तोचि सर्वांभूतीं सम । शरीराचा भ्रम नेणे कदा
५१०१	।।ना.गा.०८७१.००४।।	नामा म्हणे गाय दूध एक सरे । साधु निरंतर वर्ते तैसा
५१०२	।।ना.गा.०८७२.००१।।	भोळ्या भाविकांचें वचन नुल्लंघी । फिरतसे संगें तयामागें
५१०३	।।ना.गा.०८७२.००२।।	मी एक अभक्त मी एक अभक्त । मी एक अभक्त पापराशी
५१०४	।।ना.गा.०८७२.००३।।	नाममाळा दृढ न करी जतन । परि जाणे वर्मखूण संतसंगें
५१०५	।।ना.गा.०८७२.००४।।	नामा म्हणे नाहीं तुम्हांसी उपमा । आमुचे स्वधर्म शुद्ध नाहीं
५१०६	।।ना.गा.०८७३.००१।।	परिसाचेनि संगें लोह होय सुवर्ण । तैसा भेटे नारायण संतसंगें
५१०७	।।ना.गा.०८७३.००२।।	कीटकी ध्यातां भृंगी जाला तोचि वर्ण । तैसा भेटे नारायण संतसंगें
५१०८	।।ना.गा.०८७३.००३।।	वनस्पति परिमळु चंदन जाला जाण । तैसा भेटे नारायण संतसंगें
५१०९	।।ना.गा.०८७३.००४।।	अग्निस मिळे तें नये परतोन । तैसा भेटे नारायण संतसंगें
५११०	।।ना.गा.०८७३.००५।।	सरिता ओघ जाय सिंधूसी मिळून । तैसा भेटे नारायण संतसंगें
५१११	।।ना.गा.०८७३.००६।।	नामा म्हणे केशवा मज देई संतसंग । आणिक कांहीं तुज न मागे बापा

५११२	।।ना.गा.०८७४.००१।।	येतां जातां थोर कष्टलों गर्भवासीं । पडिलों गा उपवासी प्रेमेंविण
५११३	।।ना.गा.०८७४.००२।।	बहुतांचा सेवकु जाला काकुळती । न पावे विश्रांति कधीं काळीं
५११४	।।ना.गा.०८७४.००३।।	ऐसें माझें मन सिणलें नानापरी । घालीन आभारी संतांचियां
५११५	।।ना.गा.०८७४.००४।।	वियोगें संतांच्या व्याकुळ चिंतातुर । हिंडे दारोदार दीन रूपें
५११६	।।ना.गा.०८७४.००५।।	परि कोणी संतांच्या न घालिती चरणीं । तळमळी अनुदिनीं श्रांत सदा
५११७	।।ना.गा.०८७४.००६।।	माझें माझें म्हणवूनि जया घाली मिठी । दिसे तेचि दिठी नाहीं होय
५११८	।।ना.गा.०८७४.००७।।	तया शोकानळें संतप्त आंदोळे । गेलें तें न मिळे कदा काळीं
५११९	।।ना.गा.०८७४.००८।।	न देखत ठायीं देखावया धांवे । भ्रांति भुले भावें नाना मार्गीं
५१२०	।।ना.गा.०८७४.००९।।	तुझा स्वरूपानंदु नाहीं ओळखिला । जाहली विठ्ठला हानि थोर
५१२१	।।ना.गा.०८७४.०१०।।	लोहाचा कवळू लागला परिसातें । पढिये सर्वांतें होय जेंवी
५१२२	।।ना.गा.०८७४.०११।।	नामा म्हणे तैसी भेटी संतचरणीं । करूनि त्रिभुवनीं होईन सरता
५१२३	।।ना.गा.०८७५.००१।।	सुख सांगावें संतापुढें । जेणें सुख अधिक वाढे
५१२४	।।ना.गा.०८७५.००२।।	आणिक न करावें शहाणें । प्रेम दिठावले झणें
५१२५	।।ना.गा.०८७५.००३।।	खंडिता कल्पनेचा लाग । त्यासि असावा अनुराग
५१२६	।।ना.गा.०८७५.००४।।	तोडितां वासनेचा तंतु । त्यासि असावा एकांतु
५१२७	।।ना.गा.०८७५.००५।।	गिळी अहंतेचें बीज । त्याचें व्हावें चरणरज
५१२८	।।ना.गा.०८७५.००६।।	नामा म्हणे त्याचे संगतीं । चित्ता आपेंआप येईल निवृत्ति
५१२९	।।ना.गा.०८७६.००१।।	वासनेविरहित होवोनि एकवट । असावें निकट संतसंगें
५१३०	।।ना.गा.०८७६.००२।।	हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । करावें दास्यत्व हरीभक्तांचें
५१३१	।।ना.गा.०८७६.००३।।	नामा म्हणे केशवा तरीच शरणांगत । नाहीं तरी पतित म्हणा मातें
५१३२	।।ना.गा.०८७७.००१।।	संतांच्या चरणा द्यावें आलिंगन । जीवें निंबलोण उतरावें
५१३३	।।ना.गा.०८७७.००२।।	तेथेंचि निश्चळ राहे माझ्या मना । मग तुज यातना नव्हती कांहीं
५१३४	।।ना.गा.०८७७.००३।।	संतांचे द्वारींचा होई द्वारपाळ । तुटे मायाजाळ मोहपाश
५१३५	।।ना.गा.०८७७.००४।।	संतांचे प्रसाद सेविसी उरले । आयुष्य सरलें दुणावेल
५१३६	।।ना.गा.०८७७.००५।।	नामा म्हणे संत आहेत कृपासिंधु । देती भक्तीबोधु प्रेमसुख
५१३७	।।ना.गा.०८७८.००१।।	संतचरणरज लागतां सहज। वासनेचें बीज जळोन जाय

५१३८	।।ना.गा.०८७८.००२।।	मग रामनामीं उपजे आवडी। सुख घडोघडी वाढों लागे
५१३९	।।ना.गा.०८७८.००३।।	कंठी प्रेम दाटे नयनीं नीर लोटे। हृदयीं प्रगटे रामरूप
५१४०	।।ना.गा.०८७८.००४।।	नामा म्हणे साधन सुलभ गोमटें। परी उपतिष्ठे पूर्णपुण्यें
५१४१	।।ना.गा.०८७९.००१।।	आपुलें शरीर घालूनियां पुढें । पडे वाडेंकोडें सर्वभावें
५१४२	।।ना.गा.०८७९.००२।।	नामा आवडती नानाभूत सृष्टि । देखेन मी दृष्टि ब्रह्मरूप
५१४३	।।ना.गा.०८७९.००३।।	विष्णुरूप सर्व भवीं अखंडित । मानी सर्वभूत आत्मा माझा
५१४४	।।ना.गा.०८७९.००४।।	नामा म्हणे सत्य सत्य जे बोलती । ज्यांचे पायींची माती इच्छितसें
५१४५	।।ना.गा.०८८०.००१।।	संतांचे लक्षण ओळखावया खूण । जो दिसे उदासीन देहभावा
५१४६	।।ना.गा.०८८०.००२।।	सतत अंतरीं प्रेमाचा जिव्हाळा। वाचे वसे चाळा रामकृष्ण
५१४७	।।ना.गा.०८८०.००३।।	त्या संतांचे चरण देखिले मी दृष्टीं । जळती कल्प कोटी पापराशी
५१४८	।।ना.गा.०८८०.००४।।	जयाच्या हृदयीं प्रेमाचा जिव्हाळा । जीवें भावें गोपाळा न विसंबती
५१४९	।।ना.गा.०८८०.००५।।	त्याचे अंगणींचा होईन सांडोवा । मग तूं केशवा नुपेक्षिसी
५१५०	।।ना.गा.०८८०.००६।।	तुझ्या ध्यानीं ज्यांचे सदा भरलें मन । विश्व तूंचि म्हणोन भजती भावें
५१५१	।।ना.गा.०८८०.००७।।	त्याच्या उष्टावळीचा होईन मागता । तरीच पंढरीनाथा भेटी देसी
५१५२	।।ना.गा.०८८०.००८।।	ऐसे नित्यानंदें बोधें जे निवाले । ते जीवावेगळे न करी नाम्या
५१५३	।।ना.गा.०८८१.००१।।	माझे मायबाप साधुसंतजन । माझे जीवप्राण अंतरीचें
५१५४	।।ना.गा.०८८१.००२।।	भवभयाहूनि तारियेलें मज । बाळेभोळे गुज प्रेम दावी
५१५५	।।ना.गा.०८८१.००३।।	रंकाहूनि रंक जालों मी सेवक । ब्रह्मादिक देख इच्छिती सुख
५१५६	।।ना.गा.०८८१.००४।।	नामा म्हणे संतभाग्य अलौकिक । शुद्ध निष्कलंक पुण्यरूप
५१५७	।।ना.गा.०८८२.००१।।	आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळां । माझिया सकळां हरिच्या दासां
५१५८	।।ना.गा.०८८२.००२।।	कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संत मंडळी सुखी असो
५१५९	।।ना.गा.०८८२.००३।।	अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकांसी
५१६०	।।ना.गा.०८८२.००४।।	नामा म्हणे तया असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग
५१६१	।।ना.गा.०८८३.००१।।	जगत्रयजीवन अंतर्निष्ठ ज्ञान । तरी संतासीं शरण रिघिजे भावें
५१६२	।।ना.गा.०८८३.००२।।	हेचि भक्ति ज्ञान वैराग्याचे निधी । विवेकेंसीं बुद्धि नांदे माझी
५१६३	।।ना.गा.०८८३.००३।।	हे श्रवणाचे श्रवण मननाचे मनन । हेचि निजध्यासन वैराग्याचे

५१६४	।।ना.गा.०८८३.००४।।	म्हणोनि बैसलों संतांचे संगतीं । गोविंदा विश्रांति गहिनीनाथ
५१६५	।।ना.गा.०८८४.००१।।	बैसोनि एकांतीं गुरुगम्य गोष्टी । वेदांत परिपाठी शास्त्र बोध
५१६६	।।ना.गा.०८८४.००२।।	नित्यशुद्धबुद्ध निर्विकार पूर्ण । उमेसी जें ज्ञान शिव सांगे
५१६७	।।ना.गा.०८८४.००३।।	तेंचि सच्चिदानंद साकार जीव प्राण । शरीर जाय क्षीण जयापरी
५१६८	।।ना.गा.०८८४.००४।।	तेंचि हें सर्व विठोबाचें नाम । निराईस प्रेम गहिनीनाथीं
५१६९	।।ना.गा.०८८५.००१।।	बैसलियां दोघें भ्रतारवल्लभें । उदरींचा गर्भे तेंचि ध्यान
५१७०	।।ना.गा.०८८५.००२।।	भक्ति नवमास भरले पूर्ण दिवस। आलें वैराग्य डोळस मूर्तिमंत
५१७१	।।ना.गा.०८८५.००३।।	विठ्ठल आवडी ठेवियेलें नाम । निराईस प्रेम गहिनीनाथीं
५१७२	।।ना.गा.०८८६.००१।।	व्रतबंधदीक्षा उपदेश गायत्री । ॐकार मूळमंत्री स्वर सोळा
५१७३	।।ना.गा.०८८६.००२।।	केलें वेदपठण काव्य आणि व्याकरण । जालासे निपुण शास्त्रवक्ता
५१७४	।।ना.गा.०८८६.००३।।	मग पुष्करादि तीर्थें पाहावीं समस्तें । अनुताप चित्तें धरियेला
५१७५	।।ना.गा.०८८६.००४।।	वैराग्यपुतळा ज्ञानगम्य मूर्ति । निघालासे भक्ति तीर्थाटणा
५१७६	।।ना.गा.०८८६.००५।।	विठ्ठलें वंदुनी मातापिता दोन्ही । मग तीर्थाटणीं मुहूर्त केला
५१७७	।।ना.गा.०८८७.००१।।	आला द्वारावती पाहिली कृष्णमूर्ति । जे मोक्ष विश्रांति मुमुक्षूंची
५१७८	।।ना.गा.०८८७.००२।।	धरी मछावतार केला शंखोद्धार । देव मुक्तिमाहेर पांथिकांचें
५१७९	।।ना.गा.०८८७.००३।।	तेथोनि सत्वर आला पिंडारका । मंगळहडीहुनी द्वारका देखियेली
५१८०	।।ना.गा.०८८७.००४।।	सुवर्णाची नगरी ब्राह्मणा दिधली । ते पुरी पाहिली सुदामयाची
५१८१	।।ना.गा.०८८७.००५।।	मंडपाकार शोभे तो माधव । रुक्मिणी विवाहो जाला जेथें
५१८२	।।ना.गा.०८८७.००६।।	संपादुनी गेला अवतारकृत्य । तें भालुकातीर्थ देखियेलें
५१८३	।।ना.गा.०८८७.००७।।	पश्चिमे प्रभासलिंग देखियेलें । सोरटी वंदिलें सोमनाथा
५१८४	।।ना.गा.०८८७.००८।।	मुचकुंदाची गुंफा काळयवन उभा । विश्रांती पद्मनाभा धवलपुरीं
५१८५	।।ना.गा.०८८७.००९।।	मार्गींचीं तीर्थें करूनी समस्तें । आला शक्ति जेथें सप्तशृंगा
५१८६	।।ना.गा.०८८७.०१०।।	अरुणा वरुणा प्राची गोदावरी। ते कपाळेश्वरीं पूजा केली
५१८७	।।ना.गा.०८८७.०११।।	पुढें ज्योतिर्लिंग देखिलें त्र्यंबक । कुशावर्ती उदक स्विकारिलें
५१८८	।।ना.गा.०८८७.०१२।।	वंदूनिया गंगाद्वार सव्य ब्रह्मगिरी । मग भीमाशंकरीं आनंदला
५१८९	।।ना.गा.०८८७.०१३।।	देखोनियां भीमा आठवे पंढरी । विठ्ठला अंतरीं पांडुरंग

५१९०	।।ना.गा.०८८८.००१।।	ऐसा नित्यानित्य चालतां सुपंथीं । पदोपदीं कीर्ति नामघोष
५१९१	।।ना.गा.०८८८.००२।।	आला आळंकापुरीं इंद्रायणी-तीरीं । स्नानसंध्या करी देवपूजा
५१९२	।।ना.गा.०८८८.००३।।	देखोनी सुब्राह्मण केलेंसे नमन । वंदिले चरण सिदोपंतीं
५१९३	।।ना.गा.०८८८.००४।।	कोण तुमचा गांव आलेति कोठुन । काय अभिधान गमन कोठें
५१९४	।।ना.गा.०८८८.००५।।	विठ्ठलाचें नाम रामेश्वरीं भाव । वृत्ति आपेगांव गोदातीरीं
५१९५	।।ना.गा.०८८८.००६।।	मातापिता वृद्ध वसताती तेथें । द्वारकादि तीर्थे करुनी आलों
५१९६	।।ना.गा.०८८८.००७।।	आजि धन्य भाग्य स्वामीचें आगमन । आश्रम पावन कीजे माझा
५१९७	।।ना.गा.०८८८.००८।।	आणुनी मंदिरीं सारुनी भोजन । निद्रा करविली पूर्ण तया हातीं
५१९८	।।ना.गा.०८८८.००९।।	तंव स्वप्न अवस्थेमाजी येउनि पंढरीनाथ । म्हणे कन्या सालंकृत द्यावी यासी
५१९९	।।ना.गा.०८८८.०१०।।	प्रातःकाळ जाला नित्यनेमु सारिला । मग नमस्कार केला सिदोपंतीं
५२००	।।ना.गा.०८८८.०११।।	वंदोनियां चरण सांगितलें स्वप्न । कन्यापाणिग्रहण कीजे तुम्ही
५२०१	।।ना.गा.०८८८.०१२।।	हांसोनी उत्तर बोले पैं सारांशें । आज्ञा श्रीनिवासें केली नाहीं
५२०२	।।ना.गा.०८८८.०१३।।	आजिचा सुदिन स्वस्थ करुनी मन । वंदिले चरण सिदोपंतीं
५२०३	।।ना.गा.०८८८.०१४।।	ऐसे सुसंकल्प हेलावती मनीं । तुळसीवृंदावनीं निद्रा केली
५२०४	।।ना.गा.०८८८.०१५।।	मग विश्वीं विश्वंभर व्यापुनियां स्थानीं । येऊनियां स्वप्नीं काय बोले
५२०५	।।ना.गा.०८८८.०१६।।	भक्ति आणि ज्ञान वैराग्य आवडी । हे वसती उघडीं तुझ्या अंगीं
५२०६	।।ना.गा.०८८८.०१७।।	मूर्तिमंत चारी जन्मती इच्या उदरीं । म्हणोनि स्विकारी आज्ञा माझी
५२०७	।।ना.गा.०८८८.०१८।।	उठोनि विठ्ठलें स्वप्न सांगितलें। हरूषें वंदिले सिदोपंतीं
५२०८	।।ना.गा.०८८८.०१९।।	पाचारोनी जोशी घटितार्थ पाहिले । गुण उतरले छत्तीसही
५२०९	।।ना.गा.०८८८.०२०।।	निर्धारिलें लग्न मिळाले ब्राह्मण । निर्विघ्न पूजन केलें आधीं
५२१०	।।ना.गा.०८८८.०२१।।	देवकप्रतिष्ठा ब्राह्मणपूजन । घटिका जाली पूर्ण म्हणती द्विज
५२११	।।ना.गा.०८८८.०२२।।	कुळदेवस्मरण म्हणती सावधान । उभयतांचें मन पांडुरंगीं
५२१२	।।ना.गा.०८८८.०२३।।	जालें पाणिग्रहण विधीसी अर्पण । वंदिले चरण सिदोपंतीं
५२१३	।।ना.गा.०८८८.०२४।।	पांडुरंगक्षेत्रा मिळालीसे यात्रा । आले पंढरपुरा भक्तराज
५२१४	।।ना.गा.०८८८.०२५।।	गरुडटके पताका मृदंग वाजती । वैष्णव गर्जती जयजयकारें
५२१५	।।ना.गा.०८८८.०२६।।	गरुडपारीं उभे दाटी वैष्णवांची । उपमा वैकुंठीची पंढरीये

५२१६	।।ना.गा.०८८८.०२७।।	राऊळाभीतरीं प्रवेशलीं दोघें । देखियेलें उभे पांडुरंग
५२१७	।।ना.गा.०८८८.०२८।।	कायावाचामनीं पारूषले नयनीं । मस्तक चरणीं ठेवियेला
५२१८	।।ना.गा.०८८८.०२९।।	विठ्ठलासी ध्यान रामकृष्णमाळा । हृदयीं जिव्हाळा श्रीमूर्ति राया
५२१९	।।ना.गा.०८८९.००१।।	आश्रमविधि करावें पालन । परी विठ्ठलाचें मन तीर्थाटणीं
५२२०	।।ना.गा.०८८९.००२।।	जाणोनि अंतर म्हणे सिदोपंत । आपुले मनींचा हेत पुरता कीजे
५२२१	।।ना.गा.०८८९.००३।।	जावें हो सत्वर यावें स्वस्ति क्षेम । पावले आश्रम सिदोपंत
५२२२	।।ना.गा.०८८९.००४।।	विठ्ठलें गमन केलें तेव्हां तीर्थाटना । मुख्य मुख्य स्थाना अनुक्रमें
५२२३	।।ना.गा.०८९०.००१।।	पाहिलें श्रीशैल्य निवृत्ती संगम । पापराशी भस्म देखतांचि
५२२४	।।ना.गा.०८९०.००२।।	चालतां सुपंथी हृदयीं विठ्ठलमूर्ति। मुखीं नामकीर्ति गात चाले
५२२५	।।ना.गा.०८९०.००३।।	अभोळ नरसिंह श्रीवासुदेव । सकळ देवराव व्यंकटाद्री
५२२६	।।ना.गा.०८९०.००४।।	गेला अरुणाचळा करूनी नमन । चिदंबरा दक्षिणमथुरा कावेरी
५२२७	।।ना.गा.०८९०.००५।।	वंदुनी जनार्दन गेला रामेश्वरा । हेत जाला पुरा विठ्ठलाचा
५२२८	।।ना.गा.०८९१.००१।।	जानकीची शुद्धी करावया गेला । हनुमंत उडाला जेथुनियां
५२२९	।।ना.गा.०८९१.००२।।	आनंदभरित चालतसे मार्ग । हृदयीं अनुराग आवडीचा
५२३०	।।ना.गा.०८९१.००३।।	तें स्थान वंदुनी पावला गोकर्ण । हाटकेश्वरीं स्नान करूनीयां
५२३१	।।ना.गा.०८९१.००४।।	आला कोल्हापुरा लक्ष्मी दरुषणा । पंचगंगे स्नान करूनीयां
५२३२	।।ना.गा.०८९१.००५।।	प्रीतीचा संगम देखिला कऱ्हाटकीं । थोर जाला सुखी अंतरींचा
५२३३	।।ना.गा.०८९१.००६।।	कृष्णेचिया स्नानें कृतकृत्य जाला । माहुली देखिला संगम डोळां
५२३४	।।ना.गा.०८९१.००७।।	आला आळंकावती हर्षयुक्त चित्तीं । दिधलें सिदोपंतीं आलिंगन
५२३५	।।ना.गा.०८९१.००८।।	विठ्ठल अंतरीं मातापिता पाहावी । आज्ञा म्हणे द्यावी सिदोपंतां
५२३६	।।ना.गा.०८९२.००१।।	कुटुंबासहित जावें जी दरुषणा । केलीसे प्रार्थना सिदोपंतीं
५२३७	।।ना.गा.०८९२.००२।।	सहज बोळवण संतांचें दरुषण। म्हणे केलें मान्य शीघ्र चला
५२३८	।।ना.गा.०८९२.००३।।	मग विठ्ठलानें मातापिता वंदियेली । स्थिति सांगितली सिदोपंतीं
५२३९	।।ना.गा.०८९२.००४।।	चिरंजीव नांदा म्हणती मातापिता । सुख आमुच्या चित्ता थोर जालें
५२४०	।।ना.गा.०८९२.००५।।	वस्त्रें अलंकार सिदोपंता दिधले । मग गमन केलें सिदोपंतीं
५२४१	।।ना.गा.०८९३.००१।।	असतां सुखरूप मातापिता वृद्ध । वैकुंठा स्वानंदें निघोनी गेलीं

५२४२	।।ना.गा.०८९३.००२।।	संसाराची चिंता नाही विठ्ठलासी । अखंड वृत्तीसी समाधान
५२४३	।।ना.गा.०८९३.००३।।	जालें वर्तमान ऐकिलें सिदोपंतीं । परम तेणें चित्तीं खेद केला
५२४४	।।ना.गा.०८९३.००४।।	येउनी परामर्ष घेतला दोघांचा । म्हणे सांभाळ तुमचा करितो देव
५२४५	।।ना.गा.०८९३.००५।।	उदासीन वृत्ति तुमची सर्वकाळ । पदार्थ सकळ पाहिजे तो
५२४६	।।ना.गा.०८९३.००६।।	दया करोनी मज आतां सांभाळावें । आळंकापुरीं राहावें सुखरूप
५२४७	।।ना.गा.०८९३.००७।।	पुत्रसंतती कांहीं होईल तुम्हांसी । मग येईल चित्तासी तें करा सुखें
५२४८	।।ना.गा.०८९३.००८।।	मग मानुनी वचन विठ्ठलें तयाचें । म्हणे हें देवाचे करणें हो
५२४९	।।ना.गा.०८९४.००१।।	येऊनि आळंकावती केला क्षेत्रवास । देऊनी चित्तास समाधान
५२५०	।।ना.गा.०८९४.००२।।	नित्य हरिकथा नामसंकीर्तन। संतांचें दरूशन सर्वकाळ
५२५१	।।ना.गा.०८९४.००३।।	पंढरीची वारी आषाढी कार्तिकी । विठ्ठल येकाकी सुखरूप
५२५२	।।ना.गा.०८९४.००४।।	ऐसा बहुत काळ क्रमिलियावरी । पुत्र अपत्य उदरीं होतां न दिसे
५२५३	।।ना.गा.०८९४.००५।।	विठ्ठल म्हणे अवो ऐकतेसी कांते । मज ऐसें वाटतें संन्यास घ्यावा
५२५४	।।ना.गा.०८९४.००६।।	देसी आज्ञा तरी जाईन वाराणसी । ऐसें रखुमाईसी म्हणितलें
५२५५	।।ना.गा.०८९५.००१।।	रखुमाई म्हणे ऐकतां जी ताता । संन्यास घ्यावा आतां म्हणताती
५२५६	।।ना.गा.०८९५.००२।।	संतती वांचुनि न घ्यावा संन्यास। ऐसें सांगावें त्यांस म्हणितलें
५२५७	।।ना.गा.०८९५.००३।।	निरोपाची वाट पाहे भलत्या मिसें । रखुमाई असे सावधान
५२५८	।।ना.गा.०८९५.००४।।	असतां दुःश्चितपणें निरोप पुसिला । जा जा म्हणे दिधला अवसरु
५२५९	।।ना.गा.०८९५.००५।।	जाऊनि विठ्ठलें घेतला संन्यास । चिंता रखुमाईस पडली भारी
५२६०	।।ना.गा.०८९६.००१।।	करावें सार्थक रखुमाईनें तेव्हां । आरंभिली सेवा अश्वत्थाची
५२६१	।।ना.गा.०८९६.००२।।	जाणोनी पैं देवें उग्र अनुष्ठान । तेथें झाले येणें श्रीपादाचे
५२६२	।।ना.गा.०८९६.००३।।	देखोनि सत्पात्र केला नमस्कार । सारांश उत्तर बोलियेलें
५२६३	।।ना.गा.०८९६.००४।।	पुत्रवती होई दिधला आसीर्वाद । रखुमाईसी विनोद वाटियेला
५२६४	।।ना.गा.०८९६.००५।।	माते तूं हांससी श्रीपाद पुसती । स्वामी पुत्र कैसे होती पतीविण
५२६५	।।ना.गा.०८९६.००६।।	भ्रतारें जाऊनी घेतला संन्यास। स्वामीचे वचनास नलगे बोल
५२६६	।।ना.गा.०८९६.००७।।	पुसतां खाणखूण निश्चयो बाणला । श्रीपाद बोलिला सत्य सत्य
५२६७	।।ना.गा.०८९६.००८।।	रखुमाईसी पुसे असे तुझें कोणी । येरी कर जोडोनी बोलियेली

५२६८	।।ना.गा.०८९७.००१।।	मातापिता घरीं आहेती समस्तें । वर्तमान तयातें श्रुत करूं
५२६९	।।ना.गा.०८९७.००२।।	कृपा करूनी यावें तुम्हीं आश्रमासी। सनाथ करावयासी कृपादृष्टि
५२७०	।।ना.गा.०८९७.००३।।	नेऊनी आश्रमा दिधलें आसन । केलें श्रुत वर्तमान सिदोपंतीं
५२७१	।।ना.गा.०८९७.००४।।	अर्घ्यपाद्यपूजा भोजन सारिलें। मग वर्तमान पुसिलें सिदोपंतीं
५२७२	।।ना.गा.०८९७.००५।।	श्रीपाद म्हणती रामेश्वरीं भाव । तंव येथें हा अभिप्राव जाला ऐसा
५२७३	।।ना.गा.०८९७.००६।।	आतां फिरोनियां जाणें वाराणसी । घेऊनी रखुमाईसी तुम्ही यावें
५२७४	।।ना.गा.०८९८.००१।।	श्रीपाद म्हणती याच्या दोषास्तव । माझें पुण्य सर्व लया जातें
५२७५	।।ना.गा.०८९८.००२।।	सिदोपंत म्हणत तुम्ही दयावंत । सीघ्र गमनार्थ कीजे स्वामी
५२७६	।।ना.गा.०८९८.००३।।	जाउनी वाराणसी मठीं प्रवेशले । मग पाचारिलें चैतन्यासी
५२७७	।।ना.गा.०८९८.००४।।	तुझें कोणी होतें सत्य सांग आतां । अन्यथा बोलतां उरी नाहीं
५२७८	।।ना.गा.०८९८.००५।।	चैतन्यें चरणीं ठेवियेला माथा । म्हणे त्यागुनी कांता आलों स्वामी
५२७९	।।ना.गा.०८९८.००६।।	उठवोनी श्रीपादें दिधलें आश्वासन । म्हणतां करी पाणिग्रहण इचें आतां
५२८०	।।ना.गा.०८९८.००७।।	अविधि कर्माचें न धरावें भय । यासी आहे साह्य जगदीश
५२८१	।।ना.गा.०८९८.००८।।	स्वदेशा जाऊनी करावा आश्रमु । सुखरूप स्वधर्मु चालवावा
५२८२	।।ना.गा.०८९८.००९।।	श्रीपादें मस्तकीं हात ठेवियेला । निरोप दिधला चैतन्यासी
५२८३	।।ना.गा.०८९९.००१।।	चैतन्याश्रमी संन्यासी जाले गृहवासी । मुळींच्या प्रकृतीसी ऐक्य केलें
५२८४	।।ना.गा.०८९९.००२।।	हासिन्नले लोक बरवा हा संन्यास । करिती उपहास दर्शनाचा
५२८५	।।ना.गा.०८९९.००३।।	द्विजीं वाळियेलें जगीं सांडियेलें। सेखीं उपेक्षिलें आप्तवर्गीं
५२८६	।।ना.गा.०८९९.००४।।	ऐसीं बारा वरुषें क्रमिलीं निगुती । तंव जालीसे संतती चौघेजण
५२८७	।।ना.गा.०८९९.००५।।	निवृत्ती ज्ञानेश्वर सोपान मुक्ताबाई। हांसती सकळही ऐकोनि नांवें
५२८८	।।ना.गा.०८९९.००६।।	जालीं उपवरें व्रतबंधा योग्य । उभयतां उद्वेग चिंतातुरें
५२८९	।।ना.गा.०८९९.००७।।	जातिकूळावेगळी पडियेली निराळी । माझी वंशावळी प्रायश्चित्त
५२९०	।।ना.गा.०८९९.००८।।	मेळविले द्विज केली ब्रह्मसभा । क्षमा अपराधा करा दीना
५२९१	।।ना.गा.०८९९.००९।।	निबंधीं निर्णय पाहती धर्मशास्त्रीं । तुम्हीं अति श्रौती परायण
५२९२	।।ना.गा.०८९९.०१०।।	सांगाल तें मान्य म्हणती साहीजणें । शुची हें करणें पतितांसी
५२९३	।।ना.गा.०८९९.०११।।	निवृत्ती म्हणे तुम्ही भूदेव प्रत्यक्ष । दर्शनेची मोक्ष जडमूढा

५२९४	।।ना.गा.०९००.००१।।	पाहतील ग्रंथ सभाश्रेष्ठ महाजन । वैदिक शास्त्रज्ञ पुण्यश्लोक
५२९५	।।ना.गा.०९००.००२।।	देहान्त प्रायश्चित असे या बोलिलें। विचारूनि भलें हित करा
५२९६	।।ना.गा.०९००.००३।।	म्हणती द्विजवर आणिक नाहीं उपाव । संस्कारें देह करा शुद्ध
५२९७	।।ना.गा.०९००.००४।।	श्रीपाद म्हणती अवश्य करीन । देह हे दंडीन अनुतापें
५२९८	।।ना.गा.०९००.००५।।	त्रिवेणी संगमीं घालीन कर्वती । गेला पूर्वस्थिती वीतरागें
५२९९	।।ना.गा.०९००.००६।।	दारापुत्रगृह त्यजुनी निघाला । नमस्कार केला द्विजवृंदा
५३००	।।ना.गा.०९००.००७।।	झडझडां जाती परतोनी न पाहती। नाहीं पुनरावृत्ति म्हणती द्विज
५३०१	।।ना.गा.०९००.००८।।	त्याग आणि वैराग्य हेंचि प्रायश्चित्त । मग जाला शुचिर्भूत गुरुकृपें
५३०२	।।ना.गा.०९००.००९।।	निवृत्ति म्हणती आम्हां कवण गती । सांगावें श्रीमंतीं विचारूनी
५३०३	।।ना.गा.०९०१.००१।।	म्हणती सकळ द्विज जावें प्रतिष्ठाना । तेथुनी पत्र आणा तें वंद्य करूं
५३०४	।।ना.गा.०९०१.००२।।	नाहीं जाती कुळ वर्ण अधिकार । क्षेत्रीं वैश्य शूद्र द्विज नव्हें
५३०५	।।ना.गा.०९०१.००३।।	नव्हें देवगण यक्ष ना किन्नर । ऋषि निशाचर तेही नव्हें
५३०६	।।ना.गा.०९०१.००४।।	ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट। निजबोधें इष्ट स्वरूप माझें
५३०७	।।ना.गा.०९०१.००५।।	नव्हें आप तेज वायू व्योम मही। महत्त्व तेंही विराट नव्हें
५३०८	।।ना.गा.०९०१.००६।।	नव्हें मी सगुण नव्हें मी निर्गुण। अनुभूतीं भजन होउनी नव्हें
५३०९	।।ना.गा.०९०१.००७।।	निवृत्ति म्हणतसे ऐकें ज्ञानेश्वरा । माझी परंपरा ऐसी आहे
५३१०	।।ना.गा.०९०२.००१।।	विधी वेद विरुद्ध संपर्क संबंध । नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं
५३११	।।ना.गा.०९०२.००२।।	अविधी आचरण परम दूषण । वेदोनारायण बोलियेला
५३१२	।।ना.गा.०९०२.००३।।	स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद । उचित ते शुद्ध ज्याचें तया
५३१३	।।ना.गा.०९०२.००४।।	म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जनां दाखवावें वर्तोनियां
५३१४	।।ना.गा.०९०२.००५।।	कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार
५३१५	।।ना.गा.०९०२.००६।।	प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालतां । पावन अवस्था जरी जाली
५३१६	।।ना.गा.०९०२.००७।।	ज्ञानदेव म्हणे ऐकाजी निवृत्ति । बोलिली पद्धती धर्मशास्त्रीं
५३१७	।।ना.गा.०९०३.००१।।	हेंचि आम्हां श्रेष्ठ बोलिले परनिष्ठ । असतां दुर्घट परी सेव्य
५३१८	।।ना.गा.०९०३.००२।।	पांडवांचें कुळ शोधितां निर्मळ। कुंडजार गोळ बुद्धिकांसी
५३१९	।।ना.गा.०९०३.००३।।	भक्ति हे सरती जाति न सरती । ऐसी आत्मस्थिती स्वसंवेद्या

५३२०	।।ना.गा.०९०३.००४।।	दुर्वास वसिष्ठ अगस्ति गौतम । हे ऋषि उत्तम कुळींचे कैसे
५३२१	।।ना.गा.०९०३.००५।।	व्यास आणि वाल्मिक कोण कुळ तयांचें । तैसेंचि आमुचें सोपान म्हणे
५३२२	।।ना.गा.०९०४.००१।।	देऊनियां पत्र निघाली सत्वर । करूनि नमस्कार सकळांसी
५३२३	।।ना.गा.०९०४.००२।।	जाउनी राहिले भोगावती तीरीं। तीर्थयात्रा बरी संपादिली
५३२४	।।ना.गा.०९०४.००३।।	अनाथें पतितें शरणागत दीनें । अनाथ करणें कृपादृष्टि
५३२५	।।ना.गा.०९०४.००४।।	केली ब्रह्मसभा बैसले वरिष्ठ । होतें तैसें स्पष्ट निवेदिलें
५३२६	।।ना.गा.०९०४.००५।।	पत्र वाचुनियां सकळां जालें श्रुत । संन्याशाचे पुत्र कळों आलें
५३२७	।।ना.गा.०९०४.००६।।	नाहीं प्रायश्चित्त उभयतां कुळभ्रष्ट । बोलियेले श्रेष्ठ पूर्वापार
५३२८	।।ना.गा.०९०४.००७।।	या एक उपाय असे शास्त्रमतें । अनन्यभक्तीतें अनुसरावें
५३२९	।।ना.गा.०९०४.००८।।	तीव्र अनुतापें करावें भजन । गो खर आणि श्वान वंदुनियां
५३३०	।।ना.गा.०९०४.००९।।	वंदावें अंत्यज ब्रह्मभावनेसीं । ऐसे पद्धतीसी बोलियेले
५३३१	।।ना.गा.०९०४.०१०।।	ऐकोनि निवृत्ती संतोषला चित्तीं । धन्य तुमची वदंती तीर्थरूप
५३३२	।।ना.गा.०९०४.०११।।	ज्ञानदेव म्हणे सांगाल तें मान्य । मुक्ताई सोपान आनंदिली
५३३३	।।ना.गा.०९०५.००१।।	ऐकोनि ऐसीं नांवें हासिन्नले ब्राह्मण । नामांचें अभिधान सांगा आम्हां
५३३४	।।ना.गा.०९०५.००२।।	येक म्हणती नामापाशीं काय आहे । ज्ञाना वाहात आहे पखालीसी
५३३५	।।ना.गा.०९०५.००३।।	ज्ञानदेव म्हणे तोही माझा आत्मा । वेगळिक आम्हां तया नाहीं
५३३६	।।ना.गा.०९०५.००४।।	मारिती आसुड म्हैशियाचे पाठीं । तोचि वळ उठे ज्ञानदेवा
५३३७	।।ना.गा.०९०५.००५।।	म्हणती द्विजवर अहो ज्ञानदेवा । यापासोनी उच्चारावा वेदध्वनी
५३३८	।।ना.गा.०९०५.००६।।	तरीच तुमची समता आम्हां येईल कळों। नाहीं तरी बोलों नका कांहीं
५३३९	।।ना.गा.०९०५.००७।।	ज्ञानदेव म्हणे बोल रे ऋग्वेद । ओंकार मूळशब्द प्रणवाचा
५३४०	।।ना.गा.०९०६.००१।।	मग वेदाचा आरंभ करितां जाला पशू । विधी उपन्यासू सांग पढे
५३४१	।।ना.गा.०९०६.००२।।	करिती आश्चर्य सकळ द्विजवर। हे तीहीं अवतार तीन देवांचे
५३४२	।।ना.गा.०९०६.००३।।	आदिमाया मुक्ताई मुक्तपणें अवतरली । आम्हांपासुनि जाली थोर चुकी
५३४३	।।ना.गा.०९०६.००४।।	कर्मठ अभिमानें ठकलों देहबुद्धि । गोवियेलों विधि निषेधाच्या
५३४४	।।ना.गा.०९०६.००५।।	नेणें भक्तिज्ञान वैराग्याचा लेश । कुटुंबाचे दास होऊनि ठेलों
५३४५	।।ना.गा.०९०६.००६।।	आणिकांसी सांगों आपण नाचरों । लटिकेच हुंबरों प्रतिष्ठेसी

५३४६	।।ना.गा.०९०६.००७।।	धन्य यांचा वंश धन्य यांचें कुळ । धन्य पुण्यशील अवतार हो
५३४७	।।ना.गा.०९०६.००८।।	सकळ द्विजवर करिती नमस्कार । आनंदें जयजयकार करिताती
५३४८	।।ना.गा.०९०६.००९।।	ज्ञानदेव म्हणे तुमच्या पायांचा महिमा । सामर्थ्य हें आम्हां अंगीं नाहीं
५३४९	।।ना.गा.०९०७.००१।।	तुम्हीं वेदरूप भूदेव प्रत्यक्ष । दरुषणेंचि मोक्ष जडमूढां
५३५०	।।ना.गा.०९०७.००२।।	सकळही तीर्थें तुमच्या वसती पायीं। तेथें आमुचे कायीं उरती दोष
५३५१	।।ना.गा.०९०७.००३।।	धन्य दिवस आजी जालों कृतकृत्य । भेटलेती संतब्रह्मवृंद आम्हां
५३५२	।।ना.गा.०९०७.००४।।	ज्ञानदेवा ध्यान ब्राह्मणाचे चरण । कलिमलछेदन निवृत्ति म्हणे
५३५३	।।ना.गा.०९०८.००१।।	जयाचें दरुषण होतांची दुरूनी । सर्व जाय पळोनी पाप ताप
५३५४	।।ना.गा.०९०८.००२।।	तीर्थासी पावन कलिमलछेदन। देवाचें कल्याण जयाचेंनी
५३५५	।।ना.गा.०९०८.००३।।	ते पाय सादृश्य देखिले आजि दृष्टी । याग सहस्र कोटी न तुकती
५३५६	।।ना.गा.०९०८.००४।।	जयांच्या हृदयीं वेदांचा निवास । शास्त्रें रहिवास केला होय
५३५७	।।ना.गा.०९०८.००५।।	जयांच्या वचनें देवपितर तृप्त । स्वाहा स्वधा होत ज्यांच्या मुखें
५३५८	।।ना.गा.०९०८.००६।।	जोडोनियां कर विनवितो सोपान । निश्चयें वचन द्यावें आम्हां
५३५९	।।ना.गा.०९०८.००७।।	शेष उच्छिष्टा करावें विभागी । बटुपणालागीं अधिकारी
५३६०	।।ना.गा.०९०८.००८।।	अध्यात्मग्रंथ पाहती पैठणीं । गीतासंबोधिनी जवळी असे
५३६१	।।ना.गा.०९०८.००९।।	भोगावतीं स्नान कालिका दरुषण । वेदांत व्याख्यान परिमिती
५३६२	।।ना.गा.०९०८.०१०।।	धन्य हा सोपान धन्य ज्ञानदेव । धन्य निवृत्तिराय ब्रह्मरूप
५३६३	।।ना.गा.०९०८.०११।।	सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन । पैठणींचे जन वेधियेले
५३६४	।।ना.गा.०९०८.०१२।।	तव कव्ययज्ञ जाला गृहस्थाचे घरीं । पितर मंत्रोच्चारीं आव्हानिले
५३६५	।।ना.गा.०९०८.०१३।।	अवघे द्विजवर म्हणती धन्य धन्य । यासारिखे ब्राह्मण नाहीं कोणी
५३६६	।।ना.गा.०९०८.०१४।।	उपनिषद्भाग पढिन्नलें वेदांत । परि हें सामर्थ्य नाहीं आम्हां
५३६७	।।ना.गा.०९०८.०१५।।	नाहीं ऐकिलें ना कोठें वर्तलें। सृष्टीं तेंचि आजि दृष्टीं दाखविले
५३६८	।।ना.गा.०९०८.०१६।।	पशुमुखें वेद दृश्य इतर लोक । थोर हें कवतुक दाखविलें
५३६९	।।ना.गा.०९०८.०१७।।	मिळोनि समस्त सोडियेलें शास्त्र । विचारोनी पत्र लिहियेलें
५३७०	।।ना.गा.०९०८.०१८।।	हे परलोकीचें तारू देवत्रय कोणी । प्रायश्चित काय द्यावें कोणी
५३७१	।।ना.गा.०९०८.०१९।।	लिहोनियां पत्र दिधलें तया हातीं । समस्तांसी निवृत्ति नमस्कारिलें

५३७२	।।ना.गा.०९०९.००१।।	घेऊनियां पत्र केली प्रदक्षिणा । साष्टांगीं ब्राह्मणां नमन केलें
५३७३	।।ना.गा.०९०९.००२।।	मागोनियां म्हैसा नेवाशासी आले । प्राकृत पैं केली गीतादेवी
५३७४	।।ना.गा.०९०९.००३।।	निवृत्ती म्हणती ऐकें ज्ञानदेवा । अनुभव करावा अमृता ऐसा
५३७५	।।ना.गा.०९०९.००४।।	आदिशक्तिमाता वंदुनियां म्हाळसा । मग तेथुनी सरिसा चालियेले
५३७६	।।ना.गा.०९०९.००५।।	क्रमिताती मार्ग अनुभव कुशळ । हरिनाम सकळ कवित्वकळा
५३७७	।।ना.गा.०९०९.००६।।	येउनी उतरली आळाचिये वनीं । पशु तये स्थानीं शांत जाला
५३७८	।।ना.गा.०९०९.००७।।	करूनी तया पूजन सेंदूर तेलें लेपून । आळंकावती निजस्थान प्रवेशली
५३७९	।।ना.गा.०९०९.००८।।	साने थोर सकळ तेथील निवासी । निवृत्ति तयांसी नमस्कारिलें
५३८०	।।ना.गा.०९१०.००१।।	तिन्ही देव जैसे परब्रह्मींचे ठसे । जगीं सूर्य जैसे प्रकाशले
५३८१	।।ना.गा.०९१०.००२।।	धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान। धन्य तो निधान ज्ञानदेव
५३८२	।।ना.गा.०९१०.००३।।	उपजतांचि ज्ञानी हें वर्म जाणौनि । आले लोटांगणीं चांगदेव
५३८३	।।ना.गा.०९१०.००४।।	प्रत्यक्ष पैठणीं भटीं केला वाद । बोलविला वेद म्हैसीपुत्रा
५३८४	।।ना.गा.०९१०.००५।।	संस्कृताच्या सोडोनियां गाठी । केलीसे मराठी गीता देवी
५३८५	।।ना.गा.०९१०.००६।।	नामा म्हणे सर्व सुख लाहिजे । एक वेळां जाईजे अळंकावती
५३८६	।।ना.गा.०९११.००१।।	गीता गीता गीता त्रिवार बोलतां । पाप जाय तत्त्वतां मोक्ष जोडे
५३८७	।।ना.गा.०९११.००२।।	गीतेचा महिमा बोलवेना वाचे । बंधनें जीवाचीं दूर होती
५३८८	।।ना.गा.०९११.००३।।	येक येक अक्षर कोटी अश्वमेध । फळ हें प्रसिद्ध पुराणोक्त
५३८९	।।ना.गा.०९११.००४।।	येकचि तो श्लोक वाचिलिया नेमें। अंतीं परमधाम प्राप्त होय
५३९०	।।ना.गा.०९११.००५।।	नामा म्हणे गीता संपूर्ण वाचितां । लाभ त्याच्या हाता बोलवेना
५३९१	।।ना.गा.०९१२.००१।।	गीता गीता म्हणतां पाप होय नाश । कैवल्यही त्यास प्राप्त होय
५३९२	।।ना.गा.०९१२.००२।।	गीतेचीं अक्षरें पडतां श्रवणीं । जाय तत्क्षणीं भवभय
५३९३	।।ना.गा.०९१२.००३।।	येका येका श्लोकीं कोटी अश्वमेध । पुण्यही अगाध म्हणतां गीता
५३९४	।।ना.गा.०९१२.००४।।	नामा म्हणे गीता नित्य जो वाचिता। तयाच्या सुकृता पार नाहीं
५३९५	।।ना.गा.०९१३.००१।।	ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणें निगमवल्लि प्रगट केली
५३९६	।।ना.गा.०९१३.००२।।	गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगट केली
५३९७	।।ना.गा.०९१३.००३।।	अध्यात्म विद्येचें दाविलेंसें रूप । चैतन्याचा दीप उजळिला

५३९८	।।ना.गा.०९१३.००४।।	छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवीं नाव उभारिली
५३९९	।।ना.गा.०९१३.००५।।	श्रवणाचे मिषे बैसावें येउनी । सामराज्य भुवनीं सुखी नांदे
५४००	।।ना.गा.०९१३.००६।।	नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी
५४०१	।।ना.गा.०९१४.००१।।	नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातलें नामदेवें
५४०२	।।ना.गा.०९१४.००२।।	देऊनि आलिंगन प्रीती पडिभरें । पूजिलें आदरें यथाविधी
५४०३	।।ना.गा.०९१४.००३।।	धन्य तो अवसरु संत समागमु । करीतसे संभ्रमु आवडीचा
५४०४	।।ना.गा.०९१४.००४।।	नामदेव म्हणे सुफळ माझें जिणें । स्वामीच्या दर्शनें धन्य जालों
५४०५	।।ना.गा.०९१५.००१।।	पूर्व पुण्य माझें फळोन्मुख जालें । प्रत्यक्ष भेटले पांडुरंग
५४०६	।।ना.गा.०९१५.००२।।	संसारीं आसक्त मायामोहें रत । तापत्रयीं संतप्त जाले जीव
५४०७	।।ना.गा.०९१५.००३।।	ऐसिया पतिताचा करावया उद्धार । यालागीं अवतार तुमचा जगीं
५४०८	।।ना.गा.०९१५.००४।।	तरी मी एक दीन मूढ मतिहीनु । चरणींचा रजरेणु संतांचिया
५४०९	।।ना.गा.०९१५.००५।।	म्हणोनि पंढरीनाथ पाळितसे मातें । प्रेमजीवन भातें देवोनियां
५४१०	।।ना.गा.०९१५.००६।।	आजि स्वामींनीं पाहिलें कृपादृष्टीं । केली सुखवृष्टि अनिवार
५४११	।।ना.गा.०९१५.००७।।	नामा म्हणे तुमच्या चरणाचा आधार । ठाकिन पैलपार भवनदीचा
५४१२	।।ना.गा.०९१६.००१।।	ज्ञानदेव म्हणे तूं भक्तशिरोमणी । जोडिले जन्मोनि केशवचरण
५४१३	।।ना.गा.०९१६.००२।।	प्रेमसुख गोडी तुजची फावली । वासना मावळली सकळ तुझी
५४१४	।।ना.गा.०९१६.००३।।	धन्य तुझें जन्म धन्य तुझें कुळ । धन्य तुज राऊळ जवळीं असे
५४१५	।।ना.गा.०९१६.००४।।	भक्तिप्रेम धन्य साधिलें तुवां सार । केला पैं संसार देशधडी
५४१६	।।ना.गा.०९१६.००५।।	क्षणएक एकांतीं बैसोनी सहज । अंतरींचें गुज बोलों कांहीं
५४१७	।।ना.गा.०९१६.००६।।	जीवन्मुक्त ज्ञानी जरी जालें पावन । तरि देवतीर्थ भजन न संडिती
५४१८	।।ना.गा.०९१६.००७।।	भक्तशिरोमणी धन्य तूं संसारीं । परि एक अवधारी वचन माझें
५४१९	।।ना.गा.०९१६.००८।।	भूतळींची तीर्थें पहावीं नयनीं। असे आर्त मनीं आहे मज
५४२०	।।ना.गा.०९१६.००९।।	तुझिये संगतीचें नित्य सुख घ्यावें । सार्थक करावें संसाराचें
५४२१	।।ना.गा.०९१६.०१०।।	ऐसी उत्कंठा बहुत माझें पोटीं । भाग्यें जाली भेटी तुजसी आजी
५४२२	।।ना.गा.०९१६.०११।।	ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ । करावा मुहूर्त प्रयाणासी
५४२३	।।ना.गा.०९१७.००१।।	ऐसें ऐकोनी नामा विचारी मानसीं । काय द्यावें यासी प्रतिवचन

५४२४	।।ना.गा.०९१७.००२।।	विठोबाचे पाय आठविले मनीं । बोले अमृतवचनीं तयाप्रति
५४२५	।।ना.गा.०९१७.००३।।	सर्व सुख मज आहे पांडुरंगीं । जावें कवणा लागीं कोण्या तीर्था
५४२६	।।ना.गा.०९१७.००४।।	आहिक्य परत्रीं मज चाड नाहीं सर्वथा । न लागती पुरुषार्था मुक्ति चारी
५४२७	।।ना.गा.०९१७.००५।।	रंक होऊनियां पंढरी चोहटा । राखेन दारवंटा महाद्वारीं
५४२८	।।ना.गा.०९१७.००६।।	या सुखाकारणें शरीर कर्वतीं फाडिलें । दुर्जय तोडिलें मायाजाळ
५४२९	।।ना.गा.०९१७.००७।।	त्रिभुवनींचें वैभव सांडोनियां दुरी । जालासे भिकारी पंढरीचा
५४३०	।।ना.गा.०९१७.००८।।	कल्पतरूची छाया कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आईतें सर्वकाम
५४३१	।।ना.गा.०९१७.००९।।	विठोबाचे पायीं मज काय उणें । परि वासनाचि मनें गिळिली माझी
५४३२	।।ना.गा.०९१७.०१०।।	जन्मोनी पाळिलों पोशिलों जयाचा । विकिलों कायावाचामनें त्यासी
५४३३	।।ना.गा.०९१७.०११।।	नामा म्हणे स्वामी विठोबासी पुसा । आज्ञा देईल शिरसा धरीन त्याची
५४३४	।।ना.गा.०९१८.००१।।	ज्ञानदेव म्हणे भला भक्तराज । कळलें गौप्यगुज सर्व तुझें
५४३५	।।ना.गा.०९१८.००२।।	धीर आणि चतुर सर्वस्वें उदार। साजे तुज अधिकार प्रेमभक्ति
५४३६	।।ना.गा.०९१८.००३।।	धन्य तूं संसारीं भक्तभावशीळ । साधिलें तुवां केवळ प्रेमसुख
५४३७	।।ना.गा.०९१८.००४।।	देउनी आलिंगन नामा धरियेला करीं । वंदियेलें शिरीं चरणरज
५४३८	।।ना.गा.०९१८.००५।।	राऊळा भीतरीं चला जाऊं वेगें । आज्ञा मागों दोघे तीर्थयात्रे
५४३९	।।ना.गा.०९१८.००६।।	सत्वर उठोनी आले स्वामी जवळी । मस्तकें ठेवियेलीं चरणावरी
५४४०	।।ना.गा.०९१८.००७।।	जीवींचा निजभावो सांगे ज्ञानदेवो । ऐकोनी पंढरीरावो हासिन्नले
५४४१	।।ना.गा.०९१८.००८।।	म्हणे तूं ज्ञानशीळ चिद्रूप केवळ । सबाह्यनिर्मळ स्फटिक जैसा
५४४२	।।ना.गा.०९१८.००९।।	सहज तीर्थरूप तूंचि निरंतर । असतां हा विचार काय करिसी
५४४३	।।ना.गा.०९१८.०१०।।	येरु म्हणे स्वामी बोलिलेती बरवें । परि सार्थक करावें देहाचें या
५४४४	।।ना.गा.०९१८.०११।।	प्रसंगें नामयाचें संगति सुख घ्यावें । म्हणोनी ज्ञानदेवें धरिले चरण
५४४५	।।ना.गा.०९१९.००१।।	हांसोनी पंढरिनाथ पाहे नाम्याकडे । म्हणे नवल केवढें भाग्य तुझें
५४४६	।।ना.गा.०९१९.००२।।	प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा
५४४७	।।ना.गा.०९१९.००३।।	ऐसें भाग्य जेणें सर्वस्वें साधावें । तरीच जन्मा यावें विष्णुदासा
५४४८	।।ना.गा.०९१९.००४।।	जावें स्वस्ति क्षेम यावें शीघ्रवत । करावें स्वहित कळेल तैसें
५४४९	।।ना.गा.०९१९.००५।।	सर्वभावें आमचा विसरु न पडावा । लोभ असों द्यावा मजवरी

५४५०	।।ना.गा.०९१९.००६।।	परियेसी ज्ञानराजा बोले जगजीवनु । तूं तंव सर्वज्ञु सुखमूर्ति
५४५१	।।ना.गा.०९१९.००७।।	परि एक मागणें आहे तुजप्रती । आठवण चित्तीं असों द्यावी
५४५२	।।ना.गा.०९१९.००८।।	हें कृपेचें पोसणें माझें आवडतें । क्षण जीवापरतें न करीं कदा
५४५३	।।ना.गा.०९१९.००९।।	परी तुवां सांकडें घातलें सर्वथा । दाटलें अवस्था हृदय माझें
५४५४	।।ना.गा.०९१९.०१०।।	आरुष साबडें नामें माझें वेडें । मार्गीं मागें पुढें सांभाळावें
५४५५	।।ना.गा.०९१९.०११।।	ताहान भूक तुवां जाणावी जीवींची । मज चिंता याची थोर वाटे
५४५६	।।ना.गा.०९१९.०१२।।	मग नामयाचा हातु धरोनी श्रीपती । देतु असे हातीं ज्ञानदेवा
५४५७	।।ना.गा.०९१९.०१३।।	रानीं वनीं जनीं विसंबसी झणीं । धाडितों देखोनी आर्त तुझें
५४५८	।।ना.गा.०९१९.०१४।।	चरणीं ठेवुनी माथा निघते जाले दोघे । आले चंद्रभागे केलीं स्नानें
५४५९	।।ना.गा.०९१९.०१५।।	पुंडलिकाचे चरण वंदूनियां माथा । उतरले भीमा पैल तीरीं
५४६०	।।ना.गा.०९२०.००१।।	तीर्थयात्रेप्रति बोळविला नामा । आले निजधामा देवरावो
५४६१	।।ना.गा.०९२०.००२।।	चरण प्रक्षाळाया रुक्मादेवी आली । श्रीमुख न्याहाळी भरोनी दृष्टी
५४६२	।।ना.गा.०९२०.००३।।	तैं निडारले नयन स्वेदें भिजलें वदन । हृदय जालें पूर्ण करुणारसें
५४६३	।।ना.गा.०९२०.००४।।	बाप कृपेचा सागरु सुखाचा सुखतरु । आर्त लोभापरु दीनालागीं
५४६४	।।ना.गा.०९२०.००५।।	चरणीं ठेवुनी माथा पुसे जगन्माता। आजी कां अवस्था विपरीत देखों
५४६५	।।ना.गा.०९२०.००६।।	म्हणे वाटतें जडभारी नाम्याच्या वियोगें । दाटलें उद्वेगें चित्त माझें
५४६६	।।ना.गा.०९२०.००७।।	कवण्या सुखें स्थिर न राहे माझें मन । कैं डोळां देखेन प्राण माझा
५४६७	।।ना.गा.०९२०.००८।।	इष्टमित्र बंधु मायबाप सखा । ही नामें मज देखा ठेविलीं तेणें
५४६८	।।ना.गा.०९२०.००९।।	तो कैसा मजवीण राखिल आपुला प्राण । हे चिंता दारुण वाटे मज
५४६९	।।ना.गा.०९२०.०१०।।	तव ती महामाया म्हणे जी यादव राया । झणीं तुमच्या नामया दिठी लागे
५४७०	।।ना.गा.०९२०.०११।।	शोक मोह दु:ख क्षणामाजीं जाळी । तें जीवन त्याजवळीं नाम तुमचें
५४७१	।।ना.गा.०९२१.००१।।	माझे भक्त मज अनुसरले चित्तें । त्याहुनि पढियंते मज आणिक नाहीं
५४७२	।।ना.गा.०९२१.००२।।	व्यक्ति येणें घडे त्याची या आवडी। युगायुगीं प्रौढी हेचि मिरवी
५४७३	।।ना.गा.०९२१.००३।।	त्याचेनि कृतार्थ असें मी पूर्णकाम । ते माझे परम प्राणसखे
५४७४	।।ना.गा.०९२१.००४।।	ते माझे आश्रम मी त्यांचा विश्राम । जीहीं रूपनाम केलें मज
५४७५	।।ना.गा.०९२१.००५।।	मी त्यांचा सोयरा ते माझे सांगाती । करी त्यांसी एकांतीं सुखगोष्टी

५४७६	।।ना.गा.०९२१.००६।।	जीहीं तनुमन प्राण लाविला मजकडे । मी तयां आवडे जीवाहुनी
५४७७	।।ना.गा.०९२१.००७।।	ते माझ्या भाग्याचे अधिकारी विभागी । वैकुंठ त्या लागीं वसतें केलें
५४७८	।।ना.गा.०९२१.००८।।	त्यांचे गुज गौप्य मीची एक जाणें । माझी प्रेमखूण कळली तयां
५४७९	।।ना.गा.०९२१.००९।।	मनाची साउली करोनियां माते । भोगिती आतां ते प्रेमसुख
५४८०	।।ना.गा.०९२१.०१०।।	आपुलियाचीं किरणें विराजे गभस्ती । परी किरणें तीं नव्हती आन जेवीं
५४८१	।।ना.गा.०९२१.०११।।	तैसे माझे दास मजमाजीं उदास । असती समरस दुजेनविण
५४८२	।।ना.गा.०९२१.०१२।।	मी तो भक्तरूप भक्त माझें स्वारूप । प्रभा आणि दीप जयापरी
५४८३	।।ना.गा.०९२१.०१३।।	हे खूण अनुभवी जाणती ते ज्ञानी । ज्या नाहीं आयणी कासयाची
५४८४	।।ना.गा.०९२१.०१४।।	त्यांचिये चरणींचें रजरेणु माझें नामें। जें सांडिलें रजतमें सत्वशीळ
५४८५	।।ना.गा.०९२१.०१५।।	त्यांचे भेटीलागीं हृदय माझें कळवळे । कैं देखेन डोळे निवती माझे
५४८६	।।ना.गा.०९२२.००१।।	तंव ते आवडते भक्त अंतरंग आपुले । देवें बोलाविलें एकांतासी
५४८७	।।ना.गा.०९२२.००२।।	म्हणे ह्या नाम्यापरतें मज दुजें नावडे । सांगे तयापुढें केशीराजु
५४८८	।।ना.गा.०९२२.००३।।	त्या देखतांची दृष्टी मन माझें निवे । वाटे त्या घालावें हृदयामाजीं
५४८९	।।ना.गा.०९२२.००४।।	त्याचेनि लोभें मन माझें मोहिलें । अखंड राहिलें त्याचेपाशीं
५४९०	।।ना.गा.०९२२.००५।।	मजपरतें दुजें नेणें तो नामा । नित्य माझा प्रेमा पढिये त्यासी
५४९१	।।ना.गा.०९२२.००६।।	मी भक्तकाजकैवारी म्हणवितां वाटे लाज । परि म्यां कांहीं नाहीं काज केलें त्यांचें
५४९२	।।ना.गा.०९२२.००७।।	धर्म अर्थ काम त्या नाहीं दिधले । जन्मोनि बांधलें सेवाऋणें
५४९३	।।ना.गा.०९२२.००८।।	तेणें आपुलेनि पुरुषार्थें जिंकिला संसार । केला मदमत्सर देशधडी
५४९४	।।ना.गा.०९२२.००९।।	लोभ दंभ दुरळ माया मोह वैरी । घातलें तोडरीं कामक्रोध
५४९५	।।ना.गा.०९२२.०१०।।	तो न मनीं आणिक देवा न करी त्यांची सेवा । मजपरता विसांवा नाहीं त्यासी
५४९६	।।ना.गा.०९२२.०११।।	तें मार्गीं शिणलें असेल कोमाईलें। सुखदु:ख आपुलें सांगेल कवणा
५४९७	।।ना.गा.०९२२.०१२।।	त्याचिया जीवींचें मीच जाणे सर्व । हा माझा अनुभव आहे त्यासी
५४९८	।।ना.गा.०९२२.०१३।।	तें माझें दास आवडतें अंतरंग । त्यजिला सर्वसंग मजसाठीं
५४९९	।।ना.गा.०९२२.०१४।।	देखोनी ते आवडी अभिन्नव वाटलें। सप्रेमें दाटले सकळ भक्त
५५००	।।ना.गा.०९२२.०१५।।	परसा भागवत आनंदें नाचत । लोटांगणीं येत गरुडपारी
५५०१	।।ना.गा.०९२३.००१।।	ऐसे सुखरूप दोघे चालताती मार्गीं । परी चित्त पांडुरंगीं नामयाचें

५५०२	।।ना.गा.०९२३.००२।।	क्षणाक्षणा वास परतोनी पाहे । वियोग न साहे पंढरीचा
५५०३	।।ना.गा.०९२३.००३।।	म्हणे कां गा केशीराजा मोकलिलें मातें । न येसीच सांगातें सांभाळीत
५५०४	।।ना.गा.०९२३.००४।।	चिंतातुर थोर पडिलों ये परजनीं । न दिसे माझे कोणी जिवलग
५५०५	।।ना.गा.०९२३.००५।।	फुटोनी हृदय होती दोन्ही भाग । बहु मज उद्वेग वाटताती
५५०६	।।ना.गा.०९२३.००६।।	तूं माझी जननी तूं माझा जनिता । तूं बंधु चुलता पंढरीराया
५५०७	।।ना.गा.०९२३.००७।।	इष्टमित्र तूंचि तूंचि गणगोत । तूंचि कुळदैवत आवडतें
५५०८	।।ना.गा.०९२३.००८।।	तूंचि माझें व्रत तूंचि माझें तीर्थ । तूंचि धर्म अर्थ काम देवा
५५०९	।।ना.गा.०९२३.००९।।	तूंचि ज्ञानचक्षु तूंचि माझा लक्षू । तूंचि माझा, साक्षु स्वभावासी
५५१०	।।ना.गा.०९२३.०१०।।	साच कीं लटिकें हें बोलणें । तुजवांचुनि जाणें कवण दुजा
५५११	।।ना.गा.०९२३.०११।।	नामा म्हणे आपुलें अनाथ सांभाळीं । येऊनी हृदयकमळीं राहे माझ्या
५५१२	।।ना.गा.०९२४.००१।।	ज्ञानदेव म्हणे परियेसी विष्णुदासा । तूं सुखसंतोषा पात्र होसी
५५१३	।।ना.गा.०९२४.००२।।	प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या हृदयीं आला । तूं कां वेळोवेळां खंत करिसी
५५१४	।।ना.गा.०९२४.००३।।	विचारी सावध होवोनि भक्तराजा । सुखानंदु तुझा तुजची जवळी
५५१५	।।ना.गा.०९२४.००४।।	मी नेणें ज्ञानगती नेणें योगयुक्ति । न देखें विश्रांति एकेविण
५५१६	।।ना.गा.०९२४.००५।।	सर्वभावें मज तेंचि रूप आवडे। जें पुंडलिकापुढें उभें असे
५५१७	।।ना.गा.०९२४.००६।।	तो माझा विठ्ठल दावा दृष्टी भरी । आस मी न करी आणिकांची
५५१८	।।ना.गा.०९२४.००७।।	व्यापकु विठ्ठलु आहे सर्व देशीं । जरी सांडोनियां पाहसी भेदभ्रमु
५५१९	।।ना.गा.०९२४.००८।।	तो नाहीं ऐसा ठाव उरलासे कवण । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें
५५२०	।।ना.गा.०९२४.००९।।	काया वाचा मनें मज तोचि व्हावा । गीतीं गातां जीवा सुख वाटे
५५२१	।।ना.गा.०९२४.०१०।।	ऐकावा श्रवणीं पाहावा तोचि नयनीं । नवजावा जवळोनी दूर कोठें
५५२२	।।ना.गा.०९२४.०११।।	जें अक्षर अव्यक्त देशकाळरहित । ज्ञानी उपासित सोहंभावें
५५२३	।।ना.गा.०९२४.०१२।।	सर्वेंद्रियांसहित आवरोनि चित्त । भोगिती अद्वैत नित्य सुख
५५२४	।।ना.गा.०९२४.०१३।।	सर्व सुख मज आहे त्याच्या पायीं । आणिकांच्या वाहीं न पडे कदां
५५२५	।।ना.गा.०९२४.०१४।।	तेथें माझें मन रंगलेंसें भावें । सुख येणें जीवें देखिलें डोळां
५५२६	।।ना.गा.०९२४.०१५।।	सर्वगत संपूर्ण सर्वकाळ असणें । होणें आणि जाणें नाहीं जया
५५२७	।।ना.गा.०९२४.०१६।।	तें तुज माझारीं तूं तयाभीतरीं । अनुभवी निर्धारीं ठेवुनी मन

५५२८	।।ना.गा.०९२४.०१७।।	मी न मनीं न मनीं लटिकी हे कहाणी । जलधरावांचोनि चातक जैसा
५५२९	।।ना.गा.०९२४.०१८।।	तैसें माझें मन स्मरे रात्रंदिवस । पंढरीनिवास जीवन माझें
५५३०	।।ना.गा.०९२४.०१९।।	ऐसें ऐकोनि बोलणें म्हणे ज्ञानदेव । धन्य तुझा भाव एकविध
५५३१	।।ना.गा.०९२४.०२०।।	नामा म्हणे माझ्या सुखाचा विसावा । आवडे या जीवा पंढरीरावो
५५३२	।।ना.गा.०९२५.००१।।	ऐसें नित्यानंदभरित क्रमिताति मार्गु । हृदयीं तो अनुरागु आवडीचा
५५३३	।।ना.गा.०९२५.००२।।	प्रेमें वोसंडत करिती स्वहितगोष्टी। दाविती कसोटी अनुभवाची
५५३४	।।ना.गा.०९२५.००३।।	बाप तें सुख वृष्टि होतसे अनिवार । ब्रह्मरसें पूर वोसंडत
५५३५	।।ना.गा.०९२५.००४।।	ज्ञानदेव म्हणे परियेसी नामया । अद्वैत आत्मया प्रेममूर्ती
५५३६	।।ना.गा.०९२५.००५।।	भक्तिभाग्य तुवां जोडिलें अविनाश । सांग पां सविलास मार्ग त्याचा
५५३७	।।ना.गा.०९२५.००६।।	कैसा तो साधावा सांग भजनविधि । कैसी नमनबुद्धि सत्वशील
५५३८	।।ना.गा.०९२५.००७।।	कैसा निर्विकार ध्यानाचा प्रकार । हा सर्व विचार सांगे मज
५५३९	।।ना.गा.०९२५.००८।।	कैसें तें श्रवण कैसें तें मनन । कैसें निजध्यासन दृढ होय
५५४०	।।ना.गा.०९२५.००९।।	कवण तें भक्ति कवण तें धृति । कवण तें विश्रांति दावी मज
५५४१	।।ना.गा.०९२५.०१०।।	बहु उत्कंठित या सुखा कारणें। तें मज पारणें करवीं आजी
५५४२	।।ना.गा.०९२५.०११।।	सांगे हा अनुभवो साधन उपावो । विनवी ज्ञानदेवो नामयासी
५५४३	।।ना.गा.०९२६.००१।।	परिसूनि ते गोष्टी घाली चरणीं मिठी । दाटलासे कंठीं सद्गदित
५५४४	।।ना.गा.०९२६.००२।।	कृपेचें पोसणें मी पंढरीरायाचें। येवढें भाग्य कैचें मज जाणिवेचें
५५४५	।।ना.गा.०९२६.००३।।	नव्हे बहुश्रुत नव्हे ज्ञानशील । दास मी दुर्बळ वैष्णवांचा
५५४६	।।ना.गा.०९२६.००४।।	नेणतें नेणतें कांहींच मी नेणतें । म्हणोनि देवें तुम्हांतें निरविलें
५५४७	।।ना.गा.०९२६.००५।।	येतां माझा हात दिधला तुमच्या करीं । घातलें आभारीं मायबापें
५५४८	।।ना.गा.०९२६.००६।।	याचेनि कृपावसें येईल वाचेसरिसें । कळेल कांहीं तैसें निवेदीन
५५४९	।।ना.गा.०९२६.००७।।	परी भानूसी देखणें करिजे अनुतेजें । तैसें ज्ञान माझें स्वामीप्रती
५५५०	।।ना.गा.०९२६.००८।।	कल्पतरु याचक कृपणाचे द्वारीं । कां दैन्य भाकी थोरी कामधेनु
५५५१	।।ना.गा.०९२६.००९।।	तैसी तुमची यांच्या मज दीनाप्रती । नकळे काळगति समर्थाची
५५५२	।।ना.गा.०९२६.०१०।।	मातेचिया स्नेहें बाळक बोबडें । खेळे लाडें कोडें नेणे लाजो
५५५३	।।ना.गा.०९२६.०११।।	नामा म्हणे तैसें तुम्हीं माझें कवतुक । करुनी सुखें सुख वाढवितां

५५५४	।।ना.गा.०९२७.००१।।	ज्ञानदेव म्हणे शंका न धरिजे मनीं । दृष्टि दुजेपणीं न ठेवावी
५५५५	।।ना.गा.०९२७.००२।।	सुखें सुख घ्यावें अनुभवोनी अनुभवावें। आहे तें आघवें ब्रह्मरूप
५५५६	।।ना.गा.०९२७.००३।।	तो सुखाचा अनुवाद करी रे सुखरूपा । सुख वस्तुच्या दीपा नामदेवा
५५५७	।।ना.गा.०९२७.००४।।	सुखाचिये ताटीं सुखची वोगरी । तृप्ती होईल थोरी क्षुधातुरा
५५५८	।।ना.गा.०९२७.००५।।	पंढरीरायाचा तूं प्रेमभांडारी । आस पूर्ण करी मज याचकाची
५५५९	।।ना.गा.०९२७.००६।।	विश्रांतीसी पात्र तूंचि विष्णुदासा । हा मज भरवंसा आहे तुझा
५५६०	।।ना.गा.०९२७.००७।।	म्हणोनी तुझा संग धरिली थोर आस । झणीं होसी उदास भक्तराया
५५६१	।।ना.गा.०९२७.००८।।	सिंधुहुनी सखोल सुरस तुझे बोल । आनंदाची वोल नित्य नवी
५५६२	।।ना.गा.०९२७.००९।।	ते मज सादर ऐकवी सत्वर । श्रवण क्षुधातुर जाले माझे
५५६३	।।ना.गा.०९२७.०१०।।	जाणीव शहाणीव तरीच शोभे सर्व । जरी होय आविर्भाव वैराग्याचा
५५६४	।।ना.गा.०९२७.०११।।	ज्ञानदेव म्हणे तूं भक्त अंतरंग । नलगे तुज पांग बहुज्ञतेचा
५५६५	।।ना.गा.०९२८.००१।।	ऐसें ऐकोनियां प्रेमा आला पोटीं । म्हणे बोलावी ते गोष्टी अनुभवाची
५५६६	।।ना.गा.०९२८.००२।।	येर ते कर्मधर्म सर्वही पाल्हाळ । श्रमुचि केवळ जाणिवेचा
५५६७	।।ना.गा.०९२८.००३।।	ऐसा संत भेटे विरळा भाग्ययोगें । जो आथिला वैराग्यें सप्रेमळू
५५६८	।।ना.गा.०९२८.००४।।	सर्वभूतीं दया सर्वभावें करुणा । जेथें मीतूंपणा मावळला
५५६९	।।ना.गा.०९२८.००५।।	भजन तयां नांव वाटे मज गोड । येर ते काबाड वायांविण
५५७०	।।ना.गा.०९२८.००६।।	नमन ते नम्रता न देखें गुणदोष । अंतरीं प्रकाश आनंदाचा
५५७१	।।ना.गा.०९२८.००७।।	येर ते दांभिक जाणावे मायावी। विश्वास मी जीवीं न धरी त्यांचा
५५७२	।।ना.गा.०९२८.००८।।	ध्यान तया नांव निर्विकार निकें । जें विश्वीं माझ्या देखें विठोबासी
५५७३	।।ना.गा.०९२८.००९।।	अखंड हृदयीं तेचि आठवण । साजिरे समचरण विटेवरी
५५७४	।।ना.गा.०९२८.०१०।।	नादीं लुब्ध जैसें आसक्त हरिण। जाय विसरोन देहभाव
५५७५	।।ना.गा.०९२८.०११।।	यापरि तल्लीन दृढ राखे मन । या नांवें श्रवण आवडीचें
५५७६	।।ना.गा.०९२८.०१२।।	व्यवसायीं चित्त ठेवुनी कृपण । लाभाचें चिंतन सर्वकाळ
५५७७	।।ना.गा.०९२८.०१३।।	यापरि अखंड स्वहित विचारण । करिजे तें मनन सत्वशीळ
५५७८	।।ना.गा.०९२८.०१४।।	परपुरुषीं जैसी आसक्त व्यभिचारिणी । न लागे तिच्या मनीं कामधाम
५५७९	।।ना.गा.०९२८.०१५।।	कीटकीं भृंगुटिये जैसें अनुसंधान । निकें निजध्यासन एकविध

५५८०	।।ना.गा.०९२८.०१६।।	सर्वभावें एक विठ्ठलुचि ध्याये । सर्वांभूतीं पाहे रूप त्याचें
५५८१	।।ना.गा.०९२८.०१७।।	सर्वांहूनि निराळा रजतमावेगळा । भोगीं प्रेमकळा तेचि भक्ति
५५८२	।।ना.गा.०९२८.०१८।।	सत्वाचा सुभटु असंग एकटू । वैराग्य उद्भटू एकनिष्ठ
५५८३	।।ना.गा.०९२८.०१९।।	प्रारब्धाचा भोगी नेणें देहस्मृती । अखंड ते धृति निर्विकार
५५८४	।।ना.गा.०९२८.०२०।।	निर्वासना मन निजलाभें संपूर्ण । नेणें स्वरूपज्ञान विकल्पाचें
५५८५	।।ना.गा.०९२८.०२१।।	अनुरागें गोविंद ध्यायिजे एकांतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं
५५८६	।।ना.गा.०९२८.०२२।।	कायावाचामनें हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा
५५८७	।।ना.गा.०९२८.०२३।।	नामा म्हणे हेंहि बोलविलें तेणें । उदार सर्वज्ञें पांडुरंगें
५५८८	।।ना.गा.०९२९.००१।।	भक्त भागवत बहुसाल ऐकिले । बहु होऊनि गेले होती पुढें
५५८९	।।ना.गा.०९२९.००२।।	परि नामयाचें बोलणें नव्हे हे कवित्व। हा रस अद्भुत निरूपमु
५५९०	।।ना.गा.०९२९.००३।।	हे सुखविश्रांति नाहीं हो कल्पांतीं । विचारावें संतीं दूरदृष्टि
५५९१	।।ना.गा.०९२९.००४।।	होतू शास्त्रवक्ते व्युत्पत्तीचे माथे । होतू बहु श्रोते बुद्धिवंत
५५९२	।।ना.गा.०९२९.००५।।	होतु कर्मनिष्ठ विधीचे उद्भट । होतू सर्वश्रेष्ठ पूज्य लोकां
५५९३	।।ना.गा.०९२९.००६।।	होतू कलावंत कवित्व कुशल। होतू कां वाचाळ चतुरतेचे
५५९४	।।ना.गा.०९२९.००७।।	होतू कां पाठक होतू कां साधक। होतू कां वाचक ग्रंथकार
५५९५	।।ना.गा.०९२९.००८।।	होतू आत्मज्ञानी होतू निजध्यानीं । होतू वज्रासनीं बैसकेचे
५५९६	।।ना.गा.०९२९.००९।।	होतू योगयुक्त होतू जीवन्मुक्त । होतू कां विरक्त सर्व संगीं
५५९७	।।ना.गा.०९२९.०१०।।	ऐसे होती का सभाग्य संपन्न सर्वज्ञ । परि मी न मनीं तुजविण विष्णुदासा
५५९८	।।ना.गा.०९२९.०११।।	हे खुण जाणतां एक पंढरीरावो । रुक्मादेवी नाहो श्रीविठ्ठल
५५९९	।।ना.गा.०९३०.००१।।	पश्चिमे प्रभास आदि करोनी द्वारका । पाहिल्या सकळिकां मोक्षपुऱ्या
५६००	।।ना.गा.०९३०.००२।।	पंथी पावन तीर्थें करूनि सकळिकें । प्रक्षाळलीं पातकें वासनेचीं
५६०१	।।ना.गा.०९३०.००३।।	परी पंढरीचें प्रेम नामयाचे जीवीं । माउली आठवी पांडुरंग
५६०२	।।ना.गा.०९३०.००४।।	जीवन्मुक्त दोन्हीं भक्त आणि ज्ञानी । परतोनि तेथोनि येती मार्गीं
५६०३	।।ना.गा.०९३०.००५।।	तृषाकांत वनीं होतसे पीडणी । पडलें चिंतवणीं जीवनालागीं
५६०४	।।ना.गा.०९३०.००६।।	तंव दृष्टि एक कूप देखिला अवचिता । उदक तेथें पाहतां न लगे अंतु
५६०५	।।ना.गा.०९३०.००७।।	कवणेपरी येथें करूं रिघवणी । प्राण संतर्पणीं वांचवावे

५६०६	।।ना.गा.०९३०.००८।।	मग त्या नाम्याप्रती बोले ज्ञानदेवो । मज एक उपावो साध्य असे
५६०७	।।ना.गा.०९३०.००९।।	लघिमेचे लाघव करूनि ते अवसरीं । उतरोनि भीतरीं घेतलें उदक
५६०८	।।ना.गा.०९३०.०१०।।	घेउनि उदक निघाला बाहेरी । मग म्हणे अवधारी नामदेवा
५६०९	।।ना.गा.०९३०.०११।।	आणोनि उदक देईन तुझ्या हातीं । न दिसे अनुगति आणिक कांहीं
५६१०	।।ना.गा.०९३०.०१२।।	पडिल्या संकटीं विचारावें मनीं । सांडावी आयनी अभिमानाची
५६११	।।ना.गा.०९३०.०१३।।	आत्मा तो विठ्ठल सर्व निरंतरीं । आज्ञा दे झडकरी वेळू जाला
५६१२	।।ना.गा.०९३०.०१४।।	आत्मा तो विठ्ठलु असतां सर्व देहीं । माझी काय नाहीं चिंता त्यासी
५६१३	।।ना.गा.०९३०.०१५।।	नामा म्हणे धीर करावा नावेक । दावीन कवतुक स्वामीजवळी
५६१४	।।ना.गा.०९३१.००१।।	मग लावुनीया नेत्र निर्धारु पैं केला । हृदयीं आठविला केशीराज
५६१५	।।ना.गा.०९३१.००२।।	तूं इष्ट मित्र बंधु सोयरा जननी जनकु । नेणें मी आणिकु तुजवांचोनी
५६१६	।।ना.गा.०९३१.००३।।	येई पंढरीराया मजलागीं धांवतु । झणीं पाहासी अंतु कृपाळुवा
५६१७	।।ना.गा.०९३१.००४।।	तुझिये भेटीची बहु खंती वाटली । आसुवें दाटलीं नेत्रकमळीं
५६१८	।।ना.गा.०९३१.००५।।	धीर न धरवे जीवा पोकारितो धांवा । ये माझ्या केशवा मायबापा
५६१९	।।ना.गा.०९३१.००६।।	कायावाचामनें विनटलों चरणासी । तो मी शरण आणिकांसी जाऊं कोणा
५६२०	।।ना.गा.०९३१.००७।।	जन्मोनी पोसणा तुझाची म्हणती । मोकलितां अंतीं लाज कोणा
५६२१	।।ना.गा.०९३१.००८।।	अनाथा कैवारी नामाची आयणी। वर्णिजे पुराणीं कीर्ति तुझी
५६२२	।।ना.गा.०९३१.००९।।	तें काय लटकी वाणी करशील आजी । अजुनी तुज माझी करुणा न ये
५६२३	।।ना.गा.०९३१.०१०।।	गजेंद्राकारणें ज्या वेगीं धांवणें । केलें तंव स्मरणें कळवळोनी
५६२४	।।ना.गा.०९३१.०११।।	द्रौपदीचे आकांतीं येसी सोडविणें । तें मजकारणें विसरलासी
५६२५	।।ना.गा.०९३१.०१२।।	येतां निरविलें ज्ञानदेवाप्रती । दिधला त्याचे हातीं हात माझा
५६२६	।।ना.गा.०९३१.०१३।।	तो तूं कैसा मजलागीं करशील उदास । धांव कासावीस थोर जालों
५६२७	।।ना.गा.०९३१.०१४।।	सर्वभावें तूं मजलागीं लोभापर । मी तुझा डिंगर आवडता
५६२८	।।ना.गा.०९३१.०१५।।	नामा म्हणे हांसे जालें पिसुणाचें । न करी मज दीनाचें अव्हेरण
५६२९	।।ना.गा.०९३२.००१।।	तंव निजभुवनीं सुखें पंढरीनाथ । नित्य जीवीं आर्त निजभक्तांचें
५६३०	।।ना.गा.०९३२.००२।।	कृपेचा वोरसु होता देवापोटीं । तेचि करी गोष्टी रुक्माईसी
५६३१	।।ना.गा.०९३२.००३।।	क्षेम माझा नामा यावा एक वेळां । मग मी जीवावेगळा जाऊं नेदी

५६३२	।।ना.गा.०९३२.००४।।	आजि माझा डावा कां लवतो लोचन । करितसे स्फुरण वामबाहू
५६३३	।।ना.गा.०९३२.००५।।	उद्वेग उपसर्ग वाटती जीवाशीं । कवणा जिवलगाशीं कष्ट होती
५६३४	।।ना.गा.०९३२.००६।।	वाजतां पैं वारा न लागावा राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकासी
५६३५	।।ना.गा.०९३२.००७।।	वाटे तानभूक जाली त्या पीडणी । तरीच माझ्या मनीं ऐशी दशा
५६३६	।।ना.गा.०९३२.००८।।	तंव ती विश्वमाता विचारी नावेक । अवचिता शोक पडिला कानीं
५६३७	।।ना.गा.०९३२.००९।।	म्हणे तृषाक्रांत नामा करितसे धांवा । वेगीं जाऊनि देवा सांभाळावें
५६३८	।।ना.गा.०९३२.०१०।।	तंव तो आर्तबंधु ऐकोनि वचन । मनाचेनि मनें वेगू केला
५६३९	।।ना.गा.०९३२.०११।।	तंव गडगडित कूप उदकें वोसंडला । कल्पांतीं खवळला सिंधु जैसा
५६४०	।।ना.गा.०९३२.०१२।।	ज्ञानदेव म्हणे जालें अभिन्नव । कैसा ऋणिया देव केला येणें
५६४१	।।ना.गा.०९३२.०१३।।	सावध करोनियां दिलें आलिंगन । जीवें निंबलोण उतरिले
५६४२	।।ना.गा.०९३२.०१४।।	तो येरें चरणावरी ठेवियेला माथा । म्हणे माझी आहे चिंता विठोबासी
५६४३	।।ना.गा.०९३२.०१५।।	नामा म्हणे माझे बहु लळे पुरविले । कैं देखेन पाउलें विटेवरी
५६४४	।।ना.गा.०९३३.००१।।	योगी परम ध्यानीं बैसलिया जाणा । कांहीं या रे मना विश्रांती नुपजे
५६४५	।।ना.गा.०९३३.००२।।	तुजवीण दुसरें कांहींच नाठवे । लागली तुझी सवे विष्णुदासा
५६४६	।।ना.गा.०९३३.००३।।	कवण कुळीं तूं जन्मलासी नामा । केशव परमात्मा तुज जवळी
५६४७	।।ना.गा.०९३३.००४।।	धेनु वसे वनीं वत्स असे घरीं । चित्त तयावरी ठेवुनी चरे
५६४८	।।ना.गा.०९३३.००५।।	ते तया देखोनी संतोषली मनीं । तैसा तुझ्या गुणी वोल्हावलों
५६४९	।।ना.गा.०९३३.००६।।	तीर्थयात्रे जाणें न लगे कांहीं करणें । ऐकोनी तुझें गाणें सुखरूप
५६५०	।।ना.गा.०९३३.००७।।	वेडावल्या श्रुतिस्मृति आणि पुराणें । योगियांची ध्यानें विसर्जिलीं
५६५१	।।ना.गा.०९३३.००८।।	तुझें प्रेम सांडावें आणि मनें कोठें जावें । जावोनियां पाहावें काय कोठें
५६५२	।।ना.गा.०९३३.००९।।	समाधिसोहळा लय लक्ष वैराग्य । आम्हांलागीं भाग्य आणियेलें
५६५३	।।ना.गा.०९३३.०१०।।	ऋषि गणगंधर्व ब्रह्मादिक सर्व । लक्षिताती ठावो अरूपाचा
५६५४	।।ना.गा.०९३३.०११।।	तो तुवां आम्हां सन्मुख उभा केला । चरणासी लागला ज्ञानदेव
५६५५	।।ना.गा.०९३४.००१।।	ज्ञानदेव आले काशी । विश्वेश्वर आडवे येती
५६५६	।।ना.गा.०९३४.००२।।	रामनगरा वेशीपाशी । भेटी जाल्या उभयतांसी
५६५७	।।ना.गा.०९३४.००३।।	परस्परें आलिंगन । नामा वंदी उभयचरण

५६५८	।।ना.गा.०९३५.००१।।	पुढें उभे वेशीपाशी । त्याला लोटांगण काशी
५६५९	।।ना.गा.०९३५.००२।।	स्वर्गी देवा जाल्या भेटी । भोंवत्या पताकांच्या थाटी
५६६०	।।ना.गा.०९३५.००३।।	नामा म्हणे विठ्ठल बोला । ज्ञानोबासी म्हणे चला
५६६१	।।ना.गा.०९३६.००१।।	ज्ञानोबाचा हात । प्रेमें धरी विश्वनाथ
५६६२	।।ना.गा.०९३६.००२।।	ऐसे बोलत चालत । दोघे आले गंगे आत
५६६३	।।ना.गा.०९३६.००३।।	ज्ञानोबाचे पायीं । मिठी घाली गंगाबाई
५६६४	।।ना.गा.०९३६.००४।।	नामा म्हणे सोडा बाई । ज्ञानदेव सर्वांठायीं
५६६५	।।ना.गा.०९३७.००१।।	तीर्थें करोनी नामा पंढरीये आला । जिवलग भेटला विठोबासी
५६६६	।।ना.गा.०९३७.००२।।	सद्‌गदित कंठ वोसंडला नयनीं । घातली लोळणी चरणावरी
५६६७	।।ना.गा.०९३७.००३।।	शिणलों पंढरिराया पाहें कृपादृष्टी । थोर जालों हिंपुटी तुजविण
५६६८	।।ना.गा.०९३७.००४।।	अज्ञानाचा भाग होता माझे मनीं । हिंडविलें म्हणोनि देशोदेशीं
५६६९	।।ना.गा.०९३७.००५।।	परि पंढरीचें सुख पाहतां कोटि वाटे । स्वप्नींही परि कोठें न देखेंची
५६७०	।।ना.गा.०९३७.००६।।	उदंड तीर्थाची ऐकों जाय प्रौढी । परि चित्त माझें वोढी चंद्रभागा
५६७१	।।ना.गा.०९३७.००७।।	म्हणोनि चरणांची ठाकोनि साउली । आलों मज सांभाळीं मायबापा
५६७२	।।ना.गा.०९३७.००८।।	तया देवाची वाट न पाहती माझे नयन । न करिती पूजन कर त्यांचें
५६७३	।।ना.गा.०९३७.००९।।	तेणें पंथें माझे न चलती चरण । नाइकती श्रवण कीर्ति त्यांची
५६७४	।।ना.गा.०९३७.०१०।।	कटीं तटीं जेणें कर नाहीं ठेविलें । न देखें पाउलें विटेवरी
५६७५	।।ना.गा.०९३७.०११।।	त्यांतें म्हणतां देव लाजे माझें मन । ते कष्ट दारुण कवणा सांगू
५६७६	।।ना.गा.०९३७.०१२।।	जये गांवीं नाही वैष्णवांचा मेळु । न देखे सुकाळु हरिकथेचा
५६७७	।।ना.गा.०९३७.०१३।।	कुंचे गरुड टके देखे न पताका । त्या देवाची शंका वाटे थोर
५६७८	।।ना.गा.०९३७.०१४।।	हें जेथें न देखें तेथें खंती वाटे जीवीं । ते वेळीं आठवीं रूप तुझें
५६७९	।।ना.गा.०९३७.०१५।।	इष्ट मित्र बंधु तूं कुळदेवता । नामा म्हणे आवडता प्राण माझा
५६८०	।।ना.गा.०९३८.००१।।	केशव म्हणे नाम्या खंती वाटे माझ्या मनीं । निद्रा न लगे नयनीं पाहतां वाट
५६८१	।।ना.गा.०९३८.००२।।	तुजविण उदास वाटे ही पंढरी। न पडे क्षणभरी विसरु तुझा
५६८२	।।ना.गा.०९३८.००३।।	डोळियां वेगळा नवजें कोठें दुरी । चित्त मजवरी ठेवुनि राहे
५६८३	।।ना.गा.०९३८.००४।।	तुज माझी सवे मज तुझी आवडी । गुळासी न सोडी गोडी जैसी

५६८४	।।ना.गा.०९३८.००५।।	तैसे तुम्ही आम्ही एकमेकांमाजीं । विचारितां सहजीं दुजें नाहीं
५६८५	।।ना.गा.०९३८.००६।।	येतया जातया पुसे तुझी गोष्टी । म्हणे माझें नामें दृष्टि पडिलें होतें
५६८६	।।ना.गा.०९३८.००७।।	वाटे तहानभूक पीडिल्या जाणें कोण । एका मजविण गूज त्याचें
५६८७	।।ना.गा.०९३८.००८।।	रात्रंदिवस खेद करुनि आपुल्या जीवा । असेल माझा धांवा पोकारीत
५६८८	।।ना.गा.०९३८.००९।।	मजवीण कोणाचिये साउली बैसेल । कोण त्या पूसेल शीणभागु
५६८९	।।ना.गा.०९३८.०१०।।	संतांपासीं सांगे शिणले मजविण । कंठीं धरिला प्राण मजलागीं
५६९०	।।ना.गा.०९३८.०११।।	धरुनी हनुवटी दिधलें आलिंगन । कुरवाळोनी वदन नेत्र पुशी
५६९१	।।ना.गा.०९३८.०१२।।	मग काढोनी कंठीची सुमनतुळशीमाळा । घातलिसे गळां नामयाच्या
५६९२	।।ना.गा.०९३८.०१३।।	सर्वांगसुंदर पाहे कृपादृष्टी । पुसे जीवींची गोष्टी कृपासिंधु
५६९३	।।ना.गा.०९३८.०१४।।	निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान खेचर । नरहरि सोनार आदिकरोनी
५६९४	।।ना.गा.०९३८.०१५।।	समस्त भक्त मिळोनी लोटांगणीं येती । आलिंगन देती नामयासी
५६९५	।।ना.गा.०९३८.०१६।।	अनिवार सुमनें वर्षती सुरवर । गगनीं जयजयकार शब्द होती
५६९६	।।ना.गा.०९३८.०१७।।	ऋषिगण गंधर्व मिळोनि सकळिक । येती दृष्टिसुख घ्यावयासी
५६९७	।।ना.गा.०९३८.०१८।।	रुक्माई आरती घेऊनी आली वेगें । ओंवाळिले दोघे देवभक्त
५६९८	।।ना.गा.०९३८.०१९।।	कवतुकें नाम्याची धरिली हनुवटी। पाहे कृपादृष्टी घडिये घडिये
५६९९	।।ना.गा.०९३९.००१।।	केशव म्हणे नाम्या धन्य तुज फावलें । बरवें तुवां केलें आत्महित
५७००	।।ना.गा.०९३९.००२।।	पुण्यपावन तीर्थे पाहिली सकळिक । प्रक्षाळिलीं पातकें वासनेचीं
५७०१	।।ना.गा.०९३९.००३।।	धन्य तुवां केलें जन्मोनि सार्थक । शोक मोह दु:ख निवारिलें
५७०२	।।ना.गा.०९३९.००४।।	तीर्थयात्रा सफळ व्हावया संपूर्ण । करी का उद्यापन विधियुक्त
५७०३	।।ना.गा.०९३९.००५।।	केलिया कष्टाचें होईल सार्थक । सांगेन तें ऐक वचन माझें
५७०४	।।ना.गा.०९३९.००६।।	महा मुक्तिक्षेत्र वैकुंठ महीवरी । विख्यात पंढरी भूवैकुंठ
५७०५	।।ना.गा.०९३९.००७।।	एक शीत अन्न अर्पे द्विजामुखीं । राहे सदा सुखी कल्पवरी
५७०६	।।ना.गा.०९३९.००८।।	क्षेत्रवासी भावें पूजावे ब्राह्मण । षड्रस भोजन द्यावें त्यांसी
५७०७	।।ना.गा.०९३९.००९।।	सुगंध चंदन सुमन तुळसीमाळा । समर्पी तांबुला सदक्षिणा
५७०८	।।ना.गा.०९३९.०१०।।	ऐसें बोलोनियां देवें नामा धरियेला करीं । राउळाभीतरीं घेउनि गेले
५७०९	।।ना.गा.०९३९.०११।।	मग रुक्माईसी सांगे वैकुंठीचा राणा । आजी आराधना नामयाची

५७१०	।।ना.गा.०९४०.००१।।	तंव ते जगन्माता म्हणे जी कृपावंता । कर्ता करविता कोण याचा
५७११	।।ना.गा.०९४०.००२।।	हा तुमचा दास आहे अंतरंग । काय या उद्वेग करणें असे
५७१२	।।ना.गा.०९४०.००३।।	सर्व भार याचा लागे चालवणें । ऋणवई केलें येणें जन्मोजन्मीं
५७१३	।।ना.गा.०९४०.००४।।	तुम्हांपरतें यासी जिवलग सोयरे । कोण आहेत दुसरें लोभापर
५७१४	।।ना.गा.०९४०.००५।।	दृढ चरण धरोनि राहिला अंतरीं । जालासे अधिकारी सर्वस्वाचा
५७१५	।।ना.गा.०९४०.००६।।	जन्मोनियां येणें जोडिलें जें कांहीं । तितुकें तुमच्या पायीं निक्षेपिलें
५७१६	।।ना.गा.०९४०.००७।।	म्हणोनि याचें कोड करावें परिपूर्ण । व्हावें पैं उत्तीर्ण ऋणियाचें
५७१७	।।ना.गा.०९४०.००८।।	मायबापें याची सखी जिवलग । सांडोनि तुमचा संग धरिला सुखें
५७१८	।।ना.गा.०९४०.००९।।	म्हणोनि याचें हित लागे विचारावें । उचित करावें देवराया
५७१९	।।ना.गा.०९४०.०१०।।	आपुल्या दासाचा संभ्रम सोहळा । करणें हे गोपाळा ब्रीद तुमचें
५७२०	।।ना.गा.०९४०.०११।।	रुक्माई म्हणे हा भाग्यवंत नामा । न कळे याचा प्रेमा नित्य नवा
५७२१	।।ना.गा.०९४१.००१।।	आतां जावें वेगीं नामया घेऊनी । सांगावी आवंतणी ब्राह्मणांसी
५७२२	।।ना.गा.०९४१.००२।।	सकळकामपूर्ण असती तुमच्या पायीं । विचारावें कांहीं न लगे देवा
५७२३	।।ना.गा.०९४१.००३।।	काय काय न लभे तुमचे कृपादृष्टी । सदा सुखवृष्टी हरिच्या दासां
५७२४	।।ना.गा.०९४१.००४।।	नामयाचा हात धरोनि पंढरीनाथ । निघाले अक्षत द्यावयासी
५७२५	।।ना.गा.०९४१.००५।।	निवृत्ति ज्ञानेश्वर जनमित्र सोपान। सांवता जाल्हण घेउनि सरिसे
५७२६	।।ना.गा.०९४१.००६।।	चोखामेळा बंका काठीकर पुढें । दोन्हीं बाहीं देव्हडे सनकादिक
५७२७	।।ना.गा.०९४१.००७।।	नामयाचे पाठी चाले केशीराज । लागावया रज चरणींचे
५७२८	।।ना.गा.०९४१.००८।।	आपुल्या दासाचा सिद्धि न्यावा पणु । म्हणोनि यजमानु जाला देव
५७२९	।।ना.गा.०९४१.००९।।	तेणें मिसें करितसे क्षेत्रप्रदक्षिणा । प्रार्थित ब्राह्मणां परम प्रीति
५७३०	।।ना.गा.०९४१.०१०।।	ऐसा अनाथांचा नाथ दीनाचा गोसावी । आवडी नित्य नवी सेवकाची
५७३१	।।ना.गा.०९४१.०११।।	तो या नामयाचा सुखाचा शृंगारु । रुक्मादेविवरु श्रीविठ्ठल
५७३२	।।ना.गा.०९४२.००१।।	तंव अध्यात्मिक पंडित अग्निहोत्री । एक म्हणविती श्रोत्री सदाचार
५७३३	।।ना.गा.०९४२.००२।।	आम्हांसी तें नाहीं तुमचें स्वरुपज्ञान । अपूर्व दर्शन देखिलें आजी
५७३४	।।ना.गा.०९४२.००३।।	सुखाचें पारणें करविलें या रूपें । तेणें त्रिविधताप निवारले
५७३५	।।ना.गा.०९४२.००४।।	कवण वृत्ति काय चालविजे व्यापार । योजिलें बिढार कवणें ठायीं

५७३६	।।ना.गा.०९४२.००५।।	आजिचें निमित्त काय उपस्थित । ऐकोनि पंढरीनाथ बोलते जाले
५७३७	।।ना.गा.०९४२.००६।।	माझी कुळवृत्ति हरिदासां ठाउकी । मज यासी ओळखी निकट असे
५७३८	।।ना.गा.०९४२.००७।।	मज असंगा संगु सर्वकाळीं याचा । अनंत जन्मांचा ऋणानुबंध
५७३९	।।ना.गा.०९४२.००८।।	साक्ष तुमचे चरणा करुनि बोले वाचा । मी मैत्र नामयाचा अंतरंगु
५७४०	।।ना.गा.०९४२.००९।।	करोनियां स्नानविधी यावें शीघ्रवत । करावें सनाथ कृपादृष्टीं
५७४१	।।ना.गा.०९४२.०१०।।	बिढार तरी असे राउळाभीतरीं । नांव सांगों तरी अनंत जाणा
५७४२	।।ना.गा.०९४२.०११।।	जीवींचें गुजगौप्य संतांसीं पुसावें । नि:संदेह यावें भोजनासी
५७४३	।।ना.गा.०९४२.०१२।।	ऐसी ते अमृतवाणी ऐकोनि श्रवणीं । आनंदले मनीं भूदेव ते
५७४४	।।ना.गा.०९४२.०१३।।	आज्ञा देती देवा जावें निजमंदिरा । शीघ्रवत करा पाकसिद्धी
५७४५	।।ना.गा.०९४२.०१४।।	मग रुक्माईसी सांगे सकळ विवंचना । प्रार्थिले ब्राह्मणां सकळिकांसी
५७४६	।।ना.गा.०९४२.०१५।।	कर्मठ अभिमानी नोळखती मज । देखोनियां चोज वाटे त्यांसी
५७४७	।।ना.गा.०९४२.०१६।।	कुळवृत्ति नाम पुशिलें मज तिहीं । सांगितलें म्यांही सर्व त्यांसी
५७४८	।।ना.गा.०९४२.०१७।।	सांगाती संतांचा मी मैत्र नामयाचा । अनंत जन्मांचा निकट म्हणोनी
५७४९	।।ना.गा.०९४२.०१८।।	बिढार तरी असे राउळाभीतरीं । सांगे खूण परी न कळे त्यांसी
५७५०	।।ना.गा.०९४२.०१९।।	नाम तरी अनंत दाविला संकेत । परी नेघे त्यांचें चित्त आठवण
५७५१	।।ना.गा.०९४२.०२०।।	तंव ते विश्वमाता म्हणे जी कृपानिधी । सदा भेदबुद्धि त्यांचे ठायीं
५७५२	।।ना.गा.०९४२.०२१।।	विद्यावयसा जाती कुळाचा अभिमान । त्या कैंचे चरण प्राप्त तुमचे
५७५३	।।ना.गा.०९४२.०२२।।	उदार चक्रवर्ती भक्तांचा विसावा । त्याच्या निजभावा वेळाईतु
५७५४	।।ना.गा.०९४२.०२३।।	तो भाग्यें जोडला वैकुंठीचा ठेवा । उजरीं जाली दैवा नामयाच्या
५७५५	।।ना.गा.०९४३.००१।।	तंव अणिमादि सिद्धि उभ्या महाद्वारीं । तिहीं सर्व सामोग्री सिद्ध केली
५७५६	।।ना.गा.०९४३.००२।।	सडासंमार्जनें गुढिया तोरणें। शृंगारिलीं भुवनें परिचारिकीं
५७५७	।।ना.गा.०९४३.००३।।	म्हणती काय पुण्य केलें येणें विष्णुदासें । देवा लोभ पिसें लावियेलें
५७५८	।।ना.गा.०९४३.००४।।	द्वारीं दिपावळी चौकरंग माळा । अभिनव सोहळा आरंभिला
५७५९	।।ना.गा.०९४३.००५।।	हरुषें मंगळ तुरे वाजती विनोदें । भक्त जयजय शब्दें गर्जताती
५७६०	।।ना.गा.०९४३.००६।।	मंगळ मार्जन नामयातें करविलें । मग तें आरंभिलें पुण्याहवाचन
५७६१	।।ना.गा.०९४३.००७।।	देवें अंगवस्त्रें आपुलेनी हातें । वाहिलीं अनंतें विष्णुदासा

५७६२	।।ना.गा.०९४३.००८।।	सत्यभामा राही रुक्माई जननी । वेगीं अक्षवाणी घेउनि येती
५७६३	।।ना.गा.०९४३.००९।।	आनंदें नरनारी कवतुक पाहती । जीवें ओवाळिती नामयासी
५७६४	।।ना.गा.०९४३.०१०।।	आपुलिया दासाचा करी समारंभु । दीनानाथ प्रभु कृपासिंधु
५७६५	।।ना.गा.०९४३.०११।।	धन्य हा नामा म्हणती सकळ लोक । नेणती याचें सुख ब्रह्मादिक
५७६६	।।ना.गा.०९४४.००१।।	मग जाला स्वयंपाक स्नानविधि सारा । सकळां हांकारा जाणविला
५७६७	।।ना.गा.०९४४.००२।।	आले महाद्वारीं दिधली आसनें । पूजा नारायणें आरंभिली
५७६८	।।ना.गा.०९४४.००३।।	तंव ठकलों म्हणती देव पहा हो कैसें जालें । सर्व सुख नेलें इहीं भक्तीं
५७६९	।।ना.गा.०९४४.००४।।	रत्नजडित पाट सत्वरीं आणिले । वरी द्विज बैसविले पृथक्कारें
५७७०	।।ना.गा.०९४४.००५।।	प्रक्षाळोनि चरण पुसिले पीतांबरें । मस्तकीं आदरें तीर्थ वंदी
५७७१	।।ना.गा.०९४४.००६।।	कस्तुरीचे टिळे दिव्य चंदन उटी । घातलिया कंठीं तुळशीमाळा
५७७२	।।ना.गा.०९४४.००७।।	दशांग धूप रत्नाचा दीपक । ओवाळी नायक वैकुंठींचा
५७७३	।।ना.गा.०९४४.००८।।	दोही बाही पंक्ति मांडिल्या देव्हडी । राही रुक्माई परवडी वाढितसे
५७७४	।।ना.गा.०९४४.००९।।	चतुर्विध अन्नें आथिलीं बहुगुणें । षड्रस पक्वान्नें सर्वांठायीं
५७७५	।।ना.गा.०९४४.०१०।।	मग संकल्प सोडिला नामयाचे करें । भक्त जयजयकारें गर्जिन्नले
५७७६	।।ना.गा.०९४४.०११।।	भोक्ता नारायण लक्ष्मीचा पती । म्हणोनि प्राणाहुती घेतल्या वेगीं
५७७७	।।ना.गा.०९४४.०१२।।	भर्ता भोक्ता कर्ता करविता आपण । सहज तेथें पूर्ण सकळ काम
५७७८	।।ना.गा.०९४४.०१३।।	विश्वंभर कृपादृष्टि न्याहाळीत। प्रार्थना करीत ब्राह्मणांची
५७७९	।।ना.गा.०९४४.०१४।।	देखोनि तें समृद्धि हरिखले द्विज । जाले नवल चोज पहा कैसें
५७८०	।।ना.गा.०९४४.०१५।।	कोण हा गृहस्थु केवढा भाग्यवंतु । नेणवे अद्भुत महिमा याचा
५७८१	।।ना.गा.०९४४.०१६।।	ऐसे जेविले आनंदें धाले परमानंदें । मुखशुद्धि गोविंदें दिधली करीं
५७८२	।।ना.गा.०९४४.०१७।।	कर्पूरसहित समर्पिले विडे । कर जोडोनी पुढें विनवीतसे
५७८३	।।ना.गा.०९४४.०१८।।	ऐसा भक्तजन कृपाळु दीनाचा दयाळु। आनंदें गोपाळु उभा असे
५७८४	।।ना.गा.०९४४.०१९।।	तया नामदेवें भुलविलें लोभें । वेडावले उभे चिदानंद
५७८५	।।ना.गा.०९४५.००१।।	सकळिकां नमस्कार करुनी यादवरावो । सांगे जीवींचा भावो तयांप्रती
५७८६	।।ना.गा.०९४५.००२।।	तुमचे कृपादृष्टी करावें भोजन । येणें होईल संपूर्ण व्रतसिद्धी
५७८७	।।ना.गा.०९४५.००३।।	हेचि आवडी आहे बहु माझ्या जीवीं । ते आजी गोसावी पूर्ण कीजे

५७८८	।।ना.गा.०९४५.००४।।	क्षण एक बैसावें स्वस्थ अंत:करणें । संकल्पिलें नारायणें तुळसीदळ
५७८९	।।ना.गा.०९४५.००५।।	संतुष्ट मानसें यातें अंगिकारा । मग निजमंदिरा जावें स्वामी
५७९०	।।ना.गा.०९४५.००६।।	आजि तुमचा लाभु जाला भाग्य योगें । नामयाच्या प्रसंगें घडली सेवा
५७९१	।।ना.गा.०९४५.००७।।	तुम्ही ब्रह्मबीज ब्रह्मादिकां पूज्य । सांभाळिलें मज कृपादृष्टी
५७९२	।।ना.गा.०९४५.००८।।	मज निरालंबासी करोनी अवलंबन। निष्कामासी पूर्ण केलें काम
५७९३	।।ना.गा.०९४५.००९।।	अकर्ता असंगु तुमचेनि कृतार्थ । जालों पैं यथार्थ वचन माझें
५७९४	।।ना.गा.०९४५.०१०।।	मग ते चतुर्विधा महामंत्रस्वरें । द्विज जयजयकार करिताती
५७९५	।।ना.गा.०९४५.०११।।	विजय सर्वकाळ व्हावें पुढतो पुढतीं । आशिर्वाद देती मंत्राक्षता
५७९६	।।ना.गा.०९४५.०१२।।	पितांबराचे अचळीं घेउनी मंत्राक्षता । घांलितसे माथा नामयाच्या
५७९७	।।ना.गा.०९४५.०१३।।	हेंचि तुझें प्रेम राहें चिरंतन । मुखीं नाम ध्यान हृदयीं सदा
५७९८	।।ना.गा.०९४५.०१४।।	तंव म्हणती धरामर तुम्हीं श्रमलेति थोर । लागला उशीर भोजनासी
५७९९	।।ना.गा.०९४५.०१५।।	सर्वां ठाईं तुम्ही सर्वच होउनी एक । कारण सार्थक केलें निकें
५८००	।।ना.गा.०९४५.०१६।।	स्वामीचा आदर सांगतां अभिनव । नम्रता गौरव निरुपम
५८०१	।।ना.गा.०९४५.०१७।।	आकल्प आयुष्य चिरंजीव व्हावें । आम्हां सांभाळावें पुढतापुढतीं
५८०२	।।ना.गा.०९४५.०१८।।	आतां संतांचिया पंक्ती सारावें भोजन । करावें परिपूर्ण जीवींचें कोड
५८०३	।।ना.गा.०९४५.०१९।।	उच्छिष्ट प्रसाद द्यावा नामयातें । आस करूनि पाहात वास तुमची
५८०४	।।ना.गा.०९४६.००१।।	सुवर्णाचें ताट वोगरुनी परिकर । रुक्माईनें सत्वर आणियेलें
५८०५	।।ना.गा.०९४६.००२।।	कनक कळस घेऊनि सत्यभामा आली । आपोशन घाली देवराया
५८०६	।।ना.गा.०९४६.००३।।	सुखाचा सुरतरू भक्त चिंतामणी । पुरवितो आयणी निजभक्ताची
५८०७	।।ना.गा.०९४६.००४।।	तेथें उद्धव अक्रुर नारद तुंबर । आणिक अपार भक्त येती
५८०८	।।ना.गा.०९४६.००५।।	महाद्वारीं होतां उभा नामा ठेला । तो जवळी बोलाविला केशिराजें
५८०९	।।ना.गा.०९४६.००६।।	देवाचा वोरसु देखोनी गौरव । देहीं देहभाव विसरला
५८१०	।।ना.गा.०९४६.००७।।	निजबोध निवृत्ति राहिली निवांत । हृदयीं वोसंडित प्रेमरसें
५८११	।।ना.गा.०९४६.००८।।	देखोनि पंढरीनाथ धाविन्नला वेगीं । जैसी वत्सालागीं तान्हें धेनू
५८१२	।।ना.गा.०९४६.००९।।	उचलोनि चहूंभुजी दिलें आलिंगन । आणिलें उमजून देहावरी
५८१३	।।ना.गा.०९४६.०१०।।	धरोनि बाहुवटीं बैसविला ताटीं । स्फुंदतां हिंपुटी होत असे

५८१४	।।ना.गा.०९४६.०११।।	कुर्वाळोनि माथा घास घाली मुखीं । तंव तो परलक्षी तन्मय होतु
५८१५	।।ना.गा.०९४६.०१२।।	अंतरींचें गुज बोले कृपासिंधु । करूनि सावधु नामयासी
५८१६	।।ना.गा.०९४६.०१३।।	म्हणे जिवलगा बोलें सुख गोष्टी । आर्त आहे पोटीं बहु दिवसांचें
५८१७	।।ना.गा.०९४६.०१४।।	अंतरींचे सुख बाहेरी तूं पाहे । गगना काय आहे पाठीपोट
५८१८	।।ना.गा.०९४६.०१५।।	तैसा तूं आनंदु आहे पैं निर्मळ । चिद्रूप केवळ सदोदित
५८१९	।।ना.गा.०९४६.०१६।।	तुझें तेंचि माझें माझें तेंचि तुझें । आहे सहजीं सहजें एकविध
५८२०	।।ना.गा.०९४६.०१७।।	परतोनियां दृष्टि घाली मजवरी । मी तो निरंतरीं तूंचि होसी
५८२१	।।ना.गा.०९४६.०१८।।	हा तुझा सोहळा पाहें उघडा डोळां । मी आहे तुज जवळां ज्ञानदीपू
५८२२	।।ना.गा.०९४६.०१९।।	आर्त तुझिये भेटी आले भक्तराणे । सुखाचें पारणें करवी त्यांसी
५८२३	।।ना.गा.०९४६.०२०।।	परमानंद मूर्ति धन्य हा निवृत्ति । सुखाचा सांगाती ज्ञानदेव
५८२४	।।ना.गा.०९४६.०२१।।	पवित्र हा सोपान परलोकींचें तारू । करी याचा आदरू भाग्यवंता
५८२५	।।ना.गा.०९४६.०२२।।	म्हणोनि पंढरीनाथें आश्वासिलें करें । मिठी दिली येरें चरणकमळीं
५८२६	।।ना.गा.०९४६.०२३।।	नामा म्हणे तुझे कृपेचा वोल्हावा । विश्रांति या जिवा जाली असे
५८२७	।।ना.गा.०९४७.००१।।	नामयाचे मुखीं घालुनी कवळु । पुसतसे गोपाळु शिणभागु
५८२८	।।ना.गा.०९४७.००२।।	जें करकमळ सनकादिकां शिरीं। नामा तिहीं करीं कुरवाळिला
५८२९	।।ना.गा.०९४७.००३।।	म्हणे सांडी सर्व खंती जीवींची काजळी । विश्रांती मजजवळी आहे तुज
५८३०	।।ना.गा.०९४७.००४।।	वियोगाचेनि शोकें शिणलासी मार्गीं । देह मजलागीं वाळविला
५८३१	।।ना.गा.०९४७.००५।।	कोमाईलें वदन निडारला नयनीं । नेणें कोणी तुझी तानभूक
५८३२	।।ना.गा.०९४७.००६।।	गेलासी जवळुनी ज्या दिवसापासोनी । न दिसे माझें कोणी आवडतें
५८३३	।।ना.गा.०९४७.००७।।	धीर न धरवे जीवा पाहें दाही दिशा । माझा विष्णुदास येईल केव्हां
५८३४	।।ना.गा.०९४७.००८।।	तुज पाहे गरुडपारीं पाहे महाद्वारीं। पाहे भीमातीरीं चंद्रभागे
५८३५	।।ना.गा.०९४७.००९।।	पाहे पद्मतीर्थीं पाहे वेणूनादीं । नलगे तुझी शुद्धी खंत वाटे
५८३६	।।ना.गा.०९४७.०१०।।	अनुदिनीं भोजन करितां उदकपान । तेव्हां आठवण होय तुझी
५८३७	।।ना.गा.०९४७.०११।।	मी म्हणे धांवत येसी न धरत । प्रसादाचें आर्त बहु तुज
५८३८	।।ना.गा.०९४७.०१२।।	धांवोनियां येसी आलिंगन देसी । पुसेन सांगसी सुख गोष्टी
५८३९	।।ना.गा.०९४७.०१३।।	तेणें हर्षें निघती डोळियासी दोंदें । हृदय माझें कोंदे करुणारसें

५८४०	।।ना.गा.०९४७.०१४।।	आवडतें आळुकें जननियेचें बाळ । जाण तें कृपाळ भूक त्याची
५८४१	।।ना.गा.०९४७.०१५।।	तैसा पंढरीनाथ मोहें वोसरला । नाम्यातें पाजिला प्रेमपान्हा
५८४२	।।ना.गा.०९४८.००१।।	ऐसी ते जेवणीं ब्रह्मरसधणी । पुरविली आयणी निजभक्तांची
५८४३	।।ना.गा.०९४८.००२।।	नाम्याचें उच्छिष्ट स्वीकारिलें देवें । कवतुक अवघें पाहती द्विज
५८४४	।।ना.गा.०९४८.००३।।	म्हणती आम्हां येणें कैसी केली माव । बुडविलें सर्व क्रियाकर्म
५८४५	।।ना.गा.०९४८.००४।।	नेणवे हा कोण सुलक्षण । नव्हे क्षत्रिय ब्राह्मण वैश्य शूद्र
५८४६	।।ना.गा.०९४८.००५।।	चहूंवर्णा वेगळी दिसे याची लीला । विस्मृति सकळां पडली कैसी
५८४७	।।ना.गा.०९४८.००६।।	निर्धारें नाम्याचा होय मायबापु । सोडविलें संकल्पू त्याच्या हातीं
५८४८	।।ना.गा.०९४८.००७।।	कायावाचामनें लोभ याचेवरी । घातलिया शिरीं मंत्राक्षता
५८४९	।।ना.गा.०९४८.००८।।	एक म्हणती जाले होते ते निर्माण । आतां आपुलें आपण गौप्य करा
५८५०	।।ना.गा.०९४८.००९।।	लौकिकीं ही मात प्रकट करा झणीं । न बोलावी कोणी कोणापाशीं
५८५१	।।ना.गा.०९४८.०१०।।	एक म्हणती आतां यासीच वाळावें । आपुलें टाळावें लोकनिंद्य
५८५२	।।ना.गा.०९४८.०११।।	अज्ञानासी दोष नाहीं प्रत्यवाय । शास्त्रीं हा उपाय सिद्ध असे
५८५३	।।ना.गा.०९४८.०१२।।	आत्मशुद्धिलागीं करा विचारणा । करा मंत्रस्नाना त्रिपदा जप
५८५४	।।ना.गा.०९४८.०१३।।	म्हणोनि सत्वर चालिले अवघे । प्रार्थुनियां देवें बोलाविलें
५८५५	।।ना.गा.०९४८.०१४।।	संकोचित मनें दिसती कवण्यागुणें । कोमाईलीं वदनें सकळिकांची
५८५६	।।ना.गा.०९४८.०१५।।	काय शंका वाटे तुमच्या मनीं स्वामी । ते कृपा करूनि सांगा मज
५८५७	।।ना.गा.०९४८.०१६।।	मनाचें मवाळ तुम्ही ब्रह्मबीज । गौप्य नये गुज करूं कांहीं
५८५८	।।ना.गा.०९४८.०१७।।	मी तुम्हां सकळांचें असे कृपापात्र । सांगा जीवीचें आर्त करीन पूर्ण
५८५९	।।ना.गा.०९४८.०१८।।	मग समर्पोनि दक्षिणासहित तुळशीदळ । वरी त्या पुण्यजळ प्रोक्षूनियां
५८६०	।।ना.गा.०९४८.०१९।।	चरणावरी नामा घालोनि निरवी । म्हणे कृपा असों द्यावी याजवरी
५८६१	।।ना.गा.०९४९.००१।।	जातीचे हे शिंपी विश्व जाणे यातें । प्रत्यक्ष सांगाते जेवविलें
५८६२	।।ना.गा.०९४९.००२।।	उच्छिष्ट निजमुखीं स्वीकारिलें याचें। उरलें तें तुम्हां कैचें क्रियाकर्म
५८६३	।।ना.गा.०९४९.००३।।	न कळे हा निर्धार भ्रांति वाटे आम्हां । काय तुमचा नामा अंगभूत
५८६४	।।ना.गा.०९४९.००४।।	नवल हे आवडी लौकिका वेगळी । बुडविले सकळीं समूळ धर्म
५८६५	।।ना.गा.०९४९.००५।।	कोणा लोभें तुम्हां लावियेला लळा। कृपेचा कळवळा निरूपमु

५८६६	।।ना.गा.०९४९.००६।।	विचारितां तुम्ही आहां वेषधारी । लीला वोडंबरी दिसे तुमची
५८६७	।।ना.गा.०९४९.००७।।	वर्णाश्रमधर्म न दिसे तुमच्या ठायीं । निर्धारुचि कांहीं न कळे आम्हां
५८६८	।।ना.गा.०९४९.००८।।	वंद्य निंद्य तुम्हां न दिसेचि कोणी । दृष्टी दुजेपणी न पडे तुमची
५८६९	।।ना.गा.०९४९.००९।।	विश्व आपरूप दिसे तुम्हां सर्व । नेणवे हे माव ब्रह्मांदिका
५८७०	।।ना.गा.०९४९.०१०।।	आम्ही विश्वासलों वरवेषा तुमच्या । परी भाव अंतरींचा न कळे कांहीं
५८७१	।।ना.गा.०९४९.०११।।	आपुलें स्वहित देखोनि आपण । पाप अथवा पुण्य विचारावें
५८७२	।।ना.गा.०९४९.०१२।।	सर्वभावें करुनि विधीतें पाळावें । सर्वी सांभाळावें वेदवचन
५८७३	।।ना.गा.०९४९.०१३।।	वर्णाश्रमपरत्वें बोलिले जे धर्म । तें तें विहितकर्म आचारावें
५८७४	।।ना.गा.०९४९.०१४।।	स्वामींचे वचन स्वामींनीं पाळावें । यश मिरवावें उभयलोकीं
५८७५	।।ना.गा.०९४९.०१५।।	तरी हा तुमचा जिवलग नामा । निर्धारितां आम्हां कळों आलें
५८७६	।।ना.गा.०९५०.००१।।	नामयातें आम्हीं जेवविलें सांगातें । हा दोष आम्हांतें ठेवा झणीं
५८७७	।।ना.गा.०९५०.००२।।	सर्वत्र चाळक एकचि चैतन्य । वंद्य निंद्य कोण म्हणे स्वामी
५८७८	।।ना.गा.०९५०.००३।।	पुण्यपाप बाधा आम्हां नाहीं कदा । असो शुद्धबुद्धा निरंतर
५८७९	।।ना.गा.०९५०.००४।।	देह म्हणाल जरी वोडंबर पांचांचें । अंबरीं आभासाचें अभ्र जेवीं
५८८०	।।ना.गा.०९५०.००५।।	नामा ऐसें नाम कवणिया अवयवां । सांगा तुम्हीं देवा साच करोनी
५८८१	।।ना.गा.०९५०.००६।।	तेजीं कीं जीवनीं गगनीं कीं पवनीं । कीं दोष धरणीमाजीं होता
५८८२	।।ना.गा.०९५०.००७।।	तो तुम्हांसी गोचरु जाला कवणें युक्ती । हे खूण निरुती सांगा मज
५८८३	।।ना.गा.०९५०.००८।।	तुम्हीं वेदवक्ते सर्वशास्त्र द्रष्टे । परि नाहीं आत्मनिष्ठे पावलेती
५८८४	।।ना.गा.०९५०.००९।।	भेदभ्रम तुमचा नाहीं मावळला । भ्रमुची उरला संदेहेसी
५८८५	।।ना.गा.०९५०.०१०।।	जे वेळीं संकल्प सोडिला पैं येणें। तुम्ही आपोशनें घेतली कैसीं
५८८६	।।ना.गा.०९५०.०११।।	ते वेळीं नाहीं केली ही विचारणा । अधिकार अन्ना आहे कीं नाहीं
५८८७	।।ना.गा.०९५०.०१२।।	याचिलागीं तुम्हां प्रार्थुनी खूण सांगे । नामयाच्या प्रसंगें घडली सेवा
५८८८	।।ना.गा.०९५०.०१३।।	आशिर्वाद तुम्हीं दिल्या मंत्राक्षता । त्या त्याचे माथा टाकियेल्या
५८८९	।।ना.गा.०९५०.०१४।।	मज निरालंबासी तुम्हीं करोनि अवलंबन । निष्कामासी पूर्ण केलें काम
५८९०	।।ना.गा.०९५०.०१५।।	हें माझें बोलणें तुम्हीं ऐकोनि सकळिकीं । परी अझुनी ओळखी न धरा माझी
५८९१	।।ना.गा.०९५०.०१६।।	नि:संदेह भोजन केलें आधीं तुम्हीं । उरलें शेष आम्हीं स्वीकारिलें

५८९२	।।ना.गा.०९५०.०१७।।	यासी विधियुक्त कोण प्रायश्चित्त । सांगा कोण ग्रंथ साच करूनी
५८९३	।।ना.गा.०९५०.०१८।।	या हरिदासाचे रज आणि तुमचें चरणतीर्थ । तेणेंचि पुनीत तनु माझी
५८९४	।।ना.गा.०९५०.०१९।।	येरु तुमचा भावो तोचि फळला तुम्हां । नामा तरी आम्हां निष्कलंकु
५८९५	।।ना.गा.०९५१.००१।।	मग केशव म्हणे माझें परिसा वचन । गुज मी सांगेन अंतरीचें
५८९६	।।ना.गा.०९५१.००२।।	व्रत तप दान सकळ कर्मक्रिया। एक भूतदया असे जेथें
५८९७	।।ना.गा.०९५१.००३।।	तोचि सत्य मानी भक्त आणि ज्ञानी । न विसंबे निर्वाणीं जीवें त्यासी
५८९८	।।ना.गा.०९५१.००४।।	ज्ञानाचें सौभाग्य भक्ति आणि वैराग्य । तयाचें आरोग्य प्रेमरस
५८९९	।।ना.गा.०९५१.००५।।	त्यासी संजीवनु सदा संत संगू । त्यावरी अनुरागू वज्रकवच
५९००	।।ना.गा.०९५१.००६।।	धर्मअर्थकाममोक्ष दृष्टि नाणी । वोळंगती आंगणीं मुक्ति चारी
५९०१	।।ना.गा.०९५१.००७।।	अनहात गजरू होतसे नामाचा। दीप अलक्षाचा पाजळितु
५९०२	।।ना.गा.०९५१.००८।।	इंद्रपदादिकें नाशिवंत होती । म्हणोनि आसक्ती न धरावी त्यांची
५९०३	।।ना.गा.०९५१.००९।।	हे जाणोनि साच न धरावी त्यांची आस । अखंड माझा वास ह्रदयीं त्यांच्या
५९०४	।।ना.गा.०९५१.०१०।।	कामक्रोध वैरी दुराविले दुरी। मज ह्रदयमंदिरीं सांठविलें
५९०५	।।ना.गा.०९५१.०११।।	तेणें त्याच्या उच्छिष्टा जालोंसे अधिकारी । ब्रह्मरसा सरी न पवी जेथें
५९०६	।।ना.गा.०९५१.०१२।।	म्हणोनि ये संसारीं धन्य एक नामा । जेणें माझा प्रेमा अनुभविला
५९०७	।।ना.गा.०९५२.००१।।	महा मुक्ति क्षेत्र तीर्थाचें तारक । उपमेसि आणीक नाहीं दुजें
५९०८	।।ना.गा.०९५२.००२।।	तें हें पंढरपूर प्रेमाचें भांडार । नामें निरंतर गर्जतसे
५९०९	।।ना.गा.०९५२.००३।।	येवढें तीर्थ जवळी असतां पैं समर्थ । कोण भाग्यहत दैन्य भाकी
५९१०	।।ना.गा.०९५२.००४।।	जीवन्मुक्त ज्ञानी येथें पुंडलिक मुनि । बैसलासे ध्यानीं परलक्षी
५९११	।।ना.गा.०९५२.००५।।	योग्यांचें ह्रदयींचें निजध्यान नेटकें । तें जयाचेनि सुखें वेडावलें
५९१२	।।ना.गा.०९५२.००६।।	पुण्यपावन भीमा दक्षिणवाहिनी । अमृत संजीवनी पुण्यराशी
५९१३	।।ना.गा.०९५२.००७।।	आनंदरसकुपिका प्रत्यक्ष चंद्रभागा । दर्शनें न या गा गर्भवासा
५९१४	।।ना.गा.०९५२.००८।।	स्वर्गीं मंदाकिनी लाजोनि राहिली । पाताळीं प्रवेशली भोगावती
५९१५	।।ना.गा.०९५२.००९।।	सहस्रभाग भेणें होउनी भागीरथी । सागरा मिळती जाली वेगीं
५९१६	।।ना.गा.०९५२.०१०।।	भक्तजन भाग्याची कीं सुख आरोग्याची। जें कां वैराग्याची जन्मभूमी
५९१७	।।ना.गा.०९५२.०११।।	तेथे हरिखें निर्भर नामा संतांचें संगतीं । गीतीं गाय कीर्ति विठोबाची

५९१८	।।ना.गा.०९५३.००१।।	सकाम निष्काम वाचे जपे नाम । तो माझा परम प्राणसखा
५९१९	।।ना.गा.०९५३.००२।।	जीवाहूनि आवडता न करी जीवापरता । पूजी परम देवता भावें त्यासी
५९२०	।।ना.गा.०९५३.००३।।	हे माझी प्रसिद्धी जगीं ब्रीदावळी । हरिदासाचे कुळीं वोळंगे सदा
५९२१	।।ना.गा.०९५३.००४।।	जन्मोनि ज्याचे कुळीं एक हरिदास । धन्य त्याचा वंश पुण्यशीळ
५९२२	।।ना.गा.०९५३.००५।।	काया वाचा मनें न विसंबे त्यासी । ते माझ्या दैवासी दैव जाले
५९२३	।।ना.गा.०९५३.००६।।	नामधारकाचें उच्छिष्ट जेथें पडे । उभा राहोनि पुढें झेली मुखें
५९२४	।।ना.गा.०९५३.००७।।	तें मज गोमटें सेवितां सुख वाटे । म्हणोनि धाटें मोठें शरीर माझें
५९२५	।।ना.गा.०९५३.००८।।	बहु कांति पुष्ट यश कीर्ति प्रभा । नित्य नवी शोभा होय तेणें
५९२६	।।ना.गा.०९५३.००९।।	ते संत सोयरे भेटती जे वेळीं । ते माझी दिवाळी दसरा सण
५९२७	।।ना.गा.०९५३.०१०।।	म्हणोनी नामयातें जेवविलें सांगातें । बहु दिवस होतें आर्त पोटीं
५९२८	।।ना.गा.०९५३.०११।।	जालें तें सर्वथा नोहे पैं अन्यथा । पुढतीं सांगा आतां काय करणें
५९२९	।।ना.गा.०९५४.००१।।	तंव म्हणती द्विज परियेसी गुणनिधी । प्रतिपादिले वेदीं जे जे धर्म
५९३०	।।ना.गा.०९५४.००२।।	ते ते आचरावे विहित क्रियाकर्म। जें जें वर्णाश्रमें आलें जया
५९३१	।।ना.गा.०९५४.००३।।	तेचि एक धन्य जगीं देहधारी । असतां संसारीं जीवन्मुक्त
५९३२	।।ना.गा.०९५४.००४।।	आचार प्रथम ब्राह्मणांचा धर्म । शौच नित्यनेम सत्यवाणी
५९३३	।।ना.गा.०९५४.००५।।	तप शम दम भूतदया पूर्ण । अखंड अनुसंधान स्वस्वरूपीं
५९३४	।।ना.गा.०९५४.००६।।	स्नानसंध्या जप होम अध्ययन विधि । देवतार्चन सिद्धि करुनी भावें
५९३५	।।ना.गा.०९५४.००७।।	वैश्वदेव आणि अतिथीपूजन । नववें ब्रह्मयज्ञ आवश्यक
५९३६	।।ना.गा.०९५४.००८।।	संपादुनि हे विधि सारावें भोजन । त्यावरी श्रवण पुराणांचें
५९३७	।।ना.गा.०९५४.००९।।	सर्व काळ व्हावें संतुष्ट मानस । असावा विश्वास वेदवचनीं
५९३८	।।ना.गा.०९५४.०१०।।	तुम्हीं तंव सर्वज्ञ संपन्न चतुर । देखावा विचार विशुद्धीचा
५९३९	।।ना.गा.०९५४.०११।।	सांडुनि अभिमान व्हावें शुद्धमती । जोडावी ते कीर्ति उभय लोकीं
५९४०	।।ना.गा.०९५४.०१२।।	जावें चंद्रभागे करावें मंत्रस्नान । द्यावें हेमदान सत्वशुद्धी
५९४१	।।ना.गा.०९५४.०१३।।	पुण्यजना एकी क्षेत्रप्रदक्षिणा । करावी पावन उभयकुळें
५९४२	।।ना.गा.०९५४.०१४।।	ऐकोनि पंढरिरावो बोलते जाले वाचा । आज्ञा ते शिरसा स्वामियांची
५९४३	।।ना.गा.०९५४.०१५।।	परी काया वाचा मनें मागेन तें द्यावें। माझ्या सांभाळावें नामयासी

५९४४	।।ना.गा.०९५५.००१।।	तुम्ही सदाचार महंत ब्रह्मवादी । तुमची वाग्नदी ब्रह्मरूप
५९४५	।।ना.गा.०९५५.००२।।	सत्य वचन जळ पवित्र तें निर्मळ । कृतार्थ तेणें केवळ जालोंसे मी
५९४६	।।ना.गा.०९५५.००३।।	हा तुमचा विश्वास दृढ आहे मज । तुम्ही माझे पूज्य परम देव
५९४७	।।ना.गा.०९५५.००४।।	स्नानाचा प्रकार आहे पंचविध । सांगेन विद्गदभाव त्याचा
५९४८	।।ना.गा.०९५५.००५।।	अर्थी ठेवुनी दृष्टी विवेक घ्यावा पोटीं । प्रत्यया येईल गोष्टी अनुभवाची
५९४९	।।ना.गा.०९५५.००६।।	उत्तमाहुनी उत्तम सत्य वाग्स्नान । यापरतें पावन आणिक नाहीं
५९५०	।।ना.गा.०९५५.००७।।	काया वाचा मनें हे दृढ धरिजे । हेळाची तरिजे भवसागरु
५९५१	।।ना.गा.०९५५.००८।।	बाहेजु भीतरीं शुद्ध सर्वकाळ । हें दुजें निर्मळ शुद्धस्नान
५९५२	।।ना.गा.०९५५.००९।।	हें जया सदैवा घडे भाग्ययोगें । मग तया न लगे साधन कांहीं
५९५३	।।ना.गा.०९५५.०१०।।	सकळ इंद्रियांचा करोनि निग्रहो । दंडावा विग्रहो वासनेचा
५९५४	।।ना.गा.०९५५.०११।।	हें तिजें निर्मळ घडे जया स्नान । न लगे अनुष्ठान करणें त्यासी
५९५५	।।ना.गा.०९५५.०१२।।	सर्वांभूतीं करुणा हेंचि पैं चवथें स्नान । साधितो सज्जन विरळा कोणी
५९५६	।।ना.गा.०९५५.०१३।।	त्याचेनि दर्शनें जळती पापराशी । तो सर्वां तीर्थांसी तीर्थरूप
५९५७	।।ना.गा.०९५५.०१४।।	पांचवें स्नान काया प्रक्षाळावी जळीं । करणें ते आंघोळी लौकिकाची
५९५८	।।ना.गा.०९५५.०१५।।	काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर । हे दोष दुर्धर देहामाजीं
५९५९	।।ना.गा.०९५५.०१६।।	विवेक वैराग्य धरावें मानसीं । रहावें संगतीसी संतांचिया
५९६०	।।ना.गा.०९५५.०१७।।	अनंत जन्माचें हेंचि प्रायश्चित्त । ज्याचे वाचे नित्य रामकृष्ण
५९६१	।।ना.गा.०९५५.०१८।।	शांति क्षमा दया निजबोध निवृत्ती । अखंड खेळती जयापाशीं
५९६२	।।ना.गा.०९५५.०१९।।	तो एक संसारीं धन्य शिंपी नामा । आवडता आम्हां जीवाहोनी
५९६३	।।ना.गा.०९५६.००१।।	प्रार्थूनि सकळां बोले देवरावो । फेडावा संदेहो वासनेचा
५९६४	।।ना.गा.०९५६.००२।।	स्नानविधीलागीं जावें चंद्रभागे । संताचेनि संगें आम्ही तुम्ही
५९६५	।।ना.गा.०९५६.००३।।	बाप भक्तप्रिय कैवारिया मुरारी । लीला वोडंबरी खेळ खेळू
५९६६	।।ना.गा.०९५६.००४।।	नामयाचा हात धरोनि करकमळीं । चाले वनमाळी समारंभें
५९६७	।।ना.गा.०९५६.००५।।	नरनारी कवतुक पाहती सकळिक । स्वर्गीं ब्रह्मादिक ठकले ठेले
५९६८	।।ना.गा.०९५६.००६।।	सकल संतमेळासहित शारंगधरु । पाठी दळभारू ब्राह्मणांचा
५९६९	।।ना.गा.०९५६.००७।।	आले चंद्रभागे हरिनाम गर्जत । केला प्रणिपात पुंडलिकासी

५९७०	।।ना.गा.०९५६.००८।।	प्रक्षाळोनि चरण केले प्राणायाम । बाप सकळ धर्म जनिता स्वयें
५९७१	।।ना.गा.०९५६.००९।।	समस्त द्विजकुलां करोनि प्रदक्षिणा । आरंभिले स्नानविधि देवें
५९७२	।।ना.गा.०९५६.०१०।।	छाचर कुरळ केश रुळती पाठीवरी। पितांबरधारी शामतनू
५९७३	।।ना.गा.०९५६.०११।।	सुंदर कमळनयन मुख प्रभाराशी । तें ध्यान मानसी सनकादिकां
५९७४	।।ना.गा.०९५६.०१२।।	गोमयमृत्तिका आणोनियां देखा । प्रक्षाळुनी उदका वेदमंत्रें
५९७५	।।ना.गा.०९५६.०१३।।	करुनि प्रयोग सारियेलें स्नान । केला परिधान सोनसळा
५९७६	।।ना.गा.०९५६.०१४।।	ब्राह्मणाचें तीर्थ मस्तकीं वंदिलें । अभिवंदन केलें हरिच्या दासा
५९७७	।।ना.गा.०९५६.०१५।।	सारोनियां संध्या नित्य नेम सर्व। पुजिले भूदेव दिधली दानें
५९७८	।।ना.गा.०९५६.०१६।।	म्हणे कृपादृष्टीं मज केलें सनाथ । पुरविलें आर्त हृदयींचें
५९७९	।।ना.गा.०९५६.०१७।।	येथुनी संशयो न धरावा मानसीं । मानावें आम्हांसी आत्मरूप
५९८०	।।ना.गा.०९५६.०१८।।	चालिले सत्वर आलें महाद्वारां । आज्ञा द्विजवरां दिधली देवें
५९८१	।।ना.गा.०९५६.०१९।।	तेथें हरिखे निर्भर नामा निजबोधें । नाचतो आनंदें गरुडपारीं
५९८२	।।ना.गा.०९५७.००१।।	समस्त भक्तमंडळीसहित वनमाळी । प्रवेशले राउळीं परमानंदें
५९८३	।।ना.गा.०९५७.००२।।	राही रखुमाई सत्यभामा वेगीं । देवातें अष्टांगीं नमस्कारिती
५९८४	।।ना.गा.०९५७.००३।।	बाप सुखसिंधु स्वामी आर्तबंधु । प्रीति परमानंदु निजभक्तां
५९८५	।।ना.गा.०९५७.००४।।	सत्यभामेनें केलें प्रक्षाळण चरणां । रुक्माई विंजना जाणविती
५९८६	।।ना.गा.०९५७.००५।।	विडा देती राही उभी उजव्या बाही । दृष्टी ठेवुनि पायीं कवळी मनें
५९८७	।।ना.गा.०९५७.००६।।	शुक सनकादिक नारद तुंबर । करती जयजयकार नामघोषें
५९८८	।।ना.गा.०९५७.००७।।	आले बंदीजन पढती ब्रीदावळी । ध्यान हृदयकमळीं चंद्रचूडा
५९८९	।।ना.गा.०९५७.००८।।	निवृत्ती ज्ञानदेव सोपान सांवता । जवळी त्या जनमित्रा बोलाविले
५९९०	।।ना.गा.०९५७.००९।।	सकळिक संतें परमानंदें तृप्ती । सारोनि श्रीपती आरोगणा
५९९१	।।ना.गा.०९५७.०१०।।	बैसोनि एकांतीं पंढरीचा राणा। करितसे विचारणा निजभक्तांसी
५९९२	।।ना.गा.०९५७.०११।।	सकळिक ब्राह्मण आणावे भोजना । निरसावी वासना संदेहाची
५९९३	।।ना.गा.०९५७.०१२।।	उठोनि प्रात:काळीं यावें शीघ्रवत । द्यावया अक्षत ब्राह्मणांसी
५९९४	।।ना.गा.०९५७.०१३।।	निजबोधें आनंदें हर्षे खेळेमेळे । भोगावे सोहळे स्वानंदाचे
५९९५	।।ना.गा.०९५७.०१४।।	फेडावी तयांची भेदभ्रमदृष्टी । द्यावी तयां भेटी निजरूपाची

५९९६	।।ना.गा.०९५७.०१५।।	संतसंगतीचा प्रगट व्हावा महिमा । द्यावा भक्तिप्रेमा नामयासी
५९९७	।।ना.गा.०९५८.००१।।	सुख सेजेवरि देव विश्रांति पहुडले । विश्रांतीसी गेले सकळ भक्त
५९९८	।।ना.गा.०९५८.००२।।	ब्रह्मवीणा करीं घेऊनि ब्रह्मसुत । जाणोनी एकांत नारदमुनी
५९९९	।।ना.गा.०९५८.००३।।	बाप पंढरीनाथ सुखाचा सुखसिंधु । नित्य नवा आनंदु सोहळा करी
६०००	।।ना.गा.०९५८.००४।।	विश्रांति विसांवा जें विश्वमंगळ । तें नाम निर्मळ विठोबाचें
६००१	।।ना.गा.०९५८.००५।।	तो भक्तशिरोमणी वैराग्य पुतळा । गातो प्रेमकळा धरुनी कंठीं
६००२	।।ना.गा.०९५८.००६।।	तेणें श्रवणामृतें हृदय कोंदाटलें । प्रेमाचे सुटले पाझर नयनीं
६००३	।।ना.गा.०९५८.००७।।	हर्षे निर्भर दोनी देव नारदमुनी । प्रीति आलिंगनीं एकमेकां
६००४	।।ना.गा.०९५८.००८।।	जाती चंपक सुमनें माजीं तुळसीमिश्रित । दिधल्या त्या उचित कंठीं माळा
६००५	।।ना.गा.०९५८.००९।।	नमस्कार करुनि केले विसर्जन । भरले त्रिभुवन ब्रह्मरसें
६००६	।।ना.गा.०९५८.०१०।।	मग चालिले तेथोनि ऋषी नारदमुनी । हृदयीं संजीवनी कृष्णनाम
६००७	।।ना.गा.०९५८.०११।।	तेणें त्या विश्रांती नित्य तृप्ती मनीं । नामा जीवें चरणीं विनटला
६००८	।।ना.गा.०९५९.००१।।	जीवींचें गुज राही रुक्माईसी पुसे । न धरवे मज हांसे नवल वाटे
६००९	।।ना.गा.०९५९.००२।।	काय अभिश्राप आला देवराया । केली आपण या आत्मशुद्धी
६०१०	।।ना.गा.०९५९.००३।।	हें मज बाई सत्य सांगा वाणी । कवणें चक्रपाणि भुलविलें
६०११	।।ना.गा.०९५९.००४।।	सूर्य आणि अंधारू वर्ते ऐक ठायीं । हें भूतभविष्य नाहीं वर्तमान
६०१२	।।ना.गा.०९५९.००५।।	ऐसें हे अघटित जरी घडेल प्रसंगीं । तरीच दोष संसर्गी देवराया
६०१३	।।ना.गा.०९५९.००६।।	अग्निमाजीं बीजें पाल्हेजती सुरवाडें । कीं बुडालें सापडे लवण जळीं
६०१४	।।ना.गा.०९५९.००७।।	ऐसें हें अभिनव जरी घडेल प्रसंगीं । तरीच संसर्गीच पडती देवो
६०१५	।।ना.गा.०९५९.००८।।	ज्योतीसी अळूमाळु मिळाल्या कर्पुरी । पुढती त्यासी उरीं उरे जरी
६०१६	।।ना.गा.०९५९.००९।।	ऐसें होय जरी या त्रिभुवनामाझारीं । तरीच केशिराजीं वसती दोष
६०१७	।।ना.गा.०९५९.०१०।।	तरी हें न कळे माते सांगावें साचार । सर्वज्ञ चतुर वडील तुम्ही
६०१८	।।ना.गा.०९५९.०११।।	रुक्माई म्हणे या नामयाचे चाडे । अनंत पवाडे केले देवें
६०१९	।।ना.गा.०९६०.००१।।	रुक्माई म्हणे परियेसी वो आरजे । सांगेन सकळ जें वर्म तुज
६०२०	।।ना.गा.०९६०.००२।।	अनाथा माहेर एक चक्रपाणि। बहु दिनालागोनी लोभापर
६०२१	।।ना.गा.०९६०.००३।।	म्हणोनि भुलला देव नाम्याचेनि लोभें । कर्में शुभाशुभें अंगिकारी

६०२२	।।ना.गा.०९६०.००४।।	आवडीचा वोरसु न करी कायकाय । हा प्रसिद्ध अनुभव आहे लोकां
६०२३	।।ना.गा.०९६०.००५।।	विषम विषयसुख विषयाचें गळालें । तयाचे सोहळे करिती लोक
६०२४	।।ना.गा.०९६०.००६।।	आंधळे पांगुळे मुके अनर्गळ । परी जीवापरिस बाळ पढियें मातें
६०२५	।।ना.गा.०९६०.००७।।	अंतरीच्या कळवळें खेळवी लाडेंकोडें । परि विलासाचे नावडे चोख चांग
६०२६	।।ना.गा.०९६०.००८।।	प्रीतीच्या पडिभरें नेघे पैं विकृती। देखोनि विश्रांति थोर मानी
६०२७	।।ना.गा.०९६०.००९।।	म्हणे माझे आळीकर दिठावेल झणीं । इडापीडा घेउनी वदन चुंबी
६०२८	।।ना.गा.०९६०.०१०।।	स्नेहाच्या संभ्रमें नेणे लोकलाज । उचलोनि भुज घाली कंठीं
६०२९	।।ना.गा.०९६०.०११।।	तनुमनप्राणांची करूनी ओंवाळणी । जावें हें माझेनि म्हणे जीवें
६०३०	।।ना.गा.०९६०.०१२।।	तैसीच परी आहे या विठ्ठलाच्या ठायीं । चित्त याच्या पायीं ठेविलें जेणें
६०३१	।।ना.गा.०९६०.०१३।।	न पाहे तयाचें जाती कुळ कर्म । वर्णाश्रमधर्म शुद्ध वाणी
६०३२	।।ना.गा.०९६०.०१४।।	अनंत जन्मांचा कायामनेंवाचा । आहे या दोघांचा ऋणानुबंधु
६०३३	।।ना.गा.०९६०.०१५।।	तो नकळे न सुटे कोणिये कल्पांतीं । जिवलग सांगाती जाला नामा
६०३४	।।ना.गा.०९६१.००१।।	मग नारदातें पुसे सत्यभामा देवी । विस्मयो माझ्या जीवीं अति वाटे
६०३५	।।ना.गा.०९६१.००२।।	सांडोनियां थोरी देव मुगुटमणी। नाचतो कीर्तनीं संतांपुढें
६०३६	।।ना.गा.०९६१.००३।।	तरी कोणिये जन्माचें काय काय याचें । घेतलें नाम्याचें ऋण देवें
६०३७	।।ना.गा.०९६१.००४।।	एका पुंडलिकाचेनि पांगें येणें हो श्रीरंगें । अठ्ठावीस युगें उभ्या गेलीं
६०३८	।।ना.गा.०९६१.००५।।	न पाहे परतोनी अझुनी पाठिमोरा । न बोले निष्ठुरा वचन कांहीं
६०३९	।।ना.गा.०९६१.००६।।	तरी कोण प्रीति देवा कोण्या ऋणानुबंधें । राखितो आनंदें बळिचें द्वार
६०४०	।।ना.गा.०९६१.००७।।	विकिला पायिक कायामनें वाचा । जाला पांडवांचा वेळाइतु
६०४१	।।ना.गा.०९६१.००८।।	जें जें जया आवडे तें तें धरोनी रूप । पाववी संकल्प सिद्धी त्यांचे
६०४२	।।ना.गा.०९६१.००९।।	एकला एकटु एकलेनि जीवें । भक्तांचें करावें सकळ काज
६०४३	।।ना.गा.०९६१.०१०।।	ऐसे भक्त अपार आहेत भूमंडळीं । किती लागावळी असेल त्यांची
६०४४	।।ना.गा.०९६१.०११।।	म्हणोनि माझ्या जिवीं वाटे थोर खंती । स्वामीतें शिणविती युगायुगीं
६०४५	।।ना.गा.०९६१.०१२।।	भक्तांचे आवडी त्यजिलें वैकुंठभवन । चित्तीं अमृतपान न वाटे गोड
६०४६	।।ना.गा.०९६१.०१३।।	अखंड आवडे संतांची संगती । बैसोनि एकांतीं घेती सुख
६०४७	।।ना.गा.०९६१.०१४।।	ऐसी इहीं चाळविलें वैष्णवीं । आमुचें घर गोसावी भुलविलें

६०४८	।।ना.गा.०९६१.०१५।।	त्या सकळांहुनि पढियंता देवा एकु नामा । भक्तिभावें प्रेमा दिधला त्यासी
६०४९	।।ना.गा.०९६२.००१।।	तंव म्हणती नारदमुनि परियेसी वो माते । सांगेन मी तूतें सत्य मानी
६०५०	।।ना.गा.०९६२.००२।।	हा निर्विकल्प देव येतसे रूपा। करावया कृपा भक्तजनां
६०५१	।।ना.गा.०९६२.००३।।	हा शरणांगता वत्सलु अनाथा कृपाळु । मिरवी दीनदयाळु ब्रीद जगीं
६०५२	।।ना.गा.०९६२.००४।।	जो शब्दब्रह्मजनिता सकळ विधिकर्ता । धर्माचा पाळिता पक्षपाती
६०५३	।।ना.गा.०९६२.००५।।	म्हणोनि जन्मकर्मे असंख्यात जगीं । केलीं याचलागीं नारायणें
६०५४	।।ना.गा.०९६२.००६।।	अंबऋषीचें येणें सोसले गर्भवास । राखितो उदास बळिचें द्वार
६०५५	।।ना.गा.०९६२.००७।।	विकिला पाइकु कायामनें वाचा । जाला पांडवांचा मोलेंविण
६०५६	।।ना.गा.०९६२.००८।।	गोकुळीं नंदाचीं राखिलीं गोधनें । प्रीति उच्छिष्ट खाणे गौळियांचें
६०५७	।।ना.गा.०९६२.००९।।	विघ्न पडे तेथें आपणां वोडवी । संकटीं सोडवी माझी म्हणोनी
६०५८	।।ना.गा.०९६२.०१०।।	सांडोनि अभिमान न्यून कामें करी । जालासे अधिकारी दास त्याचा
६०५९	।।ना.गा.०९६२.०११।।	आज्ञा वाहे शिरीं जीवीं जतन करी। मानिलीं सोयरीं जिवलगें
६०६०	।।ना.गा.०९६२.०१२।।	एके अपमानिती दावेवरी बांधिती । उपहास करिती हर्ष मानी
६०६१	।।ना.गा.०९६२.०१३।।	केले अपराध नेघे आपुले चित्तीं । दुणावितो प्रीति नित्यनवी
६०६२	।।ना.गा.०९६२.०१४।।	ऐसे ब्रह्मांडनायकु देवा मुगुटमणी । हे त्याची करणी ख्याती जगीं
६०६३	।।ना.गा.०९६२.०१५।।	आम्ही सकळ भक्त याचे पूर्ण अंशु । चरणींचा सौरसु नामयासी
६०६४	।।ना.गा.०९६३.००१।।	निज गुज रुक्माई पुसे पंढरीनाथा । ठेवुनियां माथा चरणावरी
६०६५	।।ना.गा.०९६३.००२।।	सर्वांहुनी पढियंते काय स्वामियातें । तें मज निरुतें सांगा स्वामी
६०६६	।।ना.गा.०९६३.००३।।	हे माझ्या जीवींचि फेडावी आशंका । ब्रह्मांडनायका कृपाळुवा
६०६७	।।ना.गा.०९६३.००४।।	न रिगे तुमचें चित्त योगियांचे ध्यानीं । वैकुंठभुवनीं प्रीति नाहीं
६०६८	।।ना.गा.०९६३.००५।।	तेथिंचे सुखभोग सकळ विलास । नावडती उदास कवण्या गुणें
६०६९	।।ना.गा.०९६३.००६।।	सायोज्यता मुक्ती आपुली देऊनी । ज्ञानी ते निर्गुणीं बुडविले
६०७०	।।ना.गा.०९६३.००७।।	त्याहुनि जिवलग कोण तुमचे सखे । जे त्याचेनि पैं सुखें वेडावलेती
६०७१	।।ना.गा.०९६३.००८।।	चतुरानना ऐसा स्तवितां चतुरपणें । अठराही पुराणें वेद चारी
६०७२	।।ना.गा.०९६३.००९।।	परि तेहि उबगलीं म्हणती नेति नेति । शिणलीं वेवादती साहीजणें
६०७३	।।ना.गा.०९६३.०१०।।	ऐकुनि पंढरीनाथ बोले रुक्माईसी । तूं कां वो नेणसी गुज माझें

६०७४	।।ना.गा.०९६३.०११।।	कायावाचामनें सर्व निरंतरीं । आहे नाम्यावरी लोभ माझा
६०७५	।।ना.गा.०९६४.००१।।	जीवींचें गुजगौप्य सांगेन वो तूतें । ऐक एकचित्तें मनोधर्मे
६०७६	।।ना.गा.०९६४.००२।।	आवडते हे माझे भक्त परम सखे। जे सबाह्य सारिखे सप्रेमळ
६०७७	।।ना.गा.०९६४.००३।।	त्यापरिस थोर नाहीं मन दुजें । मन त्याचेनि काजें नांवरूप
६०७८	।।ना.गा.०९६४.००४।।	भक्त सर्वांहोनि पढियंते माझिया हो जीवा । भक्त हा विसावा ज्ञानियांचा
६०७९	।।ना.गा.०९६४.००५।।	भक्त योगियांच्या सुखाचा श्रृंगारु । भक्त अलंकारु वैराग्याचा
६०८०	।।ना.गा.०९६४.००६।।	भक्त वो माझिया जीवीचें निजध्येय । भक्त परमप्रिय कुळदैवत
६०८१	।।ना.गा.०९६४.००७।।	भक्तसंगेंसुखें विश्रांति विसांवा । भक्त माझा ठेवा सर्व धन
६०८२	।।ना.गा.०९६४.००८।।	भक्त हे माझिया भाग्याचे भूषण । भक्त ते निधान निक्षेपीचें
६०८३	।।ना.गा.०९६४.००९।।	भक्त यश कीर्ति भक्त सुख मूर्ति । भेटे तरी पुरती सकळ काम
६०८४	।।ना.गा.०९६४.०१०।।	भक्त माझ्या सर्व सुखाचा अधिकारी । भक्ताचिया घरीं वस्ती माझी
६०८५	।।ना.गा.०९६४.०११।।	मज आणि भक्तां नाहीं वेगळिक । घ्यावे सर्व सुख भक्ते माझे
६०८६	।।ना.गा.०९६४.०१२।।	भक्ते नाम घ्यावे भक्ते रूप घ्यावे । भक्तें मुख पहावें घडिये घडिये
६०८७	।।ना.गा.०९६४.०१३।।	भक्तें हृदयीं माझे चिंतावे चरण । भक्तें आलिंगन द्यावें मज
६०८८	।।ना.गा.०९६४.०१४।।	धर्मअर्थकाममोक्ष मुक्ति चारी । देतां न धरी करीं भक्त माझा
६०८९	।।ना.गा.०९६४.०१५।।	भक्त न मागे कांही न घाली मज भार । मजहुनि उदार भक्त माझा
६०९०	।।ना.गा.०९६४.०१६।।	पत्रपुष्प फळ जळ तें सर्वभावें । भक्ताचें मज व्हावें भलतैसें
६०९१	।।ना.गा.०९६४.०१७।।	आस करुनी वास पाहे घडिये घडिये । भक्ताचें तें पढिये सर्व मज
६०९२	।।ना.गा.०९६४.०१८।।	तरी मी भक्तांचा कीं भक्त आमुचे । सोईरे निजाचे एकमेक
६०९३	।।ना.गा.०९६४.०१९।।	म्हणोनि नामयाचे आर्त थोर जीवा । जवळोनि नवजावा दूर कोठें
६०९४	।।ना.गा.०९६५.००१।।	तंव ते सकळ भक्त आले शीघ्रवत । आनंदें गर्जत नामघोषें
६०९५	।।ना.गा.०९६५.००२।।	प्रेमें उचंबळत अंतरीं बोधले । सप्रेमें लोटले चरणांवरी
६०९६	।।ना.गा.०९६५.००३।।	त्या सुखाचा आनंदु न वर्णवे वाचे । एवढें भाग्य कैचें बोलावया
६०९७	।।ना.गा.०९६५.००४।।	आलिंगोनि देवें धरिले हृदयकमळीं । सादर सांभाळी कृपादृष्टी
६०९८	।।ना.गा.०९६५.००५।।	श्रीमुखाची वास पाहती वेळोवेळां । जाला एकवळा आनंदाचा
६०९९	।।ना.गा.०९६५.००६।।	मग उदार चक्रवर्ती सर्वज्ञाचा रावो । सांगे जीवींचा भावो रुक्माईसी

६१००	।।ना.गा.०९६५.००७।।	केला चंद्रभागें संकल्प संपूर्ण । तो व्हावा उत्तीर्ण सर्वभावें
६१०१	।।ना.गा.०९६५.००८।।	क्षेत्रवासी द्विज सुशील सदाचार । जे पुण्यसागर भूदैवत
६१०२	।।ना.गा.०९६५.००९।।	ज्यांचेनि दर्शनें पाप ताप जाय । यशकीर्ति होय चरणतीर्थें
६१०३	।।ना.गा.०९६५.०१०।।	तरी ते प्रार्थुनियां आजी आणावे त्रिभुवना । द्यावें त्या भोजना भक्तिभावें
६१०४	।।ना.गा.०९६५.०११।।	तेणें सकळ काम होतील परिपूर्ण । घ्यावें आशीर्वचन ब्राह्मणांचें
६१०५	।।ना.गा.०९६५.०१२।।	तंव म्हणे रुक्माई ब्रह्मांडनायकां । अक्षत सकळिकां द्यावी देवा
६१०६	।।ना.गा.०९६५.०१३।।	सकळही सिद्धि असती सदोदित । कर जोडुनि तिष्ठत सकळ काम
६१०७	।।ना.गा.०९६५.०१४।।	हांसोनि पंढरीनाथ बोले कवतुकें । जिवलगा आईके विष्णुदासा
६१०८	।।ना.गा.०९६५.०१५।।	पुढती कवतुक करणें तुजलागीं । नामयासी वेगीं कळली खूण
६१०९	।।ना.गा.०९६६.००१।।	केशव म्हणे नाम्या सुखाच्या निधाना । दे रे आलिंगना आवडत्या
६११०	।।ना.गा.०९६६.००२।।	जिवलगा जवळोनि नवजे कोठें दुरी । वाटे तुज अंतरीं घालावासी
६१११	।।ना.गा.०९६६.००३।।	न पुरे माझें आर्त घेतां तुझें सुख । मज नित्य तृप्ति भूक वाटे थोरी
६११२	।।ना.गा.०९६६.००४।।	उत्कंठित चित्त अखंड तुजकारणें । तुज देखिल्या पारणें होय नयना
६११३	।।ना.गा.०९६६.००५।।	अनंत जन्माचा हा ऋणानुबंधू । तरीच प्रीतिवादु न तुटे तुझा
६११४	।।ना.गा.०९६६.००६।।	तुवां मजलागोनि देह कर्वतीं दिधले । उग्र तप साधिलें जन्मोजन्मीं
६११५	।।ना.गा.०९६६.००७।।	त्यजोनि सर्व माया चित्त निरोधिलें । हृदयीं मज बांधिलें वश्य करोनी
६११६	।।ना.गा.०९६६.००८।।	तुज काय देईजे उतराई होईजे। ऐसें न देखिजे त्रिभुवनीं
६११७	।।ना.गा.०९६६.००९।।	शरीर प्राणांचे त्वां देऊनि बळिदान। केलें पैं निर्वाण भक्तराया
६११८	।।ना.गा.०९६६.०१०।।	करावें म्यां दास्यत्व आपुलेंनि अंगें । तुज तरी कांहीं नलगे देणें घेणें
६११९	।।ना.गा.०९६६.०११।।	नामा म्हणे देवा तूं दीनाचा कैवारी । म्हणोनि मजवरी करिसी मोहो
६१२०	।।ना.गा.०९६७.००१।।	भक्तजनवत्सल सुखसिंधुराशी । निर्भर मानसीं परमानंदें
६१२१	।।ना.गा.०९६७.००२।।	सरिसे सकळ भक्त घेउनि पंढरिनाथ। चालिले अक्षत द्यावयासी
६१२२	।।ना.गा.०९६७.००३।।	बाप तो कवतुकीं अनाथाचा नाथ । भोगिया श्रीमंत खेळू खेळे
६१२३	।।ना.गा.०९६७.००४।।	तंव ते उदित भाग्य भाग्यवंत । दर्शनाचें आर्त होतें त्यासी
६१२४	।।ना.गा.०९६७.००५।।	सकळही मिळोनि गेले कुंडलतीर्थी । तंव आले कमळापति दर्शनासी
६१२५	।।ना.गा.०९६७.००६।।	तेथें देखोनियां सकळांचा मेळा । केला द्विजां सकळां प्रणिपातु

६१२६	।।ना.गा.०९६७.००७।।	सांडोनि देहबुद्धि नि:संदेह व्हावें । कृपा करोनि यावें भोजनासी
६१२७	।।ना.गा.०९६७.००८।।	पाळावें आपुल्या दिधल्या सत्यवचना । करावी वासना तृप्त माझी
६१२८	।।ना.गा.०९६७.००९।।	स्नानसंध्या विधि सारोनि समस्त । यावें शीघ्रवत नैवेद्यासी
६१२९	।।ना.गा.०९६७.०१०।।	ते निवाले दर्शनें तृप्त जाले मनें । परिसोनि वचनें अमृतोपम
६१३०	।।ना.गा.०९६७.०११।।	आम्ही तरी आश्रित हेंचि जाणा सत्य । आशिर्वाद नित्य देतों तुम्हां
६१३१	।।ना.गा.०९६७.०१२।।	सर्वभावें आमुचा करावा सांभाळ । स्वामी दीनदयाळ विश्व बोले
६१३२	।।ना.गा.०९६७.०१३।।	तुम्ही महाराज राजराजेश्वर । पाहावें निरंतर कृपादृष्टी
६१३३	।।ना.गा.०९६७.०१४।।	तुमचा हा आदर निरुपम सर्वथा । दिधलीसे मान्यता वेदवचना
६१३४	।।ना.गा.०९६७.०१५।।	तें भाष्य आपुलें जतन सर्वभावें । साक्ष करुनी द्यावें प्रेम नाम्या
६१३५	।।ना.गा.०९६८.००१।।	बाप आर्तबंधु सकळ जीवनकंदू । भक्तांचा सुखसिंधु पंढरिरावो
६१३६	।।ना.गा.०९६८.००२।।	हर्षे निर्भर चित्तीं आले निजभुवना । सांगे विवंचना रुक्माईसी
६१३७	।।ना.गा.०९६८.००३।।	धन्य दिवस जाला आजि सोनियाचा । सोहळा भक्तांचा आरंभिला
६१३८	।।ना.गा.०९६८.००४।।	प्रार्थिलें ब्राह्मणां भोजनालागुनी । येताती सारोनि स्नानविधि
६१३९	।।ना.गा.०९६८.००५।।	आजीचें कवतुक पाहावें अभिन्न । हांसोनियां देव बोलते जाले
६१४०	।।ना.गा.०९६८.००६।।	तंव म्हणे रुक्माई अहो जी पूर्णकामा । स्वामी मेघश्यामा कृपानिधी
६१४१	।।ना.गा.०९६८.००७।।	त्यांचें पूर्व पुण्य आजि आलें फळा । देखिले गोपाळा चरण तुमचें
६१४२	।।ना.गा.०९६८.००८।।	तंव ते नित्य नेम सारोनि आपुले । वेगीं द्विज आले राउळांगणा
६१४३	।।ना.गा.०९६८.००९।।	नमस्कारुनि देवें बैसविलें आसनीं । पूजा चक्रपाणि आरंभिली
६१४४	।।ना.गा.०९६८.०१०।।	चरण प्रक्षाळुनी गंध तुळसीमाळा । घातलिया गळा ब्राह्मणाच्या
६१४५	।।ना.गा.०९६८.०११।।	उजळोनि दीपक ओंवाळिले प्रीति । मग ते पात्रपंक्ति मांडियेल्या
६१४६	।।ना.गा.०९६८.०१२।।	रत्नजडित सकळां सुवर्णाची ताटें । षड्रस बरवंटे तयामाजीं
६१४७	।।ना.गा.०९६८.०१३।।	विस्तारोनि वेगीं ओगरिलीं चांगें । संकल्प श्रीरंगें सोडियेला
६१४८	।।ना.गा.०९६८.०१४।।	देउनि आपोशन अमरचूडामणी । प्रार्थितो जोडोनि करकमल
६१४९	।।ना.गा.०९६८.०१५।।	कवळोकवळीं घ्यावें नाम अच्युताचें । भोजन भक्तांचें सुखरूप
६१५०	।।ना.गा.०९६८.०१६।।	ऐसे जेविले आनंदें धाले परमानंदें । मुखशुद्धि गोविंदें समर्पिली
६१५१	।।ना.गा.०९६८.०१७।।	रत्नाचे दीपक उजाळोनि आरती । साष्टांग श्रीपति नमस्कारिलें

६१५२	।।ना.गा.०९६८.०१८।।	जोडोनि दोन्ही कर विनविती श्रीरंग । आजीचा प्रसंग पुण्यकाळ
६१५३	।।ना.गा.०९६८.०१९।।	आम्हां तुम्हां भेटी जाल्या सुखगोष्टी । भरली सकळ सृष्टी परमानंदें
६१५४	।।ना.गा.०९६८.०२०।।	अवघे संतजन आमुचे सांगाती । जेवूं एका पाती सरिसे आम्ही
६१५५	।।ना.गा.०९६८.०२१।।	म्हणोनि सकळिकां पाचारिलें देवें । कवतुक अवघे पाहाती द्विज
६१५६	।।ना.गा.०९६८.०२२।।	ब्रह्मादिक देव तिष्ठत पाहाती व्योमीं । वंचलों रे आम्ही भक्ति सुखा
६१५७	।।ना.गा.०९६८.०२३।।	सर्वप्रेम देउनि निवविला नामा । ऐसें भाग्य आम्हां कैचें आतां
६१५८	।।ना.गा.०९६९.००१।।	निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान सांवता । जनमित्र पढियंता जिवलगु
६१५९	।।ना.गा.०९६९.००२।।	आसंद सुदामा विसोबा खेचर। नरहरी सोनार आदिकरुनि
६१६०	।।ना.गा.०९६९.००३।।	बाप आर्तबंधु कृपाळू दीनाचा । अभिमान भक्तांचा न संडी कदा
६१६१	।।ना.गा.०९६९.००४।।	चोखामेळा बंका भक्तवत्सल लाडका । तो बोलविला देखा आरोगणें
६१६२	।।ना.गा.०९६९.००५।।	वैराग्याचा मेरु तो गोरा कुंभारु । आवडता डिंगरु केशवाचा
६१६३	।।ना.गा.०९६९.००६।।	ऐसें थोरसानें सकळ भक्त राणे । देवें आरोगणें बोलावले
६१६४	।।ना.गा.०९६९.००७।।	धूप आणि दीप तुळशीच्या माळा । पूजिलें सकळां देवरायें
६१६५	।।ना.गा.०९६९.००८।।	तंव राही रखुमाबाई सत्यभामा सती । विस्तारोनि आणिती विविध बोणी
६१६६	।।ना.गा.०९६९.००९।।	भोंवती भक्त मंडळी मध्यें वनमाळी । शोभे नभमंडळीं चंद्र जैसा
६१६७	।।ना.गा.०९६९.०१०।।	सकळांमुखीं कवळ देतसे निजकरें । उच्छिष्ट पितांबरें सांवरितो
६१६८	।।ना.गा.०९६९.०११।।	त्या सुखाचा पारु देखोनी वैकुंठीं । होती लूलूमिठि सुखराशी
६१६९	।।ना.गा.०९६९.०१२।।	ऐसें तें भोजन जालें खेळेंमेळें । ब्रह्मरसें धाले सकळ भक्त
६१७०	।।ना.गा.०९६९.०१३।।	तंव विमानें आकाशीं दाटले सकळ। करिती कल्लोळ पुष्पवृष्टी
६१७१	।।ना.गा.०९६९.०१४।।	तें देखोनी द्विजवर पडिले चिंतवणी । म्हणती पैं जाली हानी जीवित्वाची
६१७२	।।ना.गा.०९६९.०१५।।	नव्हे हा ज्ञानमार्ग नव्हे हें वैराग्य । नवल भक्तिभाग्य आवडीचें
६१७३	।।ना.गा.०९६९.०१६।।	एक म्हणती हा पांडुरंग होय साचें। येव्हढें भाग्य कैचें मानवियां
६१७४	।।ना.गा.०९६९.०१७।।	हा नव्हे गुणिवंतु क्रियाकर्मातीतु । यासी प्राय:श्चितु काय घडे
६१७५	।।ना.गा.०९६९.०१८।।	नाहीं यासी आप नाहीं यासी पर । नाहीं या आचार जातिकूळ
६१७६	।।ना.गा.०९६९.०१९।।	षड्मार्ग संबंध नाहीं याच्या ठायीं। विकल्पाचें नाहीं वळण कदां
६१७७	।।ना.गा.०९६९.०२०।।	कृपेचा कोंवळा सोयरा दीनांचा । उदार मनाचा लोभापर

६१७८	।।ना.गा.०९६९.०२१।।	अनुसरे त्याचें मायाजाळ तोडी । बैसणें तो मोडी संसाराचें
६१७९	।।ना.गा.०९६९.०२२।।	या नामयाची माता आम्हां तुम्हां देखतां । शिणली वेवादतां नानापरी
६१८०	।।ना.गा.०९६९.०२३।।	नेदी तिच्या हातीं घातिला पाठिसी । धरिला जीवेंसी माझा म्हणुनी
६१८१	।।ना.गा.०९६९.०२४।।	देहाचा विसरु याच्या रुपाच्या दर्शनें । चरणाचेनि स्मरणें चित्त निवे
६१८२	।।ना.गा.०९६९.०२५।।	सुख गोष्टी यासी केलिया एकांत । तेणें पुरतसे आर्त जन्ममरणा
६१८३	।।ना.गा.०९६९.०२६।।	ऐसें त्याचें बोलणें ऐकोनि पंढरिनाथें । दिलें सकळिकांतें अभयदान
६१८४	।।ना.गा.०९६९.०२७।।	मग निजरूप दाविता जाला तयावेळीं । नामा हृदयकमळीं आलिंगिला
६१८५	।।ना.गा.०९७०.००१।।	तंव दिव्य रत्नमणि मस्तकीं किरीटी । मळवट लल्लाटीं कस्तुरीचा
६१८६	।।ना.गा.०९७०.००२।।	माथां मोरपिसावेठी कुंडलें गोमटीं । पाहात कृपादृष्टी निजभक्तां
६१८७	।।ना.गा.०९७०.००३।।	तो पुंडलिकाचा ठेवा पूर्वपुण्यराशी । वैकुंठनिवासी देवरावो
६१८८	।।ना.गा.०९७०.००४।।	वदन निर्मळ भाव सुस्मित वेल्हाळ । दर्शनीं रत्नकीळ तेज फांकें
६१८९	।।ना.गा.०९७०.००५।।	त्या सुखाचे अधिकारी भक्त सप्रेमळ । हृदयीं सर्वकाळ हरिचें ध्यान
६१९०	।।ना.गा.०९७०.००६।।	कौस्तुभ वैजयंती पदक हृदयावरी । शोभत साजिरी तुळसीमाळा
६१९१	।।ना.गा.०९७०.००७।।	श्रीवत्सलांछन प्रीतीचें भूषण । चर्चिला चंदन श्यामतनु
६१९२	।।ना.गा.०९७०.००८।।	शंखचक्र करीं ते कर कटावरी । पितांबरधारी जलदनील
६१९३	।।ना.गा.०९७०.००९।।	समचरण स्वयंभु उभा विटेवरी । रुळती तोडरीं दानव दैत्य
६१९४	।।ना.गा.०९७०.०१०।।	तेणें दिव्य तेजें ब्रह्मांड धवळलें । प्रकाशें लोपलें दिग्मंडळ
६१९५	।।ना.गा.०९७०.०११।।	सकळ संत द्विज देखती चतुर्भुज । शंख चक्रांबुज गदापाणि
६१९६	।।ना.गा.०९७०.०१२।।	कीटकपक्षी पशुपाषाण तरुवर । देखती द्विजवर विठ्ठलरूप
६१९७	।।ना.गा.०९७०.०१३।।	परमानंद बोधें निवाले आनंदें । भेदाभेद द्वंद्वें विसरोनि गेलीं
६१९८	।।ना.गा.०९७०.०१४।।	एकाविण दुजें तेथें न दिसे पैं आन । नाहीं आठवण देहभावा
६१९९	।।ना.गा.०९७०.०१५।।	सबाह्य कोंदली अवघी विठ्ठलमूर्ति । सुखाची विश्रांति योगियांच्या
६२००	।।ना.गा.०९७०.०१६।।	प्रेमें वोसंडत सकळ भक्तजन । देती आलिंगन एकमेकां
६२०१	।।ना.गा.०९७०.०१७।।	हर्षें निर्भर चित्तीं आनंदें गर्जती । पावले विश्रांति सकळ द्विज
६२०२	।।ना.गा.०९७०.०१८।।	ऐसा ब्रह्मानंद सोहळा भोगवी सकळां । आपुल्या प्रेमळा निजदासा
६२०३	।।ना.गा.०९७०.०१९।।	करोनि सावध वैकुंठींचा राणा । नामा घाली चरणावरी त्यांच्या

६२०४	।।ना.गा.०९७१.००१।।	बाप भक्तप्रिय पाहे कृपादृष्टी । करितसे सुखगोष्टी ब्राह्मणांसी
६२०५	।।ना.गा.०९७१.००२।।	सर्वभावें शरण सर्वकाळीं मज । ते हे भक्तराज सखे माझे
६२०६	।।ना.गा.०९७१.००३।।	याचेनि उपकारें दाटलों संपूर्ण । भक्तपराधीन जालों तेणें
६२०७	।।ना.गा.०९७१.००४।।	निवृत्ति ज्ञानेश्वर आणि हा सोपान । हे मुगुटमणी जाण सत्वमूर्ति
६२०८	।।ना.गा.०९७१.००५।।	सर्वभूतीं भजती सर्वभावें सर्वथा । केला पैं अपैता त्याचे बुद्धी
६२०९	।।ना.गा.०९७१.००६।।	हा जनमित्र जिवलग आमचा सोयरा । सांडिला संसारा ओवाळुनी
६२१०	।।ना.गा.०९७१.००७।।	माझे नामीं दृढ धरोनि विश्वास । अखंड उदास देहभावीं
६२११	।।ना.गा.०९७१.००८।।	जिवाहोनी पढियंता हा भक्त सांवता । निर्धार सांगतां नवलाव याचा
६२१२	।।ना.गा.०९७१.००९।।	हृदय विदारोनि आपुलेनि हातें । ठाव दिला मातें लपावया
६२१३	।।ना.गा.०९७१.०१०।।	बारा दिवसांचा हा भक्तवत्सला। माये सांडियेला वेणुनादीं
६२१४	।।ना.गा.०९७१.०११।।	म्हणती वो माझा त्या दिवसापासोनि । नेणें मजवाचून आणिक कांहीं
६२१५	।।ना.गा.०९७१.०१२।।	हा विसोबा खेचर आणि नरहरि सोनार । हा गोरा कुंभार अंतर्निष्ठ
६२१६	।।ना.गा.०९७१.०१३।।	समाधिस्थ सदा निवालें पैं चित्त । सबाह्य देखत मजलागीं
६२१७	।।ना.गा.०९७१.०१४।।	सुखाचा सुजाण आसंद सुदामा । हा माझा आत्मा आवडता
६२१८	।।ना.गा.०९७१.०१५।।	घरदार संसार त्यजिला मजकारणें । तोडिलें पैं येणें मायाजाळ
६२१९	।।ना.गा.०९७१.०१६।।	चोखामेळा बंका भक्त परमसखा । विसोबा हा देखा प्राण माझा
६२२०	।।ना.गा.०९७१.०१७।।	त्यजुनि सर्व संग एकविध भावें। अनुसरले जिवें माझे ठायीं
६२२१	।।ना.गा.०९७१.०१८।।	ऐसें या भक्तांचे सांगतों उपकार । आहेत बहुत फार कल्पकोडी
६२२२	।।ना.गा.०९७१.०१९।।	त्या सकळांच्या चरणींचा रजरेणु माझा नामा । भक्तिभाव प्रेमा दिधला त्यासी
६२२३	।।ना.गा.०९७२.००१।।	तंव ते भाग्याचे सागर विनविती द्विजवर । म्हणती तूं माहेर जोडलासी
६२२४	।।ना.गा.०९७२.००२।।	चरणींचा वियोग न व्हावा सर्वथा । तोडावी ममता प्रपंचाची
६२२५	।।ना.गा.०९७२.००३।।	नलगे मोक्षमुक्ति नलगे धनसंपत्ती । देई सत्संगती जन्मोजन्मीं
६२२६	।।ना.गा.०९७२.००४।।	वेदशास्त्रपठणें बहिर्मुखवनें । केली अभिमानें छळणबुद्धी
६२२७	।।ना.गा.०९७२.००५।।	धिक् तें जाणपण धिक् तो सन्मान । नाहीं प्रेमखूण कळली तुझी
६२२८	।।ना.गा.०९७२.००६।।	कुळाचेनि अभिमानें अंतरलों गा तेणें । पूर्ण देहाभिमानें भुलोनियां
६२२९	।।ना.गा.०९७२.००७।।	हें सकळ तुझी माया भुललों पंढरिराया । म्हणोनि जन्म वायां गेलें होतें

६२३०	।।ना.गा.०९७२.००८।।	अपराधांच्या कोडी घडल्या पैं आमुतें । निषेधिलें तूतें मायबापा
६२३१	।।ना.गा.०९७२.००९।।	परी त्वां दीनानाथें ब्रीद सत्य केलें । आम्हां तारियेलें पतितांसी
६२३२	।।ना.गा.०९७२.०१०।।	नकळे काय होतें संचित आमुचें । अनंत जन्माचें पूर्वपुण्य
६२३३	।।ना.गा.०९७२.०११।।	तें आजि फळलें तुझिया कृपादृष्टी । भाग्यें जाली भेटी संतजनां
६२३४	।।ना.गा.०९७२.०१२।।	दुर्जय तोडिले माया मोहपाश । केला पैं सौरस आपुल्या रूपीं
६२३५	।।ना.गा.०९७२.०१३।।	तापत्रय वणवा विझविला अवचिता। दिलें प्रेमामृता जीवन आम्हां
६२३६	।।ना.गा.०९७२.०१४।।	आतां सर्वकाळ अविट हे दृष्टी । यासाठीं संतभेटी निरंतर
६२३७	।।ना.गा.०९७२.०१५।।	प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी । मग होत कल्पकोडी गर्भवास
६२३८	।।ना.गा.०९७२.०१६।।	करता करविता तूंचि पैं एक। ब्रह्मांडनायक सर्वगत
६२३९	।।ना.गा.०९७२.०१७।।	आमुचे अवगुण न धरावे मानसीं । निरवावें संतांसी माझे म्हणुनी
६२४०	।।ना.गा.०९७२.०१८।।	तुझिया दासाचें द्यावें पैं दास्यत्व । तयाची वंदावी चरणधुळी
६२४१	।।ना.गा.०९७२.०१९।।	हेंचि व्रततीर्थ क्रियाकर्म आम्हां । द्यावा नित्य प्रेमा नामयासी
६२४२	।।ना.गा.०९७३.००१।।	कृपेच्या सागरें भक्तकरुणाघनें । देऊन आलिंगनें निववीलें तयातें
६२४३	।।ना.गा.०९७३.००२।।	सर्वज्ञाचा रावो आत्मा ज्ञानदेवो । सांगेल अनुभवो तुम्हांप्रती
६२४४	।।ना.गा.०९७३.००३।।	ते खूण अंतरीं धरा सर्वभावें । दृढ धरोनि जीवें जतन करा
६२४५	।।ना.गा.०९७३.००४।।	न लगे तीर्थाटन काया क्लेश जाण । न लगे अनुष्ठान करणें बहू
६२४६	।।ना.गा.०९७३.००५।।	न लगती सायास करणें उपवास । धरावा विश्वास संतसंगें
६२४७	।।ना.गा.०९७३.००६।।	न लगे वज्रासनीं बैसावें नेहटी । न लगे गिरिकपाटीं करणें वास
६२४८	।।ना.गा.०९७३.००७।।	न लगे उग्र तप नानामंत्र जप । भेणें जाय पाप संतसंगें
६२४९	।।ना.गा.०९७३.००८।।	न लगे भस्म उधळणें वाहणें जटाभार । न घालावा पसार लोकाचारीं
६२५०	।।ना.गा.०९७३.००९।।	सर्वभूतीं करुणा जिव्हे नामस्मृती । मन येईल निवृत्ति आपेंआप
६२५१	।।ना.गा.०९७३.०१०।।	क्रियाकर्मधर्म प्रेमेंविण खटपटा । करितां आला वीट दीर्घ दोषाचा
६२५२	।।ना.गा.०९७३.०११।।	साधनावांचुनी मार्ग सोपा जाण । करावें कीर्तन रामकृष्ण
६२५३	।।ना.गा.०९७३.०१२।।	सर्वकाळ कथा संतांची संगती । वाचे नाम कीर्ति सर्वकाळ
६२५४	।।ना.गा.०९७३.०१३।।	तो हा राजमार्ग सर्वांहोनी चांग। सदा संतसंग वाचे नाम
६२५५	।।ना.गा.०९७३.०१४।।	संकल्प विकल्प न धरावे मानसीं । मनोभावें संतांसीं शरण जावें

६२५६	।।ना.गा.०९७३.०१५।।	ज्ञानदेव म्हणे पुढती ऐका एक । सांगेन प्रत्यक्ष अनुभव सिद्ध
६२५७	।।ना.गा.०९७४.००१।।	परमामृत सागरु मंथुनियां पुरता । काढिला तत्त्वतां ज्ञानबोधु
६२५८	।।ना.गा.०९७४.००२।।	या सुखाचा पारू जाणते विरळे । घेताती गळाळे संतजन
६२५९	।।ना.गा.०९७४.००३।।	प्रेमाचिये ताटीं वोगरु सुखामृत । हें सुख त्वरित सेवा आधीं
६२६०	।।ना.गा.०९७४.००४।।	हें सुख सेवितां परमानंद धणी । कृपा संतजनीं केली पूर्ण
६२६१	।।ना.गा.०९७४.००५।।	ज्ञानाचें अंजन लेईले संतजन । जनीं जनार्दन देखती सदा
६२६२	।।ना.गा.०९७४.००६।।	नाहीं भिन्न भेद सर्व ब्रह्म एक । ब्रह्मांडनायक अनंत कोटी
६२६३	।।ना.गा.०९७४.००७।।	दीपांचा दीपक हृदय आत्मज्योती । विश्वीं विठ्ठलमूर्ती देखती सदा
६२६४	।।ना.गा.०९७४.००८।।	हें सुख दिधलें भक्तांसी विश्रांति । नामाची हे ख्याती परमानंद
६२६५	।।ना.गा.०९७४.००९।।	पढतां नाम मंत्र ब्रह्मचि अवघे । पाहतां अनुभवें वेदमतें
६२६६	।।ना.गा.०९७४.०१०।।	तें हें विठ्ठलनाम वेदाचें गव्हार । जाणती साचार संतजन
६२६७	।।ना.गा.०९७४.०११।।	युगें अठ्ठाविस विठ्ठलनामें जपतु । हा पुंडलीक भक्तु महामुनी
६२६८	।।ना.गा.०९७४.०१२।।	उघडली मांदूस भक्तिभाव तारूं । विठ्ठल उद्धारू कलियुगीं
६२६९	।।ना.गा.०९७४.०१३।।	न लगती सायास करणें उपवास । विठ्ठलनामें पाश तुटती जाणा
६२७०	।।ना.गा.०९७४.०१४।।	आदि ब्रह्म जुनाट जपती सिद्ध मुनी । तें दिलें मंथोनि पुंडलिकें
६२७१	।।ना.गा.०९७४.०१५।।	केशवनाम मंत्र नामया सांगितलें । विस्तारोनि केलें मंथन ऐसें
६२७२	।।ना.गा.०९७५.००१।।	वेदाचें हें सार वैराग्याचें जीवन । चिदाकाशींची खूण परम गुज
६२७३	।।ना.गा.०९७५.००२।।	जें शुद्धज्ञान गुह्य मोक्षमुक्ति बीज। सकळ मंत्रराज मंगलनिधीं
६२७४	।।ना.गा.०९७५.००३।।	तें या नामयाचें होतें हृदयकमळीं । कथा भूमंडळीं प्रकट केली
६२७५	।।ना.गा.०९७५.००४।।	तें हें विठ्ठलनाम साराचें पैं सार । कलियुगीं उद्धार सकळ जनां
६२७६	।।ना.गा.०९७५.००५।।	जें श्रवणाचें श्रवण मननाचें मनन । जें निजध्यासन निजध्यासाचें
६२७७	।।ना.गा.०९७५.००६।।	जें विचाराचें सार वृत्तीचा निर्धार । स्वरूप साक्षात्कार उघडा केला
६२७८	।।ना.गा.०९७५.००७।।	जें भक्तीचें सौभाग्य ज्ञानाचें आरोग्य । शास्त्राचें तें चांग मथित नाम
६२७९	।।ना.गा.०९७५.००८।।	नामापरतें थोर नाहीं पैं आणिक । जनांसि तारक हेंचि एक
६२८०	।।ना.गा.०९७५.००९।।	जें सकळ धर्म जनक पवित्राचें पावन । जें कां अधिष्ठान आनंदाचें
६२८१	।।ना.गा.०९७५.०१०।।	जें योगसिद्धीचें जीवन पीयूष । जेणें पूर्ण आयुष्य कामनेचें

६२८२	।।ना.गा.०९७५.०११।।	पुण्यपावन देवा भक्तांचे सोहळे । प्रत्यक्ष गळाले आनंदाचे
६२८३	।।ना.गा.०९७५.०१२।।	भक्तिभावें याचें करितां श्रवण । मग नाहीं दर्शन गर्भवासा
६२८४	।।ना.गा.०९७५.०१३।।	म्हणोनि कीर्तन करावें आवडी । घ्यावी अर्थगोडी अनुभवें
६२८५	।।ना.गा.०९७५.०१४।।	नव्हे हें प्राकृत पाठांतर कवित्व । हा उपनिषद मथितार्थ ब्रह्मरस
६२८६	।।ना.गा.०९७५.०१५।।	जाणीव शहाणीव न करावी सर्वथा । न पहावी योग्यता व्युत्पत्तीची
६२८७	।।ना.गा.०९७५.०१६।।	हें सात्विकाचें धन भोक्ते संतजन । नामदेवें पूर्ण ग्रंथ केला
६२८८	।।ना.गा.०९७६.००१।।	ज्ञानदेवो म्हणे विठ्ठलासी । समाधान तूंचि होसी । परि समाधि हे तुजपासीं । घेईन देवा
६२८९	।।ना.गा.०९७६.००२।।	नलगे मज मुक्ति । नलगे मज मुक्ति । तुझ्या चरणीं आर्ती । थोर आथी
६२९०	।।ना.गा.०९७६.००३।।	विठोजी म्हणे ज्ञानदेवा । ज्ञानसागरा अनुभवा । वचनेंचि विसांवा । जाला मज
६२९१	।।ना.गा.०९७६.००४।।	ऐकें ज्ञानचक्रवर्ती । तूं तंव ज्ञानाचीच मूर्ती । परि पुससी जे आर्ती । ते कळली मज
६२९२	।।ना.गा.०९७६.००५।।	येक येक अनुभव कृपा । पद पदांतरें केला सोपा । परि यांत माझिया कृपा । सकळही वोळली
६२९३	।।ना.गा.०९७६.००६।।	ज्ञानदेवें चरणीं मिठी । मनेंसी पडली एके गांठी । दृश्यादृश्य जाली एक दृष्टी । प्रत्यक्ष भेटविलेंसी
६२९४	।।ना.गा.०९७६.००७।।	कर ठेउनी कुरवाळी । सर्वांग न्याहार न्याहळी । म्हणे तुवां घेतली जे आळी । ते सिद्धितें पावेल
६२९५	।।ना.गा.०९७६.००८।।	नामा उभा असे सन्मुख । ऐकतां थोर खेद दुःख । म्हणे ज्ञानांजन महासुख । समाधि घेतसे
६२९६	।।ना.गा.०९७७.००१।।	ज्ञानदेव उभा जोडोनि हस्त । भक्त पाहती समस्त । विठोजी म्हणे सकळा स्वार्थ । या ज्ञानांजनाचा
६२९७	।।ना.गा.०९७७.००२।।	कैसे वोळले त्वां ज्ञाना । समाधान तया ध्याना । मन नाठवे मीतूंपणा । समाधि खुणा ज्ञानासी
६२९८	।।ना.गा.०९७७.००३।।	मग म्हणे विठोजी दातार । समाधि तुज निरंतर । आतां प्रस्थान करी साचार । मज निरंतर आठवी
६२९९	।।ना.गा.०९७७.००४।।	कैसे परिपूर्ण वोळले । आपण समाधिरूप जाले । मनातें मन समरसलें । विठ्ठलरूपे
६३००	।।ना.गा.०९७७.००५।।	दशमी प्रस्थानाचा समयो । येकादशी जागर उत्सावो । द्वादशी क्षीरापती महोत्सवो । ज्ञानदेवें केला
६३०१	।।ना.गा.०९७७.००६।।	त्रयोदशीं म्हणे पांडुरंग । कांहीं न करीं गा उद्वेग । अळंकापुरीं समाधि प्रसंग । करीं करीं लवलाह्या
६३०२	।।ना.गा.०९७७.००७।।	माता रुक्मिणी वाढी ताटीं । विठोजी म्हणे उघडी दृष्टी । तुज मज आहे नित्य भेटी । येई पंढरीये
६३०३	।।ना.गा.०९७७.००८।।	नामा म्हणे ज्ञानउदयो । अळंकापुरीं सिद्ध समयो । परी विठ्ठलीं मुराला भावो । या ज्ञानदेवाचा
६३०४	।।ना.गा.०९७८.००१।।	विठोजी म्हणे ज्ञानदेवा । तुझी विश्रांती मन ठेवा । ते मुराली आमुचिया भावा । निःसंदेहें
६३०५	।।ना.गा.०९७८.००२।।	कैसें समाधान ज्ञानदेवा । अळंकापुरीं समाधि ठेवा । विठ्ठल ओळला वोल्हावा । नित्यरूपसमाधि
६३०६	।।ना.गा.०९७८.००३।।	संत करिती महा खेद । म्हणती ज्ञानांजन उद्बोध । मग चालिले विद्गद । अळंकापुरीसी
६३०७	।।ना.गा.०९७८.००४।।	महावल्ली वृक्ष अजान । तो निक्षेपिला पूर्णघन । मग विठोजी म्हणे आपण । ज्ञानदेवासी

६३०८	।।ना.गा.०९७८.००५।।	धन्य धन्य ज्ञानेश्वरा । पुण्यभूमि समाधि स्थिरा । कृष्ण–पक्षीं तुज निर्धारा । भेट देत जाईन
६३०९	।।ना.गा.०९७८.००६।।	कार्तिक मास शुद्ध एकादशी । पंढरीयात्रा होईल सरिशी । दुसरी कृष्णपक्षीं निर्धारिंसी । तुज दिधली असे
६३१०	।।ना.गा.०९७८.००७।।	हें ऐकोनि संत–जनीं । जयजयकार केला ध्वनी । दिंड्या पताका मेळ गगनीं । देव सुमनें वर्षताती
६३११	।।ना.गा.०९७८.००८।।	नामा म्हणे आले वैष्णव । अळंकापुरीं मिळाले सर्व । समाधि सुखी ज्ञानदेव । बैसते जाहले
६३१२	।।ना.गा.०९७९.००१।।	महा उत्सव त्रयोदशी । केला त्या ज्ञानदेवासी । मग नामा म्हणे विठोबासी । चरण धरूनियां
६३१३	।।ना.गा.०९७९.००२।।	समाधिसुख दिधलें देवा । ज्ञानांजन अळंकापुरी ठेवा । अजानवृक्षीं बीज वोल्हावा । या ज्ञानांजनासी
६३१४	।।ना.गा.०९७९.००३।।	कृपा आली विठ्ठलासी । म्हणे ज्ञानदेवा परियेसी । तीर्थ भागीरथी अहर्निशीं । तुज नित्य स्नानासि दिधलीसे
६३१५	।।ना.गा.०९७९.००४।।	इंद्रायणी दक्षिणवाहिनी । भागीरथी मणिकर्णिका दोन्ही । इया मिळालिया त्रिसंगमीं । पुण्यभूमि तुझिये
६३१६	।।ना.गा.०९७९.००५।।	येथें जरी नित्य स्नान घडे । तरी नित्य वैकुंठवास जोडे । तुज नाहीं नाहीं रे कुवाडे । मी वाडें–कोडें उभा असे
६३१७	।।ना.गा.०९७९.००६।।	येथें हरिकथा नाम वाचे । जो उच्चारिल विठ्ठलाचे । तयासी पेणें वैकुंठींचें । दिधलें साचें अक्षयीं
६३१८	।।ना.गा.०९७९.००७।।	आणिक ऐके रे ज्ञानराजा । जो या सिद्धेश्वरीं करील पूजा । तो अंतरंग सखा माझा । मुक्ति सहजा जालीं त्यासी
६३१९	।।ना.गा.०९७९.००८।।	नामा म्हणे ऐसें अंतरंग । कैसा वोळला पांडुरंग । ज्ञानदेवीं समाधि सांग । हरिपाठ कीर्तनें
६३२०	।।ना.गा.०९८०.००१।।	सनकादिकीं मंत्रघोष । केले विधिपूर्वक पांच दिवस । मग पांडुरंग यथावकाश । भक्ता वास महिवरी
६३२१	।।ना.गा.०९८०.००२।।	धन्यभूमि अळंकापुरी । ज्ञान समाधि खेचरी । पूर्ण परिपूर्ण श्रीहरी । स्वयें आपण उभा असे
६३२२	।।ना.गा.०९८०.००३।।	संत भागवत देव्हडे । अमर उभे चहुंकडे । नारद तुंबर पुढें । वीणा वाजविती
६३२३	।।ना.गा.०९८०.००४।।	एकीं केला जयजयकार। ज्ञानदेवीं धरूनियां कर । विठ्ठल चरणा समोर । निकट बैसते जाले
६३२४	।।ना.गा.०९८०.००५।।	करें कुरवाळिलें ज्ञाना । कांसवी अवलोकिला पान्हा । आंसुवें येताती नयना । तया ज्ञानदेवाचिया
६३२५	।।ना.गा.०९८०.००६।।	विठोजी म्हणे ज्ञानांजना । तुझेनि कवित्वें हरे दारुणा । उच्चारितां महाविघ्ना । सकळै पळतील
६३२६	।।ना.गा.०९८०.००७।।	तुज आठविल जो भक्त । तो होईल विरक्त। ऐसें विठोजी बोलत । येरू चरणीं रुळे
६३२७	।।ना.गा.०९८०.००८।।	नामा म्हणे सकळ तीर्थराज । तया कृपा कैसी केली सहज। एकादशीं दिधली पूजा । तया ज्ञानदेवासी
६३२८	।।ना.गा.०९८१.००१।।	स्नानविधि केलिया भक्तीं । नाममंत्राचिया आवृत्ति । मग प्रत्यक्ष पूजिली मूर्ति । विठोबाची
६३२९	।।ना.गा.०९८१.००२।।	धन्य धन्य तो देव ज्ञान । राजा निवृत्ति निधान । विठोजी आपण । भक्तां साह्ये
६३३०	।।ना.गा.०९८१.००३।।	मग सकळही भक्तमेळीं । सहित वनमाळी । बैसले तये पाळीं । इंद्रायणीचे
६३३१	।।ना.गा.०९८१.००४।।	एकीं केलें स्तुतिस्तोत्रें । एक जपताती नाममंत्रें । एक गाताती वेदस्तोत्रें । विठोबासी
६३३२	।।ना.गा.०९८१.००५।।	तंव पुढारा जाला नारा । तो नामयाचा पुत्र सैरा । तो पुसतसे विचारा । नामयासी
६३३३	।।ना.गा.०९८१.००६।।	ये संतसभेमाजीं । राऊळ बैसले असे सहजीं । यातें पुसि जो कां जी । कवण क्षेत्र म्हणोनी

६३३४	।।ना.गा.०९८१.००७।।	उठिला नामा प्रेमें डुले । वंदिलीं विठ्ठल पाउलें । मग करद्वयें जोडुनि बोले । साशंकित
६३३५	।।ना.गा.०९८१.००८।।	नामा म्हणे पूर्णब्रह्म । तें कैसें सभासदीं मन । तें बोलतसे परम । ज्ञानदेवा भाग्यें
६३३६	।।ना.गा.०९८२.००१।।	मग सकळ प्रेम पुतळे । बैसले माजीं ब्रह्ममेळे । तेथें नामा वचन बोले । स्वामीप्रति
६३३७	।।ना.गा.०९८२.००२।।	वोळलें चैतन्य सतरावें । पूर्ण ओघ नामा विठ्ठलदेवें । पव्हे घालुनी ज्ञानदेवें । जग तारिलें कीर्तनें
६३३८	।।ना.गा.०९८२.००३।।	नामा म्हणे स्वामी सर्वज्ञ । परि आमुचें मन निमग्न । चरणरजें पापभग्न । पवित्र जालों
६३३९	।।ना.गा.०९८२.००४।।	तरी स्वामिराजा विनंति । परियेसी गा माझी पुढती । हे अलंकापुरीं होती । कवणियें युगीं
६३४०	।।ना.गा.०९८२.००५।।	हें सांगिजे जी समर्था । कवण क्षेत्र कवण तीर्था । येथें क्षेत्रज्ञ हा सर्वथा । कवण धर्म असे
६३४१	।।ना.गा.०९८२.००६।।	तूं आत्माराम संपन्न । जुगा जुनाट नारायण । तुजप्रति हें वचन । न साहे माझें
६३४२	।।ना.गा.०९८२.००७।।	कासवीचा तुषार गाढा । तैसा तुझा पवाडा । हें पुसणें कवणियां चाडा । तें तूंचि जाणसी
६३४३	।।ना.गा.०९८२.००८।।	नामा उभा तिष्ठित प्रेमें । संत दाटले सप्रेमें । आपण तें तें अनुक्रमें । सांगतसे देव
६३४४	।।ना.गा.०९८३.००१।।	देवासी कळलें गौप्यगुज । म्हणे रे नामया हेंचि चोज । तो निजभाव सहज । प्रगट सांगूं आतां
६३४५	।।ना.गा.०९८३.००२।।	कृतयुगीं क्षेत्र आदि । ज्ञानदेवा तेथें समाधि । देव सांगतसे शुद्धी । योगबुद्धी जुनाट
६३४६	।।ना.गा.०९८३.००३।।	ऐकें भक्तजनश्रेष्ठा। भूमिनामें वैकुंठपीठा । तें हें आळंकापुरीं श्रेष्ठा । आदि वरिष्ठा पीठा आठरा
६३४७	।।ना.गा.०९८३.००४।।	आणिक ऐकरे वचन । हे पंचक्रोशी पुरातन । यासी युगें सांगतां संपन्न । चतुरानन जाणतसे
६३४८	।।ना.गा.०९८३.००५।।	कांहीं एक किंचित सांगों । युगसंख्या मार्गांत रिघों । तरी वैवस्वत हाचि मागो । पूर्ण वोळंगो यापासोनी
६३४९	।।ना.गा.०९८३.००६।।	मनु सहस्र युगें संख्या । तैं अळंकापुरीं आदि लक्षा । कोटी याग असंख्या । सहस्र दक्ष येथें जाले
६३५०	।।ना.गा.०९८३.००७।।	आदि क्षेत्र संख्यारहित । ऋषिमुनी तपती सप्त। आणि नारदमुनि असे जाणत । हेचि पुरी पुरातन
६३५१	।।ना.गा.०९८३.००८।।	नामा म्हणे कैसें दिधलें । हें ज्ञानासीं सिद्ध लाधलें । हेंचि आम्हासी जोडलें । पूर्ण लाधलें पीयूष
६३५२	।।ना.गा.०९८४.००१।।	देव म्हणे नामया । ऐकें येथें चित्त देउनियां । एक एक तीर्थ सांगावया । हें तों पुराणीं असे
६३५३	।।ना.गा.०९८४.००२।।	नकळे देवाची थोरी । कैसें पुढारिले मुरारी । गौप्यगुज श्रीहरी । सांगतसे नामया
६३५४	।।ना.गा.०९८४.००३।।	पुराण म्हणसी कोण कथा । तरी ऐकें गा तूं सकळार्था । शैवशास्त्र हा ग्रंथ सर्वथा । सिद्धमार्ग असे
६३५५	।।ना.गा.०९८४.००४।।	जें जें जुनाट क्षेत्रतीर्थ । जें जें ब्रह्मनामें परमार्थ । तो तो सांगितला हेत । चतुराननें
६३५६	।।ना.गा.०९८४.००५।।	ऐसें देवमुखीचें वचन । ऐकतां संतोषले पूर्ण । मग देताती आलिंगन । येकमेकांसी
६३५७	।।ना.गा.०९८४.००६।।	जयजयकाराचा ध्वनी । विठ्ठलनामें गर्जे वाणी । प्रेम ओसंडत नयनीं । स्फुंदन रोमांचित दाटले
६३५८	।।ना.गा.०९८४.००७।।	स्फुंदत नामा नाचे गाये । परिसा म्हणे वोळली माये । तो ज्ञानासी पान्हा होये । पूर्ण बोधाचा
६३५९	।।ना.गा.०९८४.००८।।	नामा म्हणे सकळ संतमेळीं । कथा सांगितली रसाळीं । तंव ज्ञानदेवा करतलामळीं । समाधि शेज घातली

६३६०	।।ना.गा.०९८५.००१।।	मग म्हणे सर्वज्ञ विठ्ठल । न लावावा वाढवेळ । मग पातले निर्मळ । सिद्धेश्वरलिंगीं
६३६१	।।ना.गा.०९८५.००२।।	धन्य धन्य हरिदिवस । धन्य धन्य हा निवास । आपण हृषिकेश । भक्तां साह्य
६३६२	।।ना.गा.०९८५.००३।।	वैष्णव मिळाले संपन्न । गाती हरिनाम कीर्तन। तंव पातले सोपान । प्रेमें वोसंडत
६३६३	।।ना.गा.०९८५.००४।।	चरणीं घातली मिठी । विठोजी म्हणे उठी उठी । लवलाहें उघडी दृष्टी । भेटे ज्ञानदेवा
६३६४	।।ना.गा.०९८५.००५।।	येरू म्हणे मी कृतकृत्य । नामस्मरण तुझें नित्य । तेणें सकळ हित । आमुचें जालें
६३६५	।।ना.गा.०९८५.००६।।	तूंचि गा जनकजननीं । तूंचि एक त्रिभुवनीं । पाहतां नित्य उन्मनीं । लागे आम्हां
६३६६	।।ना.गा.०९८५.००७।।	समाधि शेज ज्ञानेंसी । घातली अहर्निशीं । ते कर्णीं परिसत जिवेंसी । तुवां चरण धरित आलों
६३६७	।।ना.गा.०९८५.००८।।	नामा म्हणे ज्ञान सोपान । एक जाले जनीं जनार्दन । समाधिसंगें संजीवन । अळंकापुरीं आले
६३६८	।।ना.गा.०९८६.००१।।	तंव निवृत्तीसी उन्मनीं । बैसका होती सप्तदिनीं । ते पालटोनि तत्क्षणीं । मूर्तीतें न्याहाळी
६३६९	।।ना.गा.०९८६.००२।।	निवृत्तिनिधान । सोपान निजधन । ज्ञानदेव आपण । तिन्ही मूर्ती
६३७०	।।ना.गा.०९८६.००३।।	कोण भाग्याचे संतुष्ट । जेथें प्रगटलें वैकुंठ। विठ्ठलनामें पूर्ण पाठ । आळंकापुरीसी
६३७१	।।ना.गा.०९८६.००४।।	आदि क्षेत्र जुनाट । युगें सांगतां उद्‌भट । जें कां पुण्यरूप प्रगट । सांगतसे महिमा
६३७२	।।ना.गा.०९८६.००५।।	ऐसा उत्साह गमला । निवृत्ति ध्यानीं निवाला । सोपान आळंगिला । ज्ञानराजें
६३७३	।।ना.गा.०९८६.००६।।	निवृत्ति पाहे ज्ञानाकडे । येरू धांवे लवडसवडें । तंव चरणरजामाजीं बुडे । मन निमग्न केलें
६३७४	।।ना.गा.०९८६.००७।।	तिन्ही देव एकत्र । सत्वरजतमादि मंत्र । हे गाताती नर जे स्तोत्र । ते उद्धरती सर्वथा
६३७५	।।ना.गा.०९८६.००८।।	नामा म्हणे तिन्ही देव । मिळाले गुण सागर वैभव । समाधि सेज माधव । देतु असे ज्ञानदेवा
६३७६	।।ना.गा.०९८७.००१।।	हस्तक ठेविला माथया । ज्ञानदेव लागे पायां । विठोजी म्हणे लवलाह्या । समाधीस बैसावें
६३७७	।।ना.गा.०९८७.००२।।	इंद्र चंद्र देव येती । ब्रह्मादिक गीतीं गाती । यम वरुण बृहस्पति । विमानें दाटती अंतरिक्षीं
६३७८	।।ना.गा.०९८७.००३।।	तंव पातले गरुडदेव । रुक्मिणी सत्यभामा भाव । राही माता गोपी सर्व । समाधि ज्ञानदेव पहावया
६३७९	।।ना.गा.०९८७.००४।।	ब्रह्माइंद्रप्रजापति । सर्व अंतरिक्षीं पाहती । अळंकापुरीं ये श्रीपती । हरुष चित्तीं ज्ञानदेवा
६३८०	।।ना.गा.०९८७.००५।।	ऋषिमुनी गणगंधर्व । पिशाच–गुह्यक सर्व । धृव–अंबऋषि माधव । चित्तीं भाव पहावया
६३८१	।।ना.गा.०९८७.००६।।	ऐसी दाटलीं विमानें । संतीं जाणितलें ज्ञानें । ज्ञानदेव ब्रह्म होणें । हें विंदान विठ्ठलाचें
६३८२	।।ना.गा.०९८७.००७।।	जयजय शब्दें ध्वनि गर्जे । तेणें स्वर्गमृत्युपाताळ गाजे । पाताळीं शेष म्हणे भुंजे । प्रेमें फुंजे न समाये
६३८३	।।ना.गा.०९८७.००८।।	नामा म्हणे शिवादिक । सिद्धेश्वरीं मिळाले सकळिक । पाहाती विठ्ठलकौतुक । ज्ञानदेव समाधीचें
६३८४	।।ना.गा.०९८८.००१।।	वेदध्वनि केलिया मुनी । गंधर्वगायनें होती गगनीं । ब्रह्मादिक इंद्र विमानीं । इंद्रायणी ज्ञानदेवी
६३८५	।।ना.गा.०९८८.००२।।	लागलिया मंगळतुरे ध्वनि । तीर्थें उभी असती कर जोडुनी । विठ्ठलदेव ज्ञान संजीवनी । नयनीं न्याहाळिती

६३८६	।।ना.गा.०९८८.००३।।	राही रखुमाई माता । सत्यभामा गोपी समस्तां । आरतिया ओवाळिती निभ्रांता । ब्रह्म त्वरिता ज्ञानदेवा
६३८७	।।ना.गा.०९८८.००४।।	देवऋषिगण सकळ । जयजयकार ध्वनि मंजुळ । स्तुतिस्तोत्रें सकळ । नक्षत्रादिक गाती
६३८८	।।ना.गा.०९८८.००५।।	वरूषति दिव्यसुमनें । निवृत्तिसोपान नारायणें । संबोखिलें संजीवनें । नित्य पारणें हरिपाठें
६३८९	।।ना.गा.०९८८.००६।।	परिसा भागवत डुलत। विठ्ठलीं जाला कृतकृत्य । नामा असे शोकाकुलित । चरणीं रत विठ्ठलाचे
६३९०	।।ना.गा.०९८८.००७।।	शेज घालुनी सुमनीं । विठ्ठल पाहे रुक्मिणी । ज्ञानदेवाचे गुण मनीं । आठवती म्हणे हरी
६३९१	।।ना.गा.०९८८.००८।।	नामा जाला भयभीत चित्तें । ज्ञानासारखें रत्न मागुते। न देखों ऐसें विठ्ठलातें । पुसे त्वरित रुक्मिणी
६३९२	।।ना.गा.०९८९.००१।।	देवो म्हणती रुक्मिणी । हा येचि युगीं देखिला नयनीं । हेंचि ज्ञानसंजीवनी । जाण त्रैलोक्यासीं
६३९३	।।ना.गा.०९८९.००२।।	धन्य धन्य धरातळीं । जो यातें दृष्टीं न्याहाळी । तो वात येईल टाळी । वैकुंठ भुवनासी
६३९४	।।ना.गा.०९८९.००३।।	जो करील याची यात्रा । तो तारील सकळ गोत्रां । सकळही कुळ पवित्रा । याचेंनि दरुषणें होती
६३९५	।।ना.गा.०९८९.००४।।	आळंकापुरी हें शिवपीठ । पूर्वी येथें होते नीळकंठ । ब्रह्मादिकीं तप वरिष्ठ । येथेंचि पैं केलें
६३९६	।।ना.गा.०९८९.००५।।	इंद्र येऊनियां भूमीसी । याग संपादिलें अहर्निशीं । इंद्रायणीं इंदोरिसी । या पासोनि पंचक्रोशी
६३९७	।।ना.गा.०९८९.००६।।	येथें त्रिवेणी गुप्त वसे । भैरवापासूनि भागीरथी बसे । पूर्ववटि माया दिसे । ते प्रत्यक्ष जाण पार्वती
६३९८	।।ना.गा.०९८९.००७।।	भोवतें वनवल्लिवृक्ष । येथें देव येउनी होताती पक्ष । हे असे नित्य साक्ष । अस्थी नासती उदकीं
६३९९	।।ना.गा.०९८९.००८।।	पंढरीहुनी हें सोपें । जनाचीं हरावया पापें । कळिकाळ कोपलिया कोपें । त्याचें न चले अळंकापुरीसी
६४००	।।ना.गा.०९८९.००९।।	ऐसें सांगतां हरिसी । प्रेमें ओसंडलें रुक्मिणीसी। म्हणे धन्य धन्य जयाचे कुसीं । ज्ञानदेव जन्मले
६४०१	।।ना.गा.०९८९.०१०।।	नामा म्हणे माझा स्वामी । सर्वे संतसमागमीं । ऐसें सांगितलें ग्रामीं । अळंकापुरीसी
६४०२	।।ना.गा.०९९०.००१।।	तंव पुसती होय माता । तुम्हीं झणें खेद करा चित्ता । तरी ज्ञानासारिखा कां आतां । समाधीसी बैसवितां
६४०३	।।ना.गा.०९९०.००२।।	हें सांगावें सविस्तर । याचे कोण कोण अवतार । बंधु त्रिवर्ग हे साचार । आणि ते भगिनी
६४०४	।।ना.गा.०९९०.००३।।	देव म्हणती ब्रह्मा होय । सोपान देव नेणसी काय । निवृत्ति शिव ज्योतिर्मय । ज्ञानदेव ब्रह्म निघोंट
६४०५	।।ना.गा.०९९०.००४।।	ऐसे ब्रह्मा विष्णु हर । मुक्ताई ते मूळमाता साचार । तारावया चराचर । कलिमाजीं अवतरले
६४०६	।।ना.गा.०९९०.००५।।	रुक्मिणी पुसे देवासी। कां कलिमाजीं जन दोषी । हे घातली देवा पुसी । ते सांगती महाविष्णु
६४०७	।।ना.गा.०९९०.००६।।	तरी ऐके हो साचार चित्तें । तूं काय नेणसी त्या व्यासातें । ग्रंथीं सांगितलें भारतें । कलिमाजीं जन दोषी
६४०८	।।ना.गा.०९९०.००७।।	कृष्ण अवतार जाला । पांडवी निजठाव ठाकिला । तेथून एक शकु जाला । जनमेजयापासूनि
६४०९	।।ना.गा.०९९०.००८।।	तया मागें विक्रमशक । पुण्यपवित्र सकळ लोक । कलियुगीं पुण्यश्लोक । उज्जनिये नांदती
६४१०	।।ना.गा.०९९०.००९।।	तेणें एक शत पंचतीस । हरिलें कळिकाळदोष । पुढें शालिवाहन व्हावयास । अवतार जाण पैठणीं
६४११	।।ना.गा.०९९०.०१०।।	तो हा शालिवाहन । अठरा हजार जाण । तें क्षेत्र प्रतिष्ठान । गंगातीरीं प्रत्यक्ष

६४१२	।।ना.गा.०९९०.०११।।	या शकामाजीं प्रथम । राजा भोज उत्तम । मग पुण्यपुरुष जन्म । थोडे घेती कलियुगीं
६४१३	।।ना.गा.०९९०.०१२।।	राजे भ्रष्ट यवन जाले । ठायीं ठायीं दोष घडले । मग इहीं अवतार घेतले । कलिदोष हरावया
६४१४	।।ना.गा.०९९०.०१३।।	रुक्मिणी म्हणे स्वामी । सत्य सांगितलें तुम्ही । पुराणप्रसिद्ध आम्ही । अवतार चरित्र जाणतसें
६४१५	।।ना.गा.०९९०.०१४।।	नामा म्हणे पुढें हे जन । यवनसंसर्गें कठिण । होतां गातां हरीचे गुण । ते उद्धरती सर्वथा
६४१६	।।ना.गा.०९९१.००१।।	पुष्पक विमानातळीं । हरि उतरले भूतळीं । तंव उदयो पूर्वमेळीं । सूर्याचा जाला
६४१७	।।ना.गा.०९९१.००२।।	धन्य धन्य प्रश्नोत्तर । धन्य धन्य ते तरूवर । धन्य ज्ञानदेव अवतार । तिन्ही देव प्रगटले
६४१८	।।ना.गा.०९९१.००३।।	संत सनकादिक देव । आणि भक्त आले सर्व । स्नानें करूनियां भाव । हरिचरणीं ठेविला
६४१९	।।ना.गा.०९९१.००४।।	विलाप मांडियेला भक्तीं । खंति करिती त्रिजगतीं । ज्ञानदेवासारिखी मूर्ति । न देखो म्हणती देवराया
६४२०	।।ना.गा.०९९१.००५।।	देव म्हणती निवृत्ति । तूं प्रत्यक्ष शिवमूर्ति । तारावया क्षितीं । अवतार धरियेला
६४२१	।।ना.गा.०९९१.००६।।	सोपानें घातलें लोटांगण । मुक्तया धरिले चरण । संत करिताती स्तवन । पांडुरंगरायाचें
६४२२	।।ना.गा.०९९१.००७।।	मग संबोखोनियां हरी । सोपानदेवा धरिला करीं । निवृत्ति मस्तकावरी । करकमळ हरि ठेवितसे
६४२३	।।ना.गा.०९९१.००८।।	नारा विठा पुढें चाले । ऐसे इंद्रायणीस आले । सौंदडीवृक्षातळी बैसले । सपरिवारें सकळैं भक्त
६४२४	।।ना.गा.०९९१.००९।।	न्याहाळिती कांसवदृष्टी । ऐसा हरि चालत सृष्टी ।नामा होतसे हिंपुटी । ज्ञानदेवाकारणें
६४२५	।।ना.गा.०९९२.००१।।	तंव अंतरिक्ष गगनीं । अवचिती जाली वाणी । भक्त तरतील मेदिनी । ज्ञानदेव दरुषणें
६४२६	।।ना.गा.०९९२.००२।।	ऐसी खवाणी वदली । जयजयकारें टाळी पिटली । तंव स्नानसंध्या सारिली । देवभक्तीं सकळिकीं
६४२७	।।ना.गा.०९९२.००३।।	धन्य धन्य वृक्ष अजान । धन्य धन्य सिद्धेश्वरस्थान । ज्ञानदेवा समाधान । धन्य आळंकापुरी
६४२८	।।ना.गा.०९९२.००४।।	मग पाहोनियां शुभदिन । देवें करूं आदरिलें प्रयाण । नामा होतसे खेदक्षीण । ज्ञानदेवाकारणें
६४२९	।।ना.गा.०९९३.००१।।	स्वर्ग मृत्यु पाताळ तिन्हीं ताळे उदर । विराटले थोर विश्वरूप
६४३०	।।ना.गा.०९९३.००२।।	समाधिसंजीवन निवृत्ती फावले । तें निधान देखिलें आम्ही तुम्ही
६४३१	।।ना.गा.०९९३.००३।।	निवृत्ति सोपान ज्ञानदेव निधी । मुक्ताई सिद्धि आळंकापुरीं
६४३२	।।ना.गा.०९९३.००४।।	पंढरी प्रत्यक्ष केली ज्ञानदेवें। उभारूनि बाहे सांगे आम्हां
६४३३	।।ना.गा.०९९३.००५।।	कळिकाळासीं त्रास विठ्ठल उच्चारीं । हरी चराचरीं भरला असे
६४३४	।।ना.गा.०९९३.००६।।	सर्वत्र सबाह्य अंतरंग रूपडें । तें रूप फाडोवाडें पारखिलें
६४३५	।।ना.गा.०९९३.००७।।	चिंतामणीचें सार कल्पतरू उघड । दावुनियां मूढ तारियेले
६४३६	।।ना.गा.०९९३.००८।।	सुवर्णाचा पिंपळ तिहीं केला ठाऊका । त्या समीप देखा कल्पतरू
६४३७	।।ना.गा.०९९३.००९।।	सिद्धेश्वरलिंग सिद्धिबुद्धि दाता । जड जीवा मुक्तता देतु हरी

६४३८	।।ना.गा.०९९३.०१०।।	ऐसिये स्थानकीं ज्ञानदेव राहिले । राहुनी तारिले मूढजन
६४३९	।।ना.गा.०९९३.०११।।	नामा म्हणे ज्ञानदेव हा दातार । जडजीवां उद्धार विठ्ठल हरी
६४४०	।।ना.गा.०९९४.००१।।	तंव तेथें नवल वर्तलें । आकाश असे विमानीं दाटलें । म्हणती मूळपीठ वैकुंठ देखिलें । पुंडलिकासगट
६४४१	।।ना.गा.०९९४.००२।।	पंढरीहुनि आलें कैसें । पुंडलिक देव सरिसे । ज्ञानदेवासवें नामा असे । आणि विष्णुभक्त अपार
६४४२	।।ना.गा.०९९४.००३।।	राही रुखमाई सत्यभामा। गाई गोपाळ मेघ:श्यामा । म्हणती पाहाहो महिमा । या विष्णुभक्तांचा
६४४३	।।ना.गा.०९९४.००४।।	सर्वे धृव प्रल्हाद अंबऋषी । रूक्मांगद सूर्यवंशी। आणि ऋषीमुनी तापसी । ऐसिया समवेत वनमाळी
६४४४	।।ना.गा.०९९४.००५।।	बळी भीष्म नारद । उद्धव अक्रुर विद्‌गद । आणि बिभीषण सुबुद्ध। हनुमंतादि करूनि
६४४५	।।ना.गा.०९९४.००६।।	हा हा हु हु गंधर्व गाती । रुणुझुणु रुणुझुणु विणे वाजती । देवांगना आरतिया ओवाळिती । देवभक्तांसहित
६४४६	।।ना.गा.०९९४.००७।।	ऐसा शुभ काळ समयो । जाला भाग्याचा उदयो । ज्ञानदेव नामदेव पाहाहो । धन्य धन्य धरातळीं
६४४७	।।ना.गा.०९९४.००८।।	नामा नुघडी दृष्टीसी। हृदयीं ध्यातुसे हृषिकेशी । ज्ञानदेवो निजमानसीं । विष्णुमूर्तीसी लीन जाला
६४४८	।।ना.गा.०९९५.००१।।	भक्त अमर स्वस्तिक्षेम । चरणरजें डौरलें व्योम । मग कैलासीं मंदाकिनी सोम । नीळकंठें सिरीं धरियेली
६४४९	।।ना.गा.०९९५.००२।।	धन्य विष्णुचरणींची गंगा । स्नपन होत महालिंगा । भीमरथी मृत्युलोकीं सवेगा । इंद्रायणीसमरसें
६४५०	।।ना.गा.०९९५.००३।।	भोगावती पाताळा गेली । मग विष्णुचरणीं गुप्त ठेली । मग पुरोनियां उरली । त्र्यंबक सिखरीं
६४५१	।।ना.गा.०९९५.००४।।	मग कितेका काळें भागीरथी । भगीरथें आणिली भारती । सगर उद्धरिले त्वरितीं । विष्णुतीर्थे करूनियां
६४५२	।।ना.गा.०९९५.००५।।	ऐसी त्रिभुवनीं ज्याची थोरी । तो मुकुटमणी हा हो श्रीहरी । त्यांतें सोडिलिया मुक्ति चारी । काय आम्हां तारिती
६४५३	।।ना.गा.०९९५.००६।।	सर्वे तीर्थे ज्याचे रंक । आम्ही तयाचे सेवक । ज्याचेनि नामें हें त्रैलोक्य । नाम घेतां तरत
६४५४	।।ना.गा.०९९५.००७।।	तो पूर्ण बीजमंत्र आम्ही जाणों । विष्णुविण कांहीं नेणों । पूर्ण ब्रह्म काय म्हणों । हा महिमा तूं जाणसी
६४५५	।।ना.गा.०९९५.००८।।	ज्ञानदेवें नमस्कारिले हरी । निवृत्ति सोपान झडकरी । मुक्ताऊ भेटली लवकरी । ज्ञानदेवा करीं धरियलें
६४५६	।।ना.गा.०९९६.००१।।	मग संतोष जाला हरिभक्तां । ज्ञानदेव झाला बोलता । निवृत्तीसी म्हणे तुम्ही जावें आतां । त्र्यंबका सीखरीं
६४५७	।।ना.गा.०९९६.००२।।	करूनि नमस्कार हरिसी । वेगीं यावें वैकुंठासी । नित्य हरिचरणापासीं । तुम्हीं आम्हीं सोपान
६४५८	।।ना.गा.०९९६.००३।।	मुक्ताई म्हणे ज्ञानदेवा । मज विठोबासी निरवा । मजवरी लोभ असों द्यावा । रुक्मिणीमाता आदिकरूनि
६४५९	।।ना.गा.०९९६.००४।।	पुंडलिकासी निरवावें । समस्तांसी क्षेम सांगावें । कृपादृष्टीं अवलोकावें । मजलागीं ज्ञानदेवा
६४६०	।।ना.गा.०९९६.००५।।	ज्ञानें करुनि विज्ञान । भक्तीसी करावें निरूपण । द्यावें समाधिसंजीवन । तुम्ही यावें शीघ्रवत
६४६१	।।ना.गा.०९९६.००६।।	निवृत्तीनें दिधलें उत्तर । आम्ही जाऊं वेगवत्तर । सोपानासी मार्गीं निरंतर। समाधीसी बैसवूनि
६४६२	।।ना.गा.०९९६.००७।।	तंव बोलिंला यादवराणा । तुम्ही सांगितल्या समाधीच्या खुणा । परी नामयावरी जाणा । माझी कासवदृष्टी
६४६३	।।ना.गा.०९९६.००८।।	नामा म्हणे विठोबासी । तूं स्वामि दीनाचा होसी । गेलें निधान ज्ञानदेव दाखविशी । मज नयनीं प्रत्यक्ष

६४६४	।।ना.गा.०९९७.००१।।	ऐसें बोलोनियां हरी । रुक्मिणीसीं विचार करी । यासी भोजनें परोपरी । अन्नें निफजवावीं
६४६५	।।ना.गा.०९९७.००२।।	संतोष जाला हरिभक्तां । जेथें स्वयें हरी भोक्ता । कर्ता आणि करविता । सर्व चाळक विठ्ठल
६४६६	।।ना.गा.०९९७.००३।।	तंव दिव्यग्राम उभवुनि । भक्तीं देखिले नयनीं । विश्वकर्मा येऊनी । उत्तरापंथें निर्मिले
६४६७	।।ना.गा.०९९७.००४।।	तंव अष्टमहासिद्धी । सर्व सामोग्रीची समृद्धि । कर जोडोनी कृपानिधी । विनविती आनंदें
६४६८	।।ना.गा.०९९७.००५।।	दिव्यवनें दिव्यवल्ली । दिव्यसुमनें समग्र जालीं । वैकुंठीहुनि आलीं । महाविष्णुकारणें
६४६९	।।ना.गा.०९९७.००६।।	तेथें सुगंध परिमळ । जवादि कस्तुरी निर्मळ । चिंतामणी देती ढाळ । नानाकीळ दीप्तीचे
६४७०	।।ना.गा.०९९७.००७।।	चंदनाचे खांब उभारिले । पवळ वेलीचे शोभले । मुक्ताफळाचे घोस मिरवले । रत्नखचित दामोदरें
६४७१	।।ना.गा.०९९७.००८।।	चंपक सुमनाचियां हारी । सेवंती वाटोगर नानापरी । नानापुष्पें परिमळ आगरीं । दिव्यवनें कीं शोभती
६४७२	।।ना.गा.०९९७.००९।।	आंबे खजुरिया पोफळी । फणसें नारिंगें नारिकेळीं । कर्दळी वाढिन्नलीया सरळी । उदक पाट वाहताती
६४७३	।।ना.गा.०९९७.०१०।।	तेथें भ्रमर रुणुझुणु करित । कोकिळा सुस्वरे बोलत । पारवे आनंदें घुमघुमित । सुखें संवादती निजगजरें
६४७४	।।ना.गा.०९९७.०११।।	तालालोरी गीतीं गाती । गोपाळ वीणे वाजविती । नाना परी बागडे धरिती । देव पाहती विमानीं
६४७५	।।ना.गा.०९९७.०१२।।	थकलीं योगियांचीं ध्याने । निश्चळ राहिली आसनें । निवृत्ती सोपानें । तेथें देवडे उभे असती
६४७६	।।ना.गा.०९९७.०१३।।	नामा जातो लोटांगणीं । वैकुंठ उतरले मेदिनीं । अळंकापुर पाटणीं । उत्तरापंथें देखिलें
६४७७	।।ना.गा.०९९७.०१४।।	जेथें त्रिभुवनिचें निधान । स्वयं आपण भगवान । तेथें सकळ काम होती पूर्ण । जाणती खुण अंतरंग भक्त
६४७८	।।ना.गा.०९९७.०१५।।	नामा म्हणे ऐसीं विंदानें । भक्तीलागीं जगजीवनें । प्रत्यक्ष वैकुंठ भुवनें । दासा सुखसंपन्न करावया
६४७९	।।ना.गा.०९९८.००१।।	ऐसें देखिलें वैष्णवीं । वैकुंठ नगरी चिरंजीवी । आणि ज्ञानदेव गोसावी । विष्णुमूर्ती चतुर्भुज
६४८०	।।ना.गा.०९९८.००२।।	तालालोरी वाजविती पावा । समाधान होतसे जीवां । नामा विनवितो केशवा । तुझ्या दरुशनें निवालों
६४८१	।।ना.गा.०९९८.००३।।	तंव रुक्मिणीनें विनविलें । यासि भोजन सारा कां वहिलें । तंव अक्रूरें पाचारिलें । समस्तांसीं देखा
६४८२	।।ना.गा.०९९८.००४।।	उद्धव घालित आसनें । ताटें विस्तारिलीं बोनें । राही रुक्मिणी विचक्षणें । पंचामृतें वाढिती
६४८३	।।ना.गा.०९९८.००५।।	समस्त भक्त दाटले । पांतीकर एकवटले । नानापरी भात विस्तारिले । परिमळित घमघमां
६४८४	।।ना.गा.०९९८.००६।।	वरी मिरवे मुगांचें वरण । कथिका वाढिली संपूर्ण । नाना कोरिकें विस्तीर्ण । रुक्मिणी वाढितसे
६४८५	।।ना.गा.०९९८.००७।।	कामधेनूचें घृत । पयोदधिक्षीर वाढित । नानापत्र शाखा शोभत । वैष्णवां ताटीं
६४८६	।।ना.गा.०९९८.००८।।	ऐसें समस्तांसीं संपूर्ण । ताटें जालीं विस्तीर्ण । तंव देव बोलती आपण । ज्ञानदेवासी
६४८७	।।ना.गा.०९९८.००९।।	निवृत्ती सोपान बोलवा । मुक्ताईस वेगीं आणवा । पांथिकरासी रिघावा । ताटीं बैसवा समस्तांसी
६४८८	।।ना.गा.०९९८.०१०।।	विष्णुमूर्ती चतुर्भुज । पूजी ब्राह्मण द्विभुज । तुळसी मंजिरी केसिराज । त्यांचे मस्तकीं वाहतसे
६४८९	।।ना.गा.०९९८.०११।।	चरणतीर्थ घेतलें । तेणें समस्त मंदिर शिंपिलें । आपण मुखीं घातलें म्हणे । कृतकृत्य जालों मी

६४९०	।।ना.गा.०९९८.०१२।।	नामा तिष्ठत उभा द्वारीं । त्यासीही रुक्मिणी ताट करी । ऐसीं भोजनें परोपरी । जालीं वैष्णवांची
६४९१	।।ना.गा.०९९९.००१।।	ऐसे भक्त जेवुनी धाले । समस्त पांतिकरु उठिले । गोपाळें विडे दिधले । आपुलेनि करकमळें
६४९२	।।ना.गा.०९९९.००२।।	धन्य धन्य तें भोजन । धन्य धन्य तें निधान । धन्य धन्य तो वृक्ष अजान । धन्य नारायण अळंकापुरी
६४९३	।।ना.गा.०९९९.००३।।	विठ्ठलें दिधलें वचन । यांसी घाला रे आसन । तंव उद्धवें आपण । समस्तां बैसकार दिधले
६४९४	।।ना.गा.०९९९.००४।।	पूजिलें गंधाक्षता लावुनि । टिळे उटी कर्पुर चंदनीं । ऐसे तिये वैकुंठभुवनीं । वैष्णवांसी पूजी हरी
६४९५	।।ना.गा.०९९९.००५।।	तंव म्हणे रुक्मिणी । नामा आणा बुझावुनि । आपलेनि हातें चक्रपाणि । त्यासी घांस घालावे
६४९६	।।ना.गा.०९९९.००६।।	ऐसें सांगतां हरीसी । बुझाविती नामयासी । तो स्फुंदत उकसा बुकसीं । मग चहूंकरीं उचलिला
६४९७	।।ना.गा.०९९९.००७।।	सवें संतांचा मेळा । तयामाजीं परब्रह्म पुतळा । नामा बुझावोनि तत्काळा । देहावरी आणिला
६४९८	।।ना.गा.०९९९.००८।।	तंव विस्तारुनी आणिलें ताट । माजी षड्रस अन्नें बरवंट । रुक्मिणी आणि जेथें वैकुंठ । भक्तांसहित उभे असती
६४९९	।।ना.गा.०९९९.००९।।	नामयातें संबोखोनि हरि । बैसविला मांडियेवरी । कवळ घ्यावया मुख पसरी । निजकरें हरी घालितसे
६५००	।।ना.गा.०९९९.०१०।।	नामा आनंदें डुलत । तृप्त जाला प्रेमें ओसंडत । सकळ संतां कवळ देत । आपुलेनि निजकरें
६५०१	।।ना.गा.१०००.००१।।	ऐसा येकवळा भक्तांचा । भोक्ता हरी वैकुंठींचा । उतरोनी अळंकापुरीं साचा । करी भक्तांचा उत्छाव
६५०२	।।ना.गा.१०००.००२।।	ऐसे जेवुनि धाले । हरिकरेंचि निवाले । मग सुखें रहिवासले । सकळै भक्त वैकुंठीं
६५०३	।।ना.गा.१०००.००३।।	देव म्हणती निवृत्तीसी । तुम्ही जावें त्र्यंबक सिखरासी । मग समाधी सरिसी । गंगोदकें करूनि घ्यावी
६५०४	।।ना.गा.१०००.००४।।	तंव सोपान म्हणे स्वामी । पूर्वीं बोलिले होतेति तुम्ही । कऱ्हे पठार संवत्सरे ग्रामीं । समाधी देऊं म्हणोनि
६५०५	।।ना.गा.१०००.००५।।	देव म्हणती संतासि पुसा । हा ज्ञानदेव असे सरिसा । हाहि दिव्यदेही आम्हांसरिसा । येईल तेथवरी
६५०६	।।ना.गा.१०००.००६।।	मुक्ताई म्हणे देवाधिदेवा । आम्ही करावी चरणसेवा । तुझेनि विचारें जी केशवा । समाधीधन भक्तांसी
६५०७	।।ना.गा.१०००.००७।।	ऐसा करिती विचार । तंव पातला राजा इंद्र । भक्तीं केलें जयजयकार । देवें दुंदुभी वाजविल्या
६५०८	।।ना.गा.१०००.००८।।	संत सनकादिकीं स्तोत्रें । मुखीं आरंभिली पवित्रें । गाती हरीनाम चरित्रें । ऋषिगण सकळीक
६५०९	।।ना.गा.१०००.००९।।	धन्य आळंकापुरी ग्राम । जेथें प्रत्यक्ष पुरुषोत्तम । उतरोनि वैकुंठधाम । सोहळा करी भक्तांचा
६५१०	।।ना.गा.१०००.०१०।।	नामा नाचे हरिचे द्वारीं । ब्रह्मांड गरजे जयजयकारीं । निवृत्ति सोपान म्हणती हरी । आम्हां निरंतरीं सांभाळीं
६५११	।।ना.गा.१००१.००१।।	नानागंधें तुलसीमाळा । वैष्णवीं घातलिया गळां । नमस्कार करिती गोपाळा । चरणरजा वंदिती
६५१२	।।ना.गा.१००१.००२।।	दोहीं बाहीं देव्हडे । संत सनकादिक गाढे । जयजयकार पुढें । महाशब्दें गर्जिन्नले
६५१३	।।ना.गा.१००१.००३।।	ऐसे इंद्रायणीं तटीं। हरि रुक्मिणी जगजेठी । संत सनकादिकांची गोमटी । मांदी मिळाली असे
६५१४	।।ना.गा.१००१.००४।।	तंव पुंडरिकें नमस्कार केला । म्हणे तूं कां गा येथें विठो उगवला । बहुत दिवस येथेंचि राहिला । या ज्ञानदेवाकारणें
६५१५	।।ना.गा.१००१.००५।।	तरी पंढरीहुनि हे श्रेष्ठ। तूं येथें उभा अससी प्रगट । भूमी उतरले वैकुंठ । ज्ञानदेवाकारणें

६५१६	।।ना.गा.१००१.००६।।	बहुत दिवस येथेंचि जाले । मी न देखें विटेवरी जंव पाउलें । तंव नयन माझे भुकेले । न राहाती देवराया
६५१७	।।ना.गा.१००१.००७।।	देव म्हणती पुंडरिका । तूं भक्त माझा निजसखा । आणि हा ज्ञानदेव देखा । दुजा न देखों आणिक
६५१८	।।ना.गा.१००१.००८।।	हे संत सनकादिक माझे । यांचेनि समागमें माझें बीजें । नामा डौरिन्नला यांचे चरणरजें । मग जावों रे पंढरीसी
६५१९	।।ना.गा.१००२.००१।।	सर्वे तीर्थे मिळालीं अनंतें । तीं सुखी करूनी कृतार्थे । संवत्सरा जावोनी सोपानातें । समाधीसी बैसवूं
६५२०	।।ना.गा.१००२.००२।।	अनंत सुखाचिया रासी । उदैल्या भक्तांचिया मानसीं । आनंद जाला पुंडरिकासी । मग न बोले कांहीं
६५२१	।।ना.गा.१००२.००३।।	सोपान म्हणे वैकुंठा । बिजें किजो महाश्रेष्ठा । संवत्सर ग्राम कऱ्हे तटां । वैकुंठासहित चालावें
६५२२	।।ना.गा.१००२.००४।।	इंद्रचंद्रब्रह्माहर देव । आणि गण मिळाले सर्व । तेहतीस कोटी देव । विमानी आरूढले देखा
६५२३	।।ना.गा.१००२.००५।।	निवृत्ति सोपान ज्ञानदेवो । त्रिमूर्ति तिन्ही देवो । धर्मरक्षणार्थ पाहा हो । मनुष्यरूपें अवतरले
६५२४	।।ना.गा.१००२.००६।।	तिघेही उभे सन्मुख । तिघांही थोर संतोष । विनविती केशवास । स्वामी विनंति अवधारिजो
६५२५	।।ना.गा.१००२.००७।।	ये आळंकापुरीसी । स्थापावें कोटी तीर्थांसी । जो जो भक्त येईल स्नानासी । तो वैकुंठासी आणावा
६५२६	।।ना.गा.१००२.००८।।	ऐसें आइकोनि श्रीहरी । म्हणे धन्य धन्य तुमची वैखरी । जगदोद्धार केला संसारीं । बावीस वरूषें असतां पैं
६५२७	।।ना.गा.१००२.००९।।	जो जो दिवस उगवला । तो तो ज्ञानदेवें सफळ केला । पद पदांतर कथिला । जेणें आत्माराम संतोषे
६५२८	।।ना.गा.१००२.०१०।।	पूर्वी अनंत भक्त जाले। पुढें ही भविष्य बोलिलें । परी निवृत्ती ज्ञानदेवें सोडविलें । अपार जीवजंतु
६५२९	।।ना.गा.१००२.०११।।	जो अभक्त मनुष्य जनीं प्राणी । ज्याचा भार न साहे मेदिनी । मग इहीं अवतार घेउनी । जग तारिलें कीर्तनें
६५३०	।।ना.गा.१००२.०१२।।	नामा पंढरीस नाचत । ज्ञानेश्वर आळंकापुरीं शोभत । सोपान संवत्सरीं मिरवित । निवृत्ति त्र्यंबकसिखरीं
६५३१	।।ना.गा.१००३.००१।।	ऐसें पांडुरंग बोलिले । मग सकळ तीर्थांसी सांगितलें । आळंकापुरीं वसिजो वहिलें । भक्त तारावया
६५३२	।।ना.गा.१००३.००२।।	जो जो करील कीर्तन । तो तो तरेल जाण । अळंकापुरीं नारायण । स्वयें उभे असती
६५३३	।।ना.गा.१००३.००३।।	ऐसा निरोप तीर्थांसि । ते तिष्ठति अहर्निशीं । कीर्तन करितां गजरेंसि । वैकुंठासी नेवों म्हणती
६५३४	।।ना.गा.१००३.००४।।	देव म्हणे यमुना नर्मदा । सरस्वती भागीरथी त्रिविधा । गंगा कृष्णा तुंगभद्रा । इंद्रायणीस मिळावें
६५३५	।।ना.गा.१००३.००५।।	जो जो भक्त येईल स्नाना। तो पवित्र करावा ये क्षणा । वैकुंठ कैलासापर्यंत जाणा। त्यासी घेवुनि यावें
६५३६	।।ना.गा.१००३.००६।।	हो म्हणती तीर्थे सकळें। मग मीनलीं आपुलेनि मेळें । गुप्त राहोनि यथाकाळें । आज्ञा शिरसा वंदिती
६५३७	।।ना.गा.१००३.००७।।	गया काशी त्रिवेणी। त्या शोभती विठ्ठलचरणीं । ज्ञानदेवा समाधिरंगणीं । अखंड वाहों लागल्या
६५३८	।।ना.गा.१००३.००८।।	सुवर्णाचा अश्वत्थ । द्वारीं स्थापुनि निवास । भोवते देव्हडे तापस । समाधीस बैसले
६५३९	।।ना.गा.१००३.००९।।	देव म्हणे जो करील तप । तो होईल निष्पाप। केवळ होईल शिवरूप । आत्माराम साक्षात
६५४०	।।ना.गा.१००३.०१०।।	जप तप नेम मंत्र ध्यान । कोटि याग घडले पूर्ण । अथवा द्विजीं दिधलिया अन्न । चतुर्भुज नर होती
६५४१	।।ना.गा.१००३.०११।।	ऐसें वचन सांगे हरी । ज्ञानदेवासी धरिलें करीं । निवृत्ति सोपान अंतरीं। ध्यान धरोनी राहिले

६५४२	।।ना.गा.१००३.०१२।।	नामा म्हणे कोटि तीर्थांचें । तीर्थ वोळलें पैं साचें । पाप जाईल अनंत जन्मांचें । एक स्नान केलिया
६५४३	।।ना.गा.१००४.००१।।	मग अष्टदिशा व्यापुनी । तीर्थें राहिलीं स्थानीं । आळंकापुरीं पाटणीं । इंद्रायणीचा तटीं
६५४४	।।ना.गा.१००४.००२।।	धन्य धन्य सृष्टीतळीं। अळंकापुरी महितळीं । कीर्तन करितां वैष्णव मेळीं । ते चतुर्भुज नर होती
६५४५	।।ना.गा.१००४.००३।।	मग पुंडलिकासी सांगितलें। कृष्णपक्षीं येथें पाहिजे आलें । येरू म्हणे स्वामीनें सांगितलें । ते शिरसा वंदीन
६५४६	।।ना.गा.१००४.००४।।	देव म्हणे आम्ही तुम्ही । पंढरीहुनि समागमीं । येवों अळंकापुरा ग्रामीं । सकळ तीर्थांसहित
६५४७	।।ना.गा.१००४.००५।।	मग व्यास वाल्मिक बोलिवलें । त्यांसही हें तीर्थ सांगितलें। तें तिहीं शिवपीठ ऐसें म्हणितलें । जुनाट असे केशवा
६५४८	।।ना.गा.१००४.००६।।	या शिवतीर्थाचा महिमा । कवणा वर्णवेल पुरुषोत्तमा । पंढरी पांडुरंग महात्मा । भीमातीरही उत्तम
६५४९	।।ना.गा.१००४.००७।।	आणिक आईकें वो सर्वोत्तमा । येथें अधिक अष्टतीर्थ ग्रामा । पंचक्रोशीची उपमा । सिद्धी होती तात्काळ
६५५०	।।ना.गा.१००४.००८।।	ब्रह्मा विष्णु इंद्र तप। आणि योगेश्वर उमप । पाताळीं शेष समीप । याज खालता आहे
६५५१	।।ना.गा.१००४.००९।।	स्कंदासी उपदेश स्थान । लोहोगिरीसी येऊन । पुरूरवा पुण्य क्षेत्रमहिमान । पूर्वी येथुनि जालें
६५५२	।।ना.गा.१००४.०१०।।	येथून भीमरथी नदी । भीमाशंकरा घेऊनि गेला नंदी। तेथुनि उगमीं पडली सर्वां आधीं । मग शंकरें तेथें स्नान केलें
६५५३	।।ना.गा.१००४.०११।।	तें भीमा माहात्म्य प्रसिद्ध । तो हा सिद्धेश्वर अगाध । महा योगेश्वरा निजबोध । आळंकापुर पाटणीं
६५५४	।।ना.गा.१००४.०१२।।	ऐसें व्यास बोले तये क्षणीं । नामा गेला लोटांगणीं । समाधी मूळपीठस्थानीं । अलंकापुरीं ज्ञानदेव
६५५५	।।ना.गा.१००५.००१।।	मग व्यासपूजा सारिली । तैसीच वाल्मिकाची केली । वसिष्ठादिकीं अंगिकारिली । समस्त ऋषि पूजियले
६५५६	।।ना.गा.१००५.००२।।	धन्य धन्य धरातळीं । येऊनियां देवीं सकळीं । माजीं सहित वनमाळी । आळंकापुरीं नगरीये
६५५७	।।ना.गा.१००५.००३।।	मग साठी तीनशें गंगा । माजी शिव द्वादश लिंगा । अष्टोत्तर तीर्थें समर्थें पैं गा । तिहीं स्तवन आरंभिलें
६५५८	।।ना.गा.१००५.००४।।	कोटी तीर्थांचा रहिवास । अष्टभैरव सावकास । वसू कोटि गणेश । साठीसहस्र गणासहित
६५५९	।।ना.गा.१००५.००५।।	ऐसे रहिवासले षण्मास । दिव्यद्रुमफळें प्रतिदिवस । दिव्य अन्नें सावकाश । अमृत भक्षिती देव
६५६०	।।ना.गा.१००५.००६।।	ऐसा सकळ तीर्थांचा मेळा । तयामाजी परब्रह्म पुतळा । करी ज्ञानदेवाचा सोहळा । आळंकापुर नगरिये
६५६१	।।ना.गा.१००५.००७।।	गरूड हनुमंता ऐसे । पुढें कामारी हृषिकेशें । साक्षात वसिजे महेशें । गौरीसहित आळंकापुरीं
६५६२	।।ना.गा.१००५.००८।।	नंदि श्रृंगीं त्राहाटण । प्रतिदिनीं विभूतीचें उधळण । जयजय शंकर शिव पूर्ण । ऐशीं स्तोत्रें गाताती
६५६३	।।ना.गा.१००५.००९।।	महा सभास्थळ वैकुंठ। सभे श्रेष्ठ वैकुंठपीठ । आणि शिवमूर्ती घनदाट । नीळकंठ सभेसी
६५६४	।।ना.गा.१००५.०१०।।	रंभा उर्वशी नाचती । नारद तुंबर वीणे वाजविती । गणेश सारजा आळविती । सहा राग एकवीस मूर्च्छना
६५६५	।।ना.गा.१००५.०११।।	ऐसा रंग स्थिरावला । जयजयकारें घोष केला । तेणें चवकोनि उठला । पाताळींचा शेष
६५६६	।।ना.गा.१००५.०१२।।	ऐकोनी विष्णुकीर्तन । तयासी आलें पै स्फुंदन । मग उच्चारित रामकृष्ण । मृत्युलोकासि आला
६५६७	।।ना.गा.१००५.०१३।।	सहस्र वदनें स्तुति करी । हर नमस्कारिले हरी । वाहुनि तुळसीमंजिरी । ज्ञानदेवा पूजियेलें

६५६८	।।ना.गा.१००५.०१४।।	नामा म्हणे ज्ञानउदयो । ज्ञानदेवा भाग्याचा पहा हो । आपण येऊनि वैकुंठरावो । समाधि दिधली निजहस्तें
६५६९	।।ना.गा.१००६.००१।।	ऐसे स्वर्गवासी अमर । ते आपुलाले ठायीं स्थिर । राहोनि करिती जयजयकार । पुष्पवृष्टी ज्ञानदेवावरी
६५७०	।।ना.गा.१००६.००२।।	धन्य धन्य तूं विष्णुभक्तां । ज्ञानदेवा तूं समर्था । म्हणौनि पडती पुष्पचळथा । ज्ञानदेवावरी
६५७१	।।ना.गा.१००६.००३।।	अनंत तीर्थांचा मेळ । उदकें शिंपिती ब्रह्मगोळ । लोहगिरी सुवर्णाचळ । त्यावरी आळंकापुरी
६५७२	।।ना.गा.१००६.००४।।	म्हणती धन्य धन्य हे जन । येथें जो करील कीर्तन । तया जोडे वैकुंठस्थान । चतुर्भुज होऊन जाईल
६५७३	।।ना.गा.१००६.००५।।	देव म्हणती इंद्रासी । तूं पूर्वी येथेंच होतासी । आणि ब्रह्मा रूद्र तापसी । पूर्वापर हे पुरी असे
६५७४	।।ना.गा.१००६.००६।।	कृत त्रेत हे द्वापारादि । येथें सकळांची समाधी । धन्य ज्ञानदेव गोविंदीं । रतोनी येथें बैसले
६५७५	।।ना.गा.१००६.००७।।	इंद्र म्हणे विष्णुभक्त थोर। प्रत्यक्ष हेहि हरिहर । निवृत्ती सोपान ज्ञानेश्वर । हेहि अवतार हरीचे
६५७६	।।ना.गा.१००६.००८।।	ऐसें सांगितलें समस्तां । मग विदित जालें उभयता । शक्र जाहला निघता । ब्रह्मा आदि करूनी
६५७७	।।ना.गा.१००६.००९।।	शेषही पाताळासी गेला । पुंडरिक गोपाळ राहिला । आळंकापुरा स्थिरावला । सकळां भक्तां सहित
६५७८	।।ना.गा.१००६.०१०।।	सवें संतांचा मेळ । ऐसा राहिला गोपाळ । नामा म्हणे चक्रचाळ । पुढें कैसें वर्तलें
६५७९	।।ना.गा.१००७.००१।।	गगनपंथें शुभ्र विमानें । देव लक्षिती अधोवदनें । तंव आळंकापुरीं कीर्तनें । टाळ मृदांग झणत्कारले
६५८०	।।ना.गा.१००७.००२।।	जयजयकार क्षितीं होत । महादोषां संहार घात । नामा असे नाचत । पांडुरंगापुढें
६५८१	।।ना.गा.१००७.००३।।	रामकृष्ण अवतार। चरित्र गाती सविस्तर । वैष्णवीं केला जयजयकार । पांडुरंग म्हणितलें
६५८२	।।ना.गा.१००७.००४।।	ज्ञानदेव बैसले समाधी । पुढें अजान वृक्ष निधी । वामभागीं पिंपळ क्षितीं । सुवर्णाचा शोभत
६५८३	।।ना.गा.१००७.००५।।	निवृत्ती सोपान खेचर । ज्ञानदेव मुक्ताई साचार । हे उत्तर द्वारासमोर । बैसते जाले
६५८४	।।ना.गा.१००७.००६।।	देव म्हणे ज्ञानेश्वरा । चंद्र सूर्य जंव तारा । तुझी समाधि स्थिरा। राहो हे निरंतर
६५८५	।।ना.गा.१००७.००७।।	जंववरी हें क्षितिमंडळ । जंववरी हें समुद्रजल । मग कल्पक्षयी यथाकाळ । माझ्या हृदयीं ठसावें
६५८६	।।ना.गा.१००७.००८।।	आणिक एक सोपारें । ज्ञानदेव चार अक्षरें । जो जप करील निर्धारें । त्यासी ज्ञान होईल
६५८७	।।ना.गा.१००७.००९।।	ऐसा दिधला आशीर्वाद । मग संतासीं बोले गोविंद । ज्ञानदेवा ऐसा उद्‌बोध । दुजा न देखो दृष्टीसी
६५८८	।।ना.गा.१००७.०१०।।	नामा म्हणे स्वामी माझा । अंगिकार केला वोजा । पावला भक्तांचिया काजा । गरुडारूढ होऊनी
६५८९	।।ना.गा.१००८.००१।।	ऐसे संतोषले देव । प्रसन्नरूपें माधव । मग बोलती ज्ञानदेव । विठ्ठलाप्रती
६५९०	।।ना.गा.१००८.००२।।	धन्य धन्य तूं विठ्ठला । धन्य धन्य प्रत्यक्ष देखिला । धन्य समारंभ येथिला । सोहळा करिसी भक्तांचा
६५९१	।।ना.गा.१००८.००३।।	तुझेनि आम्ही धन्य । ये जगत्रयीं देवा मान्य । म्हणती भक्तांसमान । न देखें त्रिभुवनीं
६५९२	।।ना.गा.१००८.००४।।	तूं विश्वात्मा विश्वरूप । तूं जगाचें स्वरूप । तुज न लिंपे पुण्यपाप । सदा शुद्ध बुद्ध असंसी
६५९३	।।ना.गा.१००८.००५।।	तूं आम्हां भक्तां सरिसा । सवें हिंडसी जगदीशा। तुजविण अष्टदिशा । मज शून्य वाटती

६५९४	।।ना.गा.१००८.००६।।	तरी तूं पाळिसी भक्त लळा । केला समाधीचा सोहळा । तो दाखविला मज डोळा । दिव्य दृष्टी देवोनी
६५९५	।।ना.गा.१००८.००७।।	तूं सत्वरजतमात्मक । तूं सकळ जीवांचा चालक । तूंचि त्रिमूर्ती अवघा एक । विराटस्वरूप सकळ
६५९६	।।ना.गा.१००८.००८।।	भक्तभाग्य भूमींतळीं । याकारणें तूं वनमाळी । दहा अवतार भूमंडळीं। नाना चरित्रें खेळसी
६५९७	।।ना.गा.१००८.००९।।	ऐसें महिमान अगाध । तें तुझें विश्वस्वरूप प्रसिद्ध । कोण भाग्याचा मी प्रबुद्ध । तो तूं मजकारणें आलासी
६५९८	।।ना.गा.१००८.०१०।।	नामा म्हणे ज्ञानदेवें । ऐसी स्तुती केली स्वभावें । तंव कृपा करूनियां देवें । अभयकर दीधला
६५९९	।।ना.गा.१००९.००१।।	चतुर्भुज श्याममूर्ति । शंखचक्राची आकृती । पीतांबराची दिव्य दीप्ति । पडिली सृष्टीवरी
६६००	।।ना.गा.१००९.००२।।	धन्य धन्य ज्ञानदेव । धन्य धन्य तो माधव । मग आरंभिला अनुभव । ज्ञानदेवाचेनि मुखें
६६०१	।।ना.गा.१००९.००३।।	देव म्हणे ज्ञानेश्वरा । तू अवतरोनि माजी चराचरा । हरिला महादोषथारा । तुझेनि कवित्वें
६६०२	।।ना.गा.१००९.००४।।	तुझें कवित्व माझ्या गोष्टी। जो परिसेल हे सृष्टी। तो येईल माझे भेटी । वैकुंठा पीठीं विष्णूच्या
६६०३	।।ना.गा.१००९.००५।।	तुवां जो ग्रंथानुभव । गीतें सांगितला भाव । तें मुख्य ठेवणें राणीव। अनुभवीच जाणती
६६०४	।।ना.गा.१००९.००६।।	तैसाची अमृतानुभव । सिद्ध पीठ केलें भाव। दाउनी मनोहर राणीव । निज गुह्य आमुचें
६६०५	।।ना.गा.१००९.००७।।	वसिष्ठगीतेची टीका । भावार्थ काढिला श्लोका । ग्रंथ संचिला नेटका । करूनि रचना दाविली
६६०६	।।ना.गा.१००९.००८।।	तूं महाब्रह्मींचा अंश। पदपदांतरीं केला प्रवेश । दाऊनियां उदास विशेष । या जीवांसी तारिलें
६६०७	।।ना.गा.१००९.००९।।	तरी तूं आतां एक वेळ । माझी स्तुती करी निर्मळ । जेणें करूनि तरती सकळ । वक्ते श्रोते ग्रंथकार
६६०८	।।ना.गा.१००९.०१०।।	नामा म्हणे परमानंद । पावोनियां उद्बोध । केला ज्ञानदेव सावध । स्तुती उपरती मांडिली
६६०९	।।ना.गा.१०१०.००१।।	ऐसें आळंकापुर पीठींचे । भक्त नांदती दैवाचे । जे कां सागर भाग्याचे । ज्ञानउदयो प्रकाशिते
६६१०	।।ना.गा.१०१०.००२।।	मग षोडश उपचारीं । पूजा ज्ञानदेव आदरीं । दिव्यवाद्यें मंगळतुरीं । ओवाळिती पंचारतियां
६६११	।।ना.गा.१०१०.००३।।	ज्ञान सोपान निवृत्ती । मुक्ताई प्रत्यक्ष ज्योती । ओंवाळिती विष्णूमूर्ती । चतुर्भुज पैं
६६१२	।।ना.गा.१०१०.००४।।	पीतांबरधारी श्याममूर्ति । शंखचक्राची आकृती । उद्धव अक्रूर ढाळिती। चवरें वरी
६६१३	।।ना.गा.१०१०.००५।।	प्रत्यक्ष लक्ष्मी आपण । दिव्य स्वरूप प्रसन्न वादन। माजी मिरवे दिव्य सिंहासन । त्यावरी आरूढली
६६१४	।।ना.गा.१०१०.००६।।	पुढें गरूड जोडल्या करीं । उभा पक्षांचा फडत्कारी । सूर्य लोपे तेजाकारी । अमृतकरू नाम एक
६६१५	।।ना.गा.१०१०.००७।।	गोपाळ देव्हडे उभे । मंजुळ पावे वेणुप्रभें । शुभकाळ सुप्रभें । माजी स्तुति मांडिली ज्ञानदेवें
६६१६	।।ना.गा.१०१०.००८।।	नामा म्हणे ऐका । पुढें ग्रंथाची पीठिका । तो तारील सकळ लोकां । एक एक अक्षर आईकतां
६६१७	।।ना.गा.१०११.००१।।	नमो काळकौतुहळ । नमो चक्रचालक गोपाळ । नमो विश्वप्रतिपाळ । प्रभंजन
६६१८	।।ना.गा.१०११.००२।।	नमो शिव शिवेशा। नमो शिवादि विश्वेशा । नमो रूपा अष्टदिशा । व्यापका नारायणा
६६१९	।।ना.गा.१०११.००३।।	नमो सकळ गर्भोद्भवा। नमो चितचाळक भावा। नमो विष्णुमूर्ती देवाधिदेवा। श्रीविठ्ठला

६६२०	।।ना.गा.१०११.००४।।	नमो भजनशीळ व्यापका । नमो ज्योतिर्लिंगदीपका । नमो नमो तुज एका । आत्मव्यापका जगद्गुरु
६६२१	।।ना.गा.१०११.००५।।	नमो श्रीये श्रीनिवासा । नमो आगमपरेशा । नमो ज्ञानगम्याधीशा । प्रतिकुळा
६६२२	।।ना.गा.१०११.००६।।	नमो स्वलीळा विनटा । नमोस्तु ते वैकुंठपीठा । नमो रूपादिश्रेष्ठा । वैकुंठीचिया
६६२३	।।ना.गा.१०११.००७।।	नमो दर्शनस्पर्शना । नमो उपरतिनिधाना । नमो तितीक्षा दारूणा । कमळालया
६६२४	।।ना.गा.१०११.००८।।	नमो त्रिगंटी आदटा। नमो त्रिगुणा तूं उद्भटा । नमो सत्वरूप सदटा । ब्रह्मनामा
६६२५	।।ना.गा.१०११.००९।।	नमो रजेश्वरा हरी । नमो विगळितसंहारी। नमो वाचा वक्ता करी । वाचाळ वाक्पुष्पीं
६६२६	।।ना.गा.१०११.०१०।।	नमो तमहर्ताकर्ता । नमो सकळसंहर्ता । नमो काळकौळु दाता। रक्षिता हरिभक्तां
६६२७	।।ना.गा.१०११.०११।।	नमो हरिहरेश्वरा । नमो न देखों दुसरा । नमो वेदांत सागरा । सर्वेश्वरा तुज नमो
६६२८	।।ना.गा.१०११.०१२।।	श्रुती निरामय नमो । नमो ज्ञानरूप गमो । नमो द्वैतनिरसनसमो । करीं तूं निजकरें
६६२९	।।ना.गा.१०११.०१३।।	नमो व्यक्ताव्यक्त हरी । नमो मायासंहारकेसरी । नमो सर्वांच्या माजघरीं । नांदसी तूं आत्मारामा
६६३०	।।ना.गा.१०११.०१४।।	जीवशिव नमो तुज । ज्ञानविज्ञान तूं सहज । नमो सर्व जीवां बीज । तूंचि श्रीविठ्ठला
६६३१	।।ना.गा.१०११.०१५।।	लीलेस्तव नटारंभ । नमो जगदादि अखिलस्तंभ । उभा राहोनी प्रतीभ । भीमातीरीं पंढरिये
६६३२	।।ना.गा.१०११.०१६।।	नमो ऐशिया रूपेशा । नमो त्रैलोक्य विस्तारठसा। नमो आदि परेशा । जगदाधीशा युगादी
६६३३	।।ना.गा.१०११.०१७।।	नमो पुरुषोत्तम परेशा । नमो सकळही उदासा । करूनि जीवरूपा ठसा । नांदसी तूं चराचरीं
६६३४	।।ना.गा.१०११.०१८।।	मधुसूदना तुज नमो । मधुमाधवा ह्रदय रमो । नमो मधुर गीत समो । माजघरीं आत्मयाचिये
६६३५	।।ना.गा.१०११.०१९।।	त्रिविधतिमिर नाशा । परम परमानंदा उल्हासा । नमो पुरविसी आशा । हरिभक्तांची श्रीहरी
६६३६	।।ना.गा.१०११.०२०।।	नमो वासना चक्रचाळी । नमो तुंडवितंड गेली । नमो सर्वही हरली । प्रपंचरचना
६६३७	।।ना.गा.१०११.०२१।।	नमो श्रीधर श्रीकर । नमो सर्व संगीं निर्विकार । नमो विकृती विकार । हरिसी नामें एकें
६६३८	।।ना.गा.१०११.०२२।।	नमो शांती दया क्षमा। नमो कृपाकर पुरुषोत्तमा । नमो कांसवदृष्टीसमा । निष्कलंक नाथा
६६३९	।।ना.गा.१०११.०२३।।	नमो द्विविध छेदका । नमो एकार्णव पावका । नमो द्वादश अर्का । सुभाषका वेद वक्त्या
६६४०	।।ना.गा.१०११.०२४।।	नमो चित्त चकोर हर्त्या । नमो सर्वकारण कार्यकर्त्या। नमो तुजवांचोनि सत्या । विवेक प्रत्यया पैं न ये
६६४१	।।ना.गा.१०११.०२५।।	नमो अद्वैत अनंता । नमो निर्द्वंद्व भोक्ता । नमो नित्यानित्य सरता । तुज नमो नमो
६६४२	।।ना.गा.१०११.०२६।।	नमो दुर्गतिहरणा । नमो सर्व हरण भरणा । नमो सर्व दृष्ट निवारणा । भय हरणा जगदीशा
६६४३	।।ना.गा.१०११.०२७।।	नमो शिव शक्ति समलिंगा । नमो भक्षक काळवेगा । रुद्रादित्या वसु पैं गा । सम सर्वांगा परम परेशा
६६४४	।।ना.गा.१०११.०२८।।	नमो कृत्रिम दहना । नमो कृश करण हरणा । नमो प्रतिपाळ करणा । नारायणा तुज नमो
६६४५	।।ना.गा.१०११.०२९।।	नमो इंद्रिय नियंत्या । नमो प्रपंच अकृत्या । नमो दीनादित्या । सकळ वृद्धि तूंचि

६६४६	।।ना.गा.१०११.०३०।।	नमो अवधूत दत्ता । नमो अपरमित मिता । नमो सर्वां वरिष्ठ सत्ता । तूं चाळिता हृषिकेशी
६६४७	।।ना.गा.१०११.०३१।।	नमो दृष्ट दर्पादर्पा । नमो चमत्कार गंगा सर्पा । नमो नमो हरण पापा । नमो स्वल्पा रामकृष्णा
६६४८	।।ना.गा.१०११.०३२।।	नमो चतुर वेद दीप्ता । नमो हरण करण तूं सुप्ता। जागृति स्वप्न गुप्ता । सत्य सुप्ता महाविष्णु
६६४९	।।ना.गा.१०११.०३३।।	नमो देवेश्वरा सूक्तां । महा मोहा हर्ता । मंद मंद नियंता । नमो नारायणा
६६५०	।।ना.गा.१०११.०३४।।	क्षीर नीर निर्झरा । नमो विद्वद अनुकारा । नमो विवेक सागरा । महानादा
६६५१	।।ना.गा.१०११.०३५।।	नमो मुखदंतसदना । नमो भक्षक भुवना । शुक्लांबरा शुक्लवर्णा । दयाघना गुणनिधी
६६५२	।।ना.गा.१०११.०३६।।	मृतामृत नमो नमो । नमो श्रुतिशास्त्र समो । नमो हा गर्व गमो । पद्मगर्भानंतानंता
६६५३	।।ना.गा.१०११.०३७।।	नमो चिदाकाशव्याप्ता । चित्सत्ता चळण सत्ता । चित्स्वरूपादिरूपा । भुवन दीपा महामूर्ती
६६५४	।।ना.गा.१०११.०३८।।	नमो एक एकार्णव । नमो कल्पादि गुण वैभव । नमो सकळ हे देव । हे भाव पैं तुझे
६६५५	।।ना.गा.१०११.०३९।।	गो गोपाळ नमो नमो । गोविंद गुणविष्णु धर्मो । नमो चित्त चिंतनीं रमो । सर्वकाळ तुझ्या चरणीं
६६५६	।।ना.गा.१०११.०४०।।	ध्वज वज्रांकुशा । ध्वजनीळ विकासा । ध्वजांबरा अष्ट दिशा । नीळिमा भासती शामांकिता
६६५७	।।ना.गा.१०११.०४१।।	सुषुप्तीचे जें सत्य । तें नमो तुज कृत्य । असोस जे अमित्य । तें तें क्षमा करी स्वामी
६६५८	।।ना.गा.१०११.०४२।।	नमो निर्धार नियंता । नमो सुखरूप दाता । नमो आलिया पदार्था । क्षमा करी स्वामी
६६५९	।।ना.गा.१०११.०४३।।	नमो चित्त विभ्रमा। नमोधार्य धैर्य नेमा । नमो पुराण पुरुषोत्तमा । पाहे कासव दृष्टी
६६६०	।।ना.गा.१०११.०४४।।	पसाय दाना नमो । परम परेशा समो । ध्यानांतर गमो । तुझ्या चरणीं केशवा
६६६१	।।ना.गा.१०११.०४५।।	आग्रह नियंत्या नमो । सुग्रह परी नमो । अनंता नित्य धर्मो । वैकुंठ गुण ग्राम नमो नमस्ते
६६६२	।।ना.गा.१०११.०४६।।	अनादृश दृश्यमाना । दृशादृश्य नित्यघना । सुखरूप जगजीवना । तुज नमो स्वामी
६६६३	।।ना.गा.१०११.०४७।।	दीप्तादीप्त अदृश्य । जीवन दिसती सादृश्य । जीवमय हें भाष्य । तुज नमो स्वामी
६६६४	।।ना.गा.१०११.०४८।।	परम पर ब्रह्मा। आदि ब्रह्मा तूं रामा । भक्तांलागीं साउमा । तुज नमो
६६६५	।।ना.गा.१०११.०४९।।	नमो नमो एक तत्त्वा । बाह्य मुद्रा शुद्ध सत्वा। योगा रूढ परतत्वा । सबाह्य पावसी तुज नमो
६६६६	।।ना.गा.१०११.०५०।।	वेदादि परम वक्ता । वेदादि तूंचि कर्ता । तुजवांचोनि सर्व सत्ता । नमो भोक्ता न देखों
६६६७	।।ना.गा.१०११.०५१।।	ज्योतिर्मय रूप तुझें । सर्व तत्त्वां तूंचि बीज । नमो तुज सहज । पुढती पुढती नमो नमो
६६६८	।।ना.गा.१०११.०५२।।	परब्रह्म परात्पर । परम तत्त्व परम सार । परम गुह्य परम विचार । तुज नमो नारायणा
६६६९	।।ना.गा.१०११.०५३।।	दिघड बिघड सुघडा । जाडा जाड अवघड । द्वैताद्वैत जोडाजोड । कर्ता कार्यता तुज नमो
६६७०	।।ना.गा.१०११.०५४।।	संख्या रहित जीवना । असंख्य जीव पाळणा । नमो तुज संजीवना । पुंडलिकधना पांडुरंगा
६६७१	।।ना.गा.१०११.०५५।।	निर्गुण सगुण रूपा । देवा देव तूं सोपा । तुझी जाहलिया कृपा । नमन बापा तुझ्या चरणीं

६६७२	।।ना.गा.१०११.०५६।।	नमो नमो तारका । तूं ब्रह्म नामा निशेखा । नमो तुजवांचोनि सखा । योगीयासी पैं नाहीं
६६७३	।।ना.गा.१०११.०५७।।	जुगादि जुगत्रय । जुग जोग योगमय । हे तुज पासाव होय । ऐसिया तुज नमो
६६७४	।।ना.गा.१०११.०५८।।	नमो नमो नम । नाहीं नाहीं तुजसी सम । ऐसा परापश्यंती नेम । वदलिया चारी
६६७५	।।ना.गा.१०११.०५९।।	चहू मुक्ति परतत्वा । पंचभूजा शुद्ध सत्वा । षड् मार्ग गुण सत्वा । ग्रास न करिसी तुज नमो
६६७६	।।ना.गा.१०११.०६०।।	विद्वद चिद्विलासा । भानुबिंबा प्रति प्रकाशा । नमो तेज तेजसा । आदिसूर्या
६६७७	।।ना.गा.१०११.०६१।।	ऐसा चहू ग्रंथाचा कलेशु । वाउगाचि वाहे सोसू । त्रिमिर त्रिगुण असोसू । तो सत्वांशु तोडी माझा
६६७८	।।ना.गा.१०११.०६२।।	साही नाडी चक्र भ्रमें । वाहातां इंद्रियांची ग्रामें। ते अडखळोनि साउमे । नये ऐसें करीं नमो
६६७९	।।ना.गा.१०११.०६३।।	बाध्य बाधा कर्माची। सर्व सत्ता या भ्रमाची । नमनें करूनियां तुमची । तुम्हासी अर्पिलीं स्वामी
६६८०	।।ना.गा.१०११.०६४।।	यम धर्माचिया सत्ता। कर्म धर्माचिया पंथा । कर्मधर्म विधाता । ऐसिया नेमिता तुज अर्पिला
६६८१	।।ना.गा.१०११.०६५।।	दश शम समान । इडा पिंगळा सुषुम्न । साही चक्रें दरूषन । तुझीं तुज अर्पिलीं
६६८२	।।ना.गा.१०११.०६६।।	मन पवन योग धारण । तूं यासी पैं कारण । समतुकें अवघे गुण । तुझ्या चरणीं निक्षेपिलें
६६८३	।।ना.गा.१०११.०६७।।	हें भूत भौतिक प्रचंड । जन्म उत्पत्तीचें अंड । जन्म जुगादि ब्रह्मांड । खंड विखंड तूं जाणता
६६८४	।।ना.गा.१०११.०६८।।	प्रचुर चर्या चित्ताची । धावन वळण अकोंचनाची । सूचना जे चमत्काराची । ते हि अर्पण तुज सदा
६६८५	।।ना.गा.१०११.०६९।।	निर्वासना वासना युक्त । गुंफले राहिले जेथें चित्त । तेथें तूं धावोनि अनंत । सोडविसी वासनामय
६६८६	।।ना.गा.१०११.०७०।।	सूक्ष्म अविचारा बोला । बोली नातुडे व्यर्थ गेला । तो म्यां बुझावोनि संबोखिला । मग लाविला तुझ्या पंथीं
६६८७	।।ना.गा.१०११.०७१।।	नित्य धर्माचिया वोळी । चळल्या चुकल्या कोणी चाळी । त्यासी वेद तुझा पाळी। त्या तूं सांभाळी परब्रह्म
६६८८	।।ना.गा.१०११.०७२।।	श्रुति स्मृतिंची वचनें । याची अंगराग मार्गस्थानें । कीर्तनीं गुण वर्णनें । हे हि नारायणें अंगीकारावीं
६६८९	।।ना.गा.१०११.०७३।।	उदंड विदंड वितंड । देह द्वयाचे अभंड । जे जे दिसे भ्रंश अंडांड । ते शुभ्र चंड सांभाळी
६६९०	।।ना.गा.१०११.०७४।।	देह भरणाची ममता । देह पोखिती जे सत्ता । त्याहि वरील सूक्ष्मता । ते कृपावंता सांभाळी
६६९१	।।ना.गा.१०११.०७५।।	त्रिमिर त्रिगुण अवघे । जें जें आलें असेल वोघें । तें तें मी नेघे। तें तूं सकळ वेगें सांभाळीं
६६९२	।।ना.गा.१०११.०७६।।	योनीचिया कष्टा । वरी वासना होती भ्रष्टा । त्या त्या करूनि प्रविष्टा । रत जालोन तुझ्या चरणीं
६६९३	।।ना.गा.१०११.०७७।।	विद्या वयसा कुळ । ब्रह्म कर्म आचारशीळ । गेले आले विव्हळ । ते तूं दयाळ सांभाळी
६६९४	।।ना.गा.१०११.०७८।।	नाना जन्म अवतार । नाना शाखांचे निर्धार । नाना गोत्र उच्चार । तुझा विचार तूं जाणसी
६६९५	।।ना.गा.१०११.०७९।।	पाठ वेदादि वचनें । शास्त्रदृष्टी अवलोकनें। कीर्तनीं गुण वर्णनें । हें हि नारायणें अंगीकारावी
६६९६	।।ना.गा.१०११.०८०।।	सर्वमय सर्व सपाट । त्यावरी करूनि चालिला वाट । चंद्र सूर्य नक्षत्रें घनदाट । करूनि एकवट पायरी
६६९७	।।ना.गा.१०११.०८१।।	सर्व अंडांचे ब्रह्मांड । मी न म्हणे अंडांड। खंडे करूनिया विखंड । प्रचंड मी तुजसी बोले

६६९८	।।ना.गा.१०११.०८२।।	रोमरंध्री ब्रह्मांडे । सकळ विराटमय खंडे । ऐसी महत्तू ब्रह्म प्रचंडे । तुझ्या अंगी दातारा
६६९९	।।ना.गा.१०११.०८३।।	तू विश्वरूपाची घडी । तारक ब्रह्मचि उघडी । मिया निज दृष्टीने चोखडी । तुझी मूर्ति न्याहाळिली
६७००	।।ना.गा.१०११.०८४।।	तें न सुटे निजकळे । येऱ्हवीं हें ना कळे । तुझ्या कृपागणें आकळे । तुझिया दासा निज भक्तां
६७०१	।।ना.गा.१०११.०८५।।	अनंत या नामाचा संकेत । मन मुरालें जेथें निर्धूत । तूंपणें परमाद्भुत । परमानंदा
६७०२	।।ना.गा.१०११.०८६।।	गुणाग्र गोसावी राम । गुण समुद्र गुण ग्राम । सकळ भूतांचा विश्राम । तुज नमो
६७०३	।।ना.गा.१०११.०८७।।	नमन केलिया विभूतीं । चित्त रमलें जाली विश्रांती । तुज देखिलिया श्रीपती । न राहे चित्तीं तळमळ
६७०४	।।ना.गा.१०११.०८८।।	नमन हेंचि थोर दिसे । एऱ्हवीं तरंगाकार भासे । देखिलें तितुकें नासे । नैश्वर्य ऐसें श्रुति बोले
६७०५	।।ना.गा.१०११.०८९।।	नमन हेंचि परम । नमन हेंचि सुवर्म । नमन हेचि आत्माराम । करूं निघाली
६७०६	।।ना.गा.१०११.०९०।।	नमन हाचि अनुभव । नमन हाचि मुख्य भाव । नमन हाचि पैं देव । देवाधिदेव तूं पावसी
६७०७	।।ना.गा.१०११.०९१।।	नमन हेंचि श्रेष्ठ पीठा । नेतसे तुझिया वाटा । तुज ऐसा श्रेष्ठा । मग वाटा काय कराव्या
६७०८	।।ना.गा.१०११.०९२।।	नमन हेंचि तारक । नमन हाचि विवेक । नमनेंविण त्रैलोक्य । आडमार्गी रिघताती
६७०९	।।ना.गा.१०११.०९३।।	नमन लटिकें नव्हे नव्हे । नमन भलतियासी न साहे । जें साह्य सखा होय । श्री निवृत्ती
६७१०	।।ना.गा.१०११.०९४।।	नमन एवढा मंत्र। नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । विचार लक्षण पात्र । तोचि जाणे येथीचें
६७११	।।ना.गा.१०११.०९५।।	नमन करी ब्रह्मा श्रेष्ठा । नाभीकमळीं धरी वैकुंठा । नमन करी नीळकंठा । तीर्थें मस्तकीं वंदिती
६७१२	।।ना.गा.१०११.०९६।।	इंद्र चंद्र महेंद्र थोर । नमनेंविण नैश्वर । अंडामध्यें चराचर । नमनेंविण न तरती
६७१३	।।ना.गा.१०११.०९७।।	श्री गुरु कृपा जैं होय । तैं नमनाची ऐसी सोय । पाऊनि सुगम उपाय। नमो नमस्ते तुज
६७१४	।।ना.गा.१०११.०९८।।	नमस्ते नमस्ते नमस्ते । पुढतीं पुढतीं नमस्ते । समाधिसुख आस्ते । नमो नमन करितां
६७१५	।।ना.गा.१०११.०९९।।	नमो नमो आदि पीठा । शिवादिका वरिष्ठा । येथें येऊनि वैकुंठा । समाधि शेज घातली
६७१६	।।ना.गा.१०११.१००।।	महाविष्णू तूं योगरूपा। महारूपाचिया स्वरूपा । महादित्या अमूपा । कोटी सूर्य तेजसा
६७१७	।।ना.गा.१०११.१०१।।	शंखचक्रानें मंडित । करकमळ तुझे मिरवत । पदक हृदयावरी शोभत । आणि श्रीवत्सलांछन
६७१८	।।ना.गा.१०११.१०२।।	अनंत बाहूंचा मेळ । तो तूं चतुर्भुज गोपाळ । मुगुट विराजित तेजाळ । कोटी सूर्याहूनि प्रभा
६७१९	।।ना.गा.१०११.१०३।।	पितांबर माळ कंठीं । सर्वांगीं चंदनाची उटी । हिरे माणिक कटीतटीं । अनेक कीळा फाकती
६७२०	।।ना.गा.१०११.१०४।।	क्षुद्रघंटिकाचिया वोळी । घणघणाट तया तळीं । देहुडा पाऊलीं निश्चळीं । वेणु वाजविसी सुस्वरें
६७२१	।।ना.गा.१०११.१०५।।	रुणुझुणु रुणुझुणु । ऐसा वाजविसी वेणू। सुंदर तूं श्यामतनु । अळंकापुरीं उभा असिसी
६७२२	।।ना.गा.१०११.१०६।।	सभोंवते गोपाळ तुझे । ते अंतरंग पैं सखे माझे । पुंडलिक तरि सहजे । प्राण सखा पैं माझा
६७२३	।।ना.गा.१०११.१०७।।	ऐसा ज्ञान उद्बोध बोले । ज्ञानांजन निरसलें। विज्ञानहि हारविलें । दृश्य द्रष्टेंपणेसी

६७२४	।।ना.गा.१०११.१०८।।	बापरखुमादेवीवरू । समाधि देऊनियां स्थिरू । वरी ठेवोनियां अभय करूं । वर देऊनि राहिला
६७२५	।।ना.गा.१०१२.००१।।	ऐसी स्तुति नमनाची । केलिया भगवंताची । ऐकतां जाली रुची । म्हणे धन्य धन्य रे सख्या
६७२६	।।ना.गा.१०१२.००२।।	कैसी स्तुति परिकर । जपतां नामावळी साचार । वेगीं तुष्टले हरिहर । निज ब्रह्म स्वरूप
६७२७	।।ना.गा.१०१२.००३।।	वैष्णव सभोंवते उभे । तिहीं जयजयकार प्रतिभे । करूनि रुक्मिणीवल्लभे । तया प्रसाद दिधला
६७२८	।।ना.गा.१०१२.००४।।	मागुता ज्ञानदेव वदे । धन्य धन्य तुझीं चरणारविंदें । तेथें रातलिया योगिवृंदें । ते चरण धन्य धन्य
६७२९	।।ना.गा.१०१२.००५।।	पुंडलिकें स्तवन । मांडावें तंव नारायण । म्हणे सन्मुख उभा सोपान । यासी समाधि देणें लागेल
६७३०	।।ना.गा.१०१२.००६।।	निवृत्ती मुक्ताई दोघें । ती बुझाविलीं पांडुरंगें । उद्धव अक्रुर वेगें । तया संगें निरविलीं
६७३१	।।ना.गा.१०१२.००७।।	ज्ञानदेवासी उद्धव । बोले एकांतीचा भाव । तुम्हां तुष्टला देवाधिदेव । धन्य धन्य वैष्णव तुम्ही
६७३२	।।ना.गा.१०१२.००८।।	ज्ञानदेव म्हणे स्वामी । दीनें रंकें विठोबाचे आम्ही । धन्य धन्य भाग्याचे तुम्ही । जे निरंतर विष्णुसंगें
६७३३	।।ना.गा.१०१२.००९।।	उद्धव म्हणे ज्ञानेश्वरा । आम्ही जाणो कृष्णावतारा । परि पांडुरंग मूर्ति निर्धारा । तूं आणि पुंडलिक जाणसी
६७३४	।।ना.गा.१०१२.०१०।।	नामा म्हणे ज्ञानदेवें । मागुतें स्तवन आरंभिलें भावें । तें ऐकावया देवें । एकचित्त केलें
६७३५	।।ना.गा.१०१३.००१।।	कर जोडोनियां पुढें । लोटांगण टाकिलें गाढें । म्हणे स्तवन करावया मी वेडें । काय जाणे तुझा महिमा
६७३६	।।ना.गा.१०१३.००२।।	तरी पांडुरंगा तूं दयाळु । भक्त भाविकां कृपाळु । भीमातटीं उभा गोपाळु । पुंडलिकाकारणें
६७३७	।।ना.गा.१०१३.००३।।	चंद्रभागा सरोवरीं । निरे भिवरे तिरीं । वाट पाहसी हरी । भक्तसाह्या कारणें
६७३८	।।ना.गा.१०१३.००४।।	तरी उदार शूर महिमेचा । खुंटलिया चारी वाचा । तेथ पवाडु मज कैंचा । वर्णावया सामर्थ्य
६७३९	।।ना.गा.१०१३.००५।।	शेषा ऐसा स्तुती करी । तया नाकळसीच श्रीहरि । जिव्हा चिरलिया भग्नधारी । मग मौन्येंचि राहिला
६७४०	।।ना.गा.१०१३.००६।।	तो तूं अळंकापुरीं येसी । मज दीना समाधी देसी । देव म्हणे तूं होसी । साक्षात ज्ञानरूप
६७४१	।।ना.गा.१०१३.००७।।	ज्ञानदेवो साक्षात नाम तुझें । तें ज्ञान हृदयीचें माझें । हे जन तारावया काजें । तुवां अवतार घेतला
६७४२	।।ना.गा.१०१३.००८।।	नामा म्हणे देव हरी । पुढतोपुढतीं साहाकारी । वर देऊनि अंगिकारी । आपणची जाला
६७४३	।।ना.गा.१०१४.००१।।	तव अंतरिक्षीं गगनीं । देव बैसोनि विमानीं । वर्षताती दिव्य सुमनीं । पांडुरंगावरी
६७४४	।।ना.गा.१०१४.००२।।	विठोबा गुणनिधी । सवें पुंडलिक सुबुद्धि । लघिमा अणिमादि सिद्धी । सवें असती
६७४५	।।ना.गा.१०१४.००३।।	मग नेमिलिया तिथी । कृष्णपक्ष अष्टमी समर्थी । नाम संकीर्तन संतसंगतीं । तो ब्रह्मप्राप्ति पावला
६७४६	।।ना.गा.१०१४.००४।।	नवमीं गजर कथेचा । तरि वैष्णव तोचि साचा । चतुर्भुज होईल हे वाचा । वदोनियां गेले
६७४७	।।ना.गा.१०१४.००५।।	सहज ते दशमी । दिंडी जागरण आश्रमीं । तो येईल वैकुंठ ग्रामीं । कीर्तन करीतची
६७४८	।।ना.गा.१०१४.००६।।	एकादशी श्रेष्ठ गाढी । नामस्मरणें कोटीयाग जोडी । येकी घडी युगाएवढी । एवढें सामर्थ्य इयेचें
६७४९	।।ना.गा.१०१४.००७।।	एकादशी दिननिशीं । जागरणी हृषिकेशी । कीर्तन करी अहर्निशीं । तरि तो तारिल सर्व जनां

६७५०	।।ना.गा.१०१४.००८।।	द्वादशीस क्षीराब्धि । कीर्तन करील आल्हादीं । तो पावन होईल गोविंदीं । निजपदीं विष्णूचा
६७५१	।।ना.गा.१०१४.००९।।	त्रयोदशीं उत्तम थोर । करिल दिंडी पताका गजर । टाळ मृदुंगे झणत्कार । तरि तो सकळ कुळ तारील
६७५२	।।ना.गा.१०१४.०१०।।	नामा म्हणे चतुर्दशीं । अमावास्येचे दिवशीं । ज्ञानदेवीं राहेल नेमेंसी । तरी तो तरैल भूतकाळीं
६७५३	।।ना.गा.१०१५.००१।।	नवमी गजर हरिनामाचा । तोचि वैष्णव कायामनवाचा । तो प्रत्यक्ष विष्णुरूप साचा । सत्य त्रिवाचा बोलिले
६७५४	।।ना.गा.१०१५.००२।।	जोडे जया वद्य दशमी । स्नान विष्णु पूजन स्वधर्मी । तो सत्वर पावेल निजधामी । नाम संभ्रमी नाचत
६७५५	।।ना.गा.१०१५.००३।।	व्रत एकादशी श्रेष्ठ गाढी । कीर्तन श्रवणीं कोटी याग जोडी । एक एक घडी कल्पाएवढी । भूषण प्रौढी कीर्तीची
६७५६	।।ना.गा.१०१५.००४।।	द्वादशी पारणें क्षीराब्धि । हरि कीर्तनीं परमानंदी । तो पद पावला अनादि । ज्ञानदेवी विष्णुच्या
६७५७	।।ना.गा.१०१५.००५।।	वद्य त्रयोदशी महाथोर गजर । कुंचे गरुड टके दिंडी संभार । वाजविती टाळ मृदंग झणत्कार । हरि नामें अपार उद्धरिले
६७५८	।।ना.गा.१०१५.००६।।	नामा म्हणे वद्य चतुर्दशी । पुढती अमावास्येचे दिवशीं । ज्ञानदेवा जो दृढ धरी मानसी । तो कृत निश्चयेसी तरलासे
६७५९	।।ना.गा.१०१६.००१।।	ऐसें वदोनि पांडुरंगें । समस्तांसी वस्त्रें दिलीं अंगें । देऊनि भूषणें अनेगें । रत्नमुक्ताफळें अलंकार
६७६०	।।ना.गा.१०१६.००२।।	धन्य जन्मले भूमंडळीं । कीर्तनीं नाचती गदारोळी । ते विष्णुसन्निध सर्वकाळीं । ऐसें वनमाळी बोलिले
६७६१	।।ना.गा.१०१६.००३।।	राही रुक्मिणी सत्यभामा । विचारिती पुरुषोत्तमा । बहुत अगाध येथिचा महिमा । भूमीवरी वैकुंठ
६७६२	।।ना.गा.१०१६.००४।।	म्हणे विठोजी जंववरी धरा । तंववरि समाधि स्थिरा । हरिकीर्तन करिती सैरा । चतुर्भुज होईल
६७६३	।।ना.गा.१०१६.००५।।	हें शिवपीठ शिवाचें । हेंचि पूर्वस्थान अगस्तीचें । जाणोनि जन्म जाले चौघांचे । सर्व क्षेत्रांची आदिभूमि
६७६४	।।ना.गा.१०१६.००६।।	पूर्वापार युगायुगीं । अनेक पुण्यें घडले यागीं । तपें तपिन्नलें महायोगी । तो हा आळंकापुरीं ठावो
६७६५	।।ना.गा.१०१६.००७।।	येथें रामकृष्ण कथा । जो करील सर्वथा । तो पुढें पवेल व्यथा । भवबंधापासुनी सुटेल
६७६६	।।ना.गा.१०१६.००८।।	सप्तद्वीप नवखंड । आणि अवघें गणितां ब्रह्मांड । त्याहुनि हें हो उदंड । पुण्य जोडेल नामें
६७६७	।।ना.गा.१०१६.००९।।	ऐसें उत्तमोत्तम थोर । सकळ जीवांचें माहेर । नाम घेतां तरती चराचर । दिला वर रुक्मिणीवरें
६७६८	।।ना.गा.१०१६.०१०।।	नामा म्हणे देवराव । महिमा सांगतसे भाव । धन्य आळंकापुरी गांव । आदि ठाव वरिष्ठ
६७६९	।।ना.गा.१०१७.००१।।	नित्य अनुष्ठान ये तीर्थी । त्याचे पूर्वज उद्धरिती । जे कां अन्नदान करिती । ते पावती वैकुंठीं
६७७०	।।ना.गा.१०१७.००२।।	ऐसें तीर्थक्षेत्र सर्वोत्तम । आणिक नाहीं यासी सम । शिवपीठ हें मनोरम । आळंकापुरीं हें देख
६७७१	।।ना.गा.१०१७.००३।।	न वर्णवे येथिंची थोरी । जेथें साक्षात श्रीहरि । येऊनियां झडकरी । ज्ञानदेवा समाधि दिधली
६७७२	।।ना.गा.१०१७.००४।।	अनंत पुण्य ज्याचें गांठीं । तरीच ज्ञानदेव पडे दिठी । जोडे तप कोट्यानुकोटी । ऐसे धूर्जटी बोलिले
६७७३	।।ना.गा.१०१७.००५।।	सिद्ध साधकाचें स्थळ । सर्व तीर्थाचें हेंचि मूळ । वास केलिया सर्वकाळ । तरि महादोष हरतील
६७७४	।।ना.गा.१०१७.००६।।	अजान वृक्षातळीं हरिकथा। नित्य जो नर करी तत्त्वतां । तो न जाय यमपंथा । ऐसें जगन्नाथ बोलिले
६७७५	।।ना.गा.१०१७.००७।।	द्वारीं सुवर्णाचा अश्वत्थ । नित्य पूजलिया स्वस्थ । लक्ष्मी न सांडी तया सत्य । सकळ आर्ती पूर्ण होती

६७७६	।।ना.गा.१०१७.००८।।	नित्य प्रदक्षिणा सप्त । तरी अगाध पुण्य त्वरित । पूर्वज वैकुंठासी जात । बेचाळिसां सहित
६७७७	।।ना.गा.१०१७.००९।।	नित्य विष्णूचें पूजन । नित्य नाम संकीर्तन । नित्य वैष्णव संत भोजन । धन्य पावन इहलोकीं
६७७८	।।ना.गा.१०१७.०१०।।	नामा म्हणे आळंकापूर । सर्व क्षेत्रामाजीं मनोहर । पवित्रासी परम परिकर । त्रिभुवनीं दुर्लभ
६७७९	।।ना.गा.१०१८.००१।।	ऐसें तीर्थ सर्वोत्तम । सांगतसे पुरुषोत्तम । शंकरादि परमधाम ब्रह्मनाम वर्णित
६७८०	।।ना.गा.१०१८.००२।।	श्रेत्रमहिमा अति अद्‌भुत । आदि सिद्धेश्वर कुळदैवत । समर्थ महाभागवत । नामें गर्जत सर्वकाळ
६७८१	।।ना.गा.१०१८.००३।।	म्हणे पुंडलिक पूर्वीचें स्थळ । आणि शिवाचें मूळपीठ निर्मळ । तेथें निर्विकल्प सोज्वळ । तप विशाळ जोडिले
६७८२	।।ना.गा.१०१८.००४।।	क्षेत्र पंढरीहुनी अधिक । ऐसें बोलती ब्रह्मादिक । म्हणती धन्य येथींचे लोक । शुद्ध भाविक प्रेमळ
६७८३	।।ना.गा.१०१८.००५।।	घडे महाविष्णूचें पूजन । तीर्थ व्रत संध्यास्नान । वाचे हरिनाम कीर्तन । श्रवणीं गुण विष्णुचे
६७८४	।।ना.गा.१०१८.००६।।	विठोजी म्हणे ऐक भक्ता । तपोनिधी महंत तूं सर्वथा । ज्ञानदेवासारिखा वक्ता । मज आवडता न दिसे
६७८५	।।ना.गा.१०१८.००७।।	तुम्ही दोघे असा या सृष्टीं । जग उद्धारीं पाटोवाटीं । कीर्तन करितां उठाउठी । तो वैकुंठीं पावावें
६७८६	।।ना.गा.१०१८.००८।।	पुंडलिकें नमस्कारिले हरी । चरणरज वंदिले शिरीं । म्हणे मी भाग्याचा उजरी । तूं कैवारी आमुचा
६७८७	।।ना.गा.१०१८.००९।।	नामा म्हणे देवभक्त । एक होऊनि समस्त । निवृत्तिराज स्तुति बोलत । प्रेम अद्‌भुत दाटलें
६७८८	।।ना.गा.१०१९.००१।।	परब्रह्म परममूर्ती । परमधाम परात्पर कीर्ति । परमप्रियो परंज्योती । श्रुतिस्मृति स्वानुभव
६७८९	।।ना.गा.१०१९.००२।।	अकळ विकळ निरंजन । ज्ञाताज्ञेय विवेकधन । संशय दृश्य निरसन । विश्वप्रिये
६७९०	।।ना.गा.१०१९.००३।।	नलिनीकमलविकाशा । नयनघन विश्वेशा । नमन चरणलेशा । चित्सुखा
६७९१	।।ना.गा.१०१९.००४।।	चराचर सच्चिदानंदांग । शुद्धस्नान शंकर दिव्यांग । विष्णुमूर्ति पांडुरंग । सगुणरूप भीमातटीं
६७९२	।।ना.गा.१०१९.००५।।	सजळ जळदघना । दशन कोटी सूर्यकिरणा । मुक्ताहार जडित रत्ना । किरिटी मुगुट विराजित
६७९३	।।ना.गा.१०१९.००६।।	नीलोत्पल नीलवर्णा । श्यामसुंदरा मूर्तिघना । स्तवितां सहस्रवदना । नकळे पार तुझा
६७९४	।।ना.गा.१०१९.००७।।	रजतमाचे मेहुडे । पाहतां तूं न सांपडे । नाहीं तुझिया पडिपाडें । भूमंडळीं दैवत
६७९५	।।ना.गा.१०१९.००८।।	अनंत ब्रह्मांडधीशा । गुण न वर्णवे परेशा । तुवां ज्ञानदेव सर्वेशा । आपणामाजीं सामावला
६७९६	।।ना.गा.१०१९.००९।।	निवृत्ती म्हणे आम्ही दीनें । तारावीं तुम्ही नारायणें । मग काय आदरिलें सोपानें । तेथवरी येणें घडेल
६७९७	।।ना.गा.१०१९.०१०।।	ऐसी निवृत्तिदेवाची स्तुती । ऐकुनियां श्रीपती । नामा म्हणे देव तयाप्रती । बोलते जाले
६७९८	।।ना.गा.१०१९.०११।।	नारायणें स्तुति परिसिली । ऐकुनियां अव्यक्त बोली । म्हणे तुवां गीतेची टीका केली । तें प्रमाण आम्हासी
६७९९	।।ना.गा.१०१९.०१२।।	नामा म्हणे हरी देवें । जाणोनियां अंतर्भावें । तुष्टले गुणगौरवें । निवृत्तीसी दिधलें
६८००	।।ना.गा.१०२०.००१।।	म्हणे विठोजी शंकराचा । प्रत्यक्ष अवतार तुझा साचा । स्तुति केली असे वाचा । विस्मयाचा पूर मज
६८०१	।।ना.गा.१०२०.००२।।	वसति सप्तद्वीप नवखंड । त्यामाजीं अनंत ब्रह्मांड । रोमरंध्रीं ज्या अखंड । तो मनुष्यरूपें मेदिनी

६८०२	।।ना.गा.१०२०.००३।।	निवृत्तिनाथ नाना अवतारीं । तुमच्या सेवेसीं श्रीहरी । जें जें प्रेरसी कामारी । सांगितलें करी उगाचि
६८०३	।।ना.गा.१०२०.००४।।	म्हणे देवाधिदेवा आतां । सांगाल तें करूं तत्त्वतां । हरूं भवार्णवाची चिंता । या त्रैलोक्याची
६८०४	।।ना.गा.१०२०.००५।।	तंव निवृत्तीनें लोटांगण । म्हणे नाहीं तुज समान । आम्हांकारणें नारायण । साहाकारी होसी
६८०५	।।ना.गा.१०२०.००६।।	आमुचा तपें समर्थें । तुवां सिद्धी पावविली जगन्नाथें । सरतें करूनियां आम्हांतें । विष्णुमार्गें लाविलें
६८०६	।।ना.गा.१०२०.००७।।	देव म्हणे तूं आधीं । विष्णुमार्गींची सकळ सिद्धी । जाणतां तूं एकत्र शुद्धी । निवृत्ती होसी
६८०७	।।ना.गा.१०२०.००८।।	नामा म्हणे ऐसे लळे । पाळिले तयाचे गोपाळें । देऊनियां समाधिसोहळे । विष्णुधर्म प्रतिष्ठिला
६८०८	।।ना.गा.१०२१.००१।।	ऐसा निवृत्ती स्थिरावला । महाविष्णु संतोषला । मग सोपानदेवें आरंभिला । स्तुतिवाद परियेसा
६८०९	।।ना.गा.१०२१.००२।।	जयजया तूं रामकृष्णा । भक्तभाविकां हरी तृष्णा । देहीं दीपक सहिष्णा । रामकृष्ण म्हणतांचि
६८१०	।।ना.गा.१०२१.००३।।	नरहरि नरकेसरी । टाळी वाउनियां गजरीं । टाळ मृदंग झणत्कारी । जयजय कृष्ण म्हणों आम्हीं
६८११	।।ना.गा.१०२१.००४।।	एक हरिविण नाहीं सखा । त्रिभुवनीं आत्मा देखा । समाधिसुखविशेखा । चरणरजें डौरवावें
६८१२	।।ना.गा.१०२१.००५।।	धन्य हे भूमिका देश । आपण हरि जगन्निवास । ज्ञानदेवीं केला वास । समाधिसुख घेउनी
६८१३	।।ना.गा.१०२१.००६।।	निवृत्ती ऐसा श्रेष्ठ गुरु । तोहि समाधिसी होय स्थिरू । तरि पुढें काय करणें विचारू । तो सांगावा स्वामिया
६८१४	।।ना.गा.१०२१.००७।।	देव म्हणे ब्रह्मावतारा । या अवघिया चराचरा । श्रेष्ठ तूंचि निर्धारा । मनुष्यरूपें अवतरलासी
६८१५	।।ना.गा.१०२१.००८।।	सकळ हे तुझे व्यापक । चराचर हें त्रैलोक्य । अधर्म जालिया चाळक । अवतार घेती तिघे
६८१६	।।ना.गा.१०२१.००९।।	ऐसें बोले पांडुरंग । सोपान निवाला सर्वांग । म्हणे सांकडें फेडितां श्रीरंग । तूंचि श्री विठ्ठला
६८१७	।।ना.गा.१०२१.०१०।।	नामा म्हणे सोपानदेवें । मागुती स्तुति आदरिली भावें । जेणें करूनियां बरवें । समाधिसेजेची
६८१८	।।ना.गा.१०२२.००१।।	मुक्ताई म्हणे देवा । तूं विसावा सर्वां जीवां । गुण गौरवा अनुभवा । आम्ही जाणों तुज
६८१९	।।ना.गा.१०२२.००२।।	सत्य सत्य जनार्दना । सत्य सत्य नारायणा । सत्य सत्य तूं आमुचें धना । जगज्जीवन जगदाकारा
६८२०	।।ना.गा.१०२२.००३।।	तुझेवांचोनि त्रिभुवनीं। दुजा न देखों नायकों कानीं । वेदशास्त्रपुराणीं । अगाध महिमा तुझा
६८२१	।।ना.गा.१०२२.००४।।	तूं देवा देवोत्तम । योगियांचा विश्राम । शिवाचा ही आत्माराम । ऐसा नेम वेदाचा
६८२२	।।ना.गा.१०२२.००५।।	तरी भक्तांलागीं ऐसा । पावसी तूं हृषिकेशा । तुजविण नाहीं भरवसा। आणिकां देवांचा
६८२३	।।ना.गा.१०२२.००६।।	तूं परत्रीचें तारूं । तुझा आगम निगम विचारू । तुज चिंतलिया संसारू । निरसे हेंचि सत्य
६८२४	।।ना.गा.१०२२.००७।।	देव म्हणे मुक्ताबाई । चित्त समरसें जैं माझ्या ठायीं । तैं तया जन्मचि नाहीं । हें सत्य जाणावें
६८२५	।।ना.गा.१०२२.००८।।	नामा म्हणे ऐसी स्तुति। मुक्ताबाई जंव करिती । तंव संत विनविती । महाविष्णुसी
६८२६	।।ना.गा.१०२३.००१।।	तंव पुंडलिक पुढारला । कर जोडोनि वदला । म्हणे वेदादिकां अबोला । तुझिया रूपाचा
६८२७	।।ना.गा.१०२३.००२।।	तो तूं प्रकट श्रीरंगा । भीमातटीं पांडुरंगा । येउनि आमुचिया लोभा । भक्तजनां तारिसी

६८२८	।।ना.गा.१०२३.००३।।	नेणों कोण भक्तपण । नेणों तुमचें महिमान । कोण तप कोण साधन । कोणें जन्मीं केलें होतें
६८२९	।।ना.गा.१०२३.००४।।	नीरे भिवरेचां संगमीं । चंद्रभागेचां उगमीं । वेणुनाद परब्रह्मीं । गोपाळ गजरें गर्जती
६८३०	।।ना.गा.१०२३.००५।।	तरी स्वामी दयाळा । महाविष्णू गोपाळा । भक्तालागीं कृपाळा । तारावया दासासी
६८३१	।।ना.गा.१०२३.००६।।	माझे करूनियां मिस । राहिलास युगीं अठ्ठावीस । धरूनि सगुण गुणास । माझे भक्ति लोधलासी
६८३२	।।ना.गा.१०२३.००७।।	तूं नियंता ईश्वरमूर्ति । सकळ गोसावी श्रीपती । तुजवांचोनी नेणें मती । दयामूर्ति परब्रह्मा
६८३३	।।ना.गा.१०२३.००८।।	नामा म्हणे पुंडलिका । देवें म्हणती पुण्यश्लोका । स्तुति आदर केला निका । धैर्य विवेक तूंचि होसी
६८३४	।।ना.गा.१०२४.००१।।	मग सारोनी संध्यास्नान । देवभक्ति विष्णुपूजन । पंक्ति आदरिलें आपोशन । मागुती भोजन करिताती
६८३५	।।ना.गा.१०२४.००२।।	धन्य धन्य तूं ज्ञानराजा । तूं आवडलासि केशिराजा । पंक्ति करोनि द्विजा । वाढितसे रुक्मिणी
६८३६	।।ना.गा.१०२४.००३।।	राही रुक्मिणी सत्यभामा । वाढिती पंचामृत उत्तमा । पुंडलिक बोलावुनि साउमा । ज्ञानदेवा पंक्ति बैसविलें
६८३७	।।ना.गा.१०२४.००४।।	निवृत्ती सोपान मुक्ताबाई । गोपाळ देव्हढे दोन्हीं बाहीं । रुक्मिणी सत्यभामा राही । वाढिती अन्नें नानाविधें
६८३८	।।ना.गा.१०२४.००५।।	वैष्णव प्रेमळाचे पंक्तीं । प्रार्थना करितसे श्रीपति । सोपान ज्ञानदेव निवृत्ती । एकवट बैसविले
६८३९	।।ना.गा.१०२४.००६।।	गरुड तिष्ठत होता द्वारीं । त्यासी रुक्मिणी ताट करी । मग गर्जिन्नले जैजैकारीं । गोविंद श्रीराम उच्चारें
६८४०	।।ना.गा.१०२४.००७।।	देव आकाशीं पाहाती । ब्रह्मादिक वंचलों म्हणती । भाग्य केवढें यांचें क्षितीं । या भक्तजनांचें
६८४१	।।ना.गा.१०२४.००८।।	नामा म्हणे आळंकापुर । धन्य धन्य मनोहर । आपण येउनि सारंगधर । समाधि देती ज्ञानदेवा
६८४२	।।ना.गा.१०२५.००१।।	तंव विनवी ज्ञानदेव । सकळांचा जाणोनी ठाव । शुद्ध भक्ति प्रेमळ वैष्णव । सर्वभाव सख्य घेतां
६८४३	।।ना.गा.१०२५.००२।।	बैसोनियां एक आसनीं । देवभक्त चक्रपाणि । तांबुल घेवोनियां वदनीं । सुखसंतोषें बोलती
६८४४	।।ना.गा.१०२५.००३।।	मग पाचारिला गरूड । भक्त पुंडलिक प्रौढ । भक्त सोपान गम्यगूढ । जाणते भक्त
६८४५	।।ना.गा.१०२५.००४।।	केलें प्रयाणासि मुहुर्त । पंढरीस जावयाचें आर्त । संवत्सरा जाऊनि त्वरित । समाधी देऊं सोपाना
६८४६	।।ना.गा.१०२५.००५।।	ऐसा निर्धार करूनि । समस्तां भोजनें सारूनि । सिद्ध जाली माता रुक्मिणी । दिन अस्तमाना गेला
६८४७	।।ना.गा.१०२५.००६।।	जावोनी तया पुष्पकावरी । शयन आरंभिलें हरी । नारद तुंबर वैकुंठाभीतरीं । मंजुळ सुस्वरीं गातसे
६८४८	।।ना.गा.१०२५.००७।।	भक्त भागवत भाग्याचे । तीहीं जयजयकार केला वाचे । ऐसें चतुर प्रहार निशींचे । जागरण हरीचें क्रमिलें
६८४९	।।ना.गा.१०२५.००८।।	नामा म्हणे निघतां हरी । ज्ञानदेवो प्रार्थना करी । देवा तूंचि वैकुंठहरी । आमचा ह्रदयस्थु
६८५०	।।ना.गा.१०२६.००१।।	नामयाचा धरूनि हात । क्षणक्षणा पंढरिनाथ । ज्ञानदेवातें आठवित । कंठ सद्गदित करूनियां
६८५१	।।ना.गा.१०२६.००२।।	उद्धवासी म्हणे पांडुरंग । या सज्जनाचा न व्हावा वियोग । हें ह्रदय होतसे दोन भाग । जाणा अंतरंग तुम्ही माझें
६८५२	।।ना.गा.१०२६.००३।।	त्याविण गोड मज न वाटे । ऐसे जिवलग कैचें भेटे । जे मनींचा वियोग दुःख तुटे । समाधान वाटे ह्रदयामाजीं
६८५३	।।ना.गा.१०२६.००४।।	ज्ञानदेवा ऐसा निधान । नाहीं धुंडितां त्रिभुवन । न सापडे न देखो जाण । तुझी आण उद्धवा

६८५४	।।ना.गा.१०२६.००५।।	धन्य धन्य हे तिघेजण । मुक्ताई मुक्तरूपें पूर्ण । ही उद्धरिलें त्रिभुवन । भवदुःख दारुण नासीलें
६८५५	।।ना.गा.१०२६.००६।।	याचे निपडी पाडे । उपमेसी दीसे थोडे । परी ज्ञानदेवा ऐसें रत्न जोडे । हें न घडे कल्पांतीं
६८५६	।।ना.गा.१०२६.००७।।	माझे जिवींचें गुह्यगुज । हें उद्धवा सांगितलें तुज । कां नामदेव जाणे सहज । आणि सकळ संत सज्जन
६८५७	।।ना.गा.१०२६.००८।।	गुज सांगे रुक्मिणीसी । घडी घडी हृषिकेशी । तंव रुक्मिणीही मानसीं । या जीवलगासी आठवि
६८५८	।।ना.गा.१०२६.००९।।	ज्ञानदेव तरी तुमचा अंश । केवळ स्वयंप्रकाश । स्वात्मसुख निजरहिवास । स्वानंद असे उद्बोध
६८५९	।।ना.गा.१०२६.०१०।।	निवृत्ति तुम्हां नाहीं भिन्नता । त्याचा आत्मा तुम्ही हो । शिव विष्णु आइक्यता । असे स्वभावता मुळींची
६८६०	।।ना.गा.१०२६.०११।।	सोपान तरि पोटींचा । तो प्राण असे तुमचा । तेथें शब्द भिन्नपणाचा । कोठें मिरवेल
६८६१	।।ना.गा.१०२६.०१२।।	संतभक्त सकळ मिळोनि । मस्तक ठेवला श्रीचरणीं । तंव बोले रुक्मिणी । तुम्हापासूनि दुरी नाहींत
६८६२	।।ना.गा.१०२६.०१३।।	नामयानें धरूनि चरण । साष्टांगीं करूनि नमन । म्हणे तूं सर्वांचे स्वानंद जीवन । मी दीन काय बोलों
६८६३	।।ना.गा.१०२७.००१।।	भगवंत म्हणे नामयासी । हें यथार्थ तूं बोलसी । परी क्षणक्षणा गुण आठवती मानसीं । या ज्ञानदेवाचे
६८६४	।।ना.गा.१०२७.००२।।	भक्त ज्ञानी आणि वैरागी । ज्ञानदेवा ऐसा चहुंयुगीं । न शको न देखो याची लागीं । खंती वाटे बहुत
६८६५	।।ना.गा.१०२७.००३।।	उद्धवें चरणावरी ठेउनि माथा । कांहीं एक विनंति जगन्नाथा । ते सांगाजी कृपावंता । गुज अंतरीचें स्वामी
६८६६	।।ना.गा.१०२७.००४।।	निवृत्ति ज्ञान सोपानासी । हे बैसविले जी समाधीसी । मुक्ताईची स्थिती कैसी । तें हृषिकेशी सांगावें
६८६७	।।ना.गा.१०२७.००५।।	मग देव म्हणे तूं काय नेणसी । जरी प्रीतीनें आम्हां पुससी । तरी आइकें गा स्थिती ऐसी । उघडचि बोलों
६८६८	।।ना.गा.१०२७.००६।।	तरी नाथाचा हात ईचा शिरीं । यालागीं ते सत्यसनातन अवधारी । महाकल्पाचा अवसरीं । हि सोडील देह
६८६९	।।ना.गा.१०२७.००७।।	तंववरी तिचे शरीर । अभंग चिरकाळ निरंतर । महद्माया योगिणी साचार । मुक्ताबाई उद्धवा
६८७०	।।ना.गा.१०२७.००८।।	देवगण बैसोनि विमाना । गेले आपुलिया भवना । सकळ महामुनि स्थाना । हरिचरणा वंदोनि
६८७१	।।ना.गा.१०२७.००९।।	म्हणती ज्ञानदेवाच्या प्रसादें । देखिली विठ्ठल चरणारविंदें । रूप पाहातां डोळ्यां दोंदे । निघती स्वानंद सुखाची
६८७२	।।ना.गा.१०२७.०१०।।	तरी ज्ञानदेव हा पायाळ जाण । निवृत्तिदेव तोचि अंजन । सोपान तो नयन । तेथिचे सुखप्राप्ती
६८७३	।।ना.गा.१०२७.०११।।	ऐसें करूनि साधन । साधिलें श्रीविठ्ठल निधान । तेथिचे विभागीं ज्याचें भाग्य पूर्ण । तींही प्रत्यक्ष देखिलें
६८७४	।।ना.गा.१०२७.०१२।।	या निधानासी कुरवंडी । मुक्ताबाई देह भावाची सांडी । मग उभविली गुढी । आनंदाची सर्वकाळ
६८७५	।।ना.गा.१०२७.०१३।।	नामा म्हणे पंढरीसी । चालिले हृषिकेशी । भक्ताचि मांदी देवासरीसी । नाम घोष गर्जत चालिले
६८७६	।।ना.गा.१०२८.००१।।	उगवला दिन प्रभात । स्नान संध्या सारोनी समस्त । उद्धव कर जोडोनी बोलत । पूर्ण आर्त सर्वांचे
६८७७	।।ना.गा.१०२८.००२।।	अनुपम इचा महिमा । न बोलवे जाहली सीमा । आतां चला वेगीं पुरुषोत्तमा । आपले आश्रमा पंढरीसी
६८७८	।।ना.गा.१०२८.००३।।	गरूड सामोरा तिष्टत । भक्त भागवत समस्त । मुनी पुंडलिक विनवित । केले दंडवत साष्टांगे
६८७९	।।ना.गा.१०२८.००४।।	म्हणे ज्ञानदेव यजुर्वेदि । वाग्स्नेहो वाग्बुद्धी । परंपरा याचि वैखरी । यासी मंत्रोक्त दिधली

६८८०	।।ना.गा.१०२८.००५।।	ऐसाचि सोपान मार्ग । तूंचि करितां पांडुरंग । ग्राम लेखनाचा प्रसंग । निरोपिला सांग कुळयाती
६८८१	।।ना.गा.१०२८.००६।।	सकळवंश परंपरा। न सोडावे तुम्ही आचारा । आम्ही जातो पंढरपूरा । या विठोबा सांगाते
६८८२	।।ना.गा.१०२८.००७।।	सकळा आलिंगन दिधले । मग गरुडावरी आरूढले । ज्ञानदेवांनी हरीची पाऊलें । दृढ धरिली निरंतर
६८८३	।।ना.गा.१०२८.००८।।	नामा नाचे हरिद्वारी । आनंद जाला आळंकापुरी । विठ्ठल देवो निघाले पंढरी । ज्ञानदेवा समाधि देवोनि
६८८४	।।ना.गा.१०२९.००१।।	ऐसियांचें चरित्र जो आवडी आईके । तो या भक्ताबरोबरी तुके । भोगी वैकुंठींची निजसुखे । बोलिले मुखें श्रीविठ्ठल
६८८५	।।ना.गा.१०२९.००२।।	धन्य धन्य ते भक्त । ज्या कारणें श्री भगवंत । ऐसे पवाडे करित । विश्व उद्धरी तेणें करूनि
६८८६	।।ना.गा.१०२९.००३।।	जे भाग्याचे होती । त्यासिच हे होय प्राप्ती । ते मागुते न येती पुनरावृत्ती । गर्भवासा
६८८७	।।ना.गा.१०२९.००४।।	नामा म्हणे नामस्मरण । तुटति प्रपंचधरण बंधन । सुख पावती निदान । समचरण देखलिया
६८८८	।।ना.गा.१०३०.००१।।	मंगळमूर्ति सुखधामा । भक्तांचिया कल्पद्रुमा । निवृत्तीचिया पुरुषोत्तमा । नमो तुज
६८८९	।।ना.गा.१०३०.००२।।	विद्यासागरा वैरागरा । संकटीं माउली ज्ञानेश्वरा । भरित दाटलें अंबरा । तो तूं योगेश्वरा मोक्षदायी
६८९०	।।ना.गा.१०३०.००३।।	मति चालविली रसाळ । संत श्रोतियां केला सुकाळ । दिधलें पुरुषार्थाचें बळ । तें तूं केवळ संजीवन
६८९१	।।ना.गा.१०३०.००४।।	अमृतानुभव आनंदलहरी । ग्रंथ सिद्ध केला ज्ञानेश्वरी । संस्कृत प्राकृत वैखरी । वदविली माझी
६८९२	।।ना.गा.१०३०.००५।।	आतां मोक्षाचिया वाटा । पाहिला षड्चक्र चोहटा । आज्ञा द्यावी वैकुंठा । ज्ञानदेव म्हणे
६८९३	।।ना.गा.१०३१.००१।।	आतां पदपदांतराची सेवा । संपादिली स्वामी केशवा । धन्य आमुचिया दैवा । जोडिलां तुम्ही
६८९४	।।ना.गा.१०३१.००२।।	आत्मविद्या बोलावया कारणें । सुख पावले श्रोते सज्जन । आतां जें आरंभिलें मनें । तें आपण सिद्धि न्यावें
६८९५	।।ना.गा.१०३१.००३।।	भूवैकुंठ एक पंढरी । त्याहूनि आगळी आळंकापुरी । सिद्धेश्वरा शेजारीं । इंद्रायणी
६८९६	।।ना.गा.१०३१.००४।।	त्रिपुटी पश्चिम मोक्षाची वाट । प्रत्यक्ष कैलास सिद्धपेठ । गोपाळपुरीं केली गोष्ट । चौघीजणी
६८९७	।।ना.गा.१०३१.००५।।	नलगे कलियुगींचा वारा । जें जें बोलिलों जगदोद्धारा । मागितला थारा । पदीं तुझ्या
६८९८	।।ना.गा.१०३१.००६।।	आतां वैराग्याचें बळ । सिद्धी प्राप्तीचें फळ । ज्ञानदेवें घेतली आळ । जाणा स्थळ आवडीचें
६८९९	।।ना.गा.१०३२.००१।।	अष्टोत्तरशें तीर्थें सारी । ओघें आलीं आळंकापुरीं । वाद्यें वाजताती गजरीं । कीर्तन लहरी अमृताची
६९००	।।ना.गा.१०३२.००२।।	जैसा कस्तुरीचा सुगंधु । अनुभवी न म्हणतीच बद्धु । तैसा औटपिठाचा नादु । आठवी गोविंदु आवडीनें
६९०१	।।ना.गा.१०३२.००३।।	बौद्ध अवतार चक्रपाणि । सत्रावी कळा माय रुक्मिणी । जाणत असे अंत:करणीं । भक्त इच्छा
६९०२	।।ना.गा.१०३२.००४।।	भावें विठ्ठलें केली गोष्टी । ज्ञानदेवें अपूर्व इच्छिलें पोटीं । जावें उठाउठीं । समुदायेंसी
६९०३	।।ना.गा.१०३३.००१।।	विठ्ठल रुक्मिणीसहित गरुड हनुमंत । आणिक संत महंत जमा जाले
६९०४	।।ना.गा.१०३३.००२।।	परिसा भागवत नामा पुंडलिक । पताकासहित उठावले
६९०५	।।ना.गा.१०३३.००३।।	गंधर्व आणि देव आले सुरगण । चाललीं विमानें आळंकापुरीं

६९०६	।।ना.गा.१०३३.००४।।	लहान थोर सारे आले ऋषीश्वर । उतरले भार वैष्णवांचे
६९०७	।।ना.गा.१०३३.००५।।	नामा म्हणे देवा दिसती तांतडी । जाती मज घडी युगा ऐसी
६९०८	।।ना.गा.१०३४.००१।।	पंढरीचा पोहा आला आळंकापुरीं । पंच कोसावरी साधुजन
६९०९	।।ना.गा.१०३४.००२।।	पांडुरंगा संगें वैष्णवांचे भार। दिंड्या ते बाहेर निघाल्यासे
६९१०	।।ना.गा.१०३४.००३।।	पताकांचे भार निघाले बाहेर । भेटती ऋषीश्वर पांडुरंगा
६९११	।।ना.गा.१०३४.००४।।	अवघिया भेटी जाल्या त्या बाहेरी । मग आळंकापुरीं येते जाले
६९१२	।।ना.गा.१०३४.००५।।	सोपानानें मग केला नमस्कार । उतरिले पार पांडुरंगा
६९१३	।।ना.गा.१०३५.००१।।	हरिहरविधाता आले आळंकापुरीं । इंद्रायणी तीरीं एक थाटी
६९१४	।।ना.गा.१०३५.००२।।	योगियांचा सखा कोठें ज्ञानेश्वर । जाती ऋषीश्वर भेटावया
६९१५	।।ना.गा.१०३५.००३।।	शून्याचिया पोटीं निरंजन गुंफा । ज्ञानयज्ञ सोपा सिद्ध केला
६९१६	।।ना.गा.१०३५.००४।।	उन्मनीं निद्रा लागलीसे फार । स्वरूपीं ज्ञानेश्वर जागा जाला
६९१७	।।ना.गा.१०३५.००५।।	नामा म्हणे देवा भली केली बुद्धी । लागली समाधि ज्ञानदेवा
६९१८	।।ना.गा.१०३६.००१।।	लागली उन्मनी वैराग्याची धुणी । जागा निरंजनीं निरंतर
६९१९	।।ना.गा.१०३६.००२।।	भूचरी खेचरी चाचरींच्या छंदें । अगोचरीच्या नादें सहस्र दळीं
६९२०	।।ना.गा.१०३६.००३।।	औटहातध्वनी चित्तवृत्ती जेथें । उजळली ज्योत चैतन्याची
६९२१	।।ना.गा.१०३६.००४।।	नामा म्हणे देवा करा सावधान । नाहीं देहभान ज्ञानदेवा
६९२२	।।ना.गा.१०३७.००१।।	धन्य इंद्रायणी पिंपळाचा पार । धन्य ज्ञानेश्वर पुण्यभूमी
६९२३	।।ना.गा.१०३७.००२।।	धन्य भागिरथी मनकर्णिका वोगा । आणिक हो गंगा त्रिवेणी त्या
६९२४	।।ना.गा.१०३७.००३।।	धन्य ऋषीश्वर धन्य पांडुरंग । मिळाले ते सांग आळंकापुरीं
६९२५	।।ना.गा.१०३७.००४।।	नामा म्हणे धन्य भाग्याचे हे संत । जाला पहा एकांत ज्ञानोबाचा
६९२६	।।ना.गा.१०३८.००१।।	अल्याड पल्याड पताकांचे भार । मध्यें मनोहर इंद्रायणी
६९२७	।।ना.गा.१०३८.००२।।	पिवळ्या पारव्या आणिक हिरव्या । नीळवर्ण साऱ्या लखलखित
६९२८	।।ना.गा.१०३८.००३।।	जरी जर्तारी जाल्या रानभरी । विजा त्यावरी खेळताती
६९२९	।।ना.गा.१०३८.००४।।	सर्पाकार दंड तारांगणावाणी । पताका तिकोनी दाटताती
६९३०	।।ना.गा.१०३८.००५।।	नामा म्हणे तेथें पताकांचे भार । केव्हडें भाग्य थोर ज्ञानोबाचें
६९३१	।।ना.गा.१०३९.००१।।	कैलासाचा वास अधिक सिद्धबेट । विष्णूचें वैकुंठ पुरातन

६९३२	।।ना.गा.१०३९.००२।।	भूमीवरी पंढरी तैसी आळंकापुरी। पंच कोशावरी पुण्यभूमी
६९३३	।।ना.गा.१०३९.००३।।	सुखाची हे मूर्ति नीलकंठलिंग । चक्रतीर्थ सांग मोक्ष भेटे
६९३४	।।ना.गा.१०३९.००४।।	परमार्थ सुअर्थ देखतांची संत । सांगितली मात अनुभवाची
६९३५	।।ना.गा.१०३९.००५।।	नामा म्हणे देवा हें स्थळ चांगलें । चित्त मन रंगलें ज्ञानोबाचें
६९३६	।।ना.गा.१०४०.००१।।	पुसताती संत सांगा देवा मातें । पूर्वी येथें होतें कोण क्षेत्र
६९३७	।।ना.गा.१०४०.००२।।	देव म्हणे स्थळ सिद्ध हें अनादि। येथेंच समाधि ज्ञानदेवा
६९३८	।।ना.गा.१०४०.००३।।	अष्टोत्तरशें वेळां साधिली समाधी । ऐसें हें अनादि ठाव असे
६९३९	।।ना.गा.१०४०.००४।।	नामा म्हणे देवा सांगितलें उत्तम । ज्ञानअंजन सुगम देखों डोळां
६९४०	।।ना.गा.१०४१.००१।।	स्वानंदें देवभक्तां भेटी । वोरसोनि कंठीं आलिंगावें
६९४१	।।ना.गा.१०४१.००२।।	देव म्हणे भले आठवलें तुज । ते हे संधी मज कळली असे
६९४२	।।ना.गा.१०४१.००३।।	पदपदांतरें केला मार्ग सोपा । त्यांत माझी कृपा वोळली असे
६९४३	।।ना.गा.१०४१.००४।।	देव म्हणे तुझी पुरवीन आळी । सुखी राही मंडळी वैष्णवांची
६९४४	।।ना.गा.१०४१.००५।।	नामा म्हणे देवा आज्ञा देगा यासी । नेणूं काय आम्हांसी आरंभिलें
६९४५	।।ना.गा.१०४२.००१।।	उदित जालें मन आतां काय अनुमान । करी शीघ्र प्रस्थान आज्ञा माझी
६९४६	।।ना.गा.१०४२.००२।।	देवाचा हो कर धरोनी ज्ञानेश्वर । निघाला बाहेर योगिराज
६९४७	।।ना.गा.१०४२.००३।।	मागें पुढें संत चालिले मिरवित । कौतुक पहात इहलोकीं
६९४८	।।ना.गा.१०४२.००४।।	नारा विठा गोंदा महादा विरक्त । परसा भागवत उभें तेथें
६९४९	।।ना.गा.१०४२.००५।।	समुदाय वैष्णव मिळालासे भारी । महोत्सव गजरीं आरंभिला
६९५०	।।ना.गा.१०४२.००६।।	नामा म्हणे गुज दाविलें श्रीहरी । धन्य आळंकापुरीं पुण्यभूमी
६९५१	।।ना.गा.१०४३.००१।।	सारासार विचार करिती अवघे जन । हे ज्ञान अंजन दाविलें डोळां
६९५२	।।ना.गा.१०४३.००२।।	पाहिलें गे माय अंतरींचें सुख । वैकुंठनायक उभा असे
६९५३	।।ना.गा.१०४३.००३।।	ज्ञानदेवायोगें सकळांशी दर्शन । परब्रह्म निधान डुल्लतसे
६९५४	।।ना.गा.१०४३.००४।।	वोसंडले देव पाहोनियां प्रेम । डुल्लती सप्रेम अनुभवें
६९५५	।।ना.गा.१०४३.००५।।	अवघे जन कोडें घालिती सांकडें । सांगावें निवाडे नामयाचे
६९५६	।।ना.गा.१०४३.००६।।	देवा म्हणे नामा विचारिलें आम्हां । ते कां संधी तुम्हां कळली नसे
६९५७	।।ना.गा.१०४४.००१।।	देव म्हणे नामया ब्रह्मक्षेत्र आदी । येथेंचि समाधि ज्ञानदेवा

६९५८	।।ना.गा.१०४४.००२।।	चौयुगां आदिस्थळ पुरातन । गेले तें नेमून मुनिजन
६९५९	।।ना.गा.१०४४.००३।।	चालिले सकळ जाले ते विकळ । अनादि हें स्थळ ज्ञानदेवा
६९६०	।।ना.गा.१०४४.००४।।	नामा म्हणे आम्हां सांगितलें हरी । दीर्घध्वनि करी वोसंडोनी
६९६१	।।ना.गा.१०४५.००१।।	खेद दुःख करी मनाचा कळवळा । प्रेमाश्रु डोळां दाटताती
६९६२	।।ना.गा.१०४५.००२।।	नारा विठा गोंदा पाठविला महादा । साहित्या गोविंदा सांगितलें
६९६३	।।ना.गा.१०४५.००३।।	काय काय आणूं सांगा हें प्रमाण । नेमियेला नेम पांडुरंगें
६९६४	।।ना.गा.१०४५.००४।।	तुळसी आणि बेल दर्भ आणि फुलें । उदक हें चांगलें भागिरथीचें
६९६५	।।ना.गा.१०४५.००५।।	नामा म्हणे देवा साहित्य करितां । आठवितें चित्ता खेद दुःख
६९६६	।।ना.गा.१०४६.००१।।	साडेतीन पाउलें टाकिलीं निश्चळ । नेमियलें स्थळ उत्तरायणीं
६९६७	।।ना.गा.१०४६.००२।।	देव म्हणे ज्ञाना होई सावधान। माग वरदान मज कांहीं
६९६८	।।ना.गा.१०४६.००३।।	ज्ञानदेव म्हणे शुद्ध कार्तिक मासीं । व्रत एकादशी स्वामीकडे
६९६९	।।ना.गा.१०४६.००४।।	कृष्णपक्षीं व्रत हरिदिन परिपूर्ण । मागितला मान ज्ञानदेवें
६९७०	।।ना.गा.१०४६.००५।।	नामा म्हणे देवा आवडीनें देतां । जोडलें हें संता पियुष जें
६९७१	।।ना.गा.१०४७.००१।।	वोसंडोनि हरी आनंदला तेथें । पुण्य हें अगणित सांगितलें
६९७२	।।ना.गा.१०४७.००२।।	सर्वांगालागीं न्याहाळिलें परिपूर्ण । केलें निंबलोण आवडीनें
६९७३	।।ना.गा.१०४७.००३।।	आळंकापुरीं कोणी करील कीर्तन । तयालागीं येणें वैकुंठीचें
६९७४	।।ना.गा.१०४७.००४।।	अस्ति नास्ति उदकीं करिल ब्रह्मरूप । कोटी कुळांसहित उद्धरीन
६९७५	।।ना.गा.१०४७.००५।।	जेथें ज्ञानदेव तेथें मी निशिदिनीं । येथें सुखें ज्ञानी डुल्लताती
६९७६	।।ना.गा.१०४७.००६।।	नामा म्हणे आतां वोसंडले हरी । जडमूढावरी कृपा केली
६९७७	।।ना.गा.१०४८.००१।।	वन वृक्ष वल्ली ईश्वरासमान । ऋषि मुनिजन राहाती जेथें
६९७८	।।ना.गा.१०४८.००२।।	होऊनियां पक्षी कपोद कोकिळा। वेष्टियेलें स्थळा ब्रह्मबोधें
६९७९	।।ना.गा.१०४८.००३।।	मृत्तिका पाषाण पंचक्रोशीचे खडे । जाले पहा धडफुडे ब्रह्मरूप
६९८०	।।ना.गा.१०४८.००४।।	पंचमहापातकी गेले आळंकापुरीं । न चाले त्याजवरी काळ यम
६९८१	।।ना.गा.१०४८.००५।।	सांगताती देव ऐकती रुक्मिणी । नामा म्हणे चक्रपाणि वर दिला
६९८२	।।ना.गा.१०४९.००१।।	चक्रतीर्थीं पाहा उभा तो गोपाळ । पुढें विणे टाळ वाजताती
६९८३	।।ना.गा.१०४९.००२।।	स्वर्गींहुनि पुष्पें वर्षती सुरवर। उभें ऋषीश्वर समुदायेंसी

६९८४	।।ना.गा.१०४९.००३।।	आणिक वाद्यें तेथें वाजती अपार । जाती ज्ञानेश्वर समाधीसी
६९८५	।।ना.गा.१०४९.००४।।	नामा म्हणे देवा चुकों नेदी संधी । पोंहोचवितां सिद्धि बाळकासी
६९८६	।।ना.गा.१०५०.००१।।	कोण जाणे माझे जीवींचा कळवळा । प्रेमाश्रु डोळां लोटताती
६९८७	।।ना.गा.१०५०.००२।।	अवघियांचे मन दूषित तटस्थ । लहान थोर संत वोसंडती
६९८८	।।ना.गा.१०५०.००३।।	तारियेले जड बा माझ्या कीर्तनीं । आठवती मनीं गुण तुझे
६९८९	।।ना.गा.१०५०.००४।।	नामा म्हणे येथें बोलवेना मज । जातसे निजगुज आवडीचें
६९९०	।।ना.गा.१०५१.००१।।	काय सांगो देवा ज्ञानोबाची ख्याती । वेद म्हैशामुखीं वदविले
६९९१	।।ना.गा.१०५१.००२।।	कोठवरी वानूं याची स्वरूप स्थिती । चालविली भिंती मृत्तिकेची
६९९२	।।ना.गा.१०५१.००३।।	अविद्या मायेचा लागों नेदी वारा । ऐसें जगदोद्धारा बोलविलें
६९९३	।।ना.गा.१०५१.००४।।	नामा म्हणे यांनीं तारिले पतित । भक्ति केली ख्यात ज्ञानदेवें
६९९४	।।ना.गा.१०५२.००१।।	अनुभव हा सागर गुह्य आणि ब्रह्य । उघडे अध्यात्म बोलियेलें
६९९५	।।ना.गा.१०५२.००२।।	प्रगट हें गुह्य उकलिलें गाबाळ । केलें करतळमळ ज्ञानयानें
६९९६	।।ना.गा.१०५२.००३।।	कोणाची कल्पना नुरेचि बा येथें । उघडा गुह्यार्थ सिद्ध केला
६९९७	।।ना.गा.१०५२.००४।।	करणें न करणें सांगितला पंथ। तिहीं लोकीं कीर्त वाढविली
६९९८	।।ना.गा.१०५२.००५।।	ज्ञान हें अंजन साधी संजीवनी । नामा म्हणे यांनीं ख्याती केली
६९९९	।।ना.गा.१०५३.००१।।	अहंकार पोटींचे उतरिले जहर । केला उपकार जगामाजीं
७०००	।।ना.गा.१०५३.००२।।	कामक्रोध उतें उतरिले दंभ । करपले कोंभ संशयाचे
७००१	।।ना.गा.१०५३.००३।।	विकल्पाचे पायीं घातियेली बेडी । केली तडातोडी इंद्रियांची
७००२	।।ना.गा.१०५३.००४।।	स्वर्गादिक सुखें कमाविलीं रोकडीं । वैकुंठासी शिडी लावियेली
७००३	।।ना.गा.१०५३.००५।।	नामा म्हणे धन्य उभारिल्या ध्वजा । घातियेल्या शेजा सुखधामीं
७००४	।।ना.गा.१०५४.००१।।	कासाविस प्राण मन तळमळी । जैसी कां मासोळी जीवनाविण
७००५	।।ना.गा.१०५४.००२।।	दाही दिशा वोस वाटती उदास । करिताती सोस मनामाजीं
७००६	।।ना.गा.१०५४.००३।।	घातियेली घोण प्राण आला कंठीं । ज्ञानदेवासाठीं तळमळी
७००७	।।ना.गा.१०५४.००४।।	नामा म्हणे देवा वाटतसे खंती । चालली विभूती योगियाची
७००८	।।ना.गा.१०५५.००१।।	नानापरी मन आवरितों भारी । कांहीं केल्या हरि विसर न पडे
७००९	।।ना.गा.१०५५.००२।।	दृश्यादृश्याच्या दूर केल्या गोष्टी । उघडिली दृष्टि ज्ञानदेवें

७०१०	।।ना.गा.१०५५.००३।।	गीतेवरी टीका ग्रंथ केला सार । केवळ ईश्वर ज्ञानाचा हा
७०११	।।ना.गा.१०५५.००४।।	नामा म्हणे आतां देहासी विटला । स्वरूपीं पालटला ज्ञानदेव
७०१२	।।ना.गा.१०५६.००१।।	गंध आणि अक्षता पंचामृत उदक । धूप आणि दीप आणियेले
७०१३	।।ना.गा.१०५६.००२।।	संत सज्जनांचा मिळाला समुदावो । मध्यें ज्ञानदेवो चालतसे
७०१४	।।ना.गा.१०५६.००३।।	क्षेत्र प्रदक्षिणा करावया उद्देशी । मुहूर्त देवापाशीं विचारिला
७०१५	।।ना.गा.१०५६.००४।।	दशमीचे दिवशीं रिघावें बाहेर । हरिदिनीं जागर निशिदिनीं
७०१६	।।ना.गा.१०५६.००५।।	द्वादशी पारणें सोडावें निश्चळ । नेमियेलें स्थळ सिद्धेश्वरीं
७०१७	।।ना.गा.१०५६.००६।।	नामा म्हणे हरी नेमिला सिद्धांत । काय माझा अंत पाहातसां
७०१८	।।ना.गा.१०५७.००१।।	ज्ञानेश्वरापाशीं आनंदी आनंद । नाचतो गोविंद कीर्तनासी
७०१९	।।ना.गा.१०५७.००२।।	दशमीच्या दिवशीं महोत्सव आळंकापुरीं । करितसे हरि आवडीनें
७०२०	।।ना.गा.१०५७.००३।।	हरिदिनीं जागरण होत सारी रात्र । बसोनि पंढरिनाथ स्वयें अंगें
७०२१	।।ना.गा.१०५७.००४।।	द्वादशी पुण्यतिथी केली ज्ञानेश्वरा । पांच दिवस सारा महोत्सव
७०२२	।।ना.गा.१०५७.००५।।	अमावास्ये दिवशीं केला गोपाळकाला । मग वैष्णवाला लाभ मोठा
७०२३	।।ना.गा.१०५७.००६।।	नामा म्हणे देवा आनंद आळंकापुरीं । कांहीं दिवस हरि राहा येथें
७०२४	।।ना.गा.१०५८.००१।।	विनविती संत आणिक सज्जन । नव्हे समाधान कांही केल्या
७०२५	।।ना.गा.१०५८.००२।।	नानाचि प्रकार करितसे घोर । कांहीं केल्या स्थिर चित्त नव्हे
७०२६	।।ना.गा.१०५८.००३।।	काय पाहावें याला विरक्त पुरुषाला । स्वरूपीं मिळाला ज्ञानदेव
७०२७	।।ना.गा.१०५८.००४।।	नामा म्हणे यांचें उचंबळलें प्रेम। म्हणोनि परब्रह्म मागें पुढें
७०२८	।।ना.गा.१०५९.००१।।	निवृत्ति सोपान आणिक मुक्ताई । जाताती पाहीं कोणीकडे
७०२९	।।ना.गा.१०५९.००२।।	देवासी गुह्यार्थ केला पां एकांत । ज्ञानदेवें हित आरंभिलें
७०३०	।।ना.गा.१०५९.००३।।	नामा म्हणे अवघे बसा एकीकडे । ऐकों द्या निवाडे गुज याचें
७०३१	।।ना.गा.१०६०.००१।।	निवृत्ती सोपान मुक्ताई धाकुटी । धरियेली कंठीं पांडुरंगें
७०३२	।।ना.गा.१०६०.००२।।	कळवळिली मनीं करिती दीर्घ ध्वनी । आठविती मनीं ज्ञानदेव
७०३३	।।ना.गा.१०६०.००३।।	विकळ जालें चित्त संत हे दुश्चित । नामा विकळ तेथ होत असे
७०३४	।।ना.गा.१०६१.००१।।	तिघांजणांलागीं केलें समाधान । सांगितली खूण अंतरींची
७०३५	।।ना.गा.१०६१.००२।।	कलियुगीं जग आत्याती करिती । साहवेना कीं यासी कांहीं केल्या

७०३६	।।ना.गा.१०६१.००३।।	पापी उद्धरिले पतित तारिले । जड पाठविलें मोक्षपंथीं
७०३७	।।ना.गा.१०६१.००४।।	नामा म्हणे याचें करितां समाधान । कळलें अंत:करण मन यांचें
७०३८	।।ना.गा.१०६२.००१।।	निसंगासी संग न लगे आणिकाचा । परमार्थ हा साचा गहन केला
७०३९	।।ना.गा.१०६२.००२।।	जड या जीवाचें हरविलें अज्ञान । नेले उतरून भवसिंधु
७०४०	।।ना.गा.१०६२.००३।।	ज्ञानियासि केली सिंधुसंजीवनी । जालें जनीं वनीं एक तारूं
७०४१	।।ना.गा.१०६२.००४।।	नामा म्हणे सत्य बा माझ्याचें बोलणें । करी निंबलोण पदीं त्यांचें
७०४२	।।ना.गा.१०६३.००१।।	फार आठवतें निवृत्तीचे चित्तीं । सोपान स्फुंदती मुक्ताबाई
७०४३	।।ना.गा.१०६३.००२।।	आम्हां माता पिता नित्य ज्ञानेश्वर । नाहीं आतां थार विश्रांतीसी
७०४४	।।ना.गा.१०६३.००३।।	छळिलें ब्राह्मणें प्रतिष्ठानीं जातां । रेड्यामुखीं वेदांता बोलविलें
७०४५	।।ना.गा.१०६३.००४।।	आला चांगदेव व्याघ्र वाहन घेऊन । नेला अभिमान ज्ञानदेवें
७०४६	।।ना.गा.१०६३.००५।।	नाना प्रकारचे आठविती शब्द । नामा म्हणे बोध भाविकाला
७०४७	।।ना.गा.१०६४.००१।।	देव म्हणे असे आठवाल फार । लागे उशीर समाधीसी
७०४८	।।ना.गा.१०६४.००२।।	रुक्माबाई म्हणे याजलागीं जाण। ब्रह्मीं ब्रह्म खूण मेळविली
७०४९	।।ना.गा.१०६४.००३।।	अवतार हे चौघे जाले कैशापरी । सांगा आम्हां हरी उकलोनी
७०५०	।।ना.गा.१०६४.००४।।	शिव तो निवृत्ती सोपान ब्रह्मस्थिती । ज्ञानदेव मूर्ति विष्णूची हो
७०५१	।।ना.गा.१०६४.००५।।	ब्राह्मणी हे कळा माय मुक्ताबाई । विचारुनि पाही स्वयं मुक्त
७०५२	।।ना.गा.१०६४.००६।।	नामा म्हणे याला नाही पां उपाधी । पूर्ण हे समाधि ज्ञानदेवा
७०५३	।।ना.गा.१०६५.००१।।	अंतर बाहेर कळलें स्वरूप । स्वयें नंदादीप उजळिला
७०५४	।।ना.गा.१०६५.००२।।	येणें जाणें कोठें योगी पहा अवीट। सान वैकुंठ करूनि ठेवी
७०५५	।।ना.गा.१०६५.००३।।	ज्ञानियाला मरण म्हणती अज्ञान । वायां तुम्ही शीण करूं नका
७०५६	।।ना.गा.१०६५.००४।।	घटाचिया योगें प्रतिबिंब भासे । काय म्हणे नासे निरालंब
७०५७	।।ना.गा.१०६५.००५।।	दर्पणाचे योगें दुसरें देखणें । काय मुखें दोन त्यांसी जालीं
७०५८	।।ना.गा.१०६५.००६।।	दृश्याचियामुळें जीव दिसे येथें । काय पां परमार्थ विटंबले
७०५९	।।ना.गा.१०६५.००७।।	तंतूचियामुळें पटाला विस्तार । काय निराकार वायां गेलें
७०६०	।।ना.गा.१०६५.००८।।	रखुमादेवीवरें केलें समाधान । नामा म्हणे मौन धरूनि ठेलें
७०६१	।।ना.गा.१०६६.००१।।	छत्र चामरें उभा सन्मुख भोंवती । रुक्माईचा पति मध्यभागीं

७०६२	।।ना.गा.१०६६.००२।।	निंबें आणि नारळ गोण्याचीं पोफळें । उदंड तिहीं केळें आणियलीं
७०६३	।।ना.गा.१०६६.००३।।	आणिक बहुता परी घेतली सामुग्री । पीत पीतांबरी मृगछाला
७०६४	।।ना.गा.१०६६.००४।।	भगवीं आभरणें घेतलें भस्म । अंगें परब्रह्म साह्य त्यासी
७०६५	।।ना.गा.१०६६.००५।।	नामा म्हणे स्वामी तिष्ठताती अंगें । मेळविली सांगें साहित्यासी
७०६६	।।ना.गा.१०६७.००१।।	उगमापासुनी गंगा सागरासी गेली । काय दोन जालीं उदकें त्यांची
७०६७	।।ना.गा.१०६७.००२।।	तैसा ज्ञानदेव जाला अनुभव । काय आम्हां देव दुरावला
७०६८	।।ना.गा.१०६७.००३।।	सरिता सरोवराचे एके ठायीं झरे । लहान थोर सारे स्वरूपीं माझ्या
७०६९	।।ना.गा.१०६७.००४।।	रुक्मादेवीवरें उघविलें गाबाळ । संत कृपाळ डुल्लताती
७०७०	।।ना.गा.१०६७.००५।।	नामा म्हणे येणें मोहिलें चित्त । राहिले तटस्थ चौघेंजण
७०७१	।।ना.गा.१०६८.००१।।	आणिक वाद्यें तेथें वाजताती अपार । उठावले भार वैष्णवांचे
७०७२	।।ना.गा.१०६८.००२।।	चिद्रत्नमंडप दिसला कल्लोळ। जैसे दीपमाळ दीप ठेले
७०७३	।।ना.गा.१०६८.००३।।	नक्षत्र गोंधळ उसळती भारी । चक्रें त्याजवरी उल्लाळती
७०७४	।।ना.गा.१०६८.००४।।	मोतियें तोरणें लाविलीं अपार । झळकती तारे विभु ऐसे
७०७५	।।ना.गा.१०६८.००५।।	नामा म्हणे देवा नवल केलें गहन । पुंजाळिलें गगन ज्ञानदेवें
७०७६	।।ना.गा.१०६९.००१।।	निवृत्ति ज्ञानदेव उभे दोहींकडे । सोपान तो पुढें मुक्ताबाई
७०७७	।।ना.गा.१०६९.००२।।	देहुडे सुरगण थक्क पडिलें लोकां । सुरू केला डंका वैकुंठींचा
७०७८	।।ना.गा.१०६९.००३।।	चक्रतीर्थीं उभे देव साधुजन । करविलें स्नान ज्ञानदेवा
७०७९	।।ना.गा.१०६९.००४।।	देवाचें हें तीर्थ घेतले ज्ञानेश्वरें । केला नमस्कार पादपद्मीं
७०८०	।।ना.गा.१०६९.००५।।	विठ्ठल रुक्मिणी ऋषि सुरवर । पूजा ज्ञानेश्वर करितसे
७०८१	।।ना.गा.१०६९.००६।।	नामयाच्या हातीं गंध अक्षता । पूजा महंता मान्य जाली
७०८२	।।ना.गा.१०७०.००१।।	टाळ विणे मृदंग वाजती अपार । नारद तुंबर गीत गाती
७०८३	।।ना.गा.१०७०.००२।।	शुक वामदेव अंबऋषि सादर । मध्ये ज्ञानेश्वर ब्रह्मरूप
७०८४	।।ना.गा.१०७०.००३।।	पिपिलिकेसी मार्ग जावया न मिळे । जाती भार मेळे वैष्णवांचे
७०८५	।।ना.गा.१०७०.००४।।	नामा म्हणे देवा दाविली नवाळी । पुरविली आळी ज्ञानोबाची
७०८६	।।ना.गा.१०७१.००१।।	दशमीचे दिवशीं केली प्रदक्षिणा । आणिक कीर्तना संत उभे
७०८७	।।ना.गा.१०७१.००२।।	रात्रंदिवस त्यांही केला हरिजागर । हरिदिनीं थोर कृष्णपक्षीं

७०८८	।।ना.गा.१०७१.००३।।	मग केलें स्नान भागिरथीचे तीरीं । संत महंता भारी पूजियेलें
७०८९	।।ना.गा.१०७१.००४।।	अवलोकिलें डोळां अंतर बाहेरी । मग सिद्धेश्वरीं येते झाले
७०९०	।।ना.गा.१०७१.००५।।	सिद्धेश्वरालागीं पूजिले निवळ । मागितलें स्थळ समाधिसी
७०९१	।।ना.गा.१०७१.००६।।	गंगा आणि गिरजा नीलकंठ ईश्वर । केला नमस्कार नामा म्हणे
७०९२	।।ना.गा.१०७२.००१।।	अष्टोत्तरशें वेळ समाधि निश्चळ । पूर्वी तुझें स्थळ वाहनाखालीं
७०९३	।।ना.गा.१०७२.००२।।	उठविला नंदी शिवाचा ढवळा । उघडिली शिळा विवराची
७०९४	।।ना.गा.१०७२.००३।।	आसन आणि धुनि मृगछालावर । पाहाती ऋषीश्वर वोसंडोनि
७०९५	।।ना.गा.१०७२.००४।।	बा माझी समाधि पाहिली जुनाट। केवळ वैकुंठ गुह्यगोप्य
७०९६	।।ना.गा.१०७२.००५।।	नामा म्हणे देवा पुरातन स्थान । ऐसें नारायणें दावियेलें
७०९७	।।ना.गा.१०७३.००१।।	नारा विठा गोंदा महादा पाठविला । झाडविली जागा समाधीची
७०९८	।।ना.गा.१०७३.००२।।	हरिदिनीं जागर केला निशीदिनी । उदईक पारणीं द्वादशीचीं
७०९९	।।ना.गा.१०७३.००३।।	गंगा गिरजा राही रुक्माबाई भामा । उठिल्या रांधण्या पारण्याच्या
७१००	।।ना.गा.१०७३.००४।।	नाना प्रकारचे पाक ते अपार । मुनि ऋषीश्वर बोलाविले
७१०१	।।ना.गा.१०७३.००५।।	वैष्णव देव आणि आले सुरगण । करोनियां स्नान इंद्रायणी
७१०२	।।ना.गा.१०७३.००६।।	पिंपळाचे पारीं बैसविल्या पंक्ती । पात्रें तें श्रीपती वाढूं लागे
७१०३	।।ना.गा.१०७३.००७।।	नामा म्हणे देवा करणें साहित्यासी । येतो कासाविसी प्राण माझा
७१०४	।।ना.गा.१०७४.००१।।	सोवळ्यानें हरी वाढतो सकळां । मनीचा कळवळा कोण जाणे
७१०५	।।ना.गा.१०७४.००२।।	रुक्माईचे कानीं सांगितली गोष्ट । विस्तारावें ताट ज्ञानदेवा
७१०६	।।ना.गा.१०७४.००३।।	राही रुक्माबाई वाढिती आवडीनें । सोडितो पारणें ज्ञानदेव
७१०७	।।ना.गा.१०७४.००४।।	नामा म्हणे देवा परब्रह्म अन्न । जातो बोलावण ज्ञानदेवा
७१०८	।।ना.गा.१०७५.००१।।	निवृत्ति सोपान मुक्ताई चवथी । अनेक विभूति ज्ञानेश्वरा
७१०९	।।ना.गा.१०७५.००२।।	नामा पुंडलिक गरूड हनुमंत। परसा भागवता बोलविलें
७११०	।।ना.गा.१०७५.००३।।	विठ्ठल रुक्माई सत्यभामा राही । इतुकें तयेठायीं जमा जाल्या
७१११	।।ना.गा.१०७५.००४।।	विसोबा खेचर चांगा वटेश्वर । सांवता कुंभार एके ठायीं
७११२	।।ना.गा.१०७५.००५।।	गंगा गिरजा दोघी नीळकंठ ईश्वर । मध्यें ज्ञानेश्वर घेतियेला
७११३	।।ना.गा.१०७६.००१।।	निवृत्ति मुक्ताईचें करिती समाधान । घेतला सोपान मध्यभागीं

७११४	।।ना.गा.१०७६.००२।।	ऐक्य आहिक्याची बैसली एकवटे । विस्तारिलीं ताटें रुक्माईनें
७११५	।।ना.गा.१०७६.००३।।	एक एकालागीं देताती प्रसाद । आतां ज्ञानराज पाहूं डोळां
७११६	।।ना.गा.१०७६.००४।।	नामा म्हणे स्वस्थ जेवितां पंगती । घृतपात्र हातीं विस्तारितु
७११७	।।ना.गा.१०७७.००१।।	ज्ञानदेवालागीं चंदनाची उटी । पंचारती होती आनंदाच्या
७११८	।।ना.गा.१०७७.००२।।	गंध आणि अक्षता पुष्पपरिमळा। घेती वोसंगळा नामदेव
७११९	।।ना.गा.१०७७.००३।।	ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळा । माळा घाली गळां नामदेव
७१२०	।।ना.गा.१०७८.००१।।	जेवूनियां स्वस्थ उठिले परिपूर्ण । केलें आचमन वैष्णवांनीं
७१२१	।।ना.गा.१०७८.००२।।	वैकुंठींचा प्रसाद पावेल निवाडे । गोंदा महादा विडे वांटिताती
७१२२	।।ना.गा.१०७८.००३।।	दोन प्रहरपावेतों आटोपलें भोजन । तृतीय प्रहरीं कीर्तन आरंभिलें
७१२३	।।ना.गा.१०७८.००४।।	कीर्तनाच्या नादें मोहिला गोविंद । करावा उद्योग समाधीचा
७१२४	।।ना.गा.१०७८.००५।।	नामा म्हणे देवा करितां उशिर । विकळ ज्ञानेश्वर जात असे
७१२५	।।ना.गा.१०७९.००१।।	मुगुट मनोहर कुंडलें मकाराकार । कांसे पीतांबर कसियेला
७१२६	।।ना.गा.१०७९.००२।।	खोविले गोशे स्वार गरुडावर। उठविले भार वैष्णवांचे
७१२७	।।ना.गा.१०७९.००३।।	केलें आचमन तीर्थीं त्या तांतडी । आले उठाउठी सिद्धेश्वरीं
७१२८	।।ना.गा.१०७९.००४।।	परमार्थ स्वार्थ जाल्या गुह्य गोष्टी । होताती भेटी ज्ञानदेवा
७१२९	।।ना.गा.१०७९.००५।।	नामा म्हणे भेटा लहान थोर सारे । जातो ज्ञानेश्वर समाधीसी
७१३०	।।ना.गा.१०८०.००१।।	ब्रह्मादिक तेथें करिताती पूजा । घालिताती सेजा समाधीसी
७१३१	।।ना.गा.१०८०.००२।।	चिद्रत्न आसन उन्मनीची धुनी । समाधि सज्जनीं पाहियेली
७१३२	।।ना.गा.१०८०.००३।।	धुवट वस्त्राची घडी ते अमोल । तुळसी आणि बेल आंथरिले
७१३३	।।ना.गा.१०८०.००४।।	दुर्वा दर्भ वरी टाकिले मोकळे । पुष्पें तीं सकळें समर्पिलीं
७१३४	।।ना.गा.१०८०.००५।।	नामा म्हणे येथें छाया निरंतर । सुखी ज्ञानेश्वर सुखावला
७१३५	।।ना.गा.१०८१.००१।।	लावियेला दीप निरंजन ज्योति । प्रकाशल्या दीप्ती तन्मयाच्या
७१३६	।।ना.गा.१०८१.००२।।	पूजूनि समाधि निघाले बाहेर । प्रेमें ज्ञानेश्वर डुल्लतसे
७१३७	।।ना.गा.१०८१.००३।।	अनुमानिलें स्थळ सभोंवतीं सारे । धन्य ज्ञानेश्वरें कृपा केली
७१३८	।।ना.गा.१०८१.००४।।	देवा आणि नामा रुक्माई राही । स्फुंदती ठायीं ठायीं संतजन
७१३९	।।ना.गा.१०८२.००१।।	निवृत्ती सोपान पुढें मुक्ताबाई । देवा सांगा कांहीं निजगुज

७१४०	।।ना.गा.१०८२.००२।।	देव ज्ञानेश्वर बैसले जवळीं । घेतियेली आळी सोपानानें
७१४१	।।ना.गा.१०८२.००३।।	ज्ञानदेवें खूण सांगितली देवा । पूर्ण तूं विसांवा सज्जनांचा
७१४२	।।ना.गा.१०८२.००४।।	सोपानाचे हात देवाचिये हातीं । तेव्हां आपमूर्ति कासाविस
७१४३	।।ना.गा.१०८२.००५।।	म्लान वदनें निवृत्ति सद्गुरु सागर । येऊनि ज्ञानेश्वर चरणीं लागे
७१४४	।।ना.गा.१०८२.००६।।	नामा म्हणे याचे अंतर परिपूर्ण । नाहीं देहीं भान निवृत्तीसी
७१४५	।।ना.गा.१०८३.००१।।	पांडुरंग निवृत्ति उभे दोघेजण । आरंभिलें नमन ज्ञानदेवें
७१४६	।।ना.गा.१०८३.००२।।	नामा पुंडलिक उभे दोहोंकडे । ज्ञानराज पुढें उभे ठेले
७१४७	।।ना.गा.१०८३.००३।।	गंध आणि अक्षता पुष्प परिमळ । आणियेले जळ भागिरथीचें
७१४८	।।ना.गा.१०८३.००४।।	अनंत स्वरूपाचीं अनंत ही नांवें । नमन ज्ञानदेवें आरंभिलें
७१४९	।।ना.गा.१०८३.००५।।	नामा म्हणे देवा नमनाची रीती । नमन सर्वांभूतीं मान्य जालें
७१५०	।।ना.गा.१०८४.००१।।	पुढें ज्ञानेश्वर जोडोनियां कर । बोलतो उत्तर स्वामिसंगें
७१५१	।।ना.गा.१०८४.००२।।	पाळिलें पोसिलें चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा
७१५२	।।ना.गा.१०८४.००३।।	स्वामीचिया योगें जालों स्वरूपाकार । उतरलों पार मायानदी
७१५३	।।ना.गा.१०८४.००४।।	निवृत्तीनें हात उतरिला वदना । त्यागिलें निधाना आम्हालागीं
७१५४	।।ना.गा.१०८४.००५।।	नामा म्हणे देवा देखवेना मज । ब्रह्मीं ज्ञानराज मेळविला
७१५५	।।ना.गा.१०८५.००१।।	वोसंडोनि निवृत्ति आलिंगों लागला । आणिकांच्या डोळां अश्रु येती
७१५६	।।ना.गा.१०८५.००२।।	अमर्यादा कधीं केली नाहीं येणें । शिष्य गुरूपण सिद्धी नेलें
७१५७	।।ना.गा.१०८५.००३।।	गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा । गुह्यगौप्यमाळा लेवविल्या
७१५८	।।ना.गा.१०८५.००४।।	फेडिलीं डोळ्यांचीं अत्यंत पारणीं । आतां ऐसें कोणी सखे नाहीं
७१५९	।।ना.गा.१०८५.००५।।	काढोनियां गुह्य वेद केले फोल । आठवती बोल मनामाजीं
७१६०	।।ना.गा.१०८५.००६।।	नामा म्हणे संत कासावीस सारे । लाविती पदर डोळियांसी
७१६१	।।ना.गा.१०८६.००१।।	देव म्हणे ऐसें आठवाल कोठवर । होईल उशीर समाधीशी
७१६२	।।ना.गा.१०८६.००२।।	निरंजनीं समाधि निरंतर तुम्हांसी । व्यर्थ कासाविसी होऊं नये
७१६३	।।ना.गा.१०८६.००३।।	निवृत्तीसी पोटीं धरिलें देवानें । केलें समाधान अवघियांचें
७१६४	।।ना.गा.१०८६.००४।।	ब्रह्मणि ही कळा पुढें मुक्ताबाई । देवा सांगा कांहीं आम्हांलागीं
७१६५	।।ना.गा.१०८६.००५।।	देव म्हणे तुज येणें जाणें नाहीं । अनुभवोनि पाही जीवन्मुक्ती

७१६६	।।ना.गा.१०८६.००६।।	म्हणे मुक्ताई सख्या ज्ञानेश्वरा । प्रार्थना तुम्ही करा देवालागीं
७१६७	।।ना.गा.१०८६.००७।।	ज्ञानदेवें वचन घातलें देवांवर । विश्वाचें मनोर पांडुरंग
७१६८	।।ना.गा.१०८६.००८।।	नामा म्हणे स्वामि प्रेमाचिया रंगें । बोलावणें स्वांगें करूं आम्ही
७१६९	।।ना.गा.१०८७.००१।।	ज्ञानदेवें देवा घातलें वचन । करा समाधान सोपानाचें
७१७०	।।ना.गा.१०८७.००२।।	समुदायेसीं तुम्हां करूं बोळवण । ऐसाचि सोपान ब्रह्मकरू
७१७१	।।ना.गा.१०८७.००३।।	तीर्थावळी वेळें नेमियलें स्थान । तेथें पोचविणें मजलागीं
७१७२	।।ना.गा.१०८७.००४।।	विठ्ठल रुक्माई उभी समाधान । दिधलें वचन ज्ञानदेवा
७१७३	।।ना.गा.१०८७.००५।।	नामा म्हणे देवा स्थिरावलें मन । करितां समाधान अवघियांचें
७१७४	।।ना.गा.१०८८.००१।।	निवृत्तिदेव म्हणे सांगतो या वाचे । राहाणें चौघांचें एकरूप
७१७५	।।ना.गा.१०८८.००२।।	त्रिवेणीचा ओघ जैसा एके ठायीं । तैसी मुक्ताबाई आम्हांमध्यें
७१७६	।।ना.गा.१०८८.००३।।	ब्रह्माविष्णुहर जैसे एके ठायीं । तैसी मुक्ताबाई आम्हांमध्ये
७१७७	।।ना.गा.१०८८.००४।।	रज तम गुण सत्व गुणाठायी । तैसी मुक्ताबाई आम्हांमध्ये
७१७८	।।ना.गा.१०८८.००५।।	भूचरी खेचरी चांचरी ते पाही । अगोचरा ठायीं मुक्तगंगा
७१७९	।।ना.गा.१०८८.००६।।	प्रथम ज्ञानेश्वरें काढियेली वाट । धरियेलें वैकुंठ आळंकापुरीं
७१८०	।।ना.गा.१०८८.००७।।	इंद्रनीळ पर्वत नेमिला सोपाना । निवृत्तीसी जाणा त्रिंबकेश्वर
७१८१	।।ना.गा.१०८८.००८।।	चौथी मुक्ताबाई नेमियली तापी । नामा म्हणे ख्याती केली यांनीं
७१८२	।।ना.गा.१०८९.००१।।	निवृत्तिदेव म्हणे करितां समाधान । कांहीं केल्या मन राहात नाहीं
७१८३	।।ना.गा.१०८९.००२।।	बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती
७१८४	।।ना.गा.१०८९.००३।।	बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे
७१८५	।।ना.गा.१०८९.००४।।	हरिणीविण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडसें भ्रमताती
७१८६	।।ना.गा.१०८९.००५।।	मायबापें आम्हां त्यागियेलें जेव्हां । ऐसें संकट तेव्हां जालें नाहीं
७१८७	।।ना.गा.१०८९.००६।।	नामा म्हणे देवा पेटला हुताशन । करा समाधान निवृत्तीचें
७१८८	।।ना.गा.१०९०.००१।।	देव रुक्माबाई आणिक साधुजन । करिती समाधान निवृत्तीचें
७१८९	।।ना.गा.१०९०.००२।।	ज्ञानियांनीं ऐसी करावी जंव खंती। अज्ञानाचा किती पाड आला
७१९०	।।ना.गा.१०९०.००३।।	धन्य तुमचा महिमा बोलती पुराणीं । दृश्य कांहीं मनीं आठवूं नये
७१९१	।।ना.गा.१०९०.००४।।	आकाशाचे ठायीं अभ्रें येती जाती । कोण त्याची खंती करूं पाहे

७१९२	।।ना.गा.१०९०.००५।।	अवतारादिक गेले आले अपार । जैसा का विस्तार मृगजळाचा
७१९३	।।ना.गा.१०९०.००६।।	नामा म्हणे देवें धरियेलें हातीं । उठविली विभूति निवृत्तिराज
७१९४	।।ना.गा.१०९१.००१।।	गरुड हनुमंत मुक्ताई सोपान । देव साधुजन आनंदले
७१९५	।।ना.गा.१०९१.००२।।	मागें पुढें संत पताकांचे भार । मध्यें ज्ञानेश्वर मिरवतो
७१९६	।।ना.गा.१०९१.००३।।	टाळ आणि विणे मृदंग गायन । करिती कीर्तन सुस्वरेंसी
७१९७	।।ना.गा.१०९१.००४।।	जयजयकार ध्वनि करिती सुरगण । वर्षती सुमन स्वर्गींहुनी
७१९८	।।ना.गा.१०९१.००५।।	हरिपाठ गजर करिती अपार । नामा म्हणे भार उठविले
७१९९	।।ना.गा.१०९२.००१।।	सर्व स्वस्ति क्षेम वैष्णव मंडळी । बैसलेती पाळी समाधीच्या
७२००	।।ना.गा.१०९२.००२।।	पताकांची छाया दुणावली फार । सिद्ध ज्ञानेश्वर तेव्हां जालें
७२०१	।।ना.गा.१०९२.००३।।	अजानवृक्षदंड आरोग्य अपार । समाधीसमोर स्थापियेला
७२०२	।।ना.गा.१०९२.००४।।	कोरड्या काष्टीं फुटियेला पाला । तेव्हां अवघियाला नमस्कारी
७२०३	।।ना.गा.१०९२.००५।।	नामा म्हणे देवा घार गेली उडोन । बाळें दाणादाण पडियेलीं
७२०४	।।ना.गा.१०९३.००१।।	मुंग्यांचिये विवरीं लागलीसे आग । पुढें आणि मागें जालें नाहीं
७२०५	।।ना.गा.१०९३.००२।।	राही रुक्माई आणि सत्यभामा । ओवाळिती प्रेमा ज्ञानेश्वरा
७२०६	।।ना.गा.१०९३.००३।।	उभारिल्या गुढिया आणि तोरणें । छाया सुदर्शन धरियेलें
७२०७	।।ना.गा.१०९३.००४।।	नारा विठा गोंदा भेटला महादा । उभे जागोजागा राहिलेती
७२०८	।।ना.गा.१०९३.००५।।	विसोबा खेचर चांगा वटेश्वर । केला नमस्कार अवघियांनीं
७२०९	।।ना.गा.१०९३.००६।।	गोरा कुंभार सांवता माळी । नामा तळमळी वत्सा ऐसें
७२१०	।।ना.गा.१०९४.००१।।	परसा भागवतें केला नमस्कार । सारे लहान थोर जमा जाले
७२११	।।ना.गा.१०९४.००२।।	सकळांचिया पायीं नमियलें नमना । केली प्रदक्षिणा समाधीसी
७२१२	।।ना.गा.१०९४.००३।।	प्रथम पायरी बाहेरील जेथ । उभा पंढरीनाथ भेटावया
७२१३	।।ना.गा.१०९४.००४।।	देव म्हणे बापा अमृत नेदी पाट । फार केले कष्ट जगासाठीं
७२१४	।।ना.गा.१०९४.००५।।	नामा म्हणे यांनीं अनुभवाच्या नौका । पार केलें लोकां जडमूढां
७२१५	।।ना.गा.१०९५.००१।।	देव निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर । जातो ज्ञानेश्वर समाधीसी
७२१६	।।ना.गा.१०९५.००२।।	नदीचिया माशा घातलें माजवण । तैसें जनवन कालवलें
७२१७	।।ना.गा.१०९५.००३।।	दाही दिशा धुंद उदयास्ताविण । तैसेंचि गगन कालवलें

७२१८	।।ना.गा.१०९५.००४।।	जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली
७२१९	।।ना.गा.१०९५.००५।।	ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा । पादपद्मीं ठेवा निरंतर
७२२०	।।ना.गा.१०९५.००६।।	तीन वेळां जेव्हां जोडिलें करकमळ । झांकियेले डोळे ज्ञानदेवें
७२२१	।।ना.गा.१०९५.००७।।	भीममुद्रा डोळा निरंजनीं लीन । जालें ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव
७२२२	।।ना.गा.१०९५.००८।।	नामा म्हणे आतां लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ
७२२३	।।ना.गा.१०९६.००१।।	निवृत्तीनें बाहेर आणिले गोपाळा । घातियेली शिळा समाधीसी
७२२४	।।ना.गा.१०९६.००२।।	सोपान मुक्ताई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीसी
७२२५	।।ना.गा.१०९६.००३।।	आणिकांचीं तेथें उद्विग्न तीं मनें । घालिताती सुमनें समाधीसी
७२२६	।।ना.गा.१०९६.००४।।	नामदेवें भावें केली असे पूजा । बापा ज्ञानराजा पुण्यपुरुषा
७२२७	।।ना.गा.१०९७.००१।।	अवघी जयजयकारें पिटियेली टाळी । उठली मंडळी वैष्णवांची
७२२८	।।ना.गा.१०९७.००२।।	सह मंडळी सारे उठले ऋषीश्वर । केला नमस्कार समाधीशी
७२२९	।।ना.गा.१०९७.००३।।	पंचद्वारें संत रिघाले बाहेर । सखा ज्ञानेश्वर आळंकापुरीं
७२३०	।।ना.गा.१०९७.००४।।	इंद्रायणी केलें अवघ्यांही आचमन । करिती समाधान निवृत्तीचें
७२३१	।।ना.गा.१०९७.००५।।	सोपानासी पोटीं धरिलें देवानें । संवत्सरगांवीं जाणें नेम केला
७२३२	।।ना.गा.१०९७.००६।।	मुक्ताबाईलागीं सांगितली खूण । जाय तो सोपान स्थिर असा
७२३३	।।ना.गा.१०९७.००७।।	त्रिवर्ग तीं ऐसीं राहिलीं एकमनें । जाणोनियां खूण नामा म्हणे
७२३४	।।ना.गा.१०९८.००१।।	देवसमागमें परतले भार । केला हरिगजर समाधीसी
७२३५	।।ना.गा.१०९८.००२।।	नव दिवस संत समाधीजवळी । देव चंद्रमौळी कीर्तनासी
७२३६	।।ना.गा.१०९८.००३।।	शुद्धमार्गेसर दशमी भोजनें । विधि नारायणें संपादिली
७२३७	।।ना.गा.१०९८.००४।।	एकादशीं कीर्तन द्वादशीं पारणीं। मग ऋषि मुनि संतोषले
७२३८	।।ना.गा.१०९८.००५।।	त्रयोदशीं देव रिघाले बाहेरी । धन्य आळंकापुरीं ज्ञानराज
७२३९	।।ना.गा.१०९८.००६।।	नामा म्हणे धन्य पलाटण पाउलीं । पंचक्रोश ठेलीं सकळ तीर्थें
७२४०	।।ना.गा.१०९९.००१।।	धन्य आळंकापुरी शिवपीठ शिवाचें। अगस्ति ऋषीचें पूर्वस्थळ
७२४१	।।ना.गा.१०९९.००२।।	त्रिवर्गीं म्हणितलें जातां जातां हरी । आम्हां कौंडण्यपुरीं आज्ञा द्यावी
७२४२	।।ना.गा.१०९९.००३।।	इंद्रनीळ पर्वत नेमिला सोपान देवा । तोंवरी करूं सेवा अंबिकेची
७२४३	।।ना.गा.१०९९.००४।।	देव म्हणे भलें आरंभिलें तुम्हीं । आज्ञा घेतो आम्ही पंढरीसी

७२४४	।।ना.गा.१०९९.००५।।	इंद्रनीळ पर्वतीं समाधि सोपान । सर्वत्र आमंत्रण देवें दिलें
७२४५	।।ना.गा.१०९९.००६।।	देवभक्तालागीं जालें समाधान । मग सुरगण आंवतिले
७२४६	।।ना.गा.१०९९.००७।।	नामा पुंडलिक निघाले बाहेरी । गरुडावरी देव स्वार जाले
७२४७	।।ना.गा.११००.००१।।	समाधि परिपूर्ण बैसले ज्ञानेश्वर । उठविले भार वैष्णवांचे
७२४८	।।ना.गा.११००.००२।।	आळंकापुरीं सव्य घेतली ते संतीं । दिली भागीरथी ज्ञानालागीं
७२४९	।।ना.गा.११००.००३।।	भैरवापासुनि उगम निरंतर वाहती । रानोमाळ झरे तीर्थ गंगा
७२५०	।।ना.गा.११००.००४।।	सैंघ इंद्रायणी वाहाती मिळोनी । अखंड क्षणीं ओघ जाती
७२५१	।।ना.गा.११००.००५।।	चालिले विमान गंधर्व सुरगण । यात्रा परिपूर्ण जाली म्हणती
७२५२	।।ना.गा.११००.००६।।	तीर्थ महोत्साह जाला सारासार । देव ऋषीश्वर परतले
७२५३	।।ना.गा.११००.००७।।	वैष्णवांचें भार निघाले बाहेर । केला जयजयकार सर्वत्रांनीं
७२५४	।।ना.गा.११००.००८।।	पंढरीचा पोहा निघाला बाहेर । गरुडावरी स्वार देव जाले
७२५५	।।ना.गा.११००.००९।।	नामा म्हणे ऐसा सुखी ज्ञानेश्वर । जाला असे स्थिर ब्रह्मबोधें
७२५६	।।ना.गा.११०१.००१।।	मग उड्डाण केलें गरुडें । गगन आक्रमिलें चंडें । वरी आरुढले प्रचंडें । भक्त देव सकळिक
७२५७	।।ना.गा.११०१.००२।।	पक्षाचेनि फडत्कार । ग्राम ठाकिला संवत्सर । गिरीकडे पठार । शिखरीं गरुड उतरला
७२५८	।।ना.गा.११०१.००३।।	ते दिनीं समारंभ केला । महा उत्सव तरिसी जाला । जयजयकार प्रवर्तला । विमानें दाटलीं आकाशीं
७२५९	।।ना.गा.११०१.००४।।	दृष्टी देखावया कौतुक । शिवगण आले सकळिक । कर्ता ब्रह्मांडनायक । ते कौतुक अवलोकिती
७२६०	।।ना.गा.११०१.००५।।	मुनि पुंडलिक उतरला। संगतीं वैष्णवांचा मेळा । समाधि लक्षण डोळां । पाहती देव सकळिक
७२६१	।।ना.गा.११०१.००६।।	हातें खाणोनि भूमिका । अमृत शिंपुनी सुगंधिका । महामंगळिक सुखा । वेदघोष आरंभिले
७२६२	।।ना.गा.११०१.००७।।	नामा म्हणे सुखसंगतीं । वैष्णव हरिनाम गर्जती । लक्ष्मी नारायण क्षितीं । उतरोनी समाधि देताती
७२६३	।।ना.गा.११०२.००१।।	भक्तां समागमें हरी । सत्वर आले संवत्सरीं । ब्रह्मानंद परोपरी । चरण धरी सोपानदेव
७२६४	।।ना.गा.११०२.००२।।	भागीरथी सर्वे सरिता । धावोनि आली गंगा माता । यमुना सरस्वती उभयतां । एकात्मता कऱ्हेमाजीं
७२६५	।।ना.गा.११०२.००३।।	इंद्र चंद्र तेहतीस कोडी । नवनाथ सिद्ध सौंगडी । भक्त सनकादिक प्रौढी । वेद परवडी गर्जती
७२६६	।।ना.गा.११०२.००४।।	गगनामाजी देवांगना । वर्षाव करिती दिव्यसुमना । म्हणे निवृत्तीनाथ सोपाना । चरणावरी ठेवी तूं
७२६७	।।ना.गा.११०२.००५।।	पुष्पकारूढ जाले देव । आणिक मागुती आले सर्व । पांडुरंग दैव सदैव । सोपानदेव बाळमूर्ति
७२६८	।।ना.गा.११०२.००६।।	इंद्रनीळ पर्वत आहे । तेथोनि ठाव जावया पाहें । सप्तपाताळी शेष वाहे । दीर्घदेह फणी असे
७२६९	।।ना.गा.११०२.००७।।	जावोनी त्यासी श्रुत करावें । गरुडासि बोलिलें देवरावें । मार्गीं चालिला लवलाहें । क्रमित जावें सप्तपाताळीं

७२७०	।।ना.गा.११०२.००८।।	नामा म्हणे अमृतकरीं । मुख कुरवाळोनी श्रीहरी । सोपान समाधिभीतरीं । आपण पुढारीं बैसले
७२७१	।।ना.गा.११०३.००१।।	ऐसा सोपान संबोखिला । महा उत्सव आनंद जाला । अभय वर दिधला । गर्जिन्नला देवराणा
७२७२	।।ना.गा.११०३.००२।।	म्हणे तूतें न विसंबे । संवत्सरीं असेन स्वयंभें । या वटेश्वरीं सगुण सुलभे । समारंभ प्रतिवर्षी
७२७३	।।ना.गा.११०३.००३।।	सिद्धसाधकाचें स्थळ । तो हा वटेश्वर सानुकुळ । यासी म्हणती सोडविल नीळकंठ । शीतळ प्रथम नाम
७२७४	।।ना.गा.११०३.००४।।	पूर्वी हें ब्रह्मयाचें स्थान । तेणें येथें तप साधिलें गहन । प्रत्यक्ष शंकर सुप्रसन्न । आशीर्वचन बोलिले
७२७५	।।ना.गा.११०३.००५।।	इंद्रनीळ पर्वत रूप । प्रत्यक्ष नारायण स्वरूप । असे कौंडिण्यपुर समीप । माता साक्षेपें
७२७६	।।ना.गा.११०३.००६।।	ऋषिगण गंधर्व । क्षेत्रपाळ मल्हारी देव । इंद्र चंद्र ब्रह्मदेव । शुद्ध ठाव नेमिला
७२७७	।।ना.गा.११०३.००७।।	नामा म्हणे जनार्दन । बहुत संतोषला सोपान । अंगें ब्राह्मण सनातन । शुद्ध अधिष्ठान दिधलें
७२७८	।।ना.गा.११०४.००१।।	सोपान म्हणे देवोत्तमा । पूर्वी येथें होता ब्रह्मा । आणि तुम्हीं सर्वोत्तमा । कोणे स्थळीं होतां देवा
७२७९	।।ना.गा.११०४.००२।।	देव म्हणे कथा परिस । कोट्यानुकोटी युगांस । आम्हीं होतों पंढरीस । अनंत कल्पें गेलीं
७२८०	।।ना.गा.११०४.००३।।	अनंत भक्तांचिया मेळीं । अनंत वैष्णवें भूमंडळीं । माजीं गवसले सकळीं । केली आगळी पुंडलिकें
७२८१	।।ना.गा.११०४.००४।।	येणें प्रसन्न केलें शंकरा । शंकरें मज दाखविलें निर्धारा । आपण राहोनि पाठमोरा । विश्व तारिलें कीर्तनें
७२८२	।।ना.गा.११०४.००५।।	भक्ताचेनि आराधनें । साधियेलें बहुत पुण्यें । माझें जालेंसे येणें । एक कारण पुंडलिकाचें
७२८३	।।ना.गा.११०४.००६।।	पूर्वापार पंढरीसी । होती विष्णुमात ऐशी । निर्धार करोनि मानसीं । अहर्निश अनुष्ठान
७२८४	।।ना.गा.११०४.००७।।	येथोनि पूर्वाभाग पंढरी । पश्चिमभागीं ब्रह्मा अवधारी । अवतार कऱ्हे पाठारीं । महादेव शिखरीं मानदेसी
७२८५	।।ना.गा.११०४.००८।।	तेहतीस कोटी देवस्थळी । पूर्व पश्चिम वैश्य मंडळी । उग्र तप साधिलें चंद्रमौळी । या इंद्रनीळ पर्वतावरी
७२८६	।।ना.गा.११०४.००९।।	द्रोणाचळ इंद्राचळ । हनुमंतें आणिला विशाळ। त्याच्या शाखा अधोमूळ । तो हा इंद्रनीळ पर्वत
७२८७	।।ना.गा.११०४.०१०।।	येथें वल्ली सुवर्णाकार । गुप्त असती त्या निर्धार । दिसे अस्तमानीं अंधार । दीप आकार जगाप्रती
७२८८	।।ना.गा.११०४.०११।।	येवोनियां दक्षिणद्वार । गोकर्ण महाबळेश्वर । पाताळद्वारीं पूजा शंकर । बेलपत्र अद्यापि निघती
७२८९	।।ना.गा.११०४.०१२।।	नामा म्हणे देवाधिदेव । सांगितला स्वानुभाव । अधिष्ठान गुढाव । सोपानदेव निवांत
७२९०	।।ना.गा.११०५.००१।।	पूर्वकथा संवत्सरनगरीं । सांगितली असे अवधारी । मग शेषाद्रि पर्वतावरी । गरुड शिखरीं उभा असे
७२९१	।।ना.गा.११०५.००२।।	धन्य धन्य हा सोपान । धन्य समाधि संपूर्ण । प्रत्यक्ष येऊनि नारायण । अभयदान दिधलेंसे
७२९२	।।ना.गा.११०५.००३।।	अनंत वैष्णव प्रेमळ । दिंडी पताका टाळ घोळ । रामकृष्ण नाम सरळ । भक्त सर्वकाळ नाचती
७२९३	।।ना.गा.११०५.००४।।	दिव्य उतरलीं विमानें । देव वर्षती सुमनें । इंद्र चंद्र देवगणें । लोटांगण घालती
७२९४	।।ना.गा.११०५.००५।।	समाधिसुखाचा आनंद । अंगें करीतसे गोविंद । कथा सांगितली अभेद । श्रोते सन्निध सकळीं
७२९५	।।ना.गा.११०५.००६।।	म्हणती धन्य धन्य सोपान । देव पुरुष चतुरानन । संत महंत वैष्णव प्रमाण । रामकृष्ण गाताती

७२९६	।।ना.गा.११०५.००७।।	नामा म्हणे देवराव । मनोरथ पूर्ण करोनि सर्व । अपार गुणकीर्ति लाघव । न कळे माव कोणाशीं
७२९७	।।ना.गा.११०६.००१।।	सोपान समाधि बैसला । सकळीं पुष्पवर्षाव केला । जयजयकारें भूगोल कोंदला । आनंद दाटला महीवरी
७२९८	।।ना.गा.११०६.००२।।	धन्य धन्य हा सोपान । वर्णितसे श्रीभगवान । क्षणोक्षणीं माझी आठवण । उद्विग्न मन होतसे
७२९९	।।ना.गा.११०६.००३।।	नारद तुंबर अक्रूर उद्धव । पुंडलिकादि करूनि सर्व । मुनिदेवगण गंधर्व । स्तुतिस्तव बोलती
७३००	।।ना.गा.११०६.००४।।	म्हणती चौघेजण भाग्याचे । जें निदान ब्रह्मादिकांचें । तें निजध्यान शंकराचें । सकळ जीवांची जीवनकळा
७३०१	।।ना.गा.११०६.००५।।	तो प्रत्यक्ष येऊनि अनंत । याची परिचर्या करित । भक्ता साह्य होऊनि भगवंत । पूर्ण आर्त करावया
७३०२	।।ना.गा.११०६.००६।।	निजभक्तांचें कौतुक । करोनि ब्रह्मांडनायक । तया वर्णिती सनकादिक । वरकड मशक बापुडें
७३०३	।।ना.गा.११०६.००७।।	पुंडलिक विस्मयें बोलती । हे चौघे भाग्याच्या मूर्ती । यांच्या नामें जग उद्धरती । पावे विश्रांति जगासी
७३०४	।।ना.गा.११०६.००८।।	नामा म्हणे सकळ जगाचा । उदय जाहलासे दैवाचा । सुकाळ केला स्वानंदाचा । ब्रह्मविद्येचा मृत्युलोकीं
७३०५	।।ना.गा.११०७.००१।।	सद्गुरु सागरा दीनबंधु । अनाथनाथा सुरैकसिंधु । चातकातें कृपाबिंदु । प्रसाद द्यावा
७३०६	।।ना.गा.११०७.००२।।	गुरु आणि गणपति पुरातन । सिद्धांत वेदांत जुनाट जुना । दयाळा पातकहरणा । रक्षीं रक्षीं स्वामिया
७३०७	।।ना.गा.११०७.००३।।	तूं अंतरीचें जाणतां । तूं इच्छेचा दाता । तूं हृदयीं प्रेरक होता । कमळालया
७३०८	।।ना.गा.११०७.००४।।	दृश्यादृश्य करितां पार । चौऱ्यांशीं लक्ष योनी दुर्धर । चुकवूनि उतरसी पार । संकटीं स्वामिया
७३०९	।।ना.गा.११०७.००५।।	निवृत्ति प्रवृत्ति दोन्ही थडी । मधीं माया नदी उघडी। बोधभावें घालिसी सांगडी । पार उतरिसी स्वामिया
७३१०	।।ना.गा.११०७.००६।।	सोपान आपला अंकित । पद्महस्तें करावें मुक्त । जो मनें इच्छिला अर्थ । सिद्धि न्यावा स्वामिया
७३११	।।ना.गा.११०८.००१।।	तूं सद्गुरु आनंद भरित । तुझा आदि ना अंत । तूं प्रकाशा प्रकाशमंत । तुज नमो स्वामिया
७३१२	।।ना.गा.११०८.००२।।	बुद्धिपालका वैभवा । तूं देवाधिदेवा । तूं जाणसी अंतरींचा गोवा । उगवीं उगवीं स्वामिया
७३१३	।।ना.गा.११०८.००३।।	तूं सत्त्वरूपाची चौघडी । आणि परेची पैलथडी । बोधभावें करी उघडी । पार उतरी स्वामिया
७३१४	।।ना.गा.११०८.००४।।	तूं विश्रांतीचें स्थळ । तूं निर्गुणानिर्गुण निर्मळ । निवृत्तिमतीचा विशाळ । पुरवी आळ सोपानाची
७३१५	।।ना.गा.११०९.००१।।	स्पष्ट जोडोनियां कर । मी दासानुदास अपार । प्रार्थना करुनि नमस्कार । उतरी पार भवाब्धि
७३१६	।।ना.गा.११०९.००२।।	निवृत्ति मुक्ताई परियेसी । योगीराज जाला उदयासी । वद्य कार्तिक मासीं । आळंकापुरीं जावें लागे
७३१७	।।ना.गा.११०९.००३।।	ज्ञानदेवें मागितला मान । देव वैष्णवांचें आगमन । येऊनि गंधर्वांचें विमान । विधि नारायण संपादिला
७३१८	।।ना.गा.११०९.००४।।	इंद्रनीळ पर्वत पुरातन । पूर्वी येथें ब्रह्मयाचें स्थान । कौंडण्यपुरीं अंबिकाभुवन । महाब्रह्म योग माया
७३१९	।।ना.गा.११०९.००५।।	तिची भावें केली पूजा । परमार्थ साधिला स्वहित काजा । मुक्ताई आणि निवृत्तिराजा । सोपान सहजा सिद्ध जाले
७३२०	।।ना.गा.१११०.००१।।	धन्य कऱ्हेचे पाठारीं । इंद्रनीळ पर्वत महागिरी जैसें आळंकापुरीं । तैसें पुण्यक्षेत्र हें
७३२१	।।ना.गा.१११०.००२।।	ऐसें अनुमानिलें स्थळ । पूर्वापार निर्मळ । सिद्धी पाववी आळ । माय बापा

७३२२	।।ना.गा.१११०.००३।।	मग सुमुहूर्त अमृतयोग । सिद्ध संकेत ज्ञानमार्ग । पहिला चंद्र स्वांग । गमन केलें योगिराजें
७३२३	।।ना.गा.१११०.००४।।	निवृत्ति सोपान मुक्ताई । आळंकापुरीहुनी आले पाही । मृदंग वाजती घाई । कीर्तन नवाई काय सांगू
७३२४	।।ना.गा.१११०.००५।।	समाधि सावधान । सुखी ज्ञानेश्वर निधान । जाला पां स्थिर सोपान । भेटीलागीं
७३२५	।।ना.गा.१११०.००६।।	केलें समाधिस नमन । विज्ञापिले सर्वजन । करा आमुची बोळवण । शेवटींची
७३२६	।।ना.गा.११११.००१।।	देव म्हणे नाम्या मार्गशीर्ष गाढा । जावें सासवडा उत्सवासी
७३२७	।।ना.गा.११११.००२।।	सोपानासी आम्हीं दिधलें वचन । चला अवघेजण समुदाय
७३२८	।।ना.गा.११११.००३।।	आळंकापुरीची यात्रा केली सांग । मग पांडुरंग सिद्ध जाले
७३२९	।।ना.गा.११११.००४।।	दुरोनि पताका दिसती मनोहर । उठावले भार वैष्णवांचे
७३३०	।।ना.गा.११११.००५।।	निवृत्ति मुक्ताई घेतला सोपान । जातो नारायण कऱ्हेतीरीं
७३३१	।।ना.गा.११११.००६।।	नामा म्हणे देव गंधर्व सुरगण । चालिले सोपान समाधीसी
७३३२	।।ना.गा.१११२.००१।।	भक्तांचें तें साह्य करणें पांडुरंगा । म्हणोनि तीर्थगंगा उगविलें
७३३३	।।ना.गा.१११२.००२।।	जान्हवी मंदाकिनी भोगावती मिळुनी । दुजी हे त्रिवेणी या भूमीसी
७३३४	।।ना.गा.१११२.००३।।	निर्झर जीवन वाहती निरंतर । तेथें वटेश्वर उतरले
७३३५	।।ना.गा.१११२.००४।।	दुरोनि हें स्थळ दिसे मनोहर । उतरले भार वैष्णवांचे
७३३६	।।ना.गा.१११२.००५।।	नामा म्हणे स्थळ आदि हें अनादि । येथेंची समाधी सोपानासी
७३३७	।।ना.गा.१११३.००१।।	उतरिलीं विमानें स्वर्गींचें राऊळ । पताका रानोमाळ मिरविताती
७३३८	।।ना.गा.१११३.००२।।	सोपान मुक्ताई सद्गुरु निवृत्ति । रुक्माईचा पति मध्यभागीं
७३३९	।।ना.गा.१११३.००३।।	टाळ मृदंग वाजताती विणे । नारद गायन करीतसे
७३४०	।।ना.गा.१११३.००४।।	नामा पुंडलिक चालती आवडीनें । संत साधूजन मिरवती
७३४१	।।ना.गा.१११३.००५।।	लहान थोर संत चालती मिळोन । करिती बोळवण नामा म्हणे
७३४२	।।ना.गा.१११४.००१।।	भोगावती तीरीं दिधला मंडप । साधू आपरूप पांडुरंग
७३४३	।।ना.गा.१११४.००२।।	रखुमाई राही बैसल्या अनेक । सखा पांडुरंग उतरला
७३४४	।।ना.गा.१११४.००३।।	वद्य मार्गशीर्ष दशमी जागर । हरिदिनीं गजर कीर्तनाचा
७३४५	।।ना.गा.१११४.००४।।	क्षेत्रप्रदक्षिणा केली असे संतीं । आले भोगावती अवघेजन
७३४६	।।ना.गा.१११४.००५।।	निवृत्ति मुक्ताई दुश्चित्त अंत:करण । साहित्य नारायण करीतसे
७३४७	।।ना.गा.१११४.००६।।	नामा म्हणे देवा आधीं नेमा स्थळ । मग हें सकळ साहित्य करूं

७३४८	।।ना.गा.१११५.००१।।	वटेश्वरें वृत्तान्त सांगितला सकळ । पूर्वी आमुचें स्थळ याच क्षेत्रीं
७३४९	।।ना.गा.१११५.००२।।	येथूनियां वाट जातसे पाताळा । उघडिली शिळा समाधीची
७३५०	।।ना.गा.१११५.००३।।	आसन मनोहर मृगछालावर । पहाती ऋषीश्वर आनंदानें
७३५१	।।ना.गा.१११५.००४।।	सोपान वटेश्वर करिती एकांत । कळलें मनोगत नामा म्हणे
७३५२	।।ना.गा.१११६.००१।।	सोपान वटेश्वर पातले समोर । केला नमस्कार निवृत्तीसी
७३५३	।।ना.गा.१११६.००२।।	म्हणे मुक्ताबाई जाती दोघेजण। ऐसें नारायणें बुझाविलें
७३५४	।।ना.गा.१११६.००३।।	गरूड हनुमंता परिसा भागवता । मग साधुसंता श्रुत केलें
७३५५	।।ना.गा.१११६.००४।।	गंधर्वा आणि देवा कळला वृत्तान्त । जाती उभयतां समाधीसी
७३५६	।।ना.गा.१११६.००५।।	नामा म्हणे यांनीं आरंभिलें हित । करितो स्वहित पांडुरंग
७३५७	।।ना.गा.१११७.००१।।	सोपान वटेश्वर उभे ठेले पुढती । पंचारत्या होती आनंदाच्या
७३५८	।।ना.गा.१११७.००२।।	गंध आणि अक्षता वाहियेल्या सहज । देव निवृत्तिराज पूजियेले
७३५९	।।ना.गा.१११७.००३।।	धूप आणि दीप आणिलें संपूर्ण । पूजिलें गगन सोपानानें
७३६०	।।ना.गा.१११७.००४।।	दाही दिशा दृष्टि अवलोकिली सारी । गगन अंकुरीं डवरिलें
७३६१	।।ना.गा.१११७.००५।।	चक्र सर्पाकार विजा लखलखती । ज्योति प्रकाशति रानोमाळ
७३६२	।।ना.गा.१११७.००६।।	नामा म्हणे देवा उदय जाला सकळ । सोपानदेवें मूळ दाखविलें
७३६३	।।ना.गा.१११८.००१।।	शेंदूर पारवे नीळवर्ण ठसे । जनीं वनीं दिसे परब्रह्म
७३६४	।।ना.गा.१११८.००२।।	मुक्ताफळ भरित सबाह्य कोंदलें । रूप हें चांगलें विठोबाचें
७३६५	।।ना.गा.१११८.००३।।	श्वेत पीतवर्ण आंत तारांगण । अंकुरलें गगन नानारूपें
७३६६	।।ना.गा.१११८.००४।।	ज्योतिर्मय ब्रह्म एकांतीचें पहाणें । समाधि नारायणें उदय केली
७३६७	।।ना.गा.१११८.००५।।	संत स्वरूप अवघें अवलोकिलें मनें । नमन नामा म्हणे आरंभिलें
७३६८	।।ना.गा.१११९.००१।।	निवृत्ति म्हणे ऊर्मी तुटल्या श्रृंखळा । मार्ग हा मोकळा आम्हां जाला
७३६९	।।ना.गा.१११९.००२।।	पांडुरंग पाश आवरिला आपला । म्हणोनि फुटला मार्ग आम्हां
७३७०	।।ना.गा.१११९.००३।।	आवरिली माया पुरातन आपुली । म्हणोनि आम्हां जाली बुद्धि ऐसी
७३७१	।।ना.गा.१११९.००४।।	नामदेवें मस्तक ठेवियेलें पायीं । आतां खेद कांहीं करूं नका
७३७२	।।ना.गा.११२०.००१।।	जाती ब्रह्मादिक जाती चराचर । मायिक व्यवहार ऐशा परी
७३७३	।।ना.गा.११२०.००२।।	प्रकृति पुरुषाचा मांडियेला खेळ । जाईल सकळ नाशिवंत

७३७४	।।ना.गा.११२०.००३।।	चंद्र सूर्य जाईल जाईल मृगजळ । जाती तिन्ही ताळ शून्यापोटीं
७३७५	।।ना.गा.११२०.००४।।	होईल निरामय अवघे चराचर । ब्रह्मींचा विस्तार होईल ब्रह्मीं
७३७६	।।ना.गा.११२०.००५।।	नामा म्हणे स्वामी जाताती सकळ । ब्रह्मीं माया मूळ जाली कैसी
७३७७	।।ना.गा.११२१.००१।।	धन्य आमुचें भाग्य परब्रह्म संगें । साहित्य स्वआंगें करितसे
७३७८	।।ना.गा.११२१.००२।।	नाशिवंत देह जाईल कीं अंतीं। नीचाची संगति कोण काज
७३७९	।।ना.गा.११२१.००३।।	पाहिला गे माय ब्रह्मींचा आवर्तु । जीव आणि जंतु विस्तारिले
७३८०	।।ना.गा.११२१.००४।।	निवृत्ति मुक्ताई केलासे विवेक । आपपर लोक दुजें नाहीं
७३८१	।।ना.गा.११२१.००५।।	नामा म्हणे चित्त केलें स्थिर । देव ऋषीश्वर उठावले
७३८२	।।ना.गा.११२२.००१।।	पांडुरंग म्हणे सख्या निवृत्तिराजा । झाडा आतां शेजा समाधीच्या
७३८३	।।ना.गा.११२२.००२।।	नारा विठा महादा पाठविला गोंदा । झाडावया जागा समाधीच्या
७३८४	।।ना.गा.११२२.००३।।	परिसा भागवत चांगदेव हातें । आणिलें साहित्य समाधीचें
७३८५	।।ना.गा.११२२.००४।।	तुळसी बुका बेल दर्भ आणि फुलें । उदक चांगलें भोगावतीचें
७३८६	।।ना.गा.११२२.००५।।	भस्म पीतांबर भगवीं तीं वस्त्रें । योगी दिगंबर समागमें
७३८७	।।ना.गा.११२२.००६।।	नामा म्हणे देवा उठवा ऋषीश्वर । होईल उशीर समाधीसी
७३८८	।।ना.गा.११२३.००१।।	उठिले वैष्णव घेऊनि नारायणा । चालिले ते स्नाना अवघे जन
७३८९	।।ना.गा.११२३.००२।।	गंध आणि अक्षता विसोबाचे हातीं । पूजा ते करिती सोपानाची
७३९०	।।ना.गा.११२३.००३।।	सोपान वटेश्वर सोंवळे जाले सांग । निवृत्ति पांडुरंग पूजियेले
७३९१	।।ना.गा.११२३.००४।।	गंधर्व आणि सुरगण पूजिती सोपान । यथाविधी प्रमाण संपादिलें
७३९२	।।ना.गा.११२३.००५।।	नामा म्हणे पूजा केली हृषिकेशी। चला पारण्याशी अवघे जन
७३९३	।।ना.गा.११२४.००१।।	राही रखुमाई ऋद्धिसिद्धि जेथें । पडले पर्वत पक्वान्नांचे
७३९४	।।ना.गा.११२४.००२।।	बैसल्या त्या पंक्ति भोगावती तीरीं । पात्रें टाकी हरि वैष्णवाला
७३९५	।।ना.गा.११२४.००३।।	विसोबा खेचर पुंडलिक संगें । वाढी पांडुरंग वैष्णवाला
७३९६	।।ना.गा.११२४.००४।।	संतसभेमाजीं निवृत्ति सोपान । यथाविधी प्रमाण संपादिलें
७३९७	।।ना.गा.११२४.००५।।	रखुमाईला देवें सांगितली खूण । सोडितो पारणें सोपानदेव
७३९८	।।ना.गा.११२४.००६।।	नामा म्हणे स्वामी जातो बोलावण । आणितो सोपान भोजनासी
७३९९	।।ना.गा.११२५.००१।।	चांगा वटेश्वर मुक्ता निवृत्तीश्वर । सावता कुंभार ऐहिक ते

७४००	।।ना.गा.११२५.००२।।	एके ठायीं मिळाले परब्रह्म गवसून । वटेश्वर सोपान मध्यभागीं
७४०१	।।ना.गा.११२५.००३।।	सोपान वटेश्वर घेतले वोसंगळा । माळा घाली गळां पुंडलिक
७४०२	।।ना.गा.११२५.००४।।	सोपान वटेश्वर पूजिती आवडीनें । संगतीं निधान पांडुरंग
७४०३	।।ना.गा.११२५.००५।।	आनंदानें सारे बैसले एकवट । विस्तारिलें ताट रखुमाईनें
७४०४	।।ना.गा.११२५.००६।।	नारा विठा गोंदा बोलाविला महादा । नामा म्हणे पूजा अवघे जन
७४०५	।।ना.गा.११२६.००१।।	उठिले वैष्णव आटोपलें भोजन । केलें आचमन भोगावतीं
७४०६	।।ना.गा.११२६.००२।।	अवघ्यांनी घेतला सोपान वटेश्वर । गोंदा महादा साचार विडे देती
७४०७	।।ना.गा.११२६.००३।।	निशिदिनीं कीर्तन केलें द्वादशी । वद्य त्रयोदशी मार्गशीर्ष
७४०८	।।ना.गा.११२६.००४।।	भोगावतीं केलें अवघ्यांनी स्नान । चालिले सोपान समाधीसी
७४०९	।।ना.गा.११२६.००५।।	नामा म्हणे देवा स्थळ मनोहर । उठावले भार वैष्णवांचे
७४१०	।।ना.गा.११२७.००१।।	कळवळी मन नाहीं देहभान । वटेश्वर सोपान सोंवळे जाले
७४११	।।ना.गा.११२७.००२।।	संत साधुजन होत कासाविसी। आले समाधीपाशीं तांतडीनें
७४१२	।।ना.गा.११२७.००३।।	समाधीभोंवतें कुंकुमाचे सडे । पाहाती निवाडे अवघे जन
७४१३	।।ना.गा.११२७.००४।।	वरी मृगछाला दिसताती लाल । दर्भ आणि फुलें समर्पिलीं
७४१४	।।ना.गा.११२७.००५।।	दुर्वा आणि बेल टाकिले मोकळे । साहित्य सकळ समर्पिलें
७४१५	।।ना.गा.११२७.००६।।	निवृत्ति पांडुरंग बैसले येऊन । नमन सोपान करितसे
७४१६	।।ना.गा.११२८.००१।।	नमो अगणित गुणा । नमो अगम्य ध्याना । नमो कलिविध्वंसगहना । कालरूपा
७४१७	।।ना.गा.११२८.००२।।	नमो शून्यादि क्षरा । अक्षरा तूं हरा । हरिहर सर्वेश्वरा । नमो तुज
७४१८	।।ना.गा.११२८.००३।।	वेदविदा विद्वदा । सहज बोधा परमानंदा । अनादि आनंदा । गोविंदा तुज नमो
७४१९	।।ना.गा.११२८.००४।।	नमो चित्त विभ्रमा । नमो वृत्ति ध्यानागमा । नमो आगमसमा । ऐशिया परमात्मा तुज नमो
७४२०	।।ना.गा.११२८.००५।।	नमो अनंता अशेषा । नमो सकळ महेशा । जीव शिवादि विश्वेशा । नमो तुज
७४२१	।।ना.गा.११२८.००६।।	देवें देवोत्तमा सकळा । देवाधिदेवा वेगळा । नमो तुज गोपाळा । चक्रचाळका हरी
७४२२	।।ना.गा.११२८.००७।।	नमो विष्णु कृष्णरूपा । नमो शुध्दादिरूपा । नमो नमो भुवनदीपा। नारायणा आदिनाथा
७४२३	।।ना.गा.११२८.००८।।	नमो योगिया योगोत्तमा । नमो सर्वांचा तूं आत्मा । नमो नमो परब्रह्मा । सर्वारामा आत्मया
७४२४	।।ना.गा.११२८.००९।।	नमो नमो नमन । तूं जगादि जगजीवन । जगज्जनकु जनार्दन । आनंदघन महामूर्ति
७४२५	।।ना.गा.११२८.०१०।।	नमो कौतुहलहळणा । नमो भक्त प्रेमपाळणा । परात्पर निधाना । परादि वाचा

७४२६	।।ना.गा.११२८.०११।।	परेहि परतत्त्वा । नाहीं जेथें रजतमसत्त्वा । वेदादिका देउनी महत्त्वा । पाळण करिसी धर्माचें
७४२७	।।ना.गा.११२८.०१२।।	अनंत योगाधीशा । अनंत नामाधिवासा । अनंत तपें सहसा । न जोडसी तूं स्वामी
७४२८	।।ना.गा.११२८.०१३।।	ऐशिया विश्वेश्वरादि शिवा । नमो तुज महादेवा । होय जयावरी कृपाहेलावा । तरी सर्व सुख देशी
७४२९	।।ना.गा.११२८.०१४।।	भुक्ति मुक्ति विशेषा । दवडुनी मी माझी आशा । सांडुनी रजतम दुराशा । चरणीं चित्त रमलें
७४३०	।।ना.गा.११२८.०१५।।	नमो उद्बोध विशद । तया वरील जो बोध । वरी झळके प्रसिद्ध । तो शुद्धाशुद्ध रस देई
७४३१	।।ना.गा.११२८.०१६।।	निर्विकाराचा विकार । स्वस्वरूपाचा निर्धार । सर्वरूप होऊनि निर्विकार । ग्रास न करिशी माझा
७४३२	।।ना.गा.११२८.०१७।।	शमदमादि समश्रेष्ठा । आदि अनादि वरिष्ठा । सकळ होऊनि विशिष्टा । भुवनपदा दावी
७४३३	।।ना.गा.११२८.०१८।।	अनंत अनंतेश्वरा । अरुपाचाही आकारा । ग्रास न करुनी निर्धारा । सांठवी हृदयीं आपुला
७४३४	।।ना.गा.११२८.०१९।।	नाथ दीनानाथा दीनेशा । चित्ताचित्त समरसा । नमो शिवादि शिवेशा । आदि प्रभु
७४३५	।।ना.गा.११२८.०२०।।	नमो नमो रामा । नमो नमो भवादिश्रमा । नमो योगादि विश्रामा । आदिपती तुज नमो
७४३६	।।ना.गा.११२८.०२१।।	अवधूत महादत्ता । सकळ दृष्ट तूंचि हर्ता । नमो सकळ कर्ता । आदिसत्ता पैं तुझी
७४३७	।।ना.गा.११२८.०२२।।	नमो दशानंद परेशा । नमो तुज ऐशिया जगदीशा । तुजविण व्यर्थ भरंवसा । आणिकां देवांचा
७४३८	।।ना.गा.११२८.०२३।।	नमो नमो हरी मुकुंदा । नमो नमो पावविसी परमपदा । ऐशिया तुज सदा । पुढती नमो नमो
७४३९	।।ना.गा.११२८.०२४।।	वामदक्षिण परिपूर्णा । अधउर्ध्व शून्यपणा । नमो तुज सर्वाभरणा । समाधि देशी तुज नमो
७४४०	।।ना.गा.११२८.०२५।।	वीर्य धैर्य संपन्नगुणा । निराशा आशा अवगुणा । तुज स्मरतां पूर्णनिधाना । पावविसी परमपदा
७४४१	।।ना.गा.११२८.०२६।।	चतुराचतुर शून्या । वेदशास्त्र श्रुतिमौन्या । सकळजन सौजन्या। नांदसी सभराभरित
७४४२	।।ना.गा.११२८.०२७।।	मंजुळ शब्दाचिया गुणा । मंजुळ नादाचिया ध्याना । विश्वरूप अनन्या । वैकुंठीं नांदसी सदा
७४४३	।।ना.गा.११२८.०२८।।	जगद्गुरु जगद्पालका । जगदादि जगन्नायका । वेदादि विवेका । कर्ता हर्ता जगदीशा
७४४४	।।ना.गा.११२८.०२९।।	नारायणा पूर्णचैतन्या । पूर्णापूर्ण सौजन्या । श्रुतितुजमाजिं मौन्या । मौन्यरूपी नांदसी सदा
७४४५	।।ना.गा.११२८.०३०।।	तूं परमेश्वर परेपरता । सकळ देहीं देहहर्ता । सकळ रूपें हे सत्य वार्ता । वेद बोलोनी गेले
७४४६	।।ना.गा.११२८.०३१।।	ऐशिया नमो हो देवा । महामूर्ति निरंजन ठेवा । तो तूं पुंडलिक अनुभवा । रूपरेखें आलासी
७४४७	।।ना.गा.११२८.०३२।।	विनट विठ्ठलमूर्ति । युगें अठ्ठावीस कीर्ति । वीटे नीट लक्ष्मीपती । भक्तालागीं तिष्ठसी
७४४८	।।ना.गा.११२८.०३३।।	भक्तालागीं दयाळु । दीनदयानिधि गोपाळु । तूं द्वारकेचा भूपाळु । बाळलीला अवतरलासी
७४४९	।।ना.गा.११२८.०३४।।	निराभिवरासंगम । चंद्रभागेचा उगम । माजीं सर्वात्माराम । वृंदावनीं खेळसी
७४५०	।।ना.गा.११२८.०३५।।	वैकुंठादि वैकुंठवासा । वैकुंठरूपा जगदीशा । सर्वज्ञा हृषिकेशा । त्राहे त्राहे स्वामिया
७४५१	।।ना.गा.११२८.०३६।।	समाधिधन देवा तूंचि । समाधी सेज तूंचि रची । समाधि हे जिवाची । शिवाशी मेळवी

७४५२	।।ना.गा.११२८.०३७।।	अनंत जन्माचें संचित । अनंत दोष दुर्घटित । अनंत नामाचा संकेत । हारपे तुजमाजीं
७४५३	।।ना.गा.११२८.०३८।।	ऐसी सोपान स्तुति करीत । तेणें संतोषला पंढरीनाथ । त्वां जग तारिलें समस्त । कीर्तनें करूनी
७४५४	।।ना.गा.११२८.०३९।।	नामा म्हणे ऐसें स्तवन। सोपान देवें केलें संपूर्ण । मग बोले जगज्जीवन । तयाप्रती
७४५५	।।ना.गा.११२९.००१।।	आतां स्तुति पुरे पुरे सोपाना । प्रेमळाचिया निधाना । संतुष्ट जालों रे वचना । एक एका तुझिया
७४५६	।।ना.गा.११२९.००२।।	तूं अवतार चतुरानन । ऐसें बोलिले जगज्जीवन । तंव स्तवन करितां सोपान । तो मौन्यचि राहिला
७४५७	।।ना.गा.११२९.००३।।	सर्वोत्तम म्हणे चतुरा । महा विचाराच्या सारा । पवित्ररूपा परिकरा । सकळ जनासी तूंची
७४५८	।।ना.गा.११२९.००४।।	मग पाचारिलीं तीर्थें । जे जे तीर्थरूप सामर्थ्यें । म्हणे उदक द्यावें स्नानातें । सोपानदेवासी
७४५९	।।ना.गा.११२९.००५।।	गंगा जान्हवी मंदाकिनी । भोगावती भीमरथी तिन्ही । येती जालिया माध्यान्हीं । पंचारती घेउनियां
७४६०	।।ना.गा.११२९.००६।।	योगी सिद्ध प्रसिद्ध । नाथादि नारायण नवविध । आणि सनकादिक अगाध । नारद तुंबर पातले
७४६१	।।ना.गा.११२९.००७।।	देवीं आदरिलें स्तवन । ऋषीं वेदघोष आरंभिले पूर्ण । सनकादिकीं भाष्य जाण । हा हा हु हु गंधर्व
७४६२	।।ना.गा.११२९.००८।।	मंगळ तुरे वाजती । महावैष्णव हरिकथा करिती । नामा म्हणे पुढतो पुढतीं । चरणा लागे सोपान
७४६३	।।ना.गा.११३०.००१।।	नमो ज्योतिर्मय ब्रह्मा । आनंद ईश्वर पुरातन । नमो नारायणा कमळ–कोंदणा । नमो नमो स्वामिया
७४६४	।।ना.गा.११३०.००२।।	नमो सद्‌गुरु निवृत्ति । नमो रखुमाईच्या पति । नमो ज्ञानमूर्ति । अगम्य पुरुषा
७४६५	।।ना.गा.११३०.००३।।	नमो भक्ति मुक्ति चैतन्य माया । नमो कर्ता हर्ता काया । नमो आदि पुरातन पाया । परब्रह्मा
७४६६	।।ना.गा.११३०.००४।।	नमो विराट पुरुषा पुरातना। नमो जगज्जीवना करुणाघना । चराचरपालका आनंदघना । अंगीकारीं नमना माझिया
७४६७	।।ना.गा.११३०.००५।।	नमो ब्रह्मांडव्यापका । नमो गुणातीता मायांतका । चुकवी जन्ममरण एका । तारी विश्वकृपेनें
७४६८	।।ना.गा.११३०.००६।।	नमो जळस्थळ रक्षिता । आदी अवसानी तारिता । नमो रोमारोम अव्यक्ता । नमो नमो दीनबंधू
७४६९	।।ना.गा.११३०.००७।।	नमो विराट महद्‌ब्रह्मा । निष्कलंक परब्रह्मा । योगियांच्या सुखधामा । नमो नमो दयाळा
७४७०	।।ना.गा.११३०.००८।।	औट हातीं ध्वनी । नमो नमो अंत:करणीं। नमो नमो सत्रावी त्रिवेणी । त्रिपुटी जेथें
७४७१	।।ना.गा.११३०.००९।।	नमो विटेवरी सदटा । नमो वैकुंठीचिये पीठा । आदी अंतीं एकटा। नमो आदिपुरुषा
७४७२	।।ना.गा.११३०.०१०।।	आदी अंतीं शेवटीं । सहस्रदळीं गुह्य पिठीं । नमो उघडी दृष्टि । स्वरूपीं तुझ्या
७४७३	।।ना.गा.११३०.०११।।	नमो पायीं पडली मिठी । नमो बांधिली हृदयीं गांठी । तुझें स्वरूप हृदयसंपुष्टीं । धरून ठेविलें स्वामिया
७४७४	।।ना.गा.११३०.०१२।।	नमो गेलें आलें । नमो जालें तें जालें । नमो सांभाळुनी तुझें । ठेवी आम्हां
७४७५	।।ना.गा.११३१.००१।।	नमो नमो गणपति । नमो सरस्वती । नमो नमो रमापति । दीनबंधु
७४७६	।।ना.गा.११३१.००२।।	नमो योगी दिगंतरा । नमो वैष्णवांचिया भारा । नमो गंधर्व ऋषीश्वरा । लहान थोरा
७४७७	।।ना.गा.११३१.००३।।	नमो नमो अंतरीं । नमो नमो दिशा चारी । नमो अंतरबाहेरीं । एकत्व एक

७४७८	।।ना.गा.११३१.००४।।	नमो अनंता अनंत–नामा । जानकीश जगज्जीवना । जयजय रामारामा । तुज नमो
७४७९	।।ना.गा.११३१.००५।।	नमो मत्स्य कच्छ अवतार। नमो सिंह सुकर। नमो परशुराम फरशधर। वामना तुज नमो
७४८०	।।ना.गा.११३१.००६।।	नमो रामा वेदपाळका । नमो इंद्रियेंचालका । नमो बोधभाविका । श्रीविठ्ठला
७४८१	।।ना.गा.११३१.००७।।	नमो कलंकी विनटला । पटला विठ्ठला । सारासार नटला । तुज नमो
७४८२	।।ना.गा.११३१.००८।।	निरामय निर्मय तुज । नमो नमो चतुर्भुज । नमो सर्व जगदात्मज । अनाथनाथा
७४८३	।।ना.गा.११३१.००९।।	नमो बारा ज्योतिर्लिंगा । नमो पंढरी पांडुरंगा । नमो भिवरा चंद्रभागा । नमो वैकुंठपीठा
७४८४	।।ना.गा.११३१.०१०।।	मी काय जाणें नामस्थिती । नमन केलें भोळे भक्ती । नमन श्रीपती । मान्य जालें
७४८५	।।ना.गा.११३१.०११।।	नमन निवृत्ति ज्ञानेश्वरा। नमो सोपान वटेश्वरा । नमन मुक्ताबाई निर्झरा । सत्रावींच्या
७४८६	।।ना.गा.११३१.०१२।।	नमो हंसा सुअक्षरा । नमो व्यापका चराचरा । नमो नमो अव्यक्त विषयावरा । पांडुरंगा
७४८७	।।ना.गा.११३१.०१३।।	नमन तुमचें तुम्ही केलें । नमन सहजासहज जालें । नेणें काय आलें गेलें । सद्‌गुरुनाथा
७४८८	।।ना.गा.११३२.००१।।	उभयतानीं नमन केलें यथासांग । अर्थी पांडुरंग साह्य केला
७४८९	।।ना.गा.११३२.००२।।	कळवळिले संत वैष्णवांचे भार । आणिक योगेश्वर स्फुंदताती
७४९०	।।ना.गा.११३२.००३।।	गरुड हनुमंत विसोबा खेचर । लाविती पदर डोळियासी
७४९१	।।ना.गा.११३२.००४।।	निवृत्ति मुक्ताबाई चांगदेवासहित । परसा भागवत शोक करी
७४९२	।।ना.गा.११३२.००५।।	नामा म्हणे देवा खेद सिंधू लोटा । उठा आतां भेटा सोपानासी
७४९३	।।ना.गा.११३३.००१।।	सोपानदेवें ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर निवृत्तीच्या
७४९४	।।ना.गा.११३३.००२।।	सवें मुक्ताबाई सद्‌गुरु निवृत्ति । लक्ष्मीचा पति घेतलिया
७४९५	।।ना.गा.११३३.००३।।	जयजयकार ध्वनि होताती अपार । जाती योगेश्वर समाधीसी
७४९६	।।ना.गा.११३३.००४।।	राही रखुमाई निळकंठ जवळी । समाधिच्या पाळी अवघे जण
७४९७	।।ना.गा.११३३.००५।।	समाधि पायरीवरी वटेश्वर सोपान । मागितला मान पांडुरंगा
७४९८	।।ना.गा.११३३.००६।।	प्रतिवर्षी भेटी देऊं उभयतां । आळंकापुरीं जातां उत्सवासी
७४९९	।।ना.गा.११३३.००७।।	नामा म्हणे देवा कृपा केली फार । दिधला कीं वर भक्तराज
७५००	।।ना.गा.११३४.००१।।	निवृत्ति मुक्ताईनें धरियेलें मौन । वटेश्वर सोपान त्यागियेला
७५०१	।।ना.गा.११३४.००२।।	समाधि पताकांची पडली सावली । उतरले खालीं योगीराज
७५०२	।।ना.गा.११३४.००३।।	पांडुरंगासंगें गेले ऋषीश्वर । सोपान वटेश्वरीं बैसविले
७५०३	।।ना.गा.११३४.००४।।	शिवाचा अवतार सद्‌गुरु निवृत्ति । मुक्ताबाई सखी तुम्हांपाशीं

७५०४	।।ना.गा.११३४.००५।।	अंतरीचें जाणतां बा पंढरीनाथ । आले अश्रुपात सोपानासी
७५०५	।।ना.गा.११३४.००६।।	सोपानाची बोळवण करितसे हरी । दीर्घ ध्वनी करी नामदेव
७५०६	।।ना.गा.११३५.००१।।	धूप आणि दीप उजळिल्या ज्योति । तेव्हां ओसंडती अवघे जन
७५०७	।।ना.गा.११३५.००२।।	सोपान वटेश्वरें केला नमस्कार । उतरले पार भवसिंधू
७५०८	।।ना.गा.११३५.००३।।	घेतियेलें तीर्थ तंव झालें विकळ । झांकियेले डोळे ब्रह्मबोधें
७५०९	।।ना.गा.११३५.००४।।	निवृत्ति मुक्ताई राहिलीं बाहेरी । आतां तुम्ही हरि सांभाळावें
७५१०	।।ना.गा.११३५.००५।।	देव ऋषीश्वर निघाले बाहेर । केला नमस्कार नामदेवें
७५११	।।ना.गा.११३६.००१।।	जयजयकारें टाळी पिटली सकळां । घातियेली शिळा समाधिसी
७५१२	।।ना.गा.११३६.००२।।	निवृत्तिमुक्ताईनें घातियेली घोन । करितो समाधान पांडुरंग
७५१३	।।ना.गा.११३६.००३।।	सोपान वटेश्वर सुखधामीं शेजा । करिताती पूजा समाधीची
७५१४	।।ना.गा.११३६.००४।।	खेद दुःख जालें अवघ्या साधूजनां । केली प्रदक्षिणा समाधीसी
७५१५	।।ना.गा.११३६.००५।।	निवृत्तिमुक्ताईनें वंदिली समाधि । देहभान शुद्धि हारपली
७५१६	।।ना.गा.११३६.००६।।	नामा म्हणे देवा उठा अवघेजण । करूं आचमन भोगावतीं
७५१७	।।ना.गा.११३७.००१।।	वैष्णवांनीं केली समाधि प्रदक्षिणा । गेले आचमना भोगावतीं
७५१८	।।ना.गा.११३७.००२।।	सारी रात्र कीर्तन केलें त्रयोदशीं । चतुर्दशी दिवशीं भोजनें केलीं
७५१९	।।ना.गा.११३७.००३।।	अमावास्ये जागरण केलें परिपूर्ण । प्रतिपदे गमन वैष्णवांचें
७५२०	।।ना.गा.११३७.००४।।	निवृत्ती मुक्ताई जाली उदासी । आतां हृषिकेशी बोळवावें
७५२१	।।ना.गा.११३७.००५।।	चांगा म्हणे माझी करा बोळवण । घेऊनि नारायण समागमें
७५२२	।।ना.गा.११३७.००६।।	नामा म्हणे देवा माघ मास नेमा । चांगदेवा प्रेमा समाधि देऊं
७५२३	।।ना.गा.११३८.००१।।	सव्य हातें नगर घेती ऋषीश्वर । केला नमस्कार समाधीसी
७५२४	।।ना.गा.११३८.००२।।	परतले देव आणि सुरगण । चाललीं विमानें वैष्णवांची
७५२५	।।ना.गा.११३८.००३।।	निवृत्ति मुक्ताबाई चांगदेव संगें । रुक्मिणी पांडुरंग समुदायेंसी
७५२६	।।ना.गा.११३८.००४।।	नामा म्हणे देव गंधर्व ऋषिमुनी । जाती उत्तरायणीं निवृत्तिराज
७५२७	।।ना.गा.११३९.००१।।	निवृत्तिदेवासंगें देव ऋषीश्वर । उठावले भार वैष्णवांचे
७५२८	।।ना.गा.११३९.००२।।	प्रतिपदीं देव निघाले बाहेर । केला नमस्कार समाधीसी
७५२९	।।ना.गा.११३९.००३।।	अवघियांसहित वैष्णव मंडळी । सवें वनमाळी चालताती

७५३०	।।ना.गा.११३९.००४।।	गोदातीरा जाया निवृत्ति उद्देशी । सह समुदायेंशी उठावले
७५३१	।।ना.गा.११३९.००५।।	नामा म्हणे घेतला नारायण संगें । चालिले अनेगें भक्तराज
७५३२	।।ना.गा.११४०.००१।।	निवृत्तिदेवा योग्य गंगेचें तें स्नान । करूं अवघेजण आवडीनें
७५३३	।।ना.गा.११४०.००२।।	तीर्थयात्रा होईल देवसमागमें। केवढा महिमा रामें सांगितला
७५३४	।।ना.गा.११४०.००३।।	मार्गी चालताती भक्त आणि हरी । आले भुलेश्वरीं अवघेजण
७५३५	।।ना.गा.११४०.००४।।	भुलेश्वरालागीं पूजा केली सांग। भक्त पांडुरंगें तीन रात्रीं
७५३६	।।ना.गा.११४०.००५।।	तेथून वैष्णव चालियेले हरी । आले सिद्धेश्वरीं देवभक्त
७५३७	।।ना.गा.११४०.००६।।	पाराशर ऋषींचें स्थळ पुरातन । राहिले नारायण पंचरात्र
७५३८	।।ना.गा.११४०.००७।।	नामा म्हणे देवा जावें कपिलेश्वरा। आनंद ऋषीश्वरा जाला फार
७५३९	।।ना.गा.११४१.००१।।	कौतुकानें तेथें आले सावकाश । उभे हरिदास कीर्तनासी
७५४०	।।ना.गा.११४१.००२।।	दहा दिवस तेथें राहियेले स्वस्थ। अवघ्यांचा मनोरथ पूर्ण जाला
७५४१	।।ना.गा.११४१.००३।।	क्षेत्रींचा महिमा पुसिती देवासी । जना आगळी काशी सांगियेली
७५४२	।।ना.गा.११४१.००४।।	येथोनियां वाट जाते वाराणसी । मुनि आणि ऋषि आनंदले
७५४३	।।ना.गा.११४१.००५।।	नामा म्हणे देवा दिवस जाले फार । लागेल उशीर समाधीसी
७५४४	।।ना.गा.११४२.००१।।	चालिले घेऊनि देव ऋषीश्वरा । आवघियां पुढारां गरुडदेव
७५४५	।।ना.गा.११४२.००२।।	दिवसानुदिवस चालिले सत्वर । पहावें गोदातीर म्हणोनियां
७५४६	।।ना.गा.११४२.००३।।	धन्य गोदातीर धन्य कचेश्वर । जाती ऋषीश्वर स्नानालागीं
७५४७	।।ना.गा.११४२.००४।।	सारा पौष मास गेला कचेश्वरीं। नित्य गंगातीरीं स्नानसंध्या
७५४८	।।ना.गा.११४२.००५।।	पाहिला कचेश्वर पाहिली ती गोदा । आली प्रतिपदा माघमास
७५४९	।।ना.गा.११४२.००६।।	नामा म्हणे देवा जावें पुण्यस्तंभा । मनोहर जागा सिद्धेश्वर
७५५०	।।ना.गा.११४३.००१।।	उठले वैष्णव कीर्तन गजरीं । आले सिद्धेश्वरीं आश्रमासी
७५५१	।।ना.गा.११४३.००२।।	पौर्णिमेपावेतों राहिले निश्चल। नेमा आतां स्थळ समाधीसी
७५५२	।।ना.गा.११४३.००३।।	निवृत्ती मुक्ताई संगें आला चांगा । म्हणती पांडुरंगा उठा आतां
७५५३	।।ना.गा.११४३.००४।।	ज्ञानदेवासाठीं उत्सव आळंकापूरीं। तैसा कऱ्हेतीरीं सोपानासी
७५५४	।।ना.गा.११४३.००५।।	तैसी चांगयाची पुरवावी आळी । नामा वनमाळी उठावले
७५५५	।।ना.गा.११४४.००१।।	दशमीचे दिवशीं ठेविलें प्रस्थान । साधियेला येणें देव गुरु

७५५६	।।ना.गा.११४४.००२।।	दिधला मंडप सिद्धेश्वरासमोर। उठावले भार वैष्णवांचे
७५५७	।।ना.गा.११४४.००३।।	सर्व स्वस्थ तेथें बैसले मिळून । नारद कीर्तन पुढें होत
७५५८	।।ना.गा.११४४.००४।।	धन्य पुण्यस्तंभ गंगातीर । धन्य दिसती भार पताकांचे
७५५९	।।ना.गा.११४४.००५।।	नामा म्हणे देवा निजभक्तीसाठीं । अंगें होसी कष्टी पांडुरंगा
७५६०	।।ना.गा.११४५.००१।।	गोदातीरीं उत्सव करिती जगजेठी । चांगदेवासाठीं समारंभ
७५६१	।।ना.गा.११४५.००२।।	निवृत्ती मुक्ताबाई संगें पंढरिनाथ। आले मंडपांत समुदायेंसी
७५६२	।।ना.गा.११४५.००३।।	निवृत्ति पांडुरंग बैसले निवाडे । चांगदेव पुढें उभे ठेले
७५६३	।।ना.गा.११४५.००४।।	जोडियेले कर चांगदेवें पुढतीं । करिती विनंति वोसंडोनी
७५६४	।।ना.गा.११४५.००५।।	नामा म्हणे देवा उठिलें अंत:करण । नाहीं देहभान चांगयासी
७५६५	।।ना.गा.११४६.००१।।	चवदाशें वर्षें शरीर केलें जतन । नाहीं अज्ञानपण गेलें माझें
७५६६	।।ना.गा.११४६.००२।।	अहंकारें माझें बुडविलें घर । जालों सेवा थोर स्वामीसंगें
७५६७	।।ना.गा.११४६.००३।।	तापत्रयीं तापलों महाअग्नीं जळालों । अविवेकीं जालों मंदमती
७५६८	।।ना.गा.११४६.००४।।	काय माझा देह वायांविण व्यर्थ । आलों शरणागत पांडुरंगा
७५६९	।।ना.गा.११४६.००५।।	अभिमानें आलों श्रीआळंकापुरीं । अज्ञान केलें दुरी मुक्ताईनें
७५७०	।।ना.गा.११४६.००६।।	नामा म्हणे योग दु:खाचें शरीर । काय याचा घोर करूनियां
७५७१	।।ना.गा.११४७.००१।।	नाना दु:ख माया आठवती मना । आतां नारायणा कृपा करी
७५७२	।।ना.गा.११४७.००२।।	माझ्या पातकांचा लागूं नेदी अंत । ऐसें माझें चित्त साक्ष असे
७५७३	।।ना.गा.११४७.००३।।	ज्ञानाग्नि माझी करा तृणवत । होऊनि कृपावंत श्रीहरी
७५७४	।।ना.गा.११४७.००४।।	योगिराज यासी नाहीं पापदोष । केला उपदेश मुक्ताईनें
७५७५	।।ना.गा.११४७.००५।।	नामा म्हणे देवा पेटलें अंतर । करा आतां स्थिर योगिराज
७५७६	।।ना.गा.११४८.००१।।	अवघ्या विद्येचा करूनी अभ्यास । पावलों मी क्लेश देवराया
७५७७	।।ना.गा.११४८.००२।।	मुक्ताबाई योगें उतरलों भवसिंधु । तैशी दीनबंधु कृपा करी
७५७८	।।ना.गा.११४८.००३।।	पतितपावन नाम तुझें थोर । करीं अंगिकार अनाथाचा
७५७९	।।ना.गा.११४८.००४।।	धन्य आमुचें भाग्य जाहलें दर्शन । अंगें नारायण साहित्य करी
७५८०	।।ना.गा.११४८.००५।।	चांगदेवें ऐसें आठविलें फार । केला नमस्कार नामा म्हणे
७५८१	।।ना.गा.११४९.००१।।	कृपावंत जाली जेव्हां मुक्ताबाई । स्वरूप दिशा दाही दाखविलें

७५८२	।।ना.गा.११४९.००२।।	पाठीं पोटीं स्वरूप केलें सद्गुरुनें । तंव अभिमान गेला माझा
७५८३	।।ना.गा.११४९.००३।।	याच्या उपकाराची काय वर्णूं थोरी । ज्यांच्यासंगें हरि जोडियेला
७५८४	।।ना.गा.११४९.००४।।	पुरे पुरे आतां आठविसी फार । होईल उशीर समाधीसी
७५८५	।।ना.गा.११४९.००५।।	नामा म्हणे देवा उठा संतजन । करूं आतां स्नान गौतमींसी
७५८६	।।ना.गा.११५०.००१।।	हरिपाठ गजरें केला जयजयकार । उठावले भार वैष्णवांचे
७५८७	।।ना.गा.११५०.००२।।	टाळ मृदंग वाजती अपार । मिरविती भार वैष्णवांचे
७५८८	।।ना.गा.११५०.००३।।	दोहीं बाहीं उभे पताकांचे भार । मध्यें मनोहर गौतमी ते
७५८९	।।ना.गा.११५०.००४।।	विसोबा खेचरें पुंडलिका हातें । आणिलें साहित्य समाधिचें
७५९०	।।ना.गा.११५०.००५।।	नामा म्हणे हरि चांगदेवा स्नान । घाली आवडीनें प्रेमयुक्त
७५९१	।।ना.गा.११५१.००१।।	निवृत्ति मुक्ताई गोविंद गोपाळ । उठले सकळ स्नानालागीं
७५९२	।।ना.गा.११५१.००२।।	राही रखुमाई सहसमुदायेंसी । मुनि आणि ऋषि उठावले
७५९३	।।ना.गा.११५१.००३।।	करूनियां स्नान निघाले सकळ । नाचती गोपाळ गोदातीरीं
७५९४	।।ना.गा.११५१.००४।।	चांगदेवें सोवळें होऊनियां त्वरें । देव ऋषीश्वर पूजियेले
७५९५	।।ना.गा.११५१.००५।।	धन्य गोदातीर आदि हे अनादि । उरकिली समाधि यथासांग
७५९६	।।ना.गा.११५१.००६।।	नामयाचे पुत्र नारा विठा गोंदा । जागा झाडी महादा समाधीची
७५९७	।।ना.गा.११५२.००१।।	चांगदेव योगी निष्काम चांगला । स्वरूपीं रंगला केशवाच्या
७५९८	।।ना.गा.११५२.००२।।	सुगंध अक्षता पुष्पें परिमल। पूजिले सकळ साधुसंत
७५९९	।।ना.गा.११५२.००३।।	राही रखुमाई आणि पांडुरंग । पूजियले सांग चांगदेवें
७६००	।।ना.गा.११५२.००४।।	पूजिली मुक्ताई सद्गुरु निवृत्ति । आणिक विभूति गौरविले
७६०१	।।ना.गा.११५२.००५।।	नामा म्हणे आतां नका राहूं स्थिर । होईल उशीर समाधीसी
७६०२	।।ना.गा.११५३.००१।।	उठियेलें देव गोपाळ मंडळी । बैसले ते पाळी समाधीचे
७६०३	।।ना.गा.११५३.००२।।	निशीं सर्व कीर्तन वद्य माघमासीं। व्रत एकादशी गोदातीरीं
७६०४	।।ना.गा.११५३.००३।।	द्वादशी पारणें वैष्णव सोडिती । बैसल्या त्या पंक्ती सिद्धेश्वरीं
७६०५	।।ना.गा.११५३.००४।।	सिद्धेश्वरीं पूजा केली चांगयानें । पात्रें नारायण टाकूं लागे
७६०६	।।ना.गा.११५३.००५।।	राही रखुमाई करिती पक्वान्नें । सोडितो पारणें चांगदेव
७६०७	।।ना.गा.११५३.००६।।	चांगदेवासंगें निवृत्ति मुक्ताई । बैसले ते पाही वैष्णवांत

७६०८	।।ना.गा.११५३.००७।।	नामा म्हणे आतां करावी भोजनें । ताटें रखुमाईनें विस्तारिलीं
७६०९	।।ना.गा.११५४.००१।।	एकमेळीं जेविती वैष्णव सकळ । वाढिती गोपाळ सकळांसी
७६१०	।।ना.गा.११५४.००२।।	पांडुरंगें केला चांगोबाचा सोहळा । माळ घाली गळां पुंडलिक
७६११	।।ना.गा.११५४.००३।।	गंध आणि अक्षता विसोबाचे हातीं । महापूजा होती चांगोबाला
७६१२	।।ना.गा.११५४.००४।।	आरत्या पंचारत्या करिती आनंदानें । नामा म्हणे प्रेमें वोसंडलें
७६१३	।।ना.गा.११५५.००१।।	निवृत्ति मुक्ताईचे वोसंडले नयन । करितो समाधान पांडुरंग
७६१४	।।ना.गा.११५५.००२।।	विसोबा खेचराचे भरोनि येती डोळे । परिसा तळमळे पुंडलिक
७६१५	।।ना.गा.११५५.००३।।	नाना खेद करूनि सारिलें भोजना । जाती आचमना गंगेलागीं
७६१६	।।ना.गा.११५५.००४।।	आंचवले देव वैष्णव ते ऋषी । जाती समाधीसी चांगदेव
७६१७	।।ना.गा.११५५.००५।।	जेवूनियां संत बैसले निवाडे । गोंदा महादा विडे वांटिताती
७६१८	।।ना.गा.११५५.००६।।	नामा म्हणे सवें उठे नारायण । आले अवघेजण समाधीपाशीं
७६१९	।।ना.गा.११५६.००१।।	मुक्ताईनें चांगा घेतलासे पोटा । उठा आतां भेटा लहान थोर
७६२०	।।ना.गा.११५६.००२।।	भेटले ऋषीश्वर वैष्णव सकळीं । बैसले ते पाळी समाधीच्या
७६२१	।।ना.गा.११५६.००३।।	निवृत्ति मुक्ताईसी केला नमस्कार । उतरिले पार भवसिंधू
७६२२	।।ना.गा.११५६.००४।।	विठ्ठल रखुमाईसी केली प्रदक्षिणा । मग शुद्ध नमना आरंभिलें
७६२३	।।ना.गा.११५६.००५।।	नामा म्हणे देवा निवृत्ति मुक्ताई । चांगा लागे पायीं जाऊनियां
७६२४	।।ना.गा.११५७.००१।।	नमो अनादि चक्रपाणी । नमो निवृत्ति ज्ञानस्वामी । नमो सोपान संजीवनी । मुक्ताबाई
७६२५	।।ना.गा.११५७.००२।।	नमो सद्गुरु मुक्ताई । नमो स्वस्वरूप ठायीं ठायीं । नमो वंदितसे पायीं । नमो नमो परम पद
७६२६	।।ना.गा.११५७.००३।।	नमो सूर्येन्धशनी । नमो भ्रुमध्य आटणी । नमो माय कुंडलिनी । योगियांची
७६२७	।।ना.गा.११५७.००४।।	नमो त्रिविधताप हरण । नमो विषय निवारण । नमो स्वामि निष्काम । कर्ता हर्ता नमो
७६२८	।।ना.गा.११५७.००५।।	नमो अर्ध नासिक धसनी । नमो पाठिपोटीं दाटणी । नमो जनीं वनीं । चिन्मयछत्र
७६२९	।।ना.गा.११५७.००६।।	नमो योगमाया दिगंबर । नमो व्यापक चराचर । गमो दाही अवतार । परब्रह्म नमो
७६३०	।।ना.गा.११५७.००७।।	कंद कळीकाळ हरणा नमो । तुझेनि परब्रह्म गमो । शांति अव्यक्त क्षमो । श्रीहरी
७६३१	।।ना.गा.११५७.००८।।	नमो संसार निरसिता । नमो माया हर्ता । नमो अद्वय अनंता । पांडुरंगा
७६३२	।।ना.गा.११५७.००९।।	नमो पातकसंहारी । नमो परब्रह्म खेचरी । नमो योग अगोचरीं । परमात्मा आत्मा
७६३३	।।ना.गा.११५७.०१०।।	नमो शिवशिवेशा । नमो आदिगुरु जगदीशा । नमो प्रकाश प्रकाशा । परब्रह्मा

७६३४	।।ना.गा.११५७.०११।।	पुरे पुरे येरझारा । नमो वेव्हार सारा । नमो शारंगधरा । अंत:करण पाहसी
७६३५	।।ना.गा.११५७.०१२।।	नमो मुक्ताईच्या उपदेशा । नमो आदि अनंता जगदीशा । स्वरूपादि परेशा । जगद्‌गुरु नमो नमो
७६३६	।।ना.गा.११५७.०१३।।	नमस्ते नमस्ते निवृत्ति । नमस्ते नमस्ते ज्ञानमूर्ती । नमस्ते नमस्ते सोपान ज्योती । परेशा नमो
७६३७	।।ना.गा.११५८.००१।।	लाविली कौपीन पितांबरी एक । त्यागिली अनेक महत् माया
७६३८	।।ना.गा.११५८.००२।।	सव्य हातें घेतलें संतसाधुजनां । केली प्रदक्षिणा समाधीसी
७६३९	।।ना.गा.११५८.००३।।	समाधीचे पाळी निवृत्ती वनमाळी । अंतरीं कळवळी मुक्ताबाई
७६४०	।।ना.गा.११५८.००४।।	आणिकांच्या डोळां अश्रुपात येत । होईल कीं गुप्त योगिराज
७६४१	।।ना.गा.११५८.००५।।	चांगदेवा दिधली विठोबाची पाऊलें। तीर्थ तें घेतलें देवगुरूचें
७६४२	।।ना.गा.११५८.००६।।	नामा म्हणे हरि झाली आळवण । करा बोळवण चांगोबाची
७६४३	।।ना.गा.११५९.००१।।	पुंडलिकें धरिला चांगोबाचा हात । तंव सकळ संत कळवळती
७६४४	।।ना.गा.११५९.००२।।	पताकांचे भार समाधि भोंवते । तेव्हां साधुसंत उठावले
७६४५	।।ना.गा.११५९.००३।।	यांच्या या ज्ञानाचा अंतपार नाहीं । भली मुक्ताई ओसंडली
७६४६	।।ना.गा.११५९.००४।।	संतसमागम फळला तुजला । एकांत फावला मुक्ताई
७६४७	।।ना.गा.११५९.००५।।	मसुरेप्रमाणें दावियेली खूण । तेंचि पूर्ण ब्रह्म योगियाचें
७६४८	।।ना.गा.११५९.००६।।	फार दिवस तुम्हीं रक्षिलें शरीर । मुक्ताईनें पार उतरिलें
७६४९	।।ना.गा.११५९.००७।।	नामा म्हणे देवा सद्‌गुरुचा महिमा । बाप पूर्ण आम्हां पांडुरंग
७६५०	।।ना.गा.११६०.००१।।	कुंकुम केशराचे समाधीसी सडे । पहाती निवाडे जनलोक
७६५१	।।ना.गा.११६०.००२।।	गोदातीरीं महोत्सव चांगदेवा । पूर्ण तूं विसावा पांडुरंगा
७६५२	।।ना.गा.११६०.००३।।	समाधीभोंवते उभे साधुसंत । उतरले आंत चांगदेव
७६५३	।।ना.गा.११६०.००४।।	निवृत्ती पांडुरंग गेले समागमें । वैष्णव रामराम बोलताती
७६५४	।।ना.गा.११६०.००५।।	राहि रखुमाबाई उभ्या दोहीं बाहीं । मध्यें मुक्ताबाई संबोखिती
७६५५	।।ना.गा.११६०.००६।।	नामा पुंडलिक करिती समाधान । स्थिर करा मन बोधभावें
७६५६	।।ना.गा.११६१.००१।।	समाधीशी शेज घातली मनोहर । बैसविले वर चांगदेव
७६५७	।।ना.गा.११६१.००२।।	आनंदाने टाळ्या पिटिति वैष्णवभार। लाविती पदर डोळियासी
७६५८	।।ना.गा.११६१.००३।।	टाळ मृदंगाचा जाला झणत्कार । गेले योगेश्वर समाधीसी
७६५९	।।ना.गा.११६१.००४।।	सांडिली भूषणें भस्म आभरणें । जाले निमग्न परब्रह्मीं

७६६०	।।ना.गा.११६१.००५।।	झांकियेले नेत्र उन्मनीच्या संगें । निवृत्ति पांडुरंग ओसंडले
७६६१	।।ना.गा.११६१.००६।।	नामा म्हणे जाला समाधिस्थ योगेश्वर । निघाले बाहेर देवभक्त
७६६२	।।ना.गा.११६२.००१।।	भूचरी खेचरी चांचरी निश्चळा । अगोचरी डोळा स्थिरावली
७६६३	।।ना.गा.११६२.००२।।	झांकिली समाधी संतसज्जनांनीं । तुलसी पुष्पें वरूनि वर्षताती
७६६४	।।ना.गा.११६२.००३।।	निवृत्तीची मिठी विठोबाच्या गळां । आणिकांच्या डोळां अश्रू येती
७६६५	।।ना.गा.११६२.००४।।	केलें समाधान विठ्ठल रखुमाईनें । निवृत्ति म्हणे राहणें काय आतां
७६६६	।।ना.गा.११६२.००५।।	गेले योगिराज राहिले ठायीं ठायीं । आतां मुक्ताई जाईल कीं
७६६७	।।ना.गा.११६२.००६।।	स्वरूपींचे ओघ जातील स्वरूपीं । नामा म्हणे निरोपी पांडुरंग
७६६८	।।ना.गा.११६३.००१।।	देवें समाधान केलें अवघेजण । चला आचमना गौतमीसी
७६६९	।।ना.गा.११६३.००२।।	वद्य त्रयोदशी दिधली समाधी। महोत्सव गोविंदीं समर्पिला
७६७०	।।ना.गा.११६३.००३।।	गर्जती वैष्णव विठोबाच्या नामा । थोर तुझा महिमा दीनबंधु
७६७१	।।ना.गा.११६३.००४।।	समाधि प्रदक्षिणा केली अवघींजणीं । जाली बोळवणी चांगयाची
७६७२	।।ना.गा.११६३.००५।।	कीर्तन करीत आले गौतमीसी । देव मुनि ऋषि आंचवले
७६७३	।।ना.गा.११६३.००६।।	अवघ्यांनीं आचमनें केलीं गोदातीरीं । नामा म्हणे हरी आतां उठा
७६७४	।।ना.गा.११६४.००१।।	आचमन करुनि आले सिद्धेश्वरा । हरि ऋषीश्वरा आर्जविती
७६७५	।।ना.गा.११६४.००२।।	निवृत्ती मुक्ताईला त्यागूं नये कोणी । आतां उत्तरायणीं गमन करूं
७६७६	।।ना.गा.११६४.००३।।	पांच दिवस उत्सव केला चांगदेवा । विश्वाचा विसावा श्रीहरी
७६७७	।।ना.गा.११६४.००४।।	वैष्णवांनीं समाधि बांधली साजिरी । सुवर्णाचा वरी पिंपळ तो
७६७८	।।ना.गा.११६४.००५।।	केला नमस्कार वैष्णवांनीं जेव्हां । मुक्ताई तेव्हां वोसंडली
७६७९	।।ना.गा.११६४.००६।।	नामा म्हणे देवा तीर्थक्षेत्र चांगलें । चित्त मन रंगलें चांगयाचे
७६८०	।।ना.गा.११६५.००१।।	शुद्ध फाल्गुन मांसी वैष्णव हृषिकेशी । पंचमीचे दिवशीं सिद्ध जाले
७६८१	।।ना.गा.११६५.००२।।	निवृत्तिराज म्हणे जावें म्हाळसापुरीं । जेथें ज्ञानेश्वरी पूर्ण जाली
७६८२	।।ना.गा.११६५.००३।।	उठावले भार देवऋषीश्वर । केला नमस्कार समाधीसी
७६८३	।।ना.गा.११६५.००४।।	सव्यहातें क्षेत्र घेतलें वैष्णवांनीं । चालली विमानें नेवाशासी
७६८४	।।ना.गा.११६५.००५।।	नामा म्हणे देव निघाले बाहेर । कीर्तन गजर पुढें होती
७६८५	।।ना.गा.११६६.००१।।	तेथोनि वैष्णव आले नेवाशासी । सहसमुदायेंसी देवराव

७६८६	।।ना.गा.११६६.००२।।	म्हाळसेलागीं पूजा केली असे निगुतीं । राहिले दहा रात्रीं हृषिकेशी
७६८७	।।ना.गा.११६६.००३।।	येथोनि चलावें पुढती शारंगधरा । जावें टोकेश्वरा स्नानालागीं
७६८८	।।ना.गा.११६६.००४।।	चहू युगा आदि स्थळ पुरातन । आले नारायण गोदातीरीं
७६८९	।।ना.गा.११६६.००५।।	नामा म्हणे येथें रहावें हृषिकेशी । विजयादशमीशीं सिद्ध होऊं
७६९०	।।ना.गा.११६७.००१।।	देव म्हणे राहणें न घडेचि येथें । जावें आतां पुढतें उद्योगासी
७६९१	।।ना.गा.११६७.००२।।	निवृत्तिराज म्हणे शुद्ध प्रतिपदा । जाऊं जी गोविंदा प्रतिष्ठाना
७६९२	।।ना.गा.११६७.००३।।	अनादि जें स्थळ दाविलें नारायणें । मग प्रतिष्ठाना येते जहाले
७६९३	।।ना.गा.११६७.००४।।	चक्रतीर्थी पोहा म्हणती आला थोर । वैष्णवांचे भार उतरले
७६९४	।।ना.गा.११६७.००५।।	नामा म्हणे हरी सहज आली वाट । आपेगांव कोठें सांगा स्वामी
७६९५	।।ना.गा.११६८.००१।।	मायभूमि पाहू यांची आम्हीं डोळां । चलावें गोपाळा सहजासहज
७६९६	।।ना.गा.११६८.००२।।	भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आदि । तयाची समाधि आपेगांवीं
७६९७	।।ना.गा.११६८.००३।।	आपेगांवीं आले देव ऋषीश्वर । उतरले भार वैष्णवांचे
७६९८	।।ना.गा.११६८.००४।।	धन्य यांचें कुळ धन्य यांचा वंश । धन्य यांचें कुशीं योगिराज
७६९९	।।ना.गा.११६८.००५।।	नामा म्हणे आम्हां दाविलें नारायणें । जालीं चौघीजणें याचि क्षेत्रीं
७७००	।।ना.गा.११६९.००१।।	निवृत्ति मुक्ताईनें पाहुनि स्थळ डोळां । आलासे उमाळा ओसंडोनी
७७०१	।।ना.गा.११६९.००२।।	तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा
७७०२	।।ना.गा.११६९.००३।।	निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न । सांभाळी सोपान मजलागीं
७७०३	।।ना.गा.११६९.००४।।	तुझ्या योगें हरि क्रमियेलें काळा । फुटलासे मेळा तापसांचा
७७०४	।।ना.गा.११६९.००५।।	नामा म्हणे यांचें कळवळलें मन । करी समाधान पांडुरंग
७७०५	।।ना.गा.११७०.००१।।	पाहिली गे माय पूर्वभूमि आपुली । बहुत सन्मानिली वैष्णवांनीं
७७०६	।।ना.गा.११७०.००२।।	चैत्रमास शिवरात्र उत्सव आगळा । जावें पां वेरुळा घृष्णेश्वरा
७७०७	।।ना.गा.११७०.००३।।	दशमीचे दिवशीं निघाले बाहेर । उठावले भार वैष्णवांचे
७७०८	।।ना.गा.११७०.००४।।	वेरूळ नगर असे पुरातन । विश्वकर्मा यानें कीर्ति केली
७७०९	।।ना.गा.११७०.००५।।	अगाध तें पुण्य बोलताती ऋषि । जावें वेरुळासी नामा म्हणे
७७१०	।।ना.गा.११७१.००१।।	मुक्ताई उदासी जाली असे फार । आतां हें शरीर रक्षूं नये
७७११	।।ना.गा.११७१.००२।।	त्यागिले आहार अन्नपाणी सकळीं । निवृत्तिराज तळमळी मनामाजीं

७७१२	।।ना.गा.११७१.००३।।	गंधर्व सुरगण उठले सहमेळा । गेले ते वेरूळा अवघेजण
७७१३	।।ना.गा.११७१.००४।।	वेरुळाचा महिमा सांगे हृषिकेशी । जना आगळी काशी म्हणोनियां
७७१४	।।ना.गा.११७१.००५।।	वेरुळाची यात्रा केली यथासांग । मग पांडुरंग निघते जाले
७७१५	।।ना.गा.११७१.००६।।	चालिले श्रीरंग वैष्णवांचे भार । पाहावें तापीतीर नामा म्हणे
७७१६	।।ना.गा.११७२.००१।।	निवृत्तिराज म्हणे आतां पंढरिनाथा । मुक्ताईला जपा अवघेजण
७७१७	।।ना.गा.११७२.००२।।	वेधली चित्तवृत्ति स्वरूपीं निमग्न । नाहीं देहभान मुक्ताईला
७७१८	।।ना.गा.११७२.००३।।	अवघेजण जपती जपे नारायण । चालती घेऊन मध्यभागीं
७७१९	।।ना.गा.११७२.००४।।	निवृत्तिराजें धरिली मुक्ताई हातीं । सांभाळित जाती निशिदिनीं
७७२०	।।ना.गा.११७२.००५।।	पदोपदीं जपे निवृत्तिराज करें । आणिक ऋषीश्वर सांभाळिती
७७२१	।।ना.गा.११७२.००६।।	नामा म्हणे देवा जातां तातडीनें। पुढें स्थळ कोणें नेमियेलें
७७२२	।।ना.गा.११७३.००१।।	तापीचिये तीरीं महत्ग्राम थोर । असे सोमेश्वर पुरातन
७७२३	।।ना.गा.११७३.००२।।	वद्य वैशाख मास दशमी निर्मळ । उष्णकाळ फार तापतसे
७७२४	।।ना.गा.११७३.००३।।	तेथें परशुरामें मारियेला बाण । पाहती पुरातन पश्चिमेस
७७२५	।।ना.गा.११७३.००४।।	पाहिलें माय आम्हीं तापीतीर । उतरले भार वैष्णवांचे
७७२६	।।ना.गा.११७३.००५।।	धन्य तापीतीर दिसे मनोहर । दोही थडी भार पताकांचे
७७२७	।।ना.गा.११७३.००६।।	नामा म्हणे हरी आवडीचें स्थळ । कण्हेर कमळ उदय जाला
७७२८	।।ना.गा.११७४.००१।।	फुलले अनेक तरुवर तेथ । दुर्वा दर्भ आंत डंवरले
७७२९	।।ना.गा.११७४.००२।।	करंज जांभळी लागली एक थाटी । वरी बहु दाटी तरुवरांची
७७३०	।।ना.गा.११७४.००३।।	अमृतफळें अपार विस्तारले फार । त्यामाजीं मयूर टाहो देती
७७३१	।।ना.गा.११७४.००४।।	कंठ कोकिळा त्या सुस्वर गायन । तरुवर सुमनें परिमळते
७७३२	।।ना.गा.११७४.००५।।	पारिजातकांची दाटी थाटी झाली भारी । आंत मैलागिरी डुल्लताती
७७३३	।।ना.गा.११७४.००६।।	नामा म्हणे देवा भला हा एकांत । मार्कंडेयें येथें तप केलें
७७३४	।।ना.गा.११७५.००१।।	सोनियाचीं झाडें अनेक कर्दळा । त्यांत रानकेळा फोंफावल्या
७७३५	।।ना.गा.११७५.००२।।	सीताफळी भरित अवघी तापीथडी । दाट दिसती गाढी रामफळें
७७३६	।।ना.गा.११७५.००३।।	तापीतीरीं ऋषि आणि शारंगधर । पाठीमागें भार वैष्णवांचे
७७३७	।।ना.गा.११७५.००४।।	धन्य महत्नगर धन्य सोमेश्वर। धन्य तापीतीर योगियांचें

७७३८	।।ना.गा.११७५.००५।।	उष्णकाळीं छाया आवडती फार । म्हणती ऋषीश्वर रम्य स्थळ
७७३९	।।ना.गा.११७५.००६।।	नामा म्हणे देवा रंगलें अंत:करण । उतरती विमानें गंधर्वांची
७७४०	।।ना.गा.११७६.००१।।	उदित कमळें नानावर्ण सुंदर । फुलले तरुवर नानारूपें
७७४१	।।ना.गा.११७६.००२।।	श्वेतपीतरक्त भ्रमर रुणझुण । होताती श्रवण वैष्णवांसी
७७४२	।।ना.गा.११७६.००३।।	गुंजारव भ्रमती रत्नकीळा फांकती । मनोहर दिसती सुरवरांनां
७७४३	।।ना.गा.११७६.००४।।	तरुवर गगनीं अंकुरले भारी । विजा तैं कोंदल्या बहुतांपरी
७७४४	।।ना.गा.११७६.००५।।	गंधर्व गायनें आलापित सुस्वरीं । केलें स्पष्ट नयनीं गुह्य गौप्य
७७४५	।।ना.गा.११७६.००६।।	नामा म्हणे देवा मन जालें स्थिर । पडियेला विसर अविद्येचा
७७४६	।।ना.गा.११७७.००१।।	निवृत्तीनें एकांत केला मुक्ताईशीं । गमन कोणे दिवशीं आरंभिलें
७७४७	।।ना.गा.११७७.००२।।	मुक्ताई म्हणे जावें यावें कोठें । अवघें निघोट स्वरूप स्वामी
७७४८	।।ना.गा.११७७.००३।।	गर्जतां गगन कडाडली वीज । स्वरूपीं सहज मिळयेली
७७४९	।।ना.गा.११७७.००४।।	मावळला दीप ज्योत कोठें होती। सहज सामावती निरंजनीं
७७५०	।।ना.गा.११७७.००५।।	नामा म्हणे हरि जाईल पाहतां । ऐसें माझे चित्ता कळों आलें
७७५१	।।ना.गा.११७८.००१।।	आमुच्या स्वस्थानीं नाहीं पां अंधार । अवघीं चराचर प्रकाशत्वें
७७५२	।।ना.गा.११७८.००२।।	उदयु आणि अस्तु नाहीं स्वरूपासी । ऐसें मुनि ऋषि जाणताती
७७५३	।।ना.गा.११७८.००३।।	आम्हीं कधीं आलों स्वरूप सोडोन । जावें पालटोन जेथिल तेथें
७७५४	।।ना.गा.११७८.००४।।	अंतर बाहेर स्वामींचें स्वरूप । स्वयें नंदादीप उजळिला
७७५५	।।ना.गा.११७८.००५।।	वद्य वैशाखमासीं दशमीचे दिवशीं । गेले ते स्नानासी तापीतीरीं
७७५६	।।ना.गा.११७८.००६।।	नामा म्हणे गोविंदा मनोहर पद्मनाभा । अंकुरला गाभा विराटाचा
७७५७	।।ना.गा.११७९.००१।।	टाळ विणे मृदंग सुस्वर गायन । कोंदलें गगन दाही दिशा
७७५८	।।ना.गा.११७९.००२।।	प्रळयींच्या विजा वर्षती अपार। जाला धुंधकार दाही दिशा
७७५९	।।ना.गा.११७९.००३।।	करोनियां स्नान बैसले बाहेर । म्हणती अंधकार फार जाला
७७६०	।।ना.गा.११७९.००४।।	झंझाट सुटला वारा कापूं लागे धरा । नभचि अंतरा कालवलें
७७६१	।।ना.गा.११७९.००५।।	नामा म्हणे देवा जाली कैसी गती । पडलीसे भ्रांति अवघ्या जनां
७७६२	।।ना.गा.११८०.००१।।	निवृत्तिराज म्हणे प्रळयींचा वारा । सुटला शारंगधरा ऐसें वाटे
७७६३	।।ना.गा.११८०.००२।।	हालतें गगन डोलती विमानें। गेलें देहभान अवघियांचें

७७६४	।।ना.गा.११८०.००३।।	अवघियांचे डोळे झांकले एकट । माध्यान्हीं अभूट वळुनि आलें
७७६५	।।ना.गा.११८०.००४।।	निवृत्ति पांडुरंग राही रखुमाई । धरा म्हणती घाई मुक्ताईला
७७६६	।।ना.गा.११८०.००५।।	नामा म्हणे केशवा जाहला उबाळा । कांहीं केल्या डोळा उघडें नेदी
७७६७	।।ना.गा.११८१.००१।।	ऋषि म्हणती हरि पातलेसें विघ्न । आतां कैसे प्राण वांचतील
७७६८	।।ना.गा.११८१.००२।।	कोणाचिया शुद्धि नाहींचिया कोणा। म्हणती नारायणा मृत्यु आला
७७६९	।।ना.गा.११८१.००३।।	कडाडली वीज निरंजनीं जेव्हां । मुक्ताई तेव्हां गुप्त जाली
७७७०	।।ना.गा.११८१.००४।।	वैकुंठीं लक्ष घंटा वाजती एकघाई । जाली मुक्ताई स्वरूपाकार
७७७१	।।ना.गा.११८१.००५।।	एक प्रहर जाला प्रकाश त्रिभुवनीं । जेव्हां निरंजनीं गुप्त जाली
७७७२	।।ना.गा.११८१.००६।।	गेलें निवारूनी आकाश अभूट । नामा म्हणे कोठें मुक्ताबाई
७७७३	।।ना.गा.११८२.००१।।	उघडिल्या दिशा उघडिलें गगन । पाहिलें वदन भास्कराचें
७७७४	।।ना.गा.११८२.००२।।	निवृत्तिराजातें कळवळा वाटे भारी । आतां आम्हां हरि आज्ञा द्यावी
७७७५	।।ना.गा.११८२.००३।।	जयजयकारें टाळ्या पिटिती सकळ । नाचती गोपाळ तापीतीरीं
७७७६	।।ना.गा.११८२.००४।।	सकळांचे चित्तीं येतो कळवळा । मुक्ताई डोळां पाहिली नाहीं
७७७७	।।ना.गा.११८२.००५।।	नानापरी खेद करिती योगेश्वर । लाविती पदर डोळियांसी
७७७८	।।ना.गा.११८२.००६।।	नामा म्हणे देवा कैसें आतां कांहीं । आम्हां मुक्ताई बोलली नाहीं
७७७९	।।ना.गा.११८३.००१।।	ज्ञानेश्वरा तुम्ही निरविलें सोपान । केली बोळवण पांडुरंगा
७७८०	।।ना.गा.११८३.००२।।	तो आम्ही उत्सव पाहिलासे डोळां । चांगोबाचा सोहळा दाविला हरी
७७८१	।।ना.गा.११८३.००३।।	होती ऐसी नाहीं जाली मुक्ताई । संत तया ठायीं स्फुंदताती
७७८२	।।ना.गा.११८३.००४।।	रम्य स्थळ म्हणोनि राहिले एक मास । युगा ऐसे दिवस क्रमियेले
७७८३	।।ना.गा.११८३.००५।।	अर्ध मास वैशाख अर्ध मास ज्येष्ठ । फार होती कष्ट निवृत्तिराजा
७७८४	।।ना.गा.११८३.००६।।	मुक्ताई मुक्त केली केशवराजा । नामा म्हणे पूजा तापीतीरा
७७८५	।।ना.गा.११८४.००१।।	पूजियेली तापी पूजिला सोमेश्वर । उठावले भार वैष्णवांचे
७७८६	।।ना.गा.११८४.००२।।	कांहीं कोणावरी नाहीं पडलें ओझें । कष्टी निवृत्तिराज होत असे
७७८७	।।ना.गा.११८४.००३।।	आली गेली कैसी आम्हां कळलें नाहीं । कोठें मुक्ताई विसर्जिली
७७८८	।।ना.गा.११८४.००४।।	नामा म्हणे देवा उठवा ऋषीश्वरा । निवृत्तीचें करा समाधान
७७८९	।।ना.गा.११८५.००१।।	निवृत्तिराज म्हणे भलें केलें देवा । आतां जी केशवा सिद्ध व्हावें

७७९०	।।ना.गा.११८५.००२।।	निवृत्तिदास म्हणे सहजासहज हरी । बोळविलीं सारी सुखधामा
७७९१	।।ना.गा.११८५.००३।।	दाही दिशा चित्त जालें असें सैरा । आतां शारंगधरा सिद्ध व्हावें
७७९२	।।ना.गा.११८५.००४।।	आतां माझे श्रम नको घेऊं हरी । जावें त्र्यंबकेश्वरीं समाधीसी
७७९३	।।ना.गा.११८५.००५।।	पार माझा प्राण आला असे कंठीं। आतां जगजेठी सिद्ध व्हावें
७७९४	।।ना.गा.११८५.००६।।	नामा म्हणे देवा दिवस नाहीं आतां । त्वरें वेगीं संता सिद्ध करा
७७९५	।।ना.गा.११८६.००१।।	विमानीं बैसली विठ्ठल सुखमूर्ती । घेतला निवृत्ती मध्यभागीं
७७९६	।।ना.गा.११८६.००२।।	राही रखुमाई बैसले सुरगण। उठलीं विमानें गंधर्वांचीं
७७९७	।।ना.गा.११८६.००३।।	गोपाळांचे भार उठले तातडीनें । चालिलीं विमानें सुरवरांचीं
७७९८	।।ना.गा.११८६.००४।।	आतां त्वरें चला तुम्ही सप्तश्रृंगा । कार्य हें गोविंदा सिद्धि न्यावें
७७९९	।।ना.गा.११८६.००५।।	आदि माया तेथें होईल दर्शन । संत साधुजन भेटतील
७८००	।।ना.गा.११८६.००६।।	नामा म्हणे धन्य तुझ्या योगें हरी । तीर्थयात्रा सारी घडली आम्हां
७८०१	।।ना.गा.११८७.००१।।	टाळ हे मृदंग गायनें पुढतीं । रंजविती निवृत्ति अवघेजण
७८०२	।।ना.गा.११८७.००२।।	गीतार्थ करिती योगी मुनिजन । रंजविती मन निवृत्तीचें
७८०३	।।ना.गा.११८७.००३।।	आत्मसुख एक बोलती बोलणीं । ज्ञानराज मनी आठवतो
७८०४	।।ना.गा.११८७.००४।।	ज्ञानराजें आमुचे निवविले डोळे । आतां ऐसे खेळे नाहीं कोणी
७८०५	।।ना.गा.११८७.००५।।	ऐकावा हा अर्थ मुक्ताईच्या मुखीं । आतां ऐसी सखी नाहीं कोणी
७८०६	।।ना.गा.११८७.००६।।	नामा म्हणे स्वामी सांगतां प्रमाण । ऐकतां श्रवण खेद वाटे
७८०७	।।ना.गा.११८८.००१।।	अविट बोलणें बोलावें अनादि । जें गुह्य वेदीं सांपडेना
७८०८	।।ना.गा.११८८.००२।।	कीर्ति पैं वैराग्य केलें सामराज्य। गुरुत्वासी लाज नाहीं आली
७८०९	।।ना.गा.११८८.००३।।	नाशिवंत शरीर केलें अविनाश । घडविला विलास अध्यात्मींचा
७८१०	।।ना.गा.११८८.००४।।	अविट बोलणीं आठवती मनीं । आतां त्रिभुवनीं दिसेनात
७८११	।।ना.गा.११८८.००५।।	तुझ्यामुळें हरि चालतो उगला । देहा आधीं गेला प्राण माझा
७८१२	।।ना.गा.११८८.००६।।	नामा म्हणे देवा करितां ऐसा घोर । सांडील शरीर निवृत्तिराज
७८१३	।।ना.गा.११८९.००१।।	जें जें सुख आम्हीं अनुभविलें मना । त्याचा नारायणा आठव होतो
७८१४	।।ना.गा.११८९.००२।।	ऐसें पदोपदीं निवृत्तिराज कष्टी । कोणकोणाच्या गोष्टी आठवाव्या
७८१५	।।ना.गा.११८९.००३।।	ज्येष्ठाच्या आधीं कनिष्ठाचें जाणें । केलें नारायणें उफराटें

७८१६	।।ना.गा.११८९.००४।।	उफराटें फार कळलें माझें मनीं । वळचणीचें पाणी आढ्या गेलें
७८१७	।।ना.गा.११८९.००५।।	अवघ्यापरीस कष्टी केलें मुक्ताईनें । कांहींच बोलणें घडलें नाहीं
७८१८	।।ना.गा.११८९.००६।।	नामा म्हणे विठोबा ऐकशी बोलणें । अवघियांची मनें कळवळीती
७८१९	।।ना.गा.११९०.००१।।	गहिनीनाथें मज सांगितलें सार । केली ज्ञानेश्वरें व्याख्या त्याची
७८२०	।।ना.गा.११९०.००२।।	काढिला शोधून अनुभव मुक्ताईनें । ते ज्ञान सोपानें संपादिलें
७८२१	।।ना.गा.११९०.००३।।	अनुभवें निवविला चांगा वटेश्वर । विसोबा खेंचर सिद्ध जाला
७८२२	।।ना.गा.११९०.००४।।	त्या ज्ञानें जाला चांगदेव विकळ । त्यागियेली सकळ अविद्या माया
७८२३	।।ना.गा.११९०.००५।।	अज्ञानासी ज्ञान जालें तैं सहज । ऐसें निवृत्तिराज आठविती
७८२४	।।ना.गा.११९०.००६।।	सप्तश्रृंगीं आले देव सुरगण । उतरिलीं विमानें नामा म्हणे
७८२५	।।ना.गा.११९१.००१।।	देवीं देवेंश शिवीं शिवेश । अगम्य सुरस आदिमाया
७८२६	।।ना.गा.११९१.००२।।	अष्टदिशा अगोचरें अष्टभुजा संहारकें। असुरादि मंथन विरे कुलस्वामिनिये
७८२७	।।ना.गा.११९१.००३।।	वदताती देव आणि सुरगण । उतरिलीं विमानें ठायीं ठायीं
७८२८	।।ना.गा.११९१.००४।।	सकळांनी पूजा केली आनंदानें । करिती कीर्तनें अंबेपुढें
७८२९	।।ना.गा.११९१.००५।।	मंडपीं बैसले निवृत्ति नारायण । नारदकीर्तनें पुढें होत
७८३०	।।ना.गा.११९१.००६।।	नामा म्हणे देवी पहाती सकळ । पूजिती गोपाळ आनंदानें
७८३१	।।ना.गा.११९२.००१।।	सप्तश्रृंगालागीं केली प्रदक्षिणा । आतां नारायणा सिद्ध व्हावें
७८३२	।।ना.गा.११९२.००२।।	मार्गीं आदिमाया पूजिली आनंदी । म्हणती धन्य मांदी वैष्णवांची
७८३३	।।ना.गा.११९२.००३।।	चालतां चालतां दिवस जाले फार । होईल उशीर समाधीसी
७८३४	।।ना.गा.११९२.००४।।	तीन रात्र तेथें राहिले गोपाळ। मग म्हणती सकळ चला आतां
७८३५	।।ना.गा.११९२.००५।।	नामा म्हणे देव बैसले गरुडावर । उठावले भार वैष्णवांचे
७८३६	।।ना.गा.११९३.००१।।	वंदिली अंबिका निघाले बाहेर । कीर्तन गजर पुढें होत
७८३७	।।ना.गा.११९३.००२।।	गोदातीरीं क्षेत्र धन्य त्र्यंबकेश्वर । उतरले भार वैष्णवांचे
७८३८	।।ना.गा.११९३.००३।।	म्हणती पांडुरंगें दावियेलें स्थळ । निवृत्तिराज विकळ पार जाले
७८३९	।।ना.गा.११९३.००४।।	पंचमीचे दिवशीं गेले पंचवटी । उतरले तटीं गौतमीचे
७८४०	।।ना.गा.११९३.००५।।	नामा म्हणे शेवट केला वनमाळी । राहती ये स्थळीं निवृत्तिराज
७८४१	।।ना.गा.११९४.००१।।	सुंदर नारायण गौरविले फार । केला नमस्कार वैष्णवांनीं

७८४२	।।ना.गा.११९४.००२।।	सुरस सर्व तीर्थें आदि पुरातन । केली नारायणें तीर्थयात्रा
७८४३	।।ना.गा.११९४.००३।।	विसोबा खेचर परिसा भागवत । अनेक ते संत बैसविले
७८४४	।।ना.गा.११९४.००४।।	मध्ये निवृत्तिराज पांडुरंग पुंडलिक । पाहाती कौतुक गौतमीचें
७८४५	।।ना.गा.११९४.००५।।	दशमीचे दिवशीं केलें तें प्रस्थान । विधि नारायण सांगतसे
७८४६	।।ना.गा.११९४.००६।।	नामा म्हणे श्रीरंगा गौरविले सकळ । जालासे विकळ निवृत्तिराज
७८४७	।।ना.गा.११९५.००१।।	सहसमुदायेंसी उठावें शारंगधरा । हरिहरेश्वरा जाऊं आतां
७८४८	।।ना.गा.११९५.००२।।	उठले वैष्णव आणि हृषिकेशी। आले त्र्यंबकासी निवृत्तिराज
७८४९	।।ना.गा.११९५.००३।।	एकादशी व्रत वद्य ज्येष्ठ मासीं । उत्सव निवृत्तिसी देवें केला
७८५०	।।ना.गा.११९५.००४।।	द्वादशीं पारणें सोडिती वैष्णव । समारंभ देव करितसे
७८५१	।।ना.गा.११९५.००५।।	राहिली ते शक्ति गळालें शरीर । देह अहंकार त्यागियेला
७८५२	।।ना.गा.११९५.००६।।	कोणाची करावी पूजा कोणें कोणा । अवघे नारायणा करणें येथें
७८५३	।।ना.गा.११९५.००७।।	नामा म्हणे देवा मुक्ताईची गती। सांडिलें निवृत्ती शरीरासी
७८५४	।।ना.गा.११९६.००१।।	आपुलिया अंगें साहित्य श्रीरंगें । पुजियेले सांग संतसाधू
७८५५	।।ना.गा.११९६.००२।।	निवृत्तिदेवें केली विठोबाची पूजा । उभारिल्या ध्वजा पताकांच्या
७८५६	।।ना.गा.११९६.००३।।	पश्चिमेसी स्थळ अनादि समूळ । उघडिली शीळ समाधीची
७८५७	।।ना.गा.११९६.००४।।	म्हणती योगेश्वर अनादि या शेजा। चिद्रत्नें ती पूजा केली असे
७८५८	।।ना.गा.११९६.००५।।	नामा म्हणे देवा जागा निरंजनीं । युगादि हे धुणी धृपतीये
७८५९	।।ना.गा.११९७.००१।।	तुळसी बेल पुष्पें समर्पिलीं वर । पाहाती ऋषीश्वर पहिली पूजा
७८६०	।।ना.गा.११९७.००२।।	नारा विठा गोंदा पाठविला महादा । झाडावया शेजा पुढें जाले
७८६१	।।ना.गा.११९७.००३।।	सभोंवतीं जागा झाडिली निर्मळ । अनादि हें स्थळ निवृत्तिराजा
७८६२	।।ना.गा.११९७.००४।।	सभोंवते दीप लाविलें समाधी । म्हणती पूजा आधीं केली असे
७८६३	।।ना.गा.११९७.००५।।	अनादि हे पूजा केली म्हणती संत । आतां कोणी आंत उतरूं नये
७८६४	।।ना.गा.११९७.००६।।	नामा म्हणे हरि काय स्थळ चांगलें । दुर्वा दर्भ फुलें वाहियेलीं
७८६५	।।ना.गा.११९८.००१।।	पुष्करिणीकांठीं वैष्णवांचे भार । देव ऋषीश्वर जेवताती
७८६६	।।ना.गा.११९८.००२।।	अवघिया पात्रें वाढलीं नारायणें। सोडिती पारणें निवृत्तिराज
७८६७	।।ना.गा.११९८.००३।।	विठोबा रखुमाईनें घेतला निवृत्ति । जेविताती पंक्ति गोपाळांच्या

७८६८	।।ना.गा.११९८.००४।।	जेवले वैष्णव आणि हृषिकेशी । गेले आचमनासी पुष्करिणीतें
७८६९	।।ना.गा.११९८.००५।।	अवघे संत तेथें बैसले निवाडे । पुंडलिक विडे वांटितसे
७८७०	।।ना.गा.११९८.००६।।	नामा म्हणे केशव बैसले कीर्तनास । होतो कासाविस निवृत्तिराज
७८७१	।।ना.गा.११९९.००१।।	निवृत्तिदेवासाठीं स्फुंदती ऋषीश्वर । लाविला पदर डोळियांसीं
७८७२	।।ना.गा.११९९.००२।।	गरुडावर पुंडलिकें घातियेला साज । जाती निवृत्तिराज समाधीसी
७८७३	।।ना.गा.११९९.००३।।	चालती विमानें वाजतसे घंटा । उठा आतां भेटा अवघेजण
७८७४	।।ना.गा.११९९.००४।।	समाधीभोंवते कुंकुमाचे सडे । पाहती निवाडे योगीराज
७८७५	।।ना.गा.११९९.००५।।	कीर्तन गजरीं गेलीसें मंडळी । बैसली ते पाळी समाधीच्या
७८७६	।।ना.गा.११९९.००६।।	नामा म्हणे पुढें उभे नारायण । आरंभिलें नमन निवृत्तिराजें
७८७७	।।ना.गा.१२००.००१।।	नमो गणपति गजानना । नमो सरस्वती मंगलध्याना । नमो अगाध ब्रह्मपरायणा । नमो नमो स्वामी
७८७८	।।ना.गा.१२००.००२।।	नमो आदिमायादि सागरा । नमो चिदानंद दिगंबरा । एकत्व एक सारा । नमो नमो तुज
७८७९	।।ना.गा.१२००.००३।।	नमो मच्छेंद्रनाथा अनादि । नमो सर्वव्यापका बुद्धि । नमो जुनाट युगादि । तुज नमो
७८८०	।।ना.गा.१२००.००४।।	नमो सत्यकाळनाथ त्रिजगतीं । नमो पुढती पुढती । योगेश्वरा आदि अंतीं । नमो नमो स्वामी
७८८१	।।ना.गा.१२००.००५।।	नमो गैहिनीनाथ अविनाशा । नमो सहजासहज प्रकाशा । नमो व्यापुनि दाही दिशा । आदि गुरु तुज नमो
७८८२	।।ना.गा.१२००.००६।।	गुप्तनाथ तुज नमन । नमो सद्गुरु परब्रह्म पूर्ण । सदा स्वरूपीं अनुसंधान । नमस्ते नमस्ते
७८८३	।।ना.गा.१२००.००७।।	नमो गैहिनीनाथ आदिगुरु । तूं संकटीं आदि तारूं। नमो संसारहर्ता हरू । सद्गुरुनाथा तुज नमो
७८८४	।।ना.गा.१२००.००८।।	नमो कर्ता हर्ता नारायणा । नमो उदयास्तु गगनघना । नमो विराटपुरुषा जगज्जीवना । नमस्ते नमस्ते कुळस्वामी
७८८५	।।ना.गा.१२००.००९।।	नमो त्रिपुटी गुप्तधना । नीलवर्णा कलंकी कोंदणा । नमो ज्योतिर्मय दारुणा । नमो नमो जगद्गुरु
७८८६	।।ना.गा.१२००.०१०।।	नमो पांडुरंग दयाळा । नमो गोविंदा गोपाळा । नमो वैष्णवां सकळां । योगिया ऋषीश्वरा नमो नमो
७८८७	।।ना.गा.१२००.०११।।	नमो सर्व चराचर । नमो अंतरबाहेर । नमो दहाही अवतार । जगद्भूषणा तुज नमो
७८८८	।।ना.गा.१२००.०१२।।	नमन नेणो कैसें व्यापी । नमन रंगलें विश्वरूपीं । नमन चिन्मय गुह्य गौप्यीं । नमो सर्वभूतीं निजगुरु
७८८९	।।ना.गा.१२०१.००१।।	धूप पंचारती गंधाक्षता वाहती । पूजिला निवृत्ति वैष्णवांनीं
७८९०	।।ना.गा.१२०१.००२।।	प्रेमें आसुवें येती सकळांचिये डोळां । माळा घाली गळां पुंडलिक
७८९१	।।ना.गा.१२०१.००३।।	निवृत्तिदेवें ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर विठोबाच्या
७८९२	।।ना.गा.१२०१.००४।।	अवघ्या जनालागीं केला नमस्कार । उठावले भार वैष्णवांचे
७८९३	।।ना.गा.१२०१.००५।।	गोविंद गोपाळ आले ते सकळ । प्रेमें होता विकळ निवृत्तिराज

७८९४	।।ना.गा.१२०१.००६।।	केलीं आचमनें पुष्कर्णीचे तटीं । आले उठी समाधीपाशीं
७८९५	।।ना.गा.१२०१.००७।।	नामा म्हणे देवा निवृत्तिसारखा योगी । नाहीं आतां जगीं दावावया
७८९६	।।ना.गा.१२०२.००१।।	समाधीच्या पाळी बैसली सकळीं । केला या गोपाळीं जयजयकार
७८९७	।।ना.गा.१२०२.००२।।	निवृत्तिच्या संगें पुंडलिक पांडुरंग । सिद्ध जाले सांग समाधीसी
७८९८	।।ना.गा.१२०२.००३।।	निवृत्तिदेवें वंदिलीं सकळांची पाऊलें । तीर्थ तें घेतलें विठोबाचें
७८९९	।।ना.गा.१२०२.००४।।	पताकांची छाया समाधीसी आली । उतरले खालीं निवृत्तिदेव
७९००	।।ना.गा.१२०२.००५।।	पुंडलिक पांडुरंग गेले बरोबरी । बैसले आसनावरी निवृत्तिराज
७९०१	।।ना.गा.१२०२.००६।।	नामा म्हणे देवा काय पाहावें आतां । गेला पंढरिनाथा चिद्भानु तो
७९०२	।।ना.गा.१२०३.००१।।	निवृत्तिराज बैसले समाधी सुचित । चिन्मय ते ज्योत उजळली
७९०३	।।ना.गा.१२०३.००२।।	पुंडलिकें मिठी निवृत्तिच्या गळां । अवघियांच्या डोळां आसुवें येती
७९०४	।।ना.गा.१२०३.००३।।	विठोबाचें हृदय आलेंसें भरून । झांकियेले नयन निवृत्तिराजें
७९०५	।।ना.गा.१२०३.००४।।	पुंडलिके आणिलें विठोबासी बाहेर । केला नमस्कार वैष्णवांनीं
७९०६	।।ना.गा.१२०३.००५।।	राही रखुमाई बैसल्या गहिंवरत । आणिक संत महंत वोसंडती
७९०७	।।ना.गा.१२०३.००६।।	नामा म्हणे हरि शुद्धि नाहीं सकळां । घाला आतां शिळा समाधीसी
७९०८	।।ना.गा.१२०४.००१।।	नारा महादा गोंदा विठा जाले विकळ । झांकियेली शीळ समाधीची
७९०९	।।ना.गा.१२०४.००२।।	गंधर्व आणि देव चिंतावले भारी । दीर्घध्वनि करी नारा विठा
७९१०	।।ना.गा.१२०४.००३।।	गोंदा आणि महादा सांडिती शरीर । विसोबा खेचर फार कष्टी
७९११	।।ना.गा.१२०४.००४।।	लोपलासे भानु पडला अंधार । गेला योगेश्वर निवृत्तिराज
७९१२	।।ना.गा.१२०४.००५।।	गेल्या त्या विभूति अनादि अवतार । आतां देवा फार आठवतें
७९१३	।।ना.गा.१२०४.००६।।	नामा म्हणे हरि धरवेना धीर । येती गहिंवर वोसंडोनी
७९१४	।।ना.गा.१२०५.००१।।	परिसा भागवत करितसे शोक । म्हणती देवा दुःख अति जालें
७९१५	।।ना.गा.१२०५.००२।।	द्वादशी समाधि दिधली निवृत्तीसी । जाले उदासी अवघेजण
७९१६	।।ना.गा.१२०५.००३।।	देव म्हणे उठा करा आतां पूजा । घालूं पुष्पशेजा समाधीसी
७९१७	।।ना.गा.१२०५.००४।।	उठले सकळ होताती विकळ । गेले ते गोपाळ समाधीसी
७९१८	।।ना.गा.१२०५.००५।।	घेतली समाधि सव्य वैष्णवांनीं । पूजिताती सुमनीं समाधीसी
७९१९	।।ना.गा.१२०५.००६।।	नामा म्हणे अवघे करा प्रदक्षिणा । चला आचमना पुष्कर्णीसी

७९२०	।।ना.गा.१२०६.००१।।	पांच दिवस उत्सव केला निवृत्तीसी । काला आमावस्येसी त्र्यंबकेश्वरीं
७९२१	।।ना.गा.१२०६.००२।।	प्रतिपदेसी हरि निघाले बाहेरी । कीर्तन गजरीं पुढें होत
७९२२	।।ना.गा.१२०६.००३।।	कांही ऋषीश्वर राहियेले तेथें । गेले बहुत ते आळंकापुरीं
७९२३	।।ना.गा.१२०६.००४।।	गरुडावरी सिद्ध जाले नारायण । चाललीं विमानें गंधर्वांचीं
७९२४	।।ना.गा.१२०६.००५।।	नामा म्हणे देवा जावें आषाढीसी । आले एकादशी पंढरीये
७९२५	।।ना.गा.१२०७.००१।।	जयजयकारें टाळी पिटिली सकळीं । चालली मंडळी वैष्णवांची
७९२६	।।ना.गा.१२०७.००२।।	पंढरीचा पोहा निघाला बाहेरी । कीर्तन गजरीं पुढें होत
७९२७	।।ना.गा.१२०७.००३।।	विठोबा रखुमाई बैसलीं गरुडावर । केला नमस्कार वैष्णवांनीं
७९२८	।।ना.गा.१२०७.००४।।	म्हणती तीर्थयात्रा जाली यथासांग । पाहिले प्रसंग समाधीचे
७९२९	।।ना.गा.१२०७.००५।।	गेले योगिराज अनादि जे आदि । राहिल्या समाधि जगामाजीं
७९३०	।।ना.गा.१२०७.००६।।	नामा म्हणे देवा गेले मुनिजन । राहिलें तें ज्ञान जगामाजीं
७९३१	।।ना.गा.१२०८.००१।।	गेले दिगंबर ईश्वर विभूति । राहिल्या त्या कीर्ति जगामाजीं
७९३२	।।ना.गा.१२०८.००२।।	वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं । आतां ऐसें कोणी होणें नाहीं
७९३३	।।ना.गा.१२०८.००३।।	सांगतील ज्ञान म्हणतील खूण । नयेचि साधन निवृत्तीचें
७९३४	।।ना.गा.१२०८.००४।।	परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती । कोणा नये युक्ति ज्ञानोबाची
७९३५	।।ना.गा.१२०८.००५।।	करतील अर्थ सांगतील परमार्थ । नये पां एकांत सोपानाचा
७९३६	।।ना.गा.१२०८.००६।।	नामा म्हणे सांगूनियां कांहीं । नये मुक्ताबाई गुह्य तुझें
७९३७	।।ना.गा.१२०९.००१।।	नानापरी खेद आठविती मना । आतां नारायणा सिद्धि न्यावें
७९३८	।।ना.गा.१२०९.००२।।	समाधीसी केली आरति पंचारती । राहिली निवृत्ति स्वरूपीं तुझ्या
७९३९	।।ना.गा.१२०९.००३।।	सुखाचे साधन जालीं चौघेजणें । केलीं नारायणें बोळवण
७९४०	।।ना.गा.१२०९.००४।।	पंचक्रोशावरी उभे ठेले भार । केला नमस्कार समाधीसी
७९४१	।।ना.गा.१२०९.००५।।	नामा म्हणे आतां जावें पंढरपुरा । समाधीचा सारा विधि जाला
७९४२	।।ना.गा.१२१०.००१।।	शेवटची समाधि जाली जैसी तैसी । तुज हृषिकेशी समर्पिली
७९४३	।।ना.गा.१२१०.००२।।	आपुल्या सत्ताबळें चालविलें हरि । विष्णुदासावरी कृपा केली
७९४४	।।ना.गा.१२१०.००३।।	नेणों कैसा होईल समाधीचा प्रसंग । बोलितेति अंगें पांडुरंगा
७९४५	।।ना.गा.१२१०.००४।।	मुकियाला वाचा दिधली श्रीरंगें । इच्छिला प्रसंग सिद्धी नेला

७९४६	।।ना.गा.१२१०.००५।।	नामा म्हणे देव माय बाप विठ्ठल । म्हणोनि माझे बोल स्विकारिले
७९४७	।।ना.गा.१२११.००१।।	काय म्यां बोलावें किती माझी मति । तुम्ही रमापति गोड केलें
७९४८	।।ना.गा.१२११.००२।।	विश्वरूप घडी उघडिली धडफुडी । आतां काय थोडी कृपा म्हणूं
७९४९	।।ना.गा.१२११.००३।।	चिन्मय लहरी येती उन्मळुनी । दया नारायणीं थोर केली
७९५०	।।ना.गा.१२११.००४।।	समाधि चरित्र केलें यथामति । रखूमाईचा पति आर्जविला
७९५१	।।ना.गा.१२११.००५।।	समाधि चरित्र जो करील श्रवण । तयालागीं पेणें वैकुंठींचे
७९५२	।।ना.गा.१२११.००६।।	नामा म्हणे देवगुरु धरील चित्तीं । उद्धरील पति रुक्माईचा
७९५३	।।ना.गा.१२१२.००१।।	समाधि श्रवण करिती निशिदिनीं । त्यांसी चक्रपाणि देईल भेटी
७९५४	।।ना.गा.१२१२.००२।।	समाधि श्रवणाचा धरील जो विश्वास । नाहीं नाहीं दोष पातकांचा
७९५५	।।ना.गा.१२१२.००३।।	समाधि विरक्ताची पतिता वाराणसी । कोटि कुळें त्याची उद्धरील
७९५६	।।ना.गा.१२१२.००४।।	जो कोणी बैसेल समाधिश्रवणा । तया प्रदक्षिणा पृथ्वीची हे
७९५७	।।ना.गा.१२१२.००५।।	स्वहित साधन सांगितलें येथें। परिसा भागवत लेखकु जाला
७९५८	।।ना.गा.१२१२.००६।।	नामा म्हणे हरि बोलिलों तुझिया बळें । वाहिलीं तुळसीदळें स्वामीलागीं
७९५९	।।ना.गा.१२१३.००१।।	सद्‌गुरु सखया नाथा पंढरिनाथा । ठेवी डोई पायां कृपेसाठीं
७९६०	।।ना.गा.१२१३.००२।।	नाहीं गांठी पुंजी तव कृपेजोगी। जालों हतभागी भक्तिवीण
७९६१	।।ना.गा.१२१३.००३।।	हतभाग्या कैची समर्थाची भेटी । घाली घट्ट मिटी संतापायी
७९६२	।।ना.गा.१२१३.००४।।	भक्तशिरोमणी ज्ञानदेव नामा । चरित्रमहिमा गाऊं त्यांचा
७९६३	।।ना.गा.१२१३.००५।।	इच्छी परि मन ज्ञानशक्ती क्षीण । धरितो चरण नाथजींचे
७९६४	।।ना.गा.१२१४.००१।।	आळंकापुरीस पांडुरंग गेले । समाधिस्थ केलें ज्ञानदेवा
७९६५	।।ना.गा.१२१४.००२।।	उरकोनी सोहळा संगें संतमेळा । विठोबा राहिला आळंदीस
७९६६	।।ना.गा.१२१४.००३।।	पाहे चक्रपाणि नाम्या डोळ्यां पाणी । कंठ तो दाटुनि उगा आहे
७९६७	।।ना.गा.१२१४.००४।।	पुसे रुक्मिणीकांत कां रे तूं निवांत । नाम्या शोकाक्रांत कोण्या दु:खें
७९६८	।।ना.गा.१२१५.००१।।	नामा म्हणे देवा ज्ञानदेव सृष्टीं । पडेल कां दृष्टी पुन्हां आतां
७९६९	।।ना.गा.१२१५.००२।।	ज्ञानाचा वियोग जडला हृद्‌रोग । भेटीचा प्रयोग करा देवा
७९७०	।।ना.गा.१२१५.००३।।	ज्ञानदेव माझा दाखवा या वेळीं । जीव तळमळी त्याच्याविण
७९७१	।।ना.गा.१२१५.००४।।	संत अंतरला सखा जाला दूर । आतां पंढरपूर कैसें कंठूं

७९७२	।।ना.गा.१२१५.००५।।	तुमचें दर्शन ज्ञान कृपादान । पंढरीस येणें ह्याचसाठीं
७९७३	।।ना.गा.१२१६.००१।।	तरीच येईन पंढरीस । दृष्टी देखेन ज्ञानेश
७९७४	।।ना.गा.१२१६.००२।।	ज्ञानदेवा भेटी व्हावी । ऐशी सोय देवा लावी
७९७५	।।ना.गा.१२१६.००३।।	ऐशियाच्या कृपादानें । तुम्हां संगतीं नाचणें
७९७६	।।ना.गा.१२१६.००४।।	पंढरीचें जें कां सुख । जाणे तो एक भाविक
७९७७	।।ना.गा.१२१७.००१।।	ज्ञानदेव पहावा डोळां । ऐसें वाटतें विठ्ठला
७९७८	।।ना.गा.१२१७.००२।।	जगजेठी जगत्पाळ । माझी पुरवावी आळ
७९७९	।।ना.गा.१२१७.००३।।	तुम्हां काय अवघड । लीळें झेला गिरिगड
७९८०	।।ना.गा.१२१७.००४।।	कल्पतरुतळीं वास । त्या घडे कां उपवास
७९८१	।।ना.गा.१२१७.००५।।	माझ्या कृपाळुवा देवा । हांकेसरसा घेशी धांवा
७९८२	।।ना.गा.१२१८.००१।।	ज्ञानदेव माझें सौख्यसरोवर । त्यांत जलचर स्वस्थ होतों
७९८३	।।ना.गा.१२१८.००२।।	दुर्दैव तापानें आटलें तें नीर । वर्षी रघुवीर कृपामेघ
७९८४	।।ना.गा.१२१८.००३।।	ज्ञानदेवाविण व्याकुळ हे प्राण । तूं जगज्जीवन देवा होसी
७९८५	।।ना.गा.१२१८.००४।।	विठाबाई तूं गे जाणसी ना जाण । रक्षी मज कोण दुजें येथें
७९८६	।।ना.गा.१२१९.००१।।	मग प्रश्न आदरिला । नामा फुंदो जो लागला । का गा ज्ञानदेवो गेला । मज सांडुनियां
७९८७	।।ना.गा.१२१९.००२।।	कैसा होय तुझा दास । कैसी पाहो तुझी वास । ज्ञानाकारणे कासाविस । जीव माझा होतसे
७९८८	।।ना.गा.१२१९.००३।।	देव म्हणे नामयासी । तू झणीं कासाविस होसी । तू रे तयातें नेणसी । ते कैसे आईक पां
७९८९	।।ना.गा.१२१९.००४।।	ज्ञानदेव ज्ञानसागरू । ज्ञानदेव ज्ञानागरू । ज्ञानदेव भवसिंधुतारू । प्रत्यक्ष रूपें पै असे
७९९०	।।ना.गा.१२१९.००५।।	ज्ञानदेवी ज्ञानगम्य । ज्ञानदेवी ज्ञानधर्म्य । ज्ञानदेवी ज्ञाननेम । सर्वथैव पै असे
७९९१	।।ना.गा.१२१९.००६।।	ज्ञानदेव हाचि देव । ज्ञानदेवी धरलिया भाव । ज्ञान होईल जीवा सर्व । यासी संदेह नाही
७९९२	।।ना.गा.१२१९.००७।।	ज्ञानदेवी धरितां ध्यान । ध्याता होय समाधान । जीव शिवी परिपूर्ण । एके रात्री कीर्तन केलिया
७९९३	।।ना.गा.१२१९.००८।।	झणें तू व्याकुळ होसी चित्तें । मनी आठवी गा माते । नामस्मरणे एका चित्तें । रामकृष्ण गोविंद
७९९४	।।ना.गा.१२१९.००९।।	नामा म्हणे तू समर्थ होसी । अर्जुनी प्रीति करिसी । हे सांगितले व्यासी । एकादशाध्यायी
७९९५	।।ना.गा.१२१९.०१०।।	तैसा पावे तू विश्वेशा । विश्वरूपा जगन्निवासा । मी होतसे कासाविसा । ज्ञानदेवाकारणे
७९९६	।।ना.गा.१२१९.०११।।	तरी तू गा युगानयुगी । असशी भक्तांचिया संगी । आम्ही विनटलो पांडुरंगीं । रंगारंगी विठ्ठलीं
७९९७	।।ना.गा.१२१९.०१२।।	एक वेळ माझा शोक । दुरी जाय हरे विख । ते करी निर्विशेष । नामा येतसे काकुळती

७९९८	।।ना.गा.१२२०.००१।।	तंव नावेक श्रीहरी । तटस्थ घटिका चाऱ्ही । ध्यान धरूनी अंतरीं । निश्चळ राहिला
७९९९	।।ना.गा.१२२०.००२।।	जयजयशब्द नामा बोभाये । केशवा त्राहे त्राहे । मी व्याकुळ होत आहे । ज्ञानदेवाकारणे
८०००	।।ना.गा.१२२०.००३।।	नारायणा त्राहे त्राहे। कृपादृष्टी तू रे पाहे । मी व्याकुळ होत आहे । ज्ञानदेवाकारणे
८००१	।।ना.गा.१२२०.००४।।	तुझेनि दर्शने । ज्ञानाचेनि अवलोकने । मज पंढरीस असणें । तुझे चरणी गा विठ्ठला
८००२	।।ना.गा.१२२०.००५।।	आतां मज तू सांभाळी । ज्ञानदेवेवीण सदाकाळी । मज न कंठे भूमंडळीं । भानुसहित वर्तता
८००३	।।ना.गा.१२२०.००६।।	तू माझी जनक जननी । परि ज्ञानदेवेविण मेदिनी । शून्य वाटे हे धरणी । जैसे मत्स्य जीवनेविण
८००४	।।ना.गा.१२२०.००७।।	तू रक्षिता सर्व जीवांसी । तरी का दु:ख दिधले आम्हांसी । तू जवळी असतां हृषिकेशी। ऐसी दशा हे प्राप्त
८००५	।।ना.गा.१२२०.००८।।	नामा खेदे क्षीण जाला जीवें । तंव नेत्र उघडिले देवें । आलिंगिला केशवे । चाऱ्ही भुजा पसरूनी
८००६	।।ना.गा.१२२१.००१।।	नामा न राहे खेद करूं । केशव ठेवी अभय करूं । म्हणे तू दु:खिया होसी थोरू । ज्ञानदेवाकारणे
८००७	।।ना.गा.१२२१.००२।।	धन्य धन्य तुम्ही भक्त । नित्य विष्णुचरणी रत । पुण्यशील भागवत । ज्ञानदेव नामया
८००८	।।ना.गा.१२२१.००३।।	तुमचेनि जग हे कृतार्थ । कवित्वे तरेल हे सत्य । मायामोहो निरसे समस्त । नामस्मरणे तुमचेनी
८००९	।।ना.गा.१२२१.००४।।	धन्य ज्ञानदेव ज्ञानशीळ। ज्ञानदेवा ऐसा सुढाळ । मी न देखे भूमंडळ । सकळही पाहतां
८०१०	।।ना.गा.१२२१.००५।।	तू करिसी खेद त्याचा । तरी तो आत्मा माझा साचा । भाव सांडी सांडी द्वैताचा । निखळ स्वरूप पाहे पां
८०११	।।ना.गा.१२२१.००६।।	तुम्ही भक्त अवघे आवडते । तुमचेनि साजिरे पूर्णचित्ते । मज पंढरिये येणें आवडते । नाम गाताती ये प्रीती
८०१२	।।ना.गा.१२२१.००७।।	पुंडलिक माझा भक्त सखा । परी प्रेमळ तुम्ही विशेषा । तुमचेनि सर्व दु:खा । हरणे मी हे जाणावे
८०१३	।।ना.गा.१२२१.००८।।	नामा म्हणे ज्ञानदेवाचे । मज दरुषण होईल साचे। तरीच रंगणीं मी नाचे । हरिकीर्तनी पंढरिये
८०१४	।।ना.गा.१२२२.००१।।	नामा हें वदतां डोळ्यां आलें पाणी । पडिला धरणीं देवापुढें
८०१५	।।ना.गा.१२२२.००२।।	नामदेव स्थिती पाहून श्रीपती । विस्मित ते चित्तीं स्तब्ध जाले
८०१६	।।ना.गा.१२२२.००३।।	कैशा रीती नाम्या संबोखूं मी आतां । कठिण अवस्था देव म्हणे
८०१७	।।ना.गा.१२२२.००४।।	प्रेम उचंबळे ऐकतां ही आळ । बुझावी गोपाळ नाम्यालागीं
८०१८	।।ना.गा.१२२३.००१।।	देव म्हणे नाम्या पाहे । ज्ञानदेव मीच आहे
८०१९	।।ना.गा.१२२३.००२।।	तो आणि मी नाहीं दुजा । ज्ञानदेव आत्मा माझा
८०२०	।।ना.गा.१२२३.००३।।	माझ्या ठायीं ठेवीं हेत । सोड खंत खंडी द्वैत
८०२१	।।ना.गा.१२२३.००४।।	नाम्या उमज मानसीं । ऐसें म्हणे हृषिकेशी
८०२२	।।ना.गा.१२२४.००१।।	ज्ञानदेवापुढें कथा । करी वारील ह्या व्यथा
८०२३	।।ना.गा.१२२४.००२।।	आत्मरूपीं ज्ञानेश्वर । तोचि ज्ञानाचा सागर

८०२४	।।ना.गा.१२२४.००३।।	ज्ञानदेवीं धरी भाव । स्वयें होय तूंचि देव
८०२५	।।ना.गा.१२२४.००४।।	राम कृष्ण रे गोविंद । जप म्हणे तो मुकुंद
८०२६	।।ना.गा.१२२५.००१।।	प्रेमळ तूं भक्ता माझ्या नामदेवा । जीवींचा विसावा भक्त तूंची
८०२७	।।ना.गा.१२२५.००२।।	तुमचेनि माझें देवपण सत्य । चंद्रें पाझरत सोमकांत
८०२८	।।ना.गा.१२२५.००३।।	तुमचे भक्तीनें आणिलें रूपासी । अवाच्य अविनाशी अरूप तें
८०२९	।।ना.गा.१२२५.००४।।	पंढरिचा राणा सांगतो ह्या खुणा । भक्तांच्या कारणा येणें मज
८०३०	।।ना.गा.१२२६.००१।।	नग जो तें सोनें लेण्याजोगें होतें । मुदी कंकण तैं नामें त्यांचीं
८०३१	।।ना.गा.१२२६.००२।।	मुशीमाजीं जेव्हां गेलें तें मुरोन । जालेसें सुवर्ण अभिन्न तें
८०३२	।।ना.गा.१२२६.००३।।	तैसा ज्ञानदेव भक्त तो मी देव । लौकिक लाघव दासांसाठीं
८०३३	।।ना.गा.१२२६.००४।।	ज्ञानसमाधी हे नाशी रूप नांवा । अंतींचा मेळावा मजमाजीं
८०३४	।।ना.गा.१२२७.००१।।	तेज स्पर्शे ज्योती कर्पुरीं निघाली । दोन्ही तीं निमालीं एकदांची
८०३५	।।ना.गा.१२२७.००२।।	आघातानें नाद घंटेंतून उठे । शेवटीं तो मिटे घंटेमाजीं
८०३६	।।ना.गा.१२२७.००३।।	ब्रह्मीं माया स्फुरे चैतन्यप्रकाशें । शेवटीं तें वसें ब्रह्मरूपीं
८०३७	।।ना.गा.१२२७.००४।।	पांडुरंग म्हणे ऐक नाम्या ज्ञान । वाटो समाधान तुझ्या जीवा
८०३८	।।ना.गा.१२२८.००१।।	नामदेव म्हणे देवा । ब्रह्मज्ञान पोटीं ठेवा
८०३९	।।ना.गा.१२२८.००२।।	तुम्ही मायेसंगें गूढ । ज्ञान जाणिवेचें आड
८०४०	।।ना.गा.१२२८.००३।।	आम्हां नाहीं याची चाड । वाटे संतभेटी गोड
८०४१	।।ना.गा.१२२८.००४।।	संतभेटी प्रेम फावे । प्रेमें देवाशीं भेटावें
८०४२	।।ना.गा.१२२८.००५।।	प्रेम आहे पोटभरी । देव त्यासी पोटीं धरी
८०४३	।।ना.गा.१२२८.००६।।	नामदेवा ठायीं प्रेम । मार्गीं आडविलें ब्रह्म
८०४४	।।ना.गा.१२२९.००१।।	देई भक्तिरस प्रेमा । देवा घाली आम्हां जन्मा
८०४५	।।ना.गा.१२२९.००२।।	प्रेम येई हातां जरी । जेथें नांदू ती पंढरी
८०४६	।।ना.गा.१२२९.००३।।	ज्ञानदेवीं भेट व्हावी । ज्ञान गोष्ट कां सांगावी
८०४७	।।ना.गा.१२२९.००४।।	नामा न बुझावा जनीं । कोण नाचेल कीर्तनीं
८०४८	।।ना.गा.१२२९.००५।।	पुरवा नामयाच्या आर्ता । देवा सांगे जगन्माता
८०४९	।।ना.गा.१२३०.००१।।	देव कळवळले चित्तीं । त्यासी मायेची संमती

८०५०	।।ना.गा.१२३०.००२।।	मायबापांचा त्या लळा । नामा घेईना कां आळा
८०५१	।।ना.गा.१२३०.००३।।	बाप जगताचा स्वामी । आई प्रत्यक्ष लक्षुमी
८०५२	।।ना.गा.१२३०.००४।।	नामा थोराचें लेंकरूं । छंद त्याचा अनिवारु
८०५३	।।ना.गा.१२३०.००५।।	छंद नाम्याचा पुरविण्या । देव वेंची प्रेमनाण्या
८०५४	।।ना.गा.१२३०.००६।।	हाटीं उदमीं भाविक । विठुराजा त्या ग्राहिक
८०५५	।।ना.गा.१२३१.००१।।	गरुडासि मग म्हणे पांडुरंग । साकल्य हें सांग पुंडलिका
८०५६	।।ना.गा.१२३१.००२।।	नामदेव कष्टी ज्ञानदेवासाठीं । घेऊन या तो भेटी नामयाच्या
८०५७	।।ना.गा.१२३१.००३।।	संतप्रेम भेटी देव गुज गोष्टी । जाणत्याच्या पोटीं सर्व वसे
८०५८	।।ना.गा.१२३१.००४।।	करी पांडुरंग येई त्याच्या मना । निमित्ताकारणा भक्त शोधी
८०५९	।।ना.गा.१२३२.००१।।	ऐसे परियेसिले विठ्ठले । तंव रुक्मिणीने विनविले । याचे करिजो जी म्हणितले । हाकारिजो पुंडलिका
८०६०	।।ना.गा.१२३२.००२।।	धन्य धन्य धरातळी । वोळले वोळले वनमाळी । वैष्णवी पिटली टाळी । जयजय शब्दें करूनिया
८०६१	।।ना.गा.१२३२.००३।।	गरुडासी सांगे केशव । कैसा भेटे यासी ज्ञानदेव । पुंडलिकासी जाऊनी सर्व । वृत्तांत सांगे येथीचा
८०६२	।।ना.गा.१२३२.००४।।	तेणें नमस्कारूनि हरी । निघाला पक्षाच्या फडात्कारी । भेटला पुंडलिका झडकरी । यथाविधि सांगितले
८०६३	।।ना.गा.१२३२.००५।।	पुंडलिके विस्मित चित्तीं । म्हणे धन्यधन्य ज्ञानमूर्ती । ज्या कारणे वैकुंठपती । आळंकापुरीसी गेले
८०६४	।।ना.गा.१२३२.००६।।	धन्य धन्य विठोबाचे चरण । धन्य धन्य माझे नयन । धन्य नामा रूपीं संपन्न। विष्णु भक्त सखा माझा
८०६५	।।ना.गा.१२३२.००७।।	मग गरुडासि पूजिले । ज्ञानदेवा हाकारिले । दिव्य विमानी बैसविले । चला म्हणितले आळंकापुरीसी
८०६६	।।ना.गा.१२३२.००८।।	नामा असे खेद करीत । केशव तयासी संबोखित । तुम्हां दोघांचा येकांत । माझेनि संगें पुरेल
८०६७	।।ना.गा.१२३३.००१।।	ऐकतां निरोप पुंडलिक भक्ता । जाला सद्गदित धन्य म्हणे
८०६८	।।ना.गा.१२३३.००२।।	धन्य ती आळंदी धन्य विष्णुदास । धन्य हा दिवस देव भेटे
८०६९	।।ना.गा.१२३३.००३।।	ज्ञानदेवा आलें वैकुंठीचें रूप । पोचतां निरोप पुंडलिका
८०७०	।।ना.गा.१२३३.००४।।	पुंडलिकें तेव्हां गरुड पूजियेला । ज्ञाना बैसविला विमानांत
८०७१	।।ना.गा.१२३३.००५।।	पुढें तो गरुड मागें ये विमान । रुक्मिणी दुरोन दावी देवा
८०७२	।।ना.गा.१२३४.००१।।	आकाशीं पुष्पक शुभ्र दंड दिसे । बैसोनि येतसे ज्ञानदेव
८०७३	।।ना.गा.१२३४.००२।।	शुद्धभावें इच्छी ज्ञानदेव भेटी । येई उठाउठी भेटूं त्यासी
८०७४	।।ना.गा.१२३४.००३।।	पहाती नवल भक्त ते प्रेमळ । निश्चय निढळ आहे ज्यांचा
८०७५	।।ना.गा.१२३४.००४।।	देव म्हणे नाम्या घेई भेटीसुखा । ज्ञानदेव सखा उभा येथें

८०७६	।।ना.गा.१२३५.००१।।	पुढें चालिला गरूड । आक्रमित अवघे ब्रह्मांड । विमान शुभ्र चंड । पुंडलिक आणितसे
८०७७	।।ना.गा.१२३५.००२।।	धन्य हरिभक्तांचा मेळ । धन्य धन्य तो गोपाळ । धन्य धन्य आळंकापुरी सुढाळ । ज्ञानदेव येतसे
८०७८	।।ना.गा.१२३५.००३।।	दुरोनी लक्षित रुक्मिणी । हरूषे सांगे चक्रपाणि । पैल विमान येतसे गगनीं । दाखविजे नामया
८०७९	।।ना.गा.१२३५.००४।।	मग नामयासी सावध । करूनिया तो गोविंद । म्हणे तुझा पुरविला रे छंद । पैल ज्ञानदेव येताहे
८०८०	।।ना.गा.१२३५.००५।।	नेत्र विकसित पाहे । तंव गगनीं विमान दिसताहे । पुंडलिक गरूड आहे । दिव्य देहीं दिव्य विमानी
८०८१	।।ना.गा.१२३५.००६।।	ऐसा जंव तटस्थ घटिका । तंव उतरले निमिष्य एका । नामा पावला संतोषा । ज्ञानदेवा देखोनी
८०८२	।।ना.गा.१२३५.००७।।	विमानघंटी गर्जत । नामा पुढारा चालत । जी जी रुक्मिणी म्हणत । वेगु कीजे ज्ञानदेवा
८०८३	।।ना.गा.१२३५.००८।।	नामा ज्ञानदेव भेटले । पुंडलिके विष्णु नमस्कारिले । भक्ती जयजय शब्द केले । देवी पुष्पवृष्टी केलिया
८०८४	।।ना.गा.१२३६.००१।।	ज्ञानदेव पहातां डोळां । नामदेवा हर्ष जाला
८०८५	।।ना.गा.१२३६.००२।।	घट्ट धरियेले पाय । तूं तो जाला सद्गुरुराय
८०८६	।।ना.गा.१२३६.००३।।	नको करूं रे अव्हेर । मज धरूं नको दूर
८०८७	।।ना.गा.१२३६.००४।।	सदा आठवत मना । तुझ्या भक्तीच्या कल्पना
८०८८	।।ना.गा.१२३७.००१।।	नाथा नको रे अंतरूं । तुझ्या कांसेचें वासरूं
८०८९	।।ना.गा.१२३७.००२।।	कळा दुभती तूं गाय । तुझा वियोग असह्य
८०९०	।।ना.गा.१२३७.००३।।	देह भोगितां प्राक्तन । मना ठेवी तयाधीन
८०९१	।।ना.गा.१२३७.००४।।	ज्ञानदेवीं ही समाधी । जडो मनोवृत्ति अवघी
८०९२	।।ना.गा.१२३७.००५।।	नामा भेटे ज्ञानदेवा । जनां प्रसाद मिळावा
८०९३	।।ना.गा.१२३८.००१।।	आलिंगन पडिले दृढ । मिठी पडिली न सुटे गूढ । पुंडलिक म्हणे मज चाड । या विठ्ठल चरणाची
८०९४	।।ना.गा.१२३८.००२।।	तुझे दरुषण माझा लाभ । जैसा ज्ञानदेवावरी लोभ । नामयावरी स्वयंभ । तैसाचि करी विठ्ठला
८०९५	।।ना.गा.१२३८.००३।।	नामदेवें आळंगुनी प्रीती । शिर चरणावरी अवचिती । ज्ञानदेवाच्या ठेवी पुढती । म्हणे धन्य क्षिती मी एक
८०९६	।।ना.गा.१२३८.००४।।	पुंडलिक म्हणे नामया । धन्यधन्य तुझी काया । क्षिती आणिले वैकुंठराया । ज्ञानदेवाचेनि स्मरणे
८०९७	।।ना.गा.१२३८.००५।।	धन्य युगानयुगी तुम्ही । धन्य देखिले ती आम्ही । धन्य आळंकापुर जन्मी । उपजोनी जो देखेल
८०९८	।।ना.गा.१२३८.००६।।	पंढरीहुन हे मूळपीठ । जुनाट पै वैकुंठ । पूर्वी येथें होते नीळकंठ । ब्रह्माविष्णुरुद्रइंद्र
८०९९	।।ना.गा.१२३८.००७।।	ते हे शिवक्षेत्र प्रत्यक्ष । पूर्वे मातुलिंग साक्ष । तेथेही केशव प्रत्यक्ष । चतुर्भुजरूपे असे
८१००	।।ना.गा.१२३८.००८।।	दक्षिणे पुण्येश्वर देवो । पुण्यस्थळ महादेवो । मूळपीठी नागेंद्री पाहा हो । त्रिवेणीरूपी वाहतसे
८१०१	।।ना.गा.१२३८.००९।।	पश्चिमे इंदोरिये देवो । ब्रह्मेश्वर उत्तम ठावो । उत्तरे सिद्धेश्वर देवो । खेटकग्रामी भागीरथी

८१०२	।।ना.गा.१२३८.०१०।।	मध्यस्थळी हे इंद्रायणी । सरसी भागीरथी वाहिनी । सिद्धेश्वर शोभे स्थानीं । ज्ञानदेवो सहित
८१०३	।।ना.गा.१२३८.०११।।	ऐसिये दक्षिण वाहिनीसी । स्नान घडता अहर्निशीं । कोटि तीर्थे प्रयाग काशी । प्रसन्न होती हरिहर
८१०४	।।ना.गा.१२३८.०१२।।	ऐसिये तीर्थे देवा । समाधि दिधली ज्ञानदेवा । पुंडलिक विनवितसे केशवा । धन्य भाग्य नामयाचे
८१०५	।।ना.गा.१२३९.००१।।	तंव बोलत उद्धव । धन्य धन्य हा देवाधिदेव । धन्य धन्य ज्ञानदेव । निजभक्त आवडता
८१०६	।।ना.गा.१२३९.००२।।	धन्य तीर्थ इंद्रायणी । धन्य प्रत्यक्ष शूळपाणि । तारक ब्रह्म त्रिवेणी । मिश्रित रूपें वहातुसे
८१०७	।।ना.गा.१२३९.००३।।	चिंतामणि हे पाषाण । दिव्य वनवल्ली जाण । जेथें लागले हरिचे चरण । ते धन्य आळंकापुरी
८१०८	।।ना.गा.१२३९.००४।।	जेथें समाधिसी बैसता। इंद्रादि सामोरे येती तत्त्वता । वैकुंठा जाईल निभ्रांता । रामकृष्ण उच्चारिता
८१०९	।।ना.गा.१२३९.००५।।	यम न पाहे इकडे । काळ नमस्कारी वाडेकोडे । म्हणती पाहा हो केव्हढे । भाग्य या ज्ञानदेवाचे
८११०	।।ना.गा.१२३९.००६।।	ऐसे उद्धव सांगे रुक्मिणी । होय म्हणती चक्रपाणि । पंढरीहुनि हे जुनाटपुराणी । शैवागमी बोलिलेसे
८१११	।।ना.गा.१२३९.००७।।	ज्ञानदेवें नमस्कार केला । नामा हृदयीं धरिला । प्रीतीने पुढती आलिंगिला । म्हणे धन्य धन्य रे सखया
८११२	।।ना.गा.१२३९.००८।।	नामा लोळत गडबडा । चरणरजालागी जाला वेडा । केशव म्हणे तू धडफुडा । विष्णुभक्त साचार
८११३	।।ना.गा.१२४०.००१।।	ऐसी प्रदक्षिणा करूनी विष्णुभक्तां । नामा जालासे सरता । रुक्मिणी म्हणे यातें तत्त्वता । वैकुंठासी न्यावे जी
८११४	।।ना.गा.१२४०.००२।।	नामा म्हणे नेघे मुक्ती । मज पंढरीची आर्ती । विठ्ठलानामे करीन कीर्ती । नित्यकाळ जीवन्मुक्त
८११५	।।ना.गा.१२४०.००३।।	मज नित्यमुक्ती जन्म नाही । केशवासी माते पुसोनि पाही । युगानयुगी अवतार दाही । याचेनि संगें मज घडती
८११६	।।ना.गा.१२४०.००४।।	तिहीं त्रिभुवनीं उदार । मुक्ति तुम्हापाशी साचार । परि भक्तिविण मुक्ति असार । कोण पामर इच्छिल
८११७	।।ना.गा.१२४०.००५।।	मुक्ति फलकट नैश्वर । फळ एक विठ्ठल सार । विष्णुभक्तीसी ज्याचा निर्धार । त्याचे चरण वंदीन माथा
८११८	।।ना.गा.१२४०.००६।।	विष्णुविण कीर्तन न करी । भक्तिविण नसे क्षणभरी । कीर्तन करीन गजरीं । रामकृष्णगोविंद
८११९	।।ना.गा.१२४०.००७।।	मज नामाचे अमृत । माझे मुक्ति दास्य करी । तू मूळमाता जाणसी जरी । तरी तुजसी हे गुह्य बोलिलों
८१२०	।।ना.गा.१२४०.००८।।	नामदेव परतोनी पाहे । तंव ज्ञानदेवें उभारिले बाहे । म्हणे विष्णुभक्ति ऐसी आहे । आइक माते इचा बडिवारू
८१२१	।।ना.गा.१२४१.००१।।	हरिचिया दासा नामया उदासा । तुझी हृषिकेशा प्रीति बहू
८१२२	।।ना.गा.१२४१.००२।।	हरिदासांमाजी होसी तूं आगळा। प्रेमाचा पुतळा नामदेव
८१२३	।।ना.गा.१२४१.००३।।	ज्ञानदेव म्हणे तूं विठोचा लडिवाळ । नामया तूं कृपाळ आम्हांवरी
८१२४	।।ना.गा.१२४२.००१।।	धन्य पुण्यभूमि आळंदी हें गांव । दैवताचें नांव सिद्धेश्वर
८१२५	।।ना.गा.१२४२.००२।।	चौऱ्यांशीं सिद्धींचा सिद्धभेटी मेळा । तो सुखसोहळा काय सांगूं
८१२६	।।ना.गा.१२४२.००३।।	विमानांची दाटी पाहती सुरवर । वर्षताती भार सुमनांचें
८१२७	।।ना.गा.१२४२.००४।।	नामा म्हणे देवा चला तया ठाया । विश्रांति घ्यावया कल्पवरी

८१२८	।।ना.गा.१२४३.००१।।	अगा पांडुरंगा भक्तजन कैवारी । सेवकजन द्वारीं तिष्ठताती
८१२९	।।ना.गा.१२४३.००२।।	निवृत्ति ज्ञानदेव सोपान हा पाही । आली मुक्ताबाई चांगदेव
८१३०	।।ना.गा.१२४३.००३।।	खेचर विसोबा असंद सुदामा । चोखा पुरुषोत्तमा आला असे
८१३१	।।ना.गा.१२४३.००४।।	मैराळ जनक वत्सरा तो नारा । विठा सारंगधरा आला असे
८१३२	।।ना.गा.१२४३.००५।।	परसा भागवत सांवता नरहरी । चोखा मेळा द्वारीं भानुदास
८१३३	।।ना.गा.१२४३.००६।।	नटनाट्यकुसरी कान्होपात्रा द्वारीं । चवरें विंजणें हरि जाणविती
८१३४	।।ना.गा.१२४३.००७।।	माचंगा अनंता नरसीपुरीं होता । तो हा पंढरीनाथा आला असे
८१३५	।।ना.गा.१२४३.००८।।	मच्छिंद्र गोरक्ष चरपटी चौरंगीं । गोपिचंद योगी आला असे
८१३६	।।ना.गा.१२४३.००९।।	इडा ती पिंगळा सूक्ष्म ती आवळा । षड्रस गोपाळा घेऊनि आला
८१३७	।।ना.गा.१२४३.०१०।।	तेथें टाळ दिंडी घेऊनियां नामा । भेटी पुरुषोत्तमा आला असे
८१३८	।।ना.गा.१२४४.००१।।	रखुमाई माता राही ओंवाळिती । नित्य पंचारती हरिच्या दासां
८१३९	।।ना.गा.१२४४.००२।।	नित्य भक्तां हरि यालागीं विनट । पंढरीची पेठ वसविली
८१४०	।।ना.गा.१२४४.००३।।	धन्य हा निवृत्ति धन्य हा सोपान । धन्य हा निधान ज्ञानदेव
८१४१	।।ना.गा.१२४४.००४।।	खेचर सांवता धन्य जनमित्र । यांसि सकळ देत हरि ब्रह्म
८१४२	।।ना.गा.१२४४.००५।।	पांडुरंग पिसा यालागीं जाहला । मुक्ताई पाजिला प्रेम पान्हा
८१४३	।।ना.गा.१२४४.००६।।	नामा म्हणे खूण जाणती सज्ञान । अखंड तें ध्यान निवृत्तीदेवीं
८१४४	।।ना.गा.१२४५.००१।।	सिंपियाचें कुळीं जन्म माझा जाला । परि हेतु गुंतला सदाशिवीं
८१४५	।।ना.गा.१२४५.००२।।	रात्रिमाजीं सिवी दिवसामाजी सिवि । आराणूक जीवीं नोव्हे कदा
८१४६	।।ना.गा.१२४५.००३।।	सुई आणि सुतळी कात्री गज दोरा । मांडिला पसारा सदाशिवीं
८१४७	।।ना.गा.१२४५.००४।।	नामा म्हणे सिवीं विठोबाची अंगीं । म्हणोनियां जगीं धन्य जालों
८१४८	।।ना.गा.१२४६.००१।।	कल्याणींचा सिंपी हरिभक्त गोमा । त्याची कांता उमा नरहरिभजनीं
८१४९	।।ना.गा.१२४६.००२।।	सरिता सुकृताची त्या पोटीं उत्पन्न । जाली संबोधन गोणाबाई
८१५०	।।ना.गा.१२४६.००३।।	गोणाई दामासेठी जालें पाणिग्रहण । संसारीं असोन नरसी गांवीं
८१५१	।।ना.गा.१२४६.००४।।	गोत्र संज्ञा ऐका पूर्वजांची सहज । गाधिज भारद्वाज दोनीं कुळें
८१५२	।।ना.गा.१२४६.००५।।	आऊबाई कन्या जाली गोणाईसी । पुढें देवा नवसी पुत्रासाठीं
८१५३	।।ना.गा.१२४६.००६।।	नामा म्हणे होतें विठोबाचे मनीं । तेंचि नित्य जननी नवस करी

८१५४	।।ना.गा.१२४७.००१।।	हाटासी तातडी दामशेटी गेला । नैवेद्य पाठविला नाम्या हातीं
८१५५	।।ना.गा.१२४७.००२।।	येई लवकरी जेवी झडकरी। माता माझी घरी वाट पाहे
८१५६	।।ना.गा.१२४७.००३।।	नेणता म्हणोनी कारे जेवीनासी । आपुल्या प्राणासी करीन घात
८१५७	।।ना.गा.१२४७.००४।।	नामा म्हणे माझ्या वडिलांचे ठेवणे। देई दाखउन पांडुरंगा
८१५८	।।ना.गा.१२४८.००१।।	केशवा माधवा गोविंदा गोपाळा । जेवी तूं कृपाळा पांडुरंगा
८१५९	।।ना.गा.१२४८.००२।।	अच्युता वामना दशरथनंदना। जेवी तूं गा कृष्णा पांडुरंगा
८१६०	।।ना.गा.१२४८.००३।।	कृष्णा विष्णु हरी मधुसूदन मुरारी । जेवी तूं नरहरी पांडुरंगा
८१६१	।।ना.गा.१२४८.००४।।	ऐसी ग्लानी करितां विठ्ठल पावला। नैवेद्य जेविला नामयाचा
८१६२	।।ना.गा.१२४९.००१।।	जेवूनियां हातीं देवें दिधली वाटी । आला उठाउठी नामा घरा
८१६३	।।ना.गा.१२४९.००२।।	गोणाई म्हणे रे ऐक नामदेवा। नैवेद्य आणावा माझे हातीं
८१६४	।।ना.गा.१२४९.००३।।	तेव्हां नामदेवें हातीं दिधली वाटी । पाहूं गेली दृष्टी रिकामी ते
८१६५	।।ना.गा.१२४९.००४।।	काय तुज घरीं उणें होतें अन्न। नैवेद्य आपण तेथें खावा
८१६६	।।ना.गा.१२४९.००५।।	ते दोघे बोलतां दामासेठी आला । पुसे त्या दोघां काय गुह्य
८१६७	।।ना.गा.१२४९.००६।।	देखियेलें नाहीं नाहीं ऐकियेलें । ऐसें सांगितलें नामदेवें
८१६८	।।ना.गा.१२४९.००७।।	दामासेठी म्हणे आतां असों द्यावें । सकाळीं पहावें प्रचीतीस
८१६९	।।ना.गा.१२५०.००१।।	आम्ही हाटा जाऊं लवकरी येऊं । नैवेद्य पाठवूं नाम्या हातीं
८१७०	।।ना.गा.१२५०.००२।।	दुसऱ्या दिवशीं नैवेद्य धाडिला। दामा सेठी गेला त्याच्या मार्गे
८१७१	।।ना.गा.१२५०.००३।।	जाऊनियां नामा उभा राहे सन्मुख । म्हणे विठोबास जेवी बापा
८१७२	।।ना.गा.१२५०.००४।।	देव म्हणे नाम्या बैसावें दारांत। लवकरी जेवितों पाहें आतां
८१७३	।।ना.गा.१२५०.००५।।	जेवुनियां देवें हातीं दिधली वाटी । तेव्हां दामा सेठी काय बोले
८१७४	।।ना.गा.१२५०.००६।।	बारा वर्षे तुज उपवासी मारिलें । आजि जेवविलें नामदेवें
८१७५	।।ना.गा.१२५०.००७।।	देव म्हणे आतां ऐका दामा सेठी । हे तों गुह्य गोष्टी बोलूं नका
८१७६	।।ना.गा.१२५०.००८।।	आम्ही न बोलतां आम्ही न सांगतां । कळे अवचिता आपणांसी
८१७७	।।ना.गा.१२५०.००९।।	करसी चोरी तूं गुप्त गोकुळांत । पृथ्वींत मात कोणी नेली
८१७८	।।ना.गा.१२५०.०१०।।	गोकुळींच्या गोष्टी येथें बोलूं नये । मौन पंढरिये धरिलें आहे
८१७९	।।ना.गा.१२५०.०११।।	मौन धरियेलें सांगसी आम्हासी । तरी कां जेवशी पांडुरंगा

८१८०	।।ना.गा.१२५०.०१२।।	काय तुझें घर पडियेलें ओस । चोख्यासंगें कैसा जेवलासी
८१८१	।।ना.गा.१२५०.०१३।।	चोखियाचें अन्न मिष्टान्न भोजन । मिळाया कारण तेथें नाहीं
८१८२	।।ना.गा.१२५०.०१४।।	राम अवतारीं वान्नरगणें । लंकेसी झोंबणें सीतेसाठीं
८१८३	।।ना.गा.१२५०.०१५।।	पाला खाऊनियां वाहिले पर्वत । बांधियेला सेतु सिंधुवरी
८१८४	।।ना.गा.१२५०.०१६।।	कृष्ण अवतारीं गोपाळ साचार । वळूं गायी फार देवासवें
८१८५	।।ना.गा.१२५०.०१७।।	यमुनेचे तीरीं खेळूं चेंडूफळी । आपण दिधली नाहीं डावि
८१८६	।।ना.गा.१२५०.०१८।।	पसरितों पदर धरितों हनुवटी । अन्याय हा पोटीं घालीं नाम्या
८१८७	।।ना.गा.१२५०.०१९।।	तेव्हां दामा सेठी धरूनि हातासी । म्हणे नामयासी चल घरा
८१८८	।।ना.गा.१२५०.०२०।।	धन्य माझें भाग्य धन्य माझा वंश । परब्रह्म वेष प्रगटलें
८१८९	।।ना.गा.१२५०.०२१।।	बौद्ध अवतारीं आम्हीं जालों संत । वर्णावया मात नामा म्हणे
८१९०	।।ना.गा.१२५१.००१।।	नामा सिंपे नामा सिंपे । रोप लाविलें केशवबापें
८१९१	।।ना.गा.१२५१.००२।।	येक उगवली आरडी दरडी । येक वाळुनी जाली कोरडी
८१९२	।।ना.गा.१२५१.००३।।	येक पुष्प फळासि आली । येक कळींच निर्फळ जाली
८१९३	।।ना.गा.१२५१.००४।।	नामा उगवला केशव द्वारीं । न माये आंत बाहेरी
८१९४	।।ना.गा.१२५२.००१।।	लोखंडाचा विळा परिसासी लाविला । मागिलिया मोला मागूं नये
८१९५	।।ना.गा.१२५२.००२।।	दासी होती परि रायासी रतली । मागील ते बोली बोलों नये
८१९६	।।ना.गा.१२५२.००३।।	वेश्या होती तेचि पतिव्रता जाली । मागील ते बोली बोलों नये
८१९७	।।ना.गा.१२५२.००४।।	विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला । तो शिंपी वहिला म्हणों नये
८१९८	।।ना.गा.१२५३.००१।।	कुश्चळ भूमीवरी उगवली तुळसी । अपवित्र तियेसी म्हणों नये
८१९९	।।ना.गा.१२५३.००२।।	काकविष्टेमाजी जन्में तो पिंपळ । तया अमंगळ म्हणों नये
८२००	।।ना.गा.१२५३.००३।।	दासीचिया पुत्रा राज्यपद आलें । उपमा मागील देऊं नये
८२०१	।।ना.गा.१२५३.००४।।	नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी । उपमा जातीची देऊं नये
८२०२	।।ना.गा.१२५४.००१।।	माझें जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें । लिहिलें त्याची खूण नारु ऐके
८२०३	।।ना.गा.१२५४.००२।।	अधिक ब्याण्णव गणित अकराशतें । उगवतां आदित्य रोहिणीसी
८२०४	।।ना.गा.१२५४.००३।।	शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रभव संवत्सर शालिवाहन शके
८२०५	।।ना.गा.१२५४.००४।।	प्रसवली माता मज मळमूत्रीं । तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें

८२०६	।।ना.गा.१२५४.००५।।	शत कोटी अभंग करील प्रतिज्ञा । नाम मंत्र खुणा वाचुनी पाहे
८२०७	।।ना.गा.१२५४.००६।।	ऐशीं वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन नामया वृद्धी
८२०८	।।ना.गा.१२५५.००१।।	आम्हां कीर्तन कुळवाडी । आणिक नाहीं उदीम जोडी
८२०९	।।ना.गा.१२५५.००२।।	वाचा पिकली पिकली । हरिनामाची वरो जाली
८२१०	।।ना.गा.१२५५.००३।।	एकादशीचे दिवशीं । जाल्या कैवल्याच्या राशी
८२११	।।ना.गा.१२५५.००४।।	संत म्हणती नामयाला । हरिनामाचा सुकाळ जाला
८२१२	।।ना.गा.१२५६.००१।।	केशवाचें प्रेम नामयाची जाणें । नाम्या हृदयीं असणें केशवातें
८२१३	।।ना.गा.१२५६.००२।।	नामा तो केशव केशव तो नामा । अभिन्नत्व आम्हां केशवासी
८२१४	।।ना.गा.१२५६.००३।।	नामा म्हणे केशवा दुजेपण नाहीं । परि प्रेम तुझ्या ठायीं ठेवियेलें
८२१५	।।ना.गा.१२५७.००१।।	सुख दुःख दोन्ही आम्हासीं सारिखीं । प्रतीति पारखी मना आली
८२१६	।।ना.गा.१२५७.००२।।	अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदलें । दुजेपण नेलें निपटोनि
८२१७	।।ना.गा.१२५७.००३।।	त्वचा टाकुनियां सर्प गेला बिळीं । मग तो सांभाळी कोण सांगा
८२१८	।।ना.गा.१२५७.००४।।	ओघ सोडूनियां गंगा सिंधु ठाये । विस्तारली धाये खळाळाची
८२१९	।।ना.गा.१२५७.००५।।	नामा म्हणे रात्र जैसी कां पाहाळे । धरणीतें जालें तैसें आम्हां
८२२०	।।ना.गा.१२५८.००१।।	भक्ताचिया भावा होऊनि ऋणायितु । उभा असे तिष्ठतु पंढरिये
८२२१	।।ना.गा.१२५८.००२।।	महाद्वारींची हे तळींची पायरी । तो वैकुंठावरी कळस केला
८२२२	।।ना.गा.१२५८.००३।।	भूतळीचें वैभव कायसें बापुडें । बोलतां लाज पडे देवराया
८२२३	।।ना.गा.१२५८.००४।।	त्या सुखाची नव्हाळी कैंची रसातळीं । बोलतां बोबडी जिव्हा पडे
८२२४	।।ना.गा.१२५८.००५।।	म्हणोनि पांडुरंग मौनचि राहिला । नाम्यानें धरिला दोन्हीं चरणीं
८२२५	।।ना.गा.१२५९.००१।।	उठोनि प्रात:काळीं ओढतां काचोळीं । जातो वेळोवेळीं महाद्वारीं
८२२६	।।ना.गा.१२५९.००२।।	अहो जी दातारा विनवी अवधारा । तुम्हीं यावें घरां भोजनासी
८२२७	।।ना.गा.१२५९.००३।।	रखुमाई सांगाते तुम्ही यावें तेथें । सामोग्री सांगातें चालवावी
८२२८	।।ना.गा.१२५९.००४।।	सडा संमार्जन हें माझें करणें । उदक भरणें सुगंधेंसी
८२२९	।।ना.गा.१२५९.००५।।	शेणपत्रावळी काढीन उष्टावळी । नित्य वेळोवेळीं हाचि धंदा
८२३०	।।ना.गा.१२५९.००६।।	नामा म्हणे देवा तुमचें तुम्ही जेवा । प्रसाद तो द्यावा सेवकासी
८२३१	।।ना.गा.१२६०.००१।।	आजि आवतणें संतांचें । भोजन जालें हरिनामाचें

८२३२	।।ना.गा.१२६०.००२।।	आम्ही जेविलों जेविलों । नामामृतें पूर्ण धालों
८२३३	।।ना.गा.१२६०.००३।।	बरवी परवडी वैष्णवांची । आवडी पुरली हरिनामाची
८२३४	।।ना.गा.१२६०.००४।।	नामा केशवाचा म्हणे । माझे हृदयीं नारायण
८२३५	।।ना.गा.१२६१.००१।।	अगाध महिमा यात्रा कार्तिकिये । आला पंढरीये नामदेव
८२३६	।।ना.गा.१२६१.००२।।	भक्तां शिरोमणी श्रीपंढरीनाथा । कृपाळुवा माता बाळकासी
८२३७	।।ना.गा.१२६१.००३।।	धन्य नामदेव धन्य नामदेव । हृदयीं पंढरीराव न विसंबे
८२३८	।।ना.गा.१२६१.००४।।	प्रेमळ भक्त मिळोन अपार । करिताती गजर हरिनामाचा
८२३९	।।ना.गा.१२६१.००५।।	नटनाट्य कीर्तन झळकती गरुडटके । करिती ब्रह्मादिक पुष्पवृष्टी
८२४०	।।ना.गा.१२६१.००६।।	नामघोष श्रवण सकळां समाधान । चुकले जन्ममरण कल्पकोटी
८२४१	।।ना.गा.१२६१.००७।।	नामा म्हणे जीव निवाला बा तेथें । पाहातां विठोबातें श्रम गेला
८२४२	।।ना.गा.१२६२.००१।।	गरुडपाराजवळी नामदेव आला । सन्मुख देखिला पांडुरंग
८२४३	।।ना.गा.१२६२.००२।।	मेघ:शाममूर्ती डोळस सांवळी । तें ध्यान हृदयकमळीं धरोनि ठेला
८२४४	।।ना.गा.१२६२.००३।।	धन्य नामदेव भक्त शिरोमणी । ज्याचा चक्रपाणि वेळाइतू
८२४५	।।ना.गा.१२६२.००४।।	पूर्ण सहज स्थिती जाला सुखाचा अनुभव । सकळ देहभाव पारूषले
८२४६	।।ना.गा.१२६२.००५।।	मन पांगुळलें स्वरूपीं गुंतलें । बोलणें खुंटलें प्रीतिमौन
८२४७	।।ना.गा.१२६२.००६।।	सबाह्य अभ्यंतरीं स्वरूप कोंदलें । द्वैत निरसलें दृश्याकार
८२४८	।।ना.गा.१२६२.००७।।	निजरूप निर्धारितां नयन सोज्वळ जाले । रोमांच दाटले खरबरीत
८२४९	।।ना.गा.१२६२.००८।।	आनंदाचा घन वोळला अंबरीं । वृष्टी चराचरीं होत असे
८२५०	।।ना.गा.१२६२.००९।।	तें क्षीर सेवितां जालें समाधान । चुकलें जन्ममरण कल्पकोटी
८२५१	।।ना.गा.१२६२.०१०।।	सहज सुखें निवाला भवदु:ख विसरला । विसावा भेटला पांडुरंग
८२५२	।।ना.गा.१२६२.०११।।	नामा म्हणे दृष्टी लागेल पां झणीं । धन्य पुंडलिकाचेनि जोडलें सुख
८२५३	।।ना.गा.१२६३.००१।।	दृष्टी उघडुनी नामा भोंवती जंव पाहे । तंव पुढें माय देखियेली
८२५४	।।ना.गा.१२६३.००२।।	म्हणे मजशीं नाम्या वैर कां साधिलें । बहुत दु:ख जालें कोणा सांगों
८२५५	।।ना.गा.१२६३.००३।।	भक्तजनवत्सला परियेसी केशवा । भेटवी केधवां पूर्वस्थिती
८२५६	।।ना.गा.१२६३.००४।।	भोजना बैसले जेवीं क्षुधाक्रांत । न कोणाशीं मात न बोले कांहीं
८२५७	।।ना.गा.१२६३.००५।।	तें बळें उठविले नव्हतां पैं तृप्ती । तैसी दु:खप्राप्ती जाली मज

८२५८	।।ना.गा.१२६३.००६।।	पूर्ण पान्हा धेनू यांतला वोरसे । वत्स थोर हर्षें पान करी
८२५९	।।ना.गा.१२६३.००७।।	तें धनियें देखोनि बळें आसुंडलें । तळमळित ठेले थोर आशा
८२६०	।।ना.गा.१२६३.००८।।	कृपणें संपत्ति जोडिली सायासें । तळमळित ते कैसें नेलियातें
८२६१	।।ना.गा.१२६३.००९।।	तैसी परी मज जाहली गा देवा । परियेसी केशवा मायबापा
८२६२	।।ना.गा.१२६३.०१०।।	दु:खाचे सागरीं पडलों गा श्रीहरि । सुखरूप मुरारी निववी मातें
८२६३	।।ना.गा.१२६३.०११।।	नामा म्हणे विठो कृपेचा सागरू। करावा अंगिकारू अनाथाचा
८२६४	।।ना.गा.१२६४.००१।।	माता वाट पाहे नामा अजुनी कां नये । देखोन विठ्ठल काय भुलला तेथें
८२६५	।।ना.गा.१२६४.००२।।	ऐसें मज पाहतां हेंचि घडे साचें । विठ्ठलीं मन त्याचें गुंतलें असे
८२६६	।।ना.गा.१२६४.००३।।	काय सांगें माय जाल देवळासी । जपतो अहर्निशीं विठ्ठल नामा
८२६७	।।ना.गा.१२६४.००४।।	तहान भूक कांहीं आथीचना मनीं । विठ्ठल विठ्ठल म्हणोनि हाचि छंद
८२६८	।।ना.गा.१२६४.००५।।	नेणो कवण्या गुणें भुलविलें यातें । विंदान आमुतें न कळे कांही
८२६९	।।ना.गा.१२६४.००६।।	दिशा अवलोकितां प्राण नव्हे निश्चित । बहुत क्षुधाक्रांत जाली असे
८२७०	।।ना.गा.१२६४.००७।।	तेथून लवलाहे धांवत निघाली । महाद्वारा आली पहावया
८२७१	।।ना.गा.१२६४.००८।।	तो तंव पांडुरंगा सन्मुख देखिला । चित्रींचा लिहिला पुतळा जैसा
८२७२	।।ना.गा.१२६४.००९।।	नाहीं चळणवळण तटस्थ नयन । केलें निंबलोण योगिजनीं
८२७३	।।ना.गा.१२६४.०१०।।	ते देखोनि मातेसी थोर द्वेष आला । क्रोधें आसुंडिला करीं धरुनि
८२७४	।।ना.गा.१२६४.०११।।	तंव प्रेताचियेपरी पडिला भूमीवरी । देखोनि सुंदरी रुदना करी
८२७५	।।ना.गा.१२६४.०१२।।	मग उचलोनि ओसंगा धरिला पोटासी । म्हणे कां रे रुसलासि सांग नाम्या
८२७६	।।ना.गा.१२६४.०१३।।	निढळासी निढळ मिळवुनि ते रडे । माझिया कानाडे काय जालें
८२७७	।।ना.गा.१२६४.०१४।।	दृष्टि उघडुनी नामा भोंवतें जंव पाहे । तंव सन्मुख माय देखियेली
८२७८	।।ना.गा.१२६४.०१५।।	येरी उचलोनि दिधलें आलिंगन । जालें समाधान तयेवेळीं
८२७९	।।ना.गा.१२६४.०१६।।	सुहृदें सोयरीं सकळिकें मिळोनि । करिती झाडणी नानापरी
८२८०	।।ना.गा.१२६४.०१७।।	माऊली नव्हेसि तूं वैरिणी जाण । माझ्या केशवाची खूण अंतरली
८२८१	।।ना.गा.१२६४.०१८।।	शस्त्रेंविण वध केला अवचिता । जीव तळमळतां जाऊं पाहे
८२८२	।।ना.गा.१२६४.०१९।।	आतां परतोनी माझी वाट पाहसी । साच रिपु होसी तरी जाण
८२८३	।।ना.गा.१२६४.०२०।।	नामा म्हणे माते जाई हो येथूनी । मज जाई निरवूनि विठोबासी

८२८४	।।ना.गा.१२६५.००१।।	नवमासवरी म्यां वाहिलासे उदरीं । आस केली थोरी होसी म्हणोनी
८२८५	।।ना.गा.१२६५.००२।।	शेखीं त्वां रे नाम्या ऐसें काय केलें । वनीं मोकलिलें निरंजनीं
८२८६	।।ना.गा.१२६५.००३।।	कां रे नामदेवा जालासी निष्ठुर । न बोलसी उत्तर मजसी कांहीं
८२८७	।।ना.गा.१२६५.००४।।	सज्जन सोयरीं सांडियेली लाज । जालासि निर्लज्ज एकसरा
८२८८	।।ना.गा.१२६५.००५।।	प्रेमपिसें तुज लाविलें विठ्ठलें । रूप दावुनि केलें तद्रूप तुज
८२८९	।।ना.गा.१२६५.००६।।	यासि सेविलिया कैंची बाप माय । सर्व हाचि होय सर्वांठायीं
८२९०	।।ना.गा.१२६५.००७।।	ऐसियाचा संग धरियला तुवां । परिणामीं अनुभवा जाणशील
८२९१	।।ना.गा.१२६५.००८।।	संत सनकादिकां लावियेलें वेधीं । तींहीं संसार उपाधि सांडियेली
८२९२	।।ना.गा.१२६५.००९।।	विठ्ठल विठ्ठल हेंचि पैं चिंतन । विटेसहित चरण धरियेले
८२९३	।।ना.गा.१२६५.०१०।।	ऐसें शिकवितां नाम्याचें न मोहरे चित्त । पाहतसे तटस्थ तन्मय दृष्टी
८२९४	।।ना.गा.१२६५.०११।।	नामा म्हणे मातें वायां कां कष्टसी । विठोबा जीवेंसि जडला जाण
८२९५	।।ना.गा.१२६६.००१।।	माता म्हणे नामा राऊळाशीं खेळतां । तुज कोण्या दैवता ओढियलें
८२९६	।।ना.गा.१२६६.००२।।	लाजिरवाणें नाम्या तुवां केलें जिणें । हांसती पिशुनें देशोदेशीं
८२९७	।।ना.गा.१२६६.००३।।	सांडी देवपिसें नको करूं ऐसें । बळें घर कैसें बुडविसी
८२९८	।।ना.गा.१२६६.००४।।	जन्मा येऊनियां पराक्रम करीं । कां होसी संसारीं भूमिभार
८२९९	।।ना.गा.१२६६.००५।।	सुदैवाची लेंकरें वर्ततात‍ि कैसीं । तूं मज जालासि कुळक्षय
८३००	।।ना.गा.१२६६.००६।।	कैसी तुज नाहीं लौकिकाची लाज । हेंचि थोर मज नवल वाटे
८३०१	।।ना.गा.१२६६.००७।।	अभिमान अहंता सांडुनियां जगीं । नाचतोसि रंगीं गीत गातां
८३०२	।।ना.गा.१२६६.००८।।	तुजविण लोक अज्ञान नसती । क्षण न विसंबती मायबापा
८३०३	।।ना.गा.१२६६.००९।।	पुत्र आणि कलत्र घराची विपत्ति । तुज अभाग्याचे चित्तीं पंढरीनाथ
८३०४	।।ना.गा.१२६६.०१०।।	यातें भजती त्याचें न उरेचि कांही । हाचि देव पाहीं घरघेणा
८३०५	।।ना.गा.१२६६.०११।।	जयाचें खुंटे तो लागे याच्या पंथें । तुजसी शिकवितें म्हणोनियां
८३०६	।।ना.गा.१२६६.०१२।।	गोणाई म्हणे नाम्या हें नव्हें पैं भलें । विठोबानें केलें आपणा ऐसें
८३०७	।।ना.गा.१२६७.००१।।	कापड घेऊनि जाय बाजारासी । गोणाई नाम्यासी शिकवितसे
८३०८	।।ना.गा.१२६७.००२।।	लोकांचे हे पुत्र संसार करिती । आमुची फजिती केली नाम्या
८३०९	।।ना.गा.१२६७.००३।।	नाम्या विठोबाचा संग नव्हे बरा । मैंद हा खरा गळाकाटू

८३१०	।।ना.गा.१२६७.००४।।	याचे संगतीनें संसार जाळावा । भोपळा हा घ्यावा भीक मागूं
८३११	।।ना.गा.१२६७.००५।।	नको संग धरूं नाम्या ऐक गोष्टी । गोणाई हनुवटी धरूनी सांगे
८३१२	।।ना.गा.१२६८.००१।।	नामा म्हणे माते ऐक वो वचना । मी गेलों दर्शना नागनाथा
८३१३	।।ना.गा.१२६८.००२।।	आवंढ्या देउळीं जाहला संचार । पारुषला धीर या देहाचा
८३१४	।।ना.गा.१२६८.००३।।	तैंहूनि तुज मज तुटला संबंधु । विठ्ठलाचा छंदु घेतला जीवीं
८३१५	।।ना.गा.१२६८.००४।।	लौकिक व्यवहार नाठवेचि कांहीं । कल्पना ते देहीं आथीचना
८३१६	।।ना.गा.१२६८.००५।।	टाळ दिंडी घेऊनि नाचतो रंगणीं । तेणें माझ्या मनीं सुख वाटे
८३१७	।।ना.गा.१२६८.००६।।	या देहघरसंसाराचा आलासे कंटाळा । म्हणोनि गोपाळा शरण आलों
८३१८	।।ना.गा.१२६८.००७।।	पुत्र कलत्र येथें कायसी बापुडीं । जेणें रौरव कुंडीं वास घडे
८३१९	।।ना.गा.१२६८.००८।।	तूं जरी म्हणसी हें सत्य संसारसुख । तरी हें केवळ विख विस्तारलें
८३२०	।।ना.गा.१२६८.००९।।	तेचि हें जाण म्हणोनि टाकियलें दुरी । तैं सेवितां उरीं कैंची माते
८३२१	।।ना.गा.१२६८.०१०।।	म्हणोनि मी जालों या संतांचा दीन । तेणें हरिला सीण जन्मांतरीचा
८३२२	।।ना.गा.१२६८.०११।।	नामा म्हणे आतां मीतूंपण कैंचें । मी या विठोबाचें शरणागत
८३२३	।।ना.गा.१२६९.००१।।	जनिता जीवविता सर्वज्ञ प्रतिपाळिता । आडणी सांभाळितां चराचरीं
८३२४	।।ना.गा.१२६९.००२।।	एक पांडुरंग दुजा नाहीं चांग । म्हणुनि याचा संग धरिला माते
८३२५	।।ना.गा.१२६९.००३।।	माझी तुज कांहीं करणें नलगे चिंता । मज आहे पोसिता पांडुरंग
८३२६	।।ना.गा.१२६९.००४।।	हा शरणागतांचा जाणे कळवळा । हा पै कळिकाळा पाहों नेदी
८३२७	।।ना.गा.१२६९.००५।।	केले कोटिवरी न मानी अपराध । हें पैं साजे ब्रीद पांडुरंगा
८३२८	।।ना.गा.१२६९.००६।।	आम्ही आपुल्या सुखें असो भलत्या ठायीं । प्रीति तया पायीं जडली असे
८३२९	।।ना.गा.१२६९.००७।।	तेणें उपकारें न विसंबे क्षण । हातीं सुदर्शन घेऊनि उभा
८३३०	।।ना.गा.१२६९.००८।।	जाणतां नेणतां राम गावों गीतीं । जन्माची विश्रांति होय जेणें
८३३१	।।ना.गा.१२६९.००९।।	ऐसी जिवलग होईल कैंचें आन । संचला परिपूर्ण सर्वांठायीं
८३३२	।।ना.गा.१२६९.०१०।।	इष्टमित्र बंधु सज्जन सोयरा । माझिया संसारा हाचि एक
८३३३	।।ना.गा.१२६९.०११।।	नामा म्हणे माते मज न चले मोहोपिसें । तुम्हांसी मज ऐसें होईल काई
८३३४	।।ना.गा.१२७०.००१।।	साधावया आत्मसुख । तें हे विटेवरी देख
८३३५	।।ना.गा.१२७०.००२।।	नको जाऊं परदेशीं । वास करी पंढरीसी

८३३६	।।ना.गा.१२७०.००३।।	भाव धरी बळकट । मुखीं नाम येकनिष्ठ
८३३७	।।ना.गा.१२७०.००४।।	नामा म्हणे गोणाबाई । सर्व सुख याचे पायीं
८३३८	।।ना.गा.१२७१.००१।।	वाघाचिये गव्हाणीं बांधिलीसी गाये । कैसी तूं वो माये लोभाचारें
८३३९	।।ना.गा.१२७१.००२।।	कां मज संसारीं घालतोसि देवा । कैसी तुझी माया जीवा गोड वाटे
८३४०	।।ना.गा.१२७१.००३।।	विषयाचें गरळ पाजिसी केवळ । हृदय कोवळें कैसें तुझें
८३४१	।।ना.गा.१२७१.००४।।	नामा म्हणे मज आदिअंतीं एकु । जननी आणि जनकु पांडुरंग
८३४२	।।ना.गा.१२७२.००१।।	गोणाई म्हणे नाम्या राहिलासी उदरीं । तैंहुनि मी करीं आस तुझी
८३४३	।।ना.गा.१२७२.००२।।	उपजलासि तैं मज जाला संतोष । आनंद उल्हास वाटे जीवां
८३४४	।।ना.गा.१२७२.००३।।	गणगोतामाजीं केलें बारे नांव । पंढरीचा देव प्रसन्न केला
८३४५	।।ना.गा.१२७२.००४।।	रात्रंदिवस लेखी अंघोळीवरी । तूं मज संसारीं होसी म्हणोनि
८३४६	।।ना.गा.१२७२.००५।।	तंव तुज अवचितीं उपजलीं बुद्धी । भोपळा हा खांदीं आवडला
८३४७	।।ना.गा.१२७२.००६।।	हातीं टाळ घेऊनी करिसी आळवणी । घागरिया चरणीं बांधोनियां
८३४८	।।ना.गा.१२७२.००७।।	सांडोनि घर–दार आपुला संसार । नाचतां विचार न धरिसी
८३४९	।।ना.गा.१२७२.००८।।	नव्हें तें करितां कोण असे वारिता । परी त्वां आपुल्या हिता प्रवर्तावें
८३५०	।।ना.गा.१२७२.००९।।	मी एक आहे तंव करीन तळमळ । मग तुझा सांभाळ करील कोण
८३५१	।।ना.गा.१२७२.०१०।।	या विठ्ठलावांचुनी तुज नाहीं संसार । हा बोल निर्धार सत्य माझा
८३५२	।।ना.गा.१२७२.०११।।	कोण्या गुणें तुवां घेतलें धरणें । गोणाई म्हणे करणें फळा आलें
८३५३	।।ना.गा.१२७३.००१।।	आपणा वेगळा कशाला निवडिसी । कां मज दवडिसी सांग नाम्या
८३५४	।।ना.गा.१२७३.००२।।	बरवें पुत्रपण जालासी उत्तीर्ण । आतां अभिमान पाहें माझा
८३५५	।।ना.गा.१२७३.००३।।	तुज नेल्यावीण नवजाय येथून । पंढरी गिळीन विठोबासहित
८३५६	।।ना.गा.१२७३.००४।।	माझेंसी लेकरूं मज आहे वेव्हारू । मज आहे निर्धारू विठोबासी
८३५७	।।ना.गा.१२७३.००५।।	हा दानवांतें छळी आपणा म्हणावी बळी। तें मजजवळी न चले कांहीं
८३५८	।।ना.गा.१२७३.००६।।	विटेसहित चरणीं बांधिन आपुला गळा । क्षण जीवा वेगळा जाऊं नेदी
८३५९	।।ना.गा.१२७३.००७।।	आसनीं शयनीं न विसंबे भोजनीं । घालिन मुरडोनि हृदयामाजीं
८३६०	।।ना.गा.१२७३.००८।।	या देहाचा संकल्प आलेंसें करोन । घातलेंसे पाणी घरादारां
८३६१	।।ना.गा.१२७३.००९।।	हा त्रिभुवनीं समर्थ मी असें जाणत । पाहेन पुरुषार्थ आजी याचा

८३६२	।।ना.गा.१२७३.०१०।।	अट्ठाविस युगें भरलीं तया बोला । धरोनि उभा केला पुंडलिकें
८३६३	।।ना.गा.१२७३.०११।।	गोणाई म्हणे देवा होई कां शहाणा । वायां कां परधना धरिसी लोभु
८३६४	।।ना.गा.१२७४.००१।।	वडील वडील आमुची बोलतील गोष्टी । परी तुज ऐसा सृष्टीं देव नाहीं
८३६५	।।ना.गा.१२७४.००२।।	दर्शने आलिया पाडिसी आव्हाटा । मन मारूनी चोहाटा भुलविसी तूं
८३६६	।।ना.गा.१२७४.००३।।	ऐसा कैसा कोणें केलारे देव । आमुच्या जाणिया खेंच आणियेला
८३६७	।।ना.गा.१२७४.००४।।	माझें बाळ तुझ्या दर्शनासीं आलें। तें त्वां भुलविलें केशिराजा
८३६८	।।ना.गा.१२७४.००५।।	रात्रिदिवस तुझ्या नामाचा रे छंदु । गोविंदु गोविंदु म्हणतसे
८३६९	।।ना.गा.१२७४.००६।।	तहान भूक विसरला पिसाट पैं जाला । नोळखे मजला काय करूं
८३७०	।।ना.गा.१२७४.००७।।	परतोनि संसाराची सांडियेली आस । दिसतो उदास सर्वांपरी
८३७१	।।ना.गा.१२७४.००८।।	लोकांचीं लेंकुरें कां गा चाळविसी । आपणया ऐसें करसी भलत्यासी
८३७२	।।ना.गा.१२७४.००९।।	आणिक असतां नाश वेगळा थोर । मग माझा विचार कळतां तुज
८३७३	।।ना.गा.१२७४.०१०।।	तुज एक वर्म पुंडलिक आहे । जेणें जडविले पाय विटेवरी
८३७४	।।ना.गा.१२७४.०११।।	याहुनी आणिक अधिक पावसी । आम्हां दुबळ्यासी कष्टवितां
८३७५	।।ना.गा.१२७४.०१२।।	मागें पुढें तुज ऐसेंचि फावलें । तें तंव न चले मजसी कांहीं
८३७६	।।ना.गा.१२७४.०१३।।	जीव मी देईन कां नामा नेईन । नांव मी करिन गोतामाजीं
८३७७	।।ना.गा.१२७४.०१४।।	आतां बरवें विचारी अगा ये श्रीहरी । माझा नामा करीं मज आधीन
८३७८	।।ना.गा.१२७४.०१५।।	नाहीं तरी जीवित्व वेंचिन तुझ्या पायीं । विनविते गोणाई केशिराजा
८३७९	।।ना.गा.१२७५.००१।।	अगा ये विठोबा पाहे मजकडे । कां गा केलें वेडें बाळ माझें
८३८०	।।ना.गा.१२७५.००२।।	तुझें काय खादलें त्वां काय दिधलें । भलें दाखविलें देवपण
८३८१	।।ना.गा.१२७५.००३।।	आम्हीं म्हणूं तूं रे कृपाळू अससी । आतां तूं कळलासि पंढरिराया
८३८२	।।ना.गा.१२७५.००४।।	कां देवपण आपुलें भोगूं पैं जाणावें । भक्तां सुख द्यावें हेळामात्र
८३८३	।।ना.गा.१२७५.००५।।	देव देव होऊनियां अपेश कां घ्यावें । माझें कां बिघडावें एकुलतें बाळ
८३८४	।।ना.गा.१२७५.००६।।	तूं कैसा रे देव या देशावेगळा । बांधितें तुझा गळा परि संतां भ्यालें
८३८५	।।ना.गा.१२७५.००७।।	तुझी करणी अवघी आम्हां ठाऊकीच आहे । बोलोनियां काय हलकट व्हावें
८३८६	।।ना.गा.१२७५.००८।।	जाणोनि पुंडलिक तुझी न पाहेचि वास । तूं भला नव्हेस घरघेणा
८३८७	।।ना.गा.१२७५.००९।।	तो बैस पैं न म्हणे तुज याचका कारणे । जडसी जीवेंप्राणें सात्विकभावें

८३८८	।।ना.गा.१२७५.०१०।।	झणीं तूं आपला करिसी बोभाट । मग येईल वीट लोकाचारी
८३८९	।।ना.गा.१२७५.०११।।	थोरपणें नामा करीं मज आधीन । गोणाई म्हणे चरण धरिन तुझे
८३९०	।।ना.गा.१२७६.००१।।	तुझा नामा तुज व्हावा जन्मोजन्मीं । काय यासी आम्ही करूं शकों
८३९१	।।ना.गा.१२७६.००२।।	मर्यादा सांडोनि बोलसी कठिण । करिसी वायांविण इष्ट तुटी
८३९२	।।ना.गा.१२७६.००३।।	ऐसें कांहीं सुख अनुपम्य दाखवीं । जया ओळखी जीवीं निजरूपा
८३९३	।।ना.गा.१२७६.००४।।	जेणें लोभें त्याचें मन मागें मोहरे । वृत्तिसहित विरे ठाईं ठाईं
८३९४	।।ना.गा.१२७६.००५।।	तेणें या जन्माचें विसरोनि संताप । सोय आपेंआप धरिल तुझी
८३९५	।।ना.गा.१२७६.००६।।	जरी तूं देखतीस स्वहित पूर्वी याचें । तरी कां चित्त त्याचें त्रास घेतें
८३९६	।।ना.गा.१२७६.००७।।	संसार करितां कांहीं न देखेचि सुख । म्हणोनि विन्मुख जाला तुज
८३९७	।।ना.गा.१२७६.००८।।	वरपंगाचें पेहें पाजिसिल काय । हा निजमुखीं धाय ऐसें करी
८३९८	।।ना.गा.१२७६.००९।।	तरीच तूं निजाची लोभापर माता । म्हणोनि श्लाघ्यता जगामाजीं
८३९९	।।ना.गा.१२७६.०१०।।	आतां असो सहज येणेंविण काय काज । मी बोलिलों तुज कळेल तें करीं
८४००	।।ना.गा.१२७६.०११।।	नामा म्हणे देवा ऐसें काय केलें । काय तुजवेगळें जीवन माझें
८४०१	।।ना.गा.१२७७.००१।।	माझा नामा जंव नांवरूपा आला । जंव म्हणों लागला घरदार
८४०२	।।ना.गा.१२७७.००२।।	तंव कैसें विघ्न उठिलें गे माये । नामा पंढरिरायें भुलविला
८४०३	।।ना.गा.१२७७.००३।।	सांग बा विठ्ठला म्यां काय केलें । नामया कां भुलविलें कवण्या गुणें
८४०४	।।ना.गा.१२७७.००४।।	आम्हीं गा सिंपिये अनाथें पैं दीनें । करूं सिवने टिपणें पोट भरूं
८४०५	।।ना.गा.१२७७.००५।।	त्यासी देवा तुवां आणियेला क्षयो । कैंचा आम्हां देवो निर्मिलासी
८४०६	।।ना.गा.१२७७.००६।।	असतां चराचर न बुडतां हे सृष्टी । कां गा घेसी पाठी दुर्बळीची
८४०७	।।ना.गा.१२७७.००७।।	एक बाळ माझें धरिली त्याची आस । त्या कैसी निराश मांडियेली
८४०८	।।ना.गा.१२७७.००८।।	दिसां मासां गर्भ जाणोनियां पोटीं । त्याची आस मोठी करिती लोक
८४०९	।।ना.गा.१२७७.००९।।	एवढा माझा नामा कैसेन विसरेन । देई कृपादान दुर्बळासी
८४१०	।।ना.गा.१२७७.०१०।।	तूं अनाथा गोसावी दीनाचा कैवारी । जें ब्रीद श्रीहरी काय जालें
८४११	।।ना.गा.१२७७.०११।।	बिघडलें पाडस करीं एके ठायीं । विनविते गोणाई केशिराजा
८४१२	।।ना.गा.१२७८.००१।।	तुझिया नाम्यानें बळी देउनि चित्त । जन्मोनियां आप्त केलें मज
८४१३	।।ना.गा.१२७८.००२।।	इष्ट मित्र बंधु जननी जनक । सर्व मीच एक करूनि ठेला

८४१४	।।ना.गा.१२७८.००३।।	ऐसी याची करणी अजोनि नेणसी । बाळ माझे म्हणसी चाळविलें
८४१५	।।ना.गा.१२७८.००४।।	प्रेमाचें लाघव लाउनि माझ्या पायीं । बांधलें हृदयीं धरोनियां
८४१६	।।ना.गा.१२७८.००५।।	वृत्तिसहित मन लाविलें राखण । केलें जीवें जतन मजलागीं
८४१७	।।ना.गा.१२७८.००६।।	उचंबळले नयन अंतरींच्या अनुरागें । रात्रंदिवस जागे मन माझ्या ठायीं
८४१८	।।ना.गा.१२७८.००७।।	बोले चाले परी लक्ष मजवरी । बाहेरी भीतरीं मज देखें
८४१९	।।ना.गा.१२७८.००८।।	सर्व सुख गुणा रूपा देउनि मिठी । आणि निर्गुणीं हिंपुटी होऊं नेदी
८४२०	।।ना.गा.१२७८.००९।।	न मागे न घे न धरी सोय संसाराची । कल्पना देहींची मावळली
८४२१	।।ना.गा.१२७८.०१०।।	ऐसें येणें मज विश्वासी गोंविलें । सर्वत्र लाविलें मजचिकडे
८४२२	।।ना.गा.१२७८.०११।।	निर्गुणीं हा नामा न सोडी सर्वथा । सांपडला आतां एकरूपा
८४२३	।।ना.गा.१२७९.००१।।	बुडविली क्रिया बुडविलें कर्म । बुडविला धर्म पाहा येणें
८४२४	।।ना.गा.१२७९.००२।।	तुझिया नामाचें लागलेसें पिसें । असोनि न दिसे लोकाचारीं
८४२५	।।ना.गा.१२७९.००३।।	नेणों काय कळे तुवां वागविला । संबंध तुटला मज नाम्याचा
८४२६	।।ना.गा.१२७९.००४।।	बुडविला आचार बुडविला विचार । बुडविला संसार कुळासहित
८४२७	।।ना.गा.१२७९.००५।।	आपुलें पारिखें सर्वथा सारिखें । नेणों कवणें सुखें वेडावला
८४२८	।।ना.गा.१२७९.००६।।	बुडविला मोहो बुडविली ममता । बुडविली अहंता मीतूंपण
८४२९	।।ना.गा.१२७९.००७।।	हा नेणें वेव्हार कां इंद्रियांचें सुख । अखंड याचें लक्ष तुझे पायीं
८४३०	।।ना.गा.१२७९.००८।।	बुडविली कल्पना समूळीं वासना । बुडविली सेवा त्रिविध कैसी
८४३१	।।ना.गा.१२७९.००९।।	हांसे नाचे प्रेमें फुंदतु डुल्लतु । अहर्निशीं गातु नाम तुझें
८४३२	।।ना.गा.१२७९.०१०।।	असोनि नसतां केला ये संसारीं । म्यां वाहिला उदरीं तैसा नाहीं
८४३३	।।ना.गा.१२७९.०११।।	गोणाई म्हणे देवा त्वां केली निरास । चाळविलें उदास बाळ माझें
८४३४	।।ना.गा.१२८०.००१।।	ऐके गोणाई म्हणे केशिराज । सदा अरज तुझें नामदेवा
८४३५	।।ना.गा.१२८०.००२।।	संसारादि यासी नावडेचि कांहीं । मिठीच वो पायीं घातलीसे
८४३६	।।ना.गा.१२८०.००३।।	नेणों याच्या जीवें घेतलेसें कांहीं । लोळणींच पायीं घातलीसे
८४३७	।।ना.गा.१२८०.००४।।	पुसे वो जीवीचें काय काय आवडे । उमगोनि कोडें नेई यासी
८४३८	।।ना.गा.१२८०.००५।।	देतां कांहीं न मागे नसतां कांहीं नेघे । गुज पैं न सांगें अंतरीचें
८४३९	।।ना.गा.१२८०.००६।।	जन्मोनि सांकडें घातलें वो कैसें । गिळिल मज ऐसें वाटतसे

८४४०	।।ना.गा.१२८०.००७।।	मी भावासि भुललों सांपडलों याचे हातीं । करिल काय अंतीं न कळे कांहीं
८४४१	।।ना.गा.१२८०.००८।।	एक वेळ मज सोडवीं या पासोनी । दे कां मज लागोनी जीवदान
८४४२	।।ना.गा.१२८०.००९।।	माझिये पैं बोले मजचि गोविलें । यातें आपंगिलें अनाथ म्हणोनि
८४४३	।।ना.गा.१२८०.०१०।।	अंगोळिये धरितां खांदा वोळंगिये । आतां माझें केलें न चले कांहीं
८४४४	।।ना.गा.१२८०.०११।।	तूं आपुलिया मनीं विचारूनि पाही । नामा आपुला नेई आवडता
८४४५	।।ना.गा.१२८०.०१२।।	माय लेक दोघे साम्राज्य करा । घ्यावें धरणीवरी सुख याचें
८४४६	।।ना.गा.१२८०.०१३।।	कठिण बोल तुझे बहूसाळ ऐकिले । नाहीं त्वां गे पाहिलें मागेंपुढें
८४४७	।।ना.गा.१२८०.०१४।।	आतां तुझी कैसी झांकोळिली माया । मज करिसी वायां इष्ट तूं गे
८४४८	।।ना.गा.१२८०.०१५।।	ऐसें देवाचें बोलणें ऐकोनि उदास । नाम्या जाले क्लेश तयेवेळीं
८४४९	।।ना.गा.१२८०.०१६।।	नामा म्हणे देवा ऐसें कैसें घडे । सृष्टीहि पैं बुडे तरी न सोडी तुज
८४५०	।।ना.गा.१२८१.००१।।	विश्वजनमोहना कपटिया नारायणा । काय देवपणा मिरवितोसी
८४५१	।।ना.गा.१२८१.००२।।	दर्शना आलिया हृदयीं संचरसी । देहभाव घेसी हिरोनियां
८४५२	।।ना.गा.१२८१.००३।।	या विश्वावेगळें नवल तुझें करणें । सांगावें गाऱ्हाणें कवणालागीं
८४५३	।।ना.गा.१२८१.००४।।	सर्वांगें सुंदर परी हृदयें कठोर । नेणसी जिव्हार मज दुर्बळीचें
८४५४	।।ना.गा.१२८१.००५।।	मज अनाथाचें बाळ वेधोनि मोहिलें । बहुत दुःख जालें सांगों कोणा
८४५५	।।ना.गा.१२८१.००६।।	कासया पितृभक्ति पुंडलिकें केली । विवसी आणिली पंढरीसी
८४५६	।।ना.गा.१२८१.००७।।	माय दुखवुनी मोहिसी बाळकें । देवपण निकें कैसें तुझें
८४५७	।।ना.गा.१२८१.००८।।	यातें अनुसरल्या कैंची बाप माय । नाठवेची सोय संसाराची
८४५८	।।ना.गा.१२८१.००९।।	ऐसियानें संग धरिला तुझा देवा । प्रत्यक्ष अनुभवा आलें मज
८४५९	।।ना.गा.१२८१.०१०।।	आतां माझिया जीवीचें जाणसी तें गुज । तरी काई तुज उणें होतें
८४६०	।।ना.गा.१२८१.०११।।	माझा नामा लावीं संसाराचे सोई । विनविते गोणाई केशवातें
८४६१	।।ना.गा.१२८२.००१।।	बहुत दिवस भरले पैं गोपाळा । अगा ये विठ्ठला कवण न ये
८४६२	।।ना.गा.१२८२.००२।।	नामा माझा वेगीं देई माझ्या हातीं । जाऊं दे परती अनाथनाथा
८४६३	।।ना.गा.१२८२.००३।।	खाऊं जेऊं तुज असोस पैं देऊं । कीर्ति तुझी गाऊं जगामाजीं
८४६४	।।ना.गा.१२८२.००४।।	तुज काय जाणें ब्रह्मांडनायका । नव्हेसी मजसारिखा एकदेशी
८४६५	।।ना.गा.१२८२.००५।।	अनंत ब्रह्मांडें क्षणें घडामोडीसी । कां मज दुर्बळीसी कष्टाविलें

८४६६	।।ना.गा.१२८२.००६।।	तुज दुजेपणाचा सहज आला वीट । तूं तंव एकट एकलाची
८४६७	।।ना.गा.१२८२.००७।।	ऐसी कीर्ति वेद वर्णिती पुराणें । तें कां लाजिरवाणें करिसी देवा
८४६८	।।ना.गा.१२८२.००८।।	तूं कृपेचा कोंवळा म्हणती विश्वजन । त्या तुझें निर्वाण कळलें नाहीं
८४६९	।।ना.गा.१२८२.००९।।	मैंद मुद्रा धरणें गळां तुळसीमाळा । निवटितोसि गळा न कळतां
८४७०	।।ना.गा.१२८२.०१०।।	आतां आपुला भ्रमु राखे तो शहाणा । झणें माझ्या निर्वाणा पहासी देवा
८४७१	।।ना.गा.१२८२.०११।।	गोणाई म्हणे माझा नामा देऊनी हातीं । अंगिकारीं कीर्ति पंढरिराया
८४७२	।।ना.गा.१२८३.००१।।	थिटें माझें प्रेम घेऊनि बैसला । अझुनि नुठी वाहिला नामा तुझा
८४७३	।।ना.गा.१२८३.००२।।	जीवें भावें सर्वस्वें घेतलें धरणें । म्यां काय करणें ऐशियासी
८४७४	।।ना.गा.१२८३.००३।।	कासया अपराध ठेविशिल मज । शिकवितें तुज नाहीं कोणी
८४७५	।।ना.गा.१२८३.००४।।	संसारा गांजले जन्ममरणा उबगले । म्हणोनी शरण आले भयाभीत
८४७६	।।ना.गा.१२८३.००५।।	कृपा उपजली जीवें अनुसरला । जीव गुंतला माझे ठायीं
८४७७	।।ना.गा.१२८३.००६।।	दवडितां वेगळे वोसंगा रिघालें बळें । बोलताहे साळे भोळे करुणावचनीं
८४७८	।।ना.गा.१२८३.००७।।	तेणें माझें हृदय कळवळलें । म्हणोनि देखतां डोळे निवती माझे
८४७९	।।ना.गा.१२८३.००८।।	शरण आलिया ते म्यां जरि अव्हेरावें । कोण कोणें आपंगावें सांग सत्य
८४८०	।।ना.गा.१२८३.००९।।	शत्रुमित्र आदि करूनी सकळ । दु:ख अळुमाळ पडों नेदी
८४८१	।।ना.गा.१२८३.०१०।।	संसाराची येणें सांडियेली सोयी । प्राणें माझ्या ठायीं अनुसरला
८४८२	।।ना.गा.१२८३.०११।।	आतां याची लटिकी करी दूर आस । नामा म्हणे उदास सर्वस्वासी
८४८३	।।ना.गा.१२८४.००१।।	निर्गुणपणाचा अभिमान सांडिला । निगम लाजविला नारायणा
८४८४	।।ना.गा.१२८४.००२।।	कपट करोनि भक्तांसी तारिसी । तुझा तूं ठकसी पंढरिराया
८४८५	।।ना.गा.१२८४.००३।।	ठकुनि पुंडलिकासी न्यावया वैकुंठासी । या बुद्धी आलासी पंढरिये
८४८६	।।ना.गा.१२८४.००४।।	तंव त्या भक्तराजें धरियेलें चित्तें । परतोनि मागुतें जाऊं नेदी
८४८७	।।ना.गा.१२८४.००५।।	अठ्ठावीस युगें गेलीं विचारितां । निर्गम सर्वथा नव्हे देवा
८४८८	।।ना.गा.१२८४.००६।।	मग कटावरी कर धरोनियां धीर । उभा निरंतर राहिलासी
८४८९	।।ना.गा.१२८४.००७।।	सर्व घे प्रेमें तें हिरोनि बांधिलें । विचारें साधिलें कोणें कोणा
८४९०	।।ना.गा.१२८४.००८।।	द्वारीं द्वारपाळ जालासी अंकित । सांग बुद्धीमंत कोण ऐसा
८४९१	।।ना.गा.१२८४.००९।।	नाथिलेनि करिसी आपणा गोंविसी । बोल कां ठेविसी नामयातें

८४९२	।।ना.गा.१२८४.०१०।।	गोणाई म्हणे तुझें नकळे विंदान । देईं कृपादान बाळ माझें
८४९३	।।ना.गा.१२८५.००१।।	माझें घर तुवां पूर्वींच बुडविलें । जें दर्शनासी आलें बाळ माझें
८४९४	।।ना.गा.१२८५.००२।।	नेणों काय वर्म तुझें सांपडलें हातीं । रिघालासी चित्तीं जेणें द्वारें
८४९५	।।ना.गा.१२८५.००३।।	लौकिक परिहार देसील कासया । मी तुज ऐसिया बरवें जाणें
८४९६	।।ना.गा.१२८५.००४।।	कटीं ठेउनि कर उभा गरुडपारीं । हें तंव अंतरीं हारपला
८४९७	।।ना.गा.१२८५.००५।।	नाहीं चळणवळण न लावी पात्या पातें । लागलें निरूतें लक्ष तुझें
८४९८	।।ना.गा.१२८५.००६।।	तुझी याची खूण अंतरींची एकी । दाविसी लौकिकीं भिन्नपण
८४९९	।।ना.गा.१२८५.००७।।	सांडियेली येणें लौकिकाची लाज । नव्हे माझा मज कांहीं केल्या
८५००	।।ना.गा.१२८५.००८।।	तुझेंनि सुखें धाला आनारिसा जाला । अभिमान मावळला समूळ याचा
८५०१	।।ना.गा.१२८५.००९।।	देहीं पैं असोनी विदेही दिसत । प्रेमें वोसंडत हृदयकमळीं
८५०२	।।ना.गा.१२८५.०१०।।	तूं अनाथा कैवारी ऐसी वेदवाणी । परी कां नये अजोनी कणव तुज
८५०३	।।ना.गा.१२८५.०११।।	गोणाई म्हणे माझा नामा देईं हातीं । लागेन पुढता–पुढती तुझे पायीं
८५०४	।।ना.गा.१२८६.००१।।	वाचेचेनि बळें बोलसी आगळें । मर्यादे वेगळें वायांविण
८५०५	।।ना.गा.१२८६.००२।।	भ्रमलिस आरजे न पाहसी आपणाकडे । धारिष्ट केवढें पाहें तुझें
८५०६	।।ना.गा.१२८६.००३।।	नेई आपला नामा काय चाड आम्हां । जरी आहे तुज भ्रम ममत्वाचा
८५०७	।।ना.गा.१२८६.००४।।	पाहे पां पूर्वींचा कवणिये जन्मींचा । नकळे तुझा याचा ऋणानुबंध
८५०८	।।ना.गा.१२८६.००५।।	तो सरला कीं उरला विचारी आपुला । हा तुज अंतरला कवण्या गुणें
८५०९	।।ना.गा.१२८६.००६।।	येणें सांडिला संसार वेव्हार लौकिक । अविद्या अहंभाविक दोन्ही नाहीं
८५१०	।।ना.गा.१२८६.००७।।	हा प्रपंचावेगळा नकळे याची लीला । लागलासे डोळा प्रेममुद्रा
८५११	।।ना.गा.१२८६.००८।।	ऐसी याची स्थिति देखोनियां डोळां । मज कां वेळोवेळां छळितेसी
८५१२	।।ना.गा.१२८६.००९।।	जाणसी त्या परी बुझावी वो यातें । जेणें सुखें तूंतें ओळखिला
८५१३	।।ना.गा.१२८६.०१०।।	याचेनि संसार चालविन म्हणोनी । ऐसी भ्रांती मनीं धरिली वायां
८५१४	।।ना.गा.१२८६.०११।।	नामा अंतरीं निमाला आत्मा असे उरला। तरंग निमाला जेवीं जळीं
८५१५	।।ना.गा.१२८७.००१।।	लावोनि भवभयें तुवां केलें साचें । देह नव्हे याचें ऐसें केलें
८५१६	।।ना.गा.१२८७.००२।।	सुखभोग सर्व दिला टाकोनियां। नेणों तुझ्या पायांपरतें कांहीं
८५१७	।।ना.गा.१२८७.००३।।	ऐसें काय केलें नामया चाळविलें । समूळ बुडविलें आपणांमाजीं

८५१८	।।ना.गा.१२८७.००४।।	आम्हां दुर्बळांचा करोनियां घात । केला वाताहात घराचार
८५१९	।।ना.गा.१२८७.००५।।	आतां तुजविण कोणाचें साउली । पाळली पोसिली तुझी देवा
८५२०	।।ना.गा.१२८७.००६।।	संकटीं उदरीं वाहिली म्यां आशा । होता भरंवसा थोर याचा
८५२१	।।ना.गा.१२८७.००७।।	तंव तुवां लाविला आपुलिया सवें । नव्हे मज कांहीं ऐसा केला
८५२२	।।ना.गा.१२८७.००८।।	काया वाचा मनें सांडोनियां मज । अनुसरला तुज मनोभावें
८५२३	।।ना.गा.१२८७.००९।।	नकळे तुझी माव काय या दाविलें । परतेनासें केलें चित्त याचें
८५२४	।।ना.गा.१२८७.०१०।।	आतां माझा शीण निवारिल कोण । एका तुजविण पांडुरंगा
८५२५	।।ना.गा.१२८७.०११।।	गोणाई म्हणे देवा देई जीवदान । सुखाचें निधान नामा माझा
८५२६	।।ना.गा.१२८८.००१।।	राही रखुमाई सत्यभामा माता । सिकवा वो कांता बहुतां परी
८५२७	।।ना.गा.१२८८.००२।।	संत सनकादिक साक्ष हे सकळ । येणें माझें बाळ चाळविलें
८५२८	।।ना.गा.१२८८.००३।।	हा काय आमुचा धनी कीं गोसावी । नाहीं तें शिकवी लेंकुरासी
८५२९	।।ना.गा.१२८८.००४।।	जाला देव तरी पडों याच्या पायां । मैंदावें केलिया भलें नव्हे
८५३०	।।ना.गा.१२८८.००५।।	भीड तुटलिया नेईन चोघां चारी । होईल समसरीं याची मज
८५३१	।।ना.गा.१२८८.००६।।	देव कांहीं आम्ही नसति ऐकिले । परी नाहीं देखिले ऐसे कोठें
८५३२	।।ना.गा.१२८८.००७।।	दर्शनेंचि जेथें जीवित्वाची हानी । नाठवे परतोनि घराचार
८५३३	।।ना.गा.१२८८.००८।।	कैंची वो पंढरी मी वो काय जाणे । याच्या पुत्रपणें देखियेली
८५३४	।।ना.गा.१२८८.००९।।	या देवासी भेटी जन्ममरण तुटी । मावळली गोष्टी संसाराची
८५३५	।।ना.गा.१२८८.०१०।।	तुम्ही अवघ्याजणी जीवाच्या सांगातिणी । पुसा याचे मनीं काय आहे
८५३६	।।ना.गा.१२८८.०११।।	देऊनियां नामा मज लावा वाटे । गोणाई म्हणे वोखटें न करा देवा
८५३७	।।ना.गा.१२८९.००१।।	अरे विठोबा आतां पाहे मजकडे । कारे केले वेडें बाळ माझे
८५३८	।।ना.गा.१२८९.००२।।	तुझें उच्छिष्ट खादलें त्वां काय दिधलें । भलें दाखविलें देवपण
८५३९	।।ना.गा.१२८९.००३।।	आधीं त्वां तयाचें भोगूं पैं जाणावें । भक्ता सुख द्यावें आनंदाचें
८५४०	।।ना.गा.१२८९.००४।।	गोणाई म्हणे देवा तुज बांधलें दावें । तरी तुज भ्यावें लागे संता
८५४१	।।ना.गा.१२९०.००१।।	हरी त्वां कोणाचें बरवें केलें । पूर्ण आम्हां कळों आलें
८५४२	।।ना.गा.१२९०.००२।।	नारद वैष्णव जगजेठी । त्यासी लाविली लंगोटी
८५४३	।।ना.गा.१२९०.००३।।	मयुरध्वज राजा भला । त्यासि करवतीं घातला

८५४४	।।ना.गा.१२९०.००४।।	बळी दानशीळ भला । तुवां पाताळीं घातला
८५४५	।।ना.गा.१२९०.००५।।	भीष्म वैष्णवांचा राव । त्याचा बाणें पूजिला ठाव
८५४६	।।ना.गा.१२९०.००६।।	रूक्मांगद हरिचा दास । त्याचा गांवच केला वोस
८५४७	।।ना.गा.१२९०.००७।।	बाळ एकुलतें एक । तें त्वां ज्ञानीच केला शुक
८५४८	।।ना.गा.१२९०.००८।।	उपमन्यु बाळक पाहें । क्षीरसागरीं कोंडिलें आहे
८५४९	।।ना.गा.१२९०.००९।।	धुरू बाळक गोजिरवाणें । त्याचें खुंटलें येणें जाणें
८५५०	।।ना.गा.१२९०.०१०।।	हरिश्चंद्र ताराराणी । डोंबा घरीं वाहे पाणी
८५५१	।।ना.गा.१२९०.०११।।	प्रल्हाद भक्तीचा भुकेला । त्याचा बाप त्वां वधिला
८५५२	।।ना.गा.१२९०.०१२।।	हनुमंत भक्त निकट । त्यासी केलें तूं मर्कट
८५५३	।।ना.गा.१२९०.०१३।।	पुण्यवंत राजा नळ । त्याचा केला तुवां छळ
८५५४	।।ना.गा.१२९०.०१४।।	श्रियाळ राजा भला । त्याचा बाळ त्वां खादला
८५५५	।।ना.गा.१२९०.०१५।।	तुज कोणी न म्हणे भलें । बाळ पोटीचें कोवळें
८५५६	।।ना.गा.१२९०.०१६।।	जिकडे तिकडे तुम्ही दोघें । तिकडे तिसरा नामा मागें
८५५७	।।ना.गा.१२९०.०१७।।	तुज नाहीं जाती कुळ । जेवुनी भ्रष्टविलें बाळ
८५५८	।।ना.गा.१२९०.०१८।।	जेणें तुझें नाम घेतलें । तें संसारावेगळें केलें
८५५९	।।ना.गा.१२९०.०१९।।	आतां जेविसी तरी तुज आण । ऐकोनि हांसे जगज्जीवन
८५६०	।।ना.गा.१२९०.०२०।।	नामा दिला माते हातीं । नयन भरले अश्रुपातीं
८५६१	।।ना.गा.१२९०.०२१।।	माय पाहे नामदेव । तंव तो जाला केशवराव
८५६२	।।ना.गा.१२९०.०२२।।	माय म्हणे नये कामा। तुझा ओपिला तुज नामा
८५६३	।।ना.गा.१२९०.०२३।।	गोणाई म्हणे हरी । तुझी करणी तुजचि बरी
८५६४	।।ना.गा.१२९१.००१।।	गोणाई म्हणे नाम्या वचन माझें ऐक । पोटींचें बाळक म्हणोनि सांगे
८५६५	।।ना.गा.१२९१.००२।।	महिमेचा संसार सांडोनि आपुला । संग त्वां धरिला नि:संगाचा
८५६६	।।ना.गा.१२९१.००३।।	या काय मागसी तो काय देईल । शीघ्रची नेईल वैकुंठासी
८५६७	।।ना.गा.१२९१.००४।।	सविल्याचीं लेंकुरें वर्तताती कैसीं । तूं मज जालासी कुळक्षय
८५६८	।।ना.गा.१२९१.००५।।	धनधान्य पुत्र कलत्रें नांदती । तुज अभाग्याचे चित्तीं पांडुरंग
८५६९	।।ना.गा.१२९१.००६।।	शिवण्या टिपण्या घातलेंसे पाणी । न पाहसी परतोनि घराकडे

८५७०	।।ना.गा.१२९१.००७।।	कैसी तुझी भक्ती या लौकिकावेगळी । संसाराची होळी केली नाम्या
८५७१	।।ना.गा.१२९१.००८।।	याची तुवां कैसी धरियेली कांस । हा तंव कवणास जाला नाहीं
८५७२	।।ना.गा.१२९१.००९।।	त्यातें जे अनुसरती त्याचें नुरें कांहीं । देव नव्हे पाही हा घरघेणा
८५७३	।।ना.गा.१२९१.०१०।।	गोकुळीं करी चोरी आपुलें पोट भरी । तो तुज निर्धारीं देईल काई
८५७४	।।ना.गा.१२९१.०११।।	लक्षुमीसारिखी सुंदर टाकोनि । ताटिका गौळणी गौळीयांच्या
८५७५	।।ना.गा.१२९१.०१२।।	अष्टसिद्धी दासी जयाच्या कामारी । कल्पवृक्ष द्वारीं कामधेनु
८५७६	।।ना.गा.१२९१.०१३।।	बळीच्याचि घरा भीक मागूं गेला । धरूनि बांधिला दारवंटा
८५७७	।।ना.गा.१२९१.०१४।।	कुबज्या कुरूप कंसाचिया दासी । जीवें भावें तिसी रतलास
८५७८	।।ना.गा.१२९१.०१५।।	यातें भजती त्याच्या संसाराची नासी । जडला जीवेंसी नवजाय
८५७९	।।ना.गा.१२९१.०१६।।	ठकोनियां येणें बहु नाडियेलें । तैसें तुज जालें सत्य जाण
८५८०	।।ना.गा.१२९१.०१७।।	गोणाई म्हणे नाम्या बरें नाहीं केलें । घर बुडविलें कुळासहित
८५८१	।।ना.गा.१२९२.००१।।	नामा म्हणे माते परियेसी वचन । गुज मी सांगेन अंतरीचें
८५८२	।।ना.गा.१२९२.००२।।	धरोनि माझी वृत्ति पाहें माझें सुख । मी सांगतों तें ऐक जननिये
८५८३	।।ना.गा.१२९२.००३।।	कायावाचामनें ममत्व माझ्या ठायीं । तें तूं ठेवीं पाईं विठोबाचे
८५८४	।।ना.गा.१२९२.००४।।	मग हा कृपासिंधु न विसंबेल तुज । अनाथाची लाज हाचि राखे
८५८५	।।ना.गा.१२९२.००५।।	पाहे पां पशु जळचरें गांजिले । सकळीं सांडिलें जिवलगीं
८५८६	।।ना.गा.१२९२.००६।।	पितांबरासहित घालोनियां उडी । सोडविला पानेडी अनाथ म्हणोनी
८५८७	।।ना.गा.१२९२.००७।।	प्रल्हादाकारणें जाला पैं पिसाट । धरिले विकट रूप देवें
८५८८	।।ना.गा.१२९२.००८।।	विदारुनी दैत्य आवेशें बहुत । यानें माझा भक्त गांजियेला
८५८९	।।ना.गा.१२९२.००९।।	पांडवांचें काज करितां नाहीं लाज । म्हणे शरण मज अनन्य भावें
८५९०	।।ना.गा.१२९२.०१०।।	पाडसाकारणें जैसी कुरंगिणी । तैसा रानींवनीं सांभाळित
८५९१	।।ना.गा.१२९२.०११।।	जन्मोनियां माझे बहु लळे केले । अडचणी सांभाळिलें अनाथनाथें
८५९२	।।ना.गा.१२९२.०१२।।	नामा म्हणे याचे दृढ धरिले चरण । कळिकाळापासोन सोडविलें
८५९३	।।ना.गा.१२९३.००१।।	लाभाचिया लोभें मज म्हणसी आपुलें । परी नेणसी तापलें चित्त माझें
८५९४	।।ना.गा.१२९३.००२।।	जन्म मरण दुःखें शिणलों यातायाती । ऐसी माझी खंती न विचारिसी
८५९५	।।ना.गा.१२९३.००३।।	म्हणोनि विठोबाचा जालों शरणागत । तेणें माझें हित ऐसें केलें

८५९६	।।ना.गा.१२९३.००४।।	पुत्र कलत्र सकळ भजती हितालागीं । दुःखाचे विभागीं नव्हती कोणी
८५९७	।।ना.गा.१२९३.००५।।	जन्मोनि भजतां उचित एक चुके । तें होय पारिखे क्षणामाजीं
८५९८	।।ना.गा.१२९३.००६।।	नाना योनी हिंडतां आपुलें निज कर्म । मज होय श्रम तें तूं देई
८५९९	।।ना.गा.१२९३.००७।।	परी माझ्या विठोबाची सेवा सुख गोडी । नाहीं एक घडी न देखों कोठें
८६००	।।ना.गा.१२९३.००८।।	जाती कुळ माझें नाहीं विचारिलें । नेणों अंगिकारिलें कवण्या गुणें
८६०१	।।ना.गा.१२९३.००९।।	तुजविण त्याचें हृदय कोवळें । पाळी माझे लळे नानापरी
८६०२	।।ना.गा.१२९३.०१०।।	शिणलिया बोभाय मग मी वाट पाहें । ये वो माझे माये पांडुरंगे
८६०३	।।ना.गा.१२९३.०११।।	शब्द माझ्या कानीं पडतां तत्क्षणीं। येतसे टाकोनि झेंपावत
८६०४	।।ना.गा.१२९३.०१२।।	न सांगतां कांहीं सर्व जाणें जिवींचें । आणिक ऐसें कैंचें लोभापर
८६०५	।।ना.गा.१२९३.०१३।।	देऊनि अभयदान करें कुरवाळी । करितसे साउली पीतांबरें
८६०६	।।ना.गा.१२९३.०१४।।	मायबाप सखा जिवलग सोईरा । माझिया संसारा हाचि एक
८६०७	।।ना.गा.१२९३.०१५।।	नामा म्हणे माझ्या हृदयींचा विसावा । गीतीं गातां जीवा गोड वाटे
८६०८	।।ना.गा.१२९४.००१।।	गोणाई म्हणे नाम्या जल्पसी भलतें । तुज कोण्या दैवतें वोढियेलें
८६०९	।।ना.गा.१२९४.००२।।	लाजिरवाणें तुवां केलें रे हें जिणें । हांसती पिसुनें देशोदेशीं
८६१०	।।ना.गा.१२९४.००३।।	सांडी सांडी नाम्या तूं हें देवपिसें । बळें घर कैसें बुडवितोसी
८६११	।।ना.गा.१२९४.००४।।	नवमास उदराभितरीं वाहिला । माझ्या नेणत्या बाळा चाळविलें
८६१२	।।ना.गा.१२९४.००५।।	तुझे द्वारीं बैसोनि उपवास करिन । नामा घेऊन जाईन गुणराशी
८६१३	।।ना.गा.१२९४.००६।।	येथें ते होईल लटिकेंचि भांडण । नामा द्यावा म्हणे गोणाई माझा
८६१४	।।ना.गा.१२९४.००७।।	गोणाई म्हणे नाम्या कळेल तें करी । स्वहित विचारी सांगो किती
८६१५	।।ना.गा.१२९५.००१।।	पोर निर्दय जालें देवपिसें लागलें । लोकांचें गोविलें तेंहि पोर
८६१६	।।ना.गा.१२९५.००२।।	नित्य करी अंघोळी धोत्रेंहि फाडिलीं । कळी मांडियेली याही पोरें
८६१७	।।ना.गा.१२९५.००३।।	गांवींचे महाजन करिती गुडघे स्नान । या पोरां व्यसन अंघोळीचें
८६१८	।।ना.गा.१२९५.००४।।	जन्मोजन्मीं नेणों आम्ही ह्या तुळसी । या पोरें विवसी मांडियेली
८६१९	।।ना.गा.१२९५.००५।।	गोणाई म्हणे नाम्या तुवां भलें केलें। जया वश्य केलें विठोबासी
८६२०	।।ना.गा.१२९६.००१।।	ज्याचें दैव त्या सांगातें । मला नवल वाटतें
८६२१	।।ना.गा.१२९६.००२।।	एक बैसती अश्वावरी । एक चालती चरणचाली

८६२२	।।ना.गा.१२९६.००३।।	एक जेविती मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न
८६२३	।।ना.गा.१२९६.००४।।	गोणाई म्हणे धन्य देवा । नामयाचा संचित ठेवा
८६२४	।।ना.गा.१२९७.००१।।	सोये सांडिली सर्वांची । जोडी केली विठोबाची
८६२५	।।ना.गा.१२९७.००२।।	मायबापासी टाकिलें । ध्यान देवाचें लागलें
८६२६	।।ना.गा.१२९७.००३।।	स्त्री पुत्र बंधु बहिणी । केली सर्वांची सांडणी
८६२७	।।ना.गा.१२९७.००४।।	गणगोत इष्टमित्र । सर्व जोडिलें विठ्ठलपात्र
८६२८	।।ना.गा.१२९७.००५।।	गोणाई म्हणे नामा । भली केली बारे सीमा
८६२९	।।ना.गा.१२९८.००१।।	नामयाची माता विनवितसे संता । म्हणे पुत्रनाथा काय करूं
८६३०	।।ना.गा.१२९८.००२।।	नामा चाळविला पंढरिये नेला । विठ्ठलीं मीनला नामदेव
८६३१	।।ना.गा.१२९८.००३।।	नेणें अन्नपाणी शिवणीं टिपणीं । अखंड चक्रपाणि हृदयीं वसे
८६३२	।।ना.गा.१२९८.००४।।	संत म्हणती गोणाई विपरीत अवधारीं । नामा पंढरपुरीं वैष्णवांमाजीं
८६३३	।।ना.गा.१२९९.००१।।	नामयासारिखें निधान तुझिये कुसीं । धन्य तूं वो होसी जगामाजीं
८६३४	।।ना.गा.१२९९.००२।।	धन्य याचें सुख देखियेलें डोळां । प्रेमाचा जिव्हाळा अलौकिक
८६३५	।।ना.गा.१२९९.००३।।	धन्य तुझें कुळ धन्य तुझा वंश । दीपासवें प्रकाश दिसे जेवीं
८६३६	।।ना.गा.१२९९.००४।।	धन्य तुझी काया धन्य वाचा मन । करविलें स्तनपान नामयासी
८६३७	।।ना.गा.१२९९.००५।।	धन्य हा दिवस तुवां केलें सार्थक । खेळविलें कौतुकें नामयासी
८६३८	।।ना.गा.१२९९.००६।।	धन्य तुझें भोजन नाहीं नाम्याविण । धन्य उदकपान केलें तुवां
८६३९	।।ना.गा.१२९९.००७।।	धन्य विश्रांतीसी केलें त्वां शयन । वोसंगा घेऊन नामयासी
८६४०	।।ना.गा.१२९९.००८।।	धन्य तुझे कर कुरवाळिला नामा । धन्य तो संभ्रमा स्नेह तुझा
८६४१	।।ना.गा.१२९९.००९।।	धन्य कृपादृष्टीं नाम्यातें पाहिलें । केस कुर्वाळिले बाळपणीं
८६४२	।।ना.गा.१२९९.०१०।।	ऐसी तूं वो धन्य जन्मोनियां धन्य । तुझें नाम धन्य मिरवत
८६४३	।।ना.गा.१२९९.०११।।	धन्य तुझा नामा ज्याची भेटी आम्हां । धन्य त्याचा प्रेमा नित्य नवा
८६४४	।।ना.गा.१३००.००१।।	मग पंढरीनाथ म्हणे नामयासी । तूं जाई गोणाईसी घेऊनियां
८६४५	।।ना.गा.१३००.००२।।	अतिशय कां इणें मांडिलेसे फार । मातेसी निष्ठुर होऊं नये
८६४६	।।ना.गा.१३००.००३।।	स्तनपान देऊनि मोहें पाळिलासी । अंतर तियेसी देऊं नये
८६४७	।।ना.गा.१३००.००४।।	नामा म्हणे शरण आलों जिच्या भेणें । तिचे हातीं देणें उचित नव्हे

८६४८	।।ना.गा.१३०१.००१।।	देव जाला नामा नामा जाला देव । गोणाईचा भाव पाहावया
८६४९	।।ना.गा.१३०१.००२।।	हा घे तुझा नामा काय चाड आम्हां । आनंदाचा प्रेमा गोणाईसी
८६५०	।।ना.गा.१३०१.००३।।	हातीं धरोनियां घेऊनी चालिली । फिरूनी पाहती जाली तंव तो देव
८६५१	।।ना.गा.१३०१.००४।।	अगा माझ्या बापा तूं कोणा हवासी । मज दुर्बळासी काय होय
८६५२	।।ना.गा.१३०१.००५।।	सोळा सहस्र मुख्य अष्ट तुझ्या कांता । त्या माझिया घाता प्रवर्ततील
८६५३	।।ना.गा.१३०१.००६।।	पुंडलिकासी तुवां दिधली आहे भाक । गोणाई म्हणे ठक बहु होसी
८६५४	।।ना.गा.१३०२.००१।।	माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायीं
८६५५	।।ना.गा.१३०२.००२।।	पुंडलिका भुलविलें । तैसें माझें बाळ केलें
८६५६	।।ना.गा.१३०२.००३।।	तें गा न चले मजपासीं । दे गा माझ्या नामयासी
८६५७	।।ना.गा.१३०२.००४।।	तुज संगतीं जे लागले । ते त्वां जितेंचि मारिले
८६५८	।।ना.गा.१३०२.००५।।	विठ्ठल म्हणे गोणाई । आपुला नामा घेऊनी जाई
८६५९	।।ना.गा.१३०२.००६।।	हातीं धरोनियां गेली । गोणाई तेव्हां आनंदली
८६६०	।।ना.गा.१३०३.००१।।	शिवणें टिपणें करोनि आपुलें । नित्य चालवणें संसारिक
८६६१	।।ना.गा.१३०३.००२।।	गणगोतांमाजीं बरें केलें नांव । माझें सत्त्व सर्व बुडविलें
८६६२	।।ना.गा.१३०३.००३।।	कवणें गुणें तुज पडिली बा भुली । सुख या विठ्ठलीं देखिलें काय
८६६३	।।ना.गा.१३०३.००४।।	तूं भक्त निधडा हा देव धडफुडा । मेळविला जोडा येरवेरां
८६६४	।।ना.गा.१३०३.००५।।	यासी नाहीं आप तुज नाहीं पर । आमुचा संसार विभांडिला
८६६५	।।ना.गा.१३०३.००६।।	सरलें आयुष्य उरले थोडे दिस । थोर केली आस होती जीवीं
८६६६	।।ना.गा.१३०३.००७।।	आमुच्या माघारें राखिसी वो नांव । त्वां तंव बरवें दैव काढियेलें
८६६७	।।ना.गा.१३०३.००८।।	खांदिये भोपळा गळां तुळसीमाळा । जपसी वेळोवेळां रामकृष्ण
८६६८	।।ना.गा.१३०३.००९।।	तेणें छंद नयनीं अश्रूंचिया धारा । केली ख्याति गव्हारा जनांमाजीं
८६६९	।।ना.गा.१३०३.०१०।।	अरे ऐसें तुवां बुडविलें कुळ । सांडिली सकळ लोकलाज
८६७०	।।ना.गा.१३०३.०११।।	बरवी धरिली दृढ सत्वाची पाउटी । शिकवी दामशेठी नामयासी
८६७१	।।ना.गा.१३०४.००१।।	बोले दामसेठी । नाम्या ऐकावी हे गोष्टी
८६७२	।।ना.गा.१३०४.००२।।	पाहे संसाराची सोये । हाटा बाजारासी जाये
८६७३	।।ना.गा.१३०४.००३।।	कुटुंब चालवणें तुज । वृद्धपण आलें मज

८६७४	।।ना.गा.१३०४.००४।।	तुजसाठीं नवस केला । सेखीं हाचि कामा आला
८६७५	।।ना.गा.१३०४.००५।।	दामा म्हणे नामयासी । किती शिकवावें तुजसी
८६७६	।।ना.गा.१३०५.००१।।	केशवासी नामा सांगतसे भावें । नफा वेवसाव जाला तैसा
८६७७	।।ना.गा.१३०५.००२।।	मालिक गणोबा धोंडोबा जामीन । घेतलीसे पूर्ण निशाणचिठी
८६७८	।।ना.गा.१३०५.००३।।	आठवड्याची बोली करूनियां आलों । नामा म्हणे धालों तुज पाहतां
८६७९	।।ना.गा.१३०६.००१।।	दामाशेठी म्हणे वेव्हार कोणासी । केला तो आम्हांसी सांग नाम्या
८६८०	।।ना.गा.१३०६.००२।।	गणोबा नाईक नाम हें जयाचें । सावकार साचे पुरातन
८६८१	।।ना.गा.१३०६.००३।।	तयांचे दुकानीं वेंचिलें कापड । आठांवरीं तोड ऐवजासी
८६८२	।।ना.गा.१३०६.००४।।	दामाशेठी म्हणे नामया सुजाणा । वेगीं द्रव्य आणा जाऊनियां
८६८३	।।ना.गा.१३०७.००१।।	जावोनियां नामदेव । बोले गणोबासी भाव
८६८४	।।ना.गा.१३०७.००२।।	द्रव्य द्यावें हो सत्वरीं । आम्हीं जातों आपुल्या घरीं
८६८५	।।ना.गा.१३०७.००३।।	मग म्हणे धोंडोबासी । तुम्ही जामीन ऐवजासी
८६८६	।।ना.गा.१३०७.००४।।	द्रव्य द्यावें हो लवकरी । नाहीं तरी चलावें घरीं
८६८७	।।ना.गा.१३०७.००५।।	ऐसें बोलोनि धोंडोबासी । पुढें लोटिलें तयासी
८६८८	।।ना.गा.१३०७.००६।।	नामा पंढरिसी आला । संगें धोंडोबा आणिला
८६८९	।।ना.गा.१३०८.००१।।	कुलुप अर्गळा घालोनी कोठडिसी । घातलें धोंड्याशीं बंदीखानीं
८६९०	।।ना.गा.१३०८.००२।।	गोणाई दामासेठी नव्हती तेव्हां घरीं । गेली भीमातीरीं स्नानालागीं
८६९१	।।ना.गा.१३०८.००३।।	नामदेव गेले राउळा त्वरित । सांगतसे मात केशवासी
८६९२	।।ना.गा.१३०८.००४।।	दामासेठी आले स्नान करूनियां । राजाई त्या पायां लागुनि बोले
८६९३	।।ना.गा.१३०८.००५।।	ऐका हो मामाजी पुत्राची हे मात। धोंड्याशीं घरांत कोंडियलें
८६९४	।।ना.गा.१३०८.००६।।	दामासेठी बोले नामा कोठें गेला । बोलवा तयाला झडकरी
८६९५	।।ना.गा.१३०८.००७।।	नारा महादा दोघे जाती राउळासी । बोलाविती नाम्यासी चला घरीं
८६९६	।।ना.गा.१३०८.००८।।	मुखाकडे पाहे केशवाच्या नामा । घरीं जातां दामा मारिल तो
८६९७	।।ना.गा.१३०८.००९।।	देव म्हणे नाम्या भिऊं नको मनीं । नाम हें निर्वाणीं तारिल तुज
८६९८	।।ना.गा.१३०८.०१०।।	नामा घरां आला दामासेठीपायीं । नमस्कारूनि त्याही उभा पुढें
८६९९	।।ना.गा.१३०८.०११।।	दामासेठी म्हणे नाम्या काय केलें । धोंड्याशीं कोंडिलें घरामध्यें

८७००	।।ना.गा.१३०९.००१।।	अरे नाम्या काये केलें । कासया धोंड्याशीं कोंडिलें
८७०१	।।ना.गा.१३०९.००२।।	उदीम बरवा फळा आला । हरविलें भांडवला
८७०२	।।ना.गा.१३०९.००३।।	संसारिक चतुर बहु । मातीसमान घेसी गहूं
८७०३	।।ना.गा.१३०९.००४।।	नामा म्हणे दामासेठी । माझी ऐकावी हे गोष्टी
८७०४	।।ना.गा.१३१०.००१।।	ऐका दामासेठी सांगतों तुम्हासी । द्रव्यही कुळासी मागुन घ्यावें
८७०५	।।ना.गा.१३१०.००२।।	मालधनी आलों घेऊनियां घरा । तुम्ही कां दातारा गांजितसां
८७०६	।।ना.गा.१३१०.००३।।	नामदेव म्हणे धोंडोबा नाईका । मिती आणि पैका द्यावा वेगीं
८७०७	।।ना.गा.१३११.००१।।	धोंडोबा नामदेवें काढिला बाहेरी । अंतर्बाह्यात्कारीं सोनें जालें
८७०८	।।ना.गा.१३११.००२।।	दामासेठी पाहुनी नामयासी बोले । व्यर्थ म्यां छळिलें तुज बाळा
८७०९	।।ना.गा.१३११.००३।।	राजाई गोणाई धांवोनियां आली । विनीत होऊनि बोली बोलताती
८७१०	।।ना.गा.१३११.००४।।	आम्ही हे कुटुंबी द्रव्य नाहीं घरीं । म्हणोनि श्रीहरी पावलासी
८७११	।।ना.गा.१३११.००५।।	गोणाई दामासेठी सांगे नामदेवा । न बोलावें भावा जनीं बापा
८७१२	।।ना.गा.१३११.००६।।	जगा मात कळलियावरी । नेतील हिरोनि धोंडोबासी
८७१३	।।ना.गा.१३११.००७।।	नामदेव म्हणे आपुलें द्रव्य घ्यावें । उरलें तें धाडावें गणोबासी
८७१४	।।ना.गा.१३१२.००१।।	ऐसें ऐकोनियां राजाई ते आली । रोषें येऊनि बोली बोलतसे
८७१५	।।ना.गा.१३१२.००२।।	देवानें हें दिलें तुम्हीं कां पाठवा । काशाचा गणोबा बोलतसा
८७१६	।।ना.गा.१३१२.००३।।	ऐसें बोलोनियां हातें लोटी धोंडा । तुमचिया वितंडा कोण पुसे
८७१७	।।ना.गा.१३१२.००४।।	देवें मज दिलें तुम्ही कां मागतां । अलंकार आतां घडीन मी
८७१८	।।ना.गा.१३१२.००५।।	नामा म्हणे धन ज्याचें त्यासी द्यावें । आपुलें तें घ्यावें आपणची
८७१९	।।ना.गा.१३१३.००१।।	क्षेत्रीं हा वृत्तांत कळला सर्वांशीं । आले पंचक्रोशी सभोंवते
८७२०	।।ना.गा.१३१३.००२।।	धोंडोबा गणोबा होते ज्याचे रानीं । ते आले धांवोनि मागावया
८७२१	।।ना.गा.१३१३.००३।।	आपुलें द्रव्य घ्यावें धोंडोबाशीं द्यावें । नाहीं तरी चलावें पंचाइती
८७२२	।।ना.गा.१३१३.००४।।	नामदेव म्हणे द्रव्य तुम्ही द्यावें । आपुले घेवोनि जावें धोंडोबासी
८७२३	।।ना.गा.१३१४.००१।।	सकळ समुदाव मिळोनियां आले । द्रव्य देउनि नेलें धोंडोबाशीं
८७२४	।।ना.गा.१३१४.००२।।	धोंडोबाशीं सकळिके ग्रामस्थीं आणिले । पूर्ववत जाले दगडची
८७२५	।।ना.गा.१३१४.००३।।	नामा म्हणे विठो पावला निर्वाणीं । भक्तां चक्रपाणि रक्षितसे

८७२६	।।ना.गा.१३१५.००१।।	आई जे शिकवी तीतें तुम्ही नाईका । नाहीं भय शंका लौकिकाची
८७२७	।।ना.गा.१३१५.००२।।	लावोनि लंगोटी जालेती गोसावी । आमुची उठाठेवी कोण करी
८७२८	।।ना.गा.१३१५.००३।।	ऐसी तुमची स्थिती विलग देखोनि । पडिलें चिंतवनीं काय करूं
८७२९	।।ना.गा.१३१५.००४।।	धडचि कांटीये घातलें हो कैसें । बळेंचि आपणा पिसें लावियेलें
८७३०	।।ना.गा.१३१५.००५।।	सुखाचा संसार करोनि बारा वाटे । नांव केलें मोठें जगामाजीं
८७३१	।।ना.गा.१३१५.००६।।	तोडियेला मोह सांडियेली माया । भुलविले तुमचिया चित्ता कोणें
८७३२	।।ना.गा.१३१५.००७।।	कवणें पुण्य ऐसी जोडियेली जोडी । केली बिघडाबिघडी आम्हां तुम्हां
८७३३	।।ना.गा.१३१५.००८।।	तुमचि हे गति लेकुरें नेणती । कोण चालविती घराचार
८७३४	।।ना.गा.१३१५.००९।।	म्हणोनि माझें चित्त आपुलेनि उद्वेगें । कवणा जीवींचे सांगे सुखदुःख
८७३५	।।ना.गा.१३१५.०१०।।	सर्वस्वें सांडोनि धरिला तुम्ही देव । येणें पुसिला ठाव संसारींचा
८७३६	।।ना.गा.१३१५.०११।।	आमची कणव न वाटेचि कांहीं । विनविते राजाई नामदेवा
८७३७	।।ना.गा.१३१६.००१।।	घरधनीयाणीं केला गुरु । बाई मी आतां काय करूं । असोनि नाहींसा संसारू। चमत्कार कृपेचा
८७३८	।।ना.गा.१३१६.००२।।	धांवे पावे गे मेसाई । येथें कोणाचें न चाले कांहीं । सत्यपण तुझे ठायीं । तरी हें नाहिसें करी गे
८७३९	।।ना.गा.१३१६.००३।।	मंत्र घेतला जैसा । घरीं संताचा वोळसा । वोस पडो हरिदासा । गेले नमत मागुते
८७४०	।।ना.गा.१३१६.००४।।	काय सांगों याची रीती । सोसे सोसे पाये चरणाप्रती । अवघे भांबडभूत होती । नाचताती आनंद
८७४१	।।ना.गा.१३१६.००५।।	लौकिकांत गेलीं वायां । एकाच्या एक पडती पायां । म्हणती ये गा पंढरिराया । ब्रह्मानंदें डुल्लतां
८७४२	।।ना.गा.१३१६.००६।।	भोळी सासू गोणाबाई । पांढरा स्फटिका व्याली पाही । त्यानें जोडिला शेषशायी । काय राजाई करूं म्हणे
८७४३	।।ना.गा.१३१७.००१।।	दोन प्रहर रात्र पाहोनी एकांत । राजाई वृत्तांत सांगे माते
८७४४	।।ना.गा.१३१७.००२।।	अहो रखुमाबाई विठोबासी सांगा। भ्रतारासि कां गा वेडें केलें
८७४५	।।ना.गा.१३१७.००३।।	वस्त्र पात्र नाहीं खाया जेवयासी । नाचे अहर्निशीं निर्लज्जसा
८७४६	।।ना.गा.१३१७.००४।।	चवदा मनुष्यें आहेत माझ्या घरीं । हिंडती दारोदारीं अन्नासाठीं
८७४७	।।ना.गा.१३१७.००५।।	बरा मार्ग तुम्ही उमजोनि सांगा । नामयाची राजाई भली नव्हे
८७४८	।।ना.गा.१३१८.००१।।	सावध सावध राजाई हो सुखें । नामयानें दुःख निरसिलें
८७४९	।।ना.गा.१३१८.००२।।	संसार सांतें या येऊनि भाग्याचा। छंद विठ्ठलाचा लागला यासी
८७५०	।।ना.गा.१३१८.००३।।	याचें नाम ऐसें न दिसे त्रिभुवनीं । नायकों दुजें कर्णीं नाम्या ऐसें
८७५१	।।ना.गा.१३१८.००४।।	वैष्णवांचे गजर टाळघोष दिंडी । उभयतां ब्रह्मांडीं घोष गेला

८७५२	।।ना.गा.१३१८.००५।।	तयाच्या दर्शनें कलिमाजीं तारिलीं । भाग्यें विनटलीं विठ्ठलेंसी
८७५३	।।ना.गा.१३१८.००६।।	राजाई म्हणे माते रखुमाई बुद्धीवंते । आमुच्या अदृष्टातें लिहिलें कैसें
८७५४	।।ना.गा.१३१९.००१।।	परियेसी रुक्माई जैसा बैसला पाटीं । दैन्य पैं न सोडी काय करूं
८७५५	।।ना.गा.१३१९.००२।।	सदैवाच्या स्त्रिया अलंकारमंडित । मजवरी नाहीं प्रीत काय करूं
८७५६	।।ना.गा.१३१९.००३।।	दरिद्रें विश्रांति घातली वो कैसी । सांगो कोणापाशीं माउलिये
८७५७	।।ना.गा.१३१९.००४।।	एकी दिव्य वस्त्रें नेसल्या परिकर । मज खंडें जर्जर मिळालेसें
८७५८	।।ना.गा.१३१९.००५।।	मोडकें खोंपट वारा येतो भराभराट । बहु होती कष्ट कोणा सांगों
८७५९	।।ना.गा.१३१९.००६।।	कैंचीं कुसुमसेज कैंचे पटकुळ । फाटकी वाकळ अंथरूणा
८७६०	।।ना.गा.१३१९.००७।।	कन्या आणि पुत्र जाली उपवरी । अजोनि न धरी घर प्राणनाथ
८७६१	।।ना.गा.१३१९.००८।।	जनलोकांमाजीं केलें येणें हासें । म्हणती लागलें पिसें नामयासी
८७६२	।।ना.गा.१३१९.००९।।	जन्मीं न देखे उपाय येणें केले अपाये । कोणा सांगो माये सुखदुःख
८७६३	।।ना.गा.१३१९.०१०।।	आमुच्या वडिलां शस्त्र सुई आणि कातरी । हा टाळ विणा करी वागवीत असे
८७६४	।।ना.गा.१३१९.०११।।	एकांते भाकिलें रुदना करि त्याची नारी । वाहियेली सुरी नागनाथीं
८७६५	।।ना.गा.१३१९.०१२।।	लज्जेचा हा गांव सांडियेला येणें । शिकवावें कोणें माउलिये
८७६६	।।ना.गा.१३१९.०१३।।	संसाराचा येणें सांडिला पसारा । कणव स्त्री बाळा न ये कैसी
८७६७	।।ना.गा.१३१९.०१४।।	नसतां विठोबा नसतां पंढरी । तरी हा सुखें घरी नांदतां कीं
८७६८	।।ना.गा.१३१९.०१५।।	होणार होऊन गेले शिकवूं आतां काई । विनविते राजाई रखुमाईसी
८७६९	।।ना.गा.१३२०.००१।।	शिकवा हो रुक्माई आपुलिया कांता । कां आम्हां अनाथा कष्टविती
८७७०	।।ना.गा.१३२०.००२।।	जन्मोनियां आमुची पुरविली पाठी । मोडिली राहाटी संसाराची
८७७१	।।ना.गा.१३२०.००३।।	आतां आम्ही काय करणें माउलिये । बैसूं सावलिये कवणाचिये
८७७२	।।ना.गा.१३२०.००४।।	माझ्या भ्रतारासी लावियेला चाळा । क्षण जी वेगळा न करी त्यासी
८७७३	।।ना.गा.१३२०.००५।।	आमुचा वेव्हार विध्वंसिला पाहीं । करुणा माझी कांही न ये त्यासी
८७७४	।।ना.गा.१३२०.००६।।	सकळाचें मूळ आपणा आधीन । केलें येणें जाणें पांडुरंगें
८७७५	।।ना.गा.१३२०.००७।।	आपुलें परावें मोहो हा सांडिला । आंगोठा मोडिला उपाधीचा
८७७६	।।ना.गा.१३२०.००८।।	उघडें घरदार लौकिक वेव्हार । धरिला निर्धार याचे नामीं
८७७७	।।ना.गा.१३२०.००९।।	रात्रंदिवस जपे गोविंद हृदयीं । आमुची चिंता कांही नलगे त्यासी

८७७८	।।ना.गा.१३२०.०१०।।	तुमचे सन्निधानें जालों आम्ही दीन । न वाटे निर्वाण कैसें तुम्हां
८७७९	।।ना.गा.१३२०.०११।।	संसाराची व्यथा नेणवे सर्वथा । होय तें उचिता करणें आम्हां
८७८०	।।ना.गा.१३२०.०१२।।	धरी निरंतर एकचि उत्तर । परि हा तुम्ही विचार काय केला
८७८१	।।ना.गा.१३२०.०१३।।	अनुभव अनुभवी जाणें तुम्हीं समर्थपणें । सदासुखीं म्हणे नामीं तुझ्या
८७८२	।।ना.गा.१३२०.०१४।।	जन्मोनि अवघी तुमची पोसणीं । नेणो तुम्हांवाचोनि कोणी दुजें
८७८३	।।ना.गा.१३२०.०१५।।	कायावाचामनें तुमचिये पाई । विनविते राजाई जिवलगा
८७८४	।।ना.गा.१३२१.००१।।	अंगोळिये विठा कडियेसी नारा । राजाई पंढरपुरा चालियेली
८७८५	।।ना.गा.१३२१.००२।।	भिवरा संपूर्ण जातसे भरयेली। राजाई बोलली कैसें जालें
८७८६	।।ना.गा.१३२१.००३।।	एकली मी बाळें काय करूं आतां । आहा पंढरिनाथा काय केलें
८७८७	।।ना.गा.१३२१.००४।।	एक बांधिलें पाठीसी दुजें बांधिलें पोटासी । वेणुनादापाशीं वाहावत गेली
८७८८	।।ना.गा.१३२१.००५।।	हंबरडा हाणोनि बोभाये नामया । आवर्ती पडोनियां तळास गेली
८७८९	।।ना.गा.१३२१.००६।।	योगनिद्रा सारोनि देव जागा जाला । त्वरित पावला काढिलीं तिघें
८७९०	।।ना.गा.१३२१.००७।।	नारा विठा दोघे कडियेसी घेतले । राजाईस धरिलें दक्षिण करीं
८७९१	।।ना.गा.१३२१.००८।।	आणिलीं महाद्वारा पुढें दे लेकुरां । विठोबा सामोरा नामा आला
८७९२	।।ना.गा.१३२१.००९।।	बाबा बाबा म्हणोनि नारा धाविन्नला । नामा त्या बोलिला परतें होई
८७९३	।।ना.गा.१३२१.०१०।।	देखोनि राजाईसी गहिंवरू पैं आला । अरे बा विठ्ठला काय केलें
८७९४	।।ना.गा.१३२१.०११।।	बाळेसहित विख घेईन मी आतां । पाहे पंढरिनाथा बुडवीन घर
८७९५	।।ना.गा.१३२१.०१२।।	मेला सर्प होतां तो ओटिये घेतला । खांडोनि घातला डेऱ्यामाजीं
८७९६	।।ना.गा.१३२१.०१३।।	खालीं ज्वाळ घाली उकळी फुटली । पोटासी धरिली दोघें बाळें
८७९७	।।ना.गा.१३२१.०१४।।	देह विठोबासी समर्पण करूं । ऐसा पैं निर्धारू धरियेला
८७९८	।।ना.गा.१३२१.०१५।।	रुक्मिणी म्हणे देवा अनर्थ मांडिला । नामा बाहेर गेला निश्चयेंसी
८७९९	।।ना.गा.१३२१.०१६।।	डेरा उघडोनि राजाई जंव पाहे । तोंडभरीं भरलाहे अवघें सोनें
८८००	।।ना.गा.१३२१.०१७।।	राजाईनें धरिले नामयाचे चरण । कृपादृष्टीं पाहणें आम्हांकडे
८८०१	।।ना.गा.१३२१.०१८।।	विठ्ठल विठ्ठल ऐसें बोलियेला । निवांत राहिला घटका चारी
८८०२	।।ना.गा.१३२१.०१९।।	कांपत कांपत महाद्वारीं आला । तुझी माव विठ्ठला नकळे कांहीं
८८०३	।।ना.गा.१३२१.०२०।।	अष्ट दिशा देवा वरूता आणि खालुता । तुजविण सर्वथा ठाव नाहीं

८८०४	।।ना.गा.१३२१.०२१।।	तंव नामदेव निजला देखिला । अंतरीं उठिला विठ्ठल ध्वनी
८८०५	।।ना.गा.१३२१.०२२।।	राजाई म्हणे प्रयत्न न चले तेथें आतां। प्रार्थू पंढरिनाथा बहुतांपरी
८८०६	।।ना.गा.१३२१.०२३।।	राजाईनें धरिले विठोबाचे पाय । कृपादृष्टिं पाहे आम्हांकडे
८८०७	।।ना.गा.१३२२.००१।।	नामदेवा घरीं पाहुणें मेहुणें । आले दोघेजण पंढरिसी
८८०८	।।ना.गा.१३२२.००२।।	राजाईनें बंधु देखुनि दृष्टिसी । उल्हास मानसीं थोर जाला
८८०९	।।ना.गा.१३२२.००३।।	कडकडूनि भेटि लोभाची आवडी । टाकली घोंगडी बैसावया
८८१०	।।ना.गा.१३२२.००४।।	भ्रतार लागले विठोबाचे ध्यानीं । संसाराची मनीं आस्था नाहीं
८८११	।।ना.गा.१३२२.००५।।	नाचतो निर्लज्ज होऊनि नि:शंक । सांडिला लौकिक देहभाव
८८१२	।।ना.गा.१३२२.००६।।	ऐसें जंव सांगे राजाई बंधुसी । तंव आले घरासी नामदेव
८८१३	।।ना.गा.१३२२.००७।।	तयासी सोयरे अभ्युत्थान देती । न भेटे तयासी विष्णुदास
८८१४	।।ना.गा.१३२२.००८।।	देखुनि कांतेसी क्रोध आला फार । असोनि संसार नाहीं आम्हां
८८१५	।।ना.गा.१३२२.००९।।	अगडधूत येती घेऊनि टाळविणा । लागे त्यांचे चरणा वेळोवेळां
८८१६	।।ना.गा.१३२२.०१०।।	जन्मामध्यें आले माझे सहोदर । न बोले उत्तर त्यांसी कांहीं
८८१७	।।ना.गा.१३२२.०११।।	भोंदु घरीं येती हरिनामें गर्जती । धुवुनि त्यांचें पिती पायवणी
८८१८	।।ना.गा.१३२२.०१२।।	माझे सखे बंधु घरा आले बाई । रामराम तोहि न घे त्यांचा
८८१९	।।ना.गा.१३२२.०१३।।	नामा म्हणे कांते राम ह्रदयांत । सांठवुनी तृप्त जालों आम्ही
८८२०	।।ना.गा.१३२३.००१।।	राजाई तें पुसे अहो नामयाला । करा जेवायला कांही यासी
८८२१	।।ना.गा.१३२३.००२।।	प्रात:काळीं घरीं सारूनि भोजन । आले ते चालून माझे भेटी
८८२२	।।ना.गा.१३२३.००३।।	नामा म्हणे कांते दशमी एक भुक्ति । भोजन निश्चिती करूं नये
८८२३	।।ना.गा.१३२३.००४।।	उदईक हरिदिनीं उपवास जागरण । ऐकावें कीर्तन चार प्रहर
८८२४	।।ना.गा.१३२३.००५।।	द्वादशीं पारणें जालिया भोजन । ऐकोनी पाहुणे चिंतातुर
८८२५	।।ना.गा.१३२३.००६।।	क्षुधातुर पोटीं निद्रा नलगे कांहीं । वर्षाएवढी पाही रात्र जाली
८८२६	।।ना.गा.१३२४.००१।।	ऐसी चिंताक्रांत मनीं दु:ख धरिलें । म्हणे कां बापें दिधलें ऐशियासी
८८२७	।।ना.गा.१३२४.००२।।	खाया ना जेवाया लेया ना नेसाया । दैन्य भोगावया आलें जन्मा
८८२८	।।ना.गा.१३२४.००३।।	जयाचि करीं भक्ति त्याचेंचि करणें । घरोघरीं हिंडणें न चुके माझें
८८२९	।।ना.गा.१३२४.००४।।	लाज सांडुनियां निलाजरा जाला । सूड पडसूड मारिला जोग ज्यानें

८८३०	।।ना.गा.१३२४.००५।।	देवासुरीं वाहिली तेचि दैना आली । उचितें राहिलीं तैंहूनि
८८३१	।।ना.गा.१३२४.००६।।	ऐसी भक्तकांता मनीं वाहे चिंता । काय जाला करितां पंढरिराव
८८३२	।।ना.गा.१३२४.००७।।	वेष वाणियाचा सवें बैल द्रुयाचा । म्हणे नामा आमुचा केऊतां गेला
८८३३	।।ना.गा.१३२४.००८।।	बिदीं उभा राहिला घर पुसों लागला। म्हणे नामा राहिला कोणें ठायीं
८८३४	।।ना.गा.१३२४.००९।।	सांगितलें बिराड तुळसीवन अपार । तेंचि जाणा घर नामयाचें
८८३५	।।ना.गा.१३२४.०१०।।	बाहेर तरी कोणी बैसलासे द्वारीं । बोलविली नारी नामयाची
८८३६	।।ना.गा.१३२४.०११।।	अहो घ्याहो बाई हे ठेवावी गोणी । नामा येतो परतोनी येईन मी
८८३७	।।ना.गा.१३२४.०१२।।	येरी म्हणे तुम्ही त्याचें काय जाणा । आपुली नाम खुणा सांगा तुम्ही
८८३८	।।ना.गा.१३२४.०१३।।	नाम पुसेल तरी केशवशेटी सांगावें । लागेल तितुकें वेंचावें हें द्रव्य
८८३९	।।ना.गा.१३२४.०१४।।	आणिक मज मागावें कांहीं न ठेवावें । माझें क्षेम सांगावें सखा म्हणोनि
८८४०	।।ना.गा.१३२४.०१५।।	इतुकें बोलुनि देव पाठमोरां जाला । सवेंचि घरा आला विष्णुदास
८८४१	।।ना.गा.१३२४.०१६।।	म्हणें कैची गोणी टाकुन गेला वाणी । परि आम्हीं कोणी ओळखूं ना
८८४२	।।ना.गा.१३२४.०१७।।	त्यानें नांव केशवशेटी म्हणितलें । तंव येरें जाणिलें माझा देव
८८४३	।।ना.गा.१३२४.०१८।।	कां गे धांवा केला देव माझा कष्टला । अपराध जाला तुजपाशीं
८८४४	।।ना.गा.१३२४.०१९।।	राजाई म्हणे आम्हां थोर लाभ जाला । बिडवई भेटला केशवशेटी
८८४५	।।ना.गा.१३२५.००१।।	वराईची गोणी कळली राजाईसी । नामा ब्राह्मणांसी बोलाविती
८८४६	।।ना.गा.१३२५.००२।।	इतक्यामध्यें होन मडकेंभर काढिले । गोणी ते शिविली होती तैसी
८८४७	।।ना.गा.१३२५.००३।।	द्विज मेळवुनि आला नामदेव । वांटियेलें सर्व द्रव्य त्यानें
८८४८	।।ना.गा.१३२५.००४।।	नामा म्हणे द्रव्य ज्यांचे त्या दिधलें । ऋण तें ठेविलें नाहीं कांहीं
८८४९	।।ना.गा.१३२५.००५।।	राजाई ते होन राखावया गेली । हातां राख आली कोळशांची
८८५०	।।ना.गा.१३२५.००६।।	कोळसे देखोनि खोंचियली मनीं । धन्य तुझी करणी पांडुरंगा
८८५१	।।ना.गा.१३२५.००७।।	नामदेवापुढें सांगे वर्तमान । चोरून म्यां होन ठेविलें होते
८८५२	।।ना.गा.१३२५.००८।।	पाहातां होनांचे जाले हो कोळसे । नामा पाहतां ते जाले सोनें
८८५३	।।ना.गा.१३२५.००९।।	वांटिले ब्राह्मणां ते होन तयानें । फेडियेलें ऋण गोविंदाचें
८८५४	।।ना.गा.१३२६.००१।।	नामा म्हणे स्त्रिये अनुचित केलें । कां माझ्या शिणविलें विठोबाशी
८८५५	।।ना.गा.१३२६.००२।।	निंदेच्या उत्तरीं निषेधिलें मज । वाटली त्या लाज मायबापा

८८५६	।।ना.गा.१३२६.००३।।	मग तो माझा स्वामी जाला वेषधारी । तुजलागीं सुंदरी पुढारला
८८५७	।।ना.गा.१३२६.००४।।	रत्नजडित मुगुट सत्वर फेडोनि । आलासे वेढोनी शुभ्र शेला
८८५८	।।ना.गा.१३२६.००५।।	तेणें भारें त्याचा धगधगिला मस्तक । म्हणोनि मज शोक वाटतसे
८८५९	।।ना.गा.१३२६.००६।।	कस्तुरी मळवट सुरेख पुसोनि । आलासे लावूनि विभुति भाळीं
८८६०	।।ना.गा.१३२६.००७।।	रूद्राक्षाचे मणि लेऊनि कर्णपुटीं । कुंडलें गोमटीं लपविलीं
८८६१	।।ना.गा.१३२६.००८।।	कौस्तुभ वैजयंती काढिली परती । बांधलेंसे प्रीति शिवलिंग
८८६२	।।ना.गा.१३२६.००९।।	देखूनि रखुमाईस वाटलें उदास । हसती उपहास केले त्याचे
८८६३	।।ना.गा.१३२६.०१०।।	रमा शरणागतें आलिंगिलीं बाहीं । कैसी गोणी तिहीं कवळिली
८८६४	।।ना.गा.१३२६.०११।।	सर्वांगीं साजिरी चंदनाची उटी । भ्रंशली गोमटी श्रमु जाला
८८६५	।।ना.गा.१३२६.०१२।।	सोनसळापटा फेडोनि गोमटा । नेसला धुवटा बोटधारी
८८६६	।।ना.गा.१३२६.०१३।।	इंद्रनीळ तनु रूळली असेल रजें । श्रीमुख रवितेजें कोमाइलें
८८६७	।।ना.गा.१३२६.०१४।।	धन्य तुझे नयन देखिले श्रीचरण । परी जीवें निंबलोण नाहीं केलें
८८६८	।।ना.गा.१३२६.०१५।।	द्रव्याचेनि लोभें भ्रांत जालें मन । हातीचें निधान हारपलें
८८६९	।।ना.गा.१३२६.०१६।।	आतां आदिअंतीं पाहतां केवळ । मूळ आणि फळ दु:खरूप
८८७०	।।ना.गा.१३२६.०१७।।	जाणोनि निवृत्ति धरिली सज्जनीं । सांडिलें निर्वाणीं वमन जैसें
८८७१	।।ना.गा.१३२६.०१८।।	जाणसी तें करीं आपुलें तूं हित । म्यां ठेविलें चित्त त्याचे पायीं
८८७२	।।ना.गा.१३२६.०१९।।	नामा म्हणे केशव न पाहे निर्वाण । माझा अभिमान आहे त्यासी
८८७३	।।ना.गा.१३२७.००१।।	दोन्ही जोडुनी कर माथा ठेवी चरणीं । म्हणे परिसा विनवणी स्वामी माझी
८८७४	।।ना.गा.१३२७.००२।।	मी तंव अज्ञान न कळे तुमचा महिमा । अपराध क्षमा करा माझा
८८७५	।।ना.गा.१३२७.००३।।	अंतरींची खूण कांहीं सांगा मज । जें तुम्ही हृदयीं बीज धरूनि असां
८८७६	।।ना.गा.१३२७.००४।।	जेणें सुखें तुमचें चित्त निरंतर । आनंदें निर्भर सदा असां
८८७७	।।ना.गा.१३२७.००५।।	इच्छा तृष्णा देहीं मालवली कल्पना । सदा समाधाना इंद्रियासी
८८७८	।।ना.गा.१३२७.००६।।	मायबापें मज दिधलें तुमच्या हातीं । जन्मोनि सांगाति लावियेलें
८८७९	।।ना.गा.१३२७.००७।।	देव द्विज गुरु साक्ष हे करुनी । स्वामीचे चरणी जोडियेलें
८८८०	।।ना.गा.१३२७.००८।।	तुमची चित्तवृत्ति उदास देखोनी । पडिलें चिंतावनी काय करूं
८८८१	।।ना.गा.१३२७.००९।।	मग तुमचा स्वामी कृपेचा कोंवळा । न धरत पातला अनाथबंधु

८८८२	।।ना.गा.१३२७.०१०।।	मग त्या विश्वंभरें कृपेच्या सागरें । पुसिली आदरें तुमची गोष्टी
८८८३	।।ना.गा.१३२७.०११।।	तंव मी दुराचारें निर्भर्त्सिलें तुम्हां । ऐकोनि मेघ:शामा करुणा आली
८८८४	।।ना.गा.१३२७.०१२।।	तंव तो जगज्जीवन बोले अमृतवाणी । लोटोनियां गोणी दारवंटा
८८८५	।।ना.गा.१३२७.०१३।।	म्हणोनि हें द्रव्य तुम्ही सर्वही वेंचावें । आणिक मागावें लागेल तें
८८८६	।।ना.गा.१३२७.०१४।।	सद्गदित कंठे सांगितलें तुम्हां । परि न कळे मज महिमा दैवहीना
८८८७	।।ना.गा.१३२७.०१५।।	लोभाचा वोरसु कोणिये जन्मींचा । नकळे तुमचा ऋणानुबंधु
८८८८	।।ना.गा.१३२७.०१६।।	पाहतां श्रीमुख निवालें माझें चित्त । मग हे मनोरथ विसरले
८८८९	।।ना.गा.१३२७.०१७।।	क्षण एक आनंद जाला माझें जिवीं । उपमा कवणे द्यावी तया सुखा
८८९०	।।ना.गा.१३२७.०१८।।	आतां ये संसारीं मीच धन्य जगीं । जें तुम्हां अर्धांगीं विनटले
८८९१	।।ना.गा.१३२७.०१९।।	परि मला एकवेळ घाला विठोबाचे पायीं । विनविते राजाई नामदेवा
८८९२	।।ना.गा.१३२८.००१।।	युक्तायुक्त ज्ञान वैराग्यसाधन । महातपोधन वरद योग्य
८८९३	।।ना.गा.१३२८.००२।।	आनंदाचा ओघ भक्तीचा सोहळा । हरि वेळोवेळां जपत वाचे
८८९४	।।ना.गा.१३२८.००३।।	नित्य हें पूजन करी नामदेव । विठ्ठलीं हा भाव ठेवूनियां
८८९५	।।ना.गा.१३२८.००४।।	नामयाची कांता क्रोधयुक्त बोले । भजन सोहळे तुम्हां गोड
८८९६	।।ना.गा.१३२८.००५।।	परी हा नावडे संसाराचा संग । अखंड पांडुरंग चिंतितसां
८८९७	।।ना.गा.१३२८.००६।।	तुमची हे गति लेकुरें नेणती । धान्य नाहीं नित्य भक्षावया
८८९८	।।ना.गा.१३२८.००७।।	ऐसा हा वेव्हार तुमचा जी स्वामी । आतां पुसेन मी पांडुरंगा
८८९९	।।ना.गा.१३२८.००८।।	माझिया संसारा घातलेंसे पाणी । नाचतो रंगणीं विठ्ठलाच्या
८९००	।।ना.गा.१३२८.००९।।	ऐसें देवा तुझे अघटित मत। म्हणोनि रडत देवापुढें
८९०१	।।ना.गा.१३२८.०१०।।	देव म्हणे नाम्या अंगिकार इचा । करूनि देवाचा होई सुखी
८९०२	।।ना.गा.१३२८.०११।।	नामा म्हणे देवा ऐका जी वचन । उबग कोण्या गुणें आला असें
८९०३	।।ना.गा.१३२८.०१२।।	राहो हे पंढरी सुखें नांदो देवा । मज नाहीं हेवा उणें कांही
८९०४	।।ना.गा.१३२८.०१३।।	तुझिया कृपेचा अंकित मी होये । तुजविण आहे मज कोण
८९०५	।।ना.गा.१३२८.०१४।।	माझिया संसारा पाडियेलें पाणी । काय आहे वाणी गति कोण
८९०६	।।ना.गा.१३२८.०१५।।	ऐसें असुनियां उबग केशवा । माझ्या आला दैवा कोण्या गुणें
८९०७	।।ना.गा.१३२८.०१६।।	जन्मापासोनियां सेवेसी लाविलें । नि:संतान केलें पांडुरंगा

८९०८	।।ना.गा.१३२८.०१७।।	आतां मजलागीं लावियतां उद्वेगा । अगा पांडुरंगा मायबापा
८९०९	।।ना.गा.१३२८.०१८।।	आतां मज म्हणसी संसार करावा । काय मी केशवा करूं आतां
८९१०	।।ना.गा.१३२८.०१९।।	देवा ऐसी युक्ति उगा राहे आतां । समर्था केशिनाथा देवराया
८९११	।।ना.गा.१३२८.०२०।।	मागुनि अंतरीं विचार पैं केला । चित्तीं पैं सांचला क्रोध फार
८९१२	।।ना.गा.१३२८.०२१।।	म्हणोनियां आतां विठो सुखें राहें । मुख तुज पाहे दाखविना
८९१३	।।ना.गा.१३२८.०२२।।	देवाचे चरण पहावयासाठीं। संसाराची तुटी करावया
८९१४	।।ना.गा.१३२८.०२३।।	ऐसें मी करीन जाण विठ्ठोराया । पंढरिचे ठाया मोडवीन
८९१५	।।ना.गा.१३२८.०२४।।	राहें नामीं आतां जाईन दूर देशा । भक्तीची हे आशा सोडोनियां
८९१६	।।ना.गा.१३२८.०२५।।	जाईल भिंवरा जाईल पुंडलिक । जाईल सकळिक महिमा तुझी
८९१७	।।ना.गा.१३२८.०२६।।	ऐसें बा विठ्ठला त्वां दुखविलें मज । सोडिना सहज पंढरितें
८९१८	।।ना.गा.१३२८.०२७।।	उदास हें चित्त माझें जालें देवा । जाईन केशवा मायबापा
८९१९	।।ना.गा.१३२८.०२८।।	आतां असों द्यावा लोभ हाचि देवा । समर्था केशवा मायबापा
८९२०	।।ना.गा.१३२८.०२९।।	आपुल्या सांगातें नेईन पंढरी । नेईन संत नगरीं भीवरा जन
८९२१	।।ना.गा.१३२८.०३०।।	नेईन सांगातें महिमा येथेंची । मागें हेत हाचि धरूनि राहे
८९२२	।।ना.गा.१३२८.०३१।।	चक्रतीर्थ आणि पद्माळे हें जाण । सर्वही करीन आपणासी
८९२३	।।ना.गा.१३२८.०३२।।	आपणचि तीर्थ आपणचि व्रत । आपण दीनानाथ होईन मी
८९२४	।।ना.गा.१३२८.०३३।।	येथें हे पंढरी होती ऐसें लोक । म्हणतील देख पुढें देवा
८९२५	।।ना.गा.१३२८.०३४।।	बोलोनियां ऐसें पुढें चाले नामा । मग आला प्रेमा पांडुरंगा
८९२६	।।ना.गा.१३२८.०३५।।	पळतां पळतां नाटोपे जाणा । मागें देवराणा धांवतसे
८९२७	।।ना.गा.१३२८.०३६।।	धांवता धांवता भागला केशव । उभा राहे तंव हात कटीं
८९२८	।।ना.गा.१३२८.०३७।।	जें कां पंढरपूर वस्तीचें असणें । धरियेलें तेणें ठाणें पांडुरंगें
८९२९	।।ना.गा.१३२८.०३८।।	तंव तो पळत लोळणीं घातली । त्या क्षणीं न बोले देवाशीं जो
८९३०	।।ना.गा.१३२८.०३९।।	देव म्हणे नाम्या पाहे परतोन । तुज मी शरण आलों असे
८९३१	।।ना.गा.१३२८.०४०।।	न करी उदास चाल तूं पंढरीसी । ऐसें बोले हरि नामयासी
८९३२	।।ना.गा.१३२८.०४१।।	तंव नामा म्हणे ऐसें मी करीन । पंढरी नेई भिवरें सहित
८९३३	।।ना.गा.१३२८.०४२।।	मोडीन महिमा तीर्थींचा केशवा । कळे तुज तेव्हां भक्त ऐसा

८९३४	।।ना.गा.१३२८.०४३।।	मग म्हणे विठ्ठल पुंडलिकासाठीं । चाल उठाउठीं पंढरिसी
८९३५	।।ना.गा.१३२८.०४४।।	पितृभक्त पाहीं तोचि पुंडलिक। ऐसा भाव देख जाणिवेचा
८९३६	।।ना.गा.१३२८.०४५।।	मग धरूनि मनगटीं चालविला नामा । मोठा आला प्रेमा विठोबासी
८९३७	।।ना.गा.१३२८.०४६।।	ऐसें हें आख्यान सारुनियां देवें । मग आले भावें पंढरिसी
८९३८	।।ना.गा.१३२९.००१।।	उठले निवृत्ति संतांच्या दरुशना । पंढरीचा प्रेमा घरा आला
८९३९	।।ना.गा.१३२९.००२।।	केली प्रदक्षिणा वंदिले चरण। जाला अभिमान नामयासी
८९४०	।।ना.गा.१३२९.००३।।	देवाचे जवळी आम्ही निरंतर । यासी अधिकार नमस्कारा
८९४१	।।ना.गा.१३२९.००४।।	नित्य समागम हरिच्या चरणीं । हे आणि आम्हीं देवभक्त
८९४२	।।ना.गा.१३२९.००५।।	नामा म्हणे कांये वंदू यांचे चरण । अंगें परब्रह्म मजपाशीं
८९४३	।।ना.गा.१३३०.००१।।	उठले ज्ञानेश्वर केलें तें वंदन । मस्तकीं चरण नमस्कारिले
८९४४	।।ना.गा.१३३०.००२।।	नामा म्हणे आम्हां वडिल अधिकारू । यासाठीं नमस्कारूं योग्य आहे
८९४५	।।ना.गा.१३३०.००३।।	आम्ही देवापाशीं असतों सर्वकाळ । येऊनी सकळ वंदिताती
८९४६	।।ना.गा.१३३०.००४।।	वैष्णवांचे भार देव सुरगण । येताती शरण पंढरिसी
८९४७	।।ना.गा.१३३०.००५।।	नामा म्हणे आतां पाहिली मंडळी । यासाठीं वनमाळी स्फुंदूं लागे
८९४८	।।ना.गा.१३३१.००१।।	आले ते सोपान वंदिले या पायीं । पांडुरंगा ठायीं मानियेला
८९४९	।।ना.गा.१३३१.००२।।	रंजल्यागांजल्याचा घेतला समाचार । संतमाया थोर अनाथांची
८९५०	।।ना.गा.१३३१.००३।।	आमुचे मायबाप भेटलेति आज । समाधान सहज आलिंगितां
८९५१	।।ना.गा.१३३१.००४।।	नामा म्हणे मज कळलें याचें प्रेम। देव केले श्रम काय गुणें
८९५२	।।ना.गा.१३३२.००१।।	अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार नाहीं गेला
८९५३	।।ना.गा.१३३२.००२।।	मान अपमान वाढविसी हेवा। दिवस असतां दिवा हातीं घेसी
८९५४	।।ना.गा.१३३२.००३।।	परब्रह्मासंगें नित्य तुझा खेळ । आंधळे पां डोळे कां बा जाले
८९५५	।।ना.गा.१३३२.००४।।	कल्पतरूतळवटीं इच्छिली ते गोष्टी। अद्यापि नरोटी राहिली कां
८९५६	।।ना.गा.१३३२.००५।।	घरीं कामधेनु ताक मागूं जाय । ऐसा द्वाड आहे जगामाजीं
८९५७	।।ना.गा.१३३२.००६।।	म्हणे मुक्ताबाई जाई दरुषणा । आधीं अभिमाना दूर करा
८९५८	।।ना.गा.१३३३.००१।।	जालासी हरिभक्त तरी आम्हां काय । आंतली ती सोय न ठाऊकी
८९५९	।।ना.गा.१३३३.००२।।	घेऊनि टाळ दिंडी हरिकथा करिसी । हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणें

८९६०	।।ना.गा.१३३३.००३।।	गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष । होशिल मुमुक्षु साधक तूं
८९६१	।।ना.गा.१३३३.००४।।	आत्मतत्त्वीं दृष्टी नाहींच पां केली । तंववरी ब्रह्मबोली बोलुनि काई
८९६२	।।ना.गा.१३३३.००५।।	तुझें जरी रूप तुवां नाहीं ओळखिलें । अहंतेतें धरिलें कासयासी
८९६३	।।ना.गा.१३३३.००६।।	आमुचें तूं मूळ जरी पुसतोसी । तुझें तूं अपेशी पाहुनि घेई
८९६४	।।ना.गा.१३३३.००७।।	ऐक रे नामया होई आत्मनिष्ठ । तरीच तूं श्रेष्ठ ज्ञानी म्हणे
८९६५	।।ना.गा.१३३४.००१।।	बोलोनियां येणें वाढविला डांगोरा । अंतरींचा कोरा गुरुविण
८९६६	।।ना.गा.१३३४.००२।।	संतांचा सन्मान कळेना जयासी । राहुनि देवापाशीं काय केलें
८९६७	।।ना.गा.१३३४.००३।।	परिसा झांकण घातलें खापर । नाहीं जालें अंतर बावनकस
८९६८	।।ना.गा.१३३४.००४।।	खदिरांगारीं श्रृंगारी हिलाल । अंतरीचें काळें गेलें नाहीं
८९६९	।।ना.गा.१३३४.००५।।	म्हणे मुक्ताबाई अभिमानें नेलें । सर्पा पाजियेलें विष तेंचि
८९७०	।।ना.गा.१३३५.००१।।	अमृत टाकुन कांजीची आवडी । साजेना झोपडी काय त्याला
८९७१	।।ना.गा.१३३५.००२।।	खरासी अखंड गंगेचें हो स्नान । गेलें वायांविण जिणें त्याचें
८९७२	।।ना.गा.१३३५.००३।।	पोवळ्यापरिस दिसती रानगुंजा । श्रृंगाराच्या काजा न येती त्या
८९७३	।।ना.गा.१३३५.००४।।	आनारा परिस चोखट इंद्रावन । चवी कडुपण हीन त्याचें
८९७४	।।ना.गा.१३३५.००५।।	रंगाची बाहुली दिसती साजिरी । बेगडाचे परी नग ल्याली
८९७५	।।ना.गा.१३३५.००६।।	म्हणे मुक्ताबाई पुरे तें दर्शन । गुरुविण संतपण आहे कोठें
८९७६	।।ना.गा.१३३६.००१।।	उंसाचे सेजारीं येरंडाचें झाड । नाहीं त्याचा पाड गोडी आली
८९७७	।।ना.गा.१३३६.००२।।	कर्पुरासी जाला दीपाचा शेजार । काय गुणें सार राहील त्याचा
८९७८	।।ना.गा.१३३६.००३।।	सागरीं लवण टाकिलें नेऊन । काय गुण खडेपण उरलें त्याचें
८९७९	।।ना.गा.१३३६.००४।।	तैसा नामदेव विठोबाच्या जागा । काय गुणें या गा कोरेपण
८९८०	।।ना.गा.१३३६.००५।।	म्हणे मुक्ताबाई चंदनाचें झाड । अहंतासर्प वेढे गुंडाळिले
८९८१	।।ना.गा.१३३७.००१।।	संत पाहुणेरा सज्जनाचे घरीं । पूजा करितां वरी डोईं काढी
८९८२	।।ना.गा.१३३७.००२।।	करितां सन्मान अंगीं भरे ताठा। देवा पैं करंटा असुनी काय
८९८३	।।ना.गा.१३३७.००३।।	अहंता हा खुंट वाढविला चित्तीं । न साहे संगती सज्जनाची
८९८४	।।ना.गा.१३३७.००४।।	पंढरीचें भूषण सांगतो जनांसी । नाहीं या मनासी तीळ बोध
८९८५	।।ना.गा.१३३७.००५।।	म्हणे मुक्ताबाई चांगदेवा वाणी । भजावा सज्जनीं नामदेव

८९८६	।।ना.गा.१३३८.००१।।	चौदाशें वरुषें शरीर केलें जतन । बोधाविण शिण वाढविला
८९८७	।।ना.गा.१३३८.००२।।	नाहीं गुरुमंत्र नाहीं उपदेश । परमार्थासि दोष लावियेला
८९८८	।।ना.गा.१३३८.००३।।	स्वहिताचें कारण पडियेलें जेव्हां । शरण आला तेव्हां आळंकापुरीं
८९८९	।।ना.गा.१३३८.००४।।	गैनीनाथें गुज दिलें निवृत्तीला । निवृत्तीचा जाला ज्ञानदेव
८९९०	।।ना.गा.१३३८.००५।।	ज्ञानदेवें बीज वाढविलें जनीं । तेंचि आम्हीं तुम्हीं संपादिलें
८९९१	।।ना.गा.१३३८.००६।।	म्हणे मुक्ताबाई तिहीं लोकीं ठसा । नामदेव ऐसा राहिला कां
८९९२	।।ना.गा.१३३९.००१।।	निवृत्तिदेव म्हणे ऐसें म्हणों नये । धन्य भाग्यें पाहे संत आले
८९९३	।।ना.गा.१३३९.००२।।	आपुलें स्वहित करावें आपण। संतांच्या सन्माना चुकों नये
८९९४	।।ना.गा.१३३९.००३।।	धन्य हो ते नर राहती पंढरीं । श्वान त्यांचे घरीं सुखें व्हावें
८९९५	।।ना.गा.१३३९.००४।।	नामदेवा संगें देवाचा हो वोढा । प्रेमें केला वेडा पांडुरंग
८९९६	।।ना.गा.१३३९.००५।।	निवृत्ति म्हणे त्यांसी न म्हणे आरे तुरे । बाई ठेवितां बरें डोई माते
८९९७	।।ना.गा.१३३९.००६।।	म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण । आपणां दर्शन नलगे त्यांचें
८९९८	।।ना.गा.१३४०.००१।।	कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती । काय आहे संगतीं पाणियाची
८९९९	।।ना.गा.१३४०.००२।।	मेणाची पुतळी घेतां करीं बरी । अग्निचे शेजारीं राहे कैशी
९०००	।।ना.गा.१३४०.००३।।	तैसा अधिरासी काय संतसंग । मृगजळा तरंग येतील कैसे
९००१	।।ना.गा.१३४०.००४।।	तें आजि नवल देखियेलें डोळां । दगड जैसा जळां वेगळेपण
९००२	।।ना.गा.१३४०.००५।।	म्हणे मुक्ताबाई जाऊं देऊं नये । ऐसें सरिसें काय भांडें करा
९००३	।।ना.गा.१३४१.००१।।	कुलाल आपल्या घरीं भाजवी भाचरी । म्हणे जैं होईल हरि कृपावंत
९००४	।।ना.गा.१३४१.००२।।	हरीसी वरदळ लावितो निशिदिनीं । धाडिला म्हणोनि तुम्हांपाशीं
९००५	।।ना.गा.१३४१.००३।।	तुम्ही संतजन उद्धराल तत्काळ । नामा लडिवाळ विठोबाचा
९००६	।।ना.गा.१३४१.००४।।	राखावें तें ब्रीद करावें पावन । धाडा बोलावणें गोरोबाला
९००७	।।ना.गा.१३४१.००५।।	म्हणे मुक्ताबाई भाजलें कीं कोरें । काकांचें उत्तर सत्य मानूं
९००८	।।ना.गा.१३४२.००१।।	गोरा जुनाट पैं जुनें । हातीं थापटणें अनुभवाचें
९००९	।।ना.गा.१३४२.००२।।	परब्रह्म म्हातारा निवाला अंतरीं । वैराग्याचे वरी पाल्हाळला
९०१०	।।ना.गा.१३४२.००३।।	सोहं शब्द विरक्ति डवरली अंतरीं । पाहतां अंबरीं अनुभव
९०११	।।ना.गा.१३४२.००४।।	म्हणे मुक्ताबाई घालूं द्या लोटांगण । जाऊं द्या शरण अव्यक्तासी

९०१२	।।ना.गा.१३४३.००१।।	मोतियांचा चुरा फेंकिला अंबरीं । विजुचिया परी कीळ जालें
९०१३	।।ना.गा.१३४३.००२।।	जरी पितांबरें नेसविलीं नभा । चैतन्याचा गाभा नीळबिंदू
९०१४	।।ना.गा.१३४३.००३।।	तळीपरि पसरली शून्याकार जाली । सर्पाचिये पिली नाचूं लागे
९०१५	।।ना.गा.१३४३.००४।।	कडकडोनि वीज निमाली ठायिंचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला
९०१६	।।ना.गा.१३४३.००५।।	ज्ञानदेव म्हणे कैसी जाली भेट । ओळखिलें अविट आपुलेंपण
९०१७	।।ना.गा.१३४४.००१।।	निवृत्तिदेव म्हणे चला गुंफेमधीं । अचळ हे आदि समाधी असे
९०१८	।।ना.गा.१३४४.००२।।	सद्गुरुप्रसादें बोधिली नेटकी । गुहे गौप्य ताटीं आड केलीं
९०१९	।।ना.गा.१३४४.००३।।	दंड चक्राकार बांधिली चौकुन । आंत संतजन करिती वास
९०२०	।।ना.गा.१३४४.००४।।	ऐसे गुंफेमध्यें नाहीं नामदेव । म्हणुनि माझा जीव थोडा होतो
९०२१	।।ना.गा.१३४४.००५।।	गैनीची मिरास घेतला प्रमाण । पूर्वभूमि जतन करित आस
९०२२	।।ना.गा.१३४४.००६।।	निवृत्तिदेव म्हणे मुक्ताईच्या उत्तरें । भाजलें कीं कोरें कळों येईल
९०२३	।।ना.गा.१३४५.००१।।	परस्परें गुह्य करिती भाषण । म्हणती महाधन गांवा आला
९०२४	।।ना.गा.१३४५.००२।।	रक्त श्वेत पीत नीळ वर्णाकार। नक्षत्रांची वर पूजा केली
९०२५	।।ना.गा.१३४५.००३।।	प्रकाशमय तत्त्व ज्योतिर्मय पहाणें । दीप त्रिभुवनीं एक जाला
९०२६	।।ना.गा.१३४५.००४।।	निवृत्तिदेव म्हणे कुलालाचें चक्र । अंतर बाहेर एक ऐसें जालें
९०२७	।।ना.गा.१३४६.००१।।	हांसोनि सोपानें खुणाविल्या खुणा । नामदेव पाहुणा आला असे
९०२८	।।ना.गा.१३४६.००२।।	तयासी हो पाक पाहिजे पवित्र । भाजलें कीं कोरें कळों नेदी
९०२९	।।ना.गा.१३४६.००३।।	मुक्तिकेचे पारखी तुम्ही आहां देवा । भाजुनि जीवा शिवा ब्रह्म करा
९०३०	।।ना.गा.१३४६.००४।।	आनंदें डुल्लती करावरी कर । नेणों राहिलें कोरें कोण्या गुणें
९०३१	।।ना.गा.१३४६.००५।।	निर्गुणापासोनि सगुणाची संगती । नाहीं स्वरूपस्थिति अंगा आली
९०३२	।।ना.गा.१३४६.००६।।	म्हणे मुक्ताबाई हेरोनियां हेरा । हिरा किंवा गारा नेणों बापा
९०३३	।।ना.गा.१३४७.००१।।	जोहारियाचे पुढें मांडियेलें रत्न । आतां मोला उणें येईल कैसें
९०३४	।।ना.गा.१३४७.००२।।	तैसें थापटणें पारखियाचा हात । वाफ जाल्या घात वायां जाती
९०३५	।।ना.गा.१३४७.००३।।	प्रथम थापटणें निवृत्तीच्या माथा । डेरा जाला निका परब्रह्म
९०३६	।।ना.गा.१३४७.००४।।	तेंचि थापटणें ज्ञानेश्वरावर । आतां कैंचें कोरें उरे येथें
९०३७	।।ना.गा.१३४७.००५।।	तेंचि थापटणें सोपानाचे डोईं । यांत लेश नाहीं कोरें कोठें

९०३८	।।ना.गा.१३४७.००६।।	तेंचि थापटणें मुक्ताबाईला हाणी । अमृत संजिवनी उतुं आली
९०३९	।।ना.गा.१३४७.००७।।	तेंचि थापटणें नामदेवावर । डोई चोळूं मोहरे रडों लागे
९०४०	।।ना.गा.१३४७.००८।।	गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई । सुन्नेभरि नाहीं भाजियेला
९०४१	।।ना.गा.१३४८.००१।।	संतसमागम फळला रे मला । सन्मानाचा जाला लाभ मोठा
९०४२	।।ना.गा.१३४८.००२।।	अतीथी आदर केला मुक्ताबाई । लांकडानें डोई फोडिली माझी
९०४३	।।ना.गा.१३४८.००३।।	देवानें गोंधळ घातला गरुडपारीं । भिजली पितांबरी अश्रुपातीं
९०४४	।।ना.गा.१३४८.००४।।	माझें माझें म्हणोनि गाईलें गाऱ्हाणें । कळलें संतपण हेंचि तुमचें
९०४५	।।ना.गा.१३४८.००५।।	भरी भरोनियां आलों तुम्हां जवळी । कैकाड मंडळी ठावी नोव्हे
९०४६	।।ना.गा.१३४८.००६।।	नामा म्हणे सन्मान पावलों भरून । करितां गमन बरें दिसे
९०४७	।।ना.गा.१३४९.००१।।	उद्विग्न मनीं करी दीर्घ ध्वनी । नाहीं माझें कोणी सखे ऐसें
९०४८	।।ना.गा.१३४९.००२।।	वैराग्य कसवटी सोसवेना घाये । पळावया पाये मार्ग काढी
९०४९	।।ना.गा.१३४९.००३।।	जाले चाळाचूळ मनांत चंचळ । युगा ऐसें पळ वाटतसे
९०५०	।।ना.गा.१३४९.००४।।	नामा म्हणे जावें पळोनियां आतां । संतसंग होतां भाजतील
९०५१	।।ना.गा.१३४९.००५।।	म्हणे मुक्ताबाई चैतन्याचा केर । ब्रह्म अग्नीवर चेतवावा
९०५२	।।ना.गा.१३५०.००१।।	अंतर बाहेर भाजूं आम्ही कुंभ । भरूं निरालंब सगळेची
९०५३	।।ना.गा.१३५०.००२।।	अहं सोहं उर्ध्व लाउनी फुंकणी । नेत्रद्वारें फुंकुनी जाळ करूं
९०५४	।।ना.गा.१३५०.००३।।	जीवित्व काढुनि शिव घडूं अंगा । प्रिय पांडुरंगा आवडेल
९०५५	।।ना.गा.१३५०.००४।।	म्हणे मुक्ताबाई पळायाचें पाही । आसन स्थिर नाहीं नामयाचें
९०५६	।।ना.गा.१३५१.००१।।	न पुसतां संता निघाला तेथुनी । पैलपार इंद्रायणी प्राप्त जाला
९०५७	।।ना.गा.१३५१.००२।।	मागें पुढें पाहे पळत तांतडी । आला उठाउठी पंढरिसी
९०५८	।।ना.गा.१३५१.००३।।	कळवळोनि कंठी धरिली विठ्ठल मूर्ती । नको देऊं हातीं निवृत्तीच्या
९०५९	।।ना.गा.१३५१.००४।।	ज्ञानदेव सोपान बोलाविला गोरा । जुनाट म्हातारा जाळूं आला
९०६०	।।ना.गा.१३५१.००५।।	मुक्ताईनें तेथें माजविली कळी । हे संत मंडळी कपटी तुझी
९०६१	।।ना.गा.१३५१.००६।।	नामा म्हणे देवा आणिलें पूर्व दैवें । गेलों असतों जीवें सगळाची
९०६२	।।ना.गा.१३५२.००१।।	पूर्वी तुझी कांहीं केली होती सेवा । उपयोगा देवा आली आजी
९०६३	।।ना.गा.१३५२.००२।।	अनंता जन्मींचें फळलें अनुष्ठान । पाहिले चरण विठो तुझे

९०६४	।।ना.गा.१३५२.००३।।	न जाणों माझ्या येतील पाठोपाठीं । घालतील मोठी भीड तुज
९०६५	।।ना.गा.१३५२.००४।।	त्यासी द्याल तुम्ही अगत्य उदारा । मातें कां न मारा आपुले हातें
९०६६	।।ना.गा.१३५२.००५।।	नामा म्हणे तुझे न सोडी चरण । युगायुगीं धरणें घेतलें असे
९०६७	।।ना.गा.१३५३.००१।।	हातांत नरोटी जीर्ण वस्त्र भार । म्हणसी सवदागर संत माझे
९०६८	।।ना.गा.१३५३.००२।।	परळ भोपळा गृहामाजी संपत्ति । भूषण कां श्रीपती सांगतसां
९०६९	।।ना.गा.१३५३.००३।।	भणंगाचे घरां नित्यची राजपट । सांगसी अचाट ब्रीद त्यांचें
९०७०	।।ना.गा.१३५३.००४।।	कैकाड्याचे वानी करिती गुडगुड । मजला हें गूढ उमजेना
९०७१	।।ना.गा.१३५३.००५।।	नामा म्हणे गाती प्रकाशाचें गाणें । आम्हां अघोरवाणें दिसतसे
९०७२	।।ना.गा.१३५४.००१।।	म्हणती घेतल्या आम्हीं धनाचिया कोडी । खर्चायला कवडी थार नसे
९०७३	।।ना.गा.१३५४.००२।।	रडती पडती येरांवरी येर । आनंदाला पार नाहीं म्हणती
९०७४	।।ना.गा.१३५४.००३।।	काय गुणें देव रिझाला त्यावरी । नेसाया फटकुरीं जन्म गेला
९०७५	।।ना.गा.१३५४.००४।।	पाहोन दरिद्र जालों कासाविस । केवळ परीस ते पांढरेच
९०७६	।।ना.गा.१३५४.००५।।	लहानशी मुक्ताई जैसी संणकांडी । केले देशोधडीं महान संत
९०७७	।।ना.गा.१३५४.००६।।	सगळेंची काखेसी घेई ब्रह्मांड । नामा म्हणे पाखांड दिसतें मज
९०७८	।।ना.गा.१३५५.००१।।	पांचा सातांचा आहे येक जागा मेळा । देताती कवळा येकयेकां
९०७९	।।ना.गा.१३५५.००२।।	करूं पाहातां मज जिताची विटंबना । म्हणोनी नारायणा पळोनी आलों
९०८०	।।ना.गा.१३५५.००३।।	पाहिला तयाचा मानस आदर । जमा केला केर जाळावया
९०८१	।।ना.गा.१३५५.००४।।	त्यांच्या धाकें मागें आलों रे अनंता । येत तुझ्या चित्ता बरें त्यांचें
९०८२	।।ना.गा.१३५५.००५।।	नामा म्हणे जीवें आलों वांचवोनी । अजुनि तरी चक्रपाणि वांचवी मज
९०८३	।।ना.गा.१३५६.००१।।	आहे त्यांचे मनीं करावें आगमन । घेतील मागुन तुजपाशीं
९०८४	।।ना.गा.१३५६.००२।।	त्यावेळीं तुम्ही व्हाल जी बेभान । द्याल जी काढोन संतापासीं
९०८५	।।ना.गा.१३५६.००३।।	खादल्या जेविल्याचें राखावें स्मरण । तुला माझी आण पांडुरंगा
९०८६	।।ना.गा.१३५६.००४।।	चालविला लळा पुरविली आवड । आतां कां दगड जड जालों
९०८७	।।ना.गा.१३५६.००५।।	कां माझी चिंता सांडिली अनंता । संताहातीं देतां हरुष वाटे
९०८८	।।ना.गा.१३५६.००६।।	नामा म्हणे काय करिसी अमंगळ । अडचणी राउळामाजीं जाली
९०८९	।।ना.गा.१३५७.००१।।	वटारोनि डोळे पाहती आकाश । मज त्याचा भास कळों नेदी

९०९०	।।ना.गा.१३५७.००२।।	भाजा भाजा म्हणोनि उठली एकसरां । मग म्यां बाहेरां गमन केलें
९०९१	।।ना.गा.१३५७.००३।।	आतां यांजवरी घाल त्यांचे हातीं । होऊं पाहाती माती जीवित्वाची
९०९२	।।ना.गा.१३५७.००४।।	अभयाचें दान द्यावें बा श्रीहरी । दुर्बळ बाहेरी घालूं नये
९०९३	।।ना.गा.१३५७.००५।।	समर्था लांच्छन लागतें नांवाचें । न जाणों देवाचें असेल कांहीं
९०९४	।।ना.गा.१३५७.००६।।	नामा म्हणे नांव पतितपावन । तया बोला उणें आणूं नये
९०९५	।।ना.गा.१३५८.००१।।	संतांसी विन्मुख जालासी गव्हारा । नाहीं आतां थारा इहपरलोकीं
९०९६	।।ना.गा.१३५८.००२।।	नाहीं वेड्या संतांचा अंगवळा । झोंप बैसली डोळां अज्ञानाची
९०९७	।।ना.गा.१३५८.००३।।	भ्रांतीनें तुझी पुरविली पाठी । सज्जनाच्या गोष्टी कडू जाल्या
९०९८	।।ना.गा.१३५८.००४।।	हाता आला लाभ गमाविला सारा । भुललासी गव्हारा भ्रमभूली
९०९९	।।ना.गा.१३५८.००५।।	मोह सर्पे तुझें व्यापियेलें अंग । म्हणे पांडुरंग काय आतां
९१००	।।ना.गा.१३५९.००१।।	श्रीविठ्ठलें आपुल्या मुखवचनें । नामदेवासी करी अज्ञापन । होवोनि दीनाचें अति दीन । सद्गुरुसी शरण रिघावें
९१०१	।।ना.गा.१३५९.००२।।	जोडल्या सद्गुरुकृपालेश । मग सर्वत्र माझाचि प्रकाश । तुज मज भेदाचा भास । तो निरसोन जाईल
९१०२	।।ना.गा.१३५९.००३।।	नामा म्हणे तुजसी । पावावया सेविजे सद्गुरुसी । तो तूं रोकडा जोडिलासी । आतां सद्गुरुसी काय काम
९१०३	।।ना.गा.१३५९.००४।।	फळ तरूवर शिखरीं । म्हणोनि आरोहण कीजे त्यावरी । तें फळ अवचिता जोडिलें करीं । मग तयावरी कासया चढावें
९१०४	।।ना.गा.१३५९.००५।।	मग श्रीहरी म्हणे अज्ञान । सांडून सेविजे गुरुचरण । तुझ्या प्रेमें माया सोंग धरून । लटिका तुजपाशीं मी खेळे
९१०५	।।ना.गा.१३५९.००६।।	जंव सद्गुरुचें नाहीं सेवन । तंव मी जैसें स्वप्नींचे धन । माझें न तुटे भवबंधन । सद्गुरुआज्ञेवांचुनी
९१०६	।।ना.गा.१३५९.००७।।	तेणें नामा सद्गदित जाला । विठोबाच्या चरणीं लागला । कोण गुरु पाहिजे केला । तें सांगिजे स्वामिया
९१०७	।।ना.गा.१३५९.००८।।	मग श्रीविठ्ठल म्हणे ऐक आतां । सांगेन सद्गुरुची वार्ता । त्वां पाहोनि तत्त्वतां । शरण तात्काळ रिघावें
९१०८	।।ना.गा.१३५९.००९।।	भक्तीचें नेणें लक्षण । कृपामंद दयाहीन । इतरांचे अवगुण । अखंड मुखीं जल्पती
९१०९	।।ना.गा.१३५९.०१०।।	मी एक जाणता सर्वांठायीं । सर्व शिकविलें म्यांचि पाही । ऐसें बोलती जनप्रवाही । महंतीलागीं
९११०	।।ना.गा.१३५९.०११।।	देखिलिया सज्जन । त्यासी करी सन्मान । सभा देखोनियां छळण । करी करवी तयाचें
९१११	।।ना.गा.१३५९.०१२।।	लांडें लटिकें गद्य पद्य । पुसोनी होती श्लाघ्य । नेणें तरी हांसो निंद्य । बोलती ह्या गुरुसी
९११२	।।ना.गा.१३५९.०१३।।	तो जरी सांगे खरें । त्यासी बोलती बरें बरें । सभाजनांसी नेत्रद्वारें । अशुद्धता दाविती
९११३	।।ना.गा.१३५९.०१४।।	आपण न सांगती आपुलें गुज । पुढल्यासी म्हणती नकळे तुज । ऐसें संदेह करणीचें मौज । वाटे तया
९११४	।।ना.गा.१३५९.०१५।।	शिष्य करितां उल्हासती । शिष्य होई म्हणोनि उपदेशिती । नानापरी बोधिती । सेवेलागीं
९११५	।।ना.गा.१३५९.०१६।।	शिष्य करिती बहुवस । त्यांच्या सेवेची करिती आस । जो न भजे त्यास । शिव्याशाप देताती

९११६	।।ना.गा.१३५९.०१७।।	तंत्र मंत्र उपदेशिती । ध्यान आसनीं गोविती । देवा ब्राह्मणा न भजती । आचारभ्रष्ट जे
९११७	।।ना.गा.१३५९.०१८।।	धातु विद्येची धरिती गोडी । जारणमारणाची अति आवडी । विषयवासनेची हुंडी । अखंड जीवीं
९११८	।।ना.गा.१३५९.०१९।।	ज्ञान गर्वाचा महिमा बरवा । श्रीगुरु ऐशा अखंड भावा । शिष्यसमुदाय देखोनि गर्वा । थोरीवेचा मानिती
९११९	।।ना.गा.१३५९.०२०।।	असो बहु ऐसें कथन । परी सद्गुरु कृपाधन । त्याचें ऐक महिमान । सावध चित्तें
९१२०	।।ना.गा.१३५९.०२१।।	ज्यासी गुरुत्वाचें नाहीं काज । शिष्य भजतां वाटे लाज । उदास वृत्ति सहज । निर्मळ भोळा
९१२१	।।ना.गा.१३५९.०२२।।	निंदा स्तुति समान । बोलती भेदिती कठिण वचन । कधीं न होती क्रोधायमान । कवणाहीवरी
९१२२	।।ना.गा.१३५९.०२३।।	जे नेणती खरें खोटें । समान वाटे सान मोठें । सुखदु:खाचे चपेटे । न शिवती कदाकाळीं
९१२३	।।ना.गा.१३५९.०२४।।	शिष्य करितां आळस चित्तीं । केलिया सर्वस्व निरोपिती । कांहीं थोरीव नाहींच चित्तीं । महत्त्वाची
९१२४	।।ना.गा.१३५९.०२५।।	सज्जन देखोनी आनंदती । त्याचे गुणागुण न विचारिती । जीवें भावें इच्छिती । साधुसंग
९१२५	।।ना.गा.१३५९.०२६।।	आपुला कष्टवुनी देहो । ज्ञान तर्काचा कलहो । साधुसेवेचा मनीं लाहो । करी सदा
९१२६	।।ना.गा.१३५९.०२७।।	जे आंत बाहेरी भरोनी उरले । अंतरीं निवोन विरालें । परब्रह्मीं सहजाविले । नेणों काय
९१२७	।।ना.गा.१३५९.०२८।।	ऐसें साधुचें महिमान । साधतां कैचें उरेल मन । कल्पा अवधीं करितां कथन । नव्हे पूर्ण पूर्णता
९१२८	।।ना.गा.१३५९.०२९।।	ऐसा साधु भेटेल तुज । तरी मीच होवोनि पावसी मज । जाईल सर्व संदेह आज । आपोआप नाम्या
९१२९	।।ना.गा.१३५९.०३०।।	मग नामदेव म्हणे देवा । ऐसा साधु भेटेल जेव्हां । तरी कैशापरी सेवावा । कृपानिधी तो
९१३०	।।ना.गा.१३५९.०३१।।	मग बोलिले श्रीरंग । दैवत बुद्धीचा होईल त्याग । तन मन अर्पोन चांग । शुद्ध सेवा करावी
९१३१	।।ना.गा.१३५९.०३२।।	तर्क वितर्क बाह्यमुद्रा । तेथें न चले गा भक्तनरेंद्रा । तारीं तारीं या भवसमुद्रां । म्हणोनि शरण रिघावें
९१३२	।।ना.गा.१३५९.०३३।।	ते अंतर्बाह्य व्यापक । जाणतां सर्व लीला कवतुक । जैसे त्यासी देखती देख । तैसे तयासी आज्ञापिती
९१३३	।।ना.गा.१३५९.०३४।।	भाग्यें जरी जोडती त्याचे चरण । तरी वर्तणूक आहे कठीण । तें तुज सांगतों गुप्त खूण । सावधान ऐक पां
९१३४	।।ना.गा.१३५९.०३५।।	शरीर वेंचिलें तरी वेंचिजे । परी सद्गुरुवचन नुल्लंघिजे । रात्रंदिवस राहिजे । आज्ञा संकेतीं
९१३५	।।ना.गा.१३५९.०३६।।	ज्यावरी गुरुची प्रीति। त्याची अनन्य भावें कीजे भक्ती । आज्ञेवांचोनि कल्पांतीं । विरोध कोणासी न करावा
९१३६	।।ना.गा.१३५९.०३७।।	का जरी तो सर्वांतरी आहे । विरोध कोणाचा न साहे । विशेष सद्गुरु जरी होये । तरी खेद न कीजे
९१३७	।।ना.गा.१३५९.०३८।।	अरे विरोधभाव असतां । तें चढे सद्गुरुच्या माथा । जैसा घटभंग होतां । अमृत सांडे
९१३८	।।ना.गा.१३५९.०३९।।	ज्याशीं सद्गुरुची कृपा असे । त्यासि मानावें आम्हीं ऐसें । सर्वस्व जातां मानसें । न करिजे अंतर
९१३९	।।ना.गा.१३५९.०४०।।	देखे त्याचे हृदयांतरीं । सद्गुरु वसे निरंतरीं । त्यासि खेद होतां भारी । अंतरे सद्गुरु
९१४०	।।ना.गा.१३५९.०४१।।	क्रोध हृदयीं भरला । तो आत्मस्थितीसी अंतरला । तोच गुरुचा घात केला । शिष्याहातीं
९१४१	।।ना.गा.१३५९.०४२।।	गुरुशिष्य तोचि निजबंधु । त्यासि स्वप्नीं न कीजे विरोधु । करितां घडे गुरुबंधु । शास्त्रवाक्य

९१४२	।।ना.गा.१३५९.०४३।।	तरी गा कार्याकारणें । बोलिजे तेंचि घडावें वर्तणें । एक होतां कोपायमानें । एक समाधान त्यास द्यावें
९१४३	।।ना.गा.१३५९.०४४।।	जो आपुल्या गुरुची स्तुती करी । त्याचे चरण वंदावे शिरीं । निंदा बोलतीये अवसरीं । निघिजे तेथोनी
९१४४	।।ना.गा.१३५९.०४५।।	गुरुसमीप न बैसिजे । गुरुसी वचन न बोलिजे । आज्ञा मागोनी वंदिजे । कार्याकारणें
९१४५	।।ना.गा.१३५९.०४६।।	देशीं आहे सद्गुरु । तिकडे कीजे नमस्कारू । चंद्र कारणें चकोरू । तैसा भेटी इच्छिजे
९१४६	।।ना.गा.१३५९.०४७।।	गुरुसी अर्पिजे तन मन । गुरुसी अर्पिजे वित्त धन । गुरुसी अर्पिजे चैतन्य । आनंदरूप
९१४७	।।ना.गा.१३५९.०४८।।	गुरुचे दोष गुण । मनें न कीजे उच्चारण। जें जें गुरुचें आज्ञापन । मेरू ऐसें मानिजे
९१४८	।।ना.गा.१३५९.०४९।।	सज्जनाची संगती धरिजे । गुरुरूप विश्व मानिजे । चित्तानुसार अर्पिजे । साधुजनांसी
९१४९	।।ना.गा.१३५९.०५०।।	ज्यासि सद्गुरु कोपला । तो साधु असतां खर वागला । ईश्वर जरी साह्य जाला । तरी काढों न शके
९१५०	।।ना.गा.१३५९.०५१।।	सद्गुरु आधीन सकळ देव । गुरु आधीन पितर मानव । सद्गुरु पूजितां सर्व । आनंदातें पावती
९१५१	।।ना.गा.१३५९.०५२।।	ऐसें सद्गुरुचें महिमान । म्हणोनि ब्रह्म त्या आधीन । तो जरी पतितासी देईल मान । तरी ब्रह्मपूर्ण तो होय
९१५२	।।ना.गा.१३५९.०५३।।	ऐसें जेणें आचरावें । तरी सद्गुरुसी शरण जावें । नाहीं तरी करावें । नामस्मरण माझें पैं
९१५३	।।ना.गा.१३५९.०५४।।	तेणेंकरून कांही एक । निवारूं शकेल जन्मदु:ख । कोणें एक जन्मीं सद्गुरु देख । भक्ति करोनि पाविजे
९१५४	।।ना.गा.१३५९.०५५।।	चढाओढी गुरु करिती । मग सुबुद्धिहि टाकिती । त्यासी यमाघरीं प्राप्ति । खरत्वाची
९१५५	।।ना.गा.१३५९.०५६।।	सद्गुरुसेवा तें मोक्षपद । सद्गुरुसेवा तें आनंदपद । सद्गुरुसेवा तो ब्रह्मावबोध । कैवल्यप्राप्ती
९१५६	।।ना.गा.१३५९.०५७।।	असो ऐसिया परी । जो सद्गुरु वाक्य वाहे शिरीं । तोचि ब्रह्मविद्येचा अधिकारी । हरिहरां वंद्य तो
९१५७	।।ना.गा.१३५९.०५८।।	ऐसें नामदेवाप्रति श्रीहरी । स्नेह साक्षेपें निरूपण करी । ऐकोनियां चरणावरी । सद्गदित होउनि लोटला
९१५८	।।ना.गा.१३५९.०५९।।	देवा तूं होवोनि माझी दिवटी । गुरुनिधान दाखवी दृष्टी । जेणें करूनी भवबंध गांठी । सुटेल सर्वथा
९१५९	।।ना.गा.१३५९.०६०।।	मग कळवळोनी श्रीहरी । नामदेवातें पोटासी धरी । जाय पावशील झडकरी । हस्त विसा खेचराचा
९१६०	।।ना.गा.१३५९.०६१।।	तेणें नाम्यासी समाधान । देवही जाला सुखसंपन्न । नामा पावोनी ब्रह्मज्ञान । मिळशील माझ्या स्वरूपीं
९१६१	।।ना.गा.१३५९.०६२।।	ऐसें हें देवभक्त निरूपण । प्रथम शिष्यासी करवी श्रवण । मग दीजे पूर्णपण । म्हणे नामा
९१६२	।।ना.गा.१३६०.००१।।	देव आणि नामा उभे भीमातीरा । प्रेमें येरयेरा आळविती
९१६३	।।ना.गा.१३६०.००२।।	देव म्हणे नाम्या ऐकें गुह्य गोष्टी। संसाराची तुटी जेणें होये
९१६४	।।ना.गा.१३६०.००३।।	श्रीगुरुवांचुनी मुक्ती तुज नाहीं । भवनदी डोहीं नुतरसी
९१६५	।।ना.गा.१३६०.००४।।	शरण गुरुसी जालिया सप्रेमें । संसाराचा श्रम उतरेल
९१६६	।।ना.गा.१३६०.००५।।	गुरुवांचुनियां कैंचा मुक्तिठाव । संसार हा वाव कैसा होय
९१६७	।।ना.गा.१३६०.००६।।	म्हणूनि नाम्या तुवां गुरुसी जावें शरण । तेणें भवबंधनें मुक्त होती

९१६८	।।ना.गा.१३६०.००७।।	ऐसें ऐकोनियां नामा थरारिला । मूर्च्छागत जाला भूमीवरी
९१६९	।।ना.गा.१३६०.००८।।	भूमि लोळे नामा कंठ सद्गदित । डोळियां स्रवत अश्रुजळ
९१७०	।।ना.गा.१३६०.००९।।	इतुकें देखोनियां द्रवला पुरुषोत्तम । नाम्यासी सप्रेमें उचलिलें
९१७१	।।ना.गा.१३६०.०१०।।	नाम्या तुज काय वाटतसे दु:ख । संसाराचें सुख तुज जालें
९१७२	।।ना.गा.१३६०.०११।।	नामा म्हणे देवा तुज ऐसा दाता । मज भवव्यथा कवणेपरी
९१७३	।।ना.गा.१३६१.००१।।	अनाथांचा नाथ तुझी ब्रीदावली । मज कां रे जाळी भवव्यथा
९१७४	।।ना.गा.१३६१.००२।।	देव म्हणे नाम्या गुरुवांचुनियां। मुक्ति पावावया आन नाहीं
९१७५	।।ना.गा.१३६१.००३।।	आन नेणें कांहीं करिसी विपत्ती । नव्हे माझी प्राप्ती गुरुविण
९१७६	।।ना.गा.१३६१.००४।।	जाई नाम्या जाई गुरुसी शरण । तुटे भवबंधन तुझें वेगीं
९१७७	।।ना.गा.१३६१.००५।।	नामा म्हणे देवा कवणा शरण जाऊं । कोणा मी होऊं शरणागत
९१७८	।।ना.गा.१३६२.००१।।	देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावें वेगीं
९१७९	।।ना.गा.१३६२.००२।।	इतुकें ऐकोनि नमियेलें देवा। चालयेला तेव्हां विसोबापाशी
९१८०	।।ना.गा.१३६२.००३।।	चिंताग्रस्त नामा आला आवंढ्यासी । पुढें देऊळासी देखियेलें
९१८१	।।ना.गा.१३६२.००४।।	नामा तये काळीं गेला देऊळासीं । देऊळीं कौतुकासी देखियेलें
९१८२	।।ना.गा.१३६३.००१।।	देवावरी पाये ठेउनि खेंचर । निजेला परिकर निवांतचि
९१८३	।।ना.गा.१३६३.००२।।	देखोनियां नामा पावला विस्मया। कैसा हा प्राणिया देवो नेणें
९१८४	।।ना.गा.१३६३.००३।।	उठी उठी प्राण्या आंधळा तूं काये । देवावरी पाय ठेवियेले
९१८५	।।ना.गा.१३६३.००४।।	विसोबा खेचर बोले नामदेवा । उठविले जिवा कां रे माझ्या
९१८६	।।ना.गा.१३६३.००५।।	देवाविण ठाव रिता कोठें आहे । विचारुनि पाहे नामदेवा
९१८७	।।ना.गा.१३६३.००६।।	जेथें देव नसे तेथें माझे पाय । ठेवीं पां अन्वय विचारुनी
९१८८	।।ना.गा.१३६३.००७।।	नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव । कोठें रिता ठाव न देखेची
९१८९	।।ना.गा.१३६४.००१।।	इतुकें देखोनि चरणीं घाली मिठी । सांठवला सृष्टी अवघा देव
९१९०	।।ना.गा.१३६४.००२।।	तिहीं त्रिभुवनीं आपण व्यापुनी । आनंदें कोंडोनि राहियेला
९१९१	।।ना.गा.१३६४.००३।।	श्रीगुरुचे पाय जीवें न विसंबत । मनोवृत्तिसहित ओंवाळिलें
९१९२	।।ना.गा.१३६४.००४।।	डोळियांचे डोळे उघडिलें जेणें । आनंदाचें लेणें लेवविलें
९१९३	।।ना.गा.१३६४.००५।।	जन्ममरणाचें तोडिलें सांकडें । कैवल्यचि पुढें दावियेलें

९१९४	।।ना.गा.१३६४.००६।।	कैवल्याचा गाभा विटेवरी उभा । दिसे दिव्य शोभा पांडुरंग
९१९५	।।ना.गा.१३६४.००७।।	नामा म्हणे माझी भक्ति हे माऊली । कृपेची साउली केली मज
९१९६	।।ना.गा.१३६५.००१।।	सर्व काळीं परमात्मा आहे सर्व देशीं । भावना हे अहर्निशीं दृढ धरी
९१९७	।।ना.गा.१३६५.००२।।	संतसमुदाय मिळती जेथें जेथें । जाये तेथें तेथें लोटांगणीं
९१९८	।।ना.गा.१३६५.००३।।	चिंता न करी नाम्या येणें तरसी जाण । तुज सांगितली खूण निर्वाणींची
९१९९	।।ना.गा.१३६६.००१।।	खेचरें केली माव लिंगावरी देउनि पाव । पहावया भाव नामयाचा
९२००	।।ना.गा.१३६६.००२।।	नामा तेथें आला देव नमस्कारिला । देखोन बोलला वचन त्यासी
९२०१	।।ना.गा.१३६६.००३।।	लिंगावरोनि चरण काढाजी वहिलें । दिसतां वरी भले करणी न कळे
९२०२	।।ना.गा.१३६६.००४।।	तंव येरु बोलिला नाम्या तूं भला । मज नाहीं कळला देव तुझा
९२०३	।।ना.गा.१३६६.००५।।	जेथें नाहीं देव तेथें ठेवी पाव । सर्वज्ञ सदैव तूंची अससी
९२०४	।।ना.गा.१३६६.००६।।	मीपणें भुललों मज नकळेची कांहीं । देव नसे ते ठायीं पाय ठेवीं
९२०५	।।ना.गा.१३६६.००७।।	तंव नामा होय विचारितां शब्दांची कुसरी । पाहतां निर्धारीं सान नोहे
९२०६	।।ना.गा.१३६६.००८।।	देवाविण ठाव हें बोलणेंची वाव । परतोनि संदेह पडला मज
९२०७	।।ना.गा.१३६६.००९।।	आपुलें उमाणें आपण उमगावें । मजसी तारावें भवसागरीं
९२०८	।।ना.गा.१३६६.०१०।।	नामा धरी चरण अगाध तुमचें ज्ञान । आपुलें नाम कोण सांगा स्वामी
९२०९	।।ना.गा.१३६६.०११।।	येरु म्हणे खेचर विसा पैं जाण । लौकिका मिरविणें अरे नाम्या
९२१०	।।ना.गा.१३६६.०१२।।	नाम आणि रूप दोन्ही जया नाहीं । तोचि देव पाही येर मिथ्या
९२११	।।ना.गा.१३६६.०१३।।	जळ स्थळ आणि काष्ट हे पाषाण । पिंड ब्रह्मांड व्यापुन अणुरेणु
९२१२	।।ना.गा.१३६६.०१४।।	सर्वत्र साक्षभूत हें जाणोनि पाहो । खेचर म्हणे नाम्यातें अवघा देवो
९२१३	।।ना.गा.१३६७.००१।।	नामदेव काय करिसी तीळ तुळसी । उभा गा ठेलासी दर्भ जैसा
९२१४	।।ना.गा.१३६७.००२।।	भुका कागा मरसी जेथिंचा तेथें । केशवराज तूतें आतुडेना
९२१५	।।ना.गा.१३६७.००३।।	नाहीं दया ध्यान ईश्वरीं भजन । वायांविण प्राण कां करितोसी
९२१६	।।ना.गा.१३६७.००४।।	हरिभक्तिविण जन्मलासी नरू । म्हणे विसोबा खेचरू अरे नाम्या
९२१७	।।ना.गा.१३६८.००१।।	तुझें निजसुख तुजपाशीं आहे । विचारुनि पाहे मनामाजीं
९२१८	।।ना.गा.१३६८.००२।।	विवेक वैराग्य शोधुनियां पाहे। तेणें तुज होय ब्रह्मप्राप्ती
९२१९	।।ना.गा.१३६८.००३।।	ज्ञानाचा प्रकार सहजची जाला । अहंभाव गेला गळोनियां

९२२०	।।ना.गा.१३६८.००४।।	खेचर विसा म्हणे जेथें ओंकार निमाला । सहजचि जाला ब्रह्ममूर्ती
९२२१	।।ना.गा.१३६९.००१।।	जरी म्हणसी देव देखिला । तरी हा बोल भला नव्हे नाम्या
९२२२	।।ना.गा.१३६९.००२।।	जोंवरी मी माझें न तुटे । तंव आत्माराम कैसेंनि भेटे
९२२३	।।ना.गा.१३६९.००३।।	खेचर साह्यानें मी कांहीं नेणें । जीवा या जीव इतुलें मी जाणें
९२२४	।।ना.गा.१३७०.००१।।	मेघेंविण जळ कीं जळेंविण पूर । नख न बुडे परी नाहीं उतार
९२२५	।।ना.गा.१३७०.००२।।	येथें आहे तो बुडे नाहीं तरे । लटिक्याचे खरें मानिसी काई
९२२६	।।ना.गा.१३७०.००३।।	म्हणे खेचर विसा तूं जालासी पिसा । दृश्याची हे आशा सांडी नाम्या
९२२७	।।ना.गा.१३७१.००१।।	सुखाचें सुखरूप घेऊनी जा तरी । विठ्ठल नामें भरी तिन्ही लोक
९२२८	।।ना.गा.१३७१.००२।।	आशापाश याही वासना पोखी । विठ्ठलनामा शेखीं घेऊनी राहे
९२२९	।।ना.गा.१३७१.००३।।	न लगती सायास करणें काया क्लेश । आपण वैकुंठ येईल सवें
९२३०	।।ना.गा.१३७१.००४।।	नाठवी संसार नाठवी देहभाव । रोहिणीची माव नकळे काय
९२३१	।।ना.गा.१३७१.००५।।	कुल्लाळकुसरी भ्रमत चक्र । आयुष्या आवर्त मापा करी
९२३२	।।ना.गा.१३७१.००६।।	खेचर विसा म्हणे येथूनी काढिलें । तें तुज दिधलें जा रे नाम्या
९२३३	।।ना.गा.१३७२.००१।।	भवजलधि अगाध तरावया दुस्तर । रचिलें पंढरपूर चंद्रभागा
९२३४	।।ना.गा.१३७२.००२।।	तारूं पंढरिनाथ मोलेंविण उतारितु । उगला असे तिष्ठतु वाट पाहे
९२३५	।।ना.गा.१३७२.००३।।	बुडतयाचें भय नाहीं संसारीं । कलिमाजीं पंढरी नाव थोर
९२३६	।।ना.गा.१३७२.००४।।	राव रंक दोन्ही बैसवुनी वरी । उतरी पैलतीरीं भरंवसेनी
९२३७	।।ना.गा.१३७२.००५।।	आठराही आवले जे नावेसी लागले । साही खण भरले मिरवताती
९२३८	।।ना.गा.१३७२.००६।।	चौमुखीं वर्णितां नकळे याचा पार । वेदां अगोचर सहस्र मुखा
९२३९	।।ना.गा.१३७२.००७।।	सडियातें कांसे लावित आपण । कुटुंबिये जाण नावेवरी
९२४०	।।ना.गा.१३७२.००८।।	प्रेमाचे पेटे बांधोनियां पोटीं । उतरी जगजेठी पैलपारु
९२४१	।।ना.गा.१३७२.००९।।	आप आंगें उघाडी बुडत्यातें कडे काढी । ऐसे लक्षकोडी तारियले
९२४२	।।ना.गा.१३७२.०१०।।	सहस्र नाम पेटे बांधे मज पोटीं । तरी जगजेठी लावी कांसे
९२४३	।।ना.गा.१३७२.०११।।	आदि करोनी सर्वही तारिले । उतरूनि तारिले पैलतिरीं
९२४४	।।ना.गा.१३७२.०१२।।	ऐसें पक्षी कीट गुल्मल तारिले । खेचर विसा म्हणे तारी मातें पुंडलिक
९२४५	।।ना.गा.१३७३.००१।।	श्रवणीं सांगितली मात मस्तकीं ठेवियेला हात । पदपिंडाविवर्जित केला नामा

९२४६	।।ना.गा.१३७३.००२।।	खेचरु विसा प्रेमाचा पिसा । तेणें नामा कैसा उपदेशिला
९२४७	।।ना.गा.१३७३.००३।।	तया सांगितलें गुज । आतां पाल्हाळीं तुज काय चाड
९२४८	।।ना.गा.१३७३.००४।।	मग खेचरू म्हणे मज ज्ञान हेंचि गुरु । तेणें अगोचरु म्हणे केला नामा
९२४९	।।ना.गा.१३७४.००१।।	सुखालागें मन तुझें गिवसित तळमळी । परि सुख आहे जवळी नकळे तुज
९२५०	।।ना.गा.१३७४.००२।।	दर्पणीं दीप्ति कीं दुग्धीं घृतशक्ति । परि करणीविण हातीं न लभेची जाण
९२५१	।।ना.गा.१३७४.००३।।	सुखालागीं सुखसोय दाखवीत पाहे । अनुभवोनी होय सुखरूप
९२५२	।।ना.गा.१३७४.००४।।	सुख तें शांति सुख तें दया क्षमी । सुख तें उपदेश मी निर्विकारी
९२५३	।।ना.गा.१३७४.००५।।	सुख तें नैराश्य सुख हरिदास्य । सुख तें विश्वास सदा वसे
९२५४	।।ना.गा.१३७४.००६।।	सुख तें सत्संगतीं सुख तें नामीं प्रीती । सुख तें विकृति विषयभोगीं
९२५५	।।ना.गा.१३७४.००७।।	सुख तें एकांतवास सुख तें लौकिक त्रास । सुख तें सौरस स्वस्वरूपीं
९२५६	।।ना.गा.१३७४.००८।।	म्हणे खेचर विसा परियेसी विष्णुदासा । न घडे भरवसा तरी अनुभवें
९२५७	।।ना.गा.१३७५.००१।।	भक्ति त्रिविधा षड्विधा नवविधा । यजन याजनें जीवातें दंडिताती सदा
९२५८	।।ना.गा.१३७५.००२।।	केशव परमात्मा नेणोनियां जी पतितें । पतनीं पडतां होती भूतें लया
९२५९	।।ना.गा.१३७५.००३।।	नाहीं रूप स्थिति नाहीं शब्दस्थिती । नित्य तया वस्ती निरंजनीं
९२६०	।।ना.गा.१३७५.००४।।	एकलें परब्रह्म गुरुमुखें जाणावें । तरि चुकवावें पुनरावृत्ति लया
९२६१	।।ना.गा.१३७५.००५।।	ऐसें रे नामया वचन ऐक पुढें। हे तो देवाविषयीं श्रुतीचे निवाडे
९२६२	।।ना.गा.१३७५.००६।।	श्रुती नेति परतोनि आलिया । खेचर पुढें सांगे नामया
९२६३	।।ना.गा.१३७६.००१।।	आधीं चैतन्य अपैतें करोनी । मग संचरे तारुण्य वनीं । कामक्रोध तुज देखोनी । जाती पळोनी बारा वाटा
९२६४	।।ना.गा.१३७६.००२।।	तुज पाठीं कवण धांवे । कवण टाकी कवण पावे । कामक्रोधें जग मोहावें । कासयासी खोवावें पोटीं पाय
९२६५	।।ना.गा.१३७६.००३।।	माया मोहजाळ तुटेल । पळेल पां काळ व्याळ । कां रे स्मरसी ना गोपाळ । मिथ्या व्याकुळ कांजेविण
९२६६	।।ना.गा.१३७६.००४।।	वैराग्य दृढ होई निरुता । कासया भितोसी चपेटघाता । परस्त्री तितुकी मानी माता । विषयीं निमित्या आल्यासाठीं
९२६७	।।ना.गा.१३७६.००५।।	धर्माचेनी मार्गे निघाला कर्ण । शिबी चक्रवर्ती जाला जीवित्वहीन । तयामाजीं सांग नाडला कोण । लटकी झकवण कां बोलती
९२६८	।।ना.गा.१३७६.००६।।	इंद्रिया गोड तें आरोगिजे । मग धनीवरी धावा पोखरिजे । काय सांगूं शहाणपण तुझें । खेचर विसा म्हणे अरे नामया
९२६९	।।ना.गा.१३७७.००१।।	येथोनि तेथवरी धांवोनियां गेलों । कांहीं नाहीं तें पाहुनियां आलों
९२७०	।।ना.गा.१३७७.००२।।	कोठें गेलों कोठें धांवुनी आलों । कांहीं नाहीं तें पाहुनियां धालों

९२७१	।।ना.गा.१३७७.००३।।	खेचर विसा म्हणे नामदेवा । कांहीं तें तुम्हीं मज दाखवा
९२७२	।।ना.गा.१३७८.००१।।	पर्वतप्राय पापराशी होती दग्ध । वाचेसी मुकुंद उच्चारितां
९२७३	।।ना.गा.१३७८.००२।।	अच्युत श्रीहरी केशव नरहरी । माधव हरहरी रामकृष्ण
९२७४	।।ना.गा.१३७८.००३।।	नामाचें साधन करशील पूर्ण । तें प्रपंचाचें भान उरों नेदी
९२७५	।।ना.गा.१३७८.००४।।	उदासीन वृत्ति आचरावें कर्म । नाहीं देहधर्म गुण माया
९२७६	।।ना.गा.१३७८.००५।।	ऐसा हा अनकळित मार्ग साधेल तुज । खेचर विसा गुज सांगे नाम्या
९२७७	।।ना.गा.१३७९.००१।।	आप तेज वायू पृथिवी गगन । मेलें तें कवण पंचामध्यें
९२७८	।।ना.गा.१३७९.००२।।	आम्हां मरण नाहीं मरशील काई। आत्मवस्तु पाही श्रीगुरुमुखें
९२७९	।।ना.गा.१३७९.००३।।	जिताची मरण आलेंसें हातां । मरण बोलतां लाज नये
९२८०	।।ना.गा.१३७९.००४।।	खेचर विसा म्हणे आम्हां मरण नाहीं । कैसें मरण पाही आलें नाम्या
९२८१	।।ना.गा.१३८०.००१।।	मरण सांगा स्वामी कवणियां गुणें । संसारीं मरण उरलें नाहीं
९२८२	।।ना.गा.१३८०.००२।।	आम्हां मरण नाहीं मेलें होतें काई । श्रीगुरुच्या पायीं राहे मना
९२८३	।।ना.गा.१३८०.००३।।	मरणें हें काया मरणें हें माया । मरे हे छाया कवण्या गुणें
९२८४	।।ना.गा.१३८०.००४।।	भक्ति अमरकंदु रामनाम वंदूं । नामयासी छंदू विठोबाचा
९२८५	।।ना.गा.१३८१.००१।।	नामा स्वयंपाक करूं बैसला । केशव श्वानरुपें आला । रोटी घेऊनि पळाला । सर्वांभूतीं केशव
९२८६	।।ना.गा.१३८१.००२।।	हातीं घेऊनि तुपाची वाटी । नामा लागला श्वानापाठीं । तूप घे गा जगजेठी । कोरडी रोटी कां खाशी
९२८७	।।ना.गा.१३८१.००३।।	तंव श्वान हांसोनी बोलिले । नामया तुज कैसें कळलें । येरू म्हणे खेचरें उपदेशिलें । सर्वांभूतीं विठ्ठल
९२८८	।।ना.गा.१३८२.००१।।	सद्गुरुनायकें पूर्ण कृपा केली । निजवस्तु दाविली माझी मज
९२८९	।।ना.गा.१३८२.००२।।	माझें सुख मज दावियेलें डोळां । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा
९२९०	।।ना.गा.१३८२.००३।।	तया उतराई व्हावें कवण्या गुणें । जन्म नाहीं येणें ऐसें केलें
९२९१	।।ना.गा.१३८२.००४।।	नामा म्हणे निकी दावियेली सोय । न विसरावे पाय विठोबाचे
९२९२	।।ना.गा.१३८३.००१।।	पाषाणाचा देव बोलेचि ना कधीं । हरि भवव्याधि केंवि घडे
९२९३	।।ना.गा.१३८३.००२।।	दगडाची मूर्ति मानिला ईश्वर। परि तो साचार देव भिन्न
९२९४	।।ना.गा.१३८३.००३।।	दगडाचा देव इच्छा पुरवीत । तरि कां भंगत आघातानें
९२९५	।।ना.गा.१३८३.००४।।	पाषाण देवाची करिती जे भक्ति । सर्वस्वा मुकती मूढपणें
९२९६	।।ना.गा.१३८३.००५।।	प्रस्तराचा देव बोलत भक्तांतें । सांगते ऐकते मूर्ख दोघे

९२९७	।।ना.गा.१३८३.००६।।	ऐशांचे माहात्म्य जे कां वर्णिताती । आणि म्हणविती तेणें भक्त
९२९८	।।ना.गा.१३८३.००७।।	परंतु ते नर पामर जाणावे । त्यांचे नायकावे बोल कानीं
९२९९	।।ना.गा.१३८३.००८।।	धोंडा घडोनियां देव त्याचा केला । आदरें पूजिला वर्षें बहु
९३००	।।ना.गा.१३८३.००९।।	तरी तो उतराई होय केव्हां काई । बरवें हृदयीं विचारा हें
९३०१	।।ना.गा.१३८३.०१०।।	धोंडापाण्याविण नाहीं देव कोठें । होतां सान मोठें तीर्थ क्षेत्र
९३०२	।।ना.गा.१३८३.०११।।	बाराशीचे गांवीं जाहला उपदेश । देवाविण ओस स्थळ नाहीं
९३०३	।।ना.गा.१३८३.०१२।।	तो देव नामया हृदयीं दाविला । खेचरानें केला उपकारु हा
९३०४	।।ना.गा.१३८४.००१।।	कृपेची साउली अखंड लाधली । खेचर माउली भेटलिया
९३०५	।।ना.गा.१३८४.००२।।	आतां मज भय नाहीं पैं कोणाचें । जन्ममरणाचें दुःख गेलें
९३०६	।।ना.गा.१३८४.००३।।	बंधमोक्षाची फिटली काळजी । समाधि लागली समाधिसी
९३०७	।।ना.गा.१३८४.००४।।	नामा म्हणे माझें सर्वही साधन । खेचर चरण न विसंबे
९३०८	।।ना.गा.१३८५.००१।।	भक्ति हेंचि भाण परब्रह्म पक्वान्न । गुरुमुखें जेवण जेवियेलें
९३०९	।।ना.गा.१३८५.००२।।	अनुभव भात लयलक्ष कढी। जेवणार गोडी घेत असे
९३१०	।।ना.गा.१३८५.००३।।	सुखशांति शाखा भावार्थ हा वडा । जेवणार गाढा आत्माराम
९३११	।।ना.गा.१३८५.००४।।	दया क्षीरधारी शांती पुरणपोळी । घृत हें कल्होळी प्रेम माझें
९३१२	।।ना.गा.१३८५.००५।।	विषयाचा गुरळा थुंकोनी सांडिला । नामा आंचवला संसारासी
९३१३	।।ना.गा.१३८६.००१।।	स्वानंदांत पडोनियां जाती । न संडी वासना चघळित अस्ती
९३१४	।।ना.गा.१३८६.००२।।	तैसें माझें मन मुरारी । वासना धांवे विषयावरी
९३१५	।।ना.गा.१३८६.००३।।	डोळियांचीं बुबुळें फुटोनियां जाती । न संडी वासना हालविती पातीं
९३१६	।।ना.गा.१३८६.००४।।	ढोराचें पुच्छ मोडोनियां चांगा । पुढती पुढती हालविती पैं गा
९३१७	।।ना.गा.१३८६.००५।।	वोढाळ ढोरा बांधियेलें काष्ट । पुढती पुढती धरी तीच वाट
९३१८	।।ना.गा.१३८६.००६।।	नामा म्हणे माझी मुळीं वासनाच खोटी । खेचर विसा चरणीं घातलिसे मिठी
९३१९	।।ना.गा.१३८७.००१।।	सूर्याचा प्रकाश सर्व सृष्टीवरी । धन्य तो अंतरीं सर्वकाळ
९३२०	।।ना.गा.१३८७.००२।।	स्वर्गादि पाताळ सर्व पूर्ण जळें । चातका न मिळे मेघाविण
९३२१	।।ना.गा.१३८७.००३।।	नारायण पूर्ण सर्वभूतां ठायीं । अभाग्यासी नाहीं तिहीं लोकीं
९३२२	।।ना.गा.१३८७.००४।।	नामा म्हणे गुरुकृपेचें अंजन । पायाळासी धन दिसे जैसें

९३२३	।।ना.गा.१३८८.००१।।	सुखाचे सोयरे भेटती अंतरीं । बाहेरी भितरीं दिधलें क्षेम
९३२४	।।ना.गा.१३८८.००२।।	सुखाची गवसणी घालोनियां मना । विठ्ठलीं वासना वोल्हावली
९३२५	।।ना.गा.१३८८.००३।।	वाचे उपरम मन जालें तन्मय । लागलासे लय पर लक्षीं
९३२६	।।ना.गा.१३८८.००४।।	शांति क्षमा दया देती आलिंगन । चित्त समाधान पावविलें
९३२७	।।ना.गा.१३८८.००५।।	परतलिया दृष्टी इंद्रियांच्या वृत्ती । पावली विश्रांति ठाईंच्या ठाईं
९३२८	।।ना.गा.१३८८.००६।।	विष्णुदास नामा निजबोधें निवाला । खेचरें दिधला अभयकर
९३२९	।।ना.गा.१३८९.००१।।	सद्गुरुचे पाय जीवें न विसंबावे । मन वळवावें वृत्तिसहित
९३३०	।।ना.गा.१३८९.००२।।	डोळियाचे डोळे उघडिले जेणें। आनंदाचें लेणें लेवविलें
९३३१	।।ना.गा.१३८९.००३।।	जन्ममरणाचें फेडिलें सांकडें । कैवल्यचि पुढें दाखविलें
९३३२	।।ना.गा.१३८९.००४।।	मोहरले तरु पुष्पफळभारें । तेचि निर्विकार सनकादिक
९३३३	।।ना.गा.१३८९.००५।।	नामा म्हणे स्वामी खेचर माउली । कृपेची साउली केली मज
९३३४	।।ना.गा.१३९०.००१।।	वेदांसी न कळे शास्त्रें पैं भांडती । श्रुति विवादती ब्रह्मालागीं
९३३५	।।ना.गा.१३९०.००२।।	आवघेचि कर्ममुक्त उपदेश धर्म । हरपती पैं कर्मे गुरुसेवा
९३३६	।।ना.गा.१३९०.००३।।	सेवेपरतें साधन नाहीं पैं उपदेश । हरीसी सौरस आपें आप
९३३७	।।ना.गा.१३९०.००४।।	नामा म्हणे हरि गुरु आज्ञा काम । भजन निष्काम गुरुसेवा
९३३८	।।ना.गा.१३९१.००१।।	उपजोनी सभाग्य तेचि एक जाले । जीहीं विचारिलें आत्महित
९३३९	।।ना.गा.१३९१.००२।।	सांडोनि मीपणास सद्गुरुचरण । लागलों संपूर्ण भावार्थेंसि
९३४०	।।ना.गा.१३९१.००३।।	तयाचें जें कांही सर्व मज वोझें । नाहीं मज दुजें त्यासि कांहीं
९३४१	।।ना.गा.१३९१.००४।।	तयाचे हृदयीं संतपण प्रगटे । द्वैतपण तुटे क्षणामाजीं
९३४२	।।ना.गा.१३९१.००५।।	नामा म्हणे आम्हां विठोबाचे बोल । सांपडली वोल तरावया
९३४३	।।ना.गा.१३९२.००१।।	सद्गुरुसारिखा सोईरा जिवलग । तोडिला उद्वेग संसारींचा
९३४४	।।ना.गा.१३९२.००२।।	काय उतराई होऊं कवण्या गुणें । जन्मा नाहीं येणें ऐसें केलें
९३४५	।।ना.गा.१३९२.००३।।	माझें सुख मज दाखविलें डोळां । दिधली प्रेमकळा नाममुद्रा
९३४६	।।ना.गा.१३९२.००४।।	डोळियाचा डोळा उघडिला जेणें । लेवविलें लेणें आनंदाचें
९३४७	।।ना.गा.१३९२.००५।।	नामा म्हणे निकी सापडली सोय । न विसंबे पाय खेचराचे
९३४८	।।ना.गा.१३९३.००१।।	सुखाचा सद्गुरु सुखरूप खेचरू । स्वरूप साक्षात्कारु दाखविला

९३४९	।।ना.गा.१३९३.००२।।	विठ्ठल पहातां मावळलें मन । ध्यानीं भरले नयन तन्मय जालें
९३५०	।।ना.गा.१३९३.००३।।	मी माझें होतें तें मजमाजि निमालें । जळें जळ गिळिलें जयापरी
९३५१	।।ना.गा.१३९३.००४।।	तेथें आनंदीं आनंदु वोळला परमानंदु । नाम्या जाला बोधु विठ्ठलनामें
९३५२	।।ना.गा.१३९४.००१।।	नाशवंत देतां ब्रह्म येईल हातां । ऐसी ज्याची कथा पुराणांत
९३५३	।।ना.गा.१३९४.००२।।	सद्गुरुचे पायीं देहासि अर्पितां । तात्काळ मुक्तता हातां येते
९३५४	।।ना.गा.१३९४.००३।।	माया देऊनियां ब्रह्म घ्यावें हातीं । ऐशा गुरुप्रति कां भजाना
९३५५	।।ना.गा.१३९४.००४।।	नामा म्हणे गुरुपायीं लाभ आहे । मोक्ष तोही पाहे दास होतो
९३५६	।।ना.गा.१३९५.००१।।	चंद्रभागे तीरीं आयकिल्या गोष्टी । वाल्मीकें शतकोटी ग्रंथ केला
९३५७	।।ना.गा.१३९५.००२।।	तेणें माझ्या चित्ता बहु जाले क्लेश । व्यर्थ म्यां आयुष्य गमाविलें
९३५८	।।ना.गा.१३९५.००३।।	जाऊनि राऊळा विठोसी विनविलें । वाल्मिकानें केलें रामायण
९३५९	।।ना.गा.१३९५.००४।।	असेन मी खरा तुझा भक्त देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा
९३६०	।।ना.गा.१३९५.००५।।	शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंग ऐक नाम्या
९३६१	।।ना.गा.१३९५.००६।।	तये वेळीं होती आयुष्याची वृद्धि । आतांची अवधि थोडी असे
९३६२	।।ना.गा.१३९५.००७।।	नामा म्हणे जरी न होतां संपूर्ण । जिव्हा उतरीन तुज पुढें
९३६३	।।ना.गा.१३९६.००१।।	निश्चय पाहूनि उपजली दया । स्वामी देवराया पांडुरंगा
९३६४	।।ना.गा.१३९६.००२।।	सारजेसी सांगे भीमातीरीं हरी । बैस जिव्हेवरी नामयाच्या
९३६५	।।ना.गा.१३९६.००३।।	लाडकें लडिवाळ नामा माझें तान्हें । तयाला मजविण कोण आहे
९३६६	।।ना.गा.१३९६.००४।।	मजवरी त्याचें बहु असे ऋण । होईन उत्तीर्ण एवढ्यानें
९३६७	।।ना.गा.१३९६.००५।।	नामा म्हणे हातीं बांधोनियां वह्या । बैसे लिहावया पांडुरंग
९३६८	।।ना.गा.१३९७.००१।।	अभंगाची कळा नाहीं मी नेणत । त्वरा केली प्रीत केशिराजें
९३६९	।।ना.गा.१३९७.००२।।	अक्षरांची संख्या बोलिले उदंड। मेरू सुप्रचंड शर आदि
९३७०	।।ना.गा.१३९७.००३।।	सहा साडेतीन चरण जाणावे । अक्षरें मोजावीं चौकचारी
९३७१	।।ना.गा.१३९७.००४।।	पहिल्यापासोनि तिसऱ्यापर्यंत । अठरा गणित मोज आलें
९३७२	।।ना.गा.१३९७.००५।।	चौकचारी आधीं बोलिलों मातृका । बाविसावी संख्या शेवटील
९३७३	।।ना.गा.१३९७.००६।।	दीड चरणाचें दीर्घ तें अक्षर । मुमुक्षु विचार बोध केला
९३७४	।।ना.गा.१३९७.००७।।	नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी । प्रीतीनें खेचरीं आज्ञा केली

९३७५	।।ना.गा.१३९८.००१।।	खवळलों आतां न भिये रे तुज । सांडिली रे लाज लौकिकाची
९३७६	।।ना.गा.१३९८.००२।।	आम्ही दीन सिंपे यातिचे ते हीन । दे माझें ठेवणें केशीराजा
९३७७	।।ना.गा.१३९८.००३।।	साठ लक्ष संख्या चौऱ्यांसी कोटि । त्यांत मी कवडी सोडूं काय
९३७८	।।ना.गा.१३९८.००४।।	आणिक याहून असेल वेगळें । घेईन तें बळें जाण आतां
९३७९	।।ना.गा.१३९८.००५।।	तुझें थोरपण ऐक हें देवा । दुर्बळाचा ठेवा अभिलाषी
९३८०	।।ना.गा.१३९८.००६।।	म्हणूनि पोरटा नामा खेचराचा । काया मनें वाचा सत्य करी
९३८१	।।ना.गा.१३९९.००१।।	दिवस गेले वायांविण । देवा तुज न रिघतां शरण । बाळत्व गेलें अज्ञानपण । तें आठवण नव्हेचि
९३८२	।।ना.गा.१३९९.००२।।	आला तारुण्याचा अवसरु । सर्वेचि विषयाचा पडिभरु । कामक्रोध मद मत्सरू । अति व्यापारु तृष्णेचा
९३८३	।।ना.गा.१३९९.००३।।	सर्वेचि वृद्धपण पातलें । सकळ इंद्रियें सोडिलें । देह न करीच म्हणितलें । अंतर पडलें भक्तीसी
९३८४	।।ना.गा.१३९९.००४।।	कांही हित नव्हेची माझें । दास्य न घडेचि तुझें । आयुष्य वेंचिलें वीण काजे । धरणी वोझें पैं जालों
९३८५	।।ना.गा.१३९९.००५।।	पुनरपि जन्मा येईन मागुता । कोण जाणे कैसी अवस्था । तुज मी ध्याईन अनंता । ऐसा लहान कैं होईन
९३८६	।।ना.गा.१३९९.००६।।	तुझ्या नामाचा वोरस । तेणें चुके गर्भवास । नामा म्हणे विष्णुदास । देई सौरस आपुलें नामीं
९३८७	।।ना.गा.१४००.००१।।	मज चालतां आयुष्यपंथें । तारुण्यवन पातलें तेथें । मदमत्सरादि श्वापदें बहुतें । आलीं कळकळीत मजपाशीं
९३८८	।।ना.गा.१४००.००२।।	तीं धांवती पाठोपाठीं । पाहे तंव विषयाचे घाटीं । काम क्रोध व्याघ्रांची दाटी । देखोनि पोटीं रिघालें भय
९३८९	।।ना.गा.१४००.००३।।	मग स्वधर्ममार्गीं रिघालों । तंव अहंकारतस्करें आकळिलों । राहें राहें म्हणोनि उभा केलों । तेणें शिंतरलों स्वामिया
९३९०	।।ना.गा.१४००.००४।।	जंव क्षण एक उघडिले डोळे । पाहे तंव कंठ दाटला व्याळें । मायमोहसर्पीं डंखिलें । त्यांचिये गरळें झळंबलों
९३९१	।।ना.गा.१४००.००५।।	जंव न पवे शेवटील लहरी । तंव धांव धांव उपाव करी । विष्णुदास नामा धांवा करी । माझा कैवारी केशिराजु
९३९२	।।ना.गा.१४०१.००१।।	तुज नेणों गा महेशा । म्हणुनि आलों गर्भवासा । अंध कूपीं पडिला जैसा । रात्रिदिवसा तो नेणों
९३९३	।।ना.गा.१४०१.००२।।	तुझिया नामाची सांगडी । देई ते न खंडी । पावेन मी पैलथडी । त्या सांगडी आधारें
९३९४	।।ना.गा.१४०१.००३।।	कामक्रोधादि जलचरीं । कासाविस जालों भारी । व्याकुळ होय चिंतालहरी । दुःखें भारी दाटलों
९३९५	।।ना.गा.१४०१.००४।।	कल्पना वेली गुंडाळली पायीं । तेणें बुडे विषयडोहीं । भंवतें पाहे तंव कोण्हे नाहीं । मग तुज ध्यायीं विश्वेशा
९३९६	।।ना.गा.१४०१.००५।।	मज बांधुनी कर्मदोरी । घातलें संसार दुर्धरीं । मायानदीचां महापुरीं । वाहावलों गा दातारा
९३९७	।।ना.गा.१४०१.००६।।	ऐसा खेदखिन्न जालों बहुवस । न देखें विश्रांतीची वास । विनवी नामा विष्णुदास । गर्भवास पुरे आतां
९३९८	।।ना.गा.१४०२.००१।।	अंतकाळीं मी परदेशी । ऐसें जाणोनि मानसीं । म्हणोनियां हृषिकेशी । शरण मी तुज आलों
९३९९	।।ना.गा.१४०२.००२।।	नवमास गर्भवासीं । कष्ट जाले त्या मातेसी । ते निष्ठुर जाली कैसी । अंतीं दूर राहिली
९४००	।।ना.गा.१४०२.००३।।	जीवीं बाळाची आवड । मुखीं घालूनि करी कोड । जेव्हां लागली येमवोढ । तेव्हां दुरी राहिली

९४०१	।।ना.गा.१४०२.००४।।	बहिणी बंधूचा कळवळा। तें तूं जाणसी रे दयाळा । जेव्हां लागली यमशृंखळा । तेव्हां दुरी राहिली
९४०२	।।ना.गा.१४०२.००५।।	कन्या पुत्रादिक बाळें। हे तंव स्नेहाचीं स्नेहाळें । तुझ्या दर्शनाहून व्याकुळ । अंतीं दूर राहिलीं
९४०३	।।ना.गा.१४०२.००६।।	देहगृहाची कामिनी । ते तंव राहिली भवनीं। मी जळतसें स्मशानीं । अग्निसवें एकला
९४०४	।।ना.गा.१४०२.००७।।	मित्र आले गोत्रज आले । तेहि स्मशानीं परतले । शेवटीं टाकोनियां गेले । मज परता यमजाल
९४०५	।।ना.गा.१४०२.००८।।	ऐसा जाणोनि निर्धार । मग मज आला गहिंवर । तंव दाही दिशा अंध:कार । मग मज कांहीं न सुचे
९४०६	।।ना.गा.१४०२.००९।।	ऐसें जाणोनियां पाही । मनुष्य जन्म मागुता नाहीं । नामा म्हणे तुझे पायीं । ठाव देई विठोबा
९४०७	।।ना.गा.१४०३.००१।।	परियेसी वासने संकल्प स्वरूपे । विश्व त्वां आटोपें वश केलें
९४०८	।।ना.गा.१४०३.००२।।	ब्रह्मादिक तुझे इच्छेचें खेळणें । विषयाकारणें लोलिंगत
९४०९	।।ना.गा.१४०३.००३।।	परि माझ्या मना सांडी वो समर्थे । देईं मज दीनातें कृपादान
९४१०	।।ना.गा.१४०३.००४।।	वेदशास्त्रवक्ते व्युत्पन्न थोरले । तृणापरीस केले हळुवट
९४११	।।ना.गा.१४०३.००५।।	कृपणाचे द्वारीं होऊनि याचक । विसरले सुख आत्महित
९४१२	।।ना.गा.१४०३.००६।।	एके अभिमानें भ्रांत जालें चित्त । भजती इंद्रियातें दीनरूपें
९४१३	।।ना.गा.१४०३.००७।।	शब्द स्पर्श रूप रसगंधे फांसा। गुंतले दुराशा तळमळित
९४१४	।।ना.गा.१४०३.००८।।	येकातें लाविला पुत्र कलत्र धंदा । नेणती ते कदा सुखगोष्टी
९४१५	।।ना.गा.१४०३.००९।।	जन्म मरणांचे जुंपियले पांतीं । आकल्प भोगिती नाना योनी
९४१६	।।ना.गा.१४०३.०१०।।	ऐसे तुझे संगें बहु जालों हिंपुटी । पाडिली तुटी संतसंगा
९४१७	।।ना.गा.१४०३.०११।।	नामा म्हणे पुढती गांजिसील मज । येईल केशिराज सोडवणें
९४१८	।।ना.गा.१४०४.००१।।	वीतभर पोट लागलेंसें पाठी । साधुसंगें गोष्टी सांगूं न देई
९४१९	।।ना.गा.१४०४.००२।।	पोट माझी माता पोट माझा पिता । पोटानें ही चिंता लाविलीसे
९४२०	।।ना.गा.१४०४.००३।।	पोट माझा बंधु पोट माझी बहिण । पोटानें हें दैन्य मांडिलेंसे
९४२१	।।ना.गा.१४०४.००४।।	विष्णुदास नामा पोटाकडे पाहे । अझुन किती ठाये हिंडविसी
९४२२	।।ना.गा.१४०५.००१।।	मन माझें चोरटें लागलें कुसंगीं । बांधिलें षड्वर्गी धरोनि त्यातें । केउता गेलासि माझ्या कृपावंता। ये गा पंढरिनाथा मायबापा
९४२३	।।ना.गा.१४०५.००२।।	वासनेची बेडी घालोनि माझे पायीं । विषयवज्रघायीं त्रासिताती । आशा तृष्णा माया आणिक कल्पना । करिताती कामना नानाविध
९४२४	।।ना.गा.१४०५.००३।।	कामक्रोध दंभ लाविताती कळा । ये माझ्या गोपाळा सोडवणें । नामा म्हणे माझें घेउनियां चित्त । करि बंधन मुक्त संसाराचें
९४२५	।।ना.गा.१४०६.००१।।	विषयीं आसक्त जालें माझें मन । न करी तुझें ध्यान पंढरीराया

९४२६	।।ना.गा.१४०६.००२।।	नाथिले संकल्प करी नानाविध । तेणें थोर खेद पावतसे
९४२७	।।ना.गा.१४०६.००३।।	आयुष्य सरे परी न सरे कल्पना । भोगावी यातना नानाविध
९४२८	।।ना.गा.१४०६.००४।।	जन्म मरण कष्ट भोगितां संकटीं । होतसे हिंपुटी येरझारीं
९४२९	।।ना.गा.१४०६.००५।।	ऐसा मी अपराधी दुराचारी देवा । भेटसी केशवा कवणेपरी
९४३०	।।ना.गा.१४०६.००६।।	मायामोहें सदा भ्रांत माझें चित्त । चुकलें निजहित नारायणा
९४३१	।।ना.गा.१४०६.००७।।	तूं अनाथा कैवारी ब्रीदावळी हरी । सोडवी मुरारी म्हणे नामा
९४३२	।।ना.गा.१४०७.००१।।	मन गांजिल्याचा धांवा । सावधान परिसावा
९४३३	।।ना.गा.१४०७.००२।।	विठो सुजाणाच्या राया । धांव माझ्या करुणालया
९४३४	।।ना.गा.१४०७.००३।।	माझें मन हें पामर । भ्रांत हिंडे दारोदार
९४३५	।।ना.गा.१४०७.००४।।	मोहोपाशीं मज बांधिलें । भेणें वैराग्य साधिलें
९४३६	।।ना.गा.१४०७.००५।।	नामा म्हणे काय करूं । तुजविण भूमिभारू
९४३७	।।ना.गा.१४०८.००१।।	ममता तुटेना मज केशिराजा । अंगीं भाव दुजा लागे पाठीं
९४३८	।।ना.गा.१४०८.००२।।	शरीरीं तितीक्षा नाहीं क्षमा शांति । यालागीं श्रीपति वायां गेलों
९४३९	।।ना.गा.१४०८.००३।।	नामा म्हणे देवा तारिसी पतिता । म्हणोनियां सत्ता केली आम्हीं
९४४०	।।ना.गा.१४०९.००१।।	आशा तृष्णा व्याघ्र देखोनियां डोळा । जालेंसे व्याकुळ चित्त माझें
९४४१	।।ना.गा.१४०९.००२।।	पावें गा विठोबा पावें गा विठोबा । पावें गा विठोबा मायबापा
९४४२	।।ना.गा.१४०९.००३।।	तूं भक्तकैवारी कृपाळुवा हरि । येईं गा झडकरी देवराया
९४४३	।।ना.गा.१४०९.००४।।	नामा म्हणे आन नाहीं तुजवाचोनि । जनक जननी केशिराजा
९४४४	।।ना.गा.१४१०.००१।।	माझे मनीं ऐसे होते आतां देवा । भाव समर्पावा तुझे चरणीं
९४४५	।।ना.गा.१४१०.००२।।	तंव मायामोहें मजसी केला हेवा । लोटियेलें भवजळामाजीं
९४४६	।।ना.गा.१४१०.००३।।	आशानदी पुरी वाहविलीं वेगीं । काढी मज हरी कृपाळुवा
९४४७	।।ना.गा.१४१०.००४।।	सरितेमाजीं धरिलें या मदनमगरें । पुढारें माघारें जाऊं नेदी
९४४८	।।ना.गा.१४१०.००५।।	थडिये उभाउभीं धांव गा श्रीहरी । मज हानी थोरी सर्वस्वें गेलों
९४४९	।।ना.गा.१४१०.००६।।	भक्ति नवरत्नांची बुडाली वाखोरी । काढी वेगीं हरी मायबापा
९४५०	।।ना.गा.१४१०.००७।।	धीर आणि विचार ह्या दोन्ही सांगडी । श्रद्धा दोरी पुढील तुटोनि गेली
९४५१	।।ना.गा.१४१०.००८।।	भावबळें सांपडलों दाटलों उभडीं । वेगीं घाली उडी कृपाळुवा

९४५२	।।ना.गा.१४१०.००९।।	तुझे भक्तिविण कोरडा होय गळा । नेतो रसातळा क्रोध मीन
९४५३	।।ना.गा.१४१०.०१०।।	नामा म्हणे तुझा मी सकळ जीवा । तरी हा काढावा शरणांगत
९४५४	।।ना.गा.१४११.००१।।	नावडे प्रपंच तापत्रय माया । येईं धांवोनियां केशिराजा
९४५५	।।ना.गा.१४११.००२।।	भवभयें फार भ्यालों जन्मांतरा । चौऱ्यांशीचा फेरा बुडवितो
९४५६	।।ना.गा.१४११.००३।।	सत्कथा श्रवण नाम संकीर्तन । न घडे भजन मज देवा
९४५७	।।ना.गा.१४११.००४।।	नवविधा भक्ति कवणें केली कैसी । नामा म्हणे ऐसी दावी माते
९४५८	।।ना.गा.१४१२.००१।।	भक्तीची अपेक्षा धरोनि अंतरीं । राहे भीमातीरी पंढरीये
९४५९	।।ना.गा.१४१२.००२।।	अठ्ठावीस युगें गेलीं विचारितां । निर्गम सर्वथा नव्हे देखा
९४६०	।।ना.गा.१४१२.००३।।	कटीं कर उभा शिणलें शरीर । धरोनि निर्धार भक्तिभावें
९४६१	।।ना.गा.१४१२.००४।।	नामा म्हणे आतां नको खटपट । आमुचे बोभाट नको पाहूं
९४६२	।।ना.गा.१४१३.००१।।	भावेंविण भक्ति कशानें हो करी । माया मोह वैरी देहामाजीं
९४६३	।।ना.गा.१४१३.००२।।	तुझें नाम दिव्य रस जिव्हे स्वाद । नाश काम क्रोध करिती माझा
९४६४	।।ना.गा.१४१३.००३।।	जे जे वस्तुसि नयनीं मी पाहे । त्या त्या धांवताहे विषयीं मन
९४६५	।।ना.गा.१४१३.००४।।	नामा म्हणे थोर उबगलों संसारीं । पुढा काळ वैरी ग्रासूं पाहे
९४६६	।।ना.गा.१४१४.००१।।	आम्हांपासी काय मागसी तूं देवा । नाहीं भक्तिभाव भांडवल
९४६७	।।ना.गा.१४१४.००२।।	भांडवल गांठीं देखोनि साचार । सुदाम्याची फार पाठ घेसी
९४६८	।।ना.गा.१४१४.००३।।	घेसी सोडुनियां पोहे मुठीभर । हिडसावल्या कर नामा म्हणे
९४६९	।।ना.गा.१४१५.००१।।	दंभें गर्वें मदें घेरलेंसे भारी । अनुसरलें केसरी पंचानना
९४७०	।।ना.गा.१४१५.००२।।	तूतें वेद नेणें तूतें शास्त्र नेणें । तुझें नाम नेणें गातूं असे
९४७१	।।ना.गा.१४१५.००३।।	त्रिविद्या तूं पारु दोहींचा वृत्तांतु । सत्त्व राहे ती तूं जयालागीं
९४७२	।।ना.गा.१४१५.००४।।	निर्गुण निराकार केशव उदार । नामा म्हणे पार उतरतील
९४७३	।।ना.गा.१४१६.००१।।	इलुसाचि प्रपंच परि हा लटिका । तेणें तुज व्यापका झांकियलें
९४७४	।।ना.गा.१४१६.००२।।	ऐसियाचा मज घालोनियां खेवा । स्वामिद्रोहि देवा करिसी मज
९४७५	।।ना.गा.१४१६.००३।।	मेरुचिया गळा बांधोनि मशक । पाहसी कौतुक अनाथनाथा
९४७६	।।ना.गा.१४१६.००४।।	नामा म्हणे देवा कळली तुझी माव । माझा मी उपाव करीन आतां
९४७७	।।ना.गा.१४१७.००१।।	श्रीहरी श्रीहरी ऐसें वाचे म्हणेन । वाचा धरिसी तरी श्रवणें ऐकेन

९४७८	।।ना.गा.१४१७.००२।।	श्रवणीं दाटसी तरी मी नयनीं पाहिन । ध्यानीं मी ध्याईन जेथें तेथें
९४७९	।।ना.गा.१४१७.००३।।	जेथें जाये तेथें लागलासी आम्हां । न संडी म्हणे नामा वर्म तुझें
९४८०	।।ना.गा.१४१८.००१।।	आम्हां सापडलें वर्म । करूं भागवतधर्म
९४८१	।।ना.गा.१४१८.००२।।	अवतार हा भेटला । बोलूं चालूं हा विसरला
९४८२	।।ना.गा.१४१८.००३।।	अरे हा भावाचा लंपट । सांडुनि आलासे वैकुंठ
९४८३	।।ना.गा.१४१८.००४।।	संतसंगतीं साधावा । धरूनि हृदयीं बांधावा
९४८४	।।ना.गा.१४१८.००५।।	नामा म्हणे केउता जाय । आमुचा गळा त्याचे पाय
९४८५	।।ना.गा.१४१९.००१।।	काय गुणदोष आणितोसी मना । नको नारायणा अभक्तची
९४८६	।।ना.गा.१४१९.००२।।	शरीरसंबंधा सुचतीं अंतरें । काय म्यां पामरें आवरावें
९४८७	।।ना.गा.१४१९.००३।।	नामा म्हणे मज नागविसी दातारा । नको बा अंतरा पाहों अंत
९४८८	।।ना.गा.१४२०.००१।।	काय गुण दोष माझे विचारिसी । आहे मी तों राशी अपराधांची
९४८९	।।ना.गा.१४२०.००२।।	अंगुष्ठापासोनी मस्तकापर्यंत। अखंड दुश्चित आचरलों
९४९०	।।ना.गा.१४२०.००३।।	स्वप्नीं देवा तुझी नाहीं घडली भक्ति । पुससी विरक्ति कोठुनियां
९४९१	।।ना.गा.१४२०.००४।।	तूंची माझा गुरु तूंची तारी स्वामी । सकळ अंतर्यामीं गाऊं तुज
९४९२	।।ना.गा.१४२०.००५।।	नामा म्हणे माझें चुकवीं जन्ममरण । नको करूं शीण पांडुरंगा
९४९३	।।ना.गा.१४२१.००१।।	चोरा ओढोनियां नेईजे जैं शुळीं । चालतां पाउलीं मृत्यु जैसा
९४९४	।।ना.गा.१४२१.००२।।	तैसी परी मज जाली नारायणा । दिवसेंदिवस उणा होत असे
९४९५	।।ना.गा.१४२१.००३।।	वृक्षाचिये मुळीं घालितां कुऱ्हाडी । वेंचे तैसी घडी आयुष्याची
९४९६	।।ना.गा.१४२१.००४।।	नामा म्हणे हेंही लहरीचें जळ । आटत सकळ भानुतेजें
९४९७	।।ना.गा.१४२२.००१।।	संसारींच्या लाह्या आहाळलों भारी । निववी गा श्रीहरि अमृतदृष्टी
९४९८	।।ना.गा.१४२२.००२।।	मी अनाथ अपराधी दुर्बळ दुराचारी । कृपाळू बा हरी तारीं मज
९४९९	।।ना.गा.१४२२.००३।।	नामा म्हणे विठो कृपेचा कोंवळा । जाणसी कळवळा अनाथनाथा
९५००	।।ना.गा.१४२३.००१।।	सांडोनि संसार जालों मी अंकित । ऐशियाचा अंत पाहूं नको
९५०१	।।ना.गा.१४२३.००२।।	पातकी मी सत्य पातकी मी सत्य । पातकी मी सत्य पांडुरंगा
९५०२	।।ना.गा.१४२३.००३।।	माझे गुणदोष न धरिसी चित्तीं । थोरपण ख्याति दावी आम्हां
९५०३	।।ना.गा.१४२३.००४।।	ऐसा अपराध आणूं नको मना । पंढरीच्या राणा म्हणे नामा

९५०४	।।ना.गा.१४२४.००१।।	देशीं परदेशीं जालों तुजविण । माझें समाधान कोण करी
९५०५	।।ना.गा.१४२४.००२।।	चातक चकोरापरी पाहे वास। तूं कां गे उदास पांडुरंगे
९५०६	।।ना.गा.१४२४.००३।।	नामा म्हणे चित्त देईं माझ्या बोला । जीउ हा उरला तो निघों पाहे
९५०७	।।ना.गा.१४२५.००१।।	वत्साकारणें मोहाळु गाये । अनुसरलेया पान्हा ये
९५०८	।।ना.गा.१४२५.००२।।	तैसें तुझें वासरूं बांधलों मी असें । मज लावे कांसे आपुलिया
९५०९	।।ना.गा.१४२५.००३।।	मज बांधलें त्वां संसारखुंटीं । माझी माउली दूर वैकुंठीं
९५१०	।।ना.गा.१४२५.००४।।	थोरूं करी मना लाहो। तंव आणिकें नेती पान्हावो
९५११	।।ना.गा.१४२५.००५।।	धीरू नव्हे याचि परि । नामा विनवितसे मुरारी
९५१२	।।ना.गा.१४२६.००१।।	आपुले रूपीं मज लपवीं निरंतरीं । समाये भीतरीं आड राहे
९५१३	।।ना.गा.१४२६.००२।।	परि तुज मज असावा संवादु। भ्रांति मायाबाधु काय करी
९५१४	।।ना.गा.१४२६.००३।।	काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर । हे वैरी अपार मारी माझे
९५१५	।।ना.गा.१४२६.००४।।	नामा म्हणे आम्ही जन्मजन्मांतरीचें । पोसणें घरींचे सदा तुझें
९५१६	।।ना.गा.१४२७.००१।।	मुंगीचिया गळां बांधोनियां मेरू । तेणें हा प्रकारू कळों आला
९५१७	।।ना.गा.१४२७.००२।।	माळियाचे पोर लपविलें पोटीं । तेणें जगजेठी सुख मानी
९५१८	।।ना.गा.१४२७.००३।।	कुलालाचे हातीं तुडविलें मूल । दाखवी नवल तयासाठीं
९५१९	।।ना.गा.१४२७.००४।।	मजसाठीं काय धरियेलें मौना । धांव नारायणा नामा म्हणे
९५२०	।।ना.गा.१४२८.००१।।	विठ्ठल विद्‌गदे पुंडलिकवरदे । अनंत अभेदे नामें तुझीं
९५२१	।।ना.गा.१४२८.००२।।	पाव गे विठ्ठले मजलागीं झडकरी। बुडतों भवसागरीं काढी मज
९५२२	।।ना.गा.१४२८.००३।।	आकांत अवसरीं स्मरलें साच । दीनानाथें ब्रीदें सत्य केलीं
९५२३	।।ना.गा.१४२८.००४।।	स्मरली संकटीं द्रौपदी वनवासी । धांवोनि आलासी लवडसवडीं
९५२४	।।ना.गा.१४२८.००५।।	प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं । संकटापासोनि राखियेलें
९५२५	।।ना.गा.१४२८.००६।।	नामा म्हणे थोर पीडिलों गर्भवासें । अखंड पाहातसें वास तुझी
९५२६	।।ना.गा.१४२९.००१।।	रमासिंधुमाजी सौंदर्याची धणी । ब्रीदें चक्रपाणी मिरविती
९५२७	।।ना.गा.१४२९.००२।।	मेघदेहाकृति घन:श्याम मूर्ति । नटतसे भक्तीं भक्तजना
९५२८	।।ना.गा.१४२९.००३।।	भाक देऊनियां गौळियाचे घरीं । गाई निरंतरीं चारितसे
९५२९	।।ना.गा.१४२९.००४।।	इंद्र वेडावला मुनि थोर थोर । न कळेचि पार नामा म्हणे

९५३०	।।ना.गा.१४३०.००१।।	पांचमुखीं रुद्र स्वयें करी स्तुति । चहूं मुखीं कीर्ति वर्णी ब्रह्मा
९५३१	।।ना.गा.१४३०.००२।।	देवी देव सर्व विस्मयो पावती । विठोबाची ख्याति कोण वानी
९५३२	।।ना.गा.१४३०.००३।।	परीक्षितीसाठीं प्राण त्यजी सर्व । रावणाचा गर्व स्वयें हाणी
९५३३	।।ना.गा.१४३०.००४।।	नामा म्हणे तुज सकळ समान । माझे दोष गुण मानी काय
९५३४	।।ना.गा.१४३१.००१।।	गुण दोष माझे पाहों नको आतां । तारिसी अनंता मज आतां
९५३५	।।ना.गा.१४३१.००२।।	अगाध महिमा काय वानूं हरी। गोकुळाभीतरीं गाई राखी
९५३६	।।ना.गा.१४३१.००३।।	अंबऋषीसाठीं जन्म सोशियले । महत्त्वाचे केले हूड स्वयें
९५३७	।।ना.गा.१४३१.००४।।	नामा म्हणे तुझे नामाचेनि बळ । प्रसादें केवळ लाधलों मी
९५३८	।।ना.गा.१४३२.००१।।	मी तो तुझा दास न करी उदास । मायामोहपाश तोडीं देवा
९५३९	।।ना.गा.१४३२.००२।।	प्राण जावो परी नको करूं त्याग । करी अंगसंग अंगिकार
९५४०	।।ना.गा.१४३२.००३।।	अंगीकारी आतां अजामेळ अंतीं । समान श्रीपती सम करी
९५४१	।।ना.गा.१४३२.००४।।	नामा म्हणे ऐसें वर्णावें म्यां किती । नामें केली ख्याति चराचरीं
९५४२	।।ना.गा.१४३३.००१।।	वानरांच्या संगें स्वयें क्षेम देसी । मज हृषिकेशी न बोलावें
९५४३	।।ना.गा.१४३३.००२।।	रिसांपाशीं सदा स्वभावें तुम्ही खेळा । माझिया कपाळा नातुडसी
९५४४	।।ना.गा.१४३३.००३।।	पक्षि जटायूचें लेंकरूं तूं होसी । माझ्या कां मनासि नातुडसी
९५४५	।।ना.गा.१४३३.००४।।	लावोनि चरण तारियेली शिळा । कोळियाचा केला अंगिकार
९५४६	।।ना.गा.१४३३.००५।।	नामा म्हणे तुम्हां सांगावें म्यां किती । राग मना चित्तीं काय वाणूं
९५४७	।।ना.गा.१४३४.००१।।	पतितपावना धांवसी निर्वाणीं । ब्रीद चक्रपाणि सत्य केलें
९५४८	।।ना.गा.१४३४.००२।।	काय अपराध कोणाचें पाहिले। नाहीं तुवां त्यागिलें नष्टखळां
९५४९	।।ना.गा.१४३४.००३।।	अजामेळासाठीं आहार वर्जिले । बीज तें भाजिलें भवमूळ
९५५०	।।ना.गा.१४३४.००४।।	नामा म्हणे नागवेंचि बरें । आतां उणें पुरे पाहूं नका
९५५१	।।ना.गा.१४३५.००१।।	विश्वंभर नाम तुझें कमळापती । जगीं श्रुति स्मृति वाखाणिती
९५५२	।।ना.गा.१४३५.००२।।	गौळियां घरींचें दहीं लोणी चोरूनी । खातां चक्रपाणि लाजसी ना
९५५३	।।ना.गा.१४३५.००३।।	आतां दीनानाथा तुझें ब्रीद साचें । तरी भूषण आमुचें जतन करीं
९५५४	।।ना.गा.१४३५.००४।।	येर ठेवाठेवी कायसी आतां । तुम्हां विनवितो नामा केशिराजा
९५५५	।।ना.गा.१४३६.००१।।	शरीराचा भाव तुज नाहीं देवा । तेथें मी केशवा काय बोलूं

९५५६	।।ना.गा.१४३६.००२।।	अंगदाचे अंगीं बळ देसी फार। बहु उपकार कळों आलें
९५५७	।।ना.गा.१४३६.००३।।	तुम्हां नित्य न्याय नोव्हे साचपण । बळि तूतें दान देउनि ठके
९५५८	।।ना.गा.१४३६.००४।।	नामा म्हणे सदा काय म्यां गाऱ्हाणें । किती नारायणें देऊं आतां
९५५९	।।ना.गा.१४३७.००१।।	जन्मल्यापासूनि सोशिले प्रवास । वियोग पहावया जाले आतां
९५६०	।।ना.गा.१४३७.००२।।	आतां एक करीं धावणिया धांवा । बुडतो केशवा काढी मज
९५६१	।।ना.गा.१४३७.००३।।	लाभ नव्हे हानि जाली भागाभाग । तूंचि पांडुरंग पुरविसी
९५६२	।।ना.गा.१४३७.००४।।	नामा म्हणे ऐसें सर्वस्व रक्षिलें । पाषाण तारिले जळामाजीं
९५६३	।।ना.गा.१४३८.००१।।	दुर्घट तें दुःख लागों नेदी भक्ता । त्याची तुज चिंता असे फार
९५६४	।।ना.गा.१४३८.००२।।	आणिक प्रकार घडे तो निकट । पैठणीं प्रकट रूप दावीं
९५६५	।।ना.गा.१४३८.००३।।	जेथुनि सत्वर निघाले स्वदेशा । मुक्त केलें महिषा मार्गी जाण
९५६६	।।ना.गा.१४३८.००४।।	जाणती प्रेमळ कीर्तनासी नर । समाधि निरंतर म्हणे नामा
९५६७	।।ना.गा.१४३९.००१।।	हिरे जळामधीं भिजतील कधीं । तैसें कृपानिधी केलें आम्हां
९५६८	।।ना.गा.१४३९.००२।।	आमुचा विकल्प आमुचा विकल्प । आमुचा विकल्प आम्हां नाडी
९५६९	।।ना.गा.१४३९.००३।।	कामधेनु संगें गाढव बांधिलें । तयाचें तें मोलें तुके केवि
९५७०	।।ना.गा.१४३९.००४।।	काय म्यां करावें पाठी लागे भोग । नामा म्हणे योग्य तुझ्या हातीं
९५७१	।।ना.गा.१४४०.००१।।	आशा मनिषा तृष्णा लागलीसे पाठीं । धांव जगजेठी स्वामी माझ्या
९५७२	।।ना.गा.१४४०.००२।।	गेलासि केउता वाढिलें दुश्चिता । अगा कृपावंता स्वामी माझ्या
९५७३	।।ना.गा.१४४०.००३।।	नामा म्हणे मज नाहीं कोण गत । तारिसी अनंत स्वामी माझ्या
९५७४	।।ना.गा.१४४१.००१।।	तुजविण आम्हां कोण हो पोषिता । अहो जी कृपावंता पंढरिराया
९५७५	।।ना.गा.१४४१.००२।।	न करीं विठ्ठला आतां लाजिरवाणें । मी तुझें पोसणें पांडुरंगा
९५७६	।।ना.गा.१४४१.००३।।	काकुळती कोणा येऊं हो मी आतां । अनाथाचे नाथा विठ्ठला तूं
९५७७	।।ना.गा.१४४१.००४।।	एक वेळ आतां पाहे मजकडे । नामा म्हणे वेडें रंक तुझें
९५७८	।।ना.गा.१४४२.००१।।	माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा । केशवा माधवा नारायणा
९५७९	।।ना.गा.१४४२.००२।।	नाहीं नाहीं मज आणिक सोयरा। न करीं अव्हेरा पांडुरंगा
९५८०	।।ना.गा.१४४२.००३।।	अनाथाचा नाथ होसी तूं दयाळा । किती वेळोवेळां प्रार्थू आतां
९५८१	।।ना.गा.१४४२.००४।।	नामा म्हणे जीव होतो कासावीस । केली तुझी आस आतां बरी

९५८२	।।ना.गा.१४४३.००१।।	समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हांसती सकळ लाज कोणा
९५८३	।।ना.गा.१४४३.००२।।	देव आप्त दैन्य उरे कैंचे बापा। आम्हांसि तूं कां पां विसरलासी
९५८४	।।ना.गा.१४४३.००३।।	ऐसा तूं अविनाश त्रिभुवनिंचा राजा । नामा म्हणे माझा तूंचि स्वामी
९५८५	।।ना.गा.१४४४.००१।।	आम्ही काय जाणो तुझा अंत पार । होसी तूं साचार निवारिता
९५८६	।।ना.गा.१४४४.००२।।	बहु अपराधी जाण यातिहीन । पतितपावन पांडुरंगा
९५८७	।।ना.गा.१४४४.००३।।	नामा म्हणे ऐसा पातकी पामर । करिसी उद्धार साच ब्रीद
९५८८	।।ना.गा.१४४५.००१।।	नेणे घातमात नव्हे कळावंत । शास्त्रज्ञ पंडित तोहि नव्हे
९५८९	।।ना.गा.१४४५.००२।।	रंकाहुनि रंक संतांचा सेवक । मी नामधारक विठोबाचा
९५९०	।।ना.गा.१४४५.००३।।	नव्हे बहुश्रुत नव्हे ज्ञानशीळ । नव्हे मी वाचाळ तर्कवादी
९५९१	।।ना.गा.१४४५.००४।।	नामा म्हणे राया विठोचा डिंगर । नामें पैलपार पावविलों
९५९२	।।ना.गा.१४४६.००१।।	लटिका मी गाईन लटिका मी नाचेन । संतासि देखोन लटिका लवें
९५९३	।।ना.गा.१४४६.००२।।	लटिका माझा भाव लटिकी माझी भक्ति । तूं तंव श्रीपती कृपासिंधु
९५९४	।।ना.गा.१४४६.००३।।	लटिकी माझी क्रिया लटिकें माझें कर्म । परि सत्य तुझें नाम गातु असे
९५९५	।।ना.गा.१४४६.००४।।	लटिकें माझें ध्यान लटिकें माझें ध्यान । तूं तंव सहजगुण सत्यरूप
९५९६	।।ना.गा.१४४६.००५।।	लटिकी माझी पूजा लटिकें माझें स्मरण । लटिकें माझें भजन भावहीन
९५९७	।।ना.गा.१४४६.००६।।	लटिकें प्रेमवत्स धेनु हें स्वीकारी । तैसें मज करीं म्हणे नामा
९५९८	।।ना.गा.१४४७.००१।।	आधींच मी लटिका वरी लटिकी तुझी माया । ऐसें हें कासया पाहसी देवा
९५९९	।।ना.गा.१४४७.००२।।	जाणतां नेणतां नाम तुझें देवा। गाईन केशवा आवडीनें
९६००	।।ना.गा.१४४७.००३।।	विषयीं आसक्त भ्रांत माझें मन । कैसें तुझें भजन घडेल मज
९६०१	।।ना.गा.१४४७.००४।।	नामा म्हणे आतां जाणसी तें करीं । पतितपावन हरि नाम तुझें
९६०२	।।ना.गा.१४४८.००१।।	लटिका तरी गाईन तुझेंचि नाम । लटिकें तरी प्रेम आणीन तुझें
९६०३	।।ना.गा.१४४८.००२।।	सहजचि लटिकें असे माझें ठायीं । तुझिया पालट नाहीं साचपण
९६०४	।।ना.गा.१४४८.००३।।	लटिकें तरी हरि करी तुझें ध्यान । लटिकें माझें मन तुजचि चिंती
९६०५	।।ना.गा.१४४८.००४।।	लटिकें तरी बैसे संतांचें संगतीं । दृढ धरीन चित्तीं नाम तुझें
९६०६	।।ना.गा.१४४८.००५।।	लटिका तरी तुझा म्हणविन दास । धरीन विश्वास नामीं तुझे
९६०७	।।ना.गा.१४४८.००६।।	लटिकें माझें मन सुफळ करी देवा । नामा म्हणे केशवा विनंती माझी

९६०८	।।ना.गा.१४४९.००१।।	नापिकाचे परि वरी वरी बोडी । परि अंतरींची वाढी उणी नव्हे
९६०९	।।ना.गा.१४४९.००२।।	तैसें माझें मन न राहे समूळीं । प्रपंच कवळी दाही दिशा
९६१०	।।ना.गा.१४४९.००३।।	भक्ति प्रेमभाव वरी वरी दावी । अंतरीं आटवी घराचार
९६११	।।ना.गा.१४४९.००४।।	मी लटिका जाण असे परोपरी । तारी भवसागरीं म्हणे नामा
९६१२	।।ना.गा.१४५०.००१।।	वासरूं भोवे खुंटियाभोवते । आपआपणियातें गोवियेलें
९६१३	।।ना.गा.१४५०.००२।।	तैसी परी मज जाली गा देवा । गुंफलोंसे भावा लटिकीया
९६१४	।।ना.गा.१४५०.००३।।	नामा म्हणे केशवा तोडी कां बंधनें । मी एक पोसणें भक्त तुझें
९६१५	।।ना.गा.१४५१.००१।।	लोभियाचे घरीं लटिकेचि उपवास । मरे न हृषिकेश म्हणती जगीं
९६१६	।।ना.गा.१४५१.००२।।	तूं तव भावाचा अंकुर जी देवा । लटिका मी पहावा दास तुझा
९६१७	।।ना.गा.१४५१.००३।।	लटिकी पक्षियातें बोभाये कुंटणी । ते त्वां माझी म्हणोनि अंगिकारिली
९६१८	।।ना.गा.१४५१.००४।।	लटिका अजामेळ पुत्राचेनि मोहें । सोडविला पाहे कैसा तुवां
९६१९	।।ना.गा.१४५१.००५।।	त्या अवघ्याहुनि मी लटिका सहस्र गुणें । तारूनि कीर्ति करणें म्हणे नामा
९६२०	।।ना.गा.१४५२.००१।।	तापत्रय अग्नीची जळतसे सगडी । आहाळोनि कोरडी जाली काया
९६२१	।।ना.गा.१४५२.००२।।	केव्हां करुणाघना वोळसी अंबरीं । निवविसी नरहरी कृपादृष्टी
९६२२	।।ना.गा.१४५२.००३।।	शोकमोहाचिया झळंबलों जाळी । क्रोधाची काजळीं पोळतसें
९६२३	।।ना.गा.१४५२.००४।।	चिंतेचा वणवा लागला चहूंकडां । प्राण होय व्याकुळा धांव देवा
९६२४	।।ना.गा.१४५२.००५।।	धांवधांव करुणाघना तुजविण । नामा म्हणे प्राण जातो माझा
९६२५	।।ना.गा.१४५३.००१।।	धांवुनी जाईन श्रीमुख पाहीन । इडापिडा घेईन विठोबाची
९६२६	।।ना.गा.१४५३.००२।।	तया सुखा दृष्टी लागेल वो झणीं । मग मी साजणी काय करूं
९६२७	।।ना.गा.१४५३.००३।।	म्हणोनि माझें चित्त व्यापिलें उद्वेगें । सिणलें मी उबगें जन्मोजन्मीं
९६२८	।।ना.गा.१४५३.००४।।	धरोनियां घालीं जीवाचे अंतरीं । आंतोनि बाहेरी जाऊं नेदी
९६२९	।।ना.गा.१४५३.००५।।	वासना पापिणी करील पायरव । मग हा अनुभव कोठें पाहूं
९६३०	।।ना.गा.१४५३.००६।।	वृत्तिसहित करीन मनाचें सांडणें । न विसंबें प्राणें म्हणे नामा
९६३१	।।ना.गा.१४५४.००१।।	जीव तूं प्राण तूं । आत्मा तूं गा विठ्ठला .
९६३२	।।ना.गा.१४५४.००२।।	जनक तूं जननी तूं । सोयरा तूं गा विठ्ठला
९६३३	।।ना.गा.१४५४.००३।।	माझा गुरु तूं गुरुमंत्र तूं । सर्वस्व तूं माझें म्हणे नामा

९६३४	।।ना.गा.१४५५.००१।।	संसारसंकटें रिघालों पाठिसी । आतां झणीं देसी त्यांचे हातीं
९६३५	।।ना.गा.१४५५.००२।।	ब्रीदें बडिवार ऐकोनियां फार । रिघों आम्ही द्वार विठोबाचें
९६३६	।।ना.गा.१४५५.००३।।	आणिकहि वार्ता सांगों काय आतां । पंढरिच्या नाथा परिसावें
९६३७	।।ना.गा.१४५५.००४।।	अमृत पाजणें प्रीतीनें भक्तासी । सत्य हृषिकेशी नामा म्हणे
९६३८	।।ना.गा.१४५६.००१।।	कलियुगीं जन मूर्ख शून्यवृत्ति । तारिसी श्रीपति नाम घेतां
९६३९	।।ना.गा.१४५६.००२।।	परम पावना पवित्रा निर्मळा । भक्ताचा सांभाळ करीं देवा
९६४०	।।ना.गा.१४५६.००३।।	देवा तूं दयाळ जिवलग मूर्ति । पुराणें गर्जती वेदशास्त्रें
९६४१	।।ना.गा.१४५६.००४।।	नामा म्हणे आतां नको भागाभाग । सखा पांडुरंग स्वामी माझा
९६४२	।।ना.गा.१४५७.००१।।	देवा तुज आम्हीं दिधलें थोरपण । पाहें हें वचन शोधूनियां
९६४३	।।ना.गा.१४५७.००२।।	नसतां पतित कोण पुसे तूतें । सांदीस पडतें नाम तुझें
९६४४	।।ना.गा.१४५७.००३।।	पतित अमंगळ जालों तुज साह्य । खरें खोटें पाहे विचारोनी
९६४५	।।ना.गा.१४५७.००४।।	रोग व्याधि पीडा जनांसी नसती । तरी कोण पुसती वैद्यालागीं
९६४६	।।ना.गा.१४५७.००५।।	कल्पनेची बाधा झडपे संसारीं । म्हणुनि पंचाक्षरी श्रेष्ठ जगीं
९६४७	।।ना.गा.१४५७.००६।।	नामा म्हणे विठो दैवें आलों घरा । नको लावूं दारा आम्हालागीं
९६४८	।।ना.गा.१४५८.००१।।	जगत्जीवना अगा नारायणा । कां नये करुणा दासाची हे
९६४९	।।ना.गा.१४५८.००२।।	अच्युता केशवा ये गा दीनानाथा। सर्वज्ञ समर्था कृपामूर्ति
९६५०	।।ना.गा.१४५८.००३।।	चिद्घना चिद्रूपा विरंचीच्या बापा । करावी जी कृपा सर्वांभूतीं
९६५१	।।ना.गा.१४५८.००४।।	तुझें म्हणविलें उपेक्षिसी जरी । नामा म्हणे हरि ब्रीद काय
९६५२	।।ना.गा.१४५९.००१।।	घालुनी आसन साधिला पवन । घेतलें जीवन अंतरिक्षीं
९६५३	।।ना.गा.१४५९.००२।।	परहस्तें तृप्ति नव्हे जी दातारा। कृपा करुणा करा केशिराजा
९६५४	।।ना.गा.१४५९.००३।।	जीवाचें जीवन तूं सर्वांचें कारण । धांव मजलागुन केशिराजा
९६५५	।।ना.गा.१४५९.००४।।	अनाथाचा नाथ हें ब्रीद साचार । झणें माझा अव्हेर करिसी देवा
९६५६	।।ना.गा.१४५९.००५।।	विष्णुदास नामा अंकियेला तुझा । विनवी केशिराजा प्रेमसुखें
९६५७	।।ना.गा.१४६०.००१।।	ज्याचिया रे मनें देखियेलें तुज । त्याची लोकलाज मावळली
९६५८	।।ना.गा.१४६०.००२।।	नाहीं तया क्रिया नाहीं तया कर्म । नाहीं वर्णाश्रम सुखदु:ख
९६५९	।।ना.गा.१४६०.००३।।	नाहीं देह स्फूर्ति जाती कुळ भेद । अखंड आनंद ऐक्यतेचा

९६६०	।।ना.गा.१४६०.००४।।	नामा म्हणे त्याचे चरणरज व्हावें । हेंचि भाग्य द्यावें केशिराजा
९६६१	।।ना.गा.१४६१.००१।।	वाल्मिकादि भीष्म द्रोण कृपाचार्य । द्रुपदतनया दिली भेटी
९६६२	।।ना.गा.१४६१.००२।।	उद्धव नारद अंबरिष शुक । बळी धृवादिक आले भेटी
९६६३	।।ना.गा.१४६१.००३।।	देवी देवऋषी गोपाळांसहित । भाष्यकारें नीत शुद्ध केली
९६६४	।।ना.गा.१४६१.००४।।	नामा म्हणे आतां पाहूं नको देश । पतितास यश तुझे नामीं
९६६५	।।ना.गा.१४६२.००१।।	भक्तांची आवडी मोठी त्या देवासी । सद्भक्तप्रेमासी लांचावला
९६६६	।।ना.गा.१४६२.००२।।	काय सांगूं आतां तयांचें कौतुक । जेथें ब्रह्मादिक स्तब्ध ठेले
९६६७	।।ना.गा.१४६२.००३।।	गज आणि गणिका भिल्लिणी कुंटिणी । नेल्या त्या विमानीं बैसोनियां
९६६८	।।ना.गा.१४६२.००४।।	अजामीळ खळ कोळी तो वाल्मिक । तारिले अनेक एकसरां
९६६९	।।ना.गा.१४६२.००५।।	धर्माचिये घरीं उच्छिष्ट काढी। जाहला बराडी देवराव
९६७०	।।ना.गा.१४६२.००६।।	नामा म्हणे कांहीं मागेना तो देव । मुख्य पाहे भाव दृढ त्याचा
९६७१	।।ना.गा.१४६३.००१।।	जैसा वृक्ष नेणे मान अपमान । तैसे ते सज्जन वर्तताती
९६७२	।।ना.गा.१४६३.००२।।	येऊनियां पूजा प्राणी जे करिती । त्यांचें सुख चित्तीं तया नाहीं
९६७३	।।ना.गा.१४६३.००३।।	अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती । तया न म्हणती छेदूं नका
९६७४	।।ना.गा.१४६३.००४।।	निंदा स्तुति सम मानिती जे संत । पूर्ण धैर्यवन्त सिंधु ऐसे
९६७५	।।ना.गा.१४६३.००५।।	नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी । तरी जीव शिवा मिठी पडुनि जाय
९६७६	।।ना.गा.१४६४.००१।।	मंत्रयंत्र दीक्षा सांगतील लक्ष । परि राम प्रत्यक्ष न करी कोण्ही
९६७७	।।ना.गा.१४६४.००२।।	प्रत्यक्ष दावील राम धरीन त्याचे पाय । आणिकांची काय चाड मज
९६७८	।।ना.गा.१४६४.००३।।	सर्व कामीं राम भेटविती मातें । जीवेंभावें त्यांतें ओवाळीन
९६७९	।।ना.गा.१४६४.००४।।	नामा म्हणे आम्हां थोर लाभ जाला । सोईरा भेटला अंतरींचा
९६८०	।।ना.गा.१४६५.००१।।	कैसा पांडुरंगा करावा विचार । सांग बा निर्धार साक्षरूपा
९६८१	।।ना.गा.१४६५.००२।।	काय आलें देवा कैचें थोरपण। आकारासि कोणी आणियलें
९६८२	।।ना.गा.१४६५.००३।।	आणियलें आतां आपणासारिखें । गोपिकांसी रूपें दावी नाना
९६८३	।।ना.गा.१४६५.००४।।	काय जीवेंभावें सकळां संमत । सगुण अनंत म्हणे नामा
९६८४	।।ना.गा.१४६६.००१।।	कांसविची पिलीं राहाती निराळीं । दृष्टीं पान्हावली सुधामय
९६८५	।।ना.गा.१४६६.००२।।	जैसा जवळूनि असेन मी दुरी। दृष्टीं मजवरी असो द्यावी

९६८६	।।ना.गा.१४६६.००३।।	तान्हें वत्स घरीं वनीं धेनू चरे । परि ती हुंबरे क्षणोक्षणा
९६८७	।।ना.गा.१४६६.००४।।	नामा म्हणे सत्ता करिती निकट । भक्तांसी वैकुंठ पद देसी
९६८८	।।ना.गा.१४६७.००१।।	बाप संतसभा भली । बहुता पुण्यें जोडिली । हृदयींची गोवी आपुली । संताप्रति निवेदीन
९६८९	।।ना.गा.१४६७.००२।।	आजि प्रसंग हरिभक्तीचा । हरि स्वभावें उच्चारु वाचा । विठोबा ऋणिया रे भक्तांचा । ऋण फेडितो भक्तांचें
९६९०	।।ना.गा.१४६७.००३।।	अरे हा अनादिचा लागु करी । अरे जन्माची उभरा भरी । आमुचा लागिया श्रीहरी । दो उत्तरीं निवडावा
९६९१	।।ना.गा.१४६७.००४।।	आतां असो हा कर्मविभागु । आम्ही मागूं आपुला लागूं । जरि हा म्हणेल नि:संगु । तयासी आम्हांसी संबंध कायसा
९६९२	।।ना.गा.१४६७.००५।।	जरि हा न लगे आमुचें ऋण । हातीं घेऊनि सुदर्शन । आम्ही करुं हरिकीर्तन । तेथें तिष्ठत कां उभा
९६९३	।।ना.गा.१४६७.००६।।	मागें चाळविलि या रिति । परि आम्हांसि आलिया प्रचीति । ज्यासि हरिची सोय संगती । तयासि न मनें अन्य स्थळ
९६९४	।।ना.गा.१४६७.००७।।	हरि कौसाळ मल्ल म्हणती । ते अवघी रे जाणावी भ्रांति । सेवा हरिची सांगताती। संत होती हरिकडे
९६९५	।।ना.गा.१४६७.००८।।	आणिक एकू आम्हांसी आठवलें । आम्ही भांडूकरे एकले । आमुचें केलें काय चाले । या हरिभक्तां वांचूनि
९६९६	।।ना.गा.१४६७.००९।।	जे हरिभक्ति विरहित । त्यांचें हरिचरणीं न बोधे चित्त । अवघे मिळूनि हरिचे भक्त। हरि व्हावा म्हणताती
९६९७	।।ना.गा.१४६७.०१०।।	आणिक एक नवल परि । जो याची सेवा करी । त्यांचें सर्वस्व हरि । आणि श्रीहरि नाम मिरवतु
९६९८	।।ना.गा.१४६७.०११।।	हरि आळवितां मागा उभा । आठवितां पुढें उभा । हरि ध्यातां हृदयीं उभा । हें तंव सभा विचारा
९६९९	।।ना.गा.१४६७.०१२।।	आमुचें हो तेंच तुम्हीं विनवावें । आम्हांसि मानलें आघवें । किती येरझारीं शिणवावें । शरण रिघावें श्रीहरी
९७००	।।ना.गा.१४६७.०१३।।	विश्व श्रीहरिचें आघवें । म्यां गाऱ्हाणें कवणाशीं द्यावें । लागे त्यासिच मागावें । हरिविण ठावो नसे वो
९७०१	।।ना.गा.१४६७.०१४।।	वीरराया पंढरीनाथा । आतां अपंगावें शरणागता । जरी उपेक्षिसी सर्वथा । वाट कोणाची पहावी
९७०२	।।ना.गा.१४६७.०१५।।	नको नको निंदा स्तुति । हाचि भावो हेचि भक्ति । मज नेदी पुनरावृत्ति । विष्णुदास म्हणे नामा
९७०३	।।ना.गा.१४६८.००१।।	तुझिया संतांची अंगसंगति । ते शिणलिया विश्रांति संसारिया
९७०४	।।ना.गा.१४६८.००२।।	श्रवण कीर्तन ध्यान घडे अनायासें । भेदभ्रम नासे तेचि क्षणीं
९७०५	।।ना.गा.१४६८.००३।।	ऐसें भाग्य मज देसी कवणें काळी । होईन पायधुळी वैष्णवांची
९७०६	।।ना.गा.१४६८.००४।।	वदनीं तुझें नाम वसे निरंतर । राखीन त्याचें द्वार थोर आशा
९७०७	।।ना.गा.१४६८.००५।।	येतां जातां मज करिती सावधान । वदनीं कृष्ण कृष्ण म्हणविती
९७०८	।।ना.गा.१४६८.००६।।	कामधेनु घरीं असे प्रसवली । ते विकावया नेली दैवहतें
९७०९	।।ना.गा.१४६८.००७।।	पंथी पडिला पायां लागे चिंतामणी । पाषाण म्हणउनि उपेक्षिला
९७१०	।।ना.गा.१४६८.००८।।	तैसी परी मज जाहली अधमा । चुकलों तुझ्या वर्मा केशिराजा
९७११	।।ना.गा.१४६८.००९।।	नामा म्हणे थोर खंती वाटे जीवा । कृपा करूनि ठेवा कर माथां

९७१२	।।ना.गा.१४६९.००१।।	सर्वभावें तूतें जे ध्याती दातारा । त्यांचिया संसारा तूंचि होसी
९७१३	।।ना.गा.१४६९.००२।।	ज्याचे चित्तीं नाहीं आणिक कांहीं काम । त्याचा योगक्षेम तूंचि होसी
९७१४	।।ना.गा.१४६९.००३।।	ऐहिक परत्र जें कांहीं देखिजे । तें तुवां होईजे मायबापा
९७१५	।।ना.गा.१४६९.००४।।	नामा म्हणे माझी भक्ति हे माउली । केशवा वाहिली क्षणमात्रें
९७१६	।।ना.गा.१४७०.००१।।	अमृताहुनी गोड नाम तुझें देवा । मन माझें केशवा कां बा नेघे
९७१७	।।ना.गा.१४७०.००२।।	सांग पंढरिराया काय करूं यासी । कां रूप ध्यानासि न ये तुझें
९७१८	।।ना.गा.१४७०.००३।।	कीर्तनीं बैसतां निद्रें नागविलें । मन हें भुललें विषयसुखा
९७१९	।।ना.गा.१४७०.००४।।	हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति । न ये माझ्या चित्तीं नामा म्हणे
९७२०	।।ना.गा.१४७१.००१।।	जगदानिया हें ब्रीद आहे जगीं । तें आजि मजलागीं काय जालें
९७२१	।।ना.गा.१४७१.००२।।	मज पाहतां विसरु पडिला त्या नामाचा । कीं तुज आमुचा वीट आला
९७२२	।।ना.गा.१४७१.००३।।	सुजाणाच्या राया परिसें केशिराजा । भक्ताचिया काजा लाजों नको
९७२३	।।ना.गा.१४७१.००४।।	भक्तकाजकैवारी हें ब्रीद चराचरीं । तें ठेविलें क्षीरसागरीं लक्ष्मीपाशीं
९७२४	।।ना.गा.१४७१.००५।।	मज पाहतां अभिलाष धरिला मानसीं । मग तूं ऋषिकेशी विसरलासी
९७२५	।।ना.गा.१४७१.००६।।	दीनानाथा ऐसें नाम बहुतांसी वांटिले । निर्गुण तें उरलें तुजपाशीं
९७२६	।।ना.गा.१४७१.००७।।	म्हणोनि केशिराजा विसरलासी आम्हां । विनवितसे नामा विष्णुदास
९७२७	।।ना.गा.१४७२.००१।।	अपराधाच्या कोडी हीच माझी जोडी । पावनत्व प्रौढी नाम तुझें
९७२८	।।ना.गा.१४७२.००२।।	द्रौपदी संकटीं वस्त्रें पुरविलीं । धांव त्वां घेतली गजेंद्रासी
९७२९	।।ना.गा.१४७२.००३।।	उपमन्यालागीं आळी पुरविली । अढळपदीं दिधली वस्ती ध्रुवा
९७३०	।।ना.गा.१४७२.००४।।	नामा म्हणे करा करुणा केशवा । तूं माझा विसावा पांडुरंगा
९७३१	।।ना.गा.१४७३.००१।।	संसारसागरी पडलों महापुरीं । सोडवण करी देवराया
९७३२	।।ना.गा.१४७३.००२।।	नामाची सांगडी देऊनियां मातें । वैकुंठावरूतें नेऊनि घाली
९७३३	।।ना.गा.१४७३.००३।।	काम क्रोध मगर करिती माझा ग्रास । क्षणीं तूं उदास होसी देवा
९७३४	।।ना.गा.१४७३.००४।।	नामा म्हणे देवा झणीं मोकलिसी मातें । नाम तुझें सरतें धरिलें एक
९७३५	।।ना.गा.१४७४.००१।।	किटकीतें भयें स्वयें भृंगी ध्यातां । तैसा तूं अनंता करी आतां
९७३६	।।ना.गा.१४७४.००२।।	भजनें पाठविलें श्रीहरिरूपासी। नेतो वैकुंठासी नारायण
९७३७	।।ना.गा.१४७४.००३।।	नाम नारायण अंतीं उद्धारक । नामा म्हणे देख भाक माझी

९७३८	।।ना.गा.१४७५.००१।।	काखे पान अंगणीं उभें उगें । भोजन मागें रामनाम
९७३९	।।ना.गा.१४७५.००२।।	आणिक नाहीं मज चाड । रामनाम गोड जेऊं घाला
९७४०	।।ना.गा.१४७५.००३।।	आनरस सेवितां मंद पडिलों । तुझेंचि नामें रुचीस आलों
९७४१	।।ना.गा.१४७५.००४।।	इच्छाभोजनीं तूं एक दाता । नामा विनवी पंढरीनाथा
९७४२	।।ना.गा.१४७६.००१।।	तान्हेलों भुकेलों । तुझेनि नामें निवालों
९७४३	।।ना.गा.१४७६.००२।।	तहान नेणें भूक नेणें । अखंड पारणें नामीं तुझ्या
९७४४	।।ना.गा.१४७६.००३।।	अमृतलिंग केशव हा चित्तीं । तेणें नामया तृप्ति अखंडित
९७४५	।।ना.गा.१४७७.००१।।	मोहभुजंगें डंखिलें । विषयलहरीं झांकोळिलें
९७४६	।।ना.गा.१४७७.००२।।	धांव धांव चक्रपाणि । आणिका न करवे धांवणी
९७४७	।।ना.गा.१४७७.००३।।	नामा म्हणे निर्विष जालों । केशव नामें उपचारिलों
९७४८	।।ना.गा.१४७८.००१।।	नाम गाऊं नाम ध्याऊं । नामें विठोबासी पाहूं
९७४९	।।ना.गा.१४७८.००२।।	आम्ही दैवाचे दैवाचे । दास पंढरीरायाचे
९७५०	।।ना.गा.१४७८.००३।।	टाळ दिंडी घेऊनी हातीं । केशवराज गाऊं गीतीं
९७५१	।।ना.गा.१४७८.००४।।	नामा म्हणे लाखोली सदा । अनंत नामें वाहूं गोविंदा
९७५२	।।ना.गा.१४७९.००१।।	नामें तरूं अवघे जन । यमपुरीं घालूं गहाण
९७५३	।।ना.गा.१४७९.००२।।	करूं हरिनामकीर्तन । तोडूं देहाचें बंधन
९७५४	।।ना.गा.१४७९.००३।।	करूं हरिनामाचा घोष । कुंभपाक पाडूं ओस
९७५५	।।ना.गा.१४७९.००४।।	ऐसा नामा यशवंत । विठोबाचा शरणागत
९७५६	।।ना.गा.१४८०.००१।।	विठ्ठल आवडी प्रेमभावो। विठ्ठल नामाचा रे टाहो । तुटेल हा संदेहो । भवमूळव्याधीचा
९७५७	।।ना.गा.१४८०.००२।।	म्हणा नरहरि उच्चार । कृष्ण हरी श्रीधर । हें नाम आम्हां सार । संसार तरावया
९७५८	।।ना.गा.१४८०.००३।।	एकतत्त्व त्रिभुवनीं । हेंचि आम्हां हरिपर्वणी। गाइली जे पुराणीं । वेदशास्त्रांसहित
९७५९	।।ना.गा.१४८०.००४।।	नेघों नामेंविण कांहीं । विठ्ठल कृष्ण लवलाही । नामा म्हणे तरलों पाही । विठ्ठल विठ्ठल म्हणतांचि
९७६०	।।ना.गा.१४८१.००१।।	जें जें घडेल तें तें घडो । देह राहो अथवा पडो
९७६१	।।ना.गा.१४८१.००२।।	परि मी न सोडी सर्वथा । तुझे पाय पंढरिनाथा
९७६२	।।ना.गा.१४८१.००३।।	क्लेश होत नाना परी । मुखीं रामकृष्ण हरि
९७६३	।।ना.गा.१४८१.००४।।	नामा म्हणे केशवातें । जें जें घडेल या देहातें

९७६४	।।ना.गा.१४८२.००१।।	यज्ञ याग दान व्रत उद्यापन । हें नेणें मी साधन काय करूं
९७६५	।।ना.गा.१४८२.००२।।	जप तप होम स्वधर्माचरण । नव्हे तीर्थाटण कांहीं मज
९७६६	।।ना.गा.१४८२.००३।।	गया पिंडदान प्रयागींचें स्नान । कर्म अनुष्ठान नव्हे मज
९७६७	।।ना.गा.१४८२.००४।।	भक्ति उपासना देवाचें पूजन । ध्यान उपोषण नव्हे मज
९७६८	।।ना.गा.१४८२.००५।।	पृथ्वीचें भ्रमण अनुताप संपूर्ण । सारासार खूण नकळे कांहीं
९७६९	।।ना.गा.१४८२.००६।।	पुण्य नाहीं गांठीं पापाचें संचित । परम पतित वाटे मज
९७७०	।।ना.गा.१४८२.००७।।	माझा देह आहे पातकांचा थारा । मी अपराधी खरा कळलेसें
९७७१	।।ना.गा.१४८२.००८।।	पुराणप्रसिद्ध नाम तुझें सार । ऐसें निरंतर बोलताती
९७७२	।।ना.गा.१४८२.००९।।	अन्यथा वचन नोहे हें प्रमाण । तरी ब्रीदें जाण सांडवलीं
९७७३	।।ना.गा.१४८२.०१०।।	तुम्ही ब्रीद आपुलें जतन करणें । तरी नारायणें सांभाळावें
९७७४	।।ना.गा.१४८२.०११।।	नामेंविण कांहीं आम्हांपाशीं नाहीं । विचारोनी पाही पांडुरंगा
९७७५	।।ना.गा.१४८२.०१२।।	धन वित्त सर्व आमची हे जोडी । नामा म्हणे गोडी नामीं तुझें
९७७६	।।ना.गा.१४८३.००१।।	लपलासी तरी नाम कैसें नेसी । आम्ही अहर्निशीं नाम गाऊं
९७७७	।।ना.गा.१४८३.००२।।	आम्हांपासोनियां जातां नये तुज । तें हें वर्म बीज नाम घोकूं
९७७८	।।ना.गा.१४८३.००३।।	आम्हांसी तों तुझें नामचि पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे
९७७९	।।ना.गा.१४८३.००४।।	भोळीं भक्तीं आम्ही चुकलों होतों वर्म । सांपडलें नाम नामयासी
९७८०	।।ना.गा.१४८४.००१।।	भोगावरी आम्ही घातिला पाषाण । मरणा मरण आणियेलें
९७८१	।।ना.गा.१४८४.००२।।	नाहीं यासी पतन न होय बंधन । नित्य हेंचि स्नान रामनामीं
९७८२	।।ना.गा.१४८४.००३।।	नामा म्हणे भाव सर्वांभूतीं करा । आणिक पसारा घालूं नका
९७८३	।।ना.गा.१४८५.००१।।	नलगे तुझी भुक्ती नलगे तुझी मुक्ती । मज आहे विश्रांति वेगळीच
९७८४	।।ना.गा.१४८५.००२।।	माझें मज कळलें माझें मज कळलें । माझें मज कळलें प्रेमसुख
९७८५	।।ना.गा.१४८५.००३।।	न करीं तुझें ध्यान नलगे ब्रह्मज्ञान । माझी आहे खूण वेगळीच
९७८६	।।ना.गा.१४८५.००४।।	न करीं तुझी स्तुति न वाखाणीं कीर्ति । धरलासि ते युक्ति वेगळीच
९७८७	।।ना.गा.१४८५.००५।।	न करीं काया क्लेश इंद्रिया निरोध । माझा आहे बोध वेगळाचि
९७८८	।।ना.गा.१४८५.००६।।	नामा म्हणे नाम गाईन निर्विकल्प । येसी आपोआप गिंवसित
९७८९	।।ना.गा.१४८६.००१।।	क्रिया कर्म धर्म तूंचि होसी माझे । राखेन मी तुझें द्वार देवा

९७९०	।।ना.गा.१४८६.००२।।	मज पाळीसी तैसा पाळीं दीनानाथा । न सोडीं सर्वथा नाम तुझें
९७९१	।।ना.गा.१४८६.००३।।	गाईन तुझें नाम हृदयीं धरुनि प्रेम । हाचि नित्य नेम सर्व माझा
९७९२	।।ना.गा.१४८६.००४।।	नामा म्हणे केशवा सुखाच्या सागरा । तूं आम्हां सोईरा आदिअंतीं
९७९३	।।ना.गा.१४८७.००१।।	अवघाचि संसार करीन सुखाचा । जरी जाला दु:खाचा दुर्धर हा
९७९४	।।ना.गा.१४८७.००२।।	विठोबाचें नाम गाईन मनोभावें । चित्त तेणें नांवें सुख पावे
९७९५	।।ना.गा.१४८७.००३।।	इंद्रियांचें कोड सर्वस्वें पुरती । मनाचें मावळती मनोधर्म
९७९६	।।ना.गा.१४८७.००४।।	श्रवणीं श्रवणा नामाचा प्रबंधा । नाइकें स्तुतिनिंदा दुर्जनाची
९७९७	।।ना.गा.१४८७.००५।।	कुंडलें मंडित श्रीमुख निर्मळ । पाहतां हे डोळे निवती माझे
९७९८	।।ना.गा.१४८७.००६।।	विटेसहित चरण धरीन मस्तकीं । तेणें तनु सुखी होईल माझी
९७९९	।।ना.गा.१४८७.००७।।	संतसमागमें नाचेन रंगणीं । तेणें होईल धुणी त्रिविध तापा
९८००	।।ना.गा.१४८७.००८।।	नामा म्हणे सर्व सुखाचा सोईरा । न विसंबे दातारा क्षणभरी
९८०१	।।ना.गा.१४८८.००१।।	नमन करीन द्वारकानायका । पांडव पालका देवराया
९८०२	।।ना.गा.१४८८.००२।।	आतां मी गाईन गुण नाम कीर्ति । जेणें चारी मुक्ति दासी होती
९८०३	।।ना.गा.१४८८.००३।।	साधक लोकांसी हेंचि पैं साधन । ब्रह्म सनातन वश होय
९८०४	।।ना.गा.१४८८.००४।।	नामा म्हणे सर्व सारांचें हें सार । जेणें निरंतर सुख वाटे
९८०५	।।ना.गा.१४८९.००१।।	जीवन्मुक्त केलें नामाचे गजरीं । सेवेसी अधिकारी विठोबाचे
९८०६	।।ना.गा.१४८९.००२।।	काय उतराई होऊं तुज देवा। उदारा केशवा मायबापा
९८०७	।।ना.गा.१४८९.००३।।	अंतरीं देऊन प्रेमाचा जिव्हाळा । मुक्तीचा सोहळा भोगविसी
९८०८	।।ना.गा.१४८९.००४।।	नामा म्हणे वेदां न येसी अनुमाना । वर्णितां पुराणां पाडियलें ठक
९८०९	।।ना.गा.१४९०.००१।।	मन नेणें तुझ्या मनाचा विश्वास । येर तो हव्यास गोड वाटे
९८१०	।।ना.गा.१४९०.००२।।	तुझें प्रेम नेणें तुझें प्रेम नेणें । सांग काय करणें केशिराजा
९८११	।।ना.गा.१४९०.००३।।	मज घातलें संसारीं पीडिलों कर्मभांडारीं । कृपा नरहरी करी मज
९८१२	।।ना.गा.१४९०.००४।।	नामा म्हणे मी तों ठायींचाचि अपराधी । केशवा कांहीं बुद्धी सांग मज
९८१३	।।ना.गा.१४९१.००१।।	येइना अजुनी श्रीकृष्ण सदना । गोंवळा रक्षणा मायबाप
९८१४	।।ना.गा.१४९१.००२।।	लावुनि आशा फिरविशी दिशा। प्रेमभाव कैसा दावीं आतां
९८१५	।।ना.गा.१४९१.००३।।	बाळेभोळे जन करिती विनंती । मोकलिसी अंतीं म्हणे नामा

९८१६	।।ना.गा.१४९२.००१।।	अगे तूं माउली संतांची साउली । आठवितां घाली प्रेमपान्हा
९८१७	।।ना.गा.१४९२.००२।।	प्रेमपान्हा पाजी अगे माझे आई । विठाई गे मायी वोरसोनी
९८१८	।।ना.गा.१४९२.००३।।	येतों काकुळती प्रेम पान्ह्यासाठीं । उभा तो धुर्जटी मागें पुढें
९८१९	।।ना.गा.१४९२.००४।।	नामा म्हणे जीवें करीन लिंबलोण । ओवाळिन चरण विटेसहित
९८२०	।।ना.गा.१४९३.००१।।	विठ्ठल माउली कृपेची कोंवळी । आठवितां घाली प्रेमपान्हा
९८२१	।।ना.गा.१४९३.००२।।	मज कां मोकलिलें कवणा निरविलें । कठिण कैसें जालें हृदय तुझें
९८२२	।।ना.गा.१४९३.००३।।	तुजविण जिवलग दुजें कोण होईल । ते माझे साहिल जड भारी
९८२३	।।ना.गा.१४९३.००४।।	तूं माझी माउली मी वो तुझा वत्स । परतों परतों वाट पाहे तुझी
९८२४	।।ना.गा.१४९३.००५।।	माया मोहें कैसी न विसंबे सर्वथा । अंतरींची व्यथा कोण जाणे
९८२५	।।ना.गा.१४९३.००६।।	नामा म्हणे विठ्ठले कां गे रुसलिसी । केव्हां सांभाळिसी अनाथनाथे
९८२६	।।ना.गा.१४९४.००१।।	डोळुले सिणले पाहतां वाटुली । अवस्था दाटली हृदयामाजीं
९८२७	।।ना.गा.१४९४.००२।।	तूं माझी जननी सखिये सांगातिणी । विठ्ठले धांवोनी देईं क्षेम
९८२८	।।ना.गा.१४९४.००३।।	तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । क्षुधें पीडिलों मज विसरलीसी
९८२९	।।ना.गा.१४९४.००४।।	तूं माझी कुरंगिणी मी तुझें पाडस । गुंतलें भवपाश सोडी माझा
९८३०	।।ना.गा.१४९४.००५।।	मी तुझें वत्स तूं माझी गाउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा
९८३१	।।ना.गा.१४९४.००६।।	नामा म्हणे माझी पुरवावी आस । पाजी तान्हुल्यास प्रेमपान्हा
९८३२	।।ना.गा.१४९५.००१।।	येई गे विठ्ठले अनाथाचे नाथे । माझे कुळदैवते पंढरीचे
९८३३	।।ना.गा.१४९५.००२।।	पंच प्राणांचा उजळोनि दीपक । सुंदर श्रीमुख ओवाळीन
९८३४	।।ना.गा.१४९५.००३।।	मनाचा प्रसाद तुजलागीं केला । रंगभोग आपुला घेऊनि राहे
९८३५	।।ना.गा.१४९५.००४।।	आनंदाचा भोग घालिल आसनीं । वैकुंठवासिनी तुझ्या नांवें
९८३६	।।ना.गा.१४९५.००५।।	आपुलें म्हणवावें सनाथ करावें । भावें संचारावें हृदयांत
९८३७	।।ना.गा.१४९५.००६।।	नामा म्हणे माझे पुरवी मनोरथ । देई सदोदित प्रेमकळा
९८३८	।।ना.गा.१४९६.००१।।	कृपावंत समर्थ म्हणूनि करी आर्त । येईन सावरत पांडुरंगे
९८३९	।।ना.गा.१४९६.००२।।	मज कां विसरली विठ्ठल माउली । तनु तृषावली जीवनेंविण
९८४०	।।ना.गा.१४९६.००३।।	तूं माझें जीवन नाम जनार्दन । हृदयीं भरी पूर्ण प्रेमरस
९८४१	।।ना.गा.१४९६.००४।।	अमृताच्या करें कांसवीच्या भरें । कुरवाळीं त्वरें देह माझा

९८४२	।।ना.गा.१४९६.००५।।	पूर्ण पान्हा देई निववी हृदयीं । येई वो कान्हाई सांवळिये
९८४३	।।ना.गा.१४९६.००६।।	नामा म्हणे पावे जीवा शीण न साहे । वेगीं लवलाहे पाजी पान्हा
९८४४	।।ना.गा.१४९७.००१।।	तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे
९८४५	।।ना.गा.१४९७.००२।।	तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे
९८४६	।।ना.गा.१४९७.००३।।	तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडी भवपाश पांडुरंगे
९८४७	।।ना.गा.१४९७.००४।।	तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । चारा घाली मज पांडुरंगे
९८४८	।।ना.गा.१४९७.००५।।	कासवीची दृष्टी सदा बाळावरी । तैसी दया करीं पांडुरंगे
९८४९	।।ना.गा.१४९७.००६।।	नामा म्हणे विठो भक्तीच्या वल्लभा । मागें पुढें उभा सांभाळिसी
९८५०	।।ना.गा.१४९८.००१।।	विसावा विठ्ठल सुखाची साउली । प्रेमपान्हा घाली भक्तांवरी
९८५१	।।ना.गा.१४९८.००२।।	दाखवी चरण दाखवी चरण । दाखवी चरण नारायणा
९८५२	।।ना.गा.१४९८.००३।।	विठ्ठल आचार विठ्ठल विचार । दावीं निरंतर पाय आतां
९८५३	।।ना.गा.१४९८.००४।।	नामा म्हणे नित्य बुडालों संसारीं । धांवोनियां धरीं हातीं मज
९८५४	।।ना.गा.१४९९.००१।।	भुक्ति मुक्ति मागों तुज । तरी मज हांसती पूर्वज
९८५५	।।ना.गा.१४९९.००२।।	मज प्रेम पढियें देवा । न मागें आन कांहीं सेवा
९८५६	।।ना.गा.१४९९.००३।।	मोक्ष मागूं तुजप्रति । संत छलवादें हांसती
९८५७	।।ना.गा.१४९९.००४।।	चाड धरीन ब्रह्मज्ञानीं । तरी मज व्यर्थ व्याली जननी
९८५८	।।ना.गा.१४९९.००५।।	होऊं सिद्धिचा साधितां । दैवें सांडिलें तत्त्वतां
९८५९	।।ना.गा.१४९९.००६।।	नामा म्हणे कांही न मागें । उभा राहेन संतांमागें
९८६०	।।ना.गा.१५००.००१।।	असोनि न दिसे लौकिक वेव्हारीं । ऐसा तूं अंतरीं लपवीं मज
९८६१	।।ना.गा.१५००.००२।।	परि तुझे पायीं माझें अनुसंधान । वरी प्रेमजीवन देईं देवा
९८६२	।।ना.गा.१५००.००३।।	मनाचिया वृत्ति आड तूं राहोनि । झेंपावती झणीं कामक्रोध
९८६३	।।ना.गा.१५००.००४।।	नामा म्हणे ऐसें पाळिसी तूं मातें । मी जीवें तूंतें न विसंबें
९८६४	।।ना.गा.१५०१.००१।।	उडाली पक्षिणी गेली अंतराळीं । चित्त बाळाजवळी ठेवूनियां
९८६५	।।ना.गा.१५०१.००२।।	तैसें माझें मन राहो कां ईश्वरीं । मग सुखें संसारीं असेना का
९८६६	।।ना.गा.१५०१.००३।।	धेनु चरे वनीं वत्स असे घरीं । चित्त वत्सावरी ठेवुनि फिरे
९८६७	।।ना.गा.१५०१.००४।।	दुडीवरी दुडी सखिसी गोष्टी करी । चित्त दुडीवरी ठेवूनियां

९८६८	।।ना.गा.१५०१.००५।।	विष्णुदास नामा विनवी परोपरी । हें प्रेम श्रीहरी द्यावें मज
९८६९	।।ना.गा.१५०२.००१।।	येई वो कृपावंते अनाथांचे नाथे । निवारीं भवव्यथे पांडुरंगे
९८७०	।।ना.गा.१५०२.००२।।	मी बाळक भुकाळु तूं माउली कृपाळु । करीं माझा सांभाळु पंढरिराया
९८७१	।।ना.गा.१५०२.००३।।	माझें माहेर पैं नित्य आठवे अंतरीं । सखा विटेवरी पांडुरंग
९८७२	।।ना.गा.१५०२.००४।।	मी देह तूं चैतन्य मी क्षुधार्त तूं अन्न । मी तृषार्त तूं जीवन पांडुरंगा
९८७३	।।ना.गा.१५०२.००५।।	मी चकोर तूं चंद्र मी सरिता तूं सागर । मी याचक तूं दातार पांडुरंगा
९८७४	।।ना.गा.१५०२.००६।।	मी धनलोभी शुंभ तूं पूर्ण कनक कुंभ । मी मगर तूं अंभ पांडुरंगा
९८७५	।।ना.गा.१५०२.००७।।	मी चातक तूं मेघ मी प्रवृत्ति तूं बोध । मी शुष्क नदी तूं ओघ पांडुरंगा
९८७६	।।ना.गा.१५०२.००८।।	मी दोषी तूं तारक मी भृत्य तूं नायक । मी प्रजा तूं पाळक पांडुरंगा
९८७७	।।ना.गा.१५०२.००९।।	मी पाडस तूं कुरंगिणी मी अंडज तूं पक्षिणी । मी अपत्य तूं जननी पांडुरंगा
९८७८	।।ना.गा.१५०२.०१०।।	मी भक्ति तूं निजसोय मी ध्यान तूं ध्येय । मी आडळ तूं साह्य पांडुरंगा
९८७९	।।ना.गा.१५०२.०११।।	ऐसी जे जे माझी विनंती ते तुजचि लक्ष्मीपती । निज सुख सांगाती पांडुरंगा
९८८०	।।ना.गा.१५०२.०१२।।	शीघ्र येई वो श्रीरंगे भक्त मानस घे गे । प्रेमपान्हा दे गे नामदेवा
९८८१	।।ना.गा.१५०३.००१।।	बहु दिस होतों तुमचा गांवीं । आतां कृपा असों द्यावी
९८८२	।।ना.गा.१५०३.००२।।	आम्ही जातों आपुल्या गांवा । विठोबा लोभ असों द्यावा
९८८३	।।ना.गा.१५०३.००३।।	आमुचे ठायीं तुझें मन । तुझे चरण आमुचे प्राण
९८८४	।।ना.गा.१५०३.००४।।	आमुचें स्मरण असों द्यावें । लिखित पत्र पाठवावें
९८८५	।।ना.गा.१५०३.००५।।	नामा म्हणे जी केशवा । अखंड प्रेमभाव द्यावा
९८८६	।।ना.गा.१५०४.००१।।	प्रेमपिसें भरलें अंगीं । गीतें छंदें नाचों रंगीं
९८८७	।।ना.गा.१५०४.००२।।	कोणे वेळे काय गाणें । हें तो भगवंता मी नेणें
९८८८	।।ना.गा.१५०४.००३।।	वारा धावे भलतेया । तैसी माझी रंगछाया
९८८९	।।ना.गा.१५०४.००४।।	टाळ मृदंग दक्षिणेकडे । आम्ही गातों पश्चिमेकडे
९८९०	।।ना.गा.१५०४.००५।।	बोले बाळक बोबडें । तरी तें जननीये आवडे
९८९१	।।ना.गा.१५०४.००६।।	नामा म्हणे गा केशवा । जन्मोजन्मीं देईं सेवा
९८९२	।।ना.गा.१५०५.००१।।	टाळ दिंडी हातीं उभा महाद्वारीं । नामा कीर्तन करी पंढरिये
९८९३	।।ना.गा.१५०५.००२।।	आवडीचेनि सुखें वोसंडतु प्रेमें। गातों मनोधर्में हरिचे गुण

९८९४	।।ना.गा.१५०५.००३।।	सांडोनि अभिमान नाचे धरोनि कान । अंतरीं ध्यान विठोबाचें
९८९५	।।ना.गा.१५०५.००४।।	श्रीहरिची उत्तम जन्मकर्मनामें । घेतली त्या प्रेमें सुखरूपें
९८९६	।।ना.गा.१५०५.००५।।	संतांची विश्रांति ज्ञानियांचे गुज । जें कां मुक्तिबीज मोक्षदानी
९८९७	।।ना.गा.१५०५.००६।।	कृष्ण विष्णु हरी मुकुंद मुरारी । अच्युता नरहरी नारायणा
९८९८	।।ना.गा.१५०५.००७।।	गोवर्धनधरे गोपी मनोहरे । भक्तकरुणाकरे पांडुरंगा
९८९९	।।ना.गा.१५०५.००८।।	सकळा मंगळनिधी पातकभंजना । हरि जगज्जीवना परमानंदा
९९००	।।ना.गा.१५०५.००९।।	तूंचि एक सकळ आदिमध्यअंतीं । नित्य सुखसंपत्ति सज्जनांची
९९०१	।।ना.गा.१५०५.०१०।।	तूंचि माझा श्रोता तूंचि माझा वक्ता । तूंचि घेतां देतां प्रेमसुख
९९०२	।।ना.गा.१५०५.०११।।	विष्णुदास नामा विनवी पुरुषोत्तमा । सोडवी भवभ्रमां पासूनियां
९९०३	।।ना.गा.१५०६.००१।।	तुझ्या पायीं चित्त रंगलेसें माझें । नाहीं केशिराजें ऐसें केलें
९९०४	।।ना.गा.१५०६.००२।।	उठवितां काय होईल संतोष । मज अभाग्यास मोकलीलें
९९०५	।।ना.गा.१५०६.००३।।	प्रपंच काबाडी न घाली मज दृढ । नको वाडें कोड झणीं देवा
९९०६	।।ना.गा.१५०६.००४।।	नामा म्हणे भावें विनंति समस्तां । नको भंगू आतां प्रेमपान्हा
९९०७	।।ना.गा.१५०७.००१।।	बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले
९९०८	।।ना.गा.१५०७.००२।।	प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई
९९०९	।।ना.गा.१५०७.००३।।	परेहूनि परतें घर । तेथें राहूं निरंतर
९९१०	।।ना.गा.१५०७.००४।।	सर्वांचें जें अधिष्ठान । तेंचि माझें रूप पूर्ण
९९११	।।ना.गा.१५०७.००५।।	नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं
९९१२	।।ना.गा.१५०७.००६।।	सर्व सत्ता आली हातां । नामयाचा खेचर दाता
९९१३	।।ना.गा.१५०८.००१।।	आम्ही तुझे असों एकचि त्या बोधें । नित्य परमानंदें वोसंडित
९९१४	।।ना.गा.१५०८.००२।।	विठ्ठलचि घ्यावा विठ्ठलचि गावा । विठ्ठलचि पहावा सर्वांभूतीं
९९१५	।।ना.गा.१५०८.००३।।	या परतें सुख न दिसे सर्वथा । कल्पकोटी येतां गर्भवास
९९१६	।।ना.गा.१५०८.००४।।	नामा म्हणे चित्तीं विठ्ठलाचें रूप । संकल्प विकल्प मावळले
९९१७	।।ना.गा.१५०९.००१।।	तुझें प्रेम माझे हृदया आवडी । चरण मी न सोडी पांडुरंगा
९९१८	।।ना.गा.१५०९.००२।।	कशासाठीं शीण थोडक्याकारणें। काय तुज उणें होय देवा
९९१९	।।ना.गा.१५०९.००३।।	चंद्र चकोराचा पुरवी सोहळा । काय त्याच्या कळा न्यून होती

९९२०	।।ना.गा.१५०९.००४।।	नामा म्हणे मज अनाथा सांभाळी । हृदयकमळीं स्थिर राहे
९९२१	।।ना.गा.१५१०.००१।।	नामयाचें प्रेम केशवची जाणें । केशवासी राहणें नामयापासीं
९९२२	।।ना.गा.१५१०.००२।।	केशव तोचि नामा नामा तोचि केशव । प्रेमभक्तिभाव मागतसे
९९२३	।।ना.गा.१५१०.००३।।	विष्णुदास नामा उभा केशवद्वारीं । प्रेमाची शिदोरी मागतसे
९९२४	।।ना.गा.१५११.००१।।	प्रेमफांसा घालुनियां गळां । जितें धरिलें गोपाळा
९९२५	।।ना.गा.१५११.००२।।	एक्या मनाची करूनि जोडी । विठ्ठल पायीं घातली बेडी
९९२६	।।ना.गा.१५११.००३।।	हृदय करूनि बंदिखाना । विठ्ठल कोंडुनी ठेविला जाणा
९९२७	।।ना.गा.१५११.००४।।	सोहं शब्दें मार केला । विठ्ठल काकुलती आला
९९२८	।।ना.गा.१५११.००५।।	नामा म्हणे विठ्ठलासी । जीवें न सोडी सायासी
९९२९	।।ना.गा.१५१२.००१।।	विठ्ठल आमुचें सुखाचें जीवन । विठ्ठल स्मरण प्रेमपान्हा
९९३०	।।ना.गा.१५१२.००२।।	विठ्ठलचि ध्यावों विठ्ठलचि गावों । विठ्ठलचि पाहों सर्वांभूतीं
९९३१	।।ना.गा.१५१२.००३।।	विठ्ठलापरतें न दिसे सर्वथा । कल्प येतां जातां गर्भवास
९९३२	।।ना.गा.१५१२.००४।।	नामा म्हणे चित्तीं आहे सुखरूप । संकल्प विकल्प मावळती
९९३३	।।ना.गा.१५१३.००१।।	व्यापकापरीस मन केलें वाड । सांपडलें गोड प्रेमसुख
९९३४	।।ना.गा.१५१३.००२।।	जिकडे पाहें तिकडे विठ्ठल अवघा। भीमा चंद्रभागा पुंडलिक
९९३५	।।ना.गा.१५१३.००३।।	सर्व निरंतरीं सबाह्य अंतरीं । हें ब्रह्मांड पंढरी जाली मज
९९३६	।।ना.गा.१५१३.००४।।	महुरलें तरुवर पुष्पीं फलीं भार । तेंचि निर्विकार सनकादिक
९९३७	।।ना.गा.१५१३.००५।।	आवडीचा आनंदु तोचि विष्णुनादु । अनुभव तो गोविंदु गोपवेषें
९९३८	।।ना.गा.१५१३.००६।।	नामा म्हणे विठो भक्तीच्या वल्लभा । मागें पुढें उभा सांभाळित
९९३९	।।ना.गा.१५१४.००१।।	तूं आकाश मी भूमिका । तूं लिंग मी साळुंका । तूं समुद्र मी चंद्रिका । स्वयें दोन्ही
९९४०	।।ना.गा.१५१४.००२।।	तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजिरी । तूं पांवा मी मोहरी । स्वयें दोन्ही
९९४१	।।ना.गा.१५१४.००३।।	तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिणी । तूं कृष्ण मी रुक्मिणी । स्वयें दोन्ही
९९४२	।।ना.गा.१५१४.००४।।	तूं नदी मी थडी । तूं तारूं मी सांगडी । तूं धनुष्य मी भातोडी। स्वयें दोन्ही
९९४३	।।ना.गा.१५१४.००५।।	तूं वेद मी स्तविता । तूं शास्त्र मी गीता । तूं गंध मी अक्षता । स्वयें दोन्ही
९९४४	।।ना.गा.१५१४.००६।।	नामा म्हणे पुरुषोत्तमा । स्वयें जडलों तुझ्या प्रेमा । मी कुडी तूं आत्मा । स्वयें दोन्ही
९९४५	।।ना.गा.१५१५.००१।।	वारंवार काय विनवावें आतां । समजावें चित्ता आपुलिया

९९४६	।।ना.गा.१५१५.००२।।	तूं काय म्हणसी कंटाळेल हाचि । जाईल उगाचि उठोनियां
९९४७	।।ना.गा.१५१५.००३।।	मजलागीं देवा जासी चुकवोनी । आणिक धरूनि तुजलागीं
९९४८	।।ना.गा.१५१५.००४।।	दृढ भक्तिभाव प्रेमाचा हो दोरा । बांधीन सत्वर तुझे पायीं
९९४९	।।ना.गा.१५१५.००५।।	नामा म्हणे विठो बोल काय आतां । भेटावया सर्वथा यावें बरें
९९५०	।।ना.गा.१५१६.००१।।	संसारषड्चक्रीं पडिलों महाडोहीं । सोडवणें येई पांडुरंगा
९९५१	।।ना.गा.१५१६.००२।।	दवडादवडी धांव दवडादवडी धांव । नको भक्तिभाव पाहों माझा
९९५२	।।ना.गा.१५१६.००३।।	माझी चित्तवृत्ति अज्ञान हे गाई । व्याघ्रें धरिली आहे अहंकारें
९९५३	।।ना.गा.१५१६.००४।।	पंचाननीं मज घेतलें वेढोनि । नेताति काढोनि प्राण माझा
९९५४	।।ना.गा.१५१६.००५।।	गजेंद्राकारणें घातली त्वां उडी । तैसा लवडसवडी पावें मज
९९५५	।।ना.गा.१५१६.००६।।	नामा म्हणे मज तुझाचि आधार । पोसणा डिंगर जन्मोजन्मीं
९९५६	।।ना.गा.१५१७.००१।।	येई हो विठ्ठले भक्तजनवत्सले । करुणा कल्लोळे पांडुरंगे
९९५७	।।ना.गा.१५१७.००२।।	सजलजलदघन पीतांबर परिधान । येई उद्धरणें केशिराजें
९९५८	।।ना.गा.१५१७.००३।।	नामा म्हणे तूं विश्वाची जननी । क्षिराब्धिनिवासनी जगदंबे
९९५९	।।ना.गा.१५१८.००१।।	येई वो विठ्ठले मजलागीं झडकरी । बुडतों भवसागरीं काढी मज
९९६०	।।ना.गा.१५१८.००२।।	आकांत अवसरी स्मरलीसे गजेंद्रें । दीनानाथ ब्रीदें साच केलीं
९९६१	।।ना.गा.१५१८.००३।।	स्मरलीसे संकटीं द्रौपदी वनवासी । धांवोनि आलीसी लवडसवडी
९९६२	।।ना.गा.१५१८.००४।।	प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं । संकटापासोनि राखियेलें
९९६३	।।ना.गा.१५१८.००५।।	नामा म्हणे थोर पीडिलों गर्भवासें । अखंड पाहतुसे वाट तुझी
९९६४	।।ना.गा.१५१९.००१।।	जननिये जिवलगे येवो पांडुरंगे । शिणलों भेटि दे गे एक वेळां
९९६५	।।ना.गा.१५१९.००२।।	त्राहे त्राहे त्राहे कृपादृष्टीं पाहे । येऊनियां राहे हृदयामाजीं
९९६६	।।ना.गा.१५१९.००३।।	वासनेच्या संगें शिणलें माझें चित्त । विषयाचे आघात पडती वरी
९९६७	।।ना.गा.१५१९.००४।।	नाहीं तुझी सेवा केली मनोधर्में । संसार संभ्रमें भ्रांत सदा
९९६८	।।ना.गा.१५१९.००५।।	नाहीं तुझें नाम गाईलें आवडी । वाळली कुवंडी त्रिविधतापें
९९६९	।।ना.गा.१५१९.००६।।	नामा म्हणे आई धांवे लवलाही । बुडतों चिंताडोहीं तारी मज
९९७०	।।ना.गा.१५२०.००१।।	भेटीची आवडी उत्कंठित चित्त । न राहे निवांत एके ठायीं
९९७१	।।ना.गा.१५२०.००२।।	जया देखे तया हेंचि पुसे मात। कां मज पंढरिनाथ बोलविना

९९७२	।।ना.गा.१५२०.००३।।	कृपेचा सागर विठो लोभपर । माझा कां विसर पडिला त्यासि
९९७३	।।ना.गा.१५२०.००४।।	माहेरींची आस दसरा दिवाळी । बाहे ठेवुनि निढळ वाटे पाहे
९९७४	।।ना.गा.१५२०.००५।।	सखे वारकरी पंढरीस जाती । निरोप त्या हातीं पाठवीन
९९७५	।।ना.गा.१५२०.००६।।	निर्बुजला नामा कंठीं धरिला प्राण । करीतसे ध्यान रात्रंदिवस
९९७६	।।ना.गा.१५२१.००१।।	भेटसी केशवा माझिया जिवलगा । ये गा पांडुरंगा मायबापा
९९७७	।।ना.गा.१५२१.००२।।	चित्त निरंतरीं तुझे महाद्वारीं। अखंड पंढरी हृदयीं वसे
९९७८	।।ना.गा.१५२१.००३।।	श्रीमुख साजिरें कुंडलें गोमटीं । तेथें माझी दृष्टी बैसलीसे
९९७९	।।ना.गा.१५२१.००४।।	भेटिचें आरत उत्कंठित चित्त । तुजविण माझें हित कोण करी
९९८०	।।ना.गा.१५२१.००५।।	कटीं कर विटे समचरण साजिरे । देखावया झुरे मन माझें
९९८१	।।ना.गा.१५२१.००६।।	असुवें दाटलीं उभारोनि बाहे । नामा वाट पाहे रात्रंदिवस
९९८२	।।ना.गा.१५२२.००१।।	तूं माझी जननी काय गे साजणी । विठ्ठले धांवोनि भेट देई
९९८३	।।ना.गा.१५२२.००२।।	डोळे माझे शिणले पाहतां वाटोली । अवस्था दाटली हृदयामाजीं
९९८४	।।ना.गा.१५२२.००३।।	मी तुझें पाडस गुंतलों भवपाशीं । माते धीर तुजसी कैसा धरवला
९९८५	।।ना.गा.१५२२.००४।।	तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । क्षुधें पीडिलों मज विसरशी
९९८६	।।ना.गा.१५२२.००५।।	तूं माझी माउली मी तुझें वोरस । पुढती पुढती वास पाहतसे
९९८७	।।ना.गा.१५२२.००६।।	नामा म्हणे विठ्ठले आस पुरवी माझी । ओरसे वेळां पाजीं प्रेमपान्हा
९९८८	।।ना.गा.१५२३.००१।।	मुक्तपण आम्हां नको देवराया । भेटी मज पायां पुरे बापा
९९८९	।।ना.गा.१५२३.००२।।	चतुरपणाची नको मज चाड। प्रेमभाव गोड पुरे बापा
९९९०	।।ना.गा.१५२३.००३।।	खाय भिल्लिणीचीं फळें आवडतीं । काय त्याचे चित्तीं दुजा भाव
९९९१	।।ना.गा.१५२३.००४।।	भावापाशीं देव उभा सर्वकाळ । खेचरानें बळें दाखविला
९९९२	।।ना.गा.१५२३.००५।।	नामा म्हणे मज सद्गुरुची सत्ता । आम्हासि मुक्तता नको बापा
९९९३	।।ना.गा.१५२४.००१।।	तूं माय माउली म्हणोनि आस केली । विठ्ठलें पाहिली वास तुझी
९९९४	।।ना.गा.१५२४.००२।।	मज कां मोकलिलें कवणा निरविलें । कठिण कैसें जालें हृदय तुझें
९९९५	।।ना.गा.१५२४.००३।।	तुजविण जिवलग दुजें कोण होईल । तें माझें जाणेल जडभारी
९९९६	।।ना.गा.१५२४.००४।।	मी दीन अपराधी तुझा शरणागत । तुजविण माझें हित करिल कोण
९९९७	।।ना.गा.१५२४.००५।।	करुणा कल्लोळिणी अमृत संजीवनी । चिंतितो निर्वाणीं पाव वेगीं

९९९८	।।ना.गा.१५२४.००६।।	नामा म्हणे तुजविण जालों परदेशी । केव्हां सांभाळिसी अनाथनाथे
९९९९	।।ना.गा.१५२५.००१।।	भवव्याघ्र देखोनि भ्याले माझे डोळे । जालेसें व्याकुळ चित्त माझें
१००००	।।ना.गा.१५२५.००२।।	पाव गा पाव गा पाव गा विठोबा । पाव गा विठोबा मायबापा
१०००१	।।ना.गा.१५२५.००३।।	तूं भक्त कैवारी कृपाळुवा हरी । येईं गा झडकरी देवराया
१०००२	।।ना.गा.१५२५.००४।।	नामा म्हणे नेणें आन तुजवांचूनि । जनक जननी केशिराजा
१०००३	।।ना.गा.१५२६.००१।।	कां गा मोकलिलें माझिया विठ्ठला । धांवा तुझा केला मायबापा
१०००४	।।ना.गा.१५२६.००२।।	त्रितापें तापलों बहुत पोळलों । चिखलीं पडिलों दीनानाथा
१०००५	।।ना.गा.१५२६.००३।।	यालागीं तुजला भाकितों करुणा । धांवसी निर्वाणा पांडुरंगा
१०००६	।।ना.गा.१५२६.००४।।	नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा । रुक्माईच्या कांता घाली उडी
१०००७	।।ना.गा.१५२७.००१।।	वाढवेळ कां लाविला । कोण्या भक्तें रे गोंविला
१०००८	।।ना.गा.१५२७.००२।।	झडकरी यावें बा विठ्ठला । आळवितां कंठ सोकला
१०००९	।।ना.गा.१५२७.००३।।	वाट पाहें दाही दिशा । जिवीं धरोनि भरंवसा
१००१०	।।ना.गा.१५२७.००४।।	न कळे का धरिले उदास । मज तो वाटती निरास
१००११	।।ना.गा.१५२७.००५।।	केव्हां येईल माझा हरी । आळंगील चहुंकरीं
१००१२	।।ना.गा.१५२७.००६।।	नामा गहिंवरें दाटला । देह धरणिये लोटला
१००१३	।।ना.गा.१५२८.००१।।	जिवलग कोण तुजविण होईल । जें माझें जाणेल जडभारी
१००१४	।।ना.गा.१५२८.००२।।	अन्यायी अपराधी तुम्हां शरणागत । तुजविण हित कोण करी
१००१५	।।ना.गा.१५२८.००३।।	नामा म्हणे आई धावें लवलाही । बुडतों या डोहीं दंभाचिया
१००१६	।।ना.गा.१५२९.००१।।	काय पांडुरंगा सांग म्यां करावें । शरणा कोणा जावें तुम्हांविण
१००१७	।।ना.गा.१५२९.००२।।	वाट पाहतांना भागले लोचन । कठिणच मन केलें तुवां
१००१८	।।ना.गा.१५२९.००३।।	ऐकिली म्यां कानीं कीर्ति तुझी देवा । उठलासे हेवा त्याचि गुणें
१००१९	।।ना.गा.१५२९.००४।।	अनाथ अन्यायी काय मी करीन । दयावंत खूण सांगसी तूं
१००२०	।।ना.गा.१५२९.००५।।	नामा म्हणे आस पूर्ण कीजे देवा । रूपडें दाखवा नेटें पाटें
१००२१	।।ना.गा.१५३०.००१।।	तूं माय माउली आस केली थोरी । वास निरंतरीं पंढरिये
१००२२	।।ना.गा.१५३०.००२।।	स्वरूप दाखवी एक वेळां मज । धरूं नको लाज पांडुरंगा
१००२३	।।ना.गा.१५३०.००३।।	नामा म्हणे तुज भक्तिचिये पैं पिसें । पुरविसी आस दुर्बळाची

१००२४	।।ना.गा.१५३१.००१।।	मयुरध्वज राजा महापापी जाण । उभा नारायण जोडी हात
१००२५	।।ना.गा.१५३१.००२।।	कर्वत आणसि सकळां देखतां। कापिसी तत्त्वता मांस त्याचें
१००२६	।।ना.गा.१५३१.००३।।	कपोतणी मागें पारध्याचा वेष । दावी हृषिकेश रूप त्यासी
१००२७	।।ना.गा.१५३१.००४।।	नामा म्हणे तुझें करणें उचित । कां मज प्रचित न ये देवा
१००२८	।।ना.गा.१५३२.००१।।	अज्ञान बालक कोमाईलें झणीं । जाणे ते जननी तानभूक
१००२९	।।ना.गा.१५३२.००२।।	तैसा मजलागीं होउनि कृपाळ। करी गा सांभाळ अनाथाचा
१००३०	।।ना.गा.१५३२.००३।।	वत्सालागीं धेनु येतसे वोरसे । पान्हा स्तनीं कैसे वोसंडती
१००३१	।।ना.गा.१५३२.००४।।	नामा म्हणे तुज हें न साहे उपमा । मी कुडी तूं आत्मा केशिराजा
१००३२	।।ना.गा.१५३३.००१।।	अनाथ अनाथ म्हणती मा तें । अनाथनाथ म्हणती तू तें
१००३३	।।ना.गा.१५३३.००२।।	आपुलें ब्रीद साच करी । येक वेळा भेटी दे गा मुरारी
१००३४	।।ना.गा.१५३३.००३।।	पतित पतित म्हणती मा तें । पतितपावन म्हणती तू तें
१००३५	।।ना.गा.१५३३.००४।।	नामा म्हणे ऐकें सुजाणा। नाइकसि तरि लाज कवणा
१००३६	।।ना.गा.१५३४.००१।।	तुवां येथें यावें कीं मज तेथें न्यावें । खंती माझ्या जीवें मांडियेली
१००३७	।।ना.गा.१५३४.००२।।	माझें तुजविण येथें नाहीं कोणी । विचारावें मनीं पांडुरंगा
१००३८	।।ना.गा.१५३४.००३।।	नामा म्हणे वेगीं यावें करुणाघना । जातो माझा प्राण तुजलागीं
१००३९	।।ना.गा.१५३५.००१।।	बोलावूं पाठवूं एवढी कैंची शक्ति । या रंगा श्रीपती त्वां बा यावें
१००४०	।।ना.गा.१५३५.००२।।	येई गा विठ्ठला पाहातसें अंता । या रंगा अनंता त्वां बा यावें
१००४१	।।ना.गा.१५३५.००३।।	धांवत त्वां यावें धांवत त्वां यावें । या रंगा नाचावें पांडुरंगा
१००४२	।।ना.गा.१५३५.००४।।	तिन्हीं त्रिभुवनीं तुझीच करणी । ठाव मागे चरणीं नामदेव
१००४३	।।ना.गा.१५३६.००१।।	दुरूनि आलों तुझिया भेटी । सांगावया जिवींच्या गोष्टी गा विठोबा
१००४४	।।ना.गा.१५३६.००२।।	बोल गा बोल मजशी कांहीं । दृष्टी उघडुनी मजकडे पाही गा विठोबा
१००४५	।।ना.गा.१५३६.००३।।	अरे तूं कृपाळु दीनांचा । महा उदार थोर मनाचा गा विठोबा
१००४६	।।ना.गा.१५३६.००४।।	भक्तें पुंडलिकें गोविलासी लोभें । प्रेमें प्रीतीच्या वल्लभें गा विठोबा
१००४७	।।ना.गा.१५३६.००५।।	युगें अठ्ठावीस भरलीं । धणी अजुनी नाहीं पुरली गा विठोबा
१००४८	।।ना.गा.१५३६.००६।।	प्राण होती माझे कासाविस । नामा म्हणे कां धरिलें उदास गा विठोबा
१००४९	।।ना.गा.१५३७.००१।।	कां हो मोकलिलें कवणा निरविलें । कठिण कैसें जालें चित्त तुझें

१००५०	।।ना.गा.१५३७.००२।।	करुणाकल्लोळणी अमृत संजीवनी । चिंतल्या निर्वाणीं पावें वेगीं
१००५१	।।ना.गा.१५३७.००३।।	अपराधी अनाथ जरी जालें अमंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा
१००५२	।।ना.गा.१५३७.००४।।	नामा म्हणे विठ्ठले आलों मी तुजपाशीं । केधवां भेटसी अनाथनाथा
१००५३	।।ना.गा.१५३८.००१।।	कस्तुरीचा टिळा रेखिला कपाळीं । तेणें ते शोभली मूर्ति बरी
१००५४	।।ना.गा.१५३८.००२।।	बरवा बरवा विठ्ठल गे बाई। वर्णावया साही शिणताती
१००५५	।।ना.गा.१५३८.००३।।	श्रीवत्सलांच्छन वैजयंती गळां । नेसला पाटोळा तेज:पुंज
१००५६	।।ना.गा.१५३८.००४।।	पाऊलें समान विटेवरी नीट । नामा म्हणे भेट घ्यावी त्याची
१००५७	।।ना.गा.१५३९.००१।।	नको गा मोकलूं दीना पंढरिनाथा । तुजविण आतां कोण पावे
१००५८	।।ना.गा.१५३९.००२।।	अपराधाच्या पोटीं पाहूं नको कांहीं । ये गे विठाबाई झडकरी
१००५९	।।ना.गा.१५३९.००३।।	माझ्या दोषासाठीं पाठमोरा होसी । पावन ब्रीदासी लागे बोल
१००६०	।।ना.गा.१५३९.००४।।	नामा म्हणे जननी तूंचि चराचर । तारिले अपार जड जीव
१००६१	।।ना.गा.१५४०.००१।।	वेदपरायण मनीं तो ब्राह्मण । चित्त समाधान संतुष्ट सदा
१००६२	।।ना.गा.१५४०.००२।।	येरा माझे नमन सर्वसाधारण । ग्रंथाचें राखण म्हणोनियां
१००६३	।।ना.गा.१५४०.००३।।	शास्त्रपंडित तोचि मी बहुमानी । जो आपणातें जाणोनि तन्मय जाला
१००६४	।।ना.गा.१५४०.००४।।	पुराणिक ऐसा मानितो कृतार्थ । विषयीं विरक्त विधीपाळी
१००६५	।।ना.गा.१५४०.००५।।	मानी तो हरिदास ज्या नामीं विश्वास । मी त्याचा दास देहभावें
१००६६	।।ना.गा.१५४०.००६।।	नामा म्हणे ऐसें कई भेटविसी विठ्ठला । त्यालागीं फुटला प्राण माझा
१००६७	।।ना.गा.१५४१.००१।।	भेटीलागीं माझा फुटतसे प्राण । काया वाचा मनें जीवेंभावें
१००६८	।।ना.गा.१५४१.००२।।	जया देखे तया पुसे हेंचि मात। कैं मज अनंत बोलावील
१००६९	।।ना.गा.१५४१.००३।।	संतसमागमें दसरा दिवाळी । ठेवूनि निढळीं वाहे सदा
१००७०	।।ना.गा.१५४१.००४।।	सखे पंढरीचे येती वारकरी । आर्त निरंतरीं त्यांचे पायीं
१००७१	।।ना.गा.१५४१.००५।।	नामा म्हणे ऐसें करी दंडवत । आमुचे पुनीत करी बापा
१००७२	।।ना.गा.१५४२.००१।।	संसाराचे सोये चुकले बापुडे । केशव मागें पुढें सांभाळित
१००७३	।।ना.गा.१५४२.००२।।	आळीकर नामें खेळे महाद्वारीं। आंतून बाहेरी नवजे कांहीं
१००७४	।।ना.गा.१५४२.००३।।	संतांसी देखोनि मिठी घाली चरणीं । कुरवंडी करूनी देह टाकी
१००७५	।।ना.गा.१५४२.००४।।	ऐसें निज बोधें राहिले निवांत । नामा एकुलते केशवचरणीं

१००७६	।।ना.गा.१५४३.००१।।	तळियाचे पाळीं वृक्षावरी बैसुनी । कैसा चातक बोभाइतो रे । ताहाना फुटे परी उदक नेघे । मेघाची वाट पाही रे
१००७७	।।ना.गा.१५४३.००२।।	तैसा येईं बा कान्हया येईं बा कान्हया । जीवींच्या जीवना केशीराजा रे
१००७८	।।ना.गा.१५४३.००३।।	टाळघोळ कल्लोळ नानापरीचीं वाद्यें । वाजती वोजा रे । रानींच्या मयुरा नृत्या पैं नये । तुजविण मेघराजा रे
१००७९	।।ना.गा.१५४३.००४।।	जळाविण जळचर पक्षीविण पिलियासी । तैसे जालें नामयासी रे । शंखचक्र गदा पद्म पितांबरधारी । अझुनि कां न पावशी रे
१००८०	।।ना.गा.१५४४.००१।।	तुझा विष्णुदास म्हणतात जगीं । नाहीं माझे अंगीं प्रेमभाव
१००८१	।।ना.गा.१५४४.००२।।	तेणें थोर लाज वाटे पंढरिराया । ये माझ्या हृदया एक वेळां
१००८२	।।ना.गा.१५४४.००३।।	द्वैताद्वैत भाव आहे माझे ठायीं । अनुभव नाहीं स्वरूपाचा
१००८३	।।ना.गा.१५४४.००४।।	देखावेखीं बैसे संतांचे संगतीं । नाहीं माझे चित्तीं ध्यान तुझें
१००८४	।।ना.गा.१५४४.००५।।	साकारलें रूप तैं दिसे चर्मचक्षु । परी नाहीं वोळखी केवळ मनें
१००८५	।।ना.गा.१५४४.००६।।	नामा म्हणे माझा उजळ करीं माथा । भेटी देउनी संतां निरवीं मज
१००८६	।।ना.गा.१५४५.००१।।	गरुडावरी हरी बैसोनियां यावें । आम्हांसि रक्षावें दीनबंधू
१००८७	।।ना.गा.१५४५.००२।।	अच्युता केशवा मुकुंदा मुरारी। येईं लवकरी नारायणा
१००८८	।।ना.गा.१५४५.००३।।	ऐकोनियां धांवा धांवला अनंत । उभा गरुडासहित मागें पुढें
१००८९	।।ना.गा.१५४५.००४।।	वैजयंती माळा किरीट कुंडलें । नामयानें केलें लिंबलोण
१००९०	।।ना.गा.१५४६.००१।।	नेत्र माझे रोडले आठवे माहेर । कैं भेटेन निरंतर बाईयांनो
१००९१	।।ना.गा.१५४६.००२।।	चतुर्भुज विठ्ठलु कैं देखेन डोळां। भक्तांचा जिव्हाळा जीव माझा
१००९२	।।ना.गा.१५४६.००३।।	येणें शोकें रे वाळलों शरीरीं । आठवतों हरि मी काय सांगूं
१००९३	।।ना.गा.१५४६.००४।।	चारी भुजा उचलोनि क्षेम देईल । कैं मज नेईल पंढरपुरा
१००९४	।।ना.गा.१५४६.००५।।	काम चित्तीं न लगे आतां कांहीं मज । कैं भेटेल राजा पंढरीचा
१००९५	।।ना.गा.१५४६.००६।।	त्यासि आठवितां हृदय वो फुटे । तो कैं मज भेटे बाप माझा
१००९६	।।ना.गा.१५४६.००७।।	येणें देह न पवती मग काय येउनि करिती । सांगा काकुळती रखुमाईसी
१००९७	।।ना.गा.१५४६.००८।।	वामांगीं रुक्मिणी कैं देखेन दोन्ही नयनीं । फेडीन पारणीं डोळियांची
१००९८	।।ना.गा.१५४६.००९।।	जंव जंव आठवती तंव तंव उघड येती । कोणी न सांगती विठ्ठलासी
१००९९	।।ना.गा.१५४६.०१०।।	ऐसें श्रवणीचें सुख कैंचें न वो देखे । येथें येऊनि बहुतेकें काय करिती
१०१००	।।ना.गा.१५४६.०११।।	गरुडटके अवघे आकाशीं ओळले । येवोनि सांगितलें विष्णुलोकीं
१०१०१	।।ना.गा.१५४६.०१२।।	मग जावोनियां तया ठायां पाहें पंढरिराया । लागेन मी पायां तयाचिये

१०१०२	।।ना.गा.१५४६.०१३।।	याचि लागोनियां आलों लवडसवडी । सांडियेली थडी मग रोखिलासी
१०१०३	।।ना.गा.१५४६.०१४।।	गरुडावरी आरूढ बाप माझा जाला । मज न्यावया आला बाईयांनों
१०१०४	।।ना.गा.१५४६.०१५।।	येणें हर्षें संतोष कोठेंच न माये । भेटला विठ्ठल माये रुक्मिणीसहित
१०१०५	।।ना.गा.१५४६.०१६।।	नामा जातसे माहेरा एकला पंढरपुरा । हरी दातारा संसारा वेगळा करीं
१०१०६	।।ना.गा.१५४७.००१।।	पाहूं द्यारे मज विठोबाचें मुख । लागलीसे भूक डोळां माझ्या
१०१०७	।।ना.गा.१५४७.००२।।	कस्तुरी कुंकुम भरोनियां ताटीं । अंगीं बरवंट गोपाळाचा
१०१०८	।।ना.गा.१५४७.००३।।	जाईजुई पुष्पें गुंफोनियां माळा । घालूं घननीळा आवडीनें
१०१०९	।।ना.गा.१५४७.००४।।	नामा म्हणे विठो पंढरीचे राणे । डोळियां पारणें होत असे
१०११०	।।ना.गा.१५४८.००१।।	तपें केलीं दाटोदाटीं । थोर पुण्याचिया साठीं
१०१११	।।ना.गा.१५४८.००२।।	जन्मोजन्मींचा संकटीं । विठो तुझी जाली भेटी
१०११२	।।ना.गा.१५४८.००३।।	दोन्हीं चरण लल्लाटीं । नामा म्हणे न सोडीं मिठी
१०११३	।।ना.गा.१५४९.००१।।	महिमा अगाध यात्रा कार्तिकीये । आला पंढरीये नामदेव
१०११४	।।ना.गा.१५४९.००२।।	भक्त शिरोमणी पंढरीच्या नाथा । कृपाळुवा माता बाळकासी
१०११५	।।ना.गा.१५४९.००३।।	धन्य नामदेव धन्य नामदेव । जिवीं तुझे पाव न विसंबे
१०११६	।।ना.गा.१५४९.००४।।	भक्त सप्रेम मिळाले अपार । करिती गजर हरिनामीं
१०११७	।।ना.गा.१५४९.००५।।	नटे महाद्वारीं झळके पताका । करिती ब्रह्मादिक पुष्पवृष्टी
१०११८	।।ना.गा.१५४९.००६।।	नामघोष कानीं समस्त ऐकती । पाषाण द्रवती तेणें प्रेमें
१०११९	।।ना.गा.१५४९.००७।।	नामा म्हणे जीव निवालासे येथें । पाहतां विठोबातें श्रमु गेला
१०१२०	।।ना.गा.१५५०.००१।।	ऐसी चाल नाहीं कोठें । नमस्कारा आधीं भेटे
१०१२१	।।ना.गा.१५५०.००२।।	मायबाप निर्विकारीं । सखा नांदतो पंढरीं
१०१२२	।।ना.गा.१५५०.००३।।	देव भक्तपण । नाहीं त्यासी आण
१०१२३	।।ना.गा.१५५०.००४।।	नामा म्हणे आधीं भेटी । मग चरणां घालीन मिठी
१०१२४	।।ना.गा.१५५१.००१।।	बहुत जन्माशेवटीं तुजशीं जाली भेटी । बहु मी हिंपुटी जालों थोर
१०१२५	।।ना.गा.१५५१.००२।।	बहु कीर्ति ऐकिली बहुतांचे मुखीं । बहुत केले सुखी शरणागत
१०१२६	।।ना.गा.१५५१.००३।।	बहुतां आसक्त बहुतां ओळगणा । बहुता विटंबना जाली माझी
१०१२७	।।ना.गा.१५५१.००४।।	बहु फेरे पाहिले बहु दुःख साहिलें । बहु चित्त वाहिलें दुर्भरची

१०१२८	।।ना.गा.१५५१.००५।।	बहुत काळ गेले बहु अन्याय केले । बहु नाहीं जोडिलें नाम तुझें
१०१२९	।।ना.गा.१५५१.००६।।	नामा म्हणे केशवा एक उरली वासना । घ्यावी नारायणा चरणसेवा
१०१३०	।।ना.गा.१५५२.००१।।	तान्हेलिया जाय उदका लागोनी । पारधी देखोनी मुरडे वेगीं
१०१३१	।।ना.गा.१५५२.००२।।	तैसे तुझे चरण विसरलों देवा। संसार केशवा देखोनियां
१०१३२	।।ना.गा.१५५२.००३।।	तैसी परि मज जहाली जाण देवा । नामा उभा केशवा विनवितो
१०१३३	।।ना.गा.१५५३.००१।।	धरोनी हस्तक बैससी एकांतीं । भक्तासी श्रीपती सर्वकाळ
१०१३४	।।ना.गा.१५५३.००२।।	दाखवीं चरण दाखवीं चरण। दाखवीं चरण धांवे नेटें
१०१३५	।।ना.गा.१५५३.००३।।	सर्व आचरण दाविसी प्रकार । कल्पना अंधार निमित्याचा
१०१३६	।।ना.गा.१५५३.००४।।	नामा म्हणे होसी चतुर आपण । आमुचें निर्वाण पाहूं नको
१०१३७	।।ना.गा.१५५४.००१।।	बुद्धिहीन अति करितों हव्यास । उठती उद्देश नाना मतें
१०१३८	।।ना.गा.१५५४.००२।।	एकापुढें एक नासोनियां जाती । सोशिली विपत्ति जन्ममरण
१०१३९	।।ना.गा.१५५४.००३।।	वासनेचें संगें बुडालों मी वायां । चुकवूं नको पायासवें भेटी
१०१४०	।।ना.गा.१५५४.००४।।	नामा म्हणे ऐसे गेले बहुतेक । वैकुंठनायका तारीं मज
१०१४१	।।ना.गा.१५५५.००१।।	अठ्ठाविस युगें उभा विटेवरी । मुद्रा अगोचरीं लावूनियां
१०१४२	।।ना.गा.१५५५.००२।।	ध्यान विसर्जन केधवां करिसी । नेणवे कोणासी ब्रह्मादिकां
१०१४३	।।ना.गा.१५५५.००३।।	पहातां तुजकडे माझें मीपण उडे । भेदाचें सांकडें हारपलें
१०१४४	।।ना.गा.१५५५.००४।।	तुजपाशीं असतां मुकिजे जीवित्वा । ठकले तत्त्वतां नेणों किती
१०१४५	।।ना.गा.१५५५.००५।।	नामा म्हणे स्वामी कृपादृष्टि पाहें । मन पायीं राहे ऐसें कीजे
१०१४६	।।ना.गा.१५५६.००१।।	माझी कोण गति सांग पंढरिनाथा । तारिसी अनाथ कीं बुडविसी
१०१४७	।।ना.गा.१५५६.००२।।	मनापासोनियां सांग मजप्रती । पुसे काकुळती जीवाचिये
१०१४८	।।ना.गा.१५५६.००३।।	न बोलसी कां रे धरिला अबोला । कोणासी विठ्ठला शरण जाऊं
१०१४९	।।ना.गा.१५५६.००४।।	कोणासी सांकडें घालावें हें सांग । नको करूं राग दीनावरी
१०१५०	।।ना.गा.१५५६.००५।।	बाळकासी जैसी एकचि वो माये । तैसे तुझे पाये आम्हांलागीं
१०१५१	।।ना.गा.१५५६.००६।।	नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा । कृपाळुवा कांता रखुमाईच्या
१०१५२	।।ना.गा.१५५७.००१।।	नेत्र तान्हेले पाजीं पाणी । पंढरिचे मायबहिणी
१०१५३	।।ना.गा.१५५७.००२।।	बाळ पालकीं करी सोर । माते आला निद्राभर

१०१५४	।।ना.गा.१५५७.००३।।	जागी न होसी गे माये । प्राण जातो करूं काये
१०१५५	।।ना.गा.१५५७.००४।।	नामा म्हणे चक्रपाणि । चरणीं घातली लोळणी
१०१५६	।।ना.गा.१५५८.००१।।	पक्षिणी प्रभाते चारियासी जाये । पिलें वाट पाही उपवासी
१०१५७	।।ना.गा.१५५८.००२।।	तैसें माझें मन करी वो तुझी आस । चरण रात्रंदिवस चिंतितसे
१०१५८	।।ना.गा.१५५८.००३।।	तान्हें वत्स घरीं बांधलेंसे दावा । तया हृदयीं धांवा माउलीचा
१०१५९	।।ना.गा.१५५८.००४।।	नामा म्हणे केशवा तूं माझा सोईरा । झणें मज अव्हेरा अनाथनाथा
१०१६०	।।ना.गा.१५५९.००१।।	रात्रंदिवस खंती वाटे माझे जीवीं । अनुदिनीं आठवीं चरण तुझे
१०१६१	।।ना.गा.१५५९.००२।।	ने रे पांडुरंगा आपुलिया गांवा । तूं माझा विसावा जिवलग
१०१६२	।।ना.गा.१५५९.००३।।	मी येक येकट रंकाहूनि रंक । त्रिभुवननायक कीर्ती तुझी
१०१६३	।।ना.गा.१५५९.००४।।	मी तुझें पोसणें दास पैं दुर्बळ । तूं दीनदयाळ स्वामी माझा
१०१६४	।।ना.गा.१५५९.००५।।	तुझें मी अनाथ चरणीं ठेवीं माथा । सांभाळीं सर्वथा ब्रीद तुझें
१०१६५	।।ना.गा.१५५९.००६।।	नामा म्हणे विठो जालों कासावीस । पुरवी माझी आस मायबापा
१०१६६	।।ना.गा.१५६०.००१।।	बाळका स्तनपान करविते माता । टाळितां परता चरणीं लोळे
१०१६७	।।ना.गा.१५६०.००२।।	हातीं घेऊनि शिपटीं माय लागे पाठीं । चरणीं घाली मिठी परते नोहे
१०१६८	।।ना.गा.१५६०.००३।।	तैसें माझें मन तुजलागीं देवा । न विसंबे केशवा क्षणभरी
१०१६९	।।ना.गा.१५६०.००४।।	चातक तेथें पाणी तृषाक्रांत वनीं । वाट पाहे गगनीं जीवनाची
१०१७०	।।ना.गा.१५६०.००५।।	निराळेंचि पीयुष वर्षे तयालागीं । आळवितां वेगीं मेघराया
१०१७१	।।ना.गा.१५६०.००६।।	वाळलें हें तृण न संडी हो क्षीर । तैसें भक्तीं स्थिर मन राहे
१०१७२	।।ना.गा.१५६०.००७।।	नामा म्हणे या जन्माचिया साठीं । चरणीं घाली मिठी परता नोहे
१०१७३	।।ना.गा.१५६१.००१।।	युक्तिप्रयुक्तिचें प्रमाण मी नेणें । केशवचरणें ध्यातों मनीं
१०१७४	।।ना.गा.१५६१.००२।।	आणिक साधन काय म्यां करावें । ब्रह्मादिक देव मौन ठेले
१०१७५	।।ना.गा.१५६१.००३।।	आतां मी कायसा करावा आधार । चरण निर्धार देवपूजा
१०१७६	।।ना.गा.१५६१.००४।।	नामा म्हणे तुझा अंत नाहीं पार । काय म्यां पामर जाणों आतां
१०१७७	।।ना.गा.१५६२.००१।।	जाणिव शाहणीव वाहियेलें वोझें । तेणें चरण तुझें अंतरले
१०१७८	।।ना.गा.१५६२.००२।।	मज नेणतेंचि करी मज हरि । या लौकिकाबाहेरी काढी मज
१०१७९	।।ना.गा.१५६२.००३।।	तुझिया नामाचें मज लागो पिसें । देहीं देह न दिसे ऐसें करी

१०१८०	।।ना.गा.१५६२.००४।।	नामा म्हणे तुज जाणसी तरी येकचि जाण । रहित कारण कल्पनेचें
१०१८१	।।ना.गा.१५६३.००१।।	तुझें प्रेम माझ्या दाखवीं मनातें । मग तुझ्या चरणातें न विसंबें
१०१८२	।।ना.गा.१५६३.००२।।	कासया शिणविसी थोडिया कारणें । काय तुझें उणें होईल देवा
१०१८३	।।ना.गा.१५६३.००३।।	चातकाची तहान पुरवी जळधर । काय त्याची थोरी जाऊं पाहे
१०१८४	।।ना.गा.१५६३.००४।।	चंद्र चकोराचा पुरवी सोहोळा । काय त्याच्या कळा न्यून होती
१०१८५	।।ना.गा.१५६३.००५।।	कूर्मी अवलोकीं आपुलिया बाळा । काय तिच्या डोळां दृष्टि नासे
१०१८६	।।ना.गा.१५६३.००६।।	नामा म्हणे देवा तुझाचि भरंवसा । अनाथा कुंवसा होसी तूंचि
१०१८७	।।ना.गा.१५६४.००१।।	देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो
१०१८८	।।ना.गा.१५६४.००२।।	चरण न सोडी सर्वथा । तुझी आण पंढरीनाथा
१०१८९	।।ना.गा.१५६४.००३।।	वदनीं तुझें मंगळनाम । अखंड सदोदित प्रेम
१०१९०	।।ना.गा.१५६४.००४।।	जैसा तैसा असेल भाग । तैसा तैसा घडेल योग
१०१९१	।।ना.गा.१५६४.००५।।	नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवी माझा
१०१९२	।।ना.गा.१५६५.००१।।	माथां मोरपिसा वेढी । श्रवणीं कुंडलें पदक कंठीं । हातीं घेऊनी वेताटी । गोधना पाठीं लागले
१०१९३	।।ना.गा.१५६५.००२।।	तुझीं पाउलें अनंता । न विसंबे गा सर्वथा । गोविंदा माधवा अच्युता । श्री विठ्ठला
१०१९४	।।ना.गा.१५६५.००३।।	गाई गोवळी पावला । येक म्हणती वळावळा । विष्णुदास नामा चरणाजवळा । अखंड वळत्या देतसे
१०१९५	।।ना.गा.१५६६.००१।।	ऐसें माझें मना येतें पंढरीनाथा । न सोडी सर्वथा चरण तुझे
१०१९६	।।ना.गा.१५६६.००२।।	यासि काय करूं सांगा जी गोपाळा । कां स्नेह लावियेला पूर्वीहुनी
१०१९७	।।ना.गा.१५६६.००३।।	हृदयीं चित्तवृत्ति मनेंसि मिळोनी । अवघीं तुझ्या चरणीं सुरवाडिलीं
१०१९८	।।ना.गा.१५६६.००४।।	नामा म्हणे केशवा धरिली तुझी सेवा । सुखा अनुभवा अनुभविलें
१०१९९	।।ना.गा.१५६७.००१।।	कोण होईल आत्मज्ञानी । जो बा राहे त्याच्या ध्यानीं
१०२००	।।ना.गा.१५६७.००२।।	मज तो चरणांची आवडी । जन्मोजन्मीं मी न सोडी
१०२०१	।।ना.गा.१५६७.००३।।	होईल सिद्धीचा साधक । त्यासी देई स्वर्गसुख
१०२०२	।।ना.गा.१५६७.००४।।	कोण होईल देहातीत । त्यासी करी संगरहित
१०२०३	।।ना.गा.१५६७.००५।।	नामा म्हणे जीवें साठीं । तुज मज जन्में पडिली गांठी
१०२०४	।।ना.गा.१५६८.००१।।	ब्रह्म अविनाश आणि आनंदघन । त्याहुनि चरण गोड तुझे
१०२०५	।।ना.गा.१५६८.००२।।	तें जीवें न सोडी अगा पंढरीनाथा। जाणसी तत्त्वतां हृदय माझें

१०२०६	।।ना.गा.१५६८.००३।।	परात्पर वस्तु ध्याईजे अपारापार । त्यांचे हें जिव्हार पाय तुझे
१०२०७	।।ना.गा.१५६८.००४।।	सच्चिदानंदघन जेथें हरपे मन । त्याहूनि चरण गोड तुझे
१०२०८	।।ना.गा.१५६८.००५।।	नामा म्हणे तुझें पाउल हें सार । तें माझें माहेर विटेवरी
१०२०९	।।ना.गा.१५६९.००१।।	तुझिया चरणाचें तुटतां अनुसंधान । जाती माझे प्राण तत्क्षणीं
१०२१०	।।ना.गा.१५६९.००२।।	मग हें ब्रह्मज्ञान कोणापें सांगसी । विचारीं मानसीं केशिराजा
१०२११	।।ना.गा.१५६९.००३।।	वदनीं तुझें नाम होतांचि खंडणा । शतखंडरसना होईल माझी
१०२१२	।।ना.गा.१५६९.००४।।	सांवळें सुंदर रूप तुझें दृष्टीं । न देखतां उन्मळती नेत्र माझे
१०२१३	।।ना.गा.१५६९.००५।।	तुज परतें साध्य आणिक साधन । साधक माझें मन होईल भ्रांत
१०२१४	।।ना.गा.१५६९.००६।।	नामा म्हणे केशवा अनाथाचा नाथ । झणीं माझा अंत पाहसी देवा
१०२१५	।।ना.गा.१५७०.००१।।	देवा माझें मन करोनि स्वाधीन । निमोले स्वामीपण भोगिसीना
१०२१६	।।ना.गा.१५७०.००२।।	फुकाचा कामारा वोळगे निरंतर । न घाली तुज भार कल्पनेचा
१०२१७	।।ना.गा.१५७०.००३।।	तुज नलगे देणें मज नलगे मागणें । असेन अनुसंधानें चरणाचेनि
१०२१८	।।ना.गा.१५७०.००४।।	नामा म्हणे केशवा तूं सर्व जाणता । समयींच्या उचिता चुकों नको
१०२१९	।।ना.गा.१५७१.००१।।	तुझिये चरणीं असती दोनी भाव । तरीच हा जीव नरककुंडीं
१०२२०	।।ना.गा.१५७१.००२।।	बोल बोले एक मनीं असे आणिक । तरी तयासी देख दोनी बाप
१०२२१	।।ना.गा.१५७१.००३।।	तुजविण सुख आणिकांचें मानी । तरी मज जननी दोनी देवा
१०२२२	।।ना.गा.१५७१.००४।।	नामा म्हणे माझा सत्याचा साहाकारी । आस मी न करी आणिकांची
१०२२३	।।ना.गा.१५७२.००१।।	पाहुनि न दिसे लौकिक वेव्हारीं । ऐसा तूं अंतरीं लावीं मज
१०२२४	।।ना.गा.१५७२.००२।।	परि तुझ्या चरणीं माझें अनुसंधान । तरी प्रेम पावन देईं देवा
१०२२५	।।ना.गा.१५७२.००३।।	मनाचिये वृत्तीं अखंड तूं राहोनी । झेंपावती झणीं कामक्रोध
१०२२६	।।ना.गा.१५७२.००४।।	नामा म्हणे ऐसे पावसी तूं मातें। तरी मी जीवें तूतें न विसंबें
१०२२७	।।ना.गा.१५७३.००१।।	तुझे पायीं माझ्या मनें दिली बुडी । इंद्रियें बापुडीं वेडावलीं
१०२२८	।।ना.गा.१५७३.००२।।	आतां विषयसुख जाणावें कवणें । जाणोनि भोगणें कवणें स्वामी
१०२२९	।।ना.गा.१५७३.००३।।	देह सहज स्थिति राहिले निष्काम । हृदयीं सदा प्रेम ओसंडत
१०२३०	।।ना.गा.१५७३.००४।।	नामा म्हणे देवा भक्तजनवत्सला । क्षण जीवावेगळा न करीं मज
१०२३१	।।ना.गा.१५७४.००१।।	आतां होणार तें होवो पंढरीनाथा । न सोडी सर्वथा चरण तुझे

१०२३२	।।ना.गा.१५७४.००२।।	हृदयीं तुझें ध्यान वाचे जपें नाम । हाचि नित्यनेम सर्व माझा
१०२३३	।।ना.गा.१५७४.००३।।	आम्हीं तुझी देवा धरियेली कांस । न करी उदास पांडुरंगा
१०२३४	।।ना.गा.१५७४.००४।।	नामा म्हणे देवा भक्तजनवत्सला । क्षण जीवावेगळा न करी मज
१०२३५	।।ना.गा.१५७५.००१।।	विषय तडातोडी करि माझे मन । राहिलें म्हणोन तुझे पाईं
१०२३६	।।ना.गा.१५७५.००२।।	नको नको देवा वासनेचा संग। मज आला दुभंग नारायणा
१०२३७	।।ना.गा.१५७५.००३।।	कामक्रोधलोभ वैरी पाठी लागियेती । झणीं त्याचे हातीं देसी मज
१०२३८	।।ना.गा.१५७५.००४।।	नामा म्हणे होसी अनाथ कोंवसा । ब्रीदें जगदीशा वर्णिताती
१०२३९	।।ना.गा.१५७६.००१।।	अपत्याचें हित किजे त्या जनकें । जरी वेडें मुकें जालें देख
१०२४०	।।ना.गा.१५७६.००२।।	तैसें मी पोसणें तुझे जिवलग। अंतरींची सांग खूण कांहीं
१०२४१	।।ना.गा.१५७६.००३।।	राखीन मी नांव तुझें सर्वभावें । चित्त वित्त बळी देईन पायीं
१०२४२	।।ना.गा.१५७६.००४।।	जरी दैवहीन म्हणसी मजला । तरी लाज कवणाला म्हणे नामा
१०२४३	।।ना.गा.१५७७.००१।।	देह जावो हेंचि घडी । पाय हरिचे न सोडी
१०२४४	।।ना.गा.१५७७.००२।।	क्लेश होत नानापरी । वाचे रामकृष्ण हरी
१०२४५	।।ना.गा.१५७७.००३।।	नाचूं वैष्णवांचे मेळीं । हांक विठ्ठल आरोळी
१०२४६	।।ना.गा.१५७७.००४।।	नामा म्हणे विठोबासी । जें तें घडो या देहासी
१०२४७	।।ना.गा.१५७८.००१।।	माझें सर्व भाग्य केशवाचे पाय । आणिक उपाय नेणों आम्ही
१०२४८	।।ना.गा.१५७८.००२।।	पक्षी अवचित अंगणांत आला । घेऊनिया गेला चारा तेणें
१०२४९	।।ना.गा.१५७८.००३।।	हाटकरी आम्ही हाटासी पैं गेलों । फिरोनियां आलों गांवामाजीं
१०२५०	।।ना.गा.१५७८.००४।।	नामा म्हणे नमूं सर्व जीवजंत । दिसे ते अनंत दृष्टीपुढें
१०२५१	।।ना.गा.१५७९.००१।।	मायबापाची ते सांडुनियां आस । धरिली तुझी कांस पांडुरंगा
१०२५२	।।ना.गा.१५७९.००२।।	झणीं पांडुरंगा उपेक्षिसी मातें । तरी हांसतील तूंतें संतजन
१०२५३	।।ना.गा.१५७९.००३।।	नामा म्हणे तुझीं पाउलें समान । तेथें माझें मन स्थिरावलें
१०२५४	।।ना.गा.१५८०.००१।।	तुजवांचोनि कांही गोड न वाटे जीवा । मज दिव्य केशवा पाय तुझे
१०२५५	।।ना.गा.१५८०.००२।।	लौकिकापासुनि कधीं सोडविसी । सांग हृषिकेशी उघडोनि
१०२५६	।।ना.गा.१५८०.००३।।	तुझे पाय दिव्य तुझे पाय दिव्य । तुझें पाय दिव्य रे दातारा
१०२५७	।।ना.गा.१५८०.००४।।	नामा म्हणे जिव्हे काढीन मी रवा । तुझें पाय केशवा दिव्य मज

१०२५८	।।ना.गा.१५८१.००१।।	तुझिया पायांचे प्रमाण हें माझें । चरण कमळ तुझे विसंबेना
१०२५९	।।ना.गा.१५८१.००२।।	संसाराच्या गोष्टी कीट जाले पोटीं । रामकृष्ण कंठी माळ घाल
१०२६०	।।ना.गा.१५८१.००३।।	दुरोनियां देखें गरूडाचें वारिकें । गोपाळा सारिखे चतुर्भुज
१०२६१	।।ना.गा.१५८१.००४।।	नामा म्हणे विठो जन्मजन्मांतरी । ऋणि करूनि करीं घेई मज
१०२६२	।।ना.गा.१५८२.००१।।	किती देवा तुला यावें काकुलती । काय या संचितीं लिहिलें असे
१०२६३	।।ना.गा.१५८२.००२।।	केली कां हो सांडी माझी हृषिकेशी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं
१०२६४	।।ना.गा.१५८२.००३।।	ब्रीदाचा तोडर गर्जे त्रिभुवनीं । तूंचि एक धनी त्रैलोक्याचा
१०२६५	।।ना.गा.१५८२.००४।।	समूळ घेतला पृथ्वीचा भार । माझाचि जोजार काय तुला
१०२६६	।।ना.गा.१५८२.००५।।	नको पाहूं अंत पांडुरंगे आई । नामा विठोपायीं मिठी घाली
१०२६७	।।ना.गा.१५८३.००१।।	गाणीं मी गाईलों भाटीं वाखाणिलों । जन्मोनियां जालों दास तुझा
१०२६८	।।ना.गा.१५८३.००२।।	आतां माझी लाज राखे नारायणा । झणीं केविलवाणा दिसों देसी
१०२६९	।।ना.गा.१५८३.००३।।	माये दुऱ्हाविलों मोहें मोकलिलों । सोये पैं चुकलों संसाराची
१०२७०	।।ना.गा.१५८३.००४।।	आपवर्गीं सांडिलों गोत्रजां तुटलों । येवोनि विनटलों तुझें पायीं
१०२७१	।।ना.गा.१५८३.००५।।	षड्वर्गीं सांडिलों प्रवृत्ती दंडिलों । मीपणा मुकलों मायबापा
१०२७२	।।ना.गा.१५८३.००६।।	नामा म्हणे तुझ्या चरणाची आवडी । लागली न सोडी चित्त माझें
१०२७३	।।ना.गा.१५८४.००१।।	हातीं विणा मुखीं हरी । गाये राउळाभीतरीं
१०२७४	।।ना.गा.१५८४.००२।।	अन्न उदक सोडिलें । ध्यान देवाचें लागलें
१०२७५	।।ना.गा.१५८४.००३।।	स्त्री पुत्र बाप माय । यांचा आठव न होय
१०२७६	।।ना.गा.१५८४.००४।।	देहभाव विसरला । छंद हरीचा लागला
१०२७७	।।ना.गा.१५८४.००५।।	नामा म्हणे हेंचि देई । तुझे पाय माझे डोयीं
१०२७८	।।ना.गा.१५८५.००१।।	पाहतां तुझे चरण हरली भवव्यथा । पुढतीं एक चिंता वाटतसे
१०२७९	।।ना.गा.१५८५.००२।।	झणीं मुक्तिपद देसी पांडुरंगा । मग या संतसंगा कोठें पाहूं
१०२८०	।।ना.गा.१५८५.००३।।	मग हे पंढरी आनंद सोहळा । कवणाचे डोळां पाहूं देवा
१०२८१	।।ना.गा.१५८५.००४।।	मग हे हरिकथा अमृत संजीवनी । कवणाचे श्रवणीं ऐकों देवा
१०२८२	।।ना.गा.१५८५.००५।।	नामा म्हणे मज पंढरीची सोये । अनंत जन्म होये याचिलागीं
१०२८३	।।ना.गा.१५८६.००१।।	देवा माझें मन आणि तुझे चरण । एकत्र करोन दिधली गांठी

१०२८४	।।ना.गा.१५८६.००२।।	होणार तें हो गा सुखें पंढरीनाथा । कासया शिणतां वायांविण
१०२८५	।।ना.गा.१५८६.००३।।	माझिया अदृष्टी ऐसेंचि पैं आहे । सेवावें तुझे पाय जन्मोजन्मीं
१०२८६	।।ना.गा.१५८६.००४।।	असतां निरंतर येणें अनुसंधानें । प्रारब्ध भोगणें गोड वाटे
१०२८७	।।ना.गा.१५८६.००५।।	हृदयीं तुझे रूप वदनीं तुझें नाम । बुद्धी हे निष्काम धरिली देवा
१०२८८	।।ना.गा.१५८६.००६।।	नामा म्हणे तुझीं पाउलें चिंतितां । जाली कृतकृत्यता जन्मोजन्मीं
१०२८९	।।ना.गा.१५८७.००१।।	तुझिया चरणाची न संडी मी आस । मग होत गर्भवास कोटिवरी
१०२९०	।।ना.गा.१५८७.००२।।	हेंचि मज द्यावें जन्मजन्मांतरीं। वाचे नरहरी नाम तुझें
१०२९१	।।ना.गा.१५८७.००३।।	कृपेचें पोसणें मी गा येक दिन । माझा अभिमान न सांडावा
१०२९२	।।ना.गा.१५८७.००४।।	तुझिया नामाचा करीन विसावा । मनाचा हा ठेवा तुझे पायीं
१०२९३	।।ना.गा.१५८७.००५।।	नामा म्हणे माझे हेचि मनोरथ । होईन शरणागत जन्मोजन्मीं
१०२९४	।।ना.गा.१५८८.००१।।	सांडोनि अभिमान जालों शरणागत । ऐसियाचा अंत पहासी काई
१०२९५	।।ना.गा.१५८८.००२।।	माझे गुणदोष मनीं गा न धरीं । पतित पावन जरी म्हणविसी
१०२९६	।।ना.गा.१५८८.००३।।	पडविलिया पापराशी झणीं देसी देवा । हे लाज केशवा कोणास जी
१०२९७	।।ना.गा.१५८८.००४।।	नामा म्हणे देवा चतुरा शिरोमणी । निकुरा जासी झणीं मायबापा
१०२९८	।।ना.गा.१५८९.००१।।	जाणसीं तें करीं कृपाळुवा हरी । लाज सर्वांपरी आहे तुज
१०२९९	।।ना.गा.१५८९.००२।।	आरूष साबडें मी कांहीं नेणें वेडें । जन्मोनि सांकडें केलें तुज
१०३००	।।ना.गा.१५८९.००३।।	बहुकिर्ती ऐकिली बहुतांचे मुखीं । बहुत केले सुखी शरणागत
१०३०१	।।ना.गा.१५८९.००४।।	नाहीं तुझी सेवा केली मनोभावें । लोभ दंभ गर्व भ्रांति सदा
१०३०२	।।ना.गा.१५८९.००५।।	नामा म्हणे मज होताती विपत्ती । सोडवीं श्रीपति येथोनियां
१०३०३	।।ना.गा.१५९०.००१।।	भिऊनि निघिजे समर्थाचे पोटीं । विषयांची तो भेटी नको मज
१०३०४	।।ना.गा.१५९०.००२।।	तैसा मी शरण आलों रे केशवा । मज त्वां राखावें पायांतळीं
१०३०५	।।ना.गा.१५९०.००३।।	नको उदासीन राखों अभिमान । माझें आगमन विचारीं कां
१०३०६	।।ना.गा.१५९०.००४।।	तुझेनि होईल तेंच मी मागेन । न सोडीं चरण अहर्निशीं
१०३०७	।।ना.गा.१५९०.००५।।	अविद्या अपार संचरली देवा । आम्हासि कुढावा नाहीं कोणी
१०३०८	।।ना.गा.१५९०.००६।।	देवा आतां मज नको गर्भवास । नामा विष्णुदास विनवितसे
१०३०९	।।ना.गा.१५९१.००१।।	वासनेचा फांसा पडिला माझे कंठीं । हिंडलों जगजेठी नाना योनी

१०३१०	।।ना.गा.१५९१.००२।।	सोडवीं गा देवा दीनदयानिधी । मी एक अपराधी दास तुझा
१०३११	।।ना.गा.१५९१.००३।।	शरण आलियाचे न पाहसी अवगुण । कृपेचें लक्षण तुज साजे
१०३१२	।।ना.गा.१५९१.००४।।	त्रिभुवनीं समर्थ उदार मनाचा । कृपाळू दीनांचा ब्रीद तुझें
१०३१३	।।ना.गा.१५९१.००५।।	गजेंद्र गणिकेची राखिली तुवां लाज । उद्धरिला द्विज अजामेळ
१०३१४	।।ना.गा.१५९१.००६।।	नामा म्हणे देवा अव्हेरितां मज । जगीं थोर लाज येईल तूंतें
१०३१५	।।ना.गा.१५९२.००१।।	देवा तुझी अवज्ञा घडे । तयाचे दास होती वांकुडे । व्याधिविण देह पीडे । बुडे सागरीं चिंतेच्या
१०३१६	।।ना.गा.१५९२.००२।।	देवा तूं होसी उदासीन । तरी हांसती सकळैक जन । जेथें जाय तेथें होय अपमान । जगाधीन होऊनि ठाके
१०३१७	।।ना.गा.१५९२.००३।।	देवा तूं नाहींस जयाचें चित्तीं । सोनें धरिल्या होये माती । पीक न पिके तयाचे शेती । पेंवीं पाणी रिघतसे
१०३१८	।।ना.गा.१५९२.००४।।	सेवा करी जयाचे घरीं । तींचि होती पाठमोरीं । इष्टमित्र सज्जन सोयरीं । आप्त वैरी होऊनि ठाके
१०३१९	।।ना.गा.१५९२.००५।।	ठेवा ठेविला चुके आपण । मागतोचि मागे जाण । सत्यास घडे आपदास्तपण । बोले तितुकें लटिकेची
१०३२०	।।ना.गा.१५९२.००६।।	ऐसा अनुभव घडला मज । म्हणोनि बा शरण आलों तुज । नामा म्हणे केशिराज । कृपा करीं दातारा
१०३२१	।।ना.गा.१५९३.००१।।	तुज गीतीं गातां न येसी पांडुरंगा । प्रेमेंचि दडूं गा पायांपाशीं
१०३२२	।।ना.गा.१५९३.००२।।	वांकडें तिकडे जैसें आलें तैसें । गावया उल्हास उगवला
१०३२३	।।ना.गा.१५९३.००३।।	त्याचि तोचि बरे तोंडा आलें तें बोलतों । नाम मुखीं घेतों अखंडित
१०३२४	।।ना.गा.१५९३.००४।।	तुझा म्हणवितों सांभाळावें देवा । नामया केशवा सर्वकाळ
१०३२५	।।ना.गा.१५९४.००१।।	अपराधाच्या कोडी हेचि माझी जोडी । पतितपावन प्रौढी तुझी देवा
१०३२६	।।ना.गा.१५९४.००२।।	माझिया निदैवें ऐसेंचि घडलें । तूं तंव आपुलें न संडिसी
१०३२७	।।ना.गा.१५९४.००३।।	सहस्र अपराध घालीं माझे पोटीं । तारीं जगजेठी नामा म्हणे
१०३२८	।।ना.गा.१५९५.००१।।	देवा माझें मन ठेवीं तुझें चरणीं । घालीं माझे नयनीं रूप तुझें
१०३२९	।।ना.गा.१५९५.००२।।	मज या लोकांचा शीण असे मनांत । तुजचि चिंतित हृदयकमळीं
१०३३०	।।ना.गा.१५९५.००३।।	चंदनाच्या अंगी वेधलें तरूवर । सबाह्य अभ्यंतर काय जालें
१०३३१	।।ना.गा.१५९५.००४।।	सरिता सिंधुमाजी मिळोनि लपाली । सागरची जाली एकसरें
१०३३२	।।ना.गा.१५९५.००५।।	लवण जळाचें प्रसिद्धचि असे । ऐक्यभावें वसे न दिसे कांहीं
१०३३३	।।ना.गा.१५९५.००६।।	नामा म्हणे शरण आलों केशिराजा । ऐसा भावो माझा करी वेगीं
१०३३४	।।ना.गा.१५९६.००१।।	तत्त्व पुसावया गेलों वेदज्ञासी । तंव भरले त्यापासीं विधिनिषेध
१०३३५	।।ना.गा.१५९६.००२।।	तया समाधान नुपजे कदा काळीं । अहंकार बळी जाला तेथें

१०३३६	।।ना.गा.१५९६.००३।।	म्हणोनि तुझें नाम धरिलें शुद्धभावें । उचित करावें पांडुरंगा
१०३३७	।।ना.गा.१५९६.००४।।	स्वरूप पुसावया गेलों शास्त्रज्ञासी । तंव भरले तयापाशीं भेदाभेद
१०३३८	।।ना.गा.१५९६.००५।।	एकएकाचिया न मिळती मतासी । भ्रांत गर्वराशि भुलले सदा
१०३३९	।।ना.गा.१५९६.००६।।	पुराणिकासी पुसूं स्वरूपाची स्थिति । तंव त्यासी विश्रांति नाहीं कोठें
१०३४०	।।ना.गा.१५९६.००७।।	विषयीं ठेवुनि मन सांगती ब्रह्मज्ञान । तेणें समाधान नुपजे कदा
१०३४१	।।ना.गा.१५९६.००८।।	हरिदासासी पुसूं भक्तीचा उपाव । तंव तयापाशीं भाव नाहीं कोठें
१०३४२	।।ना.गा.१५९६.००९।।	वाचेनें सांगती नामाचा बडिवार । विषयीं पडीभर सदाकाळीं
१०३४३	।।ना.गा.१५९६.०१०।।	ऐसें विचारितां बहुत भागलों । म्हणोनि शरण आलों पांडुरंगा
१०३४४	।।ना.गा.१५९६.०११।।	भयभीत जालों संसार येरझारीं । शिणलों असें भारी तारीं मज
१०३४५	।।ना.गा.१५९६.०१२।।	नामा म्हणे आतां हिंडतां कष्टलों । म्हणोनि शरण आलों पांडुरंगा
१०३४६	।।ना.गा.१५९७.००१।।	संसारी गांजलों म्हणोनि शरण आलों । पाठीसि रिघालों देवराया
१०३४७	।।ना.गा.१५९७.००२।।	कळिकाळा वास पाहूं तूं न देसी । भरंवसा मानसीं आहे तुज
१०३४८	।।ना.गा.१५९७.००३।।	नामा म्हणे देवा स्वामिया तूं एक । आवडता सेवक करीं मज
१०३४९	।।ना.गा.१५९८.००१।।	लाज सांडोनियां जालों शरणागत । ऐसियाचा अंत पाहसी झणीं
१०३५०	।।ना.गा.१५९८.००२।।	गुण दोष माझे मनीं गा न धरीं । पतितपावन जरी म्हणविसी
१०३५१	।।ना.गा.१५९८.००३।।	पडावें परदेसीं हे लाज कोणासी । जरी तूं न पावसी पांडुरंगा
१०३५२	।।ना.गा.१५९८.००४।।	नामा म्हणे केशवा चतुरा शिरोमणी । विचारीं अंत:करणीं मायबापा
१०३५३	।।ना.गा.१५९९.००१।।	शरणागतासी नको मोकलावा । हें तरी केशवा जाणतोसी
१०३५४	।।ना.गा.१५९९.००२।।	सांगणें नलगे सांगणें नलगे । सांगणें नलगे मायबाप
१०३५५	।।ना.गा.१५९९.००३।।	सांगतां समर्थ सर्वेचि विसरे । त्याच्या अभ्यंतरीं नव्हे बोल
१०३५६	।।ना.गा.१५९९.००४।।	नामा म्हणे तैसी न होसी शहाणा । अठराहि पुराणें वेडावलीं
१०३५७	।।ना.गा.१६००.००१।।	काय अपराध पाहसी कोणाचें । धांवे भाविकांचे कामकाजीं
१०३५८	।।ना.गा.१६००.००२।।	काय केशिराजा वाणूं मी दुबळें । शरणागता लळे पुरविशी
१०३५९	।।ना.गा.१६००.००३।।	पतितपावन ब्रीद चराचरीं । तेथें मी भिकारी कोणीकडे
१०३६०	।।ना.गा.१६००.००४।।	नामा म्हणे तूंचि करिशी उद्धार । मज भाग्या पार नाहीं देवा
१०३६१	।।ना.गा.१६०१.००१।।	जन्ममरणाचें भय मज दाविसी । तें म्यां हृषिकेशी अंगिकारलें

१०३६२	।।ना.गा.१६०१.००२।।	आतां माझी चिंता तुज कां पंढरीनाथा । असो दे भलभलता भलतें ठायीं
१०३६३	।।ना.गा.१६०१.००३।।	सुखदु:ख भोगणें माझें मीच जाणें । तुज तंव भोगणें नलगे कांहीं
१०३६४	।।ना.गा.१६०१.००४।।	नामा म्हणे माझे हेचि मनोरथ । होईन शरणागत जन्मोजन्मीं
१०३६५	।।ना.गा.१६०२.००१।।	आम्हीं शरणागतीं केलासी सरता । येऱ्हवीं अनंता कोण जाणे
१०३६६	।।ना.गा.१६०२.००२।।	वेदशास्त्र पुराणीं उबगोनि सांडिलासी । तो तूं आम्हीं धरिलासे हृदयकमळीं
१०३६७	।।ना.गा.१६०२.००३।।	चतुरा शिरोमणी अहो केशिराजा । अंगीकार तुझा केला आम्हीं
१०३६८	।।ना.गा.१६०२.००४।।	सहस्र नामें जरी जालासि संपन्न । तरी हेंहि भूषण आमुचेंचि
१०३६९	।।ना.गा.१६०२.००५।।	येऱ्हवीं त्या नामाची कवण जाणे सीमा । पाहें मेघ:श्यामा विचारोनि
१०३७०	।।ना.गा.१६०२.००६।।	होतासि क्षीरसागरीं अनाथाचे परी । लक्ष्मी तेथें करी चरणसेवा
१०३७१	।।ना.गा.१६०२.००७।।	तेहि तंव जाण आमुची जननी । तूं तियेवांचोनि शोभसी कैसा
१०३७२	।।ना.गा.१६०२.००८।।	तुज नाहीं नाम रूप जाति कुळ । अनादीचें मूळ म्हणती तुज
१०३७३	।।ना.गा.१६०२.००९।।	आम्ही भक्त तरी तूं भक्तवत्सल । ऐसा प्रगट बोल जगामाजीं
१०३७४	।।ना.गा.१६०२.०१०।।	ऐसि आमुचेनि भोगिसी थोरीव । आमुचा जीवभाव तुझे पायीं
१०३७५	।।ना.गा.१६०२.०११।।	नामा म्हणे केशवा जरि होसी जाणता । या बोला उचिता प्रेम देईं
१०३७६	।।ना.गा.१६०३.००१।।	आम्हीं शरणागतीं सांडिली वासना । ते त्वां नारायणा अंगिकारिली
१०३७७	।।ना.गा.१६०३.००२।।	म्हणोनि प्रसन्न व्हावया आमुतें । वोसरल्या चित्तें चालविसी
१०३७८	।।ना.गा.१६०३.००३।।	अज्ञान बाळकु ठकविला धुरू । तैसा मी अधिरू नव्हे जाण
१०३७९	।।ना.गा.१६०३.००४।।	लंकापति केला तुवां बिभीषण । झालासी उत्तीर्ण वाचाऋणें
१०३८०	।।ना.गा.१६०३.००५।।	उपमन्यें घेतला दुधाचाचि छंद । तैसा बुद्धिभेद नव्हे जाण
१०३८१	।।ना.गा.१६०३.००६।।	नामा म्हणे तैसा नव्हे मी अज्ञान । माग तुज देईन शरीर अवघें
१०३८२	।।ना.गा.१६०४.००१।।	आम्ही शरणागत परि सर्वस्वें उदार । भक्तीचें सागर सत्वशील
१०३८३	।।ना.गा.१६०४.००२।।	काया वाचा मनें अर्थ संपत्ति धन । दिधलें तुजलागुन पांडुरंगा
१०३८४	।।ना.गा.१६०४.००३।।	आम्हां ऐसें चित्त तुम्हां कैचें देवा । हा बडिवार केशवा न बोलावा
१०३८५	।।ना.गा.१६०४.००४।।	सत्वाचा सुभट बळि चक्रवर्ती । पहा केवढी ख्याति केली तेणें
१०३८६	।।ना.गा.१६०४.००५।।	त्रिभुवनीचें वैभव जोडिलें ज्या लागुनि । तें शरीर तुझ्या चरणीं समर्पियेलें
१०३८७	।।ना.गा.१६०४.००६।।	रावणा ऐसा बंधु सांडुनि सधर । ओळंगति परिवार ब्रह्मादिकां

१०३८८	।।ना.गा.१६०४.००७।।	तें सांडोनि एकसरा आलासे धांवत । जाला शरणागत बिभीषण
१०३८९	।।ना.गा.१६०४.००८।।	हिरण्यकश्यपें तुझ्या वैर संबंधें । पाहे त्या प्रल्हादा गांजियेलें
१०३९०	।।ना.गा.१६०४.००९।।	अजगर कुंजर करितां विषपान । परि तुझें स्मरण न संडीच
१०३९१	।।ना.गा.१६०४.०१०।।	पति पुत्र स्नेह सांडोनि गोपिका । रासक्रीडे देखा भाळलिया
१०३९२	।।ना.गा.१६०४.०११।।	एकीं तुझें ध्यान करितां त्यजिले प्राण । सांग ऐसें निर्वाण कवणें केलें
१०३९३	।।ना.गा.१६०४.०१२।।	ऐसे मार्गे पुढें जाले असंख्यात । भक्तभागवत सखे माझे
१०३९४	।।ना.गा.१६०४.०१३।।	त्यांचेनि सरता झालासी त्रिभुवनीं । विचारी आपुल्या मनीं पांडुरंगे
१०३९५	।।ना.गा.१६०४.०१४।।	केलें उच्चारणें बोलतां लाजिरवाणें । हांसती पिसुणें संसारींची
१०३९६	।।ना.गा.१६०४.०१५।।	नामा म्हणे केशवा अहो शिरोमणी । लेकुरा घाल झणीं मायबापा
१०३९७	।।ना.गा.१६०५.००१।।	कागदीचें वित्त वेश्येसी दिधलें । तैसें आम्हां केलें नारायणें
१०३९८	।।ना.गा.१६०५.००२।।	जोडोनियां हस्त केलें मढ्यापाशीं। तैसें तूं मजशीं केलें देवा
१०३९९	।।ना.गा.१६०५.००३।।	कडू भोपळ्याचा कोणता उपयोग । तैसें पांडुरंगें केलें जाण
१०४००	।।ना.गा.१६०५.००४।।	नामा म्हणे ऐसें करूं नको देवा । समागम व्हावा पायांसवें
१०४०१	।।ना.गा.१६०६.००१।।	दास जाल्यावरी करिसी उदास । मनीं तें तुम्हांस आणी देवा
१०४०२	।।ना.गा.१६०६.००२।।	सोशिले प्रवास जन्मजन्मांतर। करिसी अव्हेर आम्हांलागीं
१०४०३	।।ना.गा.१६०६.००३।।	भार खांद्यावरी घेऊनी हिंडवी । होसी मजविशि पाठमोरा
१०४०४	।।ना.गा.१६०६.००४।।	श्रांत सावकाश गाती इतिहास । काय कासाविस होय तुम्हां
१०४०५	।।ना.गा.१६०६.००५।।	नामा म्हणे नको वाउगे उदीम । न सोडीं मी नाम केल्या कांहीं
१०४०६	।।ना.गा.१६०७.००१।।	तुझा माझा देवा कां रे वैराकार । दु:खाचे डोंगर दाखविशी
१०४०७	।।ना.गा.१६०७.००२।।	बळें बांधोनियां देसी काळा हातीं । ऐसें काय चित्तीं आलें तुझ्या
१०४०८	।।ना.गा.१६०७.००३।।	आम्हीं देवा तुझी केली होती आशा । बरवें हृषिकेशा कळों आलें
१०४०९	।।ना.गा.१६०७.००४।।	नामा म्हणे देवा करा माझी कींव । नाहीं तरी जीव घ्यावा माझा
१०४१०	।।ना.गा.१६०८.००१।।	सकळ वैभव निजकर्म भोग । ते तुज उद्वेग दावी काई
१०४११	।।ना.गा.१६०८.००२।।	मीतूंपण असे तेथें मग कैचें । निर्माण ठायिंचें तोडीं वेल
१०४१२	।।ना.गा.१६०८.००३।।	आपुला करूनि ठेवीं तुझें पायीं । थोरपण कांहीं नको मज
१०४१३	।।ना.गा.१६०८.००४।।	नामा म्हणे तुझें सोलीन ढोंपर । कासया विचार देखों आतां

१०४१४	।।ना.गा.१६०९.००१।।	कपटनाटका कल्लोळ करुणा । मजलागीं दीन होसी देवा
१०४१५	।।ना.गा.१६०९.००२।।	रात्रंदिवस मज ठेवुनि जवळ । घालसी कवळ मुखामाजीं
१०४१६	।।ना.गा.१६०९.००३।।	पेंद्या सुदाम्याचे करिसी कैवार । मजसी अंतर केलें आतां
१०४१७	।।ना.गा.१६०९.००४।।	नामा म्हणे आम्हीं करितों बोभाट । देऊं नको भेट पांडुरंगा
१०४१८	।।ना.गा.१६१०.००१।।	त्वां चाळविलें अनंत सेवका । तोचि चाळा मज दाविसी निका
१०४१९	।।ना.गा.१६१०.००२।।	आदि अंतीं तुझ्या जाणितल्या खुणा । आतां काय करिसी पंढरीच्या राण्या
१०४२०	।।ना.गा.१६१०.००३।।	भलारे भला मज जालासि शहाणा । भेष पळविलें शास्त्रपुराणा
१०४२१	।।ना.गा.१६१०.००४।।	नामा म्हणे केशवा मज मारून दवडी । पुढती न धरावी सोय माझी पुढती फुडी
१०४२२	।।ना.गा.१६११.००१।।	कटीं कर उभा ऐसा । पहा कैसा घरघेणा
१०४२३	।।ना.गा.१६११.००२।।	माझा हिशेब करी हिशेब करी । हिशेब करी केशवा
१०४२४	।।ना.गा.१६११.००३।।	चौऱ्याशीं लक्ष जन्म केली तुझी सेवा । माझें ठेवणें देईं गा देवा
१०४२५	।।ना.गा.१६११.००४।।	नामा म्हणे मज खवळिसी वायां । पिसाळलों तरी झोंबेन तुझ्या पायां
१०४२६	।।ना.गा.१६१२.००१।।	साचपणें ब्रीद सोडविन तुझ्या । आतां केशिराजा पण हाचि
१०४२७	।।ना.गा.१६१२.००२।।	लबाड तूं देवा लबाड तूं देवा। लबाड तूं देवा ठावा आम्हां
१०४२८	।।ना.गा.१६१२.००३।।	काय मूर्खपणें सांगशिल गोष्टी । थोरपणें मोठी पुरे आतां
१०४२९	।।ना.गा.१६१२.००४।।	नामा म्हणे काय खवळिसि आम्हां । लाज नाहीं तुम्हां कवणेविसीं
१०४३०	।।ना.गा.१६१३.००१।।	काय थोरपणा मिरविसी व्यर्थ । खोटेपणा स्वार्थ कळों आलें
१०४३१	।।ना.गा.१६१३.००२।।	हिता अनहिता केले आपस्वार्थ । वचन यथार्थ बोल आतां
१०४३२	।।ना.गा.१६१३.००३।।	होसी कलिमाजीं कलिसारिखाची । भोळ्या भाविकाच्या भक्तिकाजा
१०४३३	।।ना.गा.१६१३.००४।।	नामा म्हणे माळ घातिली स्वहस्तें । करितोसि दंडवत निमित्यासी
१०४३४	।।ना.गा.१६१४.००१।।	काय केलें मागें कोणाचें तूं बरें । शेवटीं वान्नरें सांग करी तें
१०४३५	।।ना.गा.१६१४.००२।।	संगें करूनियां हिंडे रानोरान। दशरथा खूण चुकविसी
१०४३६	।।ना.गा.१६१४.००३।।	काय काय तरी सांगों तुज गुण । भिल्लिणीची आण सत्य मानी
१०४३७	।।ना.गा.१६१४.००४।।	सत्य मानी बळी वशिष्ठासहित । नामा म्हणे मात ही पुरातन
१०४३८	।।ना.गा.१६१५.००१।।	काय तुज देवा आलें थोरपण । दाविसी कृपण उणें पुरे
१०४३९	।।ना.गा.१६१५.००२।।	पुरे आतां सांगों नको बा श्रीहरी। गोकुळाभीतरीं खेळ मांडी

१०४४०	।।ना.गा.१६१५.००३।।	हलाहल शांत करी तत्क्षण । अमृतजीवन नाम तुझें
१०४४१	।।ना.गा.१६१५.००४।।	तुझें नाम सर्व सदा गोपाळासी । नामा म्हणे यासी काय जालें
१०४४२	।।ना.गा.१६१६.००१।।	निर्गुणपणाच्या घेसी अभिमाना । तुज नारायणा शोधीं नामीं
१०४४३	।।ना.गा.१६१६.००२।।	काय तुझी भीड धरावी म्यां आतां । कृपाळु अनंता म्हणे ना मी
१०४४४	।।ना.गा.१६१६.००३।।	पुंडलिकासाठीं उभा राहिलासी । ठकडा तूं होसी म्हणे ना मी
१०४४५	।।ना.गा.१६१६.००४।।	नामा म्हणे नको मज चाळवण । लवकरी चरण दावींना का
१०४४६	।।ना.गा.१६१७.००१।।	कल्पतरुतळीं बैसलिया । कल्पिलें फळ न पविजे
१०४४७	।।ना.गा.१६१७.००२।।	कामधेनु जरी दुभती । तरी उपवासी कां मरावें
१०४४८	।।ना.गा.१६१७.००३।।	उगे असा उगे असा । होणार तें होय जाणार तें जाय
१०४४९	।।ना.गा.१६१७.००४।।	नामा म्हणे केशवा काय तुझी भीड। संता महंतां देखतां सांगेन तुझी खोड
१०४५०	।।ना.गा.१६१८.००१।।	मुळींच मी जाणें तुझा ठेंगेपणा । काय नारायणा बोलसील
१०४५१	।।ना.गा.१६१८.००२।।	पुरे पुरे आतां तुमचे आचार । मजशीं वेव्हार घालूं नको
१०४५२	।।ना.गा.१६१८.००३।।	लालुचाईसाठीं मागे भाजीपाना । लाज नारायणा तुज नाहीं
१०४५३	।।ना.गा.१६१८.००४।।	नामा म्हणे काय सांगों तुझी कीर्ती । वाउगी फजिती करूं तुज
१०४५४	।।ना.गा.१६१९.००१।।	तुझा दास मी तों राहिलों होवोनि । बोल चक्रपाणि पुरे आतां
१०४५५	।।ना.गा.१६१९.००२।।	जावो प्राण आतां न सोडीन संग । नव्हती वाउगे बोल माझे
१०४५६	।।ना.गा.१६१९.००३।।	श्रुति स्मृति वेद काव्यें ही पुराणें । तीं तुज भूषणें सुखें मानूं
१०४५७	।।ना.गा.१६१९.००४।।	काय हानि जाली सांगा मजपाशीं । उद्धारा जगासी नामा म्हणे
१०४५८	।।ना.गा.१६२०.००१।।	पंढरीनिवासा सख्या पांडुरंगा । करी अंगसंगा भक्ताचिया
१०४५९	।।ना.गा.१६२०.००२।।	भक्त कैवारिया होसी नारायणा। बोलतां वचना काय लाज
१०४६०	।।ना.गा.१६२०.००३।।	मागें बहुतांचें फेडियेलें ऋण । आम्हांसाठीं कोण आली धाड
१०४६१	।।ना.गा.१६२०.००४।।	वारंवार तुज लाज नाहीं देवा । बोल रे केशवा म्हणे नामा
१०४६२	।।ना.गा.१६२१.००१।।	देवा तूं प्रथम कर्म भोगिसी । सागरीं जळचरूं मत्स्य जालासी । कमठे पाठीं न संडी कैसी । कर्में कासाविसी केलें तुज
१०४६३	।।ना.गा.१६२१.००२।।	अपवित्र नाम आधीं वराह । याहुनि थोर कूर्म कांसव । अर्ध सावज अर्ध मानव । हे भवभाव कर्मांचे
१०४६४	।।ना.गा.१६२१.००३।।	खुजेपणीं बळीसी पाताळीं घातलें । तेणें कर्में तयाचें द्वार रक्षिलें । पितयाचें वचनीं मातेसी वधिलें । तें कर्म जडलें परशुरामा
१०४६५	।।ना.गा.१६२१.००४।।	श्रीरामा जाल्या आपदा बहुता । कर्में भोगविलें अंतरली सीता । भालुका तीर्थी वधियेलें अवचिता । नाम अच्युता तुज जाहलें

१०४६६	।।ना.गा.१६२१.००५।।	ऐसा कष्टी होउनि बोध्य राहिलासी । तूं कलंकी या लोकां भारिसी । आपल्या दोषासाठीं आणिका दंडिसी । निष्कलंक होसी नारायणा
१०४६७	।।ना.गा.१६२१.००६।।	ऐसा तूं बहुतां दोषीं बांधलासी । पुढीलाचीं जन्में अवगतोसी । विष्णुदास नामा म्हणे हृषिकेशी । तुझी भीड कायसी स्वामियाहो
१०४६८	।।ना.गा.१६२२.००१।।	मरणें पेरणें जन्म उगवणें । मायेची ते खूण सांगितली
१०४६९	।।ना.गा.१६२२.००२।।	संग तुझा पुरे संग तुझा पुरे । संग तुझा पुरे नारायणा
१०४७०	।।ना.गा.१६२२.००३।।	तूं तरी न मरे मी तरी न पुरे । भक्ती हे संचरे हाचि लाभु
१०४७१	।।ना.गा.१६२२.००४।।	नामा म्हणे माझ्या ठायिंचा मी नेणें । संसार भोगणें तुझी लाज
१०४७२	।।ना.गा.१६२३.००१।।	तुज विकोनी घातली वोर । मज समोर बोलतोसी
१०४७३	।।ना.गा.१६२३.००२।।	उच्छिष्ट शिदोरी घेऊनिया करीं । भक्तांचा भिकारी तूंचि एक
१०४७४	।।ना.गा.१६२३.००३।।	चोर आणि शिंदळु चाळविलें गोविळें । अनंत मर्दिले दुष्टकाळ
१०४७५	।।ना.गा.१६२३.००४।।	नामा म्हणे केशवा सांगेन वर्म । ऐकतां न राहे संतांचें कर्म
१०४७६	।।ना.गा.१६२४.००१।।	उदार कृपाळ सांगशील जना । तरी कां रावणा मारियेलें
१०४७७	।।ना.गा.१६२४.००२।।	नित्यानित्य पूजा सिरकमळीं करी । तेणें तुझें हरी काय केलें
१०४७८	।।ना.गा.१६२४.००३।।	किती बडिवार सांगसील वायां । ठावा पंढरिराया आहेसी आम्हां
१०४७९	।।ना.गा.१६२४.००४।।	कर्णा ऐसा वीर झुंझार उदार । त्यासी त्वां जर्जर केलें बाणीं
१०४८०	।।ना.गा.१६२४.००५।।	पाडिलें भूमीसी न येचि करुणा । त्याचे नारायणा पाडिले दांत
१०४८१	।।ना.गा.१६२४.००६।।	श्रियाळ बापुडें सात्विक निर्वाणीं । खादलें कापोनी याचें पोर
१०४८२	।।ना.गा.१६२४.००७।।	ऐसा कठीण कोण होईल दुसरा । कांडियेलें शिरा उखळामाजीं
१०४८३	।।ना.गा.१६२४.००८।।	शिबी चक्रवर्ती करितां यज्ञयाग । कापिलें त्याचें अंग ठायीं ठायीं
१०४८४	।।ना.गा.१६२४.००९।।	जाचोनियां प्राण घेतला तयाचा । काय सांगसी वाचा बडिवार
१०४८५	।।ना.गा.१६२४.०१०।।	हरिश्चंद्राचें राज्य घेऊनियां सर्व । विकले त्याचे जीव डोंबाघरीं
१०४८६	।।ना.गा.१६२४.०११।।	बहुतचि श्रम दिधले तयासि । परि तो सत्वासि ढळेचिना
१०४८७	।।ना.गा.१६२४.०१२।।	पाडिला विघड नलदमयंती । ऐसी कृपामूर्ति बुद्धि तुझी
१०४८८	।।ना.गा.१६२४.०१३।।	आणिक तुझी कीर्ती सांगावी ती किती। केली ते फजिती माउशीची
१०४८९	।।ना.गा.१६२४.०१४।।	मारियेला मामा सखा पुरुषोत्तमा । नामा म्हणे सीमा फार केली

१०४९०	।।ना.गा.१६२५.००१।।	उदारांचा राणा म्हणविसी आपणां । सांग त्वां कवणा काय दिल्हें
१०४९१	।।ना.गा.१६२५.००२।।	उचिता उचित भजसी पंढरीनाथा। न बोलों सर्वथा वर्मे तुझी
१०४९२	।।ना.गा.१६२५.००३।।	वर्मे तुझीं कांहीं बोलेन मी आतां । क्षमा पंढरीनाथा करी बापा
१०४९३	।।ना.गा.१६२५.००४।।	न घेतां न देसी आपुलेंहि कोणा । प्रौढी नारायणा न बोलावी
१०४९४	।।ना.गा.१६२५.००५।।	बाळमित्र सुदामा विपत्तीं पिडला । तो भेटावया आला तुजलागीं
१०४९५	।।ना.गा.१६२५.००६।।	त्याचें मुष्टिपोहेसाठीं मन केलें आसट । मग दिलें उत्कृष्ट भाग्य तया
१०४९६	।।ना.गा.१६२५.००७।।	छळावया पांडव दुर्वास पातला । द्रौपदीनें केला धांवा तुझा
१०४९७	।।ना.गा.१६२५.००८।।	गेली वृंदावना केली प्रदक्षिणा । आळविला कान्हा द्वारकेचा
१०४९८	।।ना.गा.१६२५.००९।।	आळवी पांचाळी येर बा वनमाळी । राख ये काळीं सत्व माझें
१०४९९	।।ना.गा.१६२५.०१०।।	येवढिया आकांतीं घेऊनि भाजीपान । मग दिलें अन्न ऋषिलागीं
१०५००	।।ना.गा.१६२५.०११।।	बिभीषणा दिधली सुवर्णाची नगरी । हे कीर्ती तुझी हरि वाखाणिती
१०५०१	।।ना.गा.१६२५.०१२।।	वैरियाचें घर भेदे त्वां घेतलें । त्याचें त्यासी दिधलें नवल काय
१०५०२	।।ना.गा.१६२५.०१३।।	धृवा आणि प्रल्हाद अंबऋषि नारद । हरिश्चंद्र रुक्मांगद करुनी
१०५०३	।।ना.गा.१६२५.०१४।।	त्याचें सेवाऋण घेऊनि अपार । मग त्या देशी वर अनिर्वाच्या
१०५०४	।।ना.गा.१६२५.०१५।।	एकाचि शरीरसंपत्ति आणि वित्त । एकाचें तें चित्त हिरोनि घेसी
१०५०५	।।ना.गा.१६२५.०१६।।	मग तया देशी आपुलें तूं पद । जगदानी हें ब्रीद मिरविसी
१०५०६	।।ना.गा.१६२५.०१७।।	माझें सर्वस्व घेई तुझें नको कांहीं । मनोरथाची नाहीं चाड मज
१०५०७	।।ना.गा.१६२५.०१८।।	नामा म्हणे केशवा जन्मजन्मांतरीं । ऋणी करिन हरी ऋणें सेवा
१०५०८	।।ना.गा.१६२६.००१।।	निर्गुण नामाची अनंत कल्पना । धरूनि नारायणा व्यक्ती येसी
१०५०९	।।ना.गा.१६२६.००२।।	लाज लावियेली त्या निर्गुणपणा । श्रुतींच्या रचना वाखाणितां
१०५१०	।।ना.गा.१६२६.००३।।	तैसें न हो आम्ही करणीचे विलगट । नामाचे निकट दास तुझे
१०५११	।।ना.गा.१६२६.००४।।	चतुरा शिरोमणी नंदाचा खिल्लारी । हें अघटित मुरारी नाम जरी
१०५१२	।।ना.गा.१६२६.००५।।	तुमचे तुम्हां देवा सांगतां तें निकें । समर्थांसी रंकें बोलिजे केवीं
१०५१३	।।ना.गा.१६२६.००६।।	देवा मुगुटमणी हें बोलती पुराणें । आणि बळिचें राखणें द्वार काय
१०५१४	।।ना.गा.१६२६.००७।।	अर्जुना सारथी रथा वागविसी । उच्छिष्टें काढिसी धर्माघरीं
१०५१५	।।ना.गा.१६२६.००८।।	विश्वंभरा नाम तुझें कमळापति । जगीं श्रुति स्मृति वाखाणिती

१०५१६	।।ना.गा.१६२६.००९।।	गौळियांचे घरीं दहीं लोणी चोरूनी । खातां चक्रपाणि लाजसीना
१०५१७	।।ना.गा.१६२६.०१०।।	आतां दीनानाथ ब्रीद तुझें साचें । तरी भूषण आमुचें जतन करी
१०५१८	।।ना.गा.१६२६.०११।।	येर ठेवा ठेवी कायसी आम्हां आतां । विनवितो नामा केशिराजा
१०५१९	।।ना.गा.१६२७.००१।।	अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ । भक्तांचा कृपाळ पांडुरंग
१०५२०	।।ना.गा.१६२७.००२।।	ये गा तूं विठ्ठला माझिया माहेरा । कृपेच्या सागरा पांडुरंगा
१०५२१	।।ना.गा.१६२७.००३।।	वर्णिती पुराणें न कीं लाजिरवाणें । बोलती वचनें सनकादिक
१०५२२	।।ना.गा.१६२७.००४।।	कृपेचा सागरू कैवल्यउदारू । रखुमाईचा वरू पांडुरंग
१०५२३	।।ना.गा.१६२७.००५।।	पुंडलिकाचे भेटी अससी वाळवंटीं । हात ठेवुनि कटीं विटेवरी
१०५२४	।।ना.गा.१६२७.००६।।	भक्तिलागीं कैसा उभा असे तिष्ठत । असे वाट पहात भीमातीरीं
१०५२५	।।ना.गा.१६२७.००७।।	येऊनी जन्मासी पाहावी पंढरी । तेणें भवसागरीं तरसील
१०५२६	।।ना.गा.१६२७.००८।।	नामा म्हणे मज हरीचा विश्वास । जालों असे दास जन्मोजन्मीं
१०५२७	।।ना.गा.१६२८.००१।।	काया कर पैं फुटों नेदी । टाळ दिंडी वाहिन खांदीं
१०५२८	।।ना.गा.१६२८.००२।।	तूं बा माझा तूं बा माझा । तूं बा माझा केशिराजा
१०५२९	।।ना.गा.१६२८.००३।।	आळवणीचा तूं बा वाचे । तेणें छंदें पेंधा नाचे
१०५३०	।।ना.गा.१६२८.००४।।	तूं बा माझा मी दास तुझा । विनवितो नामा केशिराजा
१०५३१	।।ना.गा.१६२९.००१।।	निंदा आणि स्तुति तुझीच करणें । परि आणिकांचे न घेणें गुणदोष
१०५३२	।।ना.गा.१६२९.००२।।	वैर अथवा सख्य तुझियेच । परि न पडो हृदयीं विसर तुझा
१०५३३	।।ना.गा.१६२९.००३।।	दास्य अथवा सत्ता गोपाळांचे परी । असो तुजवरी सर्वलोभ
१०५३४	।।ना.गा.१६२९.००४।।	जिणें अथवा मरणें तुझियेच द्वारीं । उदास नरहरि करिसी झणें
१०५३५	।।ना.गा.१६२९.००५।।	ऐसे माझे चित्त असो तुझ्या चरणी । अगा चक्रपाणी मायबापा
१०५३६	।।ना.गा.१६२९.००६।।	नामा म्हणे थोर शिणलों पंढरीनाथा । स्वामीचें नेणतां प्रेमसुख
१०५३७	।।ना.गा.१६३०.००१।।	छंदिष्ट हें मन माझें पंढरिनाथा । न सोडीं सर्वथा पाय तुझें
१०५३८	।।ना.गा.१६३०.००२।।	यासि काय करूं सांगा जी विठ्ठला । स्नेह कां लाविला पूर्वीहूनि
१०५३९	।।ना.गा.१६३०.००३।।	कांसवीचीं पिलीं सोडोनि निराळीं । दृष्टी पान्हाइलि अमृतमय
१०५४०	।।ना.गा.१६३०.००४।।	तैसा मी जवळुनी असेन पैं दुरी । दृष्टी मजवरी असों द्यावी
१०५४१	।।ना.गा.१६३०.००५।।	तान्हें वत्स घरीं धेनु चरे वनीं । हंबरे क्षणक्षणां परतोनि

१०५४२	।।ना.गा.१६३०.००६।।	नामा म्हणे देवा सलगी करीं निकट । झणें मज वैकुंठ पद देसी
१०५४३	।।ना.गा.१६३१.००१।।	अनाथासी साह्य होसी नारायणा । करुणावचना बोलविसी
१०५४४	।।ना.गा.१६३१.००२।।	पांडुरंगा कृपा करीं मजवरी । पामर उद्धरी पाहतांची
१०५४५	।।ना.गा.१६३१.००३।।	गणिकें सत्वर मोक्षपद देसी । उपमन्यु बाळासी क्षीरसिंधु
१०५४६	।।ना.गा.१६३१.००४।।	नामा म्हणे याति विचारसी । कण्या घरीं खासी विदुराच्या
१०५४७	।।ना.गा.१६३२.००१।।	अनाथाचा नाथ भक्तांचा कैवारी । पुराणीं हे थोरी ऐकियली
१०५४८	।।ना.गा.१६३२.००२।।	ऐकोनियां कीर्ती आलों तुजपाशीं । निवारी दु:खाशी केशिराजा
१०५४९	।।ना.गा.१६३२.००३।।	त्रितापें तापलों दु:खें आहाळलों । कासाविस जालों दयासिंधू
१०५५०	।।ना.गा.१६३२.००४।।	तुजवीण आतां कोणातें मी सांगूं । तोडी हा उद्वेगु नारायणा
१०५५१	।।ना.गा.१६३२.००५।।	नामा म्हणे आतां नको पाहूं अंत । उद्धरी त्वरित पांडुरंगा
१०५५२	।।ना.गा.१६३३.००१।।	कृपा करोनि त्वां मज प्रसन्न व्हावें । आणि म्यां मागावें बुद्धिज्ञान
१०५५३	।।ना.गा.१६३३.००२।।	ऐसी भुली मज न घालीं पांडुरंगा । बिघड सत्संगा न करीं मज
१०५५४	।।ना.गा.१६३३.००३।।	मोक्षासी साधन एक ते उपाधी । दाखवुनि बुद्धिभ्रंश केलें
१०५५५	।।ना.गा.१६३३.००४।।	एका पुत्र कलत्र राज्याचा संभ्रम । दावोनि दुर्गम भ्रम केला
१०५५६	।।ना.गा.१६३३.००५।।	नामा म्हणे तुझ्या प्रेमालागीं भक्ती । घेतली म्यां सुतीं जन्ममरणें
१०५५७	।।ना.गा.१६३४.००१।।	अनंता जन्मींचें चुकवीं सांकडें । काय मी बापुडें वानूं कैसें
१०५५८	।।ना.गा.१६३४.००२।।	सगुण गुणाची वोळलिसे मूर्ति । राहो माझे चित्तीं निरंतर
१०५५९	।।ना.गा.१६३४.००३।।	माझा मीच जालों सकळ व्यापारी । संसारा बाहेरी काढी कोण
१०५६०	।।ना.गा.१६३४.००४।।	नामा म्हणे मज नको गोवूं आशा । पावन परेशा केशिराजा
१०५६१	।।ना.गा.१६३५.००१।।	जेथें जेथें मन जाईल गा माझें । तेथें तेथें तुझें रूप असो
१०५६२	।।ना.गा.१६३५.००२।।	ऐसी मज संवई लावीं निरंतर । जन्मजन्मांतरीं केशिराजा
१०५६३	।।ना.गा.१६३५.००३।।	आपणांस काम जरूर कायसा । आतां पंढरीशा आटोपावें
१०५६४	।।ना.गा.१६३५.००४।।	नामा म्हणे नको पाहों माझी लाज । संसाराचें बीज मूळ खुडी
१०५६५	।।ना.गा.१६३६.००१।।	अग्निमाजिं पडे बाळू । माता धांवे कनवाळू
१०५६६	।।ना.गा.१६३६.००२।।	तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा
१०५६७	।।ना.गा.१६३६.००३।।	संवेंचि झेपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं

१०५६८	।।ना.गा.१६३६.००४।।	भुकेलें वत्स रावें । धेनु हुंबरत धांवे
१०५६९	।।ना.गा.१६३६.००५।।	वणवा लागलासे वनीं । पाडस चिंतित हरिणी
१०५७०	।।ना.गा.१६३६.००६।।	नामा म्हणे मेघा जैसा । विनवितो चातक तैसा
१०५७१	।।ना.गा.१६३७.००१।।	धेनु विये वनीं तीसि कैचि सुयणी । तरी ते वत्स स्तनीं लावी कवण
१०५७२	।।ना.गा.१६३७.००२।।	भुजंगाचीं पिलीं उपजतांचि वेगळीं । त्यांसी डंखूं शिकविलें हो कोणी
१०५७३	।।ना.गा.१६३७.००३।।	सहज लक्षण जयाचिये ठायीं । तो आपुलिये सोई धांवतसे
१०५७४	।।ना.गा.१६३७.००४।।	उपजतांचि फूल मोगऱ्यांच्या माथां । त्यासी परिमळता कोणे लावियेली
१०५७५	।।ना.गा.१६३७.००५।।	कडू दुध्याची आळ्यासी साखर दूध घातलें । ते अधिकचि कडुवाळें कवणें केलें
१०५७६	।।ना.गा.१६३७.००६।।	गाळिला तोडिला खंड विखंडी । ऊंस न संडी सोय गोडीसी
१०५७७	।।ना.गा.१६३७.००७।।	नामा म्हणे तैसें आहे गा श्रीहरी । साईचे व्यापारीं घेईन तूतें
१०५७८	।।ना.गा.१६३८.००१।।	माता पिता बंधु कुळगुरु दैवत । सखा सर्व गोत केशिराजा
१०५७९	।।ना.गा.१६३८.००२।।	जन्मोनि पोसणा तुझा मी अंकिला । आणिकांचा पांगिला न करी देवा
१०५८०	।।ना.गा.१६३८.००३।।	विष्णुदास नामा विनवितो केशवा । झणीं घालिसी देव संसारासी
१०५८१	।।ना.गा.१६३९.००१।।	दाविसी अनंता स्वरूपें अनेक । वाउगाचि शोक वाढविसी
१०५८२	।।ना.गा.१६३९.००२।।	आपुल्या मानसीं विचारूनि पाहे । सावधान होये तुझे पाईं
१०५८३	।।ना.गा.१६३९.००३।।	नामा म्हणे नामा निर्वाणीचें बीज । मजसाठीं गुज दावियेलें
१०५८४	।।ना.गा.१६४०.००१।।	काय आम्हापाशीं आहे धन वित्त । दान तें उचित देऊं काय
१०५८५	।।ना.गा.१६४०.००२।।	देतां घेतां आम्हां पुरे पुरे जालें। संगतीं त्यागिलें भिवोनियां
१०५८६	।।ना.गा.१६४०.००३।।	काय वाणुं गुण भिकारपणाची । होसी पंढरीची नामनौका
१०५८७	।।ना.गा.१६४०.००४।।	नामा पुढें दाखवी मारग । आम्ही तुज मागें येऊं सुखें
१०५८८	।।ना.गा.१६४१.००१।।	देव दगडाचा भक्त हा मावेचा । संदेह दोघांचा फिटे कैसा
१०५८९	।।ना.गा.१६४१.००२।।	ऐसे देव तेहि फोडिले तुरकीं। घातले उदकीं बोभातीना
१०५९०	।।ना.गा.१६४१.००३।।	ऐसिया देवासी वाहिले टिळे डोळे । भक्त बाळें भाळे नागविले
१०५९१	।।ना.गा.१६४१.००४।।	ऐसींहि दैवतें नको दावूं देवा । नामा म्हणे केशवा विनवितसे
१०५९२	।।ना.गा.१६४२.००१।।	माझे गुणदोष जरि विचारिसी । सर्व नारायणा अपराधी
१०५९३	।।ना.गा.१६४२.००२।।	सेवाहीन दीन पातकाची रासी । आतां विचारिसी काय ऐसें

१०५९४	।।ना.गा.१६४२.००३।।	अंगुष्ठ धरून मस्तकापर्यंत । अखंड दुष्कृत आचरलों
१०५९५	।।ना.गा.१६४२.००४।।	स्वप्नामाजि तुझी घडली नाहीं भक्ति । पुससी विरक्ती कोठोनियां
१०५९६	।।ना.गा.१६४२.००५।।	तूंचि माझा गुरु तूंचि माझा स्वामी । सकळ अंतर्यामीं वससी तूं
१०५९७	।।ना.गा.१६४२.००६।।	नामा म्हणे माझें चुकवी जन्ममरण । न करीं मी सीण पांडुरंगा
१०५९८	।।ना.गा.१६४३.००१।।	काय करूं आतां देवा विश्वंभरा । मजलागीं थारा नाहीं कोठें
१०५९९	।।ना.गा.१६४३.००२।।	उबगति सोयरीं धायरी समस्त । काय करूं अंत पाहसी माझा
१०६००	।।ना.गा.१६४३.००३।।	तूंचि मातापिता गुरुबंधू होसी । जाऊं मी कोणासी शरण आतां
१०६०१	।।ना.गा.१६४३.००४।।	पायीं थारा मागे नाम्याची विनंति । चित्त द्या श्रीपति आतां वेगें
१०६०२	।।ना.गा.१६४४.००१।।	आसनीं शयनीं भोजनीं गमनीं । तुझे पाय दोन्ही दावी मज
१०६०३	।।ना.गा.१६४४.००२।।	संसार कल्मष समूळ छेदिसी। दावीं अहर्निशीं पाय मज
१०६०४	।।ना.गा.१६४४.००३।।	हरी ध्यानीं मनीं भक्तां तूं परेशा । अनाथ कोंवसा गोंवळियां
१०६०५	।।ना.गा.१६४४.००४।।	नामा म्हणे नाम ऐका सर्वोत्तमा । संसारींच्या श्रमा वारी देवा
१०६०६	।।ना.गा.१६४५.००१।।	नव्हे माझें कांहीं नेणें तुजविण । दुजें वोझें घेऊनि जड बहु
१०६०७	।।ना.गा.१६४५.००२।।	रंग नानासूत्रिं अनेक पुतळे । तैसा तुझा खेळ नकळे कोण्हा
१०६०८	।।ना.गा.१६४५.००३।।	नामा म्हणे तुझी नकळे करणी । जन्मोजन्मीं चरणीं ठेवीं मज
१०६०९	।।ना.गा.१६४६.००१।।	हस्तीच्या चरणावरी बैसे माशी । नमन तयासी करावया
१०६१०	।।ना.गा.१६४६.००२।।	तैसें कायसें मी केवढें बापुडें । लागे कोणीकडे देवराया
१०६११	।।ना.गा.१६४६.००३।।	नामा म्हणे तैसें मी एक दुबळें । चरणावेगळें करूं नको
१०६१२	।।ना.गा.१६४७.००१।।	कृपणाचें धन असे भूमि आंत । तेथें जाय चित्त जेथें धन
१०६१३	।।ना.गा.१६४७.००२।।	ऐसी मज देवा लावावी हे सवे । हेंचि मज द्यावें पांडुरंगा
१०६१४	।।ना.गा.१६४७.००३।।	जेथें जेथें मन जाईल हें माझें । तेथें तेथें तुझें रूप भासे
१०६१५	।।ना.गा.१६४७.००४।।	नामा म्हणे मी सर्वांपरी अज्ञान । विनवी आस करून पांडुरंगा
१०६१६	।।ना.गा.१६४८.००१।।	तुझिया चरणाचें तुटतां अनुसंधान । नेलें माझें मन षड्वर्गीं
१०६१७	।।ना.गा.१६४८.००२।।	धांव गा विठ्ठला सोडवीं आपुला दास । थोर कासावीस केलों बापा
१०६१८	।।ना.गा.१६४८.००३।।	कर्म कुळाचार क्रोध हा अनिवार । मदें निरंतर भ्रांत केलें
१०६१९	।।ना.गा.१६४८.००४।।	मत्सरें तुजसी दुरावलें देवा । लोभें केला गोवा गर्भवासी

१०६२०	।।ना.गा.१६४८.००५।।	दंभ रसातळीं जातसे घेऊनि । विश्वचक्षु होउनि पाहसी कैसा
१०६२१	।।ना.गा.१६४८.००६।।	नामा म्हणे मज तुझाचि भरंवसा । अनाथा कुंवसा होसी देवा
१०६२२	।।ना.गा.१६४९.००१।।	मनीं जें जें देखें परी दृष्टी नेणें । प्रेमाची ते खूण जाणावया
१०६२३	।।ना.गा.१६४९.००२।।	काय करूं माय बाप गा विठ्ठला । मजसी कां अबोला धरिलासी
१०६२४	।।ना.गा.१६४९.००३।।	मानसीं वसणें प्रत्यक्ष पाहणें । तुझें नाम गाणें तरी साच
१०६२५	।।ना.गा.१६४९.००४।।	नामा म्हणे किती सांगावें गा तुज । केशवा हें गुज पुरवी माझें
१०६२६	।।ना.गा.१६५०.००१।।	पुंडलिक वरद आनंदें अभेद । विठ्ठल विद्गद नाम तुझें
१०६२७	।।ना.गा.१६५०.००२।।	पाव गा वेगीं मजलागीं झडकारी। बुडतों भवसागरीं तारी मज
१०६२८	।।ना.गा.१६५०.००३।।	आकांत अवसरीं स्मरिला गजेंद्र । दीनानाथ ब्रीद साच केलें
१०६२९	।।ना.गा.१६५०.००४।।	स्मरली संकटीं द्रौपदी वनवासी । धांवुनि आलासी लवलाही
१०६३०	।।ना.गा.१६५०.००५।।	प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं । संकटापासुनि रक्षियेलें
१०६३१	।।ना.गा.१६५०.००६।।	नामा म्हणे थोर पिडिलों गर्भवासें। अखंड पाहातसें वाट तुझी
१०६३२	।।ना.गा.१६५१.००१।।	माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला
१०६३३	।।ना.गा.१६५१.००२।।	वारा जाय भलत्या ठायां । तैसी माझी रागछाया
१०६३४	।।ना.गा.१६५१.००३।।	गातां येईल तेणेंचि गावें । येरी हरि हरि म्हणावें
१०६३५	।।ना.गा.१६५१.००४।।	तान मान नेणें देवा । नामा विनविती केशवा
१०६३६	।।ना.गा.१६५२.००१।।	काया मनें वाचा नेणों भक्तिभाव । करिसी उपाव केशिराजा
१०६३७	।।ना.गा.१६५२.००२।।	थोरपणासाठीं मन घे हव्यासु । मी तो कासावीस होय देवा
१०६३८	।।ना.गा.१६५२.००३।।	सर्वांभूतांमाजीं समत्वें दिससी । नामा म्हणे ऐसी दावी लीला
१०६३९	।।ना.गा.१६५३.००१।।	समर्थपणें रंका कां गांजितसां स्वामी । हें काये स्वधर्मीं मिळतसे
१०६४०	।।ना.गा.१६५३.००२।।	आपुली करणी न विचारा मनीं। दुसरियास झणीं बोल ठेवा
१०६४१	।।ना.गा.१६५३.००३।।	निर्गुण निराकार होतेंती शून्यपणें । आम्हांसी असणें तेचि ठायां
१०६४२	।।ना.गा.१६५३.००४।।	सुखें एकरूप होतों तुझे पोटीं । कासया हे सृष्टी वाढविली
१०६४३	।।ना.गा.१६५३.००५।।	विकाराचें मूळ दिधलें हें शरीर । तेणें कष्टी थोर जालों आम्ही
१०६४४	।।ना.गा.१६५३.००६।।	पाप पुण्य दोन्हीं लाविलीं सांगातें । म्हणऊनि सुखातें अंतरलों
१०६४५	।।ना.गा.१६५३.००७।।	यमलोकीं वास रौरव यातना । तेणें नारायणा धाक थोर

१०६४६	।।ना.गा.१६५३.००८।।	खातों जेवतों तें न लगेचि अंगीं । जालोंसें उद्वेगीं रात्रंदिवस
१०६४७	।।ना.गा.१६५३.००९।।	ऐसे देह आम्हां कासया दिधले । काय मागितलें आम्हीं तुम्हां
१०६४८	।।ना.गा.१६५३.०१०।।	सृष्टीपूर्वी पाप नव्हतें हरी । कासया श्रीहरी कष्टी केलें
१०६४९	।।ना.गा.१६५३.०११।।	वेदशास्त्रभय आम्हांसी लाविलें । तें तुम्हीं टाकिलें एकीकडे
१०६५०	।।ना.गा.१६५३.०१२।।	वेदशास्त्रवचन चुकल्या अवचिता । गोसावी जी होता दंडावया
१०६५१	।।ना.गा.१६५३.०१३।।	मागा चुकलेती तें ठेवा एकिकडे । आतां तरी पुढें सांभाळावें
१०६५२	।।ना.गा.१६५३.०१४।।	एकरूप तुम्ही होतेती निर्गुणीं । तेथें आमुचे कोण्ही बोलों आलों
१०६५३	।।ना.गा.१६५३.०१५।।	निर्गुण सांडुनि व्हावें जी सगुण । ऐसें तुम्हां कोण बोलियेलें
१०६५४	।।ना.गा.१६५३.०१६।।	आपुलिये इच्छे ब्रह्मांडें रचिलीं । काय सांगितली जी आम्हीं तुम्हां
१०६५५	।।ना.गा.१६५३.०१७।।	लक्ष्मीचे विलास धरिले नाना वेष । हा काय उपदेश आम्ही केला
१०६५६	।।ना.गा.१६५३.०१८।।	विश्व हें निर्मुनि जालेती गोसावी । हें काय सांगावी आम्ही केली
१०६५७	।।ना.गा.१६५३.०१९।।	जे तुम्हां पाहिजे तें तुम्हीं निर्मिलें । आपणासवें केलें कष्टी आम्हां
१०६५८	।।ना.गा.१६५३.०२०।।	कल्पजन्मांतरी युगयुगांतरी । जवळी श्रीहरी होतों आम्हीं
१०६५९	।।ना.गा.१६५३.०२१।।	तुम्ही तेथें आम्ही आम्ही तेथें तुम्ही । विचारावें स्वामी पांडुरंगा
१०६६०	।।ना.गा.१६५३.०२२।।	तुम्हां आम्हां कांहीं वेगळिक नाहीं । बोलोनियां काई दावूं आतां
१०६६१	।।ना.गा.१६५३.०२३।।	आम्हांसि तुम्ही काय सोसिलें अधिक । ठकितसां लोक तैसें नव्हें
१०६६२	।।ना.गा.१६५३.०२४।।	तुम्हांसी अवतार कोरडियें काष्टीं । तुमच्या नामें कष्टी दैत्यें केलें
१०६६३	।।ना.गा.१६५३.०२५।।	तुम्हांसी मातेनें धाडियेलें वना । आमची विटंबना बहुत जाहली
१०६६४	।।ना.गा.१६५३.०२६।।	वल्कलें वेष्टोनी जालेती तापसी । वेष आम्हां देसी मर्कटाचे
१०६६५	।।ना.गा.१६५३.०२७।।	जवळीच असुनी हरिविली कांता । आम्हीं शुद्धीकरतां कष्टी जालों
१०६६६	।।ना.गा.१६५३.०२८।।	तियेचे वियोगें शोक करा वनीं । वानरें होऊनि हिंडों आम्हीं
१०६६७	।।ना.गा.१६५३.०२९।।	तुम्ही स्वामीपणें बैसा एके ठायीं । आम्हीं शिळा डोई वाहिलेल्या
१०६६८	।।ना.गा.१६५३.०३०।।	लंकेपुढें आम्ही वेंचियेलें प्राण । तुम्ही ते दुरून बाण टाका
१०६६९	।।ना.गा.१६५३.०३१।।	अयोध्येचे राज्यीं तुम्हां सिंहासन । आमचे कपाळीं हीन चुकेचि ना
१०६७०	।।ना.गा.१६५३.०३२।।	वस्त्रें अलंकार तुम्हां हस्ती घोडे । आम्हीं ते उघडे पायीं चालों
१०६७१	।।ना.गा.१६५३.०३३।।	चाड सरलिया नाहीं आठवण । कां हो लक्षुमण दवडिला

१०६७२	।।ना.गा.१६५३.०३४।।	लोक म्हणों तर पाठीं सहोदर । जालेति निष्ठुर देवराया
१०६७३	।।ना.गा.१६५३.०३५।।	तुम्हां एकलेनि न करावें गमन। सर्व अवघेजण आलों आम्ही
१०६७४	।।ना.गा.१६५३.०३६।।	कंसाभेणें तुम्ही राखियेल्या गाई । तेथें आम्ही काई नव्हतों देवा
१०६७५	।।ना.गा.१६५३.०३७।।	भोगा स्वामीपण राखितां गोधनें । ठकोनियां खाणें आमच्या रोट्या
१०६७६	।।ना.गा.१६५३.०३८।।	सर्पापोटीं आम्हीं घाबरलोसें विखें। तुम्ही आपुले सुखें वेगळेची
१०६७७	।।ना.गा.१६५३.०३९।।	खेळतां यमुनेडोहीं टाकियेली उडी । आम्ही थडी थडी रुदन करूं
१०६७८	।।ना.गा.१६५३.०४०।।	गोवर्धन गिरी आमुचिये शिरीं । तुम्हीं नानापरी वेणु वाहा
१०६७९	।।ना.गा.१६५३.०४१।।	आम्हां चोरूनी नेलें वर्षभरी । तुम्हीं आपुले घरीं सुखी असा
१०६८०	।।ना.गा.१६५३.०४२।।	असो आतां चाड नाहीं येणेंवीण । आमुचें निर्वाण पाहूं नका
१०६८१	।।ना.गा.१६५३.०४३।।	आमुचे दिवस काय वायां गेले । स्वामीया उगले राहा तुम्ही
१०६८२	।।ना.गा.१६५३.०४४।।	कल्पाचे शेवटीं तुम्हां आम्हां भेटी । तेथें पैं ह्या गोष्टी कळों येती
१०६८३	।।ना.गा.१६५३.०४५।।	नामा म्हणे आम्ही पाईक फुकाचे । धारक नामाचे दास तुझे
१०६८४	।।ना.गा.१६५४.००१।।	नेणें भक्ति कांहीं करूं कैसी सेवा । हें तों मज देवा समजेना
१०६८५	।।ना.गा.१६५४.००२।।	करूं कैसा जप करूं कैसें ध्यान । नाहीं माझें मन स्थिर देवा
१०६८६	।।ना.गा.१६५४.००३।।	कामक्रोध यांची मोठी हे जाचणी । जालों वेड्यावाणी समजेना
१०६८७	।।ना.गा.१६५४.००४।।	नामा म्हणे माझे सांवळे विठाई । येऊनियां राही हृदयामाजीं
१०६८८	।।ना.गा.१६५५.००१।।	तुज दिलें आतां यत्न करी याचा । जीवभाव वाचा काया मनें
१०६८९	।।ना.गा.१६५५.००२।।	भागलों दातारा शीण जाला भारी । आतां मज तारी अनाथासी
१०६९०	।।ना.गा.१६५५.००३।।	नेणतां सोसिली तयांची आटणी । नव्हती ही कोणी कांहीं माझी
१०६९१	।।ना.गा.१६५५.००४।।	वर्म नेणें दिशा हिंडती मोकाट । इंद्रिय सुसाट सर्व पृथ्वी
१०६९२	।।ना.गा.१६५५.००५।।	येरझारा फेरा शिणलों सायासीं । आतां हृषिकेशी अंगिकारीं
१०६९३	।।ना.गा.१६५५.००६।।	नामा म्हणे मन इंद्रियाचें सोयी । धांव यासी कायी करूं आतां
१०६९४	।।ना.गा.१६५६.००१।।	तुझे चरणीं चित्त रंगलें अनुरागें । बहुजन्मीं वियोगें शिणलें होतें
१०६९५	।।ना.गा.१६५६.००२।।	आहाळलें पोळलें तापत्रयीं पीडिलें । तृष्णें विभांडिलें नानापरी
१०६९६	।।ना.गा.१६५६.००३।।	काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर । इहीं निरंतर जाजावलें
१०६९७	।।ना.गा.१६५६.००४।।	बुडतिया अवचटें लाभे पैं सांगडी । ते जीवें न सोडी तैसें जालें

१०६९८	।।ना.गा.१६५६.००५।।	नामा म्हणे केशवा तूं कृपेचा सागर । झणीं माझा अव्हेर करिसी देवा
१०६९९	।।ना.गा.१६५७.००१।।	न विचारितां बळि घातला पाताळीं । सर्वेचि कणव उपजली तये वेळीं । द्वार न संडिसि कवणे काळीं। ऐसी तुझी करणी दातारा
१०७००	।।ना.गा.१६५७.००२।।	अगा केशवा सुजाणा । गार्‍हाणें सांगू कवणा । तुझिये नामें तुटे बंधना । देवकीनंदना वासुदेवा
१०७०१	।।ना.गा.१६५७.००३।।	वसुदेव बांदवडी । आपदा करोन एवढी । मग त्या कंसा केवीं धाडी । मोक्ष तया दिधला
१०७०२	।।ना.गा.१६५७.००४।।	सुदामा सांगातें जेवी । धान्य मागे गांवोगांवीं । आपदा करोनि बहू ही । मग त्यासी राज्य दिधलें
१०७०३	।।ना.गा.१६५७.००५।।	जोहरीं सुदलें पांडवां । सर्वेचि उपजली कणवा । अग्निपासोनी केशवा । रक्षियेलें तयांसी
१०७०४	।।ना.गा.१६५७.००६।।	सभा पिसुनाची दाटली । द्रौपदी वस्त्रें आसुडली । एवढी आपदा करविली । मग वस्त्रें पुरविलीं तियेतें
१०७०५	।।ना.गा.१६५७.००७।।	दैत्यें गांजियला प्रल्हाद । तुझ्या नामाचा घेतला छंद । एवढा करुनियां खेद । मग त्या दैत्या वध केला
१०७०६	।।ना.गा.१६५७.००८।।	बिभीषणा हाणितल्या लाथा । लंका दिली त्या उचिता । समर्थें केलें तें बरवें आतां । तूं रघुनाथा ऐकें पैं
१०७०७	।।ना.गा.१६५७.००९।।	आम्ही लाडके डिंगर । माझें बोलणें उद्धट फार । तूं तंव कृपेचा सागर । उतरी पार म्हणे नामा
१०७०८	।।ना.गा.१६५८.००१।।	निरंजनीं वनीं पाषाण पैं व्हावें । परी जन्मा न यावें मागत्याच्या
१०७०९	।।ना.गा.१६५८.००२।।	राजाचें लेकरूं पांघरे वाकळ । तेव्हां तें सकळ लाज कोणा
१०७१०	।।ना.गा.१६५८.००३।।	पोसवेना तरी दवडुनि देई देवा । नामा तुज केशवा विनवितसे
१०७११	।।ना.गा.१६५९.००१।।	माझिया मनाचें हिंडणें जे जे ठायीं । तेथें तेथें राही पांडुरंगा
१०७१२	।।ना.गा.१६५९.००२।।	भीमा चंद्रभागा वैकुंठ पंढरी। दावीं दृष्टीभरी निरंतर
१०७१३	।।ना.गा.१६५९.००३।।	पुंडलिकासमोर लक्ष निरंतरीं । तैसाची अंतरीं येऊनि राहे
१०७१४	।।ना.गा.१६५९.००४।।	कटीं कर विटे समचरण गोमटें । पाहतां अति निकट हेंचि ध्यान
१०७१५	।।ना.गा.१६५९.००५।।	पुरवी माझी आस तूं बाप माउली । करीं मज साउली पद्मकरें
१०७१६	।।ना.गा.१६५९.००६।।	नामा म्हणे झणें करिसी उदास । होती कासावीस प्राण माझे
१०७१७	।।ना.गा.१६६०.००१।।	आसनीं शयनीं आठवीं अनुदिनीं । नित्य समाधानीं रूप तुझें
१०७१८	।।ना.गा.१६६०.००२।।	काम धाम कांहीं नलगे माझ्या चित्तीं । न देखे विश्रांति तुजविण
१०७१९	।।ना.गा.१६६०.००३।।	तापत्रय ओणवा लागला चहूंकडे । न देखें उघडे तुजविण
१०७२०	।।ना.गा.१६६०.००४।।	तुजविण तें जिवलग दुजें कोण होईल । तें माझें निवारील उद्वेग हे
१०७२१	।।ना.गा.१६६०.००५।।	कृपेचा सागरू त्रिभुवनीं उदारू । न करी अव्हेरू अनाथाचा
१०७२२	।।ना.गा.१६६०.००६।।	नामा म्हणे केशवा आस माझी पुरवी । पाउलें दाखवी एक वेळां

१०७२३	।।ना.गा.१६६१.००१।।	आतां माझी चिंता तुज नारायणा । रुक्मिणीरमणा वासुदेवा
१०७२४	।।ना.गा.१६६१.००२।।	द्रौपदी संकटीं वस्त्रें पुरविलीं। धांव त्वां घेतली गजेंद्रासी
१०७२५	।।ना.गा.१६६१.००३।।	उपमन्या आळी तुवां पुरविली । अढळपदीं दिल्ही वस्ती धृवा
१०७२६	।।ना.गा.१६६१.००४।।	नामा म्हणे करा करुणा केशवा । तूं माझा विसावा पांडुरंगा
१०७२७	।।ना.गा.१६६२.००१।।	विष पाजावया पूतना ते आली । ते तुवां तारिली काय म्हणुनि
१०७२८	।।ना.गा.१६६२.००२।।	पुसा या म्हणोनि वेश्या बोभाईलि । ती तुवां तारिली काय म्हणूनि
१०७२९	।।ना.गा.१६६२.००३।।	पिंगळेची आख्या पुराणीं ऐकिली । ते तुवां तारिली काय म्हणुनि
१०७३०	।।ना.गा.१६६२.००४।।	गौतमाचें शापें अहल्या शिळा जाली । ते तुवां तारिली काय म्हणुनि
१०७३१	।।ना.गा.१६६२.००५।।	नामा म्हणे केशवा अकळ तुझी करणी । विसंबसी झणीं तूंचि मज
१०७३२	।।ना.गा.१६६३.००१।।	तुझें गुणनाम ऐकतां श्रवण नाराध्ये । अवलोकन करित नयन नाराध्ये । पूजन करितां कर नाराध्ये। ऐसी नाराणुक द्यावी कमळापती
१०७३३	।।ना.गा.१६६३.००२।।	नरहरि या नामें उदंड । केव्हांही नसावें रिकामें तोंड । खांदीं सतत करंडा वाहे । मस्तकीं अखंड निर्माल्य राहे । नेत्रीं आनंदजळ वाहे । यामध्यें देवा झणें कांही उणें होय
१०७३४	।।ना.गा.१६६३.००३।।	तुझेनि प्रसादें जठर पोसिलें । चरणोदकें तृष्णाहरण केलें । नामें नृत्य करितां मन हें निवालें । दंडवत घालितां श्रम हरले
१०७३५	।।ना.गा.१६६३.००४।।	गत शयनीं विसर न द्यावा श्रीरामा । यापरी निश्चित परमात्मा । तूं आलिया निवारिसी श्रमा । ऐसें केशिराजा विनवितो नामा
१०७३६	।।ना.गा.१६६४.००१।।	तुझें नाम म्हणतां सुलभ अनंता । दुर्लभ म्हणतां अंतकाळीं
१०७३७	।।ना.गा.१६६४.००२।।	तैसें तुवां मज केशवा करावें। हृदयीं भेदावें नाम तुझें
१०७३८	।।ना.गा.१६६४.००३।।	मुके पशु पक्षी वृक्ष आणि पाषाण । तया नारायणा गति कैसी
१०७३९	।।ना.गा.१६६४.००४।।	नामा म्हणे कैसें केशवा सांगणें । अज्ञानी ते नेणें कवणेंपरी
१०७४०	।।ना.गा.१६६५.००१।।	देवा निढळावरी हात दोन्ही । पाहें चक्रपाणि वाट तुझी
१०७४१	।।ना.गा.१६६५.००२।।	धांव गा धांव सख्या पांडुरंगा । जीवीं जिवलगा मायबापा
१०७४२	।।ना.गा.१६६५.००३।।	तुजविण ओस दिसती दाही दिशा । आणि धांव जगदीशा मजसाठीं
१०७४३	।।ना.गा.१६६५.००४।।	नामा म्हणे काय बैसलों निवांत । धांवतो अनंत भक्तांसाठीं
१०७४४	।।ना.गा.१६६६.००१।।	भागलासि देवा धांव धांवणिया । दाखविसी पायां पांडुरंगा
१०७४५	।।ना.गा.१६६६.००२।।	गजेंद्र गणिका तुम्हां श्रमविलें। मी काय उगलें परदेशी
१०७४६	।।ना.गा.१६६६.००३।।	सोळा सहस्र आणि गोपी त्या उद्धरती । माझी कींव चित्तीं कां बा नये

१०७४७	।।ना.गा.१६६६.००४।।	नामा म्हणे आम्हां पुरे तुझा संग । वारंवार मग वारी कोण
१०७४८	।।ना.गा.१६६७.००१।।	केशवचरणीं मनें दिली बुडी । इंद्रियें बापुडीं धांवती पाठीं
१०७४९	।।ना.गा.१६६७.००२।।	संसार संभ्रम नको सुखलेश । भातुकें सरिसें पाठविसी
१०७५०	।।ना.गा.१६६७.००३।।	जन्मजन्मांतरीं जाणावें कवणें । नेणोनि भोगणें कवणें स्वामी
१०७५१	।।ना.गा.१६६७.००४।।	नामा म्हणे केशवे भक्तवत्सले । आम्हांसि वेगळे होऊं नका
१०७५२	।।ना.गा.१६६८.००१।।	ऐसा विचारें समाधान करीं । गोविंद श्रीहरी नारायण
१०७५३	।।ना.गा.१६६८.००२।।	सर्वकाळ ऐसी वदो ही वैखरी । आणिक अंतरीं नाठवावें
१०७५४	।।ना.गा.१६६८.००३।।	आणिकासी गुज न बोले वदन । वदो नारायण सर्वकाळ
१०७५५	।।ना.गा.१६६८.००४।।	रामकृष्ण माझ्या शेषांचे स्तवन । शास्त्रेंहि पुराणें भाट ज्यांचीं
१०७५६	।।ना.गा.१६६८.००५।।	नामा म्हणे आतां ऐसें करी देवा । हृदयीं केशवा राहे माझ्या
१०७५७	।।ना.गा.१६६९.००१।।	पैल पिकली पंढरी । विठ्ठलरायाची नगरी
१०७५८	।।ना.गा.१६६९.००२।।	पाहा एकलें निरूतें । विश्व केलें हें मागुतें
१०७५९	।।ना.गा.१६६९.००३।।	केशवा खळेदान देतां । नामा जालासे मागता
१०७६०	।।ना.गा.१६७०.००१।।	विटेवरी नीट उभा कटीं ठेवुनी कर । तो पुंडलिकाचे द्वारीं देखियेला
१०७६१	।।ना.गा.१६७०.००२।।	बहुली बहुली देहुडा पाउलीं । गुंजाहार गळां देखियेला
१०७६२	।।ना.गा.१६७०.००३।।	पुष्पावतीच्या संगमीं गोपाळ आश्रमीं । काला करितां आम्ही देखियेला
१०७६३	।।ना.गा.१६७०.००४।।	वेणु वाहतां चहुंकरी नाद उठला अंबरीं । वासुरें तटस्थ हुंबरी होऊनि देखियेला
१०७६४	।।ना.गा.१६७०.००५।।	अंगी चंदनाची उटी मयुरपत्रांची दाटी । चेंडू खेळतां यमुनेतटीं देखियेला
१०७६५	।।ना.गा.१६७०.००६।।	नामा म्हणे केशवा देखियेलें हृदयीं । जन्मवरी राही हेंचि मागें
१०७६६	।।ना.गा.१६७१.००१।।	बाहेरी भीतरीं तुजचि मी देखें । चित्त तेणें सुखें वेडावलें
१०७६७	।।ना.गा.१६७१.००२।।	संतसंगें मज पालट हा जाला । पाहातां विठ्ठला रूप तुझें
१०७६८	।।ना.गा.१६७१.००३।।	मीपणासहित आनंदीं बुडालें । न निघे कांहीं केलें चित्त माझें
१०७६९	।।ना.गा.१६७१.००४।।	नामा म्हणे एक उरलीसे वासना । स्वामिसेवकपणा देई देवा
१०७७०	।।ना.गा.१६७२.००१।।	मन माझें आंधळें कपटाचें कवाडें । भक्ता केंवि उघडे ज्ञानेंविण
१०७७१	।।ना.गा.१६७२.००२।।	काय करूं देवा माझिया या दैवा । अभक्तांसी भाव केंवि होय
१०७७२	।।ना.गा.१६७२.००३।।	हें माझें म्हणसी कुबुद्धी लेंकरी । मागें काळवैरी पाहतसे

१०७७३	।।ना.गा.१६७२.००४।।	नामा म्हणे केशवा माझा तुझा भाव । तुझे पायीं ठाव देई देवा
१०७७४	।।ना.गा.१६७३.००१।।	मी असे तेथें मग तूं कैंचा । हा उपजत ठायींचा तोडी वेळु
१०७७५	।।ना.गा.१६७३.००२।।	आपुलें करोनि ठेवीं तुझे चरणीं। न मानिती कोणी क्षिती नाहीं
१०७७६	।।ना.गा.१६७३.००३।।	सेवा तुझी देई हेंचि दुजेपण । येर तो अभिमान खंडी माझा
१०७७७	।।ना.गा.१६७३.००४।।	नामा म्हणे देवा आवडसी माझ्या जीवा । सुखरूप केशवा विठ्ठलराजा
१०७७८	।।ना.गा.१६७४.००१।।	मनें ध्यान करणें वाचे उच्चारणें । नयनीं तुज पाहणें हेंचि देई
१०७७९	।।ना.गा.१६७४.००२।।	माथा चरणीं ठेवणें करें पूजा करणें । श्रवणीं ऐक गुण हेंचि देईं
१०७८०	।।ना.गा.१६७४.००३।।	षड्चक्रमार्गावरी बावन्न अक्षरीं । निरालंब निरंतरीं भेटी देईं
१०७८१	।।ना.गा.१६७४.००४।।	मनसा वाचा कर्म आणि दश इंद्रियें। तुझ्या चरणीं होय ऐसें करीं
१०७८२	।।ना.गा.१६७४.००५।।	डावी उजवीकडे आणि मागें पुढें । अंतरीं चरण जोडे ऐसें करीं
१०७८३	।।ना.गा.१६७४.००६।।	नामा म्हणे केशवा मी तुझें लडिवाळ । जन्मोजन्मीं जोड हेंचि देई
१०७८४	।।ना.गा.१६७५.००१।।	काळ देहासी आला खाऊं । आम्ही आनंदें नाचूं गाऊं
१०७८५	।।ना.गा.१६७५.००२।।	कोण वेळे काय गाणें । हें तो भगवंता मी नेणें
१०७८६	।।ना.गा.१६७५.००३।।	टाळ मृदंग दक्षिणेकडे । माझें गाणें पश्चिमेकडे
१०७८७	।।ना.गा.१६७५.००४।।	नामा म्हणे बा केशवा। जन्मोजन्मीं द्यावी सेवा
१०७८८	।।ना.गा.१६७६.००१।।	तूं एक म्हणोनि मी ऐसा जाणें । तुझें नाम जाण विस्तारिलें
१०७८९	।।ना.गा.१६७६.००२।।	आतां करिसी काय आतां करिसी काय । सांपडली सोय रामचंद्रा
१०७९०	।।ना.गा.१६७६.००३।।	चरणींजे आहे ती माझी माय । ईश्वरू तो वाहे शिरकमळीं
१०७९१	।।ना.गा.१६७६.००४।।	नामा म्हणे देवा न सोडी मी भावा । जन्मोजन्मीं सेवा यावी तुझी
१०७९२	।।ना.गा.१६७७.००१।।	दास्यत्व न घडेची तुझें । आयुष्य वेंचिलें वीण काजे । धरणीं जालें पैं ओझें । तुझ्या प्राप्तिवांचोनि
१०७९३	।।ना.गा.१६७७.००२।।	पुनरपि जन्मा येईन मागुता । कवण जाणे कैसी व्यवस्था । तुज मी ध्याईन अनंता । ऐसा लाभ कैं होईल
१०७९४	।।ना.गा.१६७७.००३।।	तुझ्या नामाचा वोरसु। तेणें चुकला गर्भवासु । नामा विनवी विष्णुदासु । देई सौरसु आपुले नामीं
१०७९५	।।ना.गा.१६७८.००१।।	स्वामी एक व्हावा तुजचि सारिखा । करी निज सेवका जगद्वंद्य
१०७९६	।।ना.गा.१६७८.००२।।	देउनी प्रेमातें पाळिसी तूं बाळें । न करिसी जीवावेगळें क्षणभरी
१०७९७	।।ना.गा.१६७८.००३।।	बळी भीष्म नारद उद्धव रुक्मांगद । हनुमंत प्रल्हाद अंबऋषि
१०७९८	।।ना.गा.१६७८.००४।।	नामा म्हणे हेचि देईं जन्मोजन्मीं। मी दास तूं स्वामी केशिराजा

१०७९९	।।ना.गा.१६७९.००१।।	हेचि माझी संध्या हेंचि माझें स्नान । तुझ्या पायीं मन लागो देवा
१०८००	।।ना.गा.१६७९.००२।।	हेचि माझी ऋद्धि हेचि माझी सिद्धी । अखंड समाधी पाय तुझे
१०८०१	।।ना.गा.१६७९.००३।।	नामा म्हणे हेंचि देई गा श्रीपती । कथेची विश्रांति जन्मोजन्मीं
१०८०२	।।ना.गा.१६८०.००१।।	पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें
१०८०३	।।ना.गा.१६८०.००२।।	हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें
१०८०४	।।ना.गा.१६८०.००३।।	मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव
१०८०५	।।ना.गा.१६८०.००४।।	नामा म्हणे तुझें नित्य महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें
१०८०६	।।ना.गा.१६८१.००१।।	माता आणि तात सोयरे हरिजन । यम नेम नेणें दोन गोष्टी
१०८०७	।।ना.गा.१६८१.००२।।	गोष्ट ते कोणती म्हणाल तुम्ही जरी । वाचे हरिहरि म्हणतसे
१०८०८	।।ना.गा.१६८१.००३।।	नामा म्हणे आम्ही मागतों देवासी । कीर्तनीं उपवासी करावें देवा
१०८०९	।।ना.गा.१६८२.००१।।	आम्हीं दिला जीव तुझिया कीर्तनें । पांगुळलीं मनें योगियांचीं
१०८१०	।।ना.गा.१६८२.००२।।	न बोलवे वाचा न बोलवे कांहीं । आपेंआप पाही ठाकलों असे
१०८११	।।ना.गा.१६८२.००३।।	ऐसें तुझें नाम दे गोड गा देवा । घाली बा केशवा हृदयामाजीं
१०८१२	।।ना.गा.१६८२.००४।।	नामा म्हणे आम्हां सांपडलें वर्म । नित्य वाचे नाम रामकृष्ण
१०८१३	।।ना.गा.१६८३.००१।।	आठवितां मनीं तुझी ब्रीदावळी । येऊनि जवळी उभा ठाकें
१०८१४	।।ना.गा.१६८३.००२।।	लाज धरोनियां होतोसि माघारा । तुजची दातारा दिसे शोभा
१०८१५	।।ना.गा.१६८३.००३।।	नामरूपासाठीं घेसी नाना सोंगें । भक्त जिवलगे अंतकाळीं
१०८१६	।।ना.गा.१६८३.००४।।	नामा म्हणे मज नको हा संसार । मज निरंतर देईं संग
१०८१७	।।ना.गा.१६८४.००१।।	सगुण निर्गुण जे कां बोलिजे । ते तूं माझें सर्व पांडुरंगा
१०८१८	।।ना.गा.१६८४.००२।।	आहेसि तितुकें तूंचि सर्वागत । मी काय अनाथ वर्णूं तुज
१०८१९	।।ना.गा.१६८४.००३।।	चरणींची आवडी न संडावी मनें । यापरि पोसणें मायबापा
१०८२०	।।ना.गा.१६८४.००४।।	साक्ष भीमरथी संत पुंडलिक । नाम्यातें आणिक न कळे कांहीं
१०८२१	।।ना.गा.१६८५.००१।।	श्रीमुखाची सोय पाहों म्हणों जरी । एवढा मी अधिकारी कैंचा देवा
१०८२२	।।ना.गा.१६८५.००२।।	चरणांजवळूनि नसावें जी दुरी । जन्मजन्मांतरी हेंचि देईं
१०८२३	।।ना.गा.१६८५.००३।।	तुज देतां सोपें मजहि तृप्ति अल्पें । सर्वज्ञा साक्षेपें सांगतसे
१०८२४	।।ना.गा.१६८५.००४।।	अनाथाचा नाथ हें ब्रीद साच । न करावें उदास नामा म्हणे

१०८२५	।।ना.गा.१६८६.००१।।	बाहेरी भीतरीं पाहतां दिसे एकु । उभा असे व्यापकु पंढरिरावो
१०८२६	।।ना.गा.१६८६.००२।।	पंढरीचा राणा विटेवरी जाणा । जीविचिया खुणा भक्ता सांगे
१०८२७	।।ना.गा.१६८६.००३।।	गुंतलों संसारीं भरलों कर्मभांडारीं । विषयामाझारीं मोहियेलें
१०८२८	।।ना.गा.१६८६.००४।।	नामा म्हणे केशवा माझें उणें न पाही । चरणसेवा देईं जन्मोजन्मीं
१०८२९	।।ना.गा.१६८७.००१।।	हेंचि देवा पैं मागत । चरणसेवा अखंडित
१०८३०	।।ना.गा.१६८७.००२।।	वास द्यावा पंढरीचा । सदा संग हरिदासाचा
१०८३१	।।ना.गा.१६८७.००३।।	जन्म हो का भलते याति । परि मी न चुके हरिभक्ति
१०८३२	।।ना.गा.१६८७.००४।।	नामा म्हणे कमळापती । हेंचि द्यावें पुढतोंपुढतीं
१०८३३	।।ना.गा.१६८८.००१।।	विणा घेऊनियां करीं । उभा राउळामाझारीं
१०८३४	।।ना.गा.१६८८.००२।।	तहान भूक हरपली । छंद लागला विठ्ठलीं
१०८३५	।।ना.गा.१६८८.००३।।	कन्या पुत्र बाप माय । त्यांचा आठव तो न ये
१०८३६	।।ना.गा.१६८८.००४।।	नामा म्हणे हेंचि देईं । तुझे पायीं माझी डोई
१०८३७	।।ना.गा.१६८९.००१।।	नेणें मन कांहीं विश्वास नामाचा । गोसावी आमुचा पांडुरंग
१०८३८	।।ना.गा.१६८९.००२।।	संसारीं पडलों कर्माचे भांडारीं । कृपा निरंतरीं करी मज
१०८३९	।।ना.गा.१६८९.००३।।	नेणें तुझें ध्यान नेणें तुझें प्रेम । दावी मज वर्म सेवकासी
१०८४०	।।ना.गा.१६८९.००४।।	नामा म्हणे माझे गुणदोष कांहीं । ठाव तुझे पायीं देईं मज
१०८४१	।।ना.गा.१६९०.००१।।	होईन संताचा वोळगणा । दास डिंगर पोसणा
१०८४२	।।ना.गा.१६९०.००२।।	प्रेम देईं नारायणा । भूतदया परिपूर्णा
१०८४३	।।ना.गा.१६९०.००३।।	संतचरणींचे रज । हेंचि सर्व तीर्थ मज
१०८४४	।।ना.गा.१६९०.००४।।	सेवीन संत उष्टावळी । तेणें पवित्र आमुची कुळीं
१०८४५	।।ना.गा.१६९०.००५।।	राखेन संताचें मी द्वार । तें मज वैकुंठीहुनि थोर
१०८४६	।।ना.गा.१६९०.००६।।	नामा म्हणे पंढरीनाथा । आणिक न मागें सर्वथा
१०८४७	।।ना.गा.१६९१.००१।।	ऐकें मोक्षाची मी कथा । तेणें भय वाटे चित्ता
१०८४८	।।ना.गा.१६९१.००२।।	देवा कांहीं न मागें न मागें । मौन असें संतसंगें
१०८४९	।।ना.गा.१६९१.००३।।	ऐकें मुक्तिचिया गोष्टी । तेणें होतसे हिंपुटी
१०८५०	।।ना.गा.१६९१.००४।।	ऐकें समाधीची गोडी । मन तुझे पायीं वोढी

१०८५१	।।ना.गा.१६९१.००५।।	ऐकें स्वर्गसुख थोरी । भेणें कांप येतो भारी
१०८५२	।।ना.गा.१६९१.००६।।	नामा म्हणे अभयदान । देऊनि सांगे प्रेमखूण
१०८५३	।।ना.गा.१६९२.००१।।	साधुनि समाधी तुज म्यां चिंतावें । मग माझ्या यावें हृदयांत
१०८५४	।।ना.गा.१६९२.००२।।	तंव पांडुरंगा संतामाजीं उणें। तुजलागीं निर्वाणें करीं देवा
१०८५५	।।ना.गा.१६९२.००३।।	तुजसी संबंध लौकिका वेगळा । पाळिसी गोपाळा लळे माझे
१०८५६	।।ना.गा.१६९२.००४।।	उपजतां बाळ हितार्था लागोनी । प्रसन्न जननी होई आधीं
१०८५७	।।ना.गा.१६९२.००५।।	भिडेस्तव पान्हा फुटोनियां थानीं । पेहे त्या पाजुनि दिलें काय
१०८५८	।।ना.गा.१६९२.००६।।	उदित सूर्यास लागे विनवावा । यावें तुवां गांवा प्रकाशित
१०८५९	।।ना.गा.१६९२.००७।।	मग तें तयानें निवारावें तमा । हे तो मेघ:श्यामा नाहीं श्रुत
१०८६०	।।ना.गा.१६९२.००८।।	पृथ्वीभूतीं काय करावा आदरू । मग त्याचा भारू चालवावा
१०८६१	।।ना.गा.१६९२.००९।।	जीवना जीवन प्रार्थुनि आणावें । तेणें काय निववावें संत त्यांसी
१०८६२	।।ना.गा.१६९२.०१०।।	सर्वज्ञ उदार होसी चक्रवर्ती । कार्याकारणांती नांद तुझी
१०८६३	।।ना.गा.१६९२.०११।।	नामा म्हणे माझें चित्त कृष्णाकार । करूनि निर्धार प्रेम देईं
१०८६४	।।ना.गा.१६९३.००१।।	आडलिया कोंवसा अनाथा कैवारी । ब्रीद चराचरीं वर्णिताती
१०८६५	।।ना.गा.१६९३.००२।।	येईं बा श्रीहरी तूं आमचा कैवारी । सुदर्शन करीं येईं शीघ्र
१०८६६	।।ना.गा.१६९३.००३।।	गजेंद्राकारणें कळवळा अगाध । जगीं तुझें ब्रीद तैसा येईं
१०८६७	।।ना.गा.१६९३.००४।।	सुदामा ब्राह्मण अनाथ दुर्बळ । तेथें तूं केवळ अवतरलासी
१०८६८	।।ना.गा.१६९३.००५।।	धृवासी स्थापिलें उपमन्याकारणें । क्षीरसागर देणें तैसा येईं
१०८६९	।।ना.गा.१६९३.००६।।	अंबऋषीसाठीं सोशी गर्भवास । दुर्वासा कासावीस तैसा येईं
१०८७०	।।ना.गा.१६९३.००७।।	विदुरासी भक्तपण तूं उद्धवासी जवळी । अर्जुना सर्वकाळीं तैसा येईं
१०८७१	।।ना.गा.१६९३.००८।।	गोपाळा यशोदा नंदासी खेळसी । गायी रानीं चारिसी तैसा येईं
१०८७२	।।ना.गा.१६९३.००९।।	नामा म्हणे मागे सदा अभयकर । प्रेमाचा उदार तैसा येईं
१०८७३	।।ना.गा.१६९४.००१।।	प्रपंचीं जरी मातें करिसी उदासीन । तरी तुझें ध्यान लागो मना
१०८७४	।।ना.गा.१६९४.००२।।	हेंचि तुज मागणें जन्मजन्मांतरीं । न मागतां अंतरीं प्रगट होसी
१०८७५	।।ना.गा.१६९४.००३।।	इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडी । प्रेमरसगोडी देईं मातें
१०८७६	।।ना.गा.१६९४.००४।।	नामा म्हणे शरण आलों मी केशवा । हाचि तूं पुरवावा मनोरथ

१०८७७	।।ना.गा.१६९५.००१।।	शरीर प्राणाचें देउनी बळीदान । साधा रे निधान प्रेमसुख
१०८७८	।।ना.गा.१६९५.००२।।	हेंचि नित्य मागा तया श्रीवल्लभा। त्रिभुवनीं दुर्लभा आणिक नाहीं
१०८७९	।।ना.गा.१६९५.००३।।	हरिदासांचा सांग हरिकथा अनुराग । हेंचि पुण्यभाग्य अनुपम्य
१०८८०	।।ना.गा.१६९५.००४।।	विषईं विरक्ती नामीं नित्य प्रीति । हृदयीं कृष्णमूर्ति वसो सदा
१०८८१	।।ना.गा.१६९५.००५।।	सर्वभावें करूनि सर्वभूतीं करुणा । सर्वत्र देखणा विठ्ठलरूप
१०८८२	।।ना.गा.१६९५.००६।।	नामा म्हणे मग तो केशव कृपासिंधु । देईल भक्तिबोधु प्रेमसुखें
१०८८३	।।ना.गा.१६९६.००१।।	वेणू वाहोनी सांवळा । गाई चारिसी गोवळा
१०८८४	।।ना.गा.१६९६.००२।।	कां बा न येसि धांवत । विठ्ठल माझें कुळदैवत
१०८८५	।।ना.गा.१६९६.००३।।	अंगीं चंदनाची उटी । पदक मिरविलें कंठीं
१०८८६	।।ना.गा.१६९६.००४।।	गळां माळ वैजयंती । सुदर्शन घेऊन हातीं
१०८८७	।।ना.गा.१६९६.००५।।	कासे पितांबर शेला । विटेवरलिया विठ्ठला
१०८८८	।।ना.गा.१६९६.००६।।	नामा म्हणे पीडिलों भुकें । देई प्रेमाचें भातुकें
१०८८९	।।ना.गा.१६९७.००१।।	पुलक धर्म रोमांच नाहीं जंव उठिले । सजळ नाहीं जाले नयन जंव
१०८९०	।।ना.गा.१६९७.००२।।	तंव हरिभक्तीचें सुख कळलें जे म्हणती । लटिकें बोलिजेति उभयलोकीं
१०८९१	।।ना.गा.१६९७.००३।।	ऐसा भक्तिप्रेमा देईं जी देवा । सर्व भावें सेवा घडे तुझी
१०८९२	।।ना.गा.१६९७.००४।।	श्रवणीं ऐकतां नाम वाचे बोले । नाहीं सुखावलें मन त्यांचें
१०८९३	।।ना.गा.१६९७.००५।।	श्रीहरीचें नाम म्हणवितां न म्हणे । मा सहज उच्चारणें कैंचें त्यासी
१०८९४	।।ना.गा.१६९७.००६।।	दर्दुराचे परी जिव्हा वटवटी । सांडोनि हरिगोष्टी आणिक सांगे
१०८९५	।।ना.गा.१६९७.००७।।	देवाच्या मूर्ती संत महंत देखोनी । न वचे लोटांगणीं भावें त्यासी
१०८९६	।।ना.गा.१६९७.००८।।	न लावी त्यांचे रज टकामका पाहत । बुजवण जैसें सेत राखे तैसें
१०८९७	।।ना.गा.१६९७.००९।।	ऐसे कैक प्राणी आहेति मूढमति । हित सांगतां चित्तीं दुःख वाटे
१०८९८	।।ना.गा.१६९७.०१०।।	नामा म्हणे केशवा मी तुझें दीन । नेणें तुजवांचोन आन दुजें
१०८९९	।।ना.गा.१६९८.००१।।	पतितपावन ब्रीद सोडवीन आतां । तरीच पंढरीनाथा दास तुझा
१०९००	।।ना.गा.१६९८.००२।।	माझे गुण दोष न धरावें मनीं । तारिलें मजहुनि कोण वंद्य
१०९०१	।।ना.गा.१६९८.००३।।	अजामेळां अधिकार न्यावया वैकुंठा । माझिया अदृष्टा काय जालें
१०९०२	।।ना.गा.१६९८.००४।।	पित्यासी पतन स्वामीची करणी । गणिका विमानीं कीर्ती कोण

१०९०३	।।ना.गा.१६९८.००५।।	शिशुपाळें सिव्या दिल्ह्या सभेआंत । त्यांहुनि पतित थोर जालों
१०९०४	।।ना.गा.१६९८.००६।।	नामा म्हणे पुढती न बोलें तुझें वर्म । अंगिकारोनि प्रेम देईं देवा
१०९०५	।।ना.गा.१६९९.००१।।	आणिक न मागें हें ब्रीद साजे चातका । भूमीच्या उदका न खालवी माथा
१०९०६	।।ना.गा.१६९९.००२।।	आणिका पुढें न गाय हें ब्रीद साजे कोकिळिये । वसंतऋतु स्वयें आळवितसे
१०९०७	।।ना.गा.१६९९.००३।।	आणिकापुढें न नाचे हें ब्रीद साजे मयुरा । वर्षला घन सारा वळोनियां
१०९०८	।।ना.गा.१६९९.००४।।	एका लक्ष्मीपतिवांचुनि न बैसे आणिकापुढें । हें ब्रीद साजे रोकडें गरुडासी
१०९०९	।।ना.गा.१६९९.००५।।	आणिकांचा पांगिला न करी गा देवा । नामा म्हणे केशवा रंक तुझा
१०९१०	।।ना.गा.१७००.००१।।	काये देणारे ते नर । जंव दिल्हें नाहीं रघुवीरें
१०९११	।।ना.गा.१७००.००२।।	आजि दिल्हें उद्या नाहीं । ऐसियासी मागों काईं
१०९१२	।।ना.गा.१७००.००३।।	हात पसरूं ऐसें धुरें । दिल्हें कल्पांतीं न सरे
१०९१३	।।ना.गा.१७००.००४।।	नामा म्हणे देवाधिदेव । समर्थ दाता पंढरिराव
१०९१४	।।ना.गा.१७०१.००१।।	माझें मागणें तें किती । दाता लक्षुमीचा पती
१०९१५	।।ना.गा.१७०१.००२।।	मेघ वर्षे सिळाधारी । तेथें चातक चंचुभरी
१०९१६	।।ना.गा.१७०१.००३।।	महाडोहो गंगाजळ । तृप्त एक दो अंजुळें
१०९१७	।।ना.गा.१७०१.००४।।	साखरेची साठी । तेथें मुंगी मुखवटी
१०९१८	।।ना.गा.१७०१.००५।।	नामा म्हणे मी सेवेसी । तूं तो उदाराची राशी
१०९१९	।।ना.गा.१७०२.००१।।	माझे मज कळे माझे मज कळे। माझे मज कळे प्रेमसुख
१०९२०	।।ना.गा.१७०२.००२।।	करि तुझे ध्यान न लगे ब्रह्मज्ञान। माझी आहे खूण वेगळीच
१०९२१	।।ना.गा.१७०२.००३।।	न करि तुझी स्तुती न वाखाणीं कीर्ति। धरिली ते युक्ती वेगळीच
१०९२२	।।ना.गा.१७०२.००४।।	न करि काया क्लेश इंद्रिया निरोधु। मज आहे बोधु वेगळाची
१०९२३	।।ना.गा.१७०२.००५।।	नामा म्हणे नाम गाईन निर्वीकल्प। येसि आपें आप गीवसीत
१०९२४	।।ना.गा.१७०३.००१।।	पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारां । पतितपावन नव्हेसी म्हणुनी जातों माघारा
१०९२५	।।ना.गा.१७०३.००२।।	घ्यावें तेव्हां द्यावें ऐसा अससी उदार । काय धरूनि देवा तुझें कृपणाचें द्वार
१०९२६	।।ना.गा.१७०३.००३।।	सोडी ब्रीद देवा आतां नव्हेसि अभिमानी । पतितपावन नाम तुझें ठेवियलें कोणी
१०९२७	।।ना.गा.१७०३.००४।।	झेंगट घेउनी हातीं दवंडी पिटीन तिहीं लोकीं । पतितपावन देवा परी तूं मोठा घातकी
१०९२८	।।ना.गा.१७०३.००५।।	नामा म्हणे देवा तुझें न लगे मज कांहीं । प्रेम असों दे चित्तीं म्हणुनी लागतसे पायीं

१०९२९	।।ना.गा.१७०४.००१।।	राहोनि भोंवतीं नामा वाटे पाहे । श्वास न समाये दु:खें पोटीं
१०९३०	।।ना.गा.१७०४.००२।।	म्हणती मायेनें वैर साधियलें। विषयीं बुडालों सांगों कोणा
१०९३१	।।ना.गा.१७०४.००३।।	भक्तां अंतरंग देतोसी तूं देवा । भेटसि केशवा पूर्ण स्थिती
१०९३२	।।ना.गा.१७०४.००४।।	पूर्ण पान्हा धेनु घालीत वोरसे । वत्स थोर हर्षें पान करी
१०९३३	।।ना.गा.१७०४.००५।।	देखोनि पैं स्वामी बळेंचि वोढिलें । तळमळीत ठेलें थोर आशा
१०९३४	।।ना.गा.१७०४.००६।।	कृपणें संपत्ति जोडिलीया राशी । हिरोनिया घेती बळियानें
१०९३५	।।ना.गा.१७०४.००७।।	आळवी करुणा धांवे दाही दिशा । तैसें हृषिकेशा जालें मज
१०९३६	।।ना.गा.१७०४.००८।।	क्षुधाक्रांत जेवि भोजनीं बैसले । कोणासी न बोले मातु कांहीं
१०९३७	।।ना.गा.१७०४.००९।।	उठविते वेलीं नव्हतांचि तृप्ति । तैसी दु:खप्राप्ति जाली मज
१०९३८	।।ना.गा.१७०४.०१०।।	अघोर संसार मोहो महापुरीं । अखंड मुरारी सुखरूप
१०९३९	।।ना.गा.१७०४.०११।।	नामा म्हणे विठो अनाथाच्या बंधु । देई सुखसिंधु मज आतां
१०९४०	।।ना.गा.१७०५.००१।।	माझें व्रत एक चालवी विठ्ठला । सकळा घटीं तुला देखें ऐसें
१०९४१	।।ना.गा.१७०५.००२।।	तईं माझें चित्त पावें समाधान। नाहीं तरी जिणें काय व्यर्थ
१०९४२	।।ना.गा.१७०५.००३।।	तुझी कास आणि बुडे महापुरीं । ऐसें होतां हरि लाज कोणा
१०९४३	।।ना.गा.१७०५.००४।।	मागितलें फार तुज काय देवा । नको बा केशवा मीतूंपण
१०९४४	।।ना.गा.१७०५.००५।।	नामा म्हणे माझा कैवारी सबळ । असोनियां काळ भोगूं काशा
१०९४५	।।ना.गा.१७०६.००१।।	मनुष्य करिसी तरी झाडफेडी मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९४६	।।ना.गा.१७०६.००२।।	पक्षि करिसी तरी चारियाचेनि मिसें। परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९४७	।।ना.गा.१७०६.००३।।	झाड करिसी तरी तुळसीचेनि मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९४८	।।ना.गा.१७०६.००४।।	वृक्ष करिसी तरी मंडपाचेनि मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९४९	।।ना.गा.१७०६.००५।।	श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९५०	।।ना.गा.१७०६.००६।।	पाषाण करिसी तरी पायरीचेनि मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९५१	।।ना.गा.१७०६.००७।।	उदक करिसी तर सडियाचेनि मिसें । परी तुझे द्वारीं वसें ऐसें करी
१०९५२	।।ना.गा.१७०६.००८।।	नामा म्हणे मज कीर्तनाचेनि मिसें । परी तुझें द्वारीं वसें ऐसें करी
१०९५३	।।ना.गा.१७०७.००१।।	काय मागूं विठ्ठल धुरे । एक तुळशीदळ पुरे
१०९५४	।।ना.गा.१७०७.००२।।	मागूं मुकुट माथाचा । तरी तो आणिला इंद्राचा

१०९५५	।।ना.गा.१७०७.००३।।	मागूं कुंडलें कर्णींचीं । तरी तीं आणिलीं कर्णाचीं
१०९५६	।।ना.गा.१७०७.००४।।	मागूं पितांबर शेला । तरी तो कासेसी कसिला
१०९५७	।।ना.गा.१७०७.००५।।	मागूं पादुका चरणींच्या । तरी त्या आणिल्या शेषाच्या
१०९५८	।।ना.गा.१७०७.००६।।	मागूं तोडर पायींचा । धाक जाईल असुरांचा
१०९५९	।।ना.गा.१७०७.००७।।	मागूं जातां लक्ष्मीयेसी । ऋद्धिसिद्धी जिच्या दासी
१०९६०	।।ना.गा.१७०७.००८।।	नामा म्हणे कांहीं न मागों । तुझे चरणीं लक्ष लागो
१०९६१	।।ना.गा.१७०८.००१।।	भावें तुझे चरण धरिले विठ्ठला । आतां तूं पांगिला करूं नको
१०९६२	।।ना.गा.१७०८.००२।।	न लगे मज कांहीं ऋद्धिसिद्धी पाही । मुक्तिसुख तेंहि नलगे मज
१०९६३	।।ना.गा.१७०८.००३।।	नामा म्हणे मज जन्म दे अनंता । भक्तिविरहिता जिणें नको
१०९६४	।।ना.गा.१७०९.००१।।	मोक्षपद जरी अभिलाषिन चित्तीं । झणीं मज अंतरती चरण तुझे
१०९६५	।।ना.गा.१७०९.००२।।	निर्वासना चित्तें भजन तुझें करितां । झणीं या सायुज्यता देसी मज
१०९६६	।।ना.गा.१७०९.००३।।	मग मी काय करूं वैकुंठनायका । ऐशा प्रेमसुखा कोठें पाहों
१०९६७	।।ना.गा.१७०९.००४।।	ध्यान सुखें करूं पाहे हृदयकमळीं । पक्षिणी ऐसी आळी करिशी झणीं
१०९६८	।।ना.गा.१७०९.००५।।	संकल्पें यावें वाटे चरणाजवळी। विकल्प काजळी झणीं देशी
१०९६९	।।ना.गा.१७०९.००६।।	नामा म्हणे आतां कांहींच मी न करीं । मज होतु कोटीवरी गर्भवास
१०९७०	।।ना.गा.१७१०.००१।।	देव देवी देवतार्चन । तूंचि माझें पूर्णपण
१०९७१	।।ना.गा.१७१०.००२।।	न मागें न मागें विठ्ठला । येथूनियां राहे उगला
१०९७२	।।ना.गा.१७१०.००३।।	जप तप नेम निष्ठा । तुजचि जाणो गा वैकुंठा
१०९७३	।।ना.गा.१७१०.००४।।	तुझी भक्ति हेचि गोड । आणिक नाहीं आम्हां चाड
१०९७४	।।ना.गा.१७१०.००५।।	यज्ञ याग मंत्र तंत्र । तूंचि आमचें कुळ गोत्र
१०९७५	।।ना.गा.१७१०.००६।।	येथुनि पंढरिये हरी । आम्हांसि तूं अंगिकारी
१०९७६	।।ना.गा.१७१०.००७।।	आम्ही करितों कीर्तन । तारावे हे तुम्ही जन
१०९७७	।।ना.गा.१७१०.००८।।	हेंचि मागणें हो देवा । नामा म्हणे द्यावी सेवा
१०९७८	।।ना.गा.१७११.००१।।	वाणी गाधिपण पाठी पसारा । घेवोनि संसारा आलों असे
१०९७९	।।ना.गा.१७११.००२।।	पसारे करी पसारे करी । वायां उभाराउभरी करितसे
१०९८०	।।ना.गा.१७११.००३।।	रस रसायन आणि भाजीपाला । शकुन आम्हां जाला पुरता आहे

१०९८१	।।ना.गा.१७११.००४।।	वाटे एक खोटें दांडी चेपी बोट । कवणेपरी न फिटे कुडेपण
१०९८२	।।ना.गा.१७११.००५।।	बोलतों पैं खोटें देतों पैं उणें । वायांच शिणे रात्रंदिवस
१०९८३	।।ना.गा.१७११.००६।।	विष्णुदास नामा विनवी केशवा । तेहिपरी देवा उद्धरावें
१०९८४	।।ना.गा.१७१२.००१।।	तुझे चरणीं सुख अनुपम्य आहे । हें तूं जाणसी काये पांडुरंगा
१०९८५	।।ना.गा.१७१२.००२।।	आम्हां ऐसें व्हावें तेणें तें भोगावें । नकळे स्वभावें ब्रह्मादिकां
१०९८६	।।ना.गा.१७१२.००३।।	चतुराशिरोमणि आमुची जननी । जाणे ते रुक्मिणी जीवनकळा
१०९८७	।।ना.गा.१७१२.००४।।	चरणींचा प्रभाव जाणे गौतमवधु । जेणें शापबद्ध मुक्त केली
१०९८८	।।ना.गा.१७१२.००५।।	चरणींचा स्वभाव जाणती वैष्णव । नल कुबेर मुनिसुग्रीव सखे माझे
१०९८९	।।ना.गा.१७१२.००६।।	नामा म्हणे तुझे चरणींची त्रिपथा । भूषण उमाकांता ऐसें जालें
१०९९०	।।ना.गा.१७१३.००१।।	तुझें नित्य सुख घ्यावें येणें मनें । असावें अनुसंधानें चरणाचेनि
१०९९१	।।ना.गा.१७१३.००२।।	वासनेविरहित होऊनि एकवट । असावें निकट संतसंगें
१०९९२	।।ना.गा.१७१३.००३।।	ऐशी मज कृपा करी गा विठ्ठला । म्हणविती आपुला दास जगीं
१०९९३	।।ना.गा.१७१३.००४।।	श्रवणीं तुझें नाम ऐकावें आवडी । चित्तें देऊनि बुडी प्रेमडोहीं
१०९९४	।।ना.गा.१७१३.००५।।	नयनीं तुझें रूप देखावें सर्वत्र । व्हावें भूतमात्र सखे माझे
१०९९५	।।ना.गा.१७१३.००६।।	वदनीं तुझें नाम गावें निर्विकल्प । धरोनि तुझें रूप हृदयकमळीं
१०९९६	।।ना.गा.१७१३.००७।।	काया संताचरणीं जावी लोटांगणीं । तें भाग्य अनुदिनीं देईं बापा
१०९९७	।।ना.गा.१७१३.००८।।	हेंचि माझें व्रत हेंचि तपतीर्थ । करावें दास्यत्व संतांचें हें
१०९९८	।।ना.गा.१७१३.००९।।	अनुदिनीं व्हावा संताचा हा संग । असावा अनुराग कीर्तनाचा
१०९९९	।।ना.गा.१७१३.०१०।।	मनाचा मज त्रास अपमानीं उल्हास । देईं तुझा ध्यास सर्वकाळ
११०००	।।ना.गा.१७१३.०११।।	नामा म्हणे विठोबा तरीच शरणागत । नाहीं तरी पतित म्हणती मज
११००१	।।ना.गा.१७१४.००१।।	देहाभिमानें पुरविली पाठी । कां हो जगजेठी न ये कृपा
११००२	।।ना.गा.१७१४.००२।।	स्वात्मसुखासाठीं स्तुति करी ब्रह्मा । व्याध निजधामा स्थिरपद
११००३	।।ना.गा.१७१४.००३।।	काय करतसे मातृपितृभक्ति । तया जगत्पति नाचतसे
११००४	।।ना.गा.१७१४.००४।।	नाचता वैकुंठीं सर्व ऋषीश्वर । नामा म्हणे पार नाहीं नाहीं
११००५	।।ना.गा.१७१५.००१।।	पूर्ण कृपा केली देवा । दिधली पादपद्मसेवा
११००६	।।ना.गा.१७१५.००२।।	पापें पळालीं पळालीं । नामकीर्तनकल्लोळीं

११००७	।।ना.गा.१७१५.००३।।	द्वारीं तुळसी वृंदावन । अखंड नामसंकीर्तन
११००८	।।ना.गा.१७१५.००४।।	रंगमाळाच्या रंगणीं । तेथें मुक्ति वाहती पाणी
११००९	।।ना.गा.१७१५.००५।।	जन्म वैष्णवकुळीं यावा । घडो संताची हे सेवा
११०१०	।।ना.गा.१७१५.००६।।	नामदेवाची आवडी । संतचरणीं देतों बुडी
११०११	।।ना.गा.१७१६.००१।।	शंख चक्र गदा पद्मेंसि अंकित । मी तुम्हां सांगाते निरंतर
११०१२	।।ना.गा.१७१६.००२।।	जिकडे जाल तिकडे मी तुमचा सांगाती । तुम्हांविण विश्रांति आणिक नाहीं
११०१३	।।ना.गा.१७१६.००३।।	संसाराचें ओझें पडो नेदी तुम्हातें । या वैष्णवा सांगाते निरंतर
११०१४	।।ना.गा.१७१६.००४।।	आसनीं शयनीं ध्यानीं मज मनीं । योगक्षेम दोन्ही वाहे त्याचें
११०१५	।।ना.गा.१७१६.००५।।	विठोबा म्हणे नाम्या न विसंबे मातें । हें वर्म तूतें सांगितलें
११०१६	।।ना.गा.१७१७.००१।।	तुझें भक्तिसुख द्यावें मज प्रेम । वसो तुझें नाम माझे मुखीं
११०१७	।।ना.गा.१७१७.००२।।	सद्भक्ति विचार वाहो माझे चित्तीं । हेचि कृपामूर्ति द्यावें मज
११०१८	।।ना.गा.१७१७.००३।।	पदर पसरिला न निघे माघारा । विठोबा दातारा द्यावें आतां
११०१९	।।ना.गा.१७१७.००४।।	नामा म्हणे देवा इतुकें द्यावें मज । ऐकोनि केशवराज काय बोले
११०२०	।।ना.गा.१७१८.००१।।	घेरे घेरे नाम्या दिल्हें माझें प्रेम । घोकी माझें नाम सर्वकाळ
११०२१	।।ना.गा.१७१८.००२।।	शिरावरी हात ठेवितसे माझ्या । अभिमान तुझा गेला म्हणुनि
११०२२	।।ना.गा.१७१८.००३।।	भक्तिसुख देवें दिल्हें नामयातें । नामा परमामृतें तृप्त जाला
११०२३	।।ना.गा.१७१९.००१।।	अपराधी तरी केला अंगिकार । कासया विचार तुजमाजीं
११०२४	।।ना.गा.१७१९.००२।।	लोहो होतें परि परिससंगतीं । तैसा तूं श्रीपती जगामाजीं
११०२५	।।ना.गा.१७१९.००३।।	घुसळितां रवी नेणें लाभ हानी । तैसें चक्रपाणि होऊं नये
११०२६	।।ना.गा.१७१९.००४।।	हीन दीन सर्व तुझाच आधार । नामा म्हणे सार हेंचि आतां
११०२७	।।ना.गा.१७२०.००१।।	मायबापांपरीस लोभ तुझा हरी । आहे मजवरी केशिराजा
११०२८	।।ना.गा.१७२०.००२।।	आतां जाणसीं तें कृपाळुवा करी । लाज सर्व हरी आहे तुज
११०२९	।।ना.गा.१७२०.००३।।	माझें जातिकूळ नाहीं त्वां पुशिलें । अन्याय साहिले कोट्यानकोटी
११०३०	।।ना.गा.१७२०.००४।।	जन्मोजन्मीं मज घातलें पाठिसी । संकटीं रक्षिसी नारायणा
११०३१	।।ना.गा.१७२०.००५।।	जन्मोजन्मीं मज घातलें पैं मातें । साउली तळहातें केली देवा
११०३२	।।ना.गा.१७२०.००६।।	हे खूण जाणती तेचि माझे सखे । मी तुझें लाडिकें म्हणवीं देवा

११०३३	।।ना.गा.१७२०.००७।।	नामा म्हणे काईं होऊनी उतराई । पुढें जन्म नाहीं ऐसें केलें
११०३४	।।ना.गा.१७२१.००१।।	दाही दिशा पाहतां दिसती निर्मळ । स्फुरत वक्ष:स्थळ होतें असे
११०३५	।।ना.गा.१७२१.००२।।	येईल माझा विठो देईल आलिंगन। जीवें निंबलोण करीन त्यासी
११०३६	।।ना.गा.१७२१.००३।।	प्रेमपूर भरतें सुखसिंधु लोटली । माऊली भेटली जिवलग
११०३७	।।ना.गा.१७२१.००४।।	धरुनि हनुवटी सांगेल गुज गोष्टी । पाहील कृपादृष्टी माझें म्हणोनि
११०३८	।।ना.गा.१७२१.००५।।	प्रीतीचें पडिभरें कुर्वाळील मज । सांगेन निजगुज संसारीचें
११०३९	।।ना.गा.१७२१.००६।।	हरुषें नामा निवाला निवाडे । नाचे संतापुढें सांगेन गुज
११०४०	।।ना.गा.१७२२.००१।।	निर्गुण गुणासी आलें । परब्रह्म ठसविलें । भक्त पुंडलिका लाधलें । गौप्य केलें प्रगट
११०४१	।।ना.गा.१७२२.००२।।	सेवा सेवा ब्रह्मरस । विठ्ठल पंढरीनिवास
११०४२	।।ना.गा.१७२२.००३।।	निर्गुण गुणाकार । मूर्ति सांवळी सुंदर । सकलहि गुणांचें माहेर। मुक्तिपेठ पंढरी
११०४३	।।ना.गा.१७२२.००४।।	धन्य धन्य भीमातट । चंद्रभागा हे निकट । जेथें विठ्ठलवीर प्रगट । नाम गर्जती हरिदास
११०४४	।।ना.गा.१७२२.००५।।	धन्य धन्य पद्माळें। सभराभरित आनंद जळें । स्नान केलिया निर्मळें । कोटी कुळें उद्धरती
११०४५	।।ना.गा.१७२२.००६।।	धन्य धन्य माणदेश । विठ्ठलें केला रहिवास । नामा म्हणे विष्णुदास । देई उल्हास भक्तिचा
११०४६	।।ना.गा.१७२३.००१।।	पंढरी माहेरीं विठ्ठल माउलिये । जावोनि हे बोली सांगिजो जी
११०४७	।।ना.गा.१७२३.००२।।	संसारगांवीं लेकी असे तुमची । चिंता का तियेची सांडियेली
११०४८	।।ना.गा.१७२३.००३।।	सासुरवासिणी पाहातुसे वाट । सांगिजो का कष्ट माउलिये
११०४९	।।ना.गा.१७२३.००४।।	अव्हेरू माझा करी अविचारु भावा । आशा तृष्णा जावा बहिणी का
११०५०	।।ना.गा.१७२३.००५।।	एकलिये माते खेदती बहुतें । तंव एकांतें तुमतें आठवीत
११०५१	।।ना.गा.१७२३.००६।।	चांडाळी हे सासू नष्ट पैं पापिणी । कांहीं केल्या धणीं पुरों नेदी
११०५२	।।ना.गा.१७२३.००७।।	रात्रंदिवस नाहीं कामाचा शेवट । जीवित्वाचा वीट येतु असे
११०५३	।।ना.गा.१७२३.००८।।	सखी सांगातिणी तिसी नाहीं भेट । अज्ञान हें पोटीं वाढतसे
११०५४	।।ना.गा.१७२३.००९।।	सुखाचे डोहळे दु:ख कीं नावडे । ऐसें केंवि घडे तुजविण
११०५५	।।ना.गा.१७२३.०१०।।	रखुमाई माता पांडुरंग पिता । मी त्याची दुहिता म्हणे नामा
११०५६	।।ना.गा.१७२४.००१।।	काशिये कनोजा द्वारके गुजरु । कानडा विठलु पंढरिये
११०५७	।।ना.गा.१७२४.००२।।	मायबापें माझी विठ्ठलरुक्मिणी। द्वारका पाटणीं माहियेर
११०५८	।।ना.गा.१७२४.००३।।	पर्वत शिखरीं बद्रीनारायणु । सोयरा सज्जनु पंढरिये

११०५९	।।ना.गा.१७२४.००४।।	बारसी भगवंत तेरेसी तिखया । विठलु सोयरिया पांडुरंग
११०६०	।।ना.गा.१७२४.००५।।	विटेवरी नीट समचरणीं उभा । पुंडलिकाचे लोभा भक्तिलागीं
११०६१	।।ना.गा.१७२४.००६।।	विष्णुदास नामा चरणीं उतावेळु । करावा सांभाळु अपत्याचा
११०६२	।।ना.गा.१७२५.००१।।	अपत्याचे परी सांभाळिलें श्रीहरी । वाट निरंतरीं पाहतु असे
११०६३	।।ना.गा.१७२५.००२।।	संवसारीं कष्ट जालेती बहूभारी । मज निववी हरी मायबापा
११०६४	।।ना.गा.१७२५.००३।।	गांव तें पंढरी भिंवरेच्या तीरीं । निरोप माहेरीं सांगिजो का
११०६५	।।ना.गा.१७२५.००४।।	क्षीरसागराभीतरीं पहुडले श्रीहरी । कवण धांवा करी कुमारीचा
११०६६	।।ना.गा.१७२५.००५।।	पुंडलिकाची भक्ति मांडली चराचरीं । गुढिया निरंतरीं उभविल्या
११०६७	।।ना.गा.१७२५.००६।।	संत सनकादिक ते माझे सज्जन । द्वारीं असें वाहन गरुडाचें
११०६८	।।ना.गा.१७२५.००७।।	रखुमाई माता विठो माझा पिता । नामा म्हणे संता भेटावया
११०६९	।।ना.गा.१७२६.००१।।	स्फुंदत स्फुंदत नामा उभा महाद्वारीं । दृष्टी पायावरीं विठोबाच्या
११०७०	।।ना.गा.१७२६.००२।।	देखोनि केशवें उभारिल्या बाहे । पालवितु आहे पीतांबरें
११०७१	।।ना.गा.१७२६.००३।।	संवसारीं रुसलासे नामा । दाटलासे प्रेमा ओसंडत
११०७२	।।ना.गा.१७२६.००४।।	येई नाम्या तुज धरीन पोटाशीं । कोणें गांजिलासि दुराचारें
११०७३	।।ना.गा.१७२६.००५।।	ऐके वो रुक्मिणी अंजारूनि तुम्हीं । वोसंगा घेऊनि आळवावा
११०७४	।।ना.गा.१७२६.००६।।	जगत्र जननी संभ्रमें करुनि । प्रीतिपान्हा स्तनीं वोसंडला
११०७५	।।ना.गा.१७२६.००७।।	वोरसला नामा घेतलासे करीं । मुख पितांबरें पुसीतसे
११०७६	।।ना.गा.१७२६.००८।।	कवणें तुझे चित्तीं लावियेला चाळा । न देखतां डोळां स्फुंदतसे
११०७७	।।ना.गा.१७२६.००९।।	बुझाविला नामा दाटलासे प्रेमा । हांसे सत्यभामा काय जालें
११०७८	।।ना.गा.१७२६.०१०।।	कोण कुळीं नामा काय लोभ याचा । तूं स्वामी दीनाचा पांडुरंगा
११०७९	।।ना.गा.१७२७.००१।।	करुणेचीं उत्तरें बोले नामदेव । ऐकोनि पंढरिरावो हासिन्नले
११०८०	।।ना.गा.१७२७.००२।।	मग हे विवंचना सांगे रुक्माईसी । म्हणे नामयासी आणा वेगीं
११०८१	।।ना.गा.१७२७.००३।।	मग रुक्माई चरणीं ठेवी माथा । म्हणे आणा जी समर्था नामयासी
११०८२	।।ना.गा.१७२७.००४।।	मग पंढरीराव रुक्माई ज्ञानदेव । पुंडलीक समुदाय चालिलासे
११०८३	।।ना.गा.१७२७.००५।।	येऊनि नाम्यापाशीं उभे पैं ठाकले । पुंडलीक बोले नामयासी
११०८४	।।ना.गा.१७२७.००६।।	धन्य नामदेवा तुझा एक भाव । सहित पंढरीराव आले तेथें

११०८५	।।ना.गा.१७२७.००७।।	पीतांबर छाया रूप प्रगट केलें । नामया आलिंगिलें पांडुरंगें
११०८६	।।ना.गा.१७२७.००८।।	कडे घेऊनि नामा रखुमाई जननी । प्रेमपान्हा वोसंडोनि पाजी तया
११०८७	।।ना.गा.१७२७.००९।।	नामयासी घेऊनि आले पंढरीसी । वैकुंठ ओवारिसी कळस केला
११०८८	।।ना.गा.१७२७.०१०।।	नामयाचे मुखीं घालुनी कवळू । पुसे हा गोपाळु सिण भाग
११०८९	।।ना.गा.१७२८.००१।।	स्वरूपाकारणें विश्वरूप घेशीं । निर्गुणा दाविसी गुणरया
११०९०	।।ना.गा.१७२८.००२।।	तत्त्वीं तत्त्वरवीं उगवे मंडळी । अवघे झाकोळी आपुल्यातें
११०९१	।।ना.गा.१७२८.००३।।	दृश्याचिये दीप्ती दृश्यासी न दिसे । समरस असें तेज त्याचें
११०९२	।।ना.गा.१७२८.००४।।	चित्स्वरूपीं नांदे तत्त्वरूप भासे । आकारासरिसें तदाकार
११०९३	।।ना.गा.१७२८.००५।।	करुणा वोतिले सप्रेम सुतेज । तेथें तूं विराज ज्ञानदेवा
११०९४	।।ना.गा.१७२८.००६।।	ज्ञान हेंचि तोय विज्ञान हे गंगा । प्रेमें प्रेमभागा स्नान करीं
११०९५	।।ना.गा.१७२८.००७।।	एकत्व आरामें शांति पूर्ण घरीं । श्रीहरी कामारी होतो तुझा
११०९६	।।ना.गा.१७२८.००८।।	स्वस्ति श्रीनिवृत्ति गुरुत्व उचित । लक्ष्मी अवचित नामदेवा
११०९७	।।ना.गा.१७२९.००१।।	राजमंदिराभीतरीं रुक्मिणी सेजेवरी । नामा परसांसरी वोळगों आले
११०९८	।।ना.गा.१७२९.००२।।	नामया देखोनी झडकरी उठली । आड उभी ठेली जाऊनियां
११०९९	।।ना.गा.१७२९.००३।।	अचळ सरिसां करी श्रृंग माथ्यावरी । पाहें पां निदसुरी होती कैसी
१११००	।।ना.गा.१७२९.००४।।	मी म्हणे नावेक लागेल वेळ यातें । तंव अवचितें देखियेलें
१११०१	।।ना.गा.१७२९.००५।।	कनक परयेळीं घेउनी आरती करीं । ओवाळिले हरी नामयासहित
१११०२	।।ना.गा.१७३०.००१।।	नाहीं भीड चाड बोलसी आगळें । तोंडाचेनि बळें अरे नाम्या
१११०३	।।ना.गा.१७३०.००२।।	आपुलिया चाडें करितसां सेवा । आभारू कां लावा आम्हांलागीं
१११०४	।।ना.गा.१७३०.००३।।	माझ्या ठायीं काय मज उणें होतें । माते देउनी सरतें केलें तुम्हीं
१११०५	।।ना.गा.१७३०.००४।।	निर्गुण निराकार होतों निजानंदें । त्यासी तुम्हीं भेद केला देखा
१११०६	।।ना.गा.१७३०.००५।।	संकल्प वासना नाना भजन मतें । शुद्ध स्वरूपातें भेद जाला
१११०७	।।ना.गा.१७३०.००६।।	वैकुंठ निजधामा सर्व सुखरासी । सांडोनी तुम्हांपासीं येणें जालें
१११०८	।।ना.गा.१७३०.००७।।	शेषाचे आरूवरीं निद्रा क्षीरसागरीं । सांडोनी वेषधारी जालों आम्ही
१११०९	।।ना.गा.१७३०.००८।।	दाही अवतारीं युगयुगांतरीं । अनुष्ठान थोरी केली नाम्या
११११०	।।ना.गा.१७३०.००९।।	अवतारीं कष्ट जालें थोर थोर । मारिले असुर तुम्हांलागीं

११११	।।ना.गा.१७३०.०१०।।	नाना योनी दु:खें भोगा अनंत जन्में । ते निरसलीं नामें माझ्या एका
१११२	।।ना.गा.१७३०.०११।।	विषय भोगितां रवरवीं वास । मन केलें उदास वैराग्येंसी
१११३	।।ना.गा.१७३०.०१२।।	प्रपंचीं प्रज्वाळ अग्निचे कल्लोळ । सुखरूप सीतल आत्मज्ञानें
१११४	।।ना.गा.१७३०.०१३।।	माया हे दुस्तर नकळे इचा पार । ते नदी उतार केली तुम्हां
१११५	।।ना.गा.१७३०.०१४।।	कामक्रोधादिक षड्वैरी विकार । महा थोर थोर वश्य केले
१११६	।।ना.गा.१७३०.०१५।।	परदारा परधन परनिंदा परपीडा । दिधलिया झाडा दयाधर्मा
१११७	।।ना.गा.१७३०.०१६।।	ऐसें सर्वांपरी म्यां केलें गोमटें । परी शब्द उफराटे न संडिसी
१११८	।।ना.गा.१७३०.०१७।।	रात्रंदिवस तुज लागला छंद । आम्हांसी विनोद करीं ठासी
१११९	।।ना.गा.१७३०.०१८।।	अवघिया परिस तूं जालासी धीट । बोलसी वोखट अमर्याद
११२०	।।ना.गा.१७३०.०१९।।	भक्तीचिया भीडा म्यां बहु साहियेलें । त्वां नाहीं पाहियेलें मागेंपुढें
११२१	।।ना.गा.१७३०.०२०।।	जें आम्हीं पेरिलें तेंचि फळ आलें । उफराटें जालें तुजवरी कृपा
११२२	।।ना.गा.१७३०.०२१।।	पहिलेचि चुकी पडयेली थोरी । तुझे अधिकारी जालों आम्ही
११२३	।।ना.गा.१७३०.०२२।।	खांदीं बैसलें तें नुतरे खालतीं । तैसें हें अमुतें वोडवलें
११२४	।।ना.गा.१७३०.०२३।।	सलगीं खेळवितां चुंबितां वदनीं । देतां टाकुनि मिठी घाली
११२५	।।ना.गा.१७३०.०२४।।	तुझा त्याग करितां कोपतील संत । हांसती समर्थ पिसुन लोक
११२६	।।ना.गा.१७३०.०२५।।	सृष्ट्यादिका व्यापार राहिला परता । तुजसी बोलतां न पुरे वेळ
११२७	।।ना.गा.१७३०.०२६।।	कांहींच न मागसी देतांहि न घेती। अखंड जीवेंसी जडोनि ठेला
११२८	।।ना.गा.१७३०.०२७।।	वाढवितां भक्ति तुज नाहीं तृप्तीं । काय करिसी अंतीं न कळे मज
११२९	।।ना.गा.१७३०.०२८।।	मागें भक्त आम्हीं बहुत देखिले । उठोनियां गेले क्षणामाजीं
११३०	।।ना.गा.१७३०.०२९।।	अवतार अवतारीं नव्हेसी परता । संबंध तुटतां न दिसे तुझा
११३१	।।ना.गा.१७३०.०३०।।	नामा म्हणे देवा होई समाधान । परियेसी वचन एक माझें
११३२	।।ना.गा.१७३१.००१।।	पितयाचें भाग्य पुत्रासि पैं न ये । विरळा एखादा होय नांव राखे
११३३	।।ना.गा.१७३१.००२।।	मी तंव अज्ञान जालों तुमचे पोटीं । तुझेनि आम्हां तुटी संसाराची
११३४	।।ना.गा.१७३१.००३।।	होणार तें जालें न चले कांहीं केलें । विठ्ठलें दुराविलें जन्म मरणें
११३५	।।ना.गा.१७३१.००४।।	माझिये अदृष्टीं ऐसेंचि लिहिलें । जें मज निर्मियेलें चतुराननें
११३६	।।ना.गा.१७३१.००५।।	या विठोबाचे पाय हृदयीं धरावे । तेणें विसरावें भवदु:ख

११९३७	।।ना.गा.१७३१.००६।।	मी नेणें पूजाविधि नेणें क्रियासिद्धि । ऐसा अपराधी तारियेलों
११९३८	।।ना.गा.१७३१.००७।।	अनुपम्य सुख देखिलिया चरणीं । घातली लोळणि माझ्या चित्तें
११९३९	।।ना.गा.१७३१.००८।।	बहुत देव माझ्या पाहियेलें जीवें । केलें सर्वभावें कुटुंबदास्य
११९४०	।।ना.गा.१७३१.००९।।	इहीं माझें चित्त केलें तडातोडी । नाहीं सुख घडी देखिलीं कांहीं
११९४१	।।ना.गा.१७३१.०१०।।	मग या पांडुरंगें माझी राखियेली लाज । हा माझा पूर्वज प्राणसखा
११९४२	।।ना.गा.१७३१.०११।।	अंतरींचें गुज सांगितलें मज । दिलें प्रेमबीज नामनिधी
११९४३	।।ना.गा.१७३१.०१२।।	सुख या दुःखाची निवारिली बाधा । शरीरसंबंधा वेगळें केलें
११९४४	।।ना.गा.१७३१.०१३।।	आपुलें म्हणोनि कृपेनें न्याहाळिलें । आवडी सांभाळिलें मायबापें
११९४५	।।ना.गा.१७३१.०१४।।	ऐसे मजलागीं स्नेहाळु न विसंबे जीवें । म्यां काय त्याचें व्हावें उतराई
११९४६	।।ना.गा.१७३१.०१५।।	नामा म्हणे मज अनाथालागुनी । न विसंबे निर्वाणीं पंढरीराव
११९४७	।।ना.गा.१७३२.००१।।	पतित अनेक पावन तूं एक । जालासी सुरेख कवणाचेनी
११९४८	।।ना.गा.१७३२.००२।।	पतित मी भला कीं पावन तूं भला । सांग बा विठ्ठला मायबापा
११९४९	।।ना.गा.१७३२.००३।।	परिसाचें महिमान कैसेंनी वाढतें । निर्माण नसतें लोहो जरी
११९५०	।।ना.गा.१७३२.००४।।	कल्पतरूची कीर्ति कैसेनी वाढते । जरि कल्पना नसती याचकासी
११९५१	।।ना.गा.१७३२.००५।।	प्रजेसी पोशिलें शोभती राजेश्वर । तैसा हा विचार तुम्हां आम्हां
११९५२	।।ना.गा.१७३२.००६।।	नामा म्हणे स्वामी नोव्हे ते आमुचे । तुज देवा कैंचें क्रियाकर्म
११९५३	।।ना.गा.१७३३.००१।।	सर्व जीव तूं जालासी आपण । आम्ही का पतित तूं कैसा पावन
११९५४	।।ना.गा.१७३३.००२।।	मना इंद्रियाचा तूंचि चाळविता । ठेवविसी सत्ता कोणे ठाईं
११९५५	।।ना.गा.१७३३.००३।।	सुवर्णाच्या पोटीं जाला अलंकारु । वानिति साचारु येकि भला
११९५६	।।ना.गा.१७३३.००४।।	गंगासिंधु मिळणीं जाली सहस्रमुख । ओघ तो उदक आन नाहीं
११९५७	।।ना.गा.१७३३.००५।।	बीजाचिया पोटीं वटाचा विस्तारु। सर्व तो आकारु तुझाचि असे
११९५८	।।ना.गा.१७३३.००६।।	नामा म्हणे ऐसे असतां निर्धार । आम्हासी अव्हेर करूं नका
११९५९	।।ना.गा.१७३४.००१।।	विषयाचे आळुके जरी नव्हतों दीन । तरी दीनानाथा कोण म्हणती तुज
११९६०	।।ना.गा.१७३४.००२।।	सुष्ट दुष्ट तरी आमुचें आचरण । तें तुज भूषण जालें देवा
११९६१	।।ना.गा.१७३४.००३।।	पतितपावन ब्रीद कैसेनी जोडतें । जरि आम्ही नव्हतों कर्मजड
११९६२	।।ना.गा.१७३४.००४।।	नामा म्हणे ऐसें आहे जी गा देवा । विचारीं केशवा मायबापा

११६३	।।ना.गा.१७३५.००१।।	महाद्वारीं सुख असे या सुखाचें । लागती संतांचे चरणरज
११६४	।।ना.गा.१७३५.००२।।	म्हणोनियां स्थळ पाहिलें निवांत । जालें चित्त तेथें समाधान
११६५	।।ना.गा.१७३५.००३।।	सकळ वैष्णवांसहित बोळवण करा । तुम्हीं हो दातारा मजलागीं
११६६	।।ना.गा.१७३५.००४।।	देव म्हणे नाम्या राहे पक्षभरी । पुरतील अंतरीं कोड तुझें
११६७	।।ना.गा.१७३६.००१।।	रुसलासे नामा उभा गरुडपारीं । पितांबरधारी पालवी तो
११६८	।।ना.गा.१७३६.००२।।	आपुल्या सुखाचा तुज देईन वांटा । तरी येसी वैकुंठा याचि वेळा
११६९	।।ना.गा.१७३६.००३।।	आपुले निजपदीं तुज बैसवीन । उभा मी राहीन मागें पुढें
११७०	।।ना.गा.१७३६.००४।।	पितांबर छाया धरीन तुजवरी । तुज मी क्षणभरी न विसंबें
११७१	।।ना.गा.१७३६.००५।।	व्यास अंबऋषि धृवरुक्मांगद । तयाहुनी वंद्य करीन तुज
११७२	।।ना.गा.१७३६.००६।।	ऐसें माझे मनीं होतें बहुत दिवस । तूं कां रे उदास कवण्या गुणें
११७३	।।ना.गा.१७३६.००७।।	ऐसें माझे मनीं होतें बहुत दिवस । तूं कां रे उदास कवण्या गुणें
११७४	।।ना.गा.१७३७.००१।।	नेघे भूमंडळ न घाली तुज सांकडें । तुजवीण केवढी जोडी याची
११७५	।।ना.गा.१७३७.००२।।	चरण मी सेवीन गाईन मी नाम । हृदयीं धरोन प्रेम नाचेन सदा
११७६	।।ना.गा.१७३७.००३।।	ऋद्धिसिद्धि नेघे कामना न लगती । तुजवीण श्रीपती अवघें वेर्थ
११७७	।।ना.गा.१७३७.००४।।	रसातळ भूतळ वैकुंठासी नये । तुजवीण न पाहे ठाव कोठें
११७८	।।ना.गा.१७३७.००५।।	विष्णुदास आम्ही भक्तिविण नेघों । दारींच वोळगों तुझ्या देवा
११७९	।।ना.गा.१७३७.००६।।	नामा म्हणे हेचि चाड गा विठ्ठला । हा पुंडलिकें सांगितला गुह्य ठेवा
११८०	।।ना.गा.१७३८.००१।।	ऐसें नामा बोले आनंदें करोनी । तंव देव विचारूनी बोलियेले
११८१	।।ना.गा.१७३८.००२।।	भला भला नाम्या शाहाणा जालासी । कां रे तूं न घेसी सांग मज
११८२	।।ना.गा.१७३८.००३।।	येरू म्हणे देवा हें अवघेंचि नश्वर । तूंचि एक साचार पुरे आम्हां
११८३	।।ना.गा.१७३८.००४।।	अनंत कोटी ब्रह्मांडें वसती रोमरंध्रीं । त्या चरणाचे अग्रीं वसों आम्हीं
११८४	।।ना.गा.१७३८.००५।।	पुंडलिक जाणे त्याचें गुह्य गुज । उमजोनि तुज काय सांगों
११८५	।।ना.गा.१७३८.००६।।	नामा म्हणे मूळ सोय धरूं खोडी । ब्रह्मांडा येवढी नलगे पृथ्वी
११८६	।।ना.गा.१७३९.००१।।	प्रेम तें पडिभरें देवासी वोसंडे । क्षमा तयाकडे शोभतसे
११८७	।।ना.गा.१७३९.००२।।	प्रेमाचें स्फुंदन न सांवरे नामया । पसरोनियां बाह्या देत क्षेम
११८८	।।ना.गा.१७३९.००३।।	सावध रे नामया आलिंगिला नाहीं । आवडतें कांहीं सांग मज

११९८९	।।ना.गा.१७३९.००४।।	उघडोनियां नयन पाहे दृष्टिभरीं। वैकुंठाभीतरीं चला जाऊं
११९९०	।।ना.गा.१७३९.००५।।	ऐकोनियां नामा जालासे सावध । मग देतसे शब्द नारायणा
११९९१	।।ना.गा.१७३९.००६।।	भक्तिविण सुख नेघेचि वैकुंठ । पंढरीं प्रगट परब्रह्म
११९९२	।।ना.गा.१७३९.००७।।	हेंचि गोड आम्हां आवडे बा हरी । वैकुंठाभीतरीं नाहीं चाड
११९९३	।।ना.गा.१७३९.००८।।	सर्वकाळ सेवा करूं पैं कीर्तन । येणें माझें मन संतुष्ट सदा
११९९४	।।ना.गा.१७३९.००९।।	संबोखिला नामा हृदयावरि हस्तक । येरू चरणीं तूं मस्तक ठेवी
११९९५	।।ना.गा.१७३९.०१०।।	माग रे नामया आवडे जितुलें । त्रिभुवना इतुलें ब्रह्मसुख
११९९६	।।ना.गा.१७३९.०११।।	देईन मागसी तें ऋद्धिसिद्धी कामारी । परिपूर्ण घरीं अखंडित
११९९७	।।ना.गा.१७३९.०१२।।	नामा म्हणे पंढरीं कीर्तन करीन । परि न सोडीं चरण तुझे
११९९८	।।ना.गा.१७४०.००१।।	मज घेउनियां बैसलासे किती । पाहे सहज स्थिति आपुलें सुख
११९९९	।।ना.गा.१७४०.००२।।	कांहीं तूं नव्हेसी विचारी मानसीं । चैतन्य आहेसि शुद्धबुद्ध
१२०००	।।ना.गा.१७४०.००३।।	क्रिया कर्म कर्ता नव्हेसी सर्वथा । आहे सर्वांगता रूप तुझें
१२००१	।।ना.गा.१७४०.००४।।	भजतां भजन पूजितां पूजन । हें कांहींच जाण आथीचना
१२००२	।।ना.गा.१७४०.००५।।	ज्ञान ज्ञेय ज्ञाता ध्याता ध्यान ध्येय । हे नाथिले उपाय नाहीं तुज
१२००३	।।ना.गा.१७४०.००६।।	नामा म्हणे मज नलगेचि कांहीं । सेवा तुझी देईं जन्मोजन्मीं
१२००४	।।ना.गा.१७४१.००१।।	जन्मजन्मांतरीं घेतलें धरणें । सांग कवण्या गुणें विष्णुदासा
१२००५	।।ना.गा.१७४१.००२।।	कांहींच न घेसी कांहींच न मागसी । ऋणें किती करिसी सेवारूपें
१२००६	।।ना.गा.१७४१.००३।।	चतुर्विधा मुक्ति अथवा धन संपत्ती । नलगे तुझे चित्तीं काय करूं
१२००७	।।ना.गा.१७४१.००४।।	समुद्रवलयांकित अवघें भूमंडळ । अथवा रसातळ दुर्लभ कांहीं
१२००८	।।ना.गा.१७४१.००५।।	भेटिलागीं आर्त आहे रे वैकुंठ । पाही तुज वाट रात्रंदिवस
१२००९	।।ना.गा.१७४१.००६।।	नामा म्हणे सर्व ओसंडिलें चित्तें । तुझिया चरणापरतें नलगे कांहीं
१२०१०	।।ना.गा.१७४२.००१।।	माझिया मनेंसी केला म्यां विचार । तव तेणें निर्धार सांगितला
१२०११	।।ना.गा.१७४२.००२।।	मज नलगे मुक्ति नलगे ब्रह्मज्ञान । पायरी होईन पंढरिची
१२०१२	।।ना.गा.१७४२.००३।।	इंद्रियां मारितां येती काकुळती । तुजचि म्हणती ठायीं ठायीं
१२०१३	।।ना.गा.१७४२.००४।।	श्रवणीं श्रवण करणें अखंड तुझी कीर्ति । विश्वविठ्ठलमूर्ति देखों डोळा
१२०१४	।।ना.गा.१७४२.००५।।	नामामृतें रसना निवाली त्या सुखें । नाठवती दुःखें जन्मांतरींचीं

११२१५	।।ना.गा.१७४२.००६।।	नामा म्हणे ऐसा कोण भाग्यहीन । जो धरी वासने वैकुंठींचे
११२१६	।।ना.गा.१७४३.००१।।	निर्विकल्प नाम अनंत कल्पना । होसी नारायणा अव्यक्तेंसी
११२१७	।।ना.गा.१७४३.००२।।	लाज ते लाविली निर्गुणपणासी । श्रुति पुराणासी साम्य दावी
११२१८	।।ना.गा.१७४३.००३।।	चातुर्य सागर नंदाचा खिल्लारी । गायी निरंतरीं चारशील
११२१९	।।ना.गा.१७४३.००४।।	तूं देवपण मिरविसी निकें । नामा म्हणे सुख तुझे पायीं
११२२०	।।ना.गा.१७४४.००१।।	जन्ममरणाच्या खुंटती लहरी । वायां का येरझारीं सीणतोसी
११२२१	।।ना.गा.१७४४.००२।।	मी सांगेन तें करीं मन मुळीं आवरीं । एकांतीं क्षणभरी चला जाऊं
११२२२	।।ना.गा.१७४४.००३।।	आकारलें तितुकें आहे नाशिवंत । देव आणि भक्त कैंचा तेथें
११२२३	।।ना.गा.१७४४.००४।।	नामा म्हणे केशवा असो तुझें तुज । तुजवांचोनि मज न लगे कांहीं
११२२४	।।ना.गा.१७४५.००१।।	वतन आमुचें मिरास पंढरी । विठोबाचे घरीं नांदणूक
११२२५	।।ना.गा.१७४५.००२।।	सेवा करूं नित्य नाचूं महाद्वारीं । नामाची उजरी जागवूं तेथें
११२२६	।।ना.गा.१७४५.००३।।	साधुसंतां शरण जावूं मनोभावें । प्रसाद स्वभावें देती मज
११२२७	।।ना.गा.१७४५.००४।।	नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे । संत पाय हिरे देती वरू
११२२८	।।ना.गा.१७४६.००१।।	क्षण एक एकांतीं बसोनि निवाडे । माग मज पुढें आवडे जें जें
११२२९	।।ना.गा.१७४६.००२।।	सीणभाग आपुला सांगे पैं वहिला । असेल जो वाटला मजविण
११२३०	।।ना.गा.१७४६.००३।।	पुरवीन जीवींचे सर्व तुझें कोड । गगनाहुनि वाढ असेल जरी
११२३१	।।ना.गा.१७४६.००४।।	वाटे माझे सर्व द्यावें तुझे हातीं । नामरूपवृत्तिसहित मन
११२३२	।।ना.गा.१७४६.००५।।	परी सर्वभावें तुझें उदासीन चित्त । उरलें माझें आर्त कवण पुरवी
११२३३	।।ना.गा.१७४६.००६।।	म्हणोनि पांडुरंग धरूनि हनुवटी । सांगे जिवींच्या गोष्टी नाम्याजवळी
११२३४	।।ना.गा.१७४७.००१।।	विचारितां सहज कोणी नव्हे माझें । दृढ चरण तुझे धरियेले
११२३५	।।ना.गा.१७४७.००२।।	हेंचि माझें ज्ञान हाचि गुरुमंत्र। व्रत तप तीर्थ चरण तुझे
११२३६	।।ना.गा.१७४७.००३।।	हेंचि माझे पुज्य हेंचि माझें पूजन । ध्याईं तुझे चरण हृदयकमळीं
११२३७	।।ना.गा.१७४७.००४।।	हेंचि माझी क्रिया हेंचि माझें कर्म । हाचि माझा धर्म चरण तुझे
११२३८	।।ना.गा.१७४७.००५।।	हाचि परमानंद हेचि योगसिद्धी । लय लक्ष समाधि चरण तुझे
११२३९	।।ना.गा.१७४७.००६।।	नामा म्हणे मनें मानिला निर्धार । तरलों भवसागर याचीपरी
११२४०	।।ना.गा.१७४८.००१।।	संकल्प विकल्प निरसुनियां भ्रांति । दावीन विश्रांति अभिनव तुज

११२४१	।।ना.गा.१७४८.००२।।	सर्वभावें माझी धरुनि आवडी । आस तूं ते सोडी इंद्रियांची
११२४२	।।ना.गा.१७४८.००३।।	जें जें विषयसुख लागेल तुझे मनीं । तें तूं खेवा घालुनी घेई मज
११२४३	।।ना.गा.१७४८.००४।।	श्रवण घ्राण रसना त्वचा आणि लोचन । हे सकळ होऊनि मीचि भोगीं
११२४४	।।ना.गा.१७४८.००५।।	यातायाती तुज न घाली रे सायास। धरी माझा विश्वास दृढ मनीं
११२४५	।।ना.गा.१७४८.००६।।	अंतरींचें गुज बोलुनि पंढरीनाथ । आलिंगन देत नामयासी
११२४६	।।ना.गा.१७४९.००१।।	सहज तुझें सुख तुजजवळी । वायां मृगजळीं बुडों नको
११२४७	।।ना.गा.१७४९.००२।।	सावध होय पां सोय धरीं वेगीं । अनुभवांगीं आनंद स्वस्वरूपीं
११२४८	।।ना.गा.१७४९.००३।।	हा हो जगडंबर पसरला पाल्हाळ । मायामय सकळ स्वप्न सर्व
११२४९	।।ना.गा.१७४९.००४।।	शरीरसंपत्तीचा मानसी निर्धार । तों हें क्षणभंगुर सत्य जाण
११२५०	।।ना.गा.१७४९.००५।।	आपुले साउली जासी बैसावया । कोण तापलिया निववी तुज
११२५१	।।ना.गा.१७४९.००६।।	नामा म्हणे देवा असो तुझें ज्ञान । देवा तुजवांचुन आन नेणें कांहीं
११२५२	।।ना.गा.१७५०.००१।।	माय मेली पोरटें लहान । कवाड धरून उभें ठेलें
११२५३	।।ना.गा.१७५०.००२।।	नेणतें बापुडें दारवंटा धरी । शेखीं आस करी भितरील
११२५४	।।ना.गा.१७५०.००३।।	राउळीं म्हणती कैचें हे भणंग । जंव तंव अंग चुकावित
११२५५	।।ना.गा.१७५०.००४।।	जाति नाहीं त्यासि कायसी पंगती । म्हणोनी एकांतीं बैसविलें
११२५६	।।ना.गा.१७५०.००५।।	सातादारवंठा बाहेर टाकी पूजा । तेथें बऱ्या वोजा बैसविलें
११२५७	।।ना.गा.१७५०.००६।।	देव म्हणे नाम्या पोशीन मी तूतें । नामामृतशितें देऊनियां
११२५८	।।ना.गा.१७५१.००१।।	केशव पुसे नामयासी । तुझी नांदणूक कैसी
११२५९	।।ना.गा.१७५१.००२।।	आम्हां काय उणें काय उणें । तुझेनि धर्मे दातारा
११२६०	।।ना.गा.१७५१.००३।।	तुम्हां घरीं बोचकें लुगडीं । आम्हां घरीं पोरें उघडीं
११२६१	।।ना.गा.१७५१.००४।।	तुम्हां घरीं दुर्ग दारवंटा । आम्हां घरीं बारा वाटा
११२६२	।।ना.गा.१७५१.००५।।	तुम्हां घरीं गाई म्हैशी। आम्हां घरीं उंदिर घुशी
११२६३	।।ना.गा.१७५१.००६।।	तुम्हां घरीं बटकी दासी । आम्हां घरीं आहेत लांसी
११२६४	।।ना.गा.१७५१.००७।।	तुम्हां घरीं शेजा बाजा । आम्हां घरीं तृण-सेजा
११२६५	।।ना.गा.१७५१.००८।।	तुम्हां घरीं सुवर्ण मडकीं । आम्हां घरीं खापरें फुटकीं
११२६६	।।ना.गा.१७५१.००९।।	तुम्हां घरीं लेंकुरें वाडे । आम्हां घरीं तुळशी झाडें

११२६७	।।ना.गा.१७५१.०१०।।	नामा म्हणे तुमचे घरीं सोनें दाम । आमुचे घरीं तुमचें नाम
११२६८	।।ना.गा.१७५२.००१।।	भक्त पुंडलिकें अससी उभा केला । त्याचेनि रागें मजसी धरिला अबोला
११२६९	।।ना.गा.१७५२.००२।।	मी तुझें पोसणें मी तुझें पोसणें । मी तुझें पोसणें पांडुरंगा
११२७०	।।ना.गा.१७५२.००३।।	तुझी कृपा नाही रे सत्य । मी तरि प्रत्यक्ष रूप अवलोकितों
११२७१	।।ना.गा.१७५२.००४।।	नामा म्हणे केशवा तूं जाणतोसी मातें । उफराटे पाहोनी गिळीन मी तूंतें
११२७२	।।ना.गा.१७५३.००१।।	भक्ताचे हृदयींची जाणोनि अवस्था । आला शरणागता लोभापरू
११२७३	।।ना.गा.१७५३.००२।।	संता पुसे माझें दाखवा रे नामें । तुम्हां समागमें खेळे सदा
११२७४	।।ना.गा.१७५३.००३।।	दृष्टिसी दाटले कृपेचें भरितें । म्हणे तें आवडतें केऊतें गेलें
११२७५	।।ना.गा.१७५३.००४।।	निर्जळे नयनीं कोमायिलें वदनीं । आणा रे गवसुनि आळीकरें
११२७६	।।ना.गा.१७५३.००५।।	तंव तो वाट पाहत होता परलक्षी । भेटी देऊनि सुखी केला देवें
११२७७	।।ना.गा.१७५३.००६।।	नामा म्हणे विठो तूं माझा सुखराशी । झणीं दूर जासी हृदयींचा
११२७८	।।ना.गा.१७५४.००१।।	कां रे विष्णुदासा कोमाईलासी वदनीं । गांजिलासी कवणीं दुराचारी
११२७९	।।ना.गा.१७५४.००२।।	क्षण एक जीव न गमे मज वेगळा । मीहि त्या जवळां सदा असे
११२८०	।।ना.गा.१७५४.००३।।	वैकुंठ भुवन नलगे माझे चित्तीं । झणीं याचि खंति होईल तुज
११२८१	।।ना.गा.१७५४.००४।।	लक्षुमिचे विलासीं न घडे माझें मन । झणीं याचे प्राण जाजावती
११२८२	।।ना.गा.१७५४.००५।।	मी वो याचे प्राण हाहि माझें मन । जाणती हे खूण भक्त माझे
११२८३	।।ना.गा.१७५४.००६।।	म्हणोनि जवळी बोलाविला केशिराजें । नामा धरी वोजें चरण दोन्ही
११२८४	।।ना.गा.१७५५.००१।।	देवा विनंती ऐक माझी । म्यां सेवा करावी तुझी । आस न धरावी दुजी । या अभिलाषाकारणें
११२८५	।।ना.गा.१७५५.००२।।	तुज म्यां जिवें अनुसरावें । आणि तुम्हीहि तैसेचि अपंगावें । परी आणिकांचे न म्हणवावें । जन्मोजन्मीं दातारा
११२८६	।।ना.गा.१७५५.००३।।	मज न मानोत सकळजन । परी तूं नको गा उदासीन । एका तुमच्या नामावांचुन । आणिक नेणें मी दातारा
११२८७	।।ना.गा.१७५५.००४।।	तुज न पोसवे दातारा । तरी या आयुष्या घाली चिरा । एका पोटासाठीं दुर्भरा । उपेक्षुं नको गा
११२८८	।।ना.गा.१७५५.००५।।	वदनीं तुजचि वर्णावें । श्रवणीं गुणनाम ऐकावें । नयनीं चरण न विसंबावे । क्षण एक दातारा
११२८९	।।ना.गा.१७५५.००६।।	अगा येऊनियां संसारा । नवजावें आणिकाच्या द्वारा । इष्ट मित्र सज्जन सोयरा । बंधू आदिकरुनी
११२९०	।।ना.गा.१७५५.००७।।	नाम विक्रयो न करावा । दान प्रतिग्रहो न घ्यावा । कष्टें करुनि मेळवावा । तोचि ग्रास आपुला
११२९१	।।ना.गा.१७५५.००८।।	नको दिवट्या छत्र घोडे । जेणें तुजसी अंतर पडे । तुझें नामची आवडे । मज बापुडे म्हणोत कां
११२९२	।।ना.गा.१७५५.००९।।	ऐसा मी अन्यायी अपराधी । अहो मज तारी कृपानिधी । तुझे नामचि उच्चारी आधीं । थोर अट्टाहास करुनी

११२९३	।।ना.गा.१७५५.०१०।।	विष्णुदास नामा म्हणे । आम्हां उपेक्षिसी झणें । जन्मोजन्मींचें पोसणें । केशवा उणें येऊं नेदी
११२९४	।।ना.गा.१७५६.००१।।	कृपेच्या सागरा भक्तकरुणाकरा । परियेसी उदारा केशिराजा
११२९५	।।ना.गा.१७५६.००२।।	मज घातलें संसारीं काळाचें आहारीं । करुणा कैसी हरि न ये तुज
११२९६	।।ना.गा.१७५६.००३।।	माझी सोडवण करीं कृपानिधी । तोडी हे उपाधि संसाराची
११२९७	।।ना.गा.१७५६.००४।।	पुत्र कलत्र बंधु सांगाति देहाचे । बांधिलें मोहाचे वज्रपाशीं
११२९८	।।ना.गा.१७५६.००५।।	तिहीं माझे चित्तीं केलें तडातोडी । नाहीं एक घडी सुखलेश
११२९९	।।ना.गा.१७५६.००६।।	सकळिक सांगाती संभार कामाचे । परी नेदिती नामाचे स्मरण कोणी
११३००	।।ना.गा.१७५६.००७।।	दुःखाचे डोंगर पडिले मजवरी । धांव बा श्रीहरी पांडुरंगा
११३०१	।।ना.गा.१७५६.००८।।	ऐशा सुखगोष्टी न करिती मजसी कोण्ही । जालों चक्रपाणि परदेशी
११३०२	।।ना.गा.१७५६.००९।।	शिणलिया न म्हणती बैस घे विश्रांति । आठवी या श्रीपति पांडुरंगा
११३०३	।।ना.गा.१७५६.०१०।।	सकळांचें दास्यत्व केली थोर आशा । मानिला भरंवसा होतील म्हणोनी
११३०४	।।ना.गा.१७५६.०११।।	तंव ते भजती आपुलिया हितां । न करिती माझी चिंता परलोकींची
११३०५	।।ना.गा.१७५६.०१२।।	ऐसा दुर्जनांचा करूनि पातेरा । केला मी मातेरा आयुष्याचा
११३०६	।।ना.गा.१७५६.०१३।।	कुटुंब काबाडी सदा कानकोंडा । जालों या ब्रह्मांडा भूमिभार
११३०७	।।ना.गा.१७५६.०१४।।	ऐसीं करुणेचीं वचनें ऐकोनी पंढरिरायें । कटिवरूनी बाहे उभारिली
११३०८	।।ना.गा.१७५६.०१५।।	ना भी नामया भय न धरीं सर्वथा । माझ्या शरणागता कोण गांजी
११३०९	।।ना.गा.१७५७.००१।।	माझिया भक्तां जे ठेविती दूषणा । तुटोनि रसना पडेल त्यांची
११३१०	।।ना.गा.१७५७.००२।।	ऐसे दुराचारी असती जे नर । भोगिती अघोर सत्य जाणा
११३११	।।ना.गा.१७५७.००३।।	माझिया भक्तां जे करिती छळण बुद्धि । त्याची वंशवृद्धि नव्हे कदां
११३१२	।।ना.गा.१७५७.००४।।	माझिया भक्तांचा करिती उपहास । त्यांचा समूळ वंश यमलोकीं
११३१३	।।ना.गा.१७५७.००५।।	केशव म्हणे नाम्या बोलिलों सत्यवाणी । लटिकें म्हणेल पतनीं पडेल पापी
११३१४	।।ना.गा.१७५८.००१।।	केशव म्हणे नामयासी । जें तूं दूरी धरिला होतासी । तैं तूं काकुळता भाकिसी । मजलागीं हिंडसी दाही दिशा
११३१५	।।ना.गा.१७५८.००२।।	तुझें गाऱ्हाणें सांगों संतापाशीं । तीहिं तुज सरतें केलें भक्तीसी । मी तंव वंद्य तीहिं लोकांसी । त्वां तंव मजसी प्रजियेलें
११३१६	।।ना.गा.१७५८.००३।।	आमुची वर्में कर्में बोलतोसी । सलगी करूनि फार जातोसी । उंच पदवी दिल्या पाइकासी । तरी काय स्वामिसी भिऊं नये
११३१७	।।ना.गा.१७५८.००४।।	मी विश्वासलों तुझिया भावासी । परि तूं शब्देंहि न पुससी । म्यां तंव अमृतदृष्टी पाहिलासी । अढळपदासी दावियेलें
११३१८	।।ना.गा.१७५८.००५।।	मी तंव वंद्य त्रिभुवनासी । श्रुति स्मृति आगमासी । न कळे अठरा पुराणांसीं । ऐसें त्वां मजसी प्रजियेलें

११३१९	।।ना.गा.१७५८.००६।।	आतां असोत बहुत बोलासी । शहाणे सिंतरले मानसीं । तप्तलोहा उदक ग्रासी । तैसा होऊनि ठेलासी विष्णुदास नामया रे
११३२०	।।ना.गा.१७५९.००१।।	भूमीं लोळे नामा कंठ सद्‌गदित । डोळियां स्रवत अश्रुजळा
११३२१	।।ना.गा.१७५९.००२।।	इतुकें देखोनियां द्रवला पुरुषोत्तम । नाम्यासी सप्रेमें उचलिलें
११३२२	।।ना.गा.१७५९.००३।।	नाम्या तुज काय वाटतसे दु:ख । संसाराचा शोक तुज जाला
११३२३	।।ना.गा.१७५९.००४।।	नामा म्हणे देवा तुज ऐसा दाता । मज भवव्यथा कवणेपरी
११३२४	।।ना.गा.१७६०.००१।।	स्फुंद स्फुंदोन नामा उभा महाद्वारीं । चित्त पायांवरी विठोबाच्या
११३२५	।।ना.गा.१७६०.००२।।	उभा दीनानाथ उभारूनी बाहे । पालवीत आहे पीतांबरें
११३२६	।।ना.गा.१७६०.००३।।	आरता ये रे नामया धरिला पोटासी । कोणें गांजिलासी दुर्जनानें
११३२७	।।ना.गा.१७६०.००४।।	अंतरींचें सांग पडे माझ्या मागें । कां करिशी उद्वेग संसारींचें
११३२८	।।ना.गा.१७६०.००५।।	नामा म्हणे विठोबा असें मी नेणता । आठवीं पंढरिनाथा वेळोवेळां
११३२९	।।ना.गा.१७६१.००१।।	तुझा तूं आहेसी नाम्या एकला एक । वायांचि कां शोक वाढविसी
११३३०	।।ना.गा.१७६१.००२।।	आपण मानसीं विचारोनि पाहीं । सावध नाम्या होई सोय धरीं
११३३१	।।ना.गा.१७६१.००३।।	तुझा तूंचि देव तुझा तूंचि भक्त । आहे पां सिद्धान्त गुरुमुखें
११३३२	।।ना.गा.१७६१.००४।।	तुझा तूंचि पूज्य तुझा तूं पूजिता । भजन भजता तुझा तूंचि
११३३३	।।ना.गा.१७६१.००५।।	तुझा तूंचि गुरु तुझा तूंचि शिष्य । तुझा तूं उपदेश घेई नाम्या
११३३४	।।ना.गा.१७६१.००६।।	नामा म्हणे केशवा हेंचि सर्व माझें । हृदयीं चरण तुझें निरंतर
११३३५	।।ना.गा.१७६२.००१।।	तुझ्या माझ्या शेता नाहीं पेंडवळा । दावियेला डोळा पांडुरंगा
११३३६	।।ना.गा.१७६२.००२।।	कल्पनेची पेंडी पाप कुंदा काढी । काशा देशोधडी लावियेल्या
११३३७	।।ना.गा.१७६२.००३।।	त्रिगुणीं त्रिफणीं धरोनी सूत्रधारी । वेद बैल चारी जुंपियेले
११३३८	।।ना.गा.१७६२.००४।।	अनाथाचें शेत प्रेमाचा हेलावा । शेत राखे देवा पांडुरंगा
११३३९	।।ना.गा.१७६२.००५।।	ब्रह्म नामबीज बांधोनियां ओटीं । पेरी दाटोदाटी नामदेव
११३४०	।।ना.गा.१७६३.००१।।	परियेसी नाम्या सांगतों मी तुज । अंतरींचें गुज भक्तराया
११३४१	।।ना.गा.१७६३.००२।।	तूं माझें आवडतें कृपेचें पोसणें। चित्ताचें बैसणें करीन तुज
११३४२	।।ना.गा.१७६३.००३।।	येणें संतसंगें यावें माझ्या गांवा । भोगावया राणिवा वैकुंठीच्या
११३४३	।।ना.गा.१७६३.००४।।	माझिया कथेची ज्या बहु आवडी । माझी प्रेम गोडी पडीये जया
११३४४	।।ना.गा.१७६३.००५।।	त्याची पायधुळी लागावी सर्वांगें । म्हणोनि मागें हिंडतसें

११३४५	।।ना.गा.१७६३.००६।।	भलतिया यातीचे भलतेच भावें । भलते एक घ्यावें नाम माझें
११३४६	।।ना.गा.१७६३.००७।।	त्याचिया उपकारें दाटे मी सर्वथा । मुगुट करूनी माथां वाहिन त्यासी
११३४७	।।ना.गा.१७६३.००८।।	चिंता न करी नाम्या नुपेक्षी सर्वथा । अभयकरू माथां ठेवला देवें
११३४८	।।ना.गा.१७६४.००१।।	देवें चहू भुजीं दिलें आलिंगन । कुरवाळिलें वदन चहू करे
११३४९	।।ना.गा.१७६४.००२।।	धरूनि हनुवटी पाहे कृपादृष्टि। केली सुखवृष्टि करूणाकरें
११३५०	।।ना.गा.१७६४.००३।।	नामदेव ऐसें नाम त्या ठेविलें । तेणें अनुभविले प्रेमसुख घनें
११३५१	।।ना.गा.१७६४.००४।।	हे संत भागवत माझिये आवडी । माझ्या रूपीं बुडी देऊनि ठेले
११३५२	।।ना.गा.१७६४.००५।।	परि या सकळांहूनि तुझा भक्तिभावो । अमृत पान्होवो अधिक बोल
११३५३	।।ना.गा.१७६४.००६।।	ज्ञान विज्ञानाचे मंडण ज्ञानेश्वरू । वैराग्याचा मेरु निवृत्तिरावो
११३५४	।।ना.गा.१७६४.००७।।	स्वात्मसुखबोधाचा सिंधु हा सोपान । सर्वात भूषण भक्तराय
११३५५	।।ना.गा.१७६४.००८।।	परमानंद जगन्मित्र जोगा । वटेश्वर चांगा केशवदास
११३५६	।।ना.गा.१७६४.००९।।	सावता बंका चोखा आणि रोहिदास । या सकळांहुनी विशेष महिमा तुझा
११३५७	।।ना.गा.१७६४.०१०।।	हा दास खेचर नरहरि सोनार । आणि गोरा कुंभार भानुदास
११३५८	।।ना.गा.१७६४.०११।।	हे आवडते माझे महाभक्तराज । परि तुझेनि तृप्ति मज अधिक होय
११३५९	।।ना.गा.१७६४.०१२।।	उद्धव रुक्मांगद भीष्म आणि नारद। बालकें ध्रुव प्रल्हाद प्रसिद्ध जगीं
११३६०	।।ना.गा.१७६४.०१३।।	हे विषयीं विरक्त सहज जीवन्मुक्त । परी तुझा अधिक भाग्यमहिमा
११३६१	।।ना.गा.१७६४.०१४।।	हे संत सोईरे जिवलग आमुचे । सांगाती जीवाचे आवडते
११३६२	।।ना.गा.१७६४.०१५।।	परी तुझा आनंद सर्वाहुनी आगळा । मज असे मानला नामदेव
११३६३	।।ना.गा.१७६५.००१।।	जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केलें । तेव्हां या विठ्ठलें कृपा केली
११३६४	।।ना.गा.१७६५.००२।।	जन्मोनि संसारीं जालों त्याचा दास । माझा तो विश्वास पांडुरंगीं
११३६५	।।ना.गा.१७६५.००३।।	अनेक देवता नेघे माझें चित्त । गोड गातां गीत विठोबाचें
११३६६	।।ना.गा.१७६५.००४।।	भ्रमर सुवासीं मधावरी मासी। तैसें या देवासी माझें मन
११३६७	।।ना.गा.१७६५.००५।।	नामा म्हणे मज पंढरीस न्या रे । हडसोनी द्वारे विठोबासी
११३६८	।।ना.गा.१७६६.००१।।	मीच माझा देव मीच माझा भक्त । मी माझा कृतार्थ सहज असे
११३६९	।।ना.गा.१७६६.००२।।	बंध आणि मोक्ष मायेची कल्पना । पडली होती मना भ्रांति कैसी
११३७०	।।ना.गा.१७६६.००३।।	विठ्ठलें विचारें दाखविलें सुख । होते जें असंख्य हरपलें

११३७१	।।ना.गा.१७६६.००४।।	नामा म्हणे सोय सांपडली निकी । जालों येकायेकीं हरिचा दास
११३७२	।।ना.गा.१७६७.००१।।	अवघा संसार सुखाचा करीन । अवघ्या भावें धरीन विठ्ठल एक
११३७३	।।ना.गा.१७६७.००२।।	अवघा शिणभाग हिरोन घेईन । अवघेंचि तोडिन मायाजळ
११३७४	।।ना.गा.१७६७.००३।।	अवघा जिवलग हाचि पैं होईल । अवघा घेईल भार माथां
११३७५	।।ना.गा.१७६७.००४।।	अवघा त्रिविधताप क्षणें मावळेल । अवघा चालविल योगक्षेम
११३७६	।।ना.गा.१७६७.००५।।	अवघ्या संसाराचें बैसणें मोडील । अवघेंचि तोडील मायाजळ
११३७७	।।ना.गा.१७६७.००६।।	नाम्या म्हणे अवघी सांडी मिथ्या भ्रांति । विठ्ठलेंविण विश्रांती नाहीं कोठें
११३७८	।।ना.गा.१७६८.००१।।	भीत नाहीं भीत नाहीं । अखंडहि सावध
११३७९	।।ना.गा.१७६८.००२।।	उघड समाधि उघड समाधि । अंतर बुद्धि निर्मळ
११३८०	।।ना.गा.१७६८.००३।।	गोंविसी कासया गोंविसी कासया । पंढरिराया सांभाळी
११३८१	।।ना.गा.१७६८.००४।।	नामा म्हणे जगज्जीवना । नारायणा सांभाळी
११३८२	।।ना.गा.१७६९.००१।।	मूर्खाहातीं दिलें रत्न पारखीसी । तयाच्या मोलासी घेऊं नका
११३८३	।।ना.गा.१७६९.००२।।	आम्ही तैसे जालों आम्ही तैसे जालों । आम्ही तैसे जालों जाणतेची
११३८४	।।ना.गा.१७६९.००३।।	अंगीं नाहीं बळ होड घाली राया । आम्ही गेलों वायां तेणें न्याये
११३८५	।।ना.गा.१७६९.००४।।	नामा म्हणे ऐसें केलें तयापरी । आम्हीं निरंतर तुम्हांसवें
११३८६	।।ना.गा.१७७०.००१।।	योगानें जोडिली सायासें । ते मज वोळली वोरसे
११३८७	।।ना.गा.१७७०.००२।।	बरवी कामधेनु गाय । विठाबाई माझी माय
११३८८	।।ना.गा.१७७०.००३।।	नसतां सडा साठवण । तृप्त केलें त्रिभुवन
११३८९	।।ना.गा.१७७०.००४।।	कोटि कुळें वोरसलीं । पुरोनि अवघींच उरलीं
११३९०	।।ना.गा.१७७०.००५।।	न साहे अहंकाराचा वारा । आली दीनाचिया घरां
११३९१	।।ना.गा.१७७०.००६।।	नामा म्हणे हें दुभतें । जोडुनि दिधलें असे आइतें
११३९२	।।ना.गा.१७७१.००१।।	देह देव्हारा पाट हृदय संपुष्ट । मधीं कृष्णमूर्त बैसविली
११३९३	।।ना.गा.१७७१.००२।।	प्रेमाचे पाण्यानें प्रक्षाळिन तुज । आत्मस्वरूप निज पांडुरंगा
११३९४	।।ना.गा.१७७१.००३।।	भावें केलें गंध भक्तीची अक्षता । वाहिली निढळा देवावरी
११३९५	।।ना.गा.१७७१.००४।।	मन केला मोगरा चित्त केलें शेवंती । भक्तीची तुळसी अर्पियेली
११३९६	।।ना.गा.१७७१.००५।।	धूप दीप आर्ती ओवाळिन तूज । एक केशवराज सकळ सिद्ध

११३९७	।।ना.गा.१७७१.००६।।	त्रिगुणीं पक्वान्न केलें ब्रह्मार्पण । वांच्छित भोजन अर्पियेलें
११३९८	।।ना.गा.१७७१.००७।।	नामा म्हणे देवा सेवा केली एका । पंचप्राण सखा विटेवरी
११३९९	।।ना.गा.१७७२.००१।।	आत्मत्वाच्यायोगें पाहूं जातां । नाहीं निरंतर भिन्न देवता
११४००	।।ना.गा.१७७२.००२।।	वर्णाश्रम याति कुळ गोत्र । भक्ति सदोदित नामापाशीं
११४०१	।।ना.गा.१७७२.००३।।	नामा म्हणे भय मुळीं कांहीं नाहीं । अखंडित पाही भक्ति सार
११४०२	।।ना.गा.१७७३.००१।।	आम्हांसी चिंतन अवश्य श्रीरामा । आवडी आणिक आम्हां नाहीं दुजी
११४०३	।।ना.गा.१७७३.००२।।	वोळगलों हरि भूतभावा निर्धारीं । दिसे चराचरी भावरूप
११४०४	।।ना.गा.१७७३.००३।।	जें जें पडे दृष्टी आणिक नाहीं सृष्टीं । हरिरूपीं भेटी हेंचि दिसे
११४०५	।।ना.गा.१७७३.००४।।	नामा म्हणे विठ्ठल सर्वांभूतीं आहे । आणिक उपाये न लगती
११४०६	।।ना.गा.१७७४.००१।।	तीर्थासी जाऊनि काये म्यां करावें । वाउगें हिंडावें पंथें तेणें
११४०७	।।ना.गा.१७७४.००२।।	माझें तीर्थ क्षेत्र पंढरी पैं जाण। उघडें निधान दृष्टीपुढें
११४०८	।।ना.गा.१७७४.००३।।	मार्गें थोर थोरी हेंचि पैं साधिलें । नाम्यासी दिधलें खेचरानें
११४०९	।।ना.गा.१७७५.००१।।	नामयानें बंद रे घेतिले । विठ्ठलासी जीते धरिलें
११४१०	।।ना.गा.१७७५.००२।।	नामा आला रे म्हणती । भेणें कळिकाळ कांपती
११४११	।।ना.गा.१७७५.००३।।	भाव भक्ति करोनि कडी । विठ्ठल पायीं जडली बेडी
११४१२	।।ना.गा.१७७५.००४।।	देह करूनि बंदिठाणा । विठ्ठल सांठविलें निधाना
११४१३	।।ना.गा.१७७५.००५।।	सोहं शब्दें मार केला । विठ्ठल काकुलती आला
११४१४	।।ना.गा.१७७५.००६।।	नामा म्हणे विठ्ठलातें । जीवें गेल्या न सोडी तूतें
११४१५	।।ना.गा.१७७६.००१।।	असो आतां किती हेचि ठेवाठेवी । कृपा विठ्ठलदेवीं केली मज
११४१६	।।ना.गा.१७७६.००२।।	अंतरींच्या सुखा नाचतसे भोजें । हेंचि निजगुज जाणवलें
११४१७	।।ना.गा.१७७६.००३।।	नामा म्हणे अंतरींचें निजगुज । सांगितलें मज पांडुरंगें
११४१८	।।ना.गा.१७७७.००१।।	कांसवीचीं पिलें पोशिलीं कृपेनें । तैसा पैं आत्मज्ञानें सुखी जालों
११४१९	।।ना.गा.१७७७.००२।।	स्वप्नींचें संतोषें मुके जेवीं उल्हासें । कीं सुखें हांसे नेणताची
११४२०	।।ना.गा.१७७७.००३।।	पक्षी फलालागीं अंतराळीं उडाला । न कळे कोठें गेला माग त्याचा
११४२१	।।ना.गा.१७७७.००४।।	नामा म्हणे खूण अनुभव जाणें । ब्रह्मत्वीं पाहाणें केशवचरण
११४२२	।।ना.गा.१७७८.००१।।	आम्हां जतन करावया उभा विटेवरी । तळुवटीं पंढरी ओढवली

११४२३	।।ना.गा.१७७८.००२।।	तिहीं लोकीं पिकला जगा जगजीवनु । प्राप्ति पाहुन दानु देत असे
११४२४	।।ना.गा.१७७८.००३।।	चातका चिंतनीं जलधर गगनीं । पुढार देऊनि पुंडलिका
११४२५	।।ना.गा.१७७८.००४।।	विष्णुदास नामा विनवी वेळोवेळां । विठ्ठलीं जीवनकळा मुरालिसे
११४२६	।।ना.गा.१७७९.००१।।	तरावया संसार जडजीव प्राणी । नाव नवखणी नवही मुखें
११४२७	।।ना.गा.१७७९.००२।।	बैसा नावेवरी नाहीं भेदाभेद । श्रवणाचे छंदें नाव गेली
११४२८	।।ना.गा.१७७९.००३।।	अठराहि आवले नावेसी लागले । साहि रंग भरले मिरवताती
११४२९	।।ना.गा.१७७९.००४।।	चहू मुखें जयाचा न कळे विचार । तेवीं अगोचर सहस्रमुखा
११४३०	।।ना.गा.१७७९.००५।।	तारील तारील हाचि पैं निर्धार । नामा पैल पार उतरला
११४३१	।।ना.गा.१७८०.००१।।	माझा भाव तुझें चरणीं । तुझें रूप माझें नयनीं
११४३२	।।ना.गा.१७८०.००२।।	सांपडलों एकमेकां । जन्मोजन्मीं नोहे सुटका
११४३३	।।ना.गा.१७८०.००३।।	त्वां तोडिली माझी माया । मी जडलों तुझ्या पायां
११४३४	।।ना.गा.१७८०.००४।।	त्वां मज केले रे विदेही । म्यां तुज धरिलें हृदयीं
११४३५	।।ना.गा.१७८०.००५।।	नामा म्हणे गा सुजाणा । सांग लटिके कोणे कोणा
११४३६	।।ना.गा.१७८१.००१।।	मन जालें उन्मन वासना तल्लीन । देखें हरिचरण सर्वांठायीं
११४३७	।।ना.गा.१७८१.००२।।	गुरुशिष्य मात हरपला दृष्टांत। प्रत्यक्ष त्वरित हरि जाला
११४३८	।।ना.गा.१७८१.००३।।	नामा म्हणे पाहे रूप चहू बाही । दिशाद्रुम दाही हरि दिसे
११४३९	।।ना.गा.१७८२.००१।।	आम्ही परीट चोखट । शुद्ध केलें खटनट
११४४०	।।ना.गा.१७८२.००२।।	बोध साबण लाऊनी ठायीं । डाग उडविला पाही
११४४१	।।ना.गा.१७८२.००३।।	शांति शिळेवरी धुतलें । ज्ञानगंगें निर्मळ जालें
११४४२	।।ना.गा.१७८२.००४।।	परब्रह्म होउनि ठेलों । नामा म्हणे सुखरूप जालों
११४४३	।।ना.गा.१७८३.००१।।	अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागें । परी पालटची नेघे पांडुरंग
११४४४	।।ना.गा.१७८३.००२।।	उभा उगेपणें पुंडलिकाचेनी सुखें । आहे तेथें लक्षें जैसे तैसा
११४४५	।।ना.गा.१७८३.००३।।	प्रेम रसरंगें प्रीतीचेनी पांगें । सदा संतसंगें खेळ करी
११४४६	।।ना.गा.१७८३.००४।।	जो न लगे योग योगें आणि देहत्यागें । तो सांपडला सर्वांगें हृदयीं धरा
११४४७	।।ना.गा.१७८३.००५।।	धुंडाळितां श्रुतिस्मृति जो नुमगे । तो भक्ता आगे मागें सांभाळित
११४४८	।।ना.गा.१७८३.००६।।	योगियांच्या ध्यानीं क्षणएक न रंगे । तो सुखी गोष्टी सांगे नामयासी

११४४९	।।ना.गा.१७८४.००१।।	आम्ही देह केलें दुकान । तेथें सांठविलें ब्रह्मज्ञान
११४५०	।।ना.गा.१७८४.००२।।	एकें खेपे पैं लाभ जाला । आम्हां पंढरिनाथ भेटला
११४५१	।।ना.गा.१७८४.००३।।	पुण्य सत्वाची केली तागडी । ब्रह्म तुकून बांधिली पुडी
११४५२	।।ना.गा.१७८४.००४।।	तुझा दास मी वाणिया भला । नामा केशवचरणीं विनटला
११४५३	।।ना.गा.१७८५.००१।।	आतां मज भय नाहीं पैं कोणाचें । जन्ममरणाचें दु:ख गेलें
११४५४	।।ना.गा.१७८५.००२।।	बद्ध मोक्षाची फिटली काजळी। समाधि लागली समाधीसी
११४५५	।।ना.गा.१७८५.००३।।	नामा म्हणे मज सर्वही साधन । खेचर चरण न विसंबे
११४५६	।।ना.गा.१७८६.००१।।	कोटी दिवाळ्या दसरे । आम्हां हेचि जाले पुरे
११४५७	।।ना.गा.१७८६.००२।।	घरोघरीं ओवाळणी । विठ्ठल देखिला नयनीं
११४५८	।।ना.गा.१७८६.००३।।	जाला सुखाचा शेजार । करी नामाचा गजर
११४५९	।।ना.गा.१७८६.००४।।	नामयाचा स्वामी आला । ब्रह्मादिकां आनंद जाला
११४६०	।।ना.गा.१७८७.००१।।	मी म्हणे उरलें पोटीं माया बालक । पाहे तंव कौतुक तेंही नाहीं
११४६१	।।ना.गा.१७८७.००२।।	तेथिचे तेथें दंपत्य लोपलें। कळिकाळें मंथिले नामें थोर
११४६२	।।ना.गा.१७८७.००३।।	तेचि घेऊनि ठेलों मी येथें लोपलों । ब्रह्मींच गुंतलों ब्रह्मीमाळे
११४६३	।।ना.गा.१७८७.००४।।	नामा म्हणे चैतन्य चैतन्या मिळाले । अरूप रूपें ठेलें आपणांमाजी
११४६४	।।ना.गा.१७८८.००१।।	मज तुज निगदले निगदले । राहे कळिकाळा उगले
११४६५	।।ना.गा.१७८८.००२।।	अरे खंडले एके बोलें । समर्थें होतां अंगिकारलें
११४६६	।।ना.गा.१७८८.००३।।	नाम्यानें संसारिक जिंकिले । केशवचरणीं मन ठेविलें
११४६७	।।ना.गा.१७८९.००१।।	सहस्रनामाचें वाटगें । खांदीं घेतलें नेटगें
११४६८	।।ना.गा.१७८९.००२।।	देवा पाती तुझी देवा पाती तुझी । बरकत माझी भक्तिभावें
११४६९	।।ना.गा.१७८९.००३।।	पंढरिये गेलों हाटा । दुकान मांडिलें वाळुवंटा
११४७०	।।ना.गा.१७८९.००४।।	वैष्णवांची भरली सांत । गिऱ्हाईक पातलें बहुत
११४७१	।।ना.गा.१७८९.००५।।	विकरा होतसे नामाचा । लाभ जाला त्या विठ्ठलाचा
११४७२	।।ना.गा.१७८९.००६।।	नामा देखूनि दुबळा । विठ्ठलें दिधलें भांडवला
११४७३	।।ना.गा.१७९०.००१।।	कोटी सूर्य प्रभादीप्ती । गगनीं झळकली अवचितीं
११४७४	।।ना.गा.१७९०.००२।।	संत नामयासी सांगती । पैल आला कमलापति

११४७५	।।ना.गा.१७९०.००३।।	वत्सालागीं जैसी धेनु । तैसा धांवे जगज्जीवनु
११४७६	।।ना.गा.१७९०.००४।।	गरुडाचे पक्षवाति । दाही दिशा आक्रंदती
११४७७	।।ना.गा.१७९०.००५।।	हरि कंठींची सुमनमाळ । सुटूनि आली भूमंडळा
११४७८	।।ना.गा.१७९०.००६।।	सवें चाले सुदर्शन । भक्त करावया रक्षण
११४७९	।।ना.गा.१७९०.००७।।	उचलोनि दोहीं बाहीं । नामा धरिला हृदयीं
११४८०	।।ना.गा.१७९१.००१।।	झणीं दृष्टि लागो तुझ्या सगुणपणा । तेणें माझ्या मना बोध केला
११४८१	।।ना.गा.१७९१.००२।।	अनंता जन्मींचें विसरलों दु:ख । पाहतां तुझें मुख पांडुरंगा
११४८२	।।ना.गा.१७९१.००३।।	योगियांच्या ध्यानीं ध्यातां नातुडसी । तो तूं आम्हांपाशीं मागें पुढें
११४८३	।।ना.गा.१७९१.००४।।	नामा म्हणे जीवें करीन निंबलोण । विटेसहित चरण वोवाळीन
११४८४	।।ना.गा.१७९२.००१।।	ऐका कलियुगाचा धर्म । पुत्र सांगे पित्यास काम । ब्राह्मण त्यजिती ब्रह्मकर्म । ऐसें वर्तमान मांडलें
११४८५	।।ना.गा.१७९२.००२।।	माया बहिणी दवडिती । स्त्री आपुली आणविती । ऐका ऐका नवल गती । अगा श्रीपति परियेसी
११४८६	।।ना.गा.१७९२.००३।।	भार्या न करिती पतिची सेवा । नाहीं कवणा धर्माचा हेवा । वर्ततसे पापाचा ठेवा । अगा केशवा परियेसी
११४८७	।।ना.गा.१७९२.००४।।	अरे वैराग्याचा घराचारू । आणि संन्यासा मोह थोरू । संता बहुत अहंकारू । रुसणें न लगे कोणासी
११४८८	।।ना.गा.१७९२.००५।।	जाला कलिचा प्रवेशु । तुम्हां नामाचा विश्वासु । हृदयीं हृषिकेशु । विष्णुदास नामा म्हणे
११४८९	।।ना.गा.१७९३.००१।।	ऐसा कलियुगींचा आचार । क्रियाभ्रष्ट जाले नर
११४९०	।।ना.गा.१७९३.००२।।	मंचकावरी बैसे राणी । माता वाहतसे पाणी
११४९१	।।ना.गा.१७९३.००३।।	स्त्रियेसी अलंकार भूषण । माता वळितसे शेण
११४९२	।।ना.गा.१७९३.००४।।	स्त्रियेसी पाटावाची साडी । माता नेसे चिंध्या लुगडीं
११४९३	।।ना.गा.१७९३.००५।।	सासुसासऱ्या योग्य मान । मायबापा न घाली अन्न
११४९४	।।ना.गा.१७९३.००६।।	साली सासवा आवडती । बहिण भावां तोंडीं माती
११४९५	।।ना.गा.१७९३.००७।।	स्त्रियेसी एकांत गोडी । मातेसी म्हणे रांड वेडी
११४९६	।।ना.गा.१७९३.००८।।	म्हणे विष्णुदास नामा । ऐसा कलियुगींचा महिमा
११४९७	।।ना.गा.१७९४.००१।।	कांहीं सांगोनि गेले वचना । कृष्ण उपदेशी पंडुनंदना । येथें राहतां पाविजे बंधना । थोर वर्तमान कलियुगीं
११४९८	।।ना.गा.१७९४.००२।।	या कलिमाझारीं । पुत्र पित्याचे वैरी । घरची माता होय कामारी । पुरुषांतें नारी अव्हेरिती
११४९९	।।ना.गा.१७९४.००३।।	न येती वृक्षा फळें आटती धेनु । न पिके मही न वर्षे धनु । यापरी आटेल सकळ जनु । ऐसे जगजीवनु बोलिले
११५००	।।ना.गा.१७९४.००४।।	आणिक एक वर्तेल अपवित्र । ब्राह्मण सांडितील वेदमंत्र । आचार सांडूनि होती शुद्र । ऐसे अपवित्र कलियुगीं

११५०१	।।ना.गा.१७९४.००५।।	थोर वर्तमान पडेल काळु । चहुं वर्णांचा होईल एकचि मेळू । कोणी कोणाचा न धरिती विटाळु । मग गोपाळु निघते जाले
११५०२	।।ना.गा.१७९४.००६।।	आतां वेळोवेळां सांगें किती । मोडला धर्म जाली प्रवृत्ति । विष्णुदास नामा येतो काकुळती । कैसेनि करूं भक्ती पंढरीराया
११५०३	।।ना.गा.१७९५.००१।।	पाप्या नावडे संतसंगति । लोभिया नावडे उदारवृत्ति । व्यभिचारिणी नावडे पति । नावडे ज्योति उजियेडा
११५०४	।।ना.गा.१७९५.००२।।	चांदणें नावडे तया चोरा । सद्बुद्धि नावडे रांडपोरा । सावधान नावडे तया हेरा । सत्य कुचरा नावडे
११५०५	।।ना.गा.१७९५.००३।।	तीर्थ नावडे तया दुष्टा । न्याय नावडे नष्टा । कणव नावडे तया पापिष्टा । अभिमान नष्टा न संडवे
११५०६	।।ना.गा.१७९५.००४।।	भक्ति नावडे तया खळा । पुण्य नावडे तया चांडाळा । देखत देखत जन आंधळा । कां रे घननीळा विसरलेती
११५०७	।।ना.गा.१७९५.००५।।	पारखी नावडे तया खोट्याला । स्नान नावडे तया विटाळा । सुसंग नावडे नाठाळा । न्याय तंट्याला नावडे
११५०८	।।ना.गा.१७९५.००६।।	धर्म नावडे तया कृपणा । शुद्धि नावडे दुर्जना । कर्म नावडे अब्राह्मणा । ऐसी दुष्ट वासना पापियातें
११५०९	।।ना.गा.१७९५.००७।।	नाम नावडे तया नष्ट भक्ता । व्रत नावडे तया सर्वथा । नावडे भजन कैंचीं कथा । नाहीं पतिव्रता कलियुगीं
११५१०	।।ना.गा.१७९५.००८।।	ऐसा आला कलिचा प्रवेश । धरा नामाचा विश्‍वास । जीवीं धरा हृषिकेश । विष्णुदास नामा म्हणे
११५११	।।ना.गा.१७९६.००१।।	देवा छळे पाप कांपते मेदिनी । षट्‌कर्म सांडियेलें ब्राह्मणीं । दैत्याचेनी भारें दाटली अवनी । प्रथम चरणीं कलियुगीं
११५१२	।।ना.गा.१७९६.००२।।	लटिक्याचा साच जिंकियेला कली । पाखांडी वेदातें न मानिती बळी । अधर्म प्रवर्तला महितळीं । ऐसी पापें कळी थोर जालीं
११५१३	।।ना.गा.१७९६.००३।।	म्हणोनी करुणा भाकितु आहे । जैसी व्याघ्रें वेढिली गाये। तेवीं पंचानन ग्रासूं पाहे । तैसें दिसती नारायणा
११५१४	।।ना.गा.१७९६.००४।।	भक्ति भावो नावडे पैं गा । जैसे कां अमृत मुखीं भुजंगा । डंख करूं आवडे जगा । ऐसें श्रीरंगा नवल चोज
११५१५	।।ना.गा.१७९६.००५।।	भ्रतारभक्ति सोडियेली नारी । परपुरुषीं मन निर्धारीं । पितयासि पुत्र असो नेदी घरीं । नित्य निंदा करी अपमान
११५१६	।।ना.गा.१७९६.००६।।	म्हणोनियां जीवें त्रासु घेतला । सत्य लोपलें धर्म बुडला । अझुनि काय पाहतोसि उगला । धांवे विठ्ठला म्हणे नामा
११५१७	।।ना.गा.१७९७.००१।।	वेदावेगळें कर्म करी । मनीं पाखंड धरी । तो पविजे अघोरीं । चिरकाल वरी
११५१८	।।ना.गा.१७९७.००२।।	तो न आणावा पैं दृष्टीं । तोचि दोषी एक या सृष्टीं । तो होईल महा कष्टी । हरिसी न भजतां
११५१९	।।ना.गा.१७९७.००३।।	संध्या स्नान नेणें दान। नेणें हरिकथा श्रवण । तोहि पतित जाण । महापातकी चांडाळ
११५२०	।।ना.गा.१७९७.००४।।	सांडुनि ब्राह्मणपण । शूद्रीती आचरण । तो कष्टी पडलिया जाण । महादोष घडेल
११५२१	।।ना.गा.१७९७.००५।।	निंदा करी जो संतांची । पूजा नेणें जो देवाची । तोचि राशी पापाचि । प्रत्यक्ष जाणावी
११५२२	।।ना.गा.१७९७.००६।।	तीर्थ न करी हिंडतां । व्रत न करी बोलतां । पुराण नायकें पाहतां । तो तंव राक्षस जाणावा
११५२३	।।ना.गा.१७९७.००७।।	सदा अमंगळ अशुची । गुरु आज्ञा भंगी साची । अखंड निंदा करी संताची । तो स्वामिद्रोही जाणावा
११५२४	।।ना.गा.१७९७.००८।।	कपट शिके नानाविध । गोत्रजाशीं करी विरोध । तो जाणावा हें प्रसिद्ध । महा पातकी चांडाळ
११५२५	।।ना.गा.१७९७.००९।।	गृहदारावरी नाहीं चित्त । परस्त्रियेसीं करी स्तुत । तो प्रत्यक्ष महादैत्य । त्याचें मुख पाहों नये

११५२६	।।ना.गा.१७९७.०१०।।	नाठवी जो उपकार । स्वामिसी न करी जो नमस्कार । तो जन्मांतरिंचा होय नर । पतित चांडाळ बोलिजे
११५२७	।।ना.गा.१७९७.०११।।	पाखंड रचि कवित्व । मातापितयाचें न करी महत्त्व । पंच पातकी जिवित्व । तो पूर्वीचा बोका होता
११५२८	।।ना.गा.१७९७.०१२।।	नामा म्हणे तैसे दोषी । न आणावे पंढरियेसी । काय करावें ते पाषाण जन्मासी । जे विठ्ठलनामासी मिळतीना
११५२९	।।ना.गा.१७९८.००१।।	कृष्णाचें कीर्तन नावडे ज्या नरा । जन्मोनि अघोरा पडे नरकीं
११५३०	।।ना.गा.१७९८.००२।।	कृष्णाचें श्रवण नाईके जो कानीं । तयासि मेदिनीं ठाव कैंचा
११५३१	।।ना.गा.१७९८.००३।।	कृष्णविष्णुकथा नावडे पैं नित्य । तयासी पैं सत्य ग्रह बाधी
११५३२	।।ना.गा.१७९८.००४।।	रामकृष्ण हरि न पाहे पैं मूर्ति । तया यम नेती अंतीं जाणा
११५३३	।।ना.गा.१७९८.००५।।	नामा म्हणे हे नर कलियुगीं उदंड । घरोघरीं पाखांड करिताती
११५३४	।।ना.गा.१७९९.००१।।	त्यागेंविण विरक्ति । प्रेमावांचुनि भक्ति । शांति नसतां ज्ञप्ति । शोभा न पवे
११५३५	।।ना.गा.१७९९.००२।।	दमनेवांचुनि यति । मननेंविण मुनिपति । योगी नसतां युक्ति । शोभा न पवे
११५३६	।।ना.गा.१७९९.००३।।	बहिर्मुख कवि मति । नेमावांचुनियां वृत्ति। बोधेविण महंती । शोभा न पवे
११५३७	।।ना.गा.१७९९.००४।।	अनधिकारा व्युत्पत्ति । गुरु तो कनिष्ठ याति । मा ते मीच शिष्यवृत्ति । शोभा न पवे
११५३८	।।ना.गा.१७९९.००५।।	हेतुवांचुनि प्रीति । गुणरहित स्तुती । करणीवांचुनि कीर्ति । शोभा न पवे
११५३९	।।ना.गा.१७९९.००६।।	सत्समागमसंगती । बाणली नसतां चित्तीं । नामा म्हणे क्षिति । शोभा न पवे सर्वथा
११५४०	।।ना.गा.१८००.००१।।	निर्विकार स्वरूप काशानें आतुडे । जंववरी न संडे मीतूंपण
११५४१	।।ना.गा.१८००.००२।।	शब्दचित्रकथा बोलती पाल्हाळ । मन नाहीं निश्चळ रामकृष्णीं
११५४२	।।ना.गा.१८००.००३।।	अणुचें प्रमाण असतां दुजेपण । मेरु तो समान देईल दुःख
११५४३	।।ना.गा.१८००.००४।।	नामा म्हणे विश्वात्मक रूप पाही । तरिच ठाईंचा ठाईं निवशील
११५४४	।।ना.गा.१८०१.००१।।	सोंगाचें वैराग्य अनर्थ हें मूळ । आशा तें केवळ मिथ्या जाण
११५४५	।।ना.गा.१८०१.००२।।	अंतरापासुनि नसतां विवेक। निभ्रांत चटक आशावरी
११५४६	।।ना.गा.१८०१.००३।।	राजस तामस करोनियां गोळा । होतसे आंधळा दाटोनियां
११५४७	।।ना.गा.१८०१.००४।।	नामा म्हणे ऐशा उदंड उपायें । विठोबाचे पाय अंतरिती
११५४८	।।ना.गा.१८०२.००१।।	मुखीं नाहीं नाम । काय जपतो श्रीराम
११५४९	।।ना.गा.१८०२.००२।।	काय आसन घालुन । मुखीं नाहीं नारायण
११५५०	।।ना.गा.१८०२.००३।।	टिळे टोपी माळा दावी । भोळ्या भाविकांसी गोवी
११५५१	।।ना.गा.१८०२.००४।।	नामा म्हणे त्याचा संग । नको चित्ता होय भंग

११५५२	।।ना.गा.१८०३.००१।।	गोमुखीं गोंवुन काय जपतोसि । जपतप त्यासी विघ्न करी
११५५३	।।ना.गा.१८०३.००२।।	नामसंकीर्तनें जळतील पापें । चुकतील खेपा चौऱ्यांशीच्या
११५५४	।।ना.गा.१८०३.००३।।	उपवास करी उग्र अनुष्ठानीं । तया चक्रपाणि अंतरतो
११५५५	।।ना.गा.१८०३.००४।।	नामा म्हणे ऐसे बहुतेक प्राणी । पिचतील खाणीं भ्रष्ट लोक
११५५६	।।ना.गा.१८०४.००१।।	कांचनिक भक्ति सर्वकाळ करी । बहुतांचे वैरी हित नेणें
११५५७	।।ना.गा.१८०४.००२।।	लोकांपुढें सांगे आम्ही हरिभक्त । न होय विरक्त स्थिति ज्याची
११५५८	।।ना.गा.१८०४.००३।।	असंतोषी सदा अतितासी जाळी । सुकृताची होळी स्वयें केली
११५५९	।।ना.गा.१८०४.००४।।	वेदमर्यादा सांडुनि चालती । हुंबते घेती वाऱ्यासवें
११५६०	।।ना.गा.१८०४.००५।।	नामा म्हणे आतां असो याची मात । सुख नेणें हित कदा काळीं
११५६१	।।ना.गा.१८०५.००१।।	सिबुर दावुनि बैसलें हाटीं । सांगताहे गोष्टी जाणिवेच्या
११५६२	।।ना.गा.१८०५.००२।।	कापियेलें नाक जालें ते नि:शंक । वारे भुरभुरां देख वाजतसे
११५६३	।।ना.गा.१८०५.००३।।	दवडा दवडा परतें करील निंदा । घ्यावा कां कांदा मुळीहुनी
११५६४	।।ना.गा.१८०५.००४।।	नामा विनवितसे केशवातें सत्ता । उरलें सुरलें आतां अवघे तासां
११५६५	।।ना.गा.१८०६.००१।।	यज्ञादिक कर्म करूनि ब्राह्मण । दंभ आचरण दावी लोकां
११५६६	।।ना.गा.१८०६.००२।।	लोकांसी दाविती मीच कर्मनिष्ठ। अभिमान खोटा वागविती
११५६७	।।ना.गा.१८०६.००३।।	वागविती वाक्य जाण ऋषीश्वर । नको येरझार नाना मतें
११५६८	।।ना.गा.१८०६.००४।।	नानामतें अधोऊर्ध्वसात जावीं । नको गोंवागोंवी नामा म्हणे
११५६९	।।ना.गा.१८०७.००१।।	वेदाध्ययन करिसी तरी वैदिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७०	।।ना.गा.१८०७.००२।।	पुराण सांगसी तरी पुराणिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७१	।।ना.गा.१८०७.००३।।	गायन करिसी तरी गुणिजन होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७२	।।ना.गा.१८०७.००४।।	कर्म आचरसी तरी कर्मठचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७३	।।ना.गा.१८०७.००५।।	यज्ञ करिसी तरी याज्ञिकचि होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७४	।।ना.गा.१८०७.००६।।	तीर्थ करिसी तरी कापडीच होसी । परी वैष्णव न होसी अरे जना
११५७५	।।ना.गा.१८०७.००७।।	नामा म्हणे नाम केशवाचें घेसी । तरीच वैष्णव होसी अरे जना
११५७६	।।ना.गा.१८०८.००१।।	योगी ब्रह्मचारी सिद्ध ब्रह्मज्ञानी । ते तों तुज कोणी न येती कामा
११५७७	।।ना.गा.१८०८.००२।।	कोंडुनी इंद्रियें बैसती समाधि । हळुच तुझ्या पदीं झेपावती

११५७८	।।ना.गा.१८०८.००३।।	एवढें विश्वरूप नाहीं ऐसें केलें । सकळ होऊनि ठेले आपणचि
११५७९	।।ना.गा.१८०८.००४।।	ऐसियाचा विश्वास न धरिसी देवा । नामा तुज केशवा विनवितसे
११५८०	।।ना.गा.१८०९.००१।।	गोसावीपणाचा दाखविती वेष । नाहीं निजध्यास हरिनामीं
११५८१	।।ना.गा.१८०९.००२।।	वरी वरी आर्त दाविती झगमग । अंतरीं तो संग विषयाचा
११५८२	।।ना.गा.१८०९.००३।।	व्यर्थ लोकांपुढें हालविती माना । केली विटंबना संसाराची
११५८३	।।ना.गा.१८०९.००४।।	नामा म्हणे मन गुंतेल पांडुरंगा । आतां ऐशा सांगा कोण रीती
११५८४	।।ना.गा.१८१०.००१।।	विष्णुसी भजला शिव दुऱ्हाविला । अध:पात जाला तया नरा
११५८५	।।ना.गा.१८१०.००२।।	शिवपूजा करी विष्णुसी अव्हेरी । तयाचिये घरीं यम नांदे
११५८६	।।ना.गा.१८१०.००३।।	विष्णुकथा ऐके शिवासी जो निंदी । तयासी गोंविदीं ठाव नाहीं
११५८७	।।ना.गा.१८१०.००४।।	नामा म्हणे शिवविष्णुमूर्ति एक । वेदाचा विवेक आत्माराम
११५८८	।।ना.गा.१८११.००१।।	डोई बोडून केली खोडी । काया नागविली बापुडी
११५८९	।।ना.गा.१८११.००२।।	ऐसा नव्हे तो संन्यास । विषय देखोनि उदास
११५९०	।।ना.गा.१८११.००३।।	मांजराचे गेले डोळे । उंदीर देखोनि तळमळे
११५९१	।।ना.गा.१८११.००४।।	वेश्या जाली पट्टराणी । तिला आठवे मागील करणी
११५९२	।।ना.गा.१८११.००५।।	नामा म्हणे वेष पालटे । परि अंतरींचें ओशाळ न तुटे
११५९३	।।ना.गा.१८१२.००१।।	पोटासाठीं जरी करी हरिकथा । जन रंजवितां फिरतसे
११५९४	।।ना.गा.१८१२.००२।।	तेणें घात केला एकोत्तरशतकुळांचा । पाहुणा यमाचा श्रेष्ठ थोर
११५९५	।।ना.गा.१८१२.००३।।	द्रव्याचिये आशें हरिकथा करी । तया यमपुरीं नित्य वास
११५९६	।।ना.गा.१८१२.००४।।	नामा म्हणे ऐसे होत जे रे कोणी । ते नर नयनीं पाहूं नये
११५९७	।।ना.गा.१८१३.००१।।	हरिभक्त म्हणविणें आणि हरिदर्शना न जाणें । बोलतां लाजिरवाणें आहे जी देवा
११५९८	।।ना.गा.१८१३.००२।।	पतिव्रता म्हणविणें आणि परपुरुषीं विचरणें । बोलतां लाजिरवाणें आहे जी देवा
११५९९	।।ना.गा.१८१३.००३।।	योगिया म्हणविणें आणि इंद्रिया नाहीं दमनें। बोलतां लाजिरवाणें आहे जी देवा
११६००	।।ना.गा.१८१३.००४।।	क्षत्रिय म्हणविणें आणि पाठींशीं घाय साहणें । बोलतां लाजिरवाणें आहे जी देवा
११६०१	।।ना.गा.१८१३.००५।।	पितृभक्त म्हणविणें आणि पितृआज्ञा न पाळणें । बोलतां लाजिरवाणें आहे जी देवा
११६०२	।।ना.गा.१८१३.००६।।	ऐसे भक्त किती गेले अधोगति । नामा म्हणे श्रीपति दास तुझा
११६०३	।।ना.गा.१८१४.००१।।	कडू कारले साखरें घोळिलें । तरी काय गेलें कडूपण

११६०४	।।ना.गा.१८१४.००२।।	तैसा तो अधम करो तीर्थाटण । नोहे त्याचें मन निर्मळ तें
११६०५	।।ना.गा.१८१४.००३।।	बचनाग रवा दुग्धीं शिजविला । तरी काय गेला त्याचा गुण
११६०६	।।ना.गा.१८१४.००४।।	नामा म्हणे संतसज्जनसंगतीं । ऐशासहि गति काळांतरीं
११६०७	।।ना.गा.१८१५.००१।।	दावी जडीबुट्टी जारण मारण । नागवें हिंडणें काय काज
११६०८	।।ना.गा.१८१५.००२।।	दावी उग्र तप केले उपवास । फिरतांहि देश काय काज
११६०९	।।ना.गा.१८१५.००३।।	काय काज तरी होसील फजित । स्मरा रे अनंत सर्वकाळ
११६१०	।।ना.गा.१८१५.००४।।	नामा म्हणे नव्हे उदंड उपाय । धरी आधीं पाय विठोबाचे
११६११	।।ना.गा.१८१६.००१।।	लांब लांब काय सांगशील गोष्टी । करी उठाउठी निरभिमान
११६१२	।।ना.गा.१८१६.००२।।	मीतूंपण जंव दंभ गेला नाहीं। साधिलें त्वां न कांही तत्त्वसार
११६१३	।।ना.गा.१८१६.००३।।	अहंभाव देहीं प्रपंचाचे दृष्टी । काय चाले गोष्टी रोकडी ते
११६१४	।।ना.गा.१८१६.००४।।	नामा म्हणे ऐसे नेणती विचार । जाती निरंतर यमपंथें
११६१५	।।ना.गा.१८१७.००१।।	मी तूं हें कथन सांगसी काबाड । विठ्ठल हें येवढें न सांगसी
११६१६	।।ना.गा.१८१७.००२।।	ऐसें कांहीं सांग जेणें फिटे पांग। नित्य पांडुरंग भजन सोये
११६१७	।।ना.गा.१८१७.००३।।	मी आणि तूं हें वचन वोखटें । विठ्ठलीं विनटे दिननिशीं
११६१८	।।ना.गा.१८१७.००४।।	नामा म्हणे भाव ऐसा धरीं सकळ । तुष्टेल गोपाळ संवरिता
११६१९	।।ना.गा.१८१८.००१।।	मुखीं नाम हातीं टाळी । दया नुपजे कोणे काळीं
११६२०	।।ना.गा.१८१८.००२।।	काय करावें तें गाणें । धिक् धिक् तें लाजिरवाणें
११६२१	।।ना.गा.१८१८.००३।।	हरिदास म्हणोनि हलवि मान । कवडीसाठीं घेतो प्राण
११६२२	।।ना.गा.१८१८.००४।।	हरिदासाचे पायीं लोळे । केशीं धरोनी कापी गळे
११६२३	।।ना.गा.१८१८.००५।।	नामा म्हणे अवघे चोर । हरिनाम हें थोर
११६२४	।।ना.गा.१८१९.००१।।	ताकहि पांढरें दूधहि पांढरें । चवी जेवणारे जाणवीते
११६२५	।।ना.गा.१८१९.००२।।	केळ्याच्या पाठीवर ठेविला दोडका । तोहि म्हणे विका तेणें मोलें
११६२६	।।ना.गा.१८१९.००३।।	ढोर म्हणती आम्हां हाकारलास । वारूवा सरसें खाऊं घांस
११६२७	।।ना.गा.१८१९.००४।।	मंदल्याजेती घरोघरीं गाती । धृपदासाठीं ताक मागती
११६२८	।।ना.गा.१८१९.००५।।	नामा म्हणे सोपीं कवित्वें जालीं फुका । हरि हरि म्हणतां आपुलिया सुखा
११६२९	।।ना.गा.१८२०.००१।।	योग याग यज्ञ इच्छिती कामना । परि केशव निधाना विसरला

११६३०	।।ना.गा.१८२०.००२।।	नेणेंचि हें मन भुललें अज्ञानें । यातायाती पतन भोगूं पाहे
११६३१	।।ना.गा.१८२०.००३।।	ज्याचेनि जाहलें तुझें हें शरीर । त्याचा नामोच्चार ना ये वाचे
११६३२	।।ना.गा.१८२०.००४।।	नामा म्हणे कां रे नेणसी अझुनी । केशवचरणीं अनुसरे कां
११६३३	।।ना.गा.१८२१.००१।।	गेला परमहंस परिवारासहित । कोल्लाळ करिती मायबहिणी
११६३४	।।ना.गा.१८२१.००२।।	काया हे नगरी पांचहि तराळ । निद्रेनें भ्रमले व्याकुळ जाले
११६३५	।।ना.गा.१८२१.००३।।	गेला मागु न दिसे कवणिये वाटे । नवहि द्वारें पडली सपाट ओस
११६३६	।।ना.गा.१८२१.००४।।	नामा म्हणे चोरी एके अंगणांत । दिवसा रात्रीं पडत खाण तेथें
११६३७	।।ना.गा.१८२२.००१।।	नाहीं परमार्थ पोटीं धनआशा । धरोनि हव्यासा धनमान
११६३८	।।ना.गा.१८२२.००२।।	दंभमान दावी ज्ञानमार्ग मोठा । पुढिलांसि वाटा यमपंथें
११६३९	।।ना.गा.१८२२.००३।।	पंथ चुकती संताविण कधीं । संसारासंबंधीं तया नरा
११६४०	।।ना.गा.१८२२.००४।।	नामा म्हणे ऐसे बहु अभाविक । संतसंगसुख काय जाणे
११६४१	।।ना.गा.१८२३.००१।।	तोंवरी रे तोंवरी वैराग्याचें ठाण । जंव कामिनी कटाक्ष बाण लागले नाहीं
११६४२	।।ना.गा.१८२३.००२।।	तोंवरी रे तोंवरी आत्मज्ञान बोध । जोंवरी अंतरीं उठले नाहीं
११६४३	।।ना.गा.१८२३.००३।।	तोंवरी रे तोंवरी निरभिमान । जंव देहीं अपमान जाला नाहीं
११६४४	।।ना.गा.१८२३.००४।।	नामा म्हणे अवघी बचबच गाळी । विरळा तो जाळी द्वैत बुद्धि
११६४५	।।ना.गा.१८२४.००१।।	चंद्र सूर्यादि बिंब लिहिताती चांग । परि प्रकाशाचें अंग लिहितां न ये
११६४६	।।ना.गा.१८२४.००२।।	संन्यासाची सोंगें आणिताती चांग । परि वैराग्याचें अंग आणितां न ये
११६४७	।।ना.गा.१८२४.००३।।	नामा म्हणे कीर्तन करिताती चांग । परि प्रेमाचें तें अंग आणितां न ये
११६४८	।।ना.गा.१८२५.००१।।	हरिभक्त आथिले ऐसे ते उत्तम । येर ते अधम अधमांहुनी
११६४९	।।ना.गा.१८२५.००२।।	हरिभक्त सप्रेम तेंचि तैसें नाम। येर ते निनाम अनामिक
११६५०	।।ना.गा.१८२५.००३।।	नामा म्हणे जया नाहीं हरिसेवा । ते जितचि केशवा प्रेतवाणें
११६५१	।।ना.गा.१८२६.००१।।	भुजंग विखार करी पवनाहार । परि तो योगेश्वर म्हणूं नये
११६५२	।।ना.गा.१८२६.००२।।	पवनाच्या अभ्यासें कायाचि पालटी । परि तो वैकुंठीं सरता नव्हे
११६५३	।।ना.गा.१८२६.००३।।	शुद्ध करी मन समता धरी ध्यान । तरिच भवबंधन तुटेल रे
११६५४	।।ना.गा.१८२६.००४।।	पवित्र गंगाजळ मीन सेवी निर्मळ । परि दुष्ट तें केवळ कर्म त्याचें
११६५५	।।ना.गा.१८२६.००५।।	अवचिता तो हे सांपडला गळीं । न सुटे तयेवेळीं तीर्थोदकें

११६५६	।।ना.गा.१८२६.००६।।	घर सांडोनियां वन सेविताती । वनीं का नसती रीस व्याघ्र
११६५७	।।ना.गा.१८२६.००७।।	काम क्रोध लोभ न संडवे मनीं। असोनियां वनीं कोण काज
११६५८	।।ना.गा.१८२६.००८।।	बहुरुप्याचा नटा माथां भार जटा । भस्म राख सोटा हातीं दंड
११६५९	।।ना.गा.१८२६.००९।।	धोति-पोति कर्मावेगळाचि दिसे । हुंबरत असे अंगबळें
११६६०	।।ना.गा.१८२६.०१०।।	त्रिपुंड टिळे अंगीं चंदनाची उटी । घालोनियां कंठीं तुळसीमाळा
११६६१	।।ना.गा.१८२६.०११।।	व्यापक हा हरी कां न धरिती चित्तीं । लटिकी याची गति गातु असे
११६६२	।।ना.गा.१८२६.०१२।।	मनातें तूं मुंडी देहभाव सांडी । राखिसी तरी शेंडी हेंचि कर्म
११६६३	।।ना.गा.१८२६.०१३।।	मन हें दर्पण करोनि निर्मळ । पाहे पां केवळ आत्मसोये
११६६४	।।ना.गा.१८२६.०१४।।	तुझा तूं केवळ तुजमाजीं पाही । नामा म्हणे ध्यायी केशिराज
११६६५	।।ना.गा.१८२७.००१।।	अहंकारें आथिलें ऐसें जें शरीर । तें जाणा मंदिर चांडाळाचें
११६६६	।।ना.गा.१८२७.००२।।	आपुलिया मुखें सांगे पंढरीनाथ। नव्हे हो तो भक्त सत्य जाणा
११६६७	।।ना.गा.१८२७.००३।।	नाम विटंबिती संतासि हांसती । ते मूर्ख म्हणिजे ती सर्पपिलीं
११६६८	।।ना.गा.१८२७.००४।।	तयांसि लक्ष्मीवल्लभ सांगे उपदेश । नामा विष्णुदास विनवितसे
११६६९	।।ना.गा.१८२८.००१।।	काय करुनियां जप । चित्तीं नाहीं अनुताप
११६७०	।।ना.गा.१८२८.००२।।	काय करूनी तीर्थाटण । मनीं भरले अवगुण
११६७१	।।ना.गा.१८२८.००३।।	मनसंकल्पाचीं पापें । नवजती तीर्थाचिया बापें
११६७२	।।ना.गा.१८२८.००४।।	नामा म्हणे वर्म सोपें । पाप जाय अनुतापें
११६७३	।।ना.गा.१८२९.००१।।	करीना साधन जीवासी बंधन । कोणे काळीं मन नोहे शुद्ध
११६७४	।।ना.गा.१८२९.००२।।	करूं जातां तप अभिमानरूप। त्रिविधादि ताप कैसा निवे
११६७५	।।ना.गा.१८२९.००३।।	नित्यानित्य करी विवेक आपण । तेणें अभिमान वाढतसे
११६७६	।।ना.गा.१८२९.००४।।	नामा म्हणे जन्म विसरोनियां गेलों । मरोनि राहिलों देहातीत
११६७७	।।ना.गा.१८३०.००१।।	शिकला तैं गाणें राग आळवण । लोकां रंजवण करावया
११६७८	।।ना.गा.१८३०.००२।।	भक्ताचें तें गाणें बोबडिया बोली । तेंहि श्री विठ्ठलीं अर्पियेलें
११६७९	।।ना.गा.१८३०.००३।।	बोबडिया बोली जाणते हांसती । तेहि पचिजेति रौरवीं
११६८०	।।ना.गा.१८३०.००४।।	नामा म्हणे बहुत बोलों आतां काय । विठोबाचे पाय अंतरती
११६८१	।।ना.गा.१८३१.००१।।	राजसी तामसी जें गान । तोडी ताल मोडी मान

११६८२	।।ना.गा.१८३१.००२।।	ख्याल गाये कंपस्वर । रिझवी दात्याचें अंतर
११६८३	।।ना.गा.१८३१.००३।।	हें तो प्रीति धनावरी । अर्था अनर्थ तो करी
११६८४	।।ना.गा.१८३१.००४।।	नामा म्हणे हा शास्त्रार्थ । अर्थ तोचि होय स्वार्थ
११६८५	।।ना.गा.१८३२.००१।।	सुवर्ण आणि परिमळ । हिरा आणि कोमळ । योगी आणि निर्मळ । हें दुर्लभ जी दातारा
११६८६	।।ना.गा.१८३२.००२।।	देव जरी बोलता । तरी कल्पतरु चालतां । गज जरी दुभता । हें दुर्लभ जी दातारा
११६८७	।।ना.गा.१८३२.००३।।	धनवंत आणि दयाळू । व्याघ्र आणि कृपाळू । अग्नि आणि सीतळू । हें दुर्लभ जी दातारा
११६८८	।।ना.गा.१८३२.००४।।	सुंदर आणि पतिव्रता । सावधान होय श्रोता । पुराणिक तरी ज्ञाता । हें दुर्लभ जी दातारा
११६८९	।।ना.गा.१८३२.००५।।	क्षत्रिय आणि शूर भला । चंदन फुलीं फुलला । स्वरूपीं गुण आथिला । हें दुर्लभ जी दातारा
११६९०	।।ना.गा.१८३२.००६।।	ऐसा संपूर्ण सर्व गुणीं । केवी पाविजे शारंगपाणि । विष्णुदास नामा करी विनवणी । मुक्ति चरणीं त्याचिया
११६९१	।।ना.गा.१८३३.००१।।	शब्दामृत मांडे येती भोजना । अभ्यास अज्ञाना तरी फळे
११६९२	।।ना.गा.१८३३.००२।।	मुंगीचें थडगे फुटे जो आकाश। ब्रह्मत्व सायास न ये हातीं
११६९३	।।ना.गा.१८३३.००३।।	मशकाचे ओढी मेरू हाले बुडी । जीवाचें तें जोडी ब्रह्म मिळे
११६९४	।।ना.गा.१८३३.००४।।	उदकींची मासोळी सूर्यासी ते भेटे । तरी वारियाचें कोडें दृष्टी पडे
११६९५	।।ना.गा.१८३३.००५।।	चंद्राचें चांदणें घेती जैं पालवीं । मिथ्या माया दावी नामा म्हणे
११६९६	।।ना.गा.१८३४.००१।।	नामाची लेखनी श्वानाचिये कानीं । धांवतसे घाणी चर्माचिये
११६९७	।।ना.गा.१८३४.००२।।	विंचू म्हणतसे उदार मी दाता । उचित हें देतां नलगे वेळ
११६९८	।।ना.गा.१८३४.००३।।	सूकर म्हणे गृहस्थ मी भला । शेखीं तयाचा डोळा विष्टेवरी
११६९९	।।ना.गा.१८३४.००४।।	नापिक म्हणे माझी नांदणूक मोठी । धोकटी माझारीं जन्म गेला
११७००	।।ना.गा.१८३४.००५।।	नामा म्हणे माझी वासना हे खोटी । विठ्ठलचरणीं मिठी पडलिसे
११७०१	।।ना.गा.१८३५.००१।।	ओढाळ ते सुणें बैसे विरहणी । तेथें काय गुणीं प्रगटेल
११७०२	।।ना.गा.१८३५.००२।।	देव खादलें ते काय करी जाणा । सर्व अवगुण तयापासीं
११७०३	।।ना.गा.१८३५.००३।।	अवघी संतति काउळें पोशिले । जावोनि बैसले विष्टेवरी
११७०४	।।ना.गा.१८३५.००४।।	भुजंगाचे मुखीं अमृत घातलें । फिरोनि पाहिलें विषमय
११७०५	।।ना.गा.१८३५.००५।।	नामा म्हणे ऐसे अभक्त निर्लज्ज । त्यासि केशिराज उपेक्षिना
११७०६	।।ना.गा.१८३६.००१।।	कांडितांचि कोंडा न निघे तांदूळ । शेरा कैसें फळ अमृताचें
११७०७	।।ना.गा.१८३६.००२।।	कण्हेरीच्या मुळा सुगंध तो नाहीं । कसाबाची गाई जिणें कैचें

११७०८	।।ना.गा.१८३६.००३।।	रुई दूध जरी येईल भोजना । लोभियाच्या धना वेंच नाहीं
११७०९	।।ना.गा.१८३६.००४।।	निर्फळ हें जिणें भक्तिविण मन । नामा म्हणे जाण नये कामा
११७१०	।।ना.गा.१८३७.००१।।	बुजगावणें शेती माणसें म्हणती । काय त्याचे हातीं शस्त्र शोभे
११७११	।।ना.गा.१८३७.००२।।	हंसासी विरोध करीत कावळा । नेणे त्याची कळा उंचपणें
११७१२	।।ना.गा.१८३७.००३।।	अनामिकासंगें पाठवितां पंडिता । तो तयातें तत्त्वतां काय जाणे
११७१३	।।ना.गा.१८३७.००४।।	नामा म्हणे बापा करूं नको तैसें । विचार कायसे पाहसील
११७१४	।।ना.गा.१८३८.००१।।	बेडुक म्हणिजे चिखलाचा भोक्ता । क्षीर सांडूनि रक्ता गोचीड झोंबे
११७१५	।।ना.गा.१८३८.००२।।	जयाची वासना तयासिच गोड । प्रेमसुख चाड नाहीं त्याला
११७१६	।।ना.गा.१८३८.००३।।	वांझ म्हणे मी वाढवितें जोंजार । उघडावया कवाड नाहीं कोणी
११७१७	।।ना.गा.१८३८.००४।।	अस्वलाशीं तेल माखियलें कानीं । तें म्हणे रानीं थोर सुख
११७१८	।।ना.गा.१८३८.००५।।	श्वानाचिया कानीं खोविली लेखणी । ते घेत असे घाणी घरोघरीं
११७१९	।।ना.गा.१८३८.००६।।	गाढवासी लाविली तूप पोळी डाळ । भुंके आळोआळ लाज नाहीं
११७२०	।।ना.गा.१८३८.००७।।	सूकरा कस्तुरी चंदन लाविला । तो तेथोनि पळाला विष्टा खाया
११७२१	।।ना.गा.१८३८.००८।।	नामा म्हणे माझी वासना हे खोटी । दृढ धरिली मिठी विठ्ठल पायीं
११७२२	।।ना.गा.१८३९.००१।।	भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव । तैसें आचार गौरव । सुकुलीनाचे
११७२३	।।ना.गा.१८३९.००२।।	झाड जाणावें फुलें । मानस जाणावें बोलें । भोगें जाणावें केलें । जन्मांतरींचें
११७२४	।।ना.गा.१८३९.००३।।	लोभ जाणावा उभय दृष्टी । क्रोध जाणावा भोंवया गांठी । लटिका जाणावा बहु गोष्टी । नष्ट प्रकृति ओळखावा
११७२५	।।ना.गा.१८३९.००४।।	ग्वाही घातलिया जाणावा खरा । ढोकळ जाणावा कलिअवसरा । परद्वारिणी जाणावी उण्या उत्तरा । कुश्चळी घरोघरीं हिंडतसे
११७२६	।।ना.गा.१८३९.००५।।	मृदंग जाणावा गंभीर नादें । गाणें जाणावें सुस्वर शब्दें । ओंकार जाणावा अक्षरभेदें । शहाणा शब्दें ओळखावा
११७२७	।।ना.गा.१८३९.००६।।	विष्णुदास नामा करी विनंती । या उत्तराची न मानावी खंता। केशवाचा प्रसाद आहे माझे चित्तीं । देवा काय करिसी तें न कळे
११७२८	।।ना.गा.१८४०.००१।।	अंतरीं आवेश धरुनी कामाचा । लटकी जल्पे वाचा शब्दज्ञानें
११७२९	।।ना.गा.१८४०.००२।।	बोलाचे पैं मांडें क्षीर घारी अन्न । तेणें समाधान केंवि होय
११७३०	।।ना.गा.१८४०.००३।।	बोलिल्यासारिखें न करी पामर । वृथाचि कुरकुर वाढविली
११७३१	।।ना.गा.१८४०.००४।।	नाहीं जीव तया प्रेता आलिंगन । तैसें तें श्रवण केल्या होय

११७३२	।।ना.गा.१८४०.००५।।	नामा म्हणे त्याच्या संगें स्थिति दोषे । जाला लाभ नासे तेथें जातां
११७३३	।।ना.गा.१८४१.००१।।	सावली पिळुनी कां घालिशी । मुद्रेनें आंग कां जाळिसी
११७३४	।।ना.गा.१८४१.००२।।	कासया केली खोडी । काया विटंबिली बापुडी
११७३५	।।ना.गा.१८४१.००३।।	कावळा प्रात:स्नान करी । जितें मेलें तें न विचारी
११७३६	।।ना.गा.१८४१.००४।।	मैंदे लावूनि द्वादश टिळे । फासा घालूनि निवटी गळे
११७३७	।।ना.गा.१८४१.००५।।	सुसरी गंगे रहिवासु । बहुतां जीवातें करी ग्रासु
११७३८	।।ना.गा.१८४१.००६।।	गंगे केल्या ज्ञान सांगे । मांजर मारिलें तें न सांगे
११७३९	।।ना.गा.१८४१.००७।।	बक ध्यान लावुनि टाळी । मौन धरुनि मासा गिळी
११७४०	।।ना.गा.१८४१.००८।।	नामा म्हणे केशिराजा। ऐशिया जीवा लावी वोजा
११७४१	।।ना.गा.१८४२.००१।।	आपुलें तें हित आपण नेणती । पुढिलांतें सांगती ब्रह्मज्ञान
११७४२	।।ना.गा.१८४२.००२।।	नेणोनि परब्रह्म जाणते पैं जाले। अभावें गुंतले मायाजाळीं
११७४३	।।ना.गा.१८४२.००३।।	जीव आणि शिव एकरूप म्हणती । सेवेसीं अंतरती केशवाचे
११७४४	।।ना.गा.१८४२.००४।।	नामा म्हणे तोचि केशवातें जाणतां । केशव म्हणतां मुक्त होय
११७४५	।।ना.गा.१८४३.००१।।	उपाय असतां अपाय मानिती । तयां अधोगति न चुकती
११७४६	।।ना.गा.१८४३.००२।।	मनुष्यामाझारीं तो एक गाढव । तया अनुभव काय करी
११७४७	।।ना.गा.१८४३.००३।।	नामा म्हणे देव ऐसियासी कैंचा । काया मनें वाचा भेदवादी
११७४८	।।ना.गा.१८४४.००१।।	जो कां करी संतनिंदा । त्यासि दंडावें गोविंदा
११७४९	।।ना.गा.१८४४.००२।।	निंदक दंडावे दंडावे । नेऊनि अघोरीं कोंडावे
११७५०	।।ना.गा.१८४४.००३।।	करी संतासि पाखंड । त्याचें करावें त्रिखंड
११७५१	।।ना.गा.१८४४.००४।।	नामा म्हणे सांगेन ऐक । निंदक श्वानाचें तें लेक
११७५२	।।ना.गा.१८४५.००१।।	हरिदासपणें उभविला ध्वज । परि तो वर्म बीज न कळेची
११७५३	।।ना.गा.१८४५.००२।।	काय करूं देवा जळो याची बुद्धि । जोंवरी नाहीं शुद्धि परलोकाची
११७५४	।।ना.गा.१८४५.००३।।	मुद्रा धारण अंगीं गळा तुळसिमाळा । परी नाहीं जिव्हाळा स्वहिताचा
११७५५	।।ना.गा.१८४५.००४।।	धरी बहु वेष वृथा करी दोष । नाम ब्रह्मरस अंगीं नाहीं
११७५६	।।ना.गा.१८४५.००५।।	दुसरा हरिदास देखोनियां रंगीं । धांवोनियां वेगीं ग्रासों पाहे
११७५७	।।ना.गा.१८४५.००६।।	दुसरियाचें पद ऐकोनियां कानीं । क्रोधें पेटे वन्हि पर्वतींचा

११७५८	।।ना.गा.१८४५.००७।।	दुर्जनाचे भयें पळती साधुवृंदें । जैसीं तीं श्वापदें व्याघ्रा भेणें
११७५९	।।ना.गा.१८४५.००८।।	बोले नानायुक्ति वश करी सभा । दुसरा रंगीं उभा राहो नेदी
११७६०	।।ना.गा.१८४५.००९।।	राजमाने श्रेष्ठ मोठे अधिकारी । त्यापुढें कुसरी करिताती
११७६१	।।ना.गा.१८४५.०१०।।	धातमात करी नटे नानापरी । चंचळ परनारी भुलवितो
११७६२	।।ना.गा.१८४५.०११।।	ऐसें नाम विटंबूनि करील जो हरिकथा । तेणें परमार्थ विघ्न केलें
११७६३	।।ना.गा.१८४५.०१२।।	जाई जुई उत्तम सुगंध कस्तुरी । विष्ठेच्या दाथरीं आंथुरिला
११७६४	।।ना.गा.१८४५.०१३।।	साडे पंधरा सोनें होतें पालवण्या । परि झालें हीण डाक लागे
११७६५	।।ना.गा.१८४५.०१४।।	द्यावें दिव्यौषध रोगियाचे हिता । केलिया कुपथ्या वायां जाय
११७६६	।।ना.गा.१८४५.०१५।।	चतुर्विध अन्न षड्रस पक्वान्न । विटाळलें जाण श्वानमुखें
११७६७	।।ना.गा.१८४५.०१६।।	ऐसें म्हणतां माझी मळेल पैं वाचा । परि हा वैष्णवांचा धर्म नव्हे
११७६८	।।ना.गा.१८४५.०१७।।	संसार-सागरू हरिकथा तारू । तरिजे हा विचारू दुरी ठेला
११७६९	।।ना.गा.१८४५.०१८।।	जे कथा ऐकती पसरोनि बाह्या । शांति क्षमा दया येती तेथें
११७७०	।।ना.गा.१८४५.०१९।।	शांति क्षमा दया येती भेटावया । तेथें मोक्ष व्हावया विलंब काय
११७७१	।।ना.गा.१८४५.०२०।।	आनंद नामाचा ऐकूनि गजर । ब्रह्मादिक हरिहर येती तेथें
११७७२	।।ना.गा.१८४५.०२१।।	खुंटला अनुवाद मावळला शब्द । अनिर्वाच्य बोध प्रगटला
११७७३	।।ना.गा.१८४५.०२२।।	वैकुंठ सांडून धांवे चक्रपाणि । कीर्तनाचा ध्वनि ऐकुनियां
११७७४	।।ना.गा.१८४५.०२३।।	तेथें श्रोते वक्ते होतील निष्पाप । ऐशी पुण्यरूप हरिकथा
११७७५	।।ना.गा.१८४५.०२४।।	शून्यांचें निजशून्य जेथें हरपलें । एकाग्र मन जालें ध्यान तेथें
११७७६	।।ना.गा.१८४५.०२५।।	नामा म्हणे माझी हरिकथा माऊली । मोक्ष पान्हा घाली भक्तालागीं
११७७७	।।ना.गा.१८४६.००१।।	देवीचिये चाडे भोप्याचें आर्जव । येऱ्हवीं त्याचें नांव कोण घेतें
११७७८	।।ना.गा.१८४६.००२।।	सीतज्वरामुळें खावी नंदपुडी । येर कडु काडी कोण सेवी
११७७९	।।ना.गा.१८४६.००३।।	सद्बुद्धिकारणें संतांचे गौरव । येऱ्हवीं त्यांचें नांव कोण पुसे
११७८०	।।ना.गा.१८४६.००४।।	रोगामुळें पाहे वैद्याचें कारण । येऱ्हवीं कधीं कोण पुसे तया
११७८१	।।ना.गा.१८४६.००५।।	तैसा नामा जगीं अगत्या अगत्य । असत्यासी सत्य न म्हणे कधीं
११७८२	।।ना.गा.१८४७.००१।।	काय चाड आम्हां बाहेरल्या वेषें । सुखाचें कारण असे अंतरीं तें
११७८३	।।ना.गा.१८४७.००२।।	भीतरीं पालट जंव नाहीं जाला । तोंवरी न बोला जाणपणें

११७८४	।।ना.गा.१८४७.००३।।	चंदनाचे संगें हें कळी टाकळी । नांवें परि उरलीं पालट देहीं
११७८५	।।ना.गा.१८४७.००४।।	नामा म्हणे ऐसें सांगा मज कोणी । जेणें केशव येऊनि हृदयीं राहे
११७८६	।।ना.गा.१८४८.००१।।	मांजरें केली एकादशी । इळवरी होतें उपवासी । यत्न करितां पारण्यासी । धांऊनि गिवसीं उंदिर
११७८७	।।ना.गा.१८४८.००२।।	लांडगा बैसला ध्यानस्थ । तोंवरी असे निवांत । जंव पेट सुटे जीवांत । मग घात करी वत्साचा
११७८८	।।ना.गा.१८४८.००३।।	श्वान गेलें मल्लिकार्जुना । देह कर्वतीं घातलें जाणा । आलें मनुष्यदेहपणा । परि खोडी न संडी आपुली
११७८९	।।ना.गा.१८४८.००४।।	श्वानें देखिला स्वयंपाक । जोंवरी जागे होते लोक । मग निजलिया नि:शंक । चारी मडकीं फोडिलीं
११७९०	।।ना.गा.१८४८.००५।।	वेश्या जाली पतिव्रता । तिचा भाव असे दुश्चिता । तिसी नाहीं आणिक चिंता । परद्वारावांचुनि
११७९१	।।ना.गा.१८४८.००६।।	दात्यानें केली समाराधना । बहुत लोक जेविले जाणा । परि न संडी वोखटी वासना । खटनट चाळितसे
११७९२	।।ना.गा.१८४८.००७।।	ऐशा प्रकारच्या भक्ति । असती त्या नेणों किती । एक ओळगा लक्ष्मीपति । म्हणे विष्णुदास नामा
११७९३	।।ना.गा.१८४९.००१।।	एकचि हें तत्त्व एकाकार देशीं । एक तो नेमेसी सर्व जनीं
११७९४	।।ना.गा.१८४९.००२।।	ऐसे ब्रह्म पाहा आहे सर्व एक । नलगे तो विवेक करणें कांही
११७९५	।।ना.गा.१८४९.००३।।	मिथ्या हें डंबर माया मथितार्थ । हरि हाचि स्वार्थ वेगीं करी
११७९६	।।ना.गा.१८४९.००४।।	नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद । नाहीं भेदाभेद ब्रह्मपणीं
११७९७	।।ना.गा.१८५०.००१।।	जाखाई जोखाई उदंड दैवतें । वाउगेंचि व्यर्थ श्रमतोसी
११७९८	।।ना.गा.१८५०.००२।।	अंतकाळीं तुज सोडविना कोणी। एक्या चक्रपाणिवांचोनियां
११७९९	।।ना.गा.१८५०.००३।।	मागें थोर थोर कोणें केलें तप । उद्धरिलें अमाप नारायणें
११८००	।।ना.गा.१८५०.००४।।	नामा म्हणे कैसे बहु जाले भांड । न उच्चारी लंड नाम वाचे
११८०१	।।ना.गा.१८५१.००१।।	नानापरीचीं दैवतें । बहुती असती असंख्यातें । सेंदुर शेरणी जें इच्छितें । तें काये आर्त पुरवितें
११८०२	।।ना.गा.१८५१.००२।।	अंध नको होऊं आलीया । भजे भजे पंढरिराया । सोडूं नको विष्णु त्रिरात्र पारणिया । तोंडी कुलुप पाठीं गळ टोचोंनिया
११८०३	।।ना.गा.१८५१.००३।।	नाना धातूंची प्रतिमा केली । षोडशोपचारें पूजिली । दुकळीं विकुनि खादली । ते काय आर्त पुरविती
११८०४	।।ना.गा.१८५१.००४।।	आतां दृढ धरोनियां भाव । वोळगा वोळगा पंढरिराव । आपुले चरणीं देईन ठाव । विष्णुदास नामा म्हणे
११८०५	।।ना.गा.१८५२.००१।।	खाटिकाप्रमाणें करिसी व्यापार । मनीं निरंतर धरोनियां
११८०६	।।ना.गा.१८५२.००२।।	दुष्ट दुराचारी दुर्बल घातकी । परम पातकी दुष्ट बुद्धी
११८०७	।।ना.गा.१८५२.००३।।	अपमानीं आशा धन मेळविसी । नरकासी जासी जाण सत्य
११८०८	।।ना.गा.१८५२.००४।।	नामा म्हणे जाण करूं मोटाळे । जाऊनियां लोळे विष्ठेमाजीं
११८०९	।।ना.गा.१८५३.००१।।	आपुली करणी न विचारी मनीं । वायां काय ठेवुनि बोल देवा

११८१०	।।ना.गा.१८५३.००२।।	खाटकी जो चेपी पशुची नरडी । अवचिता करंगळी सांपडली
११८११	।।ना.गा.१८५३.००३।।	मेलों मेलों म्हणूनि गडबडां लोळे । परि कापी गळे आठवीना
११८१२	।।ना.गा.१८५३.००४।।	आपुलें म्हणवुनि विव्हळतसे । खदखदां हांसे दुसऱ्यासी
११८१३	।।ना.गा.१८५३.००५।।	वाटपाड्यानें घर खाणोनि घेतलें । जितुकें मेळविलें तितुकें नेलें
११८१४	।।ना.गा.१८५३.००६।।	आपुलें नेलें म्हणऊनि खळखळां रडे । परि घेतां दरवडे आठवीना
११८१५	।।ना.गा.१८५३.००७।।	सोनाराचे घरीं पडिलेंसे खाण । चोरिलें सुवर्ण तेंहि नेलें
११८१६	।।ना.गा.१८५३.००८।।	आपुलें नेलें म्हणवुनि मोकलितो धाया । ठकविल्या आयाबाया ते आठवीना
११८१७	।।ना.गा.१८५३.००९।।	तराळाचे घरीं असे आला जेवा । म्हणतसे देवा काय करूं
११८१८	।।ना.गा.१८५३.०१०।।	दुसऱ्यासी मागतां परम सुख वाटे । आपण देतां फुटे काळीज तें
११८१९	।।ना.गा.१८५३.०११।।	जन्मवरीं पोशिलें लेंकुराचे परि । हातीं घेऊनि सुरी उभा राहे
११८२०	।।ना.गा.१८५३.०१२।।	गर्दन सुळीं देतां म्हणे काय केलें । पुढिल्यासि मारिलें आठवीना
११८२१	।।ना.गा.१८५३.०१३।।	नामा म्हणे विष्णुदास ऐसे जे निर्लज्ज । त्यासी पंढरिराज केंवि भेटे
११८२२	।।ना.गा.१८५४.००१।।	अर्चन विष्णूचें नाहीं पूजन । तये गांवींचे अनामिक जन । भूतप्रेताचें करिती भजन । तयासि दंडन यम करी
११८२३	।।ना.गा.१८५४.००२।।	हरीचें वंचुनी सुकृत करी । तया नाम पुण्य ठेवि जरी । तुटोनि पडो त्यांची वैखरी । अंतीं नाम महा–घोरीं वास तया
११८२४	।।ना.गा.१८५४.००३।।	समारंभ करिती आणिका देवांचा । म्हणती येणें विष्णु तृप्त होय साचा । धिग् धिग् आचार जळो त्याचा । वायांविण वाचा विटाळली
११८२५	।।ना.गा.१८५४.००४।।	पहा हो नवही द्वारें एकचि देहीं । रसस्वाद कान देतील काई । जयाचा मान तयाच्या ठायीं । येतसे पाहीं सेवितां
११८२६	।।ना.गा.१८५४.००५।।	तो देवदेवां शिरोमणी । असुर रुळती जयाच्या चरणीं । तो सांडितां चक्रपाणि । भजना हानी होईल तुझिया
११८२७	।।ना.गा.१८५४.००६।।	विष्णुदास नामा विनवी जगा । अझुनि तरी हरिसि शरण रिघा । जे जे अपराध केले असतिल मागा । ते ते नेईल भंगा स्वामी माझा
११८२८	।।ना.गा.१८५५.००१।।	व्यर्थ या व्युत्पत्ति लावितोसी श्रुति । विषयाची तृप्ति काय चाड
११८२९	।।ना.गा.१८५५.००२।।	मायेचा हा फांसा मोहजाळ सोसा । वायां कासाविसा होसी झणीं
११८३०	।।ना.गा.१८५५.००३।।	टाकी टाकी असत्य होईल सर्व कृत्य । भज का रे नित्य एक्या नामें
११८३१	।।ना.गा.१८५५.००४।।	नामा म्हणे दैवत तो एक अच्युत । सांगितला हेत खेचर विसा
११८३२	।।ना.गा.१८५६.००१।।	केशवापरते देव आणिक आहेती । ऐसें श्रुति स्मृति बोलतील
११८३३	।।ना.गा.१८५६.००२।।	तरी ते शब्द झणीं कानीं हो पडती । पाखांडी म्हणती सहावें ते

११८३४	।।ना.गा.१८५६.००३।।	इंद्रियांसी तुम्ही करा रे जतन । भजावा निधान श्रीविठ्ठल
११८३५	।।ना.गा.१८५६.००४।।	छेदावया शिर हस्त सहस्रांचे । जरि बहुतांचे उगारले
११८३६	।।ना.गा.१८५६.००५।।	परि तूतें नाम आन न देवाचें । केशव परतें कैसें असे ब्रह्म
११८३७	।।ना.गा.१८५६.००६।।	अंगें चतुराननां जालिया हो भेटी । तोहि जरी गोष्टी ऐसी करी
११८३८	।।ना.गा.१८५६.००७।।	परि तो चळला पोटीं असे जाण। एकीं दुजेपण दावी तरी
११८३९	।।ना.गा.१८५६.००८।।	ब्रह्मकटाह एक उल्लंघो शके ऐसा । वर्तोनि दाही दिशा वर्ते जरी
११८४०	।।ना.गा.१८५६.००९।।	केशव नव्हे तो होका अनारिसा । म्हणोनियां वासां पाहों नका
११८४१	।।ना.गा.१८५६.०१०।।	व्यसन भक्ति प्रौढी पुरुषार्थ पांचवा । जिवाचिया जिवा सेवा ना कां
११८४२	।।ना.गा.१८५६.०११।।	सर्वांभूतीं आहे केशव परमात्मा । न विसंबावें वर्मा नामा म्हणे
११८४३	।।ना.गा.१८५७.००१।।	दुर्जनाची बुद्धि वोखटी दारुण । आपण मरोनि दुजिया मारी
११८४४	।।ना.गा.१८५७.००२।।	माशी जातां पोटीं मेली तेचि क्षणीं । प्राण्या वोकवूनि कष्टी करी
११८४५	।।ना.गा.१८५७.००३।।	दीपकाची ज्योती पतंग नासला । अंधार पडिला जनांमध्यें
११८४६	।।ना.गा.१८५७.००४।।	तैसा नैसर्गिक स्वभाव दुष्टांचा। शेखीं ज्याचा त्यासी फळां येतो
११८४७	।।ना.गा.१८५७.००५।।	जाली सज्जनाची संगति कदापि । जाईना तथापि त्याची क्रिया
११८४८	।।ना.गा.१८५७.००६।।	सहज मळलें धुतां शुद्ध होय । बिबब्याचा काय डाग जातो
११८४९	।।ना.गा.१८५७.००७।।	वज्रहि फुटेल नभहि तुटेल । भला तो होईल ऐसा नव्हे
११८५०	।।ना.गा.१८५७.००८।।	नामा म्हणे कुंभपाकाचा तो धनी । तयासी भल्यांनी बोलूं नये
११८५१	।।ना.गा.१८५८.००१।।	दुष्ट तो दुर्जन दुरीच धरावा । संग न करावा पापियाचा
११८५२	।।ना.गा.१८५८.००२।।	सर्पाचें पिलें सानें म्हणऊनि पोशिलें । त्यासी पान दिधलें अमृताचें
११८५३	।।ना.गा.१८५८.००३।।	नव्हे तें निर्विष न संडी स्वभावगुण । घेऊं पाहे प्राण पोसिल्याचे
११८५४	।।ना.गा.१८५८.००४।।	विष्णुदास नामा सांगतसे युक्ति। विवेक हा चित्तीं दृढ धरा
११८५५	।।ना.गा.१८५९.००१।।	समर्थांसी करी क्रोध हे अहंता । अखंड ममता मानी सदा
११८५६	।।ना.गा.१८५९.००२।।	आपुल्या आपण व्यर्थ सांगे स्तुति । वडिलांची कीर्ति भोग सांगे
११८५७	।।ना.गा.१८५९.००३।।	वमन जालिया संचितसे अन्न । काय भाग्यहीन दुर्जन तो
११८५८	।।ना.गा.१८५९.००४।।	नामा म्हणे जाणे असतां शरीरीं । जातो यमपुरीं भोगावया
११८५९	।।ना.गा.१८६०.००१।।	कोळशासी दूध मज्जोनियां धूतां । न पावे शुद्धता कोणे काळीं

११८६०	।।ना.गा.१८६०.००२।।	दुर्जनासी तैसा बोधितां परमार्थ । नवजायचि स्वार्थ जाण त्याचा
११८६१	।।ना.गा.१८६०.००३।।	सूकराच्या परी नेणती मिष्टान्न । विष्टा ते भक्षण करिताती
११८६२	।।ना.गा.१८६०.००४।।	मोहिन्नले प्राणी सर्वत्र असतां । काय सांगूं आतां नवला हो
११८६३	।।ना.गा.१८६०.००५।।	नामा म्हणे तया न होयचि मोक्ष । येवोनि पद्माक्ष केंवि भेटे
११८६४	।।ना.गा.१८६१.००१।।	वेडिया उपचार गाढवा गुढार । म्हैसिया बिढार पुष्पवनीं
११८६५	।।ना.गा.१८६१.००२।।	पद्मासनीं केंवि कुंजर हा बैसे । कोडिया न दिसे चंदन बरवा
११८६६	।।ना.गा.१८६१.००३।।	तैसा नव्हे देव मूर्ख जनांच्या भक्ति । भल्याचा विरक्ति ज्ञानवारा
११८६७	।।ना.गा.१८६१.००४।।	शेळीस ऊंस कळकटिया सुदिवस । सूकराप्रति रस आंबियाचा
११८६८	।।ना.गा.१८६१.००५।।	दर्दुरा क्षीरपान त्रिदोषिया मौन । मद्यपिया मन स्थिर नव्हे
११८६९	।।ना.गा.१८६१.००६।।	नामा म्हणे हरि सबाह्य भरला । भरोनि उरला दाही दिशा
११८७०	।।ना.गा.१८६२.००१।।	थिल्लर ते नेणें सागराचा अंत । मुंगीस अग्नींत रिघ नाहीं
११८७१	।।ना.गा.१८६२.००२।।	श्वास काय जाणें मेरूचें प्रमाण। कोसळल्या गगन न कळे त्यास
११८७२	।।ना.गा.१८६२.००३।।	अंध काय जाणे कैसा उगवे दिन । पाषाणा पर्जन्य न कळे जेवीं
११८७३	।।ना.गा.१८६२.००४।।	देहवंत जीव काय जाणे देव । नामा म्हणे भाव काय तेथें
११८७४	।।ना.गा.१८६३.००१।।	जयाचे उदरीं जन्मला जो नर । पिंडी तया थोर सर्वकाळ
११८७५	।।ना.गा.१८६३.००२।।	मानिली अंतरीं सखि जिवलग । आत्महत्या मग घात करी
११८७६	।।ना.गा.१८६३.००३।।	मानीना तो भक्ति भ्रष्ट आचरण । दोषी नारायण सदोदित
११८७७	।।ना.गा.१८६३.००४।।	नामा म्हणे ऐसे पातकी चांडाळ । बुडविलें कुळ बेचाळिस
११८७८	।।ना.गा.१८६४.००१।।	अभक्ताचे स्थळीं भ्रांताची संगती । परदारा चित्तीं परनिंदा
११८७९	।।ना.गा.१८६४.००२।।	नेणें भूतदया शांतीचें लक्षण। कार्याकारण बोलतसे
११८८०	।।ना.गा.१८६४.००३।।	हरिचिया दासा करिती मत्सर । करी निरंतर द्वेषबुद्धि
११८८१	।।ना.गा.१८६४.००४।।	नामा म्हणे व्यर्थ पेटला पर्वत । नेणें अपघात स्वयें पावे
११८८२	।।ना.गा.१८६५.००१।।	मूर्ख बैसले कीर्तनीं । न कळे अर्थाची करणी
११८८३	।।ना.गा.१८६५.००२।।	घुबड पाहे भलतीकडे । नाईके नामाचे पवाडे
११८८४	।।ना.गा.१८६५.००३।।	पाहूं इच्छी परनारी । चित्त पादरक्षावरी
११८८५	।।ना.गा.१८६५.००४।।	नामा म्हणे सांगूं किती । मूढ सांगितलें नायकती

११८८६	।।ना.गा.१८६६.००१।।	कथे बैसोनि उठोनि जाती । खर होऊनि फिरती
११८८७	।।ना.गा.१८६६.००२।।	नाम नावडे नावडे । संग वैष्णवांचा न घडे
११८८८	।।ना.गा.१८६६.००३।।	नामा म्हणे सांगों किती । पूर्वजांसहित नरका जाती
११८८९	।।ना.गा.१८६७.००१।।	देव धर्मीं नाहीं चाड । त्यासी पुढें आला नाड
११८९०	।।ना.गा.१८६७.००२।।	जैसे डोंगरीचें झाड । त्याचें जन्म जाले वाड
११८९१	।।ना.गा.१८६७.००३।।	नामा म्हणे भक्ति गोड । स्वानंद नेणती ते मूढ
११८९२	।।ना.गा.१८६८.००१।।	ज्यालागीं जोडिसी ते न येती तुजसरसीं । यम कासाविसि करी तये वेळां
११८९३	।।ना.गा.१८६८.००२।।	तूं तरी अज्ञान न देखसी डोळा । जालासी गोठोळा धनगरांसी
११८९४	।।ना.गा.१८६८.००३।।	चिरीरी घेतो सांपडलिया हातीं । अवघी त्याची पाळती टाकोनियां
११८९५	।।ना.गा.१८६८.००४।।	अंतीं न म्हणावें वचन निष्ठुर । वेगीं ठाका द्वार केशवाचें
११८९६	।।ना.गा.१८६८.००५।।	नामा म्हणे शरण रिघा हरिपायीं । तया शेषशायी न विसंबे
११८९७	।।ना.गा.१८६९.००१।।	विषयांचें गोड कां करिसी कोड । होईल तुज जाड इंद्रियबाधा
११८९८	।।ना.गा.१८६९.००२।।	सर्व हें लटिकें जाण तूं बा निकें । रामेंविण एकें न सुटिजे
११८९९	।।ना.गा.१८६९.००३।।	मायाजाळमोहो इंद्रियांचा राहो । परि न धरिसी भावो भजनपंथें
११९००	।।ना.गा.१८६९.००४।।	नामा म्हणे देवा करी तूं लवलाहो । मयुराचा टाहो घन गर्जे
११९०१	।।ना.गा.१८७०.००१।।	लव निमिष म्हणतां आहे नाहीं पाहतां । क्षण एक संपादिता विषयो हा
११९०२	।।ना.गा.१८७०.००२।।	स्वहित तें आचरा हित तें विचारा । नामीं भाव धरा जाणतेना
११९०३	।।ना.गा.१८७०.००३।।	संपत्तीचे बळें एक जाले आंधळें । वेढिलें कळिकाळें स्मरण नाहीं
११९०४	।।ना.गा.१८७०.००४।।	एक विद्यावंत जातीचा अभिमान । ते नेले तमोगुणें रसातळां
११९०५	।।ना.गा.१८७०.००५।।	मिथ्या मायामोह करूनि हव्यास । वेंचिलें आयुष्य वायांविण
११९०६	।।ना.गा.१८७०.००६।।	नामा म्हणे कृपा करूनि ऐशा जीवा । सोडवी केशवा मायबापा
११९०७	।।ना.गा.१८७१.००१।।	देह पडे तोंवरी देहाचा अभिमान । न करीं मी अज्ञान आत्महित
११९०८	।।ना.गा.१८७१.००२।।	मी माझें म्हणतां गेले नेणों किती । रंक चक्रवर्ती असंख्यात
११९०९	।।ना.गा.१८७१.००३।।	क्षणाक्षणा देहींचें आयुष्य पैं झडे । वासना ते वाढे नित्य नवी
११९१०	।।ना.गा.१८७१.००४।।	मोहाची खाणोरी मिळाली चोरटी । खाऊनि शेवटीं घर घेती
११९११	।।ना.गा.१८७१.००५।।	जंववरी संपत्ति तंववरी हे सखे । गेलिया ते भुंके सुणें जैसें

११९१२	।।ना.गा.१८७१.००६।।	नामा म्हणे केशवा मी वो तुझा दास । मज आहे विश्वास तुझे नामीं
११९१३	।।ना.गा.१८७२.००१।।	भुलले हे लोक काळाचें भातुकें । सुरशक्रादिकें पाहतासी
११९१४	।।ना.गा.१८७२.००२।।	देवा तुझी माया अगम्य अगाध । प्रपंचाचा वेध सुटों नेदी
११९१५	।।ना.गा.१८७२.००३।।	माझें घरदार माझा हा संसार । मी मोठा चतुर म्हणतसे
११९१६	।।ना.गा.१८७२.००४।।	आपण देखतां जाती ते पाहती । मीपणाची भ्रांति सुटो नेणें
११९१७	।।ना.गा.१८७२.००५।।	नामा म्हणे आतां काय म्यां बोलावें । भोंवत असावें चौऱ्यांशीला
११९१८	।।ना.गा.१८७३.००१।।	विषय सेवितां तुज । नव्हे पुढील काज । न भेटे तुज । गरुडध्वज निश्चयेंसी
११९१९	।।ना.गा.१८७३.००२।।	काय करिसी खटपट । वायां मार्ग दुर्घट । वरपडा होसी कष्ट । परि तरो नेदिती
११९२०	।।ना.गा.१८७३.००३।।	सुटकेचें मूळ जाण। रामकृष्ण नारायण । येणें तुटेल भवबंधन । जन्मा न येसी सर्वथा
११९२१	।।ना.गा.१८७३.००४।।	साधन इतुकेंचि पुरे । न लागती मंत्रांचे भारे । ते बुडविती साचारे । परि तरो नेदिती
११९२२	।।ना.गा.१८७३.००५।।	नामा म्हणे ते पामर । नेणतीच हा मार्ग सार । हरि वाचे नाहीं उच्चार । तो जाणावा महादोषी
११९२३	।।ना.गा.१८७४.००१।।	मायेचा तो फांसा अहंकार वळसा । परी हृषिकेशा भजतीना
११९२४	।।ना.गा.१८७४.००२।।	नव्हे हे सुटका हा बोल लटिका । केशवासी एका न भज कां रे
११९२५	।।ना.गा.१८७४.००३।।	होतील त्यासि मुक्ति पुरतील आर्तीं। चरण चिंतिती विठ्ठलाचे
११९२६	।।ना.गा.१८७४.००४।।	नामा म्हणे केशव सर्वांभूतीं देव । ऐसा धरी भाव भजनशीळ
११९२७	।।ना.गा.१८७५.००१।।	कां शिणसि घरदार मायेच्या बंधनें । वायांचि वेसण अनहितासी
११९२८	।।ना.गा.१८७५.००२।।	भजे यादवराया लागे त्याचा पायां । आणिक उपाया करूं नको
११९२९	।।ना.गा.१८७५.००३।।	सर्वभावें हरिभजन तूं करी । भक्ति हे पुढारी तारील सत्य
११९३०	।।ना.गा.१८७५.००४।।	नामा म्हणे दया मांडी सांडी माया । भजन लवलाह्या हरिचें करी
११९३१	।।ना.गा.१८७६.००१।।	संग खोटा परनारीचा । नाश होईल या देहाचा
११९३२	।।ना.गा.१८७६.००२।।	रावण प्राणासी मुकला । भस्मासुर भस्म जाला
११९३३	।।ना.गा.१८७६.००३।।	गुरुपत्नीशीं रतला । क्षयरोग त्या चंद्राला
११९३४	।।ना.गा.१८७६.००४।।	इंद्रा अंगीं सहस्र भगें । नामा म्हणे विषयासंगें
११९३५	।।ना.गा.१८७७.००१।।	लावण्य सुंदर रूपानें बरवी । पापीण जाणावी ते कामिनी
११९३६	।।ना.गा.१८७७.००२।।	देखतां होतसे संगाची वासना। भक्ताच्या भजना नाश होय
११९३७	।।ना.गा.१८७७.००३।।	ऐसी जे घातकी जन्म कासयासी । चांडाळीण तिसी नरक प्राप्त

११९३८	।।ना.गा.१८७७.००४।।	नामा म्हणे तिचें पाहूं नये तोंड । पापीण ते रांड बुडवी नरा
११९३९	।।ना.गा.१८७८.००१।।	कायारूप जिचें हीनवट अती । माऊली धन्य ती आहे नारी
११९४०	।।ना.गा.१८७८.००२।।	तियेवरी मन कदापि नवजाये । भजना न होये कदा चळ
११९४१	।।ना.गा.१८७८.००३।।	ऐसिये माऊली परउपकारी । घात हा न करी भजनाचा
११९४२	।।ना.गा.१८७८.००४।।	नामा म्हणे तिचे चरण वंदावे । वदन पहावें माऊलीचें
११९४३	।।ना.गा.१८७९.००१।।	घरीं नांदतो बरवें परी । म्हणुनि केलिसे दुसरी अंतुरी । नित्य भांडण तया घरीं । आणिक कांहीं न देखों
११९४४	।।ना.गा.१८७९.००२।।	दुसरी न करावी बाईल । भंड फजिती होईल । बोभाट वेसदारा जाईल । बायकाच्या पाणवथ्या
११९४५	।।ना.गा.१८७९.००३।।	धाकटीकडे पाहतां कोडें । वडील धडधडा रडे । मेल्या तुझें गेलें मढें । तिकडे कां रे पाहतोसी
११९४६	।।ना.गा.१८७९.००४।।	वडील बाईल म्हणे उण्या । धाकटी बाईल केली सुण्या । लाज नाहीं तुझ्या जिण्या । काळतोंड्या बैसलासी
११९४७	।।ना.गा.१८७९.००५।।	वडील बाईल धरी दाढी । धाकटी ओढून धरी शेंडी । सांपडलासी यमझाडी । लाशी वरपडा जालासी
११९४८	।।ना.गा.१८७९.००६।।	सवती सवतीचा करकरा । उभा शिणलों दातारा । भेटी करी वनींच्या व्याघ्रा । परी संसारीं उबगलों
११९४९	।।ना.गा.१८७९.००७।।	सवतीसवतीची कैशी धरणी । कौतुक पाहती शेजारणी । तया पुरुषाची विटंबनीं । थोर जाचणी तयासी
११९५०	।।ना.गा.१८७९.००८।।	नामा म्हणे गा श्रीहरी । दोघी बायका ज्याचे घरीं । त्याचे नसावें शेजारीं । थोर दुःख तयाशीं
११९५१	।।ना.गा.१८८०.००१।।	सर्वकाळीं परमात्मा आहे सर्वदेशीं । हें भावना अहर्निश दृढ धरी
११९५२	।।ना.गा.१८८०.००२।।	संतसमुदाय मिळती जेथें जेथें । जावें तेथें लोटांगणीं
११९५३	।।ना.गा.१८८०.००३।।	चिंता न करी नाम्या येणें तरसी जाण । तुज सांगितली खूण निर्वाणींची
११९५४	।।ना.गा.१८८१.००१।।	पाहा परदारा जननिये समान । परद्रव्य पाषाण म्हणोनि मानी
११९५५	।।ना.गा.१८८१.००२।।	निंदेसी तूं मुका होऊनि तत्त्वता । परद्वेषीं तत्त्वता न घाली दृष्टी
११९५६	।।ना.गा.१८८१.००३।।	ऐसें दृढ मनीं धरूनि राहसी । तरी माझें पावसी निजपद
११९५७	।।ना.गा.१८८१.००४।।	पराकारणें प्राण वेंचि जो सर्वथा । जाणे परवेथा कळवळोनी
११९५८	।।ना.गा.१८८१.००५।।	परसुखें संतोष धरी जो मानसीं । जरी तुज परलोकासी जाणें आहे
११९५९	।।ना.गा.१८८१.००६।।	देहाचा अभिमान न धरावा चित्तीं । धरावी उपरति उपशमु
११९६०	।।ना.गा.१८८१.००७।।	सर्वकाळ प्रीति संतांचि संगति । गावें अनुरागें प्रीति नामें माझी
११९६१	।।ना.गा.१८८१.००८।।	सर्वांभूतीं सर्वदा ऐसी समबुद्धि । सांडावी उपाधि प्रपंचाची
११९६२	।।ना.गा.१८८२.००१।।	वासनेचा त्याग करा रे सर्वथा । भावें त्या अनंता शरण रिघा
११९६३	।।ना.गा.१८८२.००२।।	कृपेचा सागर नुपेक्षी निर्वाणीं। कळिकाळापासुनि सोडवील

११९६४	।।ना.गा.१८८२.००३।।	भक्तजनपाळक अनाथ कैवारी । ब्रीदें चराचरीं वर्णिताती
११९६५	।।ना.गा.१८८२.००४।।	शरीर संपत्तीचा टाका अभिमान । मन करा तल्लीन विठ्ठल पायीं
११९६६	।।ना.गा.१८८२.००५।।	आसनीं शयनीं मनीं चिंता रे गोविंदु । तेणें तुटे कंदु भवव्याधीचा
११९६७	।।ना.गा.१८८२.००६।।	परदारा परनिंदा परधन परपीडन । सांडूनि भजन हरिचें करा
११९६८	।।ना.गा.१८८२.००७।।	सर्वभूतीं कृपा संतांची संगती । मग नाहीं पुनरावृत्ति मरण जन्म
११९६९	।।ना.गा.१८८२.००८।।	शुकसनकादिक जनक चक्रवर्ती । परीक्षिती प्रल्हाद बिभीषण
११९७०	।।ना.गा.१८८२.००९।।	बळी भीष्म नारद उद्धव रुक्मांगद । शिबिये परमानंद पावविले
११९७१	।।ना.गा.१८८२.०१०।।	शास्त्रांचें हें सार वेदांचें गव्हार । नाम परिकर कलियुगीं
११९७२	।।ना.गा.१८८२.०११।।	नामा म्हणे नको साधन आणिक । दिधली मज भाक पुंडलिकें
११९७३	।।ना.गा.१८८३.००१।।	चांदणें नावडे चोरा । सद्‌बुद्धि नावडे रांडेच्या पोरा । वृक्ष नावडे कुंजरा । सत्य कुचरा नावडे
११९७४	।।ना.गा.१८८३.००२।।	चंदन जाणावा सुगंधाचि धृति । कर्पूर जाणावा उत्तम याति । हंस जाणावा चालतिये गति । कोकिळ श्रुति ओळखावी
११९७५	।।ना.गा.१८८३.००३।।	लांव जाणावी उफराटिये दृष्टीं । क्रोधी जाणावा भोंवयांसीं गांठीं । लटिक्या जाणा बहुत गोष्टी। नष्ट कुचेष्टीं ओळखावा
११९७६	।।ना.गा.१८८३.००४।।	नारी जाणावी भ्रतारभक्ति । आचारें जाणावी महासति । धनुर्धर जाणावा संधानयुक्ति । संत तापसी ओळखावा
११९७७	।।ना.गा.१८८३.००५।।	जयीं घातलिया निघे खरा । ज्ञान जाणे तोचि चतुरा । शिंदळी जाणावी नीच उत्तरा । कुसळी घरोघरां फिरतसे
११९७८	।।ना.गा.१८८३.००६।।	इतुकिया बोलाची न मानावी खंती । विठ्ठल चरणीं ठेवुनियां मति । प्रसन्न होईल लक्ष्मीपति । म्हणे विष्णुदास नामा
११९७९	।।ना.गा.१८८४.००१।।	धीर धरी सत्य हे तो नारायणा । शुद्ध आचरणा न सांडावें
११९८०	।।ना.गा.१८८४.००२।।	लौकिकाची कांहीं न धरावी लाज । हेंचि निज काज साधावें तें
११९८१	।।ना.गा.१८८४.००३।।	दंभ अभिमान सर्व त्यजोनियां । शरण त्या सखिया जावें आतां
११९८२	।।ना.गा.१८८४.००४।।	निंदा करिती तो मानावा आदर । स्तुति तें उत्तर नायकावें
११९८३	।।ना.गा.१८८४.००५।।	न धरावी चाड मानसन्मानाची । आवडी भक्तीची रूढवावी
११९८४	।।ना.गा.१८८४.००६।।	नामा म्हणे हेंचि रूढवावें मानसीं । क्षण एक नामासी विसंबू नये
११९८५	।।ना.गा.१८८५.००१।।	अंतींचा लाभु आधींच साधिजे । देह असतां कीजे हरिभक्ती
११९८६	।।ना.गा.१८८५.००२।।	आदिमध्यअंती तोचि हा व्यापकू । विश्वप्रतिपाळकु नारायण
११९८७	।।ना.गा.१८८५.००३।।	विषय महापुरीं जे पतित जीव भारी । तैसे परिचेहि हरिनाम घ्यावें
११९८८	।।ना.गा.१८८५.००४।।	नामा म्हणे हा रे दुर्लभ नरजन्म । केशव मेघ:श्याम अनुसरा वेगीं
११९८९	।।ना.गा.१८८६.००१।।	जंव हंस काया नवजाय सांडोनी । तव घेई ठाकोनि रामनाम

११९९०	।।ना.गा.१८८६.००२।।	अंतकाळ वेळीं तुझें नव्हे कोण्ही । मी माझें म्हणवूनि भुललासी
११९९१	।।ना.गा.१८८६.००३।।	राहे निरंतर राघवाचे द्वारीं । तेणें भवसागरीं तरसी बापा
११९९२	।।ना.गा.१८८६.००४।।	नवमास माये वाहिलासी उदरीं । आस केली थोरी होसिल म्हणोनी
११९९३	।।ना.गा.१८८६.००५।।	स्तनपान देऊनि मोहें प्रतिपाळी । तेहि अंतकाळीं दूर ठाकी
११९९४	।।ना.गा.१८८६.००६।।	सर्वस्व स्वामिणि म्हणवितसे कांता । तेहि केश देतां रडतसे
११९९५	।।ना.गा.१८८६.००७।।	म्हणे म्यां मेल्याचें सुख नाहीं देखिलें । तेणें तंव पाळिलें अर्धे प्राणें
११९९६	।।ना.गा.१८८६.००८।।	गाई घोडे म्हैसी आणिक त्या दासी । धन त्वां सायासीं मेळविलें
११९९७	।।ना.गा.१८८६.००९।।	तुझिया धनाला नाहीं पार लेखा । एकलाचि मूर्खा जासी अंतीं
११९९८	।।ना.गा.१८८६.०१०।।	हातींच्या मुद्रिका कानींचे ते नग । करोनि लगबग काढिती वेगीं
११९९९	।।ना.गा.१८८६.०११।।	अंगींचीं लुगडीं काढोनियां घेती । तुज बांधोनियां नेती यमदूत
१२०००	।।ना.गा.१८८६.०१२।।	भूमिभार जाला म्हणती वेग करा । नातळती शरीरा इष्ट मित्र
१२००१	।।ना.गा.१८८६.०१३।।	स्मशानीं नेऊनि भडाग्नि देऊनि । येती परतोनी सकळ जन
१२००२	।।ना.गा.१८८६.०१४।।	एकलेंचि येणें एकलेंचि जाणें । पहा दृढ ज्ञानें विचारोनी
१२००३	।।ना.गा.१८८६.०१५।।	पाप-पुण्य दोन्ही अंतींचीं सांगती । येरें तीं राहती जेथिचीं तेथें
१२००४	।।ना.गा.१८८६.०१६।।	ऐसा हा संसार माया वेष्टियला । म्हणोनि दुऱ्हाविला योगी जनीं
१२००५	।।ना.गा.१८८६.०१७।।	विष्णुदास नामा विनवितसे तुम्हां । झणीं परब्रह्मा विसराल
१२००६	।।ना.गा.१८८७.००१।।	अवचट देह लाधला प्राणिया । भक्तिविण वायां गेला जाण
१२००७	।।ना.गा.१८८७.००२।।	धिक् त्याचें जिणें जन्मला कासया । जरी पंढरिराया विसरला
१२००८	।।ना.गा.१८८७.००३।।	रामनामीं रत नव्हेचि बापुडें । जननिये सांकडें घातलें तेणें
१२००९	।।ना.गा.१८८७.००४।।	ऐसा जन्म नको नको गा श्रीरामा । म्हणे तुझा नामा विष्णुदास
१२०१०	।।ना.गा.१८८८.००१।।	जड हेंचि खळें आयुष्याची रासी । काळ माप उसी मवीतसे
१२०११	।।ना.गा.१८८८.००२।।	माप तें लागलें माप तें लागलें। माप तें लागलें झडाझडां
१२०१२	।।ना.गा.१८८८.००३।।	नामा म्हणे जावें शरण केशवा । सळेचा जो ठेवा न पवसी
१२०१३	।।ना.गा.१८८९.००१।।	अतिथी आलिया द्यावें अन्नदान । अर्पी जीव प्राण परमार्थी
१२०१४	।।ना.गा.१८८९.००२।।	तोचि एक नर श्रीहरि समान । करी दुजें कोण नाहीं ऐसा
१२०१५	।।ना.गा.१८८९.००३।।	दीनासी सन्मान करितां आदर । त्याचे उपकारा पार नाहीं

१२०१६	।।ना.गा.१८८९.००४।।	नामा म्हणे ऐसें असावें भाविकां । सर्वांभूतीं ऐक्य देखा पाहें
१२०१७	।।ना.गा.१८९०.००१।।	भूमिदानें होसी भूमिपाळु । कनकदानें कांति निर्मळु । चंदनदानें सदा शितळु । जन्मोजन्मीं प्राणिया
१२०१८	।।ना.गा.१८९०.००२।।	अन्नदानें दृढायुषीं । उदकदानें सदासुखी । मंदिरदानें भुवन पालखी । सुपरिमळु उपचार
१२०१९	।।ना.गा.१८९०.००३।।	वस्त्रदानें सुंदरपण। तांबूलदानें मनुष्यपण । गोपीचंदनें ब्राह्मणपण । अतिलावण्य सुंदरता
१२०२०	।।ना.गा.१८९०.००४।।	जे वृक्ष लाविती सर्वकाळ । तयावरी शस्त्राचें झल्लाळ । जे ईश्वरीं अर्पिती फळ । पुत्रवंत होऊनि नांदती
१२०२१	।।ना.गा.१८९०.००५।।	ऐशा दानांच्या पंक्ति । वेगळाल्या सांगों किती । एका घ्या रे लक्ष्मीपति । विष्णुदास नामा म्हणे
१२०२२	।।ना.गा.१८९१.००१।।	एकीं एकादशी करितां काय वेंचे । उपवासी राहतां काय वेंचे
१२०२३	।।ना.गा.१८९१.००२।।	एक तुळसीदळ वाहतां काय वेंचे। पाऊलीं वंदतां काय वेंचे
१२०२४	।।ना.गा.१८९१.००३।।	तुज जागरणा जातां काय वेंचे । हरि हरि म्हणतां काय वेंचे
१२०२५	।।ना.गा.१८९१.००४।।	संतसमागमा जातां काय वेंचे । चरणरज वंदितां काय वेंचे
१२०२६	।।ना.गा.१८९१.००५।।	एक दंडवत करितां काय वेंचे । अपराधी म्हणवितां काय वेंचे
१२०२७	।।ना.गा.१८९१.००६।।	एक प्रदक्षिणा करितां काय वेंचे । तीर्थयात्रेसी जातां काय वेंचे
१२०२८	।।ना.गा.१८९१.००७।।	ऐसि निमोली भक्ति कां न करिसी निदैवा । नामा म्हणे केशवा अनुसर पां
१२०२९	।।ना.गा.१८९२.००१।।	एकादशीं दिनीं खाईल जो अन्न । सूकर होऊनि येईल जन्मा
१२०३०	।।ना.गा.१८९२.००२।।	एकादशीं दिनीं करील जो भोग । त्यासी मातासंग घडतसे
१२०३१	।।ना.गा.१८९२.००३।।	एकादशीं दिनीं खेळेल सोंगटी । काळ हाणील खुंटी गुदस्थानीं
१२०३२	।।ना.गा.१८९२.००४।।	रजस्त्री शोणित सेविल्या समान । तांबुल चर्वण करील जो
१२०३३	।।ना.गा.१८९२.००५।।	नामा म्हणे नाहीं माझ्याकडे दोष । पुराणीं हें व्यासवाक्य आहे
१२०३४	।।ना.गा.१८९३.००१।।	निंदील हे जन सुखें निंदू द्यावें । सज्जनीं क्षोभावें नये बापा
१२०३५	।।ना.गा.१८९३.००२।।	निंदा स्तुति ज्याला समान पैं जाली । त्याची स्थिति आली समाधिसी
१२०३६	।।ना.गा.१८९३.००३।।	शत्रू मित्र ज्याला होती समानत्वें । तोचि पैं देवातें आवडला
१२०३७	।।ना.गा.१८९३.००४।।	माती आणि सोनें ज्या भासे समान । तो एक निधान योगिराज
१२०३८	।।ना.गा.१८९३.००५।।	नामा म्हणे भक्त ऐसे जे असती । तेणें पावन होती तिन्ही लोक
१२०३९	।।ना.गा.१८९४.००१।।	भवसागर तोडितां कां रे करितसां चिंता । पैल उभा दाता पांडुरंग
१२०४०	।।ना.गा.१८९४.००२।।	निजाचें जें पीठ सोडूनि वैकुंठ । येथें वाळवंट आवडलें
१२०४१	।।ना.गा.१८९४.००३।।	देव गुज सांगे पंढरीसी यारे । प्रेमसुख घ्या रे नाम माझें

१२०४२	।।ना.गा.१८९४.००४।।	तारीन भवसिंधु घ्या रे माझी भाक । साक्ष पुंडलिक करूनि सांगे
१२०४३	।।ना.गा.१८९४.००५।।	काया वाचा मनें दृढ धरा जीवीं । मी त्याचा चालवी भार सर्व
१२०४४	।।ना.गा.१८९४.००६।।	हें जरी लटिकें नामया पुसा । आहे त्या भरंवसा नामीं माझे
१२०४५	।।ना.गा.१८९५.००१।।	एक तत्त्व त्रिभुवनीं । दुसरें न धरी तूं मनीं
१२०४६	।।ना.गा.१८९५.००२।।	म्हणे कां नरहरि नारायण । मग तुज गांजिल कवण
१२०४७	।।ना.गा.१८९५.००३।।	दोन मनीं जरी तूं धरिसी । तरी वायां दंडिला जासी
१२०४८	।।ना.गा.१८९५.००४।।	त्रिविध भक्ती चराचरीं । तयामाजी एक तूं करी
१२०४९	।।ना.गा.१८९५.००५।।	चहुं वेदीं जें बोलिलें । तें तूं करी बा उगलें
१२०५०	।।ना.गा.१८९५.००६।।	पंच-इंद्रियांचा संग । त्यांचा नको करूं पांग
१२०५१	।।ना.गा.१८९५.००७।।	साही चक्री मन पवन । तेथें नव्हे आत्मनिधान
१२०५२	।।ना.गा.१८९५.००८।।	सप्त स्वरीं करी कीर्तन । आणिक न लगे रे साधन
१२०५३	।।ना.गा.१८९५.००९।।	अष्टही गुण सात्विक पूजा । भावें भजा गरुडध्वजा
१२०५४	।।ना.गा.१८९५.०१०।।	नवही द्वारें दंडिती । पुनरपि कोठें कैंची भक्ति
१२०५५	।।ना.गा.१८९५.०११।।	दाही दिशा अवलोकितां । दिवस गेले मोजितां
१२०५६	।।ना.गा.१८९५.०१२।।	अकरा रुद्र जाले जरी । तरी एकचि श्रीहरि
१२०५७	।।ना.गा.१८९५.०१३।।	बारा मास आणि पक्ष । व्यर्थ जाती दे तूं लक्ष
१२०५८	।।ना.गा.१८९५.०१४।।	तेरा गुणांचा तांबूल । समर्पावें पूगीफल
१२०५९	।।ना.गा.१८९५.०१५।।	चौदा भुवनें ज्याचे पोटीं । त्याचें नाम धरा कंठीं
१२०६०	।।ना.गा.१८९५.०१६।।	पंधरा दिवसां एकादशी । करा जागर उपवासी
१२०६१	।।ना.गा.१८९५.०१७।।	षोडश उपचारें पूजा । भावें भजा गरुडध्वजा
१२०६२	।।ना.गा.१८९५.०१८।।	सत्रावी जीवनकळा । तिचा घे कां रे सोहळा
१२०६३	।।ना.गा.१८९५.०१९।।	अठरा पुराणें वानिसी । निरंतर कृष्णकीर्ति
१२०६४	।।ना.गा.१८९५.०२०।।	म्हणे विष्णुदास नामा । शरण जावें पुरुषोत्तमा
१२०६५	।।ना.गा.१८९६.००१।।	हरिनामीं उदास तो पतित निष्ठुर । तया यमकिंकर गांजितील
१२०६६	।।ना.गा.१८९६.००२।।	तोचि हरिचा दासु नामीं ज्या विश्वासु । तया गर्भवासु नाहीं नाहीं
१२०६७	।।ना.गा.१८९६.००३।।	मार्ग सांडोनियां आडमार्गीं जाती । ते व्याघ्रा वरपडे होती क्षणामाजीं

१२०६८	।।ना.गा.१८९६.००४।।	नामा म्हणे जेणें नामीं आळस केला । तो येवोनि गेला व्यर्थ एक
१२०६९	।।ना.गा.१८९७.००१।।	रामनाम म्हणतां संसाराचें भय । म्हणती त्याच्या होय जिव्हे कुष्ट
१२०७०	।।ना.गा.१८९७.००२।।	अमृत सेवितां कैंचे ये मरण । जाणती हे खूण अनुभवी
१२०७१	।।ना.गा.१८९७.००३।।	ज्याची एकवृत्ति रामनामीं प्रीति । असतां कैसे होती गर्भवास
१२०७२	।।ना.गा.१८९७.००४।।	नामा म्हणे नामीं दृढ भाव धरा । आत्महित करा जाणते हो
१२०७३	।।ना.गा.१८९८.००१।।	दाही दिशा फेरे कष्टविसी सैरा । किती येरझारा कल्पकोटी
१२०७४	।।ना.गा.१८९८.००२।।	विठ्ठलाचे नामीं दृढ धरा भाव। येर सांडी वाव मृगजळ
१२०७५	।।ना.गा.१८९८.००३।।	भक्ति मुक्ति सिद्धि जोडोनियां कर । करिती निरंतर वोळगण
१२०७६	।।ना.गा.१८९८.००४।।	नामा म्हणे मना धरी पैं विश्वास । मग तुज गर्भवास नव्हे नव्हे
१२०७७	।।ना.गा.१८९९.००१।।	सांडी सांडी पसारा विषयांचा चारा । विठ्ठल विठ्ठल मोहरा वळघे वेगीं
१२०७८	।।ना.गा.१८९९.००२।।	होईल तुझें हित होसिल पूर्ण भरित। सर्वांभूतीं हित तेचि दया
१२०७९	।।ना.गा.१८९९.००३।।	वळघे विठ्ठलरूपा मार्ग हाचि सोपा । विषयाच्या खेपा चुकतील
१२०८०	।।ना.गा.१८९९.००४।।	नामा म्हणे केवळ आम्हां नित्यकाळ । दिननिशीं पळ विठ्ठल देव
१२०८१	।।ना.गा.१९००.००१।।	व्यर्थ का हव्यास करिसी परोपरी । नाम निरंतरीं न म्हणा कां रे
१२०८२	।।ना.गा.१९००.००२।।	आयुष्य जाईल क्षणांत सरोन । पावसी पतन कुंभिपाकीं
१२०८३	।।ना.गा.१९००.००३।।	नाम संकीर्तन नाईके स्वभावें । प्रत्यक्ष ते शव जगामाजीं
१२०८४	।।ना.गा.१९००.००४।।	नामा म्हणे ऐसे गेले बहुतेक । सांगे सकळिक हेंचि आतां
१२०८५	।।ना.गा.१९०१.००१।।	मुषक हव्यासें चालुनि भूमीतें । मांजर तयातें टपतसे
१२०८६	।।ना.गा.१९०१.००२।।	तैसा तुज काळ टपत वेळोवेळां । वेगीं त्या गोपाळा शरण जाई
१२०८७	।।ना.गा.१९०१.००३।।	भानुचेनि मापें आयुष्य जें चळे । वोसरे अवचितां डोळे कांहीं झांकी
१२०८८	।।ना.गा.१९०१.००४।।	नामा म्हणे कां रे निश्चिंती हे मूढा। हरिनाम गोडा सेवीस ना
१२०८९	।।ना.गा.१९०२.००१।।	पवित्र आणि परिकर । उभविलें मंदिर । दीपेंविण मनोहर । शोभा न पवे
१२०९०	।।ना.गा.१९०२.००२।।	श्यामअंगीं तरुणी । सुंदर होय रमणी । पुरुषाविण कामिनी । शोभा न पवे
१२०९१	।।ना.गा.१९०२.००३।।	द्रव्याविण नर । जरी जाहला सुंदर । तो त्याविण चतुर । शोभा न पवे
१२०९२	।।ना.गा.१९०२.००४।।	योगिया आणि कठिण । इंद्रिया नाहीं दमन । षट्कर्मेविण ब्राह्मण । शोभा न पवे
१२०९३	।।ना.गा.१९०२.००५।।	नामा म्हणे सुंदरा । रखुमादेवीवरा । तुजविण दातारा । शोभा न पवे

१२०९४	।।ना.गा.१९०३.००१।।	निरंतर तुम्ही करावा विचार । भवाब्धीचा पार होय कैसा
१२०९५	।।ना.गा.१९०३.००२।।	जन्म गेले वायां विषयाचे संगें । भुलले वाउगें मायामोहें
१२०९६	।।ना.गा.१९०३.००३।।	अवघा करितां संसाराचा धंदा । वाचे वदा सदा हरिनाम
१२०९७	।।ना.गा.१९०३.००४।।	सर्वभावें एका विठोबातें भजा । आरते करा पूजा हरिभक्त
१२०९८	।।ना.गा.१९०३.००५।।	सर्व सुख होई तुम्हांला अपैतें । न याल मागुतें गर्भवासा
१२०९९	।।ना.गा.१९०३.००६।।	नामा म्हणे तुम्ही विचारूनि पहा । सर्वकाळ रहा संतसंगें
१२१००	।।ना.गा.१९०४.००१।।	न फिटे हें ओझें मायेचा गुंडाळा । एका तूं गोपाळा शरण जाई
१२१०१	।।ना.गा.१९०४.००२।।	तुटेल बिरडें सुटेल हा मोह। केशवींच भाव असों देणें
१२१०२	।।ना.गा.१९०४.००३।।	कैचें हे क्लेश उदासीन वायां । भजन यादवराया हेंचि सत्य
१२१०३	।।ना.गा.१९०४.००४।।	नामा म्हणे सुफळ भजनाचें करी । सर्वांभूतीं हरि भजन भावो
१२१०४	।।ना.गा.१९०५.००१।।	कल्मश हरती नामें जयाचेनि । ते विसरोनी काय करावें
१२१०५	।।ना.गा.१९०५.००२।।	संसारतारक विसांवा हरी । गर्भवास चुकवी तो मुरारी
१२१०६	।।ना.गा.१९०५.००३।।	बाह्या उभारोनी घेतां रामनाम । नामा म्हणे केशव परमात्मा
१२१०७	।।ना.गा.१९०६.००१।।	उदरास भरण खळ बुद्धीसि कारण । त्याचें परिहरण रामनाम
१२१०८	।।ना.गा.१९०६.००२।।	कामसंदीपन दोष आचरण। त्याचें परिहरण रामनाम
१२१०९	।।ना.गा.१९०६.००३।।	दुर्वासना गहन दुर्बुद्धि आचरण । त्याचें परिहरण रामनाम
१२११०	।।ना.गा.१९०६.००४।।	नामा म्हणे कारण संसारतारण । जरी मनीं निधान रामनाम
१२१११	।।ना.गा.१९०७.००१।।	देवोदेवी वोळे दे तूं जीवन भातें । मेहुडें दुभतें जना यया
१२११२	।।ना.गा.१९०७.००२।।	तैसें मनीं करा भजन भाव धरा । विषय पसारा टाका वेगीं
१२११३	।।ना.गा.१९०७.००३।।	उपायो न लगे दया ते धरावी । आपुली म्हणावी माय जगीं
१२११४	।।ना.गा.१९०७.००४।।	नामा म्हणे बाप विठ्ठल तो आमुचा । कुळदेव साचा पुरातन
१२११५	।।ना.गा.१९०८.००१।।	गौळियाचे घरीं कैवल्याचे दानीं । परब्रह्म अंगणीं क्रीडतसे
१२११६	।।ना.गा.१९०८.००२।।	ऐसें कांहीं करा आलिया संसारा । जेणें जोडे सोयरा पांडुरंग
१२११७	।।ना.गा.१९०८.००३।।	करितां त्याचें काज मनीं न धरी लाज । म्हणे हें शरण मज सर्व भावें
१२११८	।।ना.गा.१९०८.००४।।	राखे बळिचें द्वार पाहे त्याची वास । म्हणे हा माझा दास अंतरंगु
१२११९	।।ना.गा.१९०८.००५।।	गोवळ्याचें उच्छिष्ट मनीं न धरीं वीट। आवडी निकट गोपाळाची

१२१२०	।।ना.गा.१९०८.००६।।	तरीच क्रिया कर्म केलें होये सफळ । जरी हृदयीं गोपाळ येऊनि राहे
१२१२१	।।ना.गा.१९०८.००७।।	येरी ते मायावी जग भुलवणी । नित्य विभांडणी सर्वभावें
१२१२२	।।ना.गा.१९०८.००८।।	नामा म्हणे ऐसें संतांचिया सोई । विठोबाचे पायीं भेटी मन
१२१२३	।।ना.गा.१९०९.००१।।	विठ्ठलाचे पाय धरोनियां राहे । मग संसार तें काय करील तुझें
१२१२४	।।ना.गा.१९०९.००२।।	संसाराचें भय नाहीं हरिचे दासा । विठु आम्हां सरिसा निरंतर
१२१२५	।।ना.गा.१९०९.००३।।	निरंतर वसे हरि भक्तापाशीं । विसवेना त्यासी कदाकाळीं
१२१२६	।।ना.गा.१९०९.००४।।	नामा म्हणे ऐसा विठ्ठल सोडोनि । वेर्थ काय जनीं शिणताती
१२१२७	।।ना.गा.१९१०.००१।।	जन्मा येऊनियां काय पुण्य केलें । बाळपण गेलें वायांविण
१२१२८	।।ना.गा.१९१०.००२।।	संतसंगें सुख हुंडारलें जाणा। नामसंकीर्तना नोळखत
१२१२९	।।ना.गा.१९१०.००३।।	तारुण्यपणेंहि नाठवेचि देवा । वृद्धपणीं सेवा अंतरली
१२१३०	।।ना.गा.१९१०.००४।।	यापरी जन्मुनि गेलासी रे वायां । पंढरिच्या राया नोळखतां
१२१३१	।।ना.गा.१९१०.००५।।	आलों मी संसारीं गुंतलों व्यापारी । अजुनी कां श्रीहरी नोळखसी
१२१३२	।।ना.गा.१९१०.००६।।	सहस्र अपराध जरी म्यां रे केले । तारी बा विठ्ठले म्हणे नामा
१२१३३	।।ना.गा.१९११.००१।।	बाळपणीं वर्षें बारा । तीं तुझीं गेलीं रे अवधारा । तैं तूं धांवसी सैरा । खेळाचेनि विनोदें
१२१३४	।।ना.गा.१९११.००२।।	म्हणवोनि आहेस नागर तरुणा । तंव वोळगे रामराणा । आलिया म्हातारपणा । मग तुज कैचि आठवण
१२१३५	।।ना.गा.१९११.००३।।	तुज भरली अठरा । मग तूं होसी निमासुरा । पहिले पंचविसाच्या भरा । झणें गव्हारा भुललासी
१२१३६	।।ना.गा.१९११.००४।।	आणिक भरलिया सात पांचा । मग होसी महिमेचा । गर्वे खिळेल तुझी वाचा । देवा ब्राह्मणातें न भजसी
१२१३७	।।ना.गा.१९११.००५।।	त्वचा मांस शिरा जाळी । बांधोनि हाडांची मोळी । लेखितोसि सदाकाळीं । देहचि रत्न आहे माझें
१२१३८	।।ना.गा.१९११.००६।।	बहु भ्रम या शिराचा रे । म्हणे मी मी तारुण्याचा भरें । ऐसा संशय मनाचा रे । तूं संडी रे अज्ञाना
१२१३९	।।ना.गा.१९११.००७।।	माथवीये पडे मासोळी । तें म्हणे मी आहे प्रबळ जळीं । तैसी विषयाच्या पाल्हाळीं । भुललासी गव्हारा
१२१४०	।।ना.गा.१९११.००८।।	तुज भरलीये साठी । मग तुझ्या हातीं येईल काठी । मग तीं अडोरें लागती । म्हणती बागुल आला रे
१२१४१	।।ना.गा.१९११.००९।।	म्हणती थोर हे म्हातारा । कानीं झालासि बहिरा । कैसे न ऐकसी परिकरा । नाम हरि हराचें
१२१४२	।।ना.गा.१९११.०१०।।	दातांची पाथीं उठी । मग चाववेना भाकर रोटी । नाक लागलें हनुवटी । नाम होटी न उच्चारवे
१२१४३	।।ना.गा.१९११.०११।।	बैसोनि उंबरवाटिया तळवटीं । आया बाया सांगतो गोष्टी । म्हणती म्हातारा बैल दृष्टी । कैसा अक्षयीं जाला गे
१२१४४	।।ना.गा.१९११.०१२।।	खोकलिया येतसा खंकारा । म्हणती रांडेचा म्हातारा। अझूनि न जाय मरणद्वारा । किती दिवस वांचेल
१२१४५	।।ना.गा.१९११.०१३।।	ऐसा जाणोनि अवसर । वोळखा वेगें सारंगधर । विष्णुदास नामयाचा दातार । वर विठ्ठल पंढरिये

१२१४६	।।ना.गा.१९१२.००१।।	संसार करितां देव जैं सांपडे । तरि कां जाले वेडें सनकादिक
१२१४७	।।ना.गा.१९१२.००२।।	संसारीं असतां देव जरी भेटता । शुकदेव कासया जाता तया लागीं
१२१४८	।।ना.गा.१९१२.००३।।	घराश्रमीं जरी जोडे परब्रह्म । तरी कां घराश्रम त्याग केला
१२१४९	।।ना.गा.१९१२.००४।।	ज्ञातीच्या आचारें सांपडे जरी सार । तरी कां निरहंकार जाले साधु
१२१५०	।।ना.गा.१९१२.००५।।	नामा म्हणे आतां सकळ सांडोन । आलोसें शरण विठोबासी
१२१५१	।।ना.गा.१९१३.००१।।	परब्रह्मींची गोडी नेणती तीं बापुडी । संसारसाकडीं विषयभरित
१२१५२	।।ना.गा.१९१३.००२।।	तूतें चुकली रे जगजीवनरक्षा। अनुभवाविण लक्षा न येचि रे कोणा
१२१५३	।।ना.गा.१९१३.००३।।	जवळी असतांचि क्षीर नव्हेसि वरपडा । रुधिर सेवितां गोचिडा जन्म गेला
१२१५४	।।ना.गा.१९१३.००४।।	दर्दुरा कमळिणी एके ठायीं बिढार । वास तो मधुकर घेऊनि गेला
१२१५५	।।ना.गा.१९१३.००५।।	मधुमक्षिया मोहोळ रचितां रात्रंदिवस । भाग्यवंत रस घेवोनि गेला
१२१५६	।।ना.गा.१९१३.००६।।	शेळीस घातली उसांची वैरणी । घेऊं नेणें धणी त्या रसाची
१२१५७	।।ना.गा.१९१३.००७।।	नामा म्हणे ऐसीं चुकलीं बापुडीं । अमृत सेवितां फुडी चवी नेणें
१२१५८	।।ना.गा.१९१४.००१।।	मिथ्या मायाजळ मृगजळ बाधा । लागलासे धंदा संसारिया
१२१५९	।।ना.गा.१९१४.००२।।	आलें रे आलें रे हाकित टाकित। मूढा गिवसित काळचक्रीं
१२१६०	।।ना.गा.१९१४.००३।।	बंधनापासूनि बांधलासे पायीं । बुडतों मी डोहीं निर्जळा ये
१२१६१	।।ना.गा.१९१४.००४।।	कोण भरंवसा धरिलासे जिवीं । बळिया सोडवी कदा काळीं
१२१६२	।।ना.गा.१९१४.००५।।	पुत्र कलत्र बंधु माझे म्हणसी झणीं । न पवती निर्वाणीं धांवणिया
१२१६३	।।ना.गा.१९१४.००६।।	नामा म्हणे वेगीं होऊनि सावधान । जाई येक्या शरण केशवराजा
१२१६४	।।ना.गा.१९१५.००१।।	आलिया संसार सोडवणें करा । शरण जा उदारा पांडुरंग
१२१६५	।।ना.गा.१९१५.००२।।	प्रपंच न सरे कदा कल्पकोडी । वासनेचि बेडी पडे पायीं
१२१६६	।।ना.गा.१९१५.००३।।	व्यर्थ मायादेवी गर्भवास गोवी । नश्वर भोगावी नाना योनी
१२१६७	।।ना.गा.१९१५.००४।।	नामा म्हणे पाहा विचारूनि मनीं । स्मरावा निर्वाणीं पांडुरंग
१२१६८	।।ना.गा.१९१६.००१।।	आलिया संसार उठा वेगें चला । जिवलगा विठ्ठला भेटीलागीं
१२१६९	।।ना.गा.१९१६.००२।।	दुर्लभ मनुष्यजन्म न लभे रे मागुता । लाहो घ्या सर्वथा पंढरिचा
१२१७०	।।ना.गा.१९१६.००३।।	भावें लोटांगण घाला महाद्वारीं । होईल बोहरी त्रिविध तापा
१२१७१	।।ना.गा.१९१६.००४।।	श्रीमुखाची वास पहा धणीवरी। आठवी अंतरीं घडिये घडिये

१२१७२	||ना.गा.१९१६.००५||	शुद्ध सुमनें कंठीं घाला तुळसीमाळा । तनमन ओवाळा चरणांवरूनि
१२१७३	||ना.गा.१९१६.००६||	नामा म्हणे विठो अनाथा कोंवसा । पुढतीं गर्भवासा येऊं नेदी
१२१७४	||ना.गा.१९१७.००१||	अवघे निरंतर करा हा विचार । भवसिंधूचा पार तरिजे केवीं
१२१७५	||ना.गा.१९१७.००२||	अवघे जन्म वायां गेले विषयसंगें । भुललेती वाउगे मायामोहें
१२१७६	||ना.गा.१९१७.००३||	अवघा वेळ करितां संसाराचा धंदा । वाचे वसो सदा हरिचें नाम
१२१७७	||ना.गा.१९१७.००४||	अवघ्या भावी एका विठ्ठलातें भजा । आर्ते पूजा करी हरिदासाची
१२१७८	||ना.गा.१९१७.००५||	अवघें सुख तुम्हां होईल अपैतें । न याल मागुते गर्भवासा
१२१७९	||ना.गा.१९१७.००६||	नामा म्हणे अवघें अनुभवोनि पहा । सर्वकाळ राहा संतसंगें
१२१८०	||ना.गा.१९१८.००१||	अवघें सावधान होऊनि विचारा । सोडवण करा संसाराची
१२१८१	||ना.गा.१९१८.००२||	अवघा काळ वाचे म्हणा नारायण । वायां एक क्षण जाऊं नेदी
१२१८२	||ना.गा.१९१८.००३||	अवघें हें आयुष्य सरोनि जाईल । मग कोण होईल साह्य तुम्हां
१२१८३	||ना.गा.१९१८.००४||	अवघा हा प्रपंच जाणोनि लटिका । शरण रिघा एका पंढरिराया
१२१८४	||ना.गा.१९१८.००५||	अवघे मायामोहें गुंतलेती पहा । अवघे सहज आहां ब्रह्मरूप
१२१८५	||ना.गा.१९१८.००६||	नामा म्हणे अवघे सुखाचेचि व्हाल । जरी मन ठेवाल विठ्ठलपायीं
१२१८६	||ना.गा.१९१९.००१||	जळीं बुडबुडे देखतां देखतां । क्षण न लागतां दिसेनाती
१२१८७	||ना.गा.१९१९.००२||	तैसा हा संसार पाहतां पाहतां । अंतकाळीं हातां काई नाहीं
१२१८८	||ना.गा.१९१९.००३||	गारुड्याचा खेळ दिसे क्षणभर । तैसा हा संसार दिसे खरा
१२१८९	||ना.गा.१९१९.००४||	नामा म्हणे तेथें कांहीं नसे बरें । क्षणाचें हें सर्व खरें आहे
१२१९०	||ना.गा.१९२०.००१||	संसाराचें दुःख सुख म्हणों नये । पुढें दुःख पाहे अनिवार
१२१९१	||ना.गा.१९२०.००२||	तया दुःख नाहीं अंतपार जाणा। काळाची यातना बहुतांपरी
१२१९२	||ना.गा.१९२०.००३||	संसाराची चिंता वाहतां जन्म गेला । सोस हा वाढला बहुतांपरी
१२१९३	||ना.गा.१९२०.००४||	हितहि बुडालें परत्र दुरावलें । नरदेह बुडविलें भजनेंविण
१२१९४	||ना.गा.१९२०.००५||	भजनाच्या प्रतापें दुःख दुरी जाय । जैसें अभ्र होय देशधडी
१२१९५	||ना.गा.१९२०.००६||	वायुच्या झुंझाटें वृक्ष उन्मळती । परी नाना गति तैसें दुःख
१२१९६	||ना.गा.१९२०.००७||	नामा म्हणे नाम दुःखाचा परिहार । सुखाचा अनिवार पार नाहीं
१२१९७	||ना.गा.१९२१.००१||	प्रपंच घडामोडी न सरे कल्पकोडी । वासनेची बेडी पडली पायीं

१२१९८	।।ना.गा.१९२१.००२।।	सोडवण करा आलिया संसारा । शरण जा उदारा विठोबासी
१२१९९	।।ना.गा.१९२१.००३।।	लटकी मायादेवी गर्भवासीं गोवीं । नरक भोगवी नाना योनी
१२२००	।।ना.गा.१९२१.००४।।	नामा म्हणे तुम्ही विचारावें मनीं । सोयरा निर्वाणीं पांडुरंग
१२२०१	।।ना.गा.१९२२.००१।।	प्रपंच स्वार्थासि साधावया चांग । वैराग्याचें अंग दाविसी जना
१२२०२	।।ना.गा.१९२२.००२।।	अनुताप नित्य नाहीं कदाकाळीं । मग संचिताची होळी कैसी होय
१२२०३	।।ना.गा.१९२२.००३।।	पवित्र ते वाचा कां रे गमविसी । रामनाम न म्हणसी अरे मूढा
१२२०४	।।ना.गा.१९२२.००४।।	नामा म्हणे जीव कासया ठेवावा । न भजतां केशवा मायबाप
१२२०५	।।ना.गा.१९२३.००१।।	स्वयें घरदार प्रपंच मांडिला । जोडुनियां दिला बाळा हातीं
१२२०६	।।ना.गा.१९२३.००२।।	तैसें सर्वांभूतीं असावें संसारीं। प्राचीनांची दोरी साक्ष आहे
१२२०७	।।ना.गा.१९२३.००३।।	वाटसरू वस्ती येऊनि राहिला । प्रात:काळीं गेला उठोनियां
१२२०८	।।ना.गा.१९२३.००४।।	नामा म्हणे आम्हां नाहीं प्रापंचिक । पंढरिनायक साह्य जाला
१२२०९	।।ना.गा.१९२४.००१।।	फुटल्या घटाचें नाहीं नागवणें । संसार भोगणें तेणें न्यायें
१२२१०	।।ना.गा.१९२४.००२।।	स्वप्नींचि ती मात जागृतीसी सांगें । तैसा भवरोग प्रारब्धाचा
१२२११	।।ना.गा.१९२४.००३।।	नामा म्हणे ऐसा जाण तो संसार । वाउगा पसारा जायजाणा
१२२१२	।।ना.गा.१९२५.००१।।	जायजाणा देह जाईल नेणसी । लौकिकीं मिरविसी लाजेसिना
१२२१३	।।ना.गा.१९२५.००२।।	माझें माझें माझें मानिसी निभ्रांत । करिसी आघात रात्रंदिवस
१२२१४	।।ना.गा.१९२५.००३।।	सांग तूं कोणाचा आलासी कोठोनि । दृढ बुद्धि मनीं विचारी पां
१२२१५	।।ना.गा.१९२५.००४।।	धन संपत्ति करोनि मदें मातलासी । पुढत पुढतीं पडसी गर्भवासी
१२२१६	।।ना.गा.१९२५.००५।।	पुत्र कलत्र दारा यांचा जालासी म्हणियारा। यांच्या पातकांचा भारा वाहसील
१२२१७	।।ना.गा.१९२५.००६।।	अंतीं यमापाशीं बांधोनियां नेती । कवतुक पाहती सकळ जन
१२२१८	।।ना.गा.१९२५.००७।।	नानापरीं तुज करिती यातना । सांगे तेथें कोणा बोभाशील
१२२१९	।।ना.गा.१९२५.००८।।	धन पुत्र दारा तुज नये कामा । एका मेघ:श्यामा वांचोनिया
१२२२०	।।ना.गा.१९२५.००९।।	विषयाचेनि संगें भुलशील झणें । भोगिसी पतनें रात्रंदिवस
१२२२१	।।ना.गा.१९२५.०१०।।	नामा म्हणे एक ध्यायी कमलापति । निजाचा सांगाति केशवराज
१२२२२	।।ना.गा.१९२६.००१।।	शरीर काळाचें भातुकें । तुम्ही नेणा कां इतुकें
१२२२३	।।ना.गा.१९२६.००२।।	माझा जन्म गेला वायां । तुजविण पंढरिराया

१२२२४	।।ना.गा.१९२६.००३।।	अझुनि तूं कां रे निश्चिंत । काळ जवळी हटकित
१२२२५	।।ना.गा.१९२६.००४।।	नामा म्हणे अवघीं चोरें । शेखीं हरिनाम सोयरे
१२२२६	।।ना.गा.१९२७.००१।।	औट हात जायाचे कोपट । दोन दिवस फुकट भोगाकारी
१२२२७	।।ना.गा.१९२७.००२।।	कवणाचें घर कवणाचें दार । भावें वोळगा रे नरहरी
१२२२८	।।ना.गा.१९२७.००३।।	आढें मोडलें घर जर्जर जालें । मोडोनियां गेलें वारियानें
१२२२९	।।ना.गा.१९२७.००४।।	खचला तो पाया पडली ते भिंती । नामा म्हणे चित्तीं घर नलगे
१२२३०	।।ना.गा.१९२८.००१।।	देह आहे तंव करा रे धांवणी । शरण चक्रपाणि रिघा वेगीं
१२२३१	।।ना.गा.१९२८.००२।।	येर ते लटिके इष्टमित्र सखे । हे तंव पारिखे सबचोर
१२२३२	।।ना.गा.१९२८.००३।।	लावुनि मोहातें दास्यत्व करविती । अंतकाळीं होती पाठिमोरी
१२२३३	।।ना.गा.१९२८.००४।।	मायेचें भुररे भुलवी सकळ । हें तुज न कळे कटकटां
१२२३४	।।ना.गा.१९२८.००५।।	यापरी आयुष्य लोटलें रे जना । पुढें यमयातना न चुकती
१२२३५	।।ना.गा.१९२८.००६।।	धोतरा देऊनी सर्वस्व हरीती । नामा म्हणे गती हेचि जना
१२२३६	।।ना.गा.१९२९.००१।।	यम सांगे दूता । तुम्ही जावें मृत्युलोका । आपुला लोक जितुका । तितुकाचि आणावा
१२२३७	।।ना.गा.१९२९.००२।।	तुम्हां सांगतों कुळरंग । निंदा आणि द्वेष करिती राग । खरी खोटी चाहडी सांगे । तें कुळ आपुलें
१२२३८	।।ना.गा.१९२९.००३।।	ज्याचें विषयावर ध्यान । परद्रव्य परस्त्री गमन । धर्मासी विन्मुखपण । तें कुळ आपुलें
१२२३९	।।ना.गा.१९२९.००४।।	भावेंविण भक्ति करिती। भक्तिविणें भाव दाविती । त्यांची तुम्ही फजिती । बहुतां प्रकारें करावी
१२२४०	।।ना.गा.१९२९.००५।।	मंत्रसंचारी जे लोक । देव सांडून दैवता उपासक। झोटिंग वेताळ खेताळ देख। ते सखे बापा तुमचे
१२२४१	।।ना.गा.१९२९.००६।।	लटिके वासनेचा नवसा । करिती करविति पशुहिंसा। त्यानें बहुत दिवस भरंवसा। धरिला आहे
१२२४२	।।ना.गा.१९२९.००७।।	घातकी पातकी गुरुद्रोही । हित सांगतां गुरुसी हेडवी । विष्णुदासा वेगळें करुन पाही । सांगितले तितुके आणावे
१२२४३	।।ना.गा.१९२९.००८।।	नामा म्हणे एक्या पातकिया दंडिती। नाना विपत्ति काय सांगू किती । विष्णुदासाचे वंदिता । चरणरज ते यम
१२२४४	।।ना.गा.१९३०.००१।।	दुर्लभ नरदेह जाला तुम्हां आम्हां । येथें साधूं प्रेमा राघोबाचा
१२२४५	।।ना.गा.१९३०.००२।।	अवघे हातोहातीं तरों भवसिंधु । आवडी गोविंदु गाऊं गीतीं
१२२४६	।।ना.गा.१९३०.००३।।	हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां । शोक मोह दु:ख निरसूं तेणें
१२२४७	।।ना.गा.१९३०.००४।।	एकमेकां करूं सदा सावधान । नामीं अनुसंधान तुटी नेदू
१२२४८	।।ना.गा.१९३०.००५।।	घेऊं सर्वभावें रामनाम दीक्षा । विश्वासें सकळिकां हेंचि सांगो
१२२४९	।।ना.गा.१९३०.००६।।	नामा म्हणे शरण रिघो पंढरिनाथा । नुपेक्षी सर्वथा दीनबंधु

१२२५०	।।ना.गा.१९३१.००१।।	नामा म्हणावया तूं कां रे करंटा । काय तुझे अदृष्टीं लिहिलें असे
१२२५१	।।ना.गा.१९३१.००२।।	यमाचे यमपाश पडतील गळां । जाशील सगळा काळापोटीं
१२२५२	।।ना.गा.१९३१.००३।।	शरीराची आशा बाळ हें तारुण्य । अवचित वृद्धपण येईल मूढा
१२२५३	।।ना.गा.१९३१.००४।।	लक्ष्मी धन मद पुत्र स्त्री घरदार । नेतां यमकिंकर न सोडविती
१२२५४	।।ना.गा.१९३१.००५।।	मायबाप सखी न येती सांगातें । जंव शरीरीं पुरतें बळ आहे
१२२५५	।।ना.गा.१९३१.००६।।	न येती सांगातें सज्जन सोयरीं । वानप्रस्थ ब्रह्मचारी श्रेष्ठ जाले
१२२५६	।।ना.गा.१९३१.००७।।	घेशील तूं सोंग संन्यास आश्रम । सांडोनि घराश्रम न सुटती
१२२५७	।।ना.गा.१९३१.००८।।	नामा म्हणे नाम नित्य नरहरी । म्हणतां श्रीहरी तरशील
१२२५८	।।ना.गा.१९३२.००१।।	बाळ वृद्ध तरुण काया हे जर्जर । वेगीं हा पामर आळसी जाला
१२२५९	।।ना.गा.१९३२.००२।।	काय करूं देवा नाहीं यासि भावो । न करी उपावो तुझे भजनीं
१२२६०	।।ना.गा.१९३२.००३।।	मन ठेवी ठायीं रंगे तूं श्रीरंगीं । गोष्टी त्या वाउग्या बोलूं नको
१२२६१	।।ना.गा.१९३२.००४।।	नामा म्हणे श्रीरंगु चिंती पां चोखडा । उघडा पवाडा सांगितला
१२२६२	।।ना.गा.१९३३.००१।।	धनमान बळें नाठविसी देवा । मृत्युकाळीं तेव्हां कोण आहे
१२२६३	।।ना.गा.१९३३.००२।।	यमाचे यमदंड बैसतील माथां । तेव्हां तुज रक्षिता कोण आहे
१२२६४	।।ना.गा.१९३३.००३।।	मायबापबंधु तोंवरी सोयरीं । इंद्रियें जोंवरी वाहताती
१२२६५	।।ना.गा.१९३३.००४।।	सर्वस्व स्वामिनी म्हणविसी कांता । तेहि केश देतां रडतसे
१२२६६	।।ना.गा.१९३३.००५।।	विष्णुदास नामा जातांचि शरण । स्वप्नीं जन्ममरण नाहीं नाहीं
१२२६७	।।ना.गा.१९३४.००१।।	भुक्ति मुक्ति सिद्धि यावयाकारणें । सेवकाशी देणें पांडुरंगा
१२२६८	।।ना.गा.१९३४.००२।।	ऐसिया तुज सांगणें आपणातें म्हणविती । तया अधोगति कल्पकोडी
१२२६९	।।ना.गा.१९३४.००३।।	देहो सरल्या मिळे ज्योतिस ज्योति । ऐसें म्हणतां किती सिंतरिले
१२२७०	।।ना.गा.१९३४.००४।।	नामा म्हणे ऐसें नाशिवंत शरीर । पूजा हरिहर एक वेळां
१२२७१	।।ना.गा.१९३५.००१।।	विषयाचा आंदणा दिसे केविलवाणा । करीतसे कल्पना नानाविध
१२२७२	।।ना.गा.१९३५.००२।।	कुटुंब पाईक म्हणवी हरिचा दास । मागे ग्रासोग्रास दारोदारीं
१२२७३	।।ना.गा.१९३५.००३।।	जळो त्याचें कर्म जळो त्याचा धर्म । जळो तो आश्रम जाणिवेचा
१२२७४	।।ना.गा.१९३५.००४।।	कल्पद्रुमातळीं काखे घेऊनि झोळी । बैसोनि सांभाळीं भिक्षा अन्न
१२२७५	।।ना.गा.१९३५.००५।।	अधम पोटभरी विचार तो न करी। पुढती दारोदारीं हिंडो जाय

१२२७६	।।ना.गा.१९३५.००६।।	पोटालागीं करी नाना विटंबना । संतोषवी मना दुर्जनांच्या
१२२७७	।।ना.गा.१९३५.००७।।	न करी हरिचें ध्यान बैसोनि एकांतीं । जन्माची विश्रांति जेणें होय
१२२७८	।।ना.गा.१९३५.००८।।	द्रव्याच्या अभिलाषें जागे सटवीपाशीं । नवजे एकादशी जागरणा
१२२७९	।।ना.गा.१९३५.००९।।	उत्तम मध्यम अधम न विचारी । स्तुति नाना करी आशाबद्ध
१२२८०	।।ना.गा.१९३५.०१०।।	वैराग्याची वार्ता कैची दैवहता। नुपजे सर्वथा प्रेमभाव
१२२८१	।।ना.गा.१९३५.०११।।	नामा म्हणे ऐसें तारीं एक्या गुणें । अजा आरोहण गजस्कंधीं
१२२८२	।।ना.गा.१९३६.००१।।	देहाचें ममत्व जंव नाहीं तुटलें । जंव नाहीं विटलें विषयीं मन
१२२८३	।।ना.गा.१९३६.००२।।	तंववरी निजसुख कैसेनि आतुडे । जंववरी न झडे मीतूंपण
१२२८४	।।ना.गा.१९३६.००३।।	मीचि एक भक्त मीचि एक मुक्त । म्हणविती पतित दुराचारी
१२२८५	।।ना.गा.१९३६.००४।।	नामा म्हणे तुझे कृपेविण देवा । केविं जोडे ठेवा विश्रांतीचा
१२२८६	।।ना.गा.१९३७.००१।।	भक्तीविणें जिणें जळों लाजिरवाणें । संसार भोगणें दु:खरूप
१२२८७	।।ना.गा.१९३७.००२।।	एक एक योनि कोटि फेरा । मनुष्य देहवारा मग लागे
१२२८८	।।ना.गा.१९३७.००३।।	वीस लक्ष योनि वृक्षामध्यें घ्याव्या । जळचरीं भोगाव्या नव लक्ष
१२२८९	।।ना.गा.१९३७.००४।।	अकरा लक्ष योनि किरडामध्यें घ्याव्या । दश लक्ष भोगाव्या पक्षामध्यें
१२२९०	।।ना.गा.१९३७.००५।।	तीस लक्ष योनि पशूंचिये घरीं । मानवाभीतरीं चारी लक्ष
१२२९१	।।ना.गा.१९३७.००६।।	नामा म्हणे तेव्हां नरदेह या नरा । तयाचा मातेरा केला मूढें
१२२९२	।।ना.गा.१९३८.००१।।	शेवटिली पाळी तेव्हां मनुष्यजन्म । चुकलिया वर्म फेरा पडे
१२२९३	।।ना.गा.१९३८.००२।।	एक जन्मीं ओळखी करा आत्मारामा । संसारा सुगम भोगूं नका
१२२९४	।।ना.गा.१९३८.००३।।	संसारीं असावें असोनि नसावें । कीर्तन करावें वेळोवेळां
१२२९५	।।ना.गा.१९३८.००४।।	नामा म्हणे विठो भक्ताचिये द्वारीं । घेऊनियां करीं सुदर्शन
१२२९६	।।ना.गा.१९३९.००१।।	वावडी दुरिच्या दुरी उडतसे अंबरीं । हातीं असे दोरी परि लक्ष तेथें
१२२९७	।।ना.गा.१९३९.००२।।	दुडी वरी दुडी पाण्या निघाली गुजरी । चाले मोकळ्या करीं परि लक्ष तेथें
१२२९८	।।ना.गा.१९३९.००३।।	व्यभिचारि नारी परपुरुष जिव्हारीं । वर्ते घरोचारीं परि लक्ष तेथें
१२२९९	।।ना.गा.१९३९.००४।।	तस्कर नगरीं परद्रव्य जिव्हारीं । वर्ते घरोघरीं परि लक्ष तेथें
१२३००	।।ना.गा.१९३९.००५।।	धनलोभ्याचें धन ठेवियेलें दुरी। वर्ते ग्रामांतरीं परि लक्ष तेथें
१२३०१	।।ना.गा.१९३९.००६।।	नामा म्हणे असावें भलतिया व्यापारीं । लक्ष सर्वेश्वरीं ठेवूनियां

१२३०२	।।ना.गा.१९४०.००१।।	भक्तिवीण मोक्ष नव्हे हा सिद्धांत । वेद बोले हात उभारोनि
१२३०३	।।ना.गा.१९४०.००२।।	जगीं तेंचि ज्ञान जाणाया लागुनि । संता वोळगोनि वश्य कीजे
१२३०४	।।ना.गा.१९४०.००३।।	प्रपंच हा खोटा शास्त्रें निवडीला । पाहिजे साक्षीला सद्गुरु तो
१२३०५	।।ना.गा.१९४०.००४।।	नामा म्हणे सेवा घडावी संतांची । घ्यावी कृपा त्यांची तेंचि ज्ञान
१२३०६	।।ना.गा.१९४१.००१।।	हरीवीण जिणें व्यर्थचि संसारीं । जग अलंकारीं मिरवीत
१२३०७	।।ना.गा.१९४१.००२।।	देवाविण शब्द लटकें करणें । भांडा रंजविणें सभेमाजीं
१२३०८	।।ना.गा.१९४१.००३।।	आचार करणें देवाविण जो गा । सर्पाचिया अंगा मृदुपण
१२३०९	।।ना.गा.१९४१.००४।।	नामा म्हणे काय बहु बोलों फार । भक्तिविण नर अभागी तो
१२३१०	।।ना.गा.१९४२.००१।।	तुम्हां स्वहित करणें आहे । सेवा राघोबाचे पाय
१२३११	।।ना.गा.१९४२.००२।।	दुष्टबुद्धि दुरी करा । तोडा अविद्येचा थारा
१२३१२	।।ना.गा.१९४२.००३।।	शुद्ध करा तुमचें मन । तुम्हां जवळी नारायण
१२३१३	।।ना.गा.१९४२.००४।।	निर्मळ करा अंत:करण । लावा राघोबासी ध्यान
१२३१४	।।ना.गा.१९४२.००५।।	नामा म्हणे दृढ धरा । तारू निर्वाणींचा खरा
१२३१५	।।ना.गा.१९४३.००१।।	मृगजळडोहो कां उपससी वायां । वेगीं लवलाह्या शरण रिघें
१२३१६	।।ना.गा.१९४३.००२।।	भजे तूं विठ्ठला सर्वांभूतीं भावें । न लगती नांवें आणिकांचीं
१२३१७	।।ना.गा.१९४३.००३।।	होईल सुटका घडेल भजन । नाम जनार्दन येईल वाचे
१२३१८	।।ना.गा.१९४३.००४।।	नामा म्हणे घडे भजन विठ्ठलीं । ऐसे हे निमाली भक्ति करी
१२३१९	।।ना.गा.१९४४.००१।।	हरिसी शरण रिघा वहिलें । राहे कळिकाळ उगले
१२३२०	।।ना.गा.१९४४.००२।।	खंडलें एका बोलें । विठ्ठल समर्थें अंगिकारिलें
१२३२१	।।ना.गा.१९४४.००३।।	नामयानें संसारा जिंकिलें । केशवचरणीं मन ठेविलें
१२३२२	।।ना.गा.१९४५.००१।।	न लगती डोंगर चढावे । हळुच पाऊल धरावें
१२३२३	।।ना.गा.१९४५.००२।।	विठ्ठलाचे पायीं बरवें । गंगा विनटे स्वभावें
१२३२४	।।ना.गा.१९४५.००३।।	नामा म्हणे तीर्थ बरवें । मुकुटीं धरिलें सदाशिवें
१२३२५	।।ना.गा.१९४६.००१।।	आतां पांडुरंग स्मरा । जन्ममृत्यु चुकवा फेरा
१२३२६	।।ना.गा.१९४६.००२।।	ऐसा कांहीं करा नेम । मुखीं स्मरा रामनाम
१२३२७	।।ना.गा.१९४६.००३।।	चिंता ऐसें ध्यान । तेणें असा समाधान

१२३२८	।।ना.गा.१९४६.००४।।	नामा म्हणे हरिदास । त्यासि असावा अभ्यास
१२३२९	।।ना.गा.१९४७.००१।।	हरिकथा ऐकतां अन्ये पैं गोष्टी । निधान त्या दृष्टीं अंतरलें
१२३३०	।।ना.गा.१९४७.००२।।	घडी घडी प्रेम अंतरु न द्यावें । सावधान व्हावें रामनामीं
१२३३१	।।ना.गा.१९४७.००३।।	यापरी स्वहितीं ठेवियेलें लक्ष । ते पावती मोक्ष म्हणे नामा
१२३३२	।।ना.गा.१९४८.००१।।	एकवेळ नयनीं पहावा । मग जाईजे भलत्या गांवा
१२३३३	।।ना.गा.१९४८.००२।।	आठवाल वेळोवेळां । विठोबा आहे रे जवळां
१२३३४	।।ना.गा.१९४८.००३।।	ह्रदयीं मांडुनियां ठसा । नामा म्हणे केशवा ऐसा
१२३३५	।।ना.गा.१९४९.००१।।	राम वाचे बोल । तया पुरुषा नाहीं मोल
१२३३६	।।ना.गा.१९४९.००२।।	धन्य तयाचें शरीर । वरी जना उपकार
१२३३७	।।ना.गा.१९४९.००३।।	ऋणिया तो तारी । विश्वव्यापक तो हरि
१२३३८	।।ना.गा.१९४९.००४।।	नामा म्हणे स्वामी । सुखें वसे अंतर्यामीं
१२३३९	।।ना.गा.१९५०.००१।।	राम म्हणतां रामचि होसी । भाक घेईं मजपाशीं
१२३४०	।।ना.गा.१९५०.००२।।	लवण समुद्रां जागा मागे । तेंहि समुद्र जालें अंगें
१२३४१	।।ना.गा.१९५०.००३।।	वात दीपासंगें गेली । तेहि दीप अंगें जाली
१२३४२	।।ना.गा.१९५०.००४।।	नामा सांगे भाविक लोकां । नाम घेतां राहूं नका
१२३४३	।।ना.गा.१९५१.००१।।	केशव म्हणतां जासी केशवपंथें । त्याहुनि सरतें आणिक नाहीं
१२३४४	।।ना.गा.१९५१.००२।।	वेद कां पढसी शास्त्र कां सांगसी । उदंड वाचेसी हरी म्हणतां
१२३४५	।।ना.गा.१९५१.००३।।	पहा याहुनियां आन नाहीं सार । भीष्में युधिष्ठिर उपदेशिला
१२३४६	।।ना.गा.१९५१.००४।।	नामा म्हणे धरी केशवीं विश्वास । तरसी गर्भवास नामें येकें
१२३४७	।।ना.गा.१९५२.००१।।	गुळ गोड न लगे म्हणावा । तैसा देव न लगे वानावा
१२३४८	।।ना.गा.१९५२.००२।।	सेवी तोचि चवी जाणे । येरा सांगतां लाजिरवाणें
१२३४९	।।ना.गा.१९५२.००३।।	नामा म्हणे या खुणा । तुम्ही ओळखा पंढरिराणा
१२३५०	।।ना.गा.१९५३.००१।।	मारगीं चालतां उगलें न चालावें । वाचेसी म्हणावें रामकृष्ण
१२३५१	।।ना.गा.१९५३.००२।।	हरि बा हरि मुकुंदा मुरारी । माधव नरहरी केशिराज
१२३५२	।।ना.गा.१९५३.००३।।	ऐसा छंद वाचे सर्वकाळ जया । नामा म्हणे तया दोष कैंचे
१२३५३	।।ना.गा.१९५४.००१।।	देवा सन्मुख दीपमाळा । कोणी भक्त हो उजळा

१२३५४	।।ना.गा.१९५४.००२।।	तेल घाला रे फारसें । नाम म्हणा रे उल्हासें
१२३५५	।।ना.गा.१९५४.००३।।	नामा दीपमाळा उजळी। तेणें भक्ति त्यासी जाळी
१२३५६	।।ना.गा.१९५५.००१।।	तो देव स्मरा रे अनंतु । जो कां वैकुंठींचा नाथु । दृढ धरा रे हृदयांतु । तेणें यमपंथु चुकेल
१२३५७	।।ना.गा.१९५५.००२।।	आकांतीं द्रौपदिये स्मरिला। तिचीं वस्त्रें आपणचि जाला । सभेमाजीं मान रक्षिला । काळ पैं जाला कौरवांचा
१२३५८	।।ना.गा.१९५५.००३।।	विमलार्जुन उन्मळिला । जरासंध तोहि मारिला । कंसासुर निर्दाळिला । कान्हया जाला गोकुळींचा
१२३५९	।।ना.गा.१९५५.००४।।	धृव जेणें अढळपदीं बैसविला। नामें एके अजामेळ उद्धरिला । उत्तरेचा गर्भ रक्षिला । तैं सोडविला परीक्षिती
१२३६०	।।ना.गा.१९५५.००५।।	जाति कुळ न पाहसी । नामें एकें उद्धरिलें गणिकेसी। त्या गोपाळाचें उच्छिष्ट खासी । गज सोडविसी पाणियाडें
१२३६१	।।ना.गा.१९५५.००६।।	ऐसा तूं कृपाळु गा देवा । प्रसन्न जालासि पांडवा। विष्णुदासा नामा विनवी केशवा । प्रेमभाव द्यावा मजलागीं
१२३६२	।।ना.गा.१९५६.००१।।	भक्त प्रल्हादाकारणें । वैकुंठीहुनि धांवणें
१२३६३	।।ना.गा.१९५६.००२।।	नरहरी पातला पातला । महादोषा पळ सुटला
१२३६४	।।ना.गा.१९५६.००३।।	शंख चक्र पद्म गदा । ना भी ना भी रे प्रल्हादा
१२३६५	।।ना.गा.१९५६.००४।।	दैत्य धरी मांडीवरी । नखें विदारी नरहरी
१२३६६	।।ना.गा.१९५६.००५।।	पावला गरुडध्वज । नामया स्वामी केशवराज
१२३६७	।।ना.गा.१९५७.००१।।	जागा रे गोपाळांनों रामनामीं जागा । कळिकाळ अंकणा महादोष जाती भंगा
१२३६८	।।ना.गा.१९५७.००२।।	सहस्रदळ समान अनुहत ध्वनि उठी । नामाचेनि बळें पापें रिघालीं कपाटीं
१२३६९	।।ना.गा.१९५७.००३।।	दशमी एक व्रत करी दिंडी दरुशन । एकादशीं उपवास तुम्ही जागा जागरण
१२३७०	।।ना.गा.१९५७.००४।।	द्वादशी साधन कोटिकुळें उद्धरती । नामा म्हणे केशव ठाव देईल वैकुंठीं
१२३७१	।।ना.गा.१९५८.००१।।	नामामृत सरिता पवित्र हरिकथा । त्रिभुवनींच्या तीर्थां मुगुटमणि
१२३७२	।।ना.गा.१९५८.००२।।	तेथें माझ्या मना होई क्षेत्रवासी । राहे संतापाशीं सुख घेत
१२३७३	।।ना.गा.१९५८.००३।।	अहिक्य परत्र समतीरीं साजिरी । परमानंद लहरी हेलावती
१२३७४	।।ना.गा.१९५८.००४।।	मुक्तीची माउली मोक्षाची गाउली। शिणल्या साउली विषयासक्ता
१२३७५	।।ना.गा.१९५८.००५।।	तेथें सनकादिक प्रेमळ सकळ । राहिले निश्चळ करुनि चित्त
१२३७६	।।ना.गा.१९५८.००६।।	नामा म्हणे माझे सखे हरिजन । तारूं त्याचे चरण दृढ धरा
१२३७७	।।ना.गा.१९५९.००१।।	नित्य नेम आम्हां चिंतन श्रीरामा । आणिका त्या नेमा नेघों नेघों
१२३७८	।।ना.गा.१९५९.००२।।	वळंघलों हरि भूतभाव निर्धारीं । दिसे चराचरीं हरिरूप
१२३७९	।।ना.गा.१९५९.००३।।	जें जें पडे दृष्टीं आणिक नाहीं सृष्टीं । हरिरूपीं भेटी हेंचि दिसे

१२३८०	।।ना.गा.१९५९.००४।।	नामा म्हणे विठ्ठल सर्वांभूतीं आहे । आणिक उपाय न लगती
१२३८१	।।ना.गा.१९६०.००१।।	एके हातीं टाळ एके हातीं दिंडी । म्हणा वाचे उदंडी रामनाम
१२३८२	।।ना.गा.१९६०.००२।।	श्रीहरिसारिखा गोसावी पैं चांगू । फेडिला पै पांगु जन्मांतरिचा
१२३८३	।।ना.गा.१९६०.००३।।	तैसें नृत्य करी वेडें बागडें । वदन वाकुडें करूनियां
१२३८४	।।ना.गा.१९६०.००४।।	चुकलें पाडस कुरंगिणि गिवसिती । तैसा हृषिकेशी न्याहाळी तूतें
१२३८५	।।ना.गा.१९६०.००५।।	धेनु पान्हाय हुंबरे वत्सातें । तैसा वोरस तूतें केशिराज
१२३८६	।।ना.गा.१९६०.००६।।	नामा म्हणे इतुकें न करवें निर्दैवा । तरी वाचेसि केशवा उच्चारी पां
१२३८७	।।ना.गा.१९६१.००१।।	गुण दोष त्याचे म्हणतां श्लाघिजे । निर्वासन कीजे चित्त आधीं
१२३८८	।।ना.गा.१९६१.००२।।	गाऊं नाचूं आम्हीं आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्हीं मागों देवा
१२३८९	।।ना.गा.१९६१.००३।।	मनाची पैं वृत्ती बुडे प्रेमडोहीं । नाठवती देहीं दुजा भाव
१२३९०	।।ना.गा.१९६१.००४।।	सगुणीं निर्गुणी एकचि आवडी । चित्तीं दिली बुडी चिदानंदी
१२३९१	।।ना.गा.१९६१.००५।।	नामा म्हणे देवा मागणें ऐसी सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं
१२३९२	।।ना.गा.१९६२.००१।।	तुमचें तीर्थ आम्ही आदरें सेवावें । तेणें तें पावावें परब्रह्म
१२३९३	।।ना.गा.१९६२.००२।।	विश्वाकरवीं ब्रह्म म्हणवितां तुम्हीं । म्हणों जी माय आम्हीं पिता तुम्हीं
१२३९४	।।ना.गा.१९६२.००३।।	जो तुमचे चरणिंचा तो नाहीं आम्हां । विष्णुदास नामा नसे तेथें
१२३९५	।।ना.गा.१९६३.००१।।	उदाराचा राजा उभा याचि काजा । उभारोनि भुजा वाट पाहे
१२३९६	।।ना.गा.१९६३.००२।।	म्हणे घ्या रे सुख प्रेम अलौकिक । साधन आणिक न लगे कांहीं
१२३९७	।।ना.गा.१९६३.००३।।	मनाचेनि मनें हृदयीं मज धरा । वाचेसि उच्चारा नाम माझें
१२३९८	।।ना.गा.१९६३.००४।।	जेणें कर्में मज साधिलें पुंडलिकें । तेंचि तुम्हां निकें सांगितलें
१२३९९	।।ना.गा.१९६३.००५।।	म्हणोनि पांडुरंग उभा भीमातीरीं । नामा निरंतरीं वोळगे चरण
१२४००	।।ना.गा.१९६४.००१।।	देवराज आले मंचकीं बैसले । भक्तांसी दिधलें अभयदान
१२४०१	।।ना.गा.१९६४.००२।।	दास हो तुम्ही सकळ सुखी रहा । सुखी राहोनियां आनंद करा
१२४०२	।।ना.गा.१९६४.००३।।	रात्रंदिवस माझें करावें चिंतन । यमाचें बंधन नाहीं तुम्हां
१२४०३	।।ना.गा.१९६४.००४।।	विष्णुदास नामा गाऊनियां गेला । सेजे पहुडला देवराणा
१२४०४	।।ना.गा.१९६५.००१।।	तप थोर देखिलें संसारीं । जो अखंड कीर्तन करी । त्याच्या तपा पुढारिले हरी । हें निर्धारें जाणा हो
१२४०५	।।ना.गा.१९६५.००२।।	धन्य धन्य विष्णुदास । ऐसा हरिनामीं सौरस । ते पितरांसहित वैकुंठ । सर्वकाळ क्रमिती

१२४०६	।।ना.गा.१९६५.००३।।	जप तप ज्ञान विठ्ठल । तयासि नाहीं काळवेळ । टाळी वाजवितांचि निर्मळ । महादोष हरतील
१२४०७	।।ना.गा.१९६५.००४।।	जेथें रामकृष्ण उच्चार । सकळ मंत्रांत मंत्रसार । पांचाहि वदनीं शंकर । नित्य रामनाम जपतसे
१२४०८	।।ना.गा.१९६५.००५।।	तो हा पुंडलिकें उभा केला। आपण दृष्टीसमोर बैसला । कीर्तनें त्रैलोक्य तारिला । स्वानंदानें पितरांसहित
१२४०९	।।ना.गा.१९६५.००६।।	न लगे करावें यज्ञयाग । न लगे आणिक मंत्रलाग । एक सेविलिया पांडुरंग । अनंत तीर्थें घडतील
१२४१०	।।ना.गा.१९६५.००७।।	पंचक्रोशी प्रदक्षिणा । नित्य नमस्कारी विठ्ठल चरणा । तरी घडेल पृथ्वीप्रदक्षिणा । कोटीच्या कोटी अनंत
१२४११	।।ना.गा.१९६५.००८।।	सप्तपुरी द्वादश लिंगें । कीर्तनें डोलती लागवेगें । ऐसे भक्त तारिले पांडुरंगें । विटेवरी उभा नीट राहोनी
१२४१२	।।ना.गा.१९६५.००९।।	नामा सांगे गुह्य गोष्टी । विठ्ठल तारक एक सृष्टी । पंढरी देखिलिया दृष्टी । वैकुंठपद पाविजे
१२४१३	।।ना.गा.१९६६.००१।।	क्रिया कर्म धर्म तिहीं केलें सांग । जिहीं पांडुरंग देखियेला
१२४१४	।।ना.गा.१९६६.००२।।	ओळखोनि मनें धरिला मानसीं । उभा अहर्निशीं हृदय कमळीं
१२४१५	।।ना.गा.१९६६.००३।।	निजानंदबोधें नामाचेनि छंदें । डोलती आनंदें वोसंडत
१२४१६	।।ना.गा.१९६६.००४।।	नाहीं देहस्मृति निमाली वासना । मावळली कल्पना भावाभाव
१२४१७	।।ना.गा.१९६६.००५।।	अखंड विदेही रजतमावेगळे । भोगती सोहळे प्रेमसुख
१२४१८	।।ना.गा.१९६६.००६।।	त्यांचिया द्वारींचा जालोंसे सांडोवा । म्हणोनि केशवा पढिये नामा
१२४१९	।।ना.गा.१९६७.००१।।	अवघी चित्तवृत्ति एकवटोनि जेणें । अवघा धरिला मनें पांडुरंग
१२४२०	।।ना.गा.१९६७.००२।।	अवघें सुख एक तयासि फावलें । अवघें सुफळ जालें जन्म त्याचें
१२४२१	।।ना.गा.१९६७.००३।।	अवघीं व्रतें दानें केली पैं तेणें । ज्याचें विठ्ठलीं ध्यान मन जडलें
१२४२२	।।ना.गा.१९६७.००४।।	नित्य विठ्ठल नाम गर्जती सप्रेमें । अवघे नित्य नेम जाले त्यांचे
१२४२३	।।ना.गा.१९६७.००५।।	अवघा इष्ट मित्र बंधु मातापिता । केला आवडता पांडुरंग
१२४२४	।।ना.गा.१९६७.००६।।	नामा म्हणे ऐसे अवघे संप्रदाय । मिळोनि धरा पाय विठोबाचे
१२४२५	।।ना.गा.१९६८.००१।।	तेरामाजीं तीन सात साक्षात्कार । आठवा निर्धार असीपद
१२४२६	।।ना.गा.१९६८.००२।।	नवमापासुनि दशमाचे अंतीं । बारावा निश्चिती योग जाणा
१२४२७	।।ना.गा.१९६८.००३।।	प्रथम अक्षरीं मध्यमा सूचना । नाम नारायणा अंतकाळीं
१२४२८	।।ना.गा.१९६८.००४।।	नामा म्हणे तुम्ही नाम स्मरा मनीं । वैकुंठभुवनीं वास होय
१२४२९	।।ना.गा.१९६९.००१।।	अनुसरे त्यासी फिरों नेदी मागें । राहे अंगसंगें समागमें
१२४३०	।।ना.गा.१९६९.००२।।	समागमें असे सर्व साक्षी देव । जैसा ज्याचा भाव तैसा राहे
१२४३१	।।ना.गा.१९६९.००३।।	सदा मुखीं नाम आळस न उच्चारीं । प्रीति मानी हरि हास्यमुखें

१२४३२	।।ना.गा.१९६९.००४।।	फळपाकीं सर्व देतील प्राणिया । नामा धरी पाया बळकट
१२४३३	।।ना.गा.१९७०.००१।।	नागवे कळिकाळ ब्रीदावळी पायीं । तोचि लवलाही ध्यायिजेसु
१२४३४	।।ना.गा.१९७०.००२।।	स्मरण विठ्ठल चित्तीं पांडुरंग । नाहीं तया मग जन्ममरण
१२४३५	।।ना.गा.१९७०.००३।।	आपणचि नांदे भक्ताचिये घरीं । आपणचि करी सर्व कृत्य
१२४३६	।।ना.गा.१९७०.००४।।	नामा म्हणे देव पंढरिनिवास । कळिकाळासी वास पाहों नेदी
१२४३७	।।ना.गा.१९७१.००१।।	भीष्मासि आपण पाडियलें रणीं । गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही
१२४३८	।।ना.गा.१९७१.००२।।	कर्ण विदारिला अर्जुनाच्या बाणीं । गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही
१२४३९	।।ना.गा.१९७१.००३।।	हरिश्चंद्र वाहे डोंबाघरीं पाणी । गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही
१२४४०	।।ना.गा.१९७१.००४।।	परीक्षिती बैसे मरण–आसनीं । गोविंदें निर्वाणीं भेटी दिल्ही
१२४४१	।।ना.गा.१९७१.००५।।	नामा म्हणे तुम्ही देव धरा मनीं । गोविंद निर्वाणीं भेटी देई
१२४४२	।।ना.गा.१९७२.००१।।	हरीस श्रवणीं ध्यावो नित्य तुम्ही । ठसावेल ध्यानीं अवघा राम जनीं वनीं
१२४४३	।।ना.गा.१९७२.००२।।	नयनीं सखा पहा कृष्ण न्याहाळुनी । प्रकाशलें तेज रवि गेला लपोनि
१२४४४	।।ना.गा.१९७२.००३।।	हरिचरणीं लावी मन दर्शन । जालिया जाती त्रिविधताप हरपोन
१२४४५	।।ना.गा.१९७२.००४।।	तुळसीचा सुगंध मस्तकीं धरा । नामा म्हणे चरण दृढ धरा
१२४४६	।।ना.गा.१९७३.००१।।	जिव्हे केशवाचें करितां कीर्तन । मिथ्या वदूं नको एक रामाविण
१२४४७	।।ना.गा.१९७३.००२।।	म्हणऊनि हरिरंगीं रंगा । नाम घेतां महापातकें जाती भंगा
१२४४८	।।ना.गा.१९७३.००३।।	चित्तीं चिंतितां होई तद्रूप । मिथ्या विषयीं लुब्ध जालिया काय सुख
१२४४९	।।ना.गा.१९७३.००४।।	भजन करा तुम्ही अच्युताचें । नामा म्हणे एकचित्तें साचें
१२४५०	।।ना.गा.१९७४.००१।।	संसार बंधन केलें जेणें शून्य । तयासी अनन्य शरण रिघा
१२४५१	।।ना.गा.१९७४.००२।।	मायबाप सखा विठ्ठल विसांवा । त्याचे पायीं ठेवा सदा मन
१२४५२	।।ना.गा.१९७४.००३।।	निजबोधरूप तोचि ज्ञानदीप । आनंदस्वरूप बाप माझा
१२४५३	।।ना.गा.१९७४.००४।।	नामा म्हणे त्याचे संगतीचा वारा । पावे पैल पारा हेळामात्रें
१२४५४	।।ना.गा.१९७५.००१।।	आगमीं नाम निगमीं नाम । पुराणीं नाम केशवाचें
१२४५५	।।ना.गा.१९७५.००२।।	अर्थी नाम पदीं नाम । धृपदीं नाम त्या केशवाचें
१२४५६	।।ना.गा.१९७५.००३।।	अनुभवें भावें कपटें प्रपंचें । परि हरिचें नाम येऊं दे वाचे
१२४५७	।।ना.गा.१९७५.००४।।	नाम व्हावें नाम व्हावें । नाम व्हावें त्या केशवाचें

१२४५८	।।ना.गा.१९७५.००५।।	ऐसें नाम बहु सुंदर । नामीं तरले लहान थोर
१२४५९	।।ना.गा.१९७५.००६।।	नामा म्हणे अंतर । पडों नेदी या ऊपर
१२४६०	।।ना.गा.१९७६.००१।।	जें जें पुण्य जोडे हरिनाम गजरीं । त्याचे वाटेंकरी दोघेजण
१२४६१	।।ना.गा.१९७६.००२।।	सावधान श्रोता आणि प्रेमळ वक्ता । जो भजे अनंता निर्विकल्प
१२४६२	।।ना.गा.१९७६.००३।।	तेणें सुखें सुख वाढे नीच नवें । जाणती अनुभवें संतजन
१२४६३	।।ना.गा.१९७६.००४।।	हातीं सुदर्शन आनंदें कीर्तनीं । उभा चक्रपाणि मागें पुढें
१२४६४	।।ना.गा.१९७६.००५।।	प्रीतीच्या वोरसें अभयदान देत । ह्रदयीं आळंगत आपुल्या दासा
१२४६५	।।ना.गा.१९७६.००६।।	धर्म अर्थ काम मोक्ष आणि मुक्ति । टाकोनियां येती विश्रांतीसी
१२४६६	।।ना.गा.१९७६.००७।।	करूनी कीर्तनाचा घोष मनीं धरूनी आस । पहातसे वास पंढरीची
१२४६७	।।ना.गा.१९७६.००८।।	नामा म्हणे धन्य धन्य ते संसारीं । न सांडितो वारी पंढरीची
१२४६८	।।ना.गा.१९७७.००१।।	अवघे ते संसारीं जाणावे ते धन्य । ज्यांचें पूर्ण प्रेम पांडुरंगीं
१२४६९	।।ना.गा.१९७७.००२।।	अवघे ते दैवाचे विठ्ठल म्हणती वाचे । अवघें कुळ त्याचें पुण्यरूप
१२४७०	।।ना.गा.१९७७.००३।।	अवघे रूपीं एक विठ्ठल भाविती । अवघे मनें भजती अवघेपणें
१२४७१	।।ना.गा.१९७७.००४।।	अवघे मिथ्या जाणोनि अवघिया विठ्ठलें । अवघे विनटले विठ्ठलपायीं
१२४७२	।।ना.गा.१९७७.००५।।	अवघे पूर्ण बोधें भावें प्रेमें प्रीती । ध्यानीं गीतीं गाती केशिराज
१२४७३	।।ना.गा.१९७७.००६।।	अवघा हा विठ्ठल भोगीं दिनराती । वोळगे किंकरवृत्ति नामा त्यातें
१२४७४	।।ना.गा.१९७८.००१।।	अवघेची वरती एकवटुन जाणे। अवघा धरीला मनें पांडुरंग
१२४७५	।।ना.गा.१९७८.००२।।	अवघे सुख एक तयास पावले। अवघे सफळ त्याचे जाले जन्मा
१२४७६	।।ना.गा.१९७८.००३।।	अवघी रते दाने केली पै तयाने। जयाचे विठ्ठली मन जडले
१२४७७	।।ना.गा.१९७८.००४।।	नित्य विठ्ठलनाम गर्जती सप्रेम। अवघे नित्य नेम जाले त्याचे
१२४७८	।।ना.गा.१९७८.००५।।	अवघे इष्ट मित्र बंधु माता पीता। केला आवडता पांडुरंग
१२४७९	।।ना.गा.१९७८.००६।।	नामा म्हणे ऐसे अवघे संप्रदाय। मिळोनी धरा पाय विठोबाचे
१२४८०	।।ना.गा.१९७९.००१।।	सर्व जिवा करी कारुण्य । वाचे सत्य उच्चारण । नित्य नामस्मरण । तोचि दास भगवंताचा
१२४८१	।।ना.गा.१९७९.००२।।	धन्य धन्य भूमंडळीं । धन्य धन्य साधुवचन पाळी । वेदमर्यादा वेगळीं । कार्यें न करी सर्वथा
१२४८२	।।ना.गा.१९७९.००३।।	प्रात:काळीं उठुनी । नरहरिनाम उच्चारूनि । उभा राहुनि कीर्तनीं । जय जय नामें गर्जतसे
१२४८३	।।ना.गा.१९७९.००४।।	देवभक्ति आवडे ज्यासी । पुण्यप्रारब्ध म्हणती त्यासी । जो उपजोनि आपुले वंशीं । पूर्वजांसि उद्धरितो

१२४८४	।।ना.गा.१९७९.००५।।	तीर्थें एक भावभजन । नित्य सत्य तें पिंडदान । भूतदया तें भागीरथी स्नान । तेथ जनार्दन उभा असे
१२४८५	।।ना.गा.१९७९.००६।।	देखिलिया ब्राह्मण । वेदांसमान देत मान । यथाशक्ति करूनि दान । अतिथिपूजन जो करी
१२४८६	।।ना.गा.१९७९.००७।।	नामा म्हणे तोचि तरे । वैकुंठ तेथें उतरे । तीर्थें म्हणती तो त्वरें । पाहों दृष्टी एकवेळ
१२४८७	।।ना.गा.१९८०.००१।।	ब्रह्म ते ब्राह्मण श्रुतिचें वचन । सर्व नारायण सर्वांभूतीं
१२४८८	।।ना.गा.१९८०.००२।।	चहूं दिशाजनीं गुरु चाऱ्ही वर्ण । प्रत्यक्ष पुराणें साक्ष देती
१२४८९	।।ना.गा.१९८०.००३।।	हेळसुनी निंदी दुरावी ब्राह्मणा । सभेमाजीं जाणा दुऱ्हाविती
१२४९०	।।ना.गा.१९८०.००४।।	त्याचें पाप नाहीं खंडन सर्वथा । म्हणोनि अनंता भय वाटे
१२४९१	।।ना.गा.१९८०.००५।।	कोपला प्रहार ब्राह्मणा मारिला । लक्ष वेडावलीं भूषण त्या
१२४९२	।।ना.गा.१९८०.००६।।	क्रोध अग्निज्वाळा झगडती जेथें । न उरती तेथें काडिमात्रें
१२४९३	।।ना.गा.१९८०.००७।।	उगेंच ब्राह्मणा सांबें छळियेलें । सर्व शांत जालें आपोआप
१२४९४	।।ना.गा.१९८०.००८।।	अपेक्षिती कोण्ही तेंचि तें होतें । न बोलावे तेथें बोल कांहीं
१२४९५	।।ना.गा.१९८०.००९।।	अग्निसी लहान थोर न म्हणावा । पडे परिस्वाहा सर्व कांहीं
१२४९६	।।ना.गा.१९८०.०१०।।	मार्कंडेय बुद्धी छळुनि ब्राह्मण । आयुष्य तें उणें होय माझें
१२४९७	।।ना.गा.१९८०.०११।।	ब्राह्मणाचें वीर्य मातंगीचे पोटीं । त्याचि एका गोष्ट आशिर्वादे
१२४९८	।।ना.गा.१९८०.०१२।।	आयुष्याचें कल्प सात चौदा होती । ऐकोनि विश्रांति कीर्तनानें
१२४९९	।।ना.गा.१९८०.०१३।।	धन्य गोत वित्त स्त्रिया आणि पुत्र । सर्व व्हावें हित ब्राह्मणातें
१२५००	।।ना.गा.१९८०.०१४।।	कुळक्षयों व्हावें ऐसे वाटे जीवा । ब्राह्मणासी दावा नको बापा
१२५०१	।।ना.गा.१९८०.०१५।।	नामा म्हणे ऐसे धन्य ते ब्राह्मण । धरिले चरण माथां त्यांचे
१२५०२	।।ना.गा.१९८१.००१।।	भक्त विठोबाचे भोळे । त्यांचे पायीं ज्ञान लोळे
१२५०३	।।ना.गा.१९८१.००२।।	भक्तिविण शब्दज्ञान । व्यर्थ अवघें तें जाण
१२५०४	।।ना.गा.१९८१.००३।।	नाहीं ज्याचे चित्तीं भक्ती । जळो तयाची व्युत्पत्ति
१२५०५	।।ना.गा.१९८१.००४।।	नामा म्हणे ऐसें जाण । नाहीं भक्तासी बंधन
१२५०६	।।ना.गा.१९८२.००१।।	पिता शिकवी पुत्रासी । नको जाऊं बापा हरिकथेसी । तेथें पांचा तोंडाची विवशी । ते वैष्णवें आणिली आहे
१२५०७	।।ना.गा.१९८२.००२।।	तिचियां गळां रुंडमाळा । अंगीं स्मशानींचा उधळा । कंठी सर्पाचें हळाहळ । गजचर्म पांघुरलें
१२५०८	।।ना.गा.१९८२.००३।।	नको जाऊं बापा तेथें । मागुता न येशी रे येथें । जे जे पाहूं गेले तियेतें । ते आले नाहीं मागुते
१२५०९	।।ना.गा.१९८२.००४।।	चंद्र पाहो गेला तियेसीं । ओढुनि बांधिला माळेसी । तैसा पडसी अभरंवशीं । मग मुकशी संसाराशी बापा

१२५१०	।।ना.गा.१९८२.००५।।	वारितां वारितां धृव गेला । तो नेऊनि अढळपदीं घातला । बळी देशवटा दिधला । तो घातला पाताळीं
१२५११	।।ना.गा.१९८२.००६।।	नारदा दिधली कांसवटी । हनुमान केला हिंपुटी । रुक्मांगदाची वैकुंठीं । नगरी नेऊनि घातली
१२५१२	।।ना.गा.१९८२.००७।।	तिचे वैष्णव शहाणे । कळों नेदिती आपुली विंदानें । हरिकथारंगीं नाचणें । नाम कल्लोळीं
१२५१३	।।ना.गा.१९८२.००८।।	तीस दहा हात अकरा डोळे । ती किती काळाची न कळे । भयानक श्रीमुख कमळें । हातीं घेऊनि हिंडतसे
१२५१४	।।ना.गा.१९८२.००९।।	भस्म डौर त्रिशूळ हातीं । ते न वर्णवे वेदश्रुतीं । तिसी नाहीं कुळ याती । आपपर तैं कैंचे
१२५१५	।।ना.गा.१९८२.०१०।।	ते वेदशास्त्रा अगोचर । तीसवें असे एक ढोर । कोठें न मिळेचि बिढार । म्हणोनि स्मशानीं वसतसें
१२५१६	।।ना.गा.१९८२.०११।।	ऐसी ती थोर लांब । तिसी गांव ना शिव । कोठेंचि न मिळे ठाव । म्हणोनि समुद्रिं वसतसे
१२५१७	।।ना.गा.१९८२.०१२।।	तेथें सर्पाचें अंथरुण करी । निद्रा उदकाभीतरीं। तया वैष्णवा माझारीं । निरंतरीं वर्ततसे
१२५१८	।।ना.गा.१९८२.०१३।।	सांगेन ते परियेसी । आहे ती संत महंतापाशीं । आणि हरिकथेसी। बैसली असे
१२५१९	।।ना.गा.१९८२.०१४।।	म्हणवोनि विश्वासें तूं जासी । मुकसी आपल्या संसाराशी । नामा विनवी श्रोतियांसी । हें बोलणें वेदांचें
१२५२०	।।ना.गा.१९८३.००१।।	ऐसा आज्ञापी भक्तांसी आपण । त्यागा अभिमान तुम्ही जाण
१२५२१	।।ना.गा.१९८३.००२।।	जाणावें प्रत्यक्ष स्वरूप सगुण । सर्व नारायण तोचि दिसे
१२५२२	।।ना.गा.१९८३.००३।।	दिसे गोपाळांसी गोपिकांसहित । आनंदें डुल्लत म्हणे नामा
१२५२३	।।ना.गा.१९८४.००१।।	सांडूनि पंढरिची वारी । मोक्ष मागती ते भिकारी
१२५२४	।।ना.गा.१९८४.००२।।	ताट वोगरिलें निकें । सांडुनि कवण जाय भिके
१२५२५	।।ना.गा.१९८४.००३।।	जो नेणें नामगोडी । तोचि मुक्तितें चरफडी
१२५२६	।।ना.गा.१९८४.००४।।	आम्ही पंढरिचे लाटे । नवजो वैकुंठींचे वाटे
१२५२७	।।ना.गा.१९८४.००५।।	झणीं भ्याल गर्भवासा । नामा म्हणे विष्णुदासा
१२५२८	।।ना.गा.१९८५.००१।।	पंढरीची वारी करील जो कोणी । त्याच्या चक्रपाणि मागें पुढें
१२५२९	।।ना.गा.१९८५.००२।।	लोखंड असतां सोनें जालें कैसें । समागम–मिषें गुणें त्याच्या
१२५३०	।।ना.गा.१९८५.००३।।	तैसें एकवेळ करी मायबापा । चुकवी या खेपा चौऱ्यांशीच्या
१२५३१	।।ना.गा.१९८५.००४।।	नामा म्हणे असो प्रारब्ध सरे । होई कृपण निकुरें चरणाचें
१२५३२	।।ना.गा.१९८६.००१।।	धन्य तोचि जगीं जाणा राजयोगी। जेणें पांडुरंगीं धरिला भाव
१२५३३	।।ना.गा.१९८६.००२।।	संकल्पविकल्पशून्य करुनी मन। हृदई धरिले ध्यान विठोबाचे
१२५३४	।।ना.गा.१९८६.००३।।	सर्व पाप रासी तेणें केली होळी। वाजवीली टाळी विठ्ठल नामीं
१२५३५	।।ना.गा.१९८६.००४।।	कोटी कुळें होती क्षणेचि पावन। एक केल्या स्नान चंद्रभागे

१२५३६	।।ना.गा.१९८६.००५।।	शोक मोह दुःख विध्वंसीले हेळा। अवलोकीला डोळा पांडुरंग
१२५३७	।।ना.गा.१९८६.००६।।	नामा म्हणे धन्य धन्य ते संसारी। चालवीती वारी पंढरीची
१२५३८	।।ना.गा.१९८७.००१।।	पंढरीस जावें जीवनमुक्त व्हावें । विठ्ठला भेटावें जिवलगा
१२५३९	।।ना.गा.१९८७.००२।।	कायावाचामन चरणीं ठेवावें । प्रेमसुख घ्यावें सर्वकाळ
१२५४०	।।ना.गा.१९८७.००३।।	सुखाचें साजिरें श्रीमुख पहावें । जीवें उतरावें निंबलोण
१२५४१	।।ना.गा.१९८७.००४।।	बाहेरी भीतरीं कैवल्य अवघें। वाचे न बोलावे ब्रह्मानंदु
१२५४२	।।ना.गा.१९८७.००५।।	चिरंजीव नामा कंठीं धरी प्राण । करी तुझें ध्यान रात्रंदिवस
१२५४३	।।ना.गा.१९८८.००१।।	विचारूनि पाहा पंढरिचें पाडें । सुख होय थोडें क्षीरसिंधु
१२५४४	।।ना.गा.१९८८.००२।।	सांडुनि वैकुंठ आले जगजेठी । वस्ती वाळवंटीं केली जाण
१२५४५	।।ना.गा.१९८८.००३।।	भक्त सहाकारी ब्रीदें बडिवार । सेवा सुखसार पांडुरंग
१२५४६	।।ना.गा.१९८८.००४।।	जिवाचे सोयरे न मिळे वैकुंठीं । हरिदासा भेटी आडलिया
१२५४७	।।ना.गा.१९८८.००५।।	प्रीतीचे वोरस उभा मागें पुढें । जीवासी आवडे भक्तराणा
१२५४८	।।ना.गा.१९८८.००६।।	लक्ष्मीचा विलास न वाटे विश्रांती । आवडे श्रीपति भक्तभावा
१२५४९	।।ना.गा.१९८८.००७।।	संगें सर्व काळ धांवे पाटो वाटी । घाली कृपादृष्टी तयावरी
१२५५०	।।ना.गा.१९८८.००८।।	अमृत सुरस नव्हेति पैं गोडी । म्हणोनि आवडी काल्याची
१२५५१	।।ना.गा.१९८८.००९।।	हरुषें निर्भर सुरवरां खेळे । वाळवंटीं लोळे संतसंगें
१२५५२	।।ना.गा.१९८८.०१०।।	अठ्ठावीस युगें उभा विटेवरी । भक्तप्रिय हरि स्वामी माझा
१२५५३	।।ना.गा.१९८८.०११।।	नामा म्हणे त्याचे सुखरूप पाय । क्षणेक न होय जीवाहुनी
१२५५४	।।ना.गा.१९८९.००१।।	पुंडलिकें रचिली पेठ । संत ग्राहिक चोखट
१२५५५	।।ना.गा.१९८९.००२।।	प्रेम साखरा वांटिती । नेघे त्याचे तोंडीं माती
१२५५६	।।ना.गा.१९८९.००३।।	समतेचे फणस गरे । आंबे पिकले पडिभरें
१२५५७	।।ना.गा.१९८९.००४।।	नामद्राक्षाचे घड । अपार रस आले गोड
१२५५८	।।ना.गा.१९८९.००५।।	नामा म्हणे भावें घ्यावें । अभक्तांचें मढें जावें
१२५५९	।।ना.गा.१९९०.००१।।	कर्मजड मूढ पतित पामर । भवसिंधु पार नटके जया
१२५६०	।।ना.गा.१९९०.००२।।	यालागीं पंढरी केली मुक्ति पेठ । भक्तें भूवैकुंठ वसविलें
१२५६१	।।ना.गा.१९९०.००३।।	हेंचि पुंडलिकें मागितलें निकें । जें सर्वथा परलोकें चाड नाहीं

१२५६२	।।ना.गा.१९९०.००४।।	भक्ती मुक्ति सिद्धी जे जया आवडे । तें तया पवाडे विठ्ठलनामें
१२५६३	।।ना.गा.१९९०.००५।।	न लगती सायास करणें काया कलेश । नामाचा विश्‍वास दृढ धरा
१२५६४	।।ना.गा.१९९०.००६।।	नामा म्हणे अवघे चला पंढरिये । भेटों मायबाप पांडुरंगा
१२५६५	।।ना.गा.१९९१.००१।।	अठ्ठावीस युगें उभा ठेला द्वारीं । पुंडलिकावरी ठेवुनि लक्ष
१२५६६	।।ना.गा.१९९१.००२।।	कृपेचा सागर भक्तजनवत्सल। आमुचा विठ्ठल मायबाप
१२५६७	।।ना.गा.१९९१.००३।।	भक्तीसी भाळला अरूप रूपा आला । वेळाईत जाला भक्तालागीं
१२५६८	।।ना.गा.१९९१.००४।।	भक्तिचिया रूपें न घडे तें केलें । वैकुंठा आणिलें भूमंडळीं
१२५६९	।।ना.गा.१९९१.००५।।	भक्ती मुक्ति सिद्धी त्या पायीं लागती । उद्धट गर्जती विठ्ठलनामें
१२५७०	।।ना.गा.१९९१.००६।।	नामा म्हणे केशवा उदाराचा राव । सेवा चरणीं ठाव देई आम्हां
१२५७१	।।ना.गा.१९९२.००१।।	नामाचा गजर गर्जे भीमातीर । महिमा साजे थोर तुज एका
१२५७२	।।ना.गा.१९९२.००२।।	रिद्धि सिद्धि दासी अंगण झाडिती । उच्छिष्टें काढिती मुक्ति चारी
१२५७३	।।ना.गा.१९९२.००३।।	चारी वेद भाट होऊनि गर्जले । सनकादिक गाती कीर्ति तुझी
१२५७४	।।ना.गा.१९९२.००४।।	सुरवरांचे भार अंगणीं लोळती। चरणरज क्षिति शिव वंदी
१२५७५	।।ना.गा.१९९२.००५।।	नामा म्हणे देव ऐसा हो कृपाळू । करि तो सांभाळू अनाथांचा
१२५७६	।।ना.गा.१९९३.००१।।	कां हो तुझी गर्वे जातां। हरी चरणीं ठेवा माथा
१२५७७	।।ना.गा.१९९३.००२।।	शंकर घाली लोटांगण। इतरांचा पाड कोण
१२५७८	।।ना.गा.१९९३.००३।।	सृष्टिकर्ता ब्रह्मदेव। तो हा चरणीं मागें ठाव
१२५७९	।।ना.गा.१९९३.००४।।	शुक सनकादिक योगी। तेहीं पायीं जडले वेगीं
१२५८०	।।ना.गा.१९९३.००५।।	रमेसारखी सुंदरी। झाली पायाची किंकरी
१२५८१	।।ना.गा.१९९३.००६।।	नामा म्हणे विठ्ठल पायीं। जडलिया भय नाहीं
१२५८२	।।ना.गा.१९९४.००१।।	शब्दाचें सुख श्रवणाचेनि द्वारें । माझिया दातारें ऐसें केलें
१२५८३	।।ना.गा.१९९४.००२।।	स्पर्शाचें सुख त्वचेचेनि द्वारें । माझिया दातारें ऐसें केलें
१२५८४	।।ना.गा.१९९४.००३।।	रूपाचें सुख नेत्राचेनि द्वारें । माझिया दातारें ऐसें केलें
१२५८५	।।ना.गा.१९९४.००४।।	रसाचें तें सुख रसनेचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें
१२५८६	।।ना.गा.१९९४.००५।।	गंधाचें सुख नाकाचेनि द्वारें । माझिया दातारें ऐसें केलें
१२५८७	।।ना.गा.१९९४.००६।।	नामा म्हणे ऐसे जयाचे उपकार । तयासी गव्हार विसरले

१२५८८	।।ना.गा.१९९५.००१।।	आप तेज वायु पृथ्वी आणि गगन । त्याचें केलें बा शरिरनिधान
१२५८९	।।ना.गा.१९९५.००२।।	त्यामाजीं घातलें मन पवन । पिंडब्रह्मांड केली रचना
१२५९०	।।ना.गा.१९९५.००३।।	काय सांगों तुझी करणी नारायणा । वेदपारायणा केशिराजा
१२५९१	।।ना.गा.१९९५.००४।।	पृथ्वीवरी तीर्थें आहेत अपार । परि पंढरीची सर एका नाहीं
१२५९२	।।ना.गा.१९९५.००५।।	जन्मोजन्मींच्या पातका दरारा । चुके येरझारा एके खेपे
१२५९३	।।ना.गा.१९९५.००६।।	बह्मज्ञानेंविण मोक्ष आहे भूतीं । वाचेसि म्हणती विठ्ठलनाम
१२५९४	।।ना.गा.१९९५.००७।।	बेचाळिसांसहित जातील वैकुंठा । नामा म्हणे भेटा विठ्ठलदेवा
१२५९५	।।ना.गा.१९९६.००१।।	साठी घडीमाजीं । एक वेंची देवकाजी
१२५९६	।।ना.गा.१९९६.००२।।	आराणूक सारूनि कानीं । सर्वभावें केशव पूजी
१२५९७	।।ना.गा.१९९६.००३।।	हेंचि भक्तीचें लक्षण । संतोषला नारायण
१२५९८	।।ना.गा.१९९६.००४।।	कोटीकुळें पावन तुझीं । नामा म्हणे भाक माझी
१२५९९	।।ना.गा.१९९७.००१।।	तुम्हीं आम्हीं जाऊं चला । भेटूं जिवलगा विठ्ठला
१२६००	।।ना.गा.१९९७.००२।।	विठो सांपडला फुका । जो दुर्लभ तिन्हीं लोकां
१२६०१	।।ना.गा.१९९७.००३।।	वेदपुराणासि वाड । तो हा भाविकांसी भीड
१२६०२	।।ना.गा.१९९७.००४।।	नामा म्हणे वंदूं चरण । कांहीं पुसूं जीवींची खूण
१२६०३	।।ना.गा.१९९८.००१।।	पैल दक्षिणेचा वारा । येतां देखिलें सामोरा
१२६०४	।।ना.गा.१९९८.००२।।	चला चला पंढरपुरा । विठोबारायाच्या नगरा
१२६०५	।।ना.गा.१९९८.००३।।	पायीं संतांच्या लागत । पाचारितो पंढरिनाथ
१२६०६	।।ना.गा.१९९८.००४।।	नामा म्हणे वेग करा । विठ्ठल भक्तांचा सोयरा
१२६०७	।।ना.गा.१९९९.००१।।	पूर्ण परिपूर्ण पंढरी हे पेठ । आपण वैकुंठ समचरण
१२६०८	।।ना.गा.१९९९.००२।।	ऐसें कांहीं करा नाम हेंचि धरा । विठ्ठल अपारा जप करा
१२६०९	।।ना.गा.१९९९.००३।।	करितां साधन नागवी अहंकार । विठ्ठल उच्चार पुण्य ओघें
१२६१०	।।ना.गा.१९९९.००४।।	नामा म्हणे घेई विठ्ठल कुळदेवो । सर्व हाचि भावो केशव ऐसा
१२६११	।।ना.गा.२०००.००१।।	संपदा सोहोळा नावडे मनाला। छंद हा लागला पंढरीचा
१२६१२	।।ना.गा.२०००.००२।।	जावें पंढरीसी आवडे मनासी। कधीं एकादशी आषाढी हे
१२६१३	।।ना.गा.२०००.००३।।	आषाढी कार्तिकी कधीं ये म्हणोनि। जातिया लागोनि पुसतसे

१२६१४	।।ना.गा.२०००.००४।।	नामा म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनी। त्याची चक्रपाणी वाट पाहे
१२६१५	।।ना.गा.२००१.००१।।	न पढावे वेद नको शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा
१२६१६	।।ना.गा.२००१.००२।।	न साधवे योग न साधवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें
१२६१७	।।ना.गा.२००१.००३।।	येर क्रियाकर्म करितां हो कलीं । माजीं कोण बळी तरले सांगा
१२६१८	।।ना.गा.२००१.००४।।	नामा म्हणे गुज सांगितलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं
१२६१९	।।ना.गा.२००२.००१।।	विष्णूचें सेवन जये गांवीं पूजा । नित्य तया द्विजा समारंभु
१२६२०	।।ना.गा.२००२.००२।।	घरीं वृंदावन नित्य अन्नदान । श्रीकृष्ण आपण तेथें असे
१२६२१	।।ना.गा.२००२.००३।।	ऐसी ध्यानगती विष्णूचें पूजन । तयासि पतन नाहीं नाहीं
१२६२२	।।ना.गा.२००२.००४।।	नामा म्हणे करा विष्णुकथा नित्य । रामनाम सत्य वचन धरा
१२६२३	।।ना.गा.२००३.००१।।	संतांचे घरी जाहला पाहुणेर । नामाचा वोगर वाढियला
१२६२४	।।ना.गा.२००३.००२।।	घ्या रे ताटभरी घ्या रे ताटभरी । जेवा पोटभरी रामनाम
१२६२५	।।ना.गा.२००३.००३।।	पायरव होईल दुर्जना न सांगावें । एकांतीं सेवावें म्हणे नामा
१२६२६	।।ना.गा.२००४.००१।।	तप न करिसी जप हृषिकेशी । नाम अहर्निशीं राघोबाचें
१२६२७	।।ना.गा.२००४.००२।।	तीर्थाचें हें तीर्थ नाम हें समर्थ । होईल कृतार्थ रामनामीं
१२६२८	।।ना.गा.२००४.००३।।	साधेल साधन तुटेल बंधन । वाचे नारायण सुफळ सदा
१२६२९	।।ना.गा.२००४.००४।।	नामा म्हणे हरिनाम तें उच्चारी । तरीच उद्धारी इहलोकीं
१२६३०	।।ना.गा.२००५.००१।।	व्रत तप न लगे करणें सर्वथा । न लगे तुम्हां तीर्था जाणें तया
१२६३१	।।ना.गा.२००५.००२।।	आपुलेचि ठायीं असा सावधान । करी हरिकीर्तन सर्वकाळ
१२६३२	।।ना.गा.२००५.००३।।	न लगे तें कांहीं वर्जावें अन्न जीवन । लावा अनुसंधान हरिचे पायीं
१२६३३	।।ना.गा.२००५.००४।।	न लगे योग याग न लगे संग त्याग । असो द्या अनुराग हरिचे पायीं
१२६३४	।।ना.गा.२००५.००५।।	न लगे निरंजनीं करणें वास तुम्हां। दृढ धरा प्रेमा हरिचे नामीं
१२६३५	।।ना.गा.२००५.००६।।	नामा म्हणे नाम दृढ धरा कंठीं । तेणें देईल भेटी पांडुरंग
१२६३६	।।ना.गा.२००६.००१।।	तेहतीस कोटींची केली सोडवण । तो हा राम जपून धरा वेगीं
१२६३७	।।ना.गा.२००६.००२।।	राघवांचें नाम वाचेसी उच्चारा । निजाचा सोयरा रामचंद्र
१२६३८	।।ना.गा.२००६.००३।।	सागरीं ह्या शिळा तारिल्या अवलीळा । ब्रह्मयाची बाला उद्धरिली
१२६३९	।।ना.गा.२००६.००४।।	रावण कुंभकर्ण विदारिले बाणीं । दिधली राजधानी शरणागता

१२६४०	।।ना.गा.२००६.००५।।	वाल्मिकी भविष्य कथुनियां गेला । रामें पवाडा केला तिहीं लोकीं
१२६४१	।।ना.गा.२००६.००६।।	नामा म्हणे रामनाम हें दुर्लभ । शिव स्वयंभ हेंचि जपे
१२६४२	।।ना.गा.२००७.००१।।	अवघे हो ऐका अवघे श्रवणीं । अवघेचि होऊनि एकचित्त
१२६४३	।।ना.गा.२००७.००२।।	विठोबाचें नाम अवघेंचि गोमटें। विचारी नेटेंपाटें आपुल्या मनीं
१२६४४	।।ना.गा.२००७.००३।।	अवघी हेचि क्रिया अवघें हेंचि कर्म । अवघ्या हाचि धर्म सत्य जाणा
१२६४५	।।ना.गा.२००७.००४।।	अवघें हें सगुण अवघें हें निर्गुण । अवघे परिपूर्ण शुद्धबद्ध
१२६४६	।।ना.गा.२००७.००५।।	अवघा हा आचार अवघा हा विचार । अवघा हा संसार सर्वकाळ
१२६४७	।।ना.गा.२००७.००६।।	अवघा जेणें दुरी ठाके भवभ्रम । तें हें निरंतर नाम गाय नामा
१२६४८	।।ना.गा.२००८.००१।।	गुरुराव गुण गंभीर वो वावो चैतन्य प्रकाशु । योगी सहज सुकामिनी विलासु
१२६४९	।।ना.गा.२००८.००२।।	चिदानंदघनु तनु सांवळावो हरि पाहतां निवती लोचन । तनुमन चरणीं वो गुंतलीं नाम गोपाळाचें अमृत समान
१२६५०	।।ना.गा.२००८.००३।।	पितांबरशेला माळ कंठी या रावो गोपाळा । मुगुटीं झळाळ सर्वांगीं कस्तुरीचें विलेपन कटीं रुळे वनमाळा
१२६५१	।।ना.गा.२००८.००४।।	येणेंचि जन्में पाविजे गोपाळाशीं आनु नाहीं सार । श्रीवत्सलांछन हेचि खूण विष्णुदास नामया दातार
१२६५२	।।ना.गा.२००९.००१।।	चेईला तो जाणारे सद्गुरुवचनीं निर्धारिं । विपरित भावना विसर पडिला कंठीं जया परिहार रे
१२६५३	।।ना.गा.२००९.००२।।	आपणा पैं पहावया कवण लांवू दिवा रे । चंद्र सूर्य जेणें प्रकाशे तो मी कैसा पाहूं रे
१२६५४	।।ना.गा.२००९.००३।।	अंत त्यासी नाहीं रे स्थान मान कांहीं रे । चेईला तेणें ओळखिला येरासी भाई रे
१२६५५	।।ना.गा.२००९.००४।।	पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर नाहीं दाही दिशा रे । महाप्रळयीं सप्त सागर एक होती अनुभविया तो तैसा रे
१२६५६	।।ना.गा.२००९.००५।।	दाही दिशा व्यापूनियां तो अंधकार महा– । रविप्रकाश जाहल्या आपोआप निरसला रे
१२६५७	।।ना.गा.२००९.००६।।	काष्ठीं पावक उपजला तोहि तया समोर । नामा म्हणे केशिराजा चेईल्या आम्हां तुम्ही रे
१२६५८	।।ना.गा.२०१०.००१।।	गुरुच्या वचनें होईल पैं ज्ञान । न कळे प्रेमखूण विठोबाची
१२६५९	।।ना.गा.२०१०.००२।।	वेदीं हे विचारा पुराणातें पुसा। विठोबाचा कैसा प्रेमभाव
१२६६०	।।ना.गा.२०१०.००३।।	साधकासी सिद्धि होईल पैं प्राप्ति । न कळे निगुति प्रेमखूण
१२६६१	।।ना.गा.२०१०.००४।।	नामा म्हणे सोडा जाणिवेचा शीण । संतांची हे खूण जाणे संत
१२६६२	।।ना.गा.२०११.००१।।	कृपेचा कोंवळा रघुनाथ दास । धरीन त्याची कास सर्वभावें
१२६६३	।।ना.गा.२०११.००२।।	सांडुनि सर्व संगु होईन शरणागत । करिती मनोरथ पूर्ण माझे
१२६६४	।।ना.गा.२०११.००३।।	भवसिंधुचा पार उतरोनि निर्धारीं । त्यापरतीं सोयरीं नाहीं सृष्टी
१२६६५	।।ना.गा.२०११.००४।।	अंतरींचें गुज सांगती श्रवणीं । अमृत संजीवनी रामनाम

१२६६६	।।ना.गा.२०११.००५।।	तेणें त्रिविधताप हरती मनींचे । जाणती जीवींचे जाले कष्ट
१२६६७	।।ना.गा.२०११.००६।।	तो जिवलग जननी परिस लोभापरु । सर्वस्व उदारु प्राणसखा
१२६६८	।।ना.गा.२०११.००७।।	नामा त्याचे बळें झेलतु यमासी । रिघोनि पाठीसी केशवाच्या
१२६६९	।।ना.गा.२०१२.००१।।	मी माझें म्हणतां अर्थ जोडितां साहिचक्र गेलें । नळ नीळ मांधाता पुरुषार्थी सारिखे तेहि काळें ग्रासियले । कपिल महामुनि सिद्ध विचारितां सागररायें पैं अंगा गेले । कुमार अंत:पुर सांडुनियां ते भक्तराज काय जाले रे
१२६७०	।।ना.गा.२०१२.००२।।	संसार स्वप्न जाणुनियां शरण रिघे पंढरिया राया रे
१२६७१	।।ना.गा.२०१२.००३।।	दुंदुभिरायें धर्म चालविला तेणें शांतिचा सागर म्हणविलें । अजपाळ जैपाळ राजा दशरथ सूर्यवंशीं ते जन्मले
१२६७२	।।ना.गा.२०१२.००४।।	जळींचे तरंग जळींच निमाले नेणों तेथें काय जालें । रामलक्ष्मण भरतशत्रुघ्न सांग पां ते काय जाले रे
१२६७३	।।ना.गा.२०१२.००५।।	सूर्यवंशीं राजा हरिश्चंद्र जन्मला स्वप्न तेणें काय साच केलें । स्त्रीपुत्रातें विकुनियां तेणें ब्राह्मणां सुखिया पैं केलें । शिबी चक्रवर्तीनें आपुले प्राण देऊनि जीव ते भक्तराज काय जाले रे
१२६७४	।।ना.गा.२०१२.००६।।	शरीराचे मुद्गले सामास कवण वेंचि ऋषि भोजनासी आले । स्त्रीपुत्रातें वेंचुनियां तेणें अतिथा सुखी केलें । सत्त्व पहावया कैलासींचा राणा कांतिपूर नगरीं उजू ठेले । श्रियाळ पोटींचें बाळक दिधलें सांग पां तें काय जालें रे
१२६७५	।।ना.गा.२०१२.००७।।	कौरवां पांडवां अति दळ संग्राम अठरा अक्षौहिणि रणासी आले । नववेळ नारायण आले गेले परी अकरा रुद्र गणतीसी आले । छपन्नकोटी यादवें तीं कृष्ण भालुका तीर्थी निमाले। नामा म्हणे ऐसे कल्पनेचे अवघे परंपरी भजिन्नले
१२६७६	।।ना.गा.२०१३.००१।।	तत्त्वमसि वाक्य उपदेशिलें तुज । तें तूं जीवीं कां अझून धरिसी दूर
१२६७७	।।ना.गा.२०१३.००२।।	त्रिभुवनापरता धांवतोसी दुरी । आधीं तूं आपुली शुद्धि करी । उदय अस्तु जाला कवणिये घरीं । पिंडामाझारीं पाहे पां
१२६७८	।।ना.गा.२०१३.००३।।	जागृतीमध्यें कवण जागते । दोहीं माजीं स्वप्न कोण देखतें । सुषुप्तींमध्यें कोण नांदतें । मग अनुवादतें तें कवण
१२६७९	।।ना.गा.२०१३.००४।।	जागृती वरोनि करीं चिंतन । सुषुप्तीमाजीं रिघे ज्ञान । दोन्हींमाजीं स्वप्न देखे कवण । जीव कीं मन सांग पां
१२६८०	।।ना.गा.२०१३.००५।।	निद्रा मरण हें एक स्थान । दोहींचा देखणा जाणे आपण । लहान सुईच्या इंधनाहून । आढळलें मन पांचासीं
१२६८१	।।ना.गा.२०१३.००६।।	इंद्रियें चपळ चेइलीं । जागत होती तीं कां परतलीं । जाऊनियां कवणा घरीं लपालीं । मना मिळालीं कवणें गुणें
१२६८२	।।ना.गा.२०१३.००७।।	सांगतां तेथें अनुवाद कैंचा । नाहीं तूंपण खुंटली वाचा । विष्णुदास नामा वोळिला साचा । परमपदीं बैसलासे
१२६८३	।।ना.गा.२०१४.००१।।	संसार सागरीं रे माझें माहेर पंढरपुरीं । विठोबा बाप माझा माता रखुमाई सुंदरी
१२६८४	।।ना.गा.२०१४.००२।।	पुंडलिक भाऊ माझा तोहि नांदे बरव्यापरी । सासुरें दुर्बळ भारी मज मोकलिलें दुरी
१२६८५	।।ना.गा.२०१४.००३।।	सुखदु:ख कवणा सांगूं माझें माहेर पंढरपुरीं
१२६८६	।।ना.गा.२०१४.००४।।	भ्रतार निष्ठुर वो काम क्रोध दोघे दीर । आशा हे सासू माझी ते मज गांजितसे थोर
१२६८७	।।ना.गा.२०१४.००५।।	तृष्णा हे नणंद सखी तिनें व्यापियेंलें घरीं । भक्ति हे माझी भगिनी ते मज होईल निर्धारीं

१२६८८	।।ना.गा.२०१४.००६।।	वर्ष महिने दिवस घडिया वाट पाहे अजुनी । देहामाजीं करिती देखा न्यावया न पवे कोणी
१२६८९	।।ना.गा.२०१४.००७।।	गजेंद्र हरिश्चंद्र त्यासी सोडवाया आला । प्रल्हाद अंबऋषि तिहीं तुझा धांवा केला
१२६९०	।।ना.गा.२०१४.००८।।	उपमन्यू दूध मागतां क्षीरसागरू दिला । गजेंद्र अजामेळ त्यांच्या सत्त्वा तूं पावला । नामया विष्णुदास गीतीं गोविंदु गाईला
१२६९१	।।ना.गा.२०१५.००१।।	बोलवरी बोलती । श्रुति वाखाणिती । हरि पाविजे ती गति । वेगळी असे
१२६९२	।।ना.गा.२०१५.००२।।	तुज न पवे गा तें स्वप्न । हरिशब्द एकचि ब्रह्म । पाविजे तें वर्म । वेंगळे असे
१२६९३	।।ना.गा.२०१५.००३।।	एक जाणीव खटपट । करिती ते सैराट । हरि पाविजे ती वाट । वेगळी असे
१२६९४	।।ना.गा.२०१५.००४।।	एक आहेत तार्किक । चर्चिकवादक । हरि पाविजे तें सुख । वेगळें असे
१२६९५	।।ना.गा.२०१५.००५।।	एक चातुर्यवक्ते । व्युत्पन्न कवित्वें । संत रंजविते । लोकाचारी
१२६९६	।।ना.गा.२०१५.००६।।	जिहीं तुज जाणितलें । तिहीं मौन धरिलें । नामा म्हणे ते पावले । भक्तियोगें
१२६९७	।।ना.गा.२०१६.००१।।	आम्हां संगतीं नावडे कांहीं । म्हणोनि जालों बा विदेही । दुःखमूळ संगतीचे पाईं । आम्ही नव्हों या गांवींचे
१२६९८	।।ना.गा.२०१६.००२।।	आम्हां नाहीं रूप नांव । वस्तीसी नाहीं एक ठाव । मन घ्या इच्छेसी धांव । आम्ही नव्हों त्या गांवींचे
१२६९९	।।ना.गा.२०१६.००३।।	स्नान केलें गंगातीरीं । गंध लाविलें पंढरपुरीं । संध्या केली कृष्णातीरीं । आम्ही नव्हों त्या गांवींचे
१२७००	।।ना.गा.२०१६.००४।।	भिक्षा केली कोल्हापुरीं । भोजन केलें महाद्वारीं । निद्रा केली माहुरी । आम्ही नव्हों त्या गांवींचे
१२७०१	।।ना.गा.२०१६.००५।।	ऐसियाची संगत करी । त्याचे चरण हृदयीं धरी । नामा म्हणे या संसारी । आम्ही नव्हों त्या गांवींचे
१२७०२	।।ना.गा.२०१७.००१।।	कळावंताच्या कळाकुसरी । त्या मी नेणें गा श्रीहरी
१२७०३	।।ना.गा.२०१७.००२।।	वारा धांवे भलत्या ठायां । तैसी माझी रंगछाया
१२७०४	।।ना.गा.२०१७.००३।।	प्रेमभातें भरले अंगीं । तेणें छंदें नाचे रंगीं
१२७०५	।।ना.गा.२०१७.००४।।	घातमात नेणें देवा । नामा विनविती केशवा
१२७०६	।।ना.गा.२०१८.००१।।	पावावया ब्रह्मपूर्ण । सांडुनि देई दोषगुण
१२७०७	।।ना.गा.२०१८.००२।।	सर्वांभूतीं समदृष्टी । हेचि भक्ति गोमटी
१२७०८	।।ना.गा.२०१८.००३।।	यावेगळे थोर नाहीं । बरवें शोधुनियां पाही
१२७०९	।।ना.गा.२०१८.००४।।	येणें संसार सुखाचा । म्हणे नामा शिंपियाचा
१२७१०	।।ना.गा.२०१९.००१।।	भक्तिप्रतापें पावलों मी सुपंथ । सफळ निश्चित परमार्थ
१२७११	।।ना.गा.२०१९.००२।।	देव सर्वांभूतीं असतां प्रगट । निर्वाणीं चोखट भक्ति जाण
१२७१२	।।ना.गा.२०१९.००३।।	भरुनियां मनीं जपसील नाम । तेणें निजधाम पावसील
१२७१३	।।ना.गा.२०१९.००४।।	जप तप ध्यान न लगे साधन । भक्ति तें कारण नामा म्हणे

१२७१४	।।ना.गा.२०२०.००१।।	माझिया मनें मज उपदेश केला । तो मज बिंबला हृदयकमळीं
१२७१५	।।ना.गा.२०२०.००२।।	निर्वाणीची एक सांगितली खूण । कैवल्य चरण केशवाचे
१२७१६	।।ना.गा.२०२०.००३।।	श्रुति स्मृति आणिक पुराणें । पढोनि जाणणें हेंचि सत्य
१२७१७	।।ना.गा.२०२०.००४।।	क्रिया कर्म धर्म करणें ज्या कारणें । ते खूण निर्वाण चरण हेचि
१२७१८	।।ना.गा.२०२०.००५।।	जप तप अनुष्ठान करोनि साधन । प्रत्यक्ष निधान चरण हेचि
१२७१९	।।ना.गा.२०२०.००६।।	नामा म्हणे मज कळलें अनुभवें । न विसंबे चरण जीवें तुझे
१२७२०	।।ना.गा.२०२१.००१।।	अच्युता अनंता गोविंदा । अरे मेघ:श्यामा तूं आत्मया रामा रे
१२७२१	।।ना.गा.२०२१.००२।।	आत्मया तूं रामा रे । म्हणा म्हणा गोविंद नामा रे
१२७२२	।।ना.गा.२०२१.००३।।	ऐसें तुझें ध्यान लागो आम्हां रे । नामयाचा स्वामी पंढरिराणा रे
१२७२३	।।ना.गा.२०२२.००१।।	द्वारावतीभुवना गेलों । शंख चक्र घेउनी आलों
१२७२४	।।ना.गा.२०२२.००२।।	वाटे प्रपंचें धरियेलों । रामनामें सोडविलों
१२७२५	।।ना.गा.२०२२.००३।।	शंखचक्र भरुनी केणें । द्वारावतीं केलें पेणें
१२७२६	।।ना.गा.२०२२.००४।।	नामा म्हणे लाभ जाला । फुकासाठीं हरि जोडला
१२७२७	।।ना.गा.२०२३.००१।।	अरे अलगटा माझिया तूं मना । किती रानोराना हिंडविसी
१२७२८	।।ना.गा.२०२३.००२।।	रे विठोबाचे पायीं दृढ घाली मिठी । कां होसी हिंपुटी वायांविण
१२७२९	।।ना.गा.२०२३.००३।।	क्रिया कर्म धर्म तुज काय चाड । जवळी असतां गोड प्रेमसुख
१२७३०	।।ना.गा.२०२३.००४।।	संकल्प विकल्प सांडी तूं समूळ । राहे रे निश्चळ क्षणभरी
१२७३१	।।ना.गा.२०२३.००५।।	आपुलें निजहित जाण तूं त्वरित । वासनारहित होई वेगीं
१२७३२	।।ना.गा.२०२३.००६।।	नामा म्हणे मज पहिलेंच कळतें । सोसणें न लगतें गर्भवास
१२७३३	।।ना.गा.२०२४.००१।।	दाही दिशा मना धांवसी तूं सईरा । न चुकती येरझारा कल्पकोटी
१२७३४	।।ना.गा.२०२४.००२।।	विठोबाचे नामीं दृढ धरी भाव। येर सांडी वाव मृगजळ
१२७३५	।।ना.गा.२०२४.००३।।	भुक्ति मुक्ति सिद्धि जोडोनियां कर । करिती निरंतर वोळगणें
१२७३६	।।ना.गा.२०२४.००४।।	नामा म्हणे मना धरीं तूं विश्वास । मग गर्भवास नव्हे तुज
१२७३७	।।ना.गा.२०२५.००१।।	अरे मना तूं मर्कटा । पापिया चांडाळा लंपटा । परद्वार हिंडसी सुनटा । अरे पापी चांडाळा
१२७३८	।।ना.गा.२०२५.००२।।	अरे तुज पापावरी बहु गोडी । देवाधर्मी नाहीं आवडी । तेणें न पावसी पैलथडी । कर्मबांदवडी पडिसील
१२७३९	।।ना.गा.२०२५.००३।।	अरे तूं अभिलाषिसी परनारी । तेणें सिद्धपंथ राहेल दुरी । जवळ येईल यमपुरी । आपदा पावसील

१२७४०	।।ना.गा.२०२५.००४।।	आतां तुज वाटतसे गोड । अंतकाळीं जाईल जड । महादोषें येतील सुखाआड । करतील कईवाड यमदूत
१२७४१	।।ना.गा.२०२५.००५।।	माझें शिकविलें नाइकसी । आतां सांगेन बळिया केशवासी । धरूनि नेईल वैकुंठासी । चरणीं जडसी म्हणे नामा
१२७४२	।।ना.गा.२०२६.००१।।	हें गे आयुष्य हातोंहातीं गेलें । आंगीं आदळलें जन्म मरण
१२७४३	।।ना.गा.२०२६.००२।।	कां रे निदसुरा दैवहत मना । आपुली सूचना न करिसी
१२७४४	।।ना.गा.२०२६.००३।।	कां रे तुज भ्रांति पडलीसे मूढा । वेढी चहूंकडा काळसैन्य
१२७४५	।।ना.गा.२०२६.००४।।	नानारोगें तुझी काया वेधियेली । नरकाची भरलीं नवही द्वारें
१२७४६	।।ना.गा.२०२६.००५।।	पाळिली पोशिली आप्त माझी सखी । अंतीं तुज पारखी होती जाण
१२७४७	।।ना.गा.२०२६.००६।।	नामा म्हणे तुज येतों लोटांगण । तारील नारायण भरंवशानें
१२७४८	।।ना.गा.२०२७.००१।।	उत्कंठित तप एक विठ्ठलनाम । आतां क्रियाकर्म कोणालागीं
१२७४९	।।ना.गा.२०२७.००२।।	राहे रे तूं मना राहे रे निवांत । ध्याई अखंडित नारायण
१२७५०	।।ना.गा.२०२७.००३।।	संतसमागमें साधीं हें साधन । पावसी निर्वाण नित्य सुख
१२७५१	।।ना.गा.२०२७.००४।।	नामा म्हणे तूं सहज सुखरूप । होऊनि निर्विकल्प विचारी पां
१२७५२	।।ना.गा.२०२८.००१।।	क्षण एक मना बैसोनि एकांतीं । विचारी विश्रांति कोठें आहे
१२७५३	।।ना.गा.२०२८.००२।।	लक्षचौऱ्यांशीच्या करितां येरझारा । शिणलासि गव्हरा वेळोवेळां
१२७५४	।।ना.गा.२०२८.००३।।	अझूनि तुज लाज न वाटे पैं कैसी । नरकाचे द्वारांसि जावें किती
१२७५५	।।ना.गा.२०२८.००४।।	दुर्लभ आयुष्य मनुष्य देहींचें । जातसे मोलाचें वायांविण
१२७५६	।।ना.गा.२०२८.००५।।	खापराचे साठीं सांडिला परिस । गहिंवरें फुटतसे हृदय माझें
१२७५७	।।ना.गा.२०२८.००६।।	पुत्रकलत्रादिक सुखाची सोयरीं । त्यांची ममता थोरी धरिली तुवां
१२७५८	।।ना.गा.२०२८.००७।।	अनुदिनी पाळितां अनुभवेंचि पाहे । कोण सुख आहे तयाजवळी
१२७५९	।।ना.गा.२०२८.००८।।	जगाचा जिवलग मायबाप आपुला । तो तुवां दुरावला केशिराज
१२७६०	।।ना.गा.२०२८.००९।।	स्वप्नींचिया धना लुब्धलासि काय । आलें काळभय हाकित तुज
१२७६१	।।ना.गा.२०२८.०१०।।	संतापाचें सदन शोकाचे पुतळे । ते त्वां मानियेले हितकारी
१२७६२	।।ना.गा.२०२८.०११।।	कैंची सुखनिद्रा इंगळाचे शेजे । प्रत्यया आणुनि तुझें तुंचि पाही
१२७६३	।।ना.गा.२०२८.०१२।।	तुज राखेल कोण येवढीये संकटीं । रिघसी ज्याचे पोटीं मरणा भेणें
१२७६४	।।ना.गा.२०२८.०१३।।	आदि मध्य अवसानीं सोडविल निर्वाणीं । तया चक्रपाणि सेवी वेगीं
१२७६५	।।ना.गा.२०२८.०१४।।	जो जो क्षण लाविसी हरिभजनाकडे । तो तो गांठीं पडे सार्थकीं रे

१२७६६	।।ना.गा.२०२८.०१५।।	नामा म्हणे तुजचि येतों काकुळती । सोडि रे संगती वासनेची
१२७६७	।।ना.गा.२०२९.००१।।	वासनेची करणी ऐके तूं रे मना । म्यां केली रचना ब्रह्माडांची
१२७६८	।।ना.गा.२०२९.००२।।	निर्गुण चैतन्य सदा सुखरासी। त्या दिलीं चौऱ्यांशीं लक्ष सोंगें
१२७६९	।।ना.गा.२०२९.००३।।	ऐसी हे लाघवी खेळे नाना खेळ । तेथें तूं दुर्बळ काय करिसी
१२७७०	।।ना.गा.२०२९.००४।।	क्षण एक चंचळ क्षण एक निश्चळ । क्षण एक विफळ सावध करी
१२७७१	।।ना.गा.२०२९.००५।।	क्षण एक कृपाळ क्षण एक निष्ठुर । क्षण एक उदार कृपण करी
१२७७२	।।ना.गा.२०२९.००६।।	क्षण एक सात्विक क्षण एक राजस । क्षण एक तामस करोनि सांडी
१२७७३	।।ना.गा.२०२९.००७।।	क्षण एक प्रवृत्ति क्षण एक निवृत्ति । क्षण एक विश्रांति तप्त करी
१२७७४	।।ना.गा.२०२९.००८।।	क्षण एक आवडे क्षण एक नावडे । क्षण एक बिघडे घडलें सुख
१२७७५	।।ना.गा.२०२९.००९।।	ऐसी हे लाघवी पाहतां क्षणभंगुर । ब्रह्मादि हरिहर ठकले जेणें
१२७७६	।।ना.गा.२०२९.०१०।।	नामा म्हणे तरीच इचा संग तुटे । दैवयोगें भेटे संतसंग
१२७७७	।।ना.गा.२०३०.००१।।	वेदी तोचि शास्त्री सर्वांठायीं तोचि । पुराणांत तोचि अंत:करणीं
१२७७८	।।ना.गा.२०३०.००२।।	नाम सदा ध्यायी नाम सदा ध्यायी । रामनाम ध्यायी अरे मना
१२७७९	।।ना.गा.२०३०.००३।।	नामा म्हणे देह नाहीं पुनरपें । केशवनाम सोपें उच्चारी बापा
१२७८०	।।ना.गा.२०३१.००१।।	धरी रे मना तूं विश्वास या नामीं । अखंड रामनामीं ओळखी धरी
१२७८१	।।ना.गा.२०३१.००२।।	जप करी ऐसा अखंड खंडेना । निशिदिनीं मना होय जागा
१२७८२	।।ना.गा.२०३१.००३।।	नामा म्हणे मना होई रामरूप । अखंडित जप सोहं सोहं
१२७८३	।।ना.गा.२०३२.००१।।	प्रेमामृत सरिता पवित्र हरिकथा । त्रिभुवनींच्या तीर्था मुगुटमणि
१२७८४	।।ना.गा.२०३२.००२।।	तेथें माझ्या मना होईल क्षेत्रवासी । राहे संतापाशीं सुख घेतां
१२७८५	।।ना.गा.२०३२.००३।।	ऐहिक परत्र दोन्हीं समतीरीं । परमानंद लहरी झेपावत
१२७८६	।।ना.गा.२०३२.००४।।	मुक्तांचें जीवन मुमुक्षा माऊली । शिणल्या साउली विषयासक्तां
१२७८७	।।ना.गा.२०३२.००५।।	परमहंसकुळ सनकादिक सकळ । राहिले निश्चळ करोनि चित्त
१२७८८	।।ना.गा.२०३२.००६।।	नामा म्हणे मना सोइरे हरिजन । तारक त्याचे चरण दृढ धरी
१२७८९	।।ना.गा.२०३३.००१।।	अरे मना सोस कां करिसी किती । हे तंव वायां धनसंपत्ति । आयुष्य भविष्य नाहीं तुझिये हातीं। हे अवघे अंतीं जायजणे
१२७९०	।।ना.गा.२०३३.००२।।	एक अर्बुद साठी कोटि देखा । तीस लक्ष दहा सहस्र लेखा । सात शतें नवमास मापा । तया हिरण्यकश्यपा काय जालें
१२७९१	।।ना.गा.२०३३.००३।।	चौदा चौकड्या लंकानाथा । नव्याण्णव सहस्र राया दशरथा । तेही गेले मृत्युपंथा । मागें सर्वथा नुरलेचि

१२७९२	।।ना.गा.२०३३.००४।।	चौदा कल्प मार्कंडेया पडे । तैं लोमहर्षणाचा एक रोम झडे । बगदालभ्याचे पुरे निमिषें मोडे । गेले एवढें अरे मना
१२७९३	।।ना.गा.२०३३.००५।।	बगदालभ्याचे पुरे निमिषें । वट हंसाचे उपडे कपिच्छ । तयासि होतां मृत्युप्रवेश । तो एक श्वास भ्रशुंडीचा
१२७९४	।।ना.गा.२०३३.००६।।	मरणांत सरे भ्रशुंडीचा । तैं एक दिवस कूर्माचा । नामा विनवी केशवाचा । वेगीं विठोबाचा पंथ धरा
१२७९५	।।ना.गा.२०३४.००१।।	गणपति पूजिले ते दोंदिल भले । वैष्णव न भले अरे मना
१२७९६	।।ना.गा.२०३४.००२।।	सीतळा पूजिली ते म्हइसे भले। वैष्णव न भले अरे मना
१२७९७	।।ना.गा.२०३४.००३।।	मैराळ पूजिले ते वाघे भले । वैष्णव न भले अरे मना
१२७९८	।।ना.गा.२०३४.००४।।	सूर्य पूजिले ते घोडे भले। वैष्णव न भले अरे मना
१२७९९	।।ना.गा.२०३४.००५।।	नामा म्हणे जे कां विठ्ठलीं भजिले । ते वैष्णव भले सत्य मना
१२८००	।।ना.गा.२०३५.००१।।	धांवत धांवत जाईन वोरसे । दाटला उल्हासे कंठ माझा
१२८०१	।।ना.गा.२०३५.००२।।	अंतरीचें गुज सांगेन आपुलें । हृदयीं दाटले प्रेमअश्रु
१२८०२	।।ना.गा.२०३५.००३।।	धरोनी पितांबरें सांगेन येकांतीं । जीविची सर्व खंति तयापुढें
१२८०३	।।ना.गा.२०३५.००४।।	संतसमागमें दावी कवतुकें । पाठवी भातुकें देऊनियां
१२८०४	।।ना.गा.२०३५.००५।।	नामा म्हणे मज आहे भरंवसा । मना तूं विश्वास दृढ धरी
१२८०५	।।ना.गा.२०३६.००१।।	नको नको मना हिंडों दारोंदारीं । कष्ट जाले भारी वायांविण
१२८०६	।।ना.गा.२०३६.००२।।	कल्पना सांडोनि संतासंगें राही । सर्व त्यांचे पायीं सुख आहे
१२८०७	।।ना.गा.२०३६.००३।।	ज्यांचिया दर्शनें शोक मोह जळे । पाप ताप पळे काळभय
१२८०८	।।ना.गा.२०३६.००४।।	जवळीच देखती पायाळावांचून । तें सुख निधान वैकुंठींचें
१२८०९	।।ना.गा.२०३६.००५।।	नामा म्हणे आली शेवटील घडी । तों घेई आवडी हाचि एक
१२८१०	।।ना.गा.२०३७.००१।।	लाजो नको मना हरीच्या कीर्तना । संसार पाहुणा दो दिवसांचा
१२८११	।।ना.गा.२०३७.००२।।	कंठीं नाहीं आइती म्हणोनि सांडू नको ज्योति । इतुकिये भ्रांति पडूं नको
१२८१२	।।ना.गा.२०३७.००३।।	बाळकाचे बोल माउली प्रीति करी । तैसी कीर्ति हरी परिसे चित्तें
१२८१३	।।ना.गा.२०३७.००४।।	भलतिया परी बोले बा श्रीहरी । तो भवसागरीं तारील जाणा
१२८१४	।।ना.गा.२०३७.००५।।	येणें तारुण्यपणें भ्रमलासि झणें । भोगिसी पतनें जन्मांतरीं
१२८१५	।।ना.गा.२०३७.००६।।	तूं होय मागता हरी होय दाता । शरण जाई अनंता म्हणे नामा
१२८१६	।।ना.गा.२०३८.००१।।	देवा तुझें मी चाटारू । सहस्रा एका हाकीं करूं । लाभ होतसे अपारू । घडी घडीये माझारीं
१२८१७	।।ना.गा.२०३८.००२।।	तुझ्या पायाची जोडी । त्यासि होतसे परवडी । आवारू न लाहे एक घडी । नंदाप्रिय होतसे

१२८१८	।।ना.गा.२०३८.००३।।	मुदल पुसतसे वेळोवेळां । हा मना रे पापी चांडाळा । सांग चोविसां आगळा । कवणेपरी न धाय
१२८१९	।।ना.गा.२०३८.००४।।	वासना मागतसे तुज । हें द्यावी जी मज । दाटणी होतसे सहज । म्हणवोनि मज अंकितसे
१२८२०	।।ना.गा.२०३८.००५।।	नामा म्हणे जी दातारा । तुझिये भेटी सारंगधरा । लाभ होतसे अपारा । घडी घडीये विठ्ठला
१२८२१	।।ना.गा.२०३९.००१।।	मन धांवे सैरावरा । मन मारुनि केलें एकमोहरा
१२८२२	।।ना.गा.२०३९.००२।।	मन केलें तैसें होय । धावडिलें तेथें जाय
१२८२३	।।ना.गा.२०३९.००३।।	मन लांचावलें न राहे । तत्त्वीं बैसलें कधीं नवजाये
१२८२४	।।ना.गा.२०३९.००४।।	नामा म्हणे सोहंशब्दीं । मन वेधलें गोविंदीं
१२८२५	।।ना.गा.२०४०.००१।।	मनाचें मनपण सांडितां रोकडें । अंतरीचें जोडे परब्रह्म
१२८२६	।।ना.गा.२०४०.००२।।	नाथिला प्रपंच धरोनियां जीवीं । सत्य तें नाठवीं कदाकाळीं
१२८२७	।।ना.गा.२०४०.००३।।	अजुनि तरी सांडी नाथिलें लटिकें । तरसील कवतुकें म्हणे नामा
१२८२८	।।ना.गा.२०४१.००१।।	परब्रह्म विश्वाकारें अवतरलें भक्तिकाजा । मूर्ति सुनीळु सांवळी केशिराजु स्वामी माझा
१२८२९	।।ना.गा.२०४१.००२।।	गोविंदा रे तुझें ध्यान लागो मना । पाविजे प्रेमपद निर्मळ होत ज्ञाना
१२८३०	।।ना.गा.२०४१.००३।।	मन हें वोवरी असे सुमनाचे चित्रशाळीं। दोन्ही चरण सुकुमारें वरी अष्टदळ कमळीं
१२८३१	।।ना.गा.२०४१.००४।।	संध्याराग रातले सुनीळ दिशातळवटीं । ध्वजवज्रांकुश चिन्हें साजती गोमटीं
१२८३२	।।ना.गा.२०४१.००५।।	इंदिरा तिथें थोकली तिच्या सुखा नाहीं पारु । ते चरणीं स्थिर जाली म्हणोनी म्हणती लक्ष्मीवरु
१२८३३	।।ना.गा.२०४१.००६।।	घवघवीत वांकी चरणीं ब्रीदाचा तोडरु । नखप्रभा फांकली तिनें लोपला दिनकरु
१२८३४	।।ना.गा.२०४१.००७।।	सृष्टी घडीत मोडीत उत्पत्ति स्थिति प्रलय अवघे नवें । तो चतुर्मुख ब्रह्मा चरण पूजितो स्वभावें
१२८३५	।।ना.गा.२०४१.००८।।	देवाधिदेव शंभू कैलासींचा राणा । गंगा मुगुटीं धरिली तिचा जन्म अंगुळीचरणां
१२८३६	।।ना.गा.२०४१.००९।।	दैत्यकुळीं जन्मला देव पळती ज्याचेनि धाकें । पावो पाठिसीं लागला म्हणुनि दारवंटा राखे
१२८३७	।।ना.गा.२०४१.०१०।।	शेष वर्णितां श्रमला वेद परतले माघारीं । नामा म्हणे अरे मना जरी याचे चरण धरी झडकरी
१२८३८	।।ना.गा.२०४२.००१।।	पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीची होसी । केशव न होसी अरे मना
१२८३९	।।ना.गा.२०४२.००२।।	आप ध्यासी तरी आपचि होसी । परि केशव न होसी अरे मना
१२८४०	।।ना.गा.२०४२.००३।।	वायु ध्यासी तरी वायुचि होसी । परि केशव न होसी अरे मना
१२८४१	।।ना.गा.२०४२.००४।।	आकाश ध्यासी तरी आकाशचि होसी । परि केशव न होसी अरे मना
१२८४२	।।ना.गा.२०४२.००५।।	नामा म्हणे जरी केशवासी ध्यासी । तरी केशवचि होसी अरे मना
१२८४३	।।ना.गा.२०४३.००१।।	धणीवरी ध्यान करी कां रे मना । या सुखनिधाना विठोबाच्या

१२८४४	।।ना.गा.२०४३.००२।।	पढियें तैसें सुख आहे त्याचे पायीं । अनुसरोनि पाही एकवेळ
१२८४५	।।ना.गा.२०४३.००३।।	श्रीमुख साजिरें पाही दृष्टीभरी । जीवित्वाचें करी लिंबलोण
१२८४६	।।ना.गा.२०४३.००४।।	जेणें लक्ष धरोनि आहे पुंडलिक । तोचि भाव एक दृढ धरी
१२८४७	।।ना.गा.२०४३.००५।।	न लगे गुरुमंत्र न लगे जपतप । उघडें स्वरूप विटेवरी
१२८४८	।।ना.गा.२०४३.००६।।	नामा म्हणे धरी निकट चरण । तरीच प्रेमखूण पावसील
१२८४९	।।ना.गा.२०४४.००१।।	संसारीं असतां जीवनमुक्त आम्ही । विठ्ठल हे नामीं विनटलों
१२८५०	।।ना.गा.२०४४.००२।।	काया क्लेश करणें शरीर दंडणें । न लगे हिंडणें दाही दिशा
१२८५१	।।ना.गा.२०४४.००३।।	कोण वाहे मंत्र वाउगी खटपट । गाऊं निष्कपट रामनाम
१२८५२	।।ना.गा.२०४४.००४।।	नामा म्हणे मज आहे हा भरंवसा । मना तूं विश्वासा दृढ धरी
१२८५३	।।ना.गा.२०४५.००१।।	शोधोनियां चारी वेद । सार काढोनियां भेद
१२८५४	।।ना.गा.२०४५.००२।।	मना जाण जाण जाण । विठोबाची प्रेमखूण
१२८५५	।।ना.गा.२०४५.००३।।	साही शास्त्राचे संमत । मंथुनि काढिले यथार्थ
१२८५६	।।ना.गा.२०४५.००४।।	याज्ञिकांचि जीवनकळा । उन्मनीचा जो जिव्हाळा
१२८५७	।।ना.गा.२०४५.००५।।	नामा म्हणे माझें बापें । साधियेलें संतकृपें
१२८५८	।।ना.गा.२०४६.००१।।	बोलिले वेदांतीं ऐकिलें सिद्धान्तीं । बोल नेति नेति अनिर्वाच्य
१२८५९	।।ना.गा.२०४६.००२।।	तोचि हा बोल बोल रे मना। बोल नारायणा समर्पावें
१२८६०	।।ना.गा.२०४६.००३।।	माझा मायबापें सोडवूनि गळा । केशवीं बांधला बोला बोल
१२८६१	।।ना.गा.२०४६.००४।।	नामा म्हणे बोल बोलतांहि बोला । खेचरें दाविला प्रेमभक्ति
१२८६२	।।ना.गा.२०४७.००१।।	मुख्य मातृकांची संख्या । सोळा अक्षरें नेटक्या
१२८६३	।।ना.गा.२०४७.००२।।	समचरणीं अभंग । नव्हे ताळ छंदोभंग
१२८६४	।।ना.गा.२०४७.००३।।	चौक पुलिता विसर्ग । गण यति लघु दीर्घ
१२८६५	।।ना.गा.२०४७.००४।।	जाणे एखादा निराळा । नामा म्हणे तो विरळा
१२८६६	।।ना.गा.२०४८.००१।।	सोळा त्या समाधि औट पीठामाझारीं । तेथें नरहरि देव नांदे
१२८६७	।।ना.गा.२०४८.००२।।	बारा गुंफेमाजीं भ्रमर गुंफे मध्यें । तेथें आत्मा शुद्ध ज्ञान नांदे
१२८६८	।।ना.गा.२०४८.००३।।	गोल्हाटाचा भेद असेची आघवा । शुद्ध ज्ञानदिवा अलक्ष तो
१२८६९	।।ना.गा.२०४८.००४।।	नामा म्हणे आम्हां तेजाच्या उजेडा । देव केला घोडा बैसावया

१२८७०	।।ना.गा.२०४९.००१।।	समाधिस्थ सदा राहे समाधान । नि:शब्द म्हणणें याचिलागीं
१२८७१	।।ना.गा.२०४९.००२।।	राम तें समान नव्हती समाधान। समाधि बैसणें एकचित्तें
१२८७२	।।ना.गा.२०४९.००३।।	उन्मनी उपासना प्रेमाची दाटणी । आत्मरूप जनीं दिसतसे
१२८७३	।।ना.गा.२०४९.००४।।	नामा म्हणे रूप डोळ्यांतील बाहुली । तीचि जगीं जाहली जगदाकार
१२८७४	।।ना.गा.२०५०.००१।।	वामांगी बाहुली तुर्या दावी कळा । ते लक्षी पाउलां रामरूप
१२८७५	।।ना.गा.२०५०.००२।।	माया निजरूप दक्षिणांगीं वसे । सूर्याचा हा भास मावळला
१२८७६	।।ना.गा.२०५०.००३।।	मी माया म्हणतां पाहे आपणातें । आत्माराम तेथें ज्ञानजळीं
१२८७७	।।ना.गा.२०५०.००४।।	नामा म्हणे ज्ञान माया ते आपण । दृष्टीचें देखणें आत्मरूप
१२८७८	।।ना.गा.२०५१.००१।।	सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण । नाहीं रूप गुण गुणातीत
१२८७९	।।ना.गा.२०५१.००२।।	नाद ना भेद ना छंदें निरंतर । दोहींच्या विचारें ब्रह्म नांदे
१२८८०	।।ना.गा.२०५१.००३।।	येकवटीं ब्रह्म आत्माराम रूप । तें पाहा स्वरूप लावण्याचें
१२८८१	।।ना.गा.२०५१.००४।।	नामा म्हणे केलें चैतन्य जवळ । मांडियेला खेळ संतीं तेथें
१२८८२	।।ना.गा.२०५२.००१।।	चैतन्याचा खेळ एकवट ब्रह्म । निर्गुणासी गुण रूप जाहलें
१२८८३	।।ना.गा.२०५२.००२।।	चैतन्य त्या कळा रूपा आले संत । निर्गुणाचा हेत रामकृष्ण
१२८८४	।।ना.गा.२०५२.००३।।	खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं । गोलांगुळांगुळीं समाधिस्थ
१२८८५	।।ना.गा.२०५२.००४।।	समाधी साधन अखंड उन्मनी । औटपीठ ध्वनी नाद होय
१२८८६	।।ना.गा.२०५२.००५।।	नामा म्हणे तेथें चौक्या ज्या रंगल्या । अरंग मिरवल्या संतसंगें
१२८८७	।।ना.गा.२०५३.००१।।	खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं । अर्ध चंद्रावरी शेखींयाचा
१२८८८	।।ना.गा.२०५३.००२।।	चोवीस त्या गुंफा रुद्रलिंगीं नांदे । अभेद तो वेद बोले तेथें
१२८८९	।।ना.गा.२०५३.००३।।	तीही अक्षरांच्या वाटेच्या शेजारीं । सोळा चंद्र नारी भेदाभेद
१२८९०	।।ना.गा.२०५३.००४।।	सूर्य एकवीस शोभती चहुंकडे । खेळती उघडे संत तेथें
१२८९१	।।ना.गा.२०५४.००१।।	दृष्टीचें देखणें तेंचि रूप माया । शब्द बोलावया ज्ञान जालें
१२८९२	।।ना.गा.२०५४.००२।।	ज्ञानाची जी जागा हृदयीं पाहावी । सत्रावीसी दावी खेळ तेथें
१२८९३	।।ना.गा.२०५४.००३।।	सत्रावी जीवन माया तिचे पोटीं । ज्ञान जाली दृष्टी देखावया
१२८९४	।।ना.गा.२०५४.००४।।	देखणें सिद्धांत बोलणें वेदांत । शब्द तोचि हेत सत्रावीचा
१२८९५	।।ना.गा.२०५४.००५।।	नाद आणि भेद देखणें सिद्धांत । बोलणें वेदांत हेचि दोनी

१२८९६	।।ना.गा.२०५४.००६।।	हेत तो अहंकार दोहींतें नाचवी । अविद्येसी दावी निजसुरा
१२८९७	।।ना.गा.२०५४.००७।।	नामा म्हणे सिद्ध देखणें हा जन्म । डोळ्यामाजीं वर्म बोलिले ते
१२८९८	।।ना.गा.२०५५.००१।।	अंत:करणीं विष्णु तोचि आत्मा असे । चंद्रमा भासे मन तेंचि
१२८९९	।।ना.गा.२०५५.००२।।	बुद्धी ब्रह्मदेव चित्त नारायण । अहंकार जाण रुद्ररूप
१२९००	।।ना.गा.२०५५.००३।।	ज्ञान आत्मे पांच ज्ञानी ओळखावे । पांच ते पाहावें कर्मस्थानीं
१२९०१	।।ना.गा.२०५५.००४।।	नामा म्हणे कैसें दाखऊं उघडें । वाटतसे कोडें मज आतां
१२९०२	।।ना.गा.२०५६.००१।।	षड्चक्र भेदोनी जातां उर्ध्वपंथें । ध्वनि अनुहात उमटे तेथें
१२९०३	।।ना.गा.२०५६.००२।।	तये ध्वनीमाजीं भग्न होय मन। योगसिद्धी जाण कैसी घडे
१२९०४	।।ना.गा.२०५६.००३।।	तेहि वोलांडितां सिद्धी आडव्या येती । घेऊनियां जाती आपुल्या पंथें
१२९०५	।।ना.गा.२०५६.००४।।	तेथें गुंतोनियां विचरती योगीजन । योगासी साधून काय होतें
१२९०६	।।ना.गा.२०५६.००५।।	आधीं तो साधितां कष्टाचे संभार । होय चकनाचूर शरीराचा
१२९०७	।।ना.गा.२०५६.००६।।	साधितिया पुढें ऐसीं विघ्नें येती । ठेऊनि मागुती फिरती मागें
१२९०८	।।ना.गा.२०५६.००७।।	वारियाची मोट कैसी बांधवेल । भलत्यासी सांगतां वाटेल हें लटिकें
१२९०९	।।ना.गा.२०५६.००८।।	नामा म्हणे तुम्ही सोडोनियां भक्ति । करितां नामा युक्ति मूर्खजन
१२९१०	।।ना.गा.२०५७.००१।।	साधनाच्या माजीं एक गजराजू । साधी त्यासी उजू होय पाहा
१२९११	।।ना.गा.२०५७.००२।।	नासिकाचे वारे कोंडोनियां प्राणें । उफराटें जाणें उर्ध्वपंथें
१२९१२	।।ना.गा.२०५७.००३।।	गुदस्थानीं टांच देऊनियां जाण । कासावीस प्राण होती पाहा
१२९१३	।।ना.गा.२०५७.००४।।	गोल्हाट भेदितां कोल्हाटीच नाहीं । विठोबाची ग्वाही नामा म्हणे
१२९१४	।।ना.गा.२०५८.००१।।	त्रिकूट शिखरावरी पाहे पां नवल । परि अखंडित धार वर्षे अमृताची
१२९१५	।।ना.गा.२०५८.००२।।	त्रिवेणी संगमीं गगन निर्मळ वाहे । तेथें स्नान करुं जाय आनंदमय
१२९१६	।।ना.गा.२०५८.००३।।	गुरुमुखें स्नान करीं परब्रह्मीं लक्ष धरी । अनुहात ध्वनि थोरी नाद गर्जे
१२९१७	।।ना.गा.२०५८.००४।।	उन्मनी जागृति गोल्हाट मंडळा जाय । तेथुनी निराळे पाहे निजतत्त्व
१२९१८	।।ना.गा.२०५८.००५।।	विष्णुदास नामा म्हणे अनुभवि तोचि जाणे। आम्ही गुरुखुणें वर्ततसों
१२९१९	।।ना.गा.२०५९.००१।।	मायेसी रुसले भावाशी त्यागिले । जाऊनि राहिले काकापासीं
१२९२०	।।ना.गा.२०५९.००२।।	काकीमुख दावा काकीमुख दावा । काकीमुख दावा बाईयांनों
१२९२१	।।ना.गा.२०५९.००३।।	काकीचें श्रीमुख गोरक्षा लाधलें । काकिये पोखिले गोरक्षासी

१२९२२	।।ना.गा.२०५९.००४।।	नामा म्हणे आम्हां काकी पैं वोळली । सत्रावी दिधली दोहावया
१२९२३	।।ना.गा.२०६०.००१।।	मुंगीस तो मार्गु सांपडे गोडीचा । योगीया लक्षीचा ज्ञान ज्योती
१२९२४	।।ना.गा.२०६०.००२।।	तरीच ओळखिजे केशवचरण । त्या जन्ममरण मग कैंचें
१२९२५	।।ना.गा.२०६०.००३।।	मत्स्य नानापरी क्रीडा खेळे जळीं । आनंदकल्लोळीं योगीराज
१२९२६	।।ना.गा.२०६०.००४।।	नामा म्हणे तोचि केशव जाणता । तया नाहीं व्यथा गर्भवासु
१२९२७	।।ना.गा.२०६१.००१।।	पृथ्वीमाजीं पाहतां नाही म्यां देखिला । हस्तिसी उडविला ऐसा कोण्ही
१२९२८	।।ना.गा.२०६१.००२।।	शोधितां शोधितां आलों पंढरीसी । तेथें ज्ञानोबासी देखियेलें
१२९२९	।।ना.गा.२०६१.००३।।	मोक्षमार्गीं देवें हा गजराज बांधला । तो ज्ञानी उडाला गोल्हाटासी
१२९३०	।।ना.गा.२०६१.००४।।	पृथ्वीमाजीं पाहतां ज्ञानीच कोल्हाटी । ढिसाळ हे दृष्टी तृणप्राय
१२९३१	।।ना.गा.२०६१.००५।।	उडोनियां तेणें दर्शन घेतलें । हस्तीसी जिंकिलें ज्ञानदेवें
१२९३२	।।ना.गा.२०६१.००६।।	याचिया इशाळे करील जो मूर्ख । पावोनियां दु:ख कष्टी होय
१२९३३	।।ना.गा.२०६१.००७।।	धन्य ज्ञानदेव योग साधुनियां । भक्ति आचरोनियां दावी लोकां
१२९३४	।।ना.गा.२०६१.००८।।	नामा म्हणे सर्व खटपट सांडोनि । पांडुरंग मनीं भावें ध्यावा
१२९३५	।।ना.गा.२०६२.००१।।	कृष्ण सहाय्य पांडवासी । ते भोगिती नष्टचर्यासी । साह्य केलें हरिहरासी । प्रारब्ध कोणासी टळेना
१२९३६	।।ना.गा.२०६२.००२।।	ऐसी प्रारब्धाची ठेव । जाले भिक्षुक पांडव । राज्य घोडे भाग्य सर्व । सांडियेला ठाव प्रारब्धें
१२९३७	।।ना.गा.२०६२.००३।।	शरीर संचिता आधीन । धर्मराज हिंडे वन । कर्में बुडाला रावण । आणि दुर्योधन प्रारब्धें
१२९३८	।।ना.गा.२०६२.००४।।	अभिमानें शिशुपाळ । कृष्ण हस्तें जाला काळ । यादव निमाले सकळ । केलें निर्मूळ प्रारब्धें
१२९३९	।।ना.गा.२०६२.००५।।	कर्मरेखा टळेना । बाण लागला जगज्जीवना। कृष्णें सांडिल्या गोपांगना । हें नारायणा प्रारब्ध
१२९४०	।।ना.गा.२०६२.००६।।	कामबुद्धीचें सुख । अति मानिति ते मूर्ख । चंद्रासी लागला कलंक । इंद्रासी दु:ख प्रारब्धें
१२९४१	।।ना.गा.२०६२.००७।।	हरिश्चंद्र तारामती । घोर जन्मांतर भोगिती । नळराव पुरुषार्थी । तयाच्या विपत्ति प्रारब्धें
१२९४२	।।ना.गा.२०६२.००८।।	पतिव्रता सुशीळ । दमयंती पाळें पोळें । ऐसें अनिवार कपाळ । भोगी दुष्काळ प्रारब्धें
१२९४३	।।ना.गा.२०६२.००९।।	ऐसी अनिवार जन्मांतरें । राज्य सांडिलें रघुवीरें । सवें मेळवूनि वानरें । फिरवी दिगंतरें प्रारब्धें
१२९४४	।।ना.गा.२०६२.०१०।।	फिरत असतां काय जालें । पुढें प्रारब्ध ओढवलें । जानकीस राक्षसें नेलें । कष्ट भोगविले प्रारब्धें
१२९४५	।।ना.गा.२०६२.०११।।	कर्मा आधीन शरीर । पूर्ण ब्रह्म रामचंद्र । रघुपति विष्णूचा अवतार । पाठीं जन्मांतर नामा म्हणे
१२९४६	।।ना.गा.२०६३.००१।।	जाला कासावीस बाण लागतांची । प्रारब्धाची गति चुकवेना
१२९४७	।।ना.गा.२०६३.००२।।	चुकतां ते रेखा क्रियमाण जाण । प्रारब्ध गति चुकवेना

१२९४८	।।ना.गा.२०६३.००३।।	बाणे पश्चाताप अर्जुनाचे मनी । शस्त्र चक्रपाणि धरेना
१२९४९	।।ना.गा.२०६३.००४।।	नामा म्हणे धरूं ऐसे याचे संगा । तारुं पांडुरंगा उभा असे
१२९५०	।।ना.गा.२०६४.००१।।	काय सांगो कर्मभोग । लिंगपात शिवाचा
१२९५१	।।ना.गा.२०६४.००२।।	याच सुखें ब्रह्मा मुख । उभा नख छेदिला
१२९५२	।।ना.गा.२०६४.००३।।	शुचिष्मंत पंडुपुत्र । भिक्षापात्र हिंडती
१२९५३	।।ना.गा.२०६४.००४।।	नामा म्हणे कर्मरेखा । देवादिकां चुकेना
१२९५४	।।ना.गा.२०६५.००१।।	हरिश्चंद्र राजा होता सत्त्वगुणी । वाहातसे पाणी डोंबाघरीं
१२९५५	।।ना.गा.२०६५.००२।।	सत्य पतिव्रता तारामति राणी । राहिली भोगोनी कायाक्लेश
१२९५६	।।ना.गा.२०६५.००३।।	भरतें ऐकतां मातेचें वचन । श्रीरामदर्शन कैसें घडे
१२९५७	।।ना.गा.२०६५.००४।।	माता पिता सर्व अव्हेरी जनक । नामा म्हणे भाक प्रारब्ध हें
१२९५८	।।ना.गा.२०६६.००१।।	प्रथम अवतारीं आई थोर ख्याती केली वो । ब्रह्मयाच्या कैवारा आपण मत्स्यरूप जाली वो । धुंडाळिला सागर आई शंखासुरा मिठी घाली वो । आणिले चारी वेद ब्रह्मपुरी त्वां स्थापिली वो
१२९५९	।।ना.गा.२०६६.००२।।	ऐसी बहु लोकां माझारीं आई खेळतसे गोंधळी वो । भूलोका माझारीं अंबा नाचतसे वो । संव्हारी दैत्य अंबा करी गदारोळी वो
१२९६०	।।ना.गा.२०६६.००३।।	कूर्म वेष धरूनि धरणी पाठीवरी धरली वो । महेंद्र मंथन मेळीं अंबा वेगींसी पावली वो । समुद्रमंथन करितां आई बरवा गोंधळ घाली वो । नारायण विश्वरूप देवा जे त्वांच दिधलें वो
१२९६१	।।ना.गा.२०६६.००४।।	वराहरूप धरूनी आई थोर पवाडा केला वो । पृथ्वीच्या कैवारा घालिसी गोंधळ दाढा वो । वधिला हिरण्याक्ष त्याचा केला त्वां रगडा वो । खेचर देवता धरणी धरीयली दाढा वो
१२९६२	।।ना.गा.२०६६.००५।।	त्रिकाळ रूप धरूनी स्तंभ फोडुनि निघाली वो । सिंहनादें गर्जतां हांक त्रिभुवनीं गाजली वो । वधिला हिरण्यकश्यप अंतरमाळा गळां घाली वो । प्रल्हादाकारणें कैसी गोंधळी नाचली वो
१२९६३	।।ना.गा.२०६६.००६।।	इंद्राच्या कैवारा आई सानें रूप धरिलें वो । बळिच्या द्वारा जाऊन भूमिदान मागितलें वो । त्रिलोक मोजतां बळीस पाताळीं घातलें वो । मागुता येईल म्हणवुनी त्याचें द्वार त्वां रक्षिलें वो
१२९६४	।।ना.गा.२०६६.००७।।	जमदग्नि रेणुके कुशीं धरियेला अवतार वो । हातीं परशु घेऊनी केला दैत्यांचा संहार वो । एकविस वेळ मेदिनी निःक्षत्रिय करूनी फेडिला भूमिभार वो । वधिला सहस्रार्जुन कामधेनुच्या कैवारा वो
१२९६५	।।ना.गा.२०६६.००८।।	पितृवचना कारणें आई वनवासासी गेली वो । अठरापद्मे वानर मेळवुनि गोंधळ घाली वो । वधिला दशशिर लंका शरणागत दिधली वो । कौसल्या माऊली देवा बंदी सोडी केली वो

१२९६६	।।ना.गा.२०६६.००९।।	वसदेवकुळटिळके तरी तूं कंसासुरे मारिती वो । कुळांतकुळतारिके तरि तूं कौरव संहारिते वो । पांडव प्रतिपाळके भक्तजनासि तारके वो । तुझा गोंधळ गातां अंबे कोण वर्णू शके वो
१२९६७	।।ना.गा.२०६६.०१०।।	विधीमार्ग सांडुन असुरें देवा गांजियलें वो । त्याचिया कैवारा आई त्वां सौम्यरूप धरिलें वो । बौद्ध रूप धरुनि भक्तालागीं मोहिलें वो । कौसल्या देवता जे त्या रुपें त्वां दिधलें वो
१२९६८	।।ना.गा.२०६६.०११।।	कलियुगाच्या अंतीं थोर होईल अन्नान वो । एकीं ठायीं होऊन खातील चारी वर्ण वो। तेव्हां पृथ्वी-भारें तुजला येईल शरण वो । तेव्हां तूं पावसी कलंकी अवतार धरूनी वो
१२९६९	।।ना.गा.२०६६.०१२।।	पुंडलिकाकारणें पंढरपुरीं केला वास वो । तुझा गोंधळ गातां थोर जिवा उल्हास वो । तूं माये माऊली तुझा मज बहु विश्वास वो । विनवी विष्णुदास नामा तुझ्या दासाचा मी दास वो
१२९७०	।।ना.गा.२०६७.००१।।	विठाई सांवळे डोळसे रंगा येई हो
१२९७१	।।ना.गा.२०६७.००२।।	कानीं कुंडलाची प्रभा । जैसे चंद्रसूर्य नभा हो
१२९७२	।।ना.गा.२०६७.००३।।	गळां वैजयंती माळा । कांसे पितांबर पिवळा हो
१२९७३	।।ना.गा.२०६७.००४।।	नामा म्हणे कृपावंत । झडकरी यावें पंढरीनाथा वो
१२९७४	।।ना.गा.२०६८.००१।।	वाजविली डांक चौक ठेवियाला वो । ठायीं पंढरीचे विठ्ठले तुज हाकारा केला वो
१२९७५	।।ना.गा.२०६८.००२।।	रंगा येई वो खेचरें विठाई सुंदरी वो । तुझीं पाऊलें गोजिरीं कैं मी दृष्टि देखेन वो
१२९७६	।।ना.गा.२०६८.००३।।	पाजळला दीपु फिटला अंधकारू वो । न लावा उशिरू पांडुरंगे माउलिये वो
१२९७७	।।ना.गा.२०६८.००४।।	तमोगुणाचा रज जाळूनि धूप केला वो । उशिरू कां लाविला पांडुरंगे माउलिये वो
१२९७८	।।ना.गा.२०६८.००५।।	तनुमनाची मूद टाकीन वोवाळूनी तुजवरोनी वो । वैकुंठवासिनी पांडुरंगे माउलिये वो
१२९७९	।।ना.गा.२०६८.००६।।	अहंकार दैवतें झडविलें नामयासी वो । येउनियां रंगासी रंग राखी आपुला वो
१२९८०	।।ना.गा.२०६९.००१।।	जंबु या द्वीपामाजीं एक पंढरपूर गांव । धर्माचें नगर विठो पाटील त्याचें नांव । चला जाऊं तया ठायां । कांहीं भोजन मागावया
१२९८१	।।ना.गा.२०६९.००२।।	विठोबाचा धर्म जागो । त्याचे चरणीं लक्ष लागो
१२९८२	।।ना.गा.२०६९.००३।।	ज्यासी नाहीं पंखपाय तेणें करावें तें काय । शुद्धभाव धरूनी पंढरीसी जाय । इच्छिलें फळ देतो यासी नवलाव तें काय
१२९८३	।।ना.गा.२०६९.००४।।	सुदामा ब्राह्मण दु:खें दरिद्रें पीडिला । मुष्टिपोहे घेऊनि त्याचे भेटीलागीं गेला । शुद्धभाव देखोनियां गांव सोनियाचा दिला
१२९८४	।।ना.गा.२०६९.००५।।	गण आणि गोत्रज सर्व हासताती मज । गेलें याचें मनुष्यपण येणें सांडियेली लाज । विनवी तो शिंपी नामा संतचरणींचा रज
१२९८५	।।ना.गा.२०७०.००१।।	बाबा अहंकार निशीं घनदाट । गुरु वचनीं फुटली पहाट । माता भक्ति भेटली बरवंट । तिनें मार्ग दाविला चोखट गा
१२९८६	।।ना.गा.२०७०.००२।।	नरहरी रामा गोविंदा वासुदेवा

१२९८७	।।ना.गा.२०७०.००३।।	एक बोल सुस्पष्ट बोलावा । वाचे हरि हरि म्हणावा । संत समागमु धरावा । तेणें ब्रह्मानंद होय आघवा गा
१२९८८	।।ना.गा.२०७०.००४।।	आला सीतळ शांतीचा वारा । तेणें सुख जालें शरीरा। फिटला पातकांचा थारा । कळीकाळासी धाक दरारा गा
१२९८९	।।ना.गा.२०७०.००५।।	अनुहात वाजती टाळ । अनुक्षीर गीत रसाळ । अनुभवें तन्मय सकळ । नामा म्हणे केशव कृपाळु गा
१२९९०	।।ना.गा.२०७१.००१।।	पिंगळा बोले महाद्वारीं । निशा सरली दिशा चारी । उठा उठा हो श्रीहरी । उदयो प्रकाशला दिनकरी
१२९९१	।।ना.गा.२०७१.००२।।	देवा शकुन ऐकावा
१२९९२	।।ना.गा.२०७१.००३।।	संत साधु अपरिमित । अवघा भरियेला थाट । टाळ विणे वाद्य वाजत । आवडी मंजुळ स्वरें गात
१२९९३	।।ना.गा.२०७१.००४।।	नादें अंबर दणाणलें । तेहतीस कोटी देव मिळाले । आवडी पहावया आले । स्वर्ग सुखातें विसरले
१२९९४	।।ना.गा.२०७१.००५।।	आई रखुमाई माते । उठवा उठवा श्रीरंगातें । नारद तुंबर गायनातें । कर जोडुनि हनुमंत
१२९९५	।।ना.गा.२०७१.००६।।	उठिला सांवळा वनमाळी । आनंदली भक्तमंडळी । जयजयकारें पिटली टाळी । विठ्ठलनामें दिधली आरोळी
१२९९६	।।ना.गा.२०७१.००७।।	पिंगळा आनंदला मनीं । तेज न माये गगनीं । हर्षे घातली लोळणी । शिंपी नामा तुझे चरणीं
१२९९७	।।ना.गा.२०७२.००१।।	नव्हे तेंचि कैसें जालें रे खेळिया । नाहीं तेंचि दिसूं लागलें रे । अरूप होतें तें रूपासि आलें । जीव शिव नाम पावले रे
१२९९८	।।ना.गा.२०७२.००२।।	आपलिच आवडी धरून खेळिया । आपआपणातें व्यालें रे । जीवनाकारणें केली बायको । तिनें एवढें वाढविलें रे
१२९९९	।।ना.गा.२०७२.००३।।	ऐक खेळिया तुज सांगितले । ऐसें जाणुनि खेळ खेळे रे
१३०००	।।ना.गा.२०७२.००४।।	ब्राह्मणाचें पोर एक खेळासि भ्यालें । तें बारा वर्षे लपालें रे । कांपत कांपत बाहेर आलें । तें नागवेंचि पळून गेलें रे
१३००१	।।ना.गा.२०७२.००५।।	सहा तोंड्या एक संभूचें बाळ । त्यानें बहुतचि बळ अथियेलें रे । खेळ खेळतां दगदगी भ्यालें । तें कपाट फोडूनि गेलें रे
१३००२	।।ना.गा.२०७२.००६।।	चहूं तोंड्याचा पोर एक नारयाहि जाण । तो खेळियामाजीं आगळा रे । कुचाली करूनी पोरें भांडवी । आपण राहे वेगळा रे
१३००३	।।ना.गा.२०७२.००७।।	गंगा गौरी दोघी भांडवी । संन्यासी धाडले राना रे । खेळ खेळे परि डायीं न सांपडे । तो एक खेळिया शहाणा रे
१३००४	।।ना.गा.२०७२.००८।।	खेळिया माजी हनुम्या शहाणा । न पडे कामव्यसनीं रे । कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा । तेथे कैचें भांडण रे । राम्या गड्याची आवडी मोठी । म्हणूनि लंके पेणे रे
१३००५	।।ना.गा.२०७२.००९।।	यादवाचा पोर एक गोप्या भला । तो बहुतचि खेळ खेळला रे । लहान थोर अवघे मारिलीं । खेळचि मोडूनि गेला रे
१३००६	।।ना.गा.२०७२.०१०।।	ऐसे खेळिये कोट्यानकोटी । गणित नाहीं त्याला रे । विष्णुदास नामा म्हणे वडील हो । पहा देहीं शोधुनी रे
१३००७	।।ना.गा.२०७३.००१।।	एका ब्राह्मणाचें घरी खाण पडिलें । सातां चोरी एक मुसळ नेलें । बापुडें ब्राह्मण नागविलें । धाऊणें आले वोसगांवीचें
१३००८	।।ना.गा.२०७३.००२।।	वोसगांवींचा हनुमंत खोटा । त्याचा बाप जुनाट चोरटा । मारूनि नेतो दाही वाटा । जना चोहटा नागविलें
१३००९	।।ना.गा.२०७३.००३।।	नागविला चोहांटीचा वाणी । आणिक नेली प्रभूची गोणी । शेळी आली लांडगा घेऊनि । गाढव बंदीखानीं बोंबलत
१३०१०	।।ना.गा.२०७३.००४।।	एका संन्याशानें कुतरें खादलें । गांवच्या खाटका प्रायश्चित्त दिलें । बापुडे कुंभार नागविले । डोचकें फोडिलें म्हातारीचें
१३०११	।।ना.गा.२०७३.००५।।	ऐशा सिद्धांतीच्या खुणा । एक जाणे पंढरीराणा । विष्णुदास नामा करीं विज्ञापना । संत प्रेमळ जाणती

१३०१२	।।ना.गा.२०७४.००१।।	मुंगी उमगा मुंगी उमगा । मुंगीचें मुखीं त्रिवेणी गंगा
१३०१३	।।ना.गा.२०७४.००२।।	उदकांचे टवळें मातीची वाती । अंधारीं मुंगीनें तेथें लाविली ज्योती
१३०१४	।।ना.गा.२०७४.००३।।	अवघें आकाश मुंगीये मागें । मुंगीये संसार सांडिला मागें
१३०१५	।।ना.गा.२०७४.००४।।	विष्णुदास नामा मुंगीये मागें । मुंगी उमगली खेचरसंगें
१३०१६	।।ना.गा.२०७५.००१।।	मुंगीनें आकाश कवळिलें बाहीं । तेथें एक नवल वर्तलें पाहीं
१३०१७	।।ना.गा.२०७५.००२।।	मुंगी उमगा मुंगी उमगा । मुंगीचे माथां त्रिवेणी गंगा
१३०१८	।।ना.गा.२०७५.००३।।	मुंगीचे गळां तुळईचा लोढणा । विष्णुदास नामा बोलिला खुणा
१३०१९	।।ना.गा.२०७६.००१।।	समुद्राचें पाणी मुंगी मुखांतुनी । काढाया लागोनि श्रम थोडे
१३०२०	।।ना.गा.२०७६.००२।।	केशवाची भक्ति कठीण त्याहूनि । वायां दंभपणीं नोहे नोहे
१३०२१	।।ना.गा.२०७६.००३।।	आकाश अंगुळें माप सुयेमान । भूमीचे वजन पालडेनि
१३०२२	।।ना.गा.२०७६.००४।।	नामा म्हणे वारा वळूं ये कदापि । केशवाचें रूपीं नव्हे बुद्धि
१३०२३	।।ना.गा.२०७७.००१।।	आंधळ्यानें स्वरूप देखियलें नयनीं । मुकें बहिऱ्या कानीं गोष्टी सांगे
१३०२४	।।ना.गा.२०७७.००२।।	कांसवीचें दूध दुहितां भरणा । दुही त्याला जाणा हात नाहीं
१३०२५	।।ना.गा.२०७७.००३।।	वारियाच्या लोथा बांधोनियां माथां । वांझेचिया सुता बळिवंता
१३०२६	।।ना.गा.२०७७.००४।।	मुंगीनें त्रैलोक्य धरियेलें तोंडीं । नामा म्हणे पिंडीं प्रचीत आहे
१३०२७	।।ना.गा.२०७८.००१।।	हाटकर कुणबी वाट मोडी । रिकामा ब्राह्मण करितो चहाडी
१३०२८	।।ना.गा.२०७८.००२।।	गुळेंविण शिंपी बोटें चाटी । प्रेमेंविण तेली क्षेम दे लाटीं
१३०२९	।।ना.गा.२०७८.००३।।	जिताची कोष्टी घातला खांचे । प्रेमेंविण कुंभार नाचे
१३०३०	।।ना.गा.२०७८.००४।।	लोहार हिंवाविण तापें । सोनारा लागले धापे
१३०३१	।।ना.गा.२०७८.००५।।	नामा म्हणे यातिचे चाळे । दुखणेंविण परीट विवळे
१३०३२	।।ना.गा.२०७९.००१।।	अकरा लोचन त्याचे पांच मुख । आठ कान देख पुच्छ दोन
१३०३३	।।ना.गा.२०७९.००२।।	अरतखंड निरत प्रचंड । उमाळ उदंड उभा फार
१३०३४	।।ना.गा.२०७९.००३।।	दहा पाय चहुं चालत ते जाय । नव्हेत ग माय सावज त्या
१३०३५	।।ना.गा.२०७९.००४।।	नामा म्हणे त्याचा अर्थ करी चोख । पूर्वज पातक लया जाय
१३०३६	।।ना.गा.२०८०.००१।।	बारा हात लुगडें एकचि नारी । पालऊं घातला खांदियावरी
१३०३७	।।ना.गा.२०८०.००२।।	जाईन त्या गोकुळां पाहीन त्या गोपाळा । तयालागीं उतावेळ मन माझें

१३०३८	।।ना.गा.२०८०.००३।।	एकें हातीं घातिला तांबियाचा वाळा । हाळदोळी वांटुनी सुदलें मी डोळां
१३०३९	।।ना.गा.२०८०.००४।।	एकली जातां नोळखे मातें । विष्णुदास नाम्यास नेईन सांगातें
१३०४०	।।ना.गा.२०८१.००१।।	राइयेयेवढें पांखरूं त्रिभुवनीं त्याचा फेरा रे । नर आणि नारी तया पांखराचा चारा रे । पिंडामध्यें आहे त्याचा शोध तुम्हीं करा रे । मेरूच्या शिखरीं त्या पांखराचा थारा रे
१३०४१	।।ना.गा.२०८१.००२।।	येउनि संसारा याचा अनुभव तुम्हीं करा रे । चौऱ्यांशीं लक्ष योनी चुकेल जन्माचा फेरा रे
१३०४२	।।ना.गा.२०८१.००३।।	अठ्ठावीस योजनें तया पांखराचा फेरा रे । बत्तिसा मुखांनीं तें बा घेतसे चारा रे । अहंसभेमध्यें याचा शोध तुम्ही करा रे । अकराही लोचन तया चोची असती फारा रे
१३०४३	।।ना.गा.२०८१.००४।।	एकवीस स्वर्गाहुनि तया पांखरांची उंची रे । सप्तही पाताळाखालीं तया पांखरांची निची रे । नेत्रांतील बाहुली तया पांखरांची निची रे । उडालें पांखरू सप्तही सागर घेऊन चोचीं रे
१३०४४	।।ना.गा.२०८१.००५।।	ऐसें तें पांखरूं दादा आहे सृष्टीवरी रे । मेरु आणि मांदार तया पांखरांचे उदरीं रे । शिवाचें आसन दादा कवणिये परी रे । पिंडीं आणि ब्रह्मांडीं म्हणती दशवें द्वारीं रे
१३०४५	।।ना.गा.२०८१.००६।।	ऐसें तें पांखरूं गोरक्षरायें वळखिलें रे । पिंडीं आणि ब्रह्मांडीं मच्छिंद्रनाथें देखियेलें रे । त्याचियेनि अंगसंगें सद्गुरुनाथें दाखविलें रे । त्याचियाचि प्रसादें नाम्या शिंप्यानें गाईली रे
१३०४६	।।ना.गा.२०८२.००१।।	प्रळयाचे काळीं ब्रह्मांड जळालें । कोण त्यांत उरलें सांगा मज
१३०४७	।।ना.गा.२०८२.००२।।	प्रभा ते फांकली जाती ते गुंतली । सांग मज खोली स्वरूपाची
१३०४८	।।ना.गा.२०८२.००३।।	ब्रह्मांडाची जेव्हां राख जळून जाली । कोणी ती लावली अरूपरूपीं
१३०४९	।।ना.गा.२०८२.००४।।	विष्णुदास नामा म्हणे सांगा हेंचि गूढ । नाहीं तरी मूढ होऊनि राहें
१३०५०	।।ना.गा.२०८३.००१।।	मेलें जित्यासी सांगे गोष्टी । आंधळे ओवी सुवर्णाच्या गांठी । पांगुळ लागे पवनाच्या पाठीं । बाळका पोटीं माय वाढे
१३०५१	।।ना.गा.२०८३.००२।।	थोट्यांने धवळार रचियेलें । मुकें पुराण सांगूं बैसलें । सवेंचि बहिरे ऐकों ठेलें । वेडें हासलें शहाणियासी
१३०५२	।।ना.गा.२०८३.००३।।	आणिक एक नवल सांगूं काई । जीत वाघ शलभानें भक्षिला पाहीं । मुंगीनें पर्वत उचलिला बाहीं । माशी करी छाया सूर्यासी पैं
१३०५३	।।ना.गा.२०८३.००४।।	मृदंगें वाहिला गुरव राणा । वांझेच्या स्तनीं संचरला पान्हा। माया फुलें खोऊं नाचे दवणा । जाण सुजाणा न कळेची
१३०५४	।।ना.गा.२०८३.००५।।	मुरकुटें सगळा सागर गिळिला । माशानें पारधी मारिला । सशानें सिंह भोवंडिला । वेदांपुराणां न कळेची
१३०५५	।।ना.गा.२०८३.००६।।	हें तुम्ही म्हणाल उमानें । हें तंव उरफाटें दृष्टी पाहाणें । विष्णुदास नामा म्हणे । अनुभवी या खुणा जाणती
१३०५६	।।ना.गा.२०८४.००१।।	नीर समुद्र तो कोण । कोठें क्षीराब्धि आसन
१३०५७	।।ना.गा.२०८४.००२।।	दधि समुद्र कोण्या ठायीं । खारा समुद्र कोण्या गृहीं

१३०५८	।।ना.गा.२०८४.००३।।	रत्न समुद्र तो कोण । कोठें मदनाचें आसन
१३०५९	।।ना.गा.२०८४.००४।।	मन समुद्र कोठें आहे । नामा म्हणे शोधून पाहे
१३०६०	।।ना.गा.२०८५.००१।।	नेत्र नीर समुद्र देखा । क्षीर सत्रावी ओळखा
१३०६१	।।ना.गा.२०८५.००२।।	दधिसमुद्र नाकीं आहे । खारा शरीरीं तो पाहे
१३०६२	।।ना.गा.२०८५.००३।।	नाभीं रत्नाकर देखा । माथां मदन ओळखा
१३०६३	।।ना.गा.२०८५.००४।।	नामा म्हणे सांगूं काय । मन समुद्र हृदयीं आहे
१३०६४	।।ना.गा.२०८६.००१।।	राधा वनींच्या पुत्रास धन बहुत जालें । तो म्हणे आतां धर्म करीन । बापाचिये श्राद्धा आवंतिले ब्राह्मण । एक जेवण सुदामाचें
१३०६५	।।ना.गा.२०८६.००२।।	कैसी नागवण आली रे बापा । वेंचा परते पाप आणिक नाहीं
१३०६६	।।ना.गा.२०८६.००३।।	सहाजणां ब्राह्मणां सवा सवा शेराचा भात । कढींत हिंग जिरें बहुत । त्यावरी घातलें मुगाचें वरण । येवो का मरण जेवित्यासी
१३०६७	।।ना.गा.२०८६.००४।।	सहाजणां ब्राह्मणां घातले सहा वडे । घालितां रडे उसकाबुसकी । त्यावरी घातलें तूप लोणकढें । जावो का मढें या जेवित्याचें
१३०६८	।।ना.गा.२०८६.००५।।	सगळ्या गव्हाची रांधिली क्षीरीं । ही एक महामारी आली देखा । त्यावरी घातली साखर गूळ । उठो का पोटशूळ जेवित्यांसी
१३०६९	।।ना.गा.२०८६.००६।।	जेवणें जालें दहीभात आला । तंव आत्मा लागला ब्रह्मांडासी । बहुतेक दिवसासी अंतर पाडिला । समूळीं नागविला म्हणे नामा
१३०७०	।।ना.गा.२०८७.००१।।	मुंगी व्याली शिंगी जाली तिचें दूध किती । सतरा रांजण भरून गेले पेले बारा हत्ती
१३०७१	।।ना.गा.२०८७.००२।।	आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें
१३०७२	।।ना.गा.२०८७.००३।।	लटिकें गेलें कटकें तेथें गाडग्याएवढें राळें । उडत चिमणी चलत चाले तिचे वाटीएवढे डोळे
१३०७३	।।ना.गा.२०८७.००४।।	शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी । उंदिर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी
१३०७४	।।ना.गा.२०८७.००५।।	पाण्यांत कांसव गीत गाय वनांत कोल्हा नाचे । सावज मनीं संतोषला खोकड पुस्तक वाचे
१३०७५	।।ना.गा.२०८७.००६।।	कांतणी घरीं लग्न लागलें सरडा कणीक कांडी । बागुल वंध्या कण्या परणी घुबड मांडे रांधी
१३०७६	।।ना.गा.२०८७.००७।।	बाभुळीचे खोडी माशानें केले कोटें । सशानें सिंह ग्रासिला बेडुक आले लोटें
१३०७७	।।ना.गा.२०८७.००८।।	विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याती । लटिकें म्हणतील त्यांचे पूर्वज नरका जाती
१३०७८	।।ना.गा.२०८८.००१।।	त्रिभुवनाची परि मांडिली शरीरीं । गोकुळाभीतरीं उभारिलीं
१३०७९	।।ना.गा.२०८८.००२।।	शेषाचिये दृष्टीं मूळ भूमिका चोखटी । तेथूनि मूळ दृष्टी आरंभिली
१३०८०	।।ना.गा.२०८८.००३।।	मन विंदानी आणि कुंडलिनी चतुर्दळांपासुनी । पवनवेगीं टाकुनि पाति समया स्वाधिष्ठानीं

१३०८१	।।ना.गा.२०८८.००४।।	मणिपूरपर्यंत कळवट शोभिवंत । तेथुनि टाकितसे नीट कर्मभूमीं
१३०८२	।।ना.गा.२०८८.००५।।	बारा सोळा नारी श्रीपति मुरारी । हृदयमंदिरीं गोपिराजु
१३०८३	।।ना.गा.२०८८.००६।।	कनक घाटेवरी सत्रावी सुंदरी । चाले उन्मत्त भारी चंद्रकळा
१३०८४	।।ना.गा.२०८८.००७।।	तेथें रोवियला दारवंटा दावी त्याच्या वाटा । जावया वैकुंठा गौळियासी
१३०८५	।।ना.गा.२०८८.००८।।	मृत्युलोकींच्या सैंवरा आल्या ज्या चौबारा । देखिल्या त्या घरा चौघीजणी
१३०८६	।।ना.गा.२०८८.००९।।	त्या चिपोळीयां वाहती मिळोनियां येती । चालती मागती पश्चिमपंथीं
१३०८७	।।ना.गा.२०८८.०१०।।	अनुहतावरी वाट करुनी नीट । विशुद्ध नगरा येती धीट
१३०८८	।।ना.गा.२०८८.०११।।	तेथुनी वाट असे नीट दारवंटा । तेथुनी जावें ब्रह्मरंध्र कपाटां
१३०८९	।।ना.गा.२०८८.०१२।।	हेंचि परब्रह्म राऊळ तेथुनी । जाऊं नये पुढारी सांडुनी राया
१३०९०	।।ना.गा.२०८८.०१३।।	तेथें रविशशीवरी आणि ब्रह्मरश्मी स्वरूप । एकांत ओवरी आहे अमूप
१३०९१	।।ना.गा.२०८८.०१४।।	विष्णुदास नामा सांगे निर्वाणीच्या खुणा । अनुभवी तोचि जाणे येरा चोजवणा
१३०९२	।।ना.गा.२०८९.००१।।	या वो क्षेत्र केलें जुंपलीं आउतें । अठरा धान्यें तेथें पेरियेलीं
१३०९३	।।ना.गा.२०८९.००२।।	मेघ:शाम मेघ वर्षे सर्वां धारीं । बीज विटेवरी सासिन्नले
१३०९४	।।ना.गा.२०८९.००३।।	जगाचें जीवन पंढरी पिकली । चराया सोकलीं भूतें जाणा
१३०९५	।।ना.गा.२०८९.००४।।	घालूनियां माळा रक्षी कळिकाळा । काय कलिमळा संसाराची
१३०९६	।।ना.गा.२०८९.००५।।	पापा सोकरणें भक्ति हे गोफण । भूस सांडी कण वेंचिताती
१३०९७	।।ना.गा.२०८९.००६।।	वेद शास्त्र ऐसें बोल बोलविता । गूढ वेगळितां लाभ होती
१३०९८	।।ना.गा.२०८९.००७।।	नामा म्हणे स्वामी विठ्ठल सुकाळ । अन्न ब्रह्म फळ त्रिभुवनीं
१३०९९	।।ना.गा.२०९०.००१।।	चालती कुळवाडी न टके । उपकें घेतलीसे नाकें । चार वर्षें पिकलें निकें । त्यांचे कण सांचले
१३१००	।।ना.गा.२०९०.००२।।	पुढें एक निपाणिक पडिलें । त्या कणाचें द्रव्य सांचलें । कृपणाचें घर भरिलें । वंचक जाला भक्तांसी
१३१०१	।।ना.गा.२०९०.००३।।	स्त्रियांबाळां खाऊं नेदी । धर्म न करीच निशुद्धी । डोईस बांधलीसे चिंधी । खादीं रकटें ठिगळाचें
१३१०२	।।ना.गा.२०९०.००४।।	त्या द्रव्यांचें करी कळांतर लेखा । सजगाणीस देई रुका । रुक्यास घेई पैका । आठा दिवसांच्या बोला
१३१०३	।।ना.गा.२०९०.००५।।	सवाई दिडी-दुणी । अकर्ताच घरीं आणी । तो न भजे चक्रपाणि । पाप दुणी होतसे
१३१०४	।।ना.गा.२०९०.००६।।	तंव एक अतीत घरासी आला । बाईलीनें त्यासी स्वैंपाक केला । तंव आपण उठून जागला । झडकरी आला दारासी
१३१०५	।।ना.गा.२०९०.००७।।	कोणें दाखविलें माझें घर । त्यावरी घेईन जहर । कोठें गेला सुना मोगर । अरगळा कोणें काढिली
१३१०६	।।ना.गा.२०९०.००८।।	ऐसा तो ब्राह्मण चडफडत गेला । आपण परतोन माघारा आला । धांवोनि घाव हाणितला । डोई फोडिला बायलेची

१३१०७	।।ना.गा.२०९०.००९।।	कैसी केली बोहरी । बोज नाहीं तुझे घरीं । नागविलें इया पोटीं । तीन वेळां खातातीं
१३१०८	।।ना.गा.२०९०.०१०।।	ऐसी गजबज ऐकोन । शेजारीं आला धांवोन । त्यासी हातीं धरोन । गृहाभितरीं हिंडविला
१३१०९	।।ना.गा.२०९०.०११।।	त्यासी बैसावया दिला पिढा । तो स्वैंपाक आणोनि पुढां । पहा हो बायलेचा धाडसा केवढा । ऐका तुम्ही दादोजी
१३११०	।।ना.गा.२०९०.०१२।।	ऐसीं पूर्ण अकरा वर्षें भरलीं । बारा वर्षांची साउली पडली । या रीतीनें गुजराण जाली । तंव अग्नि लागला गृहासी
१३१११	।।ना.गा.२०९०.०१३।।	शेतांतून कुळवाडें केली चोरी । पाणी निघाले पेवा भितरीं । सुनेनें घालून घेतलें विहिरीं । ऐसेपरी नागवलों
१३११२	।।ना.गा.२०९०.०१४।।	ऐसे जे नर असती । ते जन्मोजन्मीं नागवती । त्यांची न चुके यातायाती । विष्णुदास म्हणे नामा
१३११३	।।ना.गा.२०९१.००१।।	जन तुम्ही करा रे उदीम । वाचे स्मरा नारायण । तो तुम्हां चुकवील जन्ममरण । मायाभ्रमण चुकविल
१३११४	।।ना.गा.२०९१.००२।।	तारूं करूनी शरीराचें । केणें भरिलें हरिनामाचें । शिड उभविलें सत्त्वाचें । वल्हें पडती धर्माचें
१३११५	।।ना.गा.२०९१.००३।।	आत्मयांची करुनी कुबे काठी । वारा लागतो जगजेठी । तारूं चाले थोरा नेटी । विठ्ठल भेटी पंढरीये
१३११६	।।ना.गा.२०९१.००४।।	तारवा सांपडलें बंदर । राया विठोबाचें नगर । तें बा संतांचें माहेर । विष्णुदास म्हणे नामा
१३११७	।।ना.गा.२०९२.००१।।	जन्मासी येवोनि जाहलों मी चाटा । गेलों होतों हाटा पंढरीये
१३११८	।।ना.गा.२०९२.००२।।	गुंड गे करी गुंड गे करी । बैसलों द्वारीं पंढरीये
१३११९	।।ना.गा.२०९२.००३।।	शनिवारीं पुंडलिकापाशीं । चंद्रभागेसी स्नान केलिये
१३१२०	।।ना.गा.२०९२.००४।।	आदित्यवारीं करीं पश्चाळें । कळीकाळा न भीयें त्याचेनि बळिये
१३१२१	।।ना.गा.२०९२.००५।।	सोमवारीं वेणुनादींच्या हाटा । जातसे चाटा उभवोनी गुढीये
१३१२२	।।ना.गा.२०९२.००६।।	विष्णुदास नामयानें उभवोनी गुढी । विकलीसे प्रौढी केशीराज
१३१२३	।।ना.गा.२०९३.००१।।	चौऱ्यांशीं लक्ष जन्म हिंडतां । घोंगडें अनंता जर्जर जालें
१३१२४	।।ना.गा.२०९३.००२।।	जेथें जाय तेथें तुटचि पडे । मुद्दल न घडे काय करूं
१३१२५	।।ना.गा.२०९३.००३।।	संचित आटलें व्यवसाय खुंटले । म्हणोनि ठाकिलें द्वार तुझें
१३१२६	।।ना.गा.२०९३.००४।।	नामा म्हणे विठोबा जरी होसी जाणतां । तरी या बोला उचिता प्रेम देईं
१३१२७	।।ना.गा.२०९४.००१।।	घोंगडें हें नव्हे धडुत पैं माझें । पांघुरतां ओझें होत असे
१३१२८	।।ना.गा.२०९४.००२।।	घे आपुलें घोंगडें देई माझा पांवा। अझुनि कां चाळविसी केशिराजा
१३१२९	।।ना.गा.२०९४.००३।।	विष्णुदास नामा केशवा विनवी । ऐहिक्य परत्रीं नाहीं चाड मज
१३१३०	।।ना.गा.२०९५.००१।।	औट हात घोंगडें दिधलें हरी । पांघरलों नाहीं धणीवरी
१३१३१	।।ना.गा.२०९५.००२।।	माझें घोंगडें कृष्णा गा जतन करी। नागविलें थोरी पांचाजणीं
१३१३२	।।ना.गा.२०९५.००३।।	साठीं तीनशें दसोडी । पदरीं औट कोडी रोमावळी

१३१३३	।।ना.गा.२०९५.००४।।	बहात्तर गांठी सोळा फुंदणी । घोंगडी दाटणी होत असे
१३१३४	।।ना.गा.२०९५.००५।।	त्रिगुणीं दोरिया जाणा । घोंगडें पांघरवी पंढरीराणा
१३१३५	।।ना.गा.२०९५.००६।।	त्याचें घोंगडें त्यासी दिधलें । उघडें नामें भक्ती पांघरविलें
१३१३६	।।ना.गा.२०९६.००१।।	पाटोळा तिमलारे मजवरी घाली कांबळें
१३१३७	।।ना.गा.२०९६.००२।।	आषाढमासिंचा रे कैसा शीतळ वारा । वर्षतो मेघुला रे कैशा शीतळ धारा
१३१३८	।।ना.गा.२०९६.००३।।	झिरमिर झिरमिर रे कैसा वर्षतो मेघू । जाळीचें घोंगडें बा मजवर घालीं सेवूं
१३१३९	।।ना.गा.२०९६.००४।।	प्रेमाचें भरतें गा कैसा महापूर आला । नामया विष्णुदास केशवराजीं मिनला
१३१४०	।।ना.गा.२०९७.००१।।	देहमंदिराभीतरीं । शेजे सूदला श्रीहरी । निद्रा उन्मनीचे भरी । तें म्यां स्वप्नीं देखिलें
१३१४१	।।ना.गा.२०९७.००२।।	स्वप्ना भुललें बाई । मागील नाठवेचि कांहीं । हा जीव परवस्तूच्या ठायीं । तनुमनें आटला
१३१४२	।।ना.गा.२०९७.००३।।	स्वप्न सांगूं कोणासी । विवेक करिती तयासी । हें कोडें अज्ञानासी । संतावांचुनी नुगवे
१३१४३	।।ना.गा.२०९७.००४।।	ध्यानीं पहुडला सांवळा । जवळी नारी बारा सोळा । विंजणें वारिती सकळां । सोहं शब्दें जागरणीं
१३१४४	।।ना.गा.२०९७.००५।।	धिं धिं तुरे वाजती । अनुहत ध्वनी गर्जती । तेथें निद्रा ना सुषुप्ती । चंद्र सूर्य मावळले
१३१४५	।।ना.गा.२०९७.००६।।	मन पवना नाहीं भेद । तया ठायीं हा गोविंद । तेथें खुंटला अनुवाद । वेदश्रुति आटल्या
१३१४६	।।ना.गा.२०९७.००७।।	म्हणे विष्णुदास नामा । जन्ममरण नाहीं आम्हां । कृपा केली मेघ:श्यामा । संतसंगें तारिलों
१३१४७	।।ना.गा.२०९८.००१।।	वेणुनादीं चरे पाणी पी भीवरें । ते धेनु हुंबरे वत्सालागीं
१३१४८	।।ना.गा.२०९८.००२।।	वाणें ते सांवळी नामें तें श्रीधरा । चरे वसुंधरा चवदा भुवनें
१३१४९	।।ना.गा.२०९८.००३।।	केशव नामें गाय माधव नामें गाय । विठ्ठल नामें गाय कामधेनु
१३१५०	।।ना.गा.२०९८.००४।।	प्रेमें ते पान्हावे भक्ता घरीं जाय । भुकेलिया खाय पातकासी
१३१५१	।।ना.गा.२०९८.००५।।	नामा म्हणे गाय भाग्यवंता घरीं । पाप्या जन्मवरी पाठी लागे
१३१५२	।।ना.गा.२०९९.००१।।	परा पश्यंति मध्यमा वैखरी । तें गाय दुभे वैष्णवा घरीं
१३१५३	।।ना.गा.२०९९.००२।।	ते एके विठ्ठलें पंढरी राखिली । दुभावया दिधली पुंडलिका
१३१५४	।।ना.गा.२०९९.००३।।	चाऱ्ही वेद मुखीं धरूनियां राहे । विठ्ठलाचे द्वारीं नामा गाये
१३१५५	।।ना.गा.२१००.००१।।	कैलास भुवनीं । देव बसले सिंहासनीं । आपण भवानी । कर जोडुनी उभी असे
१३१५६	।।ना.गा.२१००.००२।।	भक्तिरस द्यावा । तेथील अनुभव घ्यावा । नित्य हरिजागरू सांगावा । कोण फळ तयाचें
१३१५७	।।ना.गा.२१००.००३।।	तंव चंद्रचूड संतोषला । देवीं प्रश्न बरवा केला । अमृत ओघ प्रवर्तला । दुजें बोलती व्यापकें
१३१५८	।।ना.गा.२१००.००४।।	या हरिजागराचें फळ । तुज सांगेन सोज्वळ । महादेव ऐसें बोलिले । प्रेमभावें गिरिजेसी

१३१५९	।।ना.गा.२१००.००५।।	परिसा हरीजागरू । गिरिजेसी सांगे महेश्वरु । नवविधा भक्तीचा प्रकारु । शिवतत्त्वीं बोलतों
१३१६०	।।ना.गा.२१००.००६।।	प्रथम अश्विनीचा भरू । पूर्ण तिथी जी शंकरू । करुनी व्रतांचा स्वीकारू । मास दिनपर्यंत
१३१६१	।।ना.गा.२१००.००७।।	मग मिळोनी संतसज्जन । करावें हरिजागरण । गीतवाद्य सुलक्षण । नृत्यविलास तांडव
१३१६२	।।ना.गा.२१००.००८।।	मग सारोनि देवासी मार्जन । वरी गंगोदकें स्नान । मग वस्त्रें परिधान । देवासी करावी
१३१६३	।।ना.गा.२१००.००९।।	यज्ञोपवित अलंकार । करोनि पूजा नमस्कार । आणि नैवेद्य नानाप्रकार । भगवंतासी अर्पावा
१३१६४	।।ना.गा.२१००.०१०।।	सद्यस्तृप्त घृत पूर्ण । वरी षड्रस पक्वान्न । भावें सर्वांसी पूजोन । नमस्कार भावें करावा
१३१६५	।।ना.गा.२१००.०११।।	मग करावी वैष्णवांची पूजा । मनीं भाव न धरावा दुजा । स्वयंभ मूर्ती मीच सहजा । सदा संतां जवळिकें
१३१६६	।।ना.गा.२१००.०१२।।	संत मार्जनादि भेदु । जेंवि मिळणी गंगासिंधु । अखंड वाचे परमानंदु । हरिकीर्तन करावें
१३१६७	।।ना.गा.२१००.०१३।।	त्या हरीजागराचें महिमान । दुजें नाहीं समाधान । सकळ तीर्थ केलिया पुण्य । परी सरी न पवशी
१३१६८	।।ना.गा.२१००.०१४।।	सकळ तीर्थांचा परवडी। दान देतां पृथ्वी थोकडी । या हरिजागराची प्रौढी । ते तयाहुनि अधिक
१३१६९	।।ना.गा.२१००.०१५।।	पहिलें पक्षु मज अर्पिला । दावा विष्णु थोर जाला । दुजा पक्षु सांगाजी वहिला । म्हणोनि नमस्कारिलें शंकराशीं
१३१७०	।।ना.गा.२१००.०१६।।	परिसे गिरिजे देवी । कथा सांगेन बरवी । फळ पावती मानवी । अंत:करणीं कल्पिलें
१३१७१	।।ना.गा.२१००.०१७।।	दुजा पक्षु प्रथम तिथी । वैश्वनरासी प्रीत्यर्थी । बीज ब्रह्मया सांगती । ऋषीसहित उपचारु
१३१७२	।।ना.गा.२१००.०१८।।	पंचमी अष्टमी नागकुळा । शेषादिकां सकळां । प्रीत्यर्थ पावो नागकुळा । षष्ठी स्वामी कार्तिक
१३१७३	।।ना.गा.२१००.०१९।।	भानुसप्तमी जागरी । जैसा समुद्र सरिता सागरीं । अष्टमीची अवधारीं । माझारीं मृत्युलोक
१३१७४	।।ना.गा.२१००.०२०।।	नवमीच षष्ठी योगिनी । चार कोटी कात्यायनी । दुर्गेसहित भवानी । दशमी यम पवित्र गुणी
१३१७५	।।ना.गा.२१००.०२१।।	तेहतीस कोटी एकादशी । ब्रह्मा हरिहर वोरसी । नंदी धेनु तेरसी । आणि चतुर्दशी परियेसा
१३१७६	।।ना.गा.२१००.०२२।।	पौर्णिमा चंद्रतारा । इंद्रादिकां देवा सकळां । इत्यर्थ पावो देवा सकळां । जे बोलिया वेदश्रुति
१३१७७	।।ना.गा.२१००.०२३।।	संतोषोनि उमापती । ऐसें पुराणें बोलती । या हरिजागराची स्थिति । तुजप्रति सांगितली
१०४१३४	शमदमादि	।।ना.गा.११२८.०१७।।	शमदमादि समश्रेष्ठा । आदि अनादि वरिष्ठा । सकळ होऊनि विशिष्टा । भुवनपदा दावी
१०४१३५	शयन	।।ना.गा.०२८२.००४।।	शयन शेषापृष्ठीं नाभीं परमेष्ठी । गंगा वामांगुष्ठी देखियेला
१०४१३६	शयन	।।ना.गा.०४६०.००३।।	पर्यंक शयन शेषाचें आसन । सांडूनि निजभुवन उभे येथें
१०४१३७	शयन	।।ना.गा.०४७८.००२।।	एक तो वृषभारूढ जाण । एका साजे गरुडवाहन । एक स्मशानीं भस्मोद् धुळण । एका शयन क्षीरसागरीं
१०४१३८	शयन	।।ना.गा.१०२५.००६।।	जावोनी तया पुष्पकावरी । शयन आरंभिलें हरी । नारद तुंबर वैकुंठाभीतरीं । मंजुळ सुस्वरीं गातसे
१०४१३९	शयन	।।ना.गा.१२९९.००७।।	धन्य विश्रांतीसी केलें त्वां शयन । वोसंगा घेऊन नामयासी
१०४१४०	शयना	।।ना.गा.२१२४.००१।।	पहुडा पहुडा जी । कान्हा कमळदळ लोचना । श्रमलेती शयना करा वेगीं
१०४१४१	शयनीं	।।ना.गा.००९३.००६।।	आसनीं शयनीं भोजनीं जतन करा। नामया दातारा केशिराजा
१०४१४२	शयनीं	।।ना.गा.०२५७.००६।।	नामया स्वामी आसनीं शयनीं । दुरी नवजे डोळ्यांपासोनी
१०४१४३	शयनीं	।।ना.गा.०४७६.००४।।	गोविंद गोकुळपाळक । गोविंद अंगवणें एक । गोविंदे दैत्या लावियेला धाक । गोविंद शेष शयनीं
१०४१४४	शयनीं	।।ना.गा.०४८३.००५।।	ऐसा हा कृपाळू आसनीं शयनीं। न विसंबावा मनीं भाग्यवंतीं
१०४१४५	शयनीं	।।ना.गा.०८१७.००१।।	आसनीं शयनीं जपतां चक्रपाणि । लाविली निशाणी वैकुंठींची
१०४१४६	शयनीं	।।ना.गा.१२७३.००७।।	आसनीं शयनीं न विसंबे भोजनीं । घालिन मुरडोनि हृदयामाजीं
१०४१४७	शयनीं	।।ना.गा.१६४४.००१।।	आसनीं शयनीं भोजनीं गमनीं । तुझे पाय दोन्ही दावी मज
१०४१४८	शयनीं	।।ना.गा.१६६०.००१।।	आसनीं शयनीं आठवीं अनुदिनीं । नित्य समाधानीं रूप तुझें

१०४१४९	शयनीं	।।ना.गा.१६६३.००४।।	गत शयनीं विसर न द्यावा श्रीरामा । यापरी निश्चित परमात्मा । तूं आलिया निवारिसी श्रमा । ऐसें केशिराजा विनविती नामा
१०४१५०	शयनीं	।।ना.गा.१७१६.००४।।	आसनीं शयनीं ध्यानीं मज मनीं । योगक्षेम दोन्ही वाहे त्याचें
१०४१५१	शयनीं	।।ना.गा.१८८२.००५।।	आसनीं शयनीं मनीं चिंता रे गोविंदु । तेणें तुटे कंदु भवव्याधीचा
१०४१५२	शय्या	।।ना.गा.०६०२.००४।।	नाना सुमनांची शय्या आरुवार । करिती उपचार सिद्धि आठ
१०४१५३	शर	।।ना.गा.१३९७.००२।।	अक्षरांची संख्या बोलिले उदंड। मेरू सुप्रचंड शर आदि
१०४१५४	शरण	।।ना.गा.०१३७.००४।।	शरण शरण अगा वासुदेवा । अच्युता माधवा दीनबंधू
१०४१५५	शरण	।।ना.गा.०१३७.००४।।	शरण शरण अगा वासुदेवा । अच्युता माधवा दीनबंधू
१०४१५६	शरण	।।ना.गा.०१६३.००१।।	चरणासी शरण तुझिया जे येती । तेचि उद्धरती भवसिंधु
१०४१५७	शरण	।।ना.गा.०२१३.००२।।	अच्युता अनंता श्रीधरा वामना । अगा नारायणा शरण तुज
१०४१५८	शरण	।।ना.गा.०२१३.००३।।	जनार्दना हरी त्रिविक्रमा केशवा । अगा वासुदेवा शरण तुज
१०४१५९	शरण	।।ना.गा.०२१३.००४।।	गोविंदा माधवा हरी मेघ:शामा। अगा पुरुषोत्तमा शरण तुज
१०४१६०	शरण	।।ना.गा.०२६४.००७।।	ज्योरे माधवजी । ज्योरे माधवजी । में शरण थई । तनका काकैपी। बाप दयाळू तूंही । मारी साडी अपो । हातणी ले कंकणी
१०४१६१	शरण	।।ना.गा.०३४५.००६।।	नामयाचा स्वामी आमुचें कुलदैवत । शरण जाऊनि गौळिया मागु उच्छिष्ट
१०४१६२	शरण	।।ना.गा.०४४०.००६।।	ऐसें सर्वभावें विठोबासी शरण । त्यांचे वंदीन चरण नामा म्हणे
१०४१६३	शरण	।।ना.गा.०४६७.००२।।	ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणूनि शरण आलों
१०४१६४	शरण	।।ना.गा.०५३९.००४।।	नामा म्हणे निवविलें सकळ इंद्रियातें । म्हणोन त्या केशवातें शरण जावें
१०४१६५	शरण	।।ना.गा.०५४९.००१।।	नित्य आम्हां सुख तुझ्या पायापासीं । शरण कोणासी जाऊं आम्ही
१०४१६६	शरण	।।ना.गा.०६१६.००२।।	एका विठ्ठला शरण जा रे । जन्म वायां कां दवडा रे
१०४१६७	शरण	।।ना.गा.०६६३.००३।।	म्हणोनियां संतां जाऊनि शरण । साधावें निधान नाम ब्रह्म
१०४१६८	शरण	।।ना.गा.०७२२.००४।।	शरण आलों जिव्हे तुवां नुपेक्षावें । नामा म्हणे गावों हरिनाम
१०४१६९	शरण	।।ना.गा.०७५३.००६।।	नामा म्हणे शरण रिघतां एक्याभावें । कैवल्य भोगावें नाममात्रें
१०४१७०	शरण	।।ना.गा.०८२९.००२।।	गुरुपदीं जावें आधीं हो शरण । मी हें माझें ओळखून घ्यावें नाम
१०४१७१	शरण	।।ना.गा.०८८३.००१।।	जगत्रयजीवन अंतर्निष्ठ ज्ञान । तरी संतासीं शरण रिघिजे भावें
१०४१७२	शरण	।।ना.गा.०९३१.००६।।	कायावाचामनें विनटलों चरणासी । तो मी शरण आणिकांसी जाऊं कोणा

१०४१७३	शरण	।।ना.गा.०९७१.००२।।	सर्वभावें शरण सर्वकाळीं मज । ते हे भक्तराज सखे माझे
१०४१७४	शरण	।।ना.गा.०९७३.०१४।।	संकल्प विकल्प न धरावे मानसीं । मनोभावें संतांसीं शरण जावें
१०४१७५	शरण	।।ना.गा.१२६८.००६।।	या देहघरसंसाराचा आलासे कंटाळा । म्हणोनि गोपाळा शरण आलों
१०४१७६	शरण	।।ना.गा.१२८३.००४।।	संसारा गांजले जन्ममरणा उबगले । म्हणोनी शरण आले भयाभीत
१०४१७७	शरण	।।ना.गा.१२८३.००८।।	शरण आलिया ते म्यां जरि अव्हेरावें । कोण कोणें आपंगावें सांग सत्य
१०४१७८	शरण	।।ना.गा.१२९२.००९।।	पांडवांचें काज करितां नाहीं लाज । म्हणे शरण मज अनन्य भावें
१०४१७९	शरण	।।ना.गा.१३००.००४।।	नामा म्हणे शरण आलों जिच्या भेणें । तिचे हातीं देणें उचित नव्हे
१०४१८०	शरण	।।ना.गा.१३२८.०३९।।	देव म्हणे नाम्या पाहे परतोन । तुज मी शरण आलों असे
१०४१८१	शरण	।।ना.गा.१३३०.००४।।	वैष्णवांचे भार देव सुरगण । येताती शरण पंढरिसी
१०४१८२	शरण	।।ना.गा.१३३८.००३।।	स्वहिताचें कारण पडियेलें जेव्हां । शरण आला तेव्हां आळंकापुरीं
१०४१८३	शरण	।।ना.गा.१३४२.००४।।	म्हणे मुक्ताबाई घालूं द्या लोटांगण । जाऊं द्या शरण अव्यक्तासी
१०४१८४	शरण	।।ना.गा.१३५९.००१।।	श्रीविठ्ठलें आपुल्या मुखवचनें । नामदेवासी करी अज्ञापन । होवोनि दीनाचें अति दीन । सद्गुरुसी शरण रिघावें
१०४१८५	शरण	।।ना.गा.१३५९.००८।।	मग श्रीविठ्ठल म्हणे ऐक आतां । सांगेन सद्गुरुची वार्ता । त्वां पाहोनि तत्त्वतां । शरण तात्काळ रिघावें
१०४१८६	शरण	।।ना.गा.१३५९.०३२।।	तर्क वितर्क बाह्यमुद्रा । तेथें न चले गा भक्तनरेंद्रा । तारीं तारीं या भवसमुद्रां । म्हणोनि शरण रिघावें
१०४१८७	शरण	।।ना.गा.१३५९.०५३।।	ऐसें जेणें आचरावें । तरी सद्गुरुसी शरण जावें । नाहीं तरी करावें । नामस्मरण माझें पैं
१०४१८८	शरण	।।ना.गा.१३६०.००४।।	शरण गुरुसी जालिया सप्रेमें । संसाराचा श्रम उतरेल
१०४१८९	शरण	।।ना.गा.१३६०.००६।।	म्हणूनि नाम्या तुवां गुरुसी जावें शरण । तेणें भवबंधनें मुक्त होती
१०४१९०	शरण	।।ना.गा.१३६१.००४।।	जाई नाम्या जाई गुरुसी शरण । तुटे भवबंधन तुझें वेगीं
१०४१९१	शरण	।।ना.गा.१३६१.००५।।	नामा म्हणे देवा कवणा शरण जाऊं । कोणा मी होऊं शरणागत
१०४१९२	शरण	।।ना.गा.१३६२.००१।।	देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावें वेगीं
१०४१९३	शरण	।।ना.गा.१३९९.००१।।	दिवस गेले वायांविण । देवा तुज न रिघतां शरण । बाळत्व गेलें अज्ञानपण । तें आठवण नव्हेचि
१०४१९४	शरण	।।ना.गा.१४०२.००१।।	अंतकाळीं मी परदेशी । ऐसें जाणोनि मानसीं । म्हणोनियां हृषिकेशी । शरण मी तुज आलों
१०४१९५	शरण	।।ना.गा.१४६७.०१२।।	आमुचें हो तेंच तुम्हीं विनवावें । आम्हांसि मानलें आघवें । किती येरझारीं शिणवावें । शरण रिघावें श्रीहरी
१०४१९६	शरण	।।ना.गा.१५५६.००३।।	न बोलसी कां रे धरिला अबोला । कोणासी विठ्ठला शरण जाऊं
१०४१९७	शरण	।।ना.गा.१५९०.००२।।	तैसा मी शरण आलों रे केशवा । मज त्वां राखावें पायांतळीं

१०४१९८	शरण	।।ना.गा.१५९१.००३।।	शरण आलियाचे न पाहसी अवगुण । कृपेचें लक्षण तुज साजे
१०४१९९	शरण	।।ना.गा.१५९२.००६।।	ऐसा अनुभव घडला मज । म्हणोनि बा शरण आलों तुज । नामा म्हणे केशिराज । कृपा करीं दातारा
१०४२००	शरण	।।ना.गा.१५९५.००६।।	नामा म्हणे शरण आलों केशिराजा । ऐसा भावो माझा करी वेगीं
१०४२०१	शरण	।।ना.गा.१५९६.०१०।।	ऐसें विचारितां बहुत भागलों । म्हणोनि शरण आलों पांडुरंगा
१०४२०२	शरण	।।ना.गा.१५९६.०१२।।	नामा म्हणे आतां हिंडतां कष्टलों । म्हणोनि शरण आलों पांडुरंगा
१०४२०३	शरण	।।ना.गा.१५९७.००१।।	संसारी गांजलों म्हणोनि शरण आलों । पाठीसि रिघालों देवराया
१०४२०४	शरण	।।ना.गा.१६४३.००३।।	तूंचि मातापिता गुरुबंधू होसी । जाऊं मी कोणासी शरण आतां
१०४२०५	शरण	।।ना.गा.१६९४.००४।।	नामा म्हणे शरण आलों मी केशवा । हाचि तूं पुरवावा मनोरथ
१०४२०६	शरण	।।ना.गा.१७४५.००३।।	साधुसंतां शरण जावूं मनोभावें । प्रसाद स्वभावें देती मज
१०४२०७	शरण	।।ना.गा.१८५४.००६।।	विष्णुदास नामा विनवी जगा । अझुनि तरी हरिसि शरण रिघा । जे जे अपराध केले असतिल मागा । ते ते नेईल भंगा स्वामी माझा
१०४२०८	शरण	।।ना.गा.१८६८.००५।।	नामा म्हणे शरण रिघा हरिपायीं । तया शेषशायी न विसंबे
१०४२०९	शरण	।।ना.गा.१८८२.००१।।	वासनेचा त्याग करा रे सर्वथा । भावें त्या अनंता शरण रिघा
१०४२१०	शरण	।।ना.गा.१८८४.००३।।	दंभ अभिमान सर्व त्यजोनियां । शरण त्या सखिया जावें आतां
१०४२११	शरण	।।ना.गा.१८८८.००३।।	नामा म्हणे जावें शरण केशवा । सळेचा जो ठेवा न पवसी
१०४२१२	शरण	।।ना.गा.१८९५.०२०।।	म्हणे विष्णुदास नामा । शरण जावें पुरुषोत्तमा
१०४२१३	शरण	।।ना.गा.१९०१.००२।।	तैसा तुज काळ टपत वेळोवेळां । वेगीं त्या गोपाळा शरण जाई
१०४२१४	शरण	।।ना.गा.१९०४.००१।।	न फिटे हें ओझें मायेचा गुंडाळा । एका तूं गोपाळा शरण जाई
१०४२१५	शरण	।।ना.गा.१९०८.००३।।	करितां त्याचें काज मनीं न धरी लाज । म्हणे हें शरण मज सर्व भावें
१०४२१६	शरण	।।ना.गा.१९१२.००५।।	नामा म्हणे आतां सकळ सांडोन । आलोसें शरण विठोबासी
१०४२१७	शरण	।।ना.गा.१९१४.००६।।	नामा म्हणे वेगीं होऊनि सावधान । जाई येक्या शरण केशवराजा
१०४२१८	शरण	।।ना.गा.१९१५.००१।।	आलिया संसार सोडवणें करा । शरण जा उदारा पांडुरंग
१०४२१९	शरण	।।ना.गा.१९१८.००४।।	अवघा हा प्रपंच जाणोनि लटिका । शरण रिघा एका पंढरिराया
१०४२२०	शरण	।।ना.गा.१९२१.००२।।	सोडवण करा आलिया संसारा । शरण जा उदारा विठोबासी
१०४२२१	शरण	।।ना.गा.१९२८.००१।।	देह आहे तंव करा रे धांवणी । शरण चक्रपाणि रिघा वेगीं
१०४२२२	शरण	।।ना.गा.१९३०.००६।।	नामा म्हणे शरण रिघो पंढरिनाथा । नुपेक्षी सर्वथा दीनबंधु

१०४२२३	शरण	।।ना.गा.१९३३.००५।।	विष्णुदास नामा जातांचि शरण । स्वप्नीं जन्ममरण नाहीं नाहीं
१०४२२४	शरण	।।ना.गा.१९४३.००१।।	मृगजळडोहो कां उपससी वायां । वेगीं लवलाह्या शरण रिघें
१०४२२५	शरण	।।ना.गा.१९४४.००१।।	हरिसी शरण रिघा वहिलें । राहे कळिकाळ उगले
१०४२२६	शरण	।।ना.गा.१९७४.००१।।	संसार बंधन केलें जेणें शून्य । तयासी अनन्य शरण रिघा
१०४२२७	शरण	।।ना.गा.२०१२.००२।।	संसार स्वप्न जाणुनियां शरण रिघे पंढरिया राया रे
१०४२२८	शरण	।।ना.गा.२०३७.००६।।	तूं होय मागता हरी होय दाता । शरण जाई अनंता म्हणे नामा
१०४२२९	शरण	।।ना.गा.२०६६.०११।।	कलियुगाच्या अंतीं थोर होईल अन्नान वो । एकीं ठायीं होऊन खातील चारी वर्ण वो। तेव्हां पृथ्वी–भारें तुजला येईल शरण वो । तेव्हां तूं पावसी कलंकी अवतार धरूनी वो
१०४२३०	शरण	।।ना.गा.२१११.००२।।	धन दारा पुत्रजन । बंधु सोयरे पिशुन । सर्व मिथ्या हें जाणून । शरण रिघा देवासी
१०४२३१	शरण	।।ना.गा.२११३.००६।।	म्हणउनि तुझें मी पोसणें । हें ऐकें ऐकें रघुनंदनें । येणेंचि कारणें आलों शरण । विष्णुदास नामा म्हणे
१०४२३२	शरणा	।।ना.गा.१५२९.००१।।	काय पांडुरंगा सांग म्यां करावें । शरणा कोणा जावें तुम्हांविण
१०४२३३	शरणांगत	।।ना.गा.०१६१.००१।।	शरणांगत तारी भवसिंधु त्वरित । ठेवावा तो हात शिरावरी
१०४२३४	शरणांगत	।।ना.गा.०२०१.००४।।	कृतांतासी धाक नामा म्हणे ज्याचा । आहे मी तयाचा शरणांगत
१०४२३५	शरणांगत	।।ना.गा.०८७६.००३।।	नामा म्हणे केशवा तरीच शरणांगत । नाहीं तरी पतित म्हणा मातें
१०४२३६	शरणांगत	।।ना.गा.१४१०.०१०।।	नामा म्हणे तुझा मी सकळ जीवा । तरी हा काढावा शरणांगत
१०४२३७	शरणांगता	।।ना.गा.०९६२.००३।।	हा शरणांगता वत्सलु अनाथा कृपाळु । मिरवी दीनदयाळु ब्रीद जगीं
१०४२३८	शरणागत	।।ना.गा.०११५.००३।।	त्रैलोक्यांत कोण ऐसा हो समर्थ । माझे शरणागत मारील जो
१०४२३९	शरणागत	।।ना.गा.०१३८.००४।।	शरणागत मारी ऐसा कोण थोर । मशक पामर पाहूं आतां
१०४२४०	शरणागत	।।ना.गा.०३९४.००२।।	क्षण एक मौन धरुनियां रहा । शरणागत पहा कृपादृष्टि
१०४२४१	शरणागत	।।ना.गा.०३९९.००७।।	या पेठेचा शेट्या पुंडलीक भक्त । नामा शरणागत केशवासी
१०४२४२	शरणागत	।।ना.गा.०७४६.००१।।	आम्ही विठोबाचे दूत । यम आणूं शरणागत
१०४२४३	शरणागत	।।ना.गा.०७४६.००६।।	ऐसा नामा यशवंत । विठोबाचा शरणागत
१०४२४४	शरणागत	।।ना.गा.०९०४.००३।।	अनाथें पतितें शरणागत दीनें । अनाथ करणें कृपादृष्टि
१०४२४५	शरणागत	।।ना.गा.११४६.००४।।	काय माझा देह वायांविण व्यर्थ । आलों शरणागत पांडुरंगा
१०४२४६	शरणागत	।।ना.गा.१२६८.०११।।	नामा म्हणे आतां मीतूंपण कैंचें । मी या विठोबाचें शरणागत
१०४२४७	शरणागत	।।ना.गा.१२९३.००३।।	म्हणोनि विठोबाचा जालों शरणागत । तेणें माझें हित ऐसें केलें

१०४२४८	शरणागत	।।ना.गा.१३६१.००५।।	नामा म्हणे देवा कवणा शरण जाऊं । कोणा मी होऊं शरणागत
१०४२४९	शरणागत	।।ना.गा.१४७९.००४।।	ऐसा नामा यशवंत । विठोबाचा शरणागत
१०४२५०	शरणागत	।।ना.गा.१५२४.००४।।	मी दीन अपराधी तुझा शरणागत । तुजविण माझें हित करिल कोण
१०४२५१	शरणागत	।।ना.गा.१५२८.००२।।	अन्यायी अपराधी तुम्हां शरणागत । तुजविण हित कोण करी
१०४२५२	शरणागत	।।ना.गा.१५५१.००२।।	बहु कीर्ति ऐकिली बहुतांचे मुखीं । बहुत केले सुखी शरणागत
१०४२५३	शरणागत	।।ना.गा.१५८७.००५।।	नामा म्हणे माझे हेचि मनोरथ । होईन शरणागत जन्मोजन्मीं
१०४२५४	शरणागत	।।ना.गा.१५८८.००१।।	सांडोनि अभिमान जालों शरणागत । ऐसियाचा अंत पहासी काई
१०४२५५	शरणागत	।।ना.गा.१५८९.००३।।	बहुकिर्ती ऐकिली बहुतांचे मुखीं । बहुत केले सुखी शरणागत
१०४२५६	शरणागत	।।ना.गा.१५९८.००१।।	लाज सांडोनियां जालों शरणागत । ऐसियाचा अंत पाहसी झणीं
१०४२५७	शरणागत	।।ना.गा.१६०१.००४।।	नामा म्हणे माझे हेचि मनोरथ । होईन शरणागत जन्मोजन्मीं
१०४२५८	शरणागत	।।ना.गा.१६०४.००१।।	आम्ही शरणागत परि सर्वस्वें उदार । भक्तीचें सागर सत्वशील
१०४२५९	शरणागत	।।ना.गा.१६०४.००७।।	तें सांडोनि एकसरा आलासे धांवत । जाला शरणागत बिभीषण
१०४२६०	शरणागत	।।ना.गा.१७१३.०११।।	नामा म्हणे विठोबा तरीच शरणागत । नाहीं तरी पतित म्हणती मज
१०४२६१	शरणागत	।।ना.गा.२०११.००२।।	सांडुनि सर्व संगु होईन शरणागत । करिती मनोरथ पूर्ण माझे
१०४२६२	शरणागत	।।ना.गा.२०६६.००८।।	पितृवचना कारणें आई वनवासासी गेली वो । अठरापद्में वानर मेळवुनि गोंधळ घाली वो । वधिला दशशिर लंका शरणागत दिधली वो । कौसल्या माऊली देवा बंदी सोडी केली वो
१०४२६३	शरणागता	।।ना.गा.००४२.००४।।	शरणागता देत क्षीरसिंधू जाण । चोखीतसे स्तन आवडीनें
१०४२६४	शरणागता	।।ना.गा.०१०६.००७।।	शरणागता नेदी काळाचिये हातीं। नामा म्हणे चित्तीं दृढ धरा
१०४२६५	शरणागता	।।ना.गा.०८१२.००२।।	या जन्ममरणाची कायसी मग चिंता । तुझिया शरणागता पंढरीनाथा
१०४२६६	शरणागता	।।ना.गा.१४६७.०१४।।	वीरराया पंढरीनाथा । आतां अपंगावें शरणागता । जरी उपेक्षिसी सर्वथा । वाट कोणाची पहावी
१०४२६७	शरणागता	।।ना.गा.१६००.००२।।	काय केशिराजा वाणूं मी दुबळें । शरणागता लळे पुरविशी
१०४२६८	शरणागता	।।ना.गा.१७५३.००१।।	भक्ताचे हृदयींची जाणोनि अवस्था । आला शरणागता लोभापरू
१०४२६९	शरणागता	।।ना.गा.१७५६.०१५।।	ना भी नामया भय न धरीं सर्वथा । माझ्या शरणागता कोण गांजी
१०४२७०	शरणागता	।।ना.गा.२००६.००४।।	रावण कुंभकर्ण विदारिले बाणीं । दिधली राजधानी शरणागता
१०४२७१	शरणागतांचा	।।ना.गा.१२६९.००४।।	हा शरणागतांचा जाणे कळवळा । हा पै कळिकाळा पाहों नेदी
१०४२७२	शरणागतासी	।।ना.गा.१५९९.००१।।	शरणागतासी नको मोकलावा । हें तरी केशवा जाणतोसी

१०४२७३	शरणागतीं	।।ना.गा.१६०२.००१।।	आम्हीं शरणागतीं केलासी सरता । येऱ्हवीं अनंता कोण जाणे
१०४२७४	शरणागतीं	।।ना.गा.१६०३.००१।।	आम्हीं शरणागतीं सांडिली वासना । ते त्वां नारायणा अंगिकारिली
१०४२७५	शरणागतें	।।ना.गा.१३२६.०१०।।	रमा शरणागतें आलिंगिलीं बाहीं । कैसी गोणी तिहीं कवळिली
१०४२७६	शरांचे	।।ना.गा.०५१८.००२।।	भीष्म पहुडला शरांचे पंजरीं । तया प्रश्न करी युधिष्ठिर
१०४२७७	शरिरनिधान	।।ना.गा.१९९५.००१।।	आप तेज वायु पृथ्वी आणि गगन । त्याचें केलें बा शरिरनिधान
१०४२७८	शरीर	।।ना.गा.०३९५.००२।।	शरीर प्राणाचा देईन मी बळी । तुज हृदयकमळीं सांठवीन
१०४२७९	शरीर	।।ना.गा.०४२२.००८।।	काशी त्यागिजे शरीर । हिवें शिणलें केदार । पाणी गोमतीचें क्षार। म्हणवोनि महिमा सम नाहीं
१०४२८०	शरीर	।।ना.गा.०५९५.००५।।	कोंवळें शरीर गोड बहु मांस। लागो सार्थकास तुझे काजीं
१०४२८१	शरीर	।।ना.गा.०७०९.००१।।	पोसिशी शरीर इंद्रियांचा बांधा । सेखीं ते आपदा करील तुज
१०४२८२	शरीर	।।ना.गा.०७१४.००४।।	सर्व हा आकार हरीचें शरीर। मायेचा विकार भुलों नका
१०४२८३	शरीर	।।ना.गा.०७७८.००१।।	शरीर संपत्ती मायेचें टवाळ । वायांची पाल्हाळ मिरवितोसी
१०४२८४	शरीर	।।ना.गा.०८७९.००१।।	आपुलें शरीर घालूनियां पुढें । पडे वाडेंकोडें सर्वभावें
१०४२८५	शरीर	।।ना.गा.०८८४.००३।।	तेंचि सच्चिदानंद साकार जीव प्राण । शरीर जाय क्षीण जयापरी
१०४२८६	शरीर	।।ना.गा.०९१७.००६।।	या सुखाकारणें शरीर कर्वतीं फाडिलें । दुर्जय तोडिलें मायाजाळ
१०४२८७	शरीर	।।ना.गा.०९५३.००७।।	तें मज गोमटें सेवितां सुख वाटे । म्हणोनि धाटें मोठें शरीर माझें
१०४२८८	शरीर	।।ना.गा.०९६६.००९।।	शरीर प्राणांचे त्वां देऊनि बळिदान। केलें पैं निर्वाण भक्तराया
१०४२८९	शरीर	।।ना.गा.१०२७.००७।।	तंववरी तिचे शरीर । अभंग चिरकाळ निरंतर । महद्माया योगिणी साचार । मुक्ताबाई उद्धवा
१०४२९०	शरीर	।।ना.गा.११४६.००१।।	चवदाशें वर्षें शरीर केलें जतन । नाहीं अज्ञानपण गेलें माझें
१०४२९१	शरीर	।।ना.गा.११४६.००६।।	नामा म्हणे योग दुःखाचें शरीर । काय याचा घोर करूनियां
१०४२९२	शरीर	।।ना.गा.११५९.००६।।	फार दिवस तुम्हीं रक्षिलें शरीर । मुक्ताईनें पार उतरिलें
१०४२९३	शरीर	।।ना.गा.११७१.००१।।	मुक्ताई उदासी जाली असे फार । आतां हें शरीर रक्षूं नये
१०४२९४	शरीर	।।ना.गा.११८८.००३।।	नाशिवंत शरीर केलें अविनाश । घडविला विलास अध्यात्मींचा
१०४२९५	शरीर	।।ना.गा.११८८.००६।।	नामा म्हणे देवा करितां ऐसा घोर । सांडील शरीर निवृत्तिराज
१०४२९६	शरीर	।।ना.गा.११९५.००५।।	राहिली ते शक्ति गळालें शरीर । देह अहंकार त्यागियेला
१०४२९७	शरीर	।।ना.गा.१२०४.००३।।	गोंदा आणि महादा सांडिती शरीर । विसोबा खेचर फार कष्टी
१०४२९८	शरीर	।।ना.गा.१३३८.००१।।	चौदाशें वरुषें शरीर केलें जतन । बोधाविण शिण वाढविला

१०४२९९	शरीर	।।ना.गा.१३५९.०३५।।	शरीर वेंचिलें तरी वेंचिजे । परी सद्गुरुवचन नुल्लंघिजे । रात्रंदिवस राहिजे । आज्ञा संकेतीं
१०४३००	शरीर	।।ना.गा.१४१२.००३।।	कटीं कर उभा शिणलें शरीर । धरोनि निर्धार भक्तिभावें
१०४३०१	शरीर	।।ना.गा.१६०३.००६।।	नामा म्हणे तैसा नव्हे मी अज्ञान । माग तुज देईन शरीर अवघें
१०४३०२	शरीर	।।ना.गा.१६०४.००५।।	त्रिभुवनीचें वैभव जोडिलें ज्या लागुनि । तें शरीर तुझ्या चरणीं समर्पियेलें
१०४३०३	शरीर	।।ना.गा.१६५३.००५।।	विकाराचें मूळ दिधलें हें शरीर । तेणें कष्टी थोर जालों आम्ही
१०४३०४	शरीर	।।ना.गा.१६९५.००१।।	शरीर प्राणाचें देउनी बळीदान । साधा रे निधान प्रेमसुख
१०४३०५	शरीर	।।ना.गा.१८२०.००३।।	ज्याचेनि जाहलें तुझें हें शरीर । त्याचा नामोच्चार ना ये वाचे
१०४३०६	शरीर	।।ना.गा.१८२७.००१।।	अहंकारें आथिलें ऐसें जें शरीर । तें जाणा मंदिर चांडाळाचें
१०४३०७	शरीर	।।ना.गा.१८८२.००४।।	शरीर संपत्तीचा टाका अभिमान । मन करा तल्लीन विठ्ठल पायीं
१०४३०८	शरीर	।।ना.गा.१९२६.००१।।	शरीर काळाचें भातुकें । तुम्ही नेणा कां इतुकें
१०४३०९	शरीर	।।ना.गा.१९३४.००४।।	नामा म्हणे ऐसें नाशिवंत शरीर । पूजा हरिहर एक वेळां
१०४३१०	शरीर	।।ना.गा.१९४९.००२।।	धन्य तयाचें शरीर । वरी जना उपकार
१०४३११	शरीर	।।ना.गा.२०४४.००२।।	काया क्लेश करणें शरीर दंडणें । न लगे हिंडणें दाही दिशा
१०४३१२	शरीर	।।ना.गा.२०६२.००३।।	शरीर संचिता आधीन । धर्मराज हिंडे वन । कर्में बुडाला रावण । आणि दुर्योधन प्रारब्धें
१०४३१३	शरीर	।।ना.गा.२०६२.०११।।	कर्मा आधीन शरीर । पूर्ण ब्रह्म रामचंद्र । रघुपति विष्णूचा अवतार । पाठीं जन्मांतर नामा म्हणे
१०४३१४	शरीर	।।ना.गा.२१२०.००१।।	गुण आणि गंभीर रणधीर । तया योग्य साजे केशव शरीर । तैसा अमृतराज हा विसोबा खेचर । बोलोनि अबोलपणा न कल्पी ऐसा सार
१०४३१५	शरीरसंपत्ति	।।ना.गा.०६५५.००४।।	शरीरसंपत्ति बळीनें देऊनि सकळ । केला द्वारपाळ नारायण
१०४३१६	शरीरसंपत्ति	।।ना.गा.१६२५.०१५।।	एकाचि शरीरसंपत्ति आणि वित्त । एकाचें तें चित्त हिरोनि घेसी
१०४३१७	शरीरसंपत्तीचा	।।ना.गा.१७४९.००४।।	शरीरसंपत्तीचा मानसी निर्धार । तों हें क्षणभंगुर सत्य जाण
१०४३१८	शरीरसंबंधा	।।ना.गा.१७३१.०१२।।	सुख या दुःखाची निवारिली बाधा । शरीरसंबंधा वेगळें केलें
१०४३१९	शरीरसंबंधा	।।ना.गा.१४१९.००२।।	शरीरसंबंधा सुचतीं अंतरें । काय म्यां पामरें आवरावें
१०४३२०	शरीरा	।।ना.गा.०१९९.००६।।	नाहीं ऐसें कळों आलें विश्वंभरा । घेवोनी शरीरा आला वरी
१०४३२१	शरीरा	।।ना.गा.१०९६.००२।।	सोपान मुक्ताई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीसी
१०४३२२	शरीरा	।।ना.गा.१८८६.०१२।।	भूमिभार जाला म्हणती वेग करा । नातळती शरीरा इष्ट मित्र

१०४३२३	शरीरा	।।ना.गा.२०७०.००४।।	आला सीतळ शांतीचा वारा । तेणें सुख जालें शरीरा। फिटला पातकांचा थारा । कळीकाळासी धाक दरारा गा
१०४३२४	शरीराचा	।।ना.गा.०८७१.००३।।	इहलोकीं तोचि सर्वांभूतीं सम । शरीराचा भ्रम नेणे कदा
१०४३२५	शरीराचा	।।ना.गा.१४३६.००१।।	शरीराचा भाव तुज नाहीं देवा । तेथें मी केशवा काय बोलूं
१०४३२६	शरीराचा	।।ना.गा.२०५६.००५।।	आधीं तो साधितां कष्टाचे संभार । होय चकनाचूर शरीराचा
१०४३२७	शरीराची	।।ना.गा.१९३१.००३।।	शरीराची आशा बाळ हें तारुण्य । अवचित वृद्धपण येईल मूढा
१०४३२८	शरीराचे	।।ना.गा.२०१२.००६।।	शरीराचे मुद्‌गले सामास कवण वेंचि ऋषि भोजनासी आले । स्त्रीपुत्रातें वेंचुनियां तेणें अतिथा सुखी केलें । सत्त्व पहावया कैलासींचा राणा कांतिपूर नगरीं उजू ठेले । श्रियाळ पोटींचें बाळक दिधलें सांग पां तें काय जालें रे
१०४३२९	शरीराचें	।।ना.गा.०८६५.००२।।	नेणे सुख दुःख शरीराचें भान । अखंड भजन केशवाचें
१०४३३०	शरीराचें	।।ना.गा.२०९१.००२।।	तारूं करूनी शरीराचें । केणें भरिलें हरिनामाचें । शिड उभविलें सत्त्वाचें । वल्हें पडती धर्माचें
१०४३३१	शरीरासी	।।ना.गा.११९५.००७।।	नामा म्हणे देवा मुक्ताईची गती। सांडिलें निवृत्ती शरीरासी
१०४३३२	शरीरीं	।।ना.गा.०३५२.००१।।	सहस्रदळांत आकाशाच्या परी । राहोनी शरीरीं शोभा दावी
१०४३३३	शरीरीं	।।ना.गा.०८५५.००१।।	प्रतिदिनीं स्वधर्म करी । हरिमूर्ति नमस्कारी । भावें भजन वसे शरीरीं । तोचि भक्त हरिचा
१०४३३४	शरीरीं	।।ना.गा.१४०८.००२।।	शरीरीं तितीक्षा नाहीं क्षमा शांति । यालागीं श्रीपति वायां गेलों
१०४३३५	शरीरीं	।।ना.गा.१५४६.००३।।	येणें शोकें रे वाळलों शरीरीं । आठवतों हरि मी काय सांगूं
१०४३३६	शरीरीं	।।ना.गा.१८५९.००४।।	नामा म्हणे जाणे असतां शरीरीं । जातो यमपुरीं भोगावया
१०४३३७	शरीरीं	।।ना.गा.१९३१.००५।।	मायबाप सखी न येती सांगातें । जंव शरीरीं पुरतें बळ आहे
१०४३३८	शरीरीं	।।ना.गा.२०८५.००२।।	दधिसमुद्र नाकीं आहे । खारा शरीरीं तो पाहे
१०४३३९	शरीरीं	।।ना.गा.२०८८.००१।।	त्रिभुवनाची परि मांडिली शरीरीं । गोकुळाभीतरीं उभारिलीं
१०४३४०	शर्करामिश्रित	।।ना.गा.००८३.००९।।	शर्करामिश्रित लाडू येकवीस। आणीक बहूवस मोदक ते
१०४३४१	शर्करेसी	।।ना.गा.००४५.००७।।	घरोघरीं नंद धाडी शर्करेसी । वस्त्रें सुहृदांसी नामा म्हणे
१०४३४२	शलभानें	।।ना.गा.२०८३.००३।।	आणिक एक नवल सांगूं काई । जीत वाघ शलभानें भक्षिला पाहीं । मुंगीनें पर्वत उचलिला बाहीं । माशी करी छाया सूर्यासी पैं
१०४३४३	शव	।।ना.गा.१९००.००३।।	नाम संकीर्तन नाईके स्वभावें । प्रत्यक्ष ते शव जगामाजीं
१०४३४४	शस्त्र	।।ना.गा.०१५८.००५।।	घेवोनियां शस्त्र मारावें सकळां । आलासे कंटाळा नामा म्हणे

१०४३४५	शस्त्र	।।ना.गा.०१७९.००७।।	घेवोनियां शस्त्र उठला त्वरित । करितों मी घात वसुदेवाचा
१०४३४६	शस्त्र	।।ना.गा.०५९४.००४।।	नामा म्हणे ऐसें बोलोनि किरात । करावया घात शस्त्र काढी
१०४३४७	शस्त्र	।।ना.गा.०६००.००२।।	क्षुधेलागीं फार न लावी उशीर । घेऊनियां शस्त्र हाणी वेगें
१०४३४८	शस्त्र	।।ना.गा.०७३३.००४।।	नामा जपे नाम मंत्र । हातीं न घे आणिक शस्त्र । रामकृष्ण हें वक्त्र । उच्चार इतुकेचि पुरे आम्हां
१०४३४९	शस्त्र	।।ना.गा.०७८४.००२।।	विठ्ठल विठ्ठल मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाहीं शस्त्र नामेंविण
१०४३५०	शस्त्र	।।ना.गा.१३१९.०१०।।	आमुच्या वडिलां शस्त्र सुई आणि कातरी । हा टाळ विणा करी वागवीत असे
१०४३५१	शस्त्र	।।ना.गा.१८३७.००१।।	बुजगावणें शेती माणसें म्हणती । काय त्याचे हातीं शस्त्र शोभे
१०४३५२	शस्त्र	।।ना.गा.२०६३.००३।।	बाणे पश्चाताप अर्जुनाचे मनी । शस्त्र चक्रपाणि धरेना
१०४३५३	शस्त्रांचे	।।ना.गा.०३७८.००१।।	मान तोडावया कर शस्त्रांचे । कठिण बहुतांचे उभारिले
१०४३५४	शस्त्राचें	।।ना.गा.१८९०.००४।।	जे वृक्ष लाविती सर्वकाळ । तयावरी शस्त्राचें झल्लाळ । जे ईश्वरीं अर्पिती फळ । पुत्रवंत होऊनि नांदती
१०४३५५	शस्त्रे	।।ना.गा.००५०.००६।।	कुर्‍हाडी आणिती । शस्त्रे करूनि तोडिती
१०४३५६	शस्त्रें	।।ना.गा.०१९१.००२।।	मागती रजका देईना तो वस्त्रें। वधी नख शस्त्रें पापियासी
१०४३५७	शस्त्रें	।।ना.गा.०४५०.०१९।।	ध्यान मुद्रा मांडूनियां । वस्त्रें शस्त्रें त्यजूनियां । राहिला पैं निरंजनिया। भक्तिभाव ओळखे तो
१०४३५८	शस्त्रें	।।ना.गा.०६७३.००४।।	नामा म्हणे नाममात्रें। अवघीं निवारलीं शस्त्रें। रामकृष्ण नाम वक्त्रें । उच्चारी तो धन्य
१०४३५९	शस्त्रेंविण	।।ना.गा.१२६४.०१८।।	शस्त्रेंविण वध केला अवचिता । जीव तळमळतां जाऊं पाहे
१०४३६०	शहाणपण	।।ना.गा.१३७६.००६।।	इंद्रिया गोड तें आरोगिजे । मग धनीवरी धावा पोखरिजे । काय सांगूं शहाणपण तुझें । खेचर विसा म्हणे अरे नामया
१०४३६१	शहाणा	।।ना.गा.०१५२.००५।।	शहाणा चतुर आहेसी नेटका । वैकुंठनायका विचारावें
१०४३६२	शहाणा	।।ना.गा.०५१५.००१।।	दिसंदिस कैसा जालासी शहाणा । गोवळांसी खेळसी पंढरीच्या राण्या
१०४३६३	शहाणा	।।ना.गा.१२७३.०११।।	गोणाई म्हणे देवा होई कां शहाणा । वायां कां परधना धरिसी लोभु
१०४३६४	शहाणा	।।ना.गा.१२८२.०१०।।	आतां आपुला भ्रमु राखे तो शहाणा । झणें माझ्या निर्वाणा पहासी देवा
१०४३६५	शहाणा	।।ना.गा.१५९९.००४।।	नामा म्हणे तैसी न होसी शहाणा । अठराहि पुराणें वेडावलीं
१०४३६६	शहाणा	।।ना.गा.१६१०.००३।।	भलारे भला मज जालासि शहाणा । भेष पळविलें शास्त्रपुराणा
१०४३६७	शहाणा	।।ना.गा.१८३९.००५।।	मृदंग जाणावा गंभीर नादें । गाणें जाणावें सुस्वर शब्दें । ओंकार जाणावा अक्षरभेदें । शहाणा शब्दें ओळखावा

१०४३६८	शहाणा	।।ना.गा.२०७२.००७।।	गंगा गौरी दोघी भांडवी । संन्यासी धाडले राना रे । खेळ खेळे परि डायीं न सांपडे । तो एक खेळिया शहाणा रे
१०४३६९	शहाणा	।।ना.गा.२०७२.००८।।	खेळिया माजी हनुम्या शहाणा । न पडे कामव्यसनीं रे । कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा । तेथे कैचें भांडण रे । राम्या गड्याची आवडी मोठी । म्हणूनि लंके पेणे रे
१०४३७०	शहाणिया	।।ना.गा.०५४३.००६।।	वेडा अविचारी करी मजवर दया। ऐके कृष्णराया शहाणिया
१०४३७१	शहाणियासी	।।ना.गा.२०८३.००२।।	थोट्यांने धवळार रचियेलें । मुकें पुराण सांगूं बैसलें । सर्वेंचि बहिरे ऐकों ठेलें । वेडें हासलें शहाणियासी
१०४३७२	शहाणीव	।।ना.गा.०९२७.०१०।।	जाणीव शहाणीव तरीच शोभे सर्व । जरी होय आविर्भाव वैराग्याचा
१०४३७३	शहाणीव	।।ना.गा.०९७५.०१५।।	जाणीव शहाणीव न करावी सर्वथा । न पहावी योग्यता व्युत्पत्तीची
१०४३७४	शहाणे	।।ना.गा.१७५८.००६।।	आतां असोत बहुत बोलासी । शहाणे सिंतरले मानसीं । तप्तलोहा उदक ग्रासी । तैसा होऊनि ठेलासी विष्णुदास नामया रे
१०४३७५	शहाणे	।।ना.गा.१९८२.००७।।	तिचे वैष्णव शहाणे । कळों नेदिती आपुली विंदानें । हरिकथारंगीं नाचणें । नाम कल्लोळीं
१०४३७६	शहाणें	।।ना.गा.०४७९.०११।।	आम्हां डिंगराचें बोलणें । अनाथनाथाचें परिसणें । विष्णुदास नामा म्हणे । शहाणें व्हावें यापरतें
१०४३७७	शहाणें	।।ना.गा.०८७५.००२।।	आणिक न करावें शहाणें । प्रेम दिठावले झणें
१०४३७८	शांत	।।ना.गा.०९०९.००६।।	येउनी उतरली आळाचिये वनीं । पशु तये स्थानीं शांत जाला
१०४३७९	शांत	।।ना.गा.१६१५.००३।।	हलाहल शांत करी तत्क्षण । अमृतजीवन नाम तुझें
१०४३८०	शांत	।।ना.गा.१९८०.००७।।	उगेंच ब्राह्मणा सांबें छळियेलें । सर्व शांत जालें आपोआप
१०४३८१	शांतरूपा	।।ना.गा.०४६८.००३।।	मुकुंदा मुरारी प्रद्युम्ना केशवा । नाम सदाशिवा शांतरूपा
१०४३८२	शांतवन	।।ना.गा.०४२२.०१४।।	बरवें पुंडलिकें केलें। हें परब्रह्म रे अर्चिलें । जगांत शांतवन केलें । परि न टके सर्वथा
१०४३८३	शांतवावी	।।ना.गा.०३२१.०१८।।	वनामाजी मेवा घेऊनियां कांहीं । क्षुधेसी ते पाही शांतवावी
१०४३८४	शांतविला	।।ना.गा.२१०३.००७।।	करूनियां स्तुति देव शांतविला । प्रल्हाद तो जाला पूर्ण भक्त
१०४३८५	शांतविलें	।।ना.गा.०१७९.०१०।।	सांगोनियां ऐसें शांतविलें त्यासी । गेला गोकुळासी नामा म्हणे
१०४३८६	शांति	।।ना.गा.०११५.००१।।	जगजेठी तेव्हां क्रोधावला चित्तीं । करीन मी शांति तुझी आतां
१०४३८७	शांति	।।ना.गा.०३५७.००१।।	शांति भीमातीरी भक्ति पंढरपुरीं । प्रेम विटेवरी देखियेलें
१०४३८८	शांति	।।ना.गा.०६६२.००३।।	दया शांति क्षमा हेंचि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशीं
१०४३८९	शांति	।।ना.गा.०८५१.००४।।	काम क्रोध दोघे घातले बाहेरी । शांति क्षमा घरीं राबवित
१०४३९०	शांति	।।ना.गा.०९५५.०१८।।	शांति क्षमा दया निजबोध निवृत्ती । अखंड खेळती जयापाशीं

१०४३९१	शांति	।।ना.गा.११५७.००७।।	कंद कळीकाळ हरणा नमो । तुझेनि परब्रह्म गमो । शांति अव्यक्त क्षमो । श्रीहरी
१०४३९२	शांति	।।ना.गा.१३७४.००४।।	सुख तें शांति सुख तें दया क्षमी । सुख तें उपदेश मी निर्विकारी
१०४३९३	शांति	।।ना.गा.१३८८.००४।।	शांति क्षमा दया देती आलिंगन । चित्त समाधान पावविलें
१०४३९४	शांति	।।ना.गा.१४०८.००२।।	शरीरीं तितीक्षा नाहीं क्षमा शांति । यालागीं श्रीपति वायां गेलों
१०४३९५	शांति	।।ना.गा.१७२८.००७।।	एकत्व आरामें शांति पूर्ण घरीं । श्रीहरी कामारी होतो तुझा
१०४३९६	शांति	।।ना.गा.१७८२.००३।।	शांति शिळेवरी धुतलें । ज्ञानगंगें निर्मळ जालें
१०४३९७	शांति	।।ना.गा.१७९९.००१।।	त्यागेंविण विरक्ति । प्रेमावांचुनि भक्ति । शांति नसतां ज्ञप्ति । शोभा न पवे
१०४३९८	शांति	।।ना.गा.१८४५.०१८।।	जे कथा ऐकती पसरोनि बाह्या । शांति क्षमा दया येती तेथें
१०४३९९	शांति	।।ना.गा.१८४५.०१९।।	शांति क्षमा दया येती भेटावया । तेथें मोक्ष व्हावया विलंब काय
१०४४००	शांतिचा	।।ना.गा.२०१२.००३।।	दुंदुभिरायें धर्म चालविला तेणें शांतिचा सागर म्हणविलें । अजपाळ जैपाळ राजा दशरथ सूर्यवंशीं ते जन्मले
१०४४०१	शांती	।।ना.गा.१०११.०२२।।	नमो शांती दया क्षमा। नमो कृपाकर पुरुषोत्तमा । नमो कांसवदृष्टीसमा । निष्कलंक नाथा
१०४४०२	शांती	।।ना.गा.१३८५.००४।।	दया क्षीरधारी शांती पुरणपोळी । घृत हें कल्होळी प्रेम माझें
१०४४०३	शांतीचा	।।ना.गा.२०७०.००४।।	आला सीतळ शांतीचा वारा । तेणें सुख जालें शरीरा। फिटला पातकांचा थारा । कळीकाळासी धाक दरारा गा
१०४४०४	शांतीची	।।ना.गा.०३८८.०१२।।	भक्तीची निजभक्ति मुक्तिची निजमुक्ति । शांतीची निजशांती विटेवरी
१०४४०५	शांतीचें	।।ना.गा.०८४६.००३।।	तळपे शांतीचें ओढण । घेती स्वानंदें उड्डाण
१०४४०६	शांतीचें	।।ना.गा.१८६४.००२।।	नेणें भूतदया शांतीचें लक्षण। कार्याकारण बोलतसे
१०४४०७	शांभवीच्या	।।ना.गा.०४५०.०१८।।	बौद्ध श्रीवत्साच्या घरीं । जन्म शांभवीच्या उदरीं । राजा कांतिये नगरीं । निरंतर रूपें राहिला
१०४४०८	शाखा	।।ना.गा.०९९८.००७।।	कामधेनूचें घृत । पयोदधिक्षीर वाढित । नानापत्र शाखा शोभत । वैष्णवां ताटीं
१०४४०९	शाखा	।।ना.गा.११०४.००९।।	द्रोणाचळ इंद्राचळ । हनुमंतें आणिला विशाळ। त्याच्या शाखा अधोमूळ । तो हा इंद्रनीळ पर्वत
१०४४१०	शाखा	।।ना.गा.१३८५.००३।।	सुखशांति शाखा भावार्थ हा वडा । जेवणार गाढा आत्माराम
१०४४११	शाखांचे	।।ना.गा.१०११.०७८।।	नाना जन्म अवतार । नाना शाखांचे निर्धार । नाना गोत्र उच्चार । तुझा विचार तूं जाणसी
१०४४१२	शापबद्ध	।।ना.गा.१७१२.००४।।	चरणींचा प्रभाव जाणे गौतमवधु । जेणें शापबद्ध मुक्त केली
१०४४१३	शापियेलें	।।ना.गा.०५६६.००२।।	सेवेसी चुकतां होय तूं किरात । ऐसें इंद्रें त्यातें शापियेलें
१०४४१४	शापिले	।।ना.गा.००७०.००१।।	कुबेराचे पुत्र मदोन्मत्त जाले । म्हणूनि शापिले नारदानें
१०४४१५	शापें	।।ना.गा.१६६२.००४।।	गौतमाचें शापें अहल्या शिळा जाली । ते तुवां तारिली काय म्हणुनि

१०४४१६	शाम	।।ना.गा.०३८९.०१६।।	तनु मृदु शाम निर्मळ । प्रभा दिसती सोज्वळ । जेवीं ओळलेंसे जळ । घनमंडळीं
१०४४१७	शामतनू	।।ना.गा.०९५६.०१०।।	छाचर कुरळ केश रुळती पाठीवरी। पितांबरधारी शामतनू
१०४४१८	शाममूर्ति	।।ना.गा.०३६३.००१।।	शाममूर्ति डोळस सुंदर सांवळी । ते ध्यान हृदयकमळीं धरूनि ठेला
१०४४१९	शामवर्ण	।।ना.गा.०३२१.०५३।।	मुखासी लागला पाहतांची डोळां । म्हणोनि तो जाला शामवर्ण
१०४४२०	शामांकिता	।।ना.गा.१०११.०४०।।	ध्वज वज्रांकुशा । ध्वजनीळ विकासा । ध्वजांबरा अष्ट दिशा । नीळिमा भासती शामांकिता
१०४४२१	शारंगधर	।।ना.गा.०७०१.००५।।	शक्तिरूपें शारंगपाणि। नारायण जाला भवानी । शारंगधर नंदी होऊनि । सन्मुखासनीं बैसला
१०४४२२	शारंगधर	।।ना.गा.११७५.००३।।	तापीतीरीं ऋषि आणि शारंगधर । पाठीमागें भार वैष्णवांचे
१०४४२३	शारंगधरा	।।ना.गा.०२६६.००७।।	तुम्ही लपवुनी याचा भंवरा गे । आळ घेतां शारंगधरा गे । तुम्ही बारा घरच्या बारा गे । गोकुळींच्या नारी
१०४४२४	शारंगधरा	।।ना.गा.०२८६.०२०।।	नामया विष्णुदासा । भेटी शारंगधरा । तनु मन जीवें त्याला । सुख जालें अंतरा
१०४४२५	शारंगधरा	।।ना.गा.०२९३.००३।।	परियेसी शारंगधरा । तुझा बैल चुकला मोरा । सांगूं गेलों तुझ्या घरा । पाठीं लागला तुझा म्हातारा
१०४४२६	शारंगधरा	।।ना.गा.११५७.०११।।	पुरे पुरे येरझारा । नमो वेव्हार सारा । नमो शारंगधरा । अंत:करण पाहसी
१०४४२७	शारंगधरा	।।ना.गा.११६६.००३।।	येथोनि चलावें पुढती शारंगधरा । जावें टोकेश्वरा स्नानालागीं
१०४४२८	शारंगधरा	।।ना.गा.११८०.००१।।	निवृत्तिराज म्हणे प्रळयींचा वारा । सुटला शारंगधरा ऐसें वाटे
१०४४२९	शारंगधरा	।।ना.गा.११८५.००३।।	दाही दिशा चित्त जालें असें सैरा । आतां शारंगधरा सिद्ध व्हावें
१०४४३०	शारंगधरा	।।ना.गा.११९५.००१।।	सहसमुदायेंसी उठावें शारंगधरा । हरिहरेश्वरा जाऊं आतां
१०४४३१	शारंगधरु	।।ना.गा.०२५०.००५।।	ऐसा गे माये सौभाग्यसुंदरु । नंदरायाचा कुमरु । विष्णुदास नामयाचा दातारु । भक्तिभावें वोळंगा शारंगधरु
१०४४३२	शारंगधरु	।।ना.गा.०९५६.००६।।	सकल संतमेळासहित शारंगधरु । पाठी दळभारू ब्राह्मणांचा
१०४४३३	शारंगधरू	।।ना.गा.०७०१.००४।।	लक्ष्मी रूपें आपण हरू । देवें वरिला शारंगधरू। गरूडरूपें महेश्वरू । वाहन जाला विष्णूचें
१०४४३४	शारंगपाणि	।।ना.गा.०७०१.००५।।	शक्तिरूपें शारंगपाणि। नारायण जाला भवानी । शारंगधर नंदी होऊनि । सन्मुखासनीं बैसला
१०४४३५	शारंगपाणि	।।ना.गा.१८३२.००६।।	ऐसा संपूर्ण सर्व गुणीं । केवी पाविजे शारंगपाणि । विष्णुदास नामा करी विनवणी । मुक्ति चरणीं त्याचिया
१०४४३६	शारंगपाणी	।।ना.गा.०२४४.००४।।	सांपडला देव्हारीं यासी बांधी दाव्यांनीं। शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी
१०४४३७	शारंगपाणी	।।ना.गा.०२६४.००८।।	इतुकें ऐकोनी । इतुकें ऐकोनी । देव बोले हांसोनी । सूर्या दंडवत करा कर जोडोनी । नामा विनवितो । म्हणे शारंगपाणी । गौळ्या ऐक तूं । धन्य तुझी करणी
१०४४३८	शारंगे	।।ना.गा.०६३३.००१।।	येई तूं शारंगे वासुदेवे त्वरें । वासुदेवे सारे गोपाळ वो
१०४४३९	शालिवाहन	।।ना.गा.०९९०.००९।।	तेणें एक शत पंचतीस । हरिले कळिकाळदोष । पुढें शालिवाहन व्हावयास । अवतार जाण पैठणीं

१०४४४०	शालिवाहन	।।ना.गा.०९९०.०१०।।	तो हा शालिवाहन । अठरा हजार जाण । तें क्षेत्र प्रतिष्ठान । गंगातीरीं प्रत्यक्ष
१०४४४१	शालिवाहन	।।ना.गा.१२५४.००३।।	शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रभव संवत्सर शालिवाहन शके
१०४४४२	शाळिग्रामाची	।।ना.गा.०४२२.०१८।।	शाळिग्रामाची पूजा करी । त्यासी प्रसन्न जाले हरि । त्यासी दावितो पंढरी । पूर्व संस्कारी म्हणोनियां
१०४४४३	शाश्वता	।।ना.गा.००२३.००५।।	अच्युता शाश्वता अनंता अज अव्यया । कृपेच्या अभया देई आम्हां
१०४४४४	शास्त्र	।।ना.गा.०२९७.००२।।	धर्म शास्त्र ऐसें डोहाळे पुसावे । त्यांचे पुरवावे मनोरथ
१०४४४५	शास्त्र	।।ना.गा.०६६७.०१६।।	विरंची सकळ शास्त्र विचारितां । हरिनामापरता मंत्र नाहीं
१०४४४६	शास्त्र	।।ना.गा.०७४४.००१।।	सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ । वंदी कळिकाळ शास्त्र सांगे
१०४४४७	शास्त्र	।।ना.गा.०७६२.००४।।	वर्णावया न पुरे शेष । वेदां न घालवे कास । तेथें शास्त्र काय घेती भाष । रूप वर्णावया हरीचें
१०४४४८	शास्त्र	।।ना.गा.०७८४.००२।।	विठ्ठल विठ्ठल मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाहीं शस्त्र नामेंविण
१०४४४९	शास्त्र	।।ना.गा.०८१८.००४।।	नामा जपे नाम मंत्र । आणिक नेणे नाना शास्त्र । रामनामें नित्य वक्त्र । हरी रंगें रंगलें
१०४४५०	शास्त्र	।।ना.गा.०८८४.००१।।	बैसोनि एकांतीं गुरुगम्य गोष्टी । वेदांत परिपाठी शास्त्र बोध
१०४४५१	शास्त्र	।।ना.गा.०९०८.०१७।।	मिळोनि समस्त सोडियेलें शास्त्र । विचारोनी पत्र लिहियेलें
१०४४५२	शास्त्र	।।ना.गा.१०११.०९४।।	नमन एवढा मंत्र। नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । विचार लक्षण पात्र । तोचि जाणे येथीचें
१०४४५३	शास्त्र	।।ना.गा.१४१५.००२।।	तूतें वेद नेणें तूतें शास्त्र नेणें । तुझें नाम नेणें गातूं असे
१०४४५४	शास्त्र	।।ना.गा.१५१४.००५।।	तूं वेद मी स्तविता । तूं शास्त्र मी गीता । तूं गंध मी अक्षता । स्वयें दोन्ही
१०४४५५	शास्त्र	।।ना.गा.१९५१.००२।।	वेद कां पढसी शास्त्र कां सांगसी । उदंड वाचेसी हरी म्हणतां
१०४४५६	शास्त्र	।।ना.गा.२०८९.००६।।	वेद शास्त्र ऐसें बोल बोलविता । गूढ वेगळितां लाभ होती
१०४४५७	शास्त्रज्ञ	।।ना.गा.०९००.००१।।	पाहतील ग्रंथ सभाश्रेष्ठ महाजन । वैदिक शास्त्रज्ञ पुण्यश्लोक
१०४४५८	शास्त्रज्ञ	।।ना.गा.१४४५.००१।।	नेणे घातमात नव्हे कळावंत । शास्त्रज्ञ पंडित तोहि नव्हे
१०४४५९	शास्त्रज्ञासी	।।ना.गा.१५९६.००४।।	स्वरूप पुसावया गेलों शास्त्रज्ञासी । तंव भरले तयापाशीं भेदाभेद
१०४४६०	शास्त्रदृष्टी	।।ना.गा.१०११.०७९।।	पाठ वेदादि वचनें । शास्त्रदृष्टी अवलोकनें। कीर्तनीं गुण वर्णनें । हें हि नारायणें अंगीकारावी
१०४४६१	शास्त्रपंडित	।।ना.गा.१५४०.००३।।	शास्त्रपंडित तोचि मी बहुमानी । जो आपणातें जाणोनि तन्मय जाला
१०४४६२	शास्त्रपुराणा	।।ना.गा.१६१०.००३।।	भलारे भला मज जालासि शहाणा । भेष पळविलें शास्त्रपुराणा
१०४४६३	शास्त्रबोध	।।ना.गा.०७१७.००१।।	अभ्यासिले वेद जाला शास्त्रबोध । साधिल्या विविध नाना कळा
१०४४६४	शास्त्रबोध	।।ना.गा.०८०८.००४।।	नव्हे तीर्थाटन पुराण श्रवण । नव्हे ब्रह्मज्ञान शास्त्रबोध
१०४४६५	शास्त्रबोध	।।ना.गा.०८०९.००३।।	न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा

१०४४६६	शास्त्रबोध	।।ना.गा.२००१.००१।।	न पढावे वेद नको शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा
१०४४६७	शास्त्रमतें	।।ना.गा.०९०४.००७।।	या एक उपाय असे शास्त्रमतें । अनन्यभक्तीतें अनुसरावें
१०४४६८	शास्त्रवक्ता	।।ना.गा.०८८६.००२।।	केलें वेदपठण काव्य आणि व्याकरण । जालासे निपुण शास्त्रवक्ता
१०४४६९	शास्त्रवक्ते	।।ना.गा.०९२९.००४।।	होतू शास्त्रवक्ते व्युत्पत्तीचे माथे । होतू बहु श्रोते बुद्धिवंत
१०४४७०	शास्त्रवाक्य	।।ना.गा.१३५९.०४२।।	गुरुशिष्य तोचि निजबंधु । त्यासि स्वप्नीं न कीजे विरोधु । करितां घडे गुरुबंधु । शास्त्रवाक्य
१०४४७१	शास्त्रां	।।ना.गा.०५१६.००१।।	वेदां जन्मस्थान शास्त्रां समाधान । काय बुझावण दाखविसी
१०४४७२	शास्त्रांचें	।।ना.गा.१८८२.०१०।।	शास्त्रांचें हें सार वेदांचें गव्हार । नाम परिकर कलियुगीं
१०४४७३	शास्त्रांसी	।।ना.गा.०४५६.००३।।	ब्रह्मादिक वंदिती शिवादिक ध्याती । शास्त्रांसी तों गति नकळेचि
१०४४७४	शास्त्राचे	।।ना.गा.२०४५.००३।।	साही शास्त्राचे संमत । मंथुनि काढिले यथार्थ
१०४४७५	शास्त्राचें	।।ना.गा.०३८८.००९।।	अनंत शास्त्राचें पुराणाचें सार । त्याचेंही जिव्हार विटेवरी
१०४४७६	शास्त्राचें	।।ना.गा.०८२६.००१।।	शास्त्राचें हें सार वेदाचें गव्हर । उतरावया पार आणिक नाहीं
१०४४७७	शास्त्राचें	।।ना.गा.०९७५.००७।।	जें भक्तीचें सौभाग्य ज्ञानाचें आरोग्य । शास्त्राचें तें चांग मथित नाम
१०४४७८	शास्त्रार्थ	।।ना.गा.१८३१.००४।।	नामा म्हणे हा शास्त्रार्थ । अर्थ तोचि होय स्वार्थ
१०४४७९	शास्त्री	।।ना.गा.२०३०.००१।।	वेदी तोचि शास्त्री सर्वांठायीं तोचि । पुराणांत तोचि अंत:करणीं
१०४४८०	शास्त्रीं	।।ना.गा.०९४८.०११।।	अज्ञानासी दोष नाहीं प्रत्यवाय । शास्त्रीं हा उपाय सिद्ध असे
१०४४८१	शास्त्रें	।।ना.गा.०४८६.००१।।	नेणें साही शास्त्रें तुज केशिराजा । स्वरूपें कुबजा काय होती
१०४४८२	शास्त्रें	।।ना.गा.०७६८.००२।।	वेद कां पढसी शास्त्रें कां शिणसी । उदंड वाचेसी हरी म्हणा
१०४४८३	शास्त्रें	।।ना.गा.०९०८.००४।।	जयांच्या हृदयीं वेदांचा निवास । शास्त्रें रहिवास केला होय
१०४४८४	शास्त्रें	।।ना.गा.१३९०.००१।।	वेदांसी न कळे शास्त्रें पैं भांडती । श्रुति विवादती ब्रह्मालागीं
१०४४८५	शास्त्रें	।।ना.गा.१९४०.००३।।	प्रपंच हा खोटा शास्त्रें निवडीला । पाहिजे साक्षीला सद्‌गुरु तो
१०४४८६	शास्त्रेंहि	।।ना.गा.१६६८.००४।।	रामकृष्ण माझ्या शेषांचे स्तवन । शास्त्रेंहि पुराणें भाट ज्यांचीं
१०४४८७	शाहणा	।।ना.गा.०३१८.००१।।	म्हणसी बिभीषण शाहणा । परि तो महामूर्ख जाणा
१०४४८८	शाहणीव	।।ना.गा.१५६२.००१।।	जाणिव शाहणीव वाहियेलें वोझें । तेणें चरण तुझें अंतरले
१०४४८९	शाहाणा	।।ना.गा.०२०४.००७।।	शाहाणा चतुर आहेसी नेटका । बोधाव्या गोपिका ब्रह्मज्ञानें
१०४४९०	शाहाणा	।।ना.गा.१७३८.००२।।	भला भला नाम्या शाहाणा जालासी । कां रे तूं न घेसी सांग मज
१०४४९१	शाहाणिया	।।ना.गा.०४८३.००८।।	शाहाणिया द्वारपाळ म्हणतां लाज थोरी । जरी जाला भिकारी ते न साहे

१०४४९२	शिंकें	।।ना.गा.०२४६.००४।।	येणें माझें कवाड उघडिलें । पुढती शिंकें हो तोडिलें। दह्यादुधातें भक्षिलें । उलंडिलें ताकातें
१०४४९३	शिंक्यावरी	।।ना.गा.००६४.००३।।	न पुरेचि हात दूध शिंक्यावरी । करावें मुरारी कैसें तेथे
१०४४९४	शिंगी	।।ना.गा.२०८७.००१।।	मुंगी व्याली शिंगी जाली तिचें दूध किती । सतरा रांजण भरून गेले पेले बारा हत्ती
१०४४९५	शिंगें	।।ना.गा.००९७.००४।।	शिंगें रंगविती देऊनियां रंग । चालती श्रीरंग मागें मागें
१०४४९६	शिंगें	।।ना.गा.०१७८.००३।।	जगजेठी तेव्हां धरितसे शिंगें । सारितसे मागें भुजाबळें
१०४४९७	शिंगें	।।ना.गा.०२३२.००२।।	शिंगें पावे मोहऱ्या वाजती कुसरी । हुंबरीं आखरीं गगन गर्जे
१०४४९८	शिंतरलों	।।ना.गा.१४००.००३।।	मग स्वधर्ममार्गीं रिघालों । तंव अहंकारतस्करें आकळिलों । राहें राहें म्हणोनि उभा केलों । तेणें शिंतरलों स्वामिया
१०४४९९	शिंदळी	।।ना.गा.१८८३.००५।।	जयीं घातलिया निघे खरा । ज्ञान जाणे तोचि चतुरा । शिंदळी जाणावी नीच उत्तरा । कुसळी घरोघरां फिरतसे
१०४५००	शिंदळु	।।ना.गा.१६२३.००३।।	चोर आणि शिंदळु चाळविलें गोविळें । अनंत मर्दिले दुष्टकाळ
१०४५०१	शिंपा	।।ना.गा.२१२१.००८।।	त्याचे चरणींचा रजरेणु हा नामदेव शिंपा। पाहतां अनुभव सकळार्थ सोपा । विठ्ठलकृपेस्तव याची मजवरी कृपा । हे एकचि मूर्ती पावलो ऐसें देखे पां
१०४५०२	शिंपिती	।।ना.गा.१००६.००३।।	अनंत तीर्थांचा मेळ । उदकें शिंपिती ब्रह्मगोळ । लोहगिरी सुवर्णाचळ । त्यावरी आळंकापुरी
१०४५०३	शिंपियाचा	।।ना.गा.२०१८.००४।।	येणें संसार सुखाचा । म्हणे नामा शिंपियाचा
१०४५०४	शिंपियेली	।।ना.गा.०२१२.००७।।	नामा म्हणे ऐसें सांगतसे कुंती । शिंपियेली क्षिती अश्रुपातें
१०४५०५	शिंपिलें	।।ना.गा.०९९८.०११।।	चरणतीर्थ घेतलें । तेणें समस्त मंदिर शिंपिलें । आपण मुखीं घातलें म्हणे । कृतकृत्य जालों मी
१०४५०६	शिंपी	।।ना.गा.०००९.००६।।	करुणेचा पर्जन्य शिंपी मज तोया। ऐकें कृष्णराया गोजरीया
१०४५०७	शिंपी	।।ना.गा.०५४३.००७।।	करुणेचा पर्जन्य शिंपी मजवरता या। ऐकें कृष्णराया गोजिरिया
१०४५०८	शिंपी	।।ना.गा.०८४७.००५।।	विशेष शिंपी नामा । तो पंढरीये पुरुषोत्तमा । हाचि बोल ऐकूनि प्रेमा । त्याच्या शिवाणा न जावें
१०४५०९	शिंपी	।।ना.गा.०८४८.००५।।	दिंडी पताका गजर टाळघोषांचा । नाद उमटतो अंबरींचा । तेथें पाड नाहीं काळाचा । शिंपी नामा तळपतो केशवराया
१०४५१०	शिंपी	।।ना.गा.०९४९.००१।।	जातीचे हे शिंपी विश्व जाणे यातें । प्रत्यक्ष सांगाते जेवविलें
१०४५११	शिंपी	।।ना.गा.०९५५.०१९।।	तो एक संसारीं धन्य शिंपी नामा । आवडता आम्हां जीवाहोनी
१०४५१२	शिंपी	।।ना.गा.१२५२.००४।।	विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला । तो शिंपी वहिला म्हणों नये
१०४५१३	शिंपी	।।ना.गा.१२५३.००४।।	नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी। उपमा जातीची देऊं नये

१०४५१४	शिंपी	।।ना.गा.२०६९.००५।।	गण आणि गोत्रज सर्व हासताती मज । गेलें याचें मनुष्यपण येणें सांडियेली लाज । विनवी तो शिंपी नामा संतचरणींचा रज
१०४५१५	शिंपी	।।ना.गा.२०७१.००७।।	पिंगळा आनंदला मनीं । तेज न माये गगनीं । हर्षे घातली लोळणी । शिंपी नामा तुझे चरणीं
१०४५१६	शिंपी	।।ना.गा.२०७८.००२।।	गुळेंविण शिंपी बोटें चाटी । प्रेमेंविण तेली क्षेम दे लाटीं
१०४५१७	शिंपीयेली	।।ना.गा.०१६३.००४।।	नामा म्हणे ऐसी करिताती स्तुती । शिंपीयेली क्षिती अश्रुपातें
१०४५१८	शिंपुनी	।।ना.गा.११०१.००६।।	हातें खाणोनि भूमिका । अमृत शिंपुनी सुगंधिका । महामंगळिक सुखा । वेदघोष आरंभिले
१०४५१९	शिंप्याचा	।।ना.गा.०२३२.०११।।	ओंवाळिला नाम्या शिंप्याचा दातार । रखुमादेवीवरू श्रीविठ्ठल
१०४५२०	शिंप्यानें	।।ना.गा.२०८१.००६।।	ऐसें तें पांखरूं गोरक्षरायें वळखिलें रे । पिंडीं आणि ब्रह्मांडीं मच्छिंद्रनाथें देखियेलें रे । त्याचियेनि अंगसंगें सद्‌गुरुनाथें दाखविलें रे । त्याचियाचि प्रसादें नाम्या शिंप्यानें गाईली रे
१०४५२१	शिंसीवावृक्षाचे	।।ना.गा.०३२१.००४।।	शिंसीवावृक्षाचे असे तळवटीं । समीप निकटीं राक्षसाचे
१०४५२२	शिक	।।ना.गा.०५०७.००६।।	केला भक्तांचा कुडावा । शिक लाविली दानवा । नामया स्वामी वोळंगावा । नरहरि विसांवा भक्तांचा
१०४५२३	शिकला	।।ना.गा.१८३०.००१।।	शिकला तैं गाणें राग आळवण । लोकां रंजवण करावया
१०४५२४	शिकवणा	।।ना.गा.००६६.००४।।	सांगतसे शिकवणा । खोडी नको करूं कान्हा
१०४५२५	शिकवा	।।ना.गा.१३२०.००१।।	शिकवा हो रुक्माई आपुलिया कांता । कां आम्हां अनाथा कष्टविती
१०४५२६	शिकवावें	।।ना.गा.१३०४.००५।।	दामा म्हणे नामयासी । किती शिकवावें तुजसी
१०४५२७	शिकवावें	।।ना.गा.१३१९.०१२।।	लज्जेचा हा गांव सांडियेला येणें । शिकवावें कोणें माउलिये
१०४५२८	शिकवितसे	।।ना.गा.१२६७.००१।।	कापड घेऊनि जाय बाजारासी । गोणाई नाम्यासी शिकवितसे
१०४५२९	शिकवितां	।।ना.गा.१२६५.०१०।।	ऐसें शिकवितां नाम्याचें न मोहरे चित्त । पाहतसे तटस्थ तन्मय दृष्टी
१०४५३०	शिकविते	।।ना.गा.०२६३.००१।।	हातीं घेऊनियां काठी । शिकविते श्रीपती । यमुनेची माती । खासी कां कां कां कां
१०४५३१	शिकवितें	।।ना.गा.१२६६.०११।।	जयाचें खुंटे तो लागे याच्या पंथें । तुजसी शिकवितें म्हणोनियां
१०४५३२	शिकवितें	।।ना.गा.१२८३.००३।।	कासया अपराध ठेविशिल मज । शिकवितें तुज नाहीं कोणी
१०४५३३	शिकविलें	।।ना.गा.१३५९.०१०।।	मी एक जाणता सर्वांठायीं । सर्व शिकविलें म्यांचि पाही । ऐसें बोलती जनप्रवाही । महंतीलागीं
१०४५३४	शिकविलें	।।ना.गा.१६३७.००२।।	भुजंगाचीं पिलीं उपजतांचि वेगळीं । त्यांसी डंखूं शिकविलें हो कोणी
१०४५३५	शिकविलें	।।ना.गा.२०२५.००५।।	माझें शिकविलें नाइकसी । आतां सांगेन बळिया केशवासी । धरूनि नेईल वैकुंठासी । चरणीं जडसी म्हणे नामा
१०४५३६	शिकवी	।।ना.गा.१२८८.००३।।	हा काय आमुचा धनी कीं गोसावी । नाहीं तें शिकवी लेंकुरासी

१०४५३७	शिकवी	।।ना.गा.१३०३.०११।।	बरवी धरिली दृढ सत्वाची पाउटी । शिकवी दामशेठी नामयासी
१०४५३८	शिकवी	।।ना.गा.१३१५.००१।।	आई जे शिकवी तीतें तुम्ही नाईका । नाहीं भय शंका लौकिकाची
१०४५३९	शिकवी	।।ना.गा.१९८२.००१।।	पिता शिकवी पुत्रासी । नको जाऊं बापा हरिकथेसी । तेथें पांचा तोंडाची विवशी । ते वैष्णवें आणिली आहे
१०४५४०	शिकवीत	।।ना.गा.००६६.००६।।	पोरां शिकवीत । गोरस आणा रे समस्त
१०४५४१	शिकवूं	।।ना.गा.१३१९.०१५।।	होणार होऊन गेले शिकवूं आतां काई । विनविते राजाई रखुमाईसी
१०४५४२	शिकावया	।।ना.गा.०३२०.००२।।	पावलों विश्रांति धालें माझें मन । न लगे आतां ध्यान शिकावया
१०४५४३	शिके	।।ना.गा.१७९७.००८।।	कपट शिके नानाविध । गोत्रजाशीं करी विरोध । तो जाणावा हें प्रसिद्ध । महा पातकी चांडाळ
१०४५४४	शिक्षा	।।ना.गा.००६६.००९।।	योगियांचे न ये लक्षा । त्यासी लावूं म्हणती शिक्षा
१०४५४५	शिक्षा	।।ना.गा.००७६.००६।।	कलह करावा भ्रतारा कळेल । तो शिक्षा करील यथास्थित
१०४५४६	शिक्षा	।।ना.गा.०२४६.००५।।	ऐसें जरी मी जाणते । यमुना पाणिया नवजातें । वोढुनि उखळी बांधितें । शिक्षा लावितें गोविंदा
१०४५४७	शिखरावरी	।।ना.गा.२०५८.००१।।	त्रिकूट शिखरावरी पाहे पां नवल । परि अखंडित धार वर्षे अमृताची
१०४५४८	शिखरीं	।।ना.गा.११०१.००२।।	पक्षाचेनि फडत्कार । ग्राम ठाकिला संवत्सर । गिरीकडे पठार । शिखरीं गरुड उतरला
१०४५४९	शिखरीं	।।ना.गा.११०४.००७।।	येथोनि पूर्वाभाग पंढरी । पश्चिमभागीं ब्रह्मा अवधारी । अवतार कऱ्हे पाठारीं । महादेव शिखरीं मानदेसी
१०४५५०	शिखरीं	।।ना.गा.११०५.००१।।	पूर्वकथा संवत्सरनगरीं । सांगितली असे अवधारी । मग शेषाद्रि पर्वतावरी । गरुड शिखरीं उभा असे
१०४५५१	शिखरीं	।।ना.गा.१३५९.००४।।	फळ तरूवर शिखरीं । म्हणोनि आरोहण कीजे त्यावरी । तें फळ अवचिता जोडिलें करीं । मग तयावरी कासया चढावें
१०४५५२	शिखरीं	।।ना.गा.१७२४.००३।।	पर्वत शिखरीं बद्रीनारायणु । सोयरा सज्जनु पंढरिये
१०४५५३	शिखरीं	।।ना.गा.२०५२.००३।।	खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं । गोलांगुळांगुळीं समाधिस्थ
१०४५५४	शिखरीं	।।ना.गा.२०५३.००१।।	खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं । अर्ध चंद्रावरी शेखींयाचा
१०४५५५	शिखरीं	।।ना.गा.२०८१.००१।।	राइयेयेवढें पांखरूं त्रिभुवनीं त्याचा फेरा रे । नर आणि नारी तया पांखराचा चारा रे । पिंडामध्यें आहे त्याचा शोध तुम्हीं करा रे । मेरूच्या शिखरीं त्या पांखराचा थारा रे
१०४५५६	शिखरें	।।ना.गा.०५६७.००५।।	हिंडे नाना वन पर्वत शिखरें । मारीतसे फार जीवजंतू
१०४५५७	शिजविती	।।ना.गा.०१३३.००५।।	एवढेंसें भांडें तांदूळ शिजविती । तुजला काय देती त्यांतूनियां
१०४५५८	शिजविला	।।ना.गा.१८१४.००३।।	बचनाग रवा दुग्धीं शिजविला । तरी काय गेला त्याचा गुण
१०४५५९	शिड	।।ना.गा.२०९१.००२।।	तारूं करूनी शरीराचें । केणें भरिलें हरिनामाचें । शिड उभविलें सत्त्वाचें । वल्हें पडती धर्माचें

१०४५६०	शिडी	।।ना.गा.०५४७.००३।।	विष्णुदास नाम्याने उभारिली शिडी । टाकावया पेढी वैकुंठींची
१०४५६१	शिडी	।।ना.गा.१०५३.००४।।	स्वर्गादिक सुखें कमाविलीं रोकडीं । वैकुंठासी शिडी लावियेली
१०४५६२	शिण	।।ना.गा.०२८४.०१४।।	कृष्ण माऊली भेटेल । शिण अवघाचि हरेल । सुख आनंदू न मायेल। या त्रिभुवनीं
१०४५६३	शिण	।।ना.गा.०२८४.०१५।।	या बहू जन्माचा शिण वो जाईल । विठोदर्शनें दु:ख हरेल । नामा सुखिया होईल । केशव चरणीं
१०४५६४	शिण	।।ना.गा.०५३१.००६।।	हृदयीं धरूनि नामा निजबोधे निमाला । शिण हारपला संसाराचा
१०४५६५	शिण	।।ना.गा.१३३८.००१।।	चौदाशें वरुषें शरीर केलें जतन । बोधाविण शिण वाढविला
१०४५६६	शिणतां	।।ना.गा.१५८६.००२।।	होणार तें हो गा सुखें पंढरीनाथा । कासया शिणतां वायांविण
१०४५६७	शिणताती	।।ना.गा.१५३८.००२।।	बरवा बरवा विठ्ठल गे बाई। वर्णावया साही शिणताती
१०४५६८	शिणताती	।।ना.गा.१९०९.००४।।	नामा म्हणे ऐसा विठ्ठल सोडोनि। वेर्थ काय जनीं शिणताती
१०४५६९	शिणती	।।ना.गा.०१५४.००८।।	न लगेची शोध शिणती सकळ । न जाती गोकुळा नामा म्हणे
१०४५७०	शिणती	।।ना.गा.०५३६.००१।।	योगिये शिणती तुझिये प्राप्तिलागीं । नातुडसी जगीं कवणासी
१०४५७१	शिणतो	।।ना.गा.०४२२.०१९।।	जयासी नावडे पंढरी । तो पापिया दुराचारी । उपजोनियां संसारीं । येरझारी शिणतो
१०४५७२	शिणतोसी	।।ना.गा.०७८२.००१।।	विठ्ठलनामीं आळस न करी गव्हारा । वायांचि वेरझारा शिणतोसी
१०४५७३	शिणभाग	।।ना.गा.०४३४.००२।।	शिणभाग दवडिला म्हणेल । जीविंचें पुसेल जडभारी
१०४५७४	शिणभाग	।।ना.गा.१७६७.००२।।	अवघा शिणभाग हिरोन घेईन । अवघेंचि तोडिन मायाजळ
१०४५७५	शिणभागु	।।ना.गा.०९४७.००१।।	नामयाचे मुखीं घालुनी कवळु । पुसतसे गोपाळु शिणभागु
१०४५७६	शिणलासि	।।ना.गा.२०२८.००२।।	लक्षचौऱ्यांशीच्या करितां येरझारा । शिणलासि गव्हरा वेळोवेळां
१०४५७७	शिणलासी	।।ना.गा.०९४७.००४।।	वियोगाचेनि शोकें शिणलासी मार्गीं । देह मजलागीं वाळविला
१०४५७८	शिणलिया	।।ना.गा.०२६१.००२।।	जीवापरीस हें वाल्हें बालक। शिणलिया विसांवा त्याचें श्रीमुख
१०४५७९	शिणलिया	।।ना.गा.१२९३.०१०।।	शिणलिया बोभाय मग मी वाट पाहें । ये वो माझे माये पांडुरंगे
१०४५८०	शिणलिया	।।ना.गा.१४६८.००१।।	तुझिया संतांची अंगसंगति । ते शिणलिया विश्रांति संसारिया
१०४५८१	शिणलिया	।।ना.गा.१७५६.००९।।	शिणलिया न म्हणती बैस घे विश्रांति । आठवी या श्रीपति पांडुरंगा
१०४५८२	शिणली	।।ना.गा.०२८५.००२।।	होती बहुत जन्में वियोगें शिणली । आप नाठवे पर सुखें मिनली
१०४५८३	शिणली	।।ना.गा.०३३६.००५।।	स्वरूपाचा निर्धार नेणती पुराणें । शिणली दरुशनें वेवादतीं
१०४५८४	शिणली	।।ना.गा.०९६९.०२२।।	या नामयाची माता आम्हां तुम्हां देखतां । शिणली वेवादतां नानापरी
१०४५८५	शिणलीं	।।ना.गा.०९६३.००९।।	परि तेहि उबगलीं म्हणती नेति नेति । शिणलीं वेवादती साहीजणें

१०४५८६	शिणले	।।ना.गा.००४२.००३।।	वेडावला शेष शिणले वेद चारी । निजे मांडीवरी यशोदेच्या
१०४५८७	शिणले	।।ना.गा.०३२७.००१।।	अनिर्वाच्य ब्रह्म निगम म्हणती । शिणले वेवादती अठरा साही
१०४५८८	शिणले	।।ना.गा.०९३८.०१०।।	संतांपासीं सांगे शिणले मजविण । कंठीं धरिला प्राण मजलागीं
१०४५८९	शिणले	।।ना.गा.१५२२.००२।।	डोळे माझे शिणले पाहतां वाटोली । अवस्था दाटली हृदयामाजीं
१०४५९०	शिणलें	।।ना.गा.०४२२.००८।।	काशी त्यागिजे शरीर । हिवें शिणलें केदार । पाणी गोमतीचें क्षार। म्हणवोनि महिमा सम नाहीं
१०४५९१	शिणलें	।।ना.गा.०४७२.००३।।	देव देव करितां शिणलें माझें मन । जेथें जाय तेथें पूजा पाषाण
१०४५९२	शिणलें	।।ना.गा.०९२२.०११।।	तें मार्गीं शिणलें असेल कोमाईलें। सुखदु:ख आपुलें सांगेल कवणा
१०४५९३	शिणलें	।।ना.गा.१४१२.००३।।	कटीं कर उभा शिणलें शरीर । धरोनि निर्धार भक्तिभावें
१०४५९४	शिणलें	।।ना.गा.१५१९.००३।।	वासनेच्या संगें शिणलें माझें चित्त । विषयाचे आघात पडती वरी
१०४५९५	शिणलें	।।ना.गा.१६५६.००१।।	तुझे चरणीं चित्त रंगलें अनुरागें । बहुजन्मीं वियोगें शिणलें होतें
१०४५९६	शिणलों	।।ना.गा.०६४१.००२।।	त्राहे वो जननी शिणलों गे माये । तुजविण आहे कवण मज
१०४५९७	शिणलों	।।ना.गा.०६४२.००२।।	नामें हरि हरि त्राहे वो झडकरी। शिणलों मी भारी जननीये
१०४५९८	शिणलों	।।ना.गा.०९३७.००३।।	शिणलों पंढरिराया पाहें कृपादृष्टी । थोर जालों हिंपुटी तुजविण
१०४५९९	शिणलों	।।ना.गा.१२९३.००२।।	जन्म मरण दु:खें शिणलों यातायाती । ऐसी माझी खंती न विचारिसी
१०४६००	शिणलों	।।ना.गा.१५१९.००१।।	जननिये जिवलगे येवो पांडुरंगे । शिणलों भेटि दे गे एक वेळां
१०४६०१	शिणलों	।।ना.गा.१५९६.०११।।	भयभीत जालों संसार येरझारीं । शिणलों असें भारी तारीं मज
१०४६०२	शिणलों	।।ना.गा.१६२९.००६।।	नामा म्हणे थोर शिणलों पंढरीनाथा । स्वामीचें नेणतां प्रेमसुख
१०४६०३	शिणलों	।।ना.गा.१६५५.००५।।	येरझारा फेरा शिणलों सायासीं । आतां हृषिकेशी अंगिकारीं
१०४६०४	शिणलों	।।ना.गा.१८७९.००६।।	सवती सवतीचा करकरा । उभा शिणलों दातारा । भेटी करी वनींच्या व्याघ्रा । परी संसारीं उबगलों
१०४६०५	शिणल्या	।।ना.गा.००५४.००८।।	शिणल्या भागल्या येतों तुम्हां घरां । मुख हें उदारा दावी कृष्णा
१०४६०६	शिणल्या	।।ना.गा.१९५८.००४।।	मुक्तीची माउली मोक्षाची गाउली । शिणल्या साउली विषयासक्ता
१०४६०७	शिणल्या	।।ना.गा.२०३२.००४।।	मुक्तांचें जीवन मुमुक्षा माऊली । शिणल्या साउली विषयासक्तां
१०४६०८	शिणवावें	।।ना.गा.१४६७.०१२।।	आमुचें हो तेंच तुम्हीं विनवावें । आम्हांसि मानलें आघवें । किती येरझारीं शिणवावें । शरण रिघावें श्रीहरी
१०४६०९	शिणविती	।।ना.गा.०९६१.०११।।	म्हणोनि माझ्या जिवीं वाटे थोर खंती । स्वामीतें शिणविती युगायुगीं
१०४६१०	शिणविलें	।।ना.गा.१३२६.००१।।	नामा म्हणे स्त्रिये अनुचित केलें । कां माझ्या शिणविलें विठोबाशी
१०४६११	शिणविसी	।।ना.गा.१५६३.००२।।	कासया शिणविसी थोडिया कारणें । काय तुझें उणें होईल देवा

१०४६१२	शिणसि	।।ना.गा.१८७५.००१।।	कां शिणसि घरदार मायेच्या बंधनें । वायांचि वेसण अनहितासी
१०४६१३	शिणसी	।।ना.गा.०७६८.००२।।	वेद कां पढसी शास्त्रें कां शिणसी । उदंड वाचेसी हरी म्हणा
१०४६१४	शिणीजे	।।ना.गा.०२८४.०१०।।	तंवचि वो शिणीजे। जंव यातें न वोळंगिजे । याचें बीज पाविजे । नामें एकें विठ्ठलें
१०४६१५	शिणे	।।ना.गा.१७११.००५।।	बोलतों पैं खोटें देतों पैं उणें । वायांच शिणे रात्रंदिवस
१०४६१६	शितळु	।।ना.गा.१८९०.००१।।	भूमिदानें होसी भूमिपाळु । कनकदानें कांति निर्मळु । चंदनदानें सदा शितळु । जन्मोजन्मीं प्राणिया
१०४६१७	शितें	।।ना.गा.०२९४.००४।।	वडजा वांकुडा पेंदा सुदामा । हेंचि पांतिकर आम्हां । तेथें विष्णुदास नामा । उच्छिष्ट शितें वेंचितसे
१०४६१८	शिदोरी	।।ना.गा.०२३५.००२।।	गाई तृप्त करी कळंबाच्या तळीं । सोडिली शिदोरी दावितसे
१०४६१९	शिदोरी	।।ना.गा.०२४७.०१०।।	आणिक एक नवल परी करीं घेऊनि शिदोरी । सवंगड्या वांटितसे नामया स्वामी मुरारी
१०४६२०	शिदोरी	।।ना.गा.०२९३.००२।।	पांच पांच पोळ्या तीन भाकरी । दीड कानवला एक पुरी। आम्हां धाडिलें वना दुरी । आमची ठकवून खाल्ली शिदोरी
१०४६२१	शिदोरी	।।ना.गा.०२९४.००२।।	माते दे वो शिदोरी । ऐसें म्हणतसे मुरारी । मी जाईन वो दुरी । धेनु चारावयालागीं
१०४६२२	शिदोरी	।।ना.गा.०२९४.००३।।	आलें बेलें चिलें मेके । सुरण मिरगोडी पैं तिखें। दह्यावांचोनि नव्हें निकें । शिदोरी ताकें कालवूं
१०४६२३	शिदोरी	।।ना.गा.०२९५.००३।।	यमुना तीरीं रे नित्य करितां अंघोळी । मला म्हणतो रे जाये आण शिदोरी। मी कैसा रे आणु करून भाकरी। काम करी भाई
१०४६२४	शिदोरी	।।ना.गा.१५१०.००३।।	विष्णुदास नामा उभा केशवद्वारीं । प्रेमाची शिदोरी मागतसे
१०४६२५	शिदोरी	।।ना.गा.१६२३.००२।।	उच्छिष्ट शिदोरी घेऊनिया करीं । भक्तांचा भिकारी तूंचि एक
१०४६२६	शिदोरीया	।।ना.गा.००९४.००४।।	चला आतां जेवूं बसू एके ठायीं । काढारे लवलाही शिदोरीया
१०४६२७	शिदोऱ्या	।।ना.गा.००९६.००२।।	गडी मिळोनी समस्त । घ्या रे शिदोऱ्या सांगात
१०४६२८	शिदोऱ्या	।।ना.गा.०१६१.००४।।	घेवोनी शिदोऱ्या गड्यांसी वांटीत । ठेवावा तो हात शिरावरी
१०४६२९	शिदोऱ्या	।।ना.गा.०२३३.००२।।	यमुने पाबळी गोपा पाचारीत। शिदोऱ्या शोभत पाठीवरी
१०४६३०	शिदोऱ्या	।।ना.गा.०२४२.००३।।	गाई गोपाळापें हरी । आणा तरी शिदोऱ्या
१०४६३१	शिपटीं	।।ना.गा.१५६०.००२।।	हातीं घेऊनि शिपटीं माय लागे पाठीं । चरणीं घाली मिठी परते नोहे
१०४६३२	शिबिये	।।ना.गा.१८८२.००९।।	बळी भीष्म नारद उद्धव रुक्मांगद । शिबिये परमानंद पावविले
१०४६३३	शिबी	।।ना.गा.१३७६.००५।।	धर्माचेनी मार्गें निघाला कर्ण। शिबी चक्रवर्ती जाला जीवित्वहीन । तयामाजीं सांग नाडला कोण । लटकी झकवण कां बोलती
१०४६३४	शिबी	।।ना.गा.१६२४.००८।।	शिबी चक्रवर्ती करितां यज्ञयाग । कापिलें त्याचें अंग ठायीं ठायीं

१०४६३५	शिबी	।।ना.गा.२०१२.००५।।	सूर्यवंशीं राजा हरिश्चंद्र जन्मला स्वप्न तेणें काय साच केलें । स्त्रीपुत्रातें विकुनियां तेणें ब्राह्मणां सुखिया पैं केलें । शिबी चक्रवर्तीनें आपुले प्राण देऊनि जीव ते भक्तराज काय जाले रे
१०४६३६	शिबीराजा	।।ना.गा.०६०१.००३।।	शिबीराजा अंग कापी नेटपाटें । सत्वासी पालट होऊं नेदी
१०४६३७	शिर	।।ना.गा.०२६४.००३।।	लडोबा गोविंदा । लडोबा गोविंदा । निरवाणी आज । आडचाल्लो पडचाल्लो ।शिर फोड्या न कोडो । मारी कन्हय्या । पानी खेळ्या न खेळो
१०४६३८	शिर	।।ना.गा.०४८०.००४।।	साधिलें नगर देऊनियां शिर । कष्ट दशशिरें एवढें केलें
१०४६३९	शिर	।।ना.गा.१२३८.००३।।	नामदेवें आळंगुनी प्रीती । शिर चरणावरी अवचिती । ज्ञानदेवाच्या ठेवी पुढती । म्हणे धन्य क्षिती मी एक
१०४६४०	शिर	।।ना.गा.१८५६.००४।।	छेदावया शिर हस्त सहस्रांचे । जरि बहुतांचे उगारले
१०४६४१	शिरकमळीं	।।ना.गा.१६७६.००३।।	चरणींजे आहे ती माझी माय । ईश्वरू तो वाहे शिरकमळीं
१०४६४२	शिरसा	।।ना.गा.०९१७.०११।।	नामा म्हणे स्वामी विठोबासी पुसा । आज्ञा देईल शिरसा धरीन त्याची
१०४६४३	शिरसा	।।ना.गा.०९५४.०१४।।	ऐकोनि पंढरिरावो बोलते जाले वाचा । आज्ञा ते शिरसा स्वामियांची
१०४६४४	शिरसा	।।ना.गा.१००३.००६।।	हो म्हणती तीर्थें सकळें। मग मीनलीं आपुलेनि मेळें । गुप्त राहोनि यथाकाळें । आज्ञा शिरसा वंदिती
३०९	।।ना.गा.कु.०४१.०८।।	कवाडा आडुनी पहात गोणाई । तिघे एकेठायीं जेविताती
३१०	।।ना.गा.कु.०४१.०९।।	जेवितां देखिलें आली ते घरासी । साक्ष आली तिसी गोंदा म्हणे
३११	।।ना.गा.कु.०४२.०१।।	साक्ष आल्यावरी कष्टी जाहली मनीं । मारिलें पापिणी नामयासी
३१२	।।ना.गा.कु.०४२.०२।।	मारिलें म्हणोनि महा शोक करीत । जेवूनियां घरीं आला नामा

३१३	।।ना.गा.कु.०४२.०३।।	नामा आला घरा पाहे मातेकडे । आनंदानें रडे गोणाबाई
३१४	।।ना.गा.कु.०४२.०५।।	नामा विनवित दोन्ही कर जोडोनि । लागला चरणीं गोणाईच्या । नामा म्हणे माते कां शोक करिसी । सांग मजपाशीं काय जाहलें
३१५	।।ना.गा.कु.०४२.०६।।	माता म्हणे आतां काय सांगूं नाम्या । साक्ष माझ्या मना आली आजी
३१६	।।ना.गा.कु.०४२.०७।।	कवाडा आडून देखियेलें आम्ही । जेवियेलां तुम्ही तिघेजण
३१७	।।ना.गा.कु.०४२.०८।।	व्यर्थ मी मारिलें केला जाच तुज । ऐसा भक्तराज गांजियेला
३१८	।।ना.गा.कु.०४२.०९।।	आतां मज देव कोपेल विठ्ठले । ऐसें माता बोले गोंदा म्हणे
३१९	।।ना.गा.कु.०४३.०१।।	नामयाची माता काय म्हणे देवा । मज तूं केशवा कोपूं नको
३२०	।।ना.गा.कु.०४३.०२।।	मज कोपूं नको देवा पांडुरंगा । गोणाई गोविंदा विनवीतसे
३२१	।।ना.गा.कु.०४३.०३।।	न कळतां देवा मारिला मी नामा । मज क्षमा करा मायबापा
३२२	।।ना.गा.कु.०४३.०४।।	सर्वस्वीं मी अपराधी पंढरीच्या राया । नाम्याविषयीं दया असों द्यावी
३२३	।।ना.गा.कु.०४३.०५।।	घातलें तयासी तिनें लोटांगण । केलें समाधान विठ्ठलानें
३२४	।।ना.गा.कु.०४३.०६।।	नामा आलिंगिला हृदयीं मातेनें । जोडला सज्जन देव तुज
३२५	।।ना.गा.कु.०४३.०७।।	तुज हा जोडला पंढरीचा राव । जाहला बरवा ठाव नामदेवा
३२६	।।ना.गा.कु.०४३.०८।।	बहुत पूर्वपुण्य होतें तुझे गांठीं । पडली हे मिठी विठ्ठलासी
३२७	।।ना.गा.कु.०४३.०९।।	नामा विठ्ठलासी नाहीं द्वैतपण । धरीत चरण गोंदा म्हणे
३२८	।।ना.गा.कु.०४४.०१।।	विठ्ठल रुकमाई भक्त नामदेव । नित्यानित्य सद्भावें जेवितसे
३२९	।।ना.गा.कु.०४४.०२।।	सेवा करितां बहु दिवस क्रमियेले । नागवन आले फार दिवसें
३३०	।।ना.गा.कु.०४४.०३।।	कांहीं नाहीं द्रव्य आणि धन । राजाई ते म्हणे गोणाईसी
३३१	।।ना.गा.कु.०४४.०४।।	काय खावें आतां असो कोणे परी । लाविले दारोदारीं विठ्ठलानें
३३२	।।ना.गा.कु.०४४.०५।।	उपवास सोसूं आतां दिवस किती । घालूं या पोरास काय आतां
३३३	।।ना.गा.कु.०४४.०६।।	विठ्ठलानें कांहीं बरें नाहीं केलें । नाम्या वेडें केलें पांडुरंगें
३३४	।।ना.गा.कु.०४४.०७।।	वेडें करूनि आम्हां जाच तूं करिसी । पोट मारविसी मायबापा
३३५	।।ना.गा.कु.०४४.०८।।	किती दुःख सोसूं आतां या शरीरीं । करीन निर्धारीं जीवघात
३३६	।।ना.गा.कु.०४४.०९।।	चौपारांसहित घालीन भीमे उडी । लागेन पैलथडी गोंदा म्हणे
३३७	।।ना.गा.कु.०४५.०१।।	दोघेजण बाळ नारा म्हादा तान्हे । बांधियेलें तिनें मागें पुढें
३३८	।।ना.गा.कु.०४५.०२।।	उडी ते घातलीं भींवरेचे डोहीं । आला लवलाहि पांडुरंग

३३९	।।ना.गा.कु.०४५.०३।।	येऊनी शिरला भींवरेचे डोहीं । ओढोनी राजाई ठेवी कांठीं
३४०	।।ना.गा.कु.०४५.०४।।	पाहें तो राजाई कांठीं उभी आहे । क्रोधें बोलताहे विठ्ठलासी
३४१	।।ना.गा.कु.०४५.०५।।	क्रोधें म्हणे देवा कां रे जाचितोसि । लल्लाट महिशी आपटिलें
३४२	।।ना.गा.कु.०४५.०६।।	क्रोधें ते आणिक टाकियेली उडी । नेली पैलथडी विठ्ठलानें
३४३	।।ना.गा.कु.०४५.०७।।	मग ते राजाई चालिली घरासी । देखिला वाटेसी मेला सर्प
३४४	।।ना.गा.कु.०४५.०८।।	सर्प तो घेऊनी वेगीं आली घरासी । ठेवीं शिजावयासी चुलीवरी
३४५	।।ना.गा.कु.०४५.०९।।	सर्प हा शिणला खाऊं पांचजणें । केला विचार तिनें, गोंदा म्हणे
३४६	।।ना.गा.कु.०४६.०१।।	शिजला तो सर्प काढिलें झांकण । पाहे तो सुवर्ण तोंडावरी
३४७	।।ना.गा.कु.०४६.०२।।	सुवर्ण देखोनि सुखी जाहली मनीं । बाई हरिखोनी सांगे नाम्या
३४८	।।ना.गा.कु.०४६.०३।।	सांगितलें वर्तमान नाम्यापाशीं । नामा म्हणे तिसी पाहूं सोनें
३४९	।।ना.गा.कु.०४६.०४।।	सुवर्ण आणूनि ठेविलें पुढें । काय केलें वेडे नामा म्हणे
३५०	।।ना.गा.कु.०४६.०५।।	कशासाठीं माझ्या स्वामिसी पीडिलें । कां गे कष्टी केलें देवराया
३५१	।।ना.गा.कु.०४६.०६।।	मेळविले द्विज तया नामयानें । वांटियलें सोनें ब्राह्मणांसी
३५२	।।ना.गा.कु.०४६.०७।।	तेव्हां राजाईने आकांत मांडिला। नामा वेडा केला पांडुरंगें
३५३	।।ना.गा.कु.०४६.०८।।	सुवर्णासारखी वस्तु ते वांटिली । भूली ते घातली नामयासी
३५४	।।ना.गा.कु.०४६.०९।।	नामदेवा तिनें बहु जाच केला । कृपाळु पावला गोंदा म्हणे
३५५	।।ना.गा.कु.०४७.०१।।	जाच केला म्हणोनि चालिला श्रीहरी । भक्तांचा कैवारी पांडुरंग
३५६	।।ना.गा.कु.०४७.०२।।	पंढरीचा वाणी जाला केशवशेट । लावियेली मूठ ढवळा नंदी
३५७	।।ना.गा.कु.०४७.०३।।	वराईची गोणी घालून त्यावरी । आणून नाम्याघरीं उतरली
३५८	।।ना.गा.कु.०४७.०४।।	पुसतां तो नामा गेला अंघोळीसी । सांगे राजाईसी केशवशेट
३५९	।।ना.गा.कु.०४७.०५।।	धनाची हे गोणी वेंचा तुम्ही घरीं । सांगा बहुतापरी नामयासी
३६०	।।ना.गा.कु.०४७.०६।।	नामदेव माझा मित्र आहे सगा । केशवशेटी सांगा दिल्ही गोणी
३६१	।।ना.गा.कु.०४७.०७।।	वचन सांगोनी केशवशेट गेला । नामदेव आला मंदिरासी
३६२	।।ना.गा.कु.०४७.०८।।	येऊनी पुसत कवणाची गोणी । तुमचा मित्र वाणी केशवशेट
३६३	।।ना.गा.कु.०४७.०९।।	नामा पाहे तंव वराईची गोणी । दु:खी जाहला मनीं गोंदा म्हणे
३६४	।।ना.गा.कु.०४८.०१।।	वराईची गोणी कळली राजाईसी । नामा ब्राह्मणासी बोलावीत

३६५	।।ना.गा.कु.०४८.०२।।	इतुक्यामध्यें होन मडकेंभर काढिले । गोणी ते शिविली होती तैसी
३६६	।।ना.गा.कु.०४८.०३।।	द्विज मिळवुनि आला नामदेव । वांटियेलें सर्व द्रव्य त्यानें
३६७	।।ना.गा.कु.०४८.०४।।	नामा म्हणे द्रव्य ज्याचें त्या दिधलें । ऋण तें ठेविलें नाहीं कांहीं
३६८	।।ना.गा.कु.०४८.०५।।	राजाई ते होन सांभाळाया गेली । हातां राख आली कोळशाची
३६९	।।ना.गा.कु.०४८.०६।।	कोळसे देखोनि खोंचली ते मनीं । धन्य तुझी करणी पांडुरंगा
३७०	।।ना.गा.कु.०४८.०७।।	नामदेवापुढें सांगे वर्तमान । चोरोनियां होन म्यां ठेविलें होते
३७१	।।ना.गा.कु.०४८.०८।।	पाहतां त्या होनाचे जाहले कोळसे । नामा पाहतसे जालें सोनें
३७२	।।ना.गा.कु.०४८.०९।।	वांटिलें ब्राह्मणा तेही होन त्यानें । फेडियलें ऋण गोंदा म्हणे
३७३	।।ना.गा.कु.०४९.०१।।	राजाईचा संशय फेडिला मनींचा । कळला पूर्ण साचा पांडुरंग
३७४	।।ना.गा.कु.०४९.०२।।	भावें ते राजाई म्हणे नामदेवा। सज्जन हा ठावा पांडुरंग
३७५	।।ना.गा.कु.०४९.०३।।	विठ्ठलावांचुनी आणिक नाहीं थोर । धरिला निर्धार राजाईनें
३७६	।।ना.गा.कु.०४९.०४।।	विकल्प सांडुनी मन केलें शुद्ध । धरिला गोविंद मनामाजीं
३७७	।।ना.गा.कु.०४९.०५।।	नामा राजाई जाहला एकभाव । लावियेला जीव विठ्ठलपायीं
३७८	।।ना.गा.कु.०४९.०६।।	नारा विठा गोंदा माहादा आउबाई। त्यांनीं धरिला पायीं पांडुरंग
३७९	।।ना.गा.कु.०४९.०७।।	नामयाची दासी नागी दुसरी जनी। त्यांनीं सेवा करूनि केला देव
३८०	।।ना.गा.कु.०४९.०८।।	एकभाव पहा लाविला विठ्ठला । त्यांनीं जवळ केला पांडुरंग
३८१	।।ना.गा.कु.०४९.०९।।	विठ्ठलावांचोनी दुजें नाहीं मनीं । गेले लोटांगणीं देवराया
३८२	।।ना.गा.कु.०४९.१०।।	ऐसा त्याचा भाव कळला देवासी । सकळ वैकुंठासी पाठविले
३८३	।।ना.गा.कु.०४९.११।।	अंतकाळीं नामा धरिला हृदयीं । ठेवियेला पायीं गोंदा म्हणे
३८४	।।ना.गा.कु.०५०.०१।।	ऐसा नामा भक्त पूर्ण केली सेवा । उद्धरिलें जीवा संगतीच्या
३८५	।।ना.गा.कु.०५०.०२।।	आवडला नामा देव विठ्ठलासी। ठेवी चरणापासीं अखंडित
३८६	।।ना.गा.कु.०५०.०३।।	नामयाची कुडी घातली पायरी । येतां जातां हरी पाय देती
३८७	।।ना.गा.कु.०५०.०४।।	आणिकहि पाय देती साधुसंत । ऐसा पूर्ण भक्त उद्धरिला
३८८	।।ना.गा.कु.०५०.०५।।	न सोडी विठ्ठल नामयासी घडी । बहु त्याची गोडी विठ्ठलासी
३८९	।।ना.गा.कु.०५०.०६।।	गोडी हे म्हणोनि ठेविलें चरणीं । आहे तो भजनीं नामदेव
३९०	।।ना.गा.कु.०५०.०७।।	ऐसा पांडुरंग भक्तांची माउली । करितो साउली मायबाप

३९१	।।ना.गा.कु.०५०.०८।।	नरदेहा आलिया भजावा हा देव । मनीं दुजाभाव धरूं नये
३९२	।।ना.गा.कु.०५०.०९।।	भजावें भजन नामयाचे परी । होय साहाकारी गोंदा म्हणे
३९३	।।ना.गा.कु.०५१.०१।।	भावें भक्तिवादें करावें कीर्तन । आशाबद्ध मन करूं नये
३९४	।।ना.गा.कु.०५१.०२।।	निष्कामें करावें देवाचें कीर्तन । भय हें सांडून शरीरांचें
३९५	।।ना.गा.कु.०५१.०३।।	रणामध्यें कैसा भिडतो रणशूर । होवोनी उदार जीवावरी
३९६	।।ना.गा.कु.०५१.०४।।	तैसा पांडुरंगीं धरा हो निर्धार । उतरा हा पार भवसिंधू
३९७	।।ना.गा.कु.०५१.०५।।	सिंधु उतरोनी लावा जगढाल । पाहा तें नवल विठ्ठलाचें
३९८	।।ना.गा.कु.०५१.०६।।	देव जोडियेला तया काय उणें । गोंदा म्हणे मन धीट करा
३९९	।।ना.गा.कु.०५२.०१।।	साठी नव लक्ष चौऱ्याण्णव कोटी । बापाची हे जोडी देई देवा
४००	।।ना.गा.कु.०५२.०२।।	जमान देउनी नाहींसें तूं करी । वायां येरझारीं शिणवितोसी
४०१	।।ना.गा.कु.०५२.०३।।	आमुचे जमान देवा तुमचे पाये । तुझा कोठें आहे जमान सांगे
४०२	।।ना.गा.कु.०५२.०४।।	नामयाचा गोंदा बळकट धरितां जाला । विठोबा आणिला चौबारांत
४०३	।।ना.गा.कु.०५३.०१।।	सेज सिद्ध जाली निजा श्रीधरा । आज्ञा द्यावी लोकां जात आपुल्या घरा
४०४	।।ना.गा.कु.०५३.०२।।	रात्र बहुत जाहाली देवा चला मंदिरा । राहिरखुमाबाई वाट पाहाती सुंदरा
४०५	।।ना.गा.कु.०५३.०३।।	तुम्हांसमोरास देवा जाली पंढरी । विनटला चरणीं गोंदा उभा राहिला द्वारीं
४०६	।।ना.गा.कु.०५४.०१।।	साधुसंतजना करितों प्रार्थना । भेटवा देवराणा द्वारकेचा
४०७	।।ना.गा.कु.०५४.०२।।	तनमनप्राण वेधले त्याचे पायीं । येऊनियां राहीं हृदयकमळीं
४०८	।।ना.गा.कु.०५४.०३।।	गोपाळाचे मेळीं खेळे वनमाळी । यमुने पाबळीं वेणु वाहे
४०९	।।ना.गा.कु.०५४.०४।।	शंख चक्र करीं मोरपिच्छ शिरीं । कानीं मकराकारी मुक्ताफळें
४१०	।।ना.गा.कु.०५४.०५।।	गळां वनमाळा कासे सोनसळा । देखुनि व्रजबाळा तन्मय जाल्या
४११	।।ना.गा.कु.०५४.०६।।	नंदाचे नंदनें मोहियेलें मन । लागलेसें ध्यान गोविंदाचें
४१२	।।ना.गा.कु.०५४.०७।।	विठा नामयाच्या चरणींचा रज । भेटवा यादवराज द्वारकेचा
४१३	।।ना.गा.कु.०५५.०१।।	मग साधुसंत म्हणती विठ्या जाय । मग तूं याचे पाय सोडूं नको
४१४	।।ना.गा.कु.०५५.०२।।	अठ्ठाविस युगें एकाचें धरणें। तेथें हें मागणें दुसरें कोठें
४१५	।।ना.गा.कु.०५५.०३।।	एकाची मागणि मागे पैं होईल । मग तुजशीं येईल बोलतां दुःख
४१६	।।ना.गा.कु.०५५.०४।।	म्हणोनि पंढरीनाथु खुणची दावीतु । नामयाचा विठा पुसतु वेव्हारीं धीटु

४१७	।।ना.गा.कु.०५६.०१।।	विठा नामयाचा आला पंढरपुरा । भेटला सोयरा विटेवरी
४१८	।।ना.गा.कु.०५६.०२।।	सुखदु:ख अवघे सांगितलें श्रीहरी। धरणें तुझें द्वारीं घेईन देवा
४१९	।।ना.गा.कु.०५६.०३।।	नामयासारिखा आणिक कोणी आहे । सृष्टीमाजी पाहे विचारूनी
४२०	।।ना.गा.कु.०५६.०४।।	नामा माझा सखा जिवाचा तो जीव । त्याचा आहे भाव माझे ठायीं
४२१	।।ना.गा.कु.०५६.०५।।	मजवांचुनि नामा दुजें नेणें कांहीं । मी त्याचे हृदयीं सदा असे
४२२	।।ना.गा.कु.०५६.०६।।	नामयानें नाम जोडिलें निधान । ठेविलें सर्व धन तुझ्या पायीं
४२३	।।ना.गा.कु.०५६.०७।।	समर्थासी कांहीं बोलूं नये आतां । ठेविणें कृपानाथा देई वेगीं
४२४	।।ना.गा.कु.०५६.०८।।	चहुंयुगीं नामा सांगतोचि आहे । वेगळा कांहीं नोहे क्षणभरी
४२५	।।ना.गा.कु.०५६.०९।।	माझिया बापाची तुजजवळ ठेवी । विठा म्हणे द्यावी केशिराजा
४२६	।।ना.गा.कु.०५७.०१।।	पूर्व जन्मीं आराधितां । तुझें वर्म आलें आमुच्या हातां । नामदेवें सांगितलें जातां । तें सर्वथा देईजे
४२७	।।ना.गा.कु.०५७.०२।।	आमुचे वडिलीं गा जोडिलें । तें तुझें पायीं गा ठेविलें । गौप्य करितां नोव्हे गा भलें । दे उगलें गा दातारा
४२८	।।ना.गा.कु.०५७.०३।।	आमुचें आम्हांसी गा देतां । कां बा नये तुझ्या चित्ता । गाऱ्हाणें देईन संतां । चौघां देखतां घेईन
४२९	।।ना.गा.कु.०५७.०४।।	तुझा दारवंटा राखेन हरी । तुज रीघों नेदी बाहेरी । मोकलिसी अधांतरीं । हे लाज कवणातें
४३०	।।ना.गा.कु.०५७.०५।।	आणिक कांहीं न मागें तूतें । सेवावृत्ती द्यावी मातें । मज निरवावें संतातें । आपुला दास म्हणेन
४३१	।।ना.गा.कु.०५७.०६।।	नामयाचा विठा म्हणे । यांत कांहीं करिसी उणें । तरी आमुच्या वडिलांचें निरूपणें । बांधलासी गा विठ्ठला
४३२	।।ना.गा.कु.०५८.०१।।	आमुचा नामा तुज गेला निरवुनी । मी तुजवांचोनी नेणें कवण
४३३	।।ना.गा.कु.०५८.०२।।	कायावाचामनें जोडिलें जें बापें । तें दिधलें तुज पैं ठेवावया
४३४	।।ना.गा.कु.०५८.०३।।	तें देगा आमुचें नको करूं विचारू । नामा तुझा डिंगरू त्याचे आम्ही
४३५	।।ना.गा.कु.०५८.०४।।	जुनें नाणें आमुच्या वडिलाचें ठेवणें । बहुता कष्टी तेणें जोडियेलें
४३६	।।ना.गा.कु.०५८.०५।।	तें आम्हालागोनी ठेविलें तुझ्या पायीं । आमुचें आम्हां देई केशीराजा
४३७	।।ना.गा.कु.०५८.०६।।	तूं अनाथ कोंवसा दीनाचा कृपाळू । तरी आमुचा सांभाळू करी गा वेगें
४३८	।।ना.गा.कु.०५८.०७।।	आमुचे संचितार्थ आम्हासी देउनी । यश घे त्रिभुवनीं म्हणे विठा
४३९	।।ना.गा.कु.०५९.०१।।	आमुचे ठेवणें जुगादीचें नाणें । जातां नामयानें सांगितलें
४४०	।।ना.गा.कु.०५९.०२।।	इतके दिवस पाहिली तुझी वाट । परी तूं उदास न बोलसी
४४१	।।ना.गा.कु.०५९.०३।।	तुजवांचोनि आम्हां कोण असे पोशिता । देई कृपावंता नाम प्रेम
४४२	।।ना.गा.कु.०५९.०४।।	आम्ही तुझी सेवकें रंकाहुनी रंक । कठीण बोलणें निकें वदें तुज

४४३	।।ना.गा.कु.०५९.०५।।	म्हणोनि वेळोवेळां लागे तुझ्या पायीं । लटकीच गोवाई करूं नको
४४४	।।ना.गा.कु.०५९.०६।।	तुज आम्हांसी वेगळीक नाहीं । तरी तूं न धरी कांहीं दुजाभाव
४४५	।।ना.गा.कु.०५९.०७।।	आपुलें म्हणावें अंधारीं ओळखावें । नामप्रेम द्यावें म्हणे विठा
४४६	।।ना.गा.कु.०६०.०१।।	हरिनामाचा ध्वनि ऐकोनि श्रवणीं । जाईन लोटांगणीं तेथवरी
४४७	।।ना.गा.कु.०६०.०२।।	माझे सखे अवघे वैष्णवजन। त्याचें मज दर्शन कैं होईल
४४८	।।ना.गा.कु.०६०.०३।।	एक उभे गाती एक बैसुनी ऐकती । हृदयीं आलिंगिती गोपीनाथु
४४९	।।ना.गा.कु.०६०.०४।।	ऐशियाचे संगतीं आहे बाप माझा । विनवितो विठा नामयाचा
४५०	।।ना.गा.कु.०६१.०१।।	आमुचा बाप अग्रेज तुझा । तूं बा आम्हां होसी आजा
४५१	।।ना.गा.कु.०६१.०२।।	कैसें आम्हां धरिलें दुरीं । सांग कृपाळुवा हरी
४५२	।।ना.गा.कु.०६१.०३।।	तूं आमुचा मुळपुरुष । आम्ही अवघे तुझे अंश
४५३	।।ना.गा.कु.०६१.०४।।	आम्ही तुझी तिसरी पिढी । संत जाणताती प्रौढी
४५४	।।ना.गा.कु.०६१.०५।।	अरे कायशीं शतें लोटलीं । कैशी लाघावळी तुटती
४५५	।।ना.गा.कु.०६१.०६।।	हांसोनी बोले केशीराज । विठ्या अवघें घेई मज
४५६	।।ना.गा.कु.०६२.०१।।	माझिया बापाचा तुजपाशीं ठेवा । विठो म्हणे द्यावा केशीराजा
४५७	।।ना.गा.कु.०६२.०२।।	ठेविलें ठेवणें झडकरी देई । वेव्हार कांहीं लावूं नको
४५८	।।ना.गा.कु.०६२.०३।।	आपुलें मागतां कोण आड येईल । आतां जाणवेल तुझें माझें
४५९	।।ना.गा.कु.०६२.०४।।	विटेसहित चरणीं घालीन मिठी । करीन सवसाटी जन्मोजन्मीं
४६०	।।ना.गा.कु.०६२.०५।।	विठा म्हणे मज खवळिसी वायां । पिसाळलिया पायां झोंबेन तरी
४६१	।।ना.गा.कु.०६३.०१।।	मायबापें काय नसती आमुचीं । लेंकरें आमचीं त्याचे हातीं
४६२	।।ना.गा.कु.०६३.०२।।	माझें देई माझ्या हातीं लवलाहीं। होई उतराई केशिराजा
४६३	।।ना.गा.कु.०६३.०३।।	तुझ्या पायीं माझा बांधीन गळा । न भियें कळिकाळा सत्य जाणा
४६४	।।ना.गा.कु.०६३.०४।।	जितुकें देणें तितुकें मी घेईन आतां । नामयानें जातां सांगितलें
४६५	।।ना.गा.कु.०६३.०५।।	रगट्या पाटोळ्यासी पडियेली मिठी । आतां जगजेठी तुज मज
४६६	।।ना.गा.कु.०६३.०६।।	बोरी काटे कांहो केळी आहो फाटे । नामयाचें विठें खवळलें
४६७	।।ना.गा.कु.०६४.०१।।	खवळलों आतां न भियें रे तुज । सांडियेली लाज लौकिकाची
४६८	।।ना.गा.कु.०६४.०२।।	आम्ही दीन शिंपे यातीचे हो हीन । दे माझें ठेवणें केशिराजा

४६९	।।ना.गा.कु.०६४.०३।।	साठी लक्ष चौऱ्याणव कोटी । त्यांतून एक कवडी न सोडी मी
४७०	।।ना.गा.कु.०६४.०४।।	आणिक याहुनी असेल आगळें । ते घेईन बळें न सोडी तुज
४७१	।।ना.गा.कु.०६४.०५।।	तुज थोरपण काईगा हें देवा । आम्हां दुर्बळाचा ठेवा अभिलाषसी
४७२	।।ना.गा.कु.०६४.०६।।	पोरटीं म्हणोनि अभिलाष करिसी । तें कोठें निस्तरिसी म्हणे विठा
४७३	।।ना.गा.कु.०६५.०१।।	तुज काय देवा न पुरतें आलें । विश्वासें ठेविलें अभिलाषेसी
४७४	।।ना.गा.कु.०६५.०२।।	लाजिरवाणें नको करूं देवा आतां । देई गा कृपावंता नामप्रेम
४७५	।।ना.गा.कु.०६५.०३।।	शरणागत वज्रपंजर म्हणवीसी । तरी कां तूं न देसी आम्हां आमुचें
४७६	।।ना.गा.कु.०६५.०४।।	माझ्या नामयानें जन्मोनि जोडिलें । तें दे गा वहिलें म्हणे विठा
४७७	।।ना.गा.कु.०६६.०१।।	उदार चक्रवर्ती लक्ष्मीचा पती । तरी कां काकुळती चित्तीं वाहासी
४७८	।।ना.गा.कु.०६६.०२।।	आम्हां दुर्बळांचें ठेवणें कां ठेविलें । दिवाळें निघालें काय तुझें
४७९	।।ना.गा.कु.०६६.०३।।	ज्याचें घेसी त्याचें ऐसेंचि करिसी । तें न चले मजपाशीं केशिराजा
४८०	।।ना.गा.कु.०६६.०४।।	चौघाचारीं तुज वेढीन मी आतां । मग बैसेल माथां अपकीर्ती
४८१	।।ना.गा.कु.०६६.०५।।	आठराही बोलती साही सत्य वाचा । उदार ठायींचा कां न होसी
४८२	।।ना.गा.कु.०६६.०६।।	देणें घेणें तुज न सुटे सर्वथा । विचारूनि आतां पाहे मनीं
४८३	।।ना.गा.कु.०६६.०७।।	नामयाचें ठेवणें तुजजवळी आहे । न सोडी तुझे पाय म्हणे विठा
४८४	।।ना.गा.कु.०६७.०१।।	माझिया बापाची मिराशी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा
४८५	।।ना.गा.कु.०६७.०२।।	उपास पारणें राखें दारवंटा । केला भोगवटा आम्हांलागीं
४८६	।।ना.गा.कु.०६७.०३।।	तुजपुरतें दुजें नेणें आणिक कांहीं । देखें सर्वांठायीं रूप तुझें
४८७	।।ना.गा.कु.०६७.०४।।	तुझ्या सुखें धाला तुजमाजी निवाला । आपुल्या विसरला देहभाव
४८८	।।ना.गा.कु.०६७.०५।।	आम्हांसी घातलें तुझीये आभारीं । विठा अंगिकारी नारायणा
४८९	।।ना.गा.कु.०६८.०१।।	हाटकरी आम्ही आठवडे मुळींचे । पंढरपुरीचे वारकरी
४९०	।।ना.गा.कु.०६८.०२।।	खेप ठिकाणाची वस्तु सवंगाची । सवाई निढळाची उणी नव्हे
४९१	।।ना.गा.कु.०६८.०३।।	चोहाटा चौकाचें दुकान नाक्याचें । जागा मिराशीची पुरातन
४९२	।।ना.गा.कु.०६८.०४।।	हरिनाम घेणें नित्य हमेशाही । तेव्हां तोटा नाहीं कोणें काळीं
४९३	।।ना.गा.कु.०६८.०५।।	विठा म्हणे वजन केली वैकुंठीची । गुणीं निर्गुणींची कडासन
४९४	।।ना.गा.कु.०६९.०१।।	माझिया बापासी तुझाचि विश्वास । म्हणवी तुझा दास अंतरंग

४९५	।।ना.गा.कु.०६९.०२।।	वृत्तिसहित मन ठेवुनी तुझ्या पायीं । तुजपरतें कांहीं जाणेचिना
४९६	।।ना.गा.कु.०६९.०३।।	तो आम्हांलागीं शब्दें न पुससी । विसरोनी गेलासी दीनानाथा
४९७	।।ना.गा.कु.०६९.०४।।	जागे ठाणांतरी पंढरी चोहोटा । राखे दारवंटा रात्रंदिवस
४९८	।।ना.गा.कु.०६९.०५।।	छत्र चवर धरूं हाडपी डोळे करूं । जाणवी आवसरू सेवा विधी
४९९	।।ना.गा.कु.०६९.०६।।	शरीर प्राणाचा देऊनियां बळी । धरिलें हृदयकमळीं चरण तुझे
५००	।।ना.गा.कु.०६९.०७।।	विठा म्हणे तुज नाहीं आठवण । सहज तूं निर्गुण पंढरिराया
५०१	।।ना.गा.कु.०७०.०१।।	भूतळीचीं तीर्थें नामा जंव करी । गांजीयेलें पोरीं नामयाच्या
५०२	।।ना.गा.कु.०७०.०२।।	तुमचें ठेवणें खेचराचे पायीं । आणिकाचे वाटीं पडों नका
५०३	।।ना.गा.कु.०७०.०३।।	वायां मृगजळ दाविसील आम्हां । सर्वथा पुरुषोत्तमा न सोडी मी
५०४	।।ना.गा.कु.०७०.०४।।	झोंडाचें ठेवणें ठेवावें कवणें । झोंडापरिस होणें झोंड जेणें
५०५	।।ना.गा.कु.०७०.०५।।	नामयाचा विठा झोंड पैं जाला । विठो उभा केला भक्तिसुखें
५०६	।।ना.गा.कु.०७१.०१।।	माझा ठेवा दाखवीं लवलाही । बांधीन मी पायीं जीव तुझ्या
५०७	।।ना.गा.कु.०७१.०२।।	सिद्धच ठेवणें नामयानें ठेविलें। त्यासी कां लाविलें आडवें हें
५०८	।।ना.गा.कु.०७१.०३।।	दोहीं कटावरी ठेऊनियां हात । कैसा हा पहात घरघेणें
५०९	।।ना.गा.कु.०७१.०४।।	तुझिया पायासीं बांधीन मी गळा । न भीयें कळिकाळा सत्य जाण
५१०	।।ना.गा.कु.०७१.०५।।	दारकोंड करोनि बैसेन दारवंटा । नामयाचा विठा हालों नेदी
५११	।।ना.गा.कु.०७२.०१।।	पंढरीराया माझिया बापें । प्रसन्न केलें तुज प्रतापें
५१२	।।ना.गा.कु.०७२.०२।।	आम्हां दिलें तुझे हातीं । पाळीं म्हणे प्रेम भक्ती
५१३	।।ना.गा.कु.०७२.०३।।	तृप्तिसहित माझिया मना । क्षेम घालीन तुझिया चरणा
५१४	।।ना.गा.कु.०७२.०४।।	तुझें गुणनाम कीर्तन । हें मज देई गा जीवदान
५१५	।।ना.गा.कु.०७२.०५।।	देऊनियां प्रेमाचें भातुकें । खेळविसी त्या कौतुकें
५१६	।।ना.गा.कु.०७२.०६।।	विठा म्हणे नामयाचा । प्रसाद तुझीये कृपेचा
५१७	।।ना.गा.कु.०७३.०१।।	तुझ्या प्रेमाचे कारणें । म्हणे म्यां घेतलें धरणें
५१८	।।ना.गा.कु.०७३.०२।।	विठोबा देई झडकरी । मी तर न सोडी निर्धारीं
५१९	।।ना.गा.कु.०७३.०३।।	शीर फोडीन कर्वती । न ये तुज काकुळती
५२०	।।ना.गा.कु.०७३.०४।।	देह घालीन गोरांजनीं । मोकलिसी मज लागोनी

५२१	।।ना.गा.कु.०७३.०५।।	तुझे द्वारीं देईन प्राण । तरी तूं पाहासी निर्वाण
५२२	।।ना.गा.कु.०७३.०६।।	विठा म्हणे पंढरिराया । आम्हां शिणवूं नको वायां
५२३	।।ना.गा.कु.०७४.०१।।	तुजसारिखा पंढरिनाथा । स्वामी शिरावरी असतां
५२४	।।ना.गा.कु.०७४.०२।।	तरी मी आणिकांचा मागतां । लाज कोणासी समर्था
५२५	।।ना.गा.कु.०७४.०३।।	असोनी क्षीरसिंधू जवळी । क्षुधाक्रांत तळमळी
५२६	।।ना.गा.कु.०७४.०४।।	कामधेनुतें वोळगतां । न पुरे कामना सर्वथा
५२७	।।ना.गा.कु.०७४.०५।।	विठा म्हणे नारायणा । आतां शरण जाऊं कोणा
५२८	।।ना.गा.कु.०७५.०१।।	जननी बाळका कोपे रागें । परि ते आहार तिसची मागे
५२९	।।ना.गा.कु.०७५.०२।।	तैसा तुज मी शरण । पंढरिराया निरुता जाण
५३०	।।ना.गा.कु.०७५.०३।।	खेती म्हणोनी परतें लोटी । परी ते चरणीं घालीं मिठी
५३१	।।ना.गा.कु.०७५.०४।।	टाकोनि जाय कडीये नेघे । परि ते धांवे तियेचि मागें
५३२	।।ना.गा.कु.०७५.०५।।	विठा म्हणे पंढरिनाथा । आम्हां नुपेक्षीं सर्वथा
५३३	।।ना.गा.कु.०७६.०१।।	हिंडता श्रमलें बहु श्रम जाला । अजुनि माझी तुला करुणा न ये
५३४	।।ना.गा.कु.०७६.०२।।	मज काय देतां होईल तुझें उणें । किती होसी कृपण पांडुरंगा
५३५	।।ना.गा.कु.०७६.०३।।	घेऊनी धरणें बैसलों महाद्वारीं । जालों पैं भिकारी पंढरीचा
५३६	।।ना.गा.कु.०७६.०४।।	विठा म्हणे देवा माझें मज देया । लौकिक वायां करितोसी
५३७	।।ना.गा.कु.०७७.०१।।	जननी बाळकांचें जीवन । जरी तें नेणें भूकतहान
५३८	।।ना.गा.कु.०७७.०२।।	तरी ते कशानें वांचती । विचारावें कमळापती
५३९	।।ना.गा.कु.०७७.०३।।	वत्सालागीं धेनु तान्हीं । लागूं नेदी आपुल्या स्तनीं
५४०	।।ना.गा.कु.०७७.०४।।	कूर्मी आपुलिया बाळा । नावलोकीं वेळोवेळां
५४१	।।ना.गा.कु.०७७.०५।।	विठा म्हणे जगज्जीवना । आतां नुपेक्षावें दीना
५४२	।।ना.गा.कु.०७८.०१।।	आमुचा बाप आम्हां सांगे । भाक दिधली पांडुरंगें
५४३	।।ना.गा.कु.०७८.०२।।	तुम्हां न विसंबें सर्वथा । तुमचा भार माझ्या माथां
५४४	।।ना.गा.कु.०७८.०३।।	करीन तळहात सावळी । तुमची अवघी वंशावळी
५४५	।।ना.गा.कु.०७८.०४।।	विठा म्हणे विसरलासी । आम्हां शब्दीं न पुससी
५४६	।।ना.गा.कु.०७९.०१।।	पितृभजन जरी पुंडलिक न करितां । तरी कां हा झोंड येता पंढरीसी

५४७	।।ना.गा.कु.०७९.०२।।	वेव्हार करितां आम्हासी जिंकलें । जन्म मरण केलें देशधडी
५४८	।।ना.गा.कु.०७९.०३।।	विठा म्हणे यानें बुडविलें अपार । पुढती हा चोर कबुल नाहीं
५४९	।।ना.गा.कु.०८०.०१।।	माझे बापाचेनि धनें बडिवार बोलसी । ते तूं घेवोनी आलासी उजागरपणें
५५०	।।ना.गा.कु.०८०.०२।।	उगलाचि देईं लावूं नको दावा । केशवासी ठावा आहे तुझा जीवभाव
५५१	।।ना.गा.कु.०८०.०३।।	सरता पुरता आमुचेनि जालासी । तें तूं आणिका सांगसी कोण्या तोंडें
५५२	।।ना.गा.कु.०८०.०४।।	सांगतां बहुत होईल पैं व्याजें । मग सोई मज तुज लाविती कां
५५३	।।ना.गा.कु.०८०.०५।।	ते म्हणती ऋणबोडा हा ठायींचा । अहो यासी बोला वाचा बुद्धिवंती
५५४	।।ना.गा.कु.०८०.०६।।	तूं नामयाच्या विठ्या धीर आणि चतुर । तुजसी खेचर काय बोलिला
५५५	।।ना.गा.कु.०८१.०१।।	उदमाचा करून झाडा । कर्म कदबा अवघा फाडा
५५६	।।ना.गा.कु.०८१.०२।।	मग येणें जाणें नाहीं । पुढें वेव्हार न लगे कांहीं
५५७	।।ना.गा.कु.०८१.०३।।	व्याज मुद्दल देऊन उजू । तिहीं लोकीं व्हावें रुजू
५५८	।।ना.गा.कु.०८१.०४।।	केशव म्हणे लिगाड तोडा । सुखसागर विठ्ठल जोडा
५५९	।।ना.गा.कु.०८२.०१।।	निज आत्मज्ञान डोहीं । जे बुडोन गेले पाहीं
५६०	।।ना.गा.कु.०८२.०२।।	तनु त्याग होतां त्याची । मग सगुणा भेटीं कैंची
५६१	।।ना.गा.कु.०८२.०३।।	अहंभाव वांटून प्याले । ते जिवंतचि मुक्त जालें
५६२	।।ना.गा.कु.०८२.०४।।	केशव म्हणे डोळां । ते पाहावे वेळोवेळां
५६३	।।ना.गा.कु.०८३.०१।।	तुझे पाय माझिया गळ्यासी । करीन एक मग उगलाची देसी
५६४	।।ना.गा.कु.०८३.०२।।	आपुलें मागतां झणें धिक्कारिसी। चोरासी सांगसी निजगुज
५६५	।।ना.गा.कु.०८३.०३।।	सांपडलीया लाथ बुक्की साहावी । जीवीं धूर धरावी विठो ऐसी
५६६	।।ना.गा.कु.०८३.०४।।	मग होणार तें हो या शरीरा। सांपडलीया धरा जीवें भावें
५६७	।।ना.गा.कु.०८३.०५।।	धुरेसी झगडा करावा सैरा । या रांडपोरां खवळसी काय
५६८	।।ना.गा.कु.०८३.०६।।	केशव म्हणे विठा झुंजार तूं भला । खेचरू दाखविला ठेवा तुझ्या बापाचा
५६९	।।ना.गा.कु.०८४.०१।।	खेचरापासीं जाय पुससी मागसीं तें आहे । येरा आणिका काय उमगेना
५७०	।।ना.गा.कु.०८४.०२।।	जाय जाय वेगीं लवलाहे पाहें । खेचराचे पाय सोडूं नको
५७१	।।ना.गा.कु.०८४.०३।।	तो सांगेल तें उगलेंच घेई । आणिकाचे वाहीं पडूं नको
५७२	।।ना.गा.कु.०८४.०४।।	केशव म्हणे नामयाच्या विठ्या भक्तराया । आलिंगुनी चहुं बाह्या दिधलें क्षेम

५७३	।।ना.गा.कु.०८५.०१।।	तंव धांवुनि गेला चरणीं लागला । देवा तूं दाखविला ठेवा माझ्या मायबापाचा
५७४	।।ना.गा.कु.०८५.०२।।	जाऊन तो धरीन न सोडी मी आतां । जे मज पंढरिनाथा ग्वाही दिधली
५७५	।।ना.गा.कु.०८५.०३।।	तंव खेचरू तेथें स्नानसंध्या करी । तंव ओढोनी पाय धरी विठा नामयाचा
५७६	।।ना.गा.कु.०८५.०४।।	तंव तो अवचिता खडबडोनी भ्याला । कोठोनी घाला पडिला धाडी मजवरी
५७७	।।ना.गा.कु.०८५.०५।।	उठी परतां तूं कोणाचा रे काय । ठाई ठाई राहें हालूं नको
५७८	।।ना.गा.कु.०८५.०६।।	तुझिया वडिलासी जाब देईन । धरोनी नेईन हें पोर कोणाचें
५७९	।।ना.गा.कु.०८५.०७।।	लाडिके लडिवाळ आपुलें बा धांवे पायीं । तुज कोणी नाहीं मग तूं निलाजिरे
५८०	।।ना.गा.कु.०८५.०८।।	छंद ना बंद झोंबतोची धीटा । बांधे न चोहटा चौघांचारी
५८१	।।ना.गा.कु.०८५.०९।।	फजीत करतील तुज कीं मज जाण । खेचर विसोबा म्हणती जा तुज विठोबाची आण
५८२	।।ना.गा.कु.०८६.०१।।	केशवाचे पाय जाणें मी आणिक कांहीं नेणें । म्हणोनि जीव प्राण अनुसरलों
५८३	।।ना.गा.कु.०८६.०२।।	पाय ते अतू पाय ते अतू । पाय ते अतू खेचराचे
५८४	।।ना.गा.कु.०८६.०३।।	पायापरते सुख आणिक नाहीं । विटेवरी पाय ध्येई मज
५८५	।।ना.गा.कु.०८६.०४।।	म्हणोनी पुढतां पुढती विठा लागे पायीं । म्हणे खेचर आई विनंती ऐका
५८६	।।ना.गा.कु.०८७.०१।।	चराचरीं जाणा एक खेचरू । त्याची पाउलें साचारू धरिलीं आम्ही
५८७	।।ना.गा.कु.०८७.०२।।	आतां पाउलें न सोडूं । पाउलें न सोडूं वेव्हारू विठा
५८८	।।ना.गा.कु.०८७.०३।।	या पाऊलाकारणें व्यवहारू जाला । खेचर वदला विठ्ठल साक्ष
५८९	।।ना.गा.कु.०८७.०४।।	तेचि पाऊलें साधुसंत आम्हां । विठा म्हणे परब्रह्म पावन केलें
५९०	।।ना.गा.कु.०८८.०१।।	तंव खेचरू ऐसी शिकवण बोली । कैसी खूण लाधली सांग विठ्या
५९१	।।ना.गा.कु.०८८.०२।।	जयाचा तुज जाहला बहूत । तो जाला शरणागत विठोबासी
५९२	।।ना.गा.कु.०८८.०३।।	वेद पुराणें शास्त्रें ते साक्ष देती । जें खेचर म्हणती ब्रह्मबीज
५९३	।।ना.गा.कु.०८८.०४।।	भारत आणि भागवत जया मुखें पाठ । संध्या गायत्री निष्ठा त्रिकाळ जप
५९४	।।ना.गा.कु.०८८.०५।।	जे केशवासी न कळे अखंड दंडे। ऐसीं बोलणीं उदंडें बोलोनी जाती
५९५	।।ना.गा.कु.०८८.०६।।	जाती आणि गोत वडील लहान थोर । अवघे पंढरपूर साक्ष देती
५९६	।।ना.गा.कु.०८८.०७।।	साधुसंतजन आणि महानुभाव । हरीचे दास सर्व सांगताती
५९७	।।ना.गा.कु.०८८.०८।।	जें खेंचर विसोबा ज्ञानधन लाधला । ठेवा तो दिधला नामयासी
५९८	।।ना.गा.कु.०८९.०१।।	सुखाचा निज ठेवा तुमचा केशवा । भाग्यें नामदेवा जोडलासी

५९९	।।ना.गा.कु.०८९.०२।।	तेणें तुझी सेवा केली मनोभावें। म्हणोनियां देवें घेतली धांव
६००	।।ना.गा.कु.०८९.०३।।	उदंड हें निधान निक्षेपें ठेविलें । थोडें बहूत दिधलें भाग्यवंता
६०१	।।ना.गा.कु.०८९.०४।।	अभिलाषी वस्तु तुझे पायीं ठेविली । ते आम्हां उगवली म्हणे विठा
६०२	।।ना.गा.कु.०९०.०१।।	माझा बाप माय विठोबा रखुमाई । वडील बंधु भाई पुंडलिक
६०३	।।ना.गा.कु.०९०.०२।।	साधुसंत जन सोईरे हे जाण । वंदीन चरण भावें त्यांचे
६०४	।।ना.गा.कु.०९०.०३।।	निजाचे सोईरे कां गा नोळखीसी । भ्रमें भुललासी मायाजाळीं
६०५	।।ना.गा.कु.०९०.०४।।	पाळिलों पोसिलों जन्मोनी जयाचा । उतराई त्याचा काई होऊं
६०६	।।ना.गा.कु.०९०.०५।।	पाहेपा परतोनी मुळिंचा तूं कोण । सद्गुरुशीं शरण रिघें वेगीं
६०७	।।ना.गा.कु.०९०.०६।।	सद्गुरू दयाळें लेवविलें अंजन । मज जनार्दन अवघा भासे
६०८	।।ना.गा.कु.०९०.०७।।	विठा म्हणे तारी आपुल्या शरणागता । अनाथाच्या नाथा पांडुरंगा
६०९	।।ना.गा.कु.०९१.०१।।	न लगे आयुष्य भविष्य संपत्ति । नाम लक्ष्मीपति द्यावें मज
६१०	।।ना.गा.कु.०९१.०२।।	तेणें तिहीं लोकीं होईन सरता । आणिक कृपावंता न मागें कांहीं
६११	।।ना.गा.कु.०९१.०३।।	नामयाचें प्रेम मज देई देवा । न घालावें खेंवा संसाराशी
६१२	।।ना.गा.कु.०९१.०४।।	वडिलांचें ठेवणें तुवां अभिलाषिलें । तें देईं वहिलें पांडुरंगा
६१३	।।ना.गा.कु.०९१.०५।।	संसार तारका भक्तजन पाळका । यादवकुलटिळका केशवराया
६१४	।।ना.गा.कु.०९१.०६।।	भवमूल छेदका गोपीमनरंजका । होसी बंधुसखा यादवकुळां
६१५	।।ना.गा.कु.०९१.०७।।	विठ्याचा तूं स्वामी भक्तिप्रेम सुख । यदुवंशटिळक यादवराया
६१६	।।ना.गा.कु.०९२.०१।।	तुजवीण जीवलग सोईरे । मज नाहीं बा दुसरे
६१७	।।ना.गा.कु.०९२.०२।।	विठो धांवे दवडादवडी । भक्त आपुला सोडवी
६१८	।।ना.गा.कु.०९२.०३।।	बहुत गांजिला संसारीं । जोजावला मदमत्सरीं
६१९	।।ना.गा.कु.०९२.०४।।	विषयसर्पें डंखियला । लोभ दंभें भक्षियला
६२०	।।ना.गा.कु.०९२.०५।।	कामक्रोधाचीये धाडी । पडियेलासें बांदवडी
६२१	।।ना.गा.कु.०९२.०६।।	विठा म्हणे राखे लाज । होसी आमुचा पूर्वज
६२२	।।ना.गा.कु.०९३.०१।।	बोलूं रे वेदांतीं बोलूं रे सिद्धांतीं । बोलूं नेती नेती अनिर्वाच्य
६२३	।।ना.गा.कु.०९३.०२।।	बोल बोल रे तूं मना । बोल नारायणा समर्पिला
६२४	।।ना.गा.कु.०९३.०३।।	माझा बाप बोल बोलूनियां गेला । केशव बांधिला बोल बोलें

६२५	।।ना.गा.कु.०९३.०४।।	नामयाचा विठा बोल नाहीं विसरला । केशव उभा केला भक्तिसुखें
६२६	।।ना.गा.कु.०९४.०१।।	बोल तो सधरू बोले तो उदारू । बोले राज्यधरू धीर धर्म
६२७	।।ना.गा.कु.०९४.०२।।	बोल तो न कळे बोल तो न कळे। बोले तो न कळे जाणतेया
६२८	।।ना.गा.कु.०९४.०३।।	बोलाच्या आधारें बोलाच्या विचारें । बोलें सर्व सार जिणोनियां
६२९	।।ना.गा.कु.०९४.०४।।	बोले जें अव्यक्त स्वरूप विचारू । ब्रह्म बोल सारू विठा म्हणे
६३०	।।ना.गा.कु.०९५.०१।।	तूंचि येसी तूंचि जासी । तूंचि भोगिसी गर्भवास
६३१	।।ना.गा.कु.०९५.०२।।	नेणों आम्ही आणिक बापा । तुम्ही याची कृपा चिरंजीव
६३२	।।ना.गा.कु.०९५.०३।।	पाप दोन्ही तूंचि भोगिसी । आमुचा न देसी भक्ती वांटा
६३३	।।ना.गा.कु.०९५.०४।।	नामयाचा विठा म्हणे केशवराजा । मी दाईज तुझा वांटेकरी
६३४	।।ना.गा.कु.०९६.०१।।	पायीं घातला तोडरू । देखूनि पळाला संसारू
६३५	।।ना.गा.कु.०९६.०२।।	आले हरीदास नेटके । भेणें पळालीं पातकें
६३६	।।ना.गा.कु.०९६.०३।।	गळां घालोनि तुळसीमाळ । वीर करिती कोल्हाळ
६३७	।।ना.गा.कु.०९६.०४।।	हांकारिती सहस्रनामें । रंगीं नाचताती प्रेमें
६३८	।।ना.गा.कु.०९६.०५।।	पताका झळकती अंबरीं । वैष्णव नाचती गजरीं
६३९	।।ना.गा.कु.०९६.०६।।	विठा केशवाचा नटू । बोले कळिकाळासी धटू
६४०	।।ना.गा.कु.०९७.०१।।	मी तुझा पोसणा अगा नारायणा । झणीं केविलवाणा दिसों दिसी
६४१	।।ना.गा.कु.०९७.०२।।	तुझा म्हणवितां आणिका शरण जातां । लाज माझ्या चित्ता वाटे थोर
६४२	।।ना.गा.कु.०९७.०३।।	रावाचा सेवक रंकाचिये द्वारीं । फिरतां घरोघरीं लाज कोणा
६४३	।।ना.गा.कु.०९७.०४।।	विठा म्हणे देवा मी तुझा शरण । मागतसे दान नाम तुझें
६४४	।।ना.गा.कु.०९८.०१।।	जावोनी वेव्हार सांगेन पंढरी । जेथें पुंडलिक द्वारीं उभा केला
६४५	।।ना.गा.कु.०९८.०२।।	देवोनी जाय कां घेवोनी जाय। आतां न सोडी पाय केशवाचे
६४६	।।ना.गा.कु.०९८.०३।।	एक आंगेसी एक जागेसी । तरी जीवें हृषिकेशी न सोडी तुज
६४७	।।ना.गा.कु.०९८.०४।।	वेव्हारा सन्निधी पुंडलिक लोभा । विठा म्हणे उभा तेणें केला
६४८	।।ना.गा.कु.०९९.०१।।	उभ्या धरणें आपण बैसला । म्हणोनी भला भला वेव्हारू हा
६४९	।।ना.गा.कु.०९९.०२।।	आमुच्या वेव्हारीं साक्ष हा एकु। पुंडलिकें लोकु उद्धरिला
६५०	।।ना.गा.कु.०९९.०३।।	नाहीं तरी वेव्हारू अवघाच खोटा । पुंडलिकाचे चोहटा उभा असे

६५१	।।ना.गा.कु.०९९.०४।।	ऐसें सात पांच वेव्हारीं बुडविले येणें । विठा म्हणे धरणें जीवीं पाय तुझे
६५२	।।ना.गा.कु.१००.०१।।	मी तुझा अंकिला अगा पंढरिनाथा । ब्रीद आपुलें आतां साच करी
६५३	।।ना.गा.कु.१००.०२।।	पतितपावन ऐसें बोलती पुराणें । तारियेले हीन अनंत याती
६५४	।।ना.गा.कु.१००.०३।।	म्हणोनि ब्रीदाचा तोडर तुझ्या पायीं । गर्जताती घाई वेदश्रुती
६५५	।।ना.गा.कु.१००.०४।।	विठा म्हणे मज देई चरणसेवा । आणिक केशवा न मागें कांहीं
६५६	।।ना.गा.कु.१०१.०१।।	तीर्थे तपें व्रतें देवातें जोडिलें । तें नामदेवासी दिधलें प्रेमसुख
६५७	।।ना.गा.कु.१०१.०२।।	ऐक्यसुख परब्रह्म साधिलें । यश जें जोडिलें त्रिभुवनींचें
६५८	।।ना.गा.कु.१०१.०३।।	धन्य तुझें नाम धन्य तुझें नाम । धन्य देवा प्रेम तुझें पायीं
६५९	।।ना.गा.कु.१०१.०४।।	नामा गोतामाजीं पायाळू जन्मला । देव भावें आला भूमंडळीं
६६०	।।ना.गा.कु.१०१.०५।।	स्वर्गीचें ठेवणें उमगिलें तेणें । केशवनाम नाणें अगणित
६६१	।।ना.गा.कु.१०१.०६।।	नेत्रीं लेईला भक्तीचें अंजन । उमगिलें निधान नामनाणें
६६२	।।ना.गा.कु.१०१.०७।।	विठा म्हणे देवा तें प्रेम पायीं । न मागतां देईं केशिराजा
६६३	।।ना.गा.कु.१०२.०१।।	भिऊनियां निघे समर्थाचे पाठी । वैरियाची भेटी न करी तया
६६४	।।ना.गा.कु.१०२.०२।।	तैसा तुज आलों शरण केशवें। मज त्वां राखावें चरणांजळी
६६५	।।ना.गा.कु.१०२.०३।।	न करा उदास न राखा अभिमान । माझें आगमन विचारी कां
६६६	।।ना.गा.कु.१०२.०४।।	तुझें जें होईल तेंची मी करीन । सेवा मी मागेन अहीर्णिसी
६६७	।।ना.गा.कु.१०२.०५।।	अविद्या अपार संचली हे देवा । याचा मज कुढावा नाहीं कोणी
६६८	।।ना.गा.कु.१०२.०६।।	देवा मज आतां नको गर्भवास । विठा विष्णुदास विनवीतसे
६६९	।।ना.गा.कु.१०३.०१।।	दासीं देवा अनुसरावें । कां आणिकां शरण जावें
६७०	।।ना.गा.कु.१०३.०२।।	लाभालाभ जेथींचा तेथें । श्रम अन्यथा तो व्यर्थ
६७१	।।ना.गा.कु.१०३.०३।।	पुण्योदक भागीरथी । नेदी चातकाची तृप्ती
६७२	।।ना.गा.कु.१०३.०४।।	सेवित स्तवितां चकोरा । काय वर्षे अमृतधारा
६७३	।।ना.गा.कु.१०३.०५।।	कासवीविण कोण बाळा । पाळी निज दृष्टी स्नेहाळा
६७४	।।ना.गा.कु.१०३.०६।।	स्वामीचिया मनोभावा । करणें ते परम सेवा
६७५	।।ना.गा.कु.१०३.०७।।	दास विठा म्हणे मीन । कैसा वांचे उदकेविण
६७६	।।ना.गा.कु.१०४.०१।।	घेतां देतां तूं तिहीं लोकीं उदार । माझा कां अव्हेर केला बापा

६७७	।।ना.गा.कु१०४.०२।।	तुझी सेवा देईं तुझी सेवा देईं। तुझी सेवा देईं श्रीविठ्ठला
६७८	।।ना.गा.कु१०४.०३।।	विठा म्हणे केशवा नको हा संसार । तुझे चरणीं अभ्यंतर ध्यान देईं
६७९	।।ना.गा.कु१०५.०१।।	कीर्तनाचा ध्वनि पडला माझ्या कानीं । जाईन लोटांगणीं तेथवरी
६८०	।।ना.गा.कु१०५.०२।।	माझें सुख तें पहा वैष्णवजन । तयांची दर्शनें कैं होतील
६८१	।।ना.गा.कु१०५.०३।।	उभ्या गाती आणि कीर्तन ऐकती । हृदयीं आळविती केशीराज
६८२	।।ना.गा.कु१०५.०४।।	ऐसीयाचे संगतीं होता बाप माझा । म्हणतसे राजा विठा नामयाचा
६८३	।।ना.गा.कु१०६.०१।।	विश्वंभरा तुझें नाम गा दुर्लभ । परी केलें सुलभ नामदेवें
६८४	।।ना.गा.कु१०६.०२।।	नामाची सांगडी लावूनिया कासे। नामदेवें कैसें उतरिलें
६८५	।।ना.गा.कु१०६.०३।।	नाम मज देई आणिक न मागो काई । प्रेम तुझे पायीं असों द्यावें
६८६	।।ना.गा.कु१०६.०४।।	पतितपावना देवकिनंदना । हरि नारायणा पद्मनाभा
६८७	।।ना.गा.कु१०६.०५।।	मुखीं तुझें नाम आवडी प्रेमाची । मग वैकुंठीची चाड नाहीं
६८८	।।ना.गा.कु१०६.०६।।	सुखाच्या सागरा केशवा उदारा । तो आम्हां सोयरा जिवलगू
६८९	।।ना.गा.कु१०६.०७।।	द्यावा प्रेमसौरसु नामामृतरसु । विठा विष्णुदासु विनवितसे
६९०	।।ना.गा.कु१०७.०१।।	माय वेल्हाळी वेल्हाळी । ब्रह्मरसा पान्हावली
६९१	।।ना.गा.कु१०७.०२।।	दोहणार चवघेजण । धार सुटेना अझुन
६९२	।।ना.गा.कु१०७.०३।।	साहा लागले कासेसी । अठरा करिती निदिध्यासी
६९३	।।ना.गा.कु१०७.०४।।	न कळे ब्रह्मादिकां वाटा । म्हणे नामयाचा विठा
६९४	।।ना.गा.कु१०८.०१।।	आनंदें नाचत पंढरीसी जाऊं । गीतीं गुण गाऊं विठोबाचे
६९५	।।ना.गा.कु१०८.०२।।	पंढरी पावन पुण्यभूमि जाणें । विठ्ठलदर्शनें दोष जाती
६९६	।।ना.गा.कु१०८.०३।।	आनंदें हो प्रेमें नाचों महाद्वारीं । आठवूं अंतरीं घडोघडी
६९७	।।ना.गा.कु१०८.०४।।	आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । घोष हरिनामाचा सदा वाचे
६९८	।।ना.गा.कु१०८.०५।।	विठा नामयाचा चरणीं जाला लीन । सांपडलें निधान विटेवरी
६९९	।।ना.गा.कु१०९.०१।।	विठोबाचे बहु उपकार शिरीं । चुकविली फेरी चौऱ्यांशीची
७००	।।ना.गा.कु१०९.०२।।	भ्रमणा दुःखाच्या बहुत वेदना। म्हणोनि नारायणा शरण आलों
७०१	।।ना.गा.कु१०९.०३।।	अनाथाच्या नाथा तूं दीनाचा गोसावी । तोडर तुझ्या पायीं शोभे देवा
७०२	।।ना.गा.कु१०९.०४।।	कर्ता करविता सर्व तुझी सत्ता । विश्वाचा चाळिता चित्तवृत्ती

७०३	।।ना.गा.कु१०९.०५।।	विठा म्हणे नाम स्मरे त्याचे मुखीं । बहु केलें सुखी शरणागतें
७०४	।।ना.गा.कु११०.०१।।	पतितपावन ऐकिलासे कानीं । म्हणोनी चक्रपाणि शरण आलों
७०५	।।ना.गा.कु११०.०२।।	जपतप नेणें मूढ मतिहीन। बोबडें गाईन नाम तुझें
७०६	।।ना.गा.कु११०.०३।।	मग कृपाळुवा जी वोळला संपूर्ण । ओलावलें मन भक्तिबोधें
७०७	।।ना.गा.कु११०.०४।।	विठा म्हणे पूर्वपुण्य कांहीं होतें । तरीच पंढरीनाथें अंगिकारिलें
७०८	।।ना.गा.कु१११.०१।।	ऐसें सुख कोठें आहे । मुक्ति मागोन करिसी काये
७०९	।।ना.गा.कु१११.०२।।	सांडोनी पंढरीची वारी । मोक्ष मागे तो भिकारी
७१०	।।ना.गा.कु१११.०३।।	सांडोनी वाळवंट । कां बा इच्छिसी वैकुंठ
७११	।।ना.गा.कु१११.०४।।	मुखीं कवळ काल्याचे । ऐसें वैकुंठीं बा कैचें
७१२	।।ना.गा.कु१११.०५।।	नामयाचा विठा खेळे । बाप नामची माझें भोळें
७१३	।।ना.गा.कु११२.०१।।	धरोनी हनुवटी । मेळवीन दृष्टादृष्टी
७१४	।।ना.गा.कु११२.०२।।	म्हणे मी ऐसाचि पाहीन । चरण धरोनी राहीन
७१५	।।ना.गा.कु११२.०३।।	जेवी कमळणी दिनकरा । चातका वरुषे जळधारा
७१६	।।ना.गा.कु११२.०४।।	बाळक जननी ये भावीं । चकोर चंद्रातें आळवी
७१७	।।ना.गा.कु११२.०५।।	कृपणाचें ठेविलें धन । तेथुनी न निघे त्याचें मन
७१८	।।ना.गा.कु११२.०६।।	विठा विनवी अनुसंधानें । तुज असतां मज काय उणें
७१९	।।ना.गा.कु११३.०१।।	नामयाचे वंशीं मैंद जन्मला । मार्ग हा पाडिला वैकुंठींचा
७२०	।।ना.गा.कु११३.०२।।	सतरावीचे पाश घेऊनियां हातीं । वाट दिवसरातीं पाडीतसे
७२१	।।ना.गा.कु११३.०३।।	मैंदाच्या हाता आला सावकार । भांडारीं कुबेर घरीं ज्याचे
७२२	।।ना.गा.कु११३.०४।।	नामयाचा विठा सत्य हा मैंद । भुलवुनी गोविंद म्हणवितसे
७२३	।।ना.गा.कु११४.०१।।	नामयाचे वंशीं जन्मलों लबाड । साधिलें घबाड विटेवरी
७२४	।।ना.गा.कु११४.०२।।	प्रपंचासी आम्ही सोडिलें उदक । वैकुंठनायक आप्त केला
७२५	।।ना.गा.कु११४.०३।।	लौकिकाची लाज निश्चयें सोडिली । दृढ मिठी दिली विठोपायीं
७२६	।।ना.गा.कु११४.०४।।	लबाड म्हणती निर्माण पैं जालें । तेथें बुडविलें मीतूंपण
७२७	।।ना.गा.कु११४.०५।।	नामयाचा विठा सत्याचा लबाड । प्रपंच काबाड ब्रह्म केलें
७२८	।।ना.गा.कु११५.०१।।	नामयाचे वंशीं जन्मा आलें सुणें । वडिलाचें ठेवणें प्राप्त जालें

७२९	।।ना.गा.कु११५.०२।।	संतसज्जनांचें राखितसें द्वार । सुणें सारासार म्हणती मज
७३०	।।ना.गा.कु११५.०३।।	प्रपंच थोरला घालोनि आसन । आवडे पैं ध्यान विठोबाचें
७३१	।।ना.गा.कु११५.०४।।	गुरुगुरु ऐसा शब्द माझा पाड । घातलें कवाड यमलोकीं
७३२	।।ना.गा.कु११५.०५।।	नामयाचा विठा सुणें सुणें एका । पूजिल्या निष्टंका परब्रह्म
७३३	।।ना.गा.कु११६.०१।।	मरण हें पेरणें जन्म हें उगवणें । हे मायेची खूण जाणीतली
७३४	।।ना.गा.कु११६.०२।।	सीणलो हो भारी बहु येरझारें । संग तुझा पुरे नारायेणा
७३५	।।ना.गा.कु११६.०३।।	तूं तरी न मरें मी तरी न मरें । भक्ति हे संचरे हाचि लाभू
७३६	।।ना.गा.कु११६.०४।।	विठा म्हणे केशवा ठाईंचा मी नेणें । गर्भवास भोगणें तुझी लाज
७३७	।।ना.गा.कु११७.०१।।	वैकुंठनायका आनंदपददायका । यादवकुळटिळका केशीराजा
७३८	।।ना.गा.कु११७.०२।।	संसारतारका भक्तजनपाळका । यादवकुळटिळका केशीराजा
७३९	।।ना.गा.कु११७.०३।।	भवमुक्तिदायका गोपीमनरंजका । यादवकुळटिळका केशीराजा
७४०	।।ना.गा.कु११७.०४।।	विठ्याचा स्वामी भक्तप्रेम सुखा । यादवकुळटिळका केशीराजा
७४१	।।ना.गा.कु११८.०१।।	एक होतें तें द्वैत पैं जालें । एक पाहतां द्वैत कैचें उरलें
७४२	।।ना.गा.कु११८.०२।।	द्वैताचा भास मृगजळीं दिसे । पाहूं गेलें तेथें भास भासे
७४३	।।ना.गा.कु११८.०३।।	चहूंचें बोलणें सहाची नेणीव । अठराची जाणीव कैंची तेथें
७४४	।।ना.गा.कु११८.०४।।	नागरीचा भाव विठोबाचा दिसे । परत्रिचें पिसें लागुनी ठेलें
७४५	।।ना.गा.कु११८.०५।।	नामयाचा विठा नामीं विनटला । सर्वस्व हरपला देहभाव
७४६	।।ना.गा.कु११९.०१।।	देहसमय अंतीं इष्टमित्र मिळती । सांभाळा म्हणती मुलें माझी
७४७	।।ना.गा.कु११९.०२।।	स्त्री धनधान्य ते निरवुनी जात। आपुलें स्वहित विचारीना
७४८	।।ना.गा.कु११९.०३।।	गाडे घोडे म्हैसी सेवक आणि दासी । सांडोनियां जासी एकलाची
७४९	।।ना.गा.कु११९.०४।।	मी कोण रे काय कसा आलों येथें । हित कीं अनहित करोनी जातों
७५०	।।ना.गा.कु११९.०५।।	हें तंव सुचेना नाठवे ज्याच्या मना । जुंपिलें ते घाणा चौऱ्यांसीच्या
७५१	।।ना.गा.कु११९.०६।।	विठा म्हणे तया कोण सोडविता । वेगीं पंढरिनाथा शरण जावें
७५२	।।ना.गा.कु१२०.०१।।	माळा मुद्रा सोंग घेऊनि होती संत । सदा विषयांत चित्त त्यांचें
७५३	।।ना.गा.कु१२०.०२।।	पोटासाठीं एक घेऊनियां वेष। ठकविती देश रांडापोरें
७५४	।।ना.गा.कु१२०.०३।।	पाषाण बांधोनी नदीये निघाला । सांगा कोण गेला पैलतीरा

७५५	।।ना.गा.कु१२०.०४।।	ब्राह्मणाचे परी मैंद वेष धरी । घालावया करीं फांसे जैसे
७५६	।।ना.गा.कु१२०.०५।।	विठा म्हणे संत न म्हणा तयासी । जाती नरकासी अध:पाता
७५७	।।ना.गा.कु१२१.०१।।	उदर भरावया घेऊनियां सोंग । घरोघरीं बोंब उपदेशाची
७५८	।।ना.गा.कु१२१.०२।।	आपणां कळेना लोकां सांगे ज्ञान। धरूनियां ध्यान बक जैसा
७५९	।।ना.गा.कु१२१.०३।।	आपण बुडाले आणिकां बुडविती । हात धरूनीयां जाती यमलोका
७६०	।।ना.गा.कु१२१.०४।।	दुरी पंथ जाणे तया यमपुरी । पापाची शिदोरी बांधोनियां
७६१	।।ना.गा.कु१२१.०५।।	विठा म्हणे काय करूं त्याच्या कपाळा । पापाचा कंटाळा न धरिती
७६२	।।ना.गा.कु१२२.०१।।	मांजराचे डोळे गेले । उंदीर धराया तळमळे
७६३	।।ना.गा.कु१२२.०२।।	तैसा नव्हे रे संन्यास । धांवे विषयावरी हव्यास
७६४	।।ना.गा.कु१२२.०३।।	वेश्या जाली पट्टराणी । विस्मरे ना पूर्वील करणी
७६५	।।ना.गा.कु१२२.०४।।	सर्प प्रतिवर्षी पालटे । परि अहंकार न पालटे
७६६	।।ना.गा.कु१२२.०५।।	पहिलें पोशिलें मर्कटा। कोणें शिकविल्या चेष्टा
७६७	।।ना.गा.कु१२२.०६।।	म्हणे नामयाचा विठा । वज्र लागो या लल्लाटा
७६८	।।ना.गा.कु१२३.०१।।	कामधेनु गाई घालोनी बाहेरी । ताक घरोघरीं मागतसे
७६९	।।ना.गा.कु१२३.०२।।	कल्पतरु वृक्ष असे ज्याचे घरीं । तो कां दारोदारीं भीक मागे
७७०	।।ना.गा.कु१२३.०३।।	ऋद्धि आणि सिद्धि विठोबाच्या दासी । तया हृषिकेशी शरण जावें
७७१	।।ना.गा.कु१२३.०४।।	इंद्र आणि चंद्र विठोबाचे किंकर। देव सुरवर ध्याती ज्यातें
७७२	।।ना.गा.कु१२३.०५।।	राव आणि रंक विठोबाचे मागते । ते काय रे तूं तें देती बापा
७७३	।।ना.गा.कु१२३.०६।।	ऐसा कोण आहे सर्व पुरविता। एका भगवंतावांचोनियां
७७४	।।ना.गा.कु१२३.०७।।	मुखीं नाम असे पुण्य ज्या पदरीं। कळीकाळावरी सत्ता त्याची
७७५	।।ना.गा.कु१२३.०८।।	विठा म्हणे शरण जाय हृषिकेशी । मग निजसुखासी पावसील
७७६	।।ना.गा.कु१२४.०१।।	जातिज्ञान नाहीं मतिज्ञान पार । फुंजे दंभाकार लौकिकांत
७७७	।।ना.गा.कु१२४.०२।।	तेथें माझ्या मना नव्हे समाधान। न पाविजे खूण संतावीण
७७८	।।ना.गा.कु१२४.०३।।	संत तेचि जाणा शांत ज्यांचें मन । अणूचें प्रमाण दूजें नाहीं
७७९	।।ना.गा.कु१२४.०४।।	विठा म्हणे तेथें स्थिरावलें मन । जालें समाधान त्याचे संगें
७८०	।।ना.गा.कु१२५.०१।।	अनंत अपरंपार नाम हें सधर । नाम सुखसागर अमृत लहरी

७८१	।।ना.गा.कु१२५.०२।।	नाम हेचि तारूं नाम हेंचि तारक। भवमूळ छेदक नाम तुझें
७८२	।।ना.गा.कु१२५.०३।।	नाम हेंचि जीवन नाम हें निधान । नाम हें कारण आनंदाचें
७८३	।।ना.गा.कु१२५.०४।।	नाम हे सांठा तोचि वैकुंठीचा मोठा । म्हणतसे विठा नामयाचा
७८४	।।ना.गा.कु१२६.०१।।	नाम तारी पतितसी । तें कां अव्हेरी भक्तांसी
७८५	।।ना.गा.कु१२६.०२।।	प्रेमळ देवाचे लडिवाळ । करी निजांगें प्रतिपाळ
७८६	।।ना.गा.कु१२६.०३।।	सेवाऋणें वागवी भार । जन्मोजन्मींचा दातार
७८७	।।ना.गा.कु१२६.०४।।	स्वामी स्वयें अंगिकारी । वोळगा कांहो दारोदारीं
७८८	।।ना.गा.कु१२६.०५।।	निष्ठुर नव्हे कोणे काळीं । कृपाकटाक्षें कुरवाळी
७८९	।।ना.गा.कु१२६.०६।।	दास विठा म्हणे वेगें । यात्रे जावें माझ्या संगें
७९०	।।ना.गा.कु१२७.०१।।	हरि म्हणा हरि म्हणा अहो जन । आणिक बोलाल तरी विठ्ठलाची आण
७९१	।।ना.गा.कु१२७.०२।।	अहिल्या पाषाण अजामेळ कुळहीन। उद्धरिला दर्शनें वाल्मिक जाण
७९२	।।ना.गा.कु१२७.०३।।	नामयाचा विठा संतचरणीं ठेवोनि माथा । कीर्तनेंवीण वृथा नको गोष्टी
७९३	।।ना.गा.कु१२८.०१।।	धर्म अर्थ मोक्ष काम । हाकारितां रामराम
७९४	।।ना.गा.कु१२८.०२।।	जें जें आवडे मनासी । त्यानें जावें पंढरीसी
७९५	।।ना.गा.कु१२८.०३।।	चला आनंदें कौतुकें । पेठ भरली पुंडलिकें
७९६	।।ना.गा.कु१२८.०४।।	न चले कोणाची थोरी । राया रंका एकी सरी
७९७	।।ना.गा.कु१२८.०५।।	सांडोनियां अहंभाव । हाचि करावा व्यवसाव
७९८	।।ना.गा.कु१२८.०६।।	विठा म्हणे विष्णुदास । आणिक न लगे सायास
७९९	।।ना.गा.कु१२९.०१।।	बरवें बरवें वाळवंट । काय इच्छिसी वैकुंठ
८००	।।ना.गा.कु१२९.०२।।	ऐसें सुख कोठें आहे । मुक्ति मागुनी करीसी काये
८०१	।।ना.गा.कु१२९.०३।।	म्हणे नामयाचा विठा । बापा नको जाऊं वैकुंठा
८०२	।।ना.गा.कु१३०.०१।।	देखुनी पंढरीच्या सुखा । मोक्षपद आलें फुका
८०३	।।ना.गा.कु१३०.०२।।	अवघें विठ्ठलचि जालें । येणें पुंडलिकें केलें
८०४	।।ना.गा.कु१३०.०३।।	ऋद्धि सिद्धि पंढरपुरीं । होवोनी वोळती कामारी
८०५	।।ना.गा.कु१३०.०४।।	मुक्ति वागती अंगणीं । घरोघरीं वाहे पाणी
८०६	।।ना.गा.कु१३०.०५।।	तीर्थ चिंतवणी करिती । पुढें आमुची कोण गती

८०७	।।ना.गा.कु१३०.०६।।	आला कळिकाळा त्रासु । विठा म्हणे विष्णुदासु
८०८	।।ना.गा.कु१३१.०१।।	बहुतां पुण्याचे कष्ट । त्यासी प्राप्त हें वैकुंठ
८०९	।।ना.गा.कु१३१.०२।।	तैसी नोहे ही पंढरी । पतित पापियातें तारी
८१०	।।ना.गा.कु१३१.०३।।	बहुता तपाचे प्रत्यक्ष । त्यासी अपकारी मोक्ष
८११	।।ना.गा.कु१३१.०४।।	जेणें केलीं तपतीर्थे । तोचि आवडे मुक्तीतें
८१२	।।ना.गा.कु१३१.०५।।	देह यासी नानाविधि । त्यासी प्राप्त होय सिद्धि
८१३	।।ना.गा.कु१३१.०६।।	विठा म्हणे नामघोष । पळ काढील महादोष
८१४	।।ना.गा.कु१३२.०१।।	ज्यासी नावडे पंढरी । तोचि वसेल अघोरीं
८१५	।।ना.गा.कु१३२.०२।।	त्यासी जाची यमदूत । सकळ पूर्वजांसहित
८१६	।।ना.गा.कु१३२.०३।।	जया नावडे हरिनाम । तया कुंभपाकीं धाम
८१७	।।ना.गा.कु१३२.०४।।	जया नावडती संत । ते चालती यमपंथ
८१८	।।ना.गा.कु१३२.०५।।	जया नावडे भीमरथी । तेचि अघोरीं पडती
८१९	।।ना.गा.कु१३२.०६।।	या बोलाचा धरी विश्वास । विठा म्हणे विष्णुदास
८२०	।।ना.गा.कु१३३.०१।।	हरिकथा ऐकतां संसार आठविती । तयाच्या सुकृति अवघा नाश
८२१	।।ना.गा.कु१३३.०२।।	निश्चित होऊनि ऐकतां श्रवणीं । यमाची करणी न लगे कांहीं
८२२	।।ना.गा.कु१३३.०३।।	आतां रामकृष्ण म्हणे करे वाचा । कळिकाळ मोचा वाहतील
८२३	।।ना.गा.कु१३३.०४।।	विठा म्हणे संतीं अवधान द्यावे । हृदयीं धरावें केशव नाम
८२४	।।ना.गा.कु१३४.०१।।	काय गाणीव काय जाणीव । काय शहाणीव कीर्तनाची
८२५	।।ना.गा.कु१३४.०२।।	थाक डोळे तोडिलें मोडिले । लोकां मानवलें बरें गातो
८२६	।।ना.गा.कु१३४.०३।।	हरिचें नाम तूं नेणसी । वायां कीर्तनीं उभा ठाकसी
८२७	।।ना.गा.कु१३४.०४।।	हरीचें नाम तुम्ही गा रे प्रेमें । विठा म्हणे माझ्या बापाच्या नांवें
८२८	।।ना.गा.कु१३५.०१।।	जैसा आंबा वर्षत पाडी । तैसी धरी गोडी कीर्तनीं नाचे
८२९	।।ना.गा.कु१३५.०२।।	न करी घातमात न लावी वेळू । तेणें हा गोपाळू अंतरला
८३०	।।ना.गा.कु१३५.०३।।	दुधावरील साय मधेसी गोडी । तैसी धरी आवडी रामनामीं
८३१	।।ना.गा.कु१३५.०४।।	जतीचा साटा तो वैष्णव लाटा । म्हणतसे विठा नामयाचा
८३२	।।ना.गा.कु१३६.०१।।	यात्रे बोलवितो हरी । कांहो नवजा पंढरी

८३३	।।ना.गा.कु१३६.०२।।	विठोबा कृपेचा कोंवळा । बहु भक्तांचा कळवळा
८३४	।।ना.गा.कु१३६.०३।।	भक्त आठवती चित्तीं । देवा वाटे परम खंती
८३५	।।ना.गा.कु१३६.०४।।	देव अवज्ञा अनुचित । पृथक सत्ता आत्मघात
८३६	।।ना.गा.कु१३६.०५।।	ऋण वारी भगवंत । दुबळा नव्हे लक्ष्मीकांत
८३७	।।ना.गा.कु१३६.०६।।	दास विठा म्हणे त्वरा । यात्रा पंढरीची करा
८३८	।।ना.गा.कु१३७.०१।।	द्रौपदीचें थालीपात्र । त्यांत कैचें शाखापत्र
८३९	।।ना.गा.कु१३७.०२।।	माव याची अभिन्नव । वाव मानसीं उपाव
८४०	।।ना.गा.कु१३७.०३।।	जंव लाधला तो आपण । केलें तृप्त त्रिभुवन
८४१	।।ना.गा.कु१३७.०४।।	सेवा घेऊनी सारी काम । अंगें चैतन्य निष्काम
८४२	।।ना.गा.कु१३७.०५।।	याच्या छळें आकर्षिला । बळिचा द्वारपाळ जाला
८४३	।।ना.गा.कु१३७.०६।।	भक्तियोगें द्वेषभयें । वेध लावुनी सन्मुख होये
८४४	।।ना.गा.कु१३७.०७।।	दोहीं बाहीं आपण देव । काय नेणां पंढरीराव
८४५	।।ना.गा.कु१३७.०८।।	दास विठा म्हणे धंदा । कृपा देवाची संपादा
८४६	।।ना.गा.कु१३८.०१।।	कृष्ण गौळियाचें लोणी चोरी । तंव अवचिता शेंडी सांपडली हरी । घेवोनि आलिया बाहेरी । तंव यशोदे वोसंगा
८४७	।।ना.गा.कु१३८.०२।।	चाकाटलिया गौळणी । देवो विसरल्या गाऱ्हाणीं । लाजे मौन्य धरोनि । अवलोकिती गोविंदा
८४८	।।ना.गा.कु१३८.०३।।	आम्हां अवघियांपासी असे । पैल यशोदा वोसंगा दिसे । हें स्वप्न कीं साच असे । म्हणती मानसें वेडावलीं
८४९	।।ना.गा.कु१३८.०४।।	ऐशा अनेक परीच्या वेदश्रुती । वाचे वर्णावया न येती । विठा विनवी विष्णुदासा प्रती । ऐसा यशोदेचा कान्हया
८५०	।।ना.गा.कु१३९.०१।।	त्रैलोक्या माझारीं एक विठाबाई सुंदरी हो । पुंडलिकाकारणें तिष्ठत भीमातीरीं हो
८५१	।।ना.गा.कु१३९.०२।।	उदो बोला उदो बोला विठाबाई माऊलीचा
८५२	।।ना.गा.कु१३९.०३।।	मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवना माझारीं हो । चौक साधियला नामीं कळस ठेविला वरी हो
८५३	।।ना.गा.कु१३९.०४।।	गोंधळ्या माझारीं एक पुंडलिक नेटका हो । घातला गोंधळ विठाई दाविली तिहीं लोकां हो
८५४	।।ना.गा.कु१३९.०५।।	गोंधळ घालीत गेली कैसी रावणाच्या घरा हो ।शरणागत रक्षिलें वधियलें दशशिरा हो
८५५	।।ना.गा.कु१३९.०६।।	आषाढी कार्तिकी तुझा गोंधळ वाळवंटीं हो । येती सनकादिक गरुडटके यांची दाटी हो
८५६	।।ना.गा.कु१३९.०७।।	करुनी गोपाळकाला गोंधळ घाली वेणूनादीं हो । गोपिकांसहीत सर्व गोपाळांची मांदी हो
८५७	।।ना.गा.कु१३९.०८।।	नामयाचा विठा कैसा गोंधळी नेटका हो । वडिलांची विठाई कुलस्वामिनी अंबिका हो
८५८	।।ना.गा.कु१४०.०१।।	गर्भवास ऐसा मजसी भिवविती । गाई बैसविती व्याघ्रापुढें

८५९	।।ना.गा.कु.१४०.०२।।	नको हा संसार नको हा संसार। नको हा संसार देवराया
८६०	।।ना.गा.कु.१४०.०३।।	कोपें काळसर्पे धरिलें अजेसी । तेणें कासाविसी सांगों नेणें
८६१	।।ना.गा.कु.१४०.०४।।	विठा म्हणे तुझें केशवा मी बाळ । ऐसा तूं कृपाळ मायबापा
८६२	।।ना.गा.कु.१४१.०१।।	संसारसागर भरला दुरुस्त विवेकी पोहणार विरळा संत
८६३	।।ना.गा.कु.१४१.०२।।	कामाचिया लाटा अंगीं आदळती । नेणो गेले किती वाहुनियां
८६४	।।ना.गा.कु.१४१.०३।।	भ्रम हा भोंवरा फिरवी गरगरा । एक पडिले घरा चौऱ्यांशीच्या
८६५	।।ना.गा.कु.१४१.०४।।	तेथें नावाड्या विठ्ठल भवसिंधू तारूं । भक्तां पैलपारू उतरीतो
८६६	।।ना.गा.कु.१४१.०५।।	विठा म्हणे नाम स्मरा श्रीरामाचें । भय कळिकाळाचें नाहीं तुम्हां
८६७	।।ना.गा.कु.१४२.०१।।	पूर्वसंबंधें मज दिधलें बापानें । शेखीं काय जाणें कैसें जालें
८६८	।।ना.गा.कु.१४२.०२।।	प्रसुतीलागीं मज आणिलें कल्याणा। अंतरला राणा पंढरीचा
८६९	।।ना.गा.कु.१४२.०३।।	मुकुंदें मजशीं थोर केला गोवा । लोटियलें भवनदीमाजी
८७०	।।ना.गा.कु.१४२.०४।।	ऐकिला वृत्तांत सर्व जालें गुप्त । माझेंचि संचित खोटें कैसें
८७१	।।ना.गा.कु.१४२.०५।।	द्वादशबहात्तरीं कृष्ण त्रयोदशी । आषाढ हे मासीं देवद्वारीं
८७२	।।ना.गा.कु.१४२.०६।।	सर्वांनीं हा देह अर्पिला विठ्ठलीं । मज कां ठेविलें पापिणीसी
८७३	।।ना.गा.कु.१४२.०७।।	लाडाई म्हणे देह अर्पीन विठ्ठला । म्हणोनी आदरिला प्राणायाम
८७४	।।ना.गा.कु.१४३.०१।।	अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ। म्हणवोनी सांभाळ करी माझा
८७५	।।ना.गा.कु.१४३.०२।।	तुज ऐसा देव नाहीं त्रिभुवनीं। म्हणवोनी चरणीं विनटलें
८७६	।।ना.गा.कु.१४३.०३।।	बापा विठ्ठलराया करीं कृपादान। सांभाळी वचन आपुले तें
८७७	।।ना.गा.कु.१४३.०४।।	लाडाई म्हणे देव भेट देई वेगीं। ब्रीद तुझें जनीं दीनानाथ
८७८	।।ना.गा.कु.१४४.०१।।	शून्य साकारलें साध्यांत दिसे । आकार नासे तेथें शून्याकार दिसे
८७९	।।ना.गा.कु.१४४.०२।।	शून्य तें सार शून्य तें सार । शून्यीं चराचर सामावलें
८८०	।।ना.गा.कु.१४४.०३।।	नामयाची बहिण आऊबाई शून्यीं सामावली । विठ्ठलीं राहिली चित्तवृत्ती
८८१	।।ना.गा.कु.१४५.०१।।	तारी मज आतां रखुमाईच्या कांता । पंढरीच्या नाथा मायबापा
८८२	।।ना.गा.कु.१४५.०२।।	अनाथाचा नाथ ऐकियेलें कानीं । सनकादिक मुनी बोलताती
८८३	।।ना.गा.कु.१४५.०३।।	त्याचिया वचनाचा पावोनी विश्वास । धरिली तुझी कांस पांडुरंगा
८८४	।।ना.गा.कु.१४५.०४।।	नामयाची लेकी लिंबाई म्हणे देवा । कृपाळू केशवा सांभाळावें

१	अंकिला	।।ना.गा.कु१००.०१।।	मी तुझा अंकिला अगा पंढरिनाथा । ब्रीद आपुलें आतां साच करी
२	अंकीं	।।ना.गा.कु०२९.०३।।	आमुचा अंकीं लागताती पुराणीं । नामयाचे ऋणीं बांधलासी
३	अंगणीं	।।ना.गा.कु१३०.०४।।	मुक्ति वागती अंगणीं । घरोघरीं वाहे पाणी
४	अंगद	।।ना.गा.कु०१९.०२।।	त्रेतायुगीं नामा अंगद कपि असे। रामचंद्रें त्यासी आलिंगिला
५	अंगलग	।।ना.गा.कु००९.०८।।	मी तुमचा सेवकु अंगलग पाईकु । मज आहे उपदेशु तुमचाच कीं
६	अंगसंगें	।।ना.गा.कु०२३.०३।।	जाय कडींयेसी नेघे । परी तिच्या अंगसंगें
७	अंगिकारिलें	।।ना.गा.कु११०.०४।।	विठा म्हणे पूर्वपुण्य कांहीं होतें । तरीच पंढरीनाथें अंगिकारिलें
८	अंगिकारी	।।ना.गा.कु०६७.०५।।	आम्हांसी घातलें तुझीये आभारीं । विठा अंगिकारी नारायणा
९	अंगिकारी	।।ना.गा.कु१२६.०४।।	स्वामी स्वयें अंगिकारी । वोळगा कांहो दारोदारीं
१०	अंगीं	।।ना.गा.कु१४१.०२।।	कामाचिया लाटा अंगीं आदळती । नेणो गेले किती वाहुनियां
११	अंगें	।।ना.गा.कु१३७.०४।।	सेवा घेऊनी सारी काम । अंगें चैतन्य निष्काम
१२	अंघोळीसी	।।ना.गा.कु०४७.०४।।	पुसतां तो नामा गेला अंघोळीसी । सांगे राजाईसी केशवशेट
१३	अंचळ	।।ना.गा.कु००६.०७।।	आणखी एक अवधारी । राउळा येत होते हरि । नामा होता बरोबरी । अंचळ सरसावी रखुमाई
१४	अंजन	।।ना.गा.कु०९०.०६।।	सद्‌गुरू दयाळें लेवविलें अंजन । मज जनार्दन अवघा भासे
१५	अंजन	।।ना.गा.कु१०१.०६।।	नेत्रीं लेईला भक्तीचें अंजन । उमगिलें निधान नामनाणें
१६	अंतकाळीं	।।ना.गा.कु०४९.११।।	अंतकाळीं नामा धरिला हृदयीं । ठेवियेला पायीं गोंदा म्हणे
१७	अंतरंग	।।ना.गा.कु०३३.०१।।	काळा अलोट अभंग । हरिचे दास अंतरंग
१८	अंतरंग	।।ना.गा.कु०६९.०१।।	माझिया बापासी तुझाचि विश्वास । म्हणवी तुझा दास अंतरंग
१९	अंतरला	।।ना.गा.कु१३५.०२।।	न करी घातमात न लावी वेळू । तेणें हा गोपाळू अंतरला
२०	अंतरला	।।ना.गा.कु१४२.०२।।	प्रसुतीलागीं मज आणिलें कल्याणा। अंतरला राणा पंढरीचा
२१	अंतरलें	।।ना.गा.कु००४.०४।।	तयासी आपुले चरणीं रहाविलें । म्यां पूर्वी काय कर्म केलें । त्वां मज वेगळें धरियलें । थितें अंतरलें चरणतीर्थ
२२	अंतरीं	।।ना.गा.कु००७.१०।।	दोघांचा संवाद होतां महाद्वारीं । विस्मय अंतरीं करिती संत
२३	अंतरीं	।।ना.गा.कु००७.२६।।	विस्मय तो करी परसोबा अंतरीं । फिरला माघारीं तेथूनियां
२४	अंतरीं	।।ना.गा.कु०१५.०१।।	तुम्ही गावें तेंचि आम्ही अंतरीं घ्यावें । म्हणोनी स्वभावें भावाभाव नाहीं येथें
२५	अंतरीं	।।ना.गा.कु१०८.०३।।	आनंदें हो प्रेमें नाचों महाद्वारीं । आठवूं अंतरीं घडोघडी
२६	अंतरींचा	।।ना.गा.कु००७.३८।।	तेणें हा झडेल अंतरींचा मळ । दिसेल सकळ ब्रह्मरूप

२७	अंतरींची	।।ना.गा.कु०२७.०६।।	नारा म्हणे माझ्या बापाचें साधन । सांपडली खूण अंतरींची
२८	अंतीं	।।ना.गा.कु११९.०१।।	देहसमय अंतीं इष्टमित्र मिळती । सांभाळा म्हणती मुलें माझी
२९	अंधारीं	।।ना.गा.कु०५९.०७।।	आपुलें म्हणावें अंधारीं ओळखावें । नामप्रेम द्यावें म्हणे विठा
३०	अंबरीं	।।ना.गा.कु०१८.०२।।	ब्रीद दिसतें अंबरीं । गरुड टके याच्या परी
३१	अंबरीं	।।ना.गा.कु०९६.०५।।	पताका झळकती अंबरीं । वैष्णव नाचती गजरीं
३२	अंबिका	।।ना.गा.कु१३९.०८।।	नामयाचा विठा कैसा गोंधळी नेटका हो । वडिलांची विठाई कुलस्वामिनी अंबिका हो
३३	अंश	।।ना.गा.कु०६१.०३।।	तूं आमुचा मुळपुरुष । आम्ही अवघे तुझे अंश
३४	अक्षरांसाठीं	।।ना.गा.कु०३२.०४।।	दोन अक्षरांसाठीं । गणिका घातली वैकुंठीं
३५	अखंड	।।ना.गा.कु००१.०६।।	अखंड वाणी हरिस्मरणीं । सुख विश्रांती कीर्तनीं । खेचर विसोबा म्हणे प्राणी । मनुष्य देह दुर्लभ
३६	अखंड	।।ना.गा.कु००८.०८।।	त्यापासूनि नाम्याची शंका येतसे आम्हां । अखंड परमात्मा जया जवळी
३७	अखंड	।।ना.गा.कु०२७.०३।।	गगनीं असो पैं न येतो मार्तंड । तैसें अखंड करूं ध्यान
३८	अखंड	।।ना.गा.कु०८८.०५।।	जे केशवासी न कळे अखंड दंडे। ऐसीं बोलणीं उदंडें बोलोनी जाती
३९	अखंडित	।।ना.गा.कु०५०.०२।।	आवडला नामा देव विठ्ठलासी। ठेवी चरणापासीं अखंडित
४०	अगणित	।।ना.गा.कु१०१.०५।।	स्वर्गीचें ठेवणें उमगिलें तेणें । केशवनाम नाणें अगणित
४१	अगा	।।ना.गा.कु०९७.०१।।	मी तुझा पोसणा अगा नारायणा । झणीं केविलवाणा दिसों दिसी
४२	अगा	।।ना.गा.कु१००.०१।।	मी तुझा अंकिला अगा पंढरिनाथा । ब्रीद आपुलें आतां साच करी
४३	अग्रेज	।।ना.गा.कु०६१.०१।।	आमुचा बाप अग्रेज तुझा । तूं बा आम्हां होसी आजा
४४	अघटित	।।ना.गा.कु००७.४१।।	संताची करणी असे अघटित । करी दंडवत नामदेव
४५	अघोरीं	।।ना.गा.कु१३२.०१।।	ज्यासी नावडे पंढरी । तोचि वसेल अघोरीं
४६	अघोरीं	।।ना.गा.कु१३२.०५।।	जया नावडे भीमरथी । तेचि अघोरीं पडती
४७	अजामेळ	।।ना.गा.कु१२७.०२।।	अहिल्या पाषाण अजामेळ कुळहीन। उद्धरिला दर्शनें वाल्मिक जाण
४८	अजुनि	।।ना.गा.कु०७६.०१।।	हिंडता श्रमलें बहु श्रम जाला । अजुनि माझी तुला करुणा न ये
४९	अजून	।।ना.गा.कु००७.३७।।	तोचि अहंकार धरिलासी अजून । होई आतां लीन संतापायीं
५०	अजेसी	।।ना.गा.कु१४०.०३।।	कोपें काळसर्पे धरिलें अजेसी । तेणें कासाविसी सांगों नेणें
५१	अझुन	।।ना.गा.कु१०७.०२।।	दोहणार चवघेजण । धार सुटेना अझुन
५२	अझुनि	।।ना.गा.कु००३.०१।।	परसा म्हणे नामयासी । अरे नामदेवा परियेसी । तूं तंव दवडिल्या न जासी । मनीं न लाजसी अझुनि

५३	अझुनी	।।ना.गा.कु००३.०६।।	ऐसा तूं कवटाळिया पाही । तुझे पूर्वज माझे पायीं । मग शंका धरिसी कांहीं । अझुनी तरी विचारी पां
५४	अझुनी	।।ना.गा.कु०३८.०३।।	अझुनी न ये तुज बा करुणा । काय नारायणा करूं आतां
५५	अटक	।।ना.गा.कु०२१.०४।।	काळासी अटक योगीयाचें हीत । परसा भागवत जवळी उभा
५६	अठरा	।।ना.गा.कु१०७.०३।।	साहा लागले कासेसी । अठरा करिती निदिध्यासी
५७	अठराची	।।ना.गा.कु११८.०३।।	चहूंचें बोलणें सहाची नेणीव । अठराची जाणीव कैंची तेथें
५८	अठ्ठाविस	।।ना.गा.कु०५५.०२।।	अठ्ठाविस युगें एकाचें धरणें। तेथें हें मागणें दुसरें कोठें
५९	अडोनिया	।।ना.गा.कु०२१.०२।।	अडोनिया सरा पाहूं या गोपाळ । डोळियां सुकाळ होईल आजी
६०	अणिक	।।ना.गा.कु०३१.०२।।	अणिक नेणों बा साधन । आमचा विषय हरिकीर्तन
६१	अणुमाजीं	।।ना.गा.कु०२०.०१।।	अणुमाजीं राम रेणुमाजीं राम । तृणकाष्टीं राम वर्ततसे
६२	अणूचें	।।ना.गा.कु१२४.०३।।	संत तेचि जाणा शांत ज्यांचें मन । अणूचें प्रमाण दूजें नाहीं
६३	अति	।।ना.गा.कु००९.०१।।	कीर्तनाच्या वेळे अति सप्रेमेची । प्रत्यक्ष हृषिकेशी अवतरले
६४	अतू	।।ना.गा.कु०८६.०२।।	पाय ते अतू पाय ते अतू । पाय ते अतू खेचराचे
६५	अतू	।।ना.गा.कु०८६.०२।।	पाय ते अतू पाय ते अतू । पाय ते अतू खेचराचे
६६	अतू	।।ना.गा.कु०८६.०२।।	पाय ते अतू पाय ते अतू । पाय ते अतू खेचराचे
४००	।।ना.गा.ज.२३८.०१।।	चोखामेळा संत भला । तेणें देव भुलवीला
४०१	।।ना.गा.ज.२३८.०२।।	भक्ति आहे ज्याची मोठी । त्याला पावतो संकटीं
४०२	।।ना.गा.ज.२३८.०३।।	चोख्यामेळ्याची करणी । तेणें देव केला ऋणी
४०३	।।ना.गा.ज.२३८.०४।।	लागा विठ्ठल चरणीं । म्हणे नामयाची जनी
४०४	।।ना.गा.ज.२३९.०१।।	माळियाचा लेक जाला । सेखीं कुर्म्यालागीं गेला
४०५	।।ना.गा.ज.२३९.०२।।	चांभारानें जानव्यासी । काढोन दाविलें भटांसी
४०६	।।ना.गा.ज.२३९.०३।।	तुरका घरीं सेले विणी । म्हणे नामयाची जनी
४०७	।।ना.गा.ज.२४०.०१।।	माझा लोभ नाहीं देवा । तुझी करीं ना मी सेवा
४०८	।।ना.गा.ज.२४०.०२।।	नाहीं अंगीं थोरपण । मिथ्या धरिसी गुमान
४०९	।।ना.गा.ज.२४०.०३।।	रागा येऊनि काय करिसी । तुझें बळ आम्हांपासीं
४१०	।।ना.गा.ज.२४०.०४।।	नाहीं सामर्थ्य तुज हरी । जनी म्हणे धरिला चोरीं
४११	।।ना.गा.ज.२४१.०१।।	द्रौपदीकारण । पाठीराखा नारायण
४१२	।।ना.गा.ज.२४१.०२।।	गोराकुंभाराच्या संगें । चिखल तुडवूं लागे अंगें
४१३	।।ना.गा.ज.२४१.०३।।	कबिराच्या बैसोनी पाठीं । शेला विणितां सांगे गोष्टी
४१४	।।ना.गा.ज.२४१.०४।।	चोख्यामेळ्यासाठीं । ढोरें ओढी जगजेठी
४१५	।।ना.गा.ज.२४१.०५।।	जनीसंगें दळूं लागे । सुरवर म्हणती धन्य भाग्यें
४१६	।।ना.गा.ज.२४२.०१।।	देव भक्ताचा अंकित । कामें त्याची सदा करित

४१७	।।ना.गा.ज.२४२.०२।।	त्याचें पडों नेदी उणें । होय रक्षिता आपण
४१८	।।ना.गा.ज.२४२.०३।।	जनी म्हणे भक्तिभाव । देवदास ऐक्य जीव
४१९	।।ना.गा.ज.२४३.०१।।	बाळे भोळे ठकविसी । तें तंव न चाले आम्हांपाशीं
४२०	।।ना.गा.ज.२४३.०२।।	गर्व धरिसी नामाचा । सोहं सोहं गर्जे वाचा
४२१	।।ना.गा.ज.२४३.०३।।	आशा तृष्णा तुम्हांपाशीं । नाहीं म्हणे जनी दासी
४२२	।।ना.गा.ज.२४४.०१।।	जेवीं जेवीं बा मुरारी । तुज वाढिली शिदोरी
४२३	।।ना.गा.ज.२४४.०२।।	कनकाचे ताटीं । दहीदुधें भरली वाटी
४२४	।।ना.गा.ज.२४४.०३।।	आमुचें ब्रह्म सारंगपाणि । हिंडतसे रानोरानीं
४२५	।।ना.गा.ज.२४४.०४।।	गोपालांचे मेळीं । हरि खेळे चेंडुफळी
४२६	।।ना.गा.ज.२४४.०५।।	तुळसीचे वनीं । उभी राहे दासी जनी
४२७	।।ना.गा.ज.२४५.०१।।	जनी म्हणे पांडुरंगा । माझ्या जीवींच्या जीवलगा । विनविलें सांगा । महिमा साधुसंतांचा
४२८	।।ना.गा.ज.२४५.०२।।	कैसी वसविली पंढरी। काय महिमा भीमातीरीं । पुंडलिकाच्या द्वारीं । कां उभा राहिलासी
४२९	।।ना.गा.ज.२४५.०३।।	कैसा आला हा गोविंद । कैसा जाला वेणुनाद । येउनी नारद । कां राहिला
४३०	।।ना.गा.ज.२४५.०४।।	कृपा करा नारायणा । सांगा अंतरींच्या खुणा । येऊं दे करुणा । दासी जनी विनवितसे
४३१	।।ना.गा.ज.२४६.०२।।	दुर्योधना मारी । पांडवासी रक्षी हरी । पांडव वनवासी जाये । तयापाठीं देव आहे
४३२	।।ना.गा.ज.२४६.०३।।	उणें न पडे तयाचें । काम पुरवी हो मनाचे
४३३	।।ना.गा.ज.२४६.०४।।	जनी म्हणे विदुराच्या । कण्या भक्षी हो प्रीतीच्या
४३४	।।ना.गा.ज.२४७.०१।।	स्कंधीं ऋषि तो वाहिला । बळीनें द्वारपाळ केला
४३५	।।ना.गा.ज.२४७.०२।।	भक्ता आधीन होसी । त्याच्या वचनीं वर्तसी
४३६	।।ना.गा.ज.२४७.०३।।	त्याचे गर्भवास सोसी । कष्टी होतां अंबऋषी
४३७	।।ना.गा.ज.२४७.०४।।	सर्व दु:खासी साहिलें । जनी म्हणे बरवें केलें
४३८	।।ना.गा.ज.२४८.०१।।	भक्तीसाठीं याति नाहीं । नाहीं तयासी ते सोई
४३९	।।ना.गा.ज.२४८.०२।।	रोहिदास तो चांभार । त्याचा करी कारभार
४४०	।।ना.गा.ज.२४८.०३।।	जो कां भक्त यातिहीन । देव करी त्याचा मान
४४१	।।ना.गा.ज.२४८.०४।।	त्यासी भक्ताचा आधार । वाट पाहे निरंतर
४४२	।।ना.गा.ज.२४८.०५।।	जनी म्हणे भक्तासाठीं । विठो सदा गोण्या लोटी

४४३	।।ना.गा.ज.२४९.०१।।	देव तारक तारक । देव दुष्टांसी मारक
४४४	।।ना.गा.ज.२४९.०२।।	गीतेमध्यें आदि अंत । ऐसें बोलतो भगवंत
४४५	।।ना.गा.ज.२४९.०३।।	शत्रुलागीं आधीं मारी । भक्तसंकटीं रक्षी हरी
४४६	।।ना.गा.ज.२४९.०४।।	जनी म्हणे कृपा करी । भाव पाहोन अंतरीं
४४७	।।ना.गा.ज.२५०.०१।।	पांडवाचे घरीं । रात्रंदिवस मुरारी
४४८	।।ना.गा.ज.२५०.०२।।	तैसा सखा नामयाचा । एके ठायीं जेवायाचा
४४९	।।ना.गा.ज.२५०.०३।।	त्याच्या उच्छिष्टाचा ग्रास । जनी हातें उचली त्यास
४५०	।।ना.गा.ज.२५१.०१।।	भूत जालें ऋषि पोटीं । लावियेलें मृगापाठीं
४५१	।।ना.गा.ज.२५१.०२।।	विश्वामित्रा घाला घाली । पोटीं शकुंतला आली
४५२	।।ना.गा.ज.२५१.०३।।	भगांकित केला । इंद्र भूतानें झडपिला
४५३	।।ना.गा.ज.२५१.०४।।	तेंचि झालें हें भारत । म्हणे जनी केली मात
४५४	।।ना.गा.ज.२५२.०१।।	दोहीकडे दोही जाया । मध्यें गोरोबाची शय्या
४५५	।।ना.गा.ज.२५२.०२।।	गोरा निद्रिस्त असतां । कपट करिती त्याच्या कांता
४५६	।।ना.गा.ज.२५२.०३।।	गोरोबाचे दोन्ही हात । आपुल्या हृदयावरी ठेवित
४५७	।।ना.गा.ज.२५२.०४।।	जागा जाला गोरा भक्त । जनी म्हणे त्या निद्रित
४५८	।।ना.गा.ज.२५३.०१।।	अहो द्रौपदीच्या बंधू । तारक देवा कृपासिंधू
४५९	।।ना.गा.ज.२५३.०२।।	पांचाळीसी वस्त्रें देत । पुरवितो जगन्नाथ
४६०	।।ना.गा.ज.२५३.०३।।	जनी म्हणे भाग्यवंत । तिच्या भावाचा अंकित
४६१	।।ना.गा.ज.२५४.०१।।	बाप श्रोतियाचा राजा । कैसी उभारिली ध्वजा
४६२	।।ना.गा.ज.२५४.०२।।	एक जाला परिक्षिती । ऐसे पवाडे गर्जिती
४६३	।।ना.गा.ज.२५४.०३।।	भागवतीं रससुखें । द्रौपदी वाढी सावकाशें
४६४	।।ना.गा.ज.२५४.०४।।	ज्याची ऐकतां गर्जना । कंप काळाचिया मना
४६५	।।ना.गा.ज.२५४.०५।।	सात दिवस वृष्टि जाली । जनी म्हणे मात केली
४६६	।।ना.गा.ज.२५५.०१।।	मांडियेला डाव । कौरवांनीं दुष्ट भाव
४६७	।।ना.गा.ज.२५५.०२।।	टाकियेला फांसा । पांडव गेले वनवासा
४६८	।।ना.गा.ज.२५५.०३।।	वना गेले पांडव बळी । दिनकरें दिधली थाळी

४६९	।।ना.गा.ज.२५५.०४।।	पांडवांची कृष्णाबाई । जनी म्हणे माझी आई
४७०	।।ना.गा.ज.२५६.०१।।	कोणे एके दिवशीं । विठो आला जनीपाशीं
४७१	।।ना.गा.ज.२५६.०२।।	हळूच मागतो खायाशी । काय देऊं बा मी तुसी
४७२	।।ना.गा.ज.२५६.०३।।	हातीं धरून नेला आंत । वाढी पंचामृत भात
४७३	।।ना.गा.ज.२५६.०४।।	प्रेमसुखाचा ढेकर दिला । जनी म्हणे विठो धाला
४७४	।।ना.गा.ज.२५७.०१।।	एके दिवशीं वाडियांत । देव आले अवचित
४७५	।।ना.गा.ज.२५७.०२।।	अवघीं पायांस लागलीं । देवें त्यावरी कृपा केली
४७६	।।ना.गा.ज.२५७.०३।।	बाहेर कामासी गुंतल्यें । देवें मजला विचारिलें
४७७	।।ना.गा.ज.२५७.०४।।	बाहेर आहेस वो बोलती । देव मजला हाटकिती
४७८	।।ना.गा.ज.२५७.०५।।	हात धुऊनि जवळ गेल्यें । कोठें गे जनी हांसून बोले
४७९	।।ना.गा.ज.२५८.०१।।	दळण्याच्या मिषें । विठ्ठल सावकाशें
४८०	।।ना.गा.ज.२५८.०२।।	देहबुद्धीचें वैरण । द्वैत खडा रे निसून
४८१	।।ना.गा.ज.२५८.०३।।	एकलीच गातां । दुजा साद उमटतां
४८२	।।ना.गा.ज.२५८.०४।।	कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरीं
४८३	।।ना.गा.ज.२५८.०५।।	खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा
४८४	।।ना.गा.ज.२५९.०१।।	मग हांसोनि सकळी । पाहूं देव कैसा बळी
४८५	।।ना.गा.ज.२५९.०२।।	आले नामदेवा घरीं । प्रेमें भुललासे हरी
४८६	।।ना.गा.ज.२५९.०३।।	घाली जातिया वैरण । गाय आवडीचें गाणें
४८७	।।ना.गा.ज.२५९.०४।।	पुढें देखे ज्ञानेश्वरा । देव जालासे घाबरा
४८८	।।ना.गा.ज.२५९.०५।।	जनी म्हणे पंढरीनाथा । जाय राउळासी आतां
४८९	।।ना.गा.ज.२६०.०१।।	निवृत्ति पुसत । कोठें होतें पंढरिनाथ
४९०	।।ना.गा.ज.२६०.०२।।	खूण कळली हृषिकेशी । सांगों नको निवृत्तीसी
४९१	।।ना.गा.ज.२६०.०३।।	उत्तर दिलें ज्ञानदेवें । नवल केवढें सांगावें
४९२	।।ना.गा.ज.२६०.०४।।	शिव वंदी पायवणी । न ये योगियांचें ध्यानीं
४९३	।।ना.गा.ज.२६०.०५।।	द्वारीं उभे ब्रह्मादिक । गुण गाती सकळिक
४९४	।।ना.गा.ज.२६०.०६।।	जनीसवें दळी देव । तिचा देखोनियां भाव

४९५	।।ना.गा.ज.२६१.०१।।	काकड आरती । करावया कमळापती
४९६	।।ना.गा.ज.२६१.०२।।	भक्त मिळाले सकळ । रितें देखिलें देऊळ
४९७	।।ना.गा.ज.२६१.०३।।	ज्ञानेश्वर बोले । आतां देव कोठें गेले
४९८	।।ना.गा.ज.२६१.०४।।	ठावें जाहलें अंतरीं । देव दळी जनीघरीं
४९९	।।ना.गा.ज.२६२.०१।।	जाय जाय राउळासी । नको येऊं आम्हांपाशीं
५००	।।ना.गा.ज.२६२.०२।।	जाऊं आम्ही बरोबर । जाला तिचा हो चाकर
५०१	।।ना.गा.ज.२६२.०३।।	तिजसंगें काम करी । ऐसें जाणा देव हरी
५०२	।।ना.गा.ज.२६२.०४।।	चहूं हातीं धुणें केलें । जनी म्हणे बरें जालें
५०३	।।ना.गा.ज.२६३.०१।।	आतां पुरे हा संसार । कोठें फेडूं उपकार
५०४	।।ना.गा.ज.२६३.०२।।	सांडूनियां थोरपण । करी दळण कांडण
५०५	।।ना.गा.ज.२६३.०३।।	नारिरूप होउनी हरी । माझें न्हाणें धुणें करी
५०६	।।ना.गा.ज.२६३.०४।।	राना जाये वेंची शेणी । शेखीं वाहे घरीं पाणी
५०७	।।ना.गा.ज.२६३.०५।।	ठाव मागें पायापाशीं । म्हणे नामयाची दासी
५०८	।।ना.गा.ज.२६४.०१।।	धुणें घेऊनि कांखेसी । जनी गेली उपवासी
५०९	।।ना.गा.ज.२६४.०२।।	मागें विठ्ठल धांवला । म्हणे कां टाकिलें मला
५१०	।।ना.गा.ज.२६४.०३।।	धाऊनी देवा कां आलासी । म्हणे नामयाची दासी
५११	।।ना.गा.ज.२६५.०१।।	जनी जाय शेणासाठीं । उभा आहे तिच्या पाठीं
५१२	।।ना.गा.ज.२६५.०२।।	पितांबराची कांस खोवी । मागें चाले जनाबाई
५१३	।।ना.गा.ज.२६५.०३।।	गौऱ्या वेंचुनि बांधिली मोट । जनी म्हणे द्यावी गांठ
५१४	।।ना.गा.ज.२६५.०४।।	मोट उचलून डोई घेई । मागें चाले जनाबाई
५१५	।।ना.गा.ज.२६६.०१।।	राना गेली शेणीसाठीं । वेचूं लागे विठो पाठीं
५१६	।।ना.गा.ज.२६६.०२।।	पितांबर ओचे खोंवी । पायीं शोभा पारखावी
५१७	।।ना.गा.ज.२६६.०३।।	पूर्ण भरोनियां मोट । जनी म्हणे द्यावी गांठ
५१८	।।ना.गा.ज.२६७.०१।।	जनीचिया बोले करी नित्य काम । वसवी तिचें धाम लक्ष्मीसहित
५१९	।।ना.गा.ज.२६७.०२।।	जनीचिया गोष्टी प्रेम ज्याचे मनीं । तयाचे चरणीं ओढवी माया
५२०	।।ना.गा.ज.२६७.०३।।	महेशादि देव तेहि तया ध्याती । जे आवडे गांती जनी ध्याती

५२१	।।ना.गा.ज.२६८.०१।।	आई मेली बाप मेला । मज सांभाळी विठ्ठला
५२२	।।ना.गा.ज.२६८.०२।।	हरी रे मज कोणी नाहीं । माझी खात असे डोई
५२३	।।ना.गा.ज.२६८.०३।।	विठ्ठल म्हणे रुक्मिणी । माझे जनीला नाहीं कोणी
५२४	।।ना.गा.ज.२६८.०४।।	हातीं घेउनी तेलफणी । केंस विंचरून घाली वेणी
५२५	।।ना.गा.ज.२६८.०५।।	वेणी घालुन दिधली गांठ । जनी म्हणे चोळ बा पाठ
५२६	।।ना.गा.ज.२६८.०६।।	जनी म्हणे बा गोपाळा । करी दुबळीचा सोहळा
५२७	।।ना.गा.ज.२६९.०१।।	एक प्रहर रात्र जाली । फेरी विठ्ठलाची आली
५२८	।।ना.गा.ज.२६९.०२।।	नामा म्हणे जनी पाहे । द्वारीं उभा कोण आहे
५२९	।।ना.गा.ज.२६९.०३।।	प्रभा घरांत दाटली । अवघी एकसरा उठली
५३०	।।ना.गा.ज.२६९.०४।।	एकमेकां आलिंगन । नामा म्हणे दासी जनी धन्य
५३१	।।ना.गा.ज.२७०.०१।।	जनी जाय पाणीयासी । मागें धांवे हृषिकेशी
५३२	।।ना.गा.ज.२७०.०२।।	पाय भिजों नेदी हात । माथां घागरी वहात
५३३	।।ना.गा.ज.२७०.०३।।	पाणी रांजणांत भरी । सडासारवण करी
५३४	।।ना.गा.ज.२७०.०४।।	धुणें धुऊनियां आणी । म्हणे नामयाची जनी
५३५	।।ना.गा.ज.२७१.०१।।	शेट्या जाला हरी । द्रव्य गोणी लोटी द्वारीं
५३६	।।ना.गा.ज.२७१.०२।।	बुद्धि सांगे राजाईसी । तुम्ही न छळावें नाम्यासी
५३७	।।ना.गा.ज.२७१.०३।।	अवघ्या वित्तासी वेंचावें । सरल्या मजपाशीं मागावें
५३८	।।ना.गा.ज.२७१.०४।।	विठ्ठलसेट्या नाम माझें । नामदेवा सांगा वोजें
५३९	।।ना.गा.ज.२७१.०५।।	आतां उचित दासासी । ऐसें बोले राजाईसीं
५४०	।।ना.गा.ज.२७१.०६।।	ऐसें बोलोनियां गेला । जनी म्हणे नामा आला
५४१	।।ना.गा.ज.२७२.०१।।	नामदेवाचे घरीं । चौदाजणें स्मरती हरी
५४२	।।ना.गा.ज.२७२.०२।।	चौघे पुत्र चौघी सुना । नित्य स्मरती नारायणा
५४३	।।ना.गा.ज.२७२.०३।।	आणिक मायबाप पाहीं । नामदेव राजाबाई
५४४	।।ना.गा.ज.२७२.०४।।	आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी । पंधरावी ती दासी जनी
५४५	।।ना.गा.ज.२७३.०१।।	माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायीं
५४६	।।ना.गा.ज.२७३.०२।।	पुंडलिका भुलविलें । तैसें माझिया बाळा केलें

५४७	।।ना.गा.ज.२७३.०३।।	तें गा न चले मजपाशीं । दे गा माझ्या नामयासी
५४८	।।ना.गा.ज.२७३.०४।।	तुज्यासंगें जे जे गेले । ते त्वां जिवेची मारिले
५४९	।।ना.गा.ज.२७३.०५।।	विठ्ठल म्हणे गोणाबाई । नामा तुझा घेवोनियां जाई
५५०	।।ना.गा.ज.२७३.०६।।	हातीं धरोनियां आली । दासी जनी आनंदली
५५१	।।ना.गा.ज.२७४.०१।।	धरा सतराचा हो मेळा । कारखाना जाला गोळा । वाजविती आपुल्या कळा । प्रेमबळा आनंदें
५५२	।।ना.गा.ज.२७४.०२।।	झडतो नामाचा चौघडा । ब्रह्मीं ब्रह्मरूपींचा हुडा । संत ऐकताती कोडां । प्रेमबळा आनंदें
५५३	।।ना.गा.ज.२७४.०३।।	नामा दामा दोनी काळू । नामा विटा दमामे पैलू । चौघी सुना चारी हेलू । कडकडां बोलू उमटती
५५४	।।ना.गा.ज.२७४.०४।।	गोंदा म्हादा करणी करी । नांदे दुमदुमली पंढरी । आऊबाई तुतारी । मंजुळ उमटती स्वरीं
५५५	।।ना.गा.ज.२७४.०५।।	गोणाबाई नौबतपल्ला । नाद अंबरी कोंदला । राजाई झांज मंजुळ बोला । मंजुळ स्वर उमटला
५५६	।।ना.गा.ज.२७४.०६।।	जनाबाई घड्याळ मोगरी । घटकां भरतां टोला मारी । काळ व्यर्थचि गेला तरी । गजर आनंदें करी
५५७	।।ना.गा.ज.२७५.०१।।	विठोबा चला मंदिरात । गस्त हिंडती बाजारांत
५५८	।।ना.गा.ज.२७५.०२।।	रांगोळी घातली गुलालाची । शेज म्यां केली पुष्पांची
५५९	।।ना.गा.ज.२७५.०३।।	समया जळती अर्ध रात्रीं । गळ्यामध्यें माळ मोत्यांची
५६०	।।ना.गा.ज.२७५.०४।।	नामदेवाला सांपडले माणिक। घेतलें जनीनें हातांत
५६१	।।ना.गा.ज.२७५.०५।।	घेउनी गेली राउळांत । गस्त हिंडती हकिमाची बाजारांत
५६२	।।ना.गा.ज.२७६.०१।।	लोलो लागला अंबेचा । विठाबाई आनंदीचा
५६३	।।ना.गा.ज.२७६.०२।।	आदि ठाणें पंढरपूर । नांदे कान्हाई सुंदर
५६४	।।ना.गा.ज.२७६.०३।।	गोणाईनें नवस केला । देवा पुत्र देई मला
५६५	।।ना.गा.ज.२७६.०४।।	शुद्ध देखोनियां भाव । पोटीं आले नामदेव
५६६	।।ना.गा.ज.२७६.०५।।	दामाशेटी हरुषला । दासी जनीस आनंदी जाला
५६७	।।ना.गा.ज.२७७.०१।।	नामदेवा पुत्र जाला । विठो बारशासी आला
५६८	।।ना.गा.ज.२७७.०२।।	आंगडें टोपडें पेहरण । शेला मुंडासा घेऊन
५६९	।।ना.गा.ज.२७७.०३।।	माझ्या जीवीच्या जीवना । नाम ठेवी नारायणा
५७०	।।ना.गा.ज.२७७.०४।।	जनी म्हणे पांडुरंगा । नांव काय ठेवूं सांगा
५७१	।।ना.गा.ज.२७८.०१।।	हाटीं जायचि तांतडी । नामा होता पैलथडी
५७२	।।ना.गा.ज.२७८.०२।।	म्हणे जा गे आणा त्यासी । नाहीं तरी मी उपवासी

५७३	।।ना.गा.ज.२७८.०३।।	जनी धांवत चालली । मागें विठ्ठल माऊली
५७४	।।ना.गा.ज.२७९.०१।।	पुंडलिकापाशीं । नामा उभा कीर्तनासी
५७५	।।ना.गा.ज.२७९.०२।।	येऊनियां पांडुरंग । स्वयें टाळ धरी अंग
५७६	।।ना.गा.ज.२७९.०३।।	गाऊं लागे बरोबरी । नाहीं बोलायाची उरी
५७७	।।ना.गा.ज.२७९.०४।।	स्वर देवाचा उमटला । दासी जनीनें ओळखिला
५७८	।।ना.गा.ज.२८०.०१।।	ऐसी कीर्तनाची गोडी । वैकुंठींहुनी घाली उडी
५७९	।।ना.गा.ज.२८०.०२।।	आपण वैकुंठींच नसे । भक्तापासी जाण वसे
५८०	।।ना.गा.ज.२८०.०३।।	जनी म्हणे कृपानिधी । भक्तभावाची मांदी शोधी
५८१	।।ना.गा.ज.२८१.०१।।	राधा आणि मुरारी । क्रीडा कुंजवनीं करी
५८२	।।ना.गा.ज.२८१.०२।।	राधा डुलत डुलत । आली निजभुवनांत
५८३	।।ना.गा.ज.२८१.०३।।	सुमनाचे सेजेवरी । राधा आणि तो मुरारी
५८४	।।ना.गा.ज.२८१.०४।।	आवडीनें विडे देत । दासी जनी उभी तेथ
५८५	।।ना.गा.ज.२८२.०१।।	विठ्ठलाचा छंद । वाचे गोविंद गोविंद
५८६	।।ना.गा.ज.२८२.०२।।	हाचि बोला हो सिद्धांत । देव सांगे हो धादांत
५८७	।।ना.गा.ज.२८२.०३।।	जनी म्हणे सांगेन आतां । कृपें ऐका पंढरिनाथा
५८८	।।ना.गा.ज.२८३.०१।।	जनीनें बोलिलें तैसेंच लिहिलें । साध्य परिसिलें तुम्हीं संतीं
५८९	।।ना.गा.ज.२८३.०२।।	अहो ज्ञानदेवा असावें तुम्हां ठावें । येणें काय लहाणीव आणिली आम्हां
५९०	।।ना.गा.ज.२८३.०३।।	माझी मज आण सांगतें प्रमाण । सेवितें चरण तुझे स्वामी
५९१	।।ना.गा.ज.२८३.०४।।	जनीचें हो बोल स्वानंदाचें डोल । स्वामी मुखीं बोल दुणावती
५९२	।।ना.गा.ज.२८३.०५।।	शुद्ध सत्व कागद नित्य करी शाई । अखंडित लिही जनीपाशीं
५९३	।।ना.गा.ज.२८३.०६।।	हांसोनि ज्ञानदेवें पिटीयेली टाळी । जयजयकार सकळीं केला थोर
५९४	।।ना.गा.ज.२८४.०१।।	जिव्हा लागली नामस्मरणीं । रित्या माप भरी गोणी
५९५	।।ना.गा.ज.२८४.०२।।	नित्य नेमाची लाखोली । गुरु आज्ञेनें मी पाळी
५९६	।।ना.गा.ज.२८४.०३।।	मज भरंवसा नामाचा । गजर नाम्याच्या दासीचा
५९७	।।ना.गा.ज.२८४.०४।।	विटेवरी ब्रह्म दिसे । जनी त्याला पाहातसे
५९८	।।ना.गा.ज.२८५.०१।।	सोंगा सोंगा जाये । नवल जाऊनी हांसताहे

५९९	।।ना.गा.ज.२८५.०२।।	हांसोनियां बडवी टिरी । कोण नाठवी हे परी
६००	।।ना.गा.ज.२८५.०३।।	हा नाठवी आपणा । म्हणे जनी भुले जाणा
६०१	।।ना.गा.ज.२८६.०१।।	देहभाव सर्व जाय । तेव्हां विदेही सुख होय
६०२	।।ना.गा.ज.२८६.०२।।	तया निद्रें जे पहुडले । भवजागृति नाहीं आले
६०३	।।ना.गा.ज.२८६.०३।।	ऐसी विश्रांती लाधली । आनंदकळा संचरली
६०४	।।ना.गा.ज.२८६.०४।।	त्या एकीं एक होतां । दासी जनी कैंचि आतां
६०५	।।ना.गा.ज.२८७.०१।।	एके रात्रींचे समयीं । देव आले लवलाही
६०६	।।ना.गा.ज.२८७.०२।।	सुखशेजें पहुडले । जनीसवें गुज बोले
६०७	।।ना.गा.ज.२८७.०३।।	गुज बोलतां बोलतां । निद्रा आली अवचिता
६०८	।।ना.गा.ज.२८७.०४।।	उठा उठा चक्रपाणि । उजाडलें म्हणे जनी
६०९	।।ना.गा.ज.२८८.०१।।	पदक माळा बाजुबंदे । ठेवियेले वो गोविंदें
६१०	।।ना.गा.ज.२८८.०२।।	देव तांतडी निघाले । वाकळ घेऊनी पळाले
६११	।।ना.गा.ज.२८८.०३।।	भक्त येतो महाद्वारीं । चोर पडले देव्हारीं
६१२	।।ना.गा.ज.२८८.०४।।	नवल जालें पंढरपुरीं । देव राबे दासी घरीं
६१३	।।ना.गा.ज.२८८.०५।।	त्रिभुवनांत मात गेली। दासी जनी प्रगटली
६१४	।।ना.गा.ज.२८९.०१।।	पदक विठ्ठलाचें गेलें । ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें
६१५	।।ना.गा.ज.२८९.०२।।	अगे शिंपियाचे जनी । नेलें पदक दे आणुनी
६१६	।।ना.गा.ज.२८९.०३।।	देवासमोर तुझें घर । तुझें येणें निरंतर
६१७	।।ना.गा.ज.२८९.०४।।	म्यां नेलें नाहीं जाण । सख्या विठोबाची आण
६१८	।।ना.गा.ज.२८९.०५।।	वाकळ झाडूनि पाहती । पडलें पदक घेऊनि जाती
६१९	।।ना.गा.ज.२८९.०६।।	जनीवरी आली चोरी । ब्राह्मण करिती मारामारी
६२०	।।ना.गा.ज.२८९.०७।।	धाविन्नले चाळीस गडी । जनीवरी पडली उडी
६२१	।।ना.गा.ज.२८९.०८।।	दंडीं लाविल्या काढण्या । विठोबा धांव रे धावण्या
६२२	।।ना.गा.ज.२८९.०९।।	चंद्रभागें रोविला शूळ । जनाबाईस आलें मूळ
६२३	।।ना.गा.ज.२८९.१०।।	हातीं टाळी वाजविती । मुखीं विठ्ठल बोलती
६२४	।।ना.गा.ज.२८९.११।।	विलंब लागला ते वेळीं । म्हणती जनिला द्या रे सुळी

६२५	।।ना.गा.ज.२८९.१२।।	ऐसा येळकोट केला । जनी म्हणे विठो मेला
६२६	।।ना.गा.ज.२८९.१३।।	तंव सुळाचें जालें पाणी । धन्य म्हणे दासी जनी
६२७	।।ना.गा.ज.२९०.०१।।	प्रेमभावें तुम्हीं नाचा । रामरंगें रंगो वाचा
६२८	।।ना.गा.ज.२९०.०२।।	हेंचि मागों देवाजीला । आवडी शांती खरें बोला
६२९	।।ना.गा.ज.२९०.०३।।	जैसी माय तान्हयातें । खेळउनी चुंबी त्यातें
६३०	।।ना.गा.ज.२९०.०४।।	तेंवि तुम्हीं संतजना । सर्वां धरावी भावना
६३१	।।ना.गा.ज.२९०.०५।।	हरि कोठवळा जाला । म्हणे जनी भक्तीं केला
६३२	।।ना.गा.ज.२९१.०१।।	अर्थ जे काढिती उपनिषदामाजी । सांडोनियां गोड भाजी घेती माठ
६३३	।।ना.गा.ज.२९१.०२।।	भूगोलाचा स्वामी सुप्रसन्न जाला । त्यासी मागे पाला भाजीचा तो
६३४	।।ना.गा.ज.२९१.०३।।	पुंडलिकें धन जोडिलें असतां । प्रार्थोनियां देतां न घेती हे
६३५	।।ना.गा.ज.२९१.०४।।	मग गडी हो पाहे देवचि येथोनि । जवळी होती जनी फावलें तिये
६३६	।।ना.गा.ज.२९२.०१।।	ऋषि म्हणती धर्मदेवा । आमचा आशीर्वाद घ्यावा
६३७	।।ना.गा.ज.२९२.०२।।	पांडवपालक गोविंद । तिहीं लोकीं गाजे ब्रिद
६३८	।।ना.गा.ज.२९२.०३।।	भक्तिभावें केला वश्य । हरि सांभाळी तयास
६३९	।।ना.गा.ज.२९२.०४।।	रात्रंदिवस तुम्हांपासी । दुजा ठाव नाहीं त्यासी
६४०	।।ना.गा.ज.२९२.०५।।	देव द्रौपदीतें सांभाळी । उभा पाठीशीं वनमाळी
६४१	।।ना.गा.ज.२९२.०६।।	वनीं सांभाळी पांडवासी । सुदर्शन त्याजपाशीं
६४२	।।ना.गा.ज.२९२.०७।।	हरिभक्ति जाहला ऋणी । म्हणे नामयाची जनी
६४३	।।ना.गा.ज.२९३.०१।।	वेदांतीं हें बोलिलें । सिद्धांतीं हें नेमियेलें
६४४	।।ना.गा.ज.२९३.०२।।	लागा लागा भक्तिवाटा । धरा हेचि नेमनिष्ठा
६४५	।।ना.गा.ज.२९३.०३।।	वेदबाह्य तें कर्म । सांडी न करीं अधर्म
६४६	।।ना.गा.ज.२९३.०४।।	तोचि एक होय ज्ञानी । देवनिष्ठ म्हणे जनी
६४७	।।ना.गा.ज.२९४.०१।।	जनीचें बोलणें वाची नित्य कोणी । तयाचे आंगणीं तिष्ठतसे
६४८	।।ना.गा.ज.२९४.०२।।	जनीचिया पदा अखंडीत गाये । तयाचे मी पायें वंदी माथा
६४९	।।ना.गा.ज.२९४.०३।।	जनीचें आवडे जयासी वचन । तयासी नारायण कृपा करी
६५०	।।ना.गा.ज.२९४.०४।।	पांडुरंग म्हणे ऐक ज्ञानदेवा । ऐसा वर द्यावा जनीसाठीं

६५१	।।ना.गा.ज.२९५.०१।।	ऐसा वर देई हरी । गाई नाम निरंतरीं
६५२	।।ना.गा.ज.२९५.०२।।	पुरवी आस माझी देवा । जेणें घडे तुझी सेवा
६५३	।।ना.गा.ज.२९५.०३।।	हेंचि आहे माझे मनीं। कृपा करी चक्रपाणि
६५४	।।ना.गा.ज.२९५.०४।।	रूप न्याहाळूनियां डोळां । मुखीं नाम लागो चाळा
६५५	।।ना.गा.ज.२९५.०५।।	उदाराच्या राया । दासी जनी लागे पायां
६५६	।।ना.गा.ज.२९६.०१।।	साधु आणि संत । जन्म द्यावा जी कलींत
६५७	।।ना.गा.ज.२९६.०२।।	मागणें तें हेंचि देवा । कृपा करी हो केशवा
६५८	।।ना.गा.ज.२९६.०३।।	संत दयाळ परम । तया साक्षी आत्माराम
६५९	।।ना.गा.ज.२९६.०४।।	जनी म्हणे ऐसे साधु । तयापाशीं तूं गोविंदु
६६०	।।ना.गा.ज.२९७.०१।।	विटेवरी ब्रह्म दिसे । जनी त्याला पाहातसे
६६१	।।ना.गा.ज.२९७.०२।।	देव भावाचा अंकित । जाणे दासाचें तें चित्त
६६२	।।ना.गा.ज.२९७.०३।।	भक्ति जनी मागे देवा । तिचा मनोरथ पुरवा
६६३	।।ना.गा.ज.२९८.०१।।	देवा देई गर्भवास । तरीच पुरेल माझी आस
६६४	।।ना.गा.ज.२९८.०२।।	परि हे देखा रे पंढरी । सेवा नामयाचे द्वारीं
६६५	।।ना.गा.ज.२९८.०३।।	करीं पक्षि कां सूकर । श्वान श्वापद मार्जार
६६६	।।ना.गा.ज.२९८.०४।।	ऐसा हेत माझे मनीं । म्हणे नामयाची जनी
६६७	।।ना.गा.ज.२९९.०१।।	ऐसा पुत्र देई संतां । तरी त्या आवडी पंढरिनाथा
६६८	।।ना.गा.ज.२९९.०२।।	गीता नित्य नेमें । वाची ज्ञानेश्वरी प्रेमें
६६९	।।ना.गा.ज.२९९.०३।।	संतांच्या चरणा । करी मस्तक ठेंगणा
६७०	।।ना.गा.ज.२९९.०४।।	कन्या व्हावी भागिरथी । तुझें प्रेम जिचे चित्तीं
६७१	।।ना.गा.ज.२९९.०५।।	ऐसे करी संतजना । दासी जनीच्या निधाना
६७२	।।ना.गा.ज.३००.०१।।	माझें दुःख नाशी देवा । मज सुख दे केशवा
६७३	।।ना.गा.ज.३००.०२।।	आम्हां सुख ऐसें देईं । तुझी कृपा विठाबाई
६७४	।।ना.गा.ज.३००.०३।।	चरणीं अनन्य शरण । त्यासी नाहीं जन्ममरण
६७५	।।ना.गा.ज.३००.०४।।	जनी म्हणे हेंचि मागें । धण्या सर्व तुज सांगे
६७६	।।ना.गा.ज.३०१.०१।।	रुक्माई आईचें आहे ऐसें भाग्य । असावें आरोग्य चिरकाल

६७७	।।ना.गा.ज.३०१.०२।।	सख्या पुंडलिका आवडतें स्थळ । असावें चिरकाळ स्वस्तिक्षेम
६७८	।।ना.गा.ज.३०१.०३।।	अहो संतजन आवडतें धन । असावें कल्याण चिरकाळ
६७९	।।ना.गा.ज.३०१.०४।।	जन्मोजन्मी हेंचि मागें गोविंदासी । म्हणे जनी दासी नामयाची
६८०	।।ना.गा.ज.३०२.०१।।	परधन कामिनी समूळ नासी मना । नाहीं हे वासना माया केली
६८१	।।ना.गा.ज.३०२.०२।।	तृष्णा हे अधम न व्हावी मजला । प्रेमाचा जिव्हाळा देई तुझ्या
६८२	।।ना.गा.ज.३०२.०३।।	निरपेक्ष वासना दे गा मज देवा । आणि तुझी सेवा आवडीची
६८३	।।ना.गा.ज.३०२.०४।।	शांतीचीं भूषणें मिरविती अंगीं । वैष्णव आणि योगी म्हणावे ते
६८४	।।ना.गा.ज.३०२.०५।।	असो तो अकुळी हो कां भलते याती । माथां वंदी प्रीती जनी त्यासी
६८५	।।ना.गा.ज.३०३.०१।।	द्वारकेच्या राया । बुद्धी दे गा नाम गाया
६८६	।।ना.गा.ज.३०३.०२।।	मतिमंद तुझी दासी । ठाव देईं चरणांपासीं
६८७	।।ना.गा.ज.३०३.०३।।	तुझे पदरीं पडलें खरी । आतां सांभाळ करी हरी
६८८	।।ना.गा.ज.३०३.०४।।	न कळे हरीची करणी । म्हणे नामयाची जनी
६८९	।।ना.गा.ज.३०४.०१।।	संतांचा तो संग नव्हे भलतैसा । पालटावी दशा तात्काळिक
६९०	।।ना.गा.ज.३०४.०२।।	चंदनाचे संगें पालटती झाडें । दुर्बळ लांकडें देवामाथां
६९१	।।ना.गा.ज.३०४.०३।।	हें कां ऐसें व्हावें संगती स्वभावें । आणिके न पालटावें देहालागीं
६९२	।।ना.गा.ज.३०४.०४।।	तैसा नि:संगाचा संग अग्रगणी । जनी ध्याय मनीं ज्ञानेश्वरा
६९३	।।ना.गा.ज.३०५.०१।।	संत हे कोण तरी देवाचे हे डोळे । पूजेविण आंधळे देवाचिये
६९४	।।ना.गा.ज.३०५.०२।।	कोण्या नेत्रें देव पाहे तुजकडे। यासाठीं आवडे संत करी
६९५	।।ना.गा.ज.३०५.०३।।	संत ऐसे करी देवाचे काम । सांडियेल्या ध्यान कोण ऐके
६९६	।।ना.गा.ज.३०५.०४।।	संत पुससी तरी देवाचे ते पाय । आगमा न गमे सोय मागाडीये
६९७	।।ना.गा.ज.३०५.०५।।	संत पुससी तरी देवाचें तें पोट । धरुनियां बोट दाविती हरी
६९८	।।ना.गा.ज.३०५.०६।।	संत म्हणसी तरी देवाचा हा गळा । जेणें रस आगळा वेदादिकां
६९९	।।ना.गा.ज.३०५.०७।।	संत जरी पुससी तरी देवाचें वदन । माझें तें वचन संत जाले
७००	।।ना.गा.ज.३०५.०८।।	परादीया चारी सांडूनि मीपणी । संत बोले वाणी विठोबाची
७०१	।।ना.गा.ज.३०५.०९।।	परेचिया चारी आनंदा माझारीं । संत जाले अंतरीं पडजीभ देवा
७०२	।।ना.गा.ज.३०५.१०।।	क्षर जे नासिलें अक्षर ते काढिलें । नि:शब्दाचें जाले बोले संत

७०३	।।ना.गा.ज.३०५.११।।	शब्द तो उडाला नाद तो बुडाला । भेद तो आटला मायाभावी
७०४	।।ना.गा.ज.३०५.१२।।	विठो वटावरी पारंबिया जाले। केश ते वाढले माय संत
७०५	।।ना.गा.ज.३०५.१३।।	कुरळ होऊनियां देती ते सुढाळ । म्हणे जनी वोवाळ जीवेंभावें
७०६	।।ना.गा.ज.३०६.०१।।	भक्तामाजीं अग्रगणी । पुंडलिक महामुनि
७०७	।।ना.गा.ज.३०६.०२।।	त्याचे प्रसादें तरले । साधुसंत उद्धरिले
७०८	।।ना.गा.ज.३०६.०३।।	तोचि प्रसाद आम्हांसी । विटेवरी हृषिकेशी
७०९	।।ना.गा.ज.३०६.०४।।	पुंडलिक बापमाय । दासी जनी वंदी पाय
७१०	।।ना.गा.ज.३०७.०१।।	अळंकापुरवासिनी बैसे माझ्या मनीं । सन्मुख इंद्रायणी वाहातसे
७११	।।ना.गा.ज.३०७.०२।।	ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायीं । धांवोनियां येई दुडदुडा
७१२	।।ना.गा.ज.३०७.०३।।	बहू कासाविस होतो माझा जीव । कळवळ्याची कीव येऊं देई
७१३	।।ना.गा.ज.३०७.०४।।	नामयाची जनी आपंगावी आपुली । याहिं सांभाळिली मायबापें
७१४	।।ना.गा.ज.३०८.०१।।	आंधळ्याची काठी । अडकली कवणे वेठीं
७१५	।।ना.गा.ज.३०८.०२।।	माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं
७१६	।।ना.गा.ज.३०८.०३।।	मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहे वास
७१७	।।ना.गा.ज.३०८.०४।।	तुजवीण काय करूं । प्राण किती कंठी धरूं
७१८	।।ना.गा.ज.३०८.०५।।	आतां जीव जाऊं पाहे । धांव घाली माझे आये
७१९	।।ना.गा.ज.३०८.०६।।	माझी भेटवा जननीं । संतां विनवी दासी जनी
७२०	।।ना.गा.ज.३०९.०१।।	पाहतां पंढरीच्या राया । त्याच्या मुक्ति लागे पायां
७२१	।।ना.गा.ज.३०९.०२।।	पुरुषार्थे चारी । त्याचें मोक्ष आर्जव करी
७२२	।।ना.गा.ज.३०९.०३।।	धन संपत्तीचा दाता । होय पाहतां पंढरिनाथा
७२३	।।ना.गा.ज.३०९.०४।।	संताचे चरणीं । लोळे नाचे दासी जनी
७२४	।।ना.गा.ज.३१०.०१।।	विष्णुमुद्रेचा अंकिला । तोचि वैष्णव एक भला
७२५	।।ना.गा.ज.३१०.०२।।	अहं जाळोनी अंगारा । सोहं भस्मीं तीर्थ सारा
७२६	।।ना.गा.ज.३१०.०३।।	विष्णु माया द्वारावती । भक्ती मुद्रा त्या मिरवती
७२७	।।ना.गा.ज.३१०.०४।।	पंचायतन पूजी भावें । अहं सोहं भस्मीं नांवें
७२८	।।ना.गा.ज.३१०.०५।।	प्रेमतुळसी कानीं । म्हणे नामयाची जनी

७२९	।।ना.गा.ज.३११.०१।।	वैष्णव तो एक इतर ती सोंगें । ठसे देउनी अंगें चितारिती
७३०	।।ना.गा.ज.३११.०२।।	जिचे योनि जन्मला तिसी दंडूं लागला । तीर्थरूप केला देशधडी
७३१	।।ना.गा.ज.३११.०३।।	नाइकोनी ब्रह्मज्ञान जो कां दुराचारी । अखंड द्वेष करी सज्जनांचा
७३२	।।ना.गा.ज.३११.०४।।	विद्येच्या अभिमानें नाईके कीर्तन । पाखांडी हें म्हणे करिती कायी
७३३	।।ना.गा.ज.३११.०५।।	पंचरस पात्रा कांता हे बुडविती । उद्धरलें म्हणती आम्ही संत
७३४	।।ना.गा.ज.३११.०६।।	कीर्तनाचा द्वेष करी तो चांडाळ । तयाचा विटाळ मातंगीसी
७३५	।।ना.गा.ज.३११.०७।।	वैष्णव तो एक चोखामेळा महार । जनी म्हणे निर्धार केला संतीं
७३६	।।ना.गा.ज.३१२.०१।।	पंढरीचा वारकरी । त्याचे पाय माझे शिरीं
७३७	।।ना.गा.ज.३१२.०२।।	हो कां उत्तम चांडाळ । पायीं ठेवीन कपाळ
७३८	।।ना.गा.ज.३१२.०३।।	वंद्य होय हरिहरा । सिद्ध मुनि ऋषिश्वरा
७३९	।।ना.गा.ज.३१२.०४।।	मुखीं नाम गर्जे वाणी । म्हणे नामयाची जनी
७४०	।।ना.गा.ज.३१३.०१।।	आले वैष्णवांचे भारे । दिले हरिनाम नगारे
७४१	।।ना.गा.ज.३१३.०२।।	अवघी दुमदुमली पंढरी । कडकडाट गरुडपारीं
७४२	।।ना.गा.ज.३१३.०३।।	टाळ मृदंग धुमाळी । रंगणीं नाचे वनमाळी
७४३	।।ना.गा.ज.३१३.०४।।	ऐसा आनंद सोहळा । दासी जनी पाहे डोळां
७४४	।।ना.गा.ज.३१४.०१।।	स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावें उदास । साधुसंतां ऐसें केलें मज
७४५	।।ना.गा.ज.३१४.०२।।	संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबानें दिली प्रेमकळा
७४६	।।ना.गा.ज.३१४.०३।।	विदूर सात्विक माझिये कुळीचा । अंगिकार त्याचा केला देवें
७४७	।।ना.गा.ज.३१४.०४।।	न विचारितां कुळ गणिका उद्धरिली । नामें सरती केली तिहीं लोकीं
७४८	।।ना.गा.ज.३१४.०५।।	ऋषींचीं कुळे उच्चारिलीं जेणें । रौरवीं तेणें वस्ती केली
७४९	।।ना.गा.ज.३१४.०६।।	नामयाची जनी भक्तीतें सादर । माझें तें साचार विटेवरी
७५०	।।ना.गा.ज.३१५.०१।।	संतभार पंढरींत । कीर्तनाचा गजर होत
७५१	।।ना.गा.ज.३१५.०२।।	तेथें असे देव उभा । जैशी समचरणांची शोभा
७५२	।।ना.गा.ज.३१५.०३।।	रंग भरे कीर्तनांत । प्रेमें हरिदास नाचत
७५३	।।ना.गा.ज.३१५.०४।।	सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचा जो जिव्हार
७५४	।।ना.गा.ज.३१५.०५।।	ऐशा संतां शरण जावें । जनी म्हणे त्याला ध्यावें

७५५	।।ना.गा.ज.३१६.०१।।	सांवळी ते मूर्ति हृदयीं बिंबली । देहो बुद्धी पालटली माझी साची
७५६	।।ना.गा.ज.३१६.०२।।	धन्य माझी भक्ति धन्य माझा भाव । हृदयीं पंढरीराव राहतसे
७५७	।।ना.गा.ज.३१६.०३।।	आशा तृष्णा कैशा मावळल्या दोन्ही । चिंता विठ्ठलाचरणीं जडोनि ठेली
७५८	।।ना.गा.ज.३१६.०४।।	नामयाचे जनी विश्रांति पैं जाली । हृदयीं राहिली विठ्ठलमूर्ति
७५९	।।ना.गा.ज.३१७.०१।।	वामसव्य दोहींकडे । देखें कृष्णाचें रूपडें
७६०	।।ना.गा.ज.३१७.०२।।	आतां खाले पाहूं जरी । चहुंकडे दिसे हरी
७६१	।।ना.गा.ज.३१७.०३।।	चराचरीं जें जें दिसे । तें तें अविद्याची नासे
७६२	।।ना.गा.ज.३१७.०४।।	माझें नाठवे मीपण । तेथें कैचें दुजेपण
७६३	।।ना.गा.ज.३१७.०५।।	सर्वांठायीं पूर्ण कळा । दासी जनी पाहे डोळां
७६४	।।ना.गा.ज.३१८.०१।।	धरिला पंढरीचा चोर । गळां बांधोनियां दोर
७६५	।।ना.गा.ज.३१८.०२।।	हृदय बंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला
७६६	।।ना.गा.ज.३१८.०३।।	शब्दें केली जवाजुडी । विठ्ठल पायीं घातली बेडी
७६७	।।ना.गा.ज.३१८.०४।।	सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुलती आला
७६८	।।ना.गा.ज.३१८.०५।।	जनी म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडी मी तुला
७६९	।।ना.गा.ज.३१९.०१।।	दळूं कांडु खेळूं । सर्व पाप ताप जाळूं
७७०	।।ना.गा.ज.३१९.०२।।	सर्व जीवामध्यें पाहूं । एक आम्ही होउनी राहूं
७७१	।।ना.गा.ज.३१९.०३।।	जनी म्हणे ब्रह्म होऊं । ऐसें सर्वांघटीं पाहूं
७७२	।।ना.गा.ज.३२०.०१।।	चरण विठोबाचे देखिले । साही रिपु हारपले
७७३	।।ना.गा.ज.३२०.०२।।	नाहीं नाहीं म्हणती आम्ही । सांगसी त्या लागूं कामीं
७७४	।।ना.गा.ज.३२०.०३।।	नाहीं तरी जाऊं देशीं । जनी नामयाची दासी
७७५	।।ना.गा.ज.३२१.०१।।	भ्रांती माझें मन प्रपंचीं गुंतलें । श्रवण मनन होऊनि ठेलें
७७६	।।ना.गा.ज.३२१.०२।।	बापें बोधिलें बापें बोधिलें । बोधुनी कैसी तदरूप जालें
७७७	।।ना.गा.ज.३२१.०३।।	निजध्यासें कैसा अवघाचि सांपडला । कीं विश्वरूपीं देखिला बाईयांनो
७७८	।।ना.गा.ज.३२१.०४।।	नामयाची जनी स्वयंबोध जाला । अवघाचि पुसिला ठाव देखा
७७९	।।ना.गा.ज.३२२.०१।।	संतमहानुभाव येती दिगंबर । नम्रतेचें घर विरळा जाणे
७८०	।।ना.गा.ज.३२२.०२।।	निवालें मीपण तें जें ठायीं नाहीं । सोहं शब्द सोई तेथें कैची

७८१	।।ना.गा.ज.३२२.०३।।	पाहतां हा कोण दावितां हा कोण । पाहतां दावितां हे खूण विरळा जाणें
७८२	।।ना.गा.ज.३२२.०४।।	नामयाची जनी वस्तु पैं जाली । तेचि होउनि ठेली तदाकार
७८३	।।ना.गा.ज.३२३.०१।।	त्या वैष्णवांच्या माता । तो नेणें देव ताता
७८४	।।ना.गा.ज.३२३.०२।।	तिहीं कर्में हें पुसिलें । अकर्म समूळ नाहींसें केलें
७८५	।।ना.गा.ज.३२३.०३।।	कानाचा हो कान । जालें धरूनियां ध्यान
७८६	।।ना.गा.ज.३२३.०४।।	डोळियाचा हो डोळा । करूनि जालें प्रेमसोहळा
७८७	।।ना.गा.ज.३२३.०५।।	तोहि वसे नरदेहीं । जनी दासी वंदी पायीं
७८८	।।ना.गा.ज.३२४.०१।।	देहभाव पूर्ण जाय । तेव्हां हें धैर्य सुख होय
७८९	।।ना.गा.ज.३२४.०२।।	तयां निद्रे जे निजले । भाव जागृती नाहीं आले
७९०	।।ना.गा.ज.३२४.०३।।	ऐसी विश्रांति लाधली । आनंद कळा संचरली
७९१	।।ना.गा.ज.३२४.०४।।	तेथें सर्वांग सुखी जालें । लिंगदेह विसरलें
७९२	।।ना.गा.ज.३२४.०५।।	त्या एकीं एक होतां । दासी जनी नाहीं आतां
७९३	।।ना.गा.ज.३२५.०१।।	जोड जाली रे शिवासी । भ्रांत फिटली रे जिवाची
७९४	।।ना.गा.ज.३२५.०२।।	आनंदची आनंदला । आनंद बोधचि बोधला
७९५	।।ना.गा.ज.३२५.०३।।	आनंदाची लहरी उठी । ब्रह्मानंदें गिळिला पोटीं
७९६	।।ना.गा.ज.३२५.०४।।	एकपण जेथें पाहीं । तेथें विज्ञप्ति उरली नाहीं
७९७	।।ना.गा.ज.३२५.०५।।	ऐसी सद्‌गुरुची करणी । दासी जनी विठ्ठल चरणीं
७९८	।।ना.गा.ज.३२६.०१।।	बाई मी लिहिणें शिकलें सद्‌गुरुरायापाशीं
७९९	।।ना.गा.ज.३२६.०२।।	ब्रह्मीं जाला जो उल्लेख । तोचि नादाकार देख । पुढें ओंकाराची रेख । तुर्या म्हणावें तिसी
८००	।।ना.गा.ज.३२६.०३।।	माया महत्‌तत्त्वाचें सुभर । तीन पांचाचा प्रकार । पुढें पंचविसाचा भार । गणित केलें छत्तीस
८०१	।।ना.गा.ज.३२६.०४।।	बारा सोळा एकविस हजार । आणिक सहाशाचा उबार । माप चाले सोहंकार । ओळखिलें बावन्न मात्रेसी
८०२	।।ना.गा.ज.३२६.०५।।	चार खोल्या चार घरीं । चौघे पुरुष चार नारी । ओळखुनी सर्वांशीं अंतरीं । राहिलें पांचव्यापासीं
८०३	।।ना.गा.ज.३२६.०६।।	पांच शहाणें पांच मूर्ख । पांच चाळक असती देख । पांच दरोडेखोर आणिक । ओळखिलें दोघांसी
८०४	।।ना.गा.ज.३२६.०७।।	एक बीजाचा अंकूर । होय वृक्षासी विस्तार । शाखा पत्रें फळ फुलभार। बीजापोटीं सामावें
८०५	।।ना.गा.ज.३२६.०८।।	कांतीण तंतूशी काढून । वरी क्रीडा करिती जाण । शेवटीं तंतूशी गिळुन । एकटी राहे आपैसी
८०६	।।ना.गा.ज.३२६.०९।।	वेदशास्त्र आणि पुराणा । याचा अर्थ आणितां मना । कनकी नगाच्या भूषणा । अनुभव वाटे जीवासी

८०७	।।ना.गा.ज.३२६.१०।।	नामदेवाचे प्रताप । शिरीं विठोबाचा हात । जनी म्हणे केली मात । पुसा ज्ञानेश्वरासी
८०८	।।ना.गा.ज.३२७.०१।।	नम्रतेविण योग्यता मिरविती । ते केवी पावती ब्रह्मसुख
८०९	।।ना.गा.ज.३२७.०२।।	लटिकें नेत्र लावुनि ध्यान पैं करिती । ते केवी पावती केशवातें
८१०	।।ना.गा.ज.३२७.०३।।	एक संत म्हणविती नग्न पैं हिंडती । अंतरीची स्थिती खडबड
८११	।।ना.गा.ज.३२७.०४।।	जालेपणाचे गुण दिसताती सगुण । वस्तु ते आपण होऊनि ठेली
८१२	।।ना.गा.ज.३२७.०५।।	सागरीं गंगा मिळोनि गेली जैसी । परतोनियां तियेसी नाम नाहीं
८१३	।।ना.गा.ज.३२७.०६।।	नामयाची जनी निर्गुणीं बोधिली । ठेवा जो लाधली पांडुरंग
८१४	।।ना.गा.ज.३२८.०१।।	शब्दांचें ब्रह्म लौकिक हो दिसे । जैसे ते फासे मईदाचे
८१५	।।ना.गा.ज.३२८.०२।।	ज्ञानी तो कोण विज्ञानी तो कोण । दोहींचा आपण साक्षभूत
८१६	।।ना.गा.ज.३२८.०३।।	स्वयें सुखें धाला आपणांते विसरला । तो योगि राहिला नाहीं येथें
८१७	।।ना.गा.ज.३२८.०४।।	नामयाची जनी सागरीं मिळाली । परतोनि मुळीं केवी जाय
८१८	।।ना.गा.ज.३२९.०१।।	अखंडित ध्यानीं । पांडुरंग जपे वाणी
८१९	।।ना.गा.ज.३२९.०२।।	पांडुरंग नाम जप । हेंचि माझें महा तप
८२०	।।ना.गा.ज.३२९.०३।।	ऐसें आलें प्रत्ययासी । सहज तेणें तत्वमसी
८२१	।।ना.गा.ज.३२९.०४।।	पावलिया हो स्वपद । सहज विराला तो शब्द
८२२	।।ना.गा.ज.३२९.०५।।	संदेह अवघाचि फिटला । जनी म्हणे उदयो जाला
८२३	।।ना.गा.ज.३३०.०१।।	देव खातें पितें । देवावरी मी निजतें
८२४	।।ना.गा.ज.३३०.०२।।	देव देतें देव घेतें । देवासवें व्यवहारितें
८२५	।।ना.गा.ज.३३०.०३।।	देव येथें देव येथें । देवाविणें नाहीं रितें
८२६	।।ना.गा.ज.३३०.०४।।	जनी म्हणे विठाबाई । भरूनि उरलें अंतरबाही
८२७	।।ना.गा.ज.३३१.०१।।	श्रीमूर्ति असे बिंबली । तरी हे देहस्थिति पालटली
८२८	।।ना.गा.ज.३३१.०२।।	धन्य माझा इह जन्म । हृदयीं विठोबाचें नाम
८२९	।।ना.गा.ज.३३१.०३।।	तृष्णा आणि आशा । पळून गेल्या दाही दिशा
८३०	।।ना.गा.ज.३३१.०४।।	नामा म्हणे जनी पाहे । द्वारीं विठ्ठल उभा आहे
८३१	।।ना.गा.ज.३३२.०१।।	जनी दृष्टी पाहे । जिकडे तिकडे हरी आहे
८३२	।।ना.गा.ज.३३२.०२।।	मग म्हणे वो देवासी । तुमच्या नामयाची दासी

८३३	।।ना.गा.ज.३३२.०३।।	नामयाचा प्रसाद । जाला जनीला आनंद
८३४	।।ना.गा.ज.३३३.०१।।	जाली पूर्णकृपा आहे । ऐसा पूर जो कां पाहे
८३५	।।ना.गा.ज.३३३.०२।।	ऐसा पूर जो कां पाहे । गुरुपुत्र तोचि होये
८३६	।।ना.गा.ज.३३३.०३।।	पूर्णपदीं जो स्थापिला । जनी म्हणे धन्य जाला
८३७	।।ना.गा.ज.३३४.०१।।	नित्य हातानें वारावें । हृदय अंतरीं पेरित जावें
८३८	।।ना.गा.ज.३३४.०२।।	ऐसा स्वरूपाचा पूर । आला असे नेत्रावर
८३९	।।ना.गा.ज.३३४.०३।।	स्वरूपाचा पूर आला । पाहतां डोळा झाकुळला
८४०	।।ना.गा.ज.३३४.०४।।	जनी म्हणे ऐसा पूर । पाहे तोचि रघुवीर
८४१	।।ना.गा.ज.३३५.०१।।	गगन सर्वत्र तत्वता । त्यासी चिखल लावूं जातां
८४२	।।ना.गा.ज.३३५.०२।।	तैसा जाण पांडुरंग । भोग भोगुनी नि:संग
८४३	।।ना.गा.ज.३३५.०३।।	सिद्ध सनकादिक । गणगंधर्व अनेक
८४४	।।ना.गा.ज.३३५.०४।।	जैसी वांझेची संतती । तैसी संसारउत्पती
८४५	।।ना.गा.ज.३३५.०५।।	तेथें कैचें धरिसी ध्यान । दासी जनी ब्रह्म पूर्ण
८४६	।।ना.गा.ज.३३६.०१।।	काळाचिये लेख । नाहीं ब्रह्मा विष्णु मुख्य
८४७	।।ना.गा.ज.३३६.०२।।	युग एक लव झडे । तोही न सरे काळापुढें
८४८	।।ना.गा.ज.३३६.०३।।	अविद्येने नवल केलें । मिथ्या देह सत्य केलें
८४९	।।ना.गा.ज.३३६.०४।।	महीपाळ स्वर्गपाळ । तेही ग्रासले समूळ
८५०	।।ना.गा.ज.३३६.०५।।	वर्म चुकलीं बापुडीं । दासी जनी विठ्ठल जोडी
८५१	।।ना.गा.ज.३३७.०१।।	रक्तवर्ण त्रिकुट स्थान । श्रीहाट पाहे श्वेतवर्ण
८५२	।।ना.गा.ज.३३७.०२।।	श्यामवर्ण तें गोलाट । निळबिंदू औटपीट
८५३	।।ना.गा.ज.३३७.०३।।	वरी भ्रमरगुंफा पाहे । दशमद्वारीं गुरु आहे
८५४	।।ना.गा.ज.३३७.०४।।	नवद्वारातें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी
८५५	।।ना.गा.ज.३३८.०१।।	शून्यावरी शून्य पाहे । तयावरी शून्य आहे
८५६	।।ना.गा.ज.३३८.०२।।	प्रथम शून्य रक्तवर्ण । त्याचें नांव अध:शून्य
८५७	।।ना.गा.ज.३३८.०३।।	उर्ध्वशून्य श्वेतवर्ण । मध्यशून्य श्यामवर्ण
८५८	।।ना.गा.ज.३३८.०४।।	महाशून्य वर्ण नीळ । त्यांत स्वरूप केवळ

८५९	।।ना.गा.ज.३३८.०५।।	अनाहुत घंटा श्रवणीं । ऐकुनी विस्मित जाहली जनी
८६०	।।ना.गा.ज.३३९.०१।।	ज्योत पहा चमकली । काय सांगूं त्याची बोली
८६१	।।ना.गा.ज.३३९.०२।।	प्रवृत्ति निवृत्ति दोघीजणी । लीन होती त्याच्या चरणीं
८६२	।।ना.गा.ज.३३९.०३।।	परा पश्यंती मध्यमा । वैखरीची जाली सीमा
८६३	।।ना.गा.ज.३३९.०४।।	चारी वाचा कुंठित जाहली । सोहं ज्योत प्रकाशली
८६४	।।ना.गा.ज.३३९.०५।।	ज्योत परब्रह्मीं जाणा । जनी म्हणे निरंजना
८६५	।।ना.गा.ज.३४०.०१।।	ज्योत परब्रह्मीं होय । खेचरी दर्पणीनें पाहे
८६६	।।ना.गा.ज.३४०.०२।।	ईडा पिंगळा सुशुम्ना । तिन्ही पाहे हृदयभुवना
८६७	।।ना.गा.ज.३४०.०३।।	हळू हळू रीघ करी । सूक्ष्म हृदय अंतरीं
८६८	।।ना.गा.ज.३४०.०४।।	हृदयकमलावरी जासी । जनी म्हणे मुक्त होसी
८६९	।।ना.गा.ज.३४१.०१।।	नाहीं आकाश घडणी । पाहा स्वरूपाची खाणी
८७०	।।ना.गा.ज.३४१.०२।।	स्वरूप हे अगोचर । गुरु करिती गोचर
८७१	।।ना.गा.ज.३४१.०३।।	गोचर करिताती जाणा । दृष्टि दिसे निरंजना
८७२	।।ना.गा.ज.३४१.०४।।	नाहीं हात पाय त्यासी । जनी म्हणे स्वरूपासी
८७३	।।ना.गा.ज.३४२.०१।।	माझे मनीं जें जें होतें । तें तें दिधलें अनंतें
८७४	।।ना.गा.ज.३४२.०२।।	देह नेउनी विदेही केलें । शांति देउनी मीपण नेलें
८७५	।।ना.गा.ज.३४२.०३।।	मूळ नेलें हें क्रोधाचें । ठाणें केलें विवेकाचें
८७६	।।ना.गा.ज.३४२.०४।।	निज पदीं दिधला ठाव । जनी म्हणे दाता देव
८७७	।।ना.गा.ज.३४३.०१।।	धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा
८७८	।।ना.गा.ज.३४३.०२।।	कामधाम माझें केशवाचे पायीं । दिननिशीं पाहे हारपली
८७९	।।ना.गा.ज.३४३.०३।।	शुक सनकादिकां जेणें सुखी केलें । तें सुख राहिलें माझ्या मनीं
८८०	।।ना.गा.ज.३४३.०४।।	जनी म्हणे जगीं अलभ्य लाभ झाला । हरी सांपडला विटेवरी
८८१	।।ना.गा.ज.३४४.०१।।	दळितां कांडितां । तुज गाईन अनंता
८८२	।।ना.गा.ज.३४४.०२।।	न विसंबें क्षणभरी । तुझें नाम गा मुरारी
८८३	।।ना.गा.ज.३४४.०३।।	नित्य हाचि कारभार । मुखीं हरि निरंतर
८८४	।।ना.गा.ज.३४४.०४।।	मायबाप बंधुबहिणी । तूं बा सखा चक्रपाणि

८८५	।।ना.गा.ज.३४४.०५।।	लक्ष लागलें चरणासी । म्हणे नामयाची दासी
८८६	।।ना.गा.ज.३४५.०१।।	चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवर पाहूं
८८७	।।ना.गा.ज.३४५.०२।।	हातीं टाळी मुखीं हरी । गात जाऊं महाद्वारीं
८८८	।।ना.गा.ज.३४५.०३।।	स्नान करूं भिवरेसी । पुंडलिका पायांपाशीं
८८९	।।ना.गा.ज.३४५.०४।।	डोळे भरून पाहूं देवा । तेणें विसरूं देहभावा
८९०	।।ना.गा.ज.३४५.०५।।	ऐसा निश्चय करूनी । म्हणे नामयाची जनी
८९१	।।ना.गा.ज.३४६.०१।।	जनी म्हणे नामयासी । चला जाऊं पंढरीसी
८९२	।।ना.गा.ज.३४६.०२।।	आला विषयाचा कंटाळा । जाऊं भेटूं त्या गोपाळा
८९३	।।ना.गा.ज.३४६.०३।।	आवडीनें जगजेठी । गळां घालूनियां मिठी
८९४	।।ना.गा.ज.३४६.०४।।	आवडीनें गुज कानीं । म्हणे नामयाची जनी
८९५	।।ना.गा.ज.३४७.०१।।	तुझा लोभ नाहीं देवा । तुझी करीन मी सेवा
८९६	।।ना.गा.ज.३४७.०२।।	नाहीं अंगीं थोरपण । मिथ्या धरीसी गुमान
८९७	।।ना.गा.ज.३४७.०३।।	रागा येउनी काय करिशी । तुझें बळ आम्हांपाशीं
८९८	।।ना.गा.ज.३४७.०४।।	नाहीं सामर्थ्य तुज हरी । जनी म्हणे धरिली चोरी
८९९	।।ना.गा.ज.३४८.०१।।	तुझे चरणीं घालूनि मिठी । चाड नाहीं रे वैकुंठीं
९००	।।ना.गा.ज.३४८.०२।।	सर्वभावें गाईन नाम । सखा तूंचि आत्माराम
९०१	।।ना.गा.ज.३४८.०३।।	नित्य पाय वंदिन माथा । तेणें नासे भवभय व्यथा
९०२	।।ना.गा.ज.३४८.०४।।	रूप न्याहाळीन दृष्टी । सर्व सुखें सांगेन गोष्टी
९०३	।।ना.गा.ज.३४८.०५।।	दीनानाथा चक्रपाणि। दासी जनी लावीं ध्यानीं
९०४	।।ना.गा.ज.३४९.०१।।	आतां भीत नाहीं देवा । आदि अंत तुझा ठावा
९०५	।।ना.गा.ज.३४९.०२।।	जालें नामाचेनि बळकट । तेणें वैकुंठ पायवाट
९०६	।।ना.गा.ज.३४९.०३।।	ज्ञान वैराग्य विवेक बळें । तें तंव आम्हांसवें खेळे
९०७	।।ना.गा.ज.३४९.०४।।	दया क्षमा आम्हांपुढें । जनी म्हणे जाले वेडे
९०८	।।ना.गा.ज.३५०.०१।।	माझें चित्त तुझे पायीं । ठेवीं वेळोवेळां डोई
९०९	।।ना.गा.ज.३५०.०२।।	मुखीं उच्चार नामाचा । काया मनें जीवें वाचा
९१०	।।ना.गा.ज.३५०.०३।।	धरणें तें ऐसें धरूं । जनी म्हणे विठ्ठल स्मरूं

९११	।।ना.गा.ज.३५१.०१।।	आम्ही पातकांच्या राशी । आलों तुझ्या पायांपाशीं
९१२	।।ना.गा.ज.३५१.०२।।	मना येईल तें तूं करी । आतां तारी अथवा मारी
९१३	।।ना.गा.ज.३५१.०३।।	जनी म्हणे सृष्टीवरी । एक अससी तूं बा हरी
९१४	।।ना.गा.ज.३५२.०१।।	मना लागो हाचि धंदा । रामकृष्ण हरि गोविंदा
९१५	।।ना.गा.ज.३५२.०२।।	जिव्हे करूं नित्य नेम । सदा विठोबाचें नाम
९१६	।।ना.गा.ज.३५२.०३।।	नामामध्यें नामसार । जप करी निरंतर
९१७	।।ना.गा.ज.३५२.०४।।	म्हणे जनी राम म्हणा । मंत्र सकळ हा जाणा
९१८	।।ना.गा.ज.३५३.०१।।	स्मरण तें हेंचि करूं । वाचे रामराम स्मरूं
९१९	।।ना.गा.ज.३५३.०२।।	आणिक न करूं तें काम । वाचे धरूं हाचि नेम
९२०	।।ना.गा.ज.३५३.०३।।	सुकृताचें फळ । जनी म्हणे हें केवळ
९२१	।।ना.गा.ज.३५४.०१।।	मनामागें मन लावूं । तेथें सर्व सुख पाहूं
९२२	।।ना.गा.ज.३५४.०२।।	मग आम्हां काय उणें । दया करी नारायण
९२३	।।ना.गा.ज.३५४.०३।।	जनी म्हणे ऐसें मन । करूं देवा हो आधिन
९२४	।।ना.गा.ज.३५५.०१।।	सत्त्व रज तमें असे हें बांधीलें । शरीर दृढ जालें अहंकारें
९२५	।।ना.गा.ज.३५५.०२।।	सांडी अहंकार धरी दृढभाव । हृदयीं पंढरिराव धरोनियां
९२६	।।ना.गा.ज.३५५.०३।।	नामयाची जनी भक्तीसी भुलली । ते चरणीं राहिली विठोबाचे
९२७	।।ना.गा.ज.३५६.०१।।	नित्य सारूं हरीकथा । तेथें काळ काय जातां
९२८	।।ना.गा.ज.३५६.०२।।	वनवासी कां धाडिलें । कृपाळें बा हो विठ्ठलें
९२९	।।ना.गा.ज.३५६.०३।।	आशा मनिषा तृषा तिन्ही । ह्या तो ठेविल्या बांधोनि
९३०	।।ना.गा.ज.३५६.०४।।	काम क्रोध विषय जाले । हें तो मोहोनि राहिले
९३१	।।ना.गा.ज.३५६.०५।।	अवलोकुनि कृपादृष्टी । जनी म्हणे देई भेटी
९३२	।।ना.गा.ज.३५७.०१।।	करूं हरीचें कीर्तन । गाऊं निर्मळ ते गुण
९३३	।।ना.गा.ज.३५७.०२।।	सदा धरूं संतसंग । मुखीं म्हणूं पांडुरंग
९३४	।।ना.गा.ज.३५७.०३।।	करूं जनांवरी कृपा । रामकृष्ण म्हणवूं लोकां
९३५	।।ना.गा.ज.३५७.०४।।	जनी म्हणे किती करूं । नाम बळकट धरूं
९३६	।।ना.गा.ज.३५८.०१।।	आनंदाचे डोहीं । जो कां समूळ जाला नाहीं

९३७	।।ना.गा.ज.३५८.०२।।	कीर्तनें जन्मला । हरीभक्तीनें शिंपिला
९३८	।।ना.गा.ज.३५८.०३।।	आळवितसे अंतवरी । वाचा नाम लाहो करी
९३९	।।ना.गा.ज.३५८.०४।।	समूळ जाला नाहीं । देहे जनी विठ्ठल पायीं
९४०	।।ना.गा.ज.३५९.०१।।	आम्ही स्वर्ग लोक मानूं जैसा ओक । देखोनियां सुख पंढरीचे
९४१	।।ना.गा.ज.३५९.०२।।	नलगे वैकुंठ न वांछुं कैलास। सर्वस्वाची आस विठोपायीं
९४२	।।ना.गा.ज.३५९.०३।।	नलगे संतति धन आणि मान । एक करणें ध्यान विठोबाचें
९४३	।।ना.गा.ज.३५९.०४।।	सत्य कीं मायीक आमुचें बोलणें । तुमची तुम्हा आण सांगा हरी
९४४	।।ना.गा.ज.३५९.०५।।	जीवभाव आम्ही सांडुं ओवाळुनी । म्हणे दासी जनी नामयाची
९४५	।।ना.गा.ज.३६०.०१।।	आतां येतो स्वामी आम्ही । कृपा असो द्यावी तुम्ही
९४६	।।ना.गा.ज.३६०.०२।।	बहु दिवस सांभाळ केला । पुन्हा जन्म नाहीं दिला
९४७	।।ना.गा.ज.३६०.०३।।	थोर सुकृताच्या राशी । तुमचे पाय मजपाशीं
९४८	।।ना.गा.ज.३६०.०४।।	ऐसा नामदेव बोले । ऐकोनि दासी जनी डोले
९४९	।।ना.गा.ज.३६१.०१।।	मी तो समर्थाची दासी । मिठी घालीन पायासी
९५०	।।ना.गा.ज.३६१.०२।।	हाचि माझा दृढभाव । करीन नामाचा उत्सव
९५१	।।ना.गा.ज.३६१.०३।।	आम्हां दासीचें हें काम । मुखीं विठ्ठल हरिनाम
९५२	।।ना.गा.ज.३६१.०४।।	सर्व सुख पायीं लोळे । जनीसंगें विठ्ठल खेळे
९५३	।।ना.गा.ज.३६२.०१।।	नामयाचे ठेवणें जनीस लाधलें । धन सांपडलें विटेवरी
९५४	।।ना.गा.ज.३६२.०२।।	धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा
९५५	।।ना.गा.ज.३६२.०३।।	कामधाम माझें विठोबाचे पाय । दिवसानिशीं माये हारपली
९५६	।।ना.गा.ज.३६२.०४।।	माझ्या वडिलांचे दैवत तो हा पंढरिनाथ। तेणें माझा आर्त पुरविला
९५७	।।ना.गा.ज.३६२.०५।।	संसारींचें सुख नेघे माझे चित्तीं । तरीच पुनरावृत्ति चुकविल्या
९५८	।।ना.गा.ज.३६२.०६।।	नामयाचे जनी आनंद पैं जाला । हृदयीं बिंबला पांडुरंग
९५९	।।ना.गा.ज.३६३.०१।।	धन्य ज्याचे चरणीं गंगाओघ जाला । मस्तकीं धरिला उमाकांतें
९६०	।।ना.गा.ज.३६३.०२।।	धुंडितां ते पाय शिणला तो ब्रह्मा । बोल ठेवीं कर्मा आपुलिया
९६१	।।ना.गा.ज.३६३.०३।।	शुक सनकादिक फिरती हरिजन । नारदादि गाणें जयासाठीं
९६२	।।ना.गा.ज.३६३.०४।।	ते चरण आम्हांसी गवसले अनायासी । धन्य जाली दासी जनी म्हणे

९६३	।।ना.गा.ज.३६४.०१।।	डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारीं जाईन मी
९६४	।।ना.गा.ज.३६४.०२।।	हातीं घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आतां मज मना कोण करी
९६५	।।ना.गा.ज.३६४.०३।।	पंढरीच्या पेठें मांडियेलें पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही
९६६	।।ना.गा.ज.३६४.०४।।	जनी म्हणे देवा मी जालें वेसवा । रिघालें केशवा घर तुझें
९६७	।।ना.गा.ज.३६५.०१।।	जात्यावरील गीतासी । दळणमिसें गोविंदासी
९६८	।।ना.गा.ज.३६५.०२।।	देह बुद्धीचें वैरण । बरवा कण हो निसून
९६९	।।ना.गा.ज.३६५.०३।।	नामाचा हो कोळी । गुरुआज्ञेतें मी पाळीं
९७०	।।ना.गा.ज.३६५.०४।।	मज भरवसा नाम्याचा । गजर दासी जनीचा
९७१	।।ना.गा.ज.३६६.०१।।	सुंदर माझें जातें गे फिरे भंवते । ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा विठ्ठला
९७२	।।ना.गा.ज.३६६.०२।।	जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे । लावुनी पांचीं बोटें गे तूं येरे बा विठ्ठला
९७३	।।ना.गा.ज.३६६.०३।।	सासु आणि सासरा दीर तो तिसरा । ओंव्या गाऊं भ्रतारा तूं येरे बा विठ्ठला
९७४	।।ना.गा.ज.३६६.०४।।	बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी । ओंव्या गाऊं बसूनि तूं येरे बा विठ्ठला
९७५	।।ना.गा.ज.३६६.०५।।	प्रपंचदळण दळिलें पीठ भरिलें । सासुपुढें ठेविलें तूं येरे बा विठ्ठला
९७६	।।ना.गा.ज.३६६.०६।।	सत्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरिलें । पाप तें उतूं गेलें तूं येरे बा विठ्ठला
९७७	।।ना.गा.ज.३६६.०७।।	जनी जातें गाइल कीर्त राहिल । थोडासा लाभ होईल तूं येरे बा विठ्ठला
९७८	।।ना.गा.ज.३६७.०१।।	वैराग्य अभिमानें फिरविलें जातें । म्हणवोनि यातें भाव खुंटा
९७९	।।ना.गा.ज.३६७.०२।।	संचित मातृका वैरण घातली। अव्यक्तिं दळिली व्यक्ताव्यक्त
९८०	।।ना.गा.ज.३६७.०३।।	नाम तें रूपा दळियेलें सर्व । पीठ भरी राव पंढरीचा
९८१	।।ना.गा.ज.३६७.०४।।	नवल हा देव बैसला दळणीं । नाहीं केली जनी नामयाची
९८२	।।ना.गा.ज.३६८.०१।।	भक्तिभावें वोळगा देव । महाराज पंढरिराव
९८३	।।ना.गा.ज.३६८.०२।।	पंढरीसी जावें । संतजनीं भेटावें
९८४	।।ना.गा.ज.३६८.०३।।	भक्ति आहे ज्याचे चित्तीं । त्याला पावतो निश्चिती
९८५	।।ना.गा.ज.३६८.०४।।	भाव धरा मनीं । म्हणे नामयाची जनी
९८६	।।ना.गा.ज.३६९.०१।।	बांधोनियां हात गयावळ मारिती । दंड ते करिती मोक्षासाठीं
९८७	।।ना.गा.ज.३६९.०२।।	गेले ते पितर मोक्षालागीं तुझें। आतां देई माझे दक्षिणेसी
९८८	।।ना.गा.ज.३६९.०३।।	बापुडे केश बोडिती मिशी दाढी । मग दक्षणा हिरडी खातसे हे

९८९	।।ना.गा.ज.३६९.०४।।	फार काय सांगू मेल्याविण मुक्ति । नाहीं ते वांछिती स्वप्नसुख
९९०	।।ना.गा.ज.३६९.०५।।	अनंत जन्म मृत्यु होतां जैसें दु:ख । त्याहुनि विशेष आहे तेथें
९९१	।।ना.गा.ज.३६९.०६।।	भांबावले जन धांवे आटाआटी । सांडूनियां कोटि अनंत पद
९९२	।।ना.गा.ज.३६९.०७।।	नलगे गाळावें नलगे तळावें। नलगे मरावें मुक्तिसाठीं
९९३	।।ना.गा.ज.३६९.०८।।	मुक्ति लागे पायां जाऊनियां पाहे । जीव आतां देह जनी नाहीं
९९४	।।ना.गा.ज.३७०.०१।।	धनियाचे पडपें गेला । जीव जिवें नाहीं जाला
९९५	।।ना.गा.ज.३७०.०२।।	देहीं देह हारपले । गेह गेहातील जालें
९९६	।।ना.गा.ज.३७०.०३।।	जाला आश्रम आश्रमा । जनी म्हणे धरा प्रेमा
९९७	।।ना.गा.ज.३७१.०१।।	जाली जगाचिये सीमा। वस्तुभाव येर व्योमा
९९८	।।ना.गा.ज.३७१.०२।।	पहा हो अधिकारी । नको असोनी भिकारी
९९९	।।ना.गा.ज.३७१.०३।।	पट तंतूचा घडला । घट मृत्तिकेचा केला
१०००	।।ना.गा.ज.३७१.०४।।	पहा श्वानसमची पंडित । जनी म्हणे एकचि मात
१००१	।।ना.गा.ज.३७२.०१।।	नाद पडे कानीं । मृग पैज घाली प्राणी
१००२	।।ना.गा.ज.३७२.०२।।	आवडी अंतरीं । गज मेला पडे गारी
१००३	।।ना.गा.ज.३७२.०३।।	चोख पाहे अंग । दीपे नाडला पतंग
१००४	।।ना.गा.ज.३७२.०४।।	गोडी रस गळा । मच्छ अडकला गळा
१००५	।।ना.गा.ज.३७२.०५।।	गंधें अलि नेला । म्हणे जनी तोचि मेला
१००६	।।ना.गा.ज.३७३.०१।।	भृंगीचिया अंगीं कोणतें हो बळ । शरिरें अनाढळ केली आळी
१००७	।।ना.गा.ज.३७३.०२।।	काय तिनें तपमुद्रा धरियेली। म्हणोनियां जाली भृंगी अंगें
१००८	।।ना.गा.ज.३७३.०३।।	अरे बा शहाणिया तैसा करी जप । संतयोगें पाप नाहीं होय
१००९	।।ना.गा.ज.३७३.०४।।	नामयाची जनी पिटि ती डांगोरा । संदेह न धरा करा पूजा
१०१०	।।ना.गा.ज.३७४.०१।।	जहाज तारिलें तारिलें । शेवटीं उगमासीं आलें
१०११	।।ना.गा.ज.३७४.०२।।	भाव शिडासी लाविला । नाम फरारा सोडिला
१०१२	।।ना.गा.ज.३७४.०३।।	कथा भरियेलें केणें । घ्या रे नका दैन्यवाणें
१०१३	।।ना.गा.ज.३७४.०४।।	एका नामाचा विसार । आधीं देउनी निर्धार
१०१४	।।ना.गा.ज.३७४.०५।।	केणें देतो फुकासाठीं । आर्तभूत व्हावें पोटीं

१०१५	।।ना.गा.ज.३७४.०६।।	आर्तभूत व्हा रे । जनी म्हणे केणें घ्यारे
१०१६	।।ना.गा.ज.३७५.०१।।	हेंचि देवाचें भजन । सदा राहे समाधान
१०१७	।।ना.गा.ज.३७५.०२।।	येर अवघे संसारिक । इंद्र देव ब्रह्मादिक
१०१८	।।ना.गा.ज.३७५.०३।।	वरकडाचा पाड किती । जनी देवास बोलती
१०१९	।।ना.गा.ज.३७६.०१।।	चोरा संगतीनें गेला । वाटें जातां नागवला
१०२०	।।ना.गा.ज.३७६.०२।।	तैसी सांडोनियां भक्ति । धरी विषयाची संगती
१०२१	।।ना.गा.ज.३७६.०३।।	अग्निसवें खेळे । न जळे तो परी पोळे
१०२२	।।ना.गा.ज.३७६.०४।।	विश्वासला चोरा । जनी म्हणे घाला खरा
१०२३	।।ना.गा.ज.३७७.०१।।	जगीं विठ्ठल रुक्मिणी । तुम्ही अखंड स्मरा ध्यानीं
१०२४	।।ना.गा.ज.३७७.०२।।	मग तुज काय उणें । जाले सोयरें त्रिभुवनें
१०२५	।।ना.गा.ज.३७७.०३।।	साराचें जें सार । भवसिंधु उतरी पार
१०२६	।।ना.गा.ज.३७७.०४।।	मन ठेउनी चरणीं । म्हणे नामयाची जनी
१०२७	।।ना.गा.ज.३७८.०१।।	सुखें संसार करावा । माजीं विठ्ठल आठवावा
१०२८	।।ना.गा.ज.३७८.०२।।	असोनियां देहीं नाहीं । छाया पुरुष जैसा पाहीं
१०२९	।।ना.गा.ज.३७८.०३।।	आहो सूर्य घटाकासी । तैसी देहीं जनी दासी
१०३०	।।ना.गा.ज.३७९.०१।।	अंगीं ल्याला शांती । दया क्षमा सर्वांभूतीं
१०३१	।।ना.गा.ज.३७९.०२।।	तेथें जाऊन पाहे देवा । ब्रह्मादिक करिती सेवा
१०३२	।।ना.गा.ज.३७९.०३।।	आवडी असे पैं कीर्तनीं । लवे संताचे चरणीं
१०३३	।।ना.गा.ज.३७९.०४।।	जैसी दया पुत्रावरी । तेंचि पाहे चराचरीं
१०३४	।।ना.गा.ज.३७९.०५।।	बहु अपराध केला । म्हणे जनी तो रक्षिला
१०३५	।।ना.गा.ज.३८०.०१।।	मृदु वाहे पाणी । व्रज मानी ऐसें लोणी
१०३६	।।ना.गा.ज.३८०.०२।।	क्षमा ऐसी जिवीं । क्रोधभूत हे पृथ्वी
१०३७	।।ना.गा.ज.३८०.०३।।	गंधमाती सरी । करुनी आपुली कस्तुरी
१०३८	।।ना.गा.ज.३८०.०४।।	गुणदोष मना नाणीं । म्हणे बहिरी होय जनी
१०३९	।।ना.गा.ज.३८१.०१।।	आपणची सारा । पाहावें कीं नारीनरां
१०४०	।।ना.गा.ज.३८१.०२।।	पटाकारणें हे जनी । पांडुरंग तंतु मानी

१०४१	।।ना.गा.ज.३८१.०३।।	भावेंवीण भजलें । भिऊनियां झांकी डोळे
१०४२	।।ना.गा.ज.३८१.०४।।	म्हणे काय पाहूं येथें । भिन्न नव्हे वस्तु जेथें
१०४३	।।ना.गा.ज.३८१.०५।।	भिन्नाभिन्न नाहीं मनीं । म्हणे नामयाची जनी
१०४४	।।ना.गा.ज.३८२.०१।।	आक्रोशें ध्यानासी आणी पुरुषोत्तमा । पृथ्वीयेसी क्षमा उणी आणी
१०४५	।।ना.गा.ज.३८२.०२।।	अखंडित शुद्ध असावें अंतर । लोणिया कठोर वाटे मनीं
१०४६	।।ना.गा.ज.३८२.०३।।	बोले तें वचन बहु हळुवट । सुमनाअंगीं दाट जडभार
१०४७	।।ना.गा.ज.३८२.०४।।	नाम तें स्मरण अमृतसंजिवनी । म्हणे दासी जनी हेंचि करा
१०४८	।।ना.गा.ज.३८३.०१।।	आम्ही आणि संत, संत आणि आम्ही । सूर्य आणि रश्मि काय दोन
१०४९	।।ना.गा.ज.३८३.०२।।	दीप आणि सारंग सारंग आणि दीप । ध्यान आणि जप काय दोन
१०५०	।।ना.गा.ज.३८३.०३।।	शांति आणि विरक्ति विरक्ति आणि शांति । समाधान काय तृप्ति दोन
१०५१	।।ना.गा.ज.३८३.०४।।	रोग आणि व्याधी व्याधी आणि रोग । देह आणि अंग काय दोन
१०५२	।।ना.गा.ज.३८३.०५।।	कान आणि श्रोत्र श्रोत्र आणि कान । यश आणि मान काय दोन
१०५३	।।ना.गा.ज.३८३.०६।।	देव आणि संत संत आणि देव । म्हणे जनी भाव एक ऐसा
१०५४	।।ना.गा.ज.३८४.०१।।	संत आणि देव मानी जो वेगळे । तेणें तेथें आगळ केलें दोष
१०५५	।।ना.गा.ज.३८४.०२।।	माता ते वेगळी कुच ते उरीचें। म्हणोनियां त्याचें मर्दन करी
१०५६	।।ना.गा.ज.३८४.०३।।	पाप तें वेगळें पुण्य तें आगळें । म्हणोनी गरळें पितो मद
१०५७	।।ना.गा.ज.३८४.०४।।	दिवस उगवतां पाहों नये त्यातें । जेणें हो संतांतें द्वेषियेलें
१०५८	।।ना.गा.ज.३८४.०५।।	तयाचा विटाळ वाहे रजस्वला । म्हणे जनी चांडाळा बोलु नका
१०५९	।।ना.गा.ज.३८५.०१।।	पाणी तेंचि मेघ मेघ तेंचि पाणी । काय या दोन्हीपणीं वेगळीक
१०६०	।।ना.गा.ज.३८५.०२।।	माती तेचि धूळ धूळ तेचि माती । भेंडा आणि भिंती काय दोन
१०६१	।।ना.गा.ज.३८५.०३।।	साखरीं ते गोडी गोडी ते साखरेसी । थिजलें तुपासी काय दोन्ही
१०६२	।।ना.गा.ज.३८५.०४।।	डोळा तें बुबुळ बुबुळ तो डोळा । शांति ज्ञानकळा काय भिन्न
१०६३	।।ना.गा.ज.३८५.०५।।	वदन ते ओठ ओठ ते वदन । क्षेम आलिंगन काय दोन
१०६४	।।ना.गा.ज.३८५.०६।।	जीभ ते पडजीभ पडजीभ ते जीभ । आशा आणि लोभ काय दोन
१०६५	।।ना.गा.ज.३८५.०७।।	संत तेचि देव देव तेचि संत । म्हणे जनी मात गोष्टी भिन्न
१०६६	।।ना.गा.ज.३८६.०१।।	प्रपंची जो रडे । ब्रह्मवन त्यातें जडे

१०६७	।।ना.गा.ज.३८६.०२।।	ऐसा अखंडित ब्रह्मीं । विठ्ठला जो कर्माकर्मी
१०६८	।।ना.गा.ज.३८६.०३।।	पुत्रदेह ध्याय ध्यानीं । कांता धन हे कामिनी
१०६९	।।ना.गा.ज.३८६.०४।।	सिंधुसी सांडावा । जनी म्हणे गा सदैवा
१०७०	।।ना.गा.ज.३८७.०१।।	काम लागे कृष्णापाठीं । केली स्मशानाची गांठी
१०७१	।।ना.गा.ज.३८७.०२।।	प्रेम कामें भुलविला । कृष्ण स्मशानासी नेला
१०७२	।।ना.गा.ज.३८७.०३।।	भुलविला मनीं । रुद्र पाहोनी मोहनी
१०७३	।।ना.गा.ज.३८७.०४।।	कन्येचिये पाठीं । ब्रह्म लागे हातवटी
१०७४	।।ना.गा.ज.३८७.०५।।	काम पराशरालागीं । ज्ञानासी लाविली आगी
१०७५	।।ना.गा.ज.३८७.०६।।	काम गेला शुकापाठीं । म्हणे जनी मारी काठी
१०७६	।।ना.गा.ज.३८८.०१।।	भजन करी महादेव । राम पूजी सदाशिव
१०७७	।।ना.गा.ज.३८८.०२।।	दोघे देव एक पाही । तयां ऐक्य दुजें नाहीं
१०७८	।।ना.गा.ज.३८८.०३।।	शिवा रामा नाहीं भेद । ऐसे देव तेही सिद्ध
१०७९	।।ना.गा.ज.३८८.०४।।	जनी म्हणे आत्मा एक । सर्व घटीं तो व्यापक
१०८०	।।ना.गा.ज.३८९.०१।।	पतंग सुखावला भारी । उडी घाली दीपावरी
१०८१	।।ना.गा.ज.३८९.०२।।	परि तो देहांती मुकला । दोहीं पदार्थी नाडिला
१०८२	।।ना.गा.ज.३८९.०३।।	ऐसे विषयाचे संगति । बहु गेले अधोगति
१०८३	।।ना.गा.ज.३८९.०४।।	ऐसे विषयानें भुलले । जनी म्हणे वायां गेले
१०८४	।।ना.गा.ज.३९०.०१।।	येऊनियां जन्मा एक । करा देहाचें सार्थक
१०८५	।।ना.गा.ज.३९०.०२।।	वाचे नाम विठ्ठलाचें । तेणें सार्थक जन्माचें
१०८६	।।ना.गा.ज.३९०.०३।।	ऐसा नामाचा महिमा । शेष वर्णितां जाली सीमा
१०८७	।।ना.गा.ज.३९०.०४।।	नाम शास्त्रीं त्रिभुवनीं । म्हणे नामयाची जनी
१०८८	।।ना.गा.ज.३९१.०१।।	विवेकाची पेठ । उघडी पंढरीची वाट
१०८९	।।ना.गा.ज.३९१.०२।।	तेथें नाहीं कांहीं धोका । उठाउठी भेटे सखा
१०९०	।।ना.गा.ज.३९१.०३।।	मरोनियां जावें । शरण विठोबासी व्हावें
१०९१	।।ना.गा.ज.३९१.०४।।	म्हणे नामयाची जनी । देव करा ऐसा ऋणी
१०९२	।।ना.गा.ज.३९२.०१।।	शरीर हें जायाचें नश्वर आणिकांचें । म्हणाल जरी त्यांचे काय काज

१०९३	।।ना.गा.ज.३९२.०२।।	आंबरसें चोखिला बिजसालें सांडिला । पुढें तेणें उभविला दुजा एकू
१०९४	।।ना.गा.ज.३९२.०३।।	समूळ साल माया सांडुनियां दिजे । वरि अहं बीज जतन करा
१०९५	।।ना.गा.ज.३९२.०४।।	तें बीज भाजोनि करा ओवाळणी । संताचे चरणीं समूळ देह
१०९६	।।ना.गा.ज.३९२.०५।।	पुढें त्या बीजाची न करावी दुराशा। न धरावी आशा पुढिलांची
१०९७	।।ना.गा.ज.३९२.०६।।	आहे नाहीं देह धरी ऐसा भाव । म्हणे जनी देव सहज होसी
१०९८	।।ना.गा.ज.३९३.०१।।	नाना व्रत तप दानें । मुखीं हरीची स्मरणें
१०९९	।।ना.गा.ज.३९३.०२।।	येथें असो द्यावा भाव । पुरवी अंतरीचें देव
११००	।।ना.गा.ज.३९३.०३।।	हाचि विश्वास धरूनी । कृपा करील चक्रपाणि
११०१	।।ना.गा.ज.३९३.०४।।	भक्तिभाव ज्याचा पुरा । त्यासी धांवतो सामोरा
११०२	।।ना.गा.ज.३९३.०५।।	लक्ष लावा पायांपाशीं । म्हणे नामयाची दासी
११०३	।।ना.गा.ज.३९४.०१।।	शूरांचें तें शस्त्र कृपणाचे धन । विध्वंसिला प्राण हातां न ये
११०४	।।ना.गा.ज.३९४.०२।।	गजमाथां मोतीं सर्पाचा तो मान। असलीया प्राण हातां न ये
११०५	।।ना.गा.ज.३९४.०३।।	सिंहाचें तें नख पतिव्रतेचे स्तन । गेलियाही प्राण हातां न ये
११०६	।।ना.गा.ज.३९४.०४।।	वीराल्यावांचुन देह अहंभाव । जनी म्हणे देव हातां न ये
११०७	।।ना.गा.ज.३९५.०१।।	संसारीं निधान लाधलें जनां । सद्गुरुचरणा सेवी बापा
११०८	।।ना.गा.ज.३९५.०२।।	कायावाचामनें तयास देऊन । वस्तु मागून घे अगोचर
११०९	।।ना.गा.ज.३९५.०३।।	तें गोचर नव्हे जाण गुरुकृपेंवीण । एऱ्हवीं तें आपणामाजीं आहे
१११०	।।ना.गा.ज.३९५.०४।।	असतां सम्यक परि जना चुकामुक । भुलली निष्टंक मंत्रतंत्रें
११११	।।ना.गा.ज.३९५.०५।।	माळ वेष्टण करीं टपोर घेतीं शिरीं । नेम अष्टोत्तरीं करिताती
१११२	।।ना.गा.ज.३९५.०६।।	जो माळ करविता वाचेसि वदविता । तया हृदयस्था नेणे कोणी
१११३	।।ना.गा.ज.३९५.०७।।	सोहं आत्मा प्रगट जो दाखवी वाट। सद्गुरु वरिष्ठ तोचि जाणा
१११४	।।ना.गा.ज.३९५.०८।।	तया उत्तीर्णता व्हावया पदार्था । न देखों सर्वथा जनी म्हणे
१११५	।।ना.गा.ज.३९६.०१।।	कीर्तनासी जातां मार्गीं टाकी पाय । अश्वमेघ होये फळ तया
१११६	।।ना.गा.ज.३९६.०२।।	ओखद तरी तेथें घडे हिंसा। जन्मवेद भाषा वेदापाशीं
१११७	।।ना.गा.ज.३९६.०३।।	गंगा वाराणसी धरोनि पदरीं । चाललीसे नारी दोहीकडे
१११८	।।ना.गा.ज.३९६.०४।।	आमच्या बापाची ऐकावया कीर्ति । जाऊं म्हणोन घेती ऐक्य कथीं

१११९	।।ना.गा.ज.३९६.०५।।	कीर्तनासी जावें कैसें कोणेपरी । असूं द्या अंतरीं गोष्ट हीत
११२०	।।ना.गा.ज.३९६.०६।।	वऱ्हाडी धांवे जैसा प्रयोजनीं । तान्हेलें तें पाणी पुसावया
११२१	।।ना.गा.ज.३९६.०७।।	व्याकुळ तें एक चुकलें बालक । त्याचा करीत शोक धांवे माता
११२२	।।ना.गा.ज.३९६.०८।।	अशी कथे जातां गंगा त्या चरणीं । म्हणे दासी जनी भाक मानी
११२३	।।ना.गा.ज.३९७.०१।।	कीर्तनाचा रस आवडे नरासी । लागती पायांसी मुक्ति चाऱ्ही
११२४	।।ना.गा.ज.३९७.०२।।	वारी पंढरीची निश्चय ज्यां केला । वारकरी जाला पंढरीचा
११२५	।।ना.गा.ज.३९७.०३।।	मोक्षाचा जो मोक्ष मुक्तीची जी मुक्ति । जनी म्हणे किती सांगू फार
११२६	।।ना.गा.ज.३९८.०१।।	गौळण म्हणे गौळणीला । पुत्र जाहला यशोदेला
११२७	।।ना.गा.ज.३९८.०२।।	एक धांवती एकीपुढें । ताटी वाटी सुंठवडे
११२८	।।ना.गा.ज.३९८.०३।।	सुईणीची गलबल जाली । दासी जनी हेल घाली
११२९	।।ना.गा.ज.३९९.०१।।	मग म्हणे नंदाजीला । पुत्रमुख पाहूं चला
११३०	।।ना.गा.ज.३९९.०२।।	स्नान घालूनि त्यासी । वस्त्रें दिधलीं ब्राह्मणांसी
११३१	।।ना.गा.ज.३९९.०३।।	परब्रह्म तें पाहूनी । ब्रह्मीं मिळे दासी जनी
११३२	।।ना.गा.ज.४००.०१।।	आलिया ब्राह्मणासी दान । द्रव्य दिधलें अपार जाण
११३३	।।ना.गा.ज.४००.०२।।	गाईम्हसींचीं खिल्लारें । ब्राह्मणा दिधलीं अपारें
११३४	।।ना.गा.ज.४००.०३।।	कामधेनूची दुभनी । कल्पवृक्षाची दाटणी
११३५	।।ना.गा.ज.४००.०४।।	ऐसा आनंद सोहळा । दासी जनी पाहे डोळां
११३६	।।ना.गा.ज.४०१.०१।।	वैकुंठींचा हरी । तान्हा यशोदेच्या घरीं
११३७	।।ना.गा.ज.४०१.०२।।	रांगतसे हा अंगणीं । माथा जावळाची वेणी
११३८	।।ना.गा.ज.४०१.०३।।	पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे
११३९	।।ना.गा.ज.४०१.०४।।	धन्य यशोदा ते माय । दासी जनी वंदी पाय
११४०	।।ना.गा.ज.४०२.०१।।	ब्रह्मा वंदी ज्याचे पाय । त्याची यशोदा ती माय
११४१	।।ना.गा.ज.४०२.०२।।	सामराज्याचा जो दानी । मागे यशोदेसी लोणी
११४२	।।ना.गा.ज.४०२.०३।।	क्षीरसागर ज्याचे चरणीं । त्याला पायावरतें न्हाणी
११४३	।।ना.गा.ज.४०२.०४।।	देव ब्रह्मांड पालकीं । त्याची टाळू हातें माखीं
११४४	।।ना.गा.ज.४०२.०५।।	शुक सनकादिक योगीं । जनी म्हणे दळूं लागी

११४५	।।ना.गा.ज.४०३.०१।।	अहो गोकुळींच्या देवा । आदि अंत तुम्हां ठावा
११४६	।।ना.गा.ज.४०३.०२।।	न लगे पुसावें हो कोणा । आदि अंत हो सुजाणा
११४७	।।ना.गा.ज.४०३.०३।।	जनी म्हणे वो गोकुळीं । किती खासी उष्टावळी
११४८	।।ना.गा.ज.४०४.०१।।	असो थोरथोरांची मात । तूंचि मिळालासी गोपाळांत
११४९	।।ना.गा.ज.४०४.०२।।	त्यांच्या शिदोऱ्या सोडिसी । ग्रासोग्रासीं उच्छिष्ट खासी
११५०	।।ना.गा.ज.४०४.०३।।	न म्हणे सोंवळें ओंवळें । प्रत्यक्षचि तें ओवळें
११५१	।।ना.गा.ज.४०४.०४।।	स्वानंदाचे डोहीं हात । धुतले सर्वांही निश्चित
११५२	।।ना.गा.ज.४०४.०५।।	हातीं काठ्या पायीं जोडे । दासी जनी वाट झाडे
११५३	।।ना.गा.ज.४०५.०१।।	भावअक्षराची गांठी । ब्रह्मज्ञानानें गोमटी
११५४	।।ना.गा.ज.४०५.०२।।	ते हे माय ज्ञानेश्वरी । संतजना माहेश्वरी
११५५	।।ना.गा.ज.४०५.०३।।	ज्ञानेश्वर मंगळ मुनी । सेवा करी दासी जनी
११५६	।।ना.गा.ज.४०६.०१।।	गीतेवरी आन टीका । त्यांनीं वाढियेली लोकां
११५७	।।ना.गा.ज.४०६.०२।।	रत्नकनक ताटामाजीं । त्यानें वोगरिलें कांजी
११५८	।।ना.गा.ज.४०६.०३।।	एका ज्ञानेशावांचोनी । म्हणे नामयाची जनी
११५९	।।ना.गा.ज.४०७.०१।।	ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर
११६०	।।ना.गा.ज.४०७.०२।।	मरोनियां जावें । बा माझ्या पोटा यावें
११६१	।।ना.गा.ज.४०७.०३।।	ऐसें करीं माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा
११६२	।।ना.गा.ज.४०७.०४।।	जावें वोवाळुनी । जन्मोजन्मीं दासी जनी
११६३	।।ना.गा.ज.४०८.०१।।	मायेहूनि माय मानी । करी जिवाची ओंवाळणी
११६४	।।ना.गा.ज.४०८.०२।।	परलोकींचें तारूं । म्हणे माझा ज्ञानेश्वरू
११६५	।।ना.गा.ज.४०८.०३।।	वित्त गोत चित्त पाहे । सत्य वंदी गुरुचे पाय
११६६	।।ना.गा.ज.४०८.०४।।	पतिव्रते जैसा पती । जनी म्हणे सांगो किती
११६७	।।ना.गा.ज.४०९.०१।।	संत राउळा चालिले । ज्ञानेश्वर तंव बोले
११६८	।।ना.गा.ज.४०९.०२।।	केवढें नवल सांगावें । दासी जनीचें पद ल्याहावें
११६९	।।ना.गा.ज.४०९.०३।।	पाय जोडुनी विटेवरी । कटीं हात उभा हरी
११७०	।।ना.गा.ज.४०९.०४।।	रूप सांवळें सुंदर । कानीं कुंडल मनोहर

११७१	।।ना.गा.ज.४०९.०५।।	सोनसळा वैजयंती । पुढें गोपाळ नाचती
११७२	।।ना.गा.ज.४०९.०६।।	गरुडपारीं सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा
११७३	।।ना.गा.ज.४१०.०१।।	ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दां । चिदानंद बाबा लिही त्यांस
११७४	।।ना.गा.ज.४१०.०२।।	निवृत्तीचे बोल लिहिले सोपानें । मुक्ताईचीं वचनें ज्ञानदेवें
११७५	।।ना.गा.ज.४१०.०३।।	चांगयाचा लिहिणार शामा तो कांसार । परमानंद खेचर लिहित होता
११७६	।।ना.गा.ज.४१०.०४।।	सांगे पूर्णानंद लिही परमानंद। भगवंत भेटी आनंद रामानंद
११७७	।।ना.गा.ज.४१०.०५।।	सांवत्या माळ्याचा काशिबा गुरव । कूर्म्याचा वसुदेव काईत होता
११७८	।।ना.गा.ज.४१०.०६।।	चोखामेळ्याचा अनंतभट्ट अभ्यंग । म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग
११७९	।।ना.गा.ज.४११.०१।।	सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ति दातार
११८०	।।ना.गा.ज.४११.०२।।	महाविष्णुचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर
११८१	।।ना.गा.ज.४११.०३।।	ब्रह्मा सोपान तो जाला । भक्तां आनंद वर्तला
११८२	।।ना.गा.ज.४११.०४।।	आदि शक्ति मुक्ताबाई । दासी जनी लागे पायीं
११८३	।।ना.गा.ज.४१२.०१।।	सोपानाची ऐसी मूर्ति । विश्वकर्ता ब्रह्मा म्हणती
११८४	।।ना.गा.ज.४१२.०२।।	ऐसे बोले पुराणांत । सृष्टिकर्ता जो भगवंत
११८५	।।ना.गा.ज.४१२.०३।।	जनी म्हणे हा सोपान । ब्रह्मा अवतरला पूर्ण
११८६	।।ना.गा.ज.४१३.०१।।	नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्गुरु
११८७	।।ना.गा.ज.४१३.०२।।	कऱ्हेवरीं करुनी वस्ती । ब्रह्मपुरी तिशी म्हणती
११८८	।।ना.गा.ज.४१३.०३।।	माझ्या जिवींच्या जीवना । हृदयीं राहे तूं सोपाना
११८९	।।ना.गा.ज.४१३.०४।।	चीत्त उधवण्याचि सत्ता । जनी म्हणे माझ्या ताता
११९०	।।ना.गा.ज.४१४.०१।।	वाचे म्हणतां सोपान । प्राप्त वैकुंठचि जाण
११९१	।।ना.गा.ज.४१४.०२।।	सोपानदेव करितां जप । समूळ नासे त्रिविधताप
११९२	।।ना.गा.ज.४१४.०३।।	सोपानदेव धरितां ध्यानें । पुन: जन्मा नाहीं येणें
११९३	।।ना.गा.ज.४१४.०४।।	दासी जनी तल्लिन जाली । सोपानचरणीं विनटली
११९४	।।ना.गा.ज.४१५.०१।।	शालिवाहन शके अक्राशें नव्वद । निवृत्ति आनंद प्रगटले
११९५	।।ना.गा.ज.४१५.०२।।	त्र्याण्णवाच्या सालीं ज्ञानेश्वर प्रगटले । सोपान देखिले शाण्णवांत
११९६	।।ना.गा.ज.४१५.०३।।	नव्याण्णवाच्या सालीं मुक्ताई देखिली । जनी म्हणे केली मात त्यांनीं

११९७	।।ना.गा.ज.४१६.०१।।	सेना न्हावी भक्त भला । तेणें देव भुलविला
११९८	।।ना.गा.ज.४१६.०२।।	नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी
११९९	।।ना.गा.ज.४१६.०३।।	रूप पालटोनि गेला । सेना न्हावी विठ्ठल जाला
१२००	।।ना.गा.ज.४१६.०४।।	काखें घेउनी धोकटी । गेला राजियाचे भेटी
१२०१	।।ना.गा.ज.४१६.०५।।	आपुले हातें भार घाली । राजियाची सेवा केली
१२०२	।।ना.गा.ज.४१६.०६।।	विसर तो पडला रामा । काय करूं मेघ:श्यामा
१२०३	।।ना.गा.ज.४१६.०७।।	राजा आयनियांत पाहे । चतुर्भुज उभा राहे
१२०४	।।ना.गा.ज.४१६.०८।।	दूत धाडूनियां नेला । राजियानें बोलाविला
१२०५	।।ना.गा.ज.४१६.०९।।	राजा बोले प्रीतिकर । रात्रीं सेवा केली फार
१२०६	।।ना.गा.ज.४१६.१०।।	राजसदनाप्रती न्यावें । भीतरींच घेउनी जावें
१२०७	।।ना.गा.ज.४१६.११।।	आतां बरा विचार नाहीं । सेना म्हणे करूं काई
१२०८	।।ना.गा.ज.४१६.१२।।	सेना न्हावी गौरविला । राजियानें मान दिला
१२०९	।।ना.गा.ज.४१६.१३।।	कितीकांचा शीण गेला । जनी म्हणे न्हावी जाला
१२१०	।।ना.गा.ज.४१७.०१।।	गोणाईनें नवस केला । देवा पुत्र देईं मला
१२११	।।ना.गा.ज.४१७.०२।।	ऐसा पुत्र देई भक्त । ज्याला आवडे पंढरीनाथ
१२१२	।।ना.गा.ज.४१७.०३।।	शुद्ध देखोनियां भाव । पोटीं आले नामदेव
१२१३	।।ना.गा.ज.४१७.०४।।	दामाशेटी हरूषला । दासी जनीनें ओवाळिला
१२१४	।।ना.गा.ज.४१८.०१।।	माझा हा विठोबा येईल गे जेव्हां । जेवीन मी तेव्हां गोणाबाई
१२१५	।।ना.गा.ज.४१८.०२।।	त्वरें राऊळासी जाऊनीयां पाहे । लवकरी बाहे भोजनासी
१२१६	।।ना.गा.ज.४१८.०३।।	भरलिया रागें क्रोध त्याचा साहे । लवकरी बाहे भोजनासी
१२१७	।।ना.गा.ज.४१८.०४।।	ज्ञानेश्वरा घरीं असेल बैसला । जाउनी विठ्ठला पाहे तेथें
१२१८	।।ना.गा.ज.४१८.०५।।	जनी म्हणे देवा चला पुरुषोत्तमा । खोळंबला नामा भोजनासी
१२१९	।।ना.गा.ज.४१९.०१।।	सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी । नामा वाळवंटीं कथा करी
१२२०	।।ना.गा.ज.४१९.०२।।	ब्रह्मादिक देव येवोनि पाहाती । आनंदें गर्जति जयजयकार
१२२१	।।ना.गा.ज.४१९.०३।।	जनी म्हणे त्याचें काय वर्णूं सुख । पहाती जे मुख विठोबाचें
१२२२	।।ना.गा.ज.४२०.०१।।	मागें किती संत जाले । नाम्या ऐसें कोण बोले

१२२३	।।ना.गा.ज.४२०.०२।।	नामा जातां राउळासी । देव बोले आधि त्यासी
१२२४	।।ना.गा.ज.४२०.०३।।	केवढें नवल सांगावें । दासी जनीचें पद लिहावें
१२२५	।।ना.गा.ज.४२१.०१।।	पूर आला भीवरेसी । पाणी लागे पायरीसी
१२२६	।।ना.गा.ज.४२१.०२।।	संतजन हो मिळाले । उठुनी नाम्याजवळी गेले
१२२७	।।ना.गा.ज.४२१.०३।।	नामा सांगे विठोबासी । उतार द्यावा भिंवरेसी
१२२८	।।ना.गा.ज.४२१.०४।।	वोहटला पूर । जनी आनंदें निर्भर
१२२९	।।ना.गा.ज.४२२.०१।।	सण दिवाळीचा आला । नामा राउळासी गेला
१२३०	।।ना.गा.ज.४२२.०२।।	हातीं धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी
१२३१	।।ना.गा.ज.४२२.०३।।	देव घरासी आणिले । चंदनपाटी बैसविले
१२३२	।।ना.गा.ज.४२२.०४।।	गोणाईनें उटणें केलें । दामाशेटीनें न्हाणिले
१२३३	।।ना.गा.ज.४२२.०५।।	पदर काढिला माथ्याचा । बाळ पुशिला नंदाचा
१२३४	।।ना.गा.ज.४२२.०६।।	हातीं घेउनी पंचारती । चक्रपाणि ओवाळिती
१२३५	।।ना.गा.ज.४२२.०७।।	देव जेऊनी तृप्त जाले । दासी जनीनें विडे दिले
१२३६	।।ना.गा.ज.४२३.०१।।	वोढिला ताडिला । देव भक्तिने फाडिला
१२३७	।।ना.गा.ज.४२३.०२।।	एका प्रेमा नामासाठीं । भक्ति कोंडियला कंठीं
१२३८	।।ना.गा.ज.४२३.०३।।	जाला नाम्याचा मजूर । मोळ्या बांधाट्याचा थर
१२३९	।।ना.गा.ज.४२३.०४।।	भिंती चांदया रचिले । त्याचें छप्पर शेकारीलें
१२४०	।।ना.गा.ज.४२३.०५।।	वरी सोडूनियां पाणी । धन्य भक्त म्हणे जनी
१२४१	।।ना.गा.ज.४२४.०१।।	वारा पाणी मुसळ धारा । तेणें मोडिलें छपरा
१२४२	।।ना.गा.ज.४२४.०२।।	मग विठाई धांवली । हातीं चक्र धांवत आली
१२४३	।।ना.गा.ज.४२४.०३।।	वासे लाविले चौफेर । क्षणामध्यें केलें घर
१२४४	।।ना.गा.ज.४२४.०४।।	जागा जाला नामदेव । द्वारीं उभे पंढरिराव
१२४५	।।ना.गा.ज.४२४.०५।।	डोयीं ठेवून पायांवरी । दासी जनी चरण चुरी
१२४६	।।ना.गा.ज.४२५.०१।।	ज्ञानेश्वर म्हणे नाम्यासवें जेवीसी । नाहीं ऋषिकेशी म्हणतसे
१२४७	।।ना.गा.ज.४२५.०२।।	सांगितलें एक भलतेचिं बोलसी । आहे याची भ्रांति ज्ञानेश्वरा
१२४८	।।ना.गा.ज.४२५.०३।।	वाहियेलें त्वरें ऐसें कांहीं काम । उठे मेघ:श्याम तातडीनें

१२४९	।।ना.गा.ज.४२५.०४।।	निरोप येवोनि सांगावा एकांतीं । म्हणे जनीप्रति पांडुरंग
१२५०	।।ना.गा.ज.४२५.०५।।	देव म्हणे नाम्या ऐकावें वचन । येईल साधोन वेळ तुझी
१२५१	।।ना.गा.ज.४२५.०६।।	जनी म्हणे आतां समजलें मज । धरीन उमज येथोनियां
१२५२	।।ना.गा.ज.४२६.०१।।	आषाढी एकादशी । नामा होतां उपवासी
१२५३	।।ना.गा.ज.४२६.०२।।	देवें गरुडा धाडिलें । वेगीं त्याला बोलाविलें । राही म्हणे पांडुरंगा । कोणे बोलाविलें सांगा
१२५४	।।ना.गा.ज.४२६.०३।।	माझ्या जीवीचें जीवन । त्यासी बोलाविलें जाण
१२५५	।।ना.गा.ज.४२६.०४।।	ऐसा भक्तराज निका । दासी जनीचा आत्मसखा
१२५६	।।ना.गा.ज.४२७.०१।।	नामा येऊनियां पाहे । आजि कौतुक दिसताहे
१२५७	।।ना.गा.ज.४२७.०२।।	तंव निवेदी राजाई । लागे नामयाचे पायीं
१२५८	।।ना.गा.ज.४२७.०३।।	नामा म्हणे या द्रव्यासी । आम्ही नातळों मानसीं
१२५९	।।ना.गा.ज.४२७.०४।।	वेगीं बोलला ब्राह्मण । करूं आतां संतर्पण
१२६०	।।ना.गा.ज.४२७.०५।।	हातीं टाळ दिंडीगान । हेंचि आमुचें सर्व धन
१२६१	।।ना.गा.ज.४२७.०६।।	ऐसें आश्चर्य देखोनी । जनी हांसतसे मनीं
१२६२	।।ना.गा.ज.४२८.०१।।	करूनी आरती । नामा आला घराप्रती
१२६३	।।ना.गा.ज.४२८.०२।।	तेणें धरियेलें व्रता । अन्न न घ्यावें सर्वथा
१२६४	।।ना.गा.ज.४२८.०३।।	ऐसा जाणोनियां नेम । अनुभवी पुरुषोत्तम
१२६५	।।ना.गा.ज.४२८.०४।।	आषाढी एकादशी । विप्रवेषें हृषिकेशी
१२६६	।।ना.गा.ज.४२८.०५।।	आला नामयाचे सदनीं । नाम गाय दासी जनी
१२६७	।।ना.गा.ज.४२९.०१।।	नमुनी ब्राह्मण । म्हणे मज द्यावें अन्न
१२६८	।।ना.गा.ज.४२९.०२।।	नामा म्हणे एकादशी । इच्छित द्यावें फराळासी
१२६९	।।ना.गा.ज.४२९.०३।।	अन्नावांचोनी आतां । मज नको रे सर्वथा
१२७०	।।ना.गा.ज.४२९.०४।।	हातापायांची वेंगडी । विप्रें घातली मुरकुंडी
१२७१	।।ना.गा.ज.४२९.०५।।	जीव सोडी चक्रपाणि । म्हणे नामयाची जनी
१२७२	।।ना.गा.ज.४३०.०१।।	जनसमुदाय मिळाला । धि:कारिती नामयाला
१२७३	।।ना.गा.ज.४३०.०२।।	विप्र बोलावुनी वेगें । प्रेत नेलें चंद्रभागे
१२७४	।।ना.गा.ज.४३०.०३।।	मोठें रचुनी सरण । मध्यें निजविला ब्राह्मण

१२७५	।।ना.गा.ज.४३०.०४।।	शय्यागमनीं पहूडला । म्हणे अग्नि द्या आम्हाला
१२७६	।।ना.गा.ज.४३०.०५।।	अग्नि दिला जयाप्रती । देव विमानीं पाहती
१२७७	।।ना.गा.ज.४३०.०६।।	विस्मित जाला चक्रपाणि । प्रगट होय म्हणे जनी
१२७८	।।ना.गा.ज.४३१.०१।।	अग्नी लागतां अंगासी । घाबरले हृषिंकेशी
१२७९	।।ना.गा.ज.४३१.०२।।	निजरूपें प्रगटले । चरणीं मस्तक ठेविलें
१२८०	।।ना.गा.ज.४३१.०३।।	सोनसळा वैजयंती । कोटि सूर्य ते लोपती
१२८१	।।ना.गा.ज.४३१.०४।।	नामा म्हणे विठोबाला । भला अंत रे पाहिला
१२८२	।।ना.गा.ज.४३१.०५।।	हातीं धरूनी नामयासी । पाठ थापटी हृषिकेशी
१२८३	।।ना.गा.ज.४३१.०६।।	गेला राउळीं चक्रपाणि । भावें वंदी दासी जनी
१२८४	।।ना.गा.ज.४३२.०१।।	ऐका हो नामयाचा जन्म मूळसंचित
१२८५	।।ना.गा.ज.४३२.०२।।	हिरण्यकश्यपकुळीं नामा प्रल्हाद । पद्मीणी नाम माझें श्रेष्ठ दासीचें पद
१२८६	।।ना.गा.ज.४३२.०३।।	दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त । मंथरा नाम माझें भरतें मारिली लाथ
१२८७	।।ना.गा.ज.४३२.०४।।	द्वापारीं कृष्णसेवा उद्धव जन्मला । कुब्ज्या नाम माझें देवें उद्धार केला
१२८८	।।ना.गा.ज.४३२.०५।।	कलींत नामदेव विठ्ठलचिंतनीं । त्याचीच सेवेलागीं जन्मली जनी
१२८९	।।ना.गा.ज.४३३.०१।।	अपूर्व कोणे एके काळीं । देव सभेच्या मंडळीं
१२९०	।।ना.गा.ज.४३३.०२।।	करी त्रैलोक्यभ्रमणा । करीं वाहे ब्रह्मवीणा
१२९१	।।ना.गा.ज.४३३.०३।।	देती सर्वही सन्मान । सिद्ध साधु योगी जन
१२९२	।।ना.गा.ज.४३३.०४।।	सांगे अपूर्व कहाणी । म्हणे नामयाची जनी
१२९३	।।ना.गा.ज.४३४.०१।।	नारद सांगे मृत्युलोकीं । हरिश्चंद्र पुण्यश्लोकी
१२९४	।।ना.गा.ज.४३४.०२।।	कैसा सत्वाचा समुद्र । ऐसा नाहीं नृपवर
१२९५	।।ना.गा.ज.४३४.०३।।	नारदाची ऐकून गोष्ट । सुखावला तो वसिष्ठ
१२९६	।।ना.गा.ज.४३४.०४।।	कोप विश्वामित्रा आला । कैसा वाढविता शिष्याला
१२९७	।।ना.गा.ज.४३४.०५।।	तपतेजें सूर्यराशी । छळीन म्हणे हरिश्चंद्रासीं
१२९८	।।ना.गा.ज.४३४.०६।।	उदय पश्चिमे दिनकर । सत्त्व ढाळीना नृपवर
१२९९	।।ना.गा.ज.४३४.०७।।	वसिष्ठाच्या ऐकुनी बोला । विश्वामित्रा क्रोध आला
१३००	।।ना.गा.ज.४३४.०८।।	जरी उतरेल माझ्या तुकीं । देईन आपुल्या तपासी

१३०१	।।ना.गा.ज.४३४.०९।।	ऐसा दोघांचा संवाद । होतां उठला नारद
१३०२	।।ना.गा.ज.४३४.१०।।	इंद्र म्हणे कां निर्फळ । शब्दाशब्दी वाढेल कळ
१३०३	।।ना.गा.ज.४३४.११।।	ऐसे ऐकतां वचन । जनी म्हणे केलें गमन
१३०४	।।ना.गा.ज.४३५.०१।।	इंद्रसभे जाला वाद । करूं रायासी सावध
१३०५	।।ना.गा.ज.४३५.०२।।	येरीकडे ब्रह्मऋषी । कृपें वोळला शिष्यासी
१३०६	।।ना.गा.ज.४३५.०३।।	नवी व्याली जैसी गाय । पक्षी अंडजीं झेपाय
१३०७	।।ना.गा.ज.४३५.०४।।	बाप माझा तैशापरी । होय शिष्याचा साहाकारी
१३०८	।।ना.गा.ज.४३५.०५।।	येऊनियां मागेल तूतें । छळ करील गाधिसुत
१३०९	।।ना.गा.ज.४३५.०६।।	बापा सावध अंतरीं । सत्त्व ढाळील नानापरी
१३१०	।।ना.गा.ज.४३५.०७।।	धरी श्वापदांच्या झुंडी । तुझ्या देशांत भवंडी
१३११	।।ना.गा.ज.४३५.०८।।	मानी शब्दाला आमुच्या । वना न जावें ऋषीच्या
१३१२	।।ना.गा.ज.४३५.०९।।	ऐसें बोलोनी रायासी । गेला वसिष्ठ तपासी
१३१३	।।ना.गा.ज.४३५.१०।।	तुझ्या सत्त्वालागीं हानी । करूं इच्छी म्हणे जनी
१३१४	।।ना.गा.ज.४३६.०१।।	विश्वामित्र तत्क्षणीं । सिद्धआश्रमा येउनी
१३१५	।।ना.गा.ज.४३६.०२।।	बैसे येउनी आश्रमासी । करी मातंग यागासी
१३१६	।।ना.गा.ज.४३६.०३।।	सहस्र अवदान आहुती । होतां प्रगटली शक्ति
१३१७	।।ना.गा.ज.४३६.०४।।	विश्वामित्रें तये वेळे । देवी वरदानाचे बळें
१३१८	।।ना.गा.ज.४३६.०५।।	व्याघ्र हिंडती रानें रानें । बंद केलें येणें जाणें
१३१९	।।ना.गा.ज.४३६.०६।।	कृषा न जाती कृषिक । तीर्थयात्रेसी पांथिक
१३२०	।।ना.गा.ज.४३६.०७।।	धेनु न जाती वनासी । वाट नाहीं वेव्हारासी
१३२१	।।ना.गा.ज.४३६.०८।।	प्रजा जाऊन राजसभे । हात जोडोनियां उभे
१३२२	।।ना.गा.ज.४३६.०९।।	ऐसी प्रजेची हे वाणी । राजा विचारितो मनीं
१३२३	।।ना.गा.ज.४३६.१०।।	गुरुवचन धरितां चित्तीं । माझी होईल अपकिर्ति
१३२४	।।ना.गा.ज.४३६.११।।	राव निघाला स्वारीसी । म्हणे नामयाची दासी
१३२५	।।ना.गा.ज.४३७.०१।।	नाना वाजंत्र्यांच्या ध्वनीं । राजा आरूढला वाहनीं
१३२६	।।ना.गा.ज.४३७.०२।।	राव प्रवेशला वनीं । अवघीं श्वापदें मारूनी

१३२७	।।ना.गा.ज.४३७.०३।।	आश्रमीं आणावयासी राव । केलें ऋषीनें लाघव
१३२८	।।ना.गा.ज.४३७.०४।।	मृग कनकाचा साजरा । आला रायाच्या सामोरा
१३२९	।।ना.गा.ज.४३७.०५।।	गुणी लाविलासे बाण । घेऊं पाहे त्याचा प्राण
१३३०	।।ना.गा.ज.४३७.०६।।	येरु कीलान मारुनी जाय । धरणी न ठेवी तो पाय
१३३१	।।ना.गा.ज.४३७.०७।।	राव लागे तया पाठीं । दम न समावे पोटीं
१३३२	।।ना.गा.ज.४३७.०८।।	प्रवेशला तये वनीं । देखे अपूर्व नयनीं
१३३३	।।ना.गा.ज.४३७.०९।।	धेनुव्याघ्र एके स्थानीं । चाटी एकमेकां दोन्हीं
१३३४	।।ना.गा.ज.४३७.१०।।	निर्वैर श्वापदगण । राव विस्मय करी देखोन
१३३५	।।ना.गा.ज.४३७.११।।	पुढें जातां सुगंध पाणी । राव स्नानातें करूनी
१३३६	।।ना.गा.ज.४३७.१२।।	भावें पूजिला गिरिजावर । नमन केलें जोडुनी कर
१३३७	।।ना.गा.ज.४३७.१३।।	विश्वामित्रें तया वनीं । दोघी रूपसा नयनीं
१३३८	।।ना.गा.ज.४३७.१४।।	रायापुढें नृत्य करी । टाळ वीणा झणत्कारी
१३३९	।।ना.गा.ज.४३७.१५।।	द्रव्य आणविलें अपारे । राव देतो आपल्या करें
१३४०	।।ना.गा.ज.४३७.१६।।	नाहीं द्रव्यासी कारण । तुझ्या स्वरूपासी लीन
१३४१	।।ना.गा.ज.४३७.१७।।	बोले मुनिवर्य दासी । राजा कोपला मानसीं
१३४२	।।ना.गा.ज.४३७.१८।।	आज्ञा केली प्रधानासी । मारा बाहेर घाला यासी
१३४३	।।ना.गा.ज.४३७.१९।।	रक्तवदन आश्रमासी । म्हणे नामयाची दासी
१३४४	।।ना.गा.ज.४३८.०१।।	ऋषिअंगणीं कामिनी । लोळती येऊनी दोघीजणी
१३४५	।।ना.गा.ज.४३८.०२।।	तुम्हां दिला कोणे त्रास । त्याचा करीन मी ग्रास
१३४६	।।ना.गा.ज.४३८.०३।।	आम्ही बोलिलों रायासी। घेत नाहीं उचितासी
१३४७	।।ना.गा.ज.४३८.०४।।	ऐसें बोलतां वचन । राव कोपला दारुण
१३४८	।।ना.गा.ज.४३८.०५।।	केलें प्रधानें ताडण । बाहेर घातलें मारून
१३४९	।।ना.गा.ज.४३८.०६।।	त्यांच्या परिसोनी बोला । विश्वामित्र कोपें आला
१३५०	।।ना.गा.ज.४३८.०७।।	म्हणे रायासी अधमा । माझी प्रतापमहिमा
१३५१	।।ना.गा.ज.४३८.०८।।	वसिष्ठाच्या पडिभारें । मातलासी द्रव्यें थोरें
१३५२	।।ना.गा.ज.४३८.०९।।	निर्वैर श्वापदांसी । कां रे मारिलें तयासी

१३५३	।।ना.गा.ज.४३८.१०।।	वधूनियां शेवटीं त्यासी । मारियेल्या तापस दासी
१३५४	।।ना.गा.ज.४३८.११।।	पुढें रसाळ आहे कथा । निद्रा लागेल नृपनाथा
१३५५	।।ना.गा.ज.४३८.१२।।	स्वप्नीं मागेल दानासी । म्हणे नामयाची दासी
१३५६	।।ना.गा.ज.४३९.०१।।	विश्वामित्र द्विजचिन्ह । स्वप्नीं प्रगटे आपण
१३५७	।।ना.गा.ज.४३९.०२।।	देखोनियां द्विजवरातें । नमियेलें जोडूनी हातें
१३५८	।।ना.गा.ज.४३९.०३।।	राव बोले उदारपणीं । काय इच्छा आहे मनीं
१३५९	।।ना.गा.ज.४३९.०४।।	दयावंत धर्ममूर्ति । तुझी तिहीं लोकीं कीर्ति
१३६०	।।ना.गा.ज.४३९.०५।।	अंकुश कडिया लेखणी । राया वोपी माझ्या पाणी
१३६१	।।ना.गा.ज.४३९.०६।।	उदारपणें देसी जरी । उदक घाली माझे करीं
१३६२	।।ना.गा.ज.४३९.०७।।	कृपा करुनी आम्हांवरी । आलें पाहिजे नगरीं
१३६३	।।ना.गा.ज.४३९.०८।।	येथें संकल्पावांचून । नाहीं होत माझें येणं
१३६४	।।ना.गा.ज.४३९.०९।।	रायें घेऊन जीवन । ऋषि हस्तकीं घालून
१३६५	।।ना.गा.ज.४३९.१०।।	एक नवल देखे दृष्टीं । काळपुरुष उभा पाठीं
१३६६	।।ना.गा.ज.४३९.११।।	लोहदंड घेउनी करीं । घालूं पाहे त्याचे शिरीं
१३६७	।।ना.गा.ज.४३९.१२।।	तेणें जाला भयाभीत । राव स्वप्नांत बरळत
१३६८	।।ना.गा.ज.४३९.१३।।	राव बैसला उठोन । करी देवाचें स्मरण
१३६९	।।ना.गा.ज.४३९.१४।।	तारामती पुसे राया । कां हो बरळलां स्वामिया
१३७०	।।ना.गा.ज.४३९.१५।।	राज्यदान सुकृतकोटी । एक काळपुरुष पाठीं
१३७१	।।ना.गा.ज.४३९.१६।।	लोहदंड घेऊन करीं । घालूं पाहे माझे शिरीं
१३७२	।।ना.गा.ज.४३९.१७।।	येरु म्हणे जा जीवनीं । करा स्नानातें जाउनी
१३७३	।।ना.गा.ज.४३९.१८।।	अग्निमुखीं द्यावें दान । स्वप्नदोष नासती जाण
१३७४	।।ना.गा.ज.४३९.१९।।	म्हणे प्रधान महाराजा । दान करा कांहीं द्विजा
१३७५	।।ना.गा.ज.४३९.२०।।	ऐसें बोलतां वचन । आला विश्वामित्र जाण
१३७६	।।ना.गा.ज.४३९.२१।।	राजा बोले कर जोडून । शयनीं देखियेलें स्वप्न
१३७७	।।ना.गा.ज.४३९.२२।।	ह्याच स्वरूपा प्रमाण । ऐसा देखिला ब्राह्मण
१३७८	।।ना.गा.ज.४३९.२३।।	सिंहासन समेदिनी । राया दे गा मजलागोनि

१३७९	।।ना.गा.ज.४३९.२४।।	आतां मागें दक्षणेसी । म्हणे नामयाची दासी
१३८०	।।ना.गा.ज.४४०.०१।।	ऋषि म्हणे रे समर्था । असो स्वप्नींची हे वार्ता
१३८१	।।ना.गा.ज.४४०.०२।।	इच्छा धरून आलों येथें । औट तुक दे कनकातें
१३८२	।।ना.गा.ज.४४०.०३।।	कृपा करून द्याल जरी । उदक घाली माझे करीं
१३८३	।।ना.गा.ज.४४०.०४।।	दया करा आम्हांवरी । आलें पाहिजे नगरीं
१३८४	।।ना.गा.ज.४४०.०५।।	येथें संकल्पावांचून । नाहीं होत माझें येणें
१३८५	।।ना.गा.ज.४४०.०६।।	रायें घेऊनी जीवन । ऋषिहस्तकीं घालून
१३८६	।।ना.गा.ज.४४०.०७।।	विश्वामित्र शिबिकासनीं । राव चालिला घेऊनी
१३८७	।।ना.गा.ज.४४०.०८।।	मार्गीं वाद्यांचा लाघव । अयोध्येसी आला राव
१३८८	।।ना.गा.ज.४४०.०९।।	राव प्रवेशला नगरी । विश्वामित्र बैसला द्वारीं
१३८९	।।ना.गा.ज.४४०.१०।।	दंड पडताळूनि हातीं । लक्षियेली तारामती
१३९०	।।ना.गा.ज.४४०.११।।	उभी थरथरां कांपत । राजा जाणविली मात
१३९१	।।ना.गा.ज.४४०.१२।।	राव म्हणे ऋषीश्वर । कोण्या अन्यायानें मार
१३९२	।।ना.गा.ज.४४०.१३।।	केला संकल्प आम्हांसी । नाहीं दिलें दक्षणेसी
१३९३	।।ना.गा.ज.४४०.१४।।	दान न देतां आम्हांसी । तूं कां गेलासी सदनासी
१३९४	।।ना.गा.ज.४४०.१५।।	हात बांधोनियां राया । दंडहस्तें मारी तया
१३९५	।।ना.गा.ज.४४०.१६।।	तंव आला रोहिदास । चरणीं ठेवी मस्तकास
१३९६	।।ना.गा.ज.४४०.१७।।	येरु रक्तांबर नयन । पुसे कवणाचा कवण
१३९७	।।ना.गा.ज.४४०.१८।।	राव म्हणे कुळभूषण । आहे आमुचा नंदन
१३९८	।।ना.गा.ज.४४०.१९।।	राजा पाचारी भांडारी । आणा कनकातें झडकरी
१३९९	।।ना.गा.ज.४४०.२०।।	मज दिलें राज्यदान । तेंचि घेसी तूं परतोन
१४००	।।ना.गा.ज.४४०.२१।।	छत्र मुद्रा सिंहासन । ऋषि हस्तकीं वोपून
१४०१	।।ना.गा.ज.४४०.२२।।	हें तो आलें राज्यदानें । औट भार कनक देणें
१४०२	।।ना.गा.ज.४४०.२३।।	धनवंत सौदागर । उभे रायाचे समोर
१४०३	।।ना.गा.ज.४४०.२४।।	धन देतो जी अपार । सोडा रायाला सत्वर
१४०४	।।ना.गा.ज.४४०.२५।।	विश्वामित्र म्हणे त्यांसी । काय करावें द्रव्यासी

१४०५	।।ना.गा.ज.४४०.२६।।	क्षितिवरी जितकें धन । तेंहि माझेंचि संपूर्ण
१४०६	।।ना.गा.ज.४४०.२७।।	नाहीं कोणाचा उपाव । जनी म्हणे रक्षील देव
१४०७	।।ना.गा.ज.४४१.०१।।	राव म्हणे अहो ऋषि । काशीखंड वाराणसी
१४०८	।।ना.गा.ज.४४१.०२।।	तेथें जाऊनियां आम्ही । ऋण फेडूं तुमचें स्वामी
१४०९	।।ना.गा.ज.४४१.०३।।	एक मासाची अवधी । तुम्ही द्यावी कृपानिधी
१४१०	।।ना.गा.ज.४४१.०४।।	ऋषि म्हणे खरें बोला । नातरी शापीन तिघांला
१४११	।।ना.गा.ज.४४१.०५।।	रोहिदास म्हणे त्यासी । गहाण राहीन तुम्हांपाशीं
१४१२	।।ना.गा.ज.४४१.०६।।	पितृवचनाचें ऋण । त्यांचा उतराई होईन
१४१३	।।ना.गा.ज.४४१.०७।।	ऋण हत्या आणि वैर । नाहीं चुकत मेल्यावर
१४१४	।।ना.गा.ज.४४१.०८।।	ऐसी बाळकाची वाणी । ऐकूनि दचकला मनीं
१४१५	।।ना.गा.ज.४४१.०९।।	ऋषि बोलला नृपासी । नको राहूं आमुचे देशीं
१४१६	।।ना.गा.ज.४४१.१०।।	निघे निघे त्यासी म्हणे । बाहेर आली तिघेजणें
१४१७	।।ना.गा.ज.४४१.११।।	वनीं निघाला त्वरित । जाला लोकांचा आकांत
१४१८	।।ना.गा.ज.४४१.१२।।	लोट पूर जाती पळा । नेत्रीं उदक ढळढळां
१४१९	।।ना.गा.ज.४४१.१३।।	कैसा ब्राह्मण पहा हो । नृपचंद्रा लागीं राहो
१४२०	।।ना.गा.ज.४४१.१४।।	राजा बाहेर दवडूनी । पाहे आमुचाचि धणी
१४२१	।।ना.गा.ज.४४१.१५।।	नगरलोकांसी फिरवुनी । राव निघाला तेथुनी
१४२२	।।ना.गा.ज.४४१.१६।।	अलंकार देखियेला । मागें विश्वामित्र आला
१४२३	।।ना.गा.ज.४४१.१७।।	माझ्या राज्यांतील संपत्ती । तारामती धरिली हातीं
१४२४	।।ना.गा.ज.४४१.१८।।	घेई भूषण उतरोनि । म्हणे नामयाची जनी
१४२५	।।ना.गा.ज.४४२.०१।।	विश्वामित्रें जाऊनि पुढें । वणवा लाविला चहूंकडे
१४२६	।।ना.गा.ज.४४२.०२।।	धुम्रें दाटलें अंबर । ज्वाळा येती भयंकर
१४२७	।।ना.गा.ज.४४२.०३।।	विश्वामित्रें काय केलें । राया बाळातें चुकविलें
१४२८	।।ना.गा.ज.४४२.०४।।	दोघे न पडतां दृष्टी । होवोनियां परम कष्टी
१४२९	।।ना.गा.ज.४४२.०५।।	म्हणे अहा कटकटा । काय लिहिलें अदृष्टा
१४३०	।।ना.गा.ज.४४२.०६।।	मेलें वणव्यांत जळोनि । ऐसें आलें तिचे मनीं

१४३१	।।ना.गा.ज.४४२.०७।।	पिटी लल्लाट करगळें। अंग टाकी धरणीं लोळे
१४३२	।।ना.गा.ज.४४२.०८।।	म्हणे बाळा रोहिदासा । भेट देई गा पाडसा
१४३३	।।ना.गा.ज.४४२.०९।।	सूर्यवंशीं चुडारत्ना । प्राणपति गा निधाना
१४३४	।।ना.गा.ज.४४२.१०।।	राव दृष्टि न पडतां । अग्नि खाईन तत्वतां
१४३५	।।ना.गा.ज.४४२.११।।	ऐसें विचारिलें मनीं । म्हणे नामयाची जनी
१४३६	।।ना.गा.ज.४४३.०१।।	धर्मशिळे आली राणी । ऋषि दचकला मनीं
१४३७	।।ना.गा.ज.४४३.०२।।	अग्नि विझवोनी अंगें । सतीपुढें आला रागें
१४३८	।।ना.गा.ज.४४३.०३।।	म्हणे कवणाची कवणें । अग्नि खासी कवण्या गुणें
१४३९	।।ना.गा.ज.४४३.०४।।	येरी म्हणे पांथिकातें । पति बाळ चुकले मातें
१४४०	।।ना.गा.ज.४४३.०५।।	तुम्हीं असतील देखिलें । मज सांगा जी वहिलें
१४४१	।।ना.गा.ज.४४३.०६।।	ऋषि बोले तिजलागून । मेले अग्नींत जळून
१४४२	।।ना.गा.ज.४४३.०७।।	तारामती नेउनी तेथें । दाखविलीं दोन्हीं प्रेतें
१४४३	।।ना.गा.ज.४४३.०८।।	त्वचा अंगींची जळाली । हात पाय गोळा जाली
१४४४	।।ना.गा.ज.४४३.०९।।	देखें नृपाचें तें मढें । पाहे वल्लभा मजकडे
१४४५	।।ना.गा.ज.४४३.१०।।	रुसूं नका बोला वेगें । गुजगोष्टी मजसंगें
१४४६	।।ना.गा.ज.४४३.११।।	रोहिदास कवळी पोटीं । लावीं लल्लाट लल्लाटीं
१४४७	।।ना.गा.ज.४४३.१२।।	शोक करी तारामती । अस्त जाला तो गभस्ती
१४४८	।।ना.गा.ज.४४३.१३।।	प्रेत कवळी कां निर्फळ । गेला गेला हंसनीळ
१४४९	।।ना.गा.ज.४४३.१४।।	आतां प्राप्त झाली निशी । व्याघ्र भक्षील तिघांसी
१४५०	।।ना.गा.ज.४४३.१५।।	सति पुढोनियां प्रेत । नेलें ओढोनी परत
१४५१	।।ना.गा.ज.४४३.१६।।	उदर फोडोनी त्वरीत । टाकियेलें काढुनी आर्त
१४५२	।।ना.गा.ज.४४३.१७।।	रागें गुरगुरी तो जाणा । भय दावी क्षणक्षणां
१४५३	।।ना.गा.ज.४४३.१८।।	येरी नेत्र झांकियेलें । पंचप्राण आकर्षिले
१४५४	।।ना.गा.ज.४४३.१९।।	तारामती सांडील प्राण । लटिकें प्रतिज्ञा वचन
१४५५	।।ना.गा.ज.४४३.२०।।	पतिपुत्र दोघेजण । आला घेउनी ब्राह्मण
१४५६	।।ना.गा.ज.४४३.२१।।	नाहीं व्याघ्र ना वणवा । मृजळाचा हेलावा

१४५७	।।ना.गा.ज.४४३.२२।।	तिघेजण एक जाली । दासी जनी आनंदली
१४५८	।।ना.गा.ज.४४४.०१।।	पंथ क्रमितां तिघांसी । आडवा आला कपटवेषी
१४५९	।।ना.गा.ज.४४४.०२।।	होवोनियां वृद्ध विप्र । हातीं काठी भार्याकुमर
१४६०	।।ना.गा.ज.४४४.०३।।	म्हणे धन्य रे नृपेशा । तुझा कीर्तिघोष ठसा
१४६१	।।ना.गा.ज.४४४.०४।।	भेरी गर्जती त्रिभुवनीं । धांवून आलों मी ऐकुनी
१४६२	।।ना.गा.ज.४४४.०५।।	आज्ञा करावी जी स्वामी । तुमचे शरणागत आम्ही
१४६३	।।ना.गा.ज.४४४.०६।।	करुणा दाखवी रायासी । दीन आम्ही तीर्थवासी
१४६४	।।ना.गा.ज.४४४.०७।।	पुढें प्रवास कठीण । पायीं नाहीं पायतण
१४६५	।।ना.गा.ज.४४४.०८।।	तिघां वोपोनियां जोडे । जनी म्हणे जाती पुढें
१४६६	।।ना.गा.ज.४४५.०१।।	आज्ञा करुनी सूर्यासी । तपवी द्वादश कळेसी
१४६७	।।ना.गा.ज.४४५.०२।।	बाप तपाच्या सामर्थ्यें । आज्ञा वंदिली आदित्यें
१४६८	।।ना.गा.ज.४४५.०३।।	पर्वताच्या लाह्या होती । असा प्रकाशला गभस्ती
१४६९	।।ना.गा.ज.४४५.०४।।	रोहिदास म्हणे तात । बहू जालों तृषाक्रांत
१४७०	।।ना.गा.ज.४४५.०५।।	भाकितसें हो करुणा । सत्वर मेळवीं जीवना
१४७१	।।ना.गा.ज.४४५.०६।।	प्राप्त न होतां जरी तोय । जीव माझा जाऊं पाहे
१४७२	।।ना.गा.ज.४४५.०७।।	बाळ कडे घेऊनियां । पैल दिसे तेथें छाया
१४७३	।।ना.गा.ज.४४५.०८।।	उदक प्राशन करुनी । पंथ क्रमुं म्हणे जनी
१४७४	।।ना.गा.ज.४४६.०१।।	पुढें जातां कष्टप्रेम । निर्मी मोहाचे आश्रम
१४७५	।।ना.गा.ज.४४६.०२।।	धर्म पोयेची कुसरी । शोभा रमणीय साजिरी
१४७६	।।ना.गा.ज.४४६.०३।।	वृक्ष लागले अंबरीं । डोलताती नानापरी
१४७७	।।ना.गा.ज.४४६.०४।।	फणस कर्दळी गंभेरी । आंबे नारळी खर्जुरी
१४७८	।।ना.गा.ज.४४६.०५।।	चिंचा पोफळी जांभळी । गुंज खिरण्या रायकेळीं
१४७९	।।ना.गा.ज.४४६.०६।।	सीताफळें कळे निंब । बोरें परीच्या दाळिंब
१४८०	।।ना.गा.ज.४४६.०७।।	जाई मोगरा सेवंती । चांपा बकुल मालती
१४८१	।।ना.गा.ज.४४६.०८।।	पारिजातक हे चमेली । झेंडू गुलाबास मखमली
१४८२	।।ना.गा.ज.४४६.०९।।	तुळसी मंजुळ शोभती । नानापरी पुष्पजाती

१४८३	।।ना.गा.ज.४४६.१०।।	प्राप्त वसंताचा काळ । मधु कुंजती कोकिळ
१४८४	।।ना.गा.ज.४४६.११।।	रंभा ऐशा देवांगना । सर्व श्रृंगारी भूषणा
१४८५	।।ना.गा.ज.४४६.१२।।	वेलवाळा तोयें सारीं । उभ्या तिष्ठताती द्वारीं
१४८६	।।ना.गा.ज.४४६.१३।।	सुगंध वनीं शीतळ जळ । ऐसें शोभे रम्य स्थळ
१४८७	।।ना.गा.ज.४४६.१४।।	ऐसी देखोनी वाटिका । चोज नाहीं नृपनायका
१४८८	।।ना.गा.ज.४४६.१५।।	म्हणती हे धर्मपोये । जनी म्हणे पुढें जाये
१४८९	।।ना.गा.ज.४४७.०१।।	पोई अव्हेरितां रायें । मागें ऋषि धांवताहे
१४९०	।।ना.गा.ज.४४७.०२।।	धन्य धन्य रे नरेंद्रा । हातीं धरी हरिश्चंद्रा
१४९१	।।ना.गा.ज.४४७.०३।।	उष्ण न ध्यायी कहार । मार्गीं श्रम जाला फार
१४९२	।।ना.गा.ज.४४७.०४।।	करा आश्रम पुण्यता । आम्हां घडों द्यावें तीर्थां
१४९३	।।ना.गा.ज.४४७.०५।।	येथें केलिया आराम । व्यर्थ जाती वायां श्रम
१४९४	।।ना.गा.ज.४४७.०६।।	क्रमा चार दिवस । पाहा पोईचा हा वास
१४९५	।।ना.गा.ज.४४७.०७।।	द्यावी आम्हां सर्व जोडी । कृपा कराल ती थोडी
१४९६	।।ना.गा.ज.४४७.०८।।	करा आनंदें भोजन । सेवा सिद्ध उदकपान
१४९७	।।ना.गा.ज.४४७.०९।।	म्हणे जावें आश्रमाला । पुढें पंथासी लागला
१४९८	।।ना.गा.ज.४४७.१०।।	त्राहें त्राहें रे जगदीशा । सत्त्व रक्षिशील कैसा
१४९९	।।ना.गा.ज.४४७.११।।	ऐसा छळक हा ऋषि । नेणों पार कैसा नेशी
१५००	।।ना.गा.ज.४४७.१२।।	आमची चिंता तुजला हरी । जनी म्हणे कृपा करी
१५०१	।।ना.गा.ज.४४८.०१।।	ऋषि आश्रमा येउनी । येतां देखे ताराराणी
१५०२	।।ना.गा.ज.४४८.०२।।	माव करुनि तात्काळ । कैसा निर्मिला नृपाळ
१५०३	।।ना.गा.ज.४४८.०३।।	येऊनि आश्रमासी पाहे । डोळां देखियेला रायें
१५०४	।।ना.गा.ज.४४८.०४।।	शुद्ध सुमन सेजे नीरा । घालिताती विंझणवारा
१५०५	।।ना.गा.ज.४४८.०५।।	सुगंध चंदन चर्चिती । नानापरींच्या उट्या देती
१५०६	।।ना.गा.ज.४४८.०६।।	रत्नखचिताची झारी । राय घेऊनियां करीं
१५०७	।।ना.गा.ज.४४८.०७।।	करी आनंदें प्राशन । पुढें दिव्यान्न भोजन
१५०८	।।ना.गा.ज.४४८.०८।।	ऐसें करितां अवलोकन । राजा पाहे शामवदन

१५०९	।।ना.गा.ज.४४८.०९।।	नव्हे तेंचि कैसें जालें । सूर्या अंधत्व आलें
१५१०	।।ना.गा.ज.४४८.१०।।	पुष्पभार शेषावरी । कैसा आजि जाला भारी
१५११	।।ना.गा.ज.४४८.११।।	धृव मेरु गजबजिला । तैसी परी जाली रायाला
१५१२	।।ना.गा.ज.४४८.१२।।	जोडोनियां करपद्मा । म्हणे बरी केली सीमा
१५१३	।।ना.गा.ज.४४८.१३।।	ऐसें होतें जरी मनीं । तरी कां राज्य दिलें दानीं
१५१४	।।ना.गा.ज.४४८.१४।।	बुद्धि भविष्यानुसार । मी तो आहे येथें स्थिर
१५१५	।।ना.गा.ज.४४८.१५।।	म्हणोनियां पुढें जाय । अव्हेरिलें धर्मपोय
१५१६	।।ना.गा.ज.४४८.१६।।	मार्गीं देखियेलें राया । जनी म्हणे लागे पायां
१५१७	।।ना.गा.ज.४४९.०१।।	येतां देखोनियां बाळ । ऋषि धांवला तत्काळ
१५१८	।।ना.गा.ज.४४९.०२।।	कडे घेऊनि तयाला । ऋषि आश्रमासी आला
१५१९	।।ना.गा.ज.४४९.०३।।	तुझें मायबापीं प्रेम । होय पाहोनी आराम
१५२०	।।ना.गा.ज.४४९.०४।।	सुखें करुनी भोजन । सुवासित उदकपान
१५२१	।।ना.गा.ज.४४९.०५।।	करुनी क्रमियेलें पंथा । तिहीं सांगितली वार्ता
१५२२	।।ना.गा.ज.४४९.०६।।	बाळ येतसे मागून । त्याचा परामर्ष करणें
१५२३	।।ना.गा.ज.४४९.०७।।	म्हणोनी सारिलें विंदान । पुढें वाहिलें दिव्यान्न
१५२४	।।ना.गा.ज.४४९.०८।।	रडे मोकलुनी धाय । येथें कल्पांतीं न राहे
१५२५	।।ना.गा.ज.४४९.०९।।	पुढें लागला पंथासी। ऋषि तटस्थ मानसीं
१५२६	।।ना.गा.ज.४४९.१०।।	वदनीं बोट घाली वोजा । ऋषि करितसे चोजा
१५२७	।।ना.गा.ज.४४९.११।।	ऐसें सत्त्वादिकांपुढें। तप खद्योत बापुडें
१५२८	।।ना.गा.ज.४४९.१२।।	काय करणें ऐसियांसी । व्यर्थ मुकलों तपासी
१५२९	।।ना.गा.ज.४४९.१३।।	मार्गीं तिघें एक जाली । दासी जनी आनंदली
१५३०	।।ना.गा.ज.४५०.०१।।	ऐसें क्रमितां अवधारी । विश्वेश्वराचे नगरीं
१५३१	।।ना.गा.ज.४५०.०२।।	देखियेली वाराणसी । थोर आनंद मानसीं
१५३२	।।ना.गा.ज.४५०.०३।।	म्हणती घ्यावें शिवदर्शन । तेणें श्रमनिवारण
१५३३	।।ना.गा.ज.४५०.०४।।	बाप येऊनि चौबारा । उभा धरूनि पदरा
१५३४	।।ना.गा.ज.४५०.०५।।	म्हणे कोठें रे दक्षणा । बरा होसी चुकवणा

१५३५	।।ना.गा.ज.४५०.०६।।	जो कां राजा सूर्यवंशीं । छत्र चामर जयासी
१५३६	।।ना.गा.ज.४५०.०७।।	माथां बांधोनियां तृण । घाली विक्रया आपण
१५३७	।।ना.गा.ज.४५०.०८।।	राणी म्हणे प्राणेश्वरा । आधीं विकरा माझा करा
१५३८	।।ना.गा.ज.४५०.०९।।	रोहिदास कर जोडुनी। चरणीं मस्तक ठेवुनी
१५३९	।।ना.गा.ज.४५०.१०।।	आधीं माझिया द्रव्यासी । तुम्ही द्यावें कौशिकासी
१५४०	।।ना.गा.ज.४५०.११।।	ऐसें दोघांचें उत्तर। नवल करी ऋषीश्वर
१५४१	।।ना.गा.ज.४५०.१२।।	काय करा याच्या बोला । म्हणे वजनीं सोनें घाला
१५४२	।।ना.गा.ज.४५०.१३।।	आग्नहोत्री तो ब्राह्मण । उभा रायातें येऊन
१५४३	।।ना.गा.ज.४५०.१४।।	देई तारामती तुक । एक भार हा कनक
१५४४	।।ना.गा.ज.४५०.१५।।	रोहिदास म्हणे ताता । माता स्नेह माझ्या चित्ता
१५४५	।।ना.गा.ज.४५०.१६।।	राव बोलिला वचन । शीघ्र यावें बा भेटोंन
१५४६	।।ना.गा.ज.४५०.१७।।	उभी राहोनी वेल्हाळा । पोटीं बाळाचा उमाळा
१५४७	।।ना.गा.ज.४५०.१८।।	अश्रु ढाळिती लोचन । हा हा शब्दें करी रुदन
१५४८	।।ना.गा.ज.४५०.१९।।	बोले कौशिक ये माते । स्नेह सोड चाल पंथें
१५४९	।।ना.गा.ज.४५०.२०।।	करूनियां ताडातोडीं । पाहे कवतुक आवडी
१५५०	।।ना.गा.ज.४५०.२१।।	माता म्हणे बाळकासी । ममता असूं दे मजपाशीं
१५५१	।।ना.गा.ज.४५०.२२।।	रोहिदास ताराराणी । तेही घेतली ब्राह्मणीं
१५५२	।।ना.गा.ज.४५०.२३।।	मोल देऊनियां दुणें । राव घेतला डोंबानें
१५५३	।।ना.गा.ज.४५०.२४।।	घेऊनियां घरा आला । येऊन सांगतो भार्येला
१५५४	।।ना.गा.ज.४५०.२५।।	सेवक आणिला तुम्हांसी । सेवा घ्यावी आवडेल तैसी
१५५५	।।ना.गा.ज.४५०.२६।।	घागर घेऊनियां हातीं । पाणी आणि शीघ्र गति
१५५६	।।ना.गा.ज.४५०.२७।।	कुंभ घेऊनि चालिला । खडा हाणोनि फोडिला
१५५७	।।ना.गा.ज.४५०.२८।।	रिक्तपाणि येतां त्यासी । अवघे धुमसिती रायासी
१५५८	।।ना.गा.ज.४५०.२९।।	हा तो पहिलाच शकुन । पुढें यानें काय करणें
१५५९	।।ना.गा.ज.४५०.३०।।	म्हणती हा तो नव्हे भला । यासी ठेवा स्मशानाला
१५६०	।।ना.गा.ज.४५०.३१।।	राव रक्षी स्मशानासी । म्हणे नामयाची दासी

१५६१	।।ना.गा.ज.४५१.०१।।	अनामिक त्यासी पुसे । तुमचें भोजनाचें कैसें
१५६२	।।ना.गा.ज.४५१.०२।।	कर संपुष्ट जोडुनी । राव विनवी मधुर वचनीं
१५६३	।।ना.गा.ज.४५१.०३।।	जेणें निघे तुमचें काम । राखा माझाही स्वधर्म
१५६४	।।ना.गा.ज.४५१.०४।।	नृपा दिलें कोरें अन्न । सुखें करावें भोजन
१५६५	।।ना.गा.ज.४५१.०५।।	धान्य घेऊनियां करीं । राव आला गंगातीरीं
१५६६	।।ना.गा.ज.४५१.०६।।	स्नान संध्या नेम सारी । राजा स्वयंपाक करी
१५६७	।।ना.गा.ज.४५१.०७।।	गाय अग्नीचा पैं ग्रास । ठाव वाढिला धर्मास
१५६८	।।ना.गा.ज.४५१.०८।।	ग्रास घालावा वदनीं । आला विश्वामित्र मुनी
१५६९	।।ना.गा.ज.४५१.०९।।	बैसावें जो भोजनासी । अकस्मात् पावे ऋषी
१५७०	।।ना.गा.ज.४५१.१०।।	एक भाग भक्षियेला । दुजा राजाचा उचलिला
१५७१	।।ना.गा.ज.४५१.११।।	तृप्त होवोनि ऋषीश्वर । उठे देउनी ढेंकर
१५७२	।।ना.गा.ज.४५१.१२।।	पदर कसुनी कटासी । सदा सादर सेवेसी
१५७३	।।ना.गा.ज.४५१.१३।।	निराहार शक्ति हीन । दिसे जैसा रंक दीन
१५७४	।।ना.गा.ज.४५१.१४।।	ऐसा छळीं प्रतिदिनीं । म्हणे नामयाची जनी
१५७५	।।ना.गा.ज.४५२.०१।।	येरीकडे ताराराणी । द्विजा घरीं वाहे पाणी
१५७६	।।ना.गा.ज.४५२.०२।।	छिद्र पाडोनी रांजणा । पाणी त्यामध्यें थारेना
१५७७	।।ना.गा.ज.४५२.०३।।	नानापरीचें गांजणें । देती गाळी हो प्रदानें
१५७८	।।ना.गा.ज.४५२.०४।।	पाणी वाहणें कीं खेळां । होऊं आली सांजवेळा
१५७९	।।ना.गा.ज.४५२.०५।।	काळ कौशिक ब्राह्मणें । नित्य अग्निहोत्र करणें
१५८०	।।ना.गा.ज.४५२.०६।।	रोहिदासा आज्ञा करी । समिधा आणाव्या झडकरी
१५८१	।।ना.गा.ज.४५२.०७।।	संगें घेऊनियां गडी । वना चालिला तांतडी
१५८२	।।ना.गा.ज.४५२.०८।।	धरूनियां सर्पवेष । रोहिदासा केला दंश
१५८३	।।ना.गा.ज.४५२.०९।।	येऊनी सांगती मातेस । सर्पें खादलें पुत्रास
१५८४	।।ना.गा.ज.४५२.१०।।	गेला चंद्र उतरोनी । दिसे जैसी म्लान वदनीं
१५८५	।।ना.गा.ज.४५२.११।।	करुणा आली ब्राह्मणासी। जाय सांभाळी पुत्रासी
१५८६	।।ना.गा.ज.४५२.१२।।	रडे मोकलोनी धाय । म्हणे आतां मी करूं काय

१५८७	।।ना.गा.ज.४५२.१३।।	काय करूं आतां कैसें । कोठें गेलें हो पाडस
१५८८	।।ना.गा.ज.४५२.१४।।	प्राण रोहिदासा कंठीं । करा पाडसाची भेटी
१५८९	।।ना.गा.ज.४५२.१५।।	निबिड अंधार काळोख । दीर्घ स्वरें मारी हांक
१५९०	।।ना.गा.ज.४५२.१६।।	ठेंचा पायीं अडखळत । पुढें पायासीं लागत
१५९१	।।ना.गा.ज.४५२.१७।।	बाळ कवळोनि हात । जनी म्हणे शोक करीत
१५९२	।।ना.गा.ज.४५३.०१।।	वेष धरोनि ब्राह्मण । तिसी करी संभाषण
१५९३	।।ना.गा.ज.४५३.०२।।	खेद न करी मानसीं । काय करणें होणारासी
१५९४	।।ना.गा.ज.४५३.०३।।	वेगीं संस्कारी याला । दिवसां मागती जा कामाला
१५९५	।।ना.गा.ज.४५३.०४।।	घेऊनियां प्रेतासी । वेगीं चेतवी अग्नीसी
१५९६	।।ना.गा.ज.४५३.०५।।	ज्वाला अवलोकितां नयनीं । राव आला तत्क्षणीं
१५९७	।।ना.गा.ज.४५३.०६।।	म्हणे कोण गे तूं येथ । येरी म्हणे तुमचा सुत
१५९८	।।ना.गा.ज.४५३.०७।।	कैचा सुत कैसा काय । आमचा हक्क कोठें आहे
१५९९	।।ना.गा.ज.४५३.०८।।	करुणा ग्लानी करी त्याची । म्हणे गोष्ट हे तो कैंची
१६००	।।ना.गा.ज.४५३.०९।।	बरेपणें जाई आतां । दंड बैसतील माथां
१६०१	।।ना.गा.ज.४५३.१०।।	घेई प्रेत ओसंगळी । वेगें प्रवेशे देउळीं
१६०२	।।ना.गा.ज.४५३.११।।	आवडे प्रेत झोपीं जाय । ऋषी धांवे लवलाहे
१६०३	।।ना.गा.ज.४५३.१२।।	उदर चिरोनियां नखीं । मांस कवळें घाली मुखीं
१६०४	।।ना.गा.ज.४५३.१३।।	येऊनियां महाद्वारीं। जनी म्हणे शोक करी
१६०५	।।ना.गा.ज.४५४.०१।।	धांवा धांवा नगरवासी । लास भक्षिते लेंकुरासी
१६०६	।।ना.गा.ज.४५४.०२।।	अवघे होऊनियां गोळा । कोणी न जातो देउळा
१६०७	।।ना.गा.ज.४५४.०३।।	जाळ करोनी पाहती । शेण धुळी धोंडे माती
१६०८	।।ना.गा.ज.४५४.०४।।	मारोनी बाहेर घातली । केली डोंबाचे हवालीं
१६०९	।।ना.गा.ज.४५४.०५।।	हिच्या करा शिरच्छेदाला। तंव तो आज्ञापी रायाला
१६१०	।।ना.गा.ज.४५४.०६।।	रायें घेऊनियां तिला । आणियेलें ठिकाणाला
१६११	।।ना.गा.ज.४५४.०७।।	म्हणे करी हो स्मरण । तुझें कुळदैवत कोण
१६१२	।।ना.गा.ज.४५४.०८।।	खड्ग पुसोनियां धारा । घाव घाली जो शिरा

१६१३	।।ना.गा.ज.४५४.०९।।	ऋषि धांवला सत्वरी । वरच्यावरी कर धरी
१६१४	।।ना.गा.ज.४५४.१०।।	म्हणे माग मी प्रसन्न । येरी बोले हास्यवदन
१६१५	।।ना.गा.ज.४५४.११।।	रोहिदासा ऐसा पुत्र । हरिश्चंद्र राजा भ्रतार
१६१६	।।ना.गा.ज.४५४.१२।।	याचक विश्वामित्र ऐसा । जन्मोजन्मीं दे जगदीशा
१६१७	।।ना.गा.ज.४५४.१३।।	बापा भली केली सीमा । तप वोपितों मी तुम्हां
१६१८	।।ना.गा.ज.४५४.१४।।	गगनीं विमानें दाटती । सुमनभार वरुषती
१६१९	।।ना.गा.ज.४५४.१५।।	वेगें उतरलीं विमानें। नामयाची जनी म्हणे
१६२०	।।ना.गा.ज.४५५.०१।।	दूत विनविती कर जोडुनी । म्हणती आरुढावें विमानीं
१६२१	।।ना.गा.ज.४५५.०२।।	ऋषि म्हणे न घडे ऐसें । ह्याचि तृप्ति नाहीं आस
१६२२	।।ना.गा.ज.४५५.०३।।	पटावरुनि काढिला । पटीं बैसवीन ह्याला
१६२३	।।ना.गा.ज.४५५.०४।।	थोर वाजत गाजत । विप्र मंत्रघोष करीत
१६२४	।।ना.गा.ज.४५५.०५।।	विजयी जाला हरिश्चंद्र । आडवा पावला परिवार
१६२५	।।ना.गा.ज.४५५.०६।।	लक्षानुलक्ष आरत्या करिती । नगरनारी ओवाळिती
१६२६	।।ना.गा.ज.४५५.०७।।	ऋषि अभिषेकिती रायाला । थोर मनीं आनंदला
१६२७	।।ना.गा.ज.४५५.०८।।	राया प्राप्ती जाला पट । गुढी उभवी वसिष्ट
१६२८	।।ना.गा.ज.४५५.०९।।	येथुनी हरिश्चंद्र आख्यान । नामयाची जनी म्हणे
१६२९	।।ना.गा.ज.४५६.०१।।	थालीपाक ऐकतां । हरि वारी जन्मव्यथा
१६३०	।।ना.गा.ज.४५६.०२।।	दुर्योधनाच्या घरासी । आला दुर्वास हो ऋषी
१६३१	।।ना.गा.ज.४५६.०३।।	सेवें बहुत तोषविला । वर माग तूं इच्छिला
१६३२	।।ना.गा.ज.४५६.०४।।	शिष्यासह रानीं जावें । इच्छाभोजन मागावें
१६३३	।।ना.गा.ज.४५६.०५।।	नंतर शाप द्यावा । आतां जातों वर द्यावा
१६३४	।।ना.गा.ज.४५६.०६।।	हर हर शब्द थोर केला । जाला वनांत गलबला
१६३५	।।ना.गा.ज.४५६.०७।।	नवल सर्वांसी वाटलें । जनी म्हणे ऋषी आले
१६३६	।।ना.गा.ज.४५७.०१।।	मध्यरात्रीं ऋषिसहित । आला दुर्वास वनांत
१६३७	।।ना.गा.ज.४५७.०२।।	पंडुसुत जागे जाले । ऋषि समस्त वंदिले
१६३८	।।ना.गा.ज.४५७.०३।।	धर्म भीमाकडे पाहे । सत्वहानि होत आहे

१६३९	।।ना.गा.ज.४५७.०४।।	द्रौपदीनें धावा केला । निजला देव जागा झाला
१६४०	।।ना.गा.ज.४५७.०५।।	ऋषि तृप्त केलें वनीं । म्हणे नामयाची जनी
१६४१	।।ना.गा.ज.४५८.०१।।	करचरण प्रक्षाळुनी । उभी ठेली वृंदावनीं
१६४२	।।ना.गा.ज.४५८.०२।।	जोडोनियां करकमळा । धांवे पावे बा गोपाळा
१६४३	।।ना.गा.ज.४५८.०३।।	कृष्णा पाहतोसी काय । आमुचें सत्व जाउं पाहे
१६४४	।।ना.गा.ज.४५८.०४।।	ऋषि स्नानासी कोपिष्ट । गेले सांगोनियां स्पष्ट
१६४५	।।ना.गा.ज.४५८.०५।।	दिवसा कर्मांचा उगाणा । सर्व सारोनियां जाणा
१६४६	।।ना.गा.ज.४५८.०६।।	आतां येतो शीघ्र गती । अन्नें वाढा पात्रावरती
१६४७	।।ना.गा.ज.४५८.०७।।	अन्न न देखतां डोळां । भस्म करीन सकळां
१६४८	।।ना.गा.ज.४५८.०८।।	गेला घालोनी संकटी । लाज राखें जगजेठी
१६४९	।।ना.गा.ज.४५८.०९।।	कोणी नाहीं रे निर्वाणीं । म्हणे नामयाची जनी
१६५०	।।ना.गा.ज.४५९.०१।।	ताट विस्तारी रुक्मिणी । देव बैसले भोजनीं
१६५१	।।ना.गा.ज.४५९.०२।।	इतक्यामध्यें अकस्मात । ध्वनि उमटला कानांत
१६५२	।।ना.गा.ज.४५९.०३।।	धांवा ऐकतां श्रवणीं । ताट लोटी चक्रपाणि
१६५३	।।ना.गा.ज.४५९.०४।।	उठिला खडबडोनि कैसा । पावे बहिणीचिया क्लेशा
१६५४	।।ना.गा.ज.४५९.०५।।	उभी वृंदावनीं बाळा । पुढें देखिला सांवळा
१६५५	।।ना.गा.ज.४५९.०६।।	मुगुट कुंडलें मेखळा । वैजयंती वनमाळा
१६५६	।।ना.गा.ज.४५९.०७।।	शंख चक्र आयुधें करीं । दिसे घवघवीत हरि
१६५७	।।ना.गा.ज.४५९.०८।।	झळके पीतांबर कासे । नयनीं कोंदला प्रकाशे
१६५८	।।ना.गा.ज.४५९.०९।।	पाहतां आनंदली मनीं । म्हणे नामयाची जनी
१६५९	।।ना.गा.ज.४६०.०१।।	रत्नाचे मंचकीं पहुडे चक्रपाणि । चोळीत रुक्मिणी चरणांबुज
१६६०	।।ना.गा.ज.४६०.०२।।	कानीं पडियेले द्रौपदीचे बोल । उठे घननीळ तातडीनें
१६६१	।।ना.गा.ज.४६०.०३।।	रुक्मिणी म्हणे ऐक एक गोष्ट । पडिलें संकटीं तान्हें माझें
१६६२	।।ना.गा.ज.४६०.०४।।	टाकिला गरुड अनवाणी पाय । जनी म्हणे माय धाविन्नली
१६६३	।।ना.गा.ज.४६१.०१।।	वंदोनी श्रीकृष्णचरण । हरुषें घाली लोटांगण
१६६४	।।ना.गा.ज.४६१.०२।।	म्हणे तूंचि माझ्या मना । स्वस्थ करी गा नारायणा

१६६५	।।ना.गा.ज.४६१.०३।।	आश्रमासी येतां ऋषि । भोजन घालावें तयासी
१६६६	।।ना.गा.ज.४६१.०४।।	ऐकतांचि हांसे देव । न दिसे प्राप्तीचा उपाव
१६६७	।।ना.गा.ज.४६१.०५।।	अवकाळीं कैचें अन्न। विचारितां दिसे विघ्न
१६६८	।।ना.गा.ज.४६१.०६।।	त्यांचे असो बळ तैसें । कांहीं वोपावें आम्हांस
१६६९	।।ना.गा.ज.४६१.०७।।	स्वस्थ नव्हे माझें मन । क्षुधा लागली दारुण
१६७०	।।ना.गा.ज.४६१.०८।।	ताटीं विस्तारिला मेवा । तुझा ऐकोनियां धांवा
१६७१	।।ना.गा.ज.४६१.०९।।	न जेवितां आलों येथ । बहु जालों क्षुधाक्रांत
१६७२	।।ना.गा.ज.४६१.१०।।	सत्वर मेळवीं भोजनीं । म्हणे नामयाची जनी
१६७३	।।ना.गा.ज.४६२.०१।।	हासें आलें द्रौपदीसी । बापा वचन परियेसी
१६७४	।।ना.गा.ज.४६२.०२।।	सर्व अरिष्टभंजना । तुजवीणा बाहो कोणा
१६७५	।।ना.गा.ज.४६२.०३।।	एक भाव तुझे पायीं । या वेगळें कांहीं नाहीं
१६७६	।।ना.गा.ज.४६२.०४।।	थाळीमाजीं पाहतां अन्न । होय क्षुधेचें हरण
१६७७	।।ना.गा.ज.४६२.०५।।	थाळी दाखवी देवासी । कैंचा विश्वास तुजसी
१६७८	।।ना.गा.ज.४६२.०६।।	धांडोळितां कष्टें बहुतें । किंचित शाखापत्र तेथें
१६७९	।।ना.गा.ज.४६२.०७।।	निर्मी कैवल्याचा दानी । म्हणे नामयाची जनी
१६८०	।।ना.गा.ज.४६३.०१।।	कर पसरिला भगवंतें । घाली द्रौपदी देठांतें
१६८१	।।ना.गा.ज.४६३.०२।।	म्हणे पावो विश्वंभर । बोले द्रौपदी सुंदर
१६८२	।।ना.गा.ज.४६३.०३।।	देतां तृप्तीचा ढेंकर । धालें त्रैलोक्य अपार
१६८३	।।ना.गा.ज.४६३.०४।।	दावी कौतुक श्रीपती । पर्वत अन्नाचे पाहाती
१६८४	।।ना.गा.ज.४६३.०५।।	उष्ण घवघवीत कैसी । वाफा उठती आकाशीं
१६८५	।।ना.गा.ज.४६३.०६।।	नाना परिचीं दिव्यान्नें । डोळां दावीं नारायणें
१६८६	।।ना.गा.ज.४६३.०७।।	चोज सर्वांचिया मनीं । म्हणे नामयाची जनी
१६८७	।।ना.गा.ज.४६४.०१।।	येरीकडे गंगातीरीं । कवतुक दाखवी श्रीहरी
१६८८	।।ना.गा.ज.४६४.०२।।	धर्मासहित साहीजण । ऋषिलागीं देती अन्न
१६८९	।।ना.गा.ज.४६४.०३।।	रत्नखचित मंडपा आंत । पंगती बैसल्या आनंदभूत
१६९०	।।ना.गा.ज.४६४.०४।।	नानापरिचें दिव्य अन्न । वाढी द्रौपदी आपण

१६९१	।।ना.गा.ज.४६४.०५।।	मिठी पडली वदनीं । म्हणे नामयाची जनी
१६९२	।।ना.गा.ज.४६५.०१।।	म्हणती माथां असते तोंड । अन्नें भक्षितों उदंड
१६९३	।।ना.गा.ज.४६५.०२।।	कैचीं पोटें आमुचीं लहान । गोड धर्मा घरचें अन्न
१६९४	।।ना.गा.ज.४६५.०३।।	उदरें सागराच्या ऐसी । करुनि यावे धर्मापाशीं
१६९५	।।ना.गा.ज.४६५.०४।।	तृप्ति द्रौपदीच्या हातें । नित्य भक्षाया अन्नातें
१६९६	।।ना.गा.ज.४६५.०५।।	वदन करवेना तळीं । वरुती चंद्राची मंडळी
१६९७	।।ना.गा.ज.४६५.०६।।	तंद्री लागलीसे नेत्रा । कोण सांभाळितें धोत्रा
१६९८	।।ना.गा.ज.४६५.०७।।	तरी आवडी भोजनीं । म्हणे नामयाची जनी
१६९९	।।ना.गा.ज.४६६.०१।।	ऐशा धाल्या ऋषिपंक्ती । ढेकर आनंदाचे देती
१७००	।।ना.गा.ज.४६६.०२।।	तृप्ति बाणली सर्वांसी । तरी आवड अन्नापाशीं
१७०१	।।ना.गा.ज.४६६.०३।।	उठले हात प्रक्षाळुनी । विडे घेतले सर्वांनीं
१७०२	।।ना.गा.ज.४६६.०४।।	न बैसावे सुखासनीं । अवघे पहुडले शयनीं
१७०३	।।ना.गा.ज.४६६.०५।।	ते देखोनि निद्रिस्थ । साही जणें झालीं गुप्त
१७०४	।।ना.गा.ज.४६६.०६।।	माया निर्मियेली जैसी । आतां गुप्त जाली तैसी
१७०५	।।ना.गा.ज.४६६.०७।।	कोणा न कळे याची करणी । म्हणे नामयाची जनी
१७०६	।।ना.गा.ज.४६७.०१।।	म्हणे पाचारा भूदेवा । धर्म म्हणे सहदेवा
१७०७	।।ना.गा.ज.४६७.०२।।	गंगातिरासी येउन । नमियेले ऋषिजन
१७०८	।।ना.गा.ज.४६७.०३।।	त्वरा करा ऋषिजन । पात्रीं विस्तारिलें अन्न
१७०९	।।ना.गा.ज.४६७.०४।।	म्हणती बापा ऐसें नव्हे । पोट आहे किंवा काय
१७१०	।।ना.गा.ज.४६७.०५।।	आतां स्वस्थ प्रसादें । तृप्त जाली ऋषिवंदें
१७११	।।ना.गा.ज.४६७.०६।।	कैंच्या नष्ट दुर्योधनें । आम्हां धाडिलें दुर्जनें
१७१२	।।ना.गा.ज.४६७.०७।।	कष्टी करितां अंबऋषि । चक्र लागलें पाठीसी
१७१३	।।ना.गा.ज.४६७.०८।।	तेचि गोष्टी जाली आतां । शीघ्र पळावें तत्वतां
१७१४	।।ना.गा.ज.४६७.०९।।	माझा आशीर्वाद धर्मा । नित्य कल्याणचि तुम्हा
१७१५	।।ना.गा.ज.४६७.१०।।	ऋषि निघाले तेथूनि । म्हणे नामयाची जनी
१७१६	।।ना.गा.ज.४६८.०१।।	ऐशापरि पांडवातें । रक्षियेलें दीनानाथें

१७१७	।।ना.गा.ज.४६८.०२।।	शंखचक्र आयुधें करीं । छाया पितांबर करी
१७१८	।।ना.गा.ज.४६८.०३।।	हस्त ठेऊनियां माथां । सुखी असा निर्भय चित्ता
१७१९	।।ना.गा.ज.४६८.०४।।	आज्ञा घेउनी सर्वांची । देव गेले द्वारकेसी
१७२०	।।ना.गा.ज.४६८.०५।।	सरला थालीपाक आतां । पुढें सावधान श्रोता
१७२१	।।ना.गा.ज.४६८.०६।।	कथा पुढील गहन । घोषयात्रा निरूपण
१७२२	।।ना.गा.ज.४६८.०७।।	येथुनी अध्याय कळस । जनी म्हणे जाला रस
१७२३	।।ना.गा.ज.४६९.०१।।	ऐसा योग घडे ज्यातें । धन्य माता आणि ताते
१७२४	।।ना.गा.ज.४६९.०२।।	अखंड वासना । ब्रह्मार्पण देवार्चना
१७२५	।।ना.गा.ज.४६९.०३।।	ब्रह्मभावें हो देवा। ऐसा पूजी जो भूदेवा
१७२६	।।ना.गा.ज.४६९.०४।।	नम्रता चरणीं । म्हणे जनी सरली मनीं
१७२७	।।ना.गा.ज.४७०.०१।।	जावोनी राउळा जोडूनियां कर । बोले ज्ञानेश्वर विठोबासी
१७२८	।।ना.गा.ज.४७०.०२।।	करावी ही तीर्थें आवड अंतरीं । घ्यावें बरोबरी नामदेवा
१७२९	।।ना.गा.ज.४७०.०३।।	ऐकतांचि ऐसें म्हणे पांडुरंग । न धाडितां राग येईल तुज
१७३०	।।ना.गा.ज.४७०.०४।।	तयाविण मज घडी जरी जाय । युगा ऐसी होय ज्ञानेश्वरा
१७३१	।।ना.गा.ज.४७०.०५।।	जनी मनीं मग नामया पाचारी । कृपाळुवा हरि मायबाप
१७३२	।।ना.गा.ज.४७१.०१।।	जाय बरोबरी नामया तूं जाय । न चले उपाय कांहीं येथें
१७३३	।।ना.गा.ज.४७१.०२।।	करूं काय मज पडिलें सांकडें । उल्लंघेना भीड मज याची
१७३४	।।ना.गा.ज.४७१.०३।।	नामा म्हणे ऐका स्वामी नारायणा । एक विज्ञापना परिसावी
१७३५	।।ना.गा.ज.४७१.०४।।	कटावरी कर नाहीं ज्या देवाचे । न घे मी तयाचें दरुशन
१७३६	।।ना.गा.ज.४७१.०५।।	मारितांचि हांक यावें त्वां झडकरी । बरें म्हणे हरि नामयासी
१७३७	।।ना.गा.ज.४७१.०६।।	निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान चांगया। जनी म्हणे तया सांगतसे
१७३८	।।ना.गा.ज.४७२.०१।।	तुम्ही सकळिक आहांत सज्ञान । हें माझें अज्ञान फार आहे
१७३९	।।ना.गा.ज.४७२.०२।।	याजबरोबर चालावी हो वाटें । मोडतील कांटे सांभाळावें
१७४०	।।ना.गा.ज.४७२.०३।।	हळूहळु जावें करूं नका घाई । चालायाची नाहीं सवय त्यासी
१७४१	।।ना.गा.ज.४७२.०४।।	लागतांचि भूक न धरी हा निर्धार । घ्यावा समाचार क्षणक्षणा
१७४२	।।ना.गा.ज.४७२.०५।।	जनी म्हणे ऐसें बोलिला घननीळ । नेत्रींहुनि जळ वाहतसे

१७४३	।।ना.गा.ज.४७३.०१।।	वियोग नाम्याचा न साहे गोपाळा । न जाय राउळा पांडुरंग
१७४४	।।ना.गा.ज.४७३.०२।।	पद्मतळीयांत राहे विश्वंभर । कळे समाचार रुक्मिणीसी
१७४५	।।ना.गा.ज.४७३.०३।।	चलावें मंदिरीं स्वामी पुरुषोत्तमा । येईल गे नामा माझा जेव्हां
१७४६	।।ना.गा.ज.४७३.०४।।	तयाविण मज दाही दिशा ओस । न लगे चित्तास गोड कांहीं
१७४७	।।ना.गा.ज.४७३.०५।।	जनी म्हणे ऐसी आवड नाम्याची । म्हणोनियां त्याची जाले दासी
१७४८	।।ना.गा.ज.४७४.०१।।	जो जो जो जो रे गोरक्षा । जगदोध्दारा जगदीशा
१७४९	।।ना.गा.ज.४७४.०२।।	शुद्ध सुमनांची सेज । भक्तिभावें आंत नीज
१७५०	।।ना.गा.ज.४७४.०३।।	माता उन्मनी केवळ । निजीं निजले गोपाळ
१७५१	।।ना.गा.ज.४७४.०४।।	मागें घालुनी आनंदा । सुखें निजे बा गोविंदा
१७५२	।।ना.गा.ज.४७४.०५।।	अद्वय नाम गीती गातां । दासी जनी कैंची आतां
१७५३	।।ना.गा.ज.४७५.०१।।	पुण्यवंत तो पाताळ लोकीं नेला । दरिद्री तो भाग्यवंत केला । चोरट्याचा बहुमान वाढविला । कीर्तिवानाचा अपमान केला
१७५४	।।ना.गा.ज.४७५.०२।।	धुंद झाला तुझा दरबार
१७५५	।।ना.गा.ज.४७५.०३।।	वैरियासि दिधली मोक्षसिद्धी । कपटिया दिधली महानिधी । सेवकाच्या ढुंगा न मिळे चिंधी । चाळकासी त्रैलोक्य भावें वंदी
१७५६	।।ना.गा.ज.४७५.०४।।	पतिव्रता ती वृथा गुंतविली । वेश्या गणिका ती सत्यलोका नेली । कळी स्वकुळा लावियेली । यादववृंदा ही गोष्ट बरी नाहीं केली
१७५७	।।ना.गा.ज.४७५.०५।।	सत्यवानाचा बहु केला छळ । कीर्तिवानाचें मारियेलें बाळ । सखा म्हणविसी त्याचें नासी बळ । जनी म्हणे मी जाणें तुझे खेळ
१७५८	।।ना.गा.ज.४७६.०१।।	माझें अचडें बचडें । छकुडे गे राधे रूपडें । पांघरूं घालीती कुंचडें
१७५९	।।ना.गा.ज.४७६.०२।।	हरि माझा गे सांवळा । पायीं पैंजण वाजे खुळखुळा । यानें भुलविल्या गोपिबाळा
१७६०	।।ना.गा.ज.४७६.०३।।	हरि माझा गे नेणता । करी त्रिभुवनाचा घोंगता। जो कां नांदे त्रिभुवनीं
१७६१	।।ना.गा.ज.४७६.०४।।	ऐसे देवाजीचे गडी । पेंद्या सुदाम्याची जोडी । बळिभद्र त्याचा गडी
१७६२	।।ना.गा.ज.४७६.०५।।	जनी म्हणे तूं चक्रपाणि । खेळ खेळतो वृंदावनीं । लुब्ध जाल्या त्या गौळणी
१७६३	।।ना.गा.ज.४७७.०१।।	विठोबा मला मूळ धाडा । धांवत येईन दुडदुडां । चरणीं लोळेन गडबडा । माझा जीव जाला वेडा
१७६४	।।ना.गा.ज.४७७.०२।।	कर ठेवुनी कटावरी । उभा राहिला विटेवरी । मुकुट घातला सरीं । कलगी खोविली वरी
१७६५	।।ना.गा.ज.४७७.०३।।	पितांबर नेसूनिया पिवळा । गळां तुळसीच्या माळा । कीं रूप सुंदर सांवळा । तेज झळके झळाळा
१७६६	।।ना.गा.ज.४७७.०४।।	नामदेवाचें कौतुक । मला सांपडलें माणिक । विठोबा पाहुनी तुझें मुख । हारपली माझी तहान भूक
१७६७	।।ना.गा.ज.४७७.०५।।	विठोबा तुझी संगत बरी । जैसा चंदन मैलगिरी । संत चालले पंढरी । निशाण पताका जरतारी
१७६८	।।ना.गा.ज.४७७.०६।।	जशी मोहोळासी लुब्ध मासी । तसी तूं सखी माझी होसी । सुख दुःख सांगेन तुजपासी । माझा जीव होईल खुषी

१७६९	।।ना.गा.ज.४७७.०७।।	काळी मध्यान रात्र जाली । फेरी विठ्ठलाची आली । जनी म्हणे सूक पडली । भेट नाहीं विठ्ठलाची जाली
१७७०	।।ना.गा.ज.४७८.०१।।	नवल वर्तलें नवल वर्तलें नवल गुरुचे पायीं । कापूर जळूनि गेला तेथें काजळी उरली नाहीं
१७७१	।।ना.गा.ज.४७८.०२।।	साखर पेरुनी ऊंस काढिला कान जाला डोळा । निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा
१७७२	।।ना.गा.ज.४७८.०३।।	नवल वर्तलें नवल वर्तलें नवल चोजवेना । डोहामाजीं मासोळीनें वांचविलें जीवना
१७७३	।।ना.गा.ज.४७८.०४।।	नवल वर्तलें नवल वर्तलें अनाम चक्रपाणि । गोकुळ चोरुन नेलें तेथें कैंची दासी जनी
१७७४	।।ना.गा.ज.४७९.०१।।	खंडेराया तुज करिते नवसू । मरूं दे रे सासू खंडेराया
१७७५	।।ना.गा.ज.४७९.०२।।	सासू मेल्यावरी तुटेल आसरा । मरूं दे सासरा खंडेराया
१७७६	।।ना.गा.ज.४७९.०३।।	सासरा मेलिया होईल आनंद । मरूं दे नणंद खंडेराया
१७७७	।।ना.गा.ज.४७९.०४।।	नणंद मरतां होईन मोकळी। गळां घालीन झोळी भंडाराची
१७७८	।।ना.गा.ज.४७९.०५।।	जनी म्हणे खंडे अवघे मरूं दे । एकटी राहूं दे पायापाशीं
१७७९	।।ना.गा.ज.४८०.०१।।	ऐसा हा देवानें थोर पवाडा केला । पूर्व अवतारीं जाला हयग्रीव
१७८०	।।ना.गा.ज.४८०.०२।।	मग अंबऋषिसाठीं पडियेला संकटीं । मच्छ जाला पोटीं समुद्राच्या
१७८१	।।ना.गा.ज.४८०.०३।।	होउनी कच्छप पर्वत धरिला । वराहें मारिला दैत्य भार
१७८२	।।ना.गा.ज.४८०.०४।।	तयाचा सहोदर मृत्यु नाहीं ऐसा वर। तेव्हां अवतार नारसिंह जाला
१७८३	।।ना.गा.ज.४८०.०५।।	अर्धनारी नटेश्वर दुसरा तो वामन । भार्गव तो निधान दशरथीं
१७८४	।।ना.गा.ज.४८०.०६।।	होऊनियां कृष्ण कंस वधियेला । आतां बुध्द जाला सखा माझा
१७८५	।।ना.गा.ज.४८०.०७।।	लीला अवतारी हरि करी खेळ नाना । म्हणे जनी जाणा तैं मी होत्यें
१७८६	।।ना.गा.ज.४८१.०१।।	बघायाला गेले क्रियामाण शिडी । घालूनियां उडी तेथें आले
१७८७	।।ना.गा.ज.४८१.०२।।	पुरवी या नवसा म्हणवी गा देवा । टोंचियेले जीवा गळ देहीं
१७८८	।।ना.गा.ज.४८१.०३।।	आठ चारी फेरे फिरविती त्यासी । पाहती नवसासी पुरलें नाहीं
१७८९	।।ना.गा.ज.४८१.०४।।	दु:ख सुख तेथें पाहूनी प्रमाण । करिती समान क्रीयमाण
१७९०	।।ना.गा.ज.४८१.०५।।	दुरुनी पाहती दावी जनी दासी । म्हणे नामयासी पहावें स्वामी
१७९१	।।ना.गा.ज.४८२.०१।।	शेष पुसतां बाणातें । कोण काजा आला येथें
१७९२	।।ना.गा.ज.४८२.०२।।	बाण करी हाहाकार । मुखें पडलीया धूर
१७९३	।।ना.गा.ज.४८२.०३।।	वृक्ष पाडी हो मक्षिका । तैसा येथें जालें देखा
१७९४	।।ना.गा.ज.४८२.०४।।	काय शिखंडीचे बाण । करितां भीष्माचें पतन

१७९५	।।ना.गा.ज.४८२.०५।।	तेथें मागितलें पाणी । म्हणे नामयाची जनी
१७९६	।।ना.गा.ज.४८३.०१।।	मांडियेला खेळ । रंग बुद्धिबळ
१७९७	।।ना.गा.ज.४८३.०२।।	कैंचा शह आला । प्याद्याखालीं फर्जी मेला
१७९८	।।ना.गा.ज.४८३.०३।।	शहबाजू जाली। जनी म्हणे मात केली
१७९९	।।ना.गा.ज.४८४.०१।।	भक्ति ते कठीण इंगळाची खाई । रिघणें त्या डोहीं कठीण असे
१८००	।।ना.गा.ज.४८४.०२।।	भक्ति ते कठीण विषग्रास घेणें । उदास पैं हाणें जीवें भावें
१८०१	।।ना.गा.ज.४८४.०३।।	भक्ति ते कठीण भक्ति ते कठीण । सोसी जो तो वार घडे तया
१८०२	।।ना.गा.ज.४८४.०४।।	भक्ति ते कठीण विचारूनि पाहे जनी। भक्तियोगें संतसमागमीं सर्व सिद्धी
१८०३	।।ना.गा.ज.४८५.०१।।	उठा पांडुरंगा प्रभातसमयो पातला । वैष्णवांचा मेळा गरुडपारीं घातला
१८०४	।।ना.गा.ज.४८५.०२।।	वाळवंटापासूनि महाद्वारापर्यंत । सुरवंटाची दाटी उभे जोडूनि हात
१८०५	।।ना.गा.ज.४८५.०३।।	शुकसनकादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटी । कवाडाआडूनि पाहताती जगजेठी
१८०६	।।ना.गा.ज.४८५.०४।।	सुरवरांची विमानें गगनीं दाटलीं सकळ । रखुमाबाई माते वेगीं उठवा घननीळ
१८०७	।।ना.गा.ज.४८५.०५।।	रंभादीक नाचती उभ्या जोडुनी हात । त्रिशूळ डमरू घेऊनि आला गिरजेचा कांत
१८०८	।।ना.गा.ज.४८५.०६।।	पंचप्राण आरत्या घेऊनियां देवस्त्रिया येती । भावें ओवाळिती राई रखुमाबाईचा पती
१८०९	।।ना.गा.ज.४८५.०७।।	अनंत अवतार घेसी भक्ताकारणें। कनवाळु कृपाळु दीनालागीं उद्धरणें
१८१०	।।ना.गा.ज.४८५.०८।।	चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं । पाठीमागें डोळे झांकुनी उभी ते जनी

१	अंकित	।।ना.गा.ज.२२९.०५।।	ऐसा अंकित भक्तासी । म्हणे नामयाची जनी दासी
२	अंकित	।।ना.गा.ज.२४२.०१।।	देव भक्ताचा अंकित । कामें त्याची सदा करित
३	अंकित	।।ना.गा.ज.२५३.०३।।	जनी म्हणे भाग्यवंत । तिच्या भावाचा अंकित
४	अंकित	।।ना.गा.ज.२९७.०२।।	देव भावाचा अंकित । जाणे दासाचें तें चित्त
५	अंकिला	।।ना.गा.ज.३१०.०१।।	विष्णुमुद्रेचा अंकिला । तोचि वैष्णव एक भला
६	अंकिली	।।ना.गा.ज.३१४.०२।।	संतांचे घरची दासी मी अंकिली । विठोबानें दिली प्रेमकळा
७	अंकुश	।।ना.गा.ज.४३९.०५।।	अंकुश कडिया लेखणी । राया वोपी माझ्या पाणी
८	अंकूर	।।ना.गा.ज.३२६.०७।।	एक बीजाचा अंकूर । होय वृक्षासी विस्तार । शाखा पत्रें फळ फुलभार। बीजापोटीं सामावें
९	अंग	।।ना.गा.ज.२७९.०२।।	येऊनियां पांडुरंग । स्वयें टाळ धरी अंग
१०	अंग	।।ना.गा.ज.३७२.०३।।	चोख पाहे अंग । दीपे नाडला पतंग
११	अंग	।।ना.गा.ज.३८३.०४।।	रोग आणि व्याधी व्याधी आणि रोग । देह आणि अंग काय दोन
१२	अंग	।।ना.गा.ज.४४२.०७।।	पिटी लल्लाट करगळें। अंग टाकी धरणीं लोळे
१३	अंगणीं	।।ना.गा.ज.४०१.०२।।	रांगतसे हा अंगणीं । माथा जावळाची वेणी
१४	अंगद	।।ना.गा.ज.४३२.०३।।	दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त । मंथरा नाम माझें भरतें मारिली लाथ
१५	अंगारा	।।ना.गा.ज.३१०.०२।।	अहं जाळोनी अंगारा । सोहं भस्मीं तीर्थ सारा
१६	अंगासी	।।ना.गा.ज.४३१.०१।।	अग्नी लागतां अंगासी । घाबरले हृषिकेशी
१७	अंगिकार	।।ना.गा.ज.३१४.०३।।	विदूर सात्विक माझिये कुळीचा । अंगिकार त्याचा केला देवें
१८	अंगिकारी	।।ना.गा.ज.२३६.०२।।	भावें तिची अंगिकारी । सर्वांहुनी कृपा करी
१९	अंगीं	।।ना.गा.ज.२४०.०२।।	नाहीं अंगीं थोरपण । मिथ्या धरिसी गुमान
२०	अंगीं	।।ना.गा.ज.३०२.०४।।	शांतीचीं भूषणें मिरविती अंगीं। वैष्णव आणि योगी म्हणावे ते
२१	अंगीं	।।ना.गा.ज.३४७.०२।।	नाहीं अंगीं थोरपण । मिथ्या धरीसी गुमान
२२	अंगीं	।।ना.गा.ज.३७३.०१।।	भृंगीचिया अंगीं कोणतें हो बळ । शरिरें अनाढळ केली आळी
२३	अंगीं	।।ना.गा.ज.३७९.०१।।	अंगीं ल्याला शांती । दया क्षमा सर्वांभूतीं
२४	अंगींची	।।ना.गा.ज.४४३.०८।।	त्वचा अंगींची जळाली । हात पाय गोळा जाली
२५	अंगें	।।ना.गा.ज.२२२.०२।।	येऊनियां देव दळूं लागे अंगें । रखुमाईचा संग दूर केला
२६	अंगें	।।ना.गा.ज.२२२.०३।।	तैसाचि पैं संगें येऊनि बाहेरी । वेंचोनियां भरी शेणी अंगें

२७	अंगें	।।ना.गा.ज.२४१.०२।।	गोराकुंभाराच्या संगें । चिखल तुडवूं लागे अंगें
२८	अंगें	।।ना.गा.ज.३११.०१।।	वैष्णव तो एक इतर ती सोंगें । ठसे देउनी अंगें चितारिती
२९	अंगें	।।ना.गा.ज.३७३.०२।।	काय तिनें तपमुद्रा धरियेली। म्हणोनियां जाली भृंगी अंगें
३०	अंगें	।।ना.गा.ज.४४३.०२।।	अग्नि विझवोनी अंगें । सतीपुढें आला रागें
३१	अंडजीं	।।ना.गा.ज.४३५.०३।।	नवी व्याली जैसी गाय । पक्षी अंडजीं झेपाय
३२	अंत	।।ना.गा.ज.२००.०५।।	अंत किती पाहासी देवा । थोर श्रम जाला जीवा
३३	अंत	।।ना.गा.ज.२४९.०२।।	गीतेमध्यें आदि अंत । ऐसें बोलतो भगवंत
३४	अंत	।।ना.गा.ज.३४९.०१।।	आतां भीत नाहीं देवा । आदि अंत तुझा ठावा
३५	अंत	।।ना.गा.ज.४०३.०१।।	अहो गोकुळींच्या देवा । आदि अंत तुम्हां ठावा
३६	अंत	।।ना.गा.ज.४०३.०२।।	न लगे पुसावें हो कोणा । आदि अंत हो सुजाणा
३७	अंत	।।ना.गा.ज.४३१.०४।।	नामा म्हणे विठोबाला । भला अंत रे पाहिला
३८	अंतर	।।ना.गा.ज.१९८.०२।।	तूं माझें वो माहेर । काय पहातोसी अंतर
३९	अंतर	।।ना.गा.ज.३८२.०२।।	अखंडित शुद्ध असावें अंतर । लोणिया कठोर वाटे मनीं
४०	अंतरंग	।।ना.गा.ज.२२५.०४।।	पुरे पुरे रे विठ्ठला । जनिचा अंतरंग धाला
४१	अंतरंगे	।।ना.गा.ज.१८१.०२।।	धांव धांव पांडुरंगे । सखे जिवलगे अंतरंगे
